महाराष्ट्राचा इतिहास-मराठा कालखंड (भाग १)

शिवकाल

(१६३० ते १७०७ इ.)

डॉ. वि. गो. खोबरेकर
एम.ए., पीएच.डी.



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राचा इतिहास
मराठा कालखंड

भाग १

शिवकाल

(इ. स. १६३०–१७०७)

डॉ. वि. गो. खोबरेकर

एम.ए., पीएच.डी.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : नोव्हेंबर, २००६

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर (पूर्व), मुंबई ४०० ०१४.

मुद्रक :
व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
चर्नी रोड, मुंबई ४०० ००४.

किंमत : रुपये २७५

निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने इ. स. १९६३ जुलैमध्ये महाराष्ट्राचा इतिहास नव्याने उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक संदर्भासह पाच भागांत संपादित करून घेण्याचे ठरविले होते. या योजनेनुसार महाराष्ट्राच्या इतिहासाची प्राचीन, मध्ययुगीन, मराठा (भाग १ व २) व अर्वाचीन अशा पाच खंडात विभागणी करण्यात आली. महाराष्ट्र प्राचीन खंड, डॉ. शां. भा. देव यांनी संपादित केला. मध्ययुगीन इतिहास संपादण्याची कामगिरी डॉ. गो. त्र्यं. कुलकर्णी यांनी पार पाडली. मराठा कालखंड भाग २ चे लेखन डॉ. वि. गो. खोबरेकर यांनी केले. इ. स. १७०७ ते १८१८ पर्यंतचा इतिहास कालखंड मंडळाने इ. स. १९८८ मध्ये प्रसिद्ध केला. अर्वाचीन कालखंडाचे लेखन प्राध्यापक श्री. राजा दीक्षित यांजवर सोपविले आहे.

मराठा कालखंड भाग १ शिवकालाचा इतिहास (इ. स. १६३० ते १७०७) ह्याचे लिखाण मंडळाने डॉ. वि. गो. खोबरेकर यांजकडे सोपविले होते. ते त्यांनी पूर्ण करून मंडळाकडे प्रकाशनासाठी दिले. प्रस्तुत खंड हा त्याच प्रकल्पाचा भाग होय. डॉ. वि. गो. खोबरेकर यांनी परिश्रमपूर्वक हा खंड लिहून पूर्ण केला याबद्दल त्यांना मंडळातर्फे धन्यवाद देऊन हा खंड वाचकांसमोर सादर करीत आहे.

मधु मंगेश कर्णिक,
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

मुंबई,
दिनांक ५ जून २००६.

अर्पणपत्रिका

शिवशाहीच्या चिंतनात अखंड रममाण झालेले माझे जिवलग स्नेही कॅप्टन प्रतापसिंह घोरपडे (निवृत्त) भारतीय नौसेना व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. लिलाताई या उभयतांस अर्पण.

ऋणनिर्देश

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने महाराष्ट्राचा इतिहास "मराठा कालखंड" (इ. स. १७०७ ते १८१८) भाग २रा हा माझ्याकडे लिहिण्यासाठी सोपविला होता. तो ७८० पृष्ठांचा इतिहास साहित्य आणि संस्कृती मंडळाने इ. स. १९८८ मध्ये प्रसिद्ध केला. त्याच सुमारास महाराष्ट्राचा इतिहास "शिवकाल खंड" (इ. स. १६३० ते १७०७) भाग १ला लिहिण्याची कामगिरी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे पहिले अध्यक्ष ज्ञानतपस्वी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी माझ्यावर सोपविली हे मी माझे भाग्य समजतो. ह्या कालखंडाचा इतिहास मी लिहून पुरा केला आणि तो छापून प्रसिद्ध करण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे दिला आणि मी तर्कतीर्थांना दिलेल्या वचनातून मुक्त झालो.

मराठेशाहीचा समग्र इतिहास रियासतकार सरदेसाई यांनी रियासतीद्वारा लिहून पुरा केला. रियासतकारांनी मराठ्यांच्या इतिहासाचे दोन भाग केले. पहिला भाग मालोजी भोसलेपासून १७०७ पर्यंतचा. त्यास त्यांनी शिवकालाचा इतिहास असे नाव दिले. दुसरा भाग पेशवे कालखंडाचा तो इ. स. १७०७ ते १८१८ पर्यंतचा.

रियासतकार सरदेसाई यांनी मराठेशाहीचा इतिहास मराठी रियासतीच्या द्वारे पाच हजार पृष्ठांत लिहिला व महाराष्ट्रास ऋणी करून ठेवले.

रियासतकार सरदेसाई यांच्यानंतर शिवशाहीचा मालोजी राजेपासून ते राणी ताराबाई (१७०७) पर्यंतचा समग्र इतिहास, इतिहास संशोधक वा. सी. बेंद्रे यांनी लिहिला. तो असा (१) मालोजी राजे आणि शहाजी महाराज यांची विचिकित्सक चरित्रे, (२) श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र, (३) छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र व (४) श्री छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन "हिंदवी स्वराज्याचा मोंगलाशी झगडा" हे इतिहास लेखन इतिहास अभ्यासकांना ठाऊक आहे.

आदरणीय श्री. स. मा. गर्गे यांनी प्रसिद्ध केलेले रियासतीचे पहिले दोन खंड व इतिहास संशोधक वा. सी. बेंद्रे यांचे वर निर्देशिलेले चार ग्रंथ यांचा उपयोग मी हा शिवकालाचा इतिहास लिहिण्यासाठी केला आहे, हे येथे नमूद करावेसे वाटते.

ह्या बाबतीत माझे एकट्याचे श्रम लक्षात घेऊन माझे जिवलग स्नेही कॅ. प्रतापसिंह घोरपडे यांनी हस्तलिखित तपासण्याच्या कामी मला साहाय्य केले याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

पुस्तकातील चित्रांची सीडी माझी सुविद्य नात कुमारी योगिनी हिने करून दिली व माझी दुसरी नात चि. प्राजक्ता, एम.ए. हिने काही मजकूर संगणकावर टाईप करून दिला तसेच माझा पुतण्या डॉ. प्रकाश खोबरेकर, इतिहास संशोधन मंडळातील माझे सहकारी प्रा. कशेळकर, श्री. ज. बा. कुलकर्णी, श्री. शरद चिटणीस, प्रा. डॉ. दत्ता पवार व श्री. राहुल परब या सर्वांनी पुस्तकाची मुद्रिते तपासण्यास मदत केली. या सर्वांचे याबद्दल मी आभार मानतो.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे यांनी मला ह्या बाबतीत कार्यप्रवण केले, हे मी कृतज्ञतापूर्वक नमूद करतो. मंडळाचे सध्याचे सचिव श्री. उत्तमराव सूर्यवंशी व त्यांचे सहायक श्री. ज. श. साळवी व श्रीमती छा. दि. गोडांबे यांनी ह्याकामी विशेष लक्ष घातले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाचे श्री. मनोहर म. मांदाडकर यांनी आपला अमूल्य वेळ खर्च करून या ग्रंथाची मुद्रिते तपासली त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. शेवटी ग्रंथाची छपाई सुबकरीत्या केल्याबद्दल व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय व त्यांचे सहायक यांचे मी आभार मानतो.

वि. गो. खोबरेकर

९, 'यशोधाम' रिलीफ रोड
सांताक्रुझ (प.), मुंबई ४०० ०५४.

अनुक्रमणिका

शिवकालीन स्वराज्याची कारभार यंत्रणा,
सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवन

प्रस्तावना

शिवकाल (इ. स. १६३० ते १७०७)

सतराव्या शतकात मराठ्यांना महाराष्ट्र भूमीत स्वराज्य स्थापिण्यात सह्याद्री पर्वतराजीने फार मोठे साहाय्य केले. सह्याद्रीची उत्तुंग शिखरे, गोदावरी-कृष्णा-कोयना ह्यासारख्या नद्या, समृद्ध खोरी, समुद्राच्या फेसाळ लाटांनी स्पर्शित कोकणची प्राचीन भूमी हे सर्व महाराष्ट्राची जडणघडण दाखवितात. ह्या भूमीमध्ये सातवाहनांपासून मराठ्यांपर्यंतचा स्फूर्तिशाली इतिहास घडला.

महाराष्ट्र राष्ट्राच्या राष्ट्रीयत्वाचा प्रारंभ सतराव्या शतकाच्या सुरवातीपासून होतो. या शतकाच्या सुरवातीस दक्षिणेत सुलतानांच्या राजवटी चालू होत्या. निजामशाहीतील आपापसातील भांडणात मालोजी भोसले यांना रणांगणवर इ. स. १६०६त मृत्यू आला. सतराव्या शतकाच्या सुरवातीस लखुजी जाधवराव, निंबाळकर, घोरपडे, मालोजी व विठोजी भोसले वगैरे मराठा सरदारांनी आपल्या शौर्याच्या आणि कर्तृत्वाच्या सामर्थ्यावर सुलतानराजवटीत मोठमोठाले हुद्दे मिळविण्याचे प्रयत्न केले ते यशस्वीही झाले. मालोजी राजे यांनी सुलतानीत मोठा हुद्दा पत्करून शौर्य धैर्यांनी कीर्ती संपादन केली आणि सर्वधर्मीय लोकांच्या सोयीसाठी जे प्रयत्न केले त्यामुळे भोसले घराण्याचे महत्त्व वाढले आणि त्यांना सुसंघटित व एकनिष्ठ असे मनुष्यबळ तयार करता आले. शहाजी महाराजांनी इस्लामी शाह्यांच्या कमकुवतपणाचा फायदा घेऊन आपली हुकुमत वाढविली व इस्लामीशाह्यांना शहाजी महाराजांस व त्यांच्या साथीदारांस मदतीसाठी वजिरी वगैरे देऊन पठाणी सरदारांच्या बरोबरीचा दर्जा देण्यात आला. त्यामुळे मराठा सरदारांतील न्यूनगंड नष्ट होऊ लागला. त्यांची स्वातंत्र्याकडे ओढ वाढू लागली. शहाजी महाराजांना स्थानिक समाजात वाढते नेतृत्व प्राप्त होत आहे, त्यास वेळीच आळा घालावयास हवा म्हणून शहाजहान बादशहाने त्यांना त्यांच्या समाजापासून अलिप्त राखण्यासाठी दूर कर्नाटकात रवाना करविले होते. आदिलशहाने ही मोगलांची अट मान्य करून शहाजी राजांना मोठ्या मानसन्मानाने फर्जंद म्हणून पंधरा हजारी देऊन त्यांना आदिलशाहीत नेले. यावेळी शहाजी राजांनी महाराष्ट्रात पुणे सुपे, कर्नाटकांत बंगळूर अशा दोन जहागिऱ्या ठेवण्यात खूपच दूरदृष्टी दाखविलेली होती. ह्या दोन

जहागिऱ्यांच्या साहाय्याने कर्नाटकात व महाराष्ट्रात आपण हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचे प्रयत्न आपले थोरले चिरंजीव संभाजी राजे व शिवराय यांच्या करवी करण्याचे योजिले आणि त्यात त्यांना सुयशही आले. शिवराय यावेळी जिजामातेसह पुण्याच्या जहागिरीवर होते. त्यांना आईसह बंगलोरला बोलावून घेतले. बंगलोरास आल्यावर ह्या दोन्ही मुलांना सर्व प्रकारचे सैनिकी शिक्षण व राज्यकारभाराचे प्रशिक्षण दोन वर्षांत बंगलोर मुक्कामी देऊन त्यांत त्यांना तरबेज केले (ग्रँट डफ ४थी आ. पृ. १०७) ह्या उभयतां चिरंजीवांना प्रशिक्षण देत असता त्यांच्या मनावर स्वराज्याचा महामंत्र कोरवला. थोरले पुत्र संभाजीराजे यांना स्वतंत्र मराठी राज्य कर्नाटकात आपल्या साहाय्याने पुढील काळात स्थापिण्यासाठी बंगलोरला आपल्या सानिध्यात ठेवले. बंगरुळ येथील दोन वर्षाच्या वास्तव्यानंतर शहाजी राजांनी शिवरायाची रवानगी पुण्यास केली. बरोबर आपल्या तालमीत तयार झालेले मुत्सद्दी दिले. पुण्याची जहागीर दिली. तोफा, हत्ती, घोडे व जागजागी गडकोटांतून साठविलेला सरंजाम दिला. त्याच्या जोरावर शिवरायांनी स्वराज्याची भव्य इमारत रचिली असे राजवाडे सांगतात तेच खरे होय. अशा रीतीने शिवाजीराजांच्या वयाच्या बाराव्या वर्षी महाराष्ट्रात भावी स्वराज्याचा पाया घालण्याचे काम शहाजी राजांनी केले. स्वराज्य स्थापिण्याच्या बाबतीत शहाजी महाराजांनी विशेष महत्त्वाची कामगिरी केली. ती म्हणजे शहाजी महाराज आदिलशहाच्या कैदेतून मुक्त झाल्यानंतर त्यांनी मोठमोठे मावळे सरदार गोळा करून त्यांचे जवळून प्राणाचीही पर्वा न करता शिवरायांस त्यांच्या हिंदवी स्वराज्याच्या कार्यात मदत करावयाचा मंत्र दिला. विशेषतः आदिलशाही व मोगल फौज शिवरायावर चालून गेली तर त्या फौजेस देहार्पण करीपर्यंत प्रतिकार करावयाचा असे सांगून त्यांजकडून आणा शपथा घेऊन व देऊन त्यांना शिवरायाकडे रवाना केले. हीच मंडळी शिवरायांच्या सुरुवातीच्या १२-१४ वर्षांच्या काळात उपयोगास आली. शहाजीराजांनी कर्नाटकातील लोकांवर विसंबून राहून आपल्या जुन्या सैनिक सरदारांना हिंदवी स्वराज्यासाठी कष्ट, मेहनत, श्रमसायास करण्यास पाठविले. त्यांनी स्वतःच्या सुखसोईपेक्षा आपल्या थोर उद्दिष्टांसाठी सर्वस्व त्याग करण्याची तयारी दाखविली.

स्वराज्याच्या कार्यास सुरुवात :

इ. स. १६४२च्या अखेरीस बाल शिवराय राजमातेसह पुण्यास आल्यावर दादाजी कोंडदेवाने जिजामातेच्या नेतृत्वाखाली पुणे पुन्हा वसविले. पुण्याभोवतालचा मावळ प्रदेश त्यातील किल्ले ताब्यात घेऊन नीट

व्यवस्थेत आणून तिथे शांतता व एकसूत्री कारभार सुरू केला. दादोजी कोंडदेव १६४७त निवर्तल्यावर महाराजांनी रोहिडा किल्ला काबीज केला आणि तिथे सहकाऱ्यांसह स्वतंत्र सत्ता चालू केली. ऐतिहासिक कागदपत्रांवरून वयाच्या १६व्या वर्षांपासून शिवाजी राजांना 'छत्रपती' या नावाने संबोधण्याचा प्रारंभ झालेला होता असे दिसते. छत्रपती ही पदवी धारण केल्यावर खाली दिलेली मुद्रा ही भावी स्वराज्याच्या कागदपत्रांवर मुद्रित करण्याचे निश्चित ठरले. ती मुद्रा म्हणजे शिक्का. तीवर खालील मजकूर आहे.

प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते।।

"हा शहाजीचा मुलगा शिवाजी याची मुद्रा प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे सारखी वाढत जाण्याचा तिचा धर्म असून ती सर्व जगाला पूज्य आहे. ती लोकांच्या कल्याणासाठी शोभत आहे."

शिवाजी महाराजांनी पुण्यास आल्यावर मावळ्यांच्या मदतीने तीन पातशाहीस सोडून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. सागरी सत्तांना आव्हान देण्यासाठी शिवाजी महाराजांनी नौदल उभारले. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात अगदी अप्रसिद्ध व हीन स्थितीत असलेले लोक भराभर पराक्रम गाजवू लागले. भिक्षुकांचे मुत्सद्दी झाले. शेतकऱ्यांचे सेनापती व जागीरदार झाले, कारकुनांचे अंमलदार बनले. मुसलमान झालेल्या हिंदूस स्वधर्मात परत घेण्याचे धाडसी कर्तव्य पार पाडले. महाराजांनी सर्व धर्मीयांना अत्यंत निःस्पृह व समान दृष्टीने वागविले. म्हणून त्यांच्या राज्यांत कोणीही मुसलमान धर्माचरणाचे बाबतीत नाखूष नव्हता. संस्कृत व मराठी भाषांबद्दलचा महाराजांचा निर्णय अनुपमेय वाटतो. दरबारचा पत्रव्यवहार मराठी भाषेत लिहिण्याचा क्रम त्यांनी सुरू केला. त्यासाठी राजव्यवहार कोश तयार करविला व फारशी शब्दांचा उपयोग करू नये अशी तजवीज महाराजांनी केली. अशा प्रकारे उदात्त ध्येयवादाने महाराजांनी राजा आणि प्रजा यांचे अतूट नाते निर्माण केले. महाराजांच्या निर्वाणानंतर हे राज्य आपण सहज जिंकू असे औरंगजेबास वाटले म्हणून त्याने मराठी राज्यावर लाखो सैनिकांसह स्वारी केली. प्रथम संभाजी महाराजांनी आणि नंतर राजाराम महाराज व राणी ताराबाईंनी औरंगजेबाशी मुकाबला केला. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रात जो स्वातंत्र्य संग्राम झाला तो तर अपूर्वच होता. राजा नाही राजधानी नाही, सेना नाही, सेनानी नाही अशा दुर्धर अवस्थेमध्ये महाराष्ट्राने औरंगजेबाच्या आक्रमणाची लाट

परतवून लावली आणि शिवरायांनी आपल्याला कोणता चैतन्य संदेश दिलेला आहे हे कृतीने दाखवून दिले. असा हा गौरवशाली इतिहास साधनांच्या आधारे ह्या ग्रंथात मांडला आहे.

शिवकाल इतिहासांच्या साधनांचा परिचय :

शिवकालाचे दप्तर राजधानी रायगडला होते. ते इ. स. १६८९ मध्ये मोगलांनी जाळले.

आजतागायत शिवकाल (इ. स. १६३० ते १७०७) इतिहासाचे विपुल साधन ग्रंथ व संदर्भ साहित्य प्रसिद्ध झाले आहेत. साधन ग्रंथांचा थोडक्यात परिचय करून दिला आहे.

मोगल बादशहा तवारीखा लिहून घेत. त्यावरून तत्कालीन घटनांची माहिती मिळते. अकबरनामा, शहाजहानचा बादशहानामा, औरंगजेबाचे अखबारात, औरंगजेबकालीन लेखक भीमसेन ह्याने लिहिलेला " दिलकुशा " नावाचा फार्सी ग्रंथ, बसातिन उस्ससलातीन म्हणजे विजापूरच्या आदिलशाहीचा इतिहास, तबातबाचा बुऱ्हान-इ-मासिर यांतील बहुशः भाग अहमदनगरच्या निजामशाहीचा इतिहास, ही सर्व तत्कालीन फार्सी साधने आज मराठीत उपलब्ध आहेत. राजस्थानी रेकॉर्डस तसेच दःखनी हिंदीतील कवी मुल्ला नुस्रती आणि हाशमी यांची काव्येसुद्धा तत्कालीन ऐतिहासिक माहिती देतात.

मराठीतील बखरी ही दुय्यम साधने होत. डॉ. र. वि. हेरवाडकर यांनी आपल्या मराठी बखर या ग्रंथात शिवपूर्वकालीन बखरी (पृ. क्र. ७९-९३), शिवकालीन बखरी (पृ. क्र. ४-१२४) यांची माहिती दिली आहे. तसेच इतिहास संशोधक बेंद्रे यांनी आपल्या शिवकालीन सर्व ग्रंथात बहुतेक सर्व बखरीतील माहिती उद्‌धृत केलेली आहे.

भारताच्या मध्ययुगीन इतिहासाकरिता तत्कालीन प्रवासवर्णने ही बहुमोल इतिहास साधने होत. सतराव्या शतकातील भारत परिभ्रमणाचा वृत्तान्त लिहिणारे सर टॉमस रो, डॉ. जॉन फ्रायर, ट्रॅव्हर्नियर, डेलॉन, कॅरेरी, ओव्हिंग्टन, मनुची, नॉरीस, हॅक्लवीट सोसायटीने प्रसिद्ध केलेले ॲबेकॅरेचे प्रवास वर्णन ही सतराव्या शतकाच्या इतिहासाची साधने होत.

पोर्तुगीज, डच आणि इंग्लिश यांचा तत्कालीन पत्रव्यवहार सतराव्या शतकातील इतिहास साधनात मोडतो. सतराव्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांतील इतिहास व घटना " हिंदुस्थानातून पाठविलेली कागदपत्रे " या मथळ्याखाली तीन भागात प्रसिद्ध झालेली आहेत. इंग्लिश व डच फॅक्टरी

रेकॉर्डसचा व काही पोर्तुगीज पत्रांचा अल्पसा परिचय शिवकालीन पत्रसार संग्रहाच्या तीन खंडातून व संभाजीकालीन पत्रसारसंग्रहातून होतो.

" इंग्लिश फॅक्टरीज इन इंडिया " ही इंग्रजी साधने व डच डाग रजिस्टर्स हा अव्वल साधनांचा ठेवा आहे. मद्रास शासनाने प्रसिद्ध केलेले फोर्ट सेंट जॉर्ज सिरीज, तेलीचरी कॉरस्पॉडन्स सिरीज, इनवर्ड आणि आऊटवर्ड, कोर्ट मिनिट्स तसेच इंग्रजांची प्रवास वृत्ते व इंग्रज नाविकांनी लिहिलेल्या डायऱ्या व वृत्तांत यांच्यातही तत्कालीन अनेक घटना व परिस्थिती यांच्याविषयी भरपूर माहिती मिळते. फ्रेंच भाषेतील मराठी अनुवाद झालेली मार्टीन डायरी हेही एक साधन आहे.

तत्काळातील मराठी कागदपत्रांचे संशोधन इतिहासाचार्य राजवाडे यांनी करून "मराठ्यांच्या इतिहासाची साधने" ही माला सुरू केली. या मालेतील खंड ८, १५, १७, १८, २० व २१ यामध्ये सतराव्या शतकातील शिवकालीन घराणी व त्यांचा पत्रव्यवहार ही शिवकालाची अव्वल साधने आहेत. भारत इतिहास संशोधक मंडळाने शिवचरित्र साहित्याचे अकरा भाग प्रसिद्ध केले. ऐतिहासिक दफ्तरे अभ्यासून शिवचरित्र वृत्तसंग्रहाचे तीन भाग भारत इतिहास संशोधक मंडळाने प्रसिद्ध केले. अव्वल साधनांची ही माहिती थोडक्यात दिलेली आहे.

विशेषत: इ. स. १६८० ते १७०७ ह्या कालखंडातील मराठ्यांच्या पराक्रमाचा इतिहास ज्या साधनांच्या आधारे लिहिला आहे त्या बहुतेक सर्व ग्रंथांची यादी इथे दिलेली आहे.

शिवकालीन कागदपत्रांचा शोध घेण्यासाठी इ. स. १९६५ पासून केलेले प्रयत्न :

शिवकालाचा इतिहास लिहिण्याची कामगिरी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने माझ्यावर १५ वर्षांपूर्वी सोपविली. त्या अगोदर इ. स. १९६६ मध्ये इतिहास तज्ज्ञांच्या विनंतीवरून महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने शिवाजी महाराजांची जन्मतिथी निश्चित करण्यासाठी इतिहास तज्ज्ञांची एक समिती नेमली. त्या समितीचे सचिवपद डॉ. मो. ग. दीक्षित निवर्तल्यावर माझ्याकडे सन १९६८ पासून आले. या समितीवर सदस्य म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार, प्रा. न. र. फाटक यांनी काम केले. या दोन सदस्यांनी शिवजन्माच्या फाल्गुन वद्य तृतीया १६३० या तिथीसाठी तत्कालीन पुराव्याचा शोध घेण्यात यावा असे सुचविले. त्यासाठी समितीच्या संमतीने मी पुराभिलेख विभागांतील

सहायक संचालक सु. ना. शास्त्री, एम.ए. यांना बंगलोरच्या बाजूस शिवकालीन कागदपत्रांचा शोध घेण्यासाठी रवाना केले. कारण ह्या विदुषीस कन्नड, मराठी, हिंदी व इंग्रजी अशा चार भाषा येत होत्या. शिवाय त्या प्रदेशात त्यांचे नातेवाईक राहत होते. सौ. शास्त्री यांनी १ सप्टेंबर १९७० पासून ४ ऑक्टोबर १९९० पर्यंत शिवकालीन कागदपत्रांच्या शोधासाठी कर्नाटकात दौरा केला. बंगलोर, म्हैसूर, तुमकर, धारवाड, बनवासी आदी ठिकाणातील वाचनालये, विद्वजन यांना त्या भेटल्या. दौऱ्यात त्यांनी अनेक नामवंत ऐतिहासिक घराणी व मठ यांजकडील ऐतिहासिक कागदपत्रांची माहिती मिळविली. त्यांत त्यांना शिवकालीन कागदपत्रे सापडली नाहीत. सौ. शास्त्री यांनी आपल्या ह्या दौऱ्याचा रिपोर्ट पुराभिलेख खात्यास दिला. तो पुराभिलेख विभागाचा वार्षिक अहवाल १९७०-१९७१ यांत परिशिष्ट ६ पृष्ठ क्रमांक ८० ते ९० वर प्रसिद्ध झालेला आहे.

ह्या अगोदर मी भारत इतिहास संशोधक मंडळाचे प्रा. ग. ह. खरे यांजबरोबर सन १९६५ मध्ये बिकानेर येथील राजस्थान अभिलेखागारास भेट देऊन एक आठवडा तिथे मुक्काम करून प्रा. ग. ह. खरे यांजसोबत शिवकालीन इतिहासासाठी उपयुक्त कागदपत्रांचा शोध घेतला. बिकानेर रेकॉर्ड कार्यालयात राजपुतान्यातील सर्व संस्थानाची मिळून सुमारे ६ कोटी कागदपत्रे आहेत. ती मोडी, राजस्थानी डींगल, हिंदी, फारसी व इंग्रजी या भाषांत आहेत. आम्हास त्यात शिवजन्मासंबंधी किंवा त्याकालचे कागदपत्र मिळाले नाहीत. पण प्रा. खरे यांनी आणखी तीनदा त्या दप्तरखान्यास आपल्या मित्रांसह भेट देऊन औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार दि. ४ डिसेंबर १६६५ ते १६८५ या कालाचे नकलून प्रसिद्ध केले. हे सर्व फारसी कागद भारत इतिहास संशोधन मंडळाच्या ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ६वा यात प्रसिद्ध झाले आहेत. ह्या अव्वल दर्जाच्या शिवकालासंबंधीच्या कागदपत्रांचा उपयोग मी ह्या ग्रंथासाठी केलेला आहे.

तसेच इतिहास पंडित सेतुमाधवराव पगडी यांनी माझ्याकडे अनुवाद करून प्रसिद्धीस दिलेली औरंगजेब दरबारची बातमीपत्रे, औरंगजेबाचे निवडक आदेश, मोगल दरबारची बातमीपत्रे, बागलाणचा दौलतमंदखान याची पत्रे, तोरण्याच्या मोगल किलेदाराची पत्रे, शाइस्तेखानाची पत्रे इत्यादी शेकडो फारसी पत्रांचे मराठीत केलेले अनुवाद मी १ जानेवारी १९७५

ते १९ एप्रिल १९८४ पर्यंत भारतीय इतिहास आणि संस्कृती या त्रैमासिकाच्या अंकात प्रसिद्ध केले आहेत आणि या सर्व साहित्याचा उपयोग प्रस्तुत ग्रंथासाठी केलेला आहे.

पंडित पगडी यांनी अनुवाद केलेली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने १९७८ मध्ये प्रसिद्ध केलेली मोगल दरबारची बातमीपत्रे यांचाही उपयोग मला झालेला आहे.

आम्ही इतिहास संशोधन मंडळातर्फे महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने महाराष्ट्र इतिहास परिषदेची दोन अधिवेशने १ नोव्हेंबर १९७४ व इ. स. १९८२ यावर्षी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती होण्यासाठी भरविली. महाराष्ट्राच्या शिवपूर्व व शिवकालीन इतिहासाच्या साधनांचे मूल्यमापन चर्चेद्वारा होऊन शिवकालाच्या इतिहासाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व इतर अनेक अंगावर प्रकाश टाकणे असा ह्या दोन परिषदांचा मुख्य हेतू होता. या दोन्ही अधिवेशनात वाचलेले शोधनिबंध पुस्तकरूपाने मंडळातर्फे आम्ही प्रसिद्ध केलेले आहेत. तत्पूर्वी छत्रपती श्री शिवाजी महाराज त्रिशत सांवत्सरिक राज्यारोहण समारोह विशेषांक एप्रिल १९७४ हा इतिहास संशोधन मंडळातर्फे प्रसिद्ध केला यांतील लेखांचा उपयोग प्रस्तुत ग्रंथासाठी केला आहे. छत्रपती श्री शिवाजी महाराज त्रिशत सांवत्सरी राज्यारोहण समारोह शासनातर्फे ६ जून १९७४ रोजी साजरा झाला. ह्या राज्यारोहण महाराष्ट्र राज्य समारोह समितीचा मी प्रमुख कार्यवाह होतो. ह्या राज्यारोहण समारंभाचा भाग म्हणून आम्ही इतिहास संशोधन मंडळाने चालविलेल्या, भारतीय इतिहास आणि संस्कृती या त्रैमासिकाचा विशेषांक प्रसिद्ध केला. त्यात अस्सल कागदपत्रांवर आधारित इतिहास संशोधकांचे १० लेख प्रसिद्ध केले आहेत.

'तारीखे दिलकशा' नावाचा शिवकालीन ग्रंथ फारसी भाषेत भीमसेन सक्सेना नावाच्या उत्तर प्रदेशियाने लिहिला. त्याची मराठी, इंग्रजी भाषांतरे इतिहासाभ्यासूस उपलब्ध आहेत. पंडित पगडी यांनी ह्या फारसी ग्रंथाचा मराठीत अनुवाद केला असून सर जदुनाथ सरकार यांनी ह्या फारसी ग्रंथाचा इंग्रजीत अनुवाद केला. तो इंग्रजी अनुवाद पुस्तकरूपाने सटीप मी छापला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज त्रिशत सावंत्सरी राज्यारोहण समारोहानिमित्त शासनाने आम्हास संबंध भारतात फिरून शिवकालीन कागदपत्रे जमवून ती प्रसिद्ध करण्यास सांगितले. आम्ही शासन हुकुमानुसार पुणे पुराभिलेख विभागातील जमाव दप्तरातील कागद, म्हसवड येथील माने घराणे, पाटण येथील पाटणकर घराणे, त्रिंबकचे ढेरगे घराणे, नेवासे येथील कमरुद्दीन घराणे यांजकडून शिवकालीन कागदपत्रे जमवून ती एकूण १४९ कागदपत्रे 'रेकॉर्डस ऑफ द शिवाजी पिरियड' या नावे पुस्तकरूपाने शिवराज्यारोहण समारंभाच्या निमित्ताने आम्ही प्रसिद्ध केली. या साधनांचा उपयोग मी ह्या ग्रंथासाठी केलेला आहे.

(२) राज्याभिषेकानंतर शिवाजी महाराज कर्नाटक स्वारीवर गेले, जिंजीपर्यंतचा मुलूख राज्यात आणिला. ह्या मुलुखाची ताबेदारी मराठी अधिकाऱ्यांकडे राहिली. तंजावर राज्य महाराजांनी आपला सावत्र भाऊ एकोजी यांजकडे राहू दिले. औरंगजेब बादशहा महाराष्ट्र राज्य जिंकून घेण्याकरिता महाराष्ट्रात आला. त्याजबरोबर जिंजीस राहून राजाराम महाराजांनी मुकाबला केला. जिंजी मुसलमानांनी इ. स. १६९८त मराठ्यांकडून घेतली. तिथपासून कर्नाटकावरील शिवकालीन सत्ता लोप पावली. कर्नाटकांत शिवकालात ज्या मराठ्यांच्या झुंजी मुसलमान सत्ताधीशांशी झाल्या त्यासंबंधीची हस्तलिखित कागदपत्रे मद्रास रेकॉर्ड ऑफिस, त्रिचनापल्ली, टेनापल्ली व तंजावर येथे राखून ठेवली आहेत. हे मला पुराभिलेख खात्याचा संचालक असताना इ. स. १९६९ साली समजले. तेव्हा शासनाकडून परवानगी घेऊन मी इतिहास संशोधक श्री. देविसिंह चव्हाण व प्रा. ग. ह. खरे ह्या दोन पुरातत्त्व मंडळाच्या सदस्यांसह मद्रास, त्रिचनापल्ली, तंजावर या ठिकाणी मार्च १९७० मध्ये गेलो. ऐतिहासिक कागदपत्रांची तपासणी तिघांनी केली व तपासणी रिपोर्ट शासनाकडे पाठविला. वरील ठिकाणचे कागद मोडीत असून त्यात जमीन महसूल, ताळेबंद, मोजमापे, पिकांची पाहणी इत्यादी विषयांचा मजकूर आहे. ते वरील तिन्ही ठिकाणी व्यवस्थित ठेवलेले आढळले. त्यांत शिवकालीन ते इ. स. १७०७ पर्यंतचा पत्रव्यवहार मुळीच नाही. ही कागदपत्रे गावगन्ना रेकॉर्डची असून त्यात तत्कालीन तामीळ भाषेतील महसूलविषयक शब्दांचा भरणा जास्त आहे. प्रस्तुत पत्रसंभार तेथील आर्थिक आणि समाजशास्त्राच्या

इतिहासाच्या स्थानिक विद्यार्थ्यांच्या उपयोगाचा आहे. ह्या कागदपत्रासंबंधीचा सविस्तर अहवाल पुराभिलेख व पुरातत्त्व विभाग महाराष्ट्र शासन वार्षिक अहवाल सन १९६९-१९७० यात अंतर्भूत केलेल्या परिशिष्ट ३ व ४ मध्ये आहे. तीच परिस्थिती हैद्राबाद रेकॉर्ड दप्तरांतील कागदपत्रांची आहे. ही वस्तुस्थिती असताना काही आपमतलबी माणसे तंजावर, मद्रास, हैदराबाद येथे शिवकालीन कागदपत्रे आहेत असे खोटे सांगून वरील स्थळांना शासनाच्या पैशाने भेटी देतात. त्यास आळा बसावा म्हणून हे सत्य लिहिले आहे.

शिवकालीन इतिहासाची साधने (इ. स. १६३० ते १७०७) :

पुणे येथील पुराभिलेखागारांत इनाम कमिशन चौकशीची १६३१ दप्तरे आहेत. प्रत्येक दप्तरात सरासरी एक हजार कागद असावेत. यातील कागदपत्रांची वर्णनात्मक सूची तयार होत आहे. याशिवाय जमाव दप्तरात जे ८००९ रुमाल आहेत, त्यातील कागदपत्रांची तपासणी केल्यास पेशवा बाळाजी विश्वनाथांच्या पूर्वीचे कागद या दप्तरात मिळण्याचा संभव आहे. ह्याच दप्तरात शिवकालीन तसेच विजापूर व नगरच्या पातशाही वेळचे कागद मिळण्याचा संभव आहे असे प्राच्यविद्या पंडित ए. एम. डी जॅक्सने आपल्या रिपोर्टात सांगितले आहे (पहा : खोबरेकर, महाराष्ट्रातील दप्तरखाने, पृ. २०-२१).

शिवाजी महाराजांचे पूर्वज महाराष्ट्रात मेवाडातील सिसोदे राज्यातून आले. त्याबद्दलची हकिगत खालीलप्रमाणे :

या घराण्याचा मूळ पुरुष राणा सुजन सिंह व त्याचा भाऊ दिलीपसिंग, दोघेही दक्षिणेत येण्याचे कारण असे : हे मेवाडातील सिसोदे राज्याचे राणा अजयसिंहाचे पुत्र. अजयसिंहाने त्यांजवर आपल्या राज्यास जो त्रास देतो त्याचा बंदोबस्त करण्याची कामगिरी सोपविली. हे बंदोबस्ताचे काम त्यांच्या हातून झाले नाही. म्हणून अजयसिंहाने हे काम आपला पुतण्या हमीर यास सांगितले. त्याने राज्यास त्रास देणाऱ्याचे शीर कापून आणून ते अजयसिंहापुढे ठेविले. अजयसिंह ह्यामुळे पुतण्या हमीरवर खूष होऊन त्याने त्यास आपला वारस नेमिले. तो अजयसिंहांच्या दिवंगत थोरल्या भावाचा मुलगा होता व म्हणून वारसदार होता. हे ह्या दोन्ही भावांस न

आवडून ते आपले नशीब काढण्यासाठी महाराष्ट्रात सन १३३४ मध्ये आले. त्यांच्यापासून पुढे भोसले व घोरपडे या घराण्याची उत्पत्ती झाली. शहाजी महाराज आपण रजपूत असल्याचे अभिमानाने महंमद आदिलशहास सतराव्या शतकाच्या प्रथमार्धातच (१६४३त) बजावतात. (बेंद्रे, छ. शिवाजी महाराज, पृ. ११) सोळाव्या शतकातील इतिहासकार फेरिस्ता तेच सांगतो. भोसले व घोरपडे या दोन्ही घराण्याचा जिवंत इतिहास प्रचलित असताना व हिंदी व दक्षिणी कवी शिवरायांच्या राज्याभिषेकापूर्वीच्या आपल्या लेखनात शिवरायांस सिसोदेवंशीय म्हणत आहेत.

शिवाजी महाराज हे सिसोदिया राजपूत जातीचे आहेत, हे शिवकालातच अनेक पुराव्यांनी सिद्ध झाले आहे. शिवाजी महाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी ह्याने राज्याभिषेकापूर्वी राजपुतान्यांत जाऊन उदयपूरच्या सिसोदे घराण्यातून शिवाजी महाराजांची उत्पत्ती झाली हे दाखविणारा वंशवेल सिद्ध करण्यात आला. तोच सध्या उपलब्ध आहे असे रियासतकार सरदेसाई सांगत आहेत. (शककर्ता शिवाजी पृ. २९३) असे असताना शिवाजी महाराजांचा पूर्वज हा कर्नाटकातील एका यादव घराण्याचा मूळ पुरुष आहे असे डॉ. रा. चिं. ढेरे आपल्या शिखर शिंगणापूरचा श्री शंभू महादेव या ग्रंथात सांगून त्यांनी छत्रपतींच्या जातीचा नवा विवाद सुरू केला आहे. त्या नव्या विवादाचा खरपूस समाचार डॉ. जयसिंगराव पवार यांनी 'शिवछत्रपतींचे कूल : मिथक आणि वास्तव' ह्या आपल्या शोधनिबंधात घेतला असून डॉ. ढेरे यांचा गवळी सिद्धांत पुराव्यानिशी खोडून काढला आहे. (पहा समाज प्रबोधन पत्रिका, ऑक्टोबर-डिसेंबर, २००३).

शिवाजी महाराजांच्या पितृत्वाबद्दलचे खोडसाळ लिखाण :

प्रसिद्ध इतिहासकार डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी 'एडमिनिस्ट्रेटिव्ह सिस्टिम ऑफ द मराठास' ह्या आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत पृष्ठ क्र. ३.७ वर कॉस्म द ग्वार्दा या पोर्तुगीज लेखकाने शिवाजी महाराजांच्या पितृत्वाबद्दल इ. स. १६९५ साली खोडसाळ लिहिल्याचे सांगितले आहे. व ही माहिती थोर इतिहास संशोधक वि. का. राजवाडे, पांडुरंग पिसुर्लेकर यांच्या वाचनात आल्यावर त्यांनी ह्या पोर्तुगीज लेखकाचा तीव्र शब्दात धिक्कार केला. हे आपल्या प्रस्तावनेच्या पृष्ठ क्र. ८ वर नमूद करून डॉ. सेन म्हणतात की पोर्तुगीज लेखकाने शिवाजी महाराजांच्या पितृत्वाबद्दल

लिहिलेली माहिती असत्य आणि धादांत खोटी अस्वीकाराहार्य आहे, हे त्यांचे म्हणणे प्रस्तावनेच्या पृ. ८ वर आहे (शिवाजी महाराजांनी बार्देसमध्ये पोर्तुगीज जुलूम करून हिंदूंना बाटवू लागले हे ऐकल्यावर बार्देसवर नोव्हेंबर १६६७ मध्ये स्वारी करून जुलूमाने बाटविणाऱ्या तीन पादऱ्यांना शिवरायाने यमसदनास पाठविले. ह्याचे उट्टे काढण्यासाठी ह्या पोर्तुगीज लेखकाने शिवाजी महाराजांबद्दल खोडसाळ लिहिले असावे.) (पोर्तुगीज-मराठे संबंध : डॉ. पिसुर्लेकर, पृ. ४८)

शिवाजी महाराजांच्या पितृत्वासंबंधीचे जेम्स लेन या अमेरिकन लेखकाकडून लिहून घेतलेले खोडसाळ लिखाण :

अमेरिकन लेखक जेम्स लेन याने शिवाजी महाराजांच्या पितृत्वासंबंधीचा मजकूर इ. स. २००३ मध्ये ‘ शिवाजी : हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया ’ ह्या पुस्तकात प्रसिद्ध केला आहे. ह्या अमेरिकन लेखकाने हे पुस्तक पुण्याच्या भांडारकर प्राच्य विद्या संशोधन केंद्रात वस्तीस राहून पुरे केले. अमेरिकन लेखक जेम्स लेन हे इंग्रजी मातृभाषा असलेले अमेरिकन नागरिक आहेत. ते इ. स. १९८६ पासून आपल्या लिखाणासाठी पुण्याच्या भांडारकर प्राच्य विद्या संशोधन केंद्रात राहून त्यांनी ‘ शिवाजी : हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया ’ हे पुस्तक भांडारकर प्राच्य विद्या संशोधन केंद्रातील मराठी मातृभाषा असलेल्या कोणा विद्वानाच्या मदतीने लिहिले आहे. हे पुस्तक इंग्रजीत आहे. ह्या अमेरिकन लेखकाने कोणताही भक्कम पुरावा न देता ऐकीव बातमीवर दादाजी कोंडदेव यांना शिवाजी महाराजांचे पिता मानले आहे. यामध्ये शिवाजी महाराज, राजमाता जिजाबाई व शहाजीराजे यांची उघडपणे बदनामी केलेली आहे.

इ. स. १६३० पर्यंत तरी दादाजी कोंडदेव हे शहाजी राजांकडे नोकरीला होते असे उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येत नाही. (बेंद्रेकृत मालोजी राजे व शहाजी महाराज, पृ. २४३) इ. स. १६३६ मध्ये शहाजीराजे यांना आदिलशहाने सरंजामास मुलूख दिला त्यात पुणे देश राजियांकडे दिला. त्यांनी आपले तर्फेने दादाजी कोंडदेव मलठणकर यांसी सुभा सांगून पुण्यास ठाणे घातले. (म.रि.भा. १, पृ. ८२).

शिवाजी महाराजांच्या जन्मानंतर इ. स. १६३६ मध्ये दादाजींचा संबंध शहाजीराजांशी आला आहे. हे विसरून विकृत मनाच्या लोकांनी शिवाजी महाराजांविषयी वेडेवाकडे व खोटारडे आरोप निर्माण करून ते जेम्स लेनकडून लिहून घेतले असे म्हणावे लागते. पुराणमतवाल्या लोकांनी शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकालासुद्धा विरोध केला होता. त्यामागे वर्णवर्चस्वाची भूमिका होती. तीच भूमिका आजही कायम आहे असे खेदाने म्हणावे लागते. अशा विशिष्ट विकृत मनोवृत्तीच्या मंडळीनी शिवचरित्र आपल्या मनासारखे लिहिण्यास लेन यास मदत केली हे सत्य आहे. तेव्हा जगतवंद्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या पितृत्वाबद्दलची अशी अश्लाघ्य व खोटी माहिती पुरविल्याबद्दल शासनाने कठोर भूमिका घेणे आवश्यक आहे.

वि. गो. खोबरेकर

१. शिवपूर्वकाल

श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी ह्या महाराष्ट्र देशात स्वराज्याची स्थापना केली आणि अवघ्या ५०व्या वर्षी इ. स. १६८० त्यांचा देहान्त झाला. त्यानंतर मराठ्यांचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांची कारकीर्द इ. स. १६८० त सुरू झाली. त्यांच्या कारकीर्दीत मोगल बादशहा औरंगजेब मराठ्यांचे राज्य जिंकून घेण्यासाठी महाराष्ट्रात मार्च १६८२ मध्ये आला. त्या वेळेपासून मोगलांशी मराठ्यांचा स्वातंत्र्य संग्राम सुरू झाला. तो इ. स. १७०७ मध्ये औरंगजेबाच्या मृत्यूने थांबला.

ह्या पंचवीस वर्षांचे काळात (१६८२ ते १७०७ इ.) मराठी स्वराज्याचे नेतृत्व छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि राणी ताराबाई यांनी केले. इ. स. १६८९ च्या मार्च महिन्यात संभाजी महाराजांचा वध झाल्यानंतर स्वातंत्र्य लढा चालू ठेवण्याची जबाबदारी राजाराम महाराजांवर पडली. २ मार्च इ. स. १७०० रोजी राजाराम महाराजांचा मृत्यू झाल्यावर या लढ्याची सूत्रे महाराणी ताराबाई हिने आपल्या हाती घेतली आणि हा स्वातंत्र्य लढा इ. स. १७०७ मध्ये यशस्वीपणे शेवटास नेला.

इतिहासकार इ. स. १६३० ते १७०७ या कालखंडास शिवकाल म्हणतात. ह्या शिवकालाचा राजकीय इतिहास ह्या ग्रंथात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. सुरुवातीस शिवपूर्व कालाची माहिती देऊन सह्याद्रीच्या रांगांनी व्यापलेला महाराष्ट्र कर्नाटक, यांच्या डोंगराळ प्रदेशाची भौगोलिक रचना सांगितली आहे. ह्या प्रदेशात प्राचीन काळी ज्या सम्राटांनी राज्य केले त्यांचा थोडक्यात परिचय करून दिला आहे, कारण राष्ट्राच्या इतिहास रचनेत भूतकालीन इतिहासाला एक विशेष स्थान व महत्त्व आहे. ह्या नंतर महाराष्ट्रात भोसल्यांचे आगमन झाले तेव्हापासूनचा इतिहास दिलेला आहे.

शिवपूर्वकाल :

हिंदवी स्वराज्य संस्थापक श्री शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळी अखिल भारतावर परकीय सत्ता राज्य करीत होत्या. दक्षिणेत आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही आणि उत्तरेत मोघल सत्तांनी भारत व्यापलेला

होता. इस्लामी आक्रमकांनी त्यापूर्वी सहासातशे वर्षे आपल्या कारवाया सुरू केल्या होत्या. त्याचा परिणाम होऊन १६व्या शतकात हिंदूचे असे एकही स्वतंत्र राज्य अस्तित्वात नव्हते. विजयनगरचे शेवटचे हिंदू राज्य नष्ट झाल्याला शंभर वर्षे पूर्ण व्हावयाची होती.

शिवाजी महाराजांच्या जन्मकाळी आदिलशाही राज्य महाराष्ट्र व कर्नाटकमध्ये पसरले होते. शिवाजी महाराजांनी आदिलशाहीचे लचके तोडून हिंदवी स्वराज्य स्थापिले. आदिलशाहीने व्यापलेला कर्नाटक-महाराष्ट्राचा प्रदेश डोंगराळ, सह्याद्री पर्वताच्या रांगेने व्यापलेला. सह्याद्रीच्या पश्चिमेस समुद्रकिनारपट्टी आहे. तर पूर्वेस विस्तीर्ण पठार पसरलेले आहे. सातवाहनपूर्वी अशोक मौर्याचे साम्राज्य दक्षिणपथावर होते असे त्याच्या शिलालेखांवरून सांगता येते. महाराष्ट्रावर त्याचा अंमल होता. कारण सोपारा आणि भूईगांव येथे त्याचे लेख मिळाले आहेत. त्यांचे महामात्रा इतर प्रदेशाप्रमाणे महाराष्ट्रात धर्माचा प्रसार करीत होते. त्यानंतर सातवाहनांचे राज्य पूर्व समुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत दक्षिणेत झाले.

पैठण येथील सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी हा पराक्रमी व महत्त्वाकांक्षी होता. त्याने आपल्या राज्याचा विस्तार केला. सातवाहन सत्तेचा उदयकाळ इ. स. पूर्व २३० असा मानण्यात आला आहे.[१] सातवाहनांचे राज्य पश्चिम महाराष्ट्रात होते. त्याचा अंमल महाराष्ट्रावर बहुधा इ. स. च्या तिसऱ्या शतकापर्यंत टिकला असावा.

सातवाहनानंतर वाकाटक, कलचुरी आणि चालुक्य या घराण्यांनी महाराष्ट्रावर राज्य केले. दक्षिण कोकण बदामीच्या चालुक्यांनी सहाव्या शतकाच्या अखेरीस जिंकून घेतले असावे. यानंतर आठव्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रकुटांनी दक्षिण कोकण जिंकून घेऊन तेथे आपले मांडलिक शिलाहार यांची स्थापना केली.[२]

प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात शिलाहार राजवटीचे महत्त्व फार आहे. त्यांची राजवट उत्तर दक्षिण कोकणांत व कोल्हापूर जवळच्या प्रदेशात दीर्घकाळ चालली होती.[३]

त्यांच्या कारकीर्दीत उत्तर कोकणातील संस्थान मंडळ (ठाणे जिल्ह्यांतील संजान सभोवारचा प्रदेश) राष्ट्रकूट नृपती द्वितीय कृष्ण याने मधुमांत (मुहम्मद) नामक अरब मांडलिकाच्या ताब्यात दिला. त्याच्या वंशजांनी

---

१. गोखले, बुद्धीझम इन महाराष्ट्र, पृ. ११.

२. आळतेकर, शिलाहाराज ऑफ वेस्टर्न इंडिया, इंडियन कल्चर, व्हा. २., पृ. ३९३.

३. एपिग्राफीका इंडिका, पुस्तक ३, पृ. २९९.

या प्रदेशात तीन पिढ्यापर्यंत राज्य केले. हे अरब राजे राष्ट्रकूटांचे मांडलिक होते. सन ९७४ पर्यंत हे अरब राज्य करीत असावे. नंतर अपराजिताने त्यांचा पराभव करून तो प्रदेश आपल्या राज्यास जोडीला.[१] अपराजिताच्या कारकीर्दीचा शेवट इ. स. १०१० मध्ये झाला असावा. राष्ट्रकूटांच्या वेळी महाराष्ट्रात भरभराटीचा काळ होता. महाराष्ट्रात शिलाहार राजवंशाने कोकण, मिरज, कोल्हापूर, कऱ्हाड या ठिकाणी राज्य केले. दक्षिण महाराष्ट्रातील शिलाहार हे कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे उपासक होते. सोमेश्वर हा उत्तर कोकणचा शेवटचा शिलाहार राजा होय. याचवेळी कल्याणीच्या चालुक्यांचे व त्यानंतर आलेल्या देवगिरीच्या यादवांचे राज्य दक्षिणेकडील विस्तीर्ण भागावर पसरलेले होते. देवगिरीच्या संपन्न राज्यावर द्रव्य लोभासाठी अल्लाउद्दीन खिलजी याने इ. स. १२९४ मध्ये स्वारी केली. देवगिरीचा राजा रामदेवराय याचा पराभव करून खिलजी त्यास दिल्लीस घेऊन गेला. अशावेळी देवगिरीचे यादव संकटात सापडले असता वरंगळच्या काकतीय राजांने यादव राज्याचे वल्लारी आणि अनंतपूर हे दोन्ही जिल्हे बळकाविले. होयसळांनी यादवांचा वनवासी प्रांत बळकाविला.[२] यावेळी यादवांशिवाय होयसळ, पांड्य आणि काकतीय अशी तीन हिंदू राज्ये होती. त्यापैकी एकही हिंदूराजा मुसलमानांच्या देवगिरीवरील आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी यादवांच्या मदतीस धावला नाही. उलट देवगिरी राज्यावर मुसलमानांचे अतिक्रमण झाले असता त्याचे लचके तोडण्याची स्वार्थी कामगिरी त्यांनी केली. त्यातील एकही हिंदू राजास आपल्या धर्मावर, स्वातंत्र्यावर मुस्लीम परधर्मियांचे आक्रमण होत आहे, ते आक्रमण संघशक्तीने थोपवून धरणे हे आपले कर्तव्य आहे हे त्यांना समजले नाही. कालांतराने मुसलमान सरदारांनी वर निर्देशिलेल्या तीन राज्यावर स्वाऱ्या केल्या. देवदेवळे लुटली. बायका पळविल्या, काही हिंदूचे सक्तीने धर्मांतर केले. हिंदूतील विघटक वृत्तीमुळे दक्षिणेतील हिंदूराजांना आपसात एकोपा घडवून आणता आला नाही. परिणामी एकेकट्यांना मुसलमानी आक्रमणाला बळी पडावे लागले.

हरपालदेव :

अल्लाउद्दीनच्या आज्ञेने त्याचा सरदार मलिक काफूर याने देवगिरीचे राज्य इ. स. १३१२त खालसा केले. पण इ. स. १३१५ मध्ये रामदेवाचा जावई हरपालदेव याने पुन्हा देवगिरी घेतली. कोकण, कृष्णा, भीमातीर या प्रदेशातून

१. जे. बी. बी. आर. ए. एस. पुस्तक २१, पृ. ५०५.

२. ब्रीग्ज फेरिस्ता व्हा. २, पृ. १५०.

दिल्लीची सत्ता झुगारून देण्यात आली. तेव्हा मलिक काफूरने हरपालदेवावर स्वारी केली, त्यास पकडले व दिल्लीस नेऊन ठार मारले.[१] यादवांच्या काळात बल्लारी व अनंतपूर परिसरांत चालुक्याचे राज्य अस्तित्वात असताना त्या चालुक्य घराण्यात विजयध्वज नावाचा राजा होऊन गेला. त्याने इ. स. १११७-११५६ पर्यंत राज्य केले. त्यानेच तुंगभद्रेच्या दक्षिण तटाशी इ. स. ११५० च्या सुमारास एक शहर वसविले व त्याचे नाव विजयनगर ठेविले. ह्या जागी इ. स. १३३६ साली हरिहराने माध्वाचार्य यांच्या मदतीने विजयनगर राज्य स्थापिले. इ. स. १३४६ साली विजयनगरच्या हरिहर व बुक्क यांनी द्वार समुद्राच्या होयसळ, वरंगळ, आंध्र प्रांतातील पोळनायक व मलबारच्या हिंदूराजांच्या मदतीने आपल्या प्रदेशातून यवनाना पिटाळून लाविले. अशा रितीने विजयनगरची राजसत्ता मुसलमानांचे आक्रमण थोपवून धरण्यात यशस्वी झाली.[२]

शिवाजी महाराजांचे पूर्वज :

शिवाजी महाराजांचा जन्म भोसले कुळात झाला. या घराण्याचा मूळ पुरुष सुजनसिंह हा उदयपूरच्या शिसोदे राजघराण्यातील असून तो इ. स. १३३४ च्या सुमारास आपले भाग्य अजमाविण्यासाठी उत्तरेतून दक्षिणेत उतरला व बहामनी घराण्याचा मूळ पुरुष हसनगंगू याच्या पदरी त्याने चाकरी पत्करली. हसनगंगूचा पाडाव करण्यासाठी बादशहा महंमद तुघलक याने दिल्लीहून इ. स. १३४६ त दक्षिणेत स्वारी केली. त्या दोघांमध्ये झालेल्या संग्रामात सुजनसिंह व त्याचा मुलगा दिलीपसिंह यांनी मोठा पराक्रम केला. इ. स. १३४७त हसनगंगूने अल्लाउद्दीन बहमन हे नाव धारण करून गुलबर्गा येथे बहामनी राज्याची स्थापना केली.[३] तेव्हा त्यांनी सुजनसिंहास देवगिरी प्रांतातील १० गावे जहागीर देऊन मोठी सरदारी दिली. पुढे बहामनी राज्यात सुजनसिंहाचे कुटुंबाचा उत्कर्ष होत गेला. सुजनसिंह इ. स. १३५५ त मरण पावला.[३] त्याचा पुत्र दिलीपसिंग कुटुंबप्रमुख बनला.

दिलिपसिंहाचा पुत्र सिद्धजी हा कर्तबगार होता. त्याने बहामनी सत्तेच्या रक्षणार्थ प्राण खर्ची घातले. त्यांचा पुत्र भेरवसिंह ऊर्फ भोसाजी यांच्या पिढीपासून या घराण्यांत " भोसले " हे उपनाव रूढ झाले. भोसाजीचे वंशज ते भोसले.

राणाकर्णसिंह आणि शुभकृष्णसिंह हे भोसाजीचे पणतू. सन १४६९ साली बहामनी वजीर महंमद गवान याने दक्षिण कोकण जिंकण्यासाठी लष्करी मोहीम हाती घेतली. कर्णसिंह आपल्या भीमसिंह या पुत्रासह या मोहिमेत सहभागी

१. नीळकंठ शास्त्री, हिस्टरी ऑफ साऊथ इंडिया, पृ. २२५-२२७.

२. ब्रीग्ज फेरिस्ता व्हा. २, पृ. १७९.

३. बेंद्रे, मालोजी राजे आणि शहाजी महाराज, पृ. ३३.

झाला होता. कोकणात उतरत असताना मार्गात खेळणा ऊर्फ विशालगड हा किल्ला लागला. तो घेण्यासाठी बहामनी फौजा प्रयत्नांची शर्थ करू लागल्या. पण सह्याद्री पर्वताच्या बिकट रांगेतील हा दुर्गम किल्ला सहजासहजी हल्ला करून जिंकता येण्यासारखा नव्हता. बहामनी फौजेचे सर्व प्रयत्न संपल्यावर कर्णसिंह व भीमसिंह या पितापुत्रांनी एक अभिनव युक्ती लढविली. त्यांनी घोरपडीच्या साहाय्याने कडा चढून किल्ला हस्तगत केला. किल्ल्यावरील लढाईत राणा कर्णसिंह धारातीर्थी पडला. पण त्याच्या प्रयत्नाने दक्षिण कोकणाचे प्रवेशद्वार असलेला खेळणा किल्ला जिंकला गेला. म्हणून बहामनी सुलतानाने कर्णसिंह व भीमसिंह यांचा गौरव करून भीमसिंहास " राजा घोरपडे बहाद्दर " हा किताब व मुधोळ आणि त्यांच्या जवळची ८४ गावे जहागीर म्हणून दिली. (सन १४६९) त्या वेळेपासून भोसले वंश शाखेस घोरपडे हे नाव प्राप्त झाले.[१] मुसलमानी सत्ता महाराष्ट्रात स्थिर झाल्यावर खिलजी, तुघलक, बहामनी यांच्या कारकीर्दीत हजारो मुसलमान दक्षिणेत आले. त्यात सुफी कलंदर, पीर, फकीर होते. राजाश्रयाच्या जोरांवर सुफीनी ठिकठिकाणी मठ, दर्गे, मशिदी यांची स्थापना केली. त्या काळात दाभोळ, चौलला उतरणाऱ्या प्रत्येक जहाजाबरोबर इराकी, इराणी, अरब आणि हबशी लढवय्ये, मुत्सद्दी आणि औलिया दक्षिणेत उतरत. दिल्लीहून अशीच वर्दळ दक्षिणेत चालू होती.

बहामनी सुलतानांनी इराण (पर्शिया), तुर्कस्थान, मध्य आशिया, अरबस्थान आणि अफगाणिस्थानातील मुसलमानांना आपल्या नोकरीत ठेवले होते. परिणामी दखनी व परदेशी यांच्यात सत्ता संघर्ष सुरू झाला. शिवाय बहुतेक दखनी सुन्नी पंथाचे असून बहुतेक परदेशी शिया पंथीय होते. बहामनी राज्याचा एक गाजलेला प्रधानमंत्री महंमद गवान हा इराणी होता. त्याचाही खून या संघर्षात पडला. बहामनी काळात अधिकाराच्या जागेवर एकाही हिंदूचे नाव आढळत नाही असे फारशीचे विद्वान इतिहास संशोधक सेतुमाधवराव पगडी सांगतात. ह्या काळात राज्यकर्त्या मुस्लिम समाजाकडून हिंदूचा छळ होत होता. याचे मोठे भेदक चित्र शिवचरित्र साहित्यात प्रसिद्ध झालेल्या लेखात सापडते. ते राजवाड्यांनी रेखाटले आहे. ते लिहितात, " हिंदू बाटवले गेले, देवळे मोडली गेली, देव फोडले गेले, बायका भ्रष्ट केल्या गेल्या, साधुसंत छळले गेले. देवळांच्या मशिदी झाल्या, पर्वत्यांचे पीर झाले, घाटाचे दर्गे बनले, राऊळाचे महल झाले, धर्म केवळ लोपून गेला अशी हैराण गत झाली ".[२] परकी राज्यसत्तेचा दुसरा परिणाम म्हणजे राज्यकर्त्यांची दखनची हिंदी भाषा, पेहराव, चालीरीती, यांचा उर्दू-फारशी लोकांवरील पगडा होय. इजार, चढाव, दाढी, गोवापाडा आणि बोली यांचा अधिकाअधिक शिरकाव हिंदूच्या दैनंदिन राहणीत होत गेला.

---

१ मुधोळ घोरपडे घराण्याचा इतिहास पृ. १३-१८.

२ राजवाडे लें. सं. भा. ३, पृ. १०१.

बहामनी काळात सुफी साधूंनी नाथपंथाला निष्प्रभ केले. पुढील मुस्लिम काळात महानुभाव पंथांची वाताहात झाली. नामदेवाच्या पश्चात वारकरी पंथालाही उतरती कळा लागली.

चौदाव्या शतकातील ज्ञानेश्वर, जनार्दन स्वामी, एकनाथ, दासोपंत इत्यादींच्या कामगिरीने महाराष्ट्राच्या भ्रांत मनाला स्थिरता प्राप्त झाली. पंधराव्या शतकांत गुरुचरित्र, सोळाव्या शतकांत एकनाथी भागवत आणि भावार्थ रामायण हे ग्रंथ महत्त्व पावले. कोकणपट्टीतील पोर्तुगीजांच्या उच्छादामुळे नवीन संकटाची भर पडली. तरीही शाह्यांच्या आपआपसातील लढाया, त्यांच्या दरबारी दक्षिणी, परदेशी शिया व सुन्नी या भेदांनी सत्तास्पर्धात भर घातली. त्यामुळे मराठा सरदारांना व मुत्सद्यांना डोके वर काढण्यास चांगली संधी मिळाली. मोरे, मोहिते, घोरपडे, घाटगे, जाधव, भोसले अशी अनेक मराठा घराणी पुढे आली.

बहामनी राज्य अस्तास गेल्यावर त्याच्या जागी पाच शाह्या उदय पावल्या त्या अशा :—

(१) विदर्भाची इमादशाही (१४८४-१५७४) : संस्थापक फतेउल्ला इमादशहा, विदर्भ या बहामनी राज्यातून फुटून आपले स्वातंत्र्य घोषित करणारा पहिला प्रदेश होय. इमादशहा हा मुळचा कर्नाटकातील ब्राह्मण असून त्याने इस्लाम धर्माची दीक्षा घेतली होती. सन १५७४ मध्ये अहमदनगरच्या निजामशाहीने इमादशाही राज्य जिंकून विलीन केले.[१]

(२) विजापूरची आदिलशाही (१४८९-१६८६) : संस्थापक युसुफ आदिलशहा हा महंमूद गवानचा जॉर्जीअन गुलाम असून स्वकर्तृत्वाने उच्च पदास चढला. हा तुर्कस्थानातून आला होता.[२]

(३) अहमदनगरची निजामशाही (१४९०-१६३६) : संस्थापक मलीक अहमद हा दख्खनी मुसलमान असून मूळचा हिंदू होता. त्याने इ. स. १४९० मध्ये जुन्नर येथे राज्य स्थापिले. सन १४९४ मध्ये त्याने संरक्षणदृष्ट्या योग्य म्हणून जुन्नरहून अहमदनगर (मूळ नाव अंबानगर) येथे आपली राजधानी नेली.[३]

(४) गोवळकोंड्याची कुतुबशाही (१५१२ ते १६८७) : संस्थापक कुली कुतुबशहा हा इराणी असून शिया पंथाचा होता.

(५) बिदारची बरीदशाही (१५२७-१६१९) : संस्थापक अमीरअली बरीद हा जॉर्जियन होता. स. १६१९ मध्ये आदिलशाहाने बिदर जिंकले.[४]

१. फेरिस्ता भा. २, पृ. २७१-२७२.

२. ब्रिग्ज फेरिस्ता भा. २, पृ. ९.

३. कुंटे, अहमदनगरची निजामशाही, पृ. २४-२५

४. फेरिस्ता भा. २, पृ. २७४.

अहमद निजामशहाचा मुलगा बुऱ्हाणशहा इ. स. १५७८ मध्ये गादीवर बसला. त्याचा मुख्य प्रधान कंवरसेन हा ब्राह्मण गृहस्थ होता. त्यामुळे हिंदूना शासकीय सेवेत येण्यास सुलभ झाले. शुभकृष्णाचे वंशज बाबाजी भोसले यांनी निजामशाहीची नोकरी पत्करली. त्यास निजामशाहीकडून परगणे पांडे पेडगांवची जहागिरी मिळाली होती. बाबाजींस मालोजी व विठोजी असे दोन पुत्र होते.

मालोजी राजे :

मालोजी राजे इ. स. १५७०-७१ च्या सुमारास जन्मले. मालोजींची पत्नी उमाबाई फलटणच्या निंबाळकरांची मुलगी. मालोजी वयात आल्यावर त्यांनी लष्करी कवाईतीचे शिक्षण वडिलांकडून व सासऱ्याकडून घेतले. यावेळी नगरात निजाम मूर्तजा निजामशहा राज्य करीत होता. त्याने मालोजीस आपल्याकडे घेऊन शिलेदारी दिली. "राजा" ही पदवी, पंचहजारी मनसब व सैन्याच्या खर्चासाठी पुणे, सुपे, चाकण चौऱ्यांशी व इंदापूरची देशमुखी व कुटुंब ठेवण्यासाठी शिवनेरीचा किल्ला इ. स. १५९० च्या सुमारास बहुमानपूर्वक दिला.[१]

विजापूर सरदार दिलेरखान याने निजामशहाच्या ताब्यातील किल्ल्यांवर चाल केली. त्याप्रसंगी मालोजीने दिलेरखानास मागे हटवून निजामशाहीचे रक्षण केले. मालोजीच्या या पराक्रमाचा उल्लेख बृहद्दीश्वर शिलालेखात केलेला आहे. इ. स. १५९३ मध्ये मालोजीना भूमिगत धन सापडले. त्यामुळे त्यांनी आपली जागा वाढविली, वेरूळच्या घृष्णेश्वराच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला आणि शिखर शिंगणापूर डोंगराचे पायथ्याशी एक तलाव बांधला. पिण्याच्या पाण्याची सोय केली व रयतेचा दुवा घेतला. अशा प्रकारे लोकहिताची अनेक कामे मालोजीनी केली त्यामुळे त्यांची कीर्ती सर्वत्र पसरली.[२]

मूर्तजा निजामशहा अल्पवयीन असल्याने दरबारात मलिक अंबर व मिआन राजू यांचे प्रस्थ वाढले व त्यांच्यामध्ये झगडा निर्माण झाला. इ. स. १६०६ च्या अखेरीस मिआन राजूने बंड केले. त्याचा बिमोड करीत असता इंदापूरच्या लढाईत मालोजीना मृत्यू आला.[३] (१६०६) असे शिवभारत सांगतो. त्यानंतर विठोजीचा मृत्यू इ. स. १६१२ च्या सुमारास झाला असावा.[४]

---

१. बेंद्रे, मालोजी राजे आणि शहाजी महाराज, पृ. १०६.

२. कित्ता, प. १२५-१२६.

३. शिवभारत अध्याय २, श्लोक २-५.

४. कित्ता अध्याय ३, श्लोक १-२.

आपल्या आयुष्यात मालोजीनी पुणे, सुपे, चाकण, इंदापूर येथील देशमुखी मिळवली. आपल्या पराक्रमाने दौलत संपादन करून भोसले वंशाच्या भाग्योदयाची ध्वजा त्यांनी उभारली. मालोजीची मदत मलिक अंबरास विशेषत्वाने झाली.

स्वराज्य संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे पितामह मालोजीराजे यांची हकीगत वर सांगितल्यानंतर त्यांचे चिरंजीव स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवणारे शहाजीराजे यांच्या पराक्रमाचा इतिहास पुढील प्रकरणात वर्णिला आहे.

□□

२. स्वराज्य स्थापनेचा प्रारंभ करणारे शहाजीराजे

मालोजीना शहाजी आणि शरीफजी असे दोन मुलगे होते. शहाजी इ. स. १५९४ व शरीफजी इ. स. १५९७ मध्ये वेरूळ येथे जन्मले. मालोजीराजे इ. स. १६०६ मध्ये निवर्तले. त्यावेळी शहाजीराजे अवघे पाच वर्षांचे होते. शहाजी आणि शरीफजी या आपल्या दोन मुलांचे संगोपन त्यांची मातोश्री उमाबाई हीने मोठ्या दक्षतेने केले. मालोजींचा भाऊ विठोजी यानेही आपल्या दोन्ही पुतण्यांच्या संरक्षणाचा भार आपल्या शिरावर घेतला. आणि दौलतीचा सांभाळ चांगल्या रीतीने केला. यावेळी दक्षिण देशासह सारा हिंदुस्तान आपल्या छत्राखाली आणण्याची अकबर बादशहाची महत्त्वाकांक्षा होती. दक्षिणेत इ. स. १५९४ मध्ये अहमदनगरचा बुऱ्हाण निजामशहा मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर निजमाशाही दरबारांत सत्तेसाठी स्पर्धा सुरू होऊन सरदारांमध्ये बेदिली माजली हे वृत्त अकबर बादशहास समजले. तेव्हा या गोंधळाचा फायदा घेण्याचे ठरवून अकबर बादशहाने दिल्लीहून अहमदनगरवर फौज पाठविली. त्यावेळी निजामशाहीच्या मुख्य कारभारी रणशूर चाँदबिबीने मोगलांना कडवा प्रतिकार केला व निजामशाहीचे रक्षण केले. तिच्या मृत्यूनंतर पुन्हा मोगलांनी अहमदनगरला वेढा घातला आणि ते राजधानी शहर इ. स. १६०० ऑगस्ट १९ ला जिंकून घेतले.[१]

राजधानीचे ठिकाण हातातून गेले तरी वजीर मलिक अंबर निराश झाला नाही. त्याने मुर्तजा निजामशहा दुसरा याच्या नावाने परांडा किल्ल्या-वरून द्वाही फिरवली व निजामशहीचा कारभार चालू केला. इ. स. १६१० मध्ये मलिक अंबरने खडकी[२] (हल्लीचे औरंगाबाद) या ठिकाणी राजधानी स्थापन केली. त्या पुढील वर्षी मलिक अंबरने शहाजी राजांकडे जहागिरीचा स्वतंत्र कारभार सोपविला. इ. स. १६१६ मध्ये मोगल सैन्याने खडकी शहराची लूट केली तेव्हा मलिक अंबरने शरणागती पत्करली व समेट घडवून आणला.

---

१ वेंद्रे, मालोजी आणि शहाजी महाराज, पृ. १११.

२ बेंद्रे, विजापूरची आदिलशाही (बुसातीन् उस् सलातीन्), पृ. २७०.

मराठ्यांचा उदय झाला तो मलिक अंबरच्या काळांत. मलिक अंबरने मोगलांशी लढा देण्याची तयारी इ. स. १६१८ मध्ये केली. मोगलांशी झुंज देण्यासाठी गनिमी काव्याने लढणाऱ्या मराठ्यांचे लष्कर उभारण्याची मलिक अंबरास जरुरी वाटली. इ. स. १६१८ ते १६२६ या मलिक अंबर-मोगल धुमश्चक्रीत जाधव, काटे, शहाजी भोसले, उदाराम वगैरे मराठे सरदारांना अनुभव मिळून त्यांचा उदय झाला. शहाजीराजे यांचे लग्न लघुजी जाधवराव यांची कन्या जिजाबाई हिच्याशी इ. स. १६११ च्या सुमारास झाले.[१]

त्यानंतर त्याचा ज्येष्ठ मुलगा संभाजी याचे लग्न शिवनेरीच्या विश्वासरावाची मुलगी जयंती हिच्याशी झाले. मालोजीच्या मृत्यूनंतर सर्व जहागीर व सैन्य यांचे अधिपत्य शहाजीराजे यांच्याकडे आले. यावेळी खंडागळे हत्ती प्रकरण उपस्थित होऊन ते लघुजी जाधवराव व भोसले घराण्यातील वितुष्टास कारणीभूत झाले.[२] निजामशाहीचा दरबार देवगिरी येथे भरला असता जाधव मंडळी व भोसले मंडळी दरबारांत एकत्र आली; त्याजबरोबर खंडागळे नावाचे सरदार उपस्थित होते. दरबार संपवून ही सर्व मंडळी आपआपल्या घरी जाण्यासाठी बाहेर पडली असता खंडागळ्याचा एक हत्ती बिथरला आणि त्याने लघुजी जाधवरावांकडील कांही माणसे तुडवून जायबंदी केली. तेव्हा लघुजीचा मुलगा दत्ताजी हा हत्तीच्या मालकास शासन करण्यासाठी धावून आला. तो चालून येतो आहे असे पाहून शहाजी व त्यांचे चुलत बंधू खेलोजी, संभाजी इत्यादी खंडागळ्यांच्या साहाय्यास धावून गेले. त्यामुळे हत्तीचे बिथरणे बाजूस पडून यांच्यामध्येच लढाई सुरू झाली. तीत दत्ताजी संभाजीकडून मारला गेला. लघुजी जाधवास हे समजताच त्याने संभाजी भोसल्यांस गाठून ठार केले. शिवाय पुत्राच्या मृत्युमुळे बेफाम होऊन लघुजीने आपला जावई शहाजी ह्यांच्या दंडावर वार केला. त्यामुळे तो बेशुद्ध होऊन पडला. निजामशहास ह्या भांडणांची बातमी समजताच त्याने हस्तक्षेप करून हे भांडण तोडले. ह्या प्रकरणातून तत्कालीन मराठा सरदारांची मनोवृत्ती दिसून येते. क्षुल्लक कारणांवरून हातघाईवर येऊन व एखाद्या बारीक घटनेवरून निर्माण झालेले वैर पिढ्यानपिढ्या चालवण्यात तत्कालीन मराठे भूषण मानीत. ह्या भांडणात निजामशहाने भोसल्यांची बाजू घेतली असा समज लघुजी जाधवरावांचा होऊन त्याने निजामशाही सोडून तो मुघलांस जाऊन मिळाला. (इ. स. १६२२-२३) ह्यानंतर शहाजीचे महत्त्व निजामशहाच्या दरबारात वाढले.

१ शिवभारत २/४४ ते ६३.

२ शिवभारत अध्याय ३ श्लोक १.५७, पृ. २२-२९.

त्याच्या उमेदवारीची पहिली चार वर्षे (१६२० ते १६२४) निजामशाही वजीर मलिक अंबरच्या नेतृत्वाखाली गेली. त्यांतल्या शेवटच्या वर्षी भातवडीची लढाई झाली. ही लढाई एका बाजूस मलिक अंबर आणि त्याच्या हाताखाली शहाजी व इतर सरदार आणि दुसऱ्या बाजूस विजापूरकर व मोगल यांचे सरदार यांमध्ये झाली. या लढाईचे मुख्य कारण निजामशाही व आदिलशाही यांमधील बेबनाव आणि मोगलांची दक्षिण देश जिंकण्याची इच्छा, हे होते. या लढाईस इ. स. १६२४ मध्ये सुरुवात झाली आणि विजापुरी सरदार मुल्ला महमद लारी मारला गेला. हे पाहून विजापुरी फौजा धूम ठोकून पळून गेल्या. आदिलशाहीकडील सुमारे पंचवीस सरदारांचा मलिक अंबरने पराभव केला. काहींचा शिरच्छेद केला. मोगल सरदारांचाही मलिक अंबरने पराभव केला.[१] या लढाईत शहाजी राजांचा भाऊ शरीफजी मारला गेला. तरी शहाजीराजांनी मोठा पराक्रम करून एका मोगल सेनापतीस हार खावयास लावली. ह्या लढाईत शहाजीराजांनी मोठा पराक्रम केल्याचे आदिलशहाच्या लक्षात आले. या लढाईत शहाजीराजांनी गनिमीकाव्याचा अवलंब करणे शक्य आहे. आदिलशहास शहाजी राजांच्या नेत्रदीपक पराक्रमाची भुरळ पडली. शहाने शहाजीराजांस आपल्याकडील दुय्यम श्रेणींचा सेनापती हे पद देण्याचे प्रलोभन दाखविले. शिवाय मलिक अंबर व शहाजी यांचे या लढाईनंतर विशेष सख्य राहिले नव्हते. म्हणून शहाजीराजे निजामशहाची नोकरी सोडून ते आदिलशाहीत सर लष्कर या पदावर रुजू झाले. ह्या दोन शाह्यांतील युद्धांत त्यांनी आपला पुणे, परगणा व पाटसकडील मुलूख विजापुरी सैन्याच्या मदतीने प्रथम निजामशाहीकडून जिंकून आदिलशाहीकडे घेतला. शहाजी राजांना शिक्षा करण्याचे काम मलिकंबरने हाती घेऊन त्याजवर फौज पाठविली.[२] (शि.व.सा.ले. २२) आणि सालप्याचे घाटांत त्यास कोंडीले. यावेळी त्यास संभाजी मोहिते याचे साहाय्य झाले. म्हणून संभाजीची शिफारस आदिलशाहाकडे करून शहाजीराजे यांनी त्यास तळबीडची देशमुखी देवविली. (१० जानेवारी १६२६) या दरम्यान संभाजी मोहित्यांची बहीण तुकाबाई हिच्याशी शहाजी महाराजांचे लग्न झाले.[३] ती त्यांची दुसरी पत्नी होय.

शहाजीराजांच्या दुर्दैवाने दुसरा इब्राहीम आदिलशहा इ. स. १६२७ च्या सप्टेंबरमध्ये मरण पावला. त्यानंतर त्याचा मुलगा मुहम्मद आदिलशहा गादीवर आला. तो हिंदू सरदारांचा द्वेष करी. त्यामुळे शहाजीराजांना आपल्या कर्तबगारीचे चीज होईल असे वाटेनासे झाले. शिवाय निजामशाहीचा प्रमुख

१ बेंद्रे, मालोजी आणि शहाजी महाराज, पृ. १८४.

२ शि. च. सा. १ ले. २२.

३ बेंद्रे, मालोजी आणि शहाजी महाराज, पृ. २४५.

वजीर मलिक अंबर मरून गेला होता. यामुळे शहाजीराजांस आदिलशाही सोडून निजामशाहीत जाणे अधिक फायद्याचे वाटले, म्हणून ते इ. स. १६२८ च्या आरंभी आदिलशाही सोडून निजामशाहीच्या बोलवण्यावरून परत निजमाशाहीत गेले. आणि आपल्या पुणे परगण्याचा मोकासा निजामशहाकडून आपल्या नावे करून घेतला. इ. स. १६२८ मार्चपासून १६२९ च्या नोव्हेंबरपर्यंत साधारणत: १ वर्ष ८ महिने शहाजी राजे फिरून निजामशाहीत राहिले.[१]

जाधवरावांसारखे मातबर सरदार आयत्यावेळी विश्वासघात करतात, त्यांचा बंदोबस्त निजामशहाने करावा असा गुप्त सल्ला जाधवरावांच्या विरुद्ध असलेल्या सरदारांनी निजामशहास दिला. असे होऊ नये म्हणून निजामशहाने त्यांना पकडून अटकेत ठेवण्याचा विचार केला. जाधव मंडळीस त्याने दौलताबादचे किल्ल्यावर दिनांक २५ ऑगस्ट १६२९ रोजी भेटीस बोलाविले. त्यास पकडीत असता विलक्षण दंगल माजली, तीत खुद्द लखूजी, त्यांचे दोघे पुत्र अवलोजी आणि राघोजी व नातू यशवंतराव इतके पुरुष मारले गेले.[२] लखूजीची बायको गिरजाबाई, भाऊ जगदेवराव व मुलगा बहादूरजी एवढे बचावून सिंदरखेडच्या गढींत आश्रयास गेले. बादशहा शहाजनास हा प्रकार कळल्यावर त्याने ह्या जाधव मंडळीस नोकरींत घेऊन मनसबी ठरवून दिल्या.

आपल्या सासऱ्याचा दग्याने खून केलेला पाहून निजामशाहींत यापुढे राहणे धोक्याचे आहे तसेच आपल्याला निजामशाहींत परत आणण्याचा जो प्रयत्न झाला त्यांत काहीतरी कुटील कारस्थानाचा भाग असला पाहिजे असा शहाजीराजांचा समज झाला. आदिलशहाला सोडून आल्याने त्याचा राग व आदिलशहा हा यावेळी निजामशहाचा सहायक या दृष्टीने, शहाजीराजांना साहजिकच मोगलांशी कारस्थान करणे भाग पडले. मोगली सत्ता यावेळी बरीचशी अडचणीत आली होती. मोंगलांचा बालाघाटखालील प्रदेश परत निजामशाहीत आल्याने युद्धाची आघाडी, जी पुष्कळच पुढे आणली गेली होती ती, बरीच पिछाडीस गेली. लोदीचे बंड ही एक घरांतच आघाडी उघडली गेली होती. जाधवरावांना वीस-पंचवीस हजारांचा जमावही अंतरला होता. शिवाय आदिलशहा व निजामशहा एकजुटीने तोंड देण्यास सिद्ध झाले होते. अशा अडचणीच्या प्रसंगी शहाजीराजांनी मोगली चाकरींत रुजू होण्याची केलेली विनंती बादशहाने त्यांच्या सर्व अटीसह तत्काळ मान्य करून फर्मानही त्वरित पाठविले.[३] त्यामुळे शहाजी राजांकडे दहा हजार सेना आली. सरंजामार्थ

१ कित्ता, पृ. २४६-२४७.

२ अणुपु. अ. ८, श्लोक २०-२३, जेधे शकावली.
सरदेसाई, न्यु हिस्टरी पृ. १२४-१२७.

३ बुसातीन उस् सलातीन पृ. १२४-१२७.

पूर्वी मालोजी राजांकडे असलेले पुणे, सुपे, जुन्नर, संगमनेरादी परगणे दिल्याचे वचन मोगल बादशहाने शहाजीराजांस दिले. त्यामुळे शहाजीराजांनी आपला वडील मुलगा संभाजी याचे शिवनेरीवर लग्न करून आपण मोगली चाकरीवर नोव्हेंबर १६२९त दाखल झाले.[१] एक दोन महिने मोगल सरदार नासिरखानाबरोबर राहून, इब्राहीम लोदी वगैरे बंडखोरांचा पाठलाग करून त्यास उत्तरेकडे हांकून दिले. त्यानंतर शहाजीराजे आपल्या सरंजामाचा मुलूख निजामशाही सरदारांकडून ताब्यात घेण्यासाठी इ. स. १६३० च्या जानेवारीच्या सुरुवातीस निघाले. स्वारीस निघण्यापूर्वी शहाजीराजांनी आपली गरोदर पत्नी जिजाबाई हीस आपले व्याही शिवनेरीचे किल्लेदार विश्वासराव यांजकडे ठेविले. शहाजीराजांना निजामशहाने पुणे परगणा जहागीर दिला होता.[२] त्यांना हा मुलुख आपल्या ताब्यांत आणणे फारसे कठीण झाले नाही. स्थानिक लोकांचा ओढा शहाजीराजांकडे होता. या मुलुखाचा बंदोबस्त करून शहाजी राजे पुन्हा पावसाळ्यांत शिवनेरीस गेले. आता हा सर्व भाग त्यांची जहागीर झाली होती.[३]

ह्यावेळी शहाजहान बादशहाने शहाजी राजांस मोगल सरदार अझमखान याच्या मदतीस जाण्याचा हुकूम दिला. यावेळी अझमखान हा बंडखोर मोगल सुभेदार खान जहानच्या पाठीवर होता. शहाजहान बादशहाच्या आज्ञेनुसार अझमखानास खानजहानला कैद करावयाचे होते. बंडखोर खानजहानच्या मदतीस दुसरा मोगल पठाण सरदार शेरखान धावून गेला. दोघांनी आपला मोर्चा बीडकडे वळविला. आपल्या पाठीवर अझमखान आहे हे समजल्यावर खानजहान व दर्याखान जालना पुरावरून उत्तरेकडे पळाले. त्यांच्या पाठीवर शहाजी राजांसह अझमखान होता. पण अबदुल्लाखान व सय्यद मुजफर हे बादशहाचे सरदार धावून जात आहेत हे पाहून शहाजीराजे नोव्हेंबर १६३० च्या सुमारास शिवनेरीस परतले. इकडे बादशहाचे सरदारांनी दर्याखानशी सिंरोजजवळ लढाई दिली त्यांत दिनांक ११ जानेवारी १६३० रोजी दर्याखान मारला गेला. खानजहान प्राणावर उदार होऊन लढत असता दिनांक २२ जानेवारी १६३० रोजी तो कालवश झाला.[४]

१ शिवभारत, अ. ६ श्लोक ९१-९४.

२ बेंद्रे, मालोजी आणि शहाजी महाराज, पृ. ३४८.

३ राजवाडे खंड १० ले. २३५ शि. च. सा. खं. ७, ले. २५.

४ बेंद्रे, मालोजी आणि शहाजी पृ. ३४८.

शहाजीराजे इ. स. १६३० च्या पावसाळ्यात शिवनेरीस आले. व पुत्र मुख पाहून मुलाचे बाकीचे विधी पूर्ण केले. ह्यावेळी निजामशाहींत बेदिली माजली होती. मलिक अंबरचा पुत्र फत्तेखान वजीर होऊन निजामशाहीचा कारभार पाहू लागला. फत्तेखानाच्या कारकीर्दीस कंटाळून शहाजी राजे मोगलांकडे आले होते. फत्तेखान आतून मोगलांस सामील होता. त्याने १८ जून १६३३ रोजी दौलताबादचा किल्ला मोगलांचे स्वाधीन केला तेव्हा मोगलांनी निजामशाही संपुष्टात आणिली[१] आणि निजामशाहीचा वजीर फत्तेखान यास आपला मनसबदार केले व अल्पवयी सुलतान हुसेन शहा यास ग्वाल्हेरास कैदेत ठेविले.

मोगलांच्या सेवेत शहाजीराजांचे मन रमेना, त्यांनी मोगलांची सेवा १ वर्ष केल्यावर, मोगलांना रामराम ठोकून ते १६३१-३२ च्या सुमारास निजामशाहींत दाखल झाले. पुढील १/२ वर्षांत वजीर फत्तेखानाने निजामशाही मोगलांच्या घरात घातली हे पाहून शहाजीराजांना सुचले की आपण निजामशाहीचे पुनरुत्थान करावे. त्याप्रमाणे शहाजीराजांनी आदिलशाहीतील सरदार मुरार जगदेव व रणदुल्लाखान यांची मदत घेऊन मोगलांशी लढण्याची तयारी केली. आदिलशाही सरदारांच्या मदतीने शहाजीराजांनी गनिमी युद्धाच्या साहाय्याने निजामशहाचा मोगलांनी जिंकलेला मुलूख परत मिळविला. निजामशाहीच्या गादीवरील अल्पवयीन हुसेनशहा मोगलांच्या अटकेत ग्वाल्हेरास होता. त्याच्या ऐवजी निजामशहाच्या वंशातील मूर्तजा (तिसरा) नावाचा एक लहान मुलगा पेमागिरी किल्ल्यावर अटकेत होता त्यास हाताशी धरून त्याची पेमगिरी किल्ल्यावरच निजामशहाच्या गादीवर स्थापना केली. स्वतः शहाजीराजे या निजामाचे वजीर बनले. (इ. स. १६३३) त्यावेळी मोगल सैन्य शहाजी राजांचा पाठलाग करू लागले. तेव्हा शहाजीराजांनी जिजाबाईस बाळ राजासह पेमगड ऊर्फ भीमगड येथे नेले. तेथेही तेव्हा मोगल सैन्य त्यांच्या पाठलागावर आले म्हणून ते माहुली किल्ल्यावर गेले. तेथेही विजापूर व मोगल सैन्य पाठलाग करण्यासाठी गेली, तेव्हा शहाजीराजांनी अल्पवयी निजामास मोगलांचे हवाली केले व तह केला. नाईलाजाने शहाजीराजे आदिलशाहीच्या नोकरीत १२ हजारांचे मनसबदार म्हणून गेले.[२] या धावपळीच्या काळात बालशिवाजी राजे व मातोश्री जिजाबाई यांचा निवास शिवनेरी, अहमदनगर, पेमगिरी, दौलताबाद व माहुली या निरनिराळ्या ठिकाणी झाला.

शहाजीराजे कर्नाटकात :

इ. स. १६३६ साली शहाजहान बादशहाच्या स्वाधीन पेमगिरी किल्ला शहाजीराजे यांनी केला तेव्हा आदिलशहा व शहाजहान बादशहा यांत तह

१ ब. मो. पुरंदरे, राजा शिवछत्रपती (पूर्वार्ध), पृ. १०२.

२ शिवचरित्र निबंधावली, पृ. १००.

झाला. त्यात भीमेपलीकडील निजामशहाचा मुलूख मोगलांस द्यावा, अलीकडील आदिलशहास द्यावा ; आदिलशहाने तो शहाजी राजांस जागीर द्यावी. बारा हजार स्वारांनिशी महाराजांनी आदिलशहाची चाकरी करावी.[१]

तहांत सरंजामास जो मुलूख दिला तो भीमानदीच्या दक्षिणेकडील त्यात पुणे समाविष्ट होते. शहाजीराजांनी पुणे हे जहागिरीचे मुख्य ठाणे बनवून तेथे आपल्या तर्फे दादाजी कोंडदेव मलठणकर यास सुभेदार नेमिले. दादाजीपंतांनी पुणे कसब्याची व गावगन्नाची वसती केली.[२]

त्यानंतर फेब्रुवारी १६३७त शहाजीराजे आपली पत्नी जिजाबाई, मुलगा संभाजी व बाल शिवाजीसह विजापुरी गेले. शहाजीराजांनी या सर्वांस आपला स्वराज्य संपादनाचा मनोदय सांगितला तो असा, संभाजीराजे यांनी कर्नाटकात स्वराज्य कमवावे आणि शिवरायाने मातोश्रीसह पुण्यास राहून महाराष्ट्रात स्वराज्य स्थापावे. तिथे ते २५ फेब्रुवारी रोजी आदिलशहाच्या चाकरीत दाखल झाले. आदिलशहाच्या संमतीने शहाजीराजांनी विजापूर जवळच्या कंपिली गावी आपणांस राहण्यासाठी एक वाडा बांधला. मोठा बगिचा केला व तेथे ते राहू लागले.[३] काही दिवसानी कंपिली गावात बांधलेला वाडा आपणासाठी आदिलशहाने द्यावा अशी खटपट घोरपड्यानी अदिलशहापाशी केली. तेव्हा आदिलशहाने शहाजीराजांची बदली बंगरुळास केली व कंपीचा वाडा घोरपड्यास राहण्यासाठी दिला. महमद आदिलशहा तरुण, तल्लख व महत्त्वाकांक्षी होता. मोगलांशी गोडी झाल्याने उत्तरेकडून आपल्यावर स्वारी होणार नाही हे आदिलशहाने लक्षात घेतले आणि कर्नाटक जिंकण्याच्या कामगिरीवर शहाजीराजे यांना विजापूर सरदार रणदुल्लाखान याज समवेत नेमले. यावेळी आदिलशहाच्या नजरेसमोर दक्षिणेतील तुंगभद्रा ते रामेश्वरपर्यंतचा हिंदूराजांनी व्यापलेला प्रदेश होता. हा प्रदेश आदिलशहा व कुतूबशहा यांनी जिंकणे त्यांच्या फायद्याचे होते. म्हणून ह्या दोन शाह्यांनी करार करून ठरविले की कर्नाटकचा पूर्व भाग कुतूबशहाने व पश्चिम भाग आदिलशहाने जिंकावा.

शहाजी राजे विजापूरच्या चाकरीत हजर झाल्यावर आदिलशहाने रणदुल्ला खानास त्याजबरोबर देऊन कर्नाटकांतील हिंदू राजांस जिंकण्यास पाठविले.[४]

इ. स. १६३७ च्या सुमारास कर्नाटकाची स्थिती :

ह्यावेळी कर्नाटकची स्थिती गोंधळाची होती. विजयनगरचे हिंदू राज्याचा मुसलमान सत्ताधीशांनी १५६५ मध्ये तालिकोटच्या लढाईत पराभव केला.

---

१ शिवचरित्र सा. खंड २ ले. ९५-९६, पृ. ११९-१२१.

२ शिवचरित्र प्रदिप, पृ. ७१ ; वर्मा, हिस्टरी ऑफ बिजापूर, पृ. २६६-६९.

३ मालोजी राजे व शहाजी महाराज, पृ. ४७२.

४ एक्याण्णव कलमी बखर, क. २२.

राज्याची वाताहात केली. त्या राजघराण्यातील एक वंशज वेलोरास राहिला होता. व विजयनगरच्या साम्राज्याचे प्रांताधिकारी आपल्या ताब्यातील प्रदेशांवर अंमल चालवीत होते. त्यापैकी इक्केरी, बसवापट्टण, बिदनूर, बंगलोर येथील पाळेगार विजयनगर राज्यापासून स्वतंत्र झाले होते. वर सांगितल्याप्रमाणे आदिलशहा व गोवळकोंडेकर यांच्यात कर्नाटकांतील प्रदेश जिंकण्याचा करार झाला होता, त्या करारानुसार आदिलशहास कर्नाटकाचा पश्चिम भाग जिंकावयाचा होता. ह्या पश्चिम भागात जी जी छोटी हिंदू राज्ये होती, त्यांनी आपसात एकी न करता एकमेकांचा मुलूख जिंकून आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न ते करीत होते. आणि स्वार्थाकरिता ते विजापूर आदिलशहाची मदत मागू लागले. अशा रीतीने विजापुरी सरदार रणदुल्लाखान व शहाजीराजे यांना कर्नाटकांत प्रवेश करण्याची संधी मिळाली. दोन विजापुरी सरदारांनी इक्केरी, बसवापट्टण, बिदनूर, बंगलोर ह्या राजांना मांडलिक बनविले. त्यांजकडून खडण्या घेतल्या. दुसऱ्या स्वारीत विजापुरी सरदार रुस्तुमजाने शहाजीराजांच्या मदतीने बंगरूळ जिंकून घेतले [१] बंगळूर हातचे गेल्यावर बंगळूरचा राजा केंपगौडा, सावनदुर्ग या किल्ल्यांत रहावयास गेला. रुस्तमजाने बंगळूर व त्याचे भोवतालचा प्रवेश सांभाळण्यासाठी शहाजीराजांस नेमिले. तेव्हा बंगलोर व आसपासचा प्रदेश शहाजीराजांनी आपल्या ताब्यांत घेतला (१६३८) इ. स. १६३७ ते १६४० या तीन वर्षांत शहाजीराजांच्या मदतीने विजापूर सुलतानाने कर्नाटकांतील फार मोठा प्रदेश जिंकला. दक्षिणेकडील या स्वाऱ्यांत कर्नाटक पायाघाट व कर्नाटक बालाघाट असे दोन प्रांत शहाजीराजांच्या पराक्रमाने त्यांना मिळाले होते. ते त्यांच्याकडेच व्यवस्थेसाठी सोपविण्यात आले, त्यापैकी बंगळूरचा अंतर्भाव बालाघाट सुभ्यांत होत असे व तो शहाजीराजांना जहागिरीदाखल देण्यात आला तेव्हापासून हे ठिकाण कर्नाटकांतील शहाजीराजांच्या राज्य सत्तेचे मुख्य केंद्र बनले. इ. स. १६३९ मध्ये शहाजी राजांना बंगलोरची जहागीर मिळाली. ते शहर त्यांनी आपली राजधानी केली.[२] व स्वतःजवळ बाळगलेल्या १५-२० हजार फौजेची राहण्याची सोय त्या शहरांत केली. त्यासाठी अधिकारी, व्यवस्थापक, कारकून यांचा फौजफाटा तयार केला. त्यांच्या वस्त्या केल्या. महाराष्ट्रांतून जे लोक एकनिष्ठ राहून सेवा करण्यासाठी कर्नाटकांत आले त्यांनाही अन्न, वस्त्र व राहण्यास जागा दिल्या. अशा रीतीने शहाजीराजे यांनी बंगलोरास आपले बस्तान नीट बसविले आणि ते एखाद्या स्वतंत्र राजाप्रमाणे थाटाने राहू लागले.[३]

१ बेंद्रे, मालोजी व शहाजी महाराज, पृ. ४८५.

२ परमानंद, शिवभारत, अ. ९ श्लोक ५४-५९.

३ सरदेसाई, मराठी रियासत भाग १, पृ. ९३.

बंगलोरला शहाजी महाराजांची दिनचर्या खालीलप्रमाणे असे :

बंगलोरला पहाटेस भुपाळ्यांचे मधुर आवाज आणि मंत्रपठण राजांना जागे करीत असे, प्रार्तविधी आटोपल्यावर ते वाड्याच्या समोरील मैदानांत होत असलेल्या हजार-पाचशे घोडेस्वारांची कवाईत पाहत. नंतर वैद्याकडून नाडी परीक्षा करून घेत. स्नान झाल्यावर सभामंडपांत (दरबारांत) प्रवेश होई. सभामंडपास नवगजी असे संबोधित असत. त्या नवगजीत राजे, संस्थानिक परराष्ट्र वकील व सरदार आधीच येऊन हजर असत. नंतर भालदारांच्या ललकाऱ्यांत महाराज हातातील तलवारीचे अग्र जमिनीला टेकीत सभास्थानात प्रवेश करून सिंहासनारूढ होत.

भोजनोत्तर कधी स्वारी, शिकार तर कधी पंडीत कारभारी यांचे बरोबर राजकारण न्यायमनसुबी, काव्यविनोद इत्यादी व्यवहारांत गुंतलेले असत. सायंकर्म आटोपल्यावर उपहारोत्तर खलबतखान्यांत मोजक्या मुत्सद्यांच्या समवेत गुप्त कारवाई चाले.[१]

यापुढील शहाजीराजांच्या कर्नाटकांतील कर्तृत्वाचा इतिहास प्रसंग विशेष पुढील प्रकरणांत ठिकठिकाणी सांगितला आहे.

कर्नाटकातील हिंदू संस्थानिकांचे शहाजीराजेंनी इस्लामी सुलतानाप्रमाणे उच्चाटन केले नाही. त्यांच्याकडून खंडणी घेऊन व आपले स्वामित्व मान्य करावयास लावून शहाजीराजे यांनी त्यांचे अस्तित्व कायम ठेविले. हिंदू राजे जाणूनबुजून जिवंत ठेवण्याचे धोरण त्यांनी पत्करले असे राईस म्हणतो ते खरे होय. यावरून शहाजीराजांच्या उदार धोरणाची व स्वकीयांबद्दल त्यांना असलेल्या ममत्वाची प्रचिती येते. शहाजीराजे आदिलशहाचे ताबेदार असले तरीही स्वदेश आणि स्वधर्म याविषयी त्यांच्या मनांत प्रखर अभिमान जागृत होता.

शिवाजी राजांच्या वयांच्या १० व्या वर्षी शहाजीराजांनी त्यांना (१६४०) राजमाता जिजाबाईसह्र बंगलोरास आणविले आणि वडीलपुत्र संभाजी व शिवराय त्यांना दोन वर्षे आपल्या सानिध्यांत बंगलोरास ठेविले व प्रशिक्षण दिले. ह्या काळात शिवाजी राजेंना स्वराज्य निर्मितीची प्रेरणा व तदनुषंगिक साहाय्य त्यांच्या पिताजीकडून मिळाले होते. जी गोष्ट स्वतः शहाजीराजांस प्रत्यक्ष करणे शक्य झाले नाही ती आपल्या दोनही प्रतापी पुत्राकडून करवून घेण्याची त्यांनी पडद्याआड राहून सिद्धता केली. पुत्राकरता स्वराज्याची योजना आखली आणि त्या स्वराज्य योजनेच्या पूर्ततेसाठी बंगलोरहून शिवाजीराजांबरोबर आपले विश्वासू सरदार मुत्सद्दी पाठविले.[२] शहाजी राजांच्या कर्तृत्वाविषयी

१ शिवभारत, अध्याय ९, श्लोक ५६-५९.

२ शिवभारत, अ. १०, श्लोक २५-२७.

प्रा. शेजवलकर म्हणतात, "शिवाजी बंगळुरास त्यांचे सान्निध्यांत असता त्यांच्या संस्कारक्षम मनावर त्यांनी स्वराज्याचा महामंत्र कोरला कारण बंगळूरहून पुण्यास परत येताच शिवाजी राजांनी स्वराज्याची स्थापना करण्याच्या दिशेने हालचाली सुरू केल्या.[१] शहाजीराजांच्या कर्नाटकांतील कामगिरीचे विश्लेषण शिवचरित्रकार डॉ. बाळकृष्ण यांनी पुढीलप्रमाणे केले आहे."

"कर्नाटकाचा सुभेदार म्हणून शहाजीराजे आदिलशहाच्या वतीने कारभार चालवीत होते त्यांच्या पदरी विविध प्रांतातील सुमारे ७५ कवी व पंडित लोक होते. मुस्लिम अधिकाऱ्यांनी तिकडील भागात चालविलेला हिंदू प्रजेचा छळ आणि मंदिरांचा विध्वंस त्यांनी थांबविला. हिंदू संस्कृती आणि साहित्य यांचे त्यांनी रक्षण केले. मराठीला दरबारी भाषेचे स्थान दिले. महाराष्ट्रीय मंडळींना आपल्या शासनांत त्यांनी महत्त्वाच्या जागा दिल्या. त्यांनी सुरू केलेली शासन पद्धती पुढील पिढीकडून आणि त्यानंतरही ब्रिटिश आमदानीत अनुसरली गेली. ते संस्कृतचे विद्वान, मुत्सद्दी व स्वधर्मनिष्ठ राजे होते. ते बृहन महाराष्ट्राचे संस्थापक होत."[२] ह्याच आपल्या ग्रंथात डॉ. बाळकृष्ण म्हणतात की, शिवाजीराजांनी मुस्लिम सत्तेविरुद्ध उठाव करून जो विजय मिळविला, त्याचे सर्वश्रेय शहाजीराजांकडे जाते.

राधामाधव विलास चंपू-प्रस्तावनेत इतिहासाचार्य राजवाडे शहाजीराजांचे कर्तृत्व शिवाजी राजांच्या राष्ट्रकार्यात कसे साहाय्यभूत झाले हे सांगत आहेत. ते लिहितात, "महाराष्ट्रात स्वराज्य स्थापनेचे श्रेय शिवाजीस मिळाले हे खरे! पण मूळ कल्पना व योजना शहाजीची होती त्या श्रेयाचा वाटेकरी शहाजीस करणे इतिहासास प्राप्त आहे! पिंगळे, अत्रे, दादाजी, पानसंबळ, रोझेकर, जेधे, बांदल, हे सर्व मुत्सद्दी सरदार शहाजीचे, जहागीर शहाजीची! तोफा, हत्ती, घोडे व जागजागी गडकोटांतून साठविलेला सरंजाम शहाजीचा! त्याच्या जोरावर शिवाजीने आपली भव्य इमारत रचली. आकाशातून पडला आणि धावायला लागला अशातला काही प्रकार शिवाजीचा नव्हता. बापाच्या खांद्यावर उभा राहून शिवाजी प्रथम उच्चासनस्थ झाला. तात्पर्य दरबारी मुत्सद्दी, लष्करी सरदार, लढाऊ सामान, शहाणव कुळींच्या जेधे आदी मराठ्यांचे साहाय्य व शहाजींच्या नावाचा दरारा आणि दिमाख या देणग्या शिवाजीला शहाजीकडून मिळाल्या[३] एवंच स्वराज्याचा प्रारंभ शहाजी राजांनी केला."

□□

१ शेजवलकर, श्री शिवछत्रपति, पृ. ५३.

२ डॉ. बाळकृष्ण, शिवाजी धी ग्रेट, पृ. १६०-१६२.

३ शेजवलकर, श्री शिवछत्रपति, पृ. ४४०-४१.

३. शिवाजीराजे यांचा जन्म, बालपण व शिक्षण

मागील प्रकरणात सांगितल्याप्रमाणे ऑक्टोबर १६२९ मध्ये शहाजीराजे यांनी आपली गर्भवती पत्नी जिजाबाई हिला शिवनेरीवर ठेवली व राजे स्वतः निजामशहाच्या बाजूने मोगलांशी लढण्यासाठी खानदेशकडे निघून गेले. ते तिकडे मोहिमेत गुंतले असताना, इकडे शिवनेरीवर शके १५५१, फाल्गुन वद्य तृतीया शुक्रवार (१९ फेब्रुवारी १६३०) ये दिवशी राजश्री शिवाजीराजे जन्मले. [१] नंतर तीन-चार महिन्यांनी शहाजीराजांनी आपल्या पुत्राचे मुख विधिपूर्वक अवलोकन केले. पुढे वर्ष-दीड वर्ष हे कुटुंब शिवनेरीवर एकत्र राहिले.

शिवाजीराजांच्या जन्मापासून शहाजीराजे यांनी पुण्याहून वस्ती उठवल्यामुळे शहाजीराजे यांचा खाजगी पत्रव्यवहार व टिपणे महाराष्ट्रातून बंगलोरास कर्नाटकांत गेली. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील व नंतरच्या बखरकारांनी शिवाजी महाराजांची जन्मतिथी ऐकीव पुराव्यावरून शके १५४९ वैशाख ही (१६२७) दिली. ग्रँट डफचा "हिस्ट्री ऑफ द मराठाज" हा ग्रंथ इ. स. १८२६ मध्ये प्रसिद्ध झाला. यातही शिवजन्म तारीख १६२७ ही दिलेली आहे. नवी शिवजन्म तिथी इ. स. १६३० सालची. ह्या नव्या शिवजन्मतिथीची माहिती अशी :–

भारतात शिवाजी जन्मोत्सव लोकमान्य टिळकांनी इ. स. १८९६ साली सुरू केला. शिवाजी महाराजांच्या चरित्रापासून जनतेस स्फूर्ती मिळून ते परवशतेचे पाश तोडण्यास उद्युक्त होतील असे लोकमान्य टिळकांस वाटू लागले म्हणून त्यांनी शिवजयंती उत्सवास सुरुवात केली. महाराजांच्या अलौकिक पराक्रमाचे स्मरण आजच्या पिढीस होण्यासाठी सर्व हिंदुस्थानात जागोजागी शिवजन्मोत्सव साजरा करण्यात यावा असे त्यावेळचे पुढारी पं. मदन मोहन मालवीय, सुरेंद्रनाथ बॅनर्जी आणि लोकमान्य टिळक आदी पुढाऱ्यांनी ठरविले. लोकमान्य टिळकांनी शिवजन्म तिथी वैशाख शु. द्वितीया शके १५४९ ही सार्वजनिक रीत्या साजरी करण्याचे ठरवून उत्सवास सुरुवात इ. स. १८९६ साली

१ कवींद्र परमानंदकृत शिवभारत, अ. ६.
श्लोक २६ ते ३१, पृ. ५१.

केली. तेव्हापासून या तारखेस (२५ एप्रिल) महाराष्ट्रात शिवजन्मोत्सव पार पडू लागले. खरी जन्मतिथी कोणती असेल या संबंधीचे आपले विवेचन मांडून इतिहासाचार्य राजवाडे यांनी इ. स. १९०० साली लोकांपुढे हा वाद ठेविला. लोकमान्य टिळकांनी त्यांत लक्ष घालून केसरीत एक लेखही लिहिला. दोघांनी ज्योतिष गणिताच्या साहाय्याने विचार करून इ. स. १६२७ वैशाख ही शिवजन्म तिथी कायम ठेविली. ह्या पुढील काळात संशोधन होत गेले. लोकमान्य टिळकांना जेधे शकावली सापडली ती त्यांनी भारत इतिहास संशोधक मंडळाच्या स्वाधीन केली. पुढील ४-५ वर्षांनी मंडळाच्या चतुर्थ संमेलन वृतांत शकावली प्रसिद्ध झाल्यावर शिवजन्मतिथीच्या वादास खरा रंग भरला.

शिवाजीराजे फाल्गुन वद्य तृतीया शुक्रवार, शके १५५१ म्हणजे दिनांक १९ फेब्रुवारी १६३० रोजी जन्मले असे जेधे शकावली सांगते. पूर्वीच्या रूढ " वैशाख शुद्ध द्वितीया शके १५४९ (इ. स. १६२७) " या तिथीशी ती विसंगत असल्यामुळे शिवजन्मतिथीचा वाद उत्पन्न झाला. दिनांक १९ फेब्रुवारी १६३० ही तारीख कवींद्र परमानंदकृत शिवभारतात दिलेली आढळते. शिवभारतकार कवींद्र परमानंदाचे शिवाजी महाराजांच्या दरबारी इ. स. १६६३ पासून वास्तव्य होते. या अस्सल दोन पुराव्यांच्या जोडीस शिवजन्माची माहिती देणाऱ्या आणखी चार-पाच शकावल्या महाराष्ट्रात सापडल्या. त्यातही " शके १५५१ शुक्ल नामसंवत्सरे फाल्गुन वद्य तृतीया शुक्रवार ये दिवशी राजश्री शिवाजी राजे उपजले " असे विधान केले आहे. तंजावर येथील बृहदीश्वराच्या मंदिरावरील शिलालेखात शके १५५१ त शिवजन्म झाला असे स्पष्ट म्हटले आहे. याच्या जोडीस राजस्थानातील बिकानेर व उदयपूर येथे मिळालेल्या महाराजांच्या जन्मकुंडल्या अस्सल व अव्वल साधन म्हणून इतिहासकारांनी विचारात घेतलेल्या आहेत. या कुंडल्यात दिलेली शिवजन्मतिथी शिवभारत व जेधे शकावली यात दिलेल्या तिथीशी म्हणजेच फाल्गुन वद्य तृतीया शुक्रवार (दि. १९ फेब्रुवारी १६३०) या तिथीशी जुळते असे फाल्गुनवादी पक्षाचे म्हणणे.

फाल्गुन वद्य तृतीया ही नवीन शिवजन्मतिथी रूढ करण्याचा प्रयत्न सन १९२४ पासून केसरीमार्फत सुरू झाला. शिवाजी महाराजांचा जन्म वैशाखी (इ. स. १६२७ साली झाला म्हणून सांगणारा तत्कालीन पुरावा एकही नाही. सर्व पुरावे तार्किक. उलट फाल्गुन वद्य तृतीया इ. स. १६३०) ह्या शिवजन्मतिथीस समकालीन अस्सल पुरावे

आहेत. ही तिथी प्रतिपादणाऱ्या दिवंगत शिवचरित्र लेखकांत डॉ. बाळकृष्ण, चि. वि. वैद्य, शेजवलकर, वा. कृ. भावे, प्रा. ग. ह. खरे, म. म. पोतदार, वा. सी. बेंद्रे आदी प्रमुख इतिहासकार आहेत. सध्याचे बहुतेक इतिहासकार १६३० हीच शिवजन्म तिथी मानतात. महाराष्ट्र शासनाने १९ फेब्रुवारी १६३० ही शिवजन्म म्हणून मान्य केली आहे.

बालशिवाजी राजे यांच्या जन्माच्या अगोदरपासून म्हणजे १६२७-२८ पासून महाराष्ट्रात दुष्काळाने उग्र स्वरूप धारण केले.[१] गावे ओस पडली होती. पोसायला अशक्य झालेली जनावरे सोडून दिल्यामुळे उजाड मुलुखातून ती जनावरे भटकताना दिसत होती. गावे सोडून माणसांचे तांडे देशोधडीला लागत होते. धान्य ही संपत्ती बनली होती. सोन्याला कुत्रे विचारत नव्हते. जिकडे जावे तिकडे भुकेकंगाल लोकांच्या झुंडी वाटा अडवून बसलेल्या असत. मूठभर धान्यासाठी ते हवे ते अत्याचार करण्यास मागे पुढे पाहत नव्हते. सारा मुलुख असुरक्षित बनला होता. आकाशात घिरट्या घालणाऱ्या घारी, गिधाडे शिवाय इतर पक्ष्यांनी मुलुख सोडला होता.[२] याच सुमारास दुष्काळाबरोबर शहाजहान बादशहाची स्वारी दक्षिणेत थैमान घालत होती. दुष्काळातून तग धरून राहिलेल्या उरल्या सुरल्या वस्त्या मोगलाईच्या स्वारीखाली बेचिराख होत होत्या. महाराष्ट्रातील सारा मुलुख दोन-तीन वर्षांत बेचिराख झाला असे शिवभारतकार सांगतात.

शिवाजी जन्माच्या ३-४ वर्षांनंतर दुष्काळात परागंदा झालेली रयत आशेने परत आपल्या गावी परतत होती. मुलुख स्थिर झाल्यावर गडावरून खाली गेलेली माणसे गडावर परतली. शिवजन्माच्या वेळी शहाजीराजे शिवनेरीस हजर नसल्यामुळे नुकत्याच जन्मलेल्या बालकाचे सर्व महत्त्वाचे संस्कार त्यांच्या अपरोक्ष झाले. जातकर्म, सूर्यदर्शन, उपवेषण व अन्नप्राशन हे चार महत्त्वाचे बाळाचे संस्कार शहाजीराजांच्या अनुपस्थितीत पार पडले.[३] शिवाजी महाराजांचे बालपण शिवनेरी, बैजपूर, पुणे इत्यादी ठिकाणी गेले. त्यावेळी नारो त्रिमल हणमंते, गोमाजी नाईक पानसंबळ वगैरे मंडळी जिजाबाईचे तैनातीत होती. शिवाजी महाराजांच्या बालपणीच्या लीलांचे कवी परमानंदानी शिवभारतात वर्णन केले आहे. इतर लहान मुलांप्रमाणे माती खाणे, आपल्या प्रतिबिंबाशी खेळणे, अंगावर

---

१ शिवचरित्र साहित्य खंड ५ ले. ८२४.

राजखंड १८, पृ. २९, शिवभारत ८य५२ ते ५६.

२ शिवभारत ८/५२ ते ५६.

३ शिवभारत ६/९२.

.धूळ माखणे, मातीचे हत्ती, घोडे यांचे खेळ खेळणे, इत्यादी गोष्टी बालशिवाजी राजे करीत होते. निसर्गाशी सानिध्य असल्यामुळे मोर, पोपट, कोकीळ यांचे हुबेहुब आवाज काढून बालराजे इतरांना फसवीत असत. वाघासारखी गर्जना करून दायांना भिवविणे, आपल्या अंगावरील दागिने काढून नोकर चाकरांना देऊन टाकणे व मातीचे किल्ले करून " हे माझे गड आहेत " असे सर्वांना सांगत असत. आंधळी कोशिंबीर, चेंडू भोवरा हे खेळ खेळत असता बालराजांना भानही राहत नसे. नाना प्रकारची सोंगे घेऊन इतरांशी खेळण्याचा बालराजांचा अभ्यास लहानपणापासूनचा असावा. बहुरूपी होऊन प्रसंगास पाहिजे तशी बतावणी करून संकट निवारण करण्याच्या कलेत बालराजे निष्णांत होते. अशा रीतीने बालराजे शिवनेरीवर मोठे होत होते.[१] तटावरून रपेट करत होते. लेण्याद्री आणि आजूबाजूचा मुलुख त्यांच्या नजरेखालून जात होता. शास्त्रीबुवा त्यांना अक्षर ओळखीचे वाचनाचे धडे देत होते.[२] शिवाजी महाराजांची पहिली सहा वर्ष शिवनेरी, प्रेमगिरी, माहुलीस म्हणजे सह्याद्री गडकोटावरच गेली.

बालपण व शिक्षण :

खरे पाहता मातोश्री जिजाबाईंच्या हाताखाली शिवरायांचे शिक्षण झाले. इ. स. १६३० पासून १६३६ पर्यंत पहिली सहा वर्षे बालशिवाजी राजांसह जिजाबाई शहाजीराजांच्या हुकुमानुसार घोड्यावरून एका किल्ल्यावरून दुसऱ्या किल्ल्यावर फिरत होत्या. निजामाची राजधानी दौलताबाद हा किल्ला मोगलांनी १७ जून १६३३ मध्ये आपल्या ताब्यात घेतला.[३] तेव्हा शहाजीराजांनी वर सांगितल्याप्रमाणे भीमगड येथे निजामशहाची गादी स्थापिली व स्वतः वजीर बनले.[४] (१६३३) ह्यावेळी जिजाबाई शिवाजी राजांसह जुन्नरास होत्या. आपल्याला पकडण्यासाठी मोगल सरदार येत आहे हे समजताच त्यांनी शिवरायास शिवापुरी पाठवून दिले. त्यानंतर मोगल सरदाराने जिजाऊंना पकडून नाशिक येथे कैदेत ठेवले. जिजाबाईचा चुलता जगदेवराव जाधव

---

१ शिवभारत ७/१७ ते ३६.

२ सातव्या वर्षी शहाजी राजे यांनी पुत्र शिवाजी राजे यांस आईसह विजापूर शेजारील कंपली गावी बांधलेल्या आपल्या वाड्यांत नेले आणि शास्त्री बुवाकडून अक्षर ओळख व जुजबी गणित त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे शिकविले. बेंद्रे, श्री छत्रपती शिवाजी महाराज, पृ. ३१.

३ बेंद्रे, विजापूरची आदिलशाही पृ. ३१९-२०. शिवच. प्रदीप, पृ. १६.

४ बेंद्रे, मालोजी व शहाजी महाराज, पृ. ३२९-३०,

इलियट डोसन, हिस्टरी ऑफ इंडिया, व्हा. ७, पृ. ५१-५२.

याच्या सांगण्यावरून त्यांची सुटका झाल्यावर शिवाजीराजांसह त्या शहाजीराजियांबरोबर राहण्यासाठी प्रेमगिरीस गेल्या. काही दिवसांनी त्या किल्ल्यास विजापूरकरांनी वेढा दिला. तेव्हा शहाजीराजे निजामशहास घेऊन माहुलीस गेले.[१] व बरोबर जिजाबाई व बाळराजे शिवाजीस ठेविले. त्या किल्ल्यासही विजापूरच्या फौजेने वेढा घातला तेव्हा किल्ला लढविण्याची शिकस्त करून वेढा उठेना म्हणून सल्ल्याची बोलणी केली व माहुली किल्ला खाली करून दिला.[२] (ऑक्टोबर १६३६) तसेच निजामास मोगलांच्या स्वाधीन केले व स्वतः शिवाजीराजे व जिजाबाईसह पुण्यास येऊन राहिले. अशा रीतीने शिवाजीराजे यांनी बालवयांत लढण्याचे व धामधुमीचे प्रसंग अनुभवले होते. ह्याचवेळी महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यातून शिवाजी राजांचा मातोश्रीबरोबर प्रवास झाला होता. ह्या काळांतच मातोश्रीकडून बालशिवाजी राजांस निजामशाही, आदिलशाही व मोंगल यांची गोष्टरूपाने ओळख झाली असावी.

कवींद्र परमानंदानी शिवभारतात " शिवाजी सहा वर्षांचा झाल्याबरोबर त्याला पंतोजींच्या मांडीवर बसवून अक्षर ओळख करून दिली.[३] असे स्पष्टपणे सांगितले आहे. शिवाजीराजे यांनी अत्यंत हुशारीने अध्ययन केले व मुळाक्षरे इतर मुलांपेक्षा लवकर आत्मसात केली असे शिवभारतात म्हटले आहे. शिवाजीराजांचे वडील शहाजीराजे स्वतः विद्वान असून विद्वानांचा आश्रयदाता म्हणूनही त्यांचा लौकिक होता. जयराम पिंडे, संगीत मकरंदकार देव असे सुमारे ३० विद्वान शहाजीराजांच्या पदरी होते असे राधा माधव विलास चंपूमध्ये म्हटले आहे. शहाजीराजे संस्कृतप्रेमी होते. त्यांना फारसीचे ज्ञान होते. बंगळूरला काही वर्ष गेल्यामुळे कानडीचे ज्ञान असावे. शिवाजी महाराज इटालियन प्रवासी मनुची यांजबरोबर हिंदुस्थानीत बोलले असे मनुची आपल्या " स्टोरियो द मोगोर " या ग्रंथात म्हणतो. यावरून " शिवाजी हा निरक्षर होता, त्याला कांही लिहिता वाचता येत नव्हते," असे ग्रँट टफ व सर जदुनाथ सरकार या दोन इतिहासकारांनी म्हटले आहे त्यांत काही तथ्य नाही. पूर्वीच्या काळी राजे वगैरे खासे

१ शिवचरित्र प्रदीप, पृ. १७.

२ बुसातीन-उस्-सलातीन, पृ. ११३-११४.
बेंद्रे, शहाजी पृ. २८५.

३ शिवभारत अ ९/७४.

लोक आपली सारी पत्रे चिटणीसासारख्या मुद्दाम कसलेल्या लेखकाकडून लिहवून घेत व खाली सुज्ञ असा, अशी अक्षरे लिहित. तीच प्रथा शिवाजी महाराजांनी चालू ठेविली होती.

इ. स. १६३६ च्या तहाप्रमाणे शहाजीराजे यांना नोकरीत घेताना विजापूरकरांनी भीमा व नीरा या दोन नद्यांमधील इंदापूर, सुपे व चाकण परगण्याचा मुलुख त्यांच्या मूळ जहागिरीबरोबर त्याजकडे ठेविला होता.[१] व त्यांची रवानगी कर्नाटकांत केली होती. अशा वेळी महाराष्ट्रातील जहागिरीची व्यवस्था पाहण्यासाठी शहाजीराजांनी बाल शिवाजीराजे व मातोश्री जिजाबाई यांच्या सोबतीस दादोजीसारखा हुशार व कल्पक सच्चा कारभारी दिला. तो शहाजीराजांकडून कामकाज समजून घेण्यासाठी कर्नाटकात अधूनमधून जाई. पुणे प्रांताचा ताबा शहाजीराजांस सन १६२८ त मिळाला. तेव्हा तेथे वाडे वगैरे बांधून कुटुंबाच्या राहण्याची सोय केली. हे वाडे सन १६३० च्या सुमारास आदिलशहाच्या हुकुमावरून मुरार जगदेवाने जाळले. शहराचा कोट पाडून टाकला आणि लोकांनी वस्ती करून नये म्हणून पुण्यावरून अक्षरशः गाढवाचा नांगर फिरविला. दादोजीने प्रथम पुण्यात वस्ती करण्याचे ठरवून धार्मिक विधी म्हणून पांढरीची शांती केली. गावावरून सोन्याचा नांगर फिरवून राहण्यास लायक असा केला.[२] कसब्यात लाल महाल नावाचा वाडा बांधून जवळ हत्ती, घोडे वगैरेची पागा तयार केली. दौलतीच्या मालकासाठी एकच वाडा असावा हे दादाजींना मान्य नव्हते. सुरक्षिततेच्या दृष्टीने ते योग्यही नव्हते. त्यांनी खेडबारे खोरे येथे शिवाजी राजांसाठी वाडा बांधण्यासाठी एक जागा मुक्रर केली. नवी पेठ वसविली आणि त्यापेठेला शिवापूर हे नाव दिले. परगण्याचे हवालदार म्हणून मुग्दल नऱ्हेकर देशपांडे यांना नेमले. या गावाशेजारी मोठी आमराई लावून दादाजीने फळांची सुबत्ता केली. तेथील आंबे वाखाणले जातात. तसेच राजगडचे पायथ्याशी शिवापट्टण हे गाव मातोश्री जिजाबाईने वसविले.[३]

शिवापूर आणि पुण्याचे वाडे तयार झाले. खेडपेक्षाही पुण्याचा वाडा बुलंद देखणा होता. याचे नाव ठेवले " लाल महाल ". शिवाजीराजे पुण्याच्या वाड्यांत आले. दादाजीनी फडाची निवडक माणसे गोळा केली. त्यांना पुण्यास वस्ती करण्याचे आवाहन

---

१ राजवाडे खंड १०, ले. २३५,
शि. छ. सा., खं ७, ले. २५.

२ सरदेसाई, रियासत, पृ. १३९.

३ शिवचरित्र प्रदीप, पृ. ७१.

केले. निरनिराळ्या जाती जमातीच्या लोकांना, कलाकारांना हरहुन्नरी लोकांना बोलावून आणून त्यांची वस्ती केली. शेतकऱ्यांना सर्व सवलती दिल्या. अशा रीतीने पुणे गाव बसविले. दादाजी कोंडदेव पुण्याची सर्व हकीगत शहाजीराजे यांना बंगलोर येथे वेळोवेळी कळवीत होते. स्वपराक्रमाने बंगळूरची जहागिरी मिळाविल्यावर शहाजी राजांनी दादोजी कोंडदेवास जिजाबाई, पुत्र शिवाजीराजे व सून सईबाई यांस बंगळूरला घेऊन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे दादाजी कोंडदेव, शहाजीराजे यांच्या कुटुंबीयास घेऊन बंगलोरला इ. स. १६४० च्या सुमारास गेला. प्रवास उत्तमरीतीने पार पडून मंडळी बंगलोरला सुखरूप दाखल झाली. स्थिरस्थावर झाल्यावर शहाजीराजे यांनी दादाजी कोंडदेवाकडून पुण्याच्या कारभाराची कसोशीने चौकशी केली, त्यात शिवाजीराजे यांचे शिक्षण व जहागिरीची व्यवस्था ह्या दोन्ही गोष्टी दादाजीने अल्पावधीत चांगल्या सिद्धीस नेल्या हे ऐकून शहाजीराजे संतोष पावले. त्यांनी दादाजीस बक्षिसे व पोशाख देऊन व पूर्वी तनखा होता त्यावर ७०० होनांची बढती करून त्यांचा गौरव केला. [१]

शिवाजीराजांना शहाजीराजांनी बंगलोरास त्याच्या वयाच्या १०व्या वर्षी (१६४०) आणविले आणि त्यांना दोन वर्षे बंगलोरास आपल्या सानिध्यात ठेवून घेतले. ह्या दोन वर्षांत शहाजीराजांनी शिवाजीराजांस सर्व प्रकारचे प्रशिक्षण दिले. शिवाजीराजांनी वडिलांचा दैनंदिन कार्यक्रम अभ्यासिला. वडिलांची नेतृत्वशक्ती व सत्तेचा वापर करण्याची पद्धती जवळून पाहिली. त्यामुळे त्यांना पित्याच्या कार्याची जाणीव झाली. वडिलांच्या दरबारांत अनेक विषयात पारंगत असे ६०/७० पंडित होते. त्यांचे साहचर्य शिवाजीराजांना मिळाले. त्यांच्यापासून राज्य व युद्धविषयक शास्त्रांचे व अनुभवाचे प्रात्यक्षिक पाहावयास मिळाले होते. त्यांच्या शिकवणीने राज्यकारभाराची व्यवस्था आणि वागणूक आपल्या आचरणात आणणे शिवाजीराजांना पुढील काळांत सोपे गेले. शहाजीराजांजवळील निष्ठावंत उपसेनापतींकडून राजियांना लढाईचे डावपेच शिकायला मिळाले. शहाजीराजांच्या पदरी बंगलोरास उपाध्याय व शास्त्री कुटुंबे होती. त्याजकडून राजेना रामायण, महाभारताची प्रवचने ऐकविली गेली. अशा रीतीने दोन वर्षे राजांच्या बंगळूर वास्तव्यांत त्यांना लढाया मारून राज्य वाढवावयाचे, राज्यशकट चालविण्याचे शिक्षण देऊन तरबेज करण्यात

१ रा. खंड १७-१९.

आले.[1] स्वतंत्र राज्य स्थापण्याच्या आपल्या प्रयत्नास यश आले नाही याची खंत शहाजीराजेना सतत वाटत असावी. आपणांस जे साध्य झाले नाही ते स्वतंत्र राज्य आपल्या मुलाने स्थापन करावे ही इच्छा मनी बाळगून शिवाजीराजांस बंगलोर वास्तव्यात प्रशिक्षण दिले. शिवाजीराजे जात्याच मोठे बुद्धिमान व चतूर होते.

हे शिक्षण पुरे झाल्यानंतर इ. स. १६४२ च्या अखेरीस शिवाजीराजांस त्यांच्या मातोश्री जिजाबाई व दादाजी कोंडदेव यांसह पुण्याच्या जहागिरीत शहाजी राजांनी त्यांची रवानगी केली. हा पुण्याचा जहागिरदार जणू स्वतंत्र राजा असे समजून शहाजीराजांनी त्याजबरोबर पेशवे, मुजुमदार, डबीर, सबनीस असेही स्वतंत्र अधिकारी करून पाठविले. तसेच बरोबर हत्ती, घोडे, पायदळ व विपुल द्रव्य दिले.[2] मावळ प्रांताच्या वतनदारास शिवाजीराजांस स्वराज्य स्थापण्यास साहाय्य करण्यासाठी पत्रे दिली. अशा रीतीने शिवाजी महाराजांच्या वडिलांनी महाराजांस स्वराज्य स्थापण्याचा मंत्र दिला. त्यासाठी प्रशिक्षण दिले, साहित्य दिले, सरंजाम दिला. स्वराज्य संपादनाच्या कामगिरींत प्रोत्साहन व मार्गदर्शन केले.

□□



शहाजीराजे भोसले

१ शिवभारत, अ. ९/५६-५९.

२ शिवभारत, अ. १०/२५, सभासद पृ. ७, शिव. च. साहित्य खंड ३/६३३.

४. हिंदवी स्वराज्याचा पाया घातला

जिजामाता व शिवाजीराजे दादाजी कोंडदेवासह आपल्या लव्याजम्यानिशी इ. स. १६४२ च्या पावसाळ्यानंतर पुण्यास आले व लाल महालात राहू लागले. पुण्यात आल्यावर शिवाजीराजांच्या नव्या आयुष्यास सुरुवात झाली. व्यायाम करून आणि आखाड्यात कुस्ती मारून राजांचे शरीर धाटदार होऊ लागले. मनगटे पोलादाच्या कांबीची झाली. छाती वज्राची झाली. तलवार चालविण्यात, दांडपट्टा खेळण्यात राजे पटाईत झाले. घोड्यावर बसून राजे जहागिरीच्या प्रदेशात संचार करू लागले. जहागिरीच्या कारभाराशी राजांचा परिचय होऊ लागला. जहागिरीतील कुळकर्णी, पाटील, देसाई, देशपांडे, देशमुख सारे येऊन राजांना भेटून जात होते. फडाला भारदस्तपणा आला होता; आदब आली होती. कारण दप्तरी आता पेशवे, डबीर, अमात्य होते. राजांना दादाजीने फडात गुंतविल्यामुळे राजेना दप्तराची माहिती होऊ लागली, कारभार पत्रव्यवहार कसा पाहावा ह्याचे शिक्षण मिळू लागले. राजे दादाजींच्या बरोबर मावळ फिरत होते. वाड्यात दप्तर पाहत होते. जिजाबाईंच्या संगतीत राहून आईंनी सोडविलेला न्याय निवाडा लक्षात घेत होते. त्यावेळेपासून ते शहाजीराजांच्या महाराष्ट्रांतील जहागिरीचा कारभार दादाजी कोंडदेवाच्या व आईच्या मदतीने पाहू लागले.

जहागिरीचे स्वरूप :

शहाजीराजांच्या जहागिरीत इंदापूर, सुपे, पुणे व चाकण एवढे चार परगणे होते. हा मुलुख म्हणजे आजचे इंदापूर, भीमथडी, दौंड, पुरंदर व हवेली हे तालुके आणि भीमानदीच्या दक्षिणेकडील खेड तालुक्याचा पूर्वभाग यातला मुलुख. ह्या जहागिरीतील फक्त वसुलाचा हक्क शहाजीराजे यांना व त्यांचा मुतालिक म्हणून दादाजी कोंडदेवाला आणि शहाजीराजांचा वारस म्हणून शिवाजीराजे यांना होता. हा वसूल गोळा करण्याचे काम दादाजीने अंगीकारले. ह्या जहागिरीची राजसत्ता आदिलशाहीकडे होती. ती राजसत्ता सिंहगडावर जो आदिलशाहीतील किल्लेदार असे तो चालवी. जहागिरींतील किल्ले जहागिरदारांच्या ताब्यात नसत. ह्या किल्ल्यांची मालकी आदिलशहाकडे व किल्लेदारही आदिलशहाच्या हुकूमाने वागणारा आदिलशहाचा नोकर असे.

शिवाजीराजे बंगळोरहून पुण्यास येताच त्यांनी आपले लक्ष्य बारा मावळे काबीज करण्याकडे वेधिले. मावळे देशमुख बांधून घेतले आणि हिरडस मावळचे देशमुख कृष्णाजी नाईक यांच्यासारखे जे वश होत नव्हते, पुंडगिरी करत होते त्यांना शिक्षा केल्या.[१] पुण्याखालची ही बारा मावळे म्हणजे अंदर मावळ, नाणे मावळ, पवन मावळ, कोरबारसे मावळ, पौडखोरे, हिरडस व रोहिडखोरे—साधारणत: शहाजीराजांच्या मावळत्या बाजूचा डोंगराळ प्रदेश. हा आदिलशहाचा मुलूख पण ह्यातील देशमुख, देशपांडे, आदी मावळे आदिलशहाची सत्ता मानीत नसत. ह्या देशमुखांतील आपआपसातील पुंडावे व भांडणे आदिलशहाला आपल्या आवाक्यात राखता आली नव्हती ते स्वतंत्रपणे एकमेकांचा मुलूख घेत, लुटीत वगैरे धावपळी करीत असत. शिवाजी महाराजांच्या जहागिरीच्या आसपासच्या पहाडी मुलखातले जे रहिवाशी, ते चरितार्थाकरिता रानांवनांत भटकत असत. त्यामुळे रानांतील सगळे रस्ते, चोरवाटा व पाऊलवाटांची माहिती त्यांना होती. शिवजीराजे यांनी ह्या मावळ्यांत मिसळून त्यांना आपलेसे केले. त्यांच्याशी प्रेमळपणाने वागून त्यांच्या मनात आपल्याविषयी प्रीती निर्माण केली. ह्या मावळ्यांचे पुढारी काही देशमुख होते त्यांशी राजियांनी पहिल्यापासून स्नेह संपादून त्यांना आपल्या स्वराज्य संपादनाच्या अंगीकृत कार्यास अनुकूल करून घेतले. ते इतिहास प्रसिद्ध बांदल देशमुख, तानाजी मालुसरे व बाजी पासलकर हे होत. हे तिघेही पिढीजाद वतनदार होते. मावळांतील लोक त्यांना आपले पुढारी मानीत. त्यांनी शिवाजीराजांस स्वराज्याच्या कामी आपल्या प्राणांची आहुती देण्याचे कबूल केले.

शिवाजीराजे (१६४२) परत पुण्यास येण्यापूर्वी दादाजी पंतांच्या संमतीने दादाजी नरसी प्रभु याने एक गाव रायरेश्वर मंदिरास पूजा-अर्चेसाठी देऊन पुजारीही नेमले होते.[२] आदिलशहास ही बातमी समजल्यावर त्यास हे कृत्य आपल्या फतव्याविरुद्ध धर्मकृत्य झाल्याचे वाटले. कारण यावेळी दादाजी कोंडदेव आदिलशहाचा सुभेदार म्हणून मावळाचा कारभार पाहत होता. तेव्हा ह्या फतव्याविरुद्धच्या धर्मकृत्यास प्रायश्चित म्हणून आदिलशहाने दादाजी कोंडदेवास १६४३ त बडतर्फ केले व ती सुभेदारी घोरपडे बंधूस दिली व घोरपडे बंधूनी दादाजींस शिक्षा केली.[३] पुढे आदिलशहा व शहाजीराजे यांचे इ. स. १६४५ त सख्य झाले तेव्हा दादाजीस पुन्हा कोंडाण्याचा सुभा मिळाला.

१ राज, खंड १७ ले. १, पृ. ४-६, इ. स. व ४, पृ. ४-६.
ऐ. सं. साहि. ४ ले. ३०, पृ. ६६-६५.

२ राज, खंड १५ ले. २६६, पृ. २७१.

३ वा. सी. बेंद्रे, छ. शिवाजी महाराज, पृ. ८१.

मावळचा प्रमुख देशमुख कान्होजी जेधे यास शहाजीराजांनी बंगलोरहून शिवाजी राजांचे तैनातीत पाठविले होते. तो बाजी पासलकरचा जावई होता. ही मंडळी शिवाजी राजांच्या उद्योगांत सामील झाली.

याप्रमाणे मावळ्यांनी राजांस साथ देण्याचा निश्चय केला. पावसाळ्यात चार महिने शेती करणाऱ्या मावळ्यांनी पावसाळ्यानंतर नांगर बाजूला ठेवून ते तलवारी घेऊ लागले. तद्नंतर राजांनी शस्त्रांची जमवाजमव करण्यास सुरुवात केली. मावळ्यांना फौजबंद केले. फौज उभी केली आणि राजांनी स्वराज्य स्थापनेचा मुहूर्त करण्याचे गुपित मातोश्री जिजाबाईंना सांगितले, तसेच दादाजी कोंडदेवांनाही सांगितले, तेव्हा दादाजी राजांस बोलले की " आपण जहागिरदार आहोत. ह्या मुलखांचे राजे आदिलशहा आहेत. त्यांचे सामर्थ्य प्रचंड आहे. त्यांना हा तुमचा उद्योग आज उद्या समजल्यावर आपल्यावर काय संकट येईल याची कल्पना करावी." पंतांचे हे बोलणे ऐकल्यावर राजेंना आपल्या बेताला त्यांची संमती मिळविणे आवश्यक वाटले कारण दादाजीपंत हे शहाजीराजांचे कारभारी त्याचप्रमाणे विजापूरकरांचे सुभेदार होते.

दादाजी राजेंना समजून देऊ लागले, " तुमच्या वडिलांनीसुद्धा प्रचंड प्रयत्न केले, निजामशाही, आदिलशाही आणि मोगलशाही या तिन्ही ठिकाणी त्यांनी धडपड केली. पण राजसत्तेपुढे त्यांचे काही चालले नाही. कुणाच्यातरी एकाच्या सेवेत राहिल्याशिवाय त्यांना दुसरा मार्ग उरला नाही. जनतेच्या अभ्युदयाचा काळ यायला अद्याप अवकाश आहे, आज जे विजापूरकरांशी वैर करतील त्यांस विनाश पत्कारावा लागेल." त्यावर जिजाऊ बोलल्या, " पंत आज त्याला सुरुवात तर करू द्या, कदाचित त्याचा पराभव होईल पण त्यातूनच नवे प्रयत्न सुरू होतील. त्याला पहिली सुरुवात करायला परवानगी द्यावी. " त्यावर दादाजीनी आईसाहेबांना सांगितले की, " आपण तुमच्या आज्ञेबाहेर नाही. शहाजीराजांना मी इमान दिले आहे. त्याचे स्मरण करून सांगतो, की शिवाजीराजांना शेवटपर्यंत साथ देईन " दादाजी पंतांचे आशीर्वाद मिळाल्यामुळे शिवाजीराजांना मनस्वी आनंद झाला, त्यांनी हजार-बाराशे मावळे जमा केले. बेत केला रोहिडखोरे जिंकून घेण्याचा. रोहिडखोऱ्याचा तरुण अधिकारी दादाजी नरसी प्रभू राजांना अनुकूल झाला. पहिला बार उडविण्याचा दिवस ठरला. राजे चालू लागले. ढाल तलवारी घेतलेले शेकडो मावळे शिवाजीराजांचा जयजयकार करीत त्याजबरोबर चालले. येसाजी कंक, बाजी पासलकर, तानाजी मालुसरे यांना बरोबर घेऊन राजांनी मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश

केला (मार्च १६४५). रोहिडेश्वराच्या साक्षीने सर्वांनी शपथपूर्वक स्वराज्याच्या प्रतिज्ञेचा उच्चार केला.[१] वातावरण उत्साहाने भारून गेले. मावळांत नवे वारे वाहू लागले.

तद्नंतर राजेयांनी राजगड किल्ला नव्याने बांधण्यास घेतला.[२] याबद्दल रोहिड-खोऱ्याचा देशपांडे दादाजी नरसी प्रभूस विजापूर दरबारकडून तंबी देणारे पत्र मिळाले. त्याने ते राजांस दाखविले. दादाजींचे वडील नरसीबाबा फार घाबरले होते. त्यांना राजांनी स्वदस्तुरीचे पत्र लिहून धीर दिला, " शहाशी बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाही. श्री रोहिडेश्वर तुमचे खोऱ्यांतील आदि कुलदेव तुमचा डोंगर माथा पठारांवर स्वयंभू आहे. त्यांनी आम्हास यश दिले व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे. तुमचे आमचे दादाजींचे विद्यमाने शपथा झाल्या त्या कायम वज्रप्राय आहेत त्यांत आम्ही अंतर करणार नाही. हे राज्य व्हावे हे श्रीचे मनात फार आहे.[३] " असे आत्मविश्वासाने राजांनी दादाजी नरसी प्रभूस सांगितले. त्यानंतर राजांचे लक्ष वळले तोरण्यावर. तो आकाशाला भिडलेला. चढायला कठीण, पण संपूर्ण दुर्लक्षित असलेला. यावेळी किल्लेदार गाफील होता हे पाहून राजांनी सरळ तोरण्यावर धडक दिली, आणि गड ताब्यात घेऊन त्यावर कब्जा केला.[४] इ. स. १६४६ त तोरण्याच्या पाठोपाठ तोरण्याच्या आग्नेयीस असलेला दुरजा देवीचा डोंगर ताब्यात घेतला. दोन्ही गडांच्या तटबंदीचे काम झपाट्याने होणे फार अगत्याचे होते. हिंमत धरून राजांनी गड तटबंदीचे काम सुरू केले. याच ठिकाणी राजांस गुप्त खजिना मिळाला. त्या खजिन्याचा उपयोग करून राजांनी शस्त्रे खरेदी केली. ह्या किल्ल्यावर स्वराज्याचे फडकत असलेले निशाण राजांच्या क्रोधास बळी पडलेल्या बांदल देशमुखांनी पाहिले. त्यांनी राजांच्या बंडाची आगळीक शिरवळला जाऊन शिरवळच्या सुभान मंगल किल्ल्याचा ठाणेदार अमीनला केली. ठाणेदाराने तातडीने विजापूरला शिवाजीराजांच्या बंडाचे वृत्त कळविले. तसेच दादाजी नरसी प्रभू गुप्ते राजांना मिळाल्याबद्दलची तक्रार केली गेली.

---

१ राज. खंड १७ ले. ७, पृ. १३.

२ बेंद्रे, शिवाजी, पृ. ७६.

३ राज. खंड १५, ले. २६८, पृ. २७२.
बेंद्रे शिवाजी, पृ. ७५-७६.

४ ऐतिहासिक फार्सी साहित्य खं. १, पृ. ५१-५२,
रियासत पृ. १५७.

दादाजी कोंडदेव यांचा मृत्यू :

आदिलशाहीशी आज ना उद्या राजांना टक्कर द्यावी लागणार हे दादाजींना स्पष्ट दिसत होते. मनातून ते निराश झाले होते. राजांच्या किल्ल्यांचे बांधकाम पूर्ण होत आले होते. रोहिडेश्वरांची तटबंदी भक्कम झाली होती. किल्ल्यांवरच्या तोफांनी बुरूज सजले होते. राजांची शिबंदीही आता मोठा आकार घेत होती. रोहिडेश्वरावर जमा केलेली हजार-बाराशे मावळेफौज पाच-सहा हजारावर गेली होती. व्याप वाढत होता. त्याबरोबर राजांच्या चिंताही वाढत होत्या. मुख्य चिंता होती दादाजींच्या आजारपणाची. दादाजींचे वय झाले होते. आणि आजारपण चालू होते. त्यांना रात्रीची झोप लागत नसे. दादाजींना आठवले की आपण पारस परगण्याचे मलठाण गावचे हिशेबनीस. शहाजीराजांनी आपल्या कारभारासाठी आपणांस उचलले. महाराज साहेबांचा विश्वास बसला, पुणे जहागिरीचा कारभार आपल्या नावे करण्याची त्यांनी दादाजींना आज्ञा केली. शहाजीराजांच्या ह्या विश्वासामुळे आदिलशाहीच्या दरबारचासुद्धा दादाजींच्यावर भरवसा होता. त्यांनीही दादोजींना अधिकार दिले होते. दादोजींना आपले मरण जवळ आल्याचे समजले, त्यांनी जहागिरीच्या हिशेबांच्या वह्या शिवाजीराजांस दाखविल्या. हळूहळू ते थकत चालले. अंथरुणातून उठण्याची शक्तीसुद्धा त्यांच्यात राहिली नाही. दादोजी घाबरे झाले आणि त्यांनी प्राण सोडला.[१] (इ. स. ७ मार्च १६४७)

दादाजी कोंडदेवाची योग्यता :

दादाजी कोंडदेव हे विजापूरकरांचे सुभेदार होते. " सुभेदार कोंडाणा " असा त्यांचा हुद्दा होता. त्यांना शहाजीराजांनी पुण्याचे मुख्य अधिकारी म्हणून नेमले. शहाजीराजे विजापूरकरांचे सरदार व जहागिरदार असल्याने दादाजीपंतांस दोघांची सेवा एकाचवेळी करता येत होती. ते राजकारणी होते. तसेच मुत्सद्दी होते. पुंडाव्याने पीडित झालेल्या शहाजीराजांच्या जहागिरीतील मावळ प्रदेश त्यांनी नीट व्यवस्थेत आणिला. तेथे शांतता व एकसूत्री कारभार स्थापन केला. त्यांची शासन पद्धती अत्यंत कडक होती. मावळांतील एका ब्राह्मणाने वसुलाचा भरणा करण्यात टाळाटाळ चालवली. त्याजवर त्यांनी विषप्रयोग करविला असे राजवाडे खं. १७ पत्र २ सांगते. मावळांतील देशमुखांचे शौर्यबळ अंतःकलह त्यात फुकट जात होते ते त्यांनी शिवाजीराजांकडून

१ शि. य. सा. २ ले. १२०, पृ. १५५-१५६.
पुरंद ३, पृ. १३०-१४४.

मिटविले. पूर्वीची मुसलमान राज्यातील इनामे व वतने दादाजींनी तशीच चालवून राज्याला स्थायिकपणा आणिला, ते वृद्धावस्थेत वयाच्या ७० व्या वर्षी निधन पावले. त्यांची पतिनिष्ठ पत्नीही दादाजींचे निधन समजताच निचेष्ट पडून तिने मृत्यूस कवटाळले. त्यांचा स्वभाव करारी व पापभीरू होता. स्वतःच्या हातून काही आगळीक घडल्यामुळे स्वतःस शिक्षा करण्याकरिता त्यांनी आपल्या हाताची बाही आमरण आखूड ठेवली अशी आख्यायिका आहे. त्यांच्या मृत्यूमुळे जिजाबाई व शिवाजीराजे यांना दुःख झाले.

शिवाजी राजांनी सिंहगड व पुरंदर हे दोन्ही किल्ले स्वतःच्या ताब्यांत घेतल्याचे विजापूर दरबारात समजल्यावर दरबारामध्ये नव्या मसलती सुरू झाल्या. प्रथम शिवाजीराजांचा बंदोबस्त करण्यासाठी मुधोळचे बाजी घोरपडे व त्यांचे बंधू खंडोजी या दोघांस विजापूर दरबारने पुण्यास पाठविले. त्यांना शिवाजी राजांनी परतून लावले. नंतर विजापूर दरबारने फलटणच्या राजा निंबाळकर यास चिथावणी दिली. तेव्हां तो शिवाजीराजांस त्रास देऊ लागला. ते सहन न होऊन शिवाजी महाराजांनी फलटणवर चाल करून निंबाळकरांना जरब बसविली. शिवाजी राजांच्या या पराक्रमामुळे पुणे परगण्यातील आदिलशाहीच्या ताब्यांतील किल्ले त्या त्या ठिकाणच्या किल्लेदारांनी फारशी खळखळ न करता राजांच्या स्वाधीन केले.

शिवाजीराजे नमत नाहीत याचा अंदाज आल्यावर आदिलशहाने भोसले घराण्यावर मोहीम सुरू केली.

शहाजीराजे कर्नाटकांत हिंदू सरदारांना आदिलशाही विरुद्ध बंड पुकारण्याची चिथावणी देत आहेत, इतकेच नव्हे तर आपल्या मुलाकरवी पुणे जहागिरींमध्ये उघड उघड उठाव करीत आहेत अशा आशयाच्या तक्रारी आदिलशाही सरदार शहाजीराजांविरुद्ध आदिलशहाकडे करीत. हे शहाजीराजांस समजल्यावर त्यांनी आदिलशाहीतील नोकरी सोडून कुतूबशाहीत जाण्याकरिता कुतूबशहास पत्र पाठवून विचारले. तेही आदिलशहास समजले. तेव्हा शहाजीराजांस पकडण्याचे आदिलशहाने ठरविले. त्यावेळी शहाजीराजे जिंजीच्या मोहिमेवर गेले होते. त्यांना पकडण्याची कामगिरी मुस्तफाखान व बाजी घोरपडे यांजवर सोपविण्यात आली. ह्या दोन सरदारांनी शहाजीराजांच्या जिंजी येथील छावणीला वेढा घालून ते झोपेत असतानाच त्यांना पकडले [१] (जुले २५ इ. स. १६४८). कांही

१ सरदेसाई, मराठी रियासत भा. १ पृ. १०१.

दिवस कर्नाटकांत त्यांना ठेवल्यावर मुस्ताफाखान ९ नोव्हेंबर १६४८ रोजी मरण पावला त्याच्या जागी आदिलशहाने अफझलखानास नेमिले. अफझलखानाने शहाजीराजांस बंदोबस्ताने बरोबर घेऊन विजापूरास पोचविले (मार्च इ. स. १६४९). त्यांना दरबारात पेश करण्यात आले. आपल्यामुळे आपल्या वडिलांचा छळ केला जात आहे हे राजेना कळतांच त्यांच्या अंतःकरणात संतापाच्या ठिणग्या उडू लागल्या. आपल्या वडिलांच्या अपमानाचा बदला घेतला पाहिजे असे त्यांचे एक मन आक्रंदू लागले पण लगेच दुसऱ्या मनाने सावधतेचा इशारा दिला.

एवढ्यावरच आदिलशहा शहाजीराजांची अप्रतिष्ठा करून थांबला नाही. त्याने इ. स. १६४८ च्या दसऱ्याच्या सुमारास बंगळोरकडील जहागीर सांभाळणारे संभाजीराजे व पुण्याच्या जहागिरीवरील शिवाजीराजे या दोघांवरही स्वाऱ्या पाठविल्या. परंतु दोघांनीही त्यांना चांगल्या तयारीने तोंड देऊन त्या मोडून काढल्या.

याप्रकरणात बाजी घोरपडे आणि अफझलखान या दोघांच्या दुष्टपणांचा कळस झाला, तो शिवाजी राजांच्या जिव्हारी लागला. या दोघांनाही त्यांच्या पापाचे प्रायश्चित्त राजांनी आठवण ठेवून पुढे आपल्या हाताने दिले. हा योगायोग ध्यानांत ठेवण्यासारखा आहे (अफझलखान इ. स. १६५९ नोव्हेंबर १०, बाजी घोरपडे इ. स. १६६४ ऑक्टोबर-नोव्हेंबर यांना जिवें मारिले).

फत्तेखानाचे शिवाजी राजांवर आक्रमण :

विजापूर दरबारने आपला सरदार फत्तेखान यास शिवाजीराजांचे पारिपत्य करण्यास पाठविले. त्याने खळदबेळपर्यंत कूच करून तेथे आपला मुक्काम ठोकला आणि आदिलशाही सरदार बाळाजी हैबतरावाला शिरवळ येथे धाडले. बाळाजी शिरवळच्या गढीत येऊन राहिल्याचे शिवाजीराजांस समजताच त्याजवर त्यांनी आपल्या मावळ्यांना रवाना केले. त्यांजबरोबर हातघाईची लढाई होऊन हैबतराव मारला गेला. हे समजताच फत्तेखान शिवाजीराजांना पकडण्यासाठी पुरंदरच्या पायथ्यांशी येऊन ठाकला आणि आपल्या सैन्याचे चार भाग करून त्यांना गड चढण्याचा हुकूम दिला. ते जेव्हा गड चढू लागले तेव्हा त्यांजवर किल्लेदाराने वरून बंदुकीचा मारा केला त्यांत मुसेखान नावाचा फत्तेखानाचा उजवा हात कामास आला तेव्हा फत्तेखानाने हार खाऊन तो परत गेला.[१]

१ शिवचरित्र साहित्य खं. १, ले. ३२, प. सा. सं. ले. ५६२.

शहाजीराजांच्या सुटकेसाठी मोगल सत्तेचा वापर :

मोगली सत्ता आपला बळी घेईल तेव्हा त्यांच्याशी जपून वागले पाहिजे हे विजापूरकरांना ठावूक होते. शिवाजीराजांना ह्या परिस्थितीची जाण येऊन त्यांनी आदिलशहाच्या कैदेतून शहाजीराजांची सुटका मोगलांच्या दबावाने करून घेण्याचे योजिले. ह्यासाठी शिवाजीराजांनी दक्षिणेतील मोगल प्रतिनिधी मुरादबक्ष याला पत्र लिहून कळविले की, आदिलशहाच्या कैदेतून आपल्या वडिलांची सुटका करण्यास पुढाकार घेतल्यास मी मोगल बादशहाची सेवा करायला तयार होईन. शिवाजीराजांचे हे पत्र वाचताच मुरादबक्ष खूष झाला. त्याने शहाजहान बादशहास शिवाजीराजांची विनंती कळविली. दरम्यान सिंहगड व कर्नाटकांतील दोन किल्ले परत करण्याच्या अटीवर[१] विजापूर दरबारने शहाजीराजांची सुटका केल्यामुळे मुरादबक्षाबरोबरच्या वाटाघाटीने प्रकरण तेथेच आटोपले.

शहाजी राजांची सुटका झाल्यावर पुढील पाच वर्षे आदिलशाही संतप्त होईल असे काही करावयाचे नाही असे शिवाजीराजांनी ठरविले.

सन १६४९ मध्ये शिवाजी महाराजांच्या जहागिरीत पुणे, इंदापूर, बारामती, चाकण आणि सुपे यांचा समावेश होता. या जहागिरीस शिवाजी महाराजांनी बारा मावळे तसेच रोहिडा, कोंडाणा, तोरणा, पुरंदर आणि राजगड हे किल्ले जोडले, ह्या बरोबरच सन १६५३ च्या सुमारास हिंदवी स्वराज्याचा पाया घातला गेला.[२]

□□

१ बेंद्रे, मालोजी व शहाजी महाराज, पृ. ४८८.

२ सरदेसाई, न्यू हिस्टरी ऑफ ध मराठाझ, भा. १, पृ. १०७.

५. स्वराज्याचा विस्तार

मागील प्रकरणात सांगितल्याप्रमाणे शिवाजीराजे यांनी वडिलार्जित जहागिरीचे स्वतंत्र राज्य बनविले. पुढील सहा वर्षांच्या काळात (१६५०-५५) शिवाजी राजांनी विजापूर सरकारला त्रास दिला नाही. परंतु शहाजी राजांची मुक्तता होईपर्यंत ते आपले राज्य एकसंघ करण्याच्या आणि जिंकलेल्या प्रदेशांची नीट व्यवस्था लावण्याच्या प्रयत्नात होते असे दिसते.[१] ह्या काळांत शिवाजी महाराजांनी घोरपडे, मोरे, शिर्के, निंबाळकर, जाधव, घाटगे या मराठा सरदारांना स्वतंत्र हिंदवी राज्याची कल्पना देऊन ह्या शुभकार्यात त्यांनी मदत करावी म्हणून त्यांना आपलेसे करण्याचे प्रयत्न केले.[२] त्यात त्यांना थोडेफार यशही मिळले. त्यानंतर सात वर्षांनी त्यांनी आपले सामर्थ्य वाढवले व संघटित केले[३] तेव्हा त्यांस असे जाणवले की आता विजापूर दरबारला घाबरण्याची गरज नाही. कारण त्यावेळी राजपुत्र औरंगजेब याने दख्खनचा सुभेदार म्हणून अधिकार गाजवण्यास व आदिलशाहीचे शोषण करण्यास प्रारंभ केला होता.[४]

शिवाजीराजांनी ह्यावेळी कोकण प्रदेशावर ताबा मिळविण्याचा विचार केला. हेतू हा की कोकणातून विजापूरचा सुलतान आणि मोगल सम्राट यांना उघड विरोध करता यावा. ह्यावर विचार करता राजेना असे आढळून आल्ले की, देश व कोकण दरम्यानचे सर्व मार्ग व खिंडी जावळीचे जहागिरदार मोरे यांच्या ताब्यात आहेत. जावळी ज्यांच्या ताब्यात तोच संपूर्ण वाई जिल्ह्यावर व सह्याद्रीच्या सर्व डोंगररांगावर आणि त्याला लागून असणाऱ्या सागरी किनाऱ्यावर अधिकार गाजवू शकेल. ही वस्तुस्थिती शिवाजीराजांच्या लक्षात आल्यावर त्यांनी जावळीचा ताबा घेण्याचे ठरविले.

---

१. सरकार, शिवाजी (५वी आवृत्ती), पृ. ३४.

२. सरकार, कित्ता पृ. ३५.

३. सरदेसाई, न्यू हिस्टरी ऑफ द मराठाझ, भाग १, पृ. १०७.

४. महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर पिरियड मराठी पृ. ७,
(शहाजहान बादशहाने सुभेदार औरंगजेब यास विजापूर खालसा कर असा हुकूम पाठविला होता).

तेथील मोरे घराणे गेल्या आठ पिढ्यांपासून जावळीची जहागीर उपभोगीत होते. हे घराणे पराक्रमी असल्यामुळे सातारा जिल्ह्यात मोऱ्यांचा चांगलाच वचक होता. त्यांनी आपली निष्ठा विजापूरकरांच्या चरणी वाहिली होती. म्हणून त्यास शिवरायांनी स्वतंत्र राज्याची स्थापना करण्याचा खटाटोप करावा हे पसंत नव्हते. मोऱ्यांच्या चिथावणीने त्यांची माणसे प्रांतात येऊन धुडगुस घालू लागली हे राजांस दु:सह झाले. म्हणून राजांनी मोऱ्यांवर हल्ला करून त्यास वठणीवर आणण्याचे ठरविले. चंद्रराव हा मोरे घराण्याचा किताब होता. जावळीचा मालक दौलतराव मोरे सन १६४८ चे सुमारास मरण पावला. त्यास संतान नसल्यामुळे दौलतरावाचे पत्नीने शिवथरकर मोऱ्यांपैकी एक मुलगा दत्तक घेतला. त्याचे नांव यशवंतराव ठेविले आणि ती शिवाजीराजांच्या साहाय्याने जावळीचा कारभार चालवू लागली. पण व्यवहार हणमंतराव मोरे पाहू लागला. हणमंतराव मोरे शिवाजीराजांस विरोध करू लागले तेव्हां जावळीचा ताबा मिळविण्यासाठी शिवाजी राजांनी सिलिमकर, बांदल व कान्होजी जेधे यांचे जमाव एकत्र करून त्यांच्यासह संभाजी कावजी या आपल्या शूर सरदारास जावळीवर रवाना केले (सन १६५५ अखेर) मोऱ्यांनी हा पहिला हल्ला मारून काढला.[१] तेव्हा महाराजांनी रघुनाथ बल्लाळ कोरडे याजबरोबर आणखी फौज जावळीवर रवाना केली. त्यावेळी युद्ध झाले त्यात हणमंतराव मोरे मारला गेला.[२] प्रतापराव मोरे विजापूरास पळून गेला व जावळीकर यशवंतराव मोरे रायगडावर (रायरीचा डोंगर) जाऊन बंदोबस्ताने राहिला. लगेच महाराजांनी जावळीस जाऊन दोन महिने राहून तेथील मुलखाची व्यवस्था केली. तिथे कृष्णाजी बाबाजी सुभेदार नेमिला पण रायगड हस्तगत झाल्याशिवाय शिवाजीराजांचे हे कार्य तडीस जाणारे नव्हते. म्हणून राजियांनी आपली फौज रायरीवर रवाना केली. तीन महिने पावेतो रायरी किल्ला यशवंतरावाने लढविला मग त्याचा इलाज चालेना म्हणून तो राजियांस शरण आला. त्यास गुन्हेगार ठरवून ठार मारिले व त्याच्या पुत्रांस पुण्यास नेऊन कैदेत ठेविले आणि त्याच्या बायका मुलांची व्यवस्था लावून रायगड किल्ला ताब्यात घेतला.[३] (मे १६५६) जावळी प्रदेशाचा आपल्या अधिकारांत समावेश झाल्यामुळे शिवाजीराजे डोंगराळ कोकण प्रदेशाचे सर्वाधिकारी बनले. तसेच शिवाजीराजे रायरी अथवा रायगडसारख्या सह्याद्रीच्या

१ बाळकृष्ण, शिवाजी धी ग्रेट, भाग-१, पृ. ३१.

२ पत्रसार संग्रह १६६७ (७).

३ शिवचरित्र प्रदीप, पृ. ६०.

उंच शिखरावरील अजिंक्य किल्ल्याचेही स्वामी झाले. त्याबरोबरच डोंगरातील खिंडीचे नियंत्रण करू लागले. आणि त्यामुळे देश व सागर या दरम्यानचा व्यापार, रहदारी यावर त्यांस नियंत्रण ठेवणेही साधले. त्यांचे राज्य प्रथमतच समुद्र किनाऱ्यापर्यंत पसरले, त्यामुळेच शिवाजीराजांनी महाड शहर हे व्यापारी केंद्र, बाजारपेठ व जहाज बांधणीचा आरमारी तळ म्हणून वसवले व भरभराटीस आणले.[१]

विजापूरच्या अधिकारातील कोकण :

१६३७ पासून विजापूर सत्ता ही कोकणातील सर्वश्रेष्ठ शक्तिशाली सत्ता होती. ४ नोव्हेंबर १६५६ रोजी महम्मद आदिलशहा मरण पावला. दाभोळ, अंजनवेल, रत्नागिरी, राजापूर येथील किल्ले, त्यांच्यावर अवलंबून असलेल्या जिल्ह्यांसह विजापूर सत्तेने नियुक्त केलेल्या सरदारांच्या अधिकारात होते. परंतु उर्वरित दक्षिण कोकण हे परंपरागत चालत आलेल्या देशमुखांच्या नियंत्रणाखाली होते. त्यामध्ये कुडाळचे सावंत हे मुख्य होते. मध्य कोकण दोन सुभ्यांमध्ये विभागलेले होते. पहिला सुभा कल्याण. हा वैतरणा नदीपासून नागोठण्यापर्यंत विस्तारलेला, तो मुल्ला अहंमदच्या अखत्यारीत होता, तर उर्वरित सुभा हा सावित्री नदीपर्यंत विस्तारलेला. जंजिऱ्याच्या सिद्दीकडे होता. ह्या प्रदेशात तळे व घोसाळ्याचे किल्ले सिद्दीच्या मालकीचे होते. उत्तर कोकणात पोर्तुगीज आणि मोगलांची सत्ता होती.[२]

मुहम्मद आदिलशहाच्या गंभीर आजारपणामुळे कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद १६४६ पासून विजापूरातच होता. त्यास मुहम्मद आदिलशहाने बोलावून घेतले होते. आदिलशहा ४ नोव्हेंबर १६५६ रोजी मरण पावला. त्याचे तक्तावर वारस न बसविता आपल्या हातात सत्ता राखण्यासाठी बेगम साहेबिणीने अली नावाच्या विजापूरच्या १८ वर्षांच्या मुलास गादीवर बसविले. हा शाही घराण्यातील अस्सल राजपुत्र नाही अशा सबबीवर औरंगजेबाने विजापूरला वेढा घातला.[३] आणि दोन्ही पक्षांनी शिवाजी राजांकडे मदत मागितली. शिवाजी महाराजांना या प्रसंगात विजापूरचा पक्ष घेऊन आपले राज्य अधिक वाढवावे हे फायदेशीर आहे असे जाणवले. पण सप्टेंबर १६५७ मध्ये विजापूर सरकारने औरंगजेबाशी शांतता करार केला.[४] तेव्हा शिवाजी राजांनी मोंगलाशी सलोखा प्रस्थापित करण्याचा निर्णय घेतला. २५ जानेवारी १६५८ रोजी शिवाजीराजांनी आपला

१ कित्ता, जेधे शकावली, पृ. १७, १८.

२ नर्न, हिस्टरी ऑफ कोकण, पृ. ३४, ३९.

३ सरदेसाई, न्यू हिस्टरी ऑफ द मराठाझ, भाग १, पृ. १२७.

४ शर्मा, मराठा हिस्टरी रिएक्झामिन, पृ. १३५.

प्रतिनिधी म्हणून सोनाजी विश्वनाथ यास औरंगजेबाच्या भेटीसाठीं बेदरला धाडले. जुनी निजामशाही आणि आदिलशाही यांच्या ताब्यांतील कोकणपट्टी आपल्याला मिळावी अशी शिवाजीराजे यांनी आपल्या वकीलाकरवी औरंगजेबास विनंती केली. धूर्त औरंगजेबाने राजांचा डाव ओळखला व वकीलास सांगितले की, " हा मामला महत्त्वाचा असल्यामुळे खुद्द शिवाजीराजे यांनीच मला भेटावे हे बरे " राजे ओरंगजेबास भेटण्याच्या फंदात पडले नाहीत. त्यांनी औरंगजेबाच्या रागाची पर्वा न करता मोगलांच्या ताब्यांतील जुन्नर व अहमदनगर ही शहरे जिंकून घेतली. इतक्यात औरंगजेबास शहाजहान बादशहा आजारी असल्याचे समजले तेव्हा दिल्ली तक्त बळकावण्यासाठी त्याने घाईने उत्तरेची वाट धरली. वाटेत असता आपल्या सेना अधिकाऱ्यांस पत्रे लिहून शिवाजीराजांच्या पारिपत्यासाठी हालचाली करण्याचा आदेश दिला.

औरंगजेबाने आग्र्यास जाण्यापूर्वी आदिलशहाची शरणागती पत्करली व विजापूरकर व दिल्लीकर यामधील तहास मान्यता दिली. हा तह ऑगस्ट १६५७ त झाला. त्यातील कलमे खालीलप्रमाणे :---

(१) आदिलशाहाने १ कोटी रुपये खंडणी द्यावी.

(२) बेदर, कल्याण, परिंडा हे किल्ले आणि त्याखालील सर्व मुलूख व निजामशाही कोकणातील सर्व किल्ले आणि वांगी परगणा आदिलशहाने मोगलास द्यावे.[२]

विजापूरकरांस औरंगजेबाने ३० लाखांची सूट दिली आणि बजावले की तुम्ही मुलखाचे संरक्षण करा. त्या प्रांतातील काही किल्ले शिवाजीने बळकावले आहेत तेथून त्याला घालवून द्या. त्याला नोकरीत ठेवण्याची इच्छा असेल तर त्याला कर्नाटकात घालवून द्या म्हणजे त्याचा उपसर्ग मोगली मुलखास पोचणार नाही.[३]

शिवाजीराजे यांनी कल्याण सुभा काबीज करण्यासाठी आबाजी सोनदेव यास ऑक्टोबर १६५७ त पाठविले.[२]

शिवाजी महाराजांनी असे हेरले की, कल्याण शहरात मुख्य अधिकारी मुल्ला अहमद विजापूरच्या आजारी सुलतानाला भेटण्याकरिता गेला असताना, त्याच्या अनुपस्थितीत

---

१ पत्र सारसंग्रह क. ७३९, राज खं. ८, ले. ६.

२ सर जदुनाथ सरकार, औरंगजेब भा. १, पृ. २७८ प. सा. सं., ले. ३७२७.

३ बेंद्रे, शिवाजी, पृ. १५०.

शहरास पुरेसे संरक्षण नव्हते. तेव्हा शिवाजी महाराजांनी कल्याण भिवंडीच्या व चौलच्या पोर्तुगीजांविरुद्ध मोहीम आखली. त्याने दोन सेनापथकांना सज्ज राहण्याचे आदेश दिले. एका पथकाचे प्रमुख पद शामराव पंत पेशवे यांचे आप्त दादाजी बापूजी यांचेकडे होते. तर दादाजी कृष्ण लोहकरे आणि त्याचे बंधू शेखोजी (कान्होजी नायकाचे कारभारी) यांनाही त्यांची मावळ्यांची पथके घेऊन कोकणात येण्यास सूचना केली होती. २४ ऑक्टोबर १६५७ रोजी मावळ्यांच्या पथकाच्या साहाय्याने आबाजी सोनदेव कल्याण घेण्यात यशस्वी झाले आणि त्यानंतर त्यांनी भिवंडीही जिंकून घेतली. त्यांनी तेथील पोर्तुगीजांची मालमत्ता लुटली आणि अशेरी किल्ल्यावर एक केंद्र स्थापन केले. पोर्तुगीजांनी प्रतिवर्षी सव्वा खंडी सोने देण्याचे मान्य केले.[१] अशेरी किल्ल्यातील मुसलमान अधिकाऱ्यास व सैन्यास घालवून दिले गेले आणि त्या जागी मावळे सैन्य ठेवण्यात आले. दादाजी कृष्ण लोहकरे ह्या शूर आणि अनुभवी अधिकाऱ्याची कल्याणचा प्रमुख म्हणून तर त्याचा भाऊ शेखो कृष्णा लोहकरे यांची भिवंडीचा प्रमुख म्हणून नियुक्ती केली. आपली विजयश्री दृढमूल करण्याकरता नव्याने जिंकलेल्या प्रदेशाची महसूल व्यवस्था नीट करण्याच्या दृष्टीने त्या दोघांनी लगोलग योजना हाती घेतल्या.[२]

कल्याणच्या लुटीमध्ये शिवाजी महाराजांना पोलादी शस्त्रे, तोफा इत्यादीचा विपुल संग्रह मिळाला. तो त्यांनी विविध किल्ल्यांमध्ये वाटून दिला. तदनंतर त्यानी पनवेलच्या पूर्वेकडील प्रबळगडाची संरक्षण व्यवस्था अधिक मजबूत केली.[३] त्यांनी कल्याण बंदरात नाविक तळ बनविला आणि गलबते उभी करण्याची गोदीही बांधली. असे सांगितले जाते की, शिवाजीराजांना कल्याण बंदराचे रक्षण करणाऱ्या विजापूर सरदारांनी सर्व ती मदत केली. राजियांनी मिळालेल्या संपत्तीचा उपयोग जवळपासच्या डोंगरामध्ये भरपूर प्रमाणात उपलब्ध असलेल्या सागवानचा (लाकडाचा) वापर करून जहाजे बांधिली.[४]

८ जानेवारी १६५८ त शिवाजी महाराजांनी माहुली काबीज केली. नंतर राजमाची, लोहगड हे डोंगरी किल्ले जिंकले. ह्या यशामुळे शिवाजी महाराज पुणे ते ठाणे येथील प्रदेशांचे निर्विवाद स्वामी बनले. शिवाजी महाराजांचे सामर्थ्य दिवसेंदिवस वाढत गेले आणि त्या प्रदेशातील सर्व किल्ले त्यांनी सर केले. त्यामुळे उत्तर कोकणात त्यांचा

१ शर्मा, कित्ता, पृ. १३६.

२ बाळकृष्ण, कित्ता भाग १, पृ. ४१.

३ ९१ कलमी बखर, पृ. ६१.

४ शिवाजी स्मृतिग्रंथ, पृ. ७९.

पाया भक्कम झाला.[१] कोकणाचा उत्तरेकडील भाग जिंकल्यामुळे शिवाजी महाराजांना पुष्कळ संपत्ती आणि व्यापारी मालाचा लाभ झाला.[२] सध्याच्या रायगड जिल्ह्यावर त्यांचा विजय तर अधिक सुकर झाला. कारण त्या तेथील बहुतेक स्थानिक प्रमुख आदिलशाही सत्तेचे अन्यायी सत्ता झुगारून मुक्त होऊ इच्छित होते. त्यांनी शिवाजी महाराजांना लगेच सहकार्य केले. शिवाजी महाराजांनी सुरगड, तळा, घोसाळगड, भुरच, कांगोरी हे किल्ले ताब्यात घेतले.[३] आजच्या ठाणे आणि रायगड जिल्ह्याचा पुष्कळसा भूभाग शिवाजी महाराजांच्या अंमलाखाली आला. ह्या भरघोस विजयामुळे विजापूर दरबारचा मांडलिक असणाऱ्या जंजिऱ्याच्या सिद्याचे बरेच नुकसान झाले.

शिवाजी महाराजांच्या ह्या हालचालीकडे विजापूर दरबारचे अत्यंत जागरूकपणे लक्ष होते. त्यावेळी विजापूर दरबारात परस्परातील कलह व विभाजनवादी प्रवृत्ती कळसास पोचलेली होती. त्याच वेळी शिवाजी राजांचे सामर्थ्य खूप वाढले होते. त्यामुळे कोणताही तोलामोलाचा विजापुरी सरदार शिवाजी महाराजांविरुद्ध मोहीम करण्यास सरसावत नव्हता. अशावेळी अफजलखान आपली सेवा सुलतानापाशी रुजू करण्याकरता फुशारकीने पुढे आला. त्याचा निकाल शिवाजीराजांनी कसा लावला हे पुढील प्रकरणात पाहू.

□□

१ शर्मा, कित्ता, पृ. १३६.

२ कित्ता.

३ सरकार, शिवाजी, पृ. ५५.

६. दगाबाज अफजलखानाचा वध

महमद आदिलशहा १६५६ त मरण पावल्यानंतर त्याच्या पत्नीने बेगम साहेबिणीने आपल्या पसंतीच्या तरण्या मुलाचे अली नाव ठेवून त्यास विजापूरच्या गादीवर बसविले. तो एकोणीस वर्षांचा होता. खरा कारभार त्याची आई साहेबीण पाहू लागली हे पूर्वी सांगितले आहे. मोऱ्यांचा निकाल शिवाजीराजांनी लावल्यापासून विजापूर दरबारावर संकटांची मालिका कोसळू लागली. औरंगजेबाने विजापूरवर आक्रमण करून त्यांना राज्य वाचविण्यासाठी मोगलांशी तह करण्यास भाग पाडले. त्याप्रमाणे २४ ऑगस्ट १६५७ रोजी आदिलशहाने औरंगजेबाशी तह केला. त्यात कल्याणी, परिंडा व त्याभोवतालचा भाग, निजामशाही कोकणातील किल्ले, वांगणी परगणा व खंडणीदाखल दीड कोटी रुपये द्यावेत अशा तहातील मुख्य अटी होत्या.[१]

इतक्यात दिल्लीला बादशहा शहाजहान आजारी पडल्याची बातमी औरंगजेबास समजली म्हणून औरंगजेबाने आपली दक्षिणेकडील मोहीम आटोपती घेतली व त्याने सरळ दिल्लीची वाट धरली. इकडे बड्या साहेबिणीने विजापूर दरबार भरविला आणि त्यांत शिवाजीराजांच्या पारिपत्याचा विचार केला. शिवाजी राजांना शासन करावे हे दरबारांत ठरले व ही कामगिरी धिप्पाड अफगाण सरदार अफझलखान याजवर सोपविण्यात आली. अफझलखानाने शिवाजीस जिवंत पकडून आणतो असे भर दरबारात बडे साहेबिणीस सांगितले असे परमानंद म्हणतो. तेव्हा बडे साहेबिणीने त्यास कानमंत्र दिला की शिवाजीराजांचा पराभव करून त्यास ठार मारावे. अफझलखानाने ही कामगिरी मोठ्या उत्साहाने स्वीकारली.[२] आणि तो पूर्वतयारी करू लागला. बरोबर बारा हजार कसलेल्या अरबांचे घोडदळ, प्रचंड तोफखाना आणि कडव्या पठाणांचे आणि अफगाणांचे सहस्रावधी पायदळ घेतले व सन १६५९ च्या सप्टेंबर महिन्यात त्याने विजापूरहून प्रयाण केले.[३] शिवाजीराजांचे वास्तव्य त्यावेळी पुण्यात होते म्हणून

---

१ जदुनाथ सरकार, औरंगजेब भाग १, पृ. २८२.
प. सा. सं. ७४३.

२ शिवभारत, अ १७/३७, बसातीन उस् सलातीन, पृ. ३७०.

३ शिवभारत, १७/१ ते ३८, प.सा.सं. ७७४.

खानाने तिकडेच जाण्याचा रोख धरला. वाटेत पंढरपूर, माणकेश्वर, करकंब, भोसे, शंभू महादेव, मलवडी या ठिकाणची हिंदूची देवालये त्याने उद्ध्वस्त केली. हेतू हा की अशी कृत्ये ऐकल्यावर सूड उगविण्यासाठी शिवाजी आपल्यावर चालून येईल. पण शिवाजीराजे गप्प राहिले. आणि स्वारी रहिमतपूरला आली. अफझलखान आपला नाश करण्यास येत आहे आणि त्याने आपला वध करावा अशी सूचना त्याला बडी साहेबिणींकडून मिळाली आहे हे राजांना माहीत होते. त्यांनी वेंगुर्ल्यास पाठविलेल्या ५ मे १६६० च्या पत्रात ही माहिती दिलेली आहे.[१] शिवाजीराजांना ही माहिती त्यांचे दरबारांतील हितचिंतकाकडून समजली. आदिलशहाचा दरबारी चरित्रकार सय्यद नुरुल्ला हा आपल्या "तारीख-इ-अली" या फार्सी भाषेत लिहिलेल्या ग्रंथात शिवाजीला मारण्यासाठी अफझलखान स्वारीवर धाडला अशी माहिती देतो. सुलताना बडीसाहेबाने मावळांतील सर्व देशमुखांकडे दरबारी फर्माने पाठवून अफझलखानास मदत करण्याचा हुकूम दिला.[२] खान वाईला आल्याची बातमी येताच राजे पुणे सोडून प्रतापगडावर येऊन राहिले. उघड्या मैदानापेक्षा पहाडी मुलकात खानाला कोंडीत पकडण्याचा डाव राजांनी टाकला. राजांना हेही कळले की खानाने रोहिड खोऱ्यातील देशमुख, खंडोजी खोपडे यास भेटीस बोलविले. तेव्हा खोपडे अफझलखानास भेटून मी शिवाजीराजांस धरून देतो अशी कबुलाती केली आणि त्याबदल्यांत खानाकडून रोहिडेश्वराची देशमुखी मागितली. बाकी सात देशमुखांनी दरबारी फर्मान डावलून शिवाजीराजांच्या बाजूने उभे राहण्याचे ठरविले.[३] खानाचे सैन्य वाईपासून महाबळेश्वरापर्यंत पसरले होते. राजियांकडे सैन्य थोडे होते. राजियांनी आपली फौज दाट झाडींतून, खोऱ्यातून लपवून पुढील पावले उचलली. पुढे पावसाळ्यात चार महिने राजे जावळीच्या मुक्कामाला जाऊन बसले.[४] अफझलखानाशी टक्कर देण्यासाठी राज्यभर बंदोबस्त राखिला. वाईला येऊन पोचल्यावर खानाने राजांच्या प्रदेशावर सर्व बाजूंनी आक्रमण करण्यास सुरुवात केली. विजापुरी सरदार जाधव याने सुपे प्रांतावर जरब बसविली, पांढऱ्याने शिरवळ, खराट्याने सासवड,

१ सेतु माधवराव पगडी, शिवचरित्र एक अभ्यास, पृ. १९८.
२ भा. इ. सं. म. त्रैमासिक व. ७, पृ. १०४.
पसासं. क्र. ७८२.
३ रा, खं. १५ ले. ३३८, पृ. ३६६-६७.
प. सा. सं. ५५८.
४ शिवचरित्र प्र., पृ. १८.

हिलालाने पुणे आणि हबशी सैफखानाने तळ कोकण व्यापले. घाटमाथा व कोकण या दोन्ही भागात खानाच्या सैन्याने धुमाकूळ घातला. तरी राजांनी जावळीस ठेविलेल्या सैन्यास कोठेही कूच करण्याचे आदेश दिले नाहीत. एकंदर परिस्थितीचा विचार केल्यानंतर खानाच्या लक्षात आले की आपण काहीही केले तरी शिवाजीराजे उघड्यावर येऊन आपल्याशी लढाई करणार नाहीत, म्हणून सामोपचाराचे बोलणे लावून विश्वास दाखवून राजांचा घात करावा, असे खानाने ठरविले व आपला वकील कृष्णाजी भास्कर यास खानाने राजांशी बोलणी करण्यास व राजांनी बळकाविलेला प्रदेश परत करण्याची सूचना देणारे पत्र बरोबर देऊन पाठविले.[१] त्या पत्रांतील मागण्यांचा सारांश असा :

"निजामशाही लोप पावल्यावर त्याचा जो मुलूख आदिलशहाने मोगलांस खूष राखण्यासाठी दिला त्या डोंगराळ मुलखातील किल्ले व मुलूख (पुणे, कल्याण, भिवंडी प्रांत) शिवाजीने जे आपल्या ताब्यात आणिले ते व चौल प्रांत शिवाजीने मोगलांस परत करावे. चक्रवर्ती राजाची चिन्हे धारण करू नयेत. चंद्रराव मोरे याजकडून जिंकून घेतलेली जावळी शिवाजीने आदिलशहास परत करावी ". ह्या पत्राचे उत्तर राजियांनी अफझलखानाला पाठविले, त्यांत असे लिहिले की, " आपण इकडे (जावळीस) यावे म्हणजे मी निर्भय होईन. आपण मागत आहात ते सर्व किल्ले आणि जावळीसुद्धा मी द्यायला तयार आहे आपण निःशंक मनाने जावळीस यावे. भेटीत माझ्या हातातील तलवार मी आपणांपुढे ठेवीन ". दोन योद्ध्यांचा चाललेला हा पत्रव्यवहार राजकीय स्वरूपाचा होता. अफझलखानाकडील वकील कृष्णाजी भास्कर खानाचे पत्र घेऊन राजियांकडे आला. राजियांचा वकील पंताजी गोपिनाथ खानाच्या वकिलाबरोबर खानाच्या छावणीत जाऊन तेथील कानोसा घेऊन आला. त्याजकडून राजियांस असे समजले की खान आपल्याला निश्चित दगा देणार. राजे खानाला पुरे ओळखून होते. कर्नाटकातील शिऱ्याचा राजा कस्तुरी रंगा याला भेटीला बोलावून याच खानाने त्याला विश्वासघाताने ठार मारले होते.[२] महाराजांचा थोरला भाऊ संभाजी राजा याच खानाच्या दगलबाजीमुळे कनकगिरीच्या लढ्यात मारला गेला होता ही गोष्ट राजे विसरले नव्हते. शहाजीराजांना कैद करून त्याने विजापुरास नेले होते हेही त्यांच्या मनात होते. शेवटी भावाच्या मरणाचा सूड घेण्याचे राजे यांनी ठरविले.

१ शिवचरित्र प्र., पृ. १९.

२ वर्मा, हिस्टरी ऑफ बिजापूर, पृ. १३९.

पूर्णपणे सावधानता राखून कृष्णाजी भास्करांची भेट घेण्याचा महाराजांनी निर्णय घेतला. हा कृष्णाजी भास्कर वाईचा कुळकर्णी, अफझलखान पूर्वी कैक वर्षे वाईस कारभारी होता तेव्हापासून कृष्णाजीशी त्याचा चांगला परिचय होता. असा आपल्या विश्वासातील हुशार माणूस खानाने राजांकडे बोलणी करण्यास पाठविला. यावेळी राजियांकडे विश्वासराव नागोजी मुसेखोरेकर नावाचा विश्वासू सरदार होता. त्याने फकिराच्या वेषांत गुप्तपणे खानाच्या छावणीत वारंवार जाऊन तेथील खडान्‌खडा बातमी आणून राजे यांस दिली. यावरून शिवाजीराजांनी आपला पुढील बेत ठरविला. आपल्याकडील वकील गोपीनाथ बोकील नावाच्या हुशार माणसास कृष्णाजी बरोबर परत वाई येथे अफझलखानाकडे शिष्टाईसाठी रवाना केले. त्याने खानाच्या छावणींत जाऊन तेथील कानोसा घेतला व खानाच्या मनात दगा करण्याचे फार आहे हे राजांस सांगितले. तेव्हा राजियांनी आपला मृत्यू घडला तर आपल्या मागे स्वराज्याचे कार्य कोणी कसे करावयाचे याच्या तपशीलवार सूचना आपल्या सहकाऱ्यांस दिल्या, राजाची भेट घेतल्याशिवाय खानाचे उद्दिष्ट साध्य होण्यासारखे नसल्यामुळे, तो हळूहळू आपला आग्रह सोडून राजांच्या अटीवर प्रतापगडच्या माचीवर उभारलेल्या शामियानात येऊन भेटण्यास तयार झाला. राजेयांनी खानाकरता एकच उत्तम वाट तयार केली.[१] वाटेच्या दुतर्फा जंगलात आपली हत्यारबंद माणसे झाडीत लपवून ठेवण्याची व्यवस्था राजांनी केली. अफझलाखानाचे मन वळवून त्याला जावळीस आणण्यात राजियांनी मुत्सद्दीपणाची कमाल केली. आपण फार घाबरलो आहोत वाईला येण्याची आपल्याला हिंमत नाही, आपण पराक्रमी आहात, आपण मला काकासारखे आहात, मी आपला सगळा मुलूख देतो, फक्त आपण जावळीला येऊन मला आदिलशहाकडे घेऊन जावे आणि मला माफी मिळवून द्यावी अशाप्रकारे राजियांनी खानाचे मन वळविले आणि तो झपाट्याने जावळीला निघाला असे परमानंद म्हणतो. शिवाजी आपणांस घाबरला असे समजून अफझलखान आपला लवाजमा व आपले सरदार बरोबर घेऊन प्रतापगडच्या पायथ्याशी पोहोचला व डेरे देऊन राहिला त्यानंतर मध्ये एक दिवस आड करून भेटीचा दिवस ठरला.

भेटीसंबंधी करार :

परमानंद सांगतो की भेटीच्या अटी ठरल्या त्या पुढीलप्रमाणे :

आपले सैन्य जसे आहे तसेच ठेवून, एकट्या अफझलखानाने सशस्त्र निघावे आणि पालखीत बसून पुढे जावे. त्याच्या सेवेसाठी दोन तीनच सेवक असावेत, तसेच त्याने

१ सरदेसाई, शिवाजी रियासत, पृ. १९१.

प्रतापगडच्या माचीजवळ स्वतः येऊन तेथेच सभामंडपात वाट पाहत राहावे आणि राजांनी सशस्त्र येऊन त्या पाहुण्यांचा आदर सत्कार गौरवाने यथाविधि करावा.[१] दोघांच्या रक्षणासाठी सज्ज, स्वामीनिष्ठ शूर व निष्ठावान अशा दहा सैनिकांनी बाणाच्या टप्प्यावर येऊन उभे राहावे आणि दोघांनीही भेटल्यावर खलबत करावे.

खानाच्या भेटीसाठी राजियांनी पोषाख केला. अंगात कवच घातले त्यावर जरीची कुडती घातली. डोईस मंदिल बांधले, त्यात तोडा बांधिला. हातात एक बिचवा (राकडा खंजीर) व वाघनख चढविले [२] आणि बरोबर मर्द सरदार जिऊ महाला यास घेतले. त्याजवळ एक पट्टा, फिरंग व ढाल दिली. अफझलखानाने गुप्त कट्यार बाळगली होती ती त्याने कंबरेत खोवली होती. त्याजवळ तलवारही होती.

नेताजी पालकर याजकडे खानाचे वाईकडील सैन्य रोखण्याची कामगिरी दिली. पारघाट व कोकण बाजू मोरोपंत पेशव्यांकडे सुपूर्द केली. सदरेच्या जागेच्या जवळपास रानात बादल व सिलिंबकरांचे सैन्य दबा धरून बसविले. खानाने दगा दिलाच तर दग्याचा संदेश प्रतापगडावरून तोफेचा आवाज करून द्यावयाचा, हा संकेत ऐकल्यावर प्रत्येकाने आपल्यावर सोपविलेली कामगिरी पार पाडावयाची असे राजेयांनी हुकूम दिले होते. आपले काही बरेवाईट झाले तर मंत्रिमंडळाने आपला पुत्र संभाजी यास राजा करून मातोश्रीच्या सल्ल्याने राज्य चालवावे अशा सूचना प्रधान मंडळास दिल्या. राजे यांनी यथासांग पूजा आटोपली. जेवण घेतले आणि किल्ल्यावरील सर्व मंडळीचा निरोप घेऊन राजे शृंगारलेल्या पालखीत बसून खानाच्या भेटीस चालले.

भेटीचा दिवस गुरुवार, १० नोव्हेंबर १६५९ हा ठरला.[३] त्या दिवशी ठरल्याप्रमाणे खान आपल्याबरोबर सरदार सय्यद बंडा यास घेऊन निघाला. राजे यांनी सैयद बंडास पाहिल्यावर त्यास दूर पाठविण्यास सुचविले. खानाने ते मान्य केले आणि राजांना विश्वास वाटावा यासाठी आपल्या हातातील तलवार सोबतच्या कृष्णाजी भास्कर या ब्राह्मणाच्या हाती दिली व स्वतः राजांना आलिंगन देण्यासाठी सज्ज झाला.

१ शिवभारत अध्याय २१ श्लोक ३-८.

२ कित्ता, श्लोक २१.

३ पटवर्धन व रावालिंनसन, सौर्स बुक ऑफ मराठा हिस्टरी, पृ. ३१.

भेटीच्या शामियान्याची सजावट राजेशाही होती. तेथील वैभव पाहून खान मत्सराने पेटला. आणि म्हणाला "जहागिरदाराच्या पोराने एवढ्या भारी वस्तू कुठून पैदा केल्या ?" त्याची समजूत पंताजी गोपीनाथ याने काढली. "हे सारे किंमती सामान आपल्याबरोबर विजापूर दरबारला नजराणा म्हणून पाठविण्यात येणार आहे" असे ते खानास बोलले. त्यावर खानाचा राग शांत झाला. डंका नौबती वाजू लागल्या. कर्णे शिंगाचा नाद घुमला. तुताऱ्यांचा घोष झाला. राजे आल्याची वर्दी आली. राजे यांना पाहताच आलिंगन देण्याकरता खान त्वरेने पुढे झाला. त्याने राजे यांना झटकन जवळ ओढले आणि राजांची मान डाव्या हाताने धरून उजव्या हाताने त्यांच्या कुशीत कट्यार खुपसली. चिलखतामुळे राजे जखमी झाले नाहीत. त्यांनी आपली मान सोडवून घेतली आणि स्वत:जवळील खंजीर खानाच्या पोटात खुपसला. त्यामुळे खानाची आतडी बाहेर आली. सशक्त खानाने आतडी आपल्या हाताने दाबून धरली व खान "दगा, दगा" म्हणून ओरडला. अफझलखानाच्या ओरडण्यामुळे त्याचा नोकर सय्यद बंडा याने तलवार घेऊन राजांवर वार केला. तो वार राजे यांनी झेलला आणि आपल्या तलवारीने अफझलखानास जबर जखमी केले. तो विव्हळत पडला. धुमश्चक्रीला सुरुवात झाली. खानाच्या मदतीला आलेला सय्यद बंडा हा कसलेला योद्धा राजांवर चवताळून धावला तेव्हा जिवा महाल्याने त्यास निमिषार्धात ठार केले.[१] इकडे भोयांनी खानाचा विव्हळत असलेला देह पालखीत घालून चालविला. परंतु राजांचा सरदार संभाजी कावजी याने भोयांचे पाय तोडले आणि खानाचे शीर कापून किल्ल्यावर नेले.[२] यावेळी शिवाजी महाराजांवर वार करण्यास आलेल्या कृष्णाजी भास्करास ठार केले.

संकेताप्रमाणे तोफांचे आवाज झाले. तोफांचे आवाज ऐकून आदिलशाही सैनिक गाफिल राहिले. त्यांना वाटले तोफा खुषखबरीच्या आहेत. पण मराठे सावध झाले. तोफांचा अर्थ समजून त्यांनी शत्रूवर चारी बाजूंनी हल्ला चढविला. त्यावेळेस सायंकाळच्या चार घटका दिवस राहिला होता. मावळ्यांनी मुसलमानी फौजेस घेरले. त्यांस हत्यारे घेण्यास किंवा घोड्यावर चढण्यासही सवड मिळाली नाही. पुढे लवकरच दिवस मावळून काळोख पडल्यावर मुसलमान सैन्य गोंधळून गेले त्यावर नेताजी पालकर, मोरोपंत पिंगळे, येसाजी कंक, तानाजी मालुसरे या मराठा सरदारांनी आपल्या सैन्यासह हल्ले

१ शिवभारत, अध्याय २१ श्लोक ७७-७८.

२ कित्ता, श्लोक ८३-८४.

केले व त्यांना कापून काढीले. शौर्याची कमाल केली. (श्री शिवभारत, अध्याय २३ श्लोक ४१-४४) खानाच्या फौजेची दाणादाण होऊन त्याचे पुष्कळ द्रव्य व सामान राजे यांच्या हाती आले. खानाचे निशाण, नगारा, ९५ हत्ती, ४ हजार घोडे, उंट, ३० तोफा, शिवाय सामान जडजवाहिरे वगैरे दहा लाखांची अमाप संपत्ती शिवाजीराजांस मिळाली.[१]

लढाईंत जखमी झालेल्या आपल्या सैनिकांची राजे यांनी विचारपूस केली. लढाईत जे मारले गेले त्यांच्या कुटुंबीय मंडळींची सर्व व्यवस्था सरकारातून करण्याची आज्ञा दिली.

खंडूजी खोपडे नावाच्या मावळे सरदाराने द्रव्याच्या लालूचीने शत्रूस मिळून अफझलखानाचा वडील मुलगा फाझलखान व बायकां-माणसे यांस संरक्षण देऊन सुरक्षितपणे कऱ्हाड येथे पोचविले, हे राजे यांस समजताच त्यांनी खंडोजी खोपड्यास पकडून आणून त्यांचा एक हात व एक पाय तोडला.[२]

शाहीर अज्ञान दासाने अफझलखानाच्या वधावर एक मर्दानी पोवाडा रचला. माँ साहेबांनी त्याला सोन्याचा तोडा बक्षीस दिला. प्रतापगडावर उत्कृष्ट मंदिर उभारून समारंभपूर्वक राजांनी भवानी मातेची स्थापना केली. स्वराज्याच्या वृद्धीस राजांचा हा पराक्रम मुख्यत: कारणीभूत झाला. लोकांवर त्यांचा वचक बसला. अचाट कल्पकता, साहस, प्रसंगावधान इत्यादी थोर पुरुषांच्या अंगी असणारे गुण राजांमध्ये आहेत अशी लोकांची खात्री झाली. राजांची गणना अद्वितीय पुरुषांत होऊ लागली.

अफझलखानाचा वध ही मराठ्यांच्या इतिहासामध्ये अत्यंत महत्त्वाची गोष्ट ठरलेली आहे. ह्या प्रसंगाने मराठ्यांची खरी अस्मिता जागृत झाली, शिवाजी राजांना आपल्या बळाची जाणीव झाली. आत्मविश्वास शंभर पटींनी दुणावला. त्या आत्मविश्वासावर राजे यांनी चौदा दिवसांच्या आत घोडदौड करून सातारा, सांगली प्रांत व्यापून २८ नोव्हेंबरला त्यांनी पन्हाळा किल्ला घेतला.

शिवाजीराजांचा नाश करण्यासाठी अली आदिलशहाने अफझलखानाची नेमणूक केली आणि खान-शिवाजी भेटीत खानाचा अंत शिवाजीराजांनी त्यास फसवून विश्वास घाताने घडवून आणला ही हकिगत आलमगीरनामा, मनुची, डॉ. फ्रायरचे ट्रॅव्हलर, खाफीखान, बुंसातीनुस्सलातीन, महमदनामा, आदी साधने देतात. तत्कालीन डच व

१ शिवभारत, अध्याय २३ श्लोक ३-४

२ शिवचरित्र प्रदीप, जेधे करीना, पृ. ४६.

इंग्रजी कागदपत्रेही यासंबंधी मनोरंजक माहिती देतात. ॲबेकॅरे लिहितो की अफझलखानाने शिवाजीवरील स्वारीस निघण्यापूर्वी आपल्या जनानखान्यातील २०० स्त्रियांबरोबर ख्याली खुशालीत विलास करण्यात आठ दिवस घालविले व शेवटच्या दिवशी त्यांना भोसकून ठार केले.[१] स्त्रियांना आपला असा भीषण अंत होईल याची मुळीच कल्पना नव्हती. अफझलखानाने आपल्या २०० स्त्रिया मारल्याची हकीकत फ्रान्सिस व्हॅलेन्टीनने दिली आहे. ती ऐकीव वाटते.[२]

□□



श्रीछत्रपती शिवाजी महाराज

१ वा. सी. बेंद्रे, श्री छत्रपती शिवाजी महाराज, (पूर्वार्ध) पृ. १७९.

२ कित्ता.

७. पन्हाळगडच्या वेढ्यातून धाडशी पलायन

अफझलखान वधाची बातमी विजापूरास समजताच साऱ्या शहरात खळबळ, गोंधळ आणि रडारड सुरू झाली. दुःखात शहर बुडाले. अली आदिलशहाने नौबत बंद केली. अफझलखानाबरोबर असलेले फाझलखान, मुसेखान, अंकुशखान वगैरे मंडळी विजापुरास येऊन पोहोचली. अफझलखानाचा मुलगा फाझलखान यास सर्वात जास्त दुःख झाले. तो मोठ्या दुःखाने खाली मान घालून विजापूरच्या सुलतानास भेटावयास गेला. त्यानंतर तीन दिवसांनी विजापुरात बातमी पसरली की शिवाजीराजे फौजेसह कोल्हापूरकडे दौडत सुटले आहेत. त्यांनी वाईपासून कऱ्हाडपर्यंतचा सर्व मुलूख आपल्या कबजात आणिला. त्यानंतर राजियांनी सुपे, तांबे, पाली, नेरले, कामेरी, विसापूर, सावे, उरण, कोळे हा संबंध मुलूख घेतला. खानाच्या वधानंतर अवघ्या तेरा दिवसात राजेयांनी गरूड भरारी मारली आणि ते दिनांक २५ नोव्हेंबर १६५९ रोजी कोल्हापुरात घुसले.[१] कोल्हापूर जिंकले. त्यानंतर राजियांची दृष्टी पन्हाळगडाकडे वळली. पन्हाळा तेथून अवघा पाच कोस होता आणि तो विजापूरकरांच्या ताब्यात होता. ह्याचवेळी शिवाजीराजांचा सरनौबत नेताजी पालकर याने गदग, तिकोटे, हुकेरी, गोकाक ही ठाणी लुटली. लक्ष्मेश्वर लुटून तो विजापुरात घुसणार अशा बातम्या विजापुरात पसरल्या. पण ह्यावेळी शिवाजीराजांनी पन्हाळ्यास वेढा घातला ही बातमी अली आदिलशहास विजापुरात पोचली. याचवेळी नेताजी पालकर लक्ष्मेश्वरपर्यंतची प्रचंड लूट घेऊन कोल्हापुरात दाखल झाला.

पन्हाळ्यास शिवाजीराजांचा वेढा पडला आहे हे विजापुरी किल्लेदारास समजताच त्याची गाळण उडाली. तरीपण किल्लेदाराने गडावरून मराठी सैन्यावर तोफांचा मारा सुरू केला. तरी तो मारा चुकवून मराठे सैन्य तटांच्या टप्प्यात आले. तटावर चढून तोफा बंद पाडल्या. भयंकर कापाकापी सुरू झाली. आतून दरवाजा उघडला गेला. सर्व मराठी फौज किल्ल्यात घुसली. त्यांनी विजापुरी फौजेचा पाठलाग सुरू केला तेव्हा ते हत्यारे टाकून शरण आले. दरवाजावर भगवा झेंडा फडफडू लागला. विजयी महाराज दिनांक २८ नोव्हेंबर १६५९ रोजी किल्यावर आले नेताजीही गडावर येऊन दाखल झाला.[२]

---

१ शिवचरित्र प्रदीप, पृ. २० पसासं. ले. ७९० व ९१.

२ फॉस्टर : इंग्लिश फॅक्टरीज इन इंडिया व्हा. १०., पृ. २५१ ; फॅ. रे. राजापूर, पृ. ८९.

अफझलखानाला मारल्यापासून अवघ्या अठरा दिवसांत शिवाजीराजांनी आपल्या पराक्रमी साथीदारांसह वाईपासून पन्हाळ्यापर्यंतचा पट्टा हस्तगत केला.

अफझलखानाचा मुलगा फाझलखान हा बापाच्या वधामुळे शिवाजीराजांवर सूड घेण्यासाठी तडफडत होता. फाझलखानास रुस्तमिजमान हा सरदार मिळाला. हा शहाजीराजांचा दोस्त रणदुल्लाखान याचा पुत्र, त्याच्या जहागिरीच्या मुलखांत राजे शिरले होते. म्हणून दोघेही एक होऊन ते अली आदिलशहापाशी गेले आणि त्यांनी आपणा दोघांस शिवाजीराजांवर रवाना करा अशी विनंती केली.[१] अली आदिलशहाने ह्या दोन्ही सरदारांस शिवाजीराजांवर चालून जाण्याचे हुकूम दिले.[२]

अली आदिलशहाने ह्या दोघां सरदारांसमवेत दहा हजार फौज दिली तसेच हत्ती, तोफा, उंट वगैरे सारा थाट दिला. बरोबर मलिक इतबार, सादातखान, फत्तेखान, बाजी घोरपडे, सर्जेराव घाटगे आदी सरदार दिले.[३] ह्या सैन्याने विजापुराहून पन्हाळगडाकडे कूच केल्याची बातमी शिवाजीराजांस हेरांनी दिली.[३] राजांना ही बातमी समजताच रायबागेकडे गेलेली आपली फौज माघारी परत बोलाविली. फाझलखान आणि रुस्तमिजमान दोघे सैन्यासह घोडदौडीने विजापुराहून कोल्हापुरानजीक आले. तेव्हा आघाडीच्या स्वारांनी खबर आणली की खुद्द शिवाजी आणि नेताजी पाच हजार फौज घेऊन येत आहेत, हे ऐकताच रूस्तमिजमानने लगेच आपल्या फौजेची लढाईसाठी जय्यत तयारी केली. शिवाजीराजांस आदिलशाही फौजेच्या हालचाली हेरांकडून समजल्यावर राजेही आपल्या सैन्यासह चढाईसाठी सज्ज झाले राजे विजापूर सैन्याच्या नजीक आले.[४] समोर विजापुराच्या फौजेची रचना रूस्तमिजमान करीत होता. राजियांच्या व रूस्तमिजमानच्या फौजांत अंतर बरेच होते. परंतु एकमेकांना एकमेकांचे सरदार दिसू शकते होते. शिवाजीराजांनी आपल्या सरदारांपैकी कोणी-कोणी विजापुरांकडील कोणकोणत्या सरदारांशी झुंज द्यायची हे सांगितले आणि राजियांच्या हुकमाने मराठी फौजेने हरहर महादेव गर्जत कूच केले.[५] रूस्तुमिजमाननेही आपल्या फौजेस मराठ्यांवर चालून जाण्याचा हुकूम दिला. मराठी फौजा शत्रूसेनेपेक्षा कमी असूनही त्यांचा जोश विलक्षण होता. राजियांनी थेट

१ शिव भा. २४/२१ ते २३.

१ शिव च. वृत्त संग्रह भाग २, पृ. ६०.

२ बेंद्रे, श्री छत्रपती शिवाजी महाराज, पृ. २२४.

३ बुसातीन-उस्-सलातीन, पृ. ४०९-४१५.

४ कवी परमानंद, अनुपुराण ४३, ४४, ४६.

५ शिवभारत, अध्याय २९.

रूस्तुमिजमानचा वेध घेतला होता तर नेताजी पालकर फाझलखानावर निसटला होता. विजापुरी फौजेस मराठी फौजेने चहूंबाजूने घेरले. चौफेर मारा सुरू केला. नेताजीने समोरासमोरच्या लढाईत फाझलखानास पळवून लावले. तसेच राजियांच्या जबरदस्त हल्ल्यामुळे रूस्तुमिजमानच्या सैन्याची फळी फुटली. त्याची फौज कापली जाऊ लागली. राजियांनी रूस्तुमच्या फौजैची वाताहात केली, तेव्हा फाझलखान व रूस्तुमिजमान पळत सुटले ते पाहून सादतखान, मलिकइतबार, फत्तेखान, बाजी घोरपडे, घाटगे वगैरे सर्व विजापुरी सरदार धूम पळत सुटले. ह्या पळणाऱ्या विजापुरी सैन्याचा मराठे सैन्य पाठलाग करू लागले त्यांना शिवाजीराजांनी थांबवले. विजयी मराठे फौजेने महाराजांचा जयजयकार केला अशा रीतीने ही लढाई दिनांक २८ डिसेंबर १६५९ रोजी संपली.[१] त्यानंतर वाईच्या जवळचे चंदनगड हे दोन किल्लेही स्वराज्यांत दाखल झाले. तसेच कोकणातीलही दाभोळ बंदर ताब्यात आले, ते दिनांक ४ फेब्रुवारी १६६० मध्ये.[२]

सिद्दी जौहर :

शिवाजीराजांनी पन्हाळा काबीज करून आदिलशाही मातब्बर लढवय्या सरदारांचा दारूण पराभव करून त्यांना पळवून लावले हे शल्य विजापूरच्या शहास बोचत राहिले. शहा या घडामोडीने चिंताक्रांत झाला. शिवाजीराजांना पन्हाळ गडावरून हुसकावून लावून त्याला शासन करण्यासाठी कोण सरदार निवडावा या चिंतेत शहा होता. यावेळी शहास सिद्दी जौहारची आठवण झाली. सिद्दी जौहर नावाचा विजापुरी सरदार कर्नूल प्रांताच्या कारभारावर होता. तो मूळचा मलीक रयमान नामक सरदाराचा नोकर असून धनी मेल्यावर तो त्याच्या मुलास बाजूस सारून आपण कारभार बळकावून बसला होता. म्हणून आदिलशहाची त्याजवर मर्जी नव्हती. प्रस्तुत प्रसंगी शहाने त्यास बोलावणे पाठवून कळविले की " शिवाजीवर चालून जाऊन त्याची तुम्ही खोड मोडाल, तर तुम्हावरील आमची इतराजी नाहीशी होईल. " सिद्दी जौहरने ही गोष्ट तत्काळ मान्य केली. त्याने शहापाशी अर्ज करून शहास सांगितले की शिवाजीराजांचा पराभव करण्याचे काम माझ्यावर सोपवा मी त्याचा निःपात करीन. सिद्दी जौहर यावेळी तेलंगणातील किल्ले कर्नूळ या जागी होता. तिथूनच त्याने बादशहास शिवाजीराजांचा निःपात

१ सरदेसाई, मराठी रियासत १, पृ. १९८.

२ खोबरेकर, कोकणचा राजकीय इतिहास, पृ. ४४.

करण्याची कामगिरी आपल्यावर सोपवावी असा अर्ज केला होता. आदिलशहाने त्याचा अर्ज मंजूर करून त्यास कर्नुळहून घेऊन येण्यासाठी काशी तिमाजी नावाच्या दरबारी खिजमतगारास कर्नुळास रवाना केले. तो कर्नुळास जाऊन जौहरसह विजापुरास परत आला. जौहरबरोबर त्याची हबशी फौजही आली.[१]

सिद्दी जौहर विजापुरास आल्यानंतर तो दरबारात शहाच्या दर्शनासाठी गेला. आदिलशहाने त्याचा गौरव करून त्याला "सलाबतखान" असा किताब दिला व त्याची रवानगी केली. शहाने काशी तिमाजीलाही "दियानतराव" असा किताब दिला आणि त्याला सिद्दी जौहरबरोबर जाण्यास फर्माविले. शहाने रूस्तुमिजमान, सादातखान, सिद्दीमसूद ऊर्फ मसालाद, मुधोळकर बाजी घोरपडे, भाईखान, पिटनाईक, बडेखान आणि फाझलखान या सरदारांना जौहरच्या फौजेत दाखल होण्याचे हुकूम सोडले.[२]

शिवाजीराजे यावेळी पन्हाळा प्रांतातील मिरज ऊर्फ मूर्तिजाबादच्या किल्ल्यास वेढा घालून बसले होते. तेव्हा सिद्दी जौहरने मिरजेच्या रोखाने चालून जाण्याचे ठरविले व शहाच्या आज्ञेप्रमाणे तो काही दिवसांनी सैन्यासह तेथे जाऊन पोहोचला.[३]

शिवाजीराजांना सिद्दी जौहर आपल्यावर प्रचंड फौजेनिशी चालून येत आहे असे मिरजेत समजले. तेव्हां त्यांनी मिरजेचा वेढा उठवून पन्हाळ्यास परत जाऊन तेथूनच सिद्दीशी झुंजण्याचा विचार केला. पन्हाळा किल्ला हा राज्याच्या सीमेबाहेर होता तेव्हा शत्रूला राज्यात येऊ न देता सरहद्दीवरच त्याच्याशी मुकाबला करणे इष्ट, त्यामुळे आपल्या प्रजेची शत्रू सैन्याकडून होणारी लुटालूट टळेल हा हेतू शिवाजीराजांचा असावा कारण अशा प्रकारची लुटालूट अफझलखानाने पूर्वी केली होती. हे महाराजांच्या ध्यानात आले म्हणून शिवाजीराजे मिरजेचा वेढा उठवून पन्हाळगडावर आले.[४]

सबंध मार्च महिना राजेयांनी पन्हाळगडावर राहून शत्रूशी लढण्याची तयारी करण्यात घालविली. त्यांनी आपल्या भरवंशाचे सरदार आजूबाजूच्या प्रातांत बंदोबस्तास ठेविले. राघोबल्लाळ यास सिद्दीवर नजंर ठेवण्यास पाठविले. बाजी पासलकर यास सावंतांची

१ बेंद्रे, विजापूरची आदिलशाही (बुसातीनचे मराठी भाषांतर), पृ. ४१०.

२ कित्ता, पृ. ४११.

३ कित्ता.

४ शिवचरित्र प्रदीप, पृ. २१.

बाजू सांभाळण्यास नेमिले. पुरंदर, सिंहगड, प्रतापगड यांच्या आटोक्यांतील मुलूख रक्षण्याची जबाबदारी मोरोपंत पिंगळे याजवर सोपविली. कल्याण प्रांती आबाजी सोनदेव यास ठेविले.

सिद्दी जौहर यास शिवाजीराजे पन्हाळगडावर गेल्याचे समजताच त्याने आपल्या फौजेस पन्हाळगडास वेढा घालण्याचा हुकूम दिला. गडाला वेढा घालून शिवाजीराजे शरण येईपर्यंत झुंजत राहायचा बेत त्याने केला होता. त्याप्रमाणे सिद्दी जौहरच्या फौजेने पन्हाळगडाच्या पायथ्याशी येऊन तंबू, राहटे ठोकून तातडीने चौफेर मोर्चे बसविले. थोड्याच दिवसांत गडाला पूर्ण वेढा पडला. सरदार फाझलखान, बडेखान, रूस्तुमेजखान आणि स्वतः जौहर यांनी गडाच्या पूर्व बाजूस मोर्चे लाविले. सरदार सादतखान, सिद्दीमसूद, बाजी घोरपडे आणि भाईखान यांनी पश्चिमेकडून नाकेबंदी केली. उत्तर आणि दक्षिण बाजूकडूनही जौहरने कडक वेढा ठेवला. अशा रीतीने शिवाजीराजे इ. स. १६६० मार्च ते जुलै असे चार साडेचार महिने पन्हाळगडावर अडकून पडले होते.[१] वेढ्यातून गडावर तोफा बंदुकांचा व बाणाचा मारा सुरू झाला. व मराठ्यांनीही जबाब दिला आणि उभयपक्षात अशी मारगिरी सततच चालू राहिली. नेताजीजवळ फौज थोडी असल्यामुळे बाहेरून सिद्दी जौहरला पन्हाळाखाली शह देता आला नाही. सिद्दी जौहरने पहिल्या महिन्या दीड महिन्यात वेढा पक्का आवळून शिवाजीराजाच्या सर्व वाटा बंद केल्या. पावसाळ्याची फिकीर न करता तात्पुरती छपरे बांधून पावसातही वेढ्याचे काम चालू ठेविले. जौहरच्या तोफांचा मारा गडावर पोहोचेना म्हणून राजापूरच्या इंग्रज वखारवाल्याकडे एका लांब पल्ल्याची तोफ व दारूगोळा याची मागणी केली. जौहरचे बळ सारखे वाढत होते. शृंगारपूरकर सूर्यराव सुर्वे व पालवणीकर जसवंतराव दळवी हे सैन्य घेऊन जौहरला सामील झाले. इंग्रजांच्या राजापूर वखारीचा मुख्य हेन्री रिव्हींग्टन होता, याने जौहरची मागणी मंजूर केली आणि इंग्रज गोलंदाजांची एक तुकडी, लांबपल्ल्याची मोठी तोफ व दारूगोळ्याचे पेटारे घेऊन हेन्री राजापुराहून २ एप्रिल १६६० रोजी निघाला, तो पन्हाळ्याच्या पायथ्याशी १० एप्रिल १६६० च्या सुमारास दाखल झाला.[२] इंग्रजांनी आपल्या तोफेच्या साहाय्याने किल्ल्यावर जोराची सरबत्ती केली. पण त्यामुळे पन्हाळ्याला काहींच इजा पोहचली नाही. जौहरने पन्हाळा

१ बेंद्रे, विजापूरची आदिलशाही, पृ. ४१२.

२ काळे, इंगलीश रेकॉर्डस् ऑन शिवाजी, पृ. ४.

सर्व बाजूंनी वेढून शिवाय त्याने खारेपाटण, संगमेश्वर इकडेही शिवाजीराजांच्या मुलखावर स्वाऱ्या केल्या ; शिवाजीराजांनी ह्या परिस्थितीवर विचार करून जौहरकडे सलोख्याचे बोलणे लावले.[१] त्याचा काहींच उपयोग झाला नाही. जौहरने यावेळी पन्हाळगडाच्या वायव्येस असलेला खेळणा ऊर्फ विशालगड या किल्ल्याला मोर्चे लावण्यासाठी सूर्यराव राजे सुर्वे व पालवणीकर जसवंतराव या दोघा सरदारांना मोर्चेबंदीस ठेविले होते.

जौहरने सलोख्याचे बोलण्यास प्रतिसाद दिला नाही तेव्हा शिवाजीराजांनी त्याच्यामार्फत आदिलशहाकडे क्षमेची याचना करून पाहिले. पण हातात सापडलेल्या बिलंदर शत्रूस कोण सोडणार ? याप्रकारे साम-दाम-दंड भेद वापरूनही राजे यांना बाहेर पडण्याचा मार्ग सुचत नव्हता. शिवाजीराजे केव्हा शरण येतात याची वाट पाहत सिद्दी जौहर, फाझलखान आणि त्याची पस्तीस हजार फौज पन्हाळ गडाकडे डोळे लावून बसली होती.[२] आषाढ महिना उजाडला पन्हाळ्यावर मुसळधार पावसाने धार धरली होती. गडावर एकंदर सहा हजार मराठे सैनिक होते, निष्ठांवत शूर धैर्यशाली बाजी प्रभू, मावळचे पिढीजात देशकुळकर्णी होते.

आषाढ निम्मा संपत आल्यावर राजे यांनी आपल्या सर्व मातब्बर जिवलगांना मसलतीसाठी सदरेवर बोलाविले. यावेळी मोगलांचा सरदार शायिस्तेखान याने पुण्यावर स्वारी करून बराच मुलूख काबीज केला. यामुळे आता पन्हाळा लढविण्यापेक्षा त्यांतून बाहेर कसे पडता येईल ह्याचा विचार राजे करू लागले. पन्हाळ्यावर अडकून पडलेल्या मराठ्यांचा धीर खचत चालला. खुद्द मातोश्री जिजाबाई राजगडावर काळजीत पडल्या. सर्व गोष्टींचा विचार करून राजांनी इ. स. १६६० जून अखेर सिद्दी जौहरशी सलोख्याचे बोलणे करून अजीजीने निकड लावून हा गुंता सोडविण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत असे मराठे सरदारांस सांगितले. राजांनी आपला हेतू साध्य होण्यासाठी नरमाईचे धोरण पत्करले. .आपल्या गंगाधरपंत नावाच्या वकिलामार्फत सिद्दी जौहरशी बोलणे लाविले की आपण आमच्यासाठी अली आदिलशहाकडे रदबदली करावी. आपण आपली सर्व मालमत्ता व राज्य अली आदिलशहाला नजर करण्यास तयार आहोत. अशा आशयाचे राजाचे पत्र पंतानी सिद्दी जौहरला दिले. हे पत्र वाचून सिद्दी जौहरची

---

१ बेंद्रे, विजापूरची आदिलशाही, पृ. ४१२.

२ कित्ता.

मती गुंग झाली. राजांची बिनर्शत शरणागती ऐकल्यावर जौहर यास आनंद होऊन त्याने राजांची मुलाखत घेण्याचा दिवसही ठरवला. छावणीत शिवाजीराजे बिनशर्त आपल्या स्वाधीन होणार ही खबर पसरली. शिवाजीराजे हाती आल्यावर ह्या मोहिमेचा अंत होणार ह्या आनंदात सर्व फौज गाफील राहिली. सिद्दी जौहरसुद्धा बेसावध राहिला. शिवाजीराजे यांनी गडाखाली हेर पाठवून कोणत्या वाटेने किल्ल्याखाली उतरावयाचे हा मार्ग निश्चित केला होता. योजना अशी होती की शिवाजीराजे यांनी गडावरून १२ जुलै १६६० रोजी पौर्णिमेच्या दिवशी बरोबर सुमारे सहाशे हत्यारबंद पायदळ शिपाइगड्यांसह गुपचूप उतरायचे आणि जौहरच्या फौजेला चाहूलही लागू न देता विशाळगडाकडे पसार व्हावयाचे.[२]

जौहरच्या ध्यानीमनी नसताही राजे आपल्याबरोबर २ पालख्या, काही खजिना, ६०० पायदळ, आणीबाणीच्या वेळी उपयोगी पडावे म्हणून १५ उमदे घोडे घेऊन, हेरांनी पूर्वी पाहून ठेवलेल्या रस्त्याने अंधारातून शत्रूचे चौक्या पहारे चुकवीत रात्री पहिल्या प्रहरी बाहेर पडले आणि विशाळगडाच्या मार्गाला लागले. समय भर पावसाचा, वाट डोंगरी, रस्ते दगड धोंड्यांनी, चिखल पाण्यामुळे व वाहत्या नाल्या ओढ्यामुळे खराब झालेले. अशा स्थितीत पन्हाळगड ते विशाळगड हे ४० मैलांचे अंतर राजे यांस तोडावयाचे होते. हे अंतर तोडण्यास राजे यांना २१ तास लागले.[३]

शिवाजीराजे निसटून गेल्याचे विजापूरच्या फौजेस कळलेसुद्धा नाही. परंतु पक्की खबर लागताच सिद्दी जौहरने आपला जावई सिद्दी मसूद व फाझलखान यांना काही घोडेस्वार बरोबर देऊन राजांच्या पाठलागावर पाठविले. राजे पालखीत बसले होते. विशाळगड पर्यंतचा प्रवास पालखीतून करण्याशिवाय गत्यंतर नव्हते. सरदार बाजीप्रभू बरोबर होते. चपळाईने झप-झप पावले टाकीत मावळे पालखी घेऊन पळत होते. त्यांची पावले विशाळगडच्या रोखाने पावसापाण्यातून वाट काढीत होती. त्यांना विशाळगड गाठण्यासाठी पन्हाळा ते विशाळगड ४० मैलांचे अंतर पायी काढावयाचे होते. विशाळगडावर जाणेही कठीण होते कारण सिद्दी जौहरने तेथेही तळाला पक्का बंदोबस्त करून ठेवला होता. विशाळगड जरी महाराजांच्या हातात होता तरी पायथ्याला कोकणांतील पालवणीचे

---

१ शि. पत्रसार संग्रह, खंड १ प. क्र. ८३१.

२ श्री शिवभारत, अध्याय २७ श्लोक १-१२, पृ. १९४.

३ पुरंदरे, राजा शिवछत्रपती, पूर्वार्ध पृ. ३९८.

राजे जसवंतराव दळवी आणि शृंगारपूरचे राजे सूर्यराव सुर्वे विजापूरकरांचे मातबर सरदार विशाळगडाला वेढा देऊन बसले होते. तसेच घोड्यावरून व पायी जौहरचे सैनिक पाठलाग करीत होते.[१]

बऱ्याच वेळाने एक पालखी व काही लोक शत्रूच्या हाती लागले. त्यांना घेऊन मोठ्या आनंदात त्यांच्या सैनिकांनी जौहरसमोर आणिले. शिवाजी हाती आल्याची त्यालाही मोठा आनंद वाटला. पण तो क्षणभंगूरच ठरला. कारण हा तर शिवा न्हावी " तोतया शिवाजी " होता हे त्यांना कळून आले. खरा शिवाजी पालखीतून विशाळगडाकडे दौडतच होता. दिनांक १३ जुलै १६६० ची सकाळ झाली. प्रहर दिवस वर येता विशाळगडचा किल्ला नजीक दिसू लागला. फक्त सहा मैल अंतर पायथ्यापर्यंत राहिले असता अफाट सैन्यानिशी शत्रू दांत, ओठ खात मागून दौडत येत होते. इथेच पांढऱ्या पाण्याजवळ गजापूरची खिंड लागली. दोन बाजूना उंच डोंगर व मधून चारपाच फर्लांगापर्यंत गेलेली अगदी अरुंद अशी खोलगट वाट. आता फौजेसह शत्रू अंगावर येऊन भिडला तर सारा कारभार आटोपणार हे लक्षात आल्यावर राजांस विशाळगडास पोहोचण्यास अवधी मिळावा म्हणून सरदार बाजी प्रभूने राजांस त्वरा करून विशाळगडास ३०० लोकांनिशी जाण्याची विनंती केली आणि स्वतः ३०० मावळेस्वारांसह ती खिंड लढविण्यासाठी सज्ज होऊन राहिला.[२]

शिवाजीराजांनी विशालगडास वेढा घालून बसलेल्या ताज्या दमाच्या फौजांची फळी फोडण्याचा प्रयत्न केला. हा वेढा फोडावयास व गडावर पाऊल ठेवावयास महाराजांना दोन प्रहर लागले.

बाजीप्रभूने प्रसंग ओळखून पाठलागाला येणाऱ्या वेढ्यांतल्या फौजेचा लोंढा थोपवून धरण्याचे काम जिवावर उदार होऊन केले. महाराज आपल्या समोरून निसटून गेले हे ध्यानात येताच शत्रूंची फौज बाजीप्रभूवर तुटून पडली. बाजीप्रभूने ठिकठिकाणी मोर्चे बंदी केली व आपल्या शूर ५० सहकाऱ्यांसह शिंडीच्या नाक्यावर तो उभा राहिला. आणि गनिमी पद्धतीने युद्ध करून शत्रूंशी झुंज देऊन त्याने शत्रूचे अनेक हल्ले मोठ्या शिताफीने परतविले. सोबतच्या मूठभर मावळ्यांनीही शौर्याची शर्थ केली. बाजीचे देहावर

१ पुरंदरे, राजा शिवछत्रपती, पूर्वार्ध पृ. ३९८.

२ सरदेसाई, म. रियासत भाग १, पृ. २०१.

वीरत्वाच्या अनेक खुणा उमटल्या. देहाची चाळण झाली. महाराज गडावर पोचल्याच्या इशारतीचा तोफांचा आवाज कानी पडला आणि मगच बाजीप्रभूने आपले प्राण सोडले.[१] कुमकेच्या अभावी राहिलेल्या मावळ्यांना शत्रूच्या माऱ्यास बळी पडावे लागले. महाराजांना ही गोष्ट लागली. अफझल प्रसंगातील उत्कृष्ट कामगिरीसाठी जेधे देशमुखांना दरबारात तलवारेच्या पहिल्या पानाचा मान होता. तो आता बाजीप्रभूच्या देशमुख घराण्यास द्यावा असे महाराजांनी ठरविले व त्यासाठी जेध्यांची संमती मिळविली.[२] स्वराज्यांतील पहिल्या दर्जाच्या वीरत्वाचा मान बाजीप्रभूनी आपल्या बलिदानाने मिळविला. स्वामिभक्त बाजीप्रभूचे नाव इतिहासात अजरामर झाले. जनशक्ती स्वातंत्र्याकांक्षेने भारून टाकण्याची किमया एकटे शिवरायच करू शकले होते म्हणूनच ते राष्ट्रपुरुष ठरले.

राजे विशालगडावर सुखरूप पोचल्यावर पन्हाळगडापासून त्यांचा पाठलाग करीत असलेला सिद्दी मसूदखान विशालगडच्या पायथ्याशी येऊन पोहोचला व त्याने विशालगडास वेढा घातला. परंतु गड सर झाला नाही. पाण्याचा तुटवडा पडला. डोंगर, रान व जंगल यामुळे त्याच्या फौजेचा इलाज चालेना. अन्नाच्या टंचाईमुळे मुसलमानी सैन्य हैराण झाले. महाराजांनीही किल्ल्यांतून तोफांचा मारा चालू ठेविला तेव्हा नाईलाज होऊन सिद्दी मसूदखानाच्या सैन्याने पराभव पत्करून सैन्य परत पन्हाळ्यावर आले.[३]

अली आदिलशहास सिद्दी जौहर पन्हाळ्यास हात हालवीत परत आल्याचे समजले तेव्हा त्यास सिद्दी जौहरने शिवाजीराजांशी संगनमत केल्याचा संशय आला. तेव्हा संतापून सिद्दी जौहरला पकडण्यासाठी तो पन्हाळ्याकडे स्वतः निघाला. विजापूरहून निघताना त्याने आपला विचार आपल्या सरदारांस बोलून दाखविला. "सिद्दीबरोबर शिवाजीलाही पकडतो आणि आदिलशाहीशी बनावत करणाऱ्यांना कोणते शासन होते हे जगाला दाखवितो."

आदिलशहा विजापूरहून निघाल्यावर त्याचा पहिला मुक्काम सैन्यासह मिरजेला पडला.[४] सिद्दीस ही बातमी समजतांच त्याने पन्हाळ्याच्या मराठा किल्लेदारास तो किल्ला आपल्या स्वाधीन करण्याची विनंती केली. त्याअगोदरच किल्लेदार त्र्यंबक भास्कर यास शिवाजीराजांनी कळविले की किल्ला सिद्दी जौहरचे ताब्यात द्या. त्याप्रमाणे पन्हाळगड सिद्दी जौहरने स्वतःच्या ताब्यात घेऊन विजापूरचा अलीशहा आल्यावर

१ रा. खंड १५, ३६३.
२ जेधे शकावली शिवचरित्र प्रदीप, पृ. २१ ; बेंद्रे, शिवाजी पृ. २०९.
३ बेंद्रे, शिवाजी महाराज पृ. २३८.
४ बेंद्रे, विजापूरची आदिलशाही, पृ. ४१४.

त्याच्या कबजात दिला.[१] (२२ सप्टेंबर १६६०) पुढे शहा आपणांस शिक्षा करील या भीतीने सिद्दी जौहर शहास न भेटता परस्पर आपल्या ज्हागिरींकडे कर्नूळ येथे निघून गेला आणि दोन महिन्यांनी विष प्राशन करून त्याने आत्महत्या केली.[२] (इ. स. १६६१).

□□



जिजाबाई

१ श्री शिवभारत अ. २८/५-६.

२ प. सा. सं. ८४५.

८. स्वराज्याचा कोकणात विस्तार- जिंकलेल्या प्रदेशाच्या स्वामित्वास विजापूरकरांची मान्यता

इ. स. १६६० त शिवाजीराजांची फौज कोकणातील स्थळे हस्तगत करीत दाभोळवर आली. हेतू हा की, दक्षिण कोकणचा मुलूख स्वराज्यात दाखल करून घेणे. राजाबरोबर तानाजी मालुसरे, पिलाजी निळकंठ, सरनाईक त्र्यंबक भास्कर वगैरे मंडळी होती. दाभोळास येताच त्यांनी बंदरातच सैन्य घुसवून गावाचा व बंदराचा ताबा घेतला. दाभोळ हे पूर्वी एकदा (इ. स. १६५९ मध्ये शिवाजीराजांच्या लोकांनी घेतले होते.) पण वर्षभरात विजापूरकरांनी ते परत घेतले. म्हणून दाभोळपासूनच्या दक्षिण मुलखावर ताबा मिळविण्यासाठी बंदर ताब्यात घेतले तेव्हा राजे यांना दाभोळ बंदरात अफझलखानाच्या मालकीची मालाने भरलेली तीन व्यापारी जहाजे आढळून आली.[१]

अफझलखानाचा मुलगा फाझलखान याच्या विनंतीवरून दाभोळच्या मुख्याधिकाऱ्याने अत्यंत घाईने ती तीन जहाजे राजापूर येथे हलविली. अन्यथा ती मराठ्यांच्या हातात पडली असती.[२] शिवाजी महाराजांनी शत्रूची ती जहाजे ताब्यात घेण्याकरता गुप्तपणे राजापूरला दूत पाठवला. इंग्रजांनी ती जहाजे शिवाजी महाराजांच्या ताब्यात दिली नसती कारण फाझलखान त्यांचे पुष्कळ देणे लागत होता. तो ते देणे जहाजातूनच व्यापार करून फेडणार होता. शिवाजी महाराज राजापूरला आल्यावर, तेथील इंग्लिश वखारीचा प्रमुख, रेव्हिंग्टन हा आक्रमणाच्या आणि पकडले जाण्याच्या भयाने सुरक्षित राहण्याकरता म्हणून जहाज घेऊन पळून जाऊ लागला. परंतु मराठे सैनिक तो माल पकडण्यात आणि उप अधिकारी फोर्ड यास कैद करण्यात यशस्वी झाले. ह्या प्रसंगास विजापूरचा सरदार रुस्तम-इ-जमान याने पकडलेला सर्व माल परत करण्यात यावा तसेच फोर्डची मुक्तता करण्यात यावी अशी शिवाजी महाराजांना कळकळीची विनंती इंग्रजांनी केली. ती शिवाजीमहाराजांनी मान्य केली आणि हे प्रकरण तेवढ्या काळापुरते मिटले.[३]

---

१ सभासद पृ. १३, बेंद्रे कित्ता पृ. ३७०

२ काळे (संपादक), इंग्लिश रेकॉर्डस् ऑन शिवाजी पृ. ४

३ तत्रैव १५ व १६, पृ. १०, सरदेसाई, न्यू हिस्ट्री ऑफ द मराठाझ, भाग १, पृ. १४८.

सन १६६१ मध्ये सुरुवातीस कल्याण प्रांत म्हणजे उत्तर कोकणावर शायिस्तेखानाच्या सैनिकांनी आक्रमण केले. प्रांताचा पुष्कळसा भाग मोगलांनी जिंकून घेतला. परंतु महत्त्वाची शहरे आणि किल्ले त्यांना हस्तगत करता आले नाहीत. मोगलांची कोकणावरील मोहीम पूर्णपणे यशस्वी करण्याकरता शायिस्तेखानाने कारतलबखान ह्या सरदाराची बलाढ्य सेनेसह निवड केली.[१]

कारतलबखानाची दैना :

कारतलबखानाच्या फौजा तळेगावहून वडगावकडे व वडगावहून मळवलीकडे चालू लागल्या. लोहगडच्या पलीकडे सह्याद्री चढून उंबरखिंडीतून खाली कोकणात उतरावयाचे असा कारतलबखानाचा बेत होता. हा मार्ग अडचणीचा, अतिशय दाट अरण्याचा, अतिशय अवघड, डोंगरकड्यांचा अरुंद, निर्जन आणि महाभयाण होता. उंबरखिंडीखाली घनदाट अरण्य होते. अतिशय दुष्कर वाट होती. कारतलबखान सह्याद्रीचा घाट चढून जाऊ लागला. त्याच्या मागोमाग मोगली फौज धडपडत चाल करीत होती. महाराजांना खानाने कूच केल्याची बातमी समजली. महाराजांनी नेताजी पालकरास आपल्याबरोबर स्वारीवर येण्यास सांगितले. महाराज मावळ्यांसह कारतलबखानास दाद लागू न देता उंबरखिंडीच्या वाटेवर येऊन उभे राहिले. कारतलबखानाची फौज त्या गहन अरण्यात ऐन गाभ्यात आली त्यावर शिवाजीराजांचे मावळे तुटून पडले (३-२-१६६१) आणि त्यांनी मोगली फौजेची दाणादाण केली. कारतलबखानास आपल्या फौजेतील माणसे पटापट मरून पडत असल्याचे दृश्य दिसले. त्याने महाराजांस शरण जाऊन तह करण्याचे ठरविले व आपला सरदार नजर इनायत यास महाराजांशी बोलणी करण्याकरिता पाठविले. महाराजांनी खानाकडून शरणागती पत्करली आणि आपल्या मावळ्यास आपला निर्णय कळविला.[१] आपल्याबरोबर आणलेले सर्व सामान जिथल्या तिथे टाकून कारतलबखानाने परत जाण्याकरिता कूच केले. अशा प्रकारे पराजय पावून मोगल फौज परत गेली. लाखो रुपयांची संपत्ती शिवाजीराजांनी हस्तगत केली. नेताजी पालकर यास त्याच्या पराक्रमाबद्दल शाबासकी दिली.[२]

ठाणे आणि रायगड (कुलाबा) जिल्हा जिंकून घेतल्यामुळे वसईपासून राजापूरपर्यंतचा सागरी किनारा शिवाजी महाराजांच्या ताब्यात आला. त्यांनी त्या प्रदेशांतील कित्येक

१ वाकसकर (संपादक) ९१ कलमी बखर, पृ. ४२, सरकार, शिवाजी पृ. ८३.

२ शर्मा, कित्ता पृ. १४१.

किल्ले जिंकून घेतले. त्यापैकी एक पनवेलच्या पूर्वेस ८ मैलावर प्रबळगड हा होता. त्याचा विजापुरी प्रमुख केसरीसिंह हा होता. त्याजशी झुंज होऊन तो मारला गेला. त्यानंतर शिवाजी महाराज स्वतः किल्ल्यात गेले आणि एका विशिष्ट ठिकाणी त्यांना मोहरा, होन, आणि सोन्याच्या काड्यांसह विपुल गुप्तधनाचा शोध लागला. केसरीसिंहची आई आणि दोन लहान मुले कोठेतरी लपून राहिली आहेत असे शिवाजी महाराजांना कळून आले तेव्हा त्यांनी तिला नमस्कार केला. तिला पालखीचा मान दिला आणि संपूर्ण संरक्षण देऊन तिला तिच्या देऊळगांव ह्या मूळगावी पाठवले.[१]

सन १६६१ च्या मे महिन्यात मोगलांनी प्रथम कल्याण जिंकून घेतले. पुढे त्या प्रांताची राजधानी महाड शहरही जिंकून घेतले. ते पुढे ९ वर्षांपर्यंत त्यांच्याकडे राहिले. मुस्लिम सैन्याधिकारी बुलाखी याने पेण परिसरातील देइरीच्या [२] किल्ल्याला वेढा घातला. परंतु त्या किल्ल्यांच्या सुटकेकरता कावजी, कोंढाळकरांच्या नेतृत्वाखाली आलेल्या मराठी सैन्याने बुलाखीला दूर पिटाळून लावले. बुलाखीच्या सैन्यातील पाचशे सैनिकांना ठार मारले. (३१ ऑगस्ट १६६१) सन १६६२ मध्ये शिवाजी महाराजांनी पेणवर आक्रमण केले. परंतु मोगलांनी निकराचा प्रतिकार केला आणि शिवाजी महाराजांच्या सैन्याची खूप हानी झाली. कित्येक सैनिक मारले गेले, कित्येक जखमी झाले.[३]

उत्तर कोकणातील जिल्ह्याकडून शिवाजी महाराजांनी दक्षिण कोकणाकडे कूच केले. दंडा राजपुरीपासून खारेपाटणपर्यंत त्यांच्या मार्गक्रमणात कोणताही अडथळा आला नाही. स्थानिक राजे आणि शहर प्रमुख शिवाजी महाराजांना अभिवादन करण्याकरता, आदर प्रगट करण्याकरता भेटीस येत असत. फेब्रुवारी १६६१ मध्ये जंजिऱ्याच्या पूर्वेकडील २२ मैलांवर असणारे निजामपूर धाड घालून लुटण्यात आले आणि दाभोळही जिंकून घेतले. पालवणीचा राजा जसवंतराव दळवी हा घाबरून पळून गेला आणि त्याने प्रभावळीचा राजा सूर्यराव सुर्वे यांच्याकडे शृंगारपुरात (संगमेश्वराच्या ईशान्येकडे ८ मैलांवर) आश्रय घेतला. संगमेश्वराचा प्रमुखदेखील बरोबरच्या काही सुस्थित माणसांना घेऊन पळून गेला. उद्ध्वस्त झालेले ते ठिकाण शिवाजी महाराजांनी पिलाजी नीळकंठ आणि तानाजी मालुसरे यांच्याकडे सोपवले.

१ सरदेसाई, न्यू हिस्ट्री ऑफ द मराठाझ, भाग १, पृ. ११६-११७.

२ देईरी गड हा पेण तालुक्यातील एक डोंगरी किल्ला आहे.

३ सरकार, शिवाजी, पृ. ८७.

शिवाजी महाराज स्वतः चिपळूण मार्गे राजापूरकडे [१] सैन्यासह निघाले. कोकणच्या पश्चिम किनाऱ्यावरील राजापूरला इंग्रजांची वखार होती. राजापूरचे इंग्रज व्यापारी यांनी सिद्दी जोहरला पन्हाळा काबीज करण्याच्या कामी तोफा व गोळे पुरविले होते. तसेच विजापूरकरांना किल्ल्यांवर मारा करण्याच्या कामात मदत करीत असल्याचेही महाराजांना माहीत होते.[२] पन्हाळा विजापूरच्या स्वाधीन केल्यानंतर राजापूरच्या इंग्रजांनी आपल्या शत्रूला सक्रिय साहाय्य केल्याबद्दल त्यांना धडा शिकवण्याकरता शिवाजी महाराजांनी त्वरित पाऊले उचलली. त्याबरोबर राजापूर ह्या व्यापारी केंद्रामधील विपुल संपत्तीदेखील एक आकर्षण होते.

शिवभारतातील संदर्भानुसार, राजापूर हे अतिशय संपन्न असे व्यापारी केंद्र असणारे शहर होते. कारण अरेबिया, पर्शिया, इजिप्त, आफ्रिका, चीन, युरोप अशा विविध देशांमधून व्यापारी मालाची तेथे आयात व विक्री करण्यात येत असे.[३] सन १६६१ च्या सुरुवातीला शिवाजी महाराज अचानकपणे राजापूरला येऊन दाखल झाले. त्यांच्याबरोबर एक हजार स्वारांचे घोडदळ व तीन हजार सैनिकांचे पायदळ होते. तेथील नागरिकांना शरण येण्याचे आवाहन करण्यात आले. त्यामुळे तेथील महत्त्वाचे रहिवासी, इंग्लिश राजप्रतिनिधी रेव्हिंग्टन आणि इतर २-३ इंग्रजांसहित भेटीच्या नियोजित स्थानी गेले. त्या समयास शिवाजी महाराजांचा आदरयुक्त सत्कार करणे योग्य आहे असा त्यांनी विचार केला होता. त्या सर्वांना अटक करून त्यांची मालमत्ताही जप्त करण्यात आली. शिवाजी महाराजांनी रेव्हिंग्टन व इतरही व्यक्तींना त्या प्रदेशातील सोनगड किल्ल्यात कैदेत टाकले आणि महाराजांना भेटण्याकरिता न आलेल्या लोकांना कैद केले. इंग्रजांची वखार पूर्णपणे लुटून त्यातील जमीनही गुप्तधनाचा शोध घेण्याकरता खणून काढण्यात आली.[४]

शिवाजी महाराजांनी राजापूरमधून अमाप लूट मिळवली आणि तिथे बंदरावर आपला शासनाधिकारी नेमला, तसेच राजापूरच्या दक्षिणेस सुमारे दहा मैलांवर असणाऱ्या खारेपाटण येथेही आपला अधिकारी नियुक्त केला.[५] वखारीतील नोंदणीमध्ये असे लिहून ठेवले आहे की, दंडाराजपूरीचा किल्ला सिद्दीच्या ताब्यातून जिंकून घेण्याच्या कामी

---

१ सरदेसाई, न्यू हिस्ट्री ऑफ मराठाझ, भाग १, पृ. १३८-१३९.

२ सरकार, शिवाजी, पृ. ३३५.

३ दिवेकर, शिवभारत, ३०, १-४, पृ. ३०४.

४ काळे, कित्ता पृ. २२.

५ सरदेसाई, न्यू हिस्ट्री ऑफ द मराठाझ, भाग १, पृ. १३९.

शिवाजी महाराजांना इंग्रजांची मदत हवी होती. हा प्रस्ताव घेऊन शिवाजी महाराजांनी आपला एक गुप्तहेर राजापूरच्या वखारीच्या प्रमुखाकडे पाठवला होता. वखारीच्या प्रमुखाला असे वाटले की, सिद्दीकडून तो किल्ला शिवाजी महाराजांनी जिंकून घेतला तर हा सर्व प्रदेश त्यांच्या ताब्यात जाईल. इंग्रजांनी ह्या कार्यात शिवाजी महाराजांशी सहकार्य केले तर इंग्रजांना एक चांगले ठिकाण "मीठ बंदर" देऊ करण्याचे आश्वासन त्या दुताने दिले. इंग्रजांनीदेखील शिवाजी महाराजांना मदत करण्याच्या [१] आपल्या अटी सुचवल्या.

शिवाजी महाराजांना मदत करण्याच्या इंग्रजांच्या अटी :—

(१) शिवाजी महाराजांनी पकडून ठेवलेल्या कैद्यांना मुक्त करावे आणि त्यांची जप्त केलेली संपत्ती, चीज, वस्तू त्यांना परत करण्यात यावी (निदान त्यांना कैदेतून मुक्त करावे).

(२) दंडाराजपुरीच्या मोहिमेत वापरल्या जाणाऱ्या इंग्रजांच्या जहाजांची किंमत शिवाजी महाराजांनी द्यावी. ती जर त्यांनी विचारली तर ती चार गलबतांची प्रत्येकी १०,००० पगोडा इतकी असेल, तसे असेल तर.

(३) शिवाजी महाराजांनी इंग्रजांना एक सोयीचे मोक्याचे बंदर-शहर द्यावे, तेथे त्यांना किल्ला बांधण्याची मुभा असावी आणि किल्ला उभारणीकरता कामगार आणि माल शिवाजी महाराजांनीच द्यावा.

(४) तसेच त्या बंदराचा अर्धा जकातीचा महसूल इंग्रजांना घेण्यास महाराजांनी अनुमती द्यावी. या बंदरात इंग्रजांच्या आयातनिर्यातीवर कर नसावा.

(५) शिवाजी महाराजांनी त्यांच्या प्रदेशात इंग्रजांना टांकसाळ स्थापन करून त्यांच्या मुलुखात इंग्रजांची अधिकृत चांदीची नाणी वापरण्यास मुभा असावी.

(६) इंग्रजांना सोरामीठ करमुक्त विकत घेण्याची परवानगी असावी.

(७) इंग्रजांना बंदराच्या ठिकाणी कोठार उपलब्ध करून देऊन ते इंग्रजांच्या ताब्यात द्यावे. [२]

इंग्रजांनी शिवाजी महाराजांशी संगनमत करण्याकरता सादर केलेल्या अटी अशा होत्या. सुरतेतील मुख्याधिकाऱ्यांनीही ह्याच स्वरूपाचे पत्रनिवेदन शिवाजी महाराजांस पाठवावे अशी सुरतेच्या मुख्यालयाला त्यांनी विनंती केली. इंग्रज हे जाणून होते की,

---

१ काळे (संपादक) २६, पृ. २३.

२ काळे, कित्ता पृ. २४.

स्वतः जागरूक असणारे शिवाजी महाराज निव्वळ मदतीच्या आश्वासनावर कैद्यांची मुक्तता करणार नाहीत. त्यांनी सुरतच्या वसाहतीस असे कळविले की, जर शिवाजी महाराजांनी कैद्यांची मुक्तता केली नाही तर इंग्रज मोगल सैन्य दक्षिणेत आणतील अशी धमकी त्यांनी (सुरतच्या वसाहतीने) महाराजांना द्यावी.[१] शिवाजी महाराजांनी इंग्रजांनी केलेल्या मागण्यांची दखल न घेता त्या मागण्या धुडकावून लावल्या. त्या चार इंग्रज कैद्यांना चांगली वागणूक देण्यात आली, पण त्यांना बंदिवास असह्य होईपर्यंत म्हणजे अधिक काळपर्यंत त्यांना कैदेत ठेवण्यात आले.

शिवाजी महाराजांनी बंदिवासातील इंग्रज सदस्यांची[२] काळजी घेण्याची विशेष व्यवस्था केली होती. त्या कैद्यांनी सुरतच्या मुख्याधिकाऱ्याला याबाबत शिवाजीशी मध्यस्थी करण्याची, दंड भरण्याची आणि त्यांची मुक्तता व्हावी अशी विनंती केली. परंतु, सुरतच्या प्रमुखाने ह्या बाबतीत मध्यस्थी करण्यास नकार दिला. कारण हे प्रकरण त्या इंग्रज कैद्यांच्याच अक्षम्य वर्तणुकीमुळे निर्माण झाले होते. तथापि, सन १६६२ मध्ये अधिकारी रेव्हिंग्टन हा सुरतमध्ये मरण पावल्यानंतर रावजी पंडित कैद्यांना राजापूर येथे घेऊन गेला आणि तेथे त्यांची मुक्तता करण्यात आली. त्यानंतर इंग्रजांनी पुन्हा राजापूरहून व्यापार उदीम सुरू केला. राजापूरहून वखारीतील एका सदस्याने सुरतच्या मुख्याधिकाऱ्यास असे कळवले की, " शिवाजीने राजापूर किनाऱ्यावर घातलेल्या धाडीत त्याने २४,००० होनांची लूट मिळवली, दोन माणसे मरण पावली आणि वर्षाकरता काही सदस्यांना तुरुंगवास भोगावा लागला.[३] इंग्रजांनी शिवाजी महाराजांकडे वखारीच्या नुकसानीची भरपाई मिळावी म्हणून खूप प्रयत्न केले. पण महाराजांनी ती मागणी फेटाळून लावली.[४]

राजापूरच्या लुटीनंतर शिवाजी महाराज चिपळूणकडे वळले. कोणताही विरोध न होता तेही महाराजांच्या ताब्यात आले. चिपळूणचे प्रसिद्ध देवस्थान श्री परशुराम क्षेत्र. महाराजांनी आपल्या लवाजम्यासह परशुरामाचे दर्शन घेतले. परिसरातील बघे मंडळी जमली होती. त्याजला कोकणचा हा रम्य प्रदेश परशुराम क्षेत्रासह स्वराज्यात सामील झाल्याचे सांगितले. नंतर महाराज संगमेश्वरावर चालून गेले. तिथेही त्यांना विरोध झाला नाही. तेही स्थळ महाराजांच्या ताब्यात आले. महत्त्वाचे स्थळी तानाजी मालुसरे व पिलाजी सरनाईक यांची फौजेसह नेमणूक केली.

१ बाळकृष्ण, कित्ता भाग १, पृ. १३६.

२ सरकार, शिवाजी, पृ. ३३७.

३ सुरत फॅक्टरी डायरी नं. १/१६५९-१६९६, पृ. ४३४

४ सरदेसाई, पृ. ३४२.

महाराजांनी चिपळूण, दाभोळप्रमाणेच शेटवली, सौंदज, हरचेरी, नेवरे, नाधवडे, कोतवडे, केळवली, कशळी, पावस, धामणसे, बेलवडे, खारेपाटण वगैरे गावेही जिंकली.

यानंतर महाराजांची स्वारी देवरुखकडे वळली. महाराजांचा कोकणातील स्थळे जिंकून घेऊन कोकण स्वराज्यांत आणण्याचा उद्योग विजापूरकरांस समजला. आदिलशहाचे रक्त सळसळले. त्याने शृंगारपूरच्या सूर्याजीस फर्मान पाठवून महाराजांनी जिंकलेली कोकणातील स्थळे परत घ्या असे फर्माविले. सूर्याजीने मराठी फौजेचा तळ संगमेश्वरी असता त्यावर आपल्या फौजेसह झडप घातली. मराठी लष्करांत गडबड उडाली. पण सारे सावध होते. एकदम सारे ढाल-तलवारी घेऊन उठले व शत्रू सैन्यावर धावले. लढाईच्या आघाडीस तानाजी मालुसरे व पिलाजी सरनाईक होते. सूर्याजीरावही शूर होता. त्याच्याशी लढण्याची तानाजी व पिलाजीने शिकस्त केली. दोन-तीन तास तुंबळ युद्ध झाले. सूर्याजीरावाची बरीच माणसे कामास आली. सूर्याजीराव पळून शृंगारपुरास गेला. एवढ्यात महाराज लढाईच्या स्थळी संगमेश्वरास येऊन पोचले. त्यांना तानाजी आणि पिलाजी सामोरे गेले. महाराजांनी युद्धाची हकीगत ऐकली. आपल्या फौजेच्या पराक्रमाची आणि विजयाची हकीगत ऐकून महाराज खूष झाले. त्यांनी आपला मोर्चा शृंगारपुराकडे सूर्याजीरावास धुंडून काढण्यासाठी वळविला. सूर्याजीराव दडून रानात राहिला. पण महाराजांनी शृंगारपुरात जाऊन त्याचा कब्जा घेतला. शृंगारपूर स्वराज्यात आणिले.

शिवाजी महाराज शहाजीराजांच्या संमतीने रायगड किल्ला राजधानीसाठी निवडतात :

रायगड किल्ला मोरे यांच्यापासून इ. स. १६५६ मध्ये जिंकून घेतला. त्या वेळेपासून महाराजांचे मनात रायगड किल्ला हिंदवी स्वराज्याची राजधानी करावी हा विचार घोळत होता. सभासद आपल्या बखरीत त्याबद्दल लिहितात, " राजा खासा जाऊन पहाता गड बहुत सचोट, चौतर्फा गडाचे कडे तासल्याप्रमाणे दीडगाव उंच, पर्जन्यकाळी कडियावर गवत उगवत नाही आणि धोंडा तासीव एकच आहे. " दौलताबाद हा पृथ्वीवर चखोट गड खरा, परंतु तो उंचीने ' थोडका '. (दौलताबादचे) रायगडाचे दशगुणी उंच असे देखोन संतुष्ट जाले आणि बोलिले ; " तक्तास जागा गड हाच करावा ".[१].

१ जोशी शं. ना. सभासद बखर, कलम ६५, पृ. ६८, ६९.

शिवाजी महाराजांच्या आक्रमक वृत्तीमुळे विजापूरकर हैराण झाले. त्यांनी इ. स. १६६२ मध्ये शिवाजी महाराजांची समजूत घालण्यासाठी शहाजी राजे यांना शिवाजी महाराजांकडे पाठविले.[१] शहाजीराजांचे मनातही फार दिवसांपासून पुत्रास भेटावे असे होते. अफझलखान याचा सूड घेतल्याने शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाबद्दल शहाजीराजांच्या मनात विशेष अभिमान उत्पन्न झाला होता. बारा वर्षांनी पिता-पुत्र एकत्र आले. युद्धकला, राज्यकारभार व राजकारणे ह्या बाबतीतले शहाजीराजांचे दखखनमधील चाळीस वर्षांचे अनुभव महाराजास मार्गदर्शक ठरले. पितापुत्रांनी मराठी राज्याची कायमची राजधानी कोठे असावी यावर चर्चा केली. त्यावेळेपर्यंत पुणे व कल्याण मोगलांचे अंमलाखाली होती. तेव्हा नाशिक, बेळगाव या भागातील किल्ल्यांची उभयतांनी दूरपर्यंत पाहणी करून महाडजवळील रायगड हे मराठी राज्याची भावी राजधानी म्हणून निश्चित केली. या दृष्टीने पुढील काही वर्षात तेथे जरूर ती तटबंदीची व इमारतीची कामे पुरी झाल्यावर इ. स. १६६६ मध्ये आग्र्याहून शिवाजी महाराज परत आल्यावर रायगड ही मराठी राज्याची अधिकृत राजधानी गणली जाऊ लागली. रायगड राजधानी करण्याचे ठरल्यावर इ. स. १६६४ पासून पुढील काही वर्षांत रायगडचे स्वरूपच बदलू लागले. महाराजांच्या आज्ञेने कल्याण सुभेदार आबाजी सोनदेव व इंदूलकर यांनी रायगडावर आवश्यक अशा एकंदर तीनशे इमारती बांधल्या.[२] त्यात राजवाडे, कचेऱ्या, धान्याची दास्ताने, दारूगोळ्याची कोठारे, शिबंदीच्या राहण्याच्या जागा, व्यापारी पेठा, पाण्याचे हौद, तलाव इत्यादींचा समावेश होतो. हे काम चालू असताना राजधानीच्या संरक्षणाच्या दृष्टीने गडावर येण्यास एकच वाट असावी अशी खबरदारी घेण्यात येत होती.[३] राजधानीच्या तटबंदी व आतील इमारती बांधण्यास शिवाजी महाराजांनी १६६४ जानेवारीत सुरत लुटून आदमासे दोन कोटी रुपये आणले ते खर्च केले असावे.

आपले वडील शहाजीराजे ह्यांच्या मध्यस्थी करण्यामुळे शिवाजी महाराजांनी विजापूरच्या नामधारी सत्ताधीश सुलतानाशी समेट केला होता. परिणामतः इतर जिल्ह्यासहित राजापूर, (शिवाजी महाराजांच्या) मुलूखापैकी एक भाग म्हणून मान्यता पावला. सन १६६२ मध्ये विजापूर शासनाने शिवाजी महाराजांच्या सर्व मागण्या मान्य केल्या. शिवाजी महाराजांनी

---

१ सरदेसाई, न्यू हिस्टरी ऑफ धी मराठाझ, भाग १, पृ. ८९.

२ कुलाबा गॅझेटिअर, पृ. ३६३, ३६४, रा. खंड ८ ले. २२.

३ आवळकर, रायगडची जीवनकथा, पृ. २६.

जिंकून घेतलेल्या उत्तरेकडील कल्याणपासून दक्षिणेस फोंड्यापर्यंतचा आणि पश्चिमेस दाभोळपासून पूर्वेकडे इंदापूरपर्यंतचा प्रदेश त्यांच्या ताब्यात देण्यात आला आणि त्यांचे स्वातंत्र्य मान्य करण्यात आले. शहाजीराजांच्या हयातीत विजापूरला हेतुतः न छळण्याची विधिपूर्वक शपथ शिवाजी महाराजांनी घेतली.[१]

त्याचबरोबर शिवाजी महाराजांनी दक्षिण कोकणातील दोन सामर्थ्यवान प्रमुख कत्रीचे शिर्के आणि शृंगारपूरचे सुर्वे यांना जिंकून आपल्या पक्षात घेतले आणि त्यामुळे वसईपासून मालवणपर्यंतचा कोकणचा पश्चिम किनारा, सह्याद्री पर्वतापर्यंतच्या अंतर्गत भूभागासहित शिवाजी महाराजांच्या ताब्यात आला.[२]

कुडाळवर विजय :

कुडाळ प्रांत हा कोकणचाच एक भाग होता. कुडाळ प्रांत आणि डिचोली, फोंडा, पेडणे, साखळी, मठोरी असे पाच परगणे मिळून सावंतवाडीचे राज्य (संस्थान) बनले होते. कुडाळचे १२ विभाग पाडलेले होते आणि प्रत्येक विभागाचा कारभार देसाई पाहत असे. सावंतवाडीचा देसाई लखम सावंत हा शिवाजी महाराजांच्या भोसले कुळापैकीच एक वंशज होता. परिस्थितीने शिवाजी महाराजांशी मैत्री करण्यास विवश झाला. त्याला शिवाजी महाराजांनी सन १६५० मध्ये कुडाळचे सरदेसाई म्हणूनच मान्यता दिली. परंतु, शिवाजी महाराजांशी निष्ठावान राहण्यास सावंताने कच खाल्ली आणि अनेकदा त्या सर्व प्रदेशात आपली सत्ता गाजवण्याचा प्रयत्न केला. सावंतासारख्या बेईमान सहकाऱ्याला शिक्षा देण्याकरता शिवाजी महाराज स्वतः कुडाळला आले आणि त्यांनी मग लखम सावंताना कैद केले. त्यानंतर मध्यस्थांच्या मुलाखती झाल्या आणि मग लखम सावंताची कैदेतून सुटका झाली. शिवाजी महाराज आणि सावंताच्या दरम्यान मैत्रीचा करार करण्यात आला.[३]

ह्या करारातील कलमे पुढीलप्रमाणे होती :—

(१) सावंताना त्याचे अधिकारी-मालकी निश्चित करून द्यावी. त्यांना मिळणाऱ्या महसुलापैकी अर्धा महसूल शिवाजी महाराजांस द्यावा. अर्धा हिस्सा स्वतःकडे ठेवावा.

---

१ किंकेड आणि पारसनीस, अ हिस्ट्री ऑफ द मराठा पीपल, भाग १, पृ. १७५.

२ पिंगुळकर, सावंतवाडी संस्थानचा इतिहास, पृ. ४०.

३ किंकेड आणि पारसनीस, अ हिस्ट्री ऑफ द मराठा पीपल, भाग १, पृ. १७५.

ह्या मिळकतीबरोबरच ३००० सैनिकही पायदळात भरती करावयाचे ठरले. जेव्हा कधी महाराजांस त्यांच्या सेवेची आवश्यकता वाटेल तेव्हा त्यांना पाठवण्यात यावे. महाराजांना गरज भासेल तेव्हा स्वत: सावंतांनीही दरबारी उपस्थित व्हावे लागेल.

(२) फोंड्याचा किल्ला आणि परिसरातील प्रदेश शिवाजी महाराजांच्या स्वाधीन करण्यात यावा. मात्र आवश्यक होईल तेव्हा सावंतांनी महाराजांच्या वतीने त्या प्रदेशाचे रक्षण करण्यास साहाय्य करावे.

(३) शिवाजी महाराजांच्या दरबारी आपले वकील ठेवून त्यांच्यामार्फत सावंतांनी महाराजांशी नेहमी संपर्क ठेवावा आणि स्वराज्य स्थापनेच्या कार्याकरता तुर्कांशी (मुस्लिमांशी) लढावे.

(४) शिवाजी महाराजांचे अधिकारी वेळोवेळी कुडाळ प्रदेशांत येऊन महसूल गोळा करून जातील. त्यावेळी महाराजांच्या आदेशानुसार सावंतांनी अधिकाऱ्यांच्या कामात मदत करावी.

(५) सावंतांना त्या त्या प्रदेशाचे मुख्याधिकारी जागीरी (वतने) आणि " बहादूर " हा किताब कायम करण्यात आला.

पाच कलमांचा हा करार ५ मार्च १६५९ रोजी करण्यात आला [१]. ह्या करारावरून असे स्पष्ट होते की, सावंतांचा प्रदेश शिवाजी महाराजांच्या नावे आणि त्यांच्या फायद्याकरता महाराजांच्या राज्याचाच एक भाग म्हणून अधिकारात राहील [२].

सावंतांचे दूत पितांबर शेणवी यांनी शिवाजी महाराज आणि सावंत यांच्या दरम्यान हा मैत्रीचा करार आणण्याच्या कामी महत्त्वाची भूमिका निभावली. ह्या करार-मध्यस्थी दरम्यानच्या काळात शिवाजी महाराजांनी कुडाळला भेट दिली. तेथे त्यांनी युरोपीय बनावटीची एक उत्तम तलवार तीनशे होनांचे मूल्य देऊन विकत घेतली आणि त्या तलवारीचे नांव त्यांनी " भवानी " ठेवले. अनेक युद्ध प्रसंगात त्यांनी भवानी तलवारीचा यशस्वीपणे वापर केला. सरदेसाईंच्या मते ती भवानी तलवार आजही महाराजांच्या सातारा वंशजाकडे आहे [३].

□□

१ पिंगुळकर, सावंतवाडी संस्थानचा इतिहास, पृ. ४०.

२ बाळकृष्ण, शिवाजी भाग २, पृ. १०३, प. सा. ९९९.

३ सरदेसाई, न्यू हिस्ट्री ऑफ द मराठाझ, भाग १, पृ. १२२, तळटीप ३ री.

९. बादशहाचा मामा शायिस्तेखान यास युक्तीने शासन

औरंगजेबाने राज्यरोहणाच्या वेळी (दिनांक ५ जून १६५९) आपला मामा शायिस्तेखान याची दक्षिणच्या सुभेदारीवर नेमणूक केली.[१] शायिस्तेखान दिल्लीहून नव्या जागी औरंगाबादला जाण्यास निघाला. वाटेत त्याने बऱ्हाणपुरास छावणी केली. शायिस्तेखान दक्षिणेच्या वाटेवर असता औरंगजेबाने विचार केला की, शायिस्तेखानास शिवाजीराजांचा बंदोबस्त करण्याचे काम द्यावे. त्याप्रमाणे औरंगजेबाने खानाकडे शिवाजीराजांवरील मोहिमेचे फर्मान पाठविले. हे फर्मान शायिस्तेखानास त्याचा मुक्काम बऱ्हाणपुरास असता मिळाले. खानाबरोबर त्यावेळी तोफखाना व एक लाख सैन्य होते. ह्या सैन्याचे अधिपत्य ५५ मोगली सरदार करते होते. त्यांना बैठकीस बोलावून मराठ्यांवरील स्वारीसंबंधीचे बादशहाकडून आलेले फर्मान वाचून दाखविले. ह्यावेळी खानाच्या सैन्यात माहूरच्या उदाराम देशमुखाची बायको रायबागीन होती. ती शूर, तडफदार व मुत्सद्दी होती. ती मोगलांचे सेवेत होती. औरंगजेब बादशहाने तिचे शौर्य पाहून तिला "रायबागन" किताब दिला होता.[२]

बादशहाचे फर्मान ऐकून सर्व मोगल सरदार मराठ्यांवर स्वारी करण्यास तयार झाले. त्यांना आगेकूच करण्याचा हुकूम शायिस्तेखानाकडून मिळाला. तेव्हा नौबतीच्या इशाऱ्यात मोगली फौज निघाली ती औरंगबादला आली. औरंगाबाद ही दक्षिणेच्या सुभेदाराची राजधानी. तिथे आल्यावर शायिस्तेखानाने तेथे काही दिवस राहून तेथील बंदोबस्त केला. औरंगाबादेस त्याने आपला मुलगा अबूलफत्तेखान याची प्रतिनिधी म्हणून नेमणूक केली. नंतर तो तेथून निघाला तो अहमदनगरास दिनांक ११ फेब्रुवारी १६६०त फौजेसह येऊन दाखल झाला.[३] दिनांक २५ फेब्रुवारी १६६० रोजी त्याने अहमदनगर सोडले.[४] वाटेत महाराजांना पाण्यात पाहणारे घाटगे, जाधवराव, कोकाटे, गाढे आदी मराठे सरदार खानास येऊन मिळाले.

---

१ सरदेसाई, मराठी रियासत, खंड १, पृ. १८३.

२ कित्ता, पृ. २०५.

३ बेंद्रे, श्री छत्रपती शिवाजी महाराज, पृ. ३३९.

४ कित्ता.

चाकणवर हल्ला :

शायिस्तेखानाच्या मोगली फौजेस अहमदनगरहून रसद मिळत होती. ती मराठे तोडीत असत. त्यास तोंड देत सुपे, बारामती, इंदापूर, शिरवळ वगैरे परगण्यातील गावेच्या गावे पेटवून देऊन खान सासवडला दाखल झाला. तद्नंतर खान आपल्या सैन्यासह दौडत पुण्यास दिनांक ९ मे १६६० रोजी पोहोचला. [१] खानाने खुद्द लालमहालचा कब्जा घेतला व तेथे तो मोठ्या दिमाखाने राहू लागला. लालमहालचा आसमंत एक लाख मोगली फौजेने व्यापून टाकला. लालमहालावर मोगलांचे हिरवे निशाण फडकू लागले. यावेळी शिवाजीराजे पन्हाळगडावर होते. राजमाता जिजाबाई राजगडावर होत्या. सबंध पुणे प्रांत मोगलांनी व्यापला होता. पुणे मुक्कामी शायिस्तेखानाने पुणे, नाशिक मार्गावर मराठ्यांच्या ताब्यातील चाकण किल्ला हल्ला करून घेण्याचे ठरविले. ह्या किल्याचे रक्षण मराठा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा करीत होता. शायिस्तेखानाने आपला तोफखाना व प्रचंड सैन्य चाकण किल्ल्यास वेढा घालण्यासाठी रवाना केले. [२] खुद्द शायिस्तेखानही जातीनं निघाला. ही बातमी हेरांकडून किल्लेदार फिरंगोजी नरसाळा यास कळली. त्याने लढाईच्या तयारीचे हुकूम दिले.

खान झपाट्याने अंतर काढीत चाकणच्या टप्प्यांत आला. येताना त्यास गांवे उजाड दिसली. खान किल्ल्याजवळ आल्यावर त्यास किल्लेदाराने किल्ल्याचा दरवाजा जाम बंद केल्याचे दिसले. फिरंगोजी किल्लेदाराने तटावरून टेहळणी केली. त्यास खानाची फौज किल्ल्याच्या अगदी जवळ आल्याचे दिसले तेव्हा किल्ल्यावरच्या तोफांना एकदम बत्ती मिळाली. धडाधड गोळे सुटू लागले. बंदुकांच्या फैरीही उडू लागल्या. तेव्हा खानाची फौज गांगरली. किल्यावरून मोगली फौजेवर सारखा मारा होत होता. हा मारा चुकविण्याकरिता खानाने आपल्या फौजेस बंदुकीच्या टप्प्याच्या अंतरापासून लांब तळ देण्यास फर्माविले. त्या फौजेने चाकण किल्ल्यास विळखा घालून खान किल्ल्यावर तोफांचे विषारी फुत्कार टाकीत होता. तरी आतील शिबंदीने खानास दाद दिली नाही म्हणून त्याने किल्यास एका बाजूस खिंडार पाडले. निष्ठावंत किल्लेदार फिरंगोजी नरसाळा याने मोगलांचा हल्ला परतवून लावण्याची शिकस्त केली. त्याचा पराक्रम पाहून शायिस्तेखान खजिल झाला. त्याला खानाने आपल्या बाजूस येण्यासाठी अनेक आमिषे दाखविली. पण तो बहादूर खानाच्या आमिषांना मुळीच भुलला नाही आणि पंचवीस दिवसपर्यंत वेढा मोठ्या शर्थीने लढविला. मोगलांचे सगळे सैन्य व नामांकित सरदार किल्ल्यावर चालून आले. पण मराठ्यांनी त्यांना थोपवून धरले. मोगलांची या वेढ्यात मोठी हानी झाली. शेवटी दोन महिने लढून १५ ऑगस्ट १६६० ला तो किल्ला मोगलांस मिळाला. [३]

१ शिवचरित्रवृत्सँ, ३ पृ. २०-२३, बेंद्रे, पृ. ३३१.

२ जदुनाथ सरकार, हिस्टरी ऑफ औरंगजेब, भाग ४ था, पृ. ४४-४६.

३ कित्ता.

या वेढ्यातील झालेली प्राणहानी पाहून शायिस्तेखानाने मराठ्यांचे डोंगरी किल्ले सर करीत बसणे आपल्याला परवडणार नाही याबद्दल खात्री झाली. त्याने मराठ्यांकडील किल्ले जिंकून घेण्याचा नाद सोडला. मराठ्यांशी लढाई द्यावयाची तर ती खुल्या मैदानात तोफखान्याच्या आश्रयाने द्यायला पाहिजे अशी खूणगाठ खानाने मनाशी बांधली. खानाने पुण्यास येऊन महाराजांच्या लालमहालामध्येच तळ ठोकला.

शायिस्तेखानावर छापा इ. स. ५ एप्रिल १६६३ :

कोकणची मोहीम फत्ते करून महाराज राजगडावर आले. शायिस्तेखान लालमहालात राहून राजांच्या गडावर फितुरी माजवी आणि त्यांच्या फौजा आसपासच्या प्रजेला त्रास देत लुटमार करीत. राजे राजगडावर विचार करत होते की, ह्या शायिस्तेखानाला स्वराज्यातून बाहेर कसा हुसकावा. एक विचार की एकदम शायिस्तेखानावर झडप घालून ठार केल्यास मोगलास चांगलीच जरब बसेल. नेताजी पालकरास बोलावून राजे यांनी त्यास मोगली मुलखांत धुमाकूळ घालण्यात रवाना केले. नेताजीने मोगलांनी जिंकलेल्या पुणे प्रांतात शिरून लूट केली व नंतर त्याने खानदेश वऱ्हाडपर्यंत मोगलांच्या मुलखातही धुमाकूळ घातला व लूट केली. मोगल फौजेने त्याचा पिच्छा पुरवून ३०० घोडे जायबंदी केले. नेताजीलाही जखमा झाल्या. (इ. स. १६६३ मार्च एप्रिल) ह्या बातम्यांनी राजे चिंताग्रस्त झाले. त्यांनी शायिस्तेखानास त्यांच्या महाली रात्री शिरून उडवायचा बेत आखला. शायिस्तेखान हा निर्धास्तपणे पुण्यास राहत होता. नुकता त्याच्या मुलीचा विवाह समारंभ थाटात पार पडला होता. शायिस्तेखानाने पुण्यात असता आपल्यासाठी एक हवेली बांधली होती. भीमसेन म्हणतो की शिवाजीराजांनी शायिस्तेखानाच्या लष्कराच्या बाजाराची आणि वारांची इतकी बारीक माहिती काढली की जणू काय राजियांनी ही स्थळे अनेकदा आपल्या नजरेखालून घातली होती.[१] ५ एप्रिल १६६३ रोजी रमजानचा सहावा चंद्र होता. दिवसाचा उपास सोडून शायिस्तेखानाच्या परिवारांतील मंडळी विश्रांती घ्यायला आपआपल्या ठिकाणी गेली. त्याच दिवशी शिवाजीराजे यांनी दोनशे अनुभवी आणि कसलेल्या लढवय्यांना बरोबर घेऊन रात्रीचे दोन प्रहर झाले असता निघाले. आम्ही पाहाऱ्यावरचे शिपाई पहारे सोडविण्यास जातो असे सांगून मध्यरात्री ते जसवंतसिंगाच्या बाजाराजवळून पुढे सरकले. नंतर ते शायिस्तेखानाच्या मुदपाकखान्यापाशी आले. राजे यांनी खानाच्या जनानखान्याच्या इमारतीच्या भिंतीला भोक पाडले व आपल्यापैकी दोघांतिघांना आत पाठविले. त्यांच्या पाठोपाठ तेही आत गेले.[३] इतर दहा माणसे त्यांच्या मागोमाग गेली. जनानखान्यातील दासींनी शायिस्तेखानास कळविले की भिंतीस भोक पाडून काही माणसे आत घुसली आहेत. हे ऐकताच शायिस्तेखान हा आपले शय्यागृह सोडून वाड्याच्या ओसरीवर आला.[४] अंधारी रात्र

१ जदुनाथ सरकार, हिस्टरी ऑफ औरंगजेब, भाग ४ था, पृ. ४७.

२ तारिके दिलकशा (इंग्लिश ट्रान्सलेशन एडिटेड बाय खोबरेकर), (१९७२), पृ. ३६.

३ कित्ता.

४ जेधे शकावली, पृ. १४.

होती. कोण माणसे आली हे समजेना. वाड्याच्या दुसऱ्या दिवाणखान्यात अनेक दिवे जळत होते. शायिस्तेखानाचा मुलगा अबुलफत्तेखान हा तेथे झोपला होता. तोच शायिस्तेखान समजून शिवाजीचे लोक त्या तरुण माणसावर तुटून पडले. त्याचे डोके कापून घेऊन ते आपल्याबरोबर घेऊन गेले. या सुमारास शायिस्तेखान हा घाबरलेल्या स्थितीत दिवाणखान्याच्या देवडीवर आला. बरोबर काही शिपाई होते. त्यांना त्याने आत पाठविले.[१]

महाराजांची युक्ती :

शिवाजीराजे यांनी शायिस्तेखानाच्या महालात प्रवेश मिळविण्यासाठी पहारेकऱ्यांची कत्तल केली. नंतरच्या कत्तलीत शायिस्तेखानाचा वडील मुलगा, जावई, १२ बेगमा, ४० मोठे दरकदार व १ मोगल सेनापती इतके गारद झाले. शायिस्तेखानाला अंधारात गाठून त्यास ठार करण्यासाठी राजांनी वार केला. तो ठार झाला अशीच राजांची समजूत झाली. परंतु त्याच्या प्राणावर बेतले होते ते केवळ त्याच्या हाताच्या बोटांवर निभावले. त्याचवेळी जनानखान्यातील आणखी ६ स्त्रिया व २ मुलगे ठार झाले. या धावपळीत मराठ्यांचे फक्त ६ सैनिक मेले व ४० जखमी झाले. शेजारी जसवंत सिंगाचे १० हजार सैन्य असून नसून सारखेच झाले. सावध होऊन शोधाशोध चालू होण्याच्या आत शिवाजीराजे आले होते. तितक्याच त्वरेने आणि गुप्तपणे, आपल्या फौजेच्या टोळ्या करीत पश्चिमेकडे कर्यात मावळात सिंहगडावर गेले.[२]

महाराजांचा पाठलाग करीत रात्री खानाचे सैन्य प्रथम कात्रज घाटाकडे गेले. कारण त्यांना त्याबाजूस मशाली पेटलेल्या दिसल्या. पण उजाडल्यावर त्यांच्या लक्षात आले की जाणून बुजून सैन्याला चकविण्यासाठी बैलांच्या शिंगांना मशाली बांधून व पेटवून त्यांना कात्रज घाटाकडे पिटाळले होते.[३]

दुसऱ्या दिवशी खानाचे लोक पाठलाग करीत सिंहगडापर्यंत गेले परंतु वरून तोफांचा भडीमार झाल्यावर मोगल सैन्य पळाले. शायिस्तेखानाने पुणे सोडून तो औरंगाबादेत गेला. शायिस्तेखानावरील धाडसी हल्ल्याची बातमी दिल्लीत पोचल्यावर सर्व मोगली सरदार भयचकित झाले. त्यांच्या मनात राजांबद्दल दहशत निर्माण झाली. आपल्या मामाची दुर्दशेची बातमी औरंगजेबाला काश्मीरात समजली तेव्हा त्याचा तडफडाट झाला.

बादशहाने शायिस्तेखानाची बदली बंगाल सुभ्यावर केली. राजांची युक्ती सोळा आणे यशस्वी झाली. महाराजांच्या भोवती जमलेल्या मंडळींस ह्या कृत्याने एक स्फुरण चढले. आणि स्वराज्य स्थापनेच्या महाराजांच्या उद्योगांत ते अहमहमिकेने सामील झाले. खानावरील अलौकिक छाप्याच्या वार्तेने लोक आश्चर्यचकित झाले.[४]

□□

१ सभासद, पृ. ३३-३४.

२ English Records on Shivaji, pp. ५३-५४.

३ काफीखान, पृ. ६१-६२.

४ बर्निअर, ट्रव्हल्स इन द मोगल एम्पायर, ट्रा. स्मीथ, २ री आवृती, पृ. १८७, मनुची, स्टोरीया दो मोगोल भाग २, पृ. १०४-१०६.

१०. शिवाजी महाराज आणि जंजिरेकर सिद्दी

मुंबईपासून १६० कि.मी. अंतरावर पाण्यात जंजिरा किल्ला आहे. तो रायगड जिल्ह्यातील दंडाराजपूर गावापासून समुद्रात अर्ध्या मैलावर आहे. इ. स. १४९० मध्ये मलिक अहमद या बहामनी सरदाराने अहमदनगर येथे निजामशाही ह्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली व उत्तर कोकणचा ताबा घेतला. दंडाराजपुरी हे एक ठाणे केले. या ठिकाणाहून पश्चिमेला पाहिले की भर समुद्रात दिसतो तो जलदुर्ग जंजिरा. हा निजामशहाने आपल्या ताब्यात इ. स. १४९० च्या सुमारास घेतला व आपल्या सिद्दी सरदारास सुभेदार नेमिले. पहिला मुर्तजा निजामशहा याच्या कारकीर्दीत बुऱ्हाणखानाने १५६९-७१ या काळात जुना मेढेकोट पाडून आज तो दिसतो त्या किल्ल्याचे काम केले व नाव ठेविले जंजिरा मेहरूब [१]. जंजिरा कोटाचा आकार वर्तुळाकार असून सभोवताली तट फार मजबूत आणि उंच आहेत. हा अवघड ठिकाणी समुद्रात बांधलेला. आरमार असल्याशिवाय त्याची नाकेबंदी करणे कठीण. त्यामुळे तो अजिंक्य राहिला. १६१८ साली निजामशहाने वजीर सिद्दी सिरुलखान यास जंजिऱ्यावर नेमले व सिद्दी अंबरला राजपुरीचा सुभेदार नेमले. हा इथला पहिला हबशी सुभेदार [२]. त्याच्या नंतर पुढे सर्व सुभेदार हबशीच झाले. हे ॲबिसिनियातून (आताच्या इथिओपियातून) आणलेले गुलाम, हे गुलाम शूर, आज्ञाधारक व हुशार होते. हे गुलाम कधी कधी गुणवत्तेत आपल्या धन्यापेक्षाही वरचढ असल्याचे दिसून येते. यांना हबशी काफीर असेही म्हणत. ईशान्य

१ मिराते अहमदी, कुलाबा गॅझेटिअर, पृ. ३०.

२ शिव. च., सा. ३, पृ. ४४६.

आफ्रिकेतील अरबअल, हबीश या प्रदेशातून आलेले म्हणून त्यांचे नामकरण हबशी असे झाले. जंजिरा संस्थानला हबसाण हे नाव याचमुळे पडले. यांना सिद्दी असेही म्हणत. सिद्दी हा सैय्यद या आदरार्थी उपाधीचा अपभ्रंश आहे.

बहामनी राजांच्या दरबारात ह्या सिद्दी सरदारांना महत्त्वाचे स्थान होते. सिद्दी सिरुलखान या ॲबिसियनीयन सरदारांची सन १६१८ मध्ये जंजिऱ्याचा किल्लेदार म्हणून नेमणूक झाली, हे वर सांगितले आहे. १६२० साली सिद्दी याकुब व मागोमाग सिद्दी अंबर (सानक) हे जंजिऱ्याचे किल्लेदार झाले.[१] मोगलांनी अहमदनगर राज्य इ. स. १६३६ मध्ये बुडविले व अहमदनगरच्या ताब्यातील उत्तर कोकणचा मुलूख विजापूरकरांकडे दिला. या काळातच जंजिऱ्याचे महत्त्व वाढले. विजापूरच्या आदिलशाही राज्यकर्त्यांनी आपल्या व्यापाराचे व मक्केला जाणाऱ्या यात्रेकरूंचे संरक्षण करण्याची जबाबदारी ॲबिसियन आरमारी प्रमुखावर सोपविली व त्यास वजीर असा किताब दिला.[२] इ. स. १६३६ ते १६६७ या काळात सिद्दी अंबर, सिद्दी युसूफखान व फत्तेखान हे वजीर होऊन गेले. फत्तेखान याचे हाताखालील सिद्दी संबूळ, कासम व खैरियत हे तीन अधिकारी मराठ्यांचे कट्टर वैरी बनले. फत्तेखान सन १६६७त मरण पावला.[३] सरहद्दीचा बंदोबस्त ठेवणे हे राज्य संरक्षणाचे मुख्य कार्य असल्यामुळे कारवारपासून सुरतपावेतो पश्चिम किनाऱ्यावर आपणास कोणी शत्रू नसावा अशी व्यवस्था शिवाजी राजे यांना करावयाची होती. हा हेतू सिद्धीस नेण्यास एका सिद्दीचीच काय ती अडचण त्यांना होती. म्हणून सिद्दीचा पाडाव करण्याचे काम त्यांनी हाती घेतले. त्यातूनच मराठ्यांच्या आरमाराची उत्पत्ती झाली.

जंजिऱ्याचा सुभेदार युसुफखान इ. स. १६५५त मेला. त्यानंतर त्याचा मुलगा फत्तेखान दंडाराजपुरीचा हवालदार झाला. त्याची कारकीर्द इ. स. १६५५ ते १६६७ पर्यंत झाली. इ. स. १६५६ च्या एप्रिलात रायगडावरील

१ बेंद्रे, छत्रपती शिवाजी, पृ. ६८८.

२ प. सा. सं. क्र. ४५९.

३ भारत वर्ष जं. सि., पृ. २.

मोहीम संपल्यानंतर इ. स. १६५७ च्या जुलैत शिवाजीराजे यांनी जंजिरा काबीज करण्यासाठी निळोपंत रघुनाथ यांजबरोबर आरमार व फौज देऊन पाठविले.[१] रघुनाथपंतांनी दंडाराजपुरी येथील हबशांवर हल्ला केला व त्यास जेरीस आणले तेव्हा त्याने वकील पाठवून रघुनाथपंतांशी सल्ला केला. सख्य होऊन रघुनाथपंतास हबशी याने वस्त्रे व घोडा दिला.[२]

रघुनाथपंतास कोकणचा सुभा नेमण्यात आले होते. त्यांच्या मदतीस शामराज निळकंठ व बाजी घोलप हे होते. परंतु इ. स. १६५९ च्या सुरुवातीस रघुनाथपंतांची पाठ फिरताच सिद्दी पुन्हा कोकणात उपद्रव देऊ लागला.

म्हणून सन १५५९ च्या पावसाळ्यात शिवाजीराजे यांनी अण्णाजी दत्तोबाचा भाऊ व्यंकोजी दत्तो याजबरोबर दुसरी फौज जंजिऱ्यावर पाठविली.[३] त्याजबरोबर पाच हजार स्वार व दोन हजार लोक मावळे दिले. मागून मोरोपंत पिंगळे यासही व्यंकोजीच्या मदतीस पाठविले. दर्यासारंग दौलतखान यांनी नवीन उत्कृष्ट आरमार वाढवून जंजिऱ्यास वेढा घातला आणि लढाईचे काम निकराने चालविले. सिद्दी खैर्यतही मोठ्या शिकस्तीने लढला.[४] पण जेरीस आला. म्हणून नाइलाज झाला. तेव्हा खैरतने शिवाजीराजांस दंडाराजपुरी देऊन तह केला, फक्त जंजिरा किल्ला सिद्दीचे ताब्यांत राहिला. त्यास व्यंकोजीपंतांनी वेढा घातला. शिवाजीराजे यांनी लगेच जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था ठरवून व्यंकोजीपंतास सुभेदार नेमिले. आणि त्याचे मदतीस सिद्दीच्या बंदोबस्तासाठी ७ हजार फौज कायमची ठेवून दिली.[५] परंतु हा वेढा उठवून सर्वांस अफझलखानाचे मसलतीस तोंड देण्यास घाटावर जावे लागले. त्यामुळे जंजिरा कोट घेणे

१. शिवभारत, पृ. १८१.

२. सरकार, औरंगजेब भाग १ ला, प. सा. सं. ७२८.


३. शि. दि. वि., पृ. १९३.

४. चिटणीस बखर, पृ. ८६.

५. बेंद्रे, छत्रपती शिवाजी, पृ. ६९२.

बाकी राहिले. नंतर आदिलशहा व मोगल यांच्याशी लढण्यात वेळ गेल्याने शिवाजीराजे यांना कोकणाकडे लक्ष देणे शक्य झाले नाही.[१]

□□



जंजिरा किल्ला

१ प. सा. सं. क्र. ७९३.

११. शिवाजी महाराजांची सुरत स्वारी

शिवाजी राजेंनी सुरत लुटण्याचे आणखी एक अजब साहस करून औरंगजेबास जबरदस्त धक्का दिला. गुजरातेंत मराठी सत्तेचा ओनामा शिवाजी राजांनी केला. त्यावेळी मोगल सत्ता गुजरातवर होती. शिवाजी राजे स्वराज्य स्थापण्याच्या उद्योगांत होते. या कामी दिल्लीकर मोगलांशी त्यांना मुकाबला करावा लागे, कित्येकदा भोवतालच्या आदिलशाही आदी सत्तांशी ते झुंजत असत. हे सामने सैन्याच्या जोरावर होते. सैन्य पोसण्यास व किल्ले बांधण्यास पैसा लागे. सन १६६४ मधील सुरतची पहिली लूट शिवरायांनी पैसा मिळविण्यासाठी केली. हेरांचा म्होरक्या बहिर्जी नाईक याला आधी सुरतेस रवाना केले. व काही महत्त्वाच्या कामाचे निमित्त काढून राजे स्वतः नाशिकास गेले. तेथेच मुक्काम केला. चार हजार सैनिक बरोबर होते. सुरत शहराच्या संपन्नतेची बातमी बहिर्जीने महाराजांस दिली. महाराज बातमीवर एकदम खूष झाले. दुसऱ्या दिवशी स्वारांसह कूच केले. डांगचे जंगल तुडवून तारीख ६ जानेवारी १६६४ रोजी शिवाजी राजे सुरत शहरापुढे येऊन धडकले.[१] दीड हजार वर्षांची ही व्यापाराची विकसित पेठ. संपन्न व्यापाऱ्यांनी गजबजलेले पश्चिम किनाऱ्यावरचे नाके, प्रचंड व्यापारी घडामोडीचे स्थळ. मक्केच्या यात्रेकरूंची ने-आण याच बंदरातून होत असे. येथील हाजी सैय्यद बेग व बहर्जी बोहरा हे दोन व्यापारी इतके सधन होते की, पृथ्वीवरील धनाढ्य सावकारात त्यांचा नंबर बराच वरचा लागे. एक बनिया तर आठ कोटी रुपयांचा धनी होता. याशिवाय नदी किनाऱ्यावर इंग्रज व डच यांच्या वखारी होत्या. अशा या संपत्तीच्या माहेर घरासमोर महाराज येऊन ठाकले. त्यावेळी सुरतेस मोगल सुभेदार इनायतखान होता. त्याला महाराजांची चाहूल हेराकडून तारीख ५ ला लागली. तसेच त्यांने शहराभोवती रक्षक ठेवले, पूल तोडले, निरनिराळ्या ठिकाणी तोफा ठेवल्या आणि नगररक्षण आपण केले अशी वार्ता त्याने पसरविली. स्वतः मात्र घोडदळासह किल्ल्याच्या आश्रयास गेला. त्यामागोमाग सर्व अधिकारी किल्ल्यात गेले. दोन श्रीमंत व्यापारी आपली घरे व माल सोडून किल्ल्यात गेले. इतक्यात शिवाजी राजीयांचा निरोप मोगल सुभेदारास असा : " समक्ष भेटून दंड ठरवून रक्कम भरण्याची तजवीज करा, असे न केल्यास आम्हांस लूट व जाळपोळ करावी लागेल, त्याची जबाबदारी तुमच्यावर राहील "[२] हा निरोप महाराजांनी मोगल सुभेदारास व व्यापाऱ्यांस पाठविला. खानाने महाराजांस उद्धट उत्तर पाठविले. उत्तर घेऊन येणाऱ्या वकिलास कैद झाली. किल्ल्यासमोर मराठी

१ जेधे शकावली, शिवच. पृ. २२.

२ पत्रसार सं. भाग १, ९७५.

सैन्य उभे ठाकले. केवळ आतील माणसांना भेडासवण्याकरिता व बाहेर कोणी फिरकू नये म्हणून त्यांनी किल्ल्यावर गोळीबार चालू केला. शहरात अग्निप्रलय व लूट सुरू झाल्याच्या बातम्या पसरल्यावर खान घाबरला. त्याने महाराजांच्या भेटीसाठी म्हणून एक छुपा खुनी धाडला. तो महाराजांच्या अंगावर खंजीर घेऊन धावला. तो खंजीराचा हात वरच्यावर शिवाजीराजांच्या बरोबर असणाऱ्या सरदाराने छाटला. तरीदेखील तो महाराजांच्या अंगावर आदळला. दोघेही कोलमडले. महाराज तत्काळ उठले. खुनी प्राणास मुकला. [१] महाराजांचा राग अनावर झाला. मागितलेला दंड सामोपचाराने न देता उलट कपट आणि उद्धटपणा याचा कळस झालेला पाहून मराठी स्वार शहरात लूट करून घरांस आगी लावू लागले. जाळ चेतवण्याची मराठ्यांनी नवीन शक्कल काढली. तेल्याच्या दुकानातून तेल घेऊन ते भिंतीवर, दारांवर व खिडक्यांवर ओतून व तेलाचे बुधले जमिनीवर उभे ठेवून ते त्यांना आग लावून देत[२] व मोठमोठ्या धनाढ्य व्यापाऱ्यांच्या घरांच्या झडत्या घेत. मात्र त्यांनी रयतेस बिलकूल त्रास दिला नाही. या झडतीत द्रव्य पुष्कळ सापडले. द्रव्याच्या राशी पडल्या. मोहरांनी भरलेल्या दोन-दोन पिशव्या घेतलेले सुमारे ३००० हमाल धावले. हिरे, माणके यांची तर गणतीच नाही. अठ्ठावीस शेर मोठे मोती होते.[३] लोक लूट घेऊन एकसारखे महाराजांपुढे ओतीत होते. सोने, रूपे आदी महत्त्वाचा माल बाजूला काढून ठेवून बाकीचे जिन्नस जवळ उभे राहणाऱ्यांना महाराज लगेच वाटून टाकीत असत.[४] अशा प्रकारे सुरत शहर तारीख ६ ते १० जानेवारीपर्यंत लुटले. लुटीत सापडलेले जिन्नस, होन, माल, मोती, हिरे, वगैरे मिळून सुमारे एक कोटीचा ऐवज महाराज पुण्यास घेऊन आले.[५] जणू मोगल बादशाहीस जरब बसविण्याकरता हा सुरतेवरील हल्ला होता. हे शहर लुटून महाराजांस बादशहावर सूड उगवावयाचा होता. रियासतकार म्हणतात ; " करा, कसा तो सुरतेचा बचाव " अशा प्रकारचे आव्हान महाराजांनी या प्रसंगी बादशहास दिले.[६]

मराठ्यांच्या आरमारानेही या वेळेस पुष्कळ काम केले. खंबायतच्या आखातापर्यंत शिवरायांची जहाजे पोचली आणि मुसलमान यात्रेकरूंना घेऊन मक्केस जात असलेल्या मोगल जहाजांवर त्यांनी हल्ला चढविला. यात्रेकरूंपासून चांगली रक्कम हबकून त्यांना नंतर सोडून दिले.[७] पुढील दोन वर्षे नेताजी पालकरने मोगलांचे मुलुखात सारखा धिंगाणा घातला होता.

---

१ पसासं ९६८.

२ कित्ता ९६, पृ. २४७.

३ कित्ता ९७७, पृ. २५३.

४ कित्ता ९६८, पृ. २४६.

५ कित्ता ९७३, पृ. २४९.

६ सरदेसाई, रियासत, शककर्ता शिवाजी, पृ. २१९.

७ बेंद्रे, छत्रपती शिवाजी महाराज, पृ. ६९४

शहाजीराजांचा मृत्यू :

इ. स. १६६४ च्या जानेवारीत शिवाजी राजे यांनी सुरतवर हल्ला केला व सुरत लुटली. औरंगजेबला हात दाखविण्यासाठी राजांनी सुरत लुटली व ते सुरतेहून परत येत असता वाटेत त्यांना त्यांचे पिताजी शहाजीराजे निर्वतल्याची दुःखद बातमी समजली.[१]

शहाजीराजे इ. स. १६६४ साली शिमोगा जिल्ह्यातील बंडखोरांचा बंदोबस्त करण्यास गेले व बंडखोरांस शासन करून त्यांना वठणीवर आणले. या स्वारीचे वेळी होदिगिरे गावी त्यांचा मुक्काम होता, तेथील जंगलातील श्वापदे रयतेला त्रास देऊ लागली होती. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी राजे शिकारीस गेले असता एका श्वापदामागे पळता पळता त्यांचा घोडा एका खड्डयात पडला. व स्वतः राजे घोड्यावरून पडून निधन पावले.[२] (दि. २३ जानेवारी १६६४) ही बातमी वाटेतच शिवाजीराजांना समजली त्यामुळे त्वरेने ते राजगडावर आले (फेब्रुवारी ५) राजांवरील पितृछत्र नाहीसे झाले. खुद्द शिवाजीराजे व मातुश्री जिजाबाई यांच्या दुःखास पारावार राहिला नाही. " मज आपणांस वडिल आता कोणी नाही " म्हणून मोठा खेद केला. त्या उपरि मातुश्री अग्निप्रवेश करीत होती तिचे मांडीवर बैसून गळां मिठी घालून आण घालून राहविली.[३] "आपला पुरूषार्थ पहावयास कोणी नाही. तू जाऊ नको " म्हणून मोठा यत्न करून राजियांनी व सर्व थोर लोकांनी राहविली.[३] (सभासद कृत शिव-छत्रपतीचे चरित्र, पृ. ५२) शहाजीराजांची योग्यता रियासतकारांनी पुढीलप्रमाणे वर्णिली आहे.

शहाजी कल्पक, धाडसी, विपन्नावस्थेत न डगमगणारा असा पण थोडा बहुत रंगेल होता. हाती द्रव्य असल्यावर पुरेशी फौजदारी बाळगून हिंदुस्थानचा प्रदेश जिंकणे शक्य आहे ही गोष्ट डुप्ले-क्लाईव्हच्या पूर्वी शंभर वर्षे शहाजीनं प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविली यास्तव तत्कालीन ऐतिहासिक व्यक्ती राष्ट्रीयत्व दिमाखाने मिरवणारा शहाजीशिवाय दुसरा एकही हिंदू सत्ताधीश दक्षिणेत आढळत नाही. शहाजी राज्य संकल्पक होते.[४]

सिंहगडचा वेढा

राजांचा मुक्काम राजगडावरच होता. मोगल सुभेदार जसवंत सिंग याने इ. स. १६६३ नोव्हेंबरात सिंहगडास वेढा दिला होता. सिंहगड पक्का बंदिस्त होता त्यामुळे सिंहगडास जसवंतसिंगाने वेढा देऊन ५/६ महिने झाले तरी मोगलांची काहीच प्रगती झाली नाही. हे पाहून जसवंत सिंग संतापला. त्याने निकराच्या लढ्याची सिद्धता केली कारण पावसाने गाठले की किल्ला सर होणे अशक्य होते. म्हणून त्याने एप्रिल ६४ मध्ये सिंहगडावर चढाईचा हल्ला केला. परंतु किल्ल्यातून जोराचा प्रतिकार करण्यात आला. त्यांनी सारे मोर्चे मोडून काढले. त्याच वेळी जसवंतसिंगाच्या दारूखान्याला आग लागली. या दोन्ही घटनानी जसवंतसिंग फार निराश झाला होता. आणि सिंहगडचा वेढा उठवून तो

१ सर जदुनाथ सरकार, शिवाजी, पृ. १०१.

२ ग. ह. खरे, शिवचरित्र संशोधन वृत्त, पृ. २३.
सरदेसाई मराठी रियासत, शहाजी भोसले, पृ. ११४.

३ सभासद, शिव-छत्रपती चरित्र, पृ. २३

४ सरदेसाई, रियासत शहाजीराजे. पृ. ११७

छावणीसाठी अन्यत्र गेला.[१] (ता. २८ मे, १६६४) सिंहगड आपल्या ताब्यात राहिल्याचे राजांना समजताच २/३ दिवसांत ते गडावर व्यवस्था पाहण्यासाठी गेले. किल्लेदार व इतर अधिकाऱ्यांचे त्यांच्या पराक्रमाबद्दल कौतुक करून राजे राजगडावर परत आले. सुरतेच्या लुटीने आणि सिंहगडच्या प्रतिकाराने राजांची दहशत वाढली होती. राजांनी शायिस्तेखानाच्या लुटीचा वचपा काढण्याचे ठरविले. महाराजांच्या हुकूमाने नेताजी पालकर याने मोगली मुलूख झोडपून काढला (ऑगस्ट १६६४) राजांच्यावर चालून येणाऱ्या मोगल अधिकाऱ्यांची चाहूल राजांना लागली. तेव्हा आपण कोण आहेत, काय केले आणि काय करणार आहोत ह्याची जाणीव राजांनी दक्षिणेतील मोगल अधिकाऱ्यांस आपला मुनशी नीलप्रभूचे हस्ते एक फारशी पत्र सन १६६४ चे अखेरीस किंवा १६६५ चे आरंभी लिहून कळविले ते असे : " आज तीन वर्षे बादशहाचे मोठमोठे सल्लागार व योद्धे आमचा प्रदेश काबीज करण्यासाठी चालून येत आहेत, हे तुम्हां सर्वांस माहित आहेच. बादशहा दिल्लीत बसून हुकूम फर्मावितात, " शिवाजीचे किल्ले व मुलूख काबीज करा ". तुम्ही जबाब पाठविता " आम्ही लवकरच काबीज करतो ". आमच्या ह्या कठीण मुलुखात नुसत्या कल्पनेचा घोडासुद्धा नाचवणे कठीण आहे, मग तो प्रदेश काबीज करण्याची गोष्ट कशाला ? भलत्याच खोट्या बातम्या बादशहाकडे लिहून पाठविण्यास तुम्हांस लाज कशी वाटत नाही ? कल्याणी व बेदरचे किल्ले केवळ उघड्या मैदानात होते, ते तुम्ही काबीज केले. आमचा प्रदेश अवघड व डोंगराळ आहे त्यातून नदी नाले उतरून जाण्यास वाट नाही. अत्यंत मजबूत असे साठ किल्ले आज माझे तयार आहेत, पैकी काही समुद्रकिनाऱ्यावर आहेत. बिचारा अफझलखान बेसावधपणे जावळीवर फौज घेऊन आला आणि नाहक मृत्युमुखी पडला. इकडचा हा सर्व प्रकार तुम्ही बादशहास का कळवीत नाही ? अमीर-उल उमराव शायिस्ताखान आमच्या या गगनचुंबी डोंगरात व पाताळास पोचणाऱ्या कप्प्यांस तीन वर्षे सारखा खपत होता. मी शिवाजीचा पाडाव करून लवकरच त्याचा प्रदेश काबीज करतो असे बादशहाकडे लिहून थकला. ह्या खोडसाळ वर्तनाचा परिणाम त्याला भोवला. तो परिणाम सूर्यासारखा स्वच्छ सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. आपल्या भूमीचे रक्षण करणे हे माझे कर्तव्य आहे, आणि तुम्ही बादशहाकडे कितीही खोट्या बातम्या लिहून पाठविल्या, तरी मी आपले कर्तव्य बजावण्यास कधी चुकणार नाही." राजांचे पत्र वाचून मोगल सरदार चकित झाले.

राजांनी विजापूर राज्यात शिरून मुलूख काबीज केला. विजापूर सरदारांना खडे चारले. तेव्हा विजापूर दरबारात फारच खळबळ उडाली. विजापुरास महमदशहाची बायको बडी साहेबीण कारभार पहात होती, त्यावेळी दरबारात पुष्कळच बाचाबाची झाली. तेव्हा विजापूर सुलतान अली याने तिजकडून सर्व कारभार आपल्या हाती घेतला. त्यामुळे रूसून अगर अन्य कारणांने ती बाई मक्केच्या यात्रेस निघून गेली.

□□

१ प. सा. सं. १०२८ ; १०२९.

२ सरदेसाई, शककर्ता शिवाजी, पृ. २२१. प. सा. सं. ले. ९९६.

१२. कुडाळवर दुसरी स्वारी व सिंधुदुर्गाचे बांधकाम

राजे राजगडावर असता त्यांना जासुदाने येऊन कळविले की, विजापूर सुलतानाने आपला वजीर खवासखान यास राजांवर रवाना केले. त्याजबरोबर बाजी घोरपडे व खेमसावंतही येत आहेत. खवासखान व घोरपडे आपल्यावर चाल करून येणार ही बातमी राजांना समजताच ते सैन्यासह कुडाळवर चालून गेले.

शायिस्तेखानाच्या पराभवानंतर इ. स. १६६३ मध्ये विजापुरकरांनी मुख्यतः शिवाजीराजांच्या ताब्यात असणारा तळ कोकणातील मुलूख पुन्हा प्राप्त करण्याचा निर्धार करून मोहीम उघडली. आदिलशहाच्या आगमनामुळे सावंत तसेच वेंगुर्ल्यातील डच आणि गोव्यातील पोर्तुगीज वखारवाले भीतीने दचकून गेले. आदिलशहाच्या अतिक्रमणाबद्दलची वार्ता शिवाजीमहाराजांच्या कानी येताच, कोल्हापूर कुडाळ मार्गे ते कोकणकडे निघाले आणि मे, १६६३ मध्ये वेंगुर्ल्यास पोहचले. शिवाजी महाराजांच्या ४,००० स्वारांच्या घोडदळाने आणि १०,००० सैनिकांच्या पायदळाने वेंगुर्ला आणि कुडाळमधील रहिवाशांना भयभीत करून दहशत निर्माण केली.[१] लखम सावंतने वेंगुर्ल्याच्या डचांकडे आपला दूत धाडून वेंगुर्ल्याचे रहिवाशी आणि डच गव्हर्नरने वाडी येथे आश्रम घ्यावा असा प्रस्ताव कळविला. वास्तविक वाडीकरांनी शिवाजीराजांशी इ. स. १६५९ मध्ये दोस्तीचा तह केला होता. पण विजापूरकरांच्या फूस लावणीने वाडीकरांनी पुन्हा राजांना विनाकरण विरोध केला. शिवाजीराजे कोकणात आल्यावर त्यांनी गोवेकरांशी मिळते धोरण राखले. कुडाळ प्रांत हा विजापूरच्या सुलतानाने मेहरबानीने आपल्याला दिला आहे. केवळ त्याचा ताबा आपण घेणार आहोत असे राजियांनी जाहीर केले. त्यावरून आपली स्वारी बिनविरोध पार पाडावी असाच त्यांचा बेत होता. कुडाळ जिंकल्यावर कुडाळचा सुभेदार म्हणून राजियांनी रावजी सोमनाथ पंडित यांची नेमणूक केली. (१६६३ जून)[२]

---

१ डॉ. बाळकृष्ण, शिवाजी भाग २, पृ. ९२

२ बेंद्रे, छत्रपती शिवाजी, पृ. ६९३.

शिवाजीराजांनी कुडाळ हस्तगत करून तिथे आपला सुभेदार नेमला हे कळताच, डचांनी शिवाजी महाराजांकडे आपला दूत पाठवून ह्या नव्या विजयाबद्दल अभिनंदनपर पत्र पाठवले व तसेच मूल्यवान भेटी पाठवल्या. त्यामुळे शिवाजी महाराजांनी वेंगुर्ल्यातील डचांना त्यांच्या स्वातंत्र्याविषयी व व्यापारविषयक निर्बंध काढून टाकण्याविषयी पत्र पाठवले. आदिलशाही सत्तेचा उघड उपमर्द करणारी शिवाजी महाराजांची ही कृती, आदिलशहाला मुळीच सहन झाली नाही. त्याने शिवाजी महाराजांच्या ताब्यातील कुडाळ पुन्हा हस्तगत करण्याचा निश्चय केला आणि आपला सरदार इखलास खान यास शिवाजी महाराजांच्या विरुद्ध लढण्यास जाण्याची आज्ञा दिली. आपला वजीर खवासखान यालादेखील ह्या प्रयत्नात इखलास खानाच्या मदतीकरता जाण्याची आदिलशहाने सूचना केली. मुधोळच्या बाजी घोरपड्यांनाही कुडाळच्या मोहिमेवर कूच करण्याचे फर्मान दिले.[१]

इ. स. १६६४ च्या हिवाळ्यात आदिलशहाच्या योजनांची परिसीमा झाली. शिवाजी महाराजांनीदेखील मोहिमेची संपूर्ण तयारी केली. मुधोळवर अचानक चढाई करून घोरपड्यांना आदिलशहाच्या योजनेतून दूर करावे असा शिवाजी महाराजांनी विचार केला. तेव्हा एक तुंबळ युद्ध झाले ज्यामध्ये बाजी घोरपडे त्यांच्या कित्येक अनुयायांसह जिवानिशी मारले गेले.[२] नंतर शिवाजी महाराजांनी मुधोळ लुटले. त्या पाठोपाठ शिवाजी महाराज विजापूरकरांचा वजीर खवासखानाकडे वळले. त्या दोघांमधील पहिली लढाई ऑक्टोबर, १६६४ मध्ये झाली.[३] पहिल्या चार तासांमध्ये मराठ्यांची सरशी होणार असे दिसून आले. हजरत शाह सिद्दी सखार आणि शेख मिरान हे मातब्बर विजापुरी सरदार त्यात मरण पावले. खवासखान लढायला आल्यामुळे तो दिवस विजापूरकरांनी वाचवला. ४०० सैनिक मारले गेल्यावर आणि १०० जखमी झाल्यावर शिवाजी महाराजांनी युद्धभूमी सोडली. काही विशिष्ट हेतू मनी आणून शिवाजी महाराजांनी माघार घेतली. कुडाळमध्ये खवासखनावर सर्व बाजूंनी एकदम हल्ला

१ सरदेसाई, न्यू हिस्टरी ऑफ मराठाझ, भाग १, पृ. १५१.

२ शिवचरित्र प्रदीप, जेधे शकावली, पृ. २३

३ पिसुर्लेकर, शिवाजी, पृ. १२. पंसा सं. क्र. १०२०.

करण्याची त्यांची योजना होती. लखम सावंताच्या सल्ल्यावरून खवासखान बेसावध राहिला. नेताजी पालकरांनी त्यांच्यावर हल्ला चढविला. यावर खवासखान, लखम सावंत आणि इतर, विजापुरी सरदार स्वतःच्या रक्षणासाठी बालेघाटातील चंद्रगडावर पळून गेले.[१]

कुडाळहून शिवाजीराजे नोव्हेंबर, १६६४त मालवणला आले. तिथे त्यांना मालवणच्या किनाऱ्यापासून सुमारे १ मैल अंतरावर खुरटे बेट दाखविण्यात आले. ते पाहून महाराज बोलले "चौऱ्यांशी बंदरी ऐशी जागा नाही". राजे यांनी २५ नोव्हेंबर १६६४ रोजी ह्या बेटावर आपल्या सागरी किल्ल्याचा पाया घातला.[२] सागरी किल्ला बांधण्याच्या कामात निष्णात कुशल असे १०० कारागीर पोर्तुगिजांकडून सिंधुदुर्ग किल्ला बांधण्यासाठी बोलावून घेण्यात आले. हा महाराजांचा मजबूत किल्ला समुद्रकिनाऱ्यावरील राजधानीसारखाच होता. तटबंदी सभोवार दोन मैल घेराची आणि म्हणून अधिक विस्तृत बांधली. त्याचे तट २९ ते ३० फूट उंच असून सुमारे १२ फूट जाड आहेत. बत्तीस बुरुजांनी तो भक्कम करण्यात आला. त्या किल्ल्याची जागा स्वतः शिवाजी महाराजांनी निवडली होती. असे म्हणतात की, त्याच्या बांधकामात शिवाजी महाराजांनी स्वतःच्या हातांनी भाग घेतला होता. तेथे एका पाषाणावर महाराजांच्या पंजाचे ठसे दाखविलेले आहेत. हा दगड सुरक्षित ठिकाणी ठेवलेला असून त्याला लहानशी दगडी महीरप केलेली आहे.[३]

कोकण जिंकून घेतल्यावर, उत्तरेस जंजिरा व दक्षिणेस गोवा या दोन तटबंदीच्या नाविक स्थळांमुळे राज्यास कशी बळकटी येते हे राजांच्या उत्तम लक्षात आले आणि तशाच प्रकारचे उत्तम नाविक शहर मालवणास निर्माण केले.

किल्ल्याचे बांधकामावर देखरेख करण्यासाठी राजे स्वतः मालवणला महिनाभर राहिले. त्या मुदतीत राजेनी सिद्दीच्या आरमाराचे हल्ले रोखण्यासाठी स्वतःचे आरमार उभारण्याचे उद्योग हाती घेतले. मराठा आरमाराच्या

१ पसासं. क्र. १०२३.

२ चित्रगुप्त बखर. पृ. १३३ व पृ. १३७.

३ मुंबई रेकॉर्डस् पो. डि. डायरी नं. ३८६/१८१२.

सामर्थ्यांची भिस्त गलिवट, गुराब आणि गलबते यावर होती. किल्ला बांधल्यावर राजियांचा तीन मोठी गलबते, पंच्याऐंशी लहान गलबतांचा ताफा समुद्रात दिसू लागला. ह्या आरमारी ताफ्यासह दिनांक ८ फेब्रुवारी १६६५ रोजी राजे मालवण येथून बसनूरच्या स्वारीवर निघाले. वाटेत गोव्यालादेखील त्यांना कोणी विरोध केला नाही. भटकळच्या दक्षिणेस बेदनूर येथपर्यंत मजल मारून राजांनी तेथील लूट धीमेपणे गोळा केली.[१] ती गलबतात चढविण्याचे हुकूम देऊन राजे तिथून गोकर्ण अंकोल्यास गेले.[२] तेथून राजेनी सर्व आरमार स्वदेशी पाठवून दिले व स्वतः फौज घेऊन किनाऱ्या किनाऱ्याने चालले. नद्या उतरून जाण्यासाठी फक्त १२ तरांडी (२ गलबते) त्यांनी आपल्याबरोबर ठेविली. राजांच्या हा दौरा बिनविरोध झाला. तारीख २२ फेब्रुवारी १६६५ रोजी आपल्या ३५व्या वाढदिवशी राजे कारवारला होते.[३] ते शहर लुटावयाचा मानस होता, हे विजापूरकरांचा ह्या भागातील सुभेदार शेरखान याने जाणून चतुराईने त्या भागातील सर्व व्यापाऱ्याना एकत्र जमविले आणि त्यांच्याकडून राजांना नजराणा देवविला.[३] यामुळे राजे तेथे दोन दिवस राहून तेथून भीमगडाकडे गेले[४]. भीमगड खानापूरच्या नैऋत्येस आठ कोसांवर. तेथे काही काळ मुक्काम करून ते राजगडास जावयास निघाले व ते मार्च १६६५च्या प्रारंभी राजगडावर आले.[५] राजगडावर आल्यावर त्यांना आपला वयोवृद्ध मंत्री सोनोपंत डबीर निवर्तल्याचे समजले.[६] पंत हुशार वकील, मुत्सद्दी, सल्लागार, निष्ठावंत सरदार होते. ते स्वराज्याच्या उद्योगात प्रथमपासूनच महाराजांना सामील होते.

□□

१ चिटणीस बखर, पृ. १४२-१४६.

२ बेंद्रे, शिवाजी महाराज, पृ. ३९२.

३ प. सं. सं. क्र. १०४४.

४ काळे, छत्रपती शिवाजी महाराज, पृ. १२२.

५ सभासद, श्री शिवप्रभुचरित्र, पृ. ७०.

६ शकावली, शि.च. प्र. बेंद्रे, शिवाजी, पृ. १०७५.

१३. राजा जयसिंगाची शिवाजीराजांवर स्वारी

विजापूर राज्यातील शहाजी राजांची पुण्याची छोटीशी जहागीर वहिवाटीसाठी शिवाजीराजांस मिळालेली. त्यातूनच अविश्रान्त परिश्रमाने शिवाजीराजांनी स्वतंत्र आणि प्रबळ असे राज्य स्थापन केले. ह्या वेळपर्यंत औरंगजेबाने शिवाजी राजांच्या विरुद्ध शायिस्ताखान, जसवंतसिंग यांना पाठविले. दक्षिणेचा सुभेदार मुअज्जम यालाही राजांचे पारिपत्य करण्यास फर्माविले. वरील तिघांना राजे पुरून उरले. तेव्हा औरंगजेबाची झोप उडाली. त्याने मिर्झाराजा जयसिंग यास शिवाजीराजांवर चालून जाण्याचे हुकूम सोडले, त्याने हाताखाली पठाण सरदार दिलेरखान यास दिले दुसऱ्या अनेक सरदारांना मिर्झाराजांच्या मदतीस औरंगजेबाने दिले (ता. ३० सप्टेंबर १६६४) ते सर्व सरदार स्वारीची तयारी करू लागले. औरंगजेबाने आपल्या सत्तेच्या आठव्या वाढदिवसाचे दिवशी (ता. २९ ऑक्टोबर १६६४) दाऊद खान कुरेशी, राणा रायसिंह, सिसोदिया, इहतशामखान, शेखझादा, कुबादखान, सुजनसिंह, बुंदेला, झबरदस्तखान, बादिलबख्तियार बर्कंदाझखान, मुल्ला याहिया नवायत, राजा नरसिंह गौड, पूरणमल बुंदेला, करितसिंह कछवाह (मिर्झा राजांचा धाकटा मुलगा) आणि खुद्द दिलेरखान या सर्वांस मिर्झाराजांच्या लष्करात सामील होण्यासाठी हुकूम सोडले. मिर्झाराजे दक्षिण स्वारीवर कूच करण्यासाठी डेरेदाखल झाल्यावर त्यांच्याकडे वर सांगितलेले सरदार आपल्या फौजेनिशी हजर झाले. मिर्झाराजांनी आपल्या तोफखान्याकरता मुख्य दरोगा निकोलाओ मनुची हा इटलीचा रहिवाशी यास घेतले. ह्याच मनुचीने आपली डायरी लिहिलेली आहे. असे नामवंत सरदार व त्यांच्या फौजा तसेच तोफखानाबरोबर घेऊन मिर्झाराजा जयसिंग उत्तरेतून निघाला.

राजा जयसिंगास पराजय कधी ठाऊक नव्हता. मोगल फौजेत त्याचा मान शहाजाद्यांच्या बरोबरीचा होता. युद्धकौशल्यापेक्षा मुत्सद्देगिरीबद्दल त्यांची विशेष ख्याती होती. हा ६० वर्षांचा वृद्ध, आणि अनुभवी सरदार, हाताखालील सैन्यासह, बादशहाच्या आज्ञेनुसार निघाला. त्याने दिनांक ९ जानेवारी, १६६५ रोजी नर्मदा ओलांडली, १९ तारखेस त्याने बऱ्हाणपुरास मुक्काम केला. तेथे तो फौजेची व सामानाची नीट व्यवस्था करण्यासाठी

दिनांक ३० जानेवारीपर्यंत राहिला. तिथून निघून औरंगाबादला दिनांक १० फेब्रुवारी रोजी मुक्काम केला. दख्खनचा सुभेदार शहाजादा मुहम्मद मुअज्जम याची भेट घेतली व चार दिवस तिथे राहून त्याने दि. १३ रोजी औरंगाबाद सोडले व ३ मार्च १६६५ रोजी पुण्यास पोचला. तेथे जसवंतसिंगाकडून सर्व कामाचा हवाला त्याने स्वतःकडे सोपवून घेतला आणि ७ मार्च रोजी जसवंतसिंग पुणे सोडून परत दिल्लीस गेला. १३ रोजी बादशहास भेटला.[१]

मिर्झाराजे जयसिंग दक्षिणेत आपल्यावर स्वारी करण्यास मोठ्या फौजेनिशी येत आहे, ही बातमी शिवाजीराजांस त्यांचा मुक्काम कारवारला असता जानेवारी १६६५ मध्ये समजली.

जयसिंग पुण्यास आल्यावर त्याने शिवाजीराजांस विजापूरचा आश्रय मिळू नये म्हणून दोहोंच्या दरम्यान आपला तळ दिला. पुण्यास येण्यापूर्वीच जयसिंगाने आदिलशाही सरदार, कुत्बाशहा, पोर्तुगीज व डच, तसेच रामनगर, पेंट व चोथियाराजे यांजकडून शिवाजीराजांविरुद्ध उठावाची अभिवचने मिळवली होती. तसेच शिवाण्या नायक व बसवापट्टणचा नायक हे एप्रिल १६६५ त जयसिंगाच्या भुलवणीवरून मोगलांच्या नोकरीत शिरण्यासाठी आले होते. जावळीचे मोरे व त्यांचा भाऊ अंबाजी गोविंदराव मोरे वगैरे जे सरदार शिवाजीराजे यांच्या विरुद्ध होते त्याजकडे जयसिंगाने मोगलास सामील होण्यासाठी दूत पाठविले.[२] अफझलखानाचा मुलगा फाझलखान व बिदनूरचा नायक हेही जयसिंगास येऊन मिळाले. तो औरंगजेबास जून १६६५ च्या पत्रात लिहितो की मी खेळोजी भोसल्यांकडून पाचशे लोक जावळीहून बोलविले व राजे शिवाजीचे सैन्य कसे फोडावे याचेच माझे प्रयत्न चालू आहेत.[३] पुरंदरचे जमीनदार आत्माजी व कहार कोळी हे दोघे बंधू त्यांच्या तीन हजार स्वारांसह जयसिंगाने फोडून आपल्या नोकरीत घेतले होते. सुप्याचे राम व हनुमंत यांना या प्रदेशाची चांगली माहिती होती म्हणून त्यांनाही नोकरीत घेतले होते.[४] प्रत्यक्ष शिवाजी राजे यांच्या फौजेतील सरदारास लाच वगैरे देऊन त्यांस आपल्याकडे वळविण्याचा त्यांनी भरपूर प्रयत्न केला. बादशहाकडून त्याने दक्षिण सुभेदाराकडील सर्वाधिकार मागून घेतले. अहमदनगर, परिंडा वगैरे ठिकाणच्या लष्करास जयसिंगाच्या हाताखाली काम करण्याचा हुकूम बादशहाने पाठविला.

१ मासिर इ. आलमगिरी प्र. ७, पृ. ३२.

२ मॉडर्न रिव्ह्यू, जयसिंगाची पत्रे भाग २, पृ.४.

३ राजा जयसिंगाचे पत्र, जून १६६५, मॉडर्न रिव्ह्यू.

४ बेंद्रे, श्री छत्रपती शिवाजी महाराज, पृ. ४८२.

फौजेचा पगारसुद्धा जयसिंह स्वतः आपलेजवळ खजिना ठेवून वाटीत असे. त्यांत हिशेबी खात्याकडून त्यास अडथळा न व्हावा अशी तजवीज बादशहाने करून दिली.

पुण्यास तळ दिल्यावर जयसिंग व दिलेरखान यांच्यात मतभेदास प्रारंभ झाला. मिर्झाराजाचे मत होते की, आपण प्रथम शिवाजीचा मोकळा मुलूख काबीज करावा. त्यांच्या डोंगरी किल्यावर अन्न, धान्य, दारूगोळा वगैरे रसद जाणे बंद पाडावे म्हणजे मग डोंगरी किल्लेही आपोआप शरण येतील. आपण डोंगरी किल्ले हल्ले चढवून जिंकून घेण्याच्या नादी लागलो तर यश येणे महा कठीण आहे. यावर दिलेरखानाचे म्हणणे असे होते की, शिवाजीराजे यांचे सर्व बळ त्यांच्या डोंगरी किल्ल्यातच आहे. आपण त्यांचे किल्लेच जिंकू. जयसिंगाने दिलेरखानाच्या विचारास अखेर संमती दिली. आणि किल्ल्यांना वेढे घालण्याचा बेत मुक्रर केला. पहिला किल्ला निवडला पुरंदर.

त्याअगोदर कोकण किनाऱ्यावर शिवाजी राजांचा पराभव करण्याचा व्यूह त्याने रचला. सिद्दीला चिथावणी दिली व टोपीकरांस आपल्या मदतीस बोलविले.

पुण्यास आल्यावर जयसिंगाने आपल्या मनाशी एक मुत्सद्दी कावा शिवरायांस सांगण्यासाठी ठरविला की, "तुम्ही बादशहास शरण याल तर तुमचे सर्व प्रकारे कल्याण होऊन वैभव वाढेल. आमच्या मध्यस्थीने तुमची बादशहाची भेट होईल. मी म्हणतो यास परमेश्वर साक्ष आहे."[१] दिलेरखानास मात्र जयसिंगाचे हे धोरण आवडले नाही. स्वराज्याच्या सर्व भागात आपल्या फौजा जयसिंगाने सर्वत्र पाठविल्या.

पुरंदरावर मोहीम :

जयसिंग व दिलेरखान यांनी ठरविल्याप्रमाणे ते पुरंदर किल्ल्यास वेढा घालण्यासाठी पुण्याहून दिनांक १५ मार्च १६६५ रोजी निघाले. बरोबर अफाट फौज, तोफखाना व सामान, सरंजाम होता. ते राजेवाडीच्या जवळपास दिनांक ३० मार्चला पोचले. तेथून जयसिंगाने दिलेरखानास सासवडला रवाना केले. सासवड मुक्कामी त्याजवर मराठी फौजेचा अचानक छापा पडला. गडबड उडाली पण खान आपली फौज घेऊन दौडत सुटला. त्याने पुरंदरचा पायथा गाठला व गडाच्या पायथ्याशी तळ ठोकला (३१ मार्च १६६५) जयसिंगास ही बातमी समजताच त्याने

१ सरदेसाई, शककर्ता शिवाजी, पृ. २३२.

दिलेरखानास मोगली फौजेची कुमक रवाना केली. पुरंदर व वज्रगड या दोन्ही किल्ल्यास वेढा घालण्यास फर्माविले. पुरंदरच्या पायथ्याशी आल्या आल्याच दिलेरखानाने गडावर हल्ला चढविला. गडावर मोगलाची फौज चालून आल्यावर किल्ल्यातील मराठ्यांनी हुशार राहून ह्या आपत्तीस तोंड देण्यासाठी ते सज्ज झाले. गडाच्या पायथ्यापासून नारायण पेठपर्यंत मोगली अफाट फौजेच्या चहूकडे राहुट्या, तंबू आणि शामियाने वरून दिसत होते.

पुरंदरगड समुद्रसपाटीपासून ४५६४ फूट आणि पायथ्यापासून २५०० फूट उंच बालेकिल्ला. दुसरा भाग माची. याची उंची पायथ्यापासून २१०० फूट, बाले किल्ल्याला बळकट तटबंदी होती आणि मुख्य दरवाजा होता. तोच सर दरवाजा. गडाची राखणदारी करणारे प्रसिद्ध लढवय्ये रामोशी होते आणि किल्लेदार होता प्रसिद्ध लढवय्या मुरारबाजी.

पुरंदरचा वेढा चालू असताना जयसिंगाने मोगल सैन्याच्या लहान मोठ्या फौजा रोहिडा, राजगड, तुंग, तिकोना ह्या किल्ल्याकडे पाठविल्या. त्या आसपासच्या मुलुखात स्वाऱ्या, जाळपोळ व लुटालूट करू लागल्या.[१]

मुरारबाजीचा अद्‌भूत पराक्रम (एप्रिल १६६५) :

मुरारबाजी आदिलशहाच्या तर्फेने चंद्रराव मोरे यांजकडे नोकरीस होता. शिवाजीराजांनी चंद्रराव मोरे यांजवर स्वारी केली तेव्हा मुरारराव चंद्ररावांच्या बाजूने शिवाजीराजांच्या फौजेबरोबर मोठ्या निकराने लढला. त्या लढाईत राजे यांना मुरारबाजीचा पराक्रम व लढण्याचे कौशल्य दिसून आले. मोऱ्यांचा पराभव होऊन त्याची मुले माणसे राजियांच्या हाती पडली. तेव्हा राजियांनी मोऱ्यास कळविले की, " मुरारबाजीस आमचे नोकरीत द्याल, तर तुमचा जीव वाचवितो " मोरे ह्या अटीस कबूल झाले आणि अद्‌भुत पराक्रमी मुरारबाजी राजियांच्या सेवेत आपल्या भावांसह रुजू झाला. राजे यांनी त्यास पुरंदरची किल्लेदारी दिली.

अशा ह्या शूर किल्लेदारासमोर दिलेरखानाच्या रूपाने मोठे संकट उभे राहिले. मोगली तोफखान्याने आगीच्या वर्षावाला सुरुवात केली. किल्ल्यात कित्येक चोरवाटांनी अन्नसामग्रीचा पुरवठा होत होता. पुरंदरच्या किल्ल्याचे वरचा कोट व खालचा कोट असे दोन भाग होते. दोहोतही दारूगोळा भरपूर होता. मोगलांनी लगट करून शिकस्तीने खालचा कोट काबीज केला तेव्हा त्यावर मराठ्यांनी गोळ्यांचा वर्षाव केला. त्यावेळी मोगल

१ बेंद्रे, छत्रपती शिवाजी, पृ. ४९३.

व मराठे यांची निकराची लढाई झाली. पण मराठ्यांना हार खावी लागली. खालचा गड म्हणजे वज्रगड, यावर मोगली निशाण चढले.[१] दिलेरखानाने वज्रगडावर दारूगोळा चढविला. पुरंदरची लढाई जास्तच जोमाने चालू केली. दिलेरखानाने मोर्चाची आघाडी गडाच्या माचीजवळ पोचविली होती. उंच माळ्यावर दोरखंडांनी दिलेरखानाने तोफा वर चढविल्या आणि तोफा सुरू केल्या तेव्हा मराठ्यांनीही तोफा डागल्या आणि बंदुकांचा मारा सुरू केला. दोहीकडून भयंकर आगीच्या ठिणग्या उडू लागल्या. घनघोर संग्राम सुरू झाला. बाले किल्ल्यावर मोगली सैन्याने दिलेरखानासह चढण्याचा प्रयत्न केला. मुरारबाजीच्या बेफाम सैनिकांनी त्याजवर एकदम झडप घातली आणि मोगल सैन्याची दाणादाण उडविली. मराठ्यांच्या व मुरारबाजीच्या पराक्रमामुळे मोगल सैन्याचा टिकाव लागला नाही. दिलेरखानासह त्यांनी आपल्या छावणीचा आश्रय घेतला. भडकलेले मराठे दिलेरखानाच्या छावणीवर धावून गेले व बेडरपणे शत्रुशी लढू लागले. मुरारबाजीचा सारा रोख दिलेरखानाकडे होता. तो खानावरच रोखून चाल करीत चालला होता. मुरारबाजीचे अद्वितीय शौर्य पाहून त्याची बहादुरी पाहून खान दिपला. त्याने ओरडून मुरारबाजीला थांबविले व तो म्हणाला, " मुरारबाजी तू मोगलांना सामील हो, तुझ्या शौर्याचे आम्ही चीज करू, तूला मोठी जहागिर मिळेल " तेव्हा मुरारबाजी त्वेषाने म्हणाला, " शिवाजी महाराजांच्या चाकरीपुढे मोगलांची जहागीर मी कस्पटासमान मानतो. आमच्या हातून स्वामीद्रोह होणे शक्य नाही. प्राण गेला तरी इमान सोडणार नाही."

मुरारबाजीने पराक्रमाची शर्थ केली. दुर्दैवाने खानाच्या बाणाला मुरारजी बळी पडला.[२] आपला नायक पडला म्हणून मराठे वीर डरले नाहीत. मुरारजीचा मृतदेह मुसलमानाचे हाती लागू न देता त्याचे तुकडे जमवून रायगडास पाठविले. शिवाजीराजेना ही बातमी कळताच त्यांना अति दुःख झाले.

नेता पडला तरी मराठे वीरांनी पुरंदर किल्ला सोडला नाही. पुरंदरचे वरचे टोकावर तोफांचा मारा लागू होईना म्हणून दिलेरखानाने रुद्रमाळाच्या

१ जदुनाथ सरकार, शिवाजी अँण्ड हिज टाइम्स, ४थी आवृत्ती, पृ. ११३.

२ सभासद ४१. एक्क्याण्णव कलमी बखर, कलम ५१.

किल्ल्यास वेढा घातला. ह्या किल्ल्याच्या बंदोबस्तास बाबाजी बोवाजी व यशवंतराव बोवाजी हे दोघे प्रभू बंधू होते. त्यांनी तुटपुंज्या लष्करासह मोगलांशी पुष्कळ वेळ चांगलाच टिकाव धरला. पण हातघाईच्या लढाईत वरील दोन प्रभू सरदार पडले आणि दि. १४ एप्रिल १६६५ रोजी किल्ला मोगलांस मिळाला.[१]

रुद्रमाळावर तोफा चढवून पुरंदर काबीज करण्याच्या उद्योगास दिलेरखान लागला. पुरंदरावर राजियांचे मोठमोठे सरदार कुटुंबासह होते. किल्ला पडल्यास त्यांचा शेवट भलताच झाला असता. जयसिंगाने चारी बाजूंनी अशी पकड घातली की राजियांस तह करण्याखेरीज दुसरा मार्ग उरला नाही.

प्रत्येक किल्ला लढवून आत्मनाश करून घेणे किंवा तात्पुरती गम खाऊन आलेली वेळ निभावून नेऊन पुन्हा योग्य संधी येताच उठाव करणे एवढे दोनच मार्ग राजांपुढे होते. शिवाजीराजांनी दूरदर्शीपणाने दुसरा मार्ग पत्करला. इथे राजे खालील सुभाषितांत सांगितल्याप्रमाणे वागले:—

सर्वनाशे समुत्पन्ने अर्धंत्यजति पंडितः।

आपण भेटीला तयार असल्याचा निरोप राजियांनी जयसिंगाकडे पाठविला. निरोप म्हणजे थैलीतून पाठविलेले पत्र. जयसिंगाने ते पत्र वाचून राजांना जळजळीत शब्दांत उत्तर लिहिले. त्याचा आशय असा : बादशाही फौज तुमचा पाडाव करण्यासाठी आलेली आहे. तेव्हा सर्वनाश टाळायचा असेल तर शरण या. शिवाजीराजांनी शेवटी जयसिंगाबरोबर तह करण्याचे ठरविले आणि तहासाठी आपला वकील रघुनाथ पंडित यास जयसिंगाकडे रवाना केले.

जयसिंगाने रघुनाथ पंडितांची भेट घेतली. राजियांनी दिलेले पत्र वाचले आणि तो बोलिलाजे, "दिल्लीचा पादशाह बहुत जोरावर, याशी शत्रूत्व लावलियाने शेवट लागणार नाही. राजियांनी आपले भेटीस यावे. आपण बरोबर घेऊन जाऊन पादशाहीची भेट करवू. जैसा रामसिंग आपला पुत्र, तैसे तुम्ही आपले आहात. आम्ही तुमचे वाईट करणार नाही. भेटीस येणे." रघुनाथपंत मिर्झा राजा जयसिंगाचे पत्र घेऊन राजियांकडे राजगडावर आले. राजियांनी जयसिंगाचे पत्र वाचून पुन्हा लिहिले की मी चार कोट पातशाहीत

---

१ जेधे शकावली, पृ. ३६.

देऊन त्याज बरोबर माझा मुलगा संभाजी याला आपल्या (मोगलीसेवेत) सेवेत ठेवण्याकरिता पाठविण्यास तयार आहे. हेही जयसिंगास रुचले नाही. त्याने राजियांना स्पष्ट नकार दिला व कळवले की, औरंगजेब पातशहानी कुल मराठी दैवत बुडवावयास फौज धाडली. मग बादशहा केवळ चार गडकोट घेऊन कसा संतुष्ट होतो, हे होणे नाही. राजियांनी हे नकारात्मक पत्र वाचून ठरविले की आपण जयसिंगाच्या भेटीस जातीने जावे, व त्याप्रमाणे जयसिंगास लिहिले की, "आमच्या जीवितास अपाय होणार नाही असे जर आपण आम्हांस वचन देत असाल तर आपल्यावर विश्वास ठेवून आम्ही आपल्या भेटीस निःशंकपणे येतो" हे वाचून जयसिंग आनंदला. त्याने अभयाचे वचन म्हणून देवावरील तुळशी व बेल राजियांस देण्यासाठी पंतांच्या हातात दिला. राजियासाठी व पंतांसाठी वस्त्रे दिली. ती घेऊन फिरून राजगडास राजियांशी ९ जून, १६६५ रोजी पोचले.[१] इकडे दिलेरखानाने पुरंदर जिंकून घेऊन बादशहापाशी आपला पराक्रम रुजू करावा, शाबासकी मिळवावी हा हेतू मनात बाळगून पुरंदरवर जास्त लगट केली. परंतु पुरंदरवरील मराठे भयंकर चिवटपणाने मोगल फौजेवर किल्यावरून दगड धोंड्याचा वर्षाव करीत होते, किल्ला भांडत ठेविला होता. ह्या भांडणात गडावरचे ६० गडी ठार झाले. इतक्यात तहाची बोलणी झाल्याची बातमी गडावरील मराठ्यांस समजली.

ह्या तहाची पूर्वतयारी पंडितरावांनी केली होती. शिवाजीराजे तहाची बोलणी करण्यास आपल्याकडे येत आहेत ही खबर कळताच जयसिंग देवडी बाहेर पायऱ्या उतरावयास आला. राजे पालखीतून उतरून भेटले. उभयतां जाऊन एकासनी बैसले, आणि राजे मिर्झाराजांशी बोलले, आपण जैसा रामसिंग तैसेच, आम्ही तुम्हास, त्याचे रक्षण करता तैसे आमचे करणे. मग जयसिंग बोलला की, "तुम्ही व आम्ही एक जाती आहोत. अगोदर आपले शीर जाईल, मग तुम्हांस काय होणे ते होईल. असा भरवसा बोलून शपथ वाहिली. मग राजे बोलेले, तुम्हास जे गड पाहिजेत ते आपण देतो. दिलेरखानास बोलावून आणणे. पुरंदर तुम्हास देतो. निशाण तुमचे चढवितो. त्यावर जयसिंगाने राजियांस आपला शूरवीर मामा सुभानसिंग यास बरोबर देऊन दिलेरखानाच्या भेटीस पाठविले. भेटी

---

१ सभासद बखर, प. ४८.

झाल्यावर सुभानसिंगाने खानास मिर्झाराजेंचा निरोप सांगितला. तो असा, "खानाजी तुम्हाकडे राजे आले आता तुम्हास जे गड पाहिजेत ते देऊ तुम्ही उतरून गोटास येणे, असा मिर्झाराजियांचा हुकूम आहे. किल्ला आपल्या ताब्यात आला तुम्ही चला" असे सुभानसिंग बोलला. खान ह्यावर बहुत कष्टी झाला. शिवाजीराजांचा पराक्रम पाहून जयसिंग तहास कबूल झाला.

पुरंदरचा तह :

खानाची आणि महाराजांची भेट मिर्झाराजाने घडवून आणली. खानाला जयसिंगाच्या हुकुमाप्रमाणे पुरंदरचा वेढा उठवावा लागला.

जयसिंग राजियांशी गोड बोलला. स्नेहाने वागला. पण तहाची कलमे ठरविताना बादशहाच्या कडक हुकुमांची अंमलबजावणी त्याला करावीच लागली. शिवाजीराजे यांना कोणतीही सवलत न देण्याचा बादशहाचा सक्त हुकूम होता.

शिवाजीराजांनी जयसिंगाच्या बोलण्याचा रोख ओळखला आणि शरण जाण्यातच आपले हित आहे हे लक्षात घेऊन राजे म्हणाले, "स्वतःला आपला मुलगा समजतो, मी बिनधोकपणे बादशहापाशी जाईन. आपल्यामार्फत मी आतापर्यंत केलेल्या अपराधांची क्षमा बादशहाकडून घेईन आणि कंधाहारच्या मोहिमेसारखे काम मी हाती घेईन. माझ्या ताब्यात आलेले चोवीस किल्ले मी बादशहास देईन. आपण आपला पितृतुल्य हात माझ्या मस्तकावर ठेवावा." मिर्झा राजा जयसिंग यास असा प्रसंग म्हणजे परमेश्वराची कृपाच वाटली. त्याने शिवाजीराजास आपल्या मुलाप्रमाणे मानण्याचे कबूल केले. जयसिंगाने विजयाचे चौघडे वाजविण्याची आज्ञा केली. शिवाजीराजे यांनी त्याच दिवशी म्हणजे १२ जून १६६५ रोजी पुरंदर किल्ला मोगलांचे स्वाधीन केला.[१]

शिवाजीराजे यांस औरंगजेबाचे भेटीस पाठविण्याची कल्पना जयसिंगाची औरंगजेबाने कोणत्याही पत्रात सूचना किंवा इच्छा प्रकट केली नव्हती.

जयसिंगाने राजांकडे निरोप पाठविला की तह पाहिजे असेल तर राजांनी सर्वच्या सर्व किल्ले सोडावे आणि मोगलांची ताबेदारी पत्करून राहावे. यावर राजांनी जयसिंगास विनंती केली की, हा प्रश्न वाटाघाटीने सोडवावा.

१ म. सा. छो. ब., पृ. ३०. शिवदिवि. पृ. २३८-२३९. एकब.क ४९-५१.

जयसिंगाने आपला हेका न चालविता तो राजांशी वाटाघाटी करण्यास तयार झाला. यालासुद्धा कारणे होती. ती जयसिंगाने बादशहास पूर्वीच कळवून त्याची संमती वाटाघाटीला आणविली होती. ती कारणे अशी :—

(१) जयसिंगाने मोगल फौजेच्या जोरावर जास्त ताणून धरले असते तर मोगलांच्या विरुद्ध शिवाजीराजांना मदत करण्यास आदिलशहाच्या फौजा सिद्ध होत्या. तसे झाले असते तर जयसिंगास थोड्या अवधीत विजयश्री मिळविणे कठीण झाले असते. युद्ध विनाकारण रेंगाळून खर्च फार वाढला असता.

(२) युद्ध रेंगाळले असते तर शिवाजीराजांनी अफझल प्रसंगाच्या वेळेसारखे वाटेल ते साहस करून निधड्या छातीने मोगल सैन्यास तोंड दिले असते, नव्हे अशा प्रकारचा बेत राजियांनी केल्याची बातमी जयसिंगास समजली होती.

(३) पावसाळा जवळ आला होता. एकदा पाऊस सुरू झाला असता, तर उत्तर हिंदुस्तानी पोषाखात डामडौल मिरवणाऱ्या मोगल फौजेचे फारच हाल झाले असते. हे लक्षात घेऊन शिवाजीराजे जयसिंगासबरोबर तहाच्या वाटाघाटी करण्यास बसले. दिनांक १३ जून १६६५ रोजी तहाचा पक्का मसुदा तयार झाला. त्यांत एकंदर पाच कलमे होती ती खालीलप्रमाणे :—

कलम १ : शिवाजीराजे यांनी केवळ बादशाही कृपेचा प्रसाद म्हणून १२ किल्ले व त्याखाली एक लाखाचा होनाचा मुलूख स्वतःकडे ठेवावा.

कलम २ : दख्खनच्या सुभेदाराच्या आज्ञेत राहून त्याच्या हुकुमाप्रमाणे कामगिऱ्या पार पाडाव्यात.

कलम ३ : शिवपुत्र संभाजी यांना बादशहाकडून पाच हजार स्वारांची मनसब मिळेल. पण संभाजी राजे लहान असल्यामुळे त्यांचा प्रतिनिधी म्हणून नेताजी पालकर याने दख्खनच्या सुभेदारापाशी चाकरीस रहावे.

कलम ४ : विजापूरकरांच्या अंमलाखालील तळ कोकणचा व बालेघाटावरचा मुलूख जिंकून घेतल्यावर तो शिवाजीराजांच्या ताब्यात ठेवण्यास बादशहाची मंजुरी आहे. त्याबद्दल शिवाजीराजांनी तीन लाख होनाच्या हप्त्याने एकूण चाळीस लाख होनांची पेशकश बादशहास द्यावी.

कलम ५ : पुरंदर, रुद्रमाळ, कोंढाणा, खंडागळा, लोहगड, तुंगतिकोना, रोहिडा, नरदुर्ग, माहुली, बंडारदुर्ग, पळसखोल, खपगड, बक्षगड, मोरबखन, माणिकगड, सरुपगड, साकरगड, मरकगड, अंकोला, सोनगड व माणगड हे तेवीस किल्ले व त्यास लागून असलेला चार लाख होनांचा मुलूख शिवाजीराजांनी मोगलांच्या स्वाधीन करावा.

ह्या तहावर सह्या झाल्यावर तो तह जयसिंगाने बादशहाकडे पाठवून दिला. आदिलशाहीशी कराव्या लागणाऱ्या युद्धात शिवाजी राजांचा पुढे उपयोग होणार हे जाणून जयसिंगाने राजांच्या भावना मोठ्या दूरदर्शीपणाने सांभाळल्या. चोवीस किल्ल्यांच्या किल्ल्या राजियांनी मिर्झाराजांस दिल्या. मोगलांचे किल्लेदार ठिकठिकाणी नेमण्यात आले. मिर्झाराजांनी किल्ले घेतल्याचे बादशहास लिहून पाठविले. त्यासोबत शिवाजीराजांची अर्जिही पाठविण्यात आली.[१]

तहाच्या अटींचा खलिता औरंगजेबास मिळाल्यावर त्याने तहास आपली मंजुरी पाठविली. राजियांसाठी भरजरी पोषाख व जडावाची कट्यार पाठविली. संभाजीराजांना पाच हजाराची सरदारी, दोन लाख रुपये रोख बक्षीस व निशाण नौबतीचा मान देण्यात आला. जड अंतःकरणाने राजियांनी संभाजीराजांना मोगल छावणीत जाण्यास निरोप दिला. शिवाजीराजांनी ह्या युक्तीने नोकरीच्या अटीतून आपली सुटका करून घेतली. नोकरीच्या खर्चाची जहागीर त्यांनी आपला मुलगा संभाजीराजे यांचे नावे घेतली. असे करण्यात आपला स्वाभिमान राखावा व राजकारणाचे डाव खेळण्यास आपण मोकळे राहावे असे शिवाजीराजांचे धोरण असावे.

□□

---

१ मासिर इ-आलमगिरी पृ. ३३.
मिर्झा राजा जयसिंगाने शिवाजी राजियाशी केलेल्या तहाची माहिती औरंगजेब बादशहास पत्राने कळविली. हफत अंजुमान पृ. १३-१४, प. सा. सं. क्र. ३. १०७७.

१४. राजा जयसिंगाबरोबर शिवाजी राजांची आदिलशाहीवर स्वारी

विजापूरवर हल्ला :

बादशहाने जयसिंग यास आज्ञा केली की, पुरंदर फत्ते झाल्यानंतर तुम्ही विजापूराकडे रवाना होऊन त्या शहरास वेढा घालावा आणि विजापूर जिंकून घ्यावे. पुरंदरच्या तहाने शिवाजीराजे मोगलांचे केवळ जहागीरदार बनले. संभाजीला पाच हजारांची मनसब, दोन लाख रुपये बक्षीस, निशाण व नौबत घेण्याची परवानगी मिळाली. पण संभाजीराजाना जहागीर मिळायची होती. मोगलांच्या छावणीत संभाजी १८ जूनला येऊन दाखल झाला. नंतर शिवाजीराजे जयसिंगास म्हणाले "बादशहाकडून अर्जाचे उत्तर येईपर्यंत एवढे मोठे सैन्य घेऊन स्वस्थ बसून राहण्यात काय अर्थ आहे आपण जर विजापूरवर मोहीम यशस्वी केली तर आपणा दोघांच्या सेवेचे सार्थक होईल"[१]. शिवाजी महाराजांनी मुत्सद्देगिरी कशी केली त्याचा हा नमुना आहे. जयसिंगास हे पटले आणि त्याप्रमाणे त्याने आपल्या सैन्याची तयारी केली. जयसिंगाजवळ १५ हजार सैन्य होते त्यावर जयसिंगाने नगद व जिनसा या रूपाने एक कोटी रुपये सर्वांवर खर्च केले. त्यांच्या बक्षिसी आणि देणग्या यांनी सैन्य कृतार्थ झाले. ठरल्याप्रमाणे जयसिंगाने शिवाजीराजांसह विजापुरावर आपला मोर्चा वळविला.[२]

विजापूरचा सरदार सय्यद इलियास ऊर्फ शर्जाखान हा ऐंशी हजार सैन्य घेऊन विजापुराबाहेर पडला आणि मोगलांवर चालून गेला. निकराचे युद्ध झाले (डिसेंबर १६६५) त्यांत शर्जाखान गोळी लागून मृत्यू पावला. मोगलांची सैन्ये विजापूरपासून पाच कोसांवर मारवान या गावी पोहोचली

१ खोबरेकर, तारीख-इ-दिलकशा, पृ. ४६.

२ जेधे शकावली, पृ. ३४.

(२९ डिसें.) विजापूरकरांच्या धाडसी आक्रमणामुळे कार्य चालू ठेवणे कठीण झाले.[१] अशा स्थितीत विजापूरला वेढा घालून तो यशस्वी करणे त्याला अशक्य वाटले. शिवाजीराजांनी त्यावर उपाय सुचविला. विजापूरच्या सैन्यात फाटाफूट करवी व दंगल घडवून आणावी. ही राजांची योजना जयसिंगाने आनंदाने मान्य केली. या योजनेप्रमाणे डिसेंबर-जानेवारी १६६६ मध्ये शिवाजीराजांनी विजापूरकरांच्या ताब्यातील पन्हाळगडावर हल्ला चढविण्यास हुकूम दिला.

पन्हाळ्याकडे जाताना शिवाजीराजांनी फौजेच्या दोन तुकड्या केल्या. एका तुकडीचे नेतृत्व आपल्याकडे घेतले आणि दुसरी तुकडी नेताजी पालकरांच्या स्वाधीन करून त्यास त्या दिवसापासून पाचव्या दिवशी पन्हाळ्याच्या पायथ्याशी येऊन आम्हास मिळावे म्हणजे आपण दोघे मिळून पन्हाळ्यावर हल्ला करू. ठरल्याप्रमाणे राजे विजापूरकरांचा मुलूख बेचिराख करीत पाचव्या दिवशी रात्री पन्हाळ्याला पोहोचले. पण नेताजींचा पत्ता नव्हता. राजांनी आपल्या जवळील दोन हजार फौजेनिशी पन्हाळगडावर चढाई सुरू केली. राजांचे सैन्य गडावर चढू लागले. गडावरील सैन्य एकाएकी सावध झाले. ते राजांच्या सैन्यावर तुटून पडले. कापाकापी सुरू झाली. अकस्मात वरून झालेल्या हल्ल्याने बिथरलेल्या मराठ्यांनी माघार घेतली. जेवढे वाचले तेवढे सैन्य गोळा करून राजे विशाळगडाच्या आश्रयास गेले. या चकमकीत राजांचे एक हजार माणूस कामी आले. राजांना हा मोठा धक्का बसला.[२] खिन्न मनाने विचार करीत बसले असता नेताजी पालकर समोर येऊन उभा राहिला. आपले न ऐकल्याचे वर्तन नेताजीने केल्याने राजेनी त्यास सैन्यातून काढून टाकले. विजापूरकरांनी त्याला आपल्या नोकरीत घेऊन चार लाख होन बक्षिस दिले. त्याने लगेच जयसिंगाच्या फौजेची लांडगेतोड सुरू केली.[३]

१ शि.च.वृ.सं., खंड २, पृ. ४७-५०.

२ आलमगीरनामा १००२ सरकार, शिवाजी ॲन्ड हिज टाइम्स, ४थी आवृत्ती, पृ. १२९-३०.

३ हफत अजूमान, १९३, पहा शेजवलकर, श्रीशिवछत्रपती, पृ. ३७७.

या अगोदर मोगल फौज विजापुराजवळ असता दिलेरखान व जयसिंग यांचे वाकडे येऊन अत्यंत गोंधळ उडाला. नेताजीने आपल्या सैन्याच्या पिछाडीवर सतत हल्ले केल्यामुळे तो त्रास चुकविण्यासाठी जयसिंगाने नेताजीला अंतस्थ रीतीने पत्रे पाठवून आणि बादशहाचा हुकुम आणवून विजापूरचे नोकरीतून आपल्या नोकरीत आणिले आणि ३८ हजार ही बक्षीस, पंचहजारी मनसब व खर्चात जहागीर दिली. (२० मार्च १६६६).

विजापूरकरांना कुतुबशाहीची मदत होतीच. त्यात शिवाजी जाऊन विजापूरकरांस मिळण्याचा संभव नाकारता येत नाही. तेव्हा हे टाळण्यासाठी बादशहाने शिवाजीच्या झालेल्या तहाला मान्यता दिली. हुकूम पाठविला की शिवाजीला दरबारात रवाना करण्यात यावे आणि यासाठी दक्षिणच्या खजिन्यातून त्याला एक लाख रुपये देण्यात यावे.[१] संकटग्रस्त शिवाजीराजे चिंतेत होते. शायिस्तेखानाच्या दबावामुळे तीन वर्षांपूर्वी जशी दैना झाली होती तीच बिकट परिस्थिती राजांची झाली होती. पुण्याकडील मुलूख अगोदरच गेला होता. त्याच्या भरीस जयसिंग आल्यानंतर पुरंदरच्या तहाने किल्लेदेखील गमावून बसावे लागले. तळकोकणातील आदिलशाही मुलूख सोडून द्यावा लागला. पन्हाळ्याची मोहीम फसली. नेताजीसारखा उजवा हात तुटला. सर्व डाव फिसकटला. त्यामुळे राजे खट्टू झाले. सर्व बाजूंनी संकटे आली. इकडे मोगलांचा विजयशाली सेनापती जयसिंगास विजापूरकरांवर विजय मिळविता येईना म्हणून ते चिंतातुर झाले. पण ह्या महाकर्तबगार आणि जबरदस्त महत्त्वाकांक्षी पुरुषांनी आपसात एक विचार पक्का केला तो म्हणजे शिवाजीराजांनी औरंगजेबाच्या भेटीला जावे.

राजकारणाची कोंडी शिवाजीराजांनाही असह्य झाली. बादशहाला प्रत्यक्ष भेटून सर्व प्रश्नाचा सोक्षमोक्ष लावण्याचा राजांनी निश्चय केला. उत्तरेतील मोगल बादशाही प्रदेश समक्ष नजरेखाली घालण्याचा त्यांचा बेत होता. मासाहेबांचा सल्ला राजियांनी घेतला. बादशहाकडे जाण्याचा धोका होता. पण आपल्या जन्मजात धाडसी स्वभावानुसार आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी नर्मदा ओलांडून उत्तर हिंदुस्तानात पाऊल टाकण्याचे व धोका पत्करण्याचे धैर्याने ठरविले.

जयसिंगाने संरक्षणाची शपथपूर्वक हमी घेतल्यावर राजे बादशहाच्या भेटीला आग्र्यास जाण्यास तयार झाले. मासाहेबाच्या अधिपत्याखाली

---

१ प.सा. सं. क्र. ११०२.

राजियांनी राहिलेल्या छोट्या स्वराज्याची उत्तम व्यवस्था लावून दिली. मासाहेबाच्या आज्ञेप्रमाणे वागावे असा राजे यांनी हुकूम दिला. प्रधान मोरोपंत पिंगळे, सेनापती प्रतापराव गुजर इत्यादींचे मंत्रिमंडळ नेमण्यात आले. सर्वांनी शिस्तीने व सावधपणे वागावे अशी आज्ञा राजियांनी दिली. जयसिंगाने शिवाजीराजांचा आदर सत्कार करून त्यांना निरोप दिला.

□□



मिर्झा राजा जयसिंह

१५. बादशहाच्या कैदेतून जगाला थक्क करणारे बिनधास्त पलायन

आग्र्यास जाण्याची तयारी राजगडावर होऊ लागली. राजियांनी रघुनाथ कोरडे, त्र्यंबक सोनदेव डबीर, मदारी मेहतर, बाजी जेधे, निराजी रावजी, सबनीस ह्या मंडळींना आपल्या बरोबर निघण्याची आज्ञा दिली. परमानंदानाही बरोबर घेतले. तानाजी, येसाजी, प्रतापराव गुजर यांच्यावर स्वराज्याचे रक्षण करण्याची कामगिरी सोपविली. वरील मंडळींशिवाय राजियांनी साडेतीनशे माणसांची निवड केली होती. मातुश्री जिजाबाईंनी फाल्गुन शुद्ध ९ हा प्रयाणाचा दिवस ठरविला. सर्व बांधाबांध होऊन राजे पुत्र संभाजीसह औरंगाबादेस जाण्यास निघाले.[१] औरंगाबादेस शहरवासीयांनी राजांचे यथोचित स्वागत रस्त्यांच्या दुतर्फा राहून केले. औरंगाबादचा अधिकारी सफशिकन खान हा राजेंना भेटावयास आला नाही. त्याची कल्पना शिवाजी राजे आपल्याला भेटावयास येतील. तसे झाले नाही. राजे शहरातून थेट जयसिंगाच्या मुक्कामावर गेले. तिथे जयसिंगाने त्याचा आदरसत्कार केला. तेव्हा औरंगजेबाचे सर्व अधिकारी राजे यांना येऊन भेटले. दुसऱ्या दिवशी शिवाजीराजे यांनी ज्याचे त्याचे योग्यतेप्रमाणे परत भेटी दिल्या. याचवेळी बादशहाच्या हुकुमाप्रमाणे राजेना बहुमान, पोशाख व नजराणे देण्यात आले. दुसऱ्या दिवशी जयसिंगाचा निरोप घेऊन राजे आग्र्यास जाण्यास निघाले. वाट खर्चाकरिता राजेंना बादशहाने एक लाख रुपये बादशाही खजिन्यातून देवविले.[२] तेही बरोबर घेतले. शिवाय प्रसंगोपात उपयोगी पडावा म्हणून भरपूर खजिना बरोबर घेतला.

राजे ११ मे १६६६ रोजी आग्र्याच्या जवळ पोहचले. वाटेत जागोजागी मोगली अमलदार राजियांना सामोरे येऊन त्यांच्या सुखसोईची सर्व तजवीज करीत होते. औरंगजेबास राजियांच्या मुक्कामाची व प्रवासाची सर्व हकीकत गाझी बेगकडून पत्राद्वारे समजत होती. राजियांचा औरंगाबादहून प्रवास

---

१ जेधे शकावली, पृ. १५.

२ खोबरेकर (सं.) तारिखे दिलखुशा, पृ. ४५, राजवाडे खंड ८, पृ. १६.

सुरू झाला. राजियांनी तापी ओलांडली. लवकर नर्मदाही ओलांडली. वाटेतच राजियांना रामसिंहाचे पत्र मिळाले. त्याने राजियांस लिहिले की, आपण न चुकता, बादशहाच्या वाढदिवशी (दि. १२ मे १६६६) आग्र्यास पोहचावे.[१] तद्नंतर राजियांनी चंबळ ओलांडली आणि यमुनेच्या प्रदेशात पाऊल टाकले. शिवाजीराजे आग्र्यापासून फक्त एका मजलीवर येऊन दाखल झाले ते बादशहाच्या वाढदिवसाच्या समारंभाच्या अगोदर एक दिवस (दि. ११ मे १६६६) आणि तेथेच थांबले. ही वेळ दुपारची होती. ठिकाण आग्रा शहराच्या दक्षिणेस सुमारे तीन कोसावर होते. शिवाजीराजे आग्र्यापासून नजीक येऊन थांबल्याची बातमी आग्रा शहरात पसरली. राजियांना सामोरे जाऊन त्यांचे स्वागत करण्याचे काम जयसिंहाचा पुत्र रामसिंग याने पत्करले होते. बादशहास हे आवडले नसावे. त्याने रामसिंगास दुसऱ्या एका महत्त्वाच्या कामगिरीवर रवाना केले. रामसिंगने बादशहाची आज्ञा शिरसावंद्य मानून राजियांच्या स्वागताकरिता आपला कारकून मुन्शी गिरीधरलाल याची नेमणूक केली.[२]

राजे आपल्या लवाजम्यासह आग्र्याजवळील मुलूकचंद सराई या ठिकाणी पोहचले.[३] तेथे त्यांना जयसिंगाचा मुलगा रामसिंग याने राजांच्या स्वागतासाठी पाठविलेला गिरीधरलाल मुन्शी हा भेटला. त्याने राजांच्या लवाजम्याचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे :—

“ शिवाजीबरोबर शंभर अनुयायी असून त्यांच्या संरक्षक पथकात दोन अडीचशे स्वार आहेत. त्यापैकी १०० शिलेदार असून इतर बारगीर आहेत. शिवाजीराजे ज्यावेळी पालखीतून निघतात त्यावेळी त्यांच्यासमोर पायदळ शिपायांचे पथक चालत येते. शिवाजीराजांचा झेंडा हा नारंगी आणि केसरी रंगाचा असून त्यावर सोनेरी आकृत्या काढलेल्या आहेत. त्यांच्या लवाजम्यात उंट कमी आहेत तेसुद्धा सामान वाहून नेण्यासाठी आहेत. पथकाबरोबर १०० वंजाऱ्यांचा तांडा असून प्रत्येकापाशी गोणी वाहणाऱ्या बैलांची जोडी आहे. शिवाजीचे सर्वांत मोठे अधिकारी पालखीतून प्रवास करतात. त्यामुळे शिवाजीच्या लवाजम्यात बऱ्याच पालख्या आहेत.”[४] ह्यावेळी गिरीधरलाल

१ जदुनाथ सरकार, हाऊस ऑफ सिवाजी, पृ. १५४.
पत्र २३ एप्रिल १६६६.

२ कित्ता, पत्र १५ मे १६६६.

३ कित्ता.

४ पगडी, श्री छत्रपती नि त्यांची प्रभावळ, पृ. १६.

मुन्शीचा लेखनिक परकालदास याने शिवाजीराजे यांना प्रत्यक्ष पाहून जे वर्णन केले आहे ते असे : "शिवाजी हा दिसण्यात किरकोळ आहे. पण त्याचा रंग विलक्षण गोरा आहे. त्याचे राजतेज असे की कोणीही त्याला पाहिले की आपोआप वाटावे की हा राजा असला पाहिजे. त्याची हिंमत आणि मर्दुमकी पाहिली की हा बुलंद हिमतीचा मर्द मनुष्य असला पाहिजे असे वाटू लागते. शिवाजीला दाढी आहे. शिवाजीचा मुलगा नऊ वर्षांचा आहे. तोही गोऱ्या रंगाचा असून विलक्षण देखणा आहे."

राजियांच्या लवाजम्यासंबंधी परकालदास म्हणतो.[१]

"महाराजांचा लवाजमा लहानच पण वैभवशाली आहे. समोर निशाणाचा हत्ती आहे. त्यावर ध्वज फडकत असतो. नंतर कोतवाल घोडा त्याला सोन्यारूप्याचा साज चढविला आहे. त्यानंतर दक्षिणी पायदळ मोठ्या थाटात चालत असते. पथकाच्या मागे हौदा अंबारी घातलेल्या दोन हत्तीणी आहेत, एकसुखपाल (पालखीचा एक प्रकार) लवाजम्यात आहे. त्याचे दांडे चांदीने मढविलेले आहेत. शिवाजीची पालखी सगळीच्या सगळी चांदीने मढविलेली आहे. पण पालखीचे पाय आणि खुंट्या सोन्याने मढविल्या आहेत."

शाही शिरस्त्याप्रमाणे बादशहाच्या मुलाखतीस येणाऱ्या महत्त्वाच्या पाहुण्यांची तो शहरापासून एका मजलीवर आला असता त्याच्या स्वागतासाठी वस्त्रालंकार घेऊन बादशहाच्या प्रतिनिधीने जावयाचे : तेथेच त्यादिवशी पाहुण्याची मुक्कामाची व्यवस्था करावयाची व दुसऱ्या दिवशी मोठ्या थाटाने त्या पाहुण्याला शहरातील मोठ्या रस्त्याने मिरवत बादशहाच्या भेटीसाठी घेऊन यावयाचे. पाहुण्यांच्या योग्यतेनुसार बादशहाकडून लहान मोठ्या प्रतीचा प्रतिनिधी सामोरा जात असे. राजे आग्र्याच्या सरहद्दीवर पोचले तेव्हा त्यांची कल्पना अशीच होती पण शिरस्त्याप्रमाणे काहीच घडले नाही. राजियांच्या मुक्कामाची व्यवस्था शाही हवेलीत, शाही शामियान्यात किंवा कोणा सरदारांच्या बंगल्यातही करण्यात आली नाही. मुलुकचंदाची सराई या नावाची धर्मशाळा होती, तेथे महाराजांना उतरविण्यात आले.[२] राजियांना या मानहानीची जाणीव झाली. त्यांनी ती रात्र मुलुकचंदाच्या धर्मशाळेत घालविली.

दुसरा दिवस बादशहाच्या पन्नासाव्या वाढदिवसाच्या समारंभाचा व आमदरबारचा. दरबारी रिवाजाप्रमाणे ह्या दिवशी (१२ मे १६६६) राजियांना

---

१ बेंद्रे, छत्रपती शिवाजी महाराज, पृ. ५६९

२ सरकार, शिवाजी, पृ. १३८-४१.

त्यांच्या मुक्कामावरून मानाने व थाटाने घेऊन जाण्याची कामगिरी रामसिंग व मुखलिसखान या दोन सरदारांवर सोपविली होती. पण रामसिंगावर बादशहाने आपल्या शाही महालाभोवती फौजेसह पहारे ठेवण्याचे काम सोपविले. त्यामुळे तो सकाळी संबंध वेळ तेथे अडकून पडला.

दरबार सकाळी सुमारे दहा वाजता होता. सर्व मुख्य थाट याचवेळी होणार होते. राजे आपल्या लवाजम्यासह धर्मशाळेत थांबले होते. रामसिंह बादशहाच्या महालाभोवतीच्या बंदोबस्ताच्या कामावर अडकून पडला तेव्हा याही खेपेस त्याने आपला कारकून मुन्शी गिरीधरलाल यालाच राजांकडे पाठवून त्यांना शहरात येण्याची विनंती करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मुन्शी गिरीधरलाल राजियांना भेटून त्यांच्यासह एका रस्त्याने शहरात येण्यास निघाला. त्याचवेळी रामसिंहाचे बंदोबस्ताचे काम संपले व तो मुखलीसखान बरोबर दुसऱ्याच रस्त्याने राजांकडे निघाला.

महाराजांना घेऊन गिरीधरलाल मुन्शी दहरआराच्या बागेवरून येत होता व रामसिंग व मुखलीसखान बागेच्या रस्त्याने राजियांस भेटण्यास गेले होते. अखेर ही चूक रामसिंहाच्या लक्षात आली, तेव्हा रामसिंहाने महाराजांकडे निरोप पाठविला की, आम्ही अशा रस्त्याने येत आहोत, तरी तुम्ही आमच्या दिशेने आमच्या रस्त्याकडे या.[१] तिकडे औरंगजेबाचा दरबार व वाढदिवस समारंभ निम्मा संपलाही होता.

शेवटी भर दुपारच्यावेळी राजियांची व रामसिंहाची गाठ शहरात असलेल्या बाजारानजीकच्या नूरगंज बागेपाशी पडली. दोघेही घोड्यावर आरूढ झालेले होते. महाराजांच्या बरोबर जयसिंगाने तेजसिंह कछवा या सरदारास दिले होते. त्याने समोरून रामसिंहास येताना पाहिल्यावर राजियांस सांगितले की, हेच कुवर रामसिंह. हे ऐकल्यावर राजे जागच्या जागी थांबले. तेजसिंहने रामसिंहाच्या जवळ जाऊन महाराजांची ओळख करून दिली. रामसिंह घोड्यावरच होता आणि महाराजही घोड्यावर होते. दोघांनी एकमेकांना घोड्यावरून आलिंगने दिली. नंतर मुखलिसखानही महाराजास भेटला.[२]

---

१ सरकार, शिवाजी, पृ १४०.

२ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी, पृ. १५५.
राजस्थानी डिंगल पत्र, दि. १५ मे १६६६

रामसिंहाच्या राहण्याच्या हवेलीजवळच राजियांना व त्यांच्या परिवारास राहण्यासाठी तंबू ठोकून उतरण्याची व्यवस्था स्वतः रामसिंहाने केली होती. राजियांनी आग्र्यात पाऊल ठेवल्यापासून शहराच्या विलासी व आळसावलेल्या जीवनात नवे चैतन्य निर्माण झाले. अमीर उमरावापासून सामान्य असामी-पर्यंत सर्वांना एक चर्चेचा विषय मिळाला. राजियाच्या साहसाच्या, पराक्रमाच्या गोष्टी दबल्या आवाजात बोलल्या जाऊ लागल्या. मराठे आग्र्याला काही धमाल तर उडवून देणार नाहीत ना अशी धास्ती मनोमनी प्रत्येकाला वाटू लागली. बादशहाने ऐकले होते की, वेळप्रसंगी शिवाजीराजे दहा-वीस हात उडी सहज मारतात. म्हणून त्याने आपल्या बसण्याची जागा खूप दूर व उंच ठेवण्याची दक्षता घेतली होती. शिवाजीराजे दरबारात येतील त्यावेळी संरक्षणाचा कडेकोट बंदोबस्त औरंगजेबाने केला होता.[१]

दरबार संपत येण्याच्या सुमारास राजे रामसिंहाबरोबर आग्र्याच्या लाल किल्ल्याकडे निघाले. बरोबर शंभू राजेही होते. राजे लाल किल्ल्याकडे जाण्यास निघाले ही बातमी शहरात पसरताच त्यांना पाहण्यासाठी शहरवासीयांची दुतर्फा गर्दी उसळली. बंदोबस्त ठेवता ठेवता शहर कोतवालाची धांदल उडाली. श्वास रोखून डोळे विस्फारून ह्या गौरवर्णीय रुबाबदार राजाचे दर्शन घेण्यात शहरवासीयांनी धन्यता मानली.[२].

राजे रामसिंहाबरोबर आग्रा किल्ल्याच्या नजीक पोहचले तेव्हा दिवाण-इ-आम मधील मोठा औपचारिक समारंभ आटोपून औरंगजेब निवडक लोकांच्या खास परामर्शासाठी मंत्रागारामध्ये म्हणजे घुसळखान्यामध्ये येऊन दाखल झाला होता. तिथेच शिवाजीराजे व पुत्र संभाजी यांना बादशहाच्या भेटीस नेण्यात आले. आसदखानाने राजांना बादशहापुढे नेले. बादशहाला राजे व संभाजीराजे यांनी शिरस्त्याप्रमाणे नजराणा पेश केला व कुर्निसात केले. पण बादशहा एक शब्दही बोलला नाही.[३]

बादशहाने खूण करताच राजांना दरबारातील जागा दाखविण्यात आली. जागा कनिष्ठ दर्जाच्या सरदारांबरोबर होती. वस्तुस्थितीची जाणीव राजांना ताबडतोब झाली. रागाने उसळून महाराज रामसिंगास म्हणाले, " आमचा अपमान करण्याकरता बादशहांनी आम्हाला बोलाविले काय ? असा

१ फॉरेन बायोग्राफी ऑफ शिवाजी, भा. २, पृ. १८१-८३.

२ खाफीखान, पृ. ६७-६८.

३ मनुची, स्टोरिया दि मोगल, भाग २, पृ. १३७-४०.

अपमान आम्ही सहन करणार नाही. ह्या दरबारात ज्या जसवंतसिंगाला श्रेष्ठ स्थान देऊन बादशहाने मानाचे पोषाख दिले त्याचा पराभव माझ्या सैनिकांनी अनेक वेळा केला आहे." राजांचे दुःख आणि राग अनावर झाला. ते संतापाने लाल झाले आणि त्यांच्या डोळ्यात विलक्षण पाणी चमकले. चाणाक्ष बादशहाच्या नजरेतून ते सुटले नाही. तो गोंधळला व त्याने कुमार रामसिंहाला इशारा केला. रामसिंह शिवाजीराजांच्या जवळ येऊन काय झाले ते विचारू लागले. त्यावर बेभान होऊन शिवाजीराजे रामसिंगला म्हणाले, "तुम्हे मालूम है, तुम्हारे पिताजी को भी मालूम है, और तुम्हारा बादशहा भी अच्छी तरहसे जानता है कि मैं कौन हूँ। तो भी जान बुझकर मुझे इतनी दूर नीचे दर्जे पर खडा किया गया है। मैं तुम्हारी मनसब से नफरत करता हूँ (तू पहातो आहेस, तुझ्या बापाने पाहिले आहे, तुमच्या बादशहाला माहीत आहे, बुद्ध्या उभा करून अपमान करावा असा माणूस मी आहे ? तुमची मनसब मी ठोकरून देतो.)[१]

इतके बोलून सिंहासनाकडे पाठ फिरवून ते तडक बाहेर पडले. रामसिंह त्यांचा हात धरून त्यांना आवरू लागला पण त्यांचा हात झिडकारून राजे बाजूला जाऊन बसले. रामसिंह त्यांच्या पाठोपाठ जाऊन त्यांची समजूत घालू लागला, तरी राजांनी ऐकले नाही. त्यांना अपमान असह्य झाला. बोलता बोलता त्यांचा आवाज चढला. ते चढ्या आवाजात बोलू लागले, " हे माझे मरणच नाही तर काय, तू मला ठार कर नाही तर मीच माझ्यावर हत्यार चालवितो. माझे शीर तोडून वाटेल तर घेऊन जा, मी बादशहाकडे येणार नाही " खूप प्रयत्न केला पण राजे रेसभरही ढळले नाहीत. रामसिंहाच्या जयपूर महालात राजेंना ठेवण्यात आले. दुसऱ्या दिवशी बादशहाने फिरून तपास केला तेव्हा बादशहास रामसिंहाने सांगितले की, " शिवाजीला ताप आला आहे आज तो येणार नाही ". ह्याचा अर्थ बादशहा समजला.[२]

सूर्यास्ताच्या दरबारात रामसिंहाने एकट्या संभाजीराजांस दरबारात नेले. तिथे त्याला पोषाख, रत्नखचित कट्यार व त्यांचा कंठा या वस्तू बादशहाकडून इनाम देण्यात आल्या.

---

१ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी, पृ. १५६-५७.

२ कित्ता.

सुटका होण्यासाठी शिवाजीराजांनी केलेले प्रयत्न :

आपल्यावर बादशहाचा पक्का पहारा बसला असून आपण बादशहाचे कैदी झालो आहेत हे शिवाजीराजांना कळून चुकले. औरंगजेबाचे दरबारात रघुनाथ कोर्डे हा शिवाजीराजांचा वकील होता. त्यास बोलावून राजे यांनी त्यांच्यातर्फे रदबदली चालविली. रघुनाथपंताने राजियांस असे सुचविले की, त्यांनी बादशहास अर्ज करावा व त्यात असे लिहावे की माझी सुटका इथून झाल्यास मी बादशहाकरिता विजापूर व गोवळकोंडा ही दोन्ही राज्ये जिंकून घेईन. अशा प्रकारची अर्जी तयार करून ती बादशहाला देण्यासाठी रघुनाथ कोर्डेकडे दिली. बादशहाने तो अर्ज वाचून सांगितले की, " थोडे दिवस थांबा तुमची विनंती मान्य करू " (रियासत पृ. २५४) ह्यावरून बादशहाचे मन आपल्यासंबंधी काय विचार करत आहे हे राजियांना समजले. त्यानंतर राजे यांनी बादशहास पुन्हा विनंती केली की, " मला एकवार समक्ष भेटीची परवानगी द्यावी, आपल्या फायद्याच्या पुष्कळ गोष्टी मी आपणास सांगणार आहे. " जाफरखान म्हणून बादशहाचा वजीर होता. ह्याची बायको ही शायिस्तेखानाची बहीण होती. तिने नवऱ्यास बजावले होते की, " शिवाजीशी फार वेळ बोलत बसू नका. शायिस्तेखानानेही वजीरास गुप्त पत्र पाठवून कळविले की, शिवाजी केवळ सैतान आहे, त्याच्याशी समक्ष भेटीचा प्रसंग बादशहाशी आणू नये " अशा सल्ल्यांची बादशहास जरूर नव्हती. कारण त्याने ऐकले होते की, दहा हजार सैन्याच्या सानिध्यात अफझलखानास त्यांनी स्वर्गाची वाट दाखविली होती. तसेच वीस हजार फौजेच्या गराड्यातून शायिस्तेखानाच्या जनानखान्यात शिरून त्यास जखमी केले हे बादशहास ठावूक होते. शिवाजीराजांस चेटके अवगत आहेत, त्याला शेपन्नास हात उडी सहज मारता येते, अदृश्यरूप धारण करून तो हवेतून तरंगत जातो. असले जनप्रवाह बादशहाने ऐकलेले होते.[१]

औरंगजेबाने शिवाजीराजांना त्यांच्या रहात्या घरी अटक करून पहारा बसविला आणि आता ह्या शिवाजीचे करायचे काय ह्याचा विचार बादशहा करू लागला. फ्रेंच प्रवासी थिवेनो ह्यावेळी आग्र्यास होता. तो लिहितो, " शिवाजीला ठार मारावे असेच बादशहाने ठरविले होते. परंतु राजपूत राजांची त्यास जामिनगिरी असल्यामुळे, कदाचित ते बंड करून उठतील या भीतीने तो बेत पुढे ढकलला. "

---

१ सरदेसाई, शिवाजी रियासत, पृ. २५४.

आपण आग्र्यास येऊन फसलो आहोत ही गोष्ट राजेंना समजून चुकली. औरंगजेबाबद्दल मिर्झाराजांना वाटलेला विश्वास अगदीच फोल होता. त्यांच्या आश्वासनांनी व वचनांनी आपण भारावलो. फारच मोठी चूक झाली. रजपुतांच्या शब्दाला येथे फारशी किंमत नाही. इकडे आग्रा शहरात शिवाजीराजांच्या शत्रूंनी उचल खाल्ली. महाराजा जयवंतसिंह शिवाजीराजांवर जळफळत होता. कारण कोंडाण्याखाली त्याला झोडपून काढले होते. जाफरखान वजीर शिवाजीराजांचा वैरी होता. कारण राजांनी त्याचा मेहुणा शाहिस्तेखान याची तीन बोटे तोडली होती. राजेंचा राग करणारी तिसरी व्यक्ती ही बेगम जहाँ आरा होती. तिला सुरत शहराचे जकातीचे उत्पन्न मिळत होते. परंतु शिवाजीराजे यांनी सुरत शहर जाळून उद्‌ध्वस्त करून टाकल्यामुळे हिचे उत्पन्न एकदम बंद पडले. त्यामुळे तीही राजांवर खवळली होती.[१] ह्या तिघांनी बादशहास भेटून शिवाजीराजांस ठार करावे असे सांगितले.

बादशहाने यावर आपल्या अधिकाऱ्यांबरोबर गुप्त मसलत केली. शिवाजी राजे यांस ठार मारायचे की त्याला एखाद्या किल्ल्यात डांबून ठेवायचे ? की त्याला तुरुंगात कोंडून टाकायचे ? स्वतः औरंगजेबाने राजांना ठार मारून टाकण्याचा निर्णय घेतला. त्याकरता त्याने राजेंना फुलादखानाच्या ताब्यात द्यायचे ठरविले. ही बातमी रामसिंहास समजली तेव्हा रामसिंह तगमगून उठला. हे घडता कामा नये म्हणून त्याने आपल्या घराण्याशी मित्रत्वाचे संबंध असलेला शाहीदरबारातील मीरबक्षी मुहम्मद अमीनखान याची भेट घेतली आणि औरंगजेबाने शिवाजीराजांस ठार केल्यास आपल्या वडिलांचे वचन आणि आपल्यावर शिवाजीराजे यांनी टाकलेला विश्वास भंगून आपल्याला कायमचा कलंक कसा लागणार हे रामसिंहाने मीरबक्षीस पटवून दिले. ते ऐकून मीरबक्षही चलबिचल झाला. मीरबक्षी लागलीच बादशहाकडे गेला आणि बादशहास भेटून रामसिंगाचे शब्द त्याला सांगितले, " मला आधी ठार करा आणि मगच शिवाजीला ठार करा "[२] औरंगजेबास रामसिंहाचे म्हणणे समजताच त्याने आपला शिवाजीराजांस ठार मारण्याचा बेत फिरविला. पण शिवाजीराजांनी आग्र्यातून निसटून जाऊ नये वा काही नेहमीसारखा भयंकर प्रकार करू

---

१ जदुनाथ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी, पृ. १६२-६९.

२ बेंद्रे, शिवाजी औरंगजेब भेट, भारतीय इतिहास आणि संस्कृती वर्ष २ रे, पु. ७ वे, पृ. ३६.

नये याची जिवापाड काळजी रामसिंहानेच घ्यावी हा धूर्त पेच औरंगजेबाने टाकला. रामसिंहाने त्याप्रमाणे बादशहास जामिनकी लिहून दिली. लगेच बादशहाने शिवाजीराजेंना काबूल स्वारीवर पाठविण्याचा बूट काढला. शहरात यावर उलट सुलट चर्चा होऊ लागली. लोक म्हणू लागले की, बादशहाने शिवाजीराजांस दख्खनची सुभेदारी देण्याचे वचन देऊन आग्र्यास भेटीस बोलविले. हे वचन मोडून बादशहा शिवाजीराजेंची फसवणूक करीत आहे. आग्रा शहरात हा एक कुजबुजीचा विषय होऊन बसला. बादशहास आपल्या हेरांच्या मार्फत हे सर्व समजत होते. आपण स्वतः दक्षिणेत जाऊन शिवाजीराजांच्या गैरहजेरीत त्याच्या मुलखावर स्वारी काढावी हा विचार बादशहाने जयसिंगास कळविला. पण जयसिंगाने तसे करण्यास धोका असल्याचे कळविले. त्याने बादशहास कळविले की, शिवाजीराजांच्या जिवाला अपाय होईल अशी थोडीशी जरी शंका आली तरी त्यांचे मागे राहिलेले अधिकारी आदिलशहाशी संगनमत करून दख्खनमध्ये सर्वच पारडे फिरेल. तेव्हा औरंगजेब काळजीत पडला. शिवाजीराजास सोडून देण्यास त्याचे मन तयार होईना. शिवाजीराजांचे आग्र्यास वास्तव्य म्हणजे एक अडचण होऊन बसली. मला सोडल्यास मी दोन कोट रुपये देईन व माझा सर्व मुलूख बादशहाचे स्वाधीन करीन असा अर्ज शिवाजीराजांनी बादशहाकडे केला. तेव्हा बादशहास कळून चुकले की, शिवाजीराजे आपल्याकडून सुटून जाण्यास धडपड करीत आहे. शिवाजीराजे यांनी सुटून जाण्याची धडपड करू नये म्हणून औरंगजेबाने पोलादखान कोतवालास बोलावून राजांच्या निवासस्थानाला फौजेचा गराडा घालण्याचा हुकूम सोडला. लगेच पोलादखानाने महाराजांच्या निवासस्थानाभोवती पाच हजार सैनिकांच्या चौक्या बसविल्या.[१] राजे बंदिस्त झाले. त्यावेळी त्यांच्या मनात आपल्या सुटकेसंबंधीचा आराखडा तयार झाला. पहिल्यांदा त्यांनी आपल्याबरोबर जे शेकडो मावळे होते व जे बंदिस्त झाले होते. त्यांना दक्षिणेत जाण्यासाठी बादशहाकडे फुलादखानातर्फे परवानगी मागितली. बादशहाने शिवाजीराजांची ही अर्जी मंजूर केली. त्यानुसार मावळ्यांना निघून जाण्यासाठी हवे असलेले प्रवासाचे परवाने (पासपोर्ट) दिनांक २५ जुलै १६६६ रोजी मागणी केल्यानंतर लगेच दिले.[२] अनूयायी १५ ऑगस्टच्या सुमारास नरवरची घाटी उतरून पार पडले. मावळ्यांना मुक्त केल्यावर

---

१ सभासद बखर, पृ. ४९.

२ पत्रसार संग्रह क्र. ११२८.

शिवाजीराजे यांनी दुसरा अर्ज औरंगजेबाशी केला की, रामसिंगास आपल्या जामीनकीतून मुक्त करावे. औरंगजेबाने रामसिंगची जामीनकीतून मुक्तता केली. तरीही राजियांच्या निवासस्थानाभोवती असलेले आपल्या राजपूत सरदारांचे पहारे कायमच ठेवले.

राजियांनी राजगडाहून निघताना बरोबर बराच खजिना घेतला होता. राजांना कैद केल्यावर ह्या कैदेतून ते आग्र्यातील अमीर उमराव बडी मंडळी यांना भेटीदाखल अनेक वस्तू पाठवू लागले. शहरात राजेविषयी चांगले मत तयार झाले. दखनीराजा चांगला दिलदार असल्याचा बोलबाला होऊ लागला. याच सुमारास औरंगजेबाने आपल्या लवाजम्यासह आग्रा शहराबाहेर जाऊन शिकार करण्याचे ठरविले. औरंगजेब दिनांक २२ जुलैपासून आग्रा शहराबाहेर राहिला. त्यामुळे आग्र्यातील कारभार थंड पडला होता. शिवाजीराजांच्या डेऱ्याभोवतीचा पहारादेखील ढिला पडला होता. शाहीदरबार काही दिवस बंद असल्याने आग्रा शहरात सुटीचे वातावरण होते. यावेळी राजे मिठाईचे पेटारे भरून आग्र्यातील अमीर उमरावांकडे घरपोच करीत होते. प्रथमतः फुलादखानाकडून हे पेटारे तपासले जात होते. त्याला व त्यांच्या पहारेवाल्यांनाही महाराजांनी मिठाई दिली असणार असे पेटारे सतत जाऊ लागले. काही दिवस लोटल्यावर राजांच्या मनात आले की, आपल्या बरोबर राहत असलेले एक थोर सत्पुरुष कवींद्र परमानंद नेवासकर यांचा सत्कार करण्याचे ठरविले. हा सत्कार समारंभ दिनांक २२ जुलै १६६६ च्या सुमारास झाला असावा, कारण ह्याचा उल्लेख दिनांक २२ जुलैच्या राजस्थानी पत्रात आहे. दिनांक २२ जुलै रविवारी शिवाजीराजे यांनी राहत्या हवेलीच्या बागेत परमानंदांची यथोचित पूजा केली. त्यांना एक हत्ती व हौबासह एक हत्तीण, दोन उत्तम घोडे व वस्त्रालंकार दिले. त्यांच्यासाठी ठेवून घेतलेले चाळीस स्वार त्यांच्या बरोबर दिले ; आपल्याजवळील मौल्यवान कापड चोपड बांधून राजियांनी कवींद्रापाशी दिले. कवींद्राना परवाना मिळालेला होता. त्याप्रमाणे ते राजांचा निरोप घेऊन निघाले.[१] व आग्रा शहराच्या पश्चिमेकडे सुमारे २३ मैलांवर असलेल्या फत्तेपूर-शिक्री या गावी पोहचले.

शिवाजीराजांना आपण होऊन औरंगजेबासारख्या क्रूर आणि कपटी बादशहाच्या जाळ्यात सापडल्याचे उमगले आणि पश्चात्ताप पावले पण

---

१ पुरंदरे, राजा शिवछत्रपती भाग ७, पृ. १५६.

डगमगले नाहीत. ह्यातून सुटका करून घेण्यासाठी राजियांनी अनेक युक्त्या लढविल्या. त्यातील एक औरंगजेबाच्या राण्यांना खूष ठेवण्यासाठी त्यांनी नजराणे पाठविण्याचे सुरू केले ही होय. आग्र्यातील अमीर उमरावांना भेटी म्हणून त्यांना पेटाऱ्यातून मेवा मिठाई पाठविण्याचा प्रघात पाडला. तो मिठाई पाठविण्याचा प्रघात चालूच ठेविला. दोन असामींनी उचलण्याजोग्या कावडी करून दांडीला या मिठाईच्या लहान मोठ्या टोपल्या लटकावून त्या नावानिशीवार बाहेर पाठविण्याची व्यवस्था राजियांनी चालू केली. आरंभी काही दिवस पहारेकरी या टोपल्या कसोशीने तपासत,[१] उघडून पाहत. मेवा खरा आढळल्यावर मग जाऊ देत. असा राबता रोज लाविला. काही दिवस जाऊ दिले आणि एके दिवशी राजे व राजपुत्र पेटाऱ्यात बसले. पुढे मागे पेटारे करून मध्ये पेटारियांत बसून चालिले. इकडे दिनांक १७ ऑगस्ट १६६६ रोजी राजियांच्या नोकराने पहारेकऱ्यास कळविले, "आज महाराजांस बिलकूल बरे वाटत नाही. दोन दिवस झोप नाही. कोणी गडबड करून त्यांना त्रास देऊ नका. पेटाऱ्यातून निघण्याच्या अगोदर राजियांनी आपला साज उतरून हिरोजी फर्जंद यास घालून आपल्या पलंगावर शेला पांघरून झोपविले. सोन्याचे कडे घातलेला हात मात्र त्यांचा उघडा बाहेर दिसू दिला, हेतू हा की पहारेकऱ्यांस महाराज झोपले आहेत असे वाटावे. आणि मदारी मेहतर यास त्याचे पाय रगडावयास सांगितले. जवळच्या कारकून मंडळींना अगोदर २/३ दिवस बादशहाचे परवानगीने आग्र्याबाहेर रवाना केले होते. ते तीन कोसांवर एक गाव होता तेथे जाऊन राहिले. राजे पेटाऱ्यातून निघून गेल्यावर[२] काही तासांनी हिरोजी फर्जंद व मदारी मेहतर राजांच्या बिछान्यावर आजारी राजे झोपले आहेत त्यांना उठवू नका असे पहारेकऱ्यांना सांगून तेही पळाले. नंतर मागे सर्व सामसूम झाल्याचे पाहून पहारेकरी तपास करतात तो शिवाजीराजे निघून गेल्याची

---

१ खोबरेकर, तारिख इ. दिलकशा (इं.), पृ. ४९.
मनुची भाग २, पृ. १३७-४०.

२ शिवाजीराजे पेटारे वाहून नेणाऱ्या भोयांच्या वेषानेही पळून गेले असण्याची शक्यता आहे. बर्नियर, ऑर्लिन्स व डगलस यांनी वेषांतर करून शिवाजी निसटले असण्याची शक्यता प्रतिपादन केली आहे.

गोष्ट समजली. पहारेकऱ्यांपासून बादशहापर्यंत सर्वजण थक्क झाले. आश्चर्याचा पहिला भर ओसरताच सर्व बाजूंनी सक्त तपास सुरू झाला.[१]

इकडे मिठाईचे पेटारे गावाबाहेर आणल्यावर त्यातून वेष बदललेले राजे व राजपुत्र बाहेर पडले आणि अगोदरच्या तरतुदीनुसार तिथे जे दोन घोडे ठेविले होते त्याजवर स्वार होऊन ते मथुरेच्या मार्गाने चालले. प्रवास सुखरूप व्हावा म्हणून त्यांनी हूल देऊन वेषांतर केले. नेहमीची दाढी काढून टाकून भरदार मिशा ठेविल्या. नेहमीचा जिरेटोप काढून त्याऐवजी सरदाराची पगडी घातली. ह्या आमूलाग्र बदललेल्या पेहरावामुळे राजेंना कोणीही ओळखू शकले नाही.

शिवाजीराजांच्या पलायनाची बातमी औरंगजेबास समजताच आश्चर्य वाटले. दुःख झाले. पहारा असताना एकाएकी जमिनीत घुसला की आसमानात जाऊन नाहीसा झाला हे आम्हास समजले नाही असे पहारेकऱ्यांचे म्हणणे पडले.[२] शिवाजी अनेक रूपे घेतो असे बादशहाने ऐकले होते. तेच खरे असे त्याला वाटू लागले. त्याने आपल्या फौजांना हुकूम करून त्या चार दिशास शिवाजीराजास शोधावयास रवाना केले व त्यांना हुकूमात सांगितले की, " शिवाजी हुन्नरवंत आहे. एखादा वेष धरून जात असेल. तरी तुम्ही जंगम, जोगी, संन्यासी, तापसी, बैरागी, नानकपंथी, गोरखपंथी फकीर, ब्राह्मण, कंगाल ब्रह्मचारी, परमहंशी, वेडे नानापरींची सोंगे शोध करून, राजा ओळखून कैद करून आणावे." बादशहा महाशंकेखोर. त्याच्या मनात शंका आली की शिवाजीराजा शहरात कोठे दडून राहून रात्री आपणास दगा करील म्हणून तजवीज करून चौकी पहारा ठेवून स्वतः बादशहा पलंगावर बसून राहिला.[३]

शिवाजी महाराजांनी लहानग्या संभाजीस मथुरेस ठेवण्याची तजवीज कवी परमानंद यांच्यामार्फत अगोदरच करण्यात आली होती.[४] अतिशय गुप्त आणि धूर्त डाव टाकून शिवाजीराजे आग्र्याहून मथुरेस गेले हे खरे,

१ शिवाजी महाराज आग्र्याहून निसटले दि. १७ ऑगस्ट जेधे शकावली, पृ. १६.
आलमगीर नामा पृ. ४०, खाफीखान २१ तारीख देतो. शिवचरित्र वृत्त संग्रह भाग ३, पृ. ८०.

२ शिवप्रभूचरित्र, पृ. ६५.

३ कित्ता.

४ कथर्डेकर, शिवाजीचा आग्रा राजगड प्रवास, भारतीय इतिहास आणि संस्कृती पुस्तक ७८, पृ. ३४.

पण ते मथुरेस कसे गेले याबद्दल सभासद बखर सांगते, " राजे पेटाऱ्यात बसले, पुत्रासह सायंकाळच्या सुमारास शहराच्या बाहेर चालले. दोन कोस गेले." नंतर एक कोस पायउतार जाले. तेथे एक गाव होता. माणसे व घोडे तयार होते. मथुरेकडे गेले (कृ. अ. सभासदकृत बखर सं. पृ. ५०-५१) शिवाजी मथुरेच्या दिशेने गेले खरे पण त्यांनी यमुना नदी कोठे पार केली असावी. अभ्यासकांचा तर्क असा आहे की, राजियांनी मथुरेस जाण्यासाठी यमुनेच्या स्वामी घाटाजवळ नदी पार केली असावी.[१]

मथुरेत शिवाजीराजांचे तीर्थगुरू मकरंद भट व गोवर्धन राहत होते. शिवाय शिवाजीराजांचा पेशवा मोरोपंत पिंगळे यांचे मेहुणे कृष्णाजी त्रिमल मथुरेस होते. पूर्व योजनेनुसार राजियांनी संभाजीस त्याजपाशी मथुरेस ठेविले. हा कृष्णाजी यात्रेचा माहीतगार होता. त्यासबरोबर घेतले. त्यांचे बंधू काशीपंत व विसाजीपंत यांनी संभाजीचा सांभाळ केला. प्रयाग येथे कवि कलश भोसल्यांचा क्षेत्रोपाध्य होता. त्याचा उपयोग चांगला झाला असावा (सरदेसाई मराठी रियासत, शककर्ता शिवाजी पृ. २६०) राजियांचे संरक्षणार्थ त्यांच्या आगेमागे शंभर-शंभर घोडेस्वार मावळे प्रवास करीत होते. आपल्या साथीदारांसह राजेनी मथुरेहून नरवरच्या दिशेने तुफानी घोडदौड सुरू केली. मनुची म्हणतो, " शिवाजी व त्याचे साथीदार फारच प्रचंड वेगाने पळत होते. एरवी जेवढे अंतर तोडण्यास ७२ तास लागत होते, तेवढे अंतर तो व त्याचे साथीदार एका रात्रीत १२ तासात कापत होते[२]. (मनुची स्टोरी या भ. भा. २, पृ. १३९-१४०) शिवाजीराजांच्या जवळ मीरबक्षी मुहम्मद अमीन खानाच्या परवान्यांचा योग्य दस्तक होता. तसेच राजांच्या मावळ्यांना परतीच्या प्रवासाचे दस्तक औरंगजेब बादशहाच्या परवानगीनेच देण्यात आले होते. त्याजमुळे त्याजवर परवाने नाहीत म्हणून पकडले जाण्याची भीती नव्हती. शिवाजीराजे २२/२३ ऑगस्टला नरवरला पोचले. त्या दिवशीचा अखबार लेखक लिहितो, नरवरच्या फौजदार अबादुल्लाह खानाने कळविले की, संध्याकाळी नमाजाच्यावेळी शिवा व त्याचे साथीदार सरदार चंबळा नदी ओलांडून पुढे गेले. त्यांनी मुहम्मद अमीन खानाच्या सहीचा व शिक्क्याचा दस्तक सादर केला. (अखबार

१ मनुची, स्टोरिया मोगल, भाग २, पृ. १३९.

२ कित्ता, पृ. १३९-१४०.

खं. ६ ले. ११) औरंगजेबाच्या दरबारात रोज संध्याकाळी डायरी लिहिली जात असे. त्यात अखबार म्हणतात दिनांक २८ ऑगस्ट १६६६ ई. अखबार लेखक लिहितो की, शिवा नर्मदेवर पोहचल्याची खबर मिळाली. परंतु तो कोणाला दिसला नाही[१]. अखबारातील या दोन्ही नोंदीवरून असे समजण्यास हरकत नाही, शिवाजीराजे मथुरेहून निघून नरवरला आले. नरवरला लागून बुंदीलखंडात तेथे मोगल विरोधी सत्ता नांदत होती. त्याला लागून असलेल्या गोंडवनात लहान-लहान राजे मोगलांच्या विरोधात होते.

शिवाजीराजांना हे ठावूक होते. ह्या प्रदेशाची दुर्गम भौगोलिक रचना येथील मोगल विरोध, हे राजेंना माहीत असल्यामुळे त्यांनी अखबारात नोंदल्याप्रमाणे हिरापूर गावी २६ ऑगस्टच्या सुमारास नर्मदा नदी पार केली असावी. १७ ऑगस्टला राजे आग्र्याहून निघाल्यानंतर ते २६ ऑगस्टच्या सुमारास नरवरवर अंतर ८ दिवसात तोडून आले असे संभवते. मनुचीच्या म्हणण्याप्रमाणे ते जर प्रचंड वेगात दौडत होते तर ८/९ दिवसात नरवर येथे येणे स्वाभाविक आहे (पेशवेकाळात दिल्ली ते पुणे हे अंतर घोडेस्वार ७ दिवसात काटत असे) हिरापूरजवळ नर्मदा नदी पार केल्यानंतर शिवाजीराजे आपल्या साथीदारांसह एलिचपूर, माहूरमार्गे, सिंदखेडकडे वळले असावेत. सिंदखेड हे राजांचे आजोळ. मातुश्री जिजाबाईंचे माहेर. सिंदखेड सोडल्यावर महाराजांनी श्रीगोंद्यावरून पुण्यास राजगडावर दिनांक १२ सप्टेंबर १६६६ रोजी बैराग्याच्या वेषात येऊन मातोश्रींचे पाय धरले.[२] रियासतकार म्हणतात की, महाराज तारीख २० नोव्हेंबर १६६६ रोजी बैराग्याच्या वेषात रायगडास येऊन त्यांनी मातोश्रींचे पाय धरले.[३] जेधे शकावलीत शिवाजीराजे राजगडला पोचल्याची तारीख २० नोव्हेंबर दिली आहे. तीच रियासतकारांनी ग्राह्य मानली. ते बरोबर नाही. मथुरा-नरवर-सागर-हिरापूर-सिंदखेड-श्रीगोंदा या मार्गाने महाराज २५ ते २६ दिवसात राजगडला पोचले. संभाजी मेल्याची खोटी बातमी उठविली.[४].

---

१ अखबार खंड ६, लेख १८.

२ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी, पृ. १७०.

३ शिवाजी महाराज, मराठी रियासत, पृ. २६१.

४ कमल गोखले, संभाजी, पृ. ३७

शिवाजीराजांनी फार मोठे साहस करून औरंगजेबाच्या कैदेतून पलायन केले. राजांच्यापुरती कोंडी फुटली. पण औरंगजेबाची मात्र त्रेधातिरपीट उडाली. खरे तर औरंगजेबाने ज्या पोलादखानास कैद खान्याचा मुख्य नेमिले त्यास जबाबदार धरावयास हवे होते. पण पोलादखानास राजे निसटून गेल्याचे समजल्यावर रामसिंगाकडे गेला आणि त्याने रामसिंगास ही बातमी सांगितली. तदनंतर दोघेही बादशहाकडे गेले आणि बादशहास राजांच्या पलायनाची बातमी कथन केली. ती बातमी ऐकून औरंगजेबाच्या अंगाचा तिळपापड झाला. तो रागाने थरथरू लागला. त्याचा राग व इतराजी जयसिंग व रामसिंग या दोघानांही पत्करावी लागली. विजापुरावर जयसिंगाची मोहीम चालू असताच शिवाजीराजे आग्र्यास गेले. जयसिंगास या मोहिमेत पराभव पत्करावा लागला. तसेच शिवाजीराजे बादशहाच्या कैदेतून निसटले ही बातमी शिवाजीराजांच्या अधिकाऱ्यास लागोलाग कळली. तेव्हा राजांचे अंमलदार चहूकडून मोगलावर उठले. हे बादशहास समजताच बादशहाने जयसिंगास परत बोलावून पुत्र मुअज्जम याची नेमणूक पुनः दक्षिणच्या सुभ्यावर केली. तेव्हा १६६७ च्या मे महिन्यात दुःखी मनःस्थितीत जयसिंग दिल्लीस येण्यास निघाला. तो बऱ्हाणपुरास दिनांक २ जुलै १६६७ ला आल्यावर मनुची म्हणतो की, औरंगजेबाचे सांगण्यावरून जयसिंगराजा विषप्रयोगाने मरण पावला (रियासत पृ. २४६) राजे निसटून गेल्यानंतर रामसिंगाच्या हस्तकांना पकडण्यात आले. त्यांचा छळ होताच त्यापैकी कोणी अगतिक होऊन घडल्या प्रकारात रामसिंगाचे अंग असल्याचे खोटेच सांगितले. पण रामसिंगाच्या अंगी पद्धतशीरपणे गुन्हा लागू झाला नाही. तरी पण औरंगजेबाच्या संशयी मनाने घेतले की, रामसिंहानेच हा व्यूह घडवून आणिला म्हणून बादशहाने रामसिंगाचा मरातब काढून घेऊन त्यास दरबारात येण्याची मनाई केली. जयसिंगाचे मृत्यूनंतर त्यास चार हजारी मनसब देऊन आसामात पाठविले. तिकडेच तो वाईट हवेने मृत्यू पावला. शिवाजीराजांस लगेच मारून टाकला नाही ही आपल्या जन्मातली मोठी चूक झाली असे औरंगजेबास अखेरपर्यंत वाटत होते. आपल्या शेवटच्या मृत्यूपत्रात म्हणतो की, " त्या दुष्ट शिव्याच्या बंदोबस्तात थोडी हयगय झाली. त्यामुळे अखेरपर्यंत मला या युद्धाच्या यातना सारख्या भोगाव्या लागत आहेत."[१]

१ सरदेसाई, रियासत शिवाजी, पृ. २६२.

शिवाजीराजांच्या पलायनाची बातमी समजल्यावर औरंगजेबाने महाराजांचे अधिकारी त्र्यंबकपंत डबीर व वकील रघुनाथपंत कोरडे यांना पकडले आणि त्यांची सुटका इ. स. १६६७ एप्रिल ३ ला केली. वकील रघुनाथला बोलावून औरंगजेबाने शिवाजीचा गुन्हा आपण माफ केल्याचे सांगितले.

पुढे गोव्याच्या व्हाईसरायने आपल्या राजास पाठविलेल्या १६६७ च्या पत्रात महाराजासंबंधी कळविलेली खालील माहिती महत्त्वाची आहे. " शिवाजी फोंडा महालात आमच्या जवळ येऊन ठेपला आहे. धूर्तपणा, चातुर्य, पराक्रम, चपलता व लष्करी बुद्धी या बाबतीत शिवाजीची तुलना करावयाची झाल्यास ती सीझर आणि सिकंदर यांच्याशी करावी लागेल. आम्हाला त्यांच्या आरमाराची भीती वाटते. कारण समुद्र किनाऱ्यावर त्याचे किल्ले आहेत.[१]

शिवाजीराजांच्या आगमनानंतर दोन-चार महिन्यांनी कृष्णाजी पंत व त्यांचे बंधू यांनी संभाजीस सुरक्षित स्वदेशी आणून पोचविले. या उपकाराबद्दल राजियांनी त्यास विशवासराव किताब व एक लाख रुपये बक्षीस दिले.

शिवाजीराजांच्या अद्‌भूत सुटकेने त्यांची कीर्ती सर्व देशात पसरली. त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले. महाराष्ट्रात त्यानिमित्त सर्व गडावरून तोफांच्या सरबत्ती सुरू झाल्या. सर्वत्र आनंदी आनंद. आपल्या उपयोगी जे लोक पडले त्यांना राजेंनी बक्षिसे देऊन खूष केले. हिरोजी फर्जंद यास पागेवर सरदारी व पालखी अबदागिरी दिली. सर्व शहरातून हत्तीवरून व किल्ल्यावर, इनामे व बक्षिसे वाटण्यात आली.[२] भर दरबारात बादशहाने आपला जाणूनबुजून अपमान केला असे वाटून ते दरबारातून निघून गेले, ही बातमी देताना एका इंग्रजी पत्रात म्हटले आहे, " शिवाजीराजांच्या उदात्त स्वभावाची व शौर्याची तारीफ आग्र्याचे लोक यापूर्वी करीतच होते, आता औरंगजेबाचे भेटीस आल्यावेळी त्याने जो बेदरकारपणा दाखविला व सडेतोड उत्तरे दिली. त्यामुळे त्यांच्या वीरश्रीचे पोवाडे लोक अधिकच गाऊ लागले आहेत. या विषयावरील राजस्थानी भाटगीते प्रसिद्ध आहेत. अनेक इंग्रजी व डच पत्रात वर्तविल्याप्रमाणे राजेंना ठार करण्याचे अनेक मनसुबे औरंगजेबाने रचले होते. पण राजा जयसिंगाने शिवाजीराजांच्या संरक्षणाची हमी घेतल्यामुळे राजियांच्या जीविताला अपाय झाल्यास सर्व राजपूत कदाचित उठाव करतील अशी भीती औरंगजेबाला वाटत होती.

---

१ स. शं. देसाई, पोर्तुगीज प्र. रं. खंड ३, पृ. ९

२ सरदेसाई, शिवाजी, पृ. २६१.

अनेक डच, इंग्रजी पत्रातील या घटनेचे उल्लेख ऐतिहासिक पुरावा म्हणून मानता येण्याजोगे आहेत.

शिवाजीराजांचा एक बुलंद सरदार नेताजी पालकर राजांवर रुसून विजापूरकरांना मिळाला होता. त्याच्या पराक्रमाने थक्क होऊन राजा जयसिंगाने त्याला आपल्याकडे वळवून मोगल फौजेत घेतले व औरंगजेब बादशहाकडून त्यास मनसब देवविली. तो मोगल बादशहाच्या सेवेत आग्र्यास राहू लागला. राजांनी आग्र्याहून पळ काढल्यावर औरंगजेब बादशहाचा राग अनावर झाला. बादशहाने नेताजी पालकर हा राजांचा नातेवाईक आहे या समजुतीने त्यास त्रास देण्यास सुरुवात केली. त्याला कैदेत टाकले. " तू मुसलमान होत असशील तर तुला हुद्यावर ठेवतो, असा त्यास निरोप पाठवला. कैदेत मरण्यापेक्षा नेताजीने मुसलमान धर्म स्वीकारला. तेव्हा औरंगजेब सुखावला. त्याने नेताजीचे नाव मुहमद कुलीखान ठेवून त्याला महमतखानाबरोबर काबूलच्या स्वारीवर धाडले.[१] तिथे त्याचे मन रमेना. महाराजास दुखविल्याबद्दल त्याला पश्चात्ताप झाला. तद्नंतर १० वर्षांनी तो महाराजांस येऊन मिळाला. दिनांक १९ जून १६७६ रोजी महाराजांनी त्यास हिंदू करून घेतले.

शिवाजीराजे आग्र्याहून परत आल्यावर त्यांनी येसोजी, तानाजी, प्रतापराव, मोरोपंत, अनाजी, सूर्याजी, फिरंगोजी आदी सर्व सरदारास बोलावून घेतले. ही सर्व मंडळी राजगडी जमल्यावर त्यांच्यावर सोपविलेल्या कामाची चौकशी केली. त्यांनी आपल्या कामाचे अहवाल राजियांस सादर केले. तेव्हा महाराजांनी आपला विचार बोलून दाखविला. " पुरंदरच्या तहाने आमचे राज्य अपुरे बनले. मोगलांचे सरदार थोड्याफार शिबंदीनिशी अजून आपल्या मुलुखात आहेत. मिर्झाराजे तर परत गेले. याचवेळी आम्ही उठाव केला तर संतप्त औरंगजेब पुन्हा दक्षिणेत उतरेल. कोकणात आपली घडी नीट वसवावयाची आहे. तेव्हा एकाच वेळी मोगल, आदिलशाही आणि कुतुबशाही यांचे वैर आपणास सोसणार नाही. आपलं राज्य नवे आहे. दोन-तीनदा पराभव पावून, जेरीस आलेल्यांनी परिस्थितीत शत्रू मित्र करून घ्यावा. ती उसंत घेऊन बळ वाढविण्याचा एकच उपाय आम्हास

१ आलमगीरनामा, ९८७ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी, पृ. १७२.

दिसतो. " ह्या सर्व सरदारांची पसंती मिळाल्यावर राजियांनी औरंगजेबास पत्र लिहिले ते असे. " जीव बचावण्यासाठी मला पळून यावे लागले. परंतु बादशाहाचा मी कोणत्याही प्रकारे विरोध करू इच्छित नाही. मी वाटेल ती सेवा करण्यास सिद्ध आहे. मी आपणांस सर्वथा शरण आलो असता आपली फौज मजवर चालून येते काय ? मी माझ्या पुत्रास तैनातीस देऊन आपल्या हुकूमांची अंमलबजावणी करण्यास सिद्ध आहे. ह्या पत्राचे उत्तर राजियांस औरंगजेबाकडून आले नाही म्हणून दक्षिणच्या सुभेदारीवर आलेला औरंगजेबाचा मुलगा मुअज्जम त्याचा मदतनीस दिलेरखान या दोघांनाही वरील आशयाचे पत्र पाठवून तुमच्या मध्यस्थीने बादशहाने माझे अपराध माफ करावे असे सांगितले. ह्या पत्रास मुअज्जम आणि त्याचा मदतनीस दिलेरखान यांनी पसंती दर्शविली. महाराज आग्र्याहून निसटण्यापूर्वीच कवींद्र परमानंद आग्र्याहून निघून त्यांनी दक्षिणेची वाट धरली होती. दौसा या ठिकाणी पोहोचताच त्यांना दौशांच्या ठाणेदाराने रोखले. कारण "शिवाजी आग्र्याहून पळाला त्यास पकडा". असा बादशहाचा हुकूम सर्व ठाणेदारांस मिळाला होता.[१] [ता. २२/०४/१६६७, प. सा. ११५८, रियासत पृ. २६४] दौशाचा ठाणेदार मनोहरदास पुरोहित व नथूराम हे दोघेही मिर्झाराजांचे नोकर होते त्यांनी दौशास त्यांना चार महिने ठेविले. [२३ ऑगस्ट ते २८ डिसेंबर १६६६] नंतर ते सुखरूप मार्गाला लागले. लौकरच मदारी मेहतर व हिराजी फर्जंद देशास सुखरूप येऊन पावले.[२]

शिवाजीराजे पळून गेल्यावर औरंगजेबाने १९ ऑगस्टपासून पकडापकडीला सुरुवात केली. पण औरंगजेबाचे मन त्याला सांगत होते की शिवाजी इतक्या अडचणीत आला असताही आपले स्वराज्य आणि स्वातंत्र्य या बाबतीत त्याचा ताठरपणा बिलकूल कमी झाला नाही. जयसिंगाने आपल्या पत्रात स्पष्टच कळविले होते की शिवाजीचे काही बरे वाईट उत्तरेत झाल्यास दक्षिणेतील मोंगली सैन्याची धडगत राहणे मुष्कील होईल. ह्या सर्व गोष्टींचा औरंगजेबाने विचार करून शिवाजीशी मिळते घेण्याचे धोरण स्वीकारले. आपला मुलगा मुअज्जमला औरंगाबादेस सुभा म्हणून पाठविताना

१ पत्रसार संग्रह, ११५८.

२ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी, पृ. ७८.

दिल्लीहून शिवाजीराजांचे लोक सोडले व तहाची बोलणी लावली. ह्याचे मुख्य कारण इराणचा शहा अब्बास व सरहद्दीवरील युसुफशाही बंडखोर यांनी याचवेळी उचल खाल्ली. त्यांच्याशी मुकाबला करण्याकरिता दक्षिणेत शांतता राहणे औरंगजेब बादशहास जरुरीचे वाटले. म्हणून मुअज्जमने औरंगाबाद येथे द:खनचा सुभेदार म्हणून सूत्रे हाती घेताच बादशहाची सेवा करायच्या शिवाजीच्या प्रस्तावाचे स्वागत केले. कारण शिवाजीराजेंना चिरडून टाकणे शक्य नाही ही गोष्ट त्याच्या चांगलीच लक्षात आली होती. मुअज्जमने मराठ्यांबरोबर वाटाघाटी करून घडवून आणलेल्या तहास बादशहाने मान्यता दिली. राजपुत्र मुअज्जमने आपल्या दिनांक ६ मार्च १६६८ च्या पत्राने राजे यांस कळविले की, बादशहाने शिवाजीस " राजा " ही पदवी बहाल केली.[१] आणि अन्य मागण्यावर विचार चालू असल्याचे त्याच पत्रात लिहिले.

विजापूरकर व गोवळकोंडकर यांजशी मैत्रीचा तह करण्याचे राजे यांनी ठरविले. इ. स. १६६७ मध्ये विजापूर सरदार बहलोलखान व राजाचे बंधू व्यंकोजी या दोघांनी रांगण्याला वेढा घातला. राजेंनी स्वत: जाऊन तो मारून काढला. तेव्हा विजापूरकरांना शिवाजीच्या शक्तीचा आवाका लक्षात आला.[२] आणि पुढच्या ऑगस्ट-सप्टेंबरात (इ. स. १६६७) त्यांनी राजांना दरसाल तीन लाख खंडणी देण्याचे कबूल करून त्यांच्याशी सल्ला केला. कुतुबशहानेही झाल्या प्रकारावरून धडा घेतला आणि राजांना दरसाल पाच लाखाची खंडणी कबूल केली. अशा रीतीने दक्षिण्यांची एकजूट करण्यात राजे यांना यश आले. (रियासत पृ. २६४) मुअज्जमच्या बोलावण्यावरून बाळाजी आवजी चिटणीस यास राजेयांनी तहाची बोलणी करण्यास औरंगाबादेस पाठविले. वाटाघाटीत पूर्वीचा पुरंदरचा तह कायम करावा असे ठरले. हा मजकूर शहाजाद्याने बादशहाकडे पाठविताच बादशहाने पुरंदरचा तह मंजूर केला.

मोगलांनी राजियांचे स्वातंत्र्य मान्य केल्यामुळे त्याचे परिणाम दूरवर झाले. मोगलांचे प्रांतोप्रातीचे सुभेदार, जंजिऱ्याचे सिद्दी, विजापूर व

१ कित्ता, पृ. ८२.

२ कित्ता, पृ. १७५-७७.

गोवळकोंडा येथीस सुलतान व एकंदर लोकसमुदाय यांजपासून शिवाजीराजेंना "स्वतंत्र राजा" असा मान मिळू लागला. वऱ्हाड प्रांताची जागीर सांभाळणे व संभाजीने बादशाही फौजेत मनसबदारी करणे या निमित्ताने औरंगाबाद येथे सरहद्दीवर आपली कायमची फौज ठेवून दिली.[१]

शिवाजीराजे यांनी शहजादा मुअज्जमकडून अशी कबुलात करून घेतली की, विजापूर व गोवळकोंडा या दोन राज्यातून चौथाई व सरदेशमुखी हक्क आपण वसूल करू. त्यास मोगलांनी प्रतिबंध करू नये. परभारे राज्ये दुर्बल करण्याच्या हेतूने शहाजाद्याने शिवाजीराजास हे हक्क दिले. लगेच राजांनी वसुलीस सुरुवात केली. विजापूरच्या सुलतानाकडून तीन लाख रुपये व गोवळकोंड्याकडून पाच लाख रुपये दरसाल खंडणी वसूल होऊ लागली.[२]

□□

१ सरदेसाई, न्यू हिस्टरी ऑफ द मराठाझ, भाग १, पृ. १९२.

२ कित्ता.

१६. पुनरपि मोगलांशी बिघाड (सन १६७०-१६७४)

औरंगजेब बादशहाने दक्षिण सुभ्यावरील राजा जयसिंगास बोलावून त्या जागी शहाजादा मुअज्जमची नेमणूक केली होती. शहाजाद्याबरोबर बादशहाने दिलेरखानासही औरंगाबादला पाठविले होते. पण ह्या दोघांचे एकमेकांशी पटेना, दिलेरखान बादशहास आपल्या चहाड्या सांगतो असा मुअज्जमला संशय होता. तसेच दिलेरखान आपले हुकूम मानीत नाही म्हणूनही मुअज्जम त्यावर रुष्ट होता. आपला पुत्र मुअज्जम शिवाजी बरोबर सलगी करेल अशी भीती बादशहास वाटत होती. तेव्हा मुअज्जम व शिवाजी ह्या दोघांचा स्नेह बिघडावा व राजियांना अद्दल घडावी अशी शक्कल बादशहाने काढली. शिवाजी राजांशी झालेल्या तहाप्रमाणे संभाजी राजांच्या मनसबीच्या पोटी प्रतापराव गुजर आणि निराजीपंत असे औरंगाबादेस शहाजादीजवळ असत. ते दोघे एखादे वेळेस भेद करतील तेव्हा त्यास कैद करावे असे त्याने मुअज्जमला लिहिले.[१] ही पत्रे डाकेने येण्यापूर्वीच शहाजाद्याला त्याच्या वकिलाकडून ही बातमी समजली. ती गुप्तपणे त्याने त्या दोघांस कळविली. तेव्हा ते दोघे तातडीने निघून राजगडास गेले. मागाहून बादशहाची पत्रे आल्यावर "मराठे आधीच पळून गेले" असे त्याने औरंगजेब बादशहास कळविले [२] (इ. स. १६६९ डिसेंबर-जानेवारी).

मुअज्ज्मने पाहिले की दिलेरखानाची अफगाण फौज गरीब रयतेची लुटालुट करीत असते. खान त्यास आळा घालीत नाही अशी तक्रार खानाविरुद्ध बादशहाकडे मुअज्जमने केली. खानाची फौज पिकांचे नुकसान करीत असल्यामुळे राज्याचे भारी नुकसान होत आहे. अशा बातम्या बादशहास हस्तकांकडून समजल्या तेव्हा बादशहाने शहाजाद्यास दिलेरखानास पकडण्याचा हुकूम सोडला. दिलेरखान गोदावरीचे आसमंतात मराठ्यांचा पाठलाग करीत असता आपणांस पकडण्याचा हुकूम झाला असल्याची खबर त्यास कळली [३] तेव्हा तो आपल्या फौजेसह माळव्यात निघून गेला. शहाजादा व जसवंतसिंग हे त्याचा पाठलाग करीत गेले आणि जाताना त्यांनी शिवाजीराजांसही त्वरेने

---

१ श्रीशिवप्रभू चरित्र (सं. गाडगीळ), पृ. ७६-७७

२ कित्ता, पृ. ७७.

३ सरदेसाई, शककर्ता शिवाजी, पृ. २७१.

आपल्या साहाय्यास बोलाविले. ह्या आपसांतील दंडेलीची बातमी हां हां म्हणता देशभर पसरून राज्यांत एकदम गोंधळ उडून गेला. बादशहाने ह्या प्रकरणात लक्ष घालून शहाजाद्यास औरंगाबादेस जाण्याचा हुकूम दिला व जसवंतसिंगास बऱ्हाणपूर येथे रहाण्याची आज्ञा केली. अशारीतीने हे भांडण तात्पुरते मिटविले.[१]

शिवाजीराजांनी ह्या गोंधळाचा उपयोग चांगलाच करून घेतला. आग्र्यास जाण्यापूर्वी जयसिंगाबरोबर केलेल्या तहात राजेंना सिंहगड आदी तेवीस किल्ले मोगलांकडे द्यावे लागले याचे राजांना आणि मातोश्री जिजाबाईंना मोठे वैषम्य वाटत होते. मोगलाई मुलखावर झडप घालावी आणि आपले मोगलांकडे दिलेले किल्ले परत मिळवावे असे राजियांनी ठरविले. त्याप्रमाणे महाराजांचे हुकूम सुटले. मोहिमेच्या योजना ठरल्या. वऱ्हाड, उत्तरगंगाथडी, औसा या मोगली मुलखावर फौजा घालायचे ठरले.[२] व फौजांना त्याप्रमाणे मोगलाईत जाण्याचे हुकूम दिले (जाने. १६७०). मराठी फौजा वऱ्हाडात घुसून त्यांनी मोगली मुलूख लुटला. त्यामुळे औरंगजेबाचे मराठ्यांना नामोहरम करण्याचे मनसुबे जिरले. मराठी फौजांनी पुणे, कल्याण, चौल इत्यादी भागातील नऊ वर्षे चाललेला मोगलांचा अंमल पार झुगारून दिला. प्रांतात शिरून लूट करून वसूल घेतला तेव्हा बादशहाने दिलेरखानास औरंगाबादेस पाठविले. खानदेशात दाऊदखान कुरेशी यास मराठ्यांवर पाठविले. अशा रीतीने तह मोडून मराठ्यांशी पुन्हा युद्ध पुकारले.[३]

सिंहगड काबीज :

हा किल्ला मोगलांकडे जयसिंगाशी केलेल्या तहाने गेला होता. तो स्वराज्यात आणण्याची उत्सुकता मातोश्री जिजाबाई व शिवाजीराजे यांना लागली. त्यांनी हा किल्ला काबीज करण्याची कामगिरी तानाजी मालुसरे या कसलेल्या सरदारावर सोपविली. सिंहगड किल्ल्याचा बंदोबस्त मोगलांनी उत्तम तऱ्हेने ठेविला होता. किल्लेदार उदेभान राठोड हा शूर रजपूत सरदार होता. थोड्याशा मावळ्यांनीशी हा किल्ला काबीज करणे हे काम मोठेच मर्दुमकीचे व धाडसाचे होते. सिंहगड जिंकण्याची कामगिरी फारच कठीण होती. ही कठीण कामगिरी करण्याचे काम तानाजी मालुसरे या मराठा सरदाराने स्वतःच्या अंगावर घेतले. महाराजांस वचन दिले की, मी सिंहगड काबीज करतो.[४] (शिवचरित्र प्रदीप, पृ. २४, ५२) तानाजी मालुसरे याचा स्वराज्य संपादनात सिंहाचा वाटा होता.

१ सरदेसाई, शककर्ता शिवाजी, पृ. २७१.

२ प. सा. सं. १२८२.

३ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ६ वा., प. ११२ सभासद, पृ. ७८.

४ शिवचरित्र प्रदीप, पृ. २४

तानाजीने महाराजांचा आणि आईसाहेबांचा निरोप घेतला. बरोबर धाकटा भाऊ सूर्याजी यास घेतले. तसेच ५०० शे शूर मावळे सैनिक बरोबर घेतले आणि दिनांक ४ फेब्रुवारी १६७० रोजी तानाजी व सूर्याजी, मावळे सैनिकांसह किल्ल्याखाली आले. तानाजीस गडाची सर्व माहिती होती, कारण पूर्वी गड सुमारे १२ वर्षे स्वराज्यात होता. शिवाय माहीतगार माणसेही बरोबर होती. गडाचा आकार काहीसा कुऱ्हाडीसारखा. किल्ल्यास पुणे व कल्याण दरवाजा असे दोन दरवाजे होते. गडात शिरायला तिसरी वाट नव्हती. गडाच्या सर्वांगाला खोलखोल उभे कडे, तटबंदी अगदी भरीव चिऱ्यांची. गडाखाली शत्रू आला तर त्याच्यावर मारा करावयास तोफा बंदुकांसाठीच्या जागा ठेविल्या होत्या. पश्चिमेच्या बाजूला ग़डाला जो कडा होता तो ताठ व खोल. त्यास दोणागिरीचा कडा असे म्हणत. त्याखाली कार्वीचे रान दाट माजलेले असायचे. गडाच्या या बाजूला चौक्या पहारे नव्हते. ही गडाची बाजू भयंकर बळकट होती. तानाजी व सूर्याजी एका रात्री पाचशे शूर मावळ्यांसह लपत छपत दोणागिरीच्या भयाण दरीत शिरले. दोन मावळे घोरपडीच्या सहाय्याने वर जाऊन पोचले. त्यांनी वर पोचताक्षणी वरून खाली माळ सोडली. त्या माळेच्या साहाय्याने तानाजी, आणि तीनशे मावळे किल्ल्यात पोहोचले. किल्लेदारास मराठ्यांच्या आगमनाची चाहूल लागताच किल्ल्यावरील शिबंदी लढाईस सरसरली. दोन्ही सैन्ये काळोखांत समोरासमोर एकमेकांशी लढू लागली. किल्लेदार सरदार उदेभान व तानाजी यांची लढाई जुंपली. तानाजीची ढाल तुटल्यावर त्याने हातावर शेला बांधला व उदेभानच्या तलवारीचे घाव झेलले. पण तानाजी व उदेभान यांना एकमेकांचे प्राणांतिक वार लागून ते दोघेही मरून पडले.[१] सूर्याजीने भाऊ गेल्याचा शोक करीत न बसता मावळ्यांस चेतवून किल्ल्यातील शिबंदी कापून काढून पराभव केला व किल्ला जिंकला व हे वर्तमान शिवाजीराजांस कळविले.

तानाजी पडल्याचे दुःख महाराजांस फार झाले. घडलेली हकीगत ऐकून महाराज म्हणाले की, “ एक गड घेतला पण एक गड गेला ” तानाजीला राजियांनी सिंहगड किल्ला घेण्याची कामगिरी सांगण्याअगोदर तो आपल्या मुलाच्या लग्नाच्या तयारीत होता. राजियांचा आदेश मिळाल्यावर तानाजीने असे उद्‌गार काढले की, “ आधी लगीन कोंढाण्याचे मग रायबाचे ” पण रायबाचे लग्न पार पाडण्यास हा मराठा वीर ह्या पृथ्वीतलावर जिवंत राहिला नाही. रायबाचे लग्न शिवाजीराजांच्या देखरेखीखाली मोठ्या धुमधडाक्यात पार पडले.

---

१ शिवचरित्र प्रदीप.

सिंहगडानंतर पराक्रमाची व यशाची मालिका सुरू झाली. मार्च १६७० मध्ये पुरंदर किल्ला मराठ्यांनी घेतला. चांदवड लुटून बादशाही खजिना ताब्यात घेतला. माहुली, कल्याण, भिवंडी ही कोकणातील स्थळे हस्तगत केली. तद्नंतर नांदेड घेतले. एप्रिल अखेरपावेतो अहमदनगर, जुन्नर, परेंडा इत्यादी प्रांतातील २१ गावे मराठ्यांनी लुटली. माळ लावून लोहगड काबीज करण्यात आला आणि यापुढे मोगलांच्या हालचाली काय होतात इकडे राजांचे लक्ष लागले.[१]

□□



किल्ले सिंहगड

१ बेंद्रे, शिवाजी, पृ. ६५२-६५३.

१७. सुरतेवर दुसरी स्वारी (दि. ३ ते ६ ऑक्टोबर १६७०)

महाराजांच्या लक्षात सुरतेची संपत्ती होती. तिचा विनियोग स्वराज्याच्या कामी करण्याची संधी पुन्हा ऑक्टोबर १६७० मध्ये लाभली. सुलतान मुअज्जम (औरंगजेबाचा मुलगा) याचे शिवाजी राजाशी संगनमत होते. त्याने सुरतेचा सुभेदार मरण पावताच तेथील शिबंदी काढून घेतली. शिवरायास ही बातमी कळली, तेव्हा या नामी संधीचा फायदा घेण्याकरिता महाराज १५,००० स्वार घेऊन सुरतेच्या वेशीवर येऊन थडकले. त्यांजबरोबर यावेळी बहुतेक मोठेमोठे सरदार होते. ते सर्व सुरतेत शिरले. मराठ्यांनी जाळपोळ व लूट केली, पण कोणी विरोध केला नाही. कंपनीचा बहुतेक माल गलबतातून स्वालीला नेऊन ठेविला होता.[१] मराठ्यांनी शहरी तटाला वेढा घातला व थोड्या चकमकीनंतर शहर ताब्यात घेऊन लूट व जाळपोळ सुरू केली. भ्याड नगररक्षक किल्ल्यातील तोफांच्या आश्रयाला पळाले.[२] पहिल्यांच दिवशी म्हणजे तारीख ३ रोजी जुन्या तार्तार सराईवर व इंग्रजाच्या वखारीवर हल्ला झाला. सराई सोडून तार्तार गेल्यावर मराठ्यांस तेथे सोने, रूपे, मौल्यवान पदके, सोन्याचा पलंग वगैरे मिळाले. तीन दिवस व्यापाऱ्यांकडून सारखा पैसा गोळा केला.[२] जवळजवळ निम्मे शहर जाळून टाकले. इतक्यात शिवाजी महाराजांस खबर मिळाली की, बऱ्हाणपुराहून आपल्यावर मोठी मोगल फौज येत आहे. म्हणून सुरतेच्या व्यापाऱ्यास व मुख्य अधिकाऱ्यांस त्यांनी बजावले की, " दरसाल १२ लाख रुपये न द्याल तर पुन्हा पुढच्या वर्षी येऊन राहिलेल्या शहराचा भाग जाळून टाकीन " अशी दहशत बसवून रुपये ६५ लाखांची लूट घेऊन महाराज लगबगीने परतले.[३] या लगबगीचे कारण तेथील वखारवाल्यास नोव्हेंबर ४ पर्यंत समजले नाही.

शिवरायाच्या या सुरतेवरील धडकेची धडक व्यापाऱ्यांस एवढी बसली की, तारीख १३ ला मराठ्यांचा मुक्काम ३५ मैलांवरील पेठ गावी (६ हजार घोडदळ व १० हजार पायदळासह) आहे असे कळले, तेव्हा पुन्हा त्यांची धाड येईल या भीतीने लगेच

१ पत्रसार संग्रह १३५३.

२ पत्रसार संग्रह १३४६.

३ खोबरेकर (सं.) तारीख-इ-दिलकशा, पृ. ६८

सगळीकडे पळापळी होऊन शहर सामसूम झाले. वारंवार खोट्या हुली उठत त्यामुळे लोक संशयग्रस्त व गोंधळलेले राहिले. त्यातून शिवरायांचा तळ ३५ मैलांवरच राहिल्यामुळे केव्हाही तो येऊन पोचेल ही धास्ती वाटली म्हणून सुरतेचा व्यापार कायमचा बसला.[१] या वेळी इंग्रजांनी आपले ठाणे मुंबईस हलविले. बरेचसे व्यापारीही सुरक्षिततेकरिता मुंबईस गेले.

रामनगरवर मराठ्यांचा ताबा :

साल्हेर व मुल्हेर हे किल्ले मोरोपंतांनी ताब्यात घेतल्यावर मोरोपंत पिंगळे यांनी जव्हारचा राजा विक्रमशहा याचा पाडाव केल्यावर लगेच तारीख १९ फेब्रुवारी १६७२ रोजी रामनगरचा राजा सोमशहा याचा पराभव केला. रामनगर शहर हस्तगत झाले. ते पुढे ८ वर्षे मराठ्यांच्या ताब्यात राहिले.[२] आपले संरक्षण कोळी लोकांपासून करावे म्हणून रामनगरच्या चोथिया राजास दमण प्रांतातील काही गावकरी चौथ देत असत. ती आपणास मिळावी अशी मागणी शिवरायांनी केली. तीबद्दल कैक वर्षे वाटाघाटी चालल्या. पण अखेरीस १० वर्षांनी गोवा सरकारने शिवाजीराजांची चौथाईची मागणी मान्य केली.[३] पुढे ही चौथाई मराठ्यांनी सबंध हिंदुस्थानभर लागू केली. चोथीला राजाच्या नावावरून पुढे या करास चौथाई नाव पडले असे डॉक्टर सेन म्हणतात. याच चौथाईच्या लोभाने मराठी सत्ता गुजरातमध्ये पुढे फैलावली.

प्रतापराव गुजर व हंबीरराव मोहिते यांनी सन १६७३ मध्ये आणखी एकदा सुरतेवर स्वारी करण्याचा आव आणला. मराठी सैन्य नर्मदापार झाले. हंबीररावाने या सैन्याचे दोन विभाग सुरतेजवळ केले. एक तुकडी जाळपोळ लुटालूट करीत बऱ्हाणपुराच्या दिशेने गेली. दुसरी हंबीररावाच्या अधिपत्याखाली भडोच लुटण्यासाठी गेली. यावेळी सुरतच्या रयतेस उद्देशून पुढील जाहीरपत्रक प्रतापरावाने काढले.

" सुरत येथील कानुगो, देसाई, व्यापारी, महाजन व शेटे आणि इंग्रज, फ्रेंच व डच वखारीचे कप्तान आणि रयत लोक यांस कळावे की,—

सुरत येथील व्यापारी मालावर सालोसाल जकातीचे उत्पन्न किती येते त्याचा पूर्ण तपास करून चौथा हिस्सा शूर मराठी फौजेची खंडणी म्हणून घेत जावा अशी आम्हांस शिवाजी महाराजांची आज्ञा झाली आहे आणि ह्या कामावर त्यांनी माझी नेमणूक केली

१ प. सा. सं. १३५१.

२ सरकार, शिवाजी पृ. ५६८.

३ प. सा. सं. भाग २, २०९७.

आहे. त्याबरहुकुम तुम्हा सर्वांस असे कळविण्यात येत आहे की, या हुकुमान्वये बऱ्या बोलाने वागण्याची सुबुद्धी देव तुम्हास देईल. तर आमचा गुमास्ता तुमच्याकडे जात आहे. त्यास सर्व कागद दाखवून हिशेब चुकवून द्यावा. असे तुम्ही न कराल तर आमचे शूर शिपाई तुमच्या शहरावर लगेच झडप घालतील व घरेदारे जमीनदोस्त करून तुमची दुर्दशा करतील. त्यांच्या कब्जातून तुम्हांस निसटता येणार नाही. बादशहा आपले संरक्षण करील असे तुम्हास वाटत असल्यास तो तुमचा भ्रम आहे. यापूर्वी दोन वेळा आम्ही तुम्हांस तुडविले तेव्हा कोठे त्याने तुमचे रक्षण केले ? तटावरील तोफांचा धूर तुमच्या डोळ्यांवर येऊन त्यामुळे तुमचे रक्षण होईल असे वाटत असेल तर आमचे शूर योद्धे क्षणमात्रांत ह्या तटाच्या चिंधड्या पिंजलेल्या कापसाप्रमाणे उडवून देतील आणि त्याच तोफांनी तुमची घरेदारे नाहीशी करतील. साल्हेर-मुल्हेरचे किल्ले किती बळकट होते ? ते आम्ही काबीज करू अशी कोणास कल्पनाही नव्हती. परंतु महाराजांच्या पुण्यप्रतापाने आमच्या शिपायांनी ते इतक्या लवकर काबीज केले की ही गोष्ट सांगण्याससुद्धा वेळ जास्त लागेल. हा प्रकार तुम्हास ठावूक आहेच. अशा आमच्या योद्ध्यांपुढे तुमच्या सुरतच्या तटाची किंमत ती काय ? तुमचे नावाजलेले योद्धे दिलेरखान व बहादूरखान हे साल्हेरीवरून मनगटे चावीत परत गेले हेही तुम्हांस ठाऊक आहे. शहरावर एकदम फौज न पाठविता तुम्हास ही आगाऊ सूचना मेहेरबानीने दिली आहे. ईश्वराची तुम्हांवर कृपा असेल तर हा हुकूम पाळण्याची सुबुद्धी तो तुम्हास देईल. नाही तर तुमचे हाल तुम्ही जाणा.'[१]

याजवर सुरतेच्या अधिकाऱ्याकडून आलेला जबाब :—

"प्रतापराव व मराठे, ब्राह्मण, नाईकवाडी व बारगीर यांचे तीव्र बुद्धीस कळावे की, तुमचे पत्र आताच आमचे हातास आले. दुष्टानों ज्या बादशहाचा लहानसा नोकर मिर्झाराजा जयसिंह याने तुमच्या शिवाजीस वठणीस आणून बादशहापुढे नाक घासण्यास लाविले, विजापूर व गोवळकोंडा येथील शहा, ज्या बादशहाच्या नोकरांपुढे नाक घासून सालोसाल खंडणी भरून आपला बचाव करितात, त्या बादशहाचा प्रभाव तुम्हास अजून ठाऊक झाला नाही काय ? तुमच्या या उद्धट शब्दांबद्दल तो तुमची जीभ कापून तुम्हांस दगडाखाली ठेचून काढील, हे तुम्हांस कळत कसे नाही ? पहिली ती सुरत ही नव्हे. तुम्हां उंदरांच्या बंदोबस्तासाठी सुरतेला आता नवीन तट बांधलेला आहे आणि आता

१ सरदेसाई, शिवाजी, पृ. २८०.

येथे मोगलांचे शूर सिंह जागत बसले आहेत. सबब हा भलताच खटाटोप सोडून देऊन, पळून जाऊन, लपून बसा कसे. सुलतान शहाजादा सत्तर हजार फौज घेऊन तुमचे पाठीवर येत आहे. तो आल्यावर तुमच्या प्रेतामुळे गिधाडांची मात्र चंगळ उडेल. आपला बचाव व्हावा अशी तुमची इच्छा असेल तर आजपावेतो तुम्ही जे काही अपहार करून घेतले आहे ते सर्व बहादूरखान व दिलेरखान यांजकडे येऊन सोपून द्या म्हणजे तुम्हांस केलेल्या अपराधांची क्षमा करून बादशहा आपल्या कृपाछत्राखाली घेईल.[१]"

सुरतेच्या अधिकाऱ्यांनी लेखणींत आव आणला खरा, पण लेखणीच्या फटकाऱ्यांने रयतेच्या पोटातील मराठ्यांबद्दल भीतीचा गोळा नाहीसा झाला नाही. वेळोवेळी मराठ्यांच्या आगमनाच्या हुली उठल्यामुळे शहरातील लोक कसे हवालदील होत याची वर्णने सुरत फॅक्टरी रेकॉर्डसमध्ये वाचावयास मिळतात. सन १६७४ ऑक्टोबरमधील गोष्ट. मोरोपंत पिंगळे रामनगरला होते. त्यांच्या सैन्याच्या नुसत्या हालचालीची चाहूल लागली म्हणजे बलसाड, चिखली, गणदेवी इथले लोक पळत. तेथील व्यापारी बांधाबांधी करू लागत. भिल्ल लोक मराठ्यांना अडविण्याकरिता रामनगरच्या खिंडीत जमा होत. अशीच हूल सन १६७५ मध्ये उठली होती. १२ ऑक्टोबरपासून पुष्कळ दिवसपर्यंत शिवाजीचे भय वाटत होते. परंतु रामनगरच्या अरण्यातील भिल्लांनी मोरोपंतांना अडविल्यामुळे त्यांचे सैन्य औरंगाबादकडे वळले.[२]

सन १६७६ मध्ये सुरतेचा मराठी वकील केसोराम यास कामावरून दूर करून त्याच्या जागी सुंदरजी परभूंची नेमणूक केली. शिवाजी महाराज सुरतेवर येणार अशी हूल त्या वर्षी मे महिन्यात दोनदा उठली. मराठ्यांनी रामनगरच्या राजाचा मोड करून कोळी देशात प्रवेश केला. तेथे सैन्य ठेऊन सुरतेपासून आठ दिवसांच्या मुक्कामावर असलेल्या पिंडोल टेकडीवर मजबूत किल्ला बांधला. इतक्या जवळ मराठी सैन्य असल्यामुळे मराठी हल्ल्याची भीती सुरतकरांना वाटणे साहजिक होते. त्यांना वाटले की, मराठे आता सुरतेवर आले नाहीत तरी पावसाळ्यात येण्यास चुकणार नाहीत. मराठे पावसाळ्यात सुरतेवर गेले नाहीत तरी रामनगर येथे असलेल्या मोरोपंतांच्या सैन्याची भीती सुरतकरांना वाटू लागली. पिंडोल व पैनेका घेऊन मोरोपंत तीन दिवसांच्या अंतरावर आल्यावर जाळपोळीची दहशत घालून मोठी खंडणी मागू लागला. सुरतच्या सुभेदाराशी त्याने याबाबत बोलणे चालू केले. इतक्यात महाराजांच्या निकडीच्या बोलावंण्यावरून ते काम अर्धवट टाकून त्यास महाराष्ट्रात परतावे लागले. दमणच्या पोर्तुगीज मुलखातून

१ सरदेसाई, शिवाजी, पृ. २८१.

२ प. सा. सं. १६९१.

येण्याजाण्याचा परवाना मराठ्यास असल्यामुळे सुरतेवर जाण्याचा मार्ग त्यांच्या ताब्यात होता. त्यामुळे तर सुरत शहराचा नाश करण्याचा किंवा मोठी खंडणी वसूल करण्याचा मराठ्यांचा पक्का बेत असावा असे सुरतच्या इंग्रजास वाटू लागले. ही भीती निराधार ठरली. कारण मोरोपंत पेशवे सन १६७६ च्या मे मध्ये रामनगरहून रायगडास परत आले.[१] सन १६७७ च्या एप्रिलमध्ये छत्रपतींच्या सैन्याने पूर्व खानदेशमधील धरणगाव लुटले. लूट नेण्यास गाड्या फार महाग मिळाल्या. धरणगावच्या लुटीची बातमी कानी पडताच सुरतेवर मराठे येण्याची भीती व्यापाऱ्यांना वाटू लागली. सुरतेवर चाल करून न जाता बलसाड, चिखली यांच्या आसपास लहान लहान टोळ्या करून मराठे फिरू लागले. त्यामुळे त्या भागात एकच गोंधळ उडाला. गणदेवीचे लोक भीतीमुळे सुरतेत आश्रयास गेले. सुरतेचा सुभेदार या वार्तेने हबकला. त्याने ५०० शिपायांची नवी भरती करून किल्ल्यात जाणाऱ्या पुलावर कडेकोट बंदोबस्त केला. कोणाचाही पुरा तपास केल्याशिवाय त्याला आत सोडू नये असा सक्त हुकूम अंमलात आणिला. कारण काही मराठे सुरतेतच दबा धरून असावेत असा त्याचा अंदाज होता.[२]

मराठ्यांच्या हालचालींची खबर कळताच सुरत शहर वेळोवेळी कसे कापत होते हे कळते. सन १६७० च्या सुरत-धाडीपासून तो १६७७ मे पर्यंत सुरतकरांस मराठ्यांचा धाक सारखा वाटत होता. इंग्रजांची सतत पत्रापत्री चालत होती. मराठ्यांच्या हालचालीचा कानोसा हरघडी घेऊन हे इंग्रज व्यापारी मुंबईला बातमी लिहीत. सन १६७७ च्या मेमध्ये मराठी सैन्य नवसारी व गणदेवी येथे राहिले. मराठी अधिकाऱ्यांनी तेथील देसायांच्या घरात मुक्काम केला. तेव्हा घरधनी देसाई बायका-मुलांसह सुरतेला पळून गेले. काजी व इतर अंमलदारही पळाले. बाहेरच्या प्रांतात मराठे खंडणी वसूल करीत. शिवाय सुरतेचे सुभेदार व बादशाही अंमलदार यांच्याकडे २०-५० घोडेस्वार रसद आणि खंडणी यांची मागणी करीत. "मराठी सैन्य दररोज थोडे थोडे वाढत असून खुद्द सुरत शहरात त्यांचे काही सैनिक गुप्तपणे राहिलेले आहेत असे खात्रीलायक समजते. फ्रेंच, डच व आम्ही कंपनीची मालमत्ता व स्वत:चे स्वातंत्र्य कसे राखता येईल या फिकिरीत आहोत. शहरावर शिवाजी अकस्मात चालून आला तर त्याला आमच्याकडून विरोध होणे अशक्य आहे. यापुढे त्याच्याशी जितके सामोपचाराने राहाता येईल तेवढे राहण्याशिवाय गत्यंतर नाही.[३]

---

१ प. सा. स. १८४९, ५९.


२ खोबरेकर, गुजरातेतील मराठी राजवट, पृ. ७.

३ कित्ता.

इंग्रजांच्या कयासाप्रमाणे शिवराज पुन्हा सुरतेस गेले नाहीत. पण मोरोपंत पिंगळे यांनी रायगडास जाण्यापूर्वी सुरतेपासून ४० कोसांच्या आत असलेल्या साल्हेर इत्यादी प्रबळ किल्ल्यात शिबंदीचा उत्तम बंदोबस्त करून ठेवला. तसेच (२० कोसांवरील) गणदेवीला सैन्य ठेविले. हे सैन्य आसमंतातील प्रांतात संचार करी, ताबा चालवी आणि हवी ती सामुग्री मिळावी. रामनगर व पिंडोल येथे शिवराजाने सैन्य ठेवून दिल्यामुळे ते सुरतेवर केव्हा चालून येईल याची सारखी धास्ती सुरतेतील इंग्रजांना वाटत असल्याचे उल्लेख १६७८ जानेवारी, १६७९ एप्रिलच्या पत्रात सापडतात.[१]

इत्यर्थ असा की, शिवकाळी सन १६६४ पासून १६८० पर्यंत मराठी सैन्य गुजरातेत सारखे फिरत होते व आपला दरारा गाजवत होते.

□□



सुरत १६७० इ.

१ खोबरेकर, गुजरातेतील मराठी राजवट, पृ. ८.

१८. मोगलाईत आक्रमण

वणी, दिंडोरी, साल्हेर काबीज

राजियांनी सुरतेस दुसऱ्यांदा वेढा घालून (इ. स. १६७० ऑक्टोबर ३-६) सुरत शहर तीन दिवसपर्यंत लुटले. हे मागील प्रकरणात सांगितले आहे. राजे सुरतेहून परतले. ते बागलाणपासून पेठ, दिंडोरी या मार्गाने परतले. त्यांना अडविण्यासाठी बऱ्हाणपुराहून मोगल सेनेने कूच केले. वणी दिंडोरी येथे मोगल व मराठ्यांची गाठ पडली. मोगलांचा सरदार व खानदेशाचा सुभेदार दाऊदखान राजियांवर चालून गेला आणि युद्धास तोंड लागले. राजियांनी दाऊदखानाचा वणी दिंडोरीपाशी १७ ऑक्टोबर १६७० या दिवशी पराभव केला. या युद्धात दाऊदखानाकडील इतर लुटीबरोबर एक हत्ती पाडाव मिळाला त्यानंतर काही वेळ कुजरगडावर घालवून नोव्हेंबरात शिवाजीराजे सातपुडा ओलांडून वऱ्हाडमध्ये आले. मराठ्यांनी वऱ्हाडावर केलेली ही पहिलीच स्वारी होती. या आकस्मिक स्वारीमुळे मोगल अधिकारी चकित झाले व मोगल सैन्य भयभीत होऊन पळून गेले.[१]

वऱ्हाडच्या सुपीक प्रदेशातील लूट सुरत लुटीप्रमाणेच होती. शिवाजी राजांनी स्वतः कारंजावर स्वारी केली. बरोबर साहाय्यार्थ प्रतापराव गुजर हे सेनापती म्हणून होते. कारंजा शहरावर लूट तीन दिवस चालली. सुरवातीस सावकार, व्यापारी स्वतःहून धन देईनात म्हणून त्यांच्या घराघरांतून संपत्ती गोळा केली. त्यानंतर शहर जाळण्याची धमकी देण्यात आली, तेव्हा प्रत्येकाने घरात लपवून ठेवलेले द्रव्य आणून दिले. ह्या लुटीत मिळाली रोकड, जवाहीर, सोने, रुपये, तलम कापड असे एक कोट रुपये किमतीचे द्रव्य प्रतापराव गुजर २००० बैल, २००० गाढवे यांच्या पाठीवर घालून घेऊन गेले. कारंजा शहराच्या लुटीनंतर शिवाजीराजांनी वऱ्हाडांतील इतर गावांवर हल्ले केले आणि

१ सरदेसाई, शिवाजी. पृ. २७१.

लूट मिळविली. या स्वारीचा इतका परिणाम झाला की वऱ्हाडातील जमीनदारांनी दरवर्षी चौथ देण्याचे कबूल केले. प्रतापराव गुजर यांनी जमीनदारांपासून लेखी करार लिहून घेतले. या स्वारीनंतर शिवाजीराजांनी वऱ्हाडावर स्वारी केली नाही पण त्यांचे सरदार रावजी सोमनाथ, चिमणजी दामोदर, परसोजी भोसले ही मंडळी वऱ्हाडमध्ये लुटालूट करीत होती.[१]

साल्हेरची घनघोर लढाई (फेब्रुवारी, १६७२) :

शिवाजी राजांनी आपल्या सेनापतीसह वऱ्हाडांत उतरून सर्व प्रांतातून चौथाई वसूल करण्याचा हुकूम जाहीर केला. मोरोपंत पिंगळे यांनी दिनांक २५ ऑक्टोबर १६७० रोजी त्रिंबकचा किल्ला घेतला व लगेच औंढापट्टा, रावळा, जवळा वगैरे काबीज केले. मराठ्यांची सर्व बाजूने सरशी होत असता दक्षिणचा सुभेदार शहाजादा मुअज्जम हतबल होऊन राहिला. याचा संशय औरंगजेबास आला. त्याला असे वाटले की हा मुअज्जम मराठ्यांशी नरमाईने वागत आहे याचे कारण मोगल तक्ताकरिता भांडत असता त्यास मराठे उपयोगी पडतील हे होय. म्हणून औरंगजेबाने शिवाजीराजांवर मोगलांचा खास सरदार महाबतखान यास पाठविले. त्यास साथ देण्यासाठी माळव्यातून दिलीरखान व गुजरातेतून बहादूरखानास मोठे सैन्य देऊन राजांवर रवाना केले. याप्रमाणे स. १६७१ चे आरंभापासून दीडवर्षपावेतो मोठमोठे मोगल सरदार व प्रचंड मोगल फौजा शिवाजीराजांवर लोटल्या. प्रथम शिवाजीराजांच्या वीस हजार फौजेने साल्हेरीस वेढा घातला. किल्लेदार फत्तुल्लाखान निकराने लढला. पण मराठ्यांच्या पराक्रमापुढे किल्लेदार टिकाव धरू शकला नाही. मराठ्यांनी त्यास मारून दिनांक ५ जानेवारी १६७१ रोजी किल्ला हस्तगत केला.

ह्यावेळी महाबतखानाचा मुक्काम गुलशमाबादेत होता. सबंध उन्हाळा त्याने तेथे काढला आणि जून १६७१ मध्ये तो सुरतच्या दक्षिणेस असलेल्या पारनेरा किल्ल्यावर जाऊन राहिला. इ. स. १६७१ चा पावसाळा संपल्यावर दिलेरखान व बहादूरखान ऑक्टोबर १६७१ त बागलाणात घुसले. त्यांनी अफाट युद्ध साहित्यासह वेढा घातला. वेढ्याच्या यशासाठी शूर सरदार व अगणित फौज खपू लागली. शिवाजीराजे ह्यावेळी शिवापुरात होते. त्यांना दिलेरखानाच्या चढाईची खबर मिळताच त्यांनी मोरोपंत पिंगळे व प्रतापराव गुजर यांना साल्हेरकडे जाण्याचे हुकूम दिले.[२] (सभासद बखर, पृ. ७३-७५).

---

१ वेंद्रे, शिवाजी, पृ. ६५२.
जदुनाथ सरकार, शिवाजी, पृ. १७८-७९.

२ सभासद बखर, पृ. ७३-७५.

मोरोपंत व प्रतापराव यांना राजियांचा हुकूम मिळतांच ते विद्युत्वेगाने फौजेसह साल्हेरकडे धावले आणि साल्हेरच्या वेढ्यावर अकस्मात जाऊन तुटून पडले. कित्येक महिने झोंबाझोंबी चालून इ. स. १६७२ च्या फेब्रुवारीत घनघोर संग्राम झाला. दिलेरखान हरला. त्यास वेढा उठवून परत जावे लागले.

मोरोपंत व प्रतापराव चालून येताहेत हे ऐकताच महाबतखानाने त्यांस अडविण्याकरिता एखलासखानास पाठविले. त्यावेळी घनघोर लढाई झाली. त्यास साल्हेरची लढाई असे नाव आहे.[१] (फेब्रुवारी १६७२) एखलासखान आपल्यावर चालून येत आहे असे दिसताच प्रतापरावाने घाबरलो असे दाखवून पळ काढला. तेव्हा मोगलांच्या फौजेने त्याचा पाठलाग सुरू केला. लगेच प्रतापराव उलटला. फारच घनघोर युद्ध झाले. तीत मोगलांचा पूर्ण पराजय झाला. मोगलांकडील सरदार व १० हजार लोक कामास आले. मराठ्यांकडील काही लोक मेले, त्यांत सूर्यराव काकडे म्हणून राजियांचा लहानपणचा सोबती होता तो पडला. " चार प्रहर युद्ध कडाक्याचे झाले. दुतर्फा दहा हजार माणूस मुर्दा जाहले, घोडे, हत्ती, उंट यांस गणना नाही. अगणित मालमत्ता हातास लागली. या विजयाच्या पाठोपाठ मोरोपंत व गुजर यांनी मुल्हेरगडही जिंकला. एकामागोमाग एक प्रचंड विजय राजियांना मिळत होते. इंग्रज कंपनीवाल्यांनीही शिवाजी फार प्रबळ झाल्यामुळे त्यांच्याशी स्नेहाचे संबंध वाढविण्याची तळमळ लागली होती.[२] (प. सा. सं. ले. १३७९). साल्हेरचा पराभव ऐकून औरंगजेबाच्या अंगाचा तिळपापड झाला. महाबतखानास त्याने परत बोलावून त्यास अफगाणिस्थानात पाठविले. तिकडे जात असता तो रस्त्यातच मरण पावला (स. १६७२). नंतर बादशहाने बहादूरखानास दक्षिणचा कारभार देऊन त्याचे हाताखाली दिलेरखानास नेमिले.

पुण्यावर पुन्हा घाला :

दिलेरखान जयसिंगाबरोबर अनुभवलेला असल्यामुळे तो व बहादुरखान यांनी पुण्यावर हल्ला करण्याचे योजिले. अल्पकाळात त्यांनी पुणे व चाकण यांवर फौजा नेल्या (इ. स. १६७२ जानेवारी). पुणे शहर यावेळी स्वराज्यात होते. खानाने पुण्यावर छापा घातला आणि शहरांतील काही लोकांची त्याने कत्तल उडविली अशी इंग्रजांची बातमी [३] आहे. (प. सा. सं. ले. १४३९) इकडे साल्हेरच्या पराभवानंतर मुल्हेरचा किल्लाही मराठ्यांनी घेतल्याची बातमी ह्या दोघा खानास लागली तेव्हा ते खानदेशात मराठ्यांच्या पाठलागावर गेले.

१ सरकार, शिवाजी, पृ. १८०.

२ प. सा. सं. १४३९.

३ कित्ता, ११८१.

याच सुमारास भागानगरचा सुलतान अब्दुल्ला कुत्बशाह हा दिनांक २१ एप्रिल १६७२ रोजी मरण पावला. राजियांनी याची दखल घेऊन निराजीपंत नावाचा आपला वकील नव्या कुत्बशहाकडे पाठविला. नव्या कुत्बशहाचे नाव होते सुलतान अब्दुलहसन कुत्बशाह ऊर्फ तानाशाह. हा अब्दुला कुत्बशहाचा जावई होता. निराजी पंत भागानगरास गेल्यावर त्यांनी शहाकडे एक लाख होन वार्षिक खंडणीची मागणी केली. कुत्बशहाने ती ताबडतोब मंजूर करून त्यापैकी सहासष्ट हजार होन रोख पंताकडे सुपूर्द केले. बाकीच्या रकमेचा वायदा केला.[१]

मराठ्यांची सत्ता उत्तरोत्तर वाढत होती. हे मुंबईच्या इंग्रजांनी हेरले आणि त्यांनी आपला वकील ले. उस्टीन यास शिवाजी राजांच्या भेटीस रायगडावर पाठविले. राजियांनी त्यास भेट दिली. भेटीत त्याने आपल्या मागण्या राजियांस सादर केल्या. त्याने मंत्र्यांच्याही भेटी घेतल्या. पण उस्टीनला वकिलीत यश लाभले नाही. तो रायगडावरून मे १५, १६७२ पूर्वी परतला.

मोरोपंत पिंगळ्यांनी कोळवण जिंकल्यावर नाशिकवर चाल केली. नाशिकचे रक्षण आपल्या फौजेसह मोगलांचा सरदार जाधवराव करीत होता. हा जाधवराव महाराजांचा मामे भाऊ होता. तो त्रिंबक हस्तगत करून घेण्यासाठी आला असता मोरोपंताने त्याचा पराभव करून त्यास कैद केले (जुलै १६७२). त्यानंतर मोरोपंताने वणी, दिंडोरीचा ठाणेदार सिद्दीहलाल याचाही पराभव केला. त्या दोघांची निर्भर्त्सना बहादूरखानाने केली. तेव्हा ते आपल्या पथकांसह बादशहाची नोकरी सोडून महाराजांच्या नोकरीत ऑक्टोबर १६७२ त दाखल झाले.[२]

शिवाजी महाराजांच्या फौजा पुन्हा वऱ्हाडांत व उत्तर तेलंगणात उतरून खंडण्या गोळा करू लागल्या. बहादुरखान व दिलेरखान यांना चढाईचे धोरण अशक्य वाटून त्यांनी बचावाचे धोरण स्वीकारले. समस्त प्रांतांवर देखरेख ठेवण्यास सोईचे व्हावे म्हणून त्यांनी १६७२ च्या पावसाळ्यांत दौंडच्या पूर्वेस भीमानदीच्या वाकणावर पेडगाव येथे छावणी केली. तिथे एक भुईकोट किल्ला बांधला. त्यास बहादूरगड असे नाव दिले. या ठिकाणाहून शिवाजीवर दाब ठेवणे जास्त सोईचे असे मोगलांनी ठरविले. इ. स. १६७० पासून महाराजांनी स्वराज्याच्या सीमा विस्तारण्यास सुरुवात केली. त्यात त्यांना

१ शि. च. प्र. पृ. २६.

२ सरकार, शिवाजी, पृ. १८९.

त्यांच्या परिपक्व सरदारांनी साथ दिली. मोगलांच्या विरोधास भीक न घालता साल्हेर मुल्हेर किल्ले जिंकून घेतले, वऱ्हाडांत खानदेशात मराठ्यांच्या शौर्याची चुणूक दाखविली. सुरत, बागलाण येथे शत्रूस तडाखे दिले. त्यामुळे मराठ्यांचे राष्ट्रतेज कसास लागले. महाराजांनी राज्य स्थापनेस सुरुवात केल्यापासून ह्या दोन वर्षात मिळालेल्या भव्य यशांने त्यांच्या शत्रूंना पटू लागले की महाराज ही एक सत्ता आहे. बळकट सत्ता आहे. ह्या सत्तेशी समेट घडवून आणणे हेच आपल्या हिताचे असे मोगलांस व विजापूरकरांस वाटू लागले. याचवेळी राजियांनी रायगडी आपणास राज्याभिषेक करून घेण्याचे निश्चित केले आणि सर्व महाल, कारखाने कुटुंबीय मंडळी, कारभाऱ्यांच्या कचेऱ्या त्यांनी रायगडावर नेऊन तेथे वस्ती केली. रायगडासाठी त्यांनी पन्नास हजार होन खर्च केले, मातोश्री जिजाबाईनांही तेथे राहावयास नेले.

इ. स. १६७२ एप्रिलच्या सुमारास राजियांस स्वामी समर्थ रामदास यांजकडून पत्र आले, त्या पत्रांचा सारांश असा, " हे गोब्राह्मण प्रतिपालक राजा, तू दुष्टांचा संहार केलास, कित्येकांस आश्रय दिलास. तू शिवकल्याण राजा. तुझ्या देशी वास्तव्य केले. परंतु तू आमची दाद घेतली नाहीस तरी पण उदंड राजकारण करून तू धर्म संस्थापना करून कीर्ती मिळव. " पत्र वाचल्यानंतर त्यांनी समर्थ रामदासांची चौकशी केली आणि भेटीचा दिवस ऑगस्ट १६७२ मधील ठरविला. महाराज समर्थांच्या भेटीस चाफळला गेले. समर्थांना भेटले. समर्थांना शिवाजी महाराजांच्या कार्याची जाण होती. दोघेही महाराष्ट्र धर्माची वृद्धी करण्यास झटत होते. महाराजांनी स्वामींचा आशीर्वाद मागितला. तो समर्थांनी दिला. महाराज संतुष्ट होऊन काही दिवस समर्थांच्या सहवासात राहून रायगडास परतले. [१]

इ. स. १६७३ च्या सुमारास महाराज व महाराजांच्या सर्व सरदारांस राष्ट्र उभारणीकरिता आपण केलेल्या उद्योगास यश आले असे वाटू लागले. ठिकठिकाणाहून आणलेला पैसा व लूट सर्व सरकारात जमा होऊन राज्याची शक्ती वाढली होती. १५ वर्षे मोगल बादशाहाशी झुंज देऊन त्यात मराठ्यांस यश आले तेव्हा शिवाजीराजांच्या प्रयत्नाचे खरे स्वरूप प्रकट झाले. विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतान महाराजांस खंडण्या देऊ लागले. मोगलांच्या राज्यातील बऱ्याच प्रदेशातून शिवाजीराजांस चौथाईचा हक्कही मिळू लागला. अशा प्रकारे शिवाजीचे राज्य व मराठ्यांचे राष्ट्र लौकिकदृष्ट्या सिद्ध झाले.

---

१ प. सा. सं. ले. १८, ७५.

पन्हाळा काबीज (६-३-१६७३) :

शिवाजीराजांचे मोगलांशी युद्ध चालू असता दिनांक २४ नोव्हेंबर १६७२ रोजी विजापूरचा बादशहा अली आदिलशहा मरण पावला. नवा बादशहा शिकंदर शहा हा गादीवर बसला व मुख्य वजीर पद सिद्धी खवासखान यास देण्यात आले. खवासखान हा शिवाजी महाराजांचा कट्टा वैरी होता. पूर्वी इ. स. १६६४ ऑक्टोबर मध्ये महाराजांनी याचा पराभव करून याला कुडाळातून हाकलून लावले होते. तेव्हापासून त्याचे महाराजांबद्दल जास्तच वाईट मत झाले होते. खवासखानाने विजापूरची सर्व सत्ता बळकाविली. त्यायोगे राज्यांत ठिकठिकाणी दंगे होऊ लागले. अस्थिरता वाढली. ह्याचा फायदा शिवाजीराजांनी घेण्याचे ठरविले. विजापूर दरबारी बाबाजी नाईक पुंडे नावाचा शिवाजीचा वकील होता. त्यास महाराजांनी परत बोलाविले. संघर्षास सुरुवात झाली. राजियांच्या मनात पन्हाळा किल्ला काबीज करण्याचे होते. पन्हाळा पूर्वी स्वराज्यात होता. (दिनांक १८ नोव्हेंबर १६५९) पण सिद्धी जोहारच्या वेळी झालेल्या तहात शिवरायांनी पन्हाळा विजापूरकरांना परत केला होता (दिनांक २२ सप्टेंबर १६६०) पन्हाळा मराठ्यांनी काबीज केल्याची बातमी विजापूर दरबारांत धडकल्यावर तेथे खळबळ उडाली. सर्व सरदारांनी विचार करून आपला नामांकित सेनानी बहलोलखान याच्या नेतृत्वाखाली राजांवर सैन्य पाठविले. विजापूर दरबाराचा हा अफझलखानसारखा अतिशय बडा सरदार होता, त्याचे नाव अब्दुल करीम बहलोलखान, हा अत्यंत शूर होता. हा मूळचा अफगाणिस्थानातील जवान. जातीचा पठाण. तो विजापूर दरबारी आल्यावर त्यास दरबारने मिरज व पन्हाळा सुभ्याचा सुभेदार नेमले होते. खुद्द त्याच्या सुभ्यापैकी पन्हाळा किल्ला घेतल्यामुळे तो चिडला होता. बहलोलखान विजापुराहून निघून तिकोट्यावरून उंब्राणीवर येऊन पोचला. त्यास रांगणा अद्वानी, कार्नोल आदी ठिकाणाहून आणखी सैन्य येऊन मिळावे म्हणून विजापूर दरबारने हुकूम काढले. शिवाय त्याने मोगल सरदार दिलेरखान याच्याकडेही फौजेची मागणी केली. हे राजांना कळले तेव्हा बहलोलखानास दुसरी सैन्ये येऊन मिळण्यापूर्वीच त्यांच्यावर आपण हल्ला करावा म्हणून राजियांनी प्रतापराव व आनंदराव यांची त्याजवर रवानगी केली. दोनच दिवसांत प्रतापराव उमराणीजवळ बहलोलखानाच्या तळाशी आला. उमराणीच्या तलावाचे पाणी बंद करण्याचे हुकूम दिले. पाणी बंद झाल्याचे समजल्यावर खानाच्या तोंडचे पाणी पळाले, तेव्हा खानाने युद्धास सुरवात केली, तीन तास घनघोर युद्ध चालले.

मुंडक्यांचा खच पडला. प्रतापरावांस शरण जाण्याशिवाय खानाकडे दुसरा उपाय नव्हता. खानाने आपला वकील प्रतापरावाकडे पाठविला, शरणागती पत्करली आणि पुन्हा मराठ्यांच्या वाटेस जाणार नाही असे कबूल केल्यामुळे प्रतापरावाने त्यास जाऊ दिले. मराठ्यांच्यापुढे मानाखाली घालून पठाणांची सेना निघून गेली. (दिनांक १५ एप्रिल १६७३)

महाराज यावेळी रायगडावर होते. प्रतापरावाने खानाला शरण आणले, एक खासा हत्ती काबीज केला हे ऐकून शिवराय आनंदले. पण प्रतापरावाने बहलोलखानास सोडून दिल्याचे समजतांच शिवाजीराजे भयंकर रागावले. त्यांनी रावांना लिहिले, " खानाशी सल्ला काय निमित्त केला ? "

वर सांगितलेल्या विजापूर दरबाराच्या गोंधळाच्या स्थितीचा फायदा शिवरायांनी घ्यायचा ठरविले. त्यांनी आपला विश्वासू सरदार अण्णाजी दत्तो सुरनीस यास पन्हाळा काबीज करून तो स्वराज्यांत आणण्यास फर्माविले. पंत दिनांक ६ जानेवारी १६७३ रोजी शिवरायांचा निरोप घेऊन रायगडावरून निघाले ते आपल्या लवाजम्यासह राजापुरास पोहोचले. तेथून त्यांनी आपले हेर पन्हाळगडाच्या टेहळणीसाठी गुप्तपणे पाठविले. दरम्यान शिवरायांनी कोंडाजी फर्जंद यास अण्णाजी दत्तोस मदत करण्यास पाठविले. ह्या दोन्ही सरदारांनी गुप्तवाटा शोधून काढून अंधारात किल्ल्यात प्रवेश करण्याचे ठरविले. त्या तयारीस महिना दीडमहिना लागला. हेरांनी आपली कामगिरी चोख बजाविली होती. कोंडाजीने पन्हाळ्याच्या एका विशिष्ट अंगाने मध्यरात्रीस जायचे. निवडक मराठ्यांची तुकडी बरोबर घ्यावयाची, अण्णाजी पंतांनी फौजेची एक टोळी घेऊन गडानजीकच्या एका अरण्यात दबा धरून बसायचे असा बेत ठरला.

कोंडाजीने आपल्या बरोबर मर्द मराठे ६० घेतले. दिनांक ६ मार्च १६७३ रोजी रात्री ते दोऱ्यांवरून किल्ल्यावर चढले. भेद यशस्वी होऊन ते वर जाऊन पोचले, तेव्हा किल्ल्यांतील लोक सावध होऊन त्याजवर चालून आले. इतकी कडी गस्त ठेऊनही शत्रू आला कसा हेच कोणाला समजेना. शत्रू अफाट असावा असे त्यांस वाटले. भयंकर लढाई जुंपली. कोंडाजीने एकदम किल्लेदारावर तलवार उगारून चाल केली. दोघांचे अटीतटीचे तुंबळ युद्ध झाले. कोंडाजीने किल्लेदाराचे मुंडके उडविले. किल्लेदार

गडावरच्या राजवाड्यापुढे ठार होऊन पडला. अवघ्या दोन-तीन तासात पन्हाळा किल्ला मराठ्यांनी जिंकला.[१] महाराज रायगडावर होते. त्यांजकडे जासूद पाठविला. ही आनंदाची बातमी महाराजांस २ दिवसांनी कळली.

लागलीच शिवाजीराजांनी पन्हाळगडावर जाण्याची तयारी केली आणि ते निघाल्यानंतर पन्हाळगडावर दिनांक १६ मार्चच्या सुमारास पोहोचले. तेथे महिनाभर राहून त्यांनी किल्ल्याचा उत्तम बंदोबस्त करून विजापूरकरांवरील मोहिमेचे मार्गदर्शन केले. ह्या स्वारीचे वर्णन पर्वत ग्रहणाख्यान ह्या जयराम पिंडे विरचित पुस्तकात मिळते. महाराज पन्हाळगडावर असता प्रतापराव महाराजांच्या भेटीस गेल्यावर महाराजांच्या सवालाचे उत्तर त्याला देता आले नाही. महाराजांनी प्रतापरावास विचारले की खानास सोडण्याची परवानगी कुणी दिली तुम्हाला ?

राजियांचे म्हणणे खरे होते. प्रतापरावाने खानास सोडून दिले ही मोठी चूक केली हे त्यास कळून आले. महाराज आपल्यावर रागावले आहेत ही गोष्ट त्याच्या मनाला फार लागली. तो दखखन भागात उद्विग्न मनःस्थितीतच स्वाऱ्या करू लागला. उंब्राणीच्या युद्धानंतर प्रतापरावाचे सैन्य पुढे धारवाड, हुबळी या बाजूल लूट करण्यासाठी गेले. इ. स. १६७३ एप्रिल १६ रोजी हुबळीची इंग्रजांची वखार लुटून त्याने सात-आठ हजार होनांचा माल नेला. (प. सा. सं. ले. १५२४, ३७, ३८) वखारीस खणता लावून सुमारे तीस हजार रुपयांची दौलत त्याने मिळविली नंतर तो कडवाड प्रांतात घुसला. [२](प. सा. सं. ले. १५४४).

बहलोलखान तावडीत सापडला असता त्यास प्रतापरावाने सोडून दिल्याबद्दल राजियांनी त्याची निर्भर्त्सना केली. आणि खानाचा पाडाव केल्याशिवाय आम्हास तोंड दाखवू नये असा खरमरीत निरोप त्यास पाठविला. हे शब्द जिव्हारी लागून प्रतापरावाने वर सांगितल्याप्रमाणे हुबळीची धनाढ्य पेठ लुटली. त्यावेळी मुजफरखान त्याजवर चालून आल्यामुळे लुटीचे काम अर्धवट टाकून तो परत फिरला.

पन्हाळ्याहून रायगडाला शिवाजीराजे जून १६७३ च्या सुरवातीस परतले. त्यावेळी इंग्रज वकील टॉमस निकल्स हा रायगडावर आला होता. त्याने दिनांक ३ जून रोजी

१ सरदेसाई, शिवाजी, पृ. २८५.

२ प. सा. सं. ले. १५४४.

महाराजांची भेट घेतली आणि वखारीचे नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली. तेव्हा राजियांनी त्याच्या बोलण्याकडे कानाडोळा केला.[१] (प. सा. सं. ले. १६३६).

तद्नंतर २७ जुलै १६७३ रोजी राजियांनी सातारा काबीज केले. पावसाळ्यात काहीही कारवाई न करता राजियांनी तो काळ जिंकलेल्या मुलखाची व्यवस्था करण्यात घालविला. दसऱ्यानंतर राजांच्या सरदारांनी वाईजवळच्या पांडवगडावर छापा घातला व दिनांक १३ ऑक्टोबर रोजी गड काबीज केला. त्याच दिवशी राजे साताऱ्यास येऊन त्यांनी बाळाजी आवजी चिटणीस या राज्याच्या सेवेत तन, मन, धन एकवटून निष्ठेने सेवा करणाऱ्या मौल्यवान हिऱ्याचा सातारा मुक्कामी पालखी बहाल करून गौरव केला. यानंतर राजियांनी बंकापूर लुटले. पुढे सतत तीन महिने राजे विजापूर मुलखांत धुमाकूळ घालीत राहिले. सर्जाखानाशी लढताना मराठावीर विठोजी शिंदे चंदगड येथे ठार झाला. [२] त्याचा सूड महिमाजी शिंद्याने लगेच उगविला. महिमाजीने सर्जाखानाला गाठून ठार केले (दिनांक ६ डिसेंबर १६७३) यावेळी राजे कद्रा येथे होते.

मध्यंतरी बहलोलखान बरा होऊन त्रासदायक हालचाली करू लागला. बहलोलखानाने चांगली तयारी करून कोल्हापुरास तळ दिला आणि तिथून तो पन्हाळा, राजापूर, कोकण या प्रदेशांतून शिवाजीराजांचा अंमल साफ उठविण्याचा उद्योग करू लागला. बहलोलखान बेळगावच्या वाटेने येत असल्याची बातमी प्रतापरावास लागली. तेव्हा उंब्राणीच्या चुकीची दुरुस्ती करण्याच्या इर्षेने प्रतापरावाने कोल्हापूरच्या दक्षिणेस चाळीस मैलांवर नेसरी येथे खिंडीत बहलोलखानाल गाठले. पण तेथे उतावीळपणे ७ स्वार बरोबर घेऊन तो शूर सेनापती अविचाराने पुढे घुसल्यामुळे अडचणीत सापडला आणि चकमकीत पडला [३] (फेब्रुवारी २४, १६७४). राजियांचा ठपका अंतःकरणास लावून घेऊन प्रतापरावाने हा आत्मयज्ञ केला. त्यामुळे राजियांस पुढे दुःख झाले. ६ वर्षांनी याच प्रतापरावाची मुलगी महाराजांनी राजारामास केली.

---

१ प. सा. सं. लं. १५३६.

२ शि. च. प्र., पृ. २६.

३ सरदेसाई, शिवाजी, पृ. २८६.

प्रतापराव पडल्यावर त्याचा दु:खी सेनापती आनंदराव मकाजी याने पुढे होऊन बहलोलखानाचा जोराने पाठलाग केला व त्याचा पराभव केला त्यानंतर आनंदरावाने बंकापुराकडे जाऊन स. १६७४ मार्च २३ ला बहलोलखानाच्या स्वत:च्या जहागिरीतील संप गावची पेठ लुटली व ३००० बैलांवर लादण्या इतकी लूट मिळविली. प्रतिकारासाठी आलेल्या खिदरखानाचा त्याने सहज पराभव केला. लूट मिळविण्यासाठी बालाघाटात निघून गेला व तिकडून यशस्वी होऊन परत आला.

□□



नेसरी गाव

१ सरदेसाई, शककर्ता शिवाजी, पृ. २८६-८७.

१९. राज्याभिषेक

शिवाजीराजे औरंगजेबाच्या कैदेतून निसटून महाराष्ट्रात सुखरूप आले. तद्नंतर मुअज्जमच्या सांगण्यावरून बादशहाने शिवरायांच्या " राजा " या पदवीस सन १६६८ च्या प्रारंभी मान्यता दिली. दक्षिणेतील शाह्या विजापूर व गोवळकोंडा. त्यापैकी विजापूरकरांच्या अंमलाचे उच्चाटन महाराजांनी महाराष्ट्रातून केले होते. तसेच गोवळकोंड्याच्या सुलतानाने राजियांस खंडणी देऊन मांडलिकत्व कबूल केले होते.

" हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे " असे शिवाजीराजे वयाच्या १० व्या वर्षांपासून म्हणू लागले. शिवाजीराजे व मातोश्री जिजाबाई यांना शहाजीराजांनी बंगळूरहून पुण्यास पाठविले. त्यावेळी त्यांच्याबरोबर राज्यकारभारास लागणारे पेशवे, मुझुमदार, डबीर, सबनीस इत्यादी अधिकारी दिले. सन १६४० पासून राजे " प्रतिपच्चंद्ररेखेव " हा शिक्का वापरू लागले. परमानंदाच्या शिवभारतात अफझलखान वधापूर्वीही शिवाजीराजे चक्रवर्ती राजाची चिन्हे धारण करीत होते व सिंहासनावर बसत असा उल्लेख आहे.

आग्र्याहून येताक्षणीच शिवाजीराजे यांनी " राजा " हा किताब धारण केला व आपल्या नावाचे नाणे पाडले असे बुंदेल्यांची बखर म्हणते. इ. स. १६७४ च्या सुरुवातीस शिवरायाचे राज्य जव्हार रामनगरपासून कारवारपर्यंत आणि बागलाण, पुणे जिल्ह्याचा निम्मा भाग, सातारा, कोल्हापूर, दक्षिण साताऱ्याचा बराचसा भाग असे पसरले होते.[१] महाराजांनी विजापूर व मोगल यांजशी सतत पंचवीस वर्षे टक्कर देऊन महाराष्ट्रात स्वतंत्र राज्याची निर्मिती केली. शिवाजी महाराजांची स्वतंत्र राज्य स्थापनेची कल्पना शहाजीराजे व मातोश्री जिजाबाईंची होती. ती सिद्धीस जाण्यासाठी व नूतन राज्याची जाणीव सर्व जनतेच्या ठिकाणी उत्पन्न करण्यासाठी शिवाजी महाराजांनी आपणांस यथाविधि राज्यभिषेक करवून घेण्याचा संकल्प सोडला. राज्याभिषेक करून स्वतंत्र राज्य घोषित केल्यानंतरच रयतेकडून कर वसूल करणे, कायद्याने त्यांचे नियंत्रण करणे, परराज्यांशी बरोबरीच्या नात्याने व्यवहार ठेवणे वगैरे गोष्टी करणे सोपे झाले असते. खुद्द महाराष्ट्रातील काही मराठे सरदार भोसल्यांचे कूळ सामान्य समजत. त्यांच्या

---

१ पगडी, महाराष्ट्र आणि मराठे, पृ. ४३.

विचारांना शह देण्यासाठी तसेच ते मराठे सरदार आम्ही यवन पादशहाचे पुरातन नोकर, चार-पाचशे वर्षांचे जुने सरदार आम्ही कदीम, तालेवार सरदार, मोगलांचे अधिकारी, राजांना वा त्यांच्या वडिलांस हा मान कधीही प्राप्त झाला नव्हता असे म्हणत व शिवाजीच्या उच्चासनास विरोध करीत. त्यांना शिवाजीराजांनी अभिषिक्त सत्ताधीश होऊन दाखवणे क्रमप्राप्त होते. देवगिरीचे स्वतंत्र राज्य सन १३१८ मध्ये कोसळल्यापासून १६७४ पर्यंत सबंध महाराष्ट्रात हिंदू स्वतंत्र राजाने राज्याभिषेक करवून घेतला नव्हता.

त्याकाळी मराठे सरदारांना राजे हा किताब बादशहाकडून क्वचित प्रसंगी मिळत असे. शिवाजी महाराजांनाही तो लाभलेला होता. पण त्यापैकी कुणी राज्याभिषेक करवून घेतला नव्हता.

राज्याभिषेकाच्या आवश्यकतेविषयी सर जदुनाथ सरकार लिहितात, शिवाजीने अफाट पराक्रम केले. पुष्कळ प्रांत जिंकले, अगणित संपत्ती मिळविली, शूर फौजा पदरी बाळगल्या, लढाऊ जहाजे बांधली यामुळे परमेश्वरी संकेताप्रमाणे हजारो लोकांचे जीवन त्यांच्या इच्छेवर अवलंबून राहिले. तथापि, अभिषेकपूर्ण राजा ही पदवी प्राप्त झालेली नसल्यामुळे राजकीय संबंधात इतर बादशहाशी वागताना त्याला मोठीच अडचण भासत असे. त्यांच्या अलोट साहसाने व प्रखर बुद्धिसामर्थ्याने सर्व जग थक्क होऊन गेले तरी औरंगजेब बादशहा त्याला एक लहानसा जमीनदार समजत असे. आदिलशहाच्या दृष्टीने तर तो पदरच्या सरदाराचा बंडखोर पुत्र ठरलेला होता. गोवळकोंड्याच्या कुतुबशाहीची शिवाजीविषयी भावना निराळी नव्हती. या कारणामुळे शिवाजीराजांनी राज्याभिषेक करून घेण्याचा घेतलेला निर्णय अचूक होता.[१]

रायगड राजधानीसाठी शिवाजीराजे यांनी वडील शहाजीराजे यांच्या समवेत चर्चा करून निश्चित केली हे मागील प्रकरणात सांगितले आहे.

राज्याभिषेक करवून घेण्यास शिवाजीराजांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. परशुरामाने सर्व क्षत्रियांचा २१ वेळा नायनाट केला असे समजून भोसले व इतर मराठे सरदारास क्षत्रिय न समजता ब्राह्मणवर्ग त्याना शूद्र ठरवीत. या प्रसंगी कित्येक ब्राह्मणांनी विरोध केला (पृ. २९३ सरदेसाई) चातुर्वर्ण्याच्या दृष्टीने भोसले शूद्रात मोडत, कित्येक मराठे सरदार भोसल्यांचे कूळ कमी समजत. शिवाजी राजे हे भोसले कुळात जन्मले. हे भोसले कूळ मूळचे राजपुतान्यातील शिसोदे कुलातील. त्यांची उत्पत्ती दाखविणारा

१ सरकार. शिवाजी, ५वी आ., पृ. २०२.

वंशवेल चिटणीस बाळाजी आवजी यांनी राजपुतान्यात अधिकारी माणसे पाठवून आणविला. तसेच बाळाजी आवजीने स्वतः राजपुतान्यात जाऊन तिकडील होत असलेल्या राज्याभिषेक समारंभाची व भोसले कुळाची पूर्वपीठिका पैदा करून आणिली.[१]

राजपुतान्यात जे राज्याभिषेक समारंभ होत ते भट्ट घराण्यांतील विद्वानांचे हातून करविण्याचा प्रघात होता. त्यास अनुसरून गागाभट्ट या विद्वान संस्कृत पंडितास तो काशीहून नाशिक क्षेत्री आला असता राजियांनी मंडळी पाठवून अभिषेक समारंभास येण्याची विनंती केली. तेव्हा गागाभट्टांनी आपल्याबरोबर विद्वान पंडित घेतले आणि ते रायगडी महाराजांच्या भेटीस आले. राजियांनी गागाभट्टाचे मनोभावे स्वागत केले. तेव्हा गागापंडित भारावून जाऊन म्हणाले, " चार पातशहांना आपण नामोहरम केले आहे. आता आपण हिंदूंची स्वतंत्र पातशाही निर्माण करावी, राजसिंहासनावर आरूढ होऊन राज्याभिषेक करवून घ्यावा " [२]. गागाभट्ट आणि शिवाजी यांची इ. स. १६६३ पासून चांगलीच ओळख झाली होती. इ. स. १६७३ अखेर शिवाजी राजांचा लौकिक सर्वतोमुखी झाला असता हिंदू धर्माभिमानी गागाभट्टांनीही त्यांची दखल घेतली असावी.[३] सभासद लिहितो त्याप्रमाणे गागाभट्टांनीच " मराठा राजा छत्रपती व्हावा असे चित्तांत आणिले " व त्यानुसार बोलणे झाले. सभासद सांगतो गागाभट्टांनी आपला विचार सांगितला व तो राजियांस मानवला. शेवटी गागाभट्टांबरोबर ह्या विषयावर वाद घालण्यास कोणी सापडला नाही. तेव्हा राज्याभिषेक विधी गागाभट्टांनीच अध्वर्यू होऊन पार पाडावा असे ठरले. राज्याभिषेक विधीने महाराजास आपोआपच श्रेष्ठ स्थान प्राप्त झाले. सभासद लिहितो त्याप्रमाणे " मऱ्हाठा पातशहा एवढा छत्रपती झाला ही गोष्ट कांही सामान्य नाही. हीच राज्याभिषेकाची खरी कामगिरी. " [४]

समारंभाची घटना (दि. ६ जून १६७४) :

महाराजांस राज्याभिषेक होणार ह्या वार्तेने स्वराज्यामध्ये उत्साह संचारला. महाराजांनी महोत्सवास शोभेल अशी पूर्वतयारी केली. बत्तीस मण सोन्याचे राजसिंहासन तयार करण्यात आले. पृथ्वी मोलाची नवरत्ने सिंहासनाला जडविण्यात आली. मोत्याच्या झालरीने जडावाचे छत्र शोभू लागले. सिंहासनाभोवती रत्नजडीत आठ खांब उभे केले.

१ सरकार, शिवाजी, ५वी आ., पृ. २०३.

२ सभासद, (सं. गाडगीळ) पृ. १०२.

३ बेंद्रे, शिवाजी च., पृ. ७३८-३९

४ सभासद, कित्ता, पृ. १०२.

तदनंतर गागाभट्टांनी मंत्रिमंडळातील वृद्धांच्या सल्ल्याने राज्याभिषेकाचा मुहूर्त ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शके १५९६ ठरविला. राजांनी प्रतापगडावरील भवानी देवीच्या देवळात जाऊन देवीचे दर्शन घेतले आणि आपल्या राज्यातील इतर देवालये आणि धार्मिक स्थळे यानांही भेटी दिल्या. राज्याभिषेकाच्या आदल्या दिवशी महाराजांनी उपवास केला आणि ध्यानधारणेत दिवस व्यतीत केला. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून परंपरेप्रमाणे अभ्यंगस्नान केले. नंतर मातोश्री जिजाबाईंना व अन्य वडिलधाऱ्या मंडळींना नमस्कार केला आणि त्यांचे आशीर्वाद घेतले. राज्याभिषेकाचे दोन महत्त्वाचे विधी म्हणजे अभिषेक आणि छत्रधारण.

अभिषेकासाठी महाराजांनी वस्त्रभूषणे परिधान केली होती. त्यांची पट्टराणी सोयराबाई हिच्या महावस्त्राच्या पदराचे एक टोक व महाराजांच्या अंगरख्याचे एक टोक यांची लग्नाच्यावेळी मारतात तशी गाठ मारलेली होती. ती दोघं पाटावर शेजारी-शेजारी ऐंद्रियशांती विधीसाठी चौरंग आणि पादपीठ यांवर बसली आणि पाठीमागे लागूनच संभाजीराजांना बसविले. पंतप्रधान मोरोपंत पिंगळे यांच्या अधिपत्याखाली महाराजांचे अष्टप्रधान मंडळ नद्यांचे पवित्र पाण्याने भरलेले कलश घेऊन सभोवती उभे होते. उपाध्याय वेदमंत्रांचे घोष करत होते आणि १६ सुहासिनी पंचारती करत होत्या.

अभिषेक विधीच्या वेळी महाराजांनी उंची केशरी पोशाख केला होता. पोशाखावर सोन्याची नक्षी केलेली होती. मोत्यांच्या माळा लावलेला राजमुकुट मस्तकावर धारण केला होता. कानात रत्नजडीत कर्णभूषण आणि गळ्यात हिऱ्या-मोत्यांचे हार होते. महाराजांनी पुन्हा गुरुजनांना आणि जिजाईला नमस्कार केला. जिजाईने आपल्या यशस्वी पुत्राला आशीर्वाद दिले आणि आनंदाश्रू ढाळले.

राज्याभिषेकाचा महाल उंची मखमल, किनखाप आणि मोत्यांनी सजविलेला होता. त्यांच्या भिंतींवर वैदिक प्रतीके आणि चिन्हे रेखाटली होती. सिंहासनसुद्धा वैदिक प्रतीके आणि चिन्हे यांनी सजविले होते. रत्नखचित सोन्याच्या पत्र्याने सिंहासन मढविले होते. हिरव्यागार केळीच्या पानांनी आणि आंब्यांच्या टाळांनी राजवाड्यांची प्रवेशद्वारे व अंगणे सुशोभित केली होती. महाद्वाराशी उंची वस्त्रप्रावरणांनी व दागिन्यांनी सुशोभित केलेले दोन घोडे व हत्ती पहारा देत होते. शहनाई, नगारा आणि इतर वाद्ये त्याप्रसंगी वाजविली जात होती.

तोफांची सलामी :

महाराजांच्या सिंहासनारूढ होण्याच्या वेळी स्वतंत्र हिंदू राजाला सलामी देण्यासाठी सर्व किल्ल्यांवर तोफा बसविल्या होत्या. गागाभट्ट मोत्यांनी सजविलेले किनखापाचे राजछत्र घेऊन पुढे आले. त्यांनी ते शिवरायांच्या डोक्यावर धरले आणि लोक समुदायाने, " श्री छत्रपती शिवाजी महाराज जय हो " असा कंठरवाने अनेक वेळा जयघोष करून, राजदरबार दुमदुमून सोडला. महाराजांनी आपल्या सरदारांना, अधिकाऱ्यांना आणि अनुयायांना तोपर्यंत चालू असलेल्या फारशी पदव्यांच्या जागी परंपरागत चालत आलेल्या भारतीय पदव्या बहाल केल्या.

शिवाजी महाराज आपल्या घोड्यावर बसले आणि रायगडावरील जगदीश्वराच्या देवळात मिरवणुकीने गेले. तेथे हत्तीवर आरूढ होऊन राजेशाही इतमामाने गडावरील रस्त्यावरून मिरवत गेले आणि गडावरील लोकांनी " क्षत्रिय कुलावंतस छत्रपती शिवाजी महाराजांचा " जयजयकार केला. हिंदूंचा स्वतंत्र राजा सिंहासनारूढ झाल्याचे कोकणाने अनुभवले. कोकण धन्य झाले. अशा प्रकारे पुणे, सुपेचा एक जहागिरदार हिंदवी स्वराज्याचा छत्रपती म्हणून ओळखला जाणारा स्वतंत्र राजा झाला.

सर्व महाराष्ट्रभर शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाची घटना फार महत्त्वाची समजली गेली. ऑक्सिंडेन या इंग्लिश वकिलाने, नारायण शेणवी या इंग्रजांच्या दुभाषाने आणि वेंगुर्ल्याचा डच व्यापारी अब्राहम ली. फेबर याने या घटनेची वर्णने लिहून ठेवलेली आहेत.


राज्यारोहणाच्या घटकेपासून नवा राज्याभिषेक शक सुरू केल्याने महाराज युगप्रवर्तक शककर्ते ठरले. स्वतंत्र कालगणना व स्वतःचे नाणे शिवराई होनही पाडण्यात आली. या दोन्ही गोष्टी सार्वभौमत्व दाखवितात. तसेच आपल्या प्रधानांची सर्वत्र रूढ असलेली फारसी नावे रद्द करून त्यांच्या जागी पेशव्याबद्दल मुख्य प्रधान, मुझुमदार याबद्दल अमात्य, सुरनीस याबद्दल सचिव अशी संस्कृत नावे ठेविली. ही त्यांची स्वाभिमानी कृती आणि इष्ट वाटेल त्याबद्दलचा मोकळेपणाने स्वीकार करण्याची वृत्ती फार महत्त्वाची आहे. राज्यव्यवहारात चालू असलेला फारसी शब्दांचा सुळसुळाट थांबण्यासाठी स्वभाषेचा प्रचार व्हावा या हेतूने त्यांनी रघुनाथ पंडितांकडून " राज्यव्यवहार कोश " या नावाचा कोश मुद्दाम करवून घेतला. तसेच पंचांगाच्या सुधारणेसाठी महाराजांच्या प्रोत्साहनाने कृष्ण ज्योतिषी याने " करण कौस्तुभ " नावाचा नवा करणग्रंथ तयार केला. रायगडावर एक टाकसाळ बांधविली. त्यात तांब्याची व सोन्याची नाणी तयार होत.[१]

१ आवळसकर, रायगडची जीवनकथा, पृ. २६.

शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक अशा रीतीने अनेक दृष्टींनी क्रांतिकारक ठरला. तसेच राज्यारोहणाने महाराजांनी स्वतंत्र मराठी राज्य अस्तित्वात आल्याचे जणू जगाला जाहीर केले.

शिवाजी महाराजांनी आपणांस राज्याभिषेक करवून घेतला ही बातमी औरंगजेब बादशहास जेव्हा समजली तेव्हा बादशहा तक्तावरून उतरून अंतःपुरात गेला आणि दोन्ही हात भुईस घासून आपले देवाचे नाव घेऊन परम खेद केला. दोन दिवस अन्न-उदक घेतले नाही आणि बोलले की, " खुदाने मुसलमानाची पातशाही दूर करून तक्त बुडवून मराठी यांस तक्त दिले, आता हद्द झाली. " बादशहाची समजूत मोठमोठ्या वजिरांनी घालून तक्तावर बैसविले. विजापूर, भागानगरच्या सुलतानांना हे वर्तमान कळल्यावर त्यांना खेद झाला. तसेच रुमशाम, इराण, दुरान आदी पातशहा सिंहासन सोहोळ्याची बातमी समजताच मनात खेद करू लागले.[१]

□□



शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक समारंभ

१ सभासद, पृ. ८७.

२०. आदिलशाहीत पुन्हा आक्रमण

इ. स. १६७४ मध्ये शिवाजी महाराजांनी राज्यारोहण केले ही बातमी ऐकून औरंगजेब बादशहाची झोप उडाली. महाराजांचे राज्यारोहण ही गोष्ट महाराष्ट्राच्या व भारताच्या इतिहासात अपूर्व होती. मोगल साम्राज्य त्यावेळी आसेतुहिमाचल पसरले होते. विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतान मोगल बादशहास घाबरून होते. त्यांची राज्ये दक्षिणेत तंजावर त्रिचनापल्लीपर्यंत पसरली होती. उत्तरेत कारकोरम, पश्चिमेस गुजरात, पूर्वेस आसाम आणि दक्षिणेत भीमेच्या काठापर्यंत औरंगजेबाचा रास्त अंमल होता. अशा ह्या विशाल साम्राज्याविरुद्ध तसेच विजापूर व गोवळकोंडा या शाह्यांविरुद्ध सतत पंचवीस वर्षे टक्कर देऊन महाराजांनी महाराष्ट्रात स्वतंत्र राज्याची निर्मिती केली. मोगलांचा रूबाब पार नाहीसा झाला. याचाच परिणाम म्हणजे उत्तरेत रजपूत, बुंदेले, जाट आणि शीख इत्यादींनी अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात मोगल साम्राज्य खिळखिळे करून टाकले. आपल्या राज्याभिषेकास मोगलांकडून विरोध होऊ नये म्हणून भर पावसाच्या तोंडावर ६ जूनला महाराजांनी राज्याभिषेक दिन ठरविला. शिवाजी महाराजांची सर्वांत मोठी कामगिरी म्हणजे भारतीय जनतेत प्रचंड आत्मविश्वास निर्माण केला ही होय. स्वधर्म, स्वसंस्कृती यांचा अभिमान बाळगून पाऊल पुढे टाकले तर जगातील कोणतीही शक्ती दीर्घकाल टिकाव धरू शकत नाही हे त्यांनी राष्ट्राला शिकविले.

शिवराज्याभिषेकाच्या समारंभाने औरंगजेबाच्या अंगाचा तिळपापड झाला. त्याचा औरंगाबाद येथील सरदार बहादूरखान हा राज्याभिषेक समारंभात विघ्न आणण्याचा खटाटोप करीत होता. ही बातमी शिवाजी महाराजांस राज्याभिषेकाच्या वेळी समजली. त्यांनी राज्यभिषेक समारंभ झाल्यावर बहादूरखानावर जुलै १६७४ त दोन हजार मराठा सैनिकांना चाल करून जाण्यास फर्माविले. त्यांनी बहादूरखानाच्या छावणीवर हल्ला करून लुटमार केली. बादशहाकरिता जमविलेले जातिवंत २०० घोडे व सुमारे १ कोटीचा खजिना लुटून, त्याचे सर्व तंबू मराठा सैनिकांनी जाळून टाकले. ह्याच सैनिकांनी बहादूरखान व त्याचे सैन्य यांस हूल दाखवून २०-३० कोस दूर नेल्यावर दुसऱ्या

७००० मराठे घोडेस्वारांनी हा पराक्रम केला.[१] ऑगस्ट-सप्टेंबरात रामनगरच्या बाजूचा कोळ्यांचा प्रदेश हस्तगत करण्यास मोरोपंत पिंगळेच्या हाताखालील फौजा कोकणातून थेट रामनगरपर्यंत गेल्या आणि त्यांनी वसईच्या पोर्तुगिजांकडे चौथाईची मागणी केली. शिवाजीमहाराजांनी रामनगरचे राज्य जिंकले, तेव्हा त्या राजाला पोर्तुगीज सरकार चौथाईचा हक्क देत असे, तो आपणास मिळावा अशी मागणी महाराजांनी पोर्तुगिजांकडे केली. यासंबंधी कित्येक वर्षे वाटाघाटी चालल्या तेव्हा त्याचा निकाल करण्यासाठी महाराजांनी आपला हुशार वकील पितांबर शेणवी यास स. १६७७ च्या डिसेंबरात गोव्यास पाठविले. दुसऱ्या वर्षी तो मरण पावला म्हणून चौथाई वसुलीच्या कामगिरीवर महाराजांनी तारीख १५ मार्च १६७९ रोजी गणेश शेट नावाच्या वकिलास गोव्यास पाठविले. तेव्हा त्या सरकारने चौथाईची मागणी मान्य केली पण प्रत्यक्षात दिल्याचा दाखला सापडत नाही.[२]

फोंड्यावर चढाई :

फोंड्याचा किल्ला इ. स. १६६४ अखेर महाराजांनी जिंकला होता. परंतु मधल्या धामधुमीत विजापूरकरांनी बळकावला. तो परत स्वराज्यात आणण्यासाठी महाराजांनी अण्णाजी दत्तो यांना स्वारीवर पाठविले. अण्णाजी दत्तो आपल्या सैन्यासह कुडाळास आले त्यांचा बेत फोंड्यावर अचानक छापा घालायाचा असा होता. ही बातमी फोंड्याचा किल्लेदार महमदखान ह्याला समजली तेव्हा तो सावध झाला व त्याने प्रतिकाराची जय्यत तयारी केली. त्यामुळे अण्णाजी दत्तोस यश न येता तो कुडाळहून राजापूर मार्गे विशाळगडास १७७४ ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात गेला.[३]

धरणगावावर चढाई :

ऑक्टोबर १६७४ च्या अखेरीस महाराजांनी खानेदशावर स्वारी करण्याच्या इराद्याने कूच केले. धरणगावास इंग्रजांची वखार होती. वखारवाल्यांस महाराज सैन्यासह जवळ आल्याची बातमी लागली. धरणगाव एरंडोलच्या जवळपास होते. ह्या भागावर कुतुबुद्दीन खेमगी नावाचा मोगली फौजदार होता, त्याने मराठ्यांना अडविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा लढाई जुंपून खेमगीचा जबर पराभव झाला व तो औरंगाबादेस पळून गेला.[४] (पसासं. ले १७१६) तद्नंतर मराठे सैन्य धरणगावच्या इंग्रजी वखारीवर चाल करून

---

१ प. सा. सं. १६६४, बेंद्र, शिवाजी, पृ. ९१०.

२ सरदेसाई, रियासत, राजा शिवाजी, पृ. २८२.

३ प. सा. सं. १७०८.

४ कित्ता, १७१६.

गेले व ती वखार लुटून फस्त केली (तारीख १ जानेवारी १६७५) ही बातमी मुंबईकर इंग्रजांस कळली तेव्हा त्यांनी धरणगाव वखारीची नुकसान भरपाई मागण्यासाठी ऑस्टीन नावाच्या वकिलास रायगडास पाठविण्याचे ठरविले.[१] त्या भागातील मोगली फौजदार कुत्बुद्दीनखान औरंगाबादेस पळून गेल्यानंतर महाराजांना अडविण्यास कोणीही मोगल सरदार आडवा न आल्यामुळे महाराज थेट बऱ्हाणपूरपर्यंत गेले. नंतर ते परत रायगडास आले.

आदिलशाहीविरुद्ध पुनश्च आघाडी :

जानेवारी १६७६ त महाराजांनी आदिलशाहीविरुद्ध आघाडी उघडली. प्रथमतः ह्या स्वारीवर दत्ताजीपंत मंत्री यास तीन हजार स्वारांसह कोल्हापूर प्रातांत रवाना केले, अण्णाजी दत्तोसही पुनः फोंड्यावर रवाना केले.[२] दत्ताजी पंताने कोल्हापूरास दीड हजार होन आणि गारगोटीच्या सोन गावाहून पाचशे होनांची खंडणी घेतली. महाराजांनी स्वारीस निघण्यापूर्वी संभाजी राजांची मुंज (दिनांक ४ फेब्रुवारी १६७६) केली.

मुंज झाल्यावर महाराज मोहिमेवर निघण्याच्या बेतात असता त्यांना बातमी मिळाली की कल्याण भिवंडीवर मोगलांनी धाड घातली व प्रजाजनांची घरे पेटविली (१५ फेब्रुवारी) त्याजवर मराठी सेना चाल करून गेली तेव्हा मोगल पसार झाले.

महाराजांस गुप्तहेरांनी कळविले की मोगल सुभा बहादूरखान हा मोठी चढाई करणार. तेव्हा त्यास हूल दिली की आपण बादशहाशी तह करण्यास तयार आहोत. त्याप्रमाणे बादशहाचा प्रतिनिधी बहादूरखान याजला कळविले की मी बादशहाला शरण आहे. तहाच्या बोलण्याची सुरुवात १६७५ च्या प्रारंभापासून झाली होती. शिवाजी महाराजांस मोगलांकडून तहाच्या अटी कळविण्यात आल्या त्या अशा : शिवाजीने मोगलांपासून घेतलेला मुलूख व १७ किल्ले मोगलांस द्यावेत. फक्त सातारा व मावळ आपल्याकडे ठेवावेत. दखनमधील सर्व मुलूखाचा देसाईपणाचा अधिकार शिवाजीला मिळावा आणि जुन्नरचा मोगली सुभेदार कल्याण भिवंडीला यावा अशी कलमे असल्याचे मानले जात होते. जुलैअखेरीस फक्त कलमांवर सह्या झाल्याचे वृत्त होते.[३] तह घडवून आणण्याची कामगिरी केल्याबद्दल बहादूरखानाला एक हत्ती बक्षीस देऊन त्याची मनसब वाढविली.

१ प.सा.सं. १७२७ व १७३२.

२ जेधे शकावली पृ. २४ प. सा. सं.

३ बेंद्रे, विजापूरची, आदिलशाही. पृ. ४९८.
जेधे शकावली, पृ. २८.

शिवाजी महाराजांनी खानाला तहाची बोलणी करण्यात झुलवत ठेविले. हेतू हा की त्याच वेळात आदिलशाही मुलुखात बिनहरकत स्वारी करता यावी. तहाच्या कलमांवर बादशहाच्या सह्या झाल्या असतानाही महाराजांनी तहाच्या अटी पाळण्यास नकार दिला. तेव्हा शिवाजी महाराजांनी मोगलांस फसविले असे मानण्यात आले.[१]

मोगलांशी तहाचे बोलणे लाविल्याने मोगल गाफिल राहिले, त्याचा फायदा महाराजांनी उठविला.

मार्चअखेरीस मराठ्यांनी कोल्हापूर जिंकले. महाराज कुडाळहून फोंड्यास गेले आणि फोंड्याच्या किल्ल्यास वेढा घातला (८ एप्रिल). फोंड्याचा किल्लेदार महमदखान हा शर्तीने किल्ला लढवीत होता. त्याला जवळचे पोर्तुगीज गुप्तपणे मदत करीत होते. मराठ्यांनी ही मदत पकडली आणि पोर्तुगिजांस त्याबद्दल जाब विचारला, तेव्हा त्यांनी कानावर हात ठेवले. आमचा ह्या मालाशी संबंध नाही असा जबाब त्यांनी दिला.

विजापुराहून बहलोलखान फोंड्याच्या मदतीस १५ हजार फौज घेऊन येत होता. तो मिरजेस आल्यावर त्याच्या वाटेत मोठमोठी झाडे पाहून महाराजांनी त्यास मिरजेतच गप्प बसविले.

मराठी फौजा कार्यरत राहिल्या. त्या फौंड्यांत घुसल्या. त्यांनी विजापूर फौजेची कत्तल केली. किल्लेदार महमदखान यास कैद केले. फोंडा स्वराज्यात आला (दिनांक ६ मे सुमारे).[१] त्यावर धर्माजी नागनाथ या मराठा वीराची नेमणूक महाराजांनी किल्लेदार म्हणून केली. नंतर अंकोला, कडवाडी व सिद्धेश्वर घेतले व कारवारवर मराठी अंमल बसविला. सोंधे व बेदनूर येथील संस्थानिकांना मांडलिक बनविले. त्यांजकडून खंडण्या घेतल्या.

इकडे जंजिऱ्यावर मराठी फौजांचे हल्ले चालूच होते. किल्ल्याच्या तटावर तोफांचा धडाका चालूच होता. त्यावर सिद्धी संबूलने समुद्रांतून आपल्या तोफांनी मारा केला. मराठ्यांचे सर्व श्रम वाया जाऊन त्यांना जंजिऱ्याचा वेढा उठविणे भाग पडले (डिसेंबर १६७५). पुन्हा नव्या दमाच्या लढाईसाठी मराठ्यांनी जंजिऱ्यावर मार्चमध्ये धडक दिली पण प्रयत्न निष्फल ठरला. महाराज सातारा पालीहून पन्हाळगडास गेले. मोरोपंत पिंगळे व इतर अधिकारी त्यांच्या सोबत होते (मे १६७६). यानंतर मराठेवीरांनी बेळगाव स्वराज्यांत आणण्याचा प्रयत्न केला. बेळगावचा विजापुरी किल्लेदार अनुखान याने

---

१ बेंद्रे, विजापूरची आदिलशाही, पृ. ४९८.

जेधे शकावली, पृ. २८.

मराठ्यांस किल्ला देतो असे सांगून ४० हजार होनांची लाच घेतली आणि फसविले. मराठी सैन्य किल्ल्यांत घुसत असता त्याजवर हल्ला चढवून ५०० मराठे सैनिकांना यमसदनास पाठविले (जून १६७६)[१]

महाराज पन्हाळ्याहून रायगडास पाऊस सुरू होण्याअगोदरच परतले.

मध्यंतरीच्या काळात विजापूर दरबारात अंतर्गत बंडाळी माजली. बहलोलखान पठाणाने खवासखानास कैद करून वजिरी बळकाविली व लवकरच त्यास बंकापूर किल्लेदाराकडून ठार मारविले (तारीख १२ जानेवारी १६७६).[२] विजापूर दरबारात पठाणाचा परदेशी पक्ष व सर्जाखानाचा दक्षिणी पक्ष असे दोन तट पडून अंतर्गत बंडाळीस सुरवात झाली. ह्या संधीचा फायदा घेऊन विजापूर जिंकून घेण्यासाठी मोगल सरदार बहादूरखान फौजेनिशी चालून आला. दिनांक २१ मार्च १६७६ रोजी विजापूर नजीक लढाई होऊन बहादूरखानाचा विजापूर सैन्याने पराभव केला व तो सोलापुरास पळून गेला. त्याने तिथे पुन्हा फौजेची जमवाजमव करून विजापूर सैन्यावर चाल केली. तीन दिवस तुंबळ युद्ध झाले. त्यांत बहादूरखानाकडील बरेच वीर धारातीर्थी पडले. याच वेळी गोवळकोंड्याची फौज बहलोलखानाचे साह्यास आली. तेव्हा बहादूरखानास पराभव पत्करावा लागला.[३] (बेंद्रे, विजापूरची आदिलशाही, पृ. ५०६) त्यामुळे बादशहाची त्यावर अवकृपा होऊन त्याने दिलेरखान सरदारास पुनः दक्षिणेत पाठविले (जून १६७६). दिलेरखानाबरोबर बादशहाने नेताजी पालकर ऊर्फ महंमद कुलीखान यासही दक्षिणेत शिवाजी महाराजांना जिंकण्यासाठी पाठविले. नेताजीने बादशहाची मर्जी संपादन केली होती. दक्षिणेत येताच नेताजीने शिवाजी महाराजांवर चाल केली आणि एक दिवस मोगल छावणीतून निघून त्याने महाराजांची गाठ घेतली. बादशहास वाटले होते, नेताजी हा पक्का मुसलमान झाला आहे. हिंदू त्याला कधीही परत हिंदू धर्मात घेणार नाहीत, याची त्याला खात्री होती, पण झाले भलतेच. महाराजांनी लगेच त्याचे शुद्धीकरण करून त्यास परत हिंदूधर्मात घेतले.[४] (१९ जून १६७६) (शिवच, पृ. २८) नेताजीला ‘दुसरा शिवाजी ’ म्हणत. महत्त्वाच्या देशकार्यापुढे धर्माच्या तांत्रिक बंधनाचा महाराजांना बाऊ वाटत नसे, हे यावरून सिद्ध होते.

---

१ प. सा. सं., ले. १८६३.

२ जेधे शकावली, पृ. ३०, बेंद्रे विजापूरची आदिलशाही, पृ. ५०४.

३ कित्ता, पृ. ५०५.

४ काळे, छत्रपती शिवाजी महाराज, पृ. २०४.

याच सुमारास महाराजांचा आदिलशाहीतील बहलोलखानाशी जुलै १६७६ मध्ये तह झाला. कृष्णा नदी ही शिवाजी महाराज आणि विजापूरकर यांच्या राज्यामधील सरहद्द ठरविण्यात आली. या विभागणीमुळे जुन्या आदिलशाहीतील जो कृष्णेच्या उत्तरेकडील बालाघाटी मुलूख महाराजांना मिळाला होता त्याच्या मोबदल्यात महाराजांनी तीन लाखांचा नजराणा व दरसाल एक लक्ष होनांची खंडणी आदिलशाहाला द्यावी असे ठरले. हा तह पुढे टिकला नाही. परंतु ह्या मुलुखावरील महाराजांच्या चालत आलेल्या प्रत्यक्ष अंमलाला अखेर आदिलशहाने मान्यता दिली.[१]

नेताजी निघून गेल्याने दिलेरखानाची बाजू लंगडी पडली. त्याने विजापूरचा वजीर बहलोलखान याजशी सख्य करून बादशहास कळविले की बहादूरखानाने शिवाजी कुतुबशहा व विजापूरकर यांजशी अंतस्थ सलोखा राखल्यामुळे त्याचे हातून वरील तीन सत्तांस जिंकण्याचा हेतू सिद्धीस जाणार नाही. ते काम मला सत्ता दिल्यास मीच करून दाखवितो. बादशहाने बहादूरखानास बदलून दक्षिणचा कारभार दिलेरखानाकडे सोपविला. इ. स. १६७७ च्या सप्टेंबरात बहादूरखान परत दिल्लीस गेला. गोवळकोंड्यावर दिलेरखानाने अचानक हल्ला केला. त्यामुळे वजीर मादण्णा यास शिवाजी महाराजांकडे मदत मागणे भाग पडले. पण पठाणांचा हा व्यूह सिद्धीस गेला नाही. बहलोलखान आजारी पडून दिनांक २३ डिसेंबर १६७७ रोजी मरण पावला.[२]

□□

१ सरदेसाई, राजा शिवाजी, पृ. ३०६.

२ काळे, राजा शिवाजी, ३०७.

२१. कर्नाटकातील मोहीम---दक्षिण दिग्विजय

बंगलोरास राहून शहाजीराजे आपल्या कर्नाटकातील जहागिरीचा कारभार पाहत होते. तंजावरचे राज्य प्रथम शहाजी राजांनी विजापूरच्या तर्फेने १६५९ च्या मार्चमध्ये जिंकले. तेव्हापासून दोन वर्षे तो प्रदेश शहाजीराजांच्या ताब्यात होता.[१] त्यानंतर विजापुरी लष्करात तंटे होऊ लागल्यामुळे शहाजी राजे तंजावर सोडून बंगलोरास आले. शहाजी राजांची राणी तुकाबाई हिने एकोजी राजे नावाच्या मुलास जन्म दिला (१६३१). एकोजीराजे अतिशय शूर व कर्तृत्ववान होते. बहुश्रुतही होते. वडलांच्या मृत्यूनंतर बंगळूरच्या जहागिरीची मालकी एकोजीराजाकडे आली. शहाजी राजांचा पहिला कारभारी नारो त्रिमल हणमंते होता. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र रघुनाथ नारायण हणमंते हा शहाजीराजांचा कारभार पाहू लागला. एकोजी राजे विजापूर दरबारची चाकरी इमाने इतबारे करीत होते. दरबारच्या हुकूमावरून एकोजी राजानी मदुरेच्या चोक्कनाथ नायकाचा पराभव केला व तंजावर शहर जिंकले (दिनांक १२ जानेवारी १६७६). तंजावर ही विजयराघव राजाची राजधानी होती. एकोजीच्या मनांत शिवाजी महाराजांसारखे आपणही स्वतंत्र राजा होऊन राज्याभिषेक करवून घ्यावा असे होते. त्याप्रमाणे एकोजी राजांनी समारंभपूर्वक तंजावरात सिंहासनारोहण केले.[२] (दिनांक ५ मार्च १६७६) तदनंतर कारभारी रघुनाथ नारायण हणमंते यांजकडून एकोजीराजे यानी कारभार काढून घेतला. हलके आणि सामान्य लोकांना जवळ करून त्यांच्या तंत्राने ते वागू लागले. तेव्हा रघुनाथपंत महाराष्ट्रात शिवाजी महाराजांस भेटावयास आले ते कर्नाटकांतील राज्य विस्ताराची मौल्यवान राजकारणे घेऊन.

रघुनाथपंत साताऱ्यास आले कारण महाराज सातारा किल्ल्यावर जवळ जवळ वर्षभर विश्रांती घेत होते. महाराजांना भेटले. काही दिवसांनी ते पन्हाळ्यास महाराजांबरोबर गेले व त्यांजबरोबर ते रायगडास जून १६७६ च्या प्रारंभी आले.

---

१ एस. अय्यर, हिस्टरी ऑफ द नायकाझ ऑफ मदुरा, पृ. १६३-१७०.

२ शिवच. प्र., पृ. ५३.

भेटीत रघुनाथपंतांनी शिवाजीराजांनी एकोजी राजांस वठणीवर आणण्यासाठी कर्नाटक मोहीम घ्यावी असे विनविले. महाराजांस कर्नाटकाच्या स्वारीवर येण्यास कोणाचाही अडथळा येऊ नये म्हणून त्यांनी भागानगरच्या कुतुबशहाशी राजकारण करण्याचा विचार मनात आणिला आणि मग हा विचार महाराजांस ऐकविला. कर्नाटकाविषयी महाराजांना आधीपासून ओढ होती. कारण कर्नाटक ताब्यात आल्यावर आपत्काळी कर्नाटकात आश्रय घेता येईल या हेतूने. हा कर्नाटकाचा प्रदेश जिंकून घेऊन स्वराज्यांत समाविष्ट करावा असा त्यांचा विचार होता.

गोवळकोंड्याच्या सुलतानास आपल्याकडे वळवून घेऊन त्याचा उपयोग मोगलाविरोधी आघाडीसाठी करून घ्यावा असा विचार १६७० च्या पूर्वीच महाराजांच्या मनात आलेला असावा. गोवळकोंड्याच्या गादीवर सुलतान अब्दुल हसन तानाशहा इ. स. १६७२ मध्ये बसला. महाराजांनी आपला वकील निराजी रावजी यास हैदराबादेस पाठविले. त्याने तानाशहाशी सौहार्दाचे संबंध जोडले. तानाशहाने महाराजांस दरवर्षी एक लाख होन द्यावे असे ठरले. त्यापैकी पहिला हप्ता ६५ हजार होनांचा बरोबर घेऊन निराजी रावजी गोवळकोंड्याहून परत शिवाजी महाराजांकडे आला.[१]

त्यानंतर वर सांगितल्याप्रमाणे तंजावराहून रघुनाथ हणमंते शिवाजी महाराजांपाशी आले. महाराजांनी कर्नाटकात यावे आणि सर्वत्र मराठ्यांचे एकछत्री राज्य चालू करावे असा विचार हणमंते यांनी महाराजांपाशी मांडला. तोच विचार घेऊन हणमंते भागानगरास (हैद्राबादेस) कुतुबशहाचा दिवाण मादण्णापंत यांस भेटले. उभयतांनी कुतुबशहाची गाठ घेऊन त्याजपुढे सर्व राजकारण पंतानी फारसी भाषेत इतके उत्तम रीतीने मांडले की ते ऐकून शिवाजी महाराजांस येथे भेटीस आणा अशी पंतांस शहाने आज्ञा केली. हणमंते यांनी पुन्हा शिवरायांची भेट घेऊन त्यांस हैद्राबादची व कर्नाटकांतील परिस्थितीची, धनसंपत्तीची संपूर्ण माहिती दिली. तेव्हा भागानगरास व तिथून कर्नाटकांत जाण्याचा बेत ठरला.[२]

मोरोपंत पिंगळे व अण्णाजी दत्तो यांस महाराजांनी स्वराज्याची व्यवस्था सांगितली. रघुनाथपंत हणमंते, निराजी रावजी व त्याचा पुत्र प्रल्हाद निराजी यांस पुढील व्यवस्थेसाठी भागानगरास आगाऊ रवाना केले. हैद्राबादेस पोचल्यावर प्रल्हाद निराजींनी कुतुबशहास सुरक्षितेविषयी शपथक्रिया दिली. त्याला विश्वास दिला की अपाय नाही, भेट घेऊन

१ शिवचरित्र प्रदीप, पृ. २६.

२ सभासद बखर (सं. गाडगीळ) पृ. १०६.

जातील. यावेळी मोगल सेनानी बहादूरखान पेडगावी मुक्काम करून होता. तो पाठीवर येऊ नये म्हणून त्याची समजूत काढण्यासाठी निराजी सिधनाथ न्यायाधीश याजबरोबर त्याच्यासाठी कित्येक द्रव्य अलंकार, रत्नखचित पाठविले. आणि गुप्तपणे निरोप दिला की एक वर्षपर्यंत आपणासी कर्नाटक साधावयास लागेल. तोपर्यंत तुम्ही राज्यास उपद्रव न करणे.[१] रायगडचा कारभार सोमनाथ या विश्वासू व कार्यक्षम अधिकाऱ्यावर सोपविला.[२] दिनांक ६ ऑक्टोबर १६७६ या विजयादशमी दिनी महाराजांनी रायगडाहून दक्षिण दिग्विजयार्थ आरंभ केला. बरोबर २५ हजार घोडेस्वार फौज घेतली, बाळाजी आवजी, दत्ताजीपंत, वाकनीस, सूर्याजी मालुसरे, नेताजी पालकर, सर्जेराव जेधे, मानाजी मोरे, येसाजी कंक, हंबीरराव मोहिते, धनाजी जाधव, बाबाजी ढमदेरे, आनंदराव सोनाजी नाईक, बंकी वगैरे मातब्बर सरदार सांगाती घेतले.[१] स्वारीचा डौल अप्रतिम होता. गोवळकोंड्याची हद्द लागल्यापासून फौजेकडून कोणासही यत्किंचित त्रास होणार नाही ह्याची खबरदारी महाराजांनी घेतली. कित्येकांस शिस्तभंगाबद्दल कडक शासने केली. महाराजांनी एवढी काळजी घेतल्याचे ऐकून पातशहा बहुत संतुष्ट जहाले. तानाशहा पातशहा भागानगरकर यांनी मनात बहुत शंका धरीली की, अफझलखान बुडविला, शास्ताखानाचा धुव्वा उडविला, दिल्लीस जाऊन अलमगीर पातशहास पराक्रम दाखविला, ऐसा एखादा अनर्थ जाहला तर काय करावे ? भेट मात्र राजियांची न घ्यावी. जे मागतील ते देऊ असे पातशहा बोलिला. तेव्हा प्रल्हादपंत वकील यांनी आणा शपथा देऊन सांगितले की अपाय नाही, स्नेहाची भेट घेऊन जातील.[२]

महाराज हैद्राबाद जवळ येत आहेत असे पातशहास कळल्यावर त्याने महाराजांस सामोरे जाण्याचा आपला हेतू कळविला. तेव्हा आण घालून पातशहास कळविले की, तुम्ही न येणे, आपण वडील भाऊ, मी धाकटा भाऊ, आपण पुढे न यावे असे सांगून पाठविल्यावरी पातशहा बहुत संतुष्ट झाले.[३]

शिवाजी महाराज भागानगर शहराच्या वेशीवर येताच पातशहातर्फे मादण्णापंत व अकण्णापंत पुढे येऊन राजियांस समारंभपूर्वक घेऊन शहरात गेले. महाराजांचे सर्व सैनिक भरजरी पौशाख घालून मिरवत होते. इकडे महाराजांच्या सत्कारार्थ सगळे शहर मुद्दाम शृंगारण्यात आले होते. अवघे भागानगर महाराज छत्रपतींना पाहण्यास उत्सुक झाले होते. तोच ती अतिभव्य मिरवणूक शहरात प्रवेशली. तेव्हा अवघ्या नगरीत

१ सभासद बखर (सं. गाडगीळ), पृ. १०६

२ शि.व.सा. खंड १०, ले. १६.

३ शि. च. प्र. (जे.श.), पृ. २८.
शिव दिग्विजय, पृ. ३०१.

शिवछत्रपतींच्या नावाचा उद्घोष आणि जयघोष दुमदुमला. रस्त्याच्या दोन्ही बाजूचे लोक महाराजांवर फुले उधळीत होते. सुवासिनी स्त्रिया त्यांच्यावरून पंचारती ओवाळीत होत्या. महाराज मुठी भरभरून चांदी सोन्याचे द्रव्य दोन्ही बाजूंना उधळीत चालले होते.

प्रचंड मिरवणूक :

नगरांतील प्रमुख राजरस्त्याने मिरवीत महाराजांची प्रचंड मिरवणूक शाही निवासस्थान गोशा महाल येथे आली.[१] गोशा महालची जागा हैद्राबाद शहरात सध्याच्या विनायक विद्यालंकार मार्गावर आहे. तेथे सध्या स्टेडियम आहे. गोशा महालात सैन्याची राहाण्याची व्यवस्था केली होती व लालमहालांत महाराजांच्या वास्तव्याची सोय कारभाऱ्यांनी केली होती. म्हणून महाराज गोशा महालात सैन्य ठेवून स्वतः लालमहालांत रहावयास गेले.[२] लालमहाल सध्याच्या हायकोर्ट जागेवर उभा होता. त्यानंतर महाराज दाद महालास पावले.

दादमहालात स्वारी दाखल होताच लवाजमा बाहेर ठेवून महाराजांनी पाच असामी बरोबर घेऊन महालांत प्रवेश केला. सिंहासन ज्या जागी होते तिथे जाण्यासाठी पायऱ्या चढताना महाराजांनी बरोबरीच्या लोकांस खाली राहण्याचा हुकूम केला. स्वतः एकटेच पायऱ्या चढून वर गेले, तो पातशहा स्वतःच पुढे येऊन त्याने महाराजांस आलिंगन दिले.[३] मादण्णा व आकण्णा सिंहासनाच्या जवळ होते. त्यांना दोन सार्वभौम भ्रातृप्रेमाने एकमेकांस सौहार्दतेने आलिंगन देऊन एकमेकांचे स्वागत करीत आहेत हे पाहून उचंबळून आले.

महाराज आणि कुतुबशहा सिंहासनावर बसल्यावर मादण्णा जवळच बसले. बाकीचे सरदार उभेच राहिले. महाराज व कुतूबशहा यांनी एक प्रहर बसून बैठकींत स्नेहाभावाची बोलणी केली. आपली पातशाही वाढवावी, मोगलांना नेस्तनाबूद करावे. दक्षिणची दौलत आम्हा दक्षिणियांच्या हातात राहिल ते करावे (उत्तरेतील मोगलांचा हात इकडे शिरकू देऊ नये) असे दूरदर्शीपणाचे धोरण दोघांच्या भेटीत एक विचाराने ठरले.[४] तसेच तह ठरला, त्या तहात महाराजांनी कर्नाटकांत स्वारी करावी त्यासाठी स्वारी संपेपर्यंत कुतुबशहानी दरमहा साडेचार लाख खर्चास द्यावे आणि पाचशे स्वार मदतीस द्यावे

१ शि. च. प्र. (जे. श.), पृ. २८.
शिव दिग्विजय, पृ. ३०१.

२ सभासद बखर (सं. गाडगीळ), पृ. १०७.

३ कित्ता, पृ. १०८.

४ कित्ता.

असे ठरले. बोलणी संपल्यावर शहाने महाराजांस खासे विडे स्वहस्ते दिले. त्यांच्या सरदारांची नावाजणी करून वस्त्रे, घोडे, हत्ती, कंठ्या, शिरपेच, तुरे, हत्यारे वगैरे देऊन गौरव केला. आणि राजे आपल्या स्थळास गेले.[१]

एक महिना वास्तव्य :

शिवाजी महाराजांनी हैद्राबादेस एक महिना मुक्काम केला (दिनांक ४ फेब्रुवारी ते १० मार्च १६७७). वास्तव्यांत अनेक सरदारांबरोबर मेजवानी जेवले. तसेच मुचकुंद नदीवरील केशवस्वामीच्या मठास भेट दिली. महाराज जियागुडा येथे पंढरीनाथाच्या देवळात केशवस्वामीच्या कीर्तनास एकवेळ हजर होते. पातशहाचे मुख्यमंत्री मादण्णा यांनी महाराजांस काजीसाबकी देवडी या ठिकाणच्या आपल्या घरी शाहीखाना दिला. भोजन अन्न पदार्थ मादण्णाच्या मातोश्रींनी स्वतः बनविले होते. महाराज, मादण्णा व अकण्णा असे तिघेही एकत्र बसून जेवले.[२] एके दिवशी येसाजी कंकाने मत्त हत्तीशी सामना करून त्याची सोंड कापून काढीली. शिवाजी महाराजांनी उलट मेजवान्या व नजराणे देऊन सर्वांस संतुष्ट केले. बाजी सर्जेराव व येसाजी कंक या सरदारांबरोबर शहाच्या फौजा देऊन त्यांस कर्नाटकांत रवाना केले[३] व स्वतः महाराज महिनाभर भागानगरास राहिले.

श्री शैलमल्लिकार्जुन, जिंजी, वेलोरे :

भागानगरास मुक्काम असता महाराजांनी थेट दक्षिणेत कृष्णा, तुंगभद्रा संगमावर जाण्याचे निश्चत केले आणि हैद्राबादेहून १० मार्च १६७७ च्या सुमारास निघून सैन्यासह कर्व्हलच्या ईशान्येस बारा कोसांवर असलेल्या श्री शैलास आले. नीलगंगेत स्नान करून श्रीचे दर्शन घेतले. हे श्रीशैल मल्लिकार्जुनाचे स्थान. ह्या निसर्गरम्य शांत देवस्थानांत शिवाजी महाराजांना उपरती झाली. सर्वस्वाचा त्याग करून तेथे कायमचा वास करण्याचे योजिले. ह्या विचारांपासून त्यांचे मन जवळच्या माणसांनी मोठ्या प्रयासाने वळविले. ह्या रम्य स्थळी त्यांनी दहा दिवस राहून मोठा दानधर्म केला. नदीवर श्रीमंगेश नावाचा एक सुंदर घाट, धर्मशाळा वगैरे बांधण्याची तजवीज केली. तिथून निघून महाराज अनंतापूर या स्थळी मुख्य फौजेस मिळाले. तेथून नंदिबाळ, कडप्पा या ठिकाणावरून ते तिरूपती बाळाजीचे दर्शन घेण्यास गेले. त्यानंतर ते काला हस्तीच्या वाटेने मद्रासचे

१ सभासद बखर (सं. गाडगीळ), पृ. १०९.

२ कित्ता. पृ. ११०.

३ इंग्लिश रेकॉर्ड ऑन शिवाजी, भाग २. ले. २३२.

आसंमतात दाखल झाले. तेथे ते १४ मे पर्यंत तळ देऊन राहिले.[१] तेथून शिवाजी महाराजांनी बेलूरला ता. २६ मे पूर्वीच जाऊन वेढा घातला होता.[२]

गोवळकोंड्याच्या सुलतानाने जिंजी, वेलूर, यमन गोंडा आणि पोर्टो नोव्होचा कर्नाटकाचा भाग विजापूरकरांच्या ताब्यातून घेण्यासाठी शिवाजी महाराजांस अखत्यारपत्र दिले होते. गोवळकोंड्याचा सेनापती एक हजार घोडदळ व ४ हजार पायदळ घेऊन प्रथम शिवाजी महाराजांबरोबर होता. शिवाजीमहाराजांस कर्नाटकात तीन शत्रू होते. एक शेरखान लोदी हा विजापुरी पठाण सरदार त्रिचनापल्लीच्या उत्तरेस सुमारे तीस मैलांवर वलिगंडपुर येथे राहणारा होता. त्याने कर्नाटकातील बराच प्रदेश हस्तगत करून तो प्रतिष्ठितपणे नांदत होता. त्याजशी शिवाजी महाराजांच्या लोकांनी झुंज दिली व त्याचा पराभव केला.[३] दुसरा पूर्वीच्या खान महमद वजीराचा मुलगा नसीर महमद जिंजीचे किल्ल्यावर होता. त्याजवर महाराजांनी ९ मे रोजी ५००० स्वार कांचीवरून जिंजीवर रवाना केले. त्यानंतर १६ हजार घोडेस्वार पाठवून जिंजीस वेढा घातला. मराठ्यांपुढे आपला निभाव लागणार नाही हे नसीर महमदने जाणून मराठ्यांकडील अधिकारी त्यास भेटण्यास आला असता त्याजबरोबर सलोख्याची बोलणी केली, किल्लेदारास दरसाल ५० हजार उत्पन्नाची जागीर देण्याचे आमीष दाखविल्यावर त्याने किल्ला शिवाजी महाराजांच्या ताब्यात दिला (१६७७ मे १३) शिवाजी महाराजांनी जिंजीचा किल्ला अगदी थोडक्या वेळात घेतल्याने महाराजांच्या सैन्याची तेथील लोकांना बरीच दहशत बसली होती. महाराज कर्नाटकात सर्वत्र यशस्वी होत गेले. ते जणू काय जगज्जेता म्हणून प्रसिद्धी व्हावी याच महत्त्वाकांक्षेने लढले असे वाटू लागले होते.[४] पंधरा वर्षांपूर्वी इंग्रज शिवाजी महाराजांस चोर, लुटारू, पळपुटा अशी दूषणे देत होते. तेच इंग्रज कर्नाटकस्वारीची हकिगत सांगताना शिवाजी महाराजांची सीझरशी तुलना करून लिहू लागले.[५] किल्ल्यावरील हल्ले चढविण्याच्या बाबतींतही अलेक्झांडर धि ग्रेट इतकाच हातखंडा असल्याचे सांगू लागले. त्याच्या युद्धकौशल्याने दिपून जाऊन ते प्रति हॉनिबॉल असल्याचे बोलत असत.[६]

---

१ प. सा. सं. क्र. १९३४.

२ कित्ता, १९३७.

३ बेंद्रे, शिवाजी, पृ. ९७९-८०

४ कित्ता, पृ. ९८२.

५ प. सा. सं. २०१३.

६ प. सा. सं. १९७६.

शिवाजी महाराजांनी जिंजी किल्ला ताब्यात घेतल्यावर आपला सरदार रायजी नलगे यास किल्लेदार नेमिले व जिंजी सुभ्यावर विठ्ठल पिलदेव यास सुभेदार नेमण्यात आले. किल्ल्याची उत्तम डागडुजी करण्याची आज्ञा महाराजांनी दिली [१]

जिंजीचा बंदोबस्त केल्यावर महाराज वायव्येस २३ मे रोजी वेलोरे येथे गेले. त्या किल्ल्यावर अब्दुलाखान म्हणून विजापुरी अधिकारी होता. दक्षिण हिंदुस्तानात अत्यंत मजबूत असा हा किल्ला घेण्यासाठी महाराजांनी जोराची तयारी केली होती. किल्ल्यास वेढा घातल्यावर किल्लेदाराने आपल्या पराक्रमाची शर्थ करून किल्ला लढविला. तेव्हा किल्ल्यावर तोफांचा मारा करण्यासाठी महाराजांनी नजीकच्या दोन टेकड्यांवर नवीन दोन किल्ले बांधिले आणि त्यांस साजरा, गोजरा असे नाव दिले आणि त्यावरून तोफांचा मारा वेलोरेच्या किल्ल्यावर सुरू केला. वेलोरे हा भुईकोट किल्ला होता.

वेलोरेचा वेढा रेंगाळणार असे दिसताच महाराजांनी नरहरी रूद्र या सरदारास दोन हजार स्वार व पाच हजार मावळी पायदळ देऊन वेलोरेच्या वेढ्यावर ठेविले व स्वतः २० जूनच्या सुमारास दक्षिणेस शेरखान लोदी कडलूर येथे चाल करून आला त्याला फौजेसह सामोरे गेले आणि स्वतः खानाच्या फौजेवर फार जोराचा हल्ला चढविला. तेव्हा खानाने लढाईतून पुत्र इब्राहिमखान यासह पळ काढला. त्याचा पाठलाग मराठी सैन्याने केला. मराठी सैन्यास चकवून खान बानागिरी पट्ट्मच्या किल्ल्यांत आश्रयसाठी गेला हे पाहून मराठ्यांनी त्या किल्ल्यास वेढा दिला.[२] शेरखान महाराजांस शरण आला. त्याची व्हालौर, तेजापठण, भवनगिरीपठण ही ठाणी मराठ्यांनी काबीज केली. (दिनांक ९ जुलै) शेरखान दीन होऊन त्याने आपला सर्व मुलूख व २० हजार होन रोख महाराजांस देण्याचे कबूल केले (१५ जुलै). जुलैच्या आरंभी शेरखानाशी तह झाला, (इ. स. १६७८ च्या फेब्रुवारीत त्याने दंडाची रक्कम रुपये वीस हजार होन भरल्यामुळे त्याच्या ओलीस ठेवलेल्या मुलाची सुटका मराठ्यांनी केली. कर्नाटकच्या सुभेदारीवर शिवाजी महाराजांनी आपला जावई हरजी महाडीक यास नेमिले. त्याने त्या प्रांताचा कारभार कैक वर्ष दक्षतेने केला. वेलोरचा वेढा चालूच राहिला. २२ जुलै १६७८ रोजी वेलोर किल्ला मराठ्यांनी जिंकून घेतला.

शिवाजी महाराजांच्या कर्नाटकातील हालचाली फार तडकाफडकी झाल्या. त्यांच्या विरोधात कर्नाटकातील संस्थानिक आणि पाळेगार टिकले नाहीत. महाराजांनी जो मुलूख

---

१ प. सा. सं. १९२०.

२ प. सा. सं. २७६७, जेधे शकावली, २८.

आक्रमिला त्याचा त्यांनी पूर्णपणे बंदोबस्त केला. कर्नाटकात ज्या सरदारांनी शहाजीराजांच्या सेवेत आयुष्य घालविले त्यांच्या लायक वंशजाना नवीन नेमणुका दिल्या. महाराजांनी जिंजीचे राज्य घेतल्यावर हिंदुस्थानातील पातशाहीचे बळ लक्षात घेऊन, भविष्यकाळी त्यांच्या सर्व एकवटलेल्या सामर्थ्याचाही प्रतिकार करता यावा म्हणून महाराजांनी बंदोबस्त करण्यास सुरवात केली. मुसलमानी सत्तेस त्या राज्यातून घालवून लावताना आपला बेत सिद्धीस नेण्याकरिता निसर्गतः दुर्गम असलेल्या जिंजी किल्ल्याची डागडुजी महाराजांनी केली, पहिले तट पाडून नवे तट व बुरूज असे कौशल्याने बांधले की, ते काम हिंदी लोकांचे नसून युरोपियनांचे असावे असे वाटते. काही जुने निरुपयोगी किल्ले पाडून महाराजांनी कित्येक नवे भुईकोट व डोंगरी किल्ले बांधले आणि युद्धोपयोगी इतर इमारती रचिल्या. ह्या कारखान्यावर आपल्या प्रजेकडून जमविलेली अपार संपत्ती खर्च केली.[१]

कर्नाटकांत एक मोठी राज्य संस्था स्थापून तिच्या योगे विजापूरच्या आदिलशाहीस खिळखिळे करून ठेवले. कर्नाटकांत शहाजीराजांनी जी मराठी राज्याची स्थापना करण्याचे योजिले होते ते एकोजीने सिद्धीस नेले. ती शिवाजी महाराजांनी इतकी प्रबळ करून ठेवली की कोणतीही मुसलमानी सत्ता तिला सहज मोडू शकली नाही.[२]

राजे एकोजीशी समझोता :

कर्नाटक मोहिमेवर असता महाराजांनी ९ मे रोजी ५००० स्वार कांचीवरवरून जिंजीवर रवाना केले. त्यानंतर स्वारी कावेरी तिरावर मुक्कामास आली तिथून त्यांनी आपला सावत्र भाऊ एकोजीराजे यांस पत्रे लिहिली.[३] तेव्हा महाराजांच्या भेटीस एकोजीराजे यांनी आपल्यातर्फे काही पोक्त लोक पाठविले. या मंडळीशी महाराजांनी व्यवहाराची योग्यतीच बोलणी केली. " कैलासवासी शहाजी महाराजांच्या कष्टाच्या धनदौलतींत जसा एकोजीराजांचा वाटा आहे तसाच आपलाही वाटा आहे. तेव्हा अर्धावाटा बऱ्या बोलाने द्या " असे महाराजांनी सांगून पाठविले. आणि हा निरोप त्यांनी एकोजीराजांची जी माणसे भेटावयास आली त्याजबरोबर एकोजीराजांच्या भेटीस आपलेकडील थोर माणसे, बाळंभट, कृष्ण ज्योतिषी व कृष्णाजी सखोजी अशी तिघेजण पाठविले. त्याजबरोबर महाराजांनी एकोजी राजांस पत्र दिले व त्यात लिहिले की शहाजी राजांच्या जहागिरीचा अर्धा वाटा एकोजी राजे यानी संभाजी पुत्र उमाजी यास द्यावयास हवा आणि त्यांना आपल्या भेटीस बोलाविले. शिवाजी महाराजांचा मुक्काम तिरूमल वाडी येथे जुलै १६७७ पासून होता.[४] तिथे एकोजी दोन हजार स्वार घेऊन भेटण्याकरिता आला. मुकामावर आल्यानंतर भेटी

१ प. सा. सं. १९७६.

२ बेंद्रे, शिवाजी, पृ. ९८४.

३ प. सा. सं. ले. १९५७.

४ इं रे. ऑन शिवाजी व्हा., २ ले. २४०.

जहाल्या. नित्य एकेताटी भोजन एकांती बसोन भाषण वाद जाले, आठवडा झाला. दिनांक २० जुलै ते २७ जुलै ७७ तरी खुलासवार बोलणे काहीच न करता मनात कुढत राहिले व शिवाजी महाराज आपणास अटक करतील अशी भीती वाटून एके दिवशी रात्री गुप्तपणे कावेरी नदीत तराफ्यावर चढून पुरांतून पलीकडे तंजावरास निघून गेले.[१] शिवाजी महाराजांस ही बातमी समजतांच वाईट वाटले.

एकोजी राजांचे कारभारी शामजी नाईक कान्हेरपंत व शिवाजी शंकर हे महाराजांचे छावणीत होते. त्यांस वस्त्रे भूषणे देऊन रवाना केले व एकोजीरावांस सांगून पाठविले की " तुम्ही व आम्ही वाटे करून घेऊन परस्परे समाधाने राहू [२]" पण यावर काही उपयोग झाला नाही. मात्र महाराजांचे एक सापत्न बंधू संताजीराजे भोसले हे महाराजांना येऊन मिळाले. महाराजांनी त्यांना हजार स्वाराची सरदारी देऊन फौजेत ठेविले.[३] शिवाजी महाराजांनी दौलतीचा हिस्सा मागितल्यावर एकोजी राजे यांनी प्रत्यक्ष भेटीत न बोलता आपला मनोदय आपल्या माणसांकरवी महाराजांस ऐकविला.

वडील असता शिवाजी महाराजांनी बंडपणा पातशहापाशी केला. तमाम मुलूख घेतला, त्यामुळे वडिलांस कित्येक प्रकारे इजा झाली. आम्ही वडिलांजवळ तंत्र देऊन राहिलो, त्यामुळे बादशहाची दौलत रक्षिली गेली. वाटा देणे ही वतनदारी तरी नाहींच. वतन बाब असेल त्याचा वाटा घ्यावा. चाकरीची दौलत सर्व विजापूरचे शहाची, आम्ही शहाचे चाकर. त्यांचे हुकूमाचे मालक, यांत तुमचा संबंध नाही.[४] अशा प्रकारे पत्र लिहिण्यास मदुरा व म्हैसूर नायकांनी व मुसलमान सल्लागारांनी एकोजीराजांस भाग पाडले. एकोजीराजे यांनी जे महाराजांस लिहिले त्याची प्रत विजापूर दरबारास त्याची संमती मिळण्यासाठी पाठविली. विजापूर दरबारने एकोजीस सबुरीचा सल्ला दिला. दरम्यान मुक्काम हालवून महाराजांची स्वारी वलिगुंडपुरमुला आली तिथून त्यांनी रघुनाथ पंतास मदुरेच्या नायकाबरोबर तह करण्यास रवाना केले. त्यांनी ६ लक्ष होनांचा करार करून महाराजांनी आपले सैन्य परत घ्यावे असे ठरले. [५] तद्नंतर महाराजांनी मुक्काम हलवून वलिगड पुराहून तुंदम गुत्तीला (तोरगड) २७ जुलैस आले. तेथे महाराजांस असे समजले की एकोजीराजे मुसलमान लोकांच्या नादी लागून शिवाजी महाराजांशी झगडा करावा या हेतूने महाराजांवर सैन्य पाठवीत आहे. हे ऐकताच महाराजांनी जनार्दन पंतास सैन्य देऊन एकोजीच्या सैन्याशी सामना देण्यास पाठविले. दोन्ही सैन्याचा थोर झगडा

१ सरदेसाई, शिवाजी, पृ. ३२२.

२ प. सा. सं. ले. २३३२.

३ प. सा. सं. ले. २७६७.

४ सरदेसाई, रियासत, पृ. ३२२-२३.

५ बेंद्रे, शिवाजी, पृ. ९८१.

झाला. एकोजीराजांचे लोक पराजय पावले, कित्येक मारिले गेले, कित्येक पळून गेले.[१] अशा रीतीने वलिगुंड पुरच्या लढाईत एकोजीराजेंच्या सैन्याची दाणादण उडाली. तरी देखील एकोजीराजे सलोख्यास तयार झाले नाहीत हे महाराजांच्या लक्षात आल्यावर महाराजांनी शहाजीराजांची बंगळूर, होसपेट, सिरे वगैरे ठाणी व त्याशेजारची राज्ये जिंकून घेतली. महाराजांचा हा पराक्रम पाहून एकोजीराजांस सुबुद्धी सुचली. त्यांनी शिवाजी महाराजांचे कर्नाटकातील मुख्य कारभारी रघुनाथ नारायण हणमंते यांच्या मार्फत महाराजांशी बोलणी लाविली. त्यास यश येऊन भावाभावांमध्ये समजुतीचा तह झाला.[२] महाराजांनी एकोजीराजांस त्याचा बहुतेक मुलूख व थोडा अधिकच त्याचेकडे लावून दिला आणि एकोजीराजांबरोबरचे भांडण मिटविले. (जेधे श. शिवचरित्रप्रदीप). महाराजांनी कर्नाटक प्रांत जिंकल्यावर कर्नाटकांतील शहाजीराजांच्या जहागिरीपैकी दोन लाख उत्पन्नाचा प्रदेश भावजयीला चोळी बांगडीसाठी आणि जिंजीप्रातांपैकी सात लाख होनांचे महाल एकोजीराजांस दूधभातासाठी म्हणून लावून दिले. अशारीतीने घरगुतीसंबंध महाराजांनी सांभाळले व मे महिन्यांत (१६७८) उर्वरित कामगिरी सरदारांवर सोपवून ते रायगडी परतले. महाराजांनी एकोजीराजांस धीर देण्यासाठी एक पत्र लिहिले आणि सांगितले की पुरुषार्थ आणि कीर्ती करून दाखविण्याचे हे दिवस आहेत त्याप्रमाणे वागावे.[३]

महाराजांच्या कर्नाटक स्वारीत रघुनाथ नारायण हणमंते महाराजांच्या सेवेस बरोबर होते. महाराजांनी कर्नाटकांत जिंकलेल्या किल्ल्यांची डागडुजी व जिंकलेल्या प्रांताचा बंदोबस्त रघुनाथ हणमंते यांनी केला. महाराजांनी त्यास दसऱ्याच्या सुमारास (२६ सप्टेंबर १६७७) दक्षिणची मजमू व जिंजी प्रांताचा सरसुभा असे महत्त्वाचे अधिकार दिले [४] आणि त्याजवर कर्नाटकातील सर्व व्यवहार सोपवून महाराज इ. स. १६७८ च्या मे-जून मध्ये रायगडास परत आले.

दक्षिण दिग्विजयामुळे स्वराज्याची हद्द दक्षिण समुद्राला मिळाली. कुतुबशाही नमली. अपार संपत्ती मिळाली. दक्षिणेकडे हिंदवी सत्तेचे पुनरुज्जीवन झाले. वेलूर आणि जिंजीमुळे स्वराज्य बळकट झाले. मराठ्यांच्या मर्दुमकीला नवे कार्यक्षेत्र मिळाले.

□□

१ प. सा. सं. १९६८.

२ प. सा. सं. १९९५.

३ काळे, शिवाजी, पृ. २१३.

४ वेंद्रे, शिवाजी, १०७३.

२२. जंजिरेकर सिद्दीशी भांडण

इ. स. १६५९ त मराठी सैन्याने सिद्दीस जेर केले. जंजिरा कोटास वेढा घातला असता अफझलखानाच्या मसलतीस तोंड देण्यासाठी वेढा उठवून सर्व सैन्यास घाटावर जावे लागले. त्यामुळे शिवाजीराजांचे सिद्दीवरील दडपण काही काळ नाहीसे होऊन पुढे आठ वर्षे सिद्दीने आरमाराच्या जोरावर शिवाजी राजांच्या मुलखास उपद्रव दिला. ते पाहून आपल्याकडे सुसज्ज आरमार असल्याशिवाय आपला ताबा कोकण प्रदेशावर बसणार नाही अशी राजांची खात्री झाली. म्हणून इ. स. १६५९ नंतर त्यांनी आपले स्वतःचे आरमार तयार केले.[१] तसेच इ. स. १६६३ मध्ये दोन अवजड आणि मोठी व्यापारी जहाजे बांधून ती जैतापुराहून मोचा येथे पाठविली. नंतर १६६५ पासून राजियांची गलबते दरवर्षी पर्शिया, बसरा, मोचा इत्यादी ठिकाणी व्यापाराकरिता रवाना होऊ लागली.[२] अशा रीतीने राजियांनी स्वतःचे आरमार व व्यापारी जहाजे तयार केली. लहान-मोठी ५०० जहाजे बांधून त्याचे मुख्य ठिकाण कुलाबा हे केले. तसेच सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग येथे गोद्या बांधून काही जहाजे ठेवून दिली. आरमाराचे आधिपत्य दर्यासारंग इब्राहीमखान व मायनाक भंडारी यांजकडे देऊन त्याचे हाताखाली भरपूर खलाशी दिले व आरमार सुभा निर्माण केला.[३] ह्या आरमारामुळे पोर्तुगिजांवर वचक बसला. त्यांनी राजियांसी तह करून तोफा दारूगोळा पुरविण्याचे कबूल केले. जयसिंग इ. स. १६६५ मध्ये महाराष्ट्रात आल्यावर त्यास सिद्दीच्या आरमाराचे महत्त्व पटले म्हणून त्याने त्यास बादशहाकडून हुकूम काढून मोगल सेवेत घेतले. तेव्हापासून सिद्दी मोगल बादशहाचा आरमारी सरदार बनला.[४] व विजापूरकरांशी जो त्याचा संबंध होता तो त्यावेळेपासून तुटला. जंजिऱ्याच्या सिद्दीने अत्यंत कार्यक्षम असे आरमार राखले. त्यावेळी समुद्रावर त्याच्या सामर्थ्यांशी टक्कर देणारी सत्ता पश्चिम किनाऱ्यावर नव्हती. ह्या वेळेपासून सिद्दी आरमार प्रमुखांना याकूबखान हा किताब मोगलांनी बहाल केला.

१ जदुनाथ सरकार, शिवाजी, पृ. २५८.

२ फॅक्टरी रेकॉर्ड, सुरत खंड २, पृ. ८६, १०५.

३ सरकार, शिवाजी, पृ. २५९.

४ कित्ता, पृ. २६२.

कोकणावर मालकी :

कोकणावर मालकी दाखवणाऱ्या प्रत्येक सत्ताधाऱ्याने एकतर सिद्दीचे सामर्थ्य नष्ट करणे किंवा त्याच्याशी मैत्री करणे आवश्यक होते. शिवाजी महाराजांच्या कोकण जिंकण्याच्या प्रयत्नात त्यांची दंडाराजपुरीच्या सिद्दीशी गाठ पडली. सुसज्ज आरमाराच्या तांड्यासह सामर्थ्यवान असणाऱ्या सिद्दीला एकट्याने हरवणे शक्य नाही, हे जाणून शिवाजी महाराजांनी राजापूरला आपल्या कैदेत असणाऱ्या इंग्रजांची मदत मिळवावी असा विचार केला. सिद्दीविरुद्धच्या मोहिमेत इंग्रजांनी आपणास मदत केल्यास त्यांना (इंग्रजांना) मीठबंदर हे ठिकाण देण्यात येईल असे महाराजांनी त्यांना आश्वासन दिले. इंग्रजांनी त्यास मान्यता दिली नाही.[१] तेव्हा १६६१ च्या पावसाळ्यात शिवाजी महाराजांनी सिद्दीच्या दंडापुरीवर आक्रमण केले आणि ते ठिकाण जिंकून घेतले. त्यानंतर त्यांनी जंजिऱ्याच्या बेटावरील किल्ल्याला वेढा घातला. परंतु तोफा आणि शस्त्रसज्ज सैनिकांच्या कमतरतेमुळे ते तो किल्ला सर करण्यात अयशस्वी ठरले. शिवाजी महाराजांनी केलेल्या या हल्ल्यामुळे जंजिऱ्याचा प्रमुख इतका जेरीस आला की, त्याने मुंबईच्या अधिकाऱ्यांना त्याला मदत करण्याकरता विनंती केली. सिद्दीची विनंती इंग्रजांनी स्वीकारली [२] आणि शिवाजी महाराजांनी केलेला हल्ला मागे घेण्यास त्यांना भाग पाडले.

रेवदंडा आणि राजपुरीचे किल्ले सिद्दीच्या ताब्यात होते. सिद्दीच्या सागरी आरमारामध्ये चाळीस ते पन्नास जहाजांचा (गुराबे) समावेश होता. त्यांच्या साहाय्याने तो विविध प्रदेश बळकावून हस्तगत करीत असे आणि आपल्या भूमीचे रक्षण करीत असे. शिवाजी महाराजांच्या मुलुखास हानी पोचवण्यास सिद्दीने सुरवात केली. त्यामुळे शिवाजी महाराजांनी सेना प्रमुख बाजी पासलकर (दुसरा असावा) याच्या नेतृत्वाखाली २००० मावळ्यांचे सैन्य त्याजवर पाठवले आणि समुद्रात ये-जा करू शकणारी गलबतेही बांधली. ह्या सुमारास अलि अदिलशाहा (द्वितीय) याने सिद्दीच्या सहकार्याने शिवाजीमहाराजांविरुद्ध मोहीम उघडली. कोकणावरील ह्या आक्रमणामध्ये विजापूरचा निष्ठावंत मांडलिक सावंत याने सिद्दीशी सहकार्य केले. त्यावेळच्या युद्धांत सावंत आणि शिवाजी महाराजांचे सेनाप्रमुख बाजी पासलकर हे दोघेही धारातीर्थी पडले. (१६६१ इ. स. वि.). त्यामुळे त्या दोघांचेही सैन्य युद्ध सोडून आपापल्या ठिकाणी परत गेले. त्यानंतर पुन्हा हस्तगत करण्याकरता शिवाजी महाराजांनी रघुनाथ बल्लाळ अत्रे यांच्या नेतृत्वाखाली पाच ते सात हजारांचे अधिक मोठे व बलशाली सैन्य पाठवले. रघुनाथ बल्लाळ अत्र्यांनी सिद्दीचा बीमोड केला. तळे, घोसाळे आणि इतर किल्ले जिंकून घेतले आणि दांड्यापर्यंतचा

१ काळे, इंग्लीश रेकॉर्ड ऑन शिवाजी, पृ. २३.

२ बनाजी, बॉम्बे ॲण्ड द सिद्दीज, पृ. ११-१२.

सागर किनारा लढून हस्तगत केला. मराठ्यांनी पावसाळ्यातही मोहीम चालू ठेवली आणि प्रदीर्घ काळ वेढा घालून दांड्याचा किल्ला जिंकून घेतला. ह्या यशाचा पाठपुरावा करीत त्यांनी प्रत्यक्ष जंजिऱ्यावर तोफा डागल्या. परंतु त्यांचा हा प्रयत्न अयशस्वी झाला. विजापूरहून मदत मिळण्याची आशा सोडलेल्या सिद्दीने शिवाजी महाराजांशी तह करून त्याने दंडाराजपुरी महाराजांच्या स्वाधीन केली. सिद्दीला पराभवाचे हे शल्य बोचून राहिले. त्यामुळे थोड्या कालावधीतच शिवाजी महाराज आणि सिद्धी यांच्यातील शत्रुत्वाचा उद्रेक झाला. सिद्दीने पुन्हा किनारपट्टीवरील मराठी मुलुखात लूटमार व विध्वंस करण्याच्या कार्यास सुरुवात केली. पावसाळ्याव्यतिरिक्त कोरड्या मोसमांमध्ये मराठेही दरवर्षी जंजिऱ्यावर तोफा डागीत असत. तरीही ते जंजिऱ्याचा किल्ला हस्तगत करू शकले नाहीत.

शिवाजी महाराजांनी जिंकून घेतलेल्या किनारी प्रदेशाची नीट व्यवस्था लावली. किनारपट्टीतील आपल्या मुलुखास एका संलग्न प्रांताचे स्वरूप देऊन व्यंकोजी दत्तो नामक सुयोग्य व कार्यक्षम अधिकाऱ्याची त्या प्रदेशातील सुभेदार म्हणून नियुक्ती केली. त्यांच्या हाताखाली पाच ते सात हजार सैनिकांचे पथक कायम तैनातीस दिले.[१]

महाराजांचे कोकण प्रांतातील सुभेदार व्यंकोजी दत्तो यांनी भूमीवरील एका घनघोर लढाईत सिद्दीचा पराभव केला आणि मुख्य भूप्रदेशातून सिद्धीला पूर्णपणे दूर हाकलले. दंडाराजपुरीतील एका टेकडीवर एक किल्ला उभारून व्यंकोजीने दंडाराजपुरीची संरक्षण व्यवस्था अधिक बळकट केली. त्याने बिरवाडी आणि लिंगाणा असे दोन नवे किल्ले बांधून सिद्दीने त्या प्रदेशात मांडलेल्या विध्वंसाला पायबंद घातला. त्यानेतर सिद्दीला रत्नागिरी जिल्ह्यांतील समुद्र किनाऱ्यावरील गावात चाचेगिरी व लूट करीत राहणे याखेरीज पर्याय राहिला नाही. सिद्दीची चाचेगिरी मोडून काढण्याकरता एक सामर्थ्यशाली आरमार बांधण्याचा आणि किनारपट्टीवर त्या योग्य आरमारी तळ किल्ले उभारणीसह सज्ज ठेवण्याचा शिवाजी महाराजांनी दृढ विचार केला.

मराठ्यांचे जंजिऱ्यावर हल्ले :

त्यानंतर म्हणजे शिवाजी महाराजांनी किनारी प्रदेशात किल्ले व आरमाराची उभारणी केल्यानंतर सिद्दी आणि शिवाजी हे दोन्ही पक्ष युद्धाकरता सज्ज राहण्याची तयारी करीत होते. दोन्ही विरोधक परस्परांच्या मुलुखामध्ये जवळ जवळ प्रत्येक दिवशी चढाई करीत आणि त्या चकमकीमुळे शांततेने चालू असणाऱ्या सागरी रहदारीस व्यत्यय येत असे. ऑक्टोबर १६६९ मध्ये शिवाजी महाराजांनी प्रचंड सामर्थ्यानिशी जंजिऱ्यावर आक्रमण

१ साने (संपादक), सभासद बखर, पृ. ७६, सरकार, शिवाजी, पृ. ३५८.

केले. ह्या आक्रमणात सिद्दीची परिस्थिती अत्यंत बिकट झाली व खूप नुकसान झाले. किल्ल्याचा रसद पुरवठा तुटल्यामुळे भुकेने जेरीस येऊन शरणागतीची वेळ येऊन ठेपलेल्या सिद्दीने मुंबईकर इंग्रजांची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला.[१] त्यानंतरच्या वर्षी ह्या संघर्षातील निर्णायक प्रसंग येऊन ठेपला. शिवाजी महाराजांनी आपली सर्व साधने व सामर्थ्य जंजिरा जिंकून घेण्याकडे एकत्रित केली. फत्तेखान सिद्दी शरणागती पत्करण्याचा विचार करीत होता, परंतु त्याच्या हाताखालील संबळ, कासिम व खैरियत यांना हे पसंत पडले नाही. त्यांनी बंड केले. बंडखोरांनी आदिलशहा आणि दक्षिणेतील मोगल राजप्रतिनिधी (प्रमुख) कडे आपल्या मदतीस यावे अशी याचना केली. मोगलांनी ही विनंती तात्काळ मान्य केली. बंडखोर नेत्यांपैकी सिद्दी संबळ यास मनसबदारी आणि तीन लक्ष उत्पनाचा मुलूख देऊन मोगल साम्राज्याचा आरमार प्रमुख नेमण्यात आले. (१६७० इ.) आणि नौदल प्रमुखाव्यतिरिक्त सिद्दी कासीमच्या हाती जंजिऱ्याचा कारभार (शासन) सोपवण्यात आला. सिद्दी खैरियतकडे दंडा राजपूरची सुभेदारी आली. इतर सिद्दी अधिकाऱ्यांचा आपापल्या आरमारातील कामगार व आश्रित नोकर यांच्यावरील अधिकार कायम ठेवण्यात आला आणि जंजिऱ्याच्या एकतंत्री गणराज्याचा कारभार व सर्वसाधारण व्यवस्था एका अधिकारी मंडळावर सोपविण्यात आली.

जंजिऱ्याचे हे बंड फेब्रुवारी १६७१ मध्ये झाले. त्यापूर्वी थोडे दिवस अगोदर नोव्हेंबर १६७० मध्ये शिवाजी महाराजांनी जंजिऱ्याच्या उत्तरेकडे १०० मैलावर नागाव येथे १६० लहान जहाजे, १०,००० घोडेस्वार व २०,००० पायदळाचे सैनिक जंजिऱ्याला वेढा घालण्याच्या पूर्ण तयारीनिशी एकत्र जमवले होते. कुदळी, फावडी, पहारी यांसारखी खाणकामाची, कित्येक हत्यारेही त्यांच्याजवळ होती. २४ नोव्हेंबर रोजी आरमाराच्या ह्या तुकडीने नागाव सोडले आणि २६ नोव्हेंबर रोजी ही तुकडी माहीला आली.[२] त्याच दिशेने मराठ्यांच्या सैन्यानेदेखील जमिनीवरून कूच केले. परंतु २६ नोव्हेंबरला महाराज अचानक माघारी वळले आणि आपल्या आरमारासही त्यांनी परत बोलावले. कारण त्यावेळी बागलाण काबीज करण्यासाठी सैन्यबळ हवे होते. जंजिऱ्याचा नवा प्रमुख सिद्दी कासिम हा अत्यंत शूर आणि धूर्त होता. त्याने आपले आरमार आणि युद्ध साहित्य वाढवले. आपले सैन्य बलशाली केले आणि तो समुद्रात गस्त घालू लागला. तो रात्रंदिवस चिलखत परिधान करीत असे आणि नेहमी शत्रूची जहाजे पकडून आपल्या ताब्यात घेत असे. पकडलेल्या कैद्यांचे तो मुंडण करीत असे. मराठे होलिकोत्सव

१ सरकार, शिवाजी, पृ. २६४.

२ शिवकालीन पत्रसारसंग्रह भाग २, पत्र क्र. १४२०.

साजरा करण्यात गुंतले होते (१६७१). तेव्हा त्याने मराठ्यांकडून दांडा परत हस्तगत केला. या वेळी सिद्दी कासिम समुद्रावरून ४० जहाजे घेऊन आणि सिद्दी खैरियत जमिनीवरून ५०० सैनिक घेऊन मराठ्यांवर चालून आले. सिद्दी खैरियत हल्ला करण्यास येतो आहे असे पाहून मराठ्यांचे सैन्य त्याजशी सामना करण्यास सरसावले. अशा प्रकारे ते प्रतिकार करण्यात गुंतले आहेत हे पाहून कासिमने किल्ल्याची समुद्राकडील भिंत चढून जाण्याची संधी साधली. त्याच्या काही सरदारांना किल्ल्यांतील मराठ्यांनी समुद्रात फेकले. काही जणांना त्यांनी (मराठ्यांनी) कंठस्नान घातले. तरीही उरलेल्या सरदारांनी किल्ल्यात प्रवेश साध्य केला. तेवढ्यात दारू कोठाराचा प्रचंड स्फोट झाला. त्यामध्ये मराठी सैन्याचा प्रमुख आणि त्याचे कित्येक सैनिक मरण पावले.[१]

मराठे सैनिकांची कत्तल करीत त्यांना बाजूला रेटीत सिद्दी कासिम किल्ल्यांच्या केंद्र भागापर्यंत गेला. तेथे त्याला सिद्दी खैरियतची कुमक येऊन मिळाली. त्यांनी मराठ्यांचा पराभव केला आणि दंडा किल्ला काबीज केला. ह्या सुमारास मराठ्यांचे सैन्य नाशिक आणि बागलाणात मोगल सुभेदाराशी निकराने सामना करत होते. मराठ्यांच्या गैरहजेरीत संधी साधून सिद्दी कासिमने दंडाराजपुरीच्या परिसरातले सात किल्ले जिंकून घेतले.[२] पैकी सहा किल्लेदारांनी भयभीत होऊन सिद्दी कासिमची शरणागती पत्करली. सातव्या किल्लेदाराने मात्र सिद्दी कासिमशी निकराने आठवडाभर मुकाबला केला परंतु आपल्या तसेच आपल्या सर्व निकटवर्तीयांच्या जीविताचे रक्षण होईल ह्या कासिमच्या आश्वासनावर शरण येण्यास नंतर तो तयार झाला. किल्ल्याचा ताबा घेताच कासिम आश्वासन विसरला. त्याने किल्ल्यांतील सुंदर स्त्रिया व लहान मुलांना बाटवून मुसलमान केले, निरुपयोगी आणि वृद्ध स्त्रियांना हाकलून लावले आणि सैन्यातील सर्व सैनिकांना ठार मारले.[३] सिद्दीने दंडाराजपुरी काबीज केली ही घटना मराठ्यांच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी बाब होती. राजकीयदृष्ट्या दंडाराजपुरी आपल्या ताब्यात ठेवणे शिवाजी महाराजांना अत्यंत आवश्यक होते. शिवाजी महाराजांच्या काळापासून राजाराम महाराजांच्या काळापर्यंत मराठ्यांनी दंडाराजापुरी हस्तगत करण्याकरिता जिद्दीने आणि निकराने लढाया केल्या. परंतु दंडाराजपुरीचा किल्ला सिद्दीच्याच ताब्यात राहिला. किल्ला सिद्दीकडून हस्तगत करण्याच्या प्रयत्नात मराठे हबशांच्या प्रदेशाची कोंडी करीत असत. ह्या कोंडीचा आर्थिक फटका मराठ्यांपेक्षा हबसाण राज्याला अधिक तीव्रतेने बसत असे.

इ. स. १६७१ च्या मे महात शिवाजी महाराजांनी दंडाराजपुरी किल्ल्यास वेढा घातला. सिद्दीची अवस्था यावेळी फारच बिकट झाली होती. त्यावेळी सिद्दीने चौलच्या पोर्तुगिजांकडे पैशाची आणि युद्ध साहित्याची मदत मिळावी म्हणून विनंती केली. तेव्हा पोर्तुगीज

---

१ सरकार, शिवाजी, पृ. २६४.

२ शिवकालीन पत्रसारसंग्रह भाग २, पत्र क्र. १४२०.

३ सरकार, कित्ता, पृ. २६४.

व्हाईसरॉयने चौलच्या प्रमुखाला सिद्दीस आर्थिक मदत देण्याविषयी कळवले, तसेच गुप्तपणाने त्यास शस्त्रे पुरवण्यात यावीत असे सांगितले. कारण जर शिवाजी महाराजांनी दंडापुरी काबीज केली, तर रेवदंडा आणि कोरलाई (मोरो) या प्रांतासच नव्हे तर संपूर्ण पश्चिम किनारपट्टीस व पोर्तुगिजांच्या हितास ते धोकादायक ठरले असते. ह्या किनाऱ्यावरील प्रदेशांचे महत्त्व पोर्तुगीज शासक अल्फान्सो अल्बुकर्कच्या काळापासून पक्के जाणून होते.[१]

इ. स. १६७१ च्या सप्टेंबर महिन्यात सिद्दीविरुद्ध इंग्रजांची मदत घेण्याचा विचार शिवाजी महाराजांनी केला. दंड्यावर आक्रमण करण्याच्या प्रयत्नात मदत मिळते का हे पाहावे यासाठी आपला गुप्त हेर शिवाजी महाराजांनी मुंबईस पाठवला. परंतु वरिष्ठ इंग्रज अधिकारी आणि सुरतच्या अधिकारी मंडळाने मुंबईच्या कार्यकारी मंडळाला आदेश दिला की, " शिवाजी महाराजांना हवा असलेला दारूगोळा, जहाजे, तोफा आणि शस्त्रे वगैरे युद्ध सामुग्री मिळेल असे आश्वासन देऊ नये, तसेच स्पष्टपणे त्यांना नकारही देऊ नये." कारण दंडा जिंकण्याच्या कामी शिवाजी महाराजांस मदत करणे गैरसोयीचे ठरेल असा आमचा (इंग्रज मंडळाचा) विचार आहे. दंडा हे एक असे मोक्याचे ठिकाण आहे की, जे शिवाजी महाराजांच्या ताब्यात राहिले तर मुंबई बंदराच्या दृष्टीने ते अत्यंत त्रासदायक ठरेल.[२]

सागरी युद्ध (१६७२-१६७५) :

१६७२ मध्ये सिद्दी फत्तेखानाला पदच्युत करून सिद्दी संबळ आरमारप्रमुख बनला. सिद्दी संबळ अत्यंत कार्यक्षम व धाडसी होता. तो सदैव मराठ्यांशी युद्ध करण्यात गुंतलेला असे. त्याने माझगावातील कित्येक घरे जाळून भस्मसात केली होती. मराठ्यांच्या सागरी व्यापार वाहतुकीस तो सतत अडचणी आणत असे. ऑक्टोबर १६७२ मध्ये त्याने मुंबईच्या परिसरात आपले आरमार नांगरून उभे केले. शिवाजी महाराजांच्या ताब्यात असणारे पनवेल, पेण आणि अलिबाग हे जिल्हे लुटण्याचा त्याचा विचार होता म्हणून त्याने मुंबईच्या इंग्रज प्रेसिडेंटकडे आपल्या आरमारास मुंबई बंदरात येऊ देण्याची परवानगी मागितली. परंतु इंग्रज प्रेसिडेंटने ती नाकारली.[३]

इंग्रजांनी ह्या प्रसंगी सिद्दीला मदत नाकारली होती. परंतु येथे औरंगजेब सिद्दीच्या मदतीस आला. त्याने (औरंगजेबाने) सुरतहून लहान आणि मोठ्या अशा ३६ जहाजांचा तांडा दंडाराजपुरीच्या सिद्दीच्या साहाय्यार्थ पाठवला. जेणेकरून समुद्रातून दुहेरी आक्रमण करता यावे.[४] मोगल आरमाराच्या तुकडीने शिवाजी महाराजांची पाचशे व्यापारी जहाजे

१ पर्वते, किल्ला, पृ. ४०.

२ सरकार, शिवाजी, पृ. २६५.

३ बनाजी, बॉम्बे ॲन्ड सिद्दीझ, पृ. १५.

४ सरकार, शिवाजी, पृ. २६५.

नष्ट करून महाराजांच्या ताब्यातील सर्व किनारी बंदरे जाळली आणि लुटली.[१] मराठ्यांविरुद्ध ही मोहीम यशस्वी करून मोगल आरमार इंग्रजांची मदत (शिवाजी महाराजांविरुद्ध) घेण्याकरता मुंबईस आले. परंतु मोगल आणि मराठे या दोघांतील संघर्षात घालमेल करून संकट ओढवून घेण्यास इंग्रजांनी नकार दिला. मात्र प्रसंगवशात डच नौदल अधिकाऱ्यानी दंडाराजपुरी पुन्हा जिंकून घेण्यास शिवाजी महाराजांना २२ जहाजांच्या डच आरमाराची मदत देण्याचे आश्वासन दिले. त्या बदल्यात शिवाजी महाराजांनी डचांना मुंबई जिंकून घेण्याच्या मोहिमेत तीन हजार मराठे सैनिक मदतीस द्यावेत अशी अट होती. परंतु शिवाजी महाराजांनी डचांच्या आश्वासनाचा भरवसा धरला नाही आणि इंग्रजांशी मैत्रीपूर्ण संबंध चालू ठेवले.[२]

१० ऑक्टोबर १६७३ रोजी सिद्दी संबळ आपल्या आरमारासह इंग्रजांची परवानगी न घेता मुंबई बंदरात आला आणि शिवाजीच्या मालकीची पेण व नागोठणे नदीवरील ठाणी त्याने उद्धवस्त केली.[३] सिद्दी संबळने तेव्हा अनावश्यक रक्तपात केला आणि कित्येक माणसे, स्त्रिया व मुले पळवून गुलाम बनवून आपल्याबरोबर मुंबईस आणिली. काही प्रमाणात व्यापारास उपद्रव झाला. त्यामुळे मुंबईच्या इंग्रज प्रमुखाने सिद्दीला आपली नाराजी कळवणारे व तंबी देणारे पत्र पाठवले. प्रेसिडेंटच्या ह्या पत्राकडे दुर्लक्ष करून सिद्दीने आपले अत्याचार, दहशतयुक्त जुलूम चालूच ठेवला. रायगडाहून आलेल्या शिवाजी महाराजांच्या शंभर सैनिकांनी सिद्दीच्या माणसांना चकित करून निर्दयपणे कापून काढले.[४] ह्या घटनेनंतर सिद्दीचे निघृण अत्याचार शांत झाले असे वाटते. इ. स. १६७४ च्या फेब्रुवारी महिन्यात शिवाजी महाराज आणि सिद्दी यांच्यात तुंबळ युद्ध झाले. दोन्ही पक्ष अगदी जेरीस आले होते. तेव्हा सिद्दीने सुरतच्या इंग्रज प्रेसिडंटला दोघांत मध्यस्थी करून शांतता निर्माण करण्याची विनंती केली.[५] मार्च १६७४ मध्ये सिद्धी संबळने रत्नागिरी जिल्ह्यातील मुचकुंढी खाडीत शिवाजी महाराजांचा आरमार प्रमुख दौलतखान याजवर हल्ला चढवला. दोन्ही नौदल प्रमुख जखमी झाले. सिद्दीचे १०० तर मराठ्यांचे ४४ सैनिक कामी आले. मराठ्यांचा विजय झाला. त्यामुळे सिद्दी संबळ जंजिऱ्याच्या २१ मैल दक्षिणेकडील हरेश्वर बंदरात निघून गेला.[६]

---

१ सरकार, शिवाजी, पृ. २६५.

२ बनाजी, बॉम्बे ॲन्ड सिद्दीझ, पृ. १६-१७.

३ ओर्मे, हिस्टॉरिकल फ्रागमेंटस ऑफ हिंदुस्थान, पृ. ३९.

४ बनाजी, बॉम्बे ॲन्ड सिद्दीझ, पृ. १९.

५ सरकार, शिवाजी, पृ. २६७.

६ कित्ता.

मे १६७४ मध्ये शिवाजी महाराजांनी वाटेल ती शर्थ करून दंडाराजपुरी किल्ला जिंकून घेण्याचा निर्धार केला. त्यांनी आपला (दंडाराजपुरीचा) वेढा बळकट करण्याकरता दर दिवशी अधिकाअधिक सैन्य, शस्त्रसामुग्री, माणसे आणि खजिना पाठविण्यास सुरवात केली. त्या वर्षात महाराजांनी राजापुरीपासून गोव्याच्या उत्तरेकडील बार्देसपर्यंतचा दक्षिण कोकणचा सागरी किनारा जिंकून घेतला. परंतु दंडाराजपुरीचा किल्ला ते हस्तगत करू शकले नाहीत. १६७२ च्या अखेरपर्यंत शिवाजी महाराजांनी जंजिरा जिंकण्याच्या निष्फळ प्रयत्नांमध्ये खूप मोठा खजिना आणि १५,००० सैनिक खर्ची घातले होते.[१]

तरीही शिवाजी महाराजांनी ढिलाई केली नाही. जंजिरा काबीज करण्याचे प्रयत्न चालूच ठेवले. १६७५ च्या सप्टेंबर महिन्यात महाराजांनी दंडाराजपुरीवर जमीन व समुद्र दोन्हीकडून हल्ला चढविण्याची योजना आखली. त्यांनी आपले आरमार वाढवले. नोव्हेंबर महिन्यात सिद्दीने त्याच्या आरमाराचे सामर्थ्य अधिक वाढवले होते आणि खाली वेंगुर्ल्याकडे आरमार नेऊन त्याने वेंगुर्ल्याची लूट व जाळपोळ केली होती. विजयदुर्ग आणि राजापुराहून मराठ्यांच्या युद्धनौका सिद्दीशी लढण्याकरता निघाल्या परंतु सिद्दी जंजिऱ्याला पळून गेला.[२]

इंग्रजांचा मराठ्यांकडे पाठवलेला दूत हेन्री ऑक्झिंडन याने शिवाजी महाराजांशी सौहार्दाचे संबंध प्रस्थापित केले. त्याच्या प्रयत्नांमुळेच इंग्रज आणि शिवाजी महाराज परस्परातील मतभेद मिटवून सामंजस्य निर्माण करण्यास तयार झाले. ऑक्झेंडनने शिवाजी महाराज आणि सिद्दीच्या दरम्यान शांतता प्रस्थापित व्हावी असे सुचवले.[३] परंतु त्याचे प्रयत्न निष्फळ ठरले. १६७४ च्या सप्टेंबरमध्ये अफगाणमधील युद्ध (१६७५) निर्णायक स्थितीत असताना औरंगजेब सिंधहून दिल्लीस परत आला होता. त्याने त्याचा सेनापती बहादुरखान यास तात्काळ शिवाजी महाराजांवर चाल करण्याचे आदेश दिले.[४] त्याने (औरंगजेबाने) सिद्दीला दोनशे लढवय्ये, जीवनावश्यक वस्तू आणि शस्त्र सामुग्री, कित्येक लढाऊ गलबते आणि दोन प्रचंड नौका हे सर्व पुरवले.[५] त्याच वेळी, सिद्दीने इंग्रजांच्या हक्कांची पायमल्ली करू नये, उंदेरी, खांदेरी आणि चौलहून येणाऱ्या इंग्रजांच्या जहाजांची लूटालूट, जाळपोळ सिद्दीने करू नये, इंग्रजांच्या जहाजांनी सिद्दीच्या प्रदेशास

१ ओर्मे, हिस्टॉरिकल फ्रागमेंटस ऑफ हिंदुस्थान, पृ. ४९, ५३.

२ सरकार, शिवाजी, पृ. २६८.

३ बनाजी, बॉम्बे ॲन्ड सिद्दीझ, पृ. २२.

४ ओर्मे, हिस्टॉरिकल फ्रागमेंटस ऑफ हिंदुस्थान, पृ. ४४.

५ बनाजी, बॉम्बे ॲन्ड सिद्दीझ, पृ. २३.

त्रास देऊ नये ह्या अटीवर शिवाजी महाराजांशी युद्धात गुंतलेल्या सिद्दीला इंग्रजही मदत करीत होते.[१] १६७५ च्या नोव्हेंबर महिन्याच्या मध्यात शिवाजी महाराजांचे आरमार टिपून बंदरात नष्ट करावे असा सिद्दीने प्रयत्न केला. परंतु त्याची निराशा झाली. ह्या प्रसंगी सिद्दी संबळ अंतर्गत असंतोषामुळे उद्‌भवलेल्या काही अडचणींशी सामना करीत होता. १६७६ च्या एप्रिलात मुंबई बंदरात येऊन राहिलेल्या सिद्दी संबळला सिद्दी आरमाराच्या प्रमुख पदावरून बाजूला सारून सिद्दी कासिमने सूत्रे हाती घेतली आणि १६७६ च्या जुलैमध्ये सिद्दी कासिमच्या नेतृत्वाखाली सिद्दीचे आरमार मुंबई बंदरात आले.[२] इंग्रजांनी सिद्दी कासिमला सन्मानपूर्वक उतरवून घेतले आणि त्याला त्याच्या जहाजांच्या ताफ्यासह माजगाव येथे राहण्याची परवानगी दिली. ऑगस्टच्या मध्यापर्यंत सिद्दी मुंबईतच तळ देऊन राहिला. त्या दरम्यान शिवाजी महाराजांचे पेशवे मोरोपंत जंजिऱ्यावर आक्रमण करण्यासाठी दहा हजार सैनिकांसह घाट उतरून आले. हे आक्रमण परतविण्यासाठी आपले तीनशे सैनिक घेऊन सिद्दी कासिम जंजिऱ्यावर परत गेला. मोरोपंत पिंगळ्यांच्या जहाजांवरील तोफखाना बंद पाडून त्याने त्यांना रायगडला माघारी जाणे भाग पाडले.

त्या वर्षात इंग्रजांना शिवाजी महाराजांकडून पहिली खबर मिळाली ती सिद्दीने केलेल्या अत्याचाराविषयी होती. सिद्दी कोकण किनाऱ्यावरील रहिवाशांवर अनन्वित अत्याचार करीत होता. इंग्रजांना सिद्दीची ही आगळीक समजताच त्यांनी सिद्दीच्या जहाजावरील माणसे गिरफदार केली. त्यापैकी तिघांना फाशी दिले आणि इतरांना सेंट हेलेनावर पाठवून दिले.[३] १६७७च्या नोव्हेंबर महिन्यात आरमार प्रमुख ह्या नात्याने सिद्दी कासिम कोकण किनारपट्टीवर गस्त घालीत असे, वारंवार किनाऱ्यावर उतरत असे आणि किनाऱ्यावील रहिवाशांना बळजबरीने पकडून नेत असे. त्यापैकी ब्राह्मण माणसांसहित सर्व कैद्यांना भंगीकाम व अंगमेहनतीचे काम करायला लावीत असे. १६७८ च्या एप्रिलमध्ये तो (सिद्दी) पावसाळी मोसमात विश्रांती घेण्याकरता मुंबईस परत आला. शिवाजी महाराजांनी आपल्या प्रजेस भोगाव्या लागलेल्या अन्यायाचा आणि अपमानाचा बदला घेण्याकरता आपले (मराठ्यांचे) आरमार प्रमुख दौलतखान आणि दर्यासारंग यांना ४००० सैनिकांच्या तुकडीसह पनवेलला पाठवले. खाडी पार करून मुंबई बेटाच्या माझगाव बंदरात जहाज नांगरून उभ्या असलेल्या सिद्दीचे आरमार जाळून नष्ट करण्याचे त्यांना आदेश दिलेले होते. परंतु प्रतिकूल हवामानामुळे दौलतखान खाडी ओलांडू शकला नाही आणि तो रायगडला परत आला. तेव्हा सिद्दी कासिमने आपली जहाजे अलिबागच्या किनाऱ्यावर पाठवली आणि लुटालूट केली.

---

१ बनाजी. डी. आर., बॉम्बे ॲन्ड सिद्धी, पृ. २३.

२ फॉरेस्ट, होम सिरीज, भाग १, पृ. ९५.

३ ओर्म., कित्ता, पृ. ६७-७२ ; अंडरसन. "द इंग्लिश इन् वेस्टर्न इंडिया", पृ. ८१.

१६७८ च्या ऑक्टोबर महिन्यात शिवाजी महाराजांनी संतप्त होऊन जंजिऱ्यावर तोफा डागल्या. या प्रसंगी आपल्या सुरतेतील माणसांना (सैनिकांना) पगार देऊ न शकल्यामुळे त्याची मदत न मिळालेल्या सिद्दीला मुंबई बंदरातच मुक्काम ठेवावा लागला.

सिद्दीला तुल्यबळ असे आपले आरमार शक्तिशाली बनविण्याकरता महाराजांचे सात वर्षे प्रयत्न चालू होते. १६७८ पर्यंत महाराजांचे आरमारात २० गुराबे (शिडाची जहाजे) आणि ४० गलबते होती. परंतु भर समुद्रांत सिद्दीच्या आरमाराच्या प्रचंड नौकापुढे त्यांचे सामर्थ्य कमी पडत असे.[१]

शिवाजी महाराजांचे असे मत होते की, त्यांना जंजिरा घेण्यामध्ये पुन्हा पुन्हा अपयश येते आणि सिद्दी मराठ्यांच्या मुलखावर हल्ले चढवतो याचे कारण त्याला इंग्रजांनी बंदरात थारा दिला हे होय. यामुळे इंग्रजांना त्यांचे तटस्थपणाचे धोरण अधिक कडक आणि स्पष्ट करण्यास प्रवृत्त करावे असा महाराजांनी दृढ विचार केला. सिद्दीवर वचक ठेवण्यास सोईस्कर अशी खांदेरी, उंदेरी ही बेटे महाराजांनी काबीज केली.[२] खांदेरी मराठ्यांच्या हाती राहणे, इंग्रजांच्या विशेषकरून मुंबईकर इंग्रजांच्या दृष्टीने सर्वस्वी अनिष्ट ठरणारे होते. कारण मुंबई बंदरात येणारे किंवा बंदरातून बाहेर पडणारे कोणतेही जहाज खांदेरीतील टेहाळणी चुकवून जाऊ शकणार नव्हते. म्हणजेच बंदरात येणाऱ्या अथवा जाणाऱ्या प्रत्येक जहाजांची मराठ्यांना खबर मिळाली असती. त्यामुळे पुढे उभे ठाकलेल्या संकटांच्या आशंकेने इंग्रज सावध झाले आणि त्यांनी शिवाजी महाराजांविरुद्ध सिद्दीला मदत करण्याचे ठरवले. जंजिऱ्याचे आपले बस्तान अधिक दृढ करण्यास सिद्दी कासिमदेखील उत्सुक होता. आपले आरमार अधिक सुसज्ज ठेवण्यात त्याला इंग्रजांची आवश्यक ती मदत मिळाली.[३]

सिद्दी कासिम आरमारासह मुंबई बंदरात आला आणि मराठ्यांना खांदेरीवरून हुसकावून लावण्याचे कामी इंग्रजांनी व सिद्दीने संयुक्तपणे खांदेरीवर आक्रमण करावे असे इंग्रजांनी आवाहन केले. सिद्दी कासिमच्या आरमारात दोन मोठी जहाजे, तीन शिडवाल्या युद्धनौका, पंधरा भक्कम गलबते आणि सातशे उत्तम लढवय्ये सैनिक यांचा समावेश होता. इंग्रजांना सिद्दीचा खांदेरी बेट आपल्या ताब्यात घेण्याचा मनोदय माहीत होता. त्यामुळे त्यांनी सिद्दीला मदत देण्याची टाळाटाळ केली. परंतु इंग्रजांनी मदत देण्याचे टाळले म्हणून सिद्दी कासिम निराश झाला नाही. त्यांच्या दोन मोठ्या जहाजांवरून त्याने कित्येक दिवसपर्यंत खांदेरी बेटावर तोफांचा भडिमार केला. मराठ्यांच्या तोफांनीदेखील त्यास प्रत्युत्तर दिले परंतु कोणत्याही पक्षास अपेक्षित हेतू साधता आला नाही. इ. स. १६७९ च्या अखेरीस इंग्रज, शिवाजी महाराज आणि सिद्दी यांच्यातील घडामोडींची स्थिती ही अशी होती.

□□

१ ओर्मे. हिस्टोरिकल फ्रागमेंटस ऑफ द मोगल एम्पायर, वॉर इन हिन्दुस्तान, व्हा. १, पृ ७८.

२ सरकार, कित्ता, पृ. २४४.

३ नैर्न, कित्ता, पृ. ७३-७४.

२३. मोगलांच्या आक्रमक कारवायांशी मुकाबला— संभाजी दिलेरखानाकडे जातो

शिवाजी महाराज कर्नाटकांतून पन्हाळगडास १६७८ च्या पावसाळ्यापूर्वी आले.[१] त्यावेळी विजापूरकर आणि शिवाजी महाराजांच्या सैन्याची परस्परांवर चढाई चालूच होती. विजापूर सरदार सर्जाखानाने मे-जून मध्ये अथणी व रायबाग येथील महाराजांची ठाणी उठविली तर महाराजांच्या सैन्याने मुळगुंद लक्ष्मेश्वर, गदग अशा विजापूरकरांच्या पेठा लुटील्या.[२] ऑगस्ट १६७८त जमशीरखान, सलीमखां, सर्जाखान व सिद्दी मसऊदखानचा मुलगा असे मिळून महाराजांवर चालून गेले. महाराजांचे सैन्यही पन्हाळ्याखाली गोळा झाले व पावसाळा संपताच लढाई सुरू झाली. तीत महाराजांच्या सैन्याचा विजय झाला.[३]

दक्षिणेतील सर्वांचा शत्रू मोगल. त्याजशी महाराजांचा लढा चालूच होता. मोगलांच्या मुलखात महाराजांची सैन्ये सदैव फिरत राहिली. औरंगाबादेकडे जून-जुलै महिन्यांत गेलेल्या सैन्याने मोगलांच्या मुलखांतून चौथाई वसूल केली आणि दिलेरखान विजापूरच्या स्वारीत गुंतल्यामुळे आणखीही मोगलांचा मुलूख त्यांनी उद्ध्वस्त केला. शिवाजी महाराजांच्या मोगल मुलखावरील आक्रमणास आळा घालण्यासाठी बादशहाने आपला मुलगा मुअज्जम याची दक्षिण सुभ्यावर नियुक्ती केली. तो १५-२-१६७९ रोजी औरंगाबादेस येऊन पोचला तरी दक्षिण कारभारांत दिलेरखानाकडेच प्रमुखपण राहिले व लढा चालूच राहिला. या लढ्यांत शिवाजी महाराज व रणमस्तखान यांची लढाई झाली. या लढाईत सरदार सिदोजी निंबाळकर गोळी लागून ठार झाला. '१६७८ च्या डिसेंबरांत महाराजांनी धरणगाव, चोपडा व आसपासची गावे लुटली. या लढ्यात महाराजांबरोबर, १२००० स्वार होते. यावेळी मोरोपंत पिंगळे यांचे हाताखाली सैनिक किल्ले घेण्यात गुंतले होते. त्यांनी हनुमंतगड घेतला, मुल्हेर घेण्याचे प्रयत्न चालू होते. [४] [बेंद्रे, शिवाजी, पृ. ९२३]

---

१ डॉ. बाळकृष्ण, शिवाजी भाग २, पृ. ९२.

२ बेंद्रे, छत्रपती शिवाजी, पृ. ६९३.

३ सरदेसाई, न्यू हिस्टरी ऑफ मराठाज भाग १, पृ. १५१.

४ शिवचरित्र प्रदीप, जेधे शकावली, पृ. २३.
छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे पत्र क्र. ८४. [सं. डॉ. प्र. न. देशपांडे]

जिझिया कराबद्दल औरंगजेबाचा निषेध :

याचवेळी औरंगजेबास वाटले की लढायांमुळे आपला खजिना रिता होत आहे. म्हणून खजिन्यात भर कोठून घालावी ह्या विवंचनेत औरंगजेब असता त्या राज्यांतील हिंदू प्रजेवर जिझिया कर बसवून पैसा गोळा करण्याचे त्याच्या मनाने घेतले आणि मोगल राज्यांतील हिंदू प्रजेवर त्याने जिझिया कर दि. ३-४-१६७९ च्या फर्मानाने बसविला. हे शिवाजी महाराजांस कळताच त्यांना औरंगजेबाची कीव आली व त्यांनी एक पत्र लिहून औरंगजब बादशहाची कानउघडणी करण्याचे ठरविले. आपले पारसनीस नीलप्रभू यांजकडून सुंदर फारसी भाषेंत एक लांब पत्र बादशहाचे नाव लिहून पाठविले, ते सुप्रसिद्ध असून वाचनीय आहे. एवढ्या ऐश्वर्यबाज बादशहाचे दोष स्पष्टपणे एकट्या शिवाजी महाराजांनी दाखविले. ते त्या पत्रात म्हणतात, " पातशाही पुरातन हिंदूंची आहे आपल्या अगोदरचे अकबरपासूनचे बादशहा जझियापट्टी घेण्यास समर्थ होते परंतु त्यांनी तसे केले नाही. न्यायाचे मार्गाने पहाता जझिया पट्टीचा कायदा केवळ गैर आहे. हिंदू लोकांस पीडा करण्यातच धर्म आहे असे मनामध्ये असल्यास आधी राजा रामसिंह याजपासून जझिया घ्यावा. गरीब, अनाथ जे मुंग्या चिलटांसारखे आहेत त्यांस उपसर्ग करण्यांत कांही मोठेपणा नाही " अशा प्रकारे अनेक गोष्टी त्या पत्रात सांगून बादशहाचा हिंदूवर कर बसविल्याबद्दल निषेध केला.[१]

संभाजीराजे मोगलांकडे जातात [१३ डिसेंबर १६७८] :

संभाजीराजे सज्जनगडावर होते. ते गुप्तपणे तिथून निसटून मोगल सुभेदार दिलेरखानास भेटण्यासाठी बहादूर गडाकडे गेले. दिलेरखानास संभाजीराजे यांनी आगाऊ पत्र पाठविले होते. त्यावरून खानाने त्यास दोन सरदार सामोरे पाठवून सन्मानाने भेटीस आणिले.[२] करकंब येथे त्यांची भेट झाली. दिलेरखानास संभाजीराजे भेटल्याचा आनंद झाला. लगेच त्याने बादशहास ही आनंदाची बातमी कळविली व संभाजीराजांस सप्तहजारी मनसब दिली. [३] तदनंतर दिलेरखान संभाजीराजांसह विजापुरावर चालून गेला. यापुढील हकिकत सांगण्याअगोदर संभाजीराजांचे बालपणापासूनचे धावते चरित्र पाहू.

[शिवाजी महाराजांची पत्नी सईबाई हीस १४ मे १६५७ गुरुवार दिवशी पुरंदर येथे पुत्ररत्न झाले. त्यांचे नाव शिवाजी महाराजांच्या थोरल्या भावाचे संभाजीराजे असे ठेविले. त्यानंतर सईबाईस आजारपण जडले. त्या दुखण्यातच ती ५ सप्टेंबर १६५९ या दिवशी राजगडावर मरण पावली.[४] आईच्या पश्चात संभाजी राजांच्या शिक्षणाची व्यवस्था व

१ पिसुर्ले, शिवाजी, पृ. १२; प. सा. सं. क्र. १०२०.

२ प. सा. सं. क्र. १०२३.

३ चित्रगुप्त बखर, पृ. १३३ व पृ. १३७.

४ मुंबई रेकॉर्ड्स पो. डि. डायरी नं. ३८६/१८१२. पृ. १५१६-१८.

देखरेख आजी जिजाबाई यांनी केली. संभाजी राजे यांना सैनिकी शिक्षणही देण्यात आले. शिवाजी महाराजांनी संभाजी राजांस युद्धकलेचे शिक्षण स्वत:च्या मार्गदर्शनाखाली दिले आणि त्यांना युद्धकलेत तरबेज केले. संभाजी राजांच्या युद्धकलेतील नैपुण्याबद्दल ॲबेकॅरे यांनी प्रशंसोद्‌गार काढले आहेत.][१]

संभाजी राजांचा विवाह पिलाजी शिर्के यांची कन्या राजसबाई बरोबर झाला. वधूचे नाव येसूबाई असे ठेवण्यात आले.[२] लहान वयातच त्यास राजकारणाचे प्रत्यक्ष धडे घेण्याची संधी मिळाली. राजे जयसिंगाबरोबरच्या तहात शिवाजी महाराजांनी पाच हजारांची मनसब आणि नोकरीच्या खर्चाची जहागिर संभाजी राजांच्या नावे स्वीकारली. अशा रीतीने संभाजी राजांचा नकळत चंचूप्रवेश राजकारणात झाला. तहांतील अटीप्रमाणे केवळ आठ वर्षे वयाचे संभाजी राजे १८ जून १६६६ रोजी मोगल छावणीत दाखल झाले.[३] सप्टेंबर १६६६ पर्यंत शिवाजी महाराजांचा प्रतिनिधी म्हणून संभाजीराजे मोगलांच्या ओलीस राहिले. मोगलांचा मनसबदार म्हणून संभाजीराजे शिवाजी महाराजांबरोबर बादशहाच्या भेटीस आग्रास ११ मे १६६६ रोजी पोचले. तिथे रामसिंगाबरोबर संभाजीराजे औरंगजेबाच्या भेटीस गेले. तदनंतर दरबारांत अनेक वेळा गेले. अखेर १८ ऑगस्ट १६६६ रोजी पितापुत्र औरंगजेबाच्या कैदेतून निसटले. महाराज दि. १२ सप्टेंबर १६६६ रोजी राजगडावर पोचले, मागाहून संभाजी राजे ३० नोव्हेंबर १६६६ रोजी राजगडास पोचले.[४] त्यानंतर मोगलांचे आणि शिवाजीमहाराजांचे सख्य झाले व तह झाला. या तहाप्रमाणे शिवाजी महाराजांचा प्रतिनिधी म्हणून संभाजीराजांना चार हजार स्वारांची मनसब देण्याचे व वऱ्हाड आणि खानदेशचा मोकासा देण्याचे ठरले. इ. स. १६६७, ४ नोव्हेंबर रोजी संभाजीराजे यांनी मोगली मनसबदार म्हणून शहाआलमची भेट घेतली. तद्‌नंतर संभाजीराजे ५ नोव्हेंबर १६६७ रोजी राजगडास परतले.[५] इ. स. १६७० सालापासून शिवाजी महाराजांनी युवराज म्हणून संभाजीराजे यांना शिक्षण देण्यास प्रारंभ केला. राज्यकारभारांत त्यांना अनुभव यावा म्हणून महाराजांनी १६ जानेवारी १६७१ रोजी कारभार सांगितला. १६७२ सालापासून संभाजीराजे युद्ध आघाडीवर जाऊ लागले. संभाजी राजास वयाच्या १७ व्या वर्षापर्यंत (१६७४ आजीचे-जिजामातोश्रींचे) वात्सल्य लाभले.

---

१ चिटणीस बखर, पृ. १४२-१४६.
२ बेंद्रे, शिवाजी महाराज, पृ. ३९२.
३ प. सा. सं. क्र. १०४४.
४ काळे, छत्रपती शिवाजी महाराज, पृ. १२२.
५ सभासद, शिवाजी, पृ. ३७.

राज्याभिषेकाचा सोहळा संपल्यावर गृहकलहास सुरवात झाली. दि. २४ फेब्रुवारी १६७० या दिवशी राणी सोयराबाईना मुलगा झाला. त्याचे नाव राजाराम ठेवले. राज्याभिषेकाच्या वेळी संभाजीराजे १७ वर्षांचे होते. राजाराम ४ वर्षांचे होते. संभाजीराजांस युवराजपद मिळाले. राजारामास ते मिळणार नाही म्हणून त्याची आई सोयराबाई हिला दुःख झाले. राजारामाला गादी मिळावी म्हणून सोयराबाईने महाराजांजवळ हट्ट सुरू केला. महाराजांस दुःख झाले. दि. ६ ऑक्टोबर १६७६ ला कर्नाटक स्वारीवर निघण्यापूर्वी महाराजांनी संभाजी राजांकडे कारभार सोपविला. कारभार पाहत असता त्यांच्याकडे मंत्र्यांनी प्रजेला दिलेल्या त्रासाच्या कागाळ्या येऊ लागल्या. तेव्हा राजे मंत्र्यांची कानउघाडणी करू लागले. प्रधान मंत्री मोरोपंत पिंगळे यांनी महाराजांना संभाजीराजे मंत्र्यांचा उपहास करतात व अपमान कसा करतात हे सांगितले. तेव्हा संभाजी राजांस समर्थांनी चार शहाणपणाचे शब्द सांगावे म्हणून महाराजांनी राजांस सज्जनगडावर रामदास स्वामींच्या भेटीस जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे संभाजीराजे शृंगारपुराहून सज्जनगडावर गेले. तेथे रामदासस्वामी नव्हते. त्यानंतर संभाजीराजे राजियांवर रुसून दक्षिणचा सुभेदार दिलेरखानाकडे सुरुवातीस सांगितल्याप्रमाणे गेले. दिलेरखानाने दि. १३ डिसेंबर १६७८ रोजी संभाजीराजांची समारंभपूर्वक भेट घेतली. दिलेरखानाने भेटीच्या वेळी बादशहाने संभाजीराजांसाठी पाठविलेला एक हत्ती, तीन घोडे, पोशाख, तलवार, चौघडा हा नजराणा दिलेरखानाने राजेंना दिला. याशिवाय संभाजी राजांस ७००० स्वार आणि ७००० जातींची मनसब देण्यात आली.[१]

दिलेरखानाने संभाजी त्यांच्याकडे आल्याचा फायदा घेऊन मराठी मुलखांतील प्रदेश जिंकण्यास सुरुवात केली. दोघांनी मराठ्यांचे काही गड काबीज केले. संभाजी दिलेरखानाकडे गेल्यावर दिलेरखान व संभाजी यांनी ३ एप्रिल १६७९ रोजी शिवाजी महाराजांचा भूपाळगड जिंकला. शिवाजी महाराजांनी हा किल्ला मांजऱ्यानजीकच्या पर्वतावर बांधून त्याचे भूपाळगड असे नाव ठेविले होते. या किल्ल्यावर सामान, सरंजाम आणि मालमत्ता ठेवण्यात येत असे. गडावर लढाऊ शिबंदी व शूर शिपायांचा पक्का बंदोबस्त केलेला होता. मोगलांची फौज येत आहे असा पुकारा होतांच किल्ल्यांच्या आसमतांतील गावचे लोक किल्ल्यांत आश्रयास जाऊन राहिले. दिलेरखानाने संभाजींच्या मदतीने भूपाळगड किल्ला घेतला. या किल्ल्यांचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा याने संभाजीराजांस समोर पाहून शत्रूवर गोळे टाकले नाहीत. याबद्दल शिवाजी महाराजांनी त्यास ठपका दिला. किल्ला हस्तगत झाल्यावर दिलेरखान व संभाजी किल्ल्यात घुसले त्यांनी ७/८ शे निरपराध शस्त्रहीन लोकांचे हात तोडले. बाकीच्यांना कैद करून गुलाम करण्यात आले.[२] दिलेरखानाने भूपाळगडची तटबंदी पाडून टाकली. यानंतर दिलेरखान व

---

१ शकावली, शि. च. प्र., बेंद्रे, शिवाजी, पृ. १०७५.

२ शिवचरित्र प्रदीप, पृ. २९.

संभाजीराजे विजापूरवर चालून गेले. विजापूरला सिद्दी जौहरचा जावई मसाऊद ऊर्फ मसूद हा वजीर होता. दिलेरखान चढाई करून येतो आहे हे समजताच मसूदचे धाबे दणाणले. त्याने शिवाजी महाराजांस मदतीकरता हाक दिली. महाराजांनी विजापूरच्या रक्षणासाठी दहा हजार फौज रवाना केली व मागाहून स्वत: महाराज मोरोपंत पिंगळ्यासह विजापूरजवळ दिनांक ३१ ऑक्टोबर १६७९ या दिवशी जाऊन पोचले.[१] महाराजांच्या मनात सुलतानांची भेट घेऊन दक्षिणी सत्ताधिशांची एकजूट बळकट करण्याची इच्छा होती. पण मोरोपंतांनी अशा संकटांत जाणे कसा प्रसंग येईल असे म्हणून आक्षेप घेतल्यामुळे भेटीचा बेत सोडून दिला. मात्र दिलेरखान विजापुरावर चालून आला तेव्हा मराठ्यांनी खानाची रसद मारून छापे घालून त्यास हैराण केले. तो वैतागून गेला. त्याने विजापूरचा वेढा उठवून तिकोट्यास प्रयाण केले.[२] (दिनांक १४ नोव्हेंबर १६७९)

दिलेरखान व संभाजीराजे तिकोट्यास आले तेथे दिलेरने प्रजेवर भयंकर अत्याचार सुरू केले. हिंदू स्त्री-पुरुषांना गुलाम केले. अब्रूरक्षणासाठी कित्येक स्त्रियांनी मुलां-बाळांसह विहिरीत उड्या टाकल्या.[३] हे पाहून संभाजीराजांना राग आला त्यांनी दिलेरखानास ह्याबद्दल जाब विचारला. तेव्हा दिलेरखान उद्धटपणे उद्गारला की मी माझा मुखत्यार आहे तुम्ही मला विचारू शकत नाही. दिलेरखानाचे कृत्य व अरेरावीपणा याने संभाजी महाराजांना भयंकर चीड आली. त्या उभयतांचे यामुळे वाकडे आले. विजापूर, गोवळकोंडा या दोन्ही ठिकाणी दिलेरखानाचे उद्योग फसले यामुळे औरंगजेबाची खानावर इतराजी झाली त्यास त्याने परत बोलावून बहादूर खानासच पुनरपी दक्षिणच्या कारभारावर रवाना केले.

दिलेरखानाचे संकट दूर झाल्यावर विजापूरकरांनी शिवाजी महाराजांबरोबर मित्रत्वाचा तह (ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यांत) केला. त्यानंतर आदिलशाही मुलुखांत पसरलेले आपले सर्व सैन्य काढून घेऊन आणि एकवटून ती महाराजांनी आपला शत्रू जो मोगल त्याच्यावर रवाना केली. शिवाजी महाराज विजापूरच्या मदतीस १० हजार घोडे स्वारांनिशी चालून गेले होते. ते सैन्य बरोबर घेऊन दिनांक ४ नोव्हेंबर १६७९ रोजी महाराज सेल्गुरांतून बाहेर पडले. हेतू हा की मोगलांच्या मुलुखात चढाई केल्यावर दिलेरखान विजापूरहून निघून मोगल मुलूखावर झालेल्या हल्ल्याचे निवारण करण्याकरता येईल. महाराजांनी सेल्गुरांतून बाहेर पडताना आपल्या सैन्याच्या दोन टोळ्या केल्या आणि ह्या दोन्ही टोळ्यांनी जालनापर्यंतचा मोगल मुलूख बेचिराख करून जालनापुरची मोठी पेठ त्यांनी लुटली. त्या शहराला लागून सय्यदखान महंमद ह्या मुसलमान साधूचा मठ

१ पत्रसार संग्रह क्र. २१८१.

२ सरदेसाई, शककर्ता शिवाजी, पृ. ३३८.

३ कित्ता.

होता त्यात पुष्कळ धनीकांनी आपले वित्त नेऊन ठेविले होते. शिवाजी महाराजांनी त्या साधूच्या विरोधास न जुमानता तो आश्रम लुटला. त्यावरून साधूने शिवाजी महाराजांस शाप दिला म्हणून शिवाजी महाराजांस लवकर मरण आले असे काफीरखान लिहितो. ती लूट घेऊन पट्टागडाचे रोखे महाराज जात असता वाटेत मोगल सरदार रणमस्तखान, आसफखान, जाबीतखान आदी ५/७ सेनापतींनी ८/१० हजार स्वारानिशी त्यांना अडविले. त्या सर्वांना हुलकावणी देऊन महाराज नोव्हेंबरच्या अखेरीस पट्ट्यास (विश्रामगडास) पोचले. त्या बाजूच्या मोहिमेचे काम मोरोपंतावर सोपविले. बागलाण व खानदेश प्रांतांत मोगलांचे २७ किल्ले होते ते व खालील मुलूख काबीज करण्याची कामगिरी महाराजांनी मोरोपंत पिंगळे याजवर सोपविली. मोरोपंतांने धरणगाव, चोपडा वगैरे शहरे लुटली व सुरतेकडे झेप टाकली.[१] तिथून ते सैन्य बऱ्हाणपूरच्या रोखाने मलकापूरच्या बाजूने गेले. मोरोपंतांने अहिवंत, नाहावा असे बागलाणांतील किल्ले घेतले. मुल्हेरवर हल्ले चढविले व हनुमंतगड काबीज केला. वाटेत सर्वत्र चौथाईचे करार करून घेतले. शिवाजी महाराज पट्टा किल्ल्यावर राहून मराठी फौजांस मार्गदर्शन करीत होते.[२] त्यानंतर डिसेंबरचे आरंभी महाराज रायगडावर आले.

हा महाराजांना झालेला आनंद त्यांनी राजे व्यंकोजीस पत्र लिहून व्यक्त केलेला दिसतो. व्यंकोजीस महाराज लिहितात चिरंजीव राजेश्री संभाजीराजे मोगलाईंत गेले होते. त्यास आणावयास उपाय बहुत केला. त्यासही कळून आले की ये पातशाहींत अगर विजापूरचे अगर भागानगरचे पातशाहीत आपले मनोगतानुरूप चालणार नाही. ऐसे जाणून त्यांनी आमचे लिहीण्यावरून स्वार होऊन आले. त्याची आमची भेट झाली. घरोब्याचे रितीने जैसे समाधान करून ये तैसे केले. हे सविस्तर वर्तमान तुम्हांस कळावे म्हणेन लिहीले असे.[३]

संभाजी राजेना भेटण्यासाठी पन्हाळ्यास गेले. यावेळी विजापूरकरांचा व मोगलांचा तह होऊन (इ. स. १६८० जानेवारी-फेब्रुवारी) विजापूरचा वेढा उठला. महाराजांच्या मदतीबद्दल आदिलशहाने महाराजांचे मनःपूर्वक आभार मानले आणि विपुल धन हत्ती, घोडे महाराजांस दिले. विजापूरकर व महाराज यांचा तह झाला. त्यात आदिलशहाने महाराजांनी कर्नाटक स्वारीत घेतलेल्या विजापूरकरांच्या सर्व प्रदेशास मान्यता दिली.

□□

१ पगडी, मोगल आणि मराठे, पृ. ७३.

२ सभासद बखर (सं. गाडगीळ), पृ. ११९-१२६.

३ शि. पत्रसार संग्रह क्र. २२३६.

२४. शिवाजी महाराजांचे निर्वाण

शिवाजी महाराज बंगलोरला दोन वर्षे (१६४०-४२) प्रशिक्षण घेऊन पुण्यास १६४३ च्या सुरुवातीस आले. त्यावेळेपासून ते इ. स. १६७९ अखेरपर्यंत जवळ जवळ ३६ वर्षे अविश्रांत परिश्रम करून आणि अनेक संकटांवर मात करून शिवाजी महाराजांनी एका स्वतंत्र राज्याची स्थापना केली. हा तत्कालीन लोकांना एक चमत्कारच वाटला असणार, महाराजांनी "हिंदवी स्वराज्य" हे विजापूरच्या आदिलशहाचे लचके तोडून निर्माण केले. श्री. पगडी सांगतात की विजापूरच्या राज्याच्या उत्कर्षांच्या काळांत त्याचे आजच्या परिभाषेत बोलावयाचे तर चौवीस जिल्हे होते. महाराजांच्या मृत्यूच्या पूर्वी यापैकी बारा जिल्हे मराठी राज्यांत समाविष्ट झाले होते. मुघलांचा एकच जिल्हा, बागलण हा मराठी राज्यात आला होता आणि तेथेच मुघल आणि मराठे यांची अटीतटीची झुंज चालू होती. अशा स्थितीत पुत्र संभाजीराजे मुघल सरदार दिलेरखानाकडे दि. १३ डिसेंबर १६७८ रोजी गेले.[१] त्यामुळे दिलेरखानाचे पारडे जड झाले. आणि महाराजांपुढे फार मोठे संकट उभे राहिले. ह्या आपत्तीसही तिळमात्र न डगमगता महाराजांनी आपली सैन्ये मुघलांच्या व विजापूरकरांच्या अशा दोन्ही मुलुखात स्वैर संचाराकरिता व त्या त्या राज्यातील शहरे लुटून पैसा आणण्याकरिता रवाना केली. मोरोपंत पिंगळे यांच्या हाताखालील सैन्याने कोपळचा मजबूत किल्ला ३ मार्च १६७९ रोजी घेतला.[२] दिनांक १० मार्चला सेनापती हंसाजी मोहिते (यास महाराजांनी हंबीरराव किताब १६७८ मध्ये दिला) याने बाळापूर घेतले व आपले सैन्य थेट विजापूरांपर्यंत भिडवून त्यांनी जवळील शहापूर लुटले. विजापूर मुघलांच्या हाती जाऊ नये म्हणून महाराजांनी दिनांक २६ ऑगस्ट १६७९ ला आपला वकील श्यामजी नाईक यास तह करण्याकरिता पाठविले. तेव्हा उचल खाऊन मुघलांनी सप्टेंबरात मंगळवेढे घेतले आणि ऑक्टोबरात दिलेरखानाने विजापुरास जाऊन वेढा घातला [३] व गोवळकोंडेकरांकडे जबरदस्त खंडणीची मागणी केली. मोगलांचे हे संकट समोर आलेले पाहून आदिलशाही दरबाराने अखेरीस निश्चय करून शिवाजी महाराजांशी प्रकट तह करण्याचा निर्णय घेतला. (इ. स. १६७९ ऑक्टोबर-नोव्हेंबर) तहानंतर विजापूर राज्यात पसरलेले मराठी

१ जदुनाथ सरकार, शिवाजी (५वी आवृत्ती), पृ. ३१७.

२ ९१ कलमी बखर क-७४.

३ शिवचरित्र प्र., पृ. ३०.

सैन्य काढून घेऊन ते मुघलांवर रवाना केले. मुघलांच्या मुलूखात जबरदस्त उठावणी झाल्यामुळे मुघल सरदारांत अंतर्गत भांडणांना ऊत आला. ह्या एकंदर परिस्थितीस कंटाळून संभाजीराजेंनी महाराजांकडे येण्याचा निर्णय घेतला. महाराजांच्या हस्तकांचा हितोपदेशही ह्यास कारणीभूत झाला. संभाजीराजे दिलेरखानास सोडून पन्हाळा किल्ल्यावर शिवाजी महाराजांपाशी आले. पितापुत्राची भेट १३ जानेवारी १६८० रोजी झाली. दिलेरखानाने विजापूरास वेढा दिला असता महाराजांनी तो अयशस्वी करण्यासाठी व मुघलांविरुद्ध सर्व दक्षिणी सत्तांनी एक झाले पाहिजे या तत्त्वास अनुसरून आपल्या फौजा विजापुरास वेढा घालून बसलेल्या मुघल सैन्यावर रवाना केल्या. त्यावेळी मुघल नरम येऊन त्यांनी विजापूरकरांशी तह केला. (इ. स. १६८० जानेवारी-फेब्रुवारी) आणि विजापूरचा वेढा उठविला.[१] याच दरम्यान आपल्या आरमारांच्या जोरावर इंग्रजांना दम देऊन त्यांना दिलेल्या व्यापारी सवलती काढून घेतल्या, त्यांच्या मालाची जप्ती करविली तेव्हा इंग्रजांनी सिद्दीला कोणत्याही प्रकारची मदत न करण्याचे कबूल करून त्यांनी महाराजांशी जानेवारी २८ रोजी सलोख्याचा तह केला,[२] व आपली गलबते थळ भागातून काढून घेतली. यानंतर महाराजांना स्वास्थ्य मिळाले. त्याचा लाभ घेऊन महाराज रायगडावर परत गेले. तेथे त्यांनी आपला दुसरा मुलगा राजाराम याची त्यास ११ वे वर्ष सुरू झाल्यानंतर मार्च दिनांक ७ रोजी मुंज केली [३] आणि १५ मार्चला प्रतापरावांच्या मुलींशी त्याचा विवाह लावला.[४] यानंतर ते फक्त सात-आठ दिवस या लोकी आरोग्याने राहिले. मार्चच्या २३ तारखेला त्यांचे रक्तातिसाराचे शेवटचे दुखणे सुरू झाले आणि चैत्र शु. १५ ला (इ. स. १६८० एप्रिल ३) शनिवारी दोन प्रहर दिवसा रायगडांवर त्यांनी देह ठेवला.[५]

शिवाजी महाराजांस रक्तातिसार झाला होता असे इंग्रज वखारवाले लिहितात. त्यांच्या आजारात रक्ताच्या ओकाऱ्या व ताप १३ दिवस होता. नंतर मृत्यू आला. प्रवाशांच्या लिहिण्याप्रमाणे हा आजार प्रवासातील सूर्यतापाच्या परिणामाने होतो. इंग्रजांच्या वर्णनाप्रमाणे शक्यही दिसते. त्यामुळेच ते प्रथमपासून बेशुद्धावस्थेत होते. जर महाराजांना शुद्ध असती तर त्यांनी आपल्या पश्चात स्वराज्याची योग्य ती काळजीपूर्वक व्यवस्था लावून दिली असती.

१ जदुनाथ सरकार, शिवाजी (५वी आ.), पृ. ३१८.
२ बेंद्रे, शिवाजी, पृ. ८८६.
३ शिवचरित्र प्रदीप, पृ. ३०.
४ कित्ता.
५ सभासद ब. १०३.

शिवाजी महाराजांच्या गुडघ्यांना सूज आली आणि त्यानंतर ताप भरला, असे ग्रँट डफ लिहितो. जदुनाथ सरकार लिहितात, " जालनाच्या सय्यद मुहमंद या मुसलमान साधूंचा शाप भोवल्यामुळे शिवाजी महाराज मृत्यू पावले असे मुसलमानांना वाटत होते. राजारामाची आई सोयराबाई हिने शिवाजी महाराजांवर विषप्रयोग केला, अशीही अफवा पसरली होती ".

शिवदिग्विजयांत सोयराबाईंने शिवाजी महाराजांवर विषप्रयोग केला असे लिहिले आहे.

महाराजांना गुडघे रोग झाला तसेच विषप्रयोग झाला हे प्रवाद खरे नाहीत असे रियासतकार सरदेसाई लिहितात. तारिख दिलकुशा या ग्रंथाचा लेखक भीमसेन सक्सेना हा मोगलांबरोबर दक्षिणेत यावेळी होता. तो लिहितो की, शिवाजी महाराज काही दिवसांच्या आजारानंतर ४ एप्रिल १६८० रोजी मरण पावले.[१]

तो पुढे लिहितो, " शिवाजी हा एक सत्पुरुष होता. शिपाई गडी म्हणून तो अद्वितीय होता. तो राजनीतिनिपुण होता. एकनिष्ठ सैनिकांना तो जीव की प्राण करी. प्रत्येक मोहिमेत तो आपल्या एकनिष्ठ सेवकांचा सल्ला घेई, पण त्याला जी मसलत योग्य वाटे आणि जी योजना पटे ती ते अमलात आणीत. ती प्रत्यक्ष अमलात येईपर्यंत कुणालाही तिची वार्तासुद्धा लागत नसे. त्याने ठिकठिकाणी किल्ले आणि इमारती बांधल्या. सुदैवाने त्याला साधने आणि संपत्तीही लाभत गेली. शिवाजी महाराज अतिशय धूर्त आणि चतुर होते. हे गुण त्यांच्या अंगी होते. शिवाजी महाराज आपले सैन्य चहुकडे पसरून धामधूम उडवीत असे. शिवाजी महाराजांपाशी चाळीस हजार घोडे होते. मोहिमेतून मालमत्ता हाती येई ती सरकारात दाखल करावी लागे. शिवाजी महाराजांनी आपले गुप्तहेर नेमले होते. सैनिकांपैकी कुणी माल लपवून ठेवला आहे याची माहिती त्याला आपल्या हेरांकडून लागे, मग सैनिकांना तो माल सरकारात दाखल करावा लागे.[२]" (तारिख-इ-दिलकशा, पृ. १२७)

औरंगजेबाचे उद्गारही प्रशंसापर आहेत. " शिवाजी मोठा लढवय्या होता. हिंदुस्थानांतील प्राचीन राज्ये बुडविण्याचा उद्योग मी सतत चालविला असता व माझे सैन्य १९ वर्षे (१६६०-१६७९) त्याचा पाठलाग करीत असता त्याचे राज्य वृद्धिंगत होत राहिले.[३] "

---

१ प.सा.सं. २२५३, जेधे शकावली, पृ. ३०.

२ तारिख-इ-दिलकशा पृ. १२७.

३ R. C. Muzumdar, An Advanced History of India, p. 448
Sardesai, New History of the Marathas I. p. 296-97.

तेव्हापासून सर्वसामान्य माणसे महाराजांना शिवाचा अवतार मानतात. समर्थ रामदास त्यांना श्रीमान योगी (म्हणजे सन्यस्त राजा) म्हणतात. असा हा कल्याणकारी राजा सकलजनांचा शिवछत्रपती यांनी हिंदवी राष्ट्र निर्माण केले. ह्या आठवणीने महाराष्ट्रीयांची मने चैतन्य पावतात, स्फुल्लिंगीत होतात.

शिवाजी महाराजांचे प्राणोत्क्रमण झाल्याचे समजल्यावर गोव्याचा पोर्तुगीज गव्हर्नर लिहितो, " हे राज्य आता भयग्रत स्थितीतून वाचले. शिवाजी महाराज युद्ध कालापेक्षा शांतता कालात फार धोकादायक होता."[१] जेसुइट फादराने आपल्या इतिहास ग्रंथात लिहून ठेवले आहे की, " सर्व हिंदुस्तान शिवाजीच्या दहशतीखाली होता. असा हा युगपुरुष ४ एप्रिल १६८० रोजी अंतर्धान पावला."[२] महाराष्ट्र अनाथ झाला. महाराष्ट्राचा राष्ट्र पुरुष गेला. त्यावेळी सर्व कारभारी, सरदार व आप्तजन यांना पराकाष्टेचे दु:ख झाले. आबाल वृद्ध शोक सागरांत बुडाले. प्रधान मंडळीने किल्ल्याचे दरवाजे बंद करून ही निधन वार्ता बाहेरून पसरणार नाही, अशी खबरदारी घेतली. सर्व राजचिन्हांनी युक्त अशी प्रेतयात्रा काढून महाराजांच्या कलेवरास विधिपूर्वक अग्नी दिला.

शिवाजी महाराजांची खाजगी वर्तणूक व सार्वजनिक पराक्रम इतके लोकोत्तर होते, की त्यांच्याशी तुलना करावयास जी जी म्हणून व्यक्ती घ्यावी ती ती ह्या नाही त्या गुणाने शिवाजी महाराजांहून कमतरच दिसेल. ह्या अवतारी पुरुषाविषयीं समर्थ लिहितात, " तयाचे गुण महत्त्वासी तुलना कैंची ? यशवंत, कीर्तिवंत, सामर्थ्यवंत, वरदवंत, नीतिवंत, जाणता, आचारशील, विचारशील, दानशील, कर्मशील, सर्वज्ञ, सुशील, धर्ममूर्ती, निश्चयाचा महामेरू, अखंड निर्धारी, राजयोगी[३] ", शिवाजी महाराजांच्या अंगी असलेल्या जाज्वल्य गुणांचे वर्णन समकालीन रामदासांनी केले आहे, त्यातच ह्या महाप्रतापी व पुण्यशील युगपुरुषाची योग्यता सामावलेली आहे.

□□

१ मॉडर्न रिव्ह्यू १९५४ व्हा. ३४, पृ. १५३-१५५, पोर्तुगीज-मराठे संबंध, पृ. ८६.

२ तारिख-इ-दिलकशा, पृ. १२७.

३ जयंत साळगावकर, देवाचिये द्वारी, भा.-२, पृ. १३४.

२५. शिवाजी महाराजांची दिनचर्या

शिवाजी महाराजांची दिनचर्या :

शिवाजी महाराजांचे कौटुंबिकजीवन कसे होते याबद्दलची निश्चित तपशीलवार माहिती मिळत नाही. महाराजांची दिनचर्या कशी होती याचे वर्णन चिटणीस बखरींत आहे ते पुढीलप्रमाणे :–

" उषःकाली उठावे, ते समयीं गायक यांनी स्तुती पाठ करावे, वीणा, मृदंग इत्यादी मंगल वाद्ये, नगारखाना यांचे श्रवण करून उठावे. काही प्रातःस्मरण करून शौच विधियुक्त करावा. नंतर गोसेवन दर्शन, मंगलालंभन करून स्नानगंगादी महानदी उदके (उदके घालून) करावे. जपध्यान व देवतार्चन करावे. ते समयी सर्व शिष्ट ब्राह्मण सभा पंडीत यांनी धर्मचर्चा करावी. पुराण श्रवण करून चार घटका दिवसास तिलक, वस्त्रे अलंकार भूषणे घेऊन तिरंदाजी व निशाण एक घटका करून सभेस यावे. तेथे सर्व कार्यकर्ते, कारभारी वगैरे यांनी आपआपली कार्ये विचारून करावी. जे जे दर्शनास येतील, त्यांजकडे कृपायुक्त अवलोकन करून त्यांचे मुजरे घ्यावे. कोणाकडे अवलोकन करून किंचित हास्य करावे, कोणाशी काही भाषण करावे, कोणास कार्ये सांगावी ऐसी सर्वांची अंतःकरणे वेधून घ्यावी. सर्वांस भासावे जे माझे ठायीं कृपा विशेष आहे. ऐसा सर्वत्र आले त्यांचा गौरव करावा. दहा घटका दिवस आलियारी दोन-चार घटका विवित्त स्थानी ज्याचा करणे त्याशी मंत्र विचार करावा. बारा घटका दिवसास (ब्राह्मण) भोजनाचे उदक सोडून नैवेद्य करून सर्व पंक्तिभोजन करणार यासह वर्तमान भोजन करावे. आणि तांबूळ घेऊन चार घटका मंत्र सभेचे ठायी पत्रे आली व पाठवणे ती अवलोकन करणे व कार्य योजना व मागील दिवशी आयव्यय झाला, दुसरे दिवशी किती करणे हे पाहून चार घटका अंतःपुरात वामकुक्ष करावी. बारा दिवस घटका राहाता पुनः सभेस येऊन सर्व कारखाने, महाल यांची चौकशी पहाणे, आपण जाऊन करावे. सभा भरून न्याय मनसुबी जाली केली ती अवलोकन करून दाद फिर्याद मनास आणावी."

" सहा-चार घटका दिवस राहाता बाहेर स्वारी बाग, आराम देवालये अथवा कारखाने यांत जावी. घोडा फेरणे, बोथाय्या वगैरे खेळून सांयकाळ जाला असता येऊन सभेस बसून सर्वांचे मुजरे घेऊन दोन घटका रात्री जपध्यान करून काही पुराण व दासबोध

विचार करून भोजन करावे. तांबूळ घेऊन सभेस दोन घटका बसोन कारभार एकांती चार घटका बसावे, बातमी, नाजूक कामे, पत्रे आली ती व द्रव्याची, धान्याची निरख हे श्रवण करून अंतःपुरात जावे."

शिवछत्रपतींचा चेहरा, पेहराव व सिंहासन

स्वरूप वर्णन :

शिवछत्रपतींना प्रत्यक्ष पाहून त्यांचे वर्णन लिहून ठेवणाऱ्या व्यक्ती फारच थोड्या आहेत. इ. स. १६६४ मध्ये सुरतेवरील छाप्याच्या वेळी इंग्लिश वखारींतील काही इंग्रज अधिकाऱ्यांनी शिवाजी महाराजांना पाहिले होते. आपल्या पत्रात त्यांनी त्यांचे वर्णनही केलेले आढळते. त्यापैकी रेव्हरंड एस्का लियार यांनी त्यांचे खालीलप्रमाणे वर्णन केले आहे :–

" शिवाजी हा मध्यम उंचीचा, ताठ, बांधेसुद आहे. तो चलाख असून सस्मित बोलतो. त्याची दृष्टी तीक्ष्ण व तरल असून त्याचा वर्ण त्याच्या इतर देशबांधवांपेक्षा अधिक गौर आहे."

(English Record on Shivaji, L. 79, p. 73, letter dated 28th January 1664).

मिर्झा राजा जयसिंह यांचा आग्रा येथील वार्ताहर परकलदास याने जयसिंहाचे जयपूर येथील दिवाण कल्याणदास यांना दिनांक २९ मे १६६६ रोजी लिहिलेल्या पत्रात शिवाजी महाराजांचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे :–

" शिवाजी शरीराने काटकुळा आणि ठेंगणा दिसला. रंगाने तो गौरवर्णीय आहे आणि तो कोण आहे हे न समजताही तो राजा असावा हे चटकन ध्यानात येते. दिसण्यात तो राजबिंडा आहे. शूर आहे. त्याला दाढी आहे."

राजापूरचे इंग्रज वखारवाले व हेन्री ऑक्झिन्डेन (राज्याभिषेक प्रसंगी रायगडावर आलेला इंग्रज वकील) यांचा शिवरायांशी प्रत्यक्ष संबंध आला होता. पण त्यांनी आपल्या पत्रात शिवरायांचे वर्णन केलेले उपलब्ध नाही ; असे जदुनाथ सरकारांचे म्हणणे आहे. (शिवाजी, ६ वी आवृत्ती). " इंग्लिश रेकॉर्ड्स ऑन शिवाजी व पत्रसारसंग्रह " यांतही शोधन केले असता याला दुजोरा मिळतो. पण काही संशोधक हेन्री आक्झिंडेन शिवरायांचे खालीलप्रमाणे वर्णन केल्याचे सांगतात :–

" चेहरा सुंदर व बाणेदार, इतर मराठ्यांच्या मानानं वर्ण गोरा, डोळे तीक्ष्ण, लांब नाक, बांकदार व जरासे खाली आलेले, दाढी कापून हनुवटीचे खाली टोकदार केलेली

मिशी बारीक असून मुद्रेत त्वरा, निश्चय, कठोरपणा व जागरूकता हे गुण स्पष्ट दिसतात." (य. न. केळकर, चित्रमय शिवाजी, भाग १ ला, २री आवृत्ती, इ. स. १९३६, पृ. ४).

शिवरायांची पाश्चात्यांनी काढलेली जी चित्रे उपलब्ध आहेत त्यांत लांब नाक, टोकदार दाढी, भरीव गर्दन, मजबूत बांधा इत्यादी लक्षणे बहुतेक सारखीच आहेत.

इतर समकालीनांत इटलियन प्रवासी निकोलास मनुची याने जयसिंगाच्या छावणीत शिवरायांना प्रत्यक्ष पाहिले. पण तो त्यांचे वर्णन देत नाही. ही झाली समकालीन पण परकीयांची गोष्ट. स्वकीयांपैकी कवीन्द्र परमानन्दाने शिवचरित्र लिहिले. शिवरायांचे अस्सल वर्णन देण्यास तोही असमर्थ ठरला आहे. फक्त " अतिसुंदर ", " अत्यंत सौम्य परंतु तेजाने उग्र ", एवढेच त्रोटक उल्लेख तो करतो.

बखरकारांत सभासद हा शिवकालाला जवळचा, पण तो शिव-वर्णन करीत नाही. तो महाराजांना आदरांजली अर्पण करतो. सर जदुनाथ सरकार म्हणतात की महाराजांनी महाराष्ट्रीयांत जो विलक्षण आत्मविश्वास उत्पन्न केला आणि राष्ट्रभावनेची जी जागृती निर्माण केली त्यामुळेच पुढच्या संकटमय परिस्थितींत स्वराज्य टिकून राहिले. अशा रीतीने अनेक लेखकांनी शिवरायांचे स्वरूपवर्णन अनेक प्रकारे केलेले आहे.

पेहेराव :

शिवाजी महाराजांच्या पेहेराव-पोशाखासाठी शिवरायांची समकालीन जरी नव्हे तरी इतिहासकालीन अशी चित्रे जी उपलब्ध आहेत, ती आपल्या उपयोगी पडतात. अशी उपयुक्त चित्रे फक्त चारच विचारात घ्यायला हवीत. (१) ब्रिटिश म्युझियममधील १७०७ चे, (२) ऑर्म्स फ्रॅग्मेन्ट्स् मधील १७८२ चे, (३) मनुचीनें दिलेले मीरमहंमदाचे, १६८८ पूर्वीचे, व (४) प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममधील.

यापैकी ब्रिटिश म्युझियममधील चित्रांत " काळी दाढी " व मिशा, कानावर लांब झुलपे, सोनेरी पगडी, हिरेजडीत शिरपेच, काळा तुरा, पांढरा लेंगा, पांढरा व वर फुले असलेला अंगरखा, खांद्यावरून जांभळा रेशमी शेला, जरीचे काम केलेला कमरबंद, डाव्या हातांत उभी टेकलेली धूम नावाची लांब तलवार, इत्यादी तपशील आढळतो. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममधील चित्राचे या चित्राशी बरेच साम्य आहे. ऑर्मच्या चित्रांत मिशांची ठेवण, शिरपेच, तुरा, शेला, अंगरखा, मोत्याचा कंठा, छातीवरील कंठमणी इत्यादी जरा भिन्न आहेत. या दोन्ही तसबिरीत डोईस बादलीचा पटका, मोत्याचा तुरा,

अंगात एकाच जातीच्या नक्षीच्या किनखापाचा अंगरखा, गळ्यांत मोत्यांच्या माळा वगैरे एकच असून पहिल्या चित्रात मंदिलात एक पसी आहे, मात्र ऑर्मप्रमाणे कानातील मोत्याची कुंडले नाहीत, हातात पट्टा असून कमरेत कट्यार आहे.

लिखित वर्णनात शिवरायांच्या पेहेरावाबद्दल खालील वर्णने विचारात घ्यायला हवीत.

शिवभारतकार परमानन्द (अध्याय २९, श्लो. १५-३५ त) पुढीलप्रमाणे तपशील पुरवितो. " अंगात अभेद्य कवच............मस्तकावर शिरस्त्राण ....बैक्ष हारासारखा व प्रचंड ढालीनें शोभणारा दुपेटा ....सोनेरी कमरपट्ट्यापासून लटकणारी तलवार ....तेजस्वी उजव्या हातात उंच भाला .... रत्नजडीत अलंकार घातलेला सुलक्षणी व धिप्पाड घोडा .... " इत्यादी.

चित्रगुप्त आपल्या बखरींत पुढील तपशील देतो - " डोक्यात जिरेटोप, कमरेस पट्टा, अंगांत बखर, वर झगा, कानांत मोत्यांची कुंडले, गळ्यांत जडवांची पदके, डोक्याला भरजरी मंदील, त्याला मोत्याचा तुरा व कलमी, कमरेला पटका, पायी चोळणा.........." व आणखी एके ठिकाणी - " भरजरी बादली मंदिल, अंगझोल ही बादली व वादरही भरगच्ची बादली व पटका बुटट्दार, व सुरवार किनारवाली व अलंकार, मस्तकी कलगी सलंब व मुक्ताफलांच्या माळा-भाळी केशरी आडवे गंध ....गंधा तळवटी शाम टिकली.........".

सिंहासन :

रायगडावरील शिवछत्रपतींच्या सिंहासनाबद्दल विशेष माहिती उपलब्ध नाही. " नव्या वर्षारंभी जूनमध्ये स्वत:ला राज्याभिषेक करून घेण्याच्या इराद्याने सोने व हिरे यांचे एक भव्य सिंहासन शिवाजी बनवीत आहे " असे दि. ४ एप्रिल, १६७४ चे नारायण शेणव्याने मुंबई गव्हर्नरला लिहिलेले पत्र आहे. (प. सा. सं. १६२५) सभासद लिहितो, " तक्त सुवर्णाचे, बत्तीस मणाचे सिद्ध करविले. नवरत्ने अमोलिक जितकी कोशांत होती त्यामध्यें शोध करून मोठी मोलाची रत्नें तक्तास जडाव केली-जडीत सिंहासन सिद्ध केले .... सिंहासनास अष्ट खांब जडीत केले. त्या स्थानी अष्ट प्रधानानी उभे रहावे. ' मल्हार रामराव चिटणीस म्हणतो ' तेथे सिंहासनास सभा करविली, ज्या सभेत सहस्त्रावीय मनुष्यें बसावी, त्यासी शीतोष्ण बाधा न व्हावी, चित्रविचित्र स्तंभ व अष्ट प्रधानांची स्थानें व भिंती वगैरे परम रमणीय ऐसे करवून, त्यांस उल्लोच व विताने म्हणावे चांदवे चांदण्या सुवर्णमय वस्त्रें किनखाप, बादली ऐशीं करविली. पटल म्हणजे पडदे किनखापी करविली. सिंहासनाचे स्थान तेथे सुवर्णाचे चार स्तंभ त्यात चांदवा अमोल्य जरी. त्यास मुक्ताफळांचे गेंदाचे घोस........"

चित्रगुप्त आपल्या अलंकारिक भाषेत सिंहासनाचे खालीलप्रमाणे वर्णन करतो. "तदुत्तर यथाशास्त्रे सुवर्णाचे सिंहासन सिद्ध करावयास गागाभटजींनी महाराजांस आज्ञापिले तेच समयी गुजरातीचे व देशांतील सुवर्णगार चतुर मयदानवी कला जाणते शिल्पक यथायुक्त परम चातुर्यता दाखवून सिंहासनी हिरे-माणकें, पाचू, पेरोज, लसणे, गोमेद, नील प्रवाल ही नवरत्ने व मुक्ताफळें संवेष्टित अमोलिक चातुर्यतेची निस्सीमताच केली. अष्टसिंह अष्टस्तंभी, तैशाच ठायी ठायी बैठका व पायरिया व विचित्रें रमणीक मनोरंजन विश्रांति सिंहासनाची ठेवी निर्मिली. सुवर्ण वजन परिमीत तीन खंडी बत्तीस शेर व बत्तीस मासे, त्रितकियांतच संपूर्ण रचना चित्रविचित्र तरू फलें पुष्पे सहित वल्लरी विविध प्रकारच्या व बुट्टे चौकडिया पुष्पें भातभातीची तैशीच पक्षिकुळें हंस मयूर व मैना नुरिया बदकें रावे व बहिरी बाज कबुतरे लगड लाहावे ति-तुर मुजिया चंडोल चिमणिया व कोकिला, कांडेसर तैशीच श्वापदें चित्ते, शागोष, हरणे, सांबरे, शशक, सिंह, शार्दुल, चितळे तैशीच बत्तीस पुतळिया व अश्व गज ही सांगोपांग निर्मिली. पुतळया मनुष्याकृति परम सुंदर अवयव भिन्न-भिन्न स्वदेशींच्या तैशाच गोमांतकी लावण्यलतिकाच कटाक्ष नटनाटक संगीत तंतुवाद्ये घेऊन उभ्या ठाकल्या. हीही कळाशी शिल्पिके दाखविली. संजीव मच्छ ऐसा भाव तैसेंच कूर्म हीही जळचरें ठायी ठायी निर्मिली. यदर्थी चतुरे संक्षेप न घ्यावा. फिरंगी पूर्तकाळी चिनी कारागिरी चातुर्यांचे कसब अधिक कुशलता आहे. यदर्थी लेखकास दूषण न ठेवावे. नवरत्नें युक्तायुक्त स्थळीं कोंदणी चातुर्यतेने सांगोपांग गोचर त्यास सप्रिय रुढवून अचल कलिमके राजवाटिकाही सिंहासनी अति उल्हासे निर्मिली. महाराजांचे आरूढतेचे स्थळ अष्टपैलू कंठ्याकार रत्नखचित पाचू, वैडूर्य, हिरे-माणिके, नीळ ही महारत्नें ठायी ठायी दैदीप्यमान उडुगणप्राय विलोकितां अन्य साक्ष नच. चौकटिया चौफेरा तसैच वोढंगणे हीही जडित योग्यतेची ठायी ठायी दिड कि या निर्मोन जडिले. सिंहासनाचे वोट्यावरि उत्तम पंच कमले अष्टपैलू सुवर्णाची जडित नवरत्नाची सिद्ध जहाली."

इंग्रज वकील हेन्री ऑक्झिंडेन राज्याभिषेकाच्या वेळी रायगडावर गेला होता. तो पुढीलप्रमाणे वर्णन करतो– "सिंहासनाच्या दोन्ही बाजूला सुवर्णांकित भाल्याच्या टोंकावर (मुसलमान पद्धतीची) अनेक अधिकारदर्शक व राजसत्तेची चिन्हे असल्याचे आम्ही पाहिले. उजव्या हाताला दोन मोठी मोठ्या दातांच्या मत्स्यांची सुवर्णाची शिरे होती. डाव्या हाताला अनेक अश्वपुष्पें व एका मूल्यवान भाल्याच्या टोकावर समपातळीत लोंबणारी सोन्याच्या तराजूची पारडी, न्यायचिन्ह म्हणून तळपत होती.

शिवाजी महाराजांनी आठ बायका केल्या त्या अशा :—

१. सईबाई (निंबाळकर) लग्न १७-४-१६४०, मृ. ५-९-१६५९.

२. सगुणाबाई (शिर्के) लग्न एप्रिल स. १६४१.

३. सोयराबाई (मोहिते) लग्न स. १६५० पूर्वी, मृ. १६८१.

४. पुतळाबाई (मोहिते) लग्न स. १६५३, सती गेली.

५. लक्ष्मीबाई (विचारे) लग्न स. १६५६ पूर्वी.

६. सकवारबाई (गायकवाड) लग्न जानेवारी १६५७.

७. काशीबाई (जाधव) लग्न ८-४-१६५७, मृत्यू ६ फेब्रु. १६७४.

८. गुणवंताबाई (इंगळे) लग्न १५-४-१६५७.

पहिली सईबाई हिला एक पुत्र व तीन कन्या झाल्या. पुत्र संभाजी याचा जन्म तारीख १४ मे १६५७. मुलगी सकवार ऊर्फ सखूबाई, हिचे लग्न महादजी निंबाळकराशी झाले. दुसरी राणूबाई जाधवांचे घरी दिली. तिसरी अंबिकाबाई हरजीराजे महाडीक तारळेकर यास दिली. सोयराबाईला एक पुत्र राजाराम जन्म २४ फेब्रुवारी १६७० व एक कन्या बाळाबाई ऊर्फ दीपाबाई हिचे लग्न विश्वासरावांशी झाले. सकवार बाईला एक कन्या कमळजाबाई हिचे लग्न जानोजी पालकरांशी झाले.

महाराजांच्या नातलग मंडळींची खाली दिलेली माहिती शेजवलकरांच्या शिव-छत्रपती या ग्रंथातून मिळते. (पृ. ४४८-४५०).

(१) शिवाजी महाराजांचा भाऊ संभाजी :

इ. स. १६५३ मध्ये यास अफझलखानाने द्वेषाने कनकगिरी किल्ल्यावरून तोफेचा गोळा सोडून मारले.

(२) संताजी राजे भोसले :

हा शहाजीच्या नाटक शाळेचा पुत्र तिरूमलवाडीस १६७७ त शिवाजी महाराजांस भेटण्यास आला. शिवाजी महाराजांनी त्यास हजार घोड्यांची दौलत कर्नाटकांत दिली. जेझुइट पत्रात संताजीस शिवाजीचा सावत्र भाऊ म्हटले आहे.

(३) मकाजी आनंदराव :

हा महाराज शहाजी यांचा फरजंद पाळलेला. हा शहाजी महाराजांकडून सेवा सोडून राजियांकडे आला होता. त्यास राजियांनी नावाजून पागेची पंच हजारी सांगितली. सुरतेच्या स्वारीत राजियांनी त्यास बरोबर घेतले. सालेरीच्या युद्धात याने चमक दाखविली म्हणून महाराजांनी त्यास अपार द्रव्य दिले. शिवाजी महाराज कर्नाटकांतून मध्येच परत फिरले त्यावेळी आनंदराव त्यांच्या बरोबर होता. राजियांनी जयसिंगाशी तहं करताना मकाजी आनंदराव होता. भेटीच्या वेळी तो राजियांचा जोडा घेऊन उभा होता.

(४) व (५) **भिवजी व प्रतापजीराजे भोसले :**

हे दोघेही शहाजी महाराजांच्या नाटक शाळेचे पुत्र होत. व्यंकोजी शिवाजी महाराजांस भेटण्यास तिरुमलवाडीस आला त्यावेळी हे दोघेही त्याजबरोबर होते. हंबीररावाने व्यंकोजीचा पाडाव केला त्यावेळी दोघांस कैद केले.

(६) **धाराई आवा :**

संभाजीचा जन्म झाल्यावर, सईबाईला अंगावर दूध नसल्याने धाराई आवा (गाडे) या दाईचे दूध त्याला पाजण्यात येत असे. त्याबद्दल शिवाजी महाराजांनी तिला वर्षाची २६ होन तैनात करून दिली होती. ती नसरापूरजवळील कापूर वहाळ या गावी राहत होती. तिची दोन मुले शिवाजीच्या सैन्यात सामील झाली होती.

(७) **शिवरायांचा जावई अचलोजी :**

३१ जानेवारी १६८६ त महाराजांचा जावई अचलोजी औरंगजेबास मिळाला असे मासिरी आलमगिरी सांगते.

(८) **शिवाजीचा थोरला भाऊ संभाजी याचा मुलगा उमाजी :**

हा लहान असल्याने कर्नाटकचा कारभार एकोजीस मिळाला. त्यास विजापूरातर्फे जहागिर होती, त्याने धामधूम करून जोरावारीने देशमुखी घेतली. उमाजीला बहादूरजी नावाचा पुत्र झाला होता. त्याला एकोजीने फारसे दिलेले नसावे म्हणून राजियांनी आपल्या भावाच्या मुलाची वाटणी एकोजीजवळ मागणे भाग पडले असले पाहिजे. राजियांस स्वत:करता ही वाटणी नको होती.

(९) **शिवाजी महाराजांचा पुत्र संभाजी :**

संभाजी याचे दुसरे लग्न चंपा या नावाच्या उपवर मुलीशी इ. स. १६७९ त झाले. तिला मदनसिंग व उधीसिंग असे दोन मुलगे व एक-दोन मुली झाल्या.

(१०) शिवरायांस गायकवाडांच्या सकवारबाईपासून कमळाबाई नावाची मुलगी झाली. कमळाबाई नेताजी पालकरच्या मुलास दिली होती.

(११) राजियांची पत्नी काशीबाई दि. ६ फेब्रुवारी १६७४ त पाचाडात निवर्तली.

(१२) राजियांची पत्नी सोयराबाई ही मोहित्यांची मुलगी होती. सोयराबाईचा मृत्यू दि. २७ ऑक्टोबर १६८१ रोजी रायगडी झाला त्यावेळी संभाजी महाराज पन्हाळ्यास होते.

(१३) राजियांस दोन नाटक शाळा होत्या.

सगुणाबाईला एक कन्या नानीबाई उर्फ राजकुँवर हिचे लग्न गणोजी शिर्के मळेकर यांच्याशी झाले. एकंदर अपत्ये आठ, दोन मुलगे व सहा मुली. शिवाजी महाराजांच्या मृत्युसमयी तीनच स्त्रिया हयात होत्या असे दिसते. पैकी पुतळाबाई सती गेली, सोयराबाईचा मृत्यू वारसाहक्काच्या कलहातून झाला आणि एक सकवारबाई शाहूबरोबर बादशहाच्या कैदेत होती.

शिवाजी महाराजांच्या अंतसमयी संभाजीराजे पन्हाळ्यावर होते. महाराजांनी त्यास पन्हाळ्याचा (कोकण) सुभा देऊन गौरविले होते व अण्णाजी दत्तोस त्या सुभ्यावरून काढून दूर कारवार सुभ्यावर त्याची नेमणूक केली होती.

संभाजी राजांस शिवाजी महाराजांच्या दुःखद निधनाची वार्ता सोयराबाई व अण्णाजी दत्तो या दोघांनी कळू दिली नाही. त्यांचा इरादा संभाजी राजांस पन्हाळी नजरकैदेत ठेवून राजारामास गादीवर बसवावा असा होता. त्याप्रमाणे राजाराम महाराजांचे मंचकारोहण करविले, नंतर अण्णाजी दत्तो मोरोपंत पिंगळे यांस बरोबर घेऊन सैन्यासह चालले होते. हेतू संभाजी राजांस पन्हाळगडीच नजर कैदेत ठेविण्याचा. ही बातमी संभाजीराजांस कळतांच त्यांनी सेनापती हंबीरराव मोहिते यांस आपल्या बाजूस घेतले. हंबीररावांनी अण्णाजी दत्तो व मोरोपंत यांस कैद करून संभाजी राजियांसमोर उभे केले. संभाजी महाराजांनी त्यांना कैदेत ठेवण्याचे हुकूम दिले, स्वतः रायगडावर आले, जून १६८० च्या सुरुवातीला त्यांना सर्वाधिकार प्राप्त झाला. संभाजी महाराजांनी श्रावण शुद्ध पंचमी, शके १६०२ म्हणजेच दि. २० जुलै १६८० या दिवशी स्वतःचा मंचकारोहण समारंभ केला.

□□

२६. शिवाजी महाराज आणि युरोपीय राष्ट्रे

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात इ. स. १६४६ ते १६८० याकाळात हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. ह्या कालखंडात शिवरायांना मोगलांशी व विजापूर सुलतानाशी लढावे लागले. महाराष्ट्रात व दक्षिण हिंदुस्तानात पश्चिम व पूर्व किनाऱ्यावर युरोपियन राष्ट्रांच्या कंपन्यांनी व्यापाराकरिता ठाणी स्थापन केली होती. शिवपूर्व कालात इ. स. १४९८ साली पोर्तुगीज खलाशी वास्को-डी-गामा हिंदुस्तानात आला त्यानंतर भारताशी व्यापार करण्यासाठी २० मार्च १६०२ रोजी डच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. डचांनी भारताच्या मलबार किनाऱ्यावर बऱ्याच ठिकाणी वखारी स्थापिल्या.

पोर्तुगिज व डच यांनी हिंदुस्तानात व्यापारास सुरुवात केली म्हणून इंग्लंडच्या इंग्रजांनी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी स्थापून हिंदुस्तानाच्या पश्चिम किनाऱ्यावर आपली सोय लावून घेतली आणि इ. स. १६१४ साली त्यांनी सुरत येथे वखार घातली, यानंतर फ्रेंचानी आपली वखार सुरत येथे १६६८ फेब्रुवारींत स्थापिली.

अशा रीतीने पोर्तुगीज, डच, इंग्रज व फ्रेंच या चार युरोपियन राष्ट्रांनी भारतात व्यापार करण्यासाठी कंपन्या स्थापन केल्या आणि ते एतद्देशीय सत्ताधीशांच्या भांडणात भाग घेऊ लागले. आपला प्रभाव एतद्देशीय सत्तांस दाखवू लागले. शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्याची स्थापना करीत असता त्यांचा संबंध गोव्याच्या पोर्तुगिजांशी आला, तदनंतर (२) डच, (३) इंग्रज, व (४) फ्रेंच याजशी कसा आला यासंबंधीची हकीगत इथे दिली आहे.

शिवाजी महाराज व पोर्तुगीज :

पोर्तुगिजांचे आगमन मलबार किनाऱ्यावर इ. स. १४९८ साली झाले, त्यानंतर त्यांनी हिंदुस्तानच्या पश्चिम आणि पूर्व किनाऱ्यावर कन्मानूर, कोचीन, गोवा, चौल, मुंबई, साष्टी, दमण दीव इत्यादी जागी आपल्या वखारी स्थापन केल्या. पूर्वेकडील पोर्तुगीज साम्राज्याची राजधानी प्रथम कोचीनला होती, नंतर ही गोव्याला गेली. इ. स. १५४३ पासून पोर्तुगिजांनी तिसवडी, मालसरे व बारदेश ह्या दक्षिण कोकणातील जिल्ह्यांवर कबजा मिळविला आणि गोवा राज्य चालू केले. इ. स. १५३४ पोर्तुगिजांनी वसई प्रांत

गुजरातच्या सुलतानाकडून मिळविला. १५३५ मध्ये पोर्तुगिजांनी दिवला किल्ला बांधिला. इ. स. १५८० पोर्तुगिजांच्या ताब्यांत दीव दमण, मुंबई बेट, वसई, चेऊल, गोवा बेट, सालसेट, बारदेश ही स्थळे आली. ते अरबी समुद्रावर मालकी हक्क गाजवू लागले. इ. स. १६६८ मध्ये पोर्तुगिजांनी मुंबई बेट इंग्रजांना दिले.

निजामशाहीत शहाजी राजे सरदार असता, त्यांचे व पोर्तुगिजांचे संबंध सलोख्याचे होते. शहाजी राजांनी इ. स. १६३३ त शहा मुर्तजाच्या अज्ञानी मुलास निजामशहा केले व स्वतः वजीर बनले आणि निजामशाही मुलूख ताब्यात घेतला. निजामशाही नष्ट करण्याचा विडा उचललेल्या शहाजहान बादशहाने निजामशाहीची तात्पुरती राजधानी त्रिमलवाडी किल्ला याजवर हल्ला करण्यासाठी आपले सरदार खान, झमान खान डौरान व शाहिस्तेखान यांना रवाना केले, त्यांनी किल्ल्यास वेढा देऊन शहाजी राजांविरुद्ध लढा चालू केला. त्यावेळी शहाजी राजे यांनी चौल येथील पोर्तुगिजांना पत्र पाठवून विनंती केली की त्यांनी आपल्याला व आपल्या कुटुंबास मोगलाकडून होणारा पाठलाग चुकविण्याकरिता चौलमध्ये आश्रय द्यावा. असे केल्यास मोगल बादशहाची आपल्यावर इतराजी होईल या भीतीने पोर्तुगिजांनी शहाजी राजांस कळविले की आम्ही आपल्या कुटुंबास दंडाराजापुरी या ठिकाणी गुपचूप आश्रय देऊ.[१] तदनंतर शहाजीराजे आदिलशाहीचे फर्जंद बनले. त्यावेळीसुद्धा पोर्तुगीज राजा व शहाजी महाराज यांचे संबंध सौहार्दाचे राहिले होते.[२] इ. स. १६५७ त शहाजीराजे यांनी आदिलशाहीचे चाकरीत असता भटग्राम आणि परनेम हे दोन परगणे स्वतःच्या चरितार्थासाठी पोर्तुगिजांकडे मागणी केली.[३]

शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचा उद्योग आरंभिल्यानंतर त्यांना आपले आरमार असावे असे वाटू लागले. त्यासाठी महाराजांनी चेऊल व वसईच्या आसमंतातील भिवंडी, कल्याण, पनवेल हा मुलूख काबीज केला, ह्या जागातील जंगलातून जहाजे बांधण्याजोगे लाकूड घेऊन आरमारी जहाजे बांधिली.[४] चौलच्या अधिकाऱ्याने शिवाजी महाराजांनी

१ पर्वते, पोर्तुगीज-मराठा रिलेशन्स, पृ. ३४.

२ पिसुर्लेकर, शिवाजी, पृ. ३.

३ पर्वते, कित्ता, पृ. ३५.

४ बेंद्रे, शिवाजी.

बांधलेल्या जहाजाबद्दलची माहिती १६५९ च्या पत्राने पोर्तुगालच्या राजास कळविली. या अगोदर एक वर्ष शिवाजी महाराजांनी इ. स. १६५८ साली उत्तर कोकणवर स्वारी केली. तेव्हा पोर्तुगिजांच्या चौल आणि दमण ठाण्यांना मराठा सैनिकांकडून उपसर्ग पोचला.[१]

पुन्हा शिवाजीराजांनी इ. स. १६६१ साली दक्षिण कोकणवर स्वारी केली. त्यावेळी त्यांचे सैन्य गोव्याच्या हद्दीपर्यंत आले. शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाचा पराभव केल्यावर त्याचे अभिनंदन पोर्तुगिजांनी दिनांक २७ एप्रिल १६६३ च्या पत्राने केले. ही वेळपावेतो शिवाजी महाराजांनी विजापूरकरांचे डिचोली आणि साखळी हे दोन प्रांत जिंकून घेतले, तेव्हा पोर्तुगिजांनी आपला वकील रामजी शेणवी यास अभिनंदनपर पत्र देऊन राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी शिवाजी महाराजांकडे पाठविले.

इ. स. १६६४ साली विजापूरचा सरदार खवासखान हा महाराजांवर मोठ्या सैन्यानिशी चालून आला. महाराजांनी त्याचा पराभव केला. तेव्हा दिनांक ७ जानेवारी १६६५ रोजी गोवा व्हाईसरायने शिवाजी महाराजांचे अभिनंदन केले. मोगल बादशहाचे सैन्य लक्षावधी आहे पण ह्या सैन्याच्या नाकावर टिच्चून शिवाजीराजे यांनी सुरत शहर लुटले. शिवाजीराजांच्या युद्धनौका मोठ्या नसल्या तरी त्या पुष्कळ आहेत असे त्याने पत्रात लिहिले आहे. ह्या पत्रव्यवहारात शिवाजी महाराजांची तुलना (व्हाईसरायने) सिकंदर व सीझर यांच्याशी केली आहे. इंग्रजी कागदपत्रांतही तुलना आढळते, पण ती १० वर्षांनंतर.[२]

इ. स. १६६४ च्या ऑगस्टमध्ये चेऊलच्या पोर्तुगीज कॅप्टनने शिवाजी महाराज चेऊलच्या वर भागात ५० जहाजे बांधीत आहे. त्यापैकी त्यांची ७ जहाजे समुद्रावर फिरण्यास तयार झाली आहेत असे पोर्तुगालला कळविले.[३] या आरमारी तयारीचा रोख पोर्तुगिजांवर असावा असा संशय डच व इंग्रज घेत होते. तरी या आरमाराचा पहिला आघात कोठे व कसा होणार याची यत्किंचितही कल्पना या युरोपियन दर्यावर्दीना शिवाजी महाराजांनी येऊ दिली नव्हती.

---

१ पिसुर्लेकर, शिवाजी सोव्हेनियर, शिवाजी अॅन्ड द पोर्तुगिज, पृ. १७८.

२ केळकर, आपटे (सं) इंग्लिश रेकॉर्ड्स ऑन शिवाजी, भाग २, एक्सट्रॅक ६३.

३ प. सा. सं. क्र. १०४४, बेंद्रे, शिवाजी, पृ. ४३७.

शिवाजी महाराजांनी कोणत्या उद्देशाने आरमाराची तयारी चालविली होती याचा नक्की अंदाज कोणासच त्यावेळी आला नाही.

शिवाजी महाराजांनी मोठ्या परिश्रमाने इ. स. १६६४ मध्ये ५० गलबतांचे आरमार तयार केले व ते ऑगस्टअखेर सफरीस बाहेर पडले. परंतु ते कोठे व कशाकरता जात आहे याचा शेवटपर्यंत कोणालाच पत्ता लागू दिला नाही. त्यामुळे शिवाजी महाराजांची पहिली आरमारी मोहीम पोर्तुगिजांच्या नाकावर टिच्चून बेदनूरकरांना विजापूरकरांच्या जबड्यातून सोडविण्यासाठी केली. फेब्रुवारी १६६५ च्या प्रारंभी ८५ लहान व मोठी गलबते घेऊन शिवाजी महाराज मालवणातून बाहेर पडले. ते गोव्यावरून काहीही विरोध झाल्याशिवाय बार्सीलूरपर्यंत जाऊन ते बंदर लुटून पोर्तुगिजांचा पुरा मोड करून बेदनूरचा मुलूख त्या राजाच्या ताब्यात देऊन महाराज गोकर्णला परत आले.[१]

शिवाजीराजे आणि मोगल यांचे वितुष्ट आल्याचे दिसताच गोव्याच्या पोर्तुगिजांनी जयसिंगाला पत्र लिहिले की, " आपल्याला खर्च दिल्यास आपण शिवाजीचे आरमार बुडविण्यास मोगलांना मदत करू. " (१९ एप्रिल १६६७). मात्र युद्धाचा खर्च मोगलांनी करावा.[२] याचवेळी जयसिंगाकडून दक्षिणसुभा मुअज्जम याजकडे आला होता आणि मोगलांनी शिवाजीराजे यांजशी सख्य केले हे पाहून गोव्याच्या व्हाईसरायने महाराजांस लिहिले, " आपण आग्ऱ्याहून सुटून आलात याचा आनंद वाटतो " हे अभिनंदनाचे पत्र राजियांस ५ जुलै १६६७ रोजी पाठविले.[३] राजियांनी पोर्तुगीज गोवा सरहद्दीवर देत असलेला त्रास ठाऊक होता. त्यांचा बंदोबस्त करण्याची संधी राजियांस चालून आली.

विजापूरकर पक्षाचे लखम सावंत, केशव नाईक, केशव प्रभू, आदी कोकणांतील देसाई गोव्यात आश्रय घेऊन ते महाराजांच्या मुलुखात घुसून धामधूम करीत. पोर्तुगीज त्यांना आतून मदत करीत म्हणून इ. स. १६६७ नोव्हेंबर १९ ते २० तारखेच्या रात्री राजियांचे सुमारे ५ हजार पायदळ व १ हजार घोडदळ पोर्तुगिजांवर चाल करून गेले. त्यांनी बारदेशात प्रवेश केला.[४] आणि तीन दिवसात त्यांची १६ खेडी बेचिराख केली

१ बेंद्रे, शिवाजी महाराज, पृ. ४१८.

२ प. सा. सं. क्र. ११५७.

३ पर्वते, पोर्तुगिज मराठा रिलेशन्स, पृ. ४६.

४ केळकर, आपटे (सं) इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी, भाग १, एक्सट्रॅक ५०. भाग २-२०२.

व १३०० कैदी धरून नेले व दीड कोट पागोडा नेल्या.[१] तेव्हा पोर्तुगिजांचे डोळे उघडले. त्यांनी पकडून नेलेले कैदी सोडविण्यासाठी व तहाचे बोलणे करण्यासाठी पाद्री गालेसालू मार्तीस व रामजी शेणवी कोठारी यांना राजियांकडे पाठविले. यावेळी शिवाजी महाराज बिचोलीमला गोव्याजवळ होते.[२] राजियांनी आपला वकील सखोपंत यास गोव्यास पाठविले. त्याचे व पोर्तुगिजांचे बोलणे होऊन पोर्तुगीज वकील गोझांलो मार्टीन यास बरोबर घेऊन तो रायगडास आला.[३] तेथे तारीख ११ डिसेंबर १६६७ रोजी राजियांनी तह पुरा केला.

राजे व पोर्तुगीज यांमधील तह :

(१) ह्यापूर्वी गोव्यातून पकडून नेलेले कैदी व गुरे-ढोरे मराठ्यांनी सोडून द्यावी. (२) लखम सावंत, केशव नाईक, देसाई हे शिवरायाचे पुरातन शत्रू गोव्यात राहून मराठ्यांच्या मुलखास उपद्रव देतात. त्यास पोर्तुगिजांनी गोव्यातून हाकलून लावावे. (३) बाळेघाटातून बैलांच्या पाठीवरून जो माल येईल त्यास तोशीस न लावता आदिलशाही दरापेक्षा जास्त दंडक लावू नये. अशा प्रकारचा तह मराठे व पोर्तुगीज यामध्ये झाला.[४]

पोर्तुगिजांवर वरील स्वारी करण्याचा शिवाजी राजांचा दुहेरी हेतू होता. (१) बंडखोर देसाईंना शिवाजीच्या मुलुखात घुसखोरी करून लुटालूट करतात त्यास पोर्तुगिजांनी आश्रय देऊ नये. (२) पोर्तुगीज प्रदेशातील हिंदूचे बळजबरीने होत असलेले धर्मांतर थांबवावे. धर्मांतराचा उल्लेख पोर्तुगीज कागदपत्रात सापडत नाही असे स. शं. देसाई म्हणतात [५] पण इंग्रजीपत्रात, " जेव्हा मुलाचा बाप मरतो तेव्हा त्यांना जेसुईट कॉलेजात नेण्यात येते. तेथून त्याला त्यांच्या नातेवाईकांच्या हवाली कधीच केले जात नाही " असे आढळते.[६] (इ.रे.भा. २-२०२) शिवाजीराजे यांनी बारदेशावर स्वारी केली व चार पाद्र्यांना पकडले. त्यांना हिंदू होण्यास सांगितले. त्यांनी नकार दिल्यावर त्यांची कत्तल केली.[७] व्हाईसरायने ह्याची भयंकर दहशत घेतली व धर्मांतराचे कडक आज्ञापत्र

१ इंग्लिश रेकॉर्ड्स ऑन शिवाजी, भाग १-२३८.
२ बाळकृष्ण, शिवाजी, भाग १, पृ. ५७४.
३ पिसुर्लेकर, शिवाजी, पृ. १९-२०, प. सा. सं. क्र. ११८३.
४ पिसुर्लेकर-शिवाजी, परिशिष्ट १, प. सा. सं. क्र. ११८४.
५ देसाई सं. शं., शिवाजी महाराज आणि पोर्तुगीज, भा. इ. सं. पु. १७ वे, पृ. ६९.
६ इंग्लिश रेकॉर्ड्स भा. २-२०२.
७ प. सा. सं. क्र. ११८६.

त्याने मागे घेतले. राजियांनी सर्वत्र जाळपोळ केली आणि दीड कोट पागोडा (इ. स. भा. १-१३८) म्हणून पोर्तुगिजांनी शिवाजीराजांशी देऊन वरील सलोख्याचा तह केला.[१] तसेच पोर्तुगीज व्हाईसरायने १६ फेब्रुवारी १६६८ च्या पत्राने लखम सावंत व केशव नायकास राज्यातून जाण्यास आज्ञा दिली.[२] नंतर २८ मे ला सर्व देसायांना पोर्तुगीज सत्ता घालवून देण्यासाठीच बारदेशावर स्वारी केली होती. पण त्यांचा उद्देश सफल झाला नाही. पण गोव्याच्या व्हाईसरायला चांगली जरब बसविली.

मोगल, दक्षिणेतील सुलतान आणि मराठे हे एतद्देशीय सत्ताधीश. त्यांनी आपसांतील भांडणात परकीयांची मदत घ्यायला नको होती. ही शिस्त मोगल जे जुने सत्ताधीश त्यांनी पाळावयास हवी होती. पण मोगल सरदार राजा जयसिंग दक्षिणेत विजापूरकर व शिवाजी यांचे उच्चाटन करण्यासाठी आला. त्याने पोर्तुगीज, डच, इंग्रज या सर्वांना राजांच्या विरुद्ध उठविले. परकी लोकांना हिंदी राजकारणात ओढून आणून त्यांचा भाव, त्यांच्या आकांक्षा वाढविण्याचे देशहित घातक धोरण प्रथम मोगलांकडून सुरू झाले.

शिवाजी महाराजांच्या शक्तीबद्दल व्हाईसरॉय पोर्तुगालच्या राजास जानेवारी, १६७० च्या पत्राने कळवितो की, शिवाजी मोठा प्रबळ राजा असून, सामर्थ्यवान अशा अनेक प्रबळ शत्रूंना न जुमानता जरा जपून वागतो. त्याची प्रजा त्याचेसारखीच मूर्तिपूजक असली तरी तो सर्व धर्मांना नांदू देतो. ह्या भागातील अत्यंत धोरणी व राजकारणी पुरुष म्हणून त्याची ख्याती आहे.[३]

इ. स. १६७० च्या अखेरीस पोर्तुगिजांनी शिवाजी महाराजांशी आगळीक करण्यास सुरुवात केली. शिवाजी महाराजांची १३ गलबते व एक १२,००० रुपये किमतीचे मोठे जहाज सुरतेला जात असता ती पोर्तुगिजांनी वसईजवळ पकडली.[४] त्या दोघांत चकमक उडाली. मराठ्यांनी आपले आरमार दाभोळकडे नेले. शिवाजी महाराजांचे मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे यांच्या सैन्याने पोर्तुगिजांच्या मुलुखात उपद्रव दिला. त्याने पोर्तुगिजांकडे चौथची मागणी केली.[५]

---

१ कित्ता क्र. १२०५.

२ पिसुर्लेकर, शिवाजी, पृ. २५, प. सा. सं. क्र. १२१२.

३ प. सा. सं. क्र. १२७९.

४ प. सा. सं. क्र. १३६९.

५ प. सा. सं. क्र. १४७३.

इ. स. १६७४-७५ मध्ये मराठ्यांचा पोर्तुगिजांशी लढा चालूच होता. मराठी सैन्य १६७५ मध्ये फोंडा किल्ल्यास वेढा घालून बसले होते. किल्ल्यात पोर्तुगिजांची माणसे होती. त्यांना अन्नसामग्री गोव्याहून पोचत होती. अशी अन्नधान्याने भरलेली १० शिबारे शिवाजी महाराजांच्या सैनिकांनी पकडली, ह्याबद्दल व्हाईसरॉयला विचारल्यावर तो नाकबूल झाला.[१] यानंतर पोर्तुगिजांनी शिवाजी महाराजांची मैत्री संपादन करण्याचा प्रयत्न आपला वकील पितांबर शेणवी यास महाराजांकडे पाठवून केला. तसेच महाराजांनी पोर्तुगिजांस लिहिले की वसई व दमणकडील मुलूख आता आमच्या ताब्यात आल्यामुळे तेथील चोथिया राजाला पोर्तुगीज अंमलदारांकडून जो चौथपूर्वी देण्यात येत होता तो चौथ आता आम्हास द्यावा.[२] हे पोर्तुगिजांनी कालांतराने मान्य केले.[३]

शिवाजी महाराजांनी खंदेरी बेटाच्या तटबंदीचे काम हाती घेतले. तेव्हा पोर्तुगिजांनी आपल्या राजास दिनांक १५ नोव्हेंबर १६७९ च्या पत्राने कळविले की, येथील बांधकामास इंग्रज व सिद्दी यांनी विरोध करण्याचे ठरविले आहे. आमचे असे मत असे आहे की, " इंग्रजांपेक्षा शिवजीचा शेजार बरा...

दिनांक १५ नोव्हेंबर १६७९ च्या पत्रात पोर्तुगीज गव्हर्नरने पोर्तुगीज राजास लिहिताना महाराजांची तुलना हूण सेनानायक Atila (ॲटिला) ह्याच्याशी केली असून ते बचावाचे व चढाईचे अशी दोन्हीही युद्धे कुशलतेने खेळतात असे म्हटले आहे.[४] यावेळी शिवाजीचे कोकणांतील राज्य गोव्याचा लहानसा टापू सोडल्यास उत्तरेस रामनगरपासून दक्षिणेस कारवार जिल्ह्यातील गंगावळी नदीपर्यंत पसरले होते.[५] "

शिवाजी महाराज आणि डच संबंध :

हॉलंडमधील डच व्यापाऱ्यांनी भारताशी व पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्यासाठी दिनांक २० मार्च १६०२ रोजी डच ईस्ट इंडिया कंपनी स्थापन केली. तसेच हॉलंडच्या सरकारकडून कंपनीस मॅगेलनची सामुद्रधुनीलगतच्या प्रदेशात आणि भारत आणि पूर्वेकडील देश जावा, सुमात्रा ही बेटे यात व्यापार करण्यास व मालाच्या सुरक्षिततेसाठी वखारी व वखारीभोवती तटबंदी व सुरक्षा सैनिक ठेवण्यास, किल्ले-बांधणी व जहाज बांधण्यास परवाना मिळाला.

डच कंपनीने इ. स. १६१७ मध्ये बटेव्हीया शहराची उभारणी केली. तिथे वखार घातली. कालांतराने ते शहर त्यांच्या व्यापारी आणि राजकीय उलाढालीचे केंद्र बनले.

१ प. सा. सं. क्र. १७४३.

२ सेन, हिस्टॉरिकल रेकॉर्डस एट गोवा, पृ. १४.

३ सेन, तत्रैव, पृ. १७, १९; प. सा. सं. २०४८ व २०५०.

४ देसाई स. शं., शिवाजी महाराज आणि पोर्तुगीज, भा. इ. सं. पु. १७, पृ. ६९.

५ कित्ता, पृ. ७०.

मॉरिस व फ्रेडरिक या हॉलंडच्या राजांनी डच ईस्ट इंडिया कंपनीस पुष्कळ जहाजे व व्यापारी सवलती दिल्या. डचांनी भारताच्या मलबार किनाऱ्यावर बऱ्याच ठिकाणी वखारी स्थापिल्या व पोर्तुगिजांची नाविक सत्ता खूपच कमी केली. त्यांनी कारवार, वेंगुर्ला व सुरत येथे व्यापारी वखारी स्थापिल्या. मोगल सत्ताधीशांशी संधान बांधून आग्रा, दिल्ली, अहमदाबाद, सुरत, राजापूर, वेंगुर्ला येथे त्यांनी वखारी व वकिलाती स्थापन केल्या. त्यांच्या जहाजावर तोफा, बंदुकधारी खलाशी असल्यामुळे त्यांना चोर, अपहरण, लुटालुटीचे तितकेसे भय नसे. मुस्लिम व इतर सत्ताधाऱ्यांना दारूगोळा विकणे हाही व्यापार त्यांचा चाले. इ. स. १६०७ साली ७-८ डच लढाऊ जहाजे सुरतेस येऊन त्यांनी बंदराची व शहरातील व्यापाऱ्यांची नाकेबंदी केली. डचांचे परवान्याखेरीज कोणतेही जहाज सबंध किनाऱ्यालगतच्या समुद्रावर फिरकेनासे झाले. इतकी डचांनी दहशत बसविली. सन १६१६ मध्ये डच कंपनीचा एक अधिकारी पीटर व्हॅन डर गोएके याने शहाजहान बादशहाकडून व्यापारी सवलती मिळविल्या. इंग्रज कंपनीच्या पत्राप्रमाणे हिंदुस्तानातील बहुतेक मोक्याची ठिकाणे त्यांच्या ताब्यात होती. त्यांच्या सल्ल्याखेरीज कोणी फारसे काही करू शकत नव्हते.

किनारपट्टीचा व्यापार व समुद्रावरील सत्ता बरीच वर्ष डचांच्या स्वाधीन होती. शिवाजी महाराजांचे आरमार बलिष्ट होईपर्यंत डचांचे परवाने इतर व्यापाऱ्यांना माल पाठवताना, आणताना घ्यावे लागत. त्यांना काही बंदरात जकात संपूर्ण माफ होती.

मराठ्यांचा व डचांचा संबंध शहाजीराजांच्या कर्नाटक मोहिमेतून निर्माण झाला. इ. स. १६५७ साली संद्रेम पाटण शहर शहाजीराजांनी घेतले त्यावेळी तेथील डच वखार शहाजीराजांच्या सैनिकांनी लुटली व स्वतःच्या ताब्यात ठेविली आणि नोकरांना कैद केले.[१] दिनांक १० जानेवारी १६६० रोजी शिवाजीराजेंनी राजापूर लुटले पण तेथे डच वखार नव्हती. १४ फेब्रुवारी १६६० रोजी नेमलेला वेंगुर्ल्याचा विजापुरी सुभेदार रुस्तुमजा हा डचांचा मित्र होता. असे असले तरी डच कंपनीने इंग्रज व पोर्तुगीज यांचेपुढे कशी बाजी मारली त्याचे वर्णन हेनरी रिव्हिंगटनच्या दिनांक १० डिसेंबर १६५९ च्या पत्रात मिळते ते असे.[२]

" आमचे (इंग्रजांचे) व पोर्तुगिजांचे शत्रू डच लोक यांनी पोर्तुगिजांची या किनाऱ्यावर सर्वत्र दुर्दशा उडविली आहे. आम्हास कळते की, वेंगुर्ल्याच्या डचांनी विजापूर राणीला

१ शिवाजी निबंधावली १/७५.

२ प. सा. सं. क्र. ७९१, बेंद्रे, शिवाजी, पृ. ४११.

मोठी लांच भरून गोव्यावर सैन्य पाठविले होते. तिच्याकडेही गोवेकरांनी वकिलासोबत एक लक्षाचा नजराणा पाठविला. त्यामुळे तिने यावर्षी सैन्य पाठविण्याचे स्थगित केले. परंतु डचांनी पुन्हा नजराणा भरून हा डाव उलटविला. इंग्रज व डच यांच्यात युद्ध उपस्थित होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. डचांजवळील पुष्कळसे सैन्य नाही. परंतु लवकरच जमा करून त्यांनी विजापूरकरांशी संगनमत केल्यास ते गोवे घेऊ शकतील ".

" परंतु रुस्तुमजमाने मनात आणल्यास व पोर्तुगीज लोक त्याजशी सढळ हातांनी वागतील तर डचांना मुसलमानी कुमक मिळणार नाही.[१] १० जानेवारी १६६० रोजी शिवाजी महाराजांनी राजापूर लुटले. परंतु, तेथे डच वखार नव्हती. याचवेळी शिवाजी महाराजांनी वेंगुर्ल्याचे डच रेसिडेंट संदुलीक यांजकडे वकील पाठवण्याचा बेत केला. डचांनीही एक स्वागतपर पत्र, नजराणा आणि स्नेहाच्या अटीबद्दलचे पत्र महाराजांना धाडले.[२]

इ. स. १६६३ मध्ये शिवाजी महाराजांनी कुडाळवर स्वारी केली. त्यावेळी वेंगुर्ले शहर व्यापाऱ्यांच्या दृष्टीने मोठे भरभराटीस आलेले होते. कोल्हापूर-कुडाळमार्गे ते कोकणाकडे निघाले आणि मे १६६३ मध्ये वेंगुर्ल्यास पोहोचले. शिवाजी महाराजांच्या ४००० स्वारांच्या घोडदळाने आणि १०,००० सैनिकांच्या पायदळाने वेंगुर्ले आणि कुडाळमधील रहिवाशांना भयभीत करून दहशत निर्माण केली. यावेळी डच लोकांनी समग्र कोकणपट्टी वेंगुर्ल्यापर्यंत आपल्या दहशतीखाली आणली होती. पोर्तुगिजांची जुनाट सत्ता त्यांनी खिळखिळी करून टाकली होती. डचांवर ताण बसविण्यासाठी शिवाजी महाराजांनी वेंगुर्ल्याच्या मागील कुडाळ, सावंतवाडी जिंकून घेतली.[३] डिसेंबर १६६४ च्या आरंभी वेंगुर्लेही लुटले.[४] त्यानंतर महाराजांनी १६६५ च्या फेब्रुवारीत आपले ८५ शिवाडे व तीन मोठी गलबते असलेले आरमार बरोबर घेऊन बसनूरची स्वारी स्वतः तारवांतून जाऊन केली.[५]

" शिवाजीराजांची कृत्ये थक्क करणारी, बुद्धिमत्तेची द्योतक, त्यांचा मार्ग शोधणे फारच कठीण " असे डचांचे मत होते.[५] शिवाजीचे आरमार कानडा प्रदेशात गेले आहे हे समजण्यास डचांना बरेच दिवस लागले. डच कंपनीचा रेसिडेंट कळवितो की, महाराजांना बसनूरमध्ये तीन लाख गिल्डरची खंडणी मिळाली.[६]

१ बाळकृष्ण, शिवाजी, भाग २, पृ. ९२.
२ प. सा. सं. खं. १, पृ. २३० व पत्र ९२६, ९२८, ९३३.
३ प. सा. सं. ९५९, १०१५, १०२८. बाळकृष्ण, शिवाजी भाग १, पार्ट २, पृ. ५०४-५०५.
४ प. सा. सं. १०२८, बाळकृष्ण, कित्ता.
५ बाळकृष्ण, शिवाजी भाग २, पृ. २५७.
६ कित्ता, व्हा. १, पार्ट २. पृ. ५१९.

शिवाजी राजांनी मुंबई जिंकून घेण्यास डचांना ३ हजार सैन्य द्यावे व त्याबद्दल सिद्दीची दंडाराजापुरी घेण्यास डच लोकांनी शिवाजीस मदत द्यावी असा डच ॲडमिरल व गव्हर्नर रिकलॉफने करार केल्याची बातमी इंग्रजांना समजली. पण डचांना शिवाजीसंबंधी तितकीशी खात्री वाटेना. तरीपण ७ डच जहाजे मुंबईपासून जरा दूर अंतरावर नांगर टाकून राहिली होती. डचांशी पूर्ण संगनमत झाले असते तर इंग्रजांना मुंबईच काय पण सुरतेहून काढता पाय घ्यावा लागला असता असे मुंबई कन्सल्टेशन सांगते.[१] कारवार येथे डचांनी इ. स. १६६७ मध्ये वखार घातली. पण त्यास शिवाजीच्या लोकांनी त्रास दिला नाही. शिवाजीराजांचे मंत्री डचांना वेंगुर्ल्यास मित्रत्वाने वागवितात असे डच रेकॉर्ड ३१ जानेवारी १६७५ चे पत्र बोलते.[२]

शिवाजीराजे कर्नाटकांत स्वारीवर गेले तेव्हा पुलिकतचे डच व फ्रेंच यांच्याकडून २ लक्ष होन प्रत्येकी मागितले.[३] देवनापटणचे डच मोठ्या थाटात शिवाजीराजेंना भेटावयास आले त्यांना महाराजांनी छावणीमध्ये २ महिने अडकवून ठेवले व त्यांच्याकडून बऱ्याच द्रव्याची प्राप्ती झाल्यावर सोडून दिले.[४]

हिंदू राजे एखाद्या माणसाची योग्यता ठरवतात ती त्याचा बाणेदारपणा, रुबाब, त्याचा बोलबाला, नावलौकिक, लोकप्रियता व श्रीमंती यावरूनच, असे डच वकील हर्बर्ट डी जॅगर लिहितो.

तो पुढे लिहितो की, शिवाजीराजांचा खास तंबू (स्टेट टेंट) उभारलेला होता. तो साधाच होता. जनार्दनपंत वकील व त्याचा भाऊ रघुनाथपंत यांना बरोबर घेऊन शिवाजीराजे तंबूत आले.[५]

तदनंतर डच कंपनीची मानवंदना शिवाजीराजे यांनी स्वीकारली व पूर्वी दिलेली आश्वासने तशीच चालू राहतील असे आश्वासिले. डच वकिलांनी आपल्या व्यापारांच्या हकीगती, माहिती, अडचणी, तक्रारी, गैरसोई व चालू परिस्थितीची माहिती दुभाष्यामार्फत (वेंकटाजी) कळविली. ती ऐकून घेतली. पानसुपारी नजराणे झाले. डच वकील जाण्यास निघाले तेव्हा शिवाजीराजे यांनी डच गव्हर्नर जनरलला भेट म्हणून काही जिनसा

१ प. सा. सं. १५६३.
२ प. सा. सं. क्र. १७२२.
३ बेंद्रे, शिवाजी, पृ. ९६४.
४ कित्ता, पृ. ९८१.
५ शेजवलकर, शिवछत्रपती, पृ. १८८.

जॅगरकडे देण्यास सांगितले. वकील जाता-येता त्यास शिवाजी राजांच्या घोडेस्वारांनी त्यास मानवंदना दिली. अशा रीतीने राजे डचांना मोठा मान देत असत.[१] शिवाजीराजांकडून कारोमांडल किनाऱ्यावर व्यापार करण्यास काही सवलती आणि अभयपत्र मिळाली. शिवाजी राजांचा वकील रघुनाथ नारायण हणमंते यांजकडून डचांना अभयपत्र मिळाले. त्यांत काही शर्ती पुढीलप्रमाणे होत्या :—

(१) जिंजी प्रांतावर व्यापार जकात शे. २।। टक्के घेतात, तितकी घ्यावी.

(२) शिवाजी राजांच्या अधिकाऱ्यांनी पेटारे उघडून पाहून घ्यावी.

(३) त्याकरिता आयात-निर्यात माल कोणता याची माहिती अगोदर दिली पाहिजे.

(४) डच कंपनीचे लोकांना प्रवास परवाने द्यावेत.

(५) शिवाजींचे नोकर हवालदार वगैरे यांनी घेतलेल्या मालाची योग्य ती किंमत देऊन विकत घ्यावे.

(६) जहाजे फुटल्यास सरकार जबाबदार नाही. गुलामांचा व्यापार करू नये.

पोटोन्मेव्हो येथील फ्रेंच व डच वखारवाले पैसे देत नाहीत म्हणून शिवाजी राजांच्या सैनिकांनी त्यांच्या वखारी लुटल्या होत्या. पण डच अधिकाऱ्याने शिवाजी राजांची गाठ घेऊन त्यांना एक हजार नजराणा दिला. बदाम, पिस्ते आदी जिन्नस भेट म्हणून दिल्या तेव्हा डच वखारींना उपद्रव दिला जाणार नाही असे आश्वासन दिले गेले.[२]

वेंगुर्ल्याच्या डच प्रमुखास शिवाजीने पत्र लिहून चांगले सुरूंग उडविणाऱ्या लोकांची मागणी केली होती. यावरून शिवाजीराजे पाश्चात्यांची मदत कोणत्या प्रकारे घेत हे कळते. पण त्या लोकांकडे शिकण्यासाठी तरुण पाठविल्याचे उल्लेख मिळत नाहीत. पाश्चात्यापासून तोफा, बंदुका, दारूगोळा, औषधे शिवाजी राजे विकत घेत व ते गुप्तपणे या जिनसा शिवाजीला पुरवीत. मोगल सत्तेला हे पाश्चात्य बाह्यतः तरी भीत असत असे शिवकालीन पत्रव्यवहारावरून म्हणता येते. शिवाजी राजांच्या सैन्यात पोर्तुगीज नोकर तोफखान्यावर असत. औरंगजेबाच्या तोफखान्यामध्ये युरोपांतल्या सर्व देशातल्या लोकांची भरती केलेली होती. शिवाजीची मुख्यतः भिस्त घोडदळ आणि हातबॉम्ब,


१ प. सा. सं. १९६४, पृ. ५८६-८७.

२ E. R. S. II, पृ. ३४९.

बंदुकधारी पायदळ व तोफा यावर असे हे निर्विवाद आहे. गनिमी काव्याने शत्रूस बेजार करण्याचे त्यांचे धोरण होते. त्याला कूटयुद्ध असे म्हणण्यात येते. त्यामुळे पाश्चात्य देशीय शिवाजी राजांना वचकून असत.

डच रेकॉर्डमध्ये राज्याभिषेकाचे वर्णनही दिलेले आढळते.[१]

□□



राजापूर इंग्रज फॅक्टरी

१ भा. इ. आणि सं. सं. त्रै. वर्ष ११, पृ. ४२ पृ. ५३.

२७. शिवाजी महाराज आणि इंग्रज संबंध

इंग्लंडमधील व्यापाऱ्यांनी ईस्ट इंडिया कंपनी पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्यासाठी इ. स. १५९८ मध्ये स्थापन केली. त्यांनी समुद्र पर्यटनाच्या साहित्याची सर्व तयारी केली तेव्हा आपला व्यापार प्रथम पोर्तुगिजांच्या ताब्यातील बंदरातून केला. परंतु पोर्तुगिजांच्या विरोधास कंटाळून त्यांनी हिंदुस्थानातील पश्चिम किनाऱ्यावरील एतद्देशीय सत्ताधीशांच्या ताब्यातील सुरत बंदरात आपली सोय लावून घेण्याचे ठरविले. (इ. स. १६११). कारण पश्चिम किनाऱ्यावर सुरत हेच काय ते प्रमुख बंदर होते. आपल्या व्यापारवृद्धीसाठी सुरत, मद्रास व कलकत्ता ही बंदरे निश्चित केली. इंग्रज व शिवाजी महाराज यांचा संबंध इ. स. १६६० मध्ये आला. अफझलखानाचा वध नोव्हेंबर १६५९ मध्ये महाराजांनी केला. अफझलखान व आदिलशहाचे बलिष्ट सरदार आपल्याजवळ जहाजे बाळगून मालाची ने-आण करीत असत व पुष्कळ पैसा मिळवीत असत. खानाच्या वधानंतर त्याच्या मुलाची तीन जहाजे दाभोळ बंदरात माल घेऊन आली होती. पण हे बंदर महाराजांनी अफझल वधापूर्वी आपल्या ताब्यात घेतले होते.[१] म्हणून दाभोळचा सुभेदार महमूद शरीफ ही तीन जहाजे घेऊन सुरक्षिततेसाठी राजापूर बंदरात आला. इ. स. १६६० साली शिवाजी राजांचा अधिकारी दौरोजी याने राजापूर बंदर आपल्या ताब्यात घेतले.[२] दौरोजीने एका जहाजावरील माल त्याची किंमत न देताच नेला. तेव्हा इंग्रजांशी त्याचे खटके उडाले. त्यात मराठ्यांनी जिफोर्ड यास पकडले. त्याला शिवाजी महाराजांचे सैनिक पकडून नेत असता इंग्रज सैनिकांनी त्यांच्यावर हल्ला करून त्यास सोडवून नेले.[३] ह्यावेळी शिवाजी महाराजांचे सैन्य कोकणातील स्थळे काबीज करत दाभोळपाशी आले. तदनंतर मराठे सैनिक राजापूरला आले. त्यावेळी त्यांना तेथील इंग्रज वखारीचा प्रमुख रेव्हिंग्टन हा आक्रमणाच्या व आपण पकडले

१ सरकार, शिवाजी चरित्र, पृ. २२२.
सेन, फॉरेन बायोग्राफी ऑफ शिवाजी, पृ. ७ व १०.

२ सरकार, शिवाजी चरित्र, पृ. ३३३.

३ कित्ता, पृ. ३३५.

जाण्याच्या भीतीने सुरक्षित राहण्यासाठी म्हणून जहाज घेऊन पळून जाऊ लागला. तेव्हा मराठी सैनिकांनी त्या जहाजावरील माल पकडला आणि उपअधिकारी जिफोर्ड यास कैद केले. ह्या प्रसंगी इंग्रजांतर्फे विजापूरचा सरदार रुस्तुम-इ-जमान याने शिवाजी महाराजांना जिफोर्डची मुक्तता करण्याची कळकळीची विनंती केली. ती शिवाजी महाराजांनी मान्य केली आणि हे प्रकरण तेवढ्यापुरते मिटले.[१]

पुढीलवर्षी शिवाजी महाराजांनी कोकण स्वराज्यात आणण्यासाठी सैन्यासह कूच करून वसईपासून राजापूरपर्यंतचा सागरी किनारा स्वराज्यात आणिला. तदनंतर महाराज स्वतः चिपळूणमार्गे राजापूरकडे सैन्यासह निघाले.[२] कोकणच्या पश्चिम किनाऱ्यावर राजापूरला इंग्रजांची वखार होती हे महाराजांस ठावूक होते आणि त्यांना हेही समजले होते की राजापूरचे इंग्रज व्यापारी सिद्दी जोहरला पन्हाळा काबीज करण्याच्या कामी लहान तोफा व गोळे पुरवीत होते. तसेच त्यांनी विजापूरकरांना पन्हाळा किल्ल्यावर मारा करण्याच्या कामात मराठ्यांविरुद्ध मदत केली होती.[३] महाराजांनी पन्हाळा किल्ला विजापूरकरांच्या स्वाधीन केल्यानंतर राजापूरच्या इंग्रजांनी आपल्या शत्रूला सक्रिय सहाय्य केल्याबद्दल त्यांना धडा शिकविण्याचे महाराजांनी ठरविले. सन १६६१च्या मार्चमध्ये राजापूरवर स्वारी करून इंग्रजांची वखार लुटली व खणून काढली आणि तेथील इंग्रजांना कैद केले.[४] इंग्रजांना आपले कैदी दहशतीने सोडवून घ्यावेत असे पहिल्या प्रथम वाटले. म्हणून सुरत येथील इंग्रजांनी आपल्या जहाजांना हुकूम दिला की, " दक्षिणेकडून सेंट जॉन ते चॉलपर्यंतच्या जहाजांना पकडून ती जप्त करावी. समुद्रातच धरावी."[५] यापैकी काहीच घडले नाही. पकडलेल्या इंग्रज कैद्यांनी उर्मट उत्तरे मराठे अधिकाऱ्यास दिल्यामुळे त्यांची कैद वाढली. दोन वर्षेपर्यंत त्यांना रायरी किल्ल्यात कैदेत राहावे लागले. सुरत इंग्रजांनी शिवाजी महाराजांपाशी त्यांच्या सुटकेकरिता खटपट केल्यावर त्या कैद्यांची सुटका शिवाजी महाराजांनी १७ जानेवारी १६६३ ला केली.[६] सुटकेनंतर

१ काळे, इंग्लिश रेकॉर्ड ऑन शिवाजी १५ व १६, पृ. १०.
सरदेसाई, न्यू हि. म. भा. १, पृ. १४०.

२ सरदेसाई, न्यू हि. म. भा. १, पृ. १३८-३९.

३ सरकार, शिवाजी, पृ. ३३५.

४ प. सं. ले. ८५२, शिवभारत अध्याय ३०-६.

५ बेंद्रे, शिवाजी, पृ. ८१९.

६ प. सा. सं. क्र. ९१७.

रायरीहून हे इंग्रज व्यापारी तारीख २९ जानेवारीस राजापुरास आले. सुटका झालेले गिफर्ड व त्यांचे सहकारी राजापुराहून निसटून गोव्यास गेले. त्यांनी सुरतेच्या अधिकाऱ्यास आपण सुरतेस कसे यावे ह्याचे मार्गदर्शन करण्याची विनंती पत्राद्वारे केली.[१] सर्व इंग्रज कैदी मुक्त झाल्यांवर सुरतकरांनी हे प्रकरण मिटते घेतले.

इ. स. १६६४च्या जानेवारीत शिवाजी महाराजांनी सुरत लुटली. पण इंग्रज, डच व्यापारांच्या गोदामास त्यांनी हात लावला नाही. पण इंग्रजांनी शिवाजी महाराजांच्या एका तुकडीचा प्रतिकार केला तेव्हा इंग्रजांचे तीन लोक बंदुकीने ठार मारले गेले आणि तेही त्यांच्या वखारीजवळ. बाकी सुरत लुटीसंबंधीचा मजकूर त्याच प्रकरणात आला असल्यामुळे त्याची इथे पुनरुक्ती नको.

शिवाजी महाराजांना इंग्रजांची मदत सिद्दीचा पाडाव करण्यासाठी हवी होती म्हणून महाराजांनी ९ सप्टेंबर १६७१ रोजी आपला वकील सुंदरजी यास मुंबई इंग्रजाकडे पाठविला. त्याने मुंबई कौन्सिल बरोबर केलेल्या वाटाघाटी फोल ठरल्या.[२] इंग्रजांना राजापूर वखारीतून मराठ्यांनी नेलेल्या मालाबद्दल नुकसानभरपाई मागण्यासाठी आपला वकील उस्टीक यास शिवाजी महाराजांकडे पाठविले. महाराजांपाशी नुकसानभरपाई बद्दल ३९९५७ होनाची मागणी केली. महाराजांनी फक्त ५००० होन देण्याचे कबूल केले. ते मान्य न करून उस्टीक सुरतला परत गेला.[३] अशा रीतीने उस्टीकची शिष्टाई असफल झाली. यानंतर शिवाजी महाराजांनी सुंदरजी नावाच्या वकिलास प्रेसिडेंट ऑंजियर याजकडे बोलणी करावयास पाठविले. सुंदरजीने अगदी थोड्या फेडीचे बोलणे काढले ते प्रेसिडेंटला पसंत न पडून आपले मागणे काय आहे ते कळवून त्याला परत पाठविण्यात आले.[४] पुढे शिवाजी महाराजांकडून १६७३ च्या फेब्रुवारीत पिलाजी नावाचा वकील इंग्रजांकडे गेला. त्याने इंग्रजास देण्याचा नुकसानभरपाईचा आकडा ७००० होन बोलला. पण इंग्रजांचे डचांशी यावेळी युद्ध असल्याचे कारण पुढे करून त्यास इंग्रजांनी परत पाठविले.[५]

---

१ प. सा. सं. क्र. ९३७.

२ सेन फॉरेन बायोग्राफी ऑफ शिवाजी, पृ. २९३.

३ प. सा. सं. १४६९, पृ. ४१६.

४ प. सा. सं. १५७०, प. ४५६.

५ कित्ता १५१६, पृ. ४३०-३१.

त्यानंतर इंग्रज कंपनीच्या मागण्या घेऊन तारीख १९ मे १६७३ रोजी इंग्रज वकील टॉमस निकल्स शिवाजी महाराजांकडे जाऊन दिनांक १६ जूनला परत मुंबईस आला. ह्याच टॉमस निकल्सने ह्या प्रवासाची तपशीलवार हकीगत लिहून ठेविली आहे. विचारसारांश शिवकालीन पत्रसारसंग्रह भाग-२, क्र. १५३६ यात दिलेला आढळतो.[१]

दिनांक २४ जून १६७३ च्या सुमारास इंग्रजांनी आपला वकील नारायण शेणवी यास रायगडावर पाठविले.[२] त्याने शिवाजी महाराजांचा वकील भिमाजी पंडीत याजबरोबर तहाच्या वाटाघाटी केल्या. शिवाजी महाराजांच्या वकीलाने इंग्रजांस नुकसानभरपाई दाखल १२००० होन देण्याचे कबूल केले. पण कंपनीने ते मान्य केले नाही. तदनंतर शिवाजी महाराजांचा वकील मुंबईत इंग्रजांकडे तहाची बोलणी करण्यासाठी ऑक्टोबर १६७३ त गेला. त्याने इंग्रजांकडे ३९९५७ होनांचा हिशेब मागितला. तो देण्याची कामगिरी इंग्रज प्रेसिडेंट चाईल्ड, उस्टीक व डे या सहाय्यकांवर सोपविली. त्यानंतर वकील भिमाजी पंडीत व वरील इंग्रज अधिकाऱ्यांची बैठक झाली. शेवटी ऑक्टोबर अखेरीस राजापूरचे संबंधातील शिवाजी महाराजांबरोबरीचा चाललेल्या वादाचा निकाल इंग्रजांच्या मनासारखा लागला. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या मुलखापासून कंपनीच्या व्यापारास बरकत येईल असे इंग्रज कंपनीस वाटू लागले.[३] पण राजापूरसंबंधी वादाचा निकाल जरी इंग्रजांना आपल्या मनासारखा झाल्याचे वाटू लागले, तरी इंग्रज मराठ्यांचा अंतिम तह होण्यासाठी दोघांचा पत्रव्यवहार चालूच राहिला.

नारायण शेणवी इंग्रजांचा निरोप घेऊन निराजी पंडीताची भेट घेण्यासाठी पाचाडला एप्रिल १६७४ च्या पहिल्या आठवड्यात गेला.[४] निराजीच्या भेटीत नारायण शेणवी यास शिवाजी महाराजांच्या होऊ घातलेल्या राज्याभिषेकासंबंधीची बातमी समजली. ही बातमी त्याने मुंबई कौन्सिलला कळविली. तेव्हा कौन्सिलने शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक समारंभास नजराणा घेऊन उपस्थित राहाण्याकरिता हेन्री ऑक्झिंडेनची नेमणूक केली. नजराणा चांगला १०००/१२०० शे रुपयांचा पाठवावा असे ठरले. दिनांक ४ मे १६७४ च्या पत्राप्रमाणे ऑक्झिंडेनबरोबर जॉर्ज रॉबिन्सन व टॉमस मिचेल यांना त्याचे मदतनीस म्हणून जाण्याची आज्ञा झाली.[५] इंग्रज वकील ऑक्झिंडेनने सर्वांच्या पसंतीने खालील नजराणा शिवाजी महाराज आणि त्यांचे इतर अधिकारी यांना देण्याचे ठरले.

१ शिवकालीन पत्रसारसंग्रह, भा. २, क्र. १५३६
२ कित्ता १५४७.
३ कित्ता १५७४
४ कित्ता १६२५.
५ कित्ता १६३८, सरदेसाई, शककर्ता शिवाजी, पृ. २९५.

शिवाजी राजांस—(१)	हिरेजडीत शिरपेच किंमत	रु.	६९०
(२)	हिरेजडीत सळकडी किंमत	रु.	४५०
(३)	मोती (रती १०/१/१०) किंमत	रु.	५१०
		रु.	१६५०

शिवाजीपुत्र संभाजी राजा याला—

दोन लाल खचित सलकडी किंमत	रु.	१२५
एककंठी ८ हिऱ्यांची किंमत	रु.	२५०
	रु.	३७५

शिवाजी महाराजांच्या खास मर्जीतील मोरोपंत पंडीत, अण्णाजी पंडीत, निराजी पंडीत व शिवाजीचा कारभारी (सेक्रेटरीने) या सर्वांना रायगडावरील अभिषेकाच्या वेळी नजराणा द्यावा असे कंपनीने ठरविले. तसेच इंग्रजांनी शिवाजी राजे यांजबरोबर जो तह करावयाचा त्याची कलमे ही आपल्या वकिलाबरोबर पाठविली.

तहाची कलमे :—

(१) उभयतांमध्ये आजपासून पक्क्या व अभंग सलोख्याचा तह असावा.

(२) सर्व शत्रुत्व नष्ट व्हावे आणि उभयपक्षी कोणत्याही भागात लूट करणे, छापे घालणे इत्यादी प्रकारे नुकसान करू नये.

(३) शिवाजीचे राज्यांत संचार, रहिवास व व्यापार याबाबतीत इंग्रजांना स्वातंत्र्य असावे. इंग्रजांनी नित्याच्या जकाती देऊन सरकारशी आज्ञाधारकपणे शिवाजी महाराजांच्या प्रजेला मुंबई बेटावर याच प्रकारच्या सवलती मिळाव्या.

राजापूरच्या भरपाईबद्दल १० हजार होन देण्याचा करार शिवाजी महाराजांच्या सहीचा आला हे मुंबई कौन्सिलच्या दिनांक ११ मे १६७४ च्या पत्रात नमूद करण्यात आले. तहाची बोलणी चालू असताना एप्रिल, १६७३ मध्ये शिवाजी महाराजांच्या सैनिकांनी हुबळीत ठेविलेला इंग्रजांचा माल लुटला. त्यांनी हुबळीच्या वखारीत पुरुषभर खोल खणून सापडली ती लूट नेली.[१] हुबळीस झालेल्या लुटीबद्दल शिवाजी महाराजांशी बोलल्याबरोबर महाराजांनी सांगितले की याबद्दल आपणांस काही माहिती नसून ती लूट आदिलशाही सैन्याने किंवा तेथील सुभेदारानेच केली असावी.[२] हे कंपनीला खरे

१ प. सा. संग्रह क्र. १५४३.

२ प. सा. सं. क्र. १५४८.

वाटले नाही. शिवाजीच्या सैनिकांनी हुबळी शहर लुटले याची खात्री इंग्रजांनी केली. तसेच कारवारच्या लोकांनी विजापूरच्या आदिलशहाविरुद्ध बंड करून तेथील वखारीस पुष्कळच त्रास दिल्याचे मुंबई कंपनीस समजले.[१]

एप्रिल १६७४ ला शिवाजी महाराजांनी इंग्रज कंपनीस खालील खणखणीत निरोप पाठविला की, " सिद्दीला बंदरात जागा दिल्यास मी तुमच्याशी युद्ध करून बादशाही आरमार जाळण्याचा शक्य तितका प्रयत्न करीन आणि मुंबई बेट घेण्याकरिता डचांना १० हजार सैन्याची कुमक करीन " याकरता आपण सिद्दीला प्रवेश मुळीच देता कामा नये.[२]

शिवाजी महाराजांच्या या धमकीमुळे मुंबईकर इंग्रज भयभीत झाले. त्यांनी ३० एप्रिल १६७४ रोजी सुरतेस पत्र लिहून शिवाजी महाराज कशा रीतीने इंग्रजांस त्रास देणार आहेत याबद्दल कळविले. यानंतर शिवाजी महाराजांनी आपल्या सहीचे करारनामे इंग्रजांस पाठविले. त्याचे भाषांतर केल्यानंतर इंग्रजांच्या लक्षात आले की शिवाजी महाराजांच्या काही अटी जाचक आहेत. त्यानंतर हेन्री ऑक्झिंडेनला शिवाजी महाराजांशी तहाचे बाबतीत सूचना देऊन रायगडी राज्याभिषेक समारंभास जाण्यास निरोप दिला. इंग्रज वकील हेनरी ऑक्झिंडेन मुंबईहून निघून चौलवरून १९ मे ला सकाळी ९ वाजता पाचाडला पोचला. तदनंतर तो रायगडावर २२ मे ला गेला. त्यास तिथे राजमहाल, दरबार प्रधानाची घरे मिळून ३०० इमारती दिसल्या. त्याने मोरोपंत पेशवे, शामजी नाईक, प्रल्हाद निराजी ह्या सरदारांस त्यांच्या इतमामाप्रमाणे नजराणे दिले. त्यास ह्या सरदारांनी रायगडावरच ठेवून घेतले. दिनांक ५ जून रोजी त्यास निराजी पंडीतांचा निरोप आला की दुसऱ्या दिवशी सात-आठ वाजता सिंहासनारूढ राजाला मुजरा व नजर करण्यासाठी यावे. त्याप्रमाणे सिंहासनावर आरूढ झालेल्या राजास ऑक्झिंडेनने मुजरा केला व नारायण शेणव्याने नजरेची आंगठी वर धरली. शिवाजी महाराजांचे लक्ष इंग्रज वकिलाकडे जाताच शिवाजी महाराजांनी त्यास अगदी सिंहासनाच्या पायरीजवळ येण्याचा हुकूम केला व पोषाख देऊन त्यांना परत जाण्यासाठी तत्काळ रजा दिली. इंग्रज वकिलाने त्यानंतर निराजी पंडीताकडे राजांची तहावर सही लवकर मिळविण्यासाठी टुमणे लाविले. तारीख ११ जून रोजी महाराजांनी तहावर सही केल्याचे निराजी पंडीताने इंग्रज वकिलास कळविले. तारीख १२ रोजी सर्व प्रधानांच्या सह्या तहावर झाल्या. तो तहाचा कागद घेऊन इंग्रज वकील मुंबईस येण्यास १३ तारखेस रायगडाहून निघाला तो १६ जूनला मुंबईस आला.[३]

---

१ पत्रसारसंग्रह भा. २, १५६१.

२ कित्ता १६३०.

३ कित्ता १६४३.

रायगडावरील राज्याभिषेक समारंभाचे रसभरीत वर्णन इंग्रज वकिलाने केल्याचे इ. स. १६७६ च्या डायरीत सापडते. त्यानंतर महाराजांनी दिनांक ६ नोव्हेंबर १६७४ रोजी आपला वकील मुंबईकरांकडे पत्र देऊन पाठविला. ह्या पत्रात महाराजांनी इंग्रजाकडून ४० ते ६० हं. वे. वजनाच्या ५० मोठ्या तोफांची मागणी केली. हे पत्र मुंबई इंग्रजांनी सुरत इंग्रजाकडे पाठविले. सुरतकरांनी त्यावर विचार करून महाराजांस कळविले की, अशा कृत्याने मोगल बादशहास घुस्सा येईल म्हणून आपली तोफांची मागणी पुरी करू शकत नाही.

जानेवारी १६७५त शिवाजी महाराजांची सैन्ये औरंगाबादकडे गेली. ह्या सैन्याने बरीच लूट मिळविली. मोगल सेनापती कुतुबखान याचा पराभव केला आणि हीच फौज बऱ्हाणपुरापर्यंत मोगलांचे गाव लुटीत निघाली. वाटेतील धरणगाव इत्यादी शहरे लुटली व बरीच लूट मिळवली.[१] धरणगावला इंग्रजांची वखार होती. ती लुटून फस्त केली. या वखारीचा मुख्य सॅम्युअल ऑस्टीन हा होता व थॉमस हॅगस्टन हा दुय्यम अधिकारी होता. धरणगावची वखार लुटल्यावर हे दोन्ही अधिकारी सुरतेस गेले आणि घडलेली हकिगत व झालेले नुकसान याची माहिती दिली. वखारीतील कापड व दहा हजार रुपये रोकड शिवाजी महाराजांच्या सरदारांनी नेली असे ह्या दोघांनी सांगितले. सुरतकरांनी ही बातमी मुंबई कौन्सिलला कळविली. त्यावर मुंबई कौन्सिलने ठराव केला की, धरणगावच्या वखारीची जी लूट झाली त्याबाबत शिवाजीराजांकडे दूत पाठवून त्याजवळ पत्रे द्यावीत व पत्रात शिवाजी महाराजांकडे संपूर्ण भरपाई मागण्यात यावी. या कामी कौन्सिलने ऑस्टीन यास शिवाजी महाराजांकडे पाठविण्यात आले.[२] दरम्यानच्या काळात शिवाजीराजे यांनी आपला सेवक मुंबईकरांकडे पाठवून त्यांजकडून लोखंड, दारूगोळा, तोफा व तांबे यांची मागणी केली होती. कारण मोगलांशी राजियांची झुंज चालू होती. त्यासाठी या जिनसांची जरुरी होती.

मुंबई कौन्सिलने दारूगोळा तांदळाच्या बदली देण्याचे मान्य केले. तांबे व तोफा देण्याचे कौन्सिलच्या पुढील बैठकीत ठरविण्याचे ठरले. त्याप्रमाणे डिसेंबर १६७५ च्या सुमारास इंग्रजांनी काही तोफा शिवाजी महाराजांस दिल्या.[२] राजियांकडील दूतास धरणगावच्या वखारीचे त्यांजकडून किती नुकसान झाले ते सांगण्यात आले व महाराजांनी ही नुकसानभरपाई इंग्रजांस द्यावी असे सुचविण्यात आले.

१ प. सा. सं. भा. २, १७१९, बेंद्रे, शिवाजी, पृ. ८४६.

२ कित्ता १७७६.

ऑस्टीनबरोबर महाराजांस व त्यांच्या मंत्र्यास देण्यासाठी म्हणून सातशे चाळीस रुपये किमतीच्या भेटी होत्या. दिनांक २४ ऑगस्ट १६७५ रोजी त्याने मुंबई सोडली व दिनांक ६ सप्टेंबर रोजी तो रायगडावर दाखल झाला. त्याची महाराजांशी मुलाखत १५ तारखेला रात्री प्रल्हाद निराजीच्या मध्यस्थीने झाली. ऑस्टीनला सांगण्यात आले की धरणगावबाबत तुम्ही सांगत असलेल्या हकीगतीपैकी कोणतीही हकीगत महाराजांच्या कानी आलेली नाही. तेव्हा जी नुकसानभरपाई मागत आहात ती निरर्थक आहे. त्यानंतर ऑस्टीनने कंपनीच्या वखारीसाठी कौल (अभय) मागितला. त्यावर फार चिकित्सा होऊन महाराजांनी तो देण्यासाठी हुकुम दिला.[१]

ईस्ट इंडिया कंपनीला शिवाजीच्या मुलखात व्यापार करण्यासाठी खास सवलती हव्या होत्या. त्यासाठी राजापूरकर इंग्रज वखारवाले, सुरत वखारवाले महाराजांकडून कौल मिळविण्याच्या खटपटीत होते. राजापूरकरांना ऑक्टोबर ७६ मध्ये कौल मिळाला. त्यांनी तो मुंबई कौन्सिलकडे पाठवून दिला व कौन्सिलला लिहिले की ह्या कौलाचा उपयोग शिवाजी महाराजांच्या सुभेदार किंवा सेनापती याजकडून त्रास झाल्यासच करावा.[१]

इंग्रजांनी शिवाजी महाराजांस न दुखविण्याचे धोरण ठेविले होते. शिवाजी महाराजांकडून प्रत्यक्ष धोका होण्याचा संभव नव्हता असे वाटत होते.

□□

१ पत्रसारसंग्रह, भाग २, १७८९.

२८. युवराज संभाजी राजांचा राज्यकारभारांत प्रवेश व राज्यप्राप्ती

युवराज संभाजीराजे हे शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र होत. ते १ मे १६५९ रोजी जन्मले. इ. स. १६७० सालापर्यंत सर्व भोसले घराण्यांत संभाजीराजे हे एकुलते एक पुत्र होते. वाचकांना आठवत असेल की शिवाजी महाराजांनी स्वतंत्र राज्य स्थापनेचा उद्योग करावा म्हणून त्यांचे पिता शहाजी राजे यांनी त्यांना राज्यकारभारविषयक व युद्धकला यांचे प्रशिक्षण मिळावे म्हणून इ. स. १६४० ते १६४२ या दोन वर्षांत बंगलोरास ठेवून दिले होते. इ. स. १६७० त संभाजीराजांस १३ वे वर्ष लागले, तेव्हां शिवाजी महाराजांनी मराठी राज्याच्या ह्या पहिल्या युवराजास, आपल्या वारसास, विद्या, कला, प्रशासन, युद्धनीती व राजनीती अशा सर्व क्षेत्रात निपुण बनविण्याचे प्रशिक्षण देण्यास प्रारंभ केला.

संभाजी राजांस धनुर्विद्या, संगीत, पुराणेतिहास व काव्यालंकार शिकविण्यासाठी केशव पंडितांची नेमणूक केली. ह्या केशव पंडिताकडून संभाजीराजे यांनी रामायण पुराण श्रवण केले. त्याची सांगता केली.[१] सारांश, शिवाजी महाराजांनी संभाजी राजांस राज्य व्यवहारोपयोगी व वाङ्‌मयीन असे बरेच शिक्षण देवविले.

युवराजाने युद्धांतील डावपेच आत्मसात करून युद्धकलेत तरबेज व्हावे म्हणून संभाजीराजांकडे महाराजांनी खानदेशचा सुभा सोपविला होता. सेनापती प्रतापराव गुजर व आनंदराव हे आपल्या छोट्या सुभेदारास घेऊन स्वारीवर जात. याबद्दल ॲबेकॅरेने आपल्या इ. स. १६७२ च्या अहवालात म्हटले आहे ते असे " शिवाजीराजांनी एक सर्वांत शूर अशा दहा हजार सैनिकांचा विभाग संभाजीराजांच्या ताब्यात दिला होता," ॲबेकॅरे म्हणतो की, " हा युवराज लहान आहे तरी धैर्यशील व आपल्या बापाच्या कीर्तीस साजेल असाच शूरवीर आहे. शिवाजी राजांसारख्या युद्धकुशल पित्याच्या बरोबर राहून तो युद्धकलेत तरबेज झालेला असून चांगल्या वयोवृद्ध सेनापतींचीही बरोबरी करील इतका तो तयार आहे. तो मजबूत बांध्याचा असून अति स्वरूपवान आहे. त्याचे सौंदर्य हाच त्याचेकडे आकर्षण वाढविणारा मोठा गुण आहे. सैनिकांचे त्याच्यावर

---

१ शाहू रोजकीर्द रु. १, पुडके नं. १५, क्र. ६४५-६४७.

फार प्रेम आहे व ते त्याला शिवाजीसारखाच मान देतात. सैनिकांना संभाजीराजांच्या हाताखाली लढण्यात विशेष धन्यता वाटते. ते आपल्या कर्तबगारीचे सर्व श्रेय आपल्या छोट्या सेनापतीस देतात. संभाजीराजेही कोणीही कर्तबगारी करून दाखविली तर त्याचे कौतुक करतात व त्याचे समोर घडलेल्या शौर्याचे चीज संभाजीराजांकडून ताबडतोब बक्षीस रूपाने झाल्याशिवाय राहत नाही."[१]

अशा रीतीने शिवाजी महाराजांनी इ. स. १६७० पासून संभाजीराजांस राज्यकारभारांत गुंतविले.[२] ह्या वेळपर्यंत शिवाजी महाराजांच्या गैरहजेरीत राजधानी रायगडावर मुखत्यारीने राज्यकारभार पाहणारी राजमाता जिजाबाई वृद्ध झाल्याने राज्याचा कारभार २६ जानेवारी १६७१ रोजी महाराजांनी संभाजीराजांस सांगितला. संभाजीराजांस कारभार मिळण्यापूर्वी ते शिवाजी महाराजांच्या दरबारांत बसत व शिष्टाचार घेत असत. त्यांच्यावर आपल्या गैरहजेरीत राज्यकारभार सोपविल्यावर महादजी यमाजी नावाच्या कारकुनाची नेमणूक सालींना १०० होनावर करून त्यास संभाजी महाराजांकडे लावून दिले.[३]

संभाजीराजांवर आपल्या अनुपस्थितींत राज्याचा कारभार सोपविल्यानंतर युवराज संभाजी रायगडी बसून महाराजांच्या अनुपस्थितीत राज्यकारभार पाहू लागले. शिवाजी महाराजांच्या मंत्र्यांना हे आवडले नसावे. आम्ही एवढे कर्तबगार, महाराजांनी आमच्यावर विश्वास दाखवून कार्ये करून घेतली, प्रतिष्ठेने वागविले असता, युवराज तरुण, अपरिपक्व, त्यांनी आम्हास शिकवावयास नको ही भावना ज्येष्ठ पिढीतील प्रधानांची असावी. या उलट युवराज, राज्याचे वारसदार, ही प्रधान मंडळी राज्याचे चाकर त्यांनी आपला (युवराजांचा) हुकूम मानलाच पाहिजे असा विचार युवराजांचा होता. त्यामुळे संभाजीराजे-प्रधान यामधील वितुष्टास सुरुवात झाली असावी.

संभाजीराजांनी महाराजांच्या अनुपस्थितींत रायगडावर आलेला इंग्रज वकील टॉमस निकोलस याची भेट दिनांक २४ मे १६७३त घेऊन त्याच्या तक्रारी ऐकून घेतल्या.[४] राजापूरच्या एका व्यापाऱ्याचे जहाज मुंबईकर इंग्रजांनी धरल्याची तक्रार संभाजीराजे यांजकडे आली तेव्हा ते जहाज सोडून देण्यासाठी मुंबईकर इंग्रजांना संभाजीराजांनी ऑगस्ट १६७३ मध्ये लिहिले.[५] इंग्रजांनी संभाजी महाराजांचा हुकूम मानला. शिवाजी

१ बेंद्रे, संभाजी चरित्र, पृ. ५०.

२ शि. च. प्र., पृ. ५२.

३ बेंद्रे, उपरोक्त, पृ. ५५.

४ कित्ता, पृ. ५५-५९.

५ कित्ता, पृ. ५६.

महाराजांनी इ. स. १६७२-७३ साली विजापूरकरांशी युद्ध सुरू केले. त्यांत संभाजीराजांकडे मुख्य कामगिरी देऊन त्याचे जोडीस अण्णाजी दत्तोस नेमिले. त्यावेळेपासून संभाजीराजांना पन्हाळ्यास राहणे भाग पडले. विजापूरकरांशी ज्या ज्या वेळी लढाईचे प्रसंग आले त्या त्या वेळी शिवाजी महाराजही पन्हाळ्यास राहत असत.

संभाजीराजे व मंत्री यांमधील कलहास सुरुवात :

राज्याभिषेकाच्या वेळी शिवाजी महाराज सिंहासनावर बसले. युवराज संभाजीराजे यांना सिंहासनाच्या पायरीवर बसविले. अष्ट प्रधानास डाव्या आणि उजव्या बाजूस उभे केले. राज्याभिषेकानंतर पहिल्याच मुहूर्तावर संभाजीराजे यांची मुंज झाली. दिनांक ६ सप्टेंबर, १६७५ रोजी सॅम्युअल ऑस्टीनने रायगडावर जाऊन शिवाजी महाराजांची भेट घेतली. याप्रसंगी संभाजीराजे शिवाजी महाराजांचे बाजूस बसल्याचे तो लिहितो.[१] शिवाजी महाराजांनी अंकोल्यापर्यंतचा प्रांत जिंकण्यासाठी आदिलशाहीतील फोंड्यावर चाल केली तेव्हा स्वारींत संभाजीराजे बरोबर होते. शिवाजी महाराजांनी फोंडा घेतल्यावर मराठी सैन्य संभाजीराजांच्या अधिपत्याखाली दिले. त्यांनी अथणी, रायबाग-भागानगर वरून पुन्हा गदगहुबळी केली व नंतर ते महाराजांस फोंड्यास भेटण्यास आले (ऑगस्ट १६७६). यानंतर महाराज युवराजांसह रायगडी आले.[२] आपल्या रायगडच्या वास्तव्यांत शिवाजी महाराजांनी राज्याच्या सुभ्यांच्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. उत्तर सरसुभा मोरोपंतांकडे, दाभोळ प्रभावळीचा सुपीक व्यापारी भाग अण्णाजी पंतांकडे व कुडाळ फोंडा सर सुभा दत्ताजी पंताकडे दिला. ह्यामुळे महाराजांनी मंत्र्यांच्या सांगण्यावरून आपणांस दूर कसे ठेविले हे युवराजांस दिसून आले ह्या वेळेपासून मंत्री आणि युवराज यांच्यामधील कलहास सुरुवात झाली.[३]

इ. स. १६७८ च्या एप्रिल महांत शिवाजी महाराज कर्नाटक स्वारीहून विजयी होऊन रायगडी परत आले.[४] कर्नाटकांत जिंजीसुद्धा मुलूख काबीज केला व तो मराठी राज्यात अंतर्भूत केला. रायगडी आल्यावर त्यांनी मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो आदी मंत्र्यांची बैठक बोलविली. त्या बैठकीत त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. " कर्नाटक राज्य

---

१ शि. च. प्र., पृ. २९, ऑस्टीन नॅरेटीव्ह, पृ. ७०.

२ प.सा.सं. क्र. १९०५.

३ बेंद्रे, संभाजी, पृ. ६४.

४ पवार, ताराबाईकालीन कागदपत्रे भाग १, ले. ३२०, पृ. ४८४.

रक्षिण्यासाठी पुत्र संभाजी यासारख्या योद्धयाकडे सोपवावा. राजाराम लहान, त्याला दूर ठेवणे योग्य वाटत नाही. एवढे बोलून महाराजांनी आपल्या विचारास मंत्र्यांची संमती मागितली. त्यावर मोरोपंत पिंगळे म्हणाले की, संभाजी राजास आम्ही महाराजांचा मुलगा म्हणून मान देतो. नमस्कार करावयास गेलो तर तो आमचा उपहास करतो. करांच्या बाबतीत संभाजीराजे प्रजेला सूट देतात त्यामुळे राज्याच्या महसुलांत तूट पडत आहे. एवढेच नव्हे तर संभाजीराजांचा मोगल सुभेदारांशी होत असलेला गुप्त पत्रव्यवहार महाराजांच्या कानी घातला. यवनाकडे जात असलेल्या युवराजास वेळीच ताळ्यावर आणले पाहिजे."[१] हे ऐकून महाराज दुःखी झाले त्यांनी संभाजीराजांस आदेश दिला की तू शृंगारपूर सोडून सज्जनगडास जा. "[२] महाराजांच्या आज्ञेनुसार संभाजीराजे दिनांक ३ नोव्हेंबर १६७८ च्या सुमारास सज्जनगडाला गेले.[३] तिथेही प्रजेची अनेक गाऱ्हाणी संभाजीराजांकडे येऊ लागली. विशेषतः स्थगित इनाम चालू करण्यासंबंधीची प्रकरणे संभाजीराजे यांजकडे आल्यावर जमीन महसूल कारभार पाहणारे मंत्री अण्णाजी दत्तो यांना ही प्रकरणे निकालात काढण्याचा हुकूम दिला. " संभाजीराजे प्रजेला येईल तशी सूट देतात.[४] ही सर्व मंत्र्यांनी आपल्याविषयीची महाराजांकडे केलेली तक्रार संभाजी राजांस समजली. इतक्यात संभाजीराजांस सज्जनगडावर त्या प्रांताच्या बंदोबस्तास पाठविले. ते संभाजीराजांस न मानवून ते ३ डिसेंबर १६७८ रोजी पारखे होऊन मोगल सरदार दिलेरखानाकडे गेले. परळी सज्जनगडावर जाण्यास सांगण्याचा महाराजांचा हेतू असा होता की रामदास स्वामी संभाजीराजांस चार हिताच्या गोष्टी सांगतील व कौटुंबिक कलह मिटेल. पण रामदास स्वामी सज्जनगडावर त्यावेळी नसल्यामुळे तसे झाले नाही. दिलेरखानाने संभाजीराजांस सप्तहजारी मनसब देऊन त्याचा सत्कार केला. आपल्या जवळ ठेविले. दिलेरखानाने शिवाजी महाराजांस शरण आणण्यासाठी युवराज संभाजीचा उपयोग करण्याचे योजिले. पण संभाजीराजे दिलेरखानाबरोबर एक वर्ष राहिले. ह्या मुदतीत शिवाजी महाराजांनी आपल्याकडील विश्वासू लोकांस गुप्तरीतीने संभाजीराजांकडे पाठविले, त्यांनी संभाजीराजांची हरप्रकारे समजूत घातली. चित्ती समाधान केले. तेव्हा संभाजीराजांनी मोगल छावणीतून पळ काढला व ते पन्हाळगडावर वडिलांस भेटावयास

१ शि. च. प्र., पृ. २९.

२ गोखले कमल, संभाजी, पृ. ५८.

३ कित्ता.

४ शि. च. प्र., पृ. २९, संभाजी शकावली, पृ. १००.

डिसेंबर १६७९ त परत आले. तेथे पितापुत्रांची भेट दिनांक १३ जानेवारी १६८० रोजी झाली.[१] महाराजांची एक मोठी काळजी दूर झाली. भेट झाल्यावर संभाजीराजांनी महाराजांच्या पायावर डोके ठेविले. महाराजांनी संभाजीराजांस जवळ बसण्याचा आग्रह केला. संस्कृतपटू संभाजीराजे विनयाने वडिलांपाशी बसले नाहीत. महाराज संभाजीराजांस म्हणाले, " लेकरा, मला सोडू नको. औरंगजेबाचा व आपला दावा. तुजला दगा करावयाचा होता. परंतु, श्रींने कृपा करून सोडून आणिला. थोर कार्य जाले. आता तू ज्येष्ठ पुत्र, थोर जालास आणि स्वतंत्र राज्य कर्तव्य हे तुझ्या चित्ती आहे असे आपणांस कळले. तर मजला हे अगत्य आहे. तरी तुजलाही राज्य एक देतो. आपले पुत्र दोघेजण एक तू संभाजी दुसरा राजाराम-ऐसियास- हे सर्व राज्य आहे. यास दोन विभाग करतो. एक चंदीचे राज्य, याची हद्द तुंगभद्रा तहद् कावेरी हे एक राज्य आहे. दुसरे राज्य तुंगभद्रा अलीकडे गोदावरी नदीपर्यंत राज्य आहे. ऐशी दोन राज्ये आहेत. त्यास तू वडील पुत्र. तुजला कर्नाटकचे राज्य दिधले. इकडील राज्य राजारामास देतो. तुम्ही दोघे पुत्र दोन राज्ये करणे. आपण श्रींचे स्मरण करून उत्तर सार्थक करीत बसतो. " असे बोलिले. तेव्हा संभाजीराजे बोलिले की, " आपणांस साहेबांचे पायाची जोड आहे. आपण दूधभात खाऊन साहेबांचे पायाचे चिंतन करून राहीन. " असे उत्तर दिधले आणि राजे संतुष्ट जाहले. मग पितापुत्र बैसुन कुलराज्य आपले देखिले.[२]

वर सांगितल्याप्रमाणे संभाजीराजांना भेटण्यास शिवाजी महाराज पन्हाळगडास आले त्यापूर्वी ते वीस हजार सैनिकांसह बऱ्हाणपूर जालना भागांतून चौथाई वसूल करीत होते. त्यांना संभाजीराजे पन्हाळगडी आले ही बातमी ते स्वारीवर जालन्याकडे असता मिळाली. तेव्हा केवळ संभाजीराजांच्या भेटीसाठीच तिकडील स्वारी सेनापतींवर सोपवून महाराज पन्हाळगडी आले. पन्हाळगडावर आल्यानंतरही महाराजांचे लक्ष त्याच आघाडीच्या कार्यावर लागले होते. शिवाजी महाराजांनी संभाजीराजांची भेट घेतली आणि पहिल्याच भेटीत शिवाजी महाराजांनी त्यांना पन्हाळा प्रांताची मोठी आणि महत्त्वाची सुभेदारी सांगितली आणि अण्णाजी पंतांस कारवारकडे पाठविले आणि आपले मायेचे आणि विश्वासाचे प्रतीक म्हणून मोगलांविरुद्ध लढयाची आपली खास जबाबदारी संभाजी राजांवर सोपविली. वीस हजार स्वार संभाजीराजांच्या ताब्यांत देऊन त्यांना बऱ्हाणपूर

१ सरदेसाई, शककर्ता शिवाजी, पृ. ३४२, शकावली, पृ. १०१.

२ सभासद बखर, पृ. ७७-७८.

व औरंगाबादेवर जाऊन महाराजांनी मोगलांविरुद्ध जी स्वारी चालू केली होती ती पुढे चालविण्याची आज्ञा केली. सोबत खास म्हालोजी घोरपडेचे पथक त्याच्या चाकरीस दिले. अशा रीतीने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांच्या दिलेरखानाविरुद्ध झालेल्या तत्कालीन मनःस्थितीचा फायदा घेतला. संभाजीराजांस ताबडतोब मोगली साम्राज्यावरील स्वारीचे अधिपत्य देऊन गौरव केला.[१]

त्याप्रमाणे संभाजीमहाराजांनी महाराजांच्या आज्ञेप्रमाणे २४ फेब्रुवारीनंतर वीस हजार सैनिकांसह बऱ्हाणपूरवर हल्ला चढविला. व्यापाऱ्यांकडून खंडणी गोळा केली हे काम त्यांनी मार्च १६८० मध्ये केले हे औरंगजेबास समजताच त्यास दुःख झाले असे काफीखान लिहितो.

मार्चमध्ये बऱ्हाणपूरचे मोहल्ले लुटण्याच्या कामी संभाजीराजे व्यग्र असता शिवाजी महाराजांनी राजारामाचे लग्न प्रतापराव गुजरच्या मुलीशी दिनांक १५ मार्च १६८० रोजी उरकून घेतले. ह्या लग्न समारंभास संभाजी महाराज रायगडावर नव्हते. तसेच ते पन्हाळगडावरही नव्हते. बऱ्हाणपुरावरील स्वारीत होते. असे असता माहितीच्या अभावी संभाजी चरित्र लेखक कमल गोखले, सदाशिव शिवदे व रियासतकार सरदेसाई म्हणतात की, संभाजीराजे राजारामाच्या लग्नाच्यावेळी पन्हाळ्यावर होते आणि त्यांना लग्नाचे आमंत्रण पाठविले नाही. संभाजीराजेंना बऱ्हाणपुराहून राजारामाच्या लग्नास मुहूर्त दिवशीं येणे शक्य झाले नाही ही वस्तुस्थिती होती. साधन माहितीअभावी संभाजी राजांस ते पन्हाळगडी असताही राजारामाचे लग्नाचे निमंत्रण पाठविण्यात आले नाही असे वर निर्देशिलेल्या संभाजी चरित्रकारांनी म्हटले आहे ते बरोबर नाही. संभाजी चरित्रकार वा. सी. बेंद्रे यांनी इंग्रज वखारवाल्यांच्या पत्रांच्या आधाराने संभाजीराजे राजारामाच्या लग्नाच्यावेळी शिवाजी महाराजांच्या आदेशावरून बऱ्हाणपुरवरील स्वारीत गुंतले होते. बऱ्हाणपुरची स्वारी आटोपून संभाजीराजे मार्च ८० च्या अखेरीस पन्हाळगडावर परतले असावेत असे प्रतिपादले. यावेळी स्वराज्यावर आदिलशाही मोगल व सिद्दी यांचे जोराचे आघात चालू असतानाच शिवाजी महाराजांचे दिनांक ३ एप्रिल १६८० रोजी देहावसान झाले.[२] त्यामुळे सेनापती हंबीरराव मोहिते यांनी संभाजीराजांस भेटून राज्यकारभार हाती घेण्यापूर्वीच त्यांना खांदेरीउंदेरीच्या लढाईकडे लक्ष देण्यास सांगितले. यावेळी संभाजी महाराजांनी सैन्याची व्यवस्था करून आपण स्वतः सिद्दीचे तोंडावर व आदिलशाही सरदारांवर जाऊन दक्षिण बाजू सांभाळली होती.[३]

१ बेंद्रे, छत्रपती राजाराम महाराज, पृ. २७.

२ शि. च. प्र., पृ. ३०.

३ बेंद्रे, संभाजी, पृ. १६३.

रायगडावरील घटना :

अशा प्रकारे संभाजी महाराज राज्य रक्षणाच्या कामी कार्यरत असता रायगडावर शिवाजी महाराजांचा अंत दिनांक ३ एप्रिल, १६८० रोजी झाला. ही बातमी शिवाजी महाराजांची पत्नी सोयराबाई व प्रधानमंडळी यांनी संभाजी राजांपासून लपवून ठेवली.

शिवाजी महाराजांचा मृत्यू व गृहकलह :

शिवाजी महाराज हयात असताना त्यांच्या पट्टराणी सोयराबाई ह्यांनी शिवाजी महाराजांच्या पश्चात आपला मुलगा राजाराम यास गादी मिळावी असा हट्ट महाराजांपाशी धरला होता. महाराजांनी आपली अंतिम इच्छा जाहीर केलेली नव्हती. शिवाजी महाराजांस एकदम आजार येऊन त्यांत त्यांची शुद्ध गेली असावी म्हणून त्यांना आपल्या पश्चात संभाजीराजांस राजा करावे असे मंत्र्यांस सांगणे शक्य झाले नसावे. शिवाजी महाराजांनी आपल्या अंतकाळी खालील उद्‌गार काढले असे सभासद लिहितो. “ राज्य म्यां शिवाजीने ४० हजार होनांचा पुणे महाल होता, त्यावरील एक कोटी होनांचे राज्य पैदा केले. हे गड, कोट व लष्कर पागा ऐसे मिळविले. परंतु मज माघारे हे राज्य संरक्षण करणार ऐसा पुत्र दिसत नाही. कदाचित धाकटा कुंवार राजाराम वाचला तर तो हे राज्य वृद्धीने पावेल. संभाजीराजे वडील पुत्र जाणता आहे. परंतु बुद्धी फटकळ आहे, अल्प बुद्धी आहे. यास काय करावे ? आपण तो प्रयाण करतो. तुम्ही कारकून व हुजरे मराठे कदीम या राज्यांतील आहां. तुम्हास या गोष्टी कळल्या असाव्या. ”[१] अशा रीतीने शिवाजी महाराजांनी वारसा हक्काचा प्रश्न अष्टप्रधान मंडळावर सोपविला.

संभाजीराजांचा हक्क डावलून आपला मुलगा राजाराम यास गादी मिळावी अशी सोयराबाईंची खटपट चालू होती. संभाजी महाराजांनी आपल्या वर्तणुकीने मंत्र्यांची मने दुखविली होती. अष्टप्रधानापैकी मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो, निराजी असे हे तीन मंत्री संभाजीराजांस गादीवर बसवू नये या मताचे होते. त्यांच्या दृष्टीने संभाजीराजे इ. स. १६७८ त मोगलांस जाऊन मिळाले आणि स्वराज्यातील किल्ले घेण्यास दिलेरखान यास मदत केली, म्हणून संभाजीराजे राष्ट्रद्रोही ठरले. शिवाय महाराजांचा अंत रायगडी चैत्र शु. १५ ला (इ. स. १६८० एप्रिल) शनिवारी दोन प्रहरी झाला. त्यावेळी संभाजीमहाराज हजर नव्हते. ही परिस्थिती लक्षात घेऊन रायगडावरील कारभारी मंडळीने महाराजांच्या मृत्यूबद्दल पन्हाळा येथे असलेल्या संभाजीराजांस बातमी लागू

१ गोखले, कलम संभाजी, पृ. ७३.

न देता शिवाजी महाराजांची उत्तर क्रिया दहा वर्षे वयाच्या राजारामाचा मुखत्यार म्हणून साबाजी भोसले शिंगणापूरकर या भोसले वंशीयांकडून करविली.

शिवाजी महाराजांच्या निधनानंतर रायगडावरील सर्व कारभाराची सूत्रे सोयराबाई हिने आपल्या हातात घेतली आणि हवालदार कान्होजी भांडवलकर आणि सरकारकून यांना रायगड किल्ल्याचा बंदोबस्त करावयास सांगितला.[१] हेतू हा की, आपला पुत्र राजाराम यास राज्यपदावर बसवावे.

राजारामास गादी मिळवून देण्याचे कामी अण्णाजी दत्तो याने पुढाकार घेतला. अण्णाजी दत्तो आणि संभाजीराजे यांचे वाकडे होते. म्हणून अण्णाजी दत्तो सोयराबाईंच्या पक्षास मिळाला व त्याने राजारामास मंचकारोहण करण्यासाठी इतर मंत्र्यांची संमती मिळविली. सोयराबाईने राजारामास दिनांक २१ एप्रिल १६८० रोजी गादीवर बसविले.[२]

शिवाजी महाराजांच्या मृत्यूची बातमी सोयराबाईंनी गुप्त ठेवण्याचा प्रयत्न केला होता तरी पन्हाळ्यास आलेल्या खंडू जासूदाकडून संभाजी महाराजांना सर्व बातमी समजली.[३] आपल्या विरुद्ध चाललेल्या कटाचा त्यांना सुगावा लागताच त्यांनी सेनापती हंबीरराव मोहिते यांना आपल्या बाजूस वळविले. राजापूर कुडाळकडील कमावीसदारांस पत्रे पाठवून पैका घेऊन पन्हाळ्यावर बोलाविले. कारवारच्या बंदरात धान्य होते ते त्यांनी आपणाकडे आणविले.[४]

सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या स्वामीनिष्ठेची परीक्षा :

शिवाजी महाराजांचा सर सेनापती प्रतापराव गुजर यांना २३ फेब्रुवारी १६७४ रोजी वीरमरण आले. त्यानंतर थोड्याच दिवसात दिनांक ८ एप्रिल १६७४ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांकडून हंसाजी मोहिते तळबीडकर यांना "हंबीरराव" या किताबतीसह "सरनौबतकीची" वस्त्रे दिली गेली. हंसाजी मोहिते सरनौबत (सरसेनापती) हंबीरराव मोहिते झाले. हंबीरराव मोहिते हे शिवाजी महाराजांची पट्टराणी सोयराबाई हिचे बंधू व राजारामाचे सख्खे मामा होते. राजारामास सत्ता प्राप्त झाल्यावर त्याला साथ देणारे अण्णाजी व मोरोपंत यांनी सरसेनापती हंबीररावांस मदतीकरता

१ सभासद बखर पृ. ८७, कमल गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. ७५.

२ शि. च. प्र., पृ. ३०.

३ बेंद्रे, संभाजी, पृ. १३०.

४ सरदेसाई, उग्रप्रकृती संभाजी, पृ. २३, त्रै. वर्ष. ९ अंक १, पृ. १४.

पत्र पाठविले. सदर पत्रांत सेनापतींना लिहिले की, आम्हाला मिळून राजारामाचा कार्यभाग साधावा. " सेनापतींनी धूर्तपणे उत्तर दिले ;" तुम्ही जेथे जेथे जाल तिथे मी आहेच. "[१] यानंतर युवराज संभाजीराजे यांजकडून आपल्याला येऊन मिळण्याचे पत्र सरसेनापतींना आले. कऱ्हाडच्या लष्करी छावणींत यावेळी हंबीररावांसोबत रंगोजी (रूपाजी) भोसले, आनंदराव व महादू भोपाळकर गुजर हे सेनानी होते.[२] येथे याप्रसंगी सरसेनापती हंबीररावाच्या स्वामीनिष्ठेची परीक्षाच होती. श्रींच्या राज्याचे अस्तित्व व कार्य त्यांच्या निर्णयावर अवलंबून होते.

शिवाजी महाराजांचे मृत्यूच्या वेळी औरंगजेब दक्षिणेवर चालून येण्याच्या तयारीत होता. त्याच्या वार्ता हरघडी समजत होत्या. अशा अवस्थेत स्वराज्याचे रक्षण बाळ राजारामाच्या हातून होईल की नाही हाच खरा प्रश्न होता. सैन्यास व लोकांसही या संकटकाळांत संभाजीराजाच हवा होता. हे सरदारांच्या पन्हाळगडाकडे संभाजी राजांच्या भेटीसाठी लागलेल्या रांगेवरून स्पष्ट होते. हंबीररावांनी ह्या सर्वांचा विचार करून स्वराज्याचे हित डोळ्यापुढे ठेवून संभाजीराजांना साथ देण्याचे ठरविले. अण्णाजी, मोरोपंतासहित, स्वतःच्या बहिणीच्या-महाराणी सोयराबाईंच्या पक्षास साथ देण्याचे नाकारले. स्वतःचा सख्खा भाचा बाळ राजाराम याच्या हाती या निर्नायकी अवस्थेत राज्य सुरक्षित राहणार नाही, हे जाणून संभाजी राजांचे पाठीमागे स्वराज्याचे सैन्यबळ उभे केले. इकडे अण्णाजी दत्तो व मोरोपंत पिंगळे रायगडाचा बंदोबस्त करून पन्हाळ्यावर चाल करून जाऊ लागले. हे संभाजीराजांस समजताच त्यांनी हंबीरराव मोहिते यांना त्याजवर पाठवून दोघांसही कैद करून पन्हाळगडावर आणविले.[३]

रायगडावरील उपक्रमांत अण्णाजी दत्तो पुढारी होता, त्याचे पायात जड बेड्या घातल्या आणि ते व मोरोपंत या दोघांसही पक्क्या बंदोबस्ताने अटकेत ठेविले.[४] यावेळी सैन्य व प्रजा संभाजी महाराजांचे बाजूस होती.

नंतर वीस हजार सैनिकांच्या फौजेसह संभाजीराजांनी रायगडकडे कूच केले आणि दिनांक १८ जून रोजी रायगड ताब्यात घेतला. राजाराम राजे आणि त्यांची आई सोयराबाई

---

१ पवार जयसिंगराव संपादित संभाजी स्मारक ग्रंथ, पृ. ३५४-३५६.

२ मोडक ज. बा. (सं.) मराठी साम्राज्याची छोटी बखर, पृ. ५०.

३ शिवचरित्र प्रदीप, पृ. ३०.

४ मराठी रियासत, उग्रप्रकृती संभाजी, पृ. २३.

यांना नजरकैदेत [१] ठेवल्यानंतर २० जुलै रोजी संभाजी महाराजांनी विधिपूर्वक मंचकारोहण केले. तसेच संभाजी महाराजांनी कोकणात राजापूर येथे आपल्या नव्या सुभेदाराची नेमणूक केली.[२]

संभाजी महाराजांचे राज्यारोहण :

मोरोपंत व अण्णाजी आपल्या लोकांनिशी रायगडाहून पन्हाळ्याकडे निघाल्यानंतर लवकरच रायगडावर सरनौबत व नायकवाडी यांनी १६ मे रोजी किल्ला ताब्यात घेऊन फितुरीतील लोकांना कैद केले व आपले चौकी पहारे बसविले.[३] त्यानंतर संभाजीराजांचा सासरा पिलाजी शिर्के यांनी संभाजी महाराजांची अनुज्ञा मिळवून १५,००० स्वारांसह येऊन रायगडचा बंदोबस्त केला.[४] एवढ्यांत पन्हाळगडावरून निघून संभाजी महाराज दिनांक १० जूनला रायगडला पोचले. त्याच दिवशी दरबार भरवून राज्यकारभारास प्रत्यक्ष प्रारंभ केला. परत आल्यावर संभाजीराजे यांनी सोयराबाई व दुसऱ्या तीन मातांचे सांत्वन केले असे परमानंद स्पष्ट लिहितो. संभाजी रायगडी आल्यानंतर परत क्रियाकर्म केले व दानही दिले. त्यानंतर २७ जून रोजी शिवाजी महाराजांची पत्नी पुतळाबाईंने अग्निप्रवेश केला. संभाजीराजांच्या राज्याभिषेकाचा समारंभ दिनांक १४ ते १६ जानेवारी १६८१ या तीन दिवसांत संपला. या शिवाय तुलादान विधी, प्रथम प्रतापगड येथील कुलस्वामीनीचे पूजन व शेवटी भोजन समारंभ झाले. अशा रीतीने पहिले गडबडीचे वातावरण लवकरच निवळले. हिरोजी फर्जंद व अण्णाजी दत्तो यांसही कैदैतून सोडून संभाजी महाराजांनी त्यांच्या पूर्वीच्या जागी नेमणुका केल्या. मात्र मोरोपंत पिंगळे त्याच साली म्हणजे इ. स. १६८० च्या ऑक्टोबरात मृत्यू पावले. त्यांचे जागी त्याचा पुत्र निळोपंत यांची नेमणूक केली. संभाजी महाराजांनी अण्णाजी दत्तो यांनाही बंधनमुक्त केले. पण त्यांना पूर्वीचे सचिव पद न देता अमात्य किंवा मुजूमदार म्हणून नियुक्त केले.[५] शिवछत्रपतींच्या अष्टप्रधान मंडळात प्रल्हाद निराजी न्यायाधीश होते. ते पद त्यांच्याकडे चालू ठेविले. तसेच मोरेश्वर रघुनाथ हे शिवाजी महाराजांच्या वेळी पंडितराव

१ भा. इ. सं. मं. प्र. श. १८३४, पृ. २१६.

२ संभाजी पत्र सार संग्रह, पृ. १०२.

३ ऑर्म, पृ. १२१.

४ अनुपुराण अ. १६ बेंद्रे, संभाजी, पृ. १५६.

५ जेधे शकावली, शिवचरित्र प्रदीप, पृ. ३१.

पदावर होते. त्याच पदावर त्यांची नव्याने नेमणूक केली.[१] सेनापती किंवा सरनौबत हंबीरराव मोहिते संभाजीराजांच्या आपत्काळात पाठीराखे राहिले. संभाजी महाराजांनी त्यांनाच सेनापती पदावर कायम केले.[२]

अल्पावधीत आपल्याला मिळालेल्या ह्या यशाबद्दल कृतज्ञतेने त्यांनी कुलदेवता भवानी देवीस वर्षाला दहा हजार सुवर्ण होन वर्षासन देण्याची तरतूद केली.[३]

दिनांक १६ जानेवारी १६८१ रोजी संभाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा औपचारिक सोहळा पार पडला.

मल्हार रामराव चिटणीस सांगतो, " माघ शुद्ध गुरुवार शके मजकुरी यास (संभाजी) राज्याभिषेक होऊन सिंहासनारुढ जाले. तोफा करविल्या. तो सूर्यदर्शन व्हावे ते अस्तमानपर्यंत अभ्र येऊन न जाले. सिंहासनावरून उठोन रथावर बसले. तेथून काळपुरुष मारावा म्हणून निघाले तो मार्गी रथ मोडला. तसेच जाऊन काळपुरुष मारून, बाजाराचे बाहेर जाऊन, हत्तीवर स्वार होऊन मिरवत समारंभे करून महालात आले. तेथून यज्ञशाळा केली (होती) तेथे कबजीचे सांगण्यावरून सोने, रुपे, तांबे, पितळ, लोखंड, कापूस, तेल, मीठ, सुपारी, नारळ, गूळ, साखर, अठरा धान्ये (यांच्या) तुला केल्या. अष्टप्रधान यांचे सन्मान वस्त्रे अलंकार देऊन, ब्राह्मण तीस चाळीस हजार जाले. त्यास दक्षणा देऊन ब्राह्मण भोजन करविले. तेव्हा दक्षणेचे दाटीत काही ब्राह्मणही मेले. गुणी गायक यांसही द्रव्य बहुत देऊन संतोषित केले. ते समयी अष्टप्रधान जाहले ते पूर्वीचे होते तेच."[४]

मराठी राज्यावर चोहोंकडून आलेली संकटे :

संभाजी महाराज रायगडी सिंहासनाधिष्ठित झाले. त्यांनी अष्टप्रधानांच्या नेमणुका केल्या. लगेच संभाजी महाराजांना निकालात काढण्यासाठी दोन कट रचले गेले. पहिला कट संभाजी महाराजांस अन्नातून विष देण्याचा. मुंबईकर इंग्रज या कटाबद्दल ३० ऑगस्ट १६८१ ला माहिती देताना लिहितात ; " संभाजीराजा प्राणावरील मोठ्या संकटांत सापडला होता. त्याच्या जेवणातील मत्स्यान्नाचे पोटी घातलेल्या विषाने तो मरायचाच, परंतु त्याच्या अल्पवयी नोकराने त्यांना जेवण्यापासून थांबविले. तेव्हा त्यातील काही

---

१ जोशी, प. स. छत्रपती संभाजी, पृ. १२४.

२ सरदेसाई, उग्रप्रकृती संभाजी, पृ. ३३.

३ सरदेसाई न्यू हिस्टरी ऑफ मराठा भाग २, पृ. २९४.

४ म. रा. चि. ब., पृ. ९.

भाग नोकरांपैकी एकाला व कुत्र्याला देवविला. दोघेही थोड्याच तासात मेले. संभाजीराजांनी ह्या कटाचा छडा लावताच त्यांस असे समजले की, हा कट अण्णाजी दत्तो, केसोपंडित प्रल्हाद पंडित यांनी केला. लागलीच ह्या सर्वांना शृंखला ठोकविल्या. हा कट पन्हाळ्यावर झाला होता.[१] आता त्यानंतरच्या कटासंबंधीची माहिती देऊ.

औरंगजेबपुत्र अकबर पालीस असताना अण्णाजी दत्तोचे पक्षपाती लोक अकबराला भेटले. कटाचा उद्देश संभाजीस ठार करून राजारामाला गादीवर आणणे हा होता. रॉबर्ट आर्म याविषयी लिहितो. " कटातील मंडळी संभाजी आणि अकबर यांची भेट होण्यापूर्वीच अकबरला भेटली. संभाजीराजांस मारण्याच्या कटात अकबर सहकार्य देण्यास तयार असेल तर ही मंडळी राज्याचा मोठा हिस्सा त्याला देऊन राजारामाला लहान भाग ठेवण्यास तयार झाली होती."[२] यावरून शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झालेली ही माणसे व्यक्तीद्वेषाने वेडी होऊन आपले इप्सीत साधण्यासाठी शिवाजी महाराजांनी मोठ्या कष्टाने मिळविलेल्या स्वराज्यावर पाणी सोडण्यास तयार झाली. हे पत्र अकबरास मिळताच त्याने दुर्गादास यास सल्ला विचारला. तेव्हा त्याने अकबरास सल्ला दिला की, तू ते पत्र संभाजी महाराजांच्या हवाली करून आपले इमान व कृतज्ञता दाखव." त्याप्रमाणे अकबराने ते पत्र संभाजी महाराजांकडे पाठविले.

संभाजी महाराजांनी हे पत्र आपली सुज्ञ पत्नी येसूबाईस दाखविले आणि तूच काय करायचे ते सांग असे तिला विचारले. राज्याच्या व राजाच्या जिवावर उठलेल्यांना पकडून योग्य ते शासन द्यावे असे तिने सांगितल्यावर अण्णाजी दत्तो, बाळाजी प्रभू, सोमाजी दत्तो आणि हिरजी फर्जंद यांना कैद करून ठार मारले. काहींना हत्तीच्या पायी देऊन मारले. शामजी नाईक कर्नाटकात पळून गेला होता. त्यास कैद करविले. कटात सापडलेल्या आणखी २० जणांना ठार मारण्यात आले. कटाची मुख्य सूत्रधार सोयराबाई हिने पश्चात्तापाने दग्ध होऊन विष प्राशन करून मृत्यूस कवटाळले.[३]

अशा रीतीने संभाजी महाराजांनी कटाद्वारे स्वराज्यावर आणि आपल्यावर आलेल्या संकटांना धैर्याने तोंड दिले ; आणि सर्व प्रश्न धैर्याने सोडविले.

□□

१ बेंद्रे, संभाजी महाराज, पृ. १९०.

२ रॉ. आम, हिस्टॉरिकल फ्रेगमेंटस् ऑफ द मोगल एम्पायर, पृ. १०५.

३ गोखले, कमल शिवपुत्र संभाजी, पृ. ८९.

२९. संभाजी महाराज व शहाजादा अकबर

शहाजादा अकबर हा औरंगजेब बादशहाचा चौथा मुलगा. त्याचे आणि औरंगजेबाचे बिनसल्यावरून तो संभाजी महाराजांचे साहाय्य घेण्यासाठी दक्षिणेस आला. अकबर आणि संभाजी महाराज एकाच वयाचे, अकबराची आई त्याच्या लहानपणीच निवर्तल्यामुळे औरंगजेबाने त्याचे लाड केले, त्यास राजकारणाचे धडे दिले ; त्याला वयाच्या सतराव्या वर्षी सरदारकी दिली. काबूलला असद खानाबरोबर पाठविले. माळवा, मुलतानाच्या, सुभेदारीवर नेमणुका केल्या.[१] बापाच्या मर्जीप्रमाणे वागून हरेक कामात फत्ते मिळवून त्याने बाहेरचा लौकिक व बापाचा विश्वास संपादिला.

इ. स. १६७९ साली घडलेल्या राजकीय घटनामुळे अकबर व औरंगजेबाचे बिनसले. राजपूत राज्ये खालसा करण्याचा विचार औरंगजेबाचा होता. त्यानुसार जोधपुरचा राजा जसवंतसिंग निवर्तल्यावर औरंगजेबाने ते राज्य खालसा करण्यासाठी आपला अत्यंत आवडता मुलगा अकबर यास स्वारीवर पाठविले.

या युद्धाचे प्रयोजन औरंगजेबास मारवाडचा रजपूत राजा जसवंत सिंह याचे राज्य खालसा करावयाचे होते. जसवंत सिंह अफगाणास्थानात कामगिरीवर असता तो ता. १० डिसेंबर १६७८ रोजी मरण पावला. त्याचा मोठा मुलगा जयसिंह अगोदरच युद्धात मेला असल्यामुळे त्याला मुलगा नव्हता. पण त्याचे भावाचा नातू इंद्रसिंह गादीचा वारस होता. त्यास राज्य न देता मारवाडचे राज्य खालसा करण्यासाठी औरंगजेबाने लगेच फौजा रवाना केल्या आणि मागाहून युद्धाची व्यवस्था पहाण्याकरिता आपण स्वतः अजमीरास जाऊन राहिला. जसवंतसिंह मरण पावला तेव्हा त्याच्या दोन राण्या गरोदर होत्या. त्या अल्पावकाशात प्रसूत होऊन त्याना पुत्र झाले. पैकी एका मुलाचे निधन झाले. दुसरा मुलगा मोठा झाला. त्याचे नाव अजितसिंह. या अजितसिहांस मारवाडची गादी मिळवून देण्याचा उद्योग जसवंत सिंहाचा दिवाण गजकर्ण म्हणून होता त्याचा

---

१ सरदेसाई, उग्रप्रवृत्ती संभाजी, पृ. २६-२७.

मुलगा दुर्गादास याने अंगावर घेतला. या अजितसिंहाचा बचाव करून त्यास मारवाडात आणून गुप्त जागी ठेविले. सर्व राजपूत राजांस सामील करून घेऊन दुर्गादासने दोन वर्षे औरंगजेबाच्या फौजेशी लढा दिला. राजपूत सैन्य डोंगरकपारीत आश्रय घेऊन मोगली सैन्यावर हल्ले करून त्यास हैराण करीत असे. तेव्हा आपला निभाव लागणे कठीण आहे अशी खात्री अकबराची झाली. अशावेळी रजपुतांनी समेटाची बोलणी करण्यास आपला वकील अकबराकडे पाठविला. राजपुतांनी अकबरास समजाविले की, बादशाहीला यत्किंचित इजा पोचविण्याची आमची इच्छा नाही. आमच्या राज्यांचा अपहार करू नये म्हणजे आम्ही पूर्वापार रिवाजांप्रमाणे बादशहाची सेवा निष्ठेने करू. हे अकबरास पटले.

आपला निभाव त्यांच्या समोर लागत नाही तेव्हा युद्ध थांबवून सलोखा करा असे पत्र अकबराने औरंगजेबास तो अजमेरला असता पाठविले. औरंगजेबास अकबराचा राग आला. त्याने त्याची अवहेलना व निर्भर्त्सना केली. ती त्यास झोंबली आणि त्याचे मन बिथरले. राजपुतांच्या हे लक्षात येताच जसवंतसिंगाच्या दिवाणाचा मुलगा दुर्गादास याने अकबरास बापाविरुद्धच्या उठावास साहाय्य करण्याचे ठरविले. इ. स. १६८१ त अकबराने औरंगजेब अजमेरला असता त्याजवर राजपुतांच्या साहाय्याने चाल केली. हा कठीण प्रसंग औरंगजेबाने केवळ कपट विद्येच्या बळावर निभावून नेला. राजपुतांना खोटे पत्र पाठविले. राजपुतांना कपटनीतीने औरंगजेबाने अकबरापासून फोडले.[१] अकबर एकटा पडला. त्यास पकडण्याकरिता औरंगजेबाने दुसरा मुलगा शहजादा मुअज्जम यास पाठविले. मुअज्जमच्या सैन्याने अकबराचा पाठलाग चालू ठेविला. अकबराबरोबर दुर्गादास राठोड होता. तेव्हा सैन्याचा पाठलाग चुकविण्यासाठी दोघांनी दक्षिणेत संभाजीराजांकडे जावयाचे ठरविले आणि ते बागलाणांतून महाराष्ट्रात आले.[२] नाशिकावरून त्रिंबकच्या घाटाने ते कोकणात पोहचले.[३]

अकबराचे मराठी राज्यात आगमन :

अकबराने नर्मदा नदी ओलांडल्यावर दोन पत्रे संभाजी महाराजांस लिहिली. ह्या दोन्ही पत्रांना संभाजी महाराजांनी उत्तर देण्याचे टाळले. त्या पत्रात राजपुत्र अकबराने संभाजी महाराजास लिहिले की, बादशहा औरंगजेबास तख्तावरून खाली काढण्याच्या

१ वेंद्रे, छत्रपती संभाजी महाराज, पृ. १७८

२ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी, पृ. १८१-१८४

३ खोबरेकर (संपादक), तारीख इ. दिलकशा, पृ. १३१-१३२.

कामात आपण मला मदत करावी.[१] अकबर मराठी मुलखात शिरताच त्याला आणण्यासाठी संभाजी महाराजांनी काही लोक पाठविले. त्याला १ जून १६८१ रोजी उत्तर कोकणात रायगडाच्या उत्तरेस २५ मैलांवर नागोठण्यानजीक पाली गावी आणिले. अकबराजवळ ४०० घोडे, २५ उंट आणि थोडे पायदळ होते. अकबराचे लोक त्याला बादशहा म्हणून मुजरा करीत असत.[२] अकबर जूनच्या सुरुवातीस म्हणजे पावसाळ्याच्या तोंडावर येऊन संभाजी महाराजांचा पाहुणचार घेऊ लागला. या ठिकाणास पुढे पातशहापूर असे नाव पडले. संभाजी महाराजांनी आपले प्रतिनिधी म्हणून हिरोजी फर्जंद व नेताजी पालकर यांना अकबराकडे पाठवून दिले. तसेच राजधानीत अकबराच्या संरक्षणाकरिता ३०० हशम ठेवण्याची व्यवस्था केली.

पाली येथे अकबराला लागणाऱ्या धान्य सामुग्रीचीही व्यवस्था करण्यात आली. पाली येथे अकबराने बादशाही थाटाचे वर्तन ठेविले. तो दरबार भरवी. लोकांच्या तक्रारी निवारण करी. ह्या वागणुकीमुळे संभाजी महाराजांच्या मनात अविश्वास उत्पन्न झाला. तेव्हा राजे यांनी अकबरास कळविले की, " माझ्या राज्यात तुम्हास राहणे असेल तर फौज वगैरे वाढवू नका. नाहीतर दुसरीकडे निघून जा " संभाजी महाराज अकबरास खर्चासाठी दररोज ६० होन (रु. ३००) तनखा देत असत.[३]

ऑगस्ट १६८१ मध्ये प्रधानमंडळातील काही प्रमुख मंडळींनी अकबरास भेटून संभाजी महाराजांस गादीवरून पदच्युत करण्यासाठी आणखी एक कट केला, हे पहिल्या प्रकरणात सांगितले आहे. अकबर पालीस असता त्याला संभाजी महाराजांच्या विरुद्ध असलेल्या मंडळींचा प्रतिनिधी भेटला व त्यास पत्र दिले. पत्रातील आशय असा : संभाजीराजांस मारण्याच्या कटात अकबर सहकार्य देण्यास तयार असेल तर ही मंडळी राज्याचा मोठा हिस्सा त्याला देऊन राजारामाला लहान भाग ठेवण्यास तयार झाली होती.[४] हे पत्र अकबरास मिळताच त्याने दुर्गादासच्या सल्ल्यावरून ते पत्र संभाजीराजांच्या हवाली केले. हे पत्र संभाजी महाराजास मिळाल्यावर अकबराने दर्शित केलेल्या मित्र भावाबद्दल त्याचे आभार मानले.[५]

---

१ खोबरेकर (संपादक), तारीख इ. दिलकशा, पृ. १३२.

२ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. ९८.

३ सरदेसाई, उ. संभाजी, पृ. २८

४ भारतवर्ष मासिक पंतप्रतिनिधीची बखर, पृ. २७
गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. ८९

५ पवार (सं) ताराबाईकालीन कागदपत्रे भाग १ क्र. ३२२, पृ. ४७०
मनुची, स्टोरिया द मुघल, भा. २, पृ. २५७-५८.

संभाजी महाराजांस आपल्या विरुद्धच्या कटाची बातमी अकबराकडून समजली म्हणून त्यांना अकबराविषयी विश्वास उत्पन्न झाला. आपल्या विरुद्ध कट करणाऱ्यास शासन केल्यानंतर संभाजी महाराज दिनांक १३ नोव्हेंबर १६८१ रोजी पातशहापूर (धोडसे) येथे अकबराची भेट घेण्याकरिता गेले. गजापूर येथे महाराजांनी कवी कलश यांस बरोबर घेऊन अकबराची भेट घेतली.[१] अकबराच्या बरोबर दुर्गादास राठोडही होता. दोघांनी एकमेकांचा सन्मान केला.[२] आणि तेथून रायगडावर परतले.[३] औरंगजेब बादशहास आपला मुलगा अकबर दक्षिणेस संभाजीच्या आश्रयास गेल्याचे समजल्यापासून बादशहा अस्वस्थ झाला. अकबर आणि संभाजी यांनी एकत्र येऊन मोगल राज्यावर हल्ला केल्यास आपल्या राज्यास व जीवितास धोका पोचेल हे त्याच्या लक्षात आले. ह्या बिकट परिस्थितीतून मार्ग काढण्यास एकच उपाय औरंगजेबाला दिसला. त्याच्या मते दक्षिणेस कूच करून संभाजी व अकबर ह्या दोघांचा नाश करणे. त्याप्रमाणे त्याने राजपुतांशी तह करून दक्षिणेत स्वारी करण्याचे ठरविले. त्यासाठी प्रचंड सैन्य जमा केले. शहाजादे आणि अनुभवी सरदार बरोबर घेतले. दिनांक ८ सप्टेंबर १६८१ या दिवशी बादशहाने अजमेरहून दक्षिणेस जाण्यासाठी कूच केले. तत्पूर्वी त्याने आपला पुत्र मुअज्जम व सरदार चिनाकुलिजखान यांची दक्षिणेत रवानगी केली.[४] दिनांक १३ नोव्हेंबर १६८१ रोजी औरंगजेब बादशहा आपल्या प्रचंड सैन्यासह बऱ्हाणपुरास पोचला. १६८१ च्या अखेरीस त्याने आपल्या प्रमुख सरदारास मराठी राज्याच्या सरहद्दीवर चढाई करण्यासाठी रवाना केले. तसेच अकबरास पकडण्यासाठी सिद्दी, पोर्तुगीज आणि कर्नाटकचे खार्यी देसाई पालेगार यांचे सहकार्य मिळविण्याची खटपट केली. ह्या खटपटीत यश येऊन सिद्दीही मोगलांचे अधिकारी बनले आणि पोर्तुगिजांनी औरंगजेब बादशहास सर्व प्रकारचे साहाय्य केले.

संभाजी महाराजांनीसुद्धा मोगली आक्रमणास तोंड देण्याची जय्यत तयारी केली. शहाजादा अकबरासह संभाजी महाराजांनी सिद्दीविरुद्ध चालू असलेली मोहीम जास्त निकराने चालू ठेविली. शहाजादा अकबरासह संभाजी महाराजांनी सिद्दीच्या दंडाराजपुरीला १६८१ च्या अखेरीस वेढा घातला. याच सुमारास औरंगजेब सरदार हसनवलीखान

१ मनुची, स्टोरिया द मुघल भाग २, पृ. २४१.

२ शि. च. प्र., पृ. ३०-४७

३ पवार (ताराबाईकालीन पत्रे खंड १), पृ. ४४७.

४ सरकार, जदुनाथ मासिर-३५ आलमगिरी, पृ. १३०-१३२.

कोकणात उतरल्याने संभाजी महाराज आणि अकबर जंजिऱ्याच्या वेढ्यातून कल्याणला परत गेले.[१] संभाजी महाराजांना औरंगजेबाच्या सामर्थ्याची जाणीव होती. तो दक्षिणेत व उत्तरेत युद्ध आघाड्या एकाचवेळी उघडून दोन्ही आघाड्यांवर लढण्यास समर्थ होता. अकबराचे टुमणे संभाजी महाराजांच्या मागे सारखे होते. तेव्हा संभाजी महाराजांनी जयसिंग पुत्र रामसिंग याजशी पत्रव्यवहार केला. राजपुतांनी हिंदुधर्म रक्षणासाठी औरंगजेबाशी लढत द्यावी असा उपदेश त्यांनी राजपुत राजेराजवाड्यांना केला. पण राजपुत औरंगजेबाच्या विरोधात जाऊन त्याबरोबर लढण्यास तयार होईनात. तेव्हा एकट्याने एवढ्या प्रचंड शक्तीशी टक्कर देणे योग्य नाही, त्यात आपला नाश आहे हे संभाजी महाराजांनी जाणले आणि अकबराच्या नादी लागून नसते धाडस करण्याचे सोडून दिले.[१]

१६८२ सालच्या १३ नोव्हेंबर रोजी अखेरीस संभाजी महाराज अकबरास भेटले. या भेटीत संभाजी महाराजांनी अकबरास आपल्या मुलुखातून समुद्रमार्गे अहमदाबादच्या बाजूने राठोडांच्या मुलखात पाठविण्याचे ठरविले होते. ही बातमी औरंगजेबाला समजताच त्याने गुजराथेतील सुभेदार व ठिकठिकाणच्या फौजदारांना अकबरास पकडण्याचे हुकूम दिले.[२]

या भेटीनंतर अकबर तिकोना येथे थांबला. परंतु त्याला तेथील हवामान मानवले नाही. म्हणून त्यास जैतापूरला ठेवण्यात आले. तेथीलही हवा त्याला मानवली नाही.[३]

ह्यावेळी औरंगजेबाने दक्षिणेत येऊन आपल्या सैन्याकरवी मराठ्यांच्या सर्व गडांना वेढे दिले. इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी यांना मराठ्याविरुद्ध उठविले. ह्या परिस्थितीस तोंड देण्याची पराकाष्ठा संभाजी महाराज आपल्या परीने करीत होते. त्यांना स्वरक्षणासाठीचा मार्ग सोडून अकबराच्या म्हणण्याप्रमाणे वागणे शक्य नव्हते. अशा परिस्थितीत १६८२ च्या अखेरीस खालील प्रसंग घडला. त्यामुळे संभाजी आणि अकबर यांचे संबंध दुरावले. याचवेळी अकबर व औरंगजेब पत्रव्यवहार चालू असल्याचे संभाजी महाराजांस समजले. औरंगजेबाने लिहिले की " मी तुझ्या येण्याची आतुरतेने वाट पहात आहे. त्या पत्राबरोबर तुझ्यासाठी सोने, नाणे व जड-जवाहीरही पाठविले आहे."

१ गोखले, कमल शिवपुत्र संभाजी, पृ. १०२.

२ अखबरात ३-२-१६८२ (गोखले, शिवपुत्र, पृ. १०६).

३ अखबरात १३-९-१६८२.

इ. स. १६८२ च्या अखेरीस एका हिंदू गायिकेला अकबराने मुसलमान करून आपल्याजवळ रखेली म्हणून ठेविले होते. संभाजीराजे यांनी दिलेली माळ आणि इतर काही वस्तू अकबराने त्या गायिकेल्या दिल्या. आपण दिलेली माळ एका रखेलीस दिल्याचे संभाजी महाराज यांना समजताच त्यांनी तो राजांचा अपमान आहे असे मानले व अकबराने माळ रखेलीस दिल्याच्या कृत्यास नापसंती दर्शविली. तेव्हा अकबराने उत्तर पाठविले की, "मी बादशहा आहे. माझ्या मनासारखा मी वागेन."[१] हे उत्तर येताच संभाजी महाराजांनी अकबराच्या दिमतीस दिलेली २००० घोडदळ आणि २००० पायदळ परत बोलाविले. खर्चाची रक्कम देणे बंद केले. त्यामुळे अकबर फारच निराश झाला.[२]

संभाजी महाराज आपल्याकडे ठराविक मर्यादेपलीकडे लक्ष द्यावयास तयार नाहीत हे अकबराच्या ध्यानी आले. मोगल मुलखात जावे तर औरंगजेबाचे अधिकारी आपल्याला अटक करणार तेव्हा त्याने गोव्यास पोर्तुगिजांकडे जाण्याचा विचार केला आणि डिसेंबर १६८२ त तो पालीहून निघून बांदा या गावी जाऊन राहिला. या दरम्यान संभाजी महाराजांनी गोवा पोर्तुगिजांबरोबर लढाई सुरू केली होती. त्यावेळी अकबराने पोर्तुगीज आणि मराठे यांचे दरम्यान तह घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

दिल्लीच्या ऐशआरामी वातावरणात वाढलेल्या अकबरास महाराष्ट्रातील डोंगराळ भागातील गवताच्या झोपडीत राहून जिणे जगणे मुश्कील झाले व तो कंटाळून गेला. त्याच्या हालचालींवर संभाजी महाराजांची कडक नजर होती. अकबर, संभाजी महाराजांस कविकलुशाबद्दल प्रशंसोद्गार काढून पत्रे लिहीत होता. अकबराचा काही पत्रव्यवहार मॉडर्न रिव्हूमध्ये सर जदुनाथ सरकार यांनी प्रसिद्ध केला आहे तो वाचण्यासारखा आहे. कविकलशाला दिनांक १३ मार्च १६८२, १८ ऑगस्ट १६८२ व ११ सप्टेंबरची पत्रे सारांशरूपाने रियासतकार सरदेसाई यांनी संभाजी रियासतींत (१९७६ ची आवृत्ती) पृ. ७०-७१ वर दिली आहेत. त्यानंतर संभाजी महाराजांस अकबराने लिहिले की कविकलश हे तुमचे फार उत्कृष्ट व विश्वासू नोकर आहेत. त्यांजबद्दल तुमच्या इतर प्रधानास वैषम्य न वाटो म्हणजे झाले. तुमच्या लिहिण्यावरून तुम्ही खेळणा किल्ल्यांकडे गेला आहात असे मी समजतो. तुमची इच्छा असेल तर मीही तुम्हांस येऊन मिळतो. तदनंतर त्याने कविकलश यास लिहिले आणि आपण साखरप्याहून निघून तुम्हांस भेटण्यास येतो असे सांगितले.

---

१ असे होते मोगल, पृ. २११.

२ अखबंरात १७-२-१६८३.

आपली इतर मुले व नातवंडे मिळून त्या सर्वांनी आपल्या विरुद्ध बंड करून उठू नये म्हणून औरंगजेब अकबरास चुचकारत होता. त्यास ममतापूर्वक पत्रे लिहीत होता. येण्याचा आग्रह त्याला करीत होता. कुराणाच्या नावाने अकबरास बादशहाने वचन दिले की मी तुला कोणत्याही प्रकारचा त्रास देणार नाही. पण अकबरास बापाची कृष्णकृत्ये ठाऊक होती. त्याने अंगी नम्रता व आज्ञाधारकपणा दाखवून बादशहास गोड-गोड पत्रे लिहिली. बादशहाने अकबरला खर्चास पुष्कळ सोने-नाणे पाठविले आणि तो पुत्राच्या प्रत्यागमनाची वाट पाहू लागला. अकबराने आपल्या बापाकडून पैसा उकळून आपल्या खर्चाची बऱ्याच दिवसांची बेगमी केल्यावर त्याने बादशहास पत्र पाठविले की मी बादशहाकडे नक्कीच येणार आहे, तो एका हातात तलवार उपसून व आपल्या जीवावर उदार होऊन तुम्हास ठार करून हिंदुस्थानच्या पातशाहीवर विराजमान होण्याकरता येईन. तेव्हा बादशहास कळून चुकले की अकबर आपल्याला येऊन भेटत नाही. म्हणून संभाजीच्या भोवतालील जहागिरदारांस पत्रे पाठवून अकबरास धरण्याकरिता किंवा मारण्याकरिता लिहिले होते. औरंगजेबाने गोव्याचा व्हाईसराय फ्रन्सिस्को द तर्वारा कोंद-द-अलबोर यास लिहिले संभाजी गोव्यावर स्वारी करील तेव्हा आम्ही मदत करू. मात्र संभाजीबरोबर आपला मुलगा अकबर आहे त्यास पकडा किंवा मारून टाका.

संभाजी महाराजांनी गोव्यावर स्वारी केल्यावर गोव्याचे पोर्तुगीज मराठ्यांना शरण आले आणि तहाची बोलणी करण्यास तयार झाले. २ जानेवारी १६८४ रोजी पोर्तुगीज सरदार तहाच्या वाटाघाटीसाठी संभाजी महाराजांकडे गेला. शकावलीप्रमाणे माघ शु. १ (७ जानेवारी १६८४) रोजी कविकलश अकबरास घेऊन भीमगडच्या झाडीत गेले. फिरंगीयांशी सल्ला केला (बेंद्रे २०२). यानंतरचे एक वर्ष अकबराने साखरपे आणि मलकापूर येथे काढले. मधून-मधून तो बागलाणमार्गे उत्तरेस जाण्याची खटपट करीत होता. हे बादशहास कळताच त्याने शहाजादा अज्जम यास ३० हजार सैन्य देऊन अहमदनगरकडे पाठविले. अकबर त्याच वाटेने उत्तर हिंदुस्थानात जाणार होता. बादशहाने आज्जमशहास अकबराची वाट अडविण्यास सांगितले. त्याने अकबराचा पाठलाग केला. अकबर मोठ्या शर्थीने जीव बचावून साल्हेर येथे पोचला. लगेच त्या बाजूसअजमशहा आला तेव्हा अकबर कोकणांत माहुलीस गेला. मोगल सैन्य पाठीशी असल्यामुळे तो पळत पळत पन्हाळ्याचे बाजूस आला असता पुन्हा बादशाही फौजेशी त्याची लढाई झाली. तेणेकरून उत्तर हिंदुस्थानांत राजपुतांच्या आश्रयास जाण्याची अकबराची आशा साफ खुंटली. (रियासत, पृ. ७५)

माहुलीहून तो गुजराथेत जाण्याकरिता जव्हारला आला. जव्हारच्या राजाने त्यास मदत केल्यामुळे तो दमणला पोचला. पुढे गुजराथला जाणार तोच अजमशहा त्याचा पुढील मार्ग अडवून बसला. त्यामुळे त्यास पुढे जाता आले नाही. अकबराचा उत्तरेत जाण्याचा प्रयत्न फसला. संभाजी महाराज राज्याच्या संरक्षणात गुंतल्यामुळे त्यांना अकबराकडे लक्ष देण्यास वेळ नव्हता. हिंदुस्थानात अपयश आल्यानंतर दुर्गादासाच्या मदतीने दोन जहाजे विकत घेतली आणि राजापूरच्या बंदरातून तो १६८७ च्या फेब्रुवारीत इराणकडे रवाना झाला.[१] त्याजबरोबर ५० माणसे होती. दुर्गादास राठोडाने त्यास रवाना केल्यानंतर तो स्वतः रतलामच्या बाजूस गेला. इराणला पोचल्यावर शहाअब्बासचा मुलगा शहासुलतान याने त्याचे स्वागत केले. त्याला पुष्कळ नजराणे दिले. तो तिथेच इ. स. १७०४ साली वयाच्या ४७ व्या वर्षी मरण पावला.[२]

□□



छत्रपती संभाजी राजे

१ शि. च. प्र., पृ. ३४ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. ११६.

२ सरकार जदुनाथ मासिर-इ आलमगिरी, पृ. २८८, शिवपुत्र संभाजी, पृ. ११६.

३०. संभाजी महाराज आणि सिद्दी संघर्ष

छत्रपतीच्या आसनावर बसल्यावर संभाजी महाराजांनी आपल्याविरुद्ध झालेली कट-कारस्थाने निपटली. त्यानंतर संभाजी महाराजांचा कारभार नीट सुरू झाला. संभाजी महाराजांचा पहिला युद्धप्रसंग जंजिऱ्याच्या सिद्दीशी झाला. शिवाजी महाराजांस आरमाराची उभारणी समुद्रातील तत्कालीन शत्रू जंजिऱ्याचा सिद्दी, इंग्रज व पोर्तुगीज यांच्या प्रतिकारार्थ करावी लागली. त्यातील सिद्दी हा मोगल सत्तेचा पाठिंबा राखून होता. तसेच निसर्गसिद्ध दुर्घट असा जंजिऱ्याचा जलदुर्ग व सर्व शत्रूंस सारखाच वाव देणारा अफाट समुद्र यामुळेच सिद्दीचा बंदोबस्त होऊ शकला नाही. " घरात जैसा उंदिर, तैसा महाराजांचे राज्यास सिद्दी." असे सभासद म्हणतो. त्या सिद्दीशी संभाजी महाराजांस कसा संघर्ष करावा लागला ते पाहू.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर एप्रिल, १६८० पासून सिद्दी माझगांव बंदरात येऊन चढाई करीतच राहिला, त्याचा इंग्रजांनी दाणागोटा बंद केला तेव्हा सिद्दीचे लोकच त्याचेविरुद्ध गेले म्हणून सिद्दीने इंग्रजांशी तह केला. त्या तहात नागोठणे, पेण, आपटे, बट्टी या भागात लुटालूट न करण्याची अट सिद्दीने लिहून दिली. यावेळी औरंगजेब बादशहाने मराठी राज्य बुडविण्यासाठी दक्षिणेत येऊन मराठ्यांविरुद्ध सिद्दी, इंग्रज व पोर्तुगीज यांना संघर्ष करावयास लावले.

प्रथम सिद्दीशी झालेल्या संघर्षाची हकीकत पाहू.

ऑगस्ट १६८० मध्ये संभाजी महाराजांनी आपली दोनशे माणसे उंदेरीवर उतरविली. सिद्दीच्या लोकांस ह्या माणसांची काळोखांतील हालचाल कळून आल्यावर त्यांनी संभाजी महाराजांच्या माणसांवर हल्ला चढविला. त्यात महाराजांकडील ८० माणसे कामास आली.[१] संभाजी महाराजांना ह्या कृत्यास इंग्रज कंपनीची फूस असल्याचे समजले. तेव्हा त्यानी इंग्रजास कळविले की, जोपर्यंत सिद्दीला इंग्रज कंपनी मुंबईत व बंदरात ठाव देते तसेच त्यास दारूगोळा वगैरे साहित्य पुरविते तोपर्यंत आपण शिवाजी महाराजांच्या

---

१ बनाजी डी. आर, बॉम्बे ॲन्ड सिद्दीझ, पृ. ३२-३३.

बरोबर झालेल्या इंग्रजांच्या तहातील अटी पाळण्यास जबाबदार नाही.[१] इतकेच नव्हे तर त्याने इंग्रजांस कळविले की, त्यांनी सिद्दीला बाहेर काढून लावले नाही तर इंग्रजांची पर्वा न करता मुंबईविरुद्ध कडक उपाय योजले जातील.[२] इंग्रजांनी संभाजी महाराजांच्या तंबीचा धसका घेतला आणि सिद्दीस आरमारासह मुंबई बंदरातून बाहेर जाण्यास भाग पाडले. तसेच पाणी व धान्य सामग्री सिद्दीच्या जहाजांना पुरविली जाणार नाही हे सुरतकर इंग्रजांचे म्हणणेही मान्य असल्याचे त्यांनी सिद्दीस कळविले. तेव्हा आपण मराठ्यांस त्रास देणार नाही असे वचन देऊन सिद्दी मे १६८१ च्या सुरुवातीस सुरतला गेला. हे इंग्रजांशी बोलणी करण्यास आलेला मराठी वकील आवजी पंडित यास समजताच इंग्रजांच्या वागणुकीवर समाधान मानून तो दिनांक २३ मे १६८१ नंतर रायगडास परत गेला.

इ. स. १६८० च्या अखेरीस सिद्दी कासिमच्या आरमाराने वेंगुर्ल्यावर हल्ला करण्याच्या हेतूने दक्षिण कोकणकडे कूच केले. बराच पाठलाग आणि छोट्या मोठ्या चकमकी होऊन सिद्दी कासिम १६८१ मध्ये मुंबईत आला. उंदेरी आणि माझगांव ह्या दोन्ही ठिकाणी काही लढाऊ गलबते आणि सैनिक ठेवून तो पुढे सुरतेला गेला. कित्येक वेळा सिद्दीने उंदेरी येथून मुंबईहून कुलाब्याकडे माल घेण्याकरता जा-ये करणाऱ्या बोटींवर हल्ले चढवले.[३]

त्याने कुलाब्याचा विध्वंस केला आणि तेथील प्रमुख रहिवाश्यांना पकडून कैद केले. त्या कैद्यांपैकी कित्येक मुस्लिम होते तरीही त्यांना उंदेरीस नेऊन निर्दयपणे मारहाण केली व त्यांचे हालहाल केले. अखेर त्या कैद्यांनी १८,००० रुपये खंडणी देण्याचे मान्य केले. सिद्दीने शांततेचा भंग करणारे हे जे कृत्य केले त्याबद्दल सुरतेच्या इंग्रजांनी नापसंती दर्शविली व सिद्दीला प्रत्युत्तर म्हणून सोळा महिन्यांपूर्वी सिद्दीने चालवलेली मराठा युद्धकैद्यांची विक्री मुंबईच्या इंग्रजांनी थांबविली होती. त्या कैद्यांची किंमत इंग्रजांनी आपल्याला द्यावी अशी उलट मागणी सिद्दीने केली. सुरतच्या मोगल प्रमुखाने इंग्रजांच्या वखारीवर हल्ला करण्यास सिद्दीला प्रोत्साहन दिले. दोन दिवस इंग्रजांची वखार बंद ठेवण्यात आली. जहाजांवर चढवण्याकरता आणलेला माल वखारींच्या आवारातच पडून राहिला. त्यानंतर ऑक्टोबर, १६८२ च्या अखेरीस सिद्दीने मुंबई बंदरात प्रवेश केला. मुंबईच्या इंग्रज सरकारने विरोध करूनदेखील त्याने मुंबई

१ बनाजी, बॉम्बे ॲन्ड सिद्दीझ, पृ. ३३.

२ ओर्मे व्हा, ११६-५, बेंद्रे संभाजी, पृ. ३७३.

३ कित्ता, पृ. ३३.

बंदरात व्यापाराकरिता आलेल्या सर्वच्या सर्व गलबतांवर हल्ला चढवला.[१] एवढेच नव्हे तर त्यात त्याने मुंबई (इंग्रजांच्या) मालकीचे एक गलबतही पकडले. त्यानंतर कुलाबा किनारपट्टीवरील एक भाग भस्मसात करून त्याने चौलकडे मार्गक्रमणा केली, परंतु चौल शहरावरील हल्ल्याचा प्रयत्न असफल झाला. त्यानंतर संभाजी महाराजांना जंजिऱ्याच्या सिद्दीशी सामना करावा लागला. उंदेरीहून लहान लहान नौका मुंबई बंदरात पाठविल्या. मुंबई बंदराच्या दक्षिणेकडील किनाऱ्यावर छापा घालून, लूट करून तिथे पकडलेल्या कैद्यांना गुलाम म्हणून विकण्याकरता मुंबईस पाठवले.[३] इंग्रजांनी सिद्दीच्या ह्या जुलमी कृत्याचा निषेध केला आणि त्या दुर्दैवी कैद्यांपैकी एकवीस जणांची सुटका केली.[४] इंग्रज सिद्दीला दुखवू शकत नव्हते कारण सिद्दी हा बादशहा औरंगजेबाचा सरदार होता. त्याचा रोष ओढवून घेतला असता तर त्याने मोगल साम्राज्यात मुक्त व्यापार करण्यास इंग्रजांना दिलेली सवलत बंद केली असती. त्याचा परिणाम असा झाला की, जेव्हा इंग्रजांनी सिद्दीला मुंबई बेटावर राहण्यासाठी परवानगी दिली तेव्हा त्या संधीचा उपयोग सिद्दीने मुंबईत येऊन मराठ्यांच्या मुलखावर आक्रमणे करण्याकरता, मराठ्यांची आगळीक करण्याकरता केला. सिद्दीचे अमानुष अत्याचार रोखण्याकरता संभाजी महाराजांनी सिद्दीची जहाजे जाळण्याचा प्रयत्न केला. परंतु तो प्रयत्न असफल ठरला. संभाजी महाराजांचे बहुसंख्य सैनिक मारले गेले किंवा कैदी म्हणून पकडले गेले.[५] इ. स. १६८० च्या अखेरीस सिद्दीचे आरमार वेंगुर्ल्यावर हल्ला करण्याच्या हेतूने खालच्या किनारपट्टीस गेले.[६] परंतु, कित्येक शह काटशह चकमकी होऊन सिद्दी १६८१ मध्ये मुंबई बंदरात आला. मुंबईहून कुलाब्याच्या किनाऱ्याकडे माल रसद पुरवठा घेऊन जात असणाऱ्या कित्येक नौकांवर उंदेरी येथून सिद्दीने हल्ले चढवले. सिद्दी, इंग्रज आणि मराठे यांच्यात बारीकसारीक युद्ध किंवा चकमकी झाल्याशिवाय एकही वर्ष उलटत नसे. त्याला १६८१ हे वर्षही अपवाद नव्हते. त्यातून होणाऱ्या विध्वंसाला सिद्दी आणि मराठे हे दोघेही कारण होते, दोघेही दोषी होते. संभाजी महाराजांचा इंग्रजावरील अविश्वास, रोष एवढा तीव्र होता की, त्यांनी आपल्या मराठी मुलखातून मुंबईस होणारा धान्यपुरवठा बंद केला.[७] त्याबरोबर पोर्तुगिजांनीदेखील इंग्रजांना त्रास देण्याची ही संधी

१ बेंद्रे, संभाजी महाराज चरित्र, पृ. ३८१-८२.

२ पगडी, मासीर-इ-आलमगिरी, पृ.२१.

३ बनाजी, बॉम्बे ॲन्ड द सिद्दीझ, पृ. ३२.

४ उपरोक्त.

५ भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक वर्ष ९ वे भाग १, पृ. १५.

६ ओर्मे, हिस्टॉरिकल फ्रॅग्मेंट्स ऑफ हिंदोस्तान, पृ. ९६-९८.

७ बनाजी, कित्ता, पृ. ३३.

साधली. त्यामुळे मुंबईमध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या किमती तिपटीने वाढल्या.[१] दमण येथे पोर्तुगिजांनी संभाजी महाराजांच्या काही माणसांना ठार मारले असे वृत्त कानावर येताच मराठ्यांनी आपल्या प्रदेशातील पोर्तुगिजांची घरे जाळून टाकली.[२]

इ. स. १६८१ च्या डिसेंबरमध्ये सिद्दीने मराठ्यांची आपटे व नागोठणे ही गावे लुटली आणि जाळली. जंजिरेकर सिद्दीच्या ह्या अशा कृत्यांचे संभाजी महाराजांनी लपंडाव करून जंजिरा हस्तगत करण्याचे ठरवले. संभाजी महाराजांनी आपल्या कोंडाजी फर्जंद या माणसाला सिद्दीकडे नोकरी मिळवण्यास पाठवले. त्यात तो यशस्वी झाला आणि आपल्या कुटुंबांसह जंजिरा किल्ल्यात राहू लागला. जंजिऱ्यावरील दारूखाना इत्यादींना आग लावून देण्याचा त्याचा विचार होता. कोंडाजी फर्जंदचा हा डाव सिद्दीस कळला तेव्हा सिद्दीने त्याचे डोके मारले. त्यांच्या सोबत असणाऱ्या काही लोकांना बुडविले.[३] दगलबाजीने जंजिरा सर करण्याचा प्रयत्न अयशस्वी होताच संभाजी महाराजांनी दादाजी रघुनाथ देशपांडे या सेनापतीस दंडाराजपुरीस वेढा घालण्याकरता पाठवले. नंतर, संभाजी महाराज, राजपुत्र अकबर हे वीस हजार सैनिकांसह रायगडाहून निघाले आणि वेढा घालून राहिलेल्या सैनिकांस येऊन मिळाले. ह्या सैन्याने [४] पंधरा दिवस सतत जंजिऱ्यावर तोफा डागल्या. तोफांच्या भडिमारामुळे किल्ल्याची भिंत कोसळून पडण्याची वेळ आली. दिनांक ३ जानेवारीपासून दिनांक ३ फेब्रुवारी १६८२ ह्या काळात संभाजी महाराजांनी सिद्दीवर अतिशय दबाव आणला होता, सिद्दीला अडचणीत टाकले होते आणि त्यावेळी मराठे जंजिरा जिंकून घेण्याच्या बेतात होते. त्याकरिता त्यांनी किल्ल्याभोवती खंदक भरून काढण्याकरता ५० हजार माणसे कामाला लावली. आठशे यार्ड रुंद आणि तीस यार्ड खोल असणारा खंदक दगड, लाकडे, कापसाची गाठोडी वगैरे टाकून त्यांनी भरून काढला. अशाप्रकारे किल्ल्यावर चाल करून जाणाऱ्या आपल्या सैनिकांकरता त्यांनी रस्ता तयार केला.[५] परंतु, औरंगजेबाचे दोन हजार घोडदळ आणि पंधरा हजार पायदळासह नबाब हसन अलिखान याचे मोगल सैन्य ४ फेब्रुवारी १६८२ रोजी कोकणात येऊन थडकले.[६] दिनांक ३० जानेवारी १६८२ रोजी मोगलांनी कल्याण जिंकून घेतले. त्यामुळेच संभाजी महाराजांना सिद्दीवरील मोहीम महाडच्या दादाजी प्रभू देशपांडे यांच्यावर सोपवून मोगल सेनेशी मुकाबला करण्यासाठी रायगडावर परत यावे लागले.

१ ओर्मे, कित्ता पृ. १०७-१०९.

२ भारतीय इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक वर्ष ९, भाग १, पृ. १६.

३ चिटणीस, संभाजी बखर, पृ. १७.

४ आवळसकर, ऐतिहासिक साधने, पत्र क्र. ६४, पृ. ९९.

५ सरकार, हिस्टरी ऑफ औरंगजेब, खंड ४, पृ. ३१२.

६ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी, पृ. २२३

सर जदुनाथ सरकार यांनी तेव्हा मुंबईत गेलेल्या मराठी आरमाराच्या तांड्याचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. मे १६८२ ते १६८५च्या दरम्यान सुमारे पाच हजार सैनिक असणारी गलबते, मुंबई समोरील समुद्रामध्ये सज्ज होती. संभाजी महाराजांचे आरमार १२० गलबते आणि १५ गुराबांनी युक्त असे सामर्थ्यशाली होते.[१] मुंबईतील इंग्रज प्रतिनिधींनी नोंदले आहे की, नोव्हेंबर १६८१ ते जुलै १६८२ ह्या काळात संभाजी महाराजांच्या खांदेरीतील गलबतांनी विरोधी पक्षाचे ४५०० रुपयांइतके प्रचंड नुकसान केले [२] त्याचा बदला घेण्याकरता म्हणून सिद्दीने कुर्ल्यावर ऑगस्ट, १६८२ मध्ये हल्ला चढविला आणि तेथील कित्येक रहिवाशांची नाके कापली.[३] मराठे आणि सिद्दीचे आरमार यांची ऑक्टोबर, १६८२ मध्ये समोरा-समोर भेट झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळांत मराठ्यांना येऊन मिळालेल्या सिद्दी मिस्त्री याने मराठ्यांचा आरमार प्रमुख म्हणून कार्यभार साभाळला. त्यानेच सिद्दीशी समोरा-समोर युद्ध केले. (४ ऑक्टोबर १६८२). त्या युद्धात संभाजी महाराजांचे सैन्य आपल्या सेनाधिकाऱ्याला शत्रूच्या हाती एकाकी टाकून पळून गेले..... सिद्दी मिस्त्री जबर जख्मी झाला होता. तो त्याच दिवशी मरण पावला.[४] (५ ऑक्टो. १६८२).

जंजिऱ्याच्या मोहिमेचे नेतृत्व करीत असणाऱ्या दादाजी रघुनाथ देशपांडे यांना जंजिरा सर केला गेला तर अमात्य पद बहाल करण्याचे संभाजी महाराजांनी वचन दिले होते. ह्या वेढ्याच्या कामात दौलतखान, मायनाईक, कावजी महमूद आणि गोविंद कान्हो ह्यांनी दादाजी प्रभू देशपांडे यांना सर्वपरी साहाय्य केले.[५]

अचानक छापा घालून जंजिरा काबीज करण्याचा दादाजी रघुनाथ देशपांडे यांचा हा प्रयत्न अपयशी ठरला.[६] दादाजीने आपले सैन्य माघारी घेतले. यावर सिद्दी जोर करून मराठी मुलखात घुसला. त्याने महाडवर चढाई केली. दादाजींची पत्नी आणि कुटुंबीयांस पकडून त्यांना जंजिऱ्याला घेऊन गेला.[७] सिद्दीच्या जंजिऱ्यातील सामर्थ्याला प्रतिशह देण्याकरता संभाजी महाराजांनी अंजदिव येथे सुभेदाराची नेमणूक केली. इ. स. १६८२ च्या आरंभी अंजदिव येथे आरमार तळ सुसज्जतेने उभारण्याच्या दृष्टीने

१ सरकार, हिस्टरी ऑफ औरंगजेब, खंड ४, पृ. ३११.

२ फॉरेस्ट, कित्ता, पृ. ११०.

३ सरकार, द हाऊस ऑफ शिवाजी, पृ. २२३.

४ फॉरेस्ट, कित्ता, पृ. ११२, बेंद्रे, संभाजी चरित्र, पृ. ३८०-८१.

५ चिटणीस मल्हारराव, संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांची चरित्रे, पृ. १४-१५.

६ उपरोक्त.

७ चिटणीस, कित्ता, पृ. १६.

तेथे किल्ला उभारणे आवश्यक होते.[१] हे वृत्त कानी येताच पोर्तुगीज अंजदिव येथे २०० सैनिकांसह जाऊन दाखल झाले. त्यांनी मराठ्यांना हुसकावून लावले आणि ११ एप्रिल १६८२ रोजी पोर्तुगीजांनीच अंजदिव येथे किल्ला उभारला.[२] याच वेळी इंग्रजांच्या व्यवस्थेत मोठी बंडाळी उत्पन्न झाली तीच संभाजी महाराजांच्या पथ्यावर पडली. कॅप्टन रिचर्ड कीग्विन ह्या इंग्रजाने मुंबईत एक क्रांतिकारी घटना घडवली. त्याने ईस्ट इंडिया कंपनीच्या गव्हर्नरच्या ताब्यात असणाऱ्या मुंबईच्या किल्ल्यास वेढा घातला आणि इंग्लडचा राजा दुसरा चार्ल्स याच्या नावे आपण राजव्यवस्था पाहणार आहोत असे त्याने घोषित केले. ह्या वेळी एका मोगल सेनापतीने संभाजी महाराजांच्या एका प्रतिनिधीस कैद केले होते आणि त्याचा शिरच्छेदही होणार होता. मुंबईचे शासन, कंपनीकडून इंग्रजांच्या राजाच्या माणसाने हाती घेतले हे कळताच त्या मोगल सेनापतीने संभाजी महाराजांच्या माणसाचा शिरच्छेद रद्द केला आणि त्या माणसाला कैदी म्हणून कॅप्टन रिचर्ड किग्विनकडे पाठवले. त्यानंतर कॅप्टनने सुरक्षितपणे त्या माणसास संभाजी महाराजांकडे पोचते केले. ह्या सौहार्दपूर्ण वर्तनानंतर इंग्रज आणि संभाजी महाराज यांचे परस्परातील संबंध सुधारण्यास खूपच मदत झाली.[३] इ. स. १६८४ च्या एप्रिलमध्ये सिद्दी कासिम नेहमीप्रमाणे जहाजे नांगरून विश्रांती घेण्याकरता मुंबईस आला. मात्र त्याला मुंबई बेटावर फक्त पाणी घेता येईल, आसरा घेता येणार नाही असे किग्विनने त्याला स्पष्टपणे कळवले. यावर सिद्दी तेथून निघून गेला. या घटनेनंतर मराठ्यांच्या मुख्य भूभागावर अतिक्रमण करण्याकरता सुरक्षित तळ म्हणून मुंबईचा वापर करणे सिद्दीला अशक्य झाले.[४] संभाजी महाराजांशी इंग्रजांचे मतभेद दूर होण्यासाठी आणि महाराजांशी शांतता प्रस्थापित करण्यासाठी म्हणून किग्विनने कॅप्टन हेन्री गॅरी आणि लेफ्टनंट विल्किन्स यांना आपले दूत म्हणून संभाजी महाराजांकडे पाठवून दिले.[५] संभाजी महाराज आणि इंग्रज यांच्यात झालेल्या करारातील २७ व्या कलमाने असे निश्चित केले की, " इंग्रजांनी सिद्दीच्या विरोधात राहावे " असे त्यांना आवाहन करून मी असे वचन देतो की, " इंग्रज जर कराराप्रमाणे वागले तर, प्रसंग पडेल तेव्हा मी इंग्रजांना मदत करीन." अशा रीतीने इंग्रज व संभाजी महाराज यांमध्ये दोन करार झाले ते उभयतांसाठी चांगले फायदेशीर झाले. हे करार पुढील प्रकरणात दिले आहेत.

□□

१ सरकार, औरंगजेब, खंड ४, पृ. ३१५.

२ डॅनव्हर्स, द पोर्तुगीज इन इंडिया भाग २, पृ. ३६६.

३ सरकार, संभाजीराजे रिलेशन्स विथ द इंग्लिश १६८४ (भा.इ. सं. मं. त्रैमासिक, भाग-२-४, जून १९३२, पृ. ३०.

४ बनाजी, बॉम्बे ॲन्ड द सिद्दीझ, पृ. ३७.

५ सरकार, औरंगजेब, भाग ४, पृ. ३०-३१.

३१. छत्रपती संभाजी महाराज आणि इंग्रज

मुंबई बेट इंग्रजांच्या ताब्यात इ. स. १६६४ डिसेंबरमध्ये आले. त्या वेळेपासून ते छत्रपती शिवाजी महाराजांशी सख्य राखण्याचा प्रयत्न करीत होते. तदनंतर जानेवारी, १६६४ च्या सुरत येथील लुटीच्या निमित्ताने त्यांचा शिवाजी महाराजांशी प्रत्यक्ष संबंध आला. मोगलांकडून शिवाजी महाराजांनी आपले सर्व गड किल्ले घेतले हे पाहून इंग्रजांना शिवाजी महाराजांबद्दल दहशत निर्माण झाली. पण इंग्रजांनी शिवाजी महाराजांचा शत्रू जो सिद्दी यास गुपचूप मदत करण्याचे धोरण ठेविले. शिवाजी महाराजांना हे कळताच त्यांनी इंग्रजांना तंबी दिली. याचा परिणाम असा झाला की सिद्दीचे आरमार पावसाळ्यासाठी १० मे १६७३ रोजी मुंबई बंदरात आश्रयासाठी येऊ लागले तेव्हा त्यास इंग्रजांनी येऊ दिले नाही. इंग्रजांना शिवाजी महाराजांशी चांगले संबंध राखावयाचे होते म्हणून त्यांनी आपला वकील थॉमस निकोलसन यास ११ जून १६७३ रोजी शिवाजी महाराजांच्या भेटीस पाठविले. परंतु त्याचीही काही फलनिष्पती झाली नाही. तेव्हा इंग्रजांतर्फे नारायण शेणवी हा इंग्रजांचा दुसरा वकील बोलणी करण्यास २४ मार्च १६७४ रोजी रायगडावर शिवाजी महाराजांकडे गेला. तसेच ऑक्सिंगडेन हाही शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकाच्या वेळी इंग्रजातर्फे नजराणा घेऊन गेला. शिवाजी महाराजांनी इंग्रजांकडे जुलै, १६७५ त दारूगोळा व तोफा यांची मागणी केली. त्यांनी इंग्रजांच्या सर्व वखारींस अभयाचा कौल दिला. पण इंग्रजांनी शिवाजी महाराजांस दारूगोळा दिला नाही. सन १६७९ मध्ये मुंबई बंदराच्या तोंडावर असलेले खांदेरी-उंदेरी नावाचे इंग्रजांच्या ताब्यातील बेट शिवाजी महाराजांनी आपल्या ताब्यात घेतले आणि त्यावर तटबंदी केली.[१] ही बातमी इंग्रजांस समजताच त्यांचा तिळपापड झाला. त्यांनी हे बेट पुन्हा मिळविण्याकरिता पुढील दोन वर्षे निकराचे प्रयत्न केले. परंतु त्यांना यश आले नाही. तेव्हा त्यांनी चौलचा सुभेदार अण्णाजी दत्तो याजबरोबर तहाची बोलणी करण्यास आपला वकील राम शेणवी यास पाठविले व तह घडवून आणला.[२]

---

१ ओर्मे, व्हॉ. १, पृ. ११६.

२ बेंद्रे, वा. सी., छत्रपती संभाजी महाराज, आवृत्ती १९७१, पृ. ३२९.

इंग्रजास तंबी

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी महाराज गादीवर आले. त्यांनी आपला सुभेदार चौल येथे नव्याने नेमला. त्याजकडे राजापूरच्या इंग्रजांनी आपल्या मालमत्तेसह परत जाण्यासाठी मे १६८० च्या सुरुवातीस परवानगी मागितली. तेव्हा याबद्दल सुभेदाराने इंग्रजांस संभाजी महाराजांची परवानगी घेण्यास सांगितले. म्हणून परवानगी मिळविण्यासाठी इंग्रजांनी आपली माणसे महाराजांकडे पाठविली. " परंतु सध्या अन्य कामात गुंतल्याने तुमच्या अर्जाचा विचार तूर्त करता येत नाही. " असे महाराजांनी सांगून त्यास घालवून दिले.[१] याचे कारण इंग्रजांनी शिवाजी महाराजांशी केलेला तह पाळला नव्हता. सिद्दीचा बंदोबस्त केला नव्हता. सिद्दी मराठ्यांच्या मुलखातील पेण-नागोठणे या भागात लुटालूट करीत होता. मुंबईकर इंग्रजांनी त्यास आश्रय दिला होता. तेव्हा संभाजी महाराजांनी इंग्रजांची खोड मोडण्यासाठी राजापूरच्या वखारीजवळ मराठे सैन्य पाठविले. सैन्याचा हल्ला होईल या भीतीने इंग्रज निघून न जाता वखारीतच अडकून राहिले.[२] सिद्दीचा बंदोबस्त करण्यासाठी संभाजी महाराजांनी आपला निष्णात व धूर्त वकील आवजी पंडित इंग्रजांशी बोलणी करण्यासाठी २० नोव्हेंबर १६८० रोजी मुंबईस पाठविला. सिद्दीच्या मुंबईतील हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवण्यासंबंधीच्या गुप्त सूचनाही त्यास दिल्या. वकिलाने इंग्रजांची भेट घेऊन त्यास असे सांगितले की, शिवाजी महाराजांशी झालेल्या तहाप्रमाणे मुंबईकरांनी सिद्दीचा बंदोबस्त केला नाही तर संभाजी महाराज इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारतील, इंग्रजांनी सिद्दीस देत असलेली मदत ताबडतोब थांबवावी ; त्यास आरमारासह ताबडतोब मुंबईबाहेर काढावे. तसे न केल्यास संभाजी महाराजांनी मुंबईवर स्वारी करण्याचा निश्चय केला आहे.[३] यावेळी सिद्दी आपल्या आरमारासह मुंबईहून सुरतेस गेला त्यामुळे सिद्दीच्या भानगडीतून मुबंईकरांना थोडा काल तरी मुक्त झाल्यासारखे वाटले.[४] संभाजी महाराजांचा वकील मुंबईस काही काल राहिला. इंग्रजांनी त्याची बडदास्त चांगली राखली. निघताना त्यास नजराणा दिला. महाराजांसही त्याजबरोबर नजराणा पाठविला. तेव्हा त्यांना असे वाटू लागले की संभाजी महाराजास संतोषी वाटून किनारपट्टीवरून आपली तांदळाची गरज भागेल.[५] पण ह्या त्यांच्या मनोदयास सिद्दीने तडा दिला. सिद्दीने १६ मार्च १६८१ रोजी मुंबईस जाणारी मराठ्यांची २ गलबते व

१ शिवकालीन पत्रसारसंग्रह, क्र. २२६३.

२ कित्ता, क्र. २२९२.

३ गोखले, कमल आवृत्ती १९७१, पृ. १२६.

४ ओर्मे, व्हॉ. २, ११६-७, २५४; छत्रपती संभाजी महाराज, पृ. ३३५.

५ छत्रपती संभाजी महाराज, पृ. ३३५.

त्यातील ४ माणसे पकडली. चेऊल येथे ३००० सैन्यासह मराठा अधिकारी बसला होता. त्याने गलबतांची रास्त मागणी केली तेव्हा इंग्रजांनी संभाजी महाराजांच्या भयास्तव ती गलबते सिद्दीकडून घेऊन मराठ्यांकडे पाठविली.

संभाजी महाराज, इंग्रज व सिद्दी :

इंग्रजांच्या पाठिंब्यावर सिद्दी उंदेरीवर राहून मराठ्यास त्रास देतो तेव्हा उंदेरी काबीज करण्याचे संभाजी महाराजांनी ठरवून त्यासाठी अरब आरमाराशी संगनमत केले. उंदेरी बेट काबीज केले व तेथे कोट बांधण्यास सुरुवात केली व स्वतः जंजिऱ्यास जाऊन वेढा दिला. त्याचवेळी धान्यासाठी गेलेल्या इंग्रजांच्या तीन होड्या पकडल्या. मुंबईकरांनी संभाजी महाराजांचा वकील सुंदरजी बाजी याची अजिजी करून त्या स. १६८२ च्या सुरुवातीस सोडवून नेल्या. १९ जानेवारी १६८.२ च्या पत्राने मुंबईकर इंग्रजांनी सुरत इंग्रजांस कळविले की जर सिद्दीने मराठ्यांस त्रास देण्याचे थांबविले नाही तर इंग्रजांशी संभाजी महाराज कोणत्याही क्षणी लढाई देतील व इंग्रजांस त्यांचा हल्ला परतविणे जड जाईल. " तेव्हा सुरतकर इंग्रजांनी कळविले की संभाजी महाराजांशी गोडी गुलाबीने वागा, मैत्रीने राहा, सिद्दीला दुखवू नका."[१] सुरतकरांनी औरंगजेबाच्या भीतीने सिद्दीबाबत थंड राहण्याचे ठरविले होते. सुरतकर इंग्रज मुंबईकरांस लिहितात की, संभाजी राजांच्या मुलखांत हेर ठेवा व पहाऱ्याला बाहेर होड्या ठेवा म्हणजे त्याने काही छापे घालण्याचे प्रयत्न केले तर प्रतिकार करता येईल.[२] संभाजी महाराजांनी इंग्रजाकडे जाणारा अन्नधान्य पुरवठा बंद केला आणि पोर्तुगिजांनी कोणाही इंग्रजांना धान्य देऊ नये म्हणून जाहीरनामा काढला. तेव्हा मुंबईकरानी सुरतकरांकडे आरमाराची मदत मागितली.[३] अर्थात सुरतकरांनी १६ ऑक्टोबर १६८२ ला टोलवाटोलवीची उत्तरे दिली.[४] तेव्हा संभाजी महाराजांशी मिळते घेण्यासाठी इंग्रजांनी २० ऑक्टोबर १६८२ ला प्रल्हाद निराजीस आणण्यासाठी " बलून " जहाज पाठविले. प्रल्हाद निराजीने मुंबईकरांशी बोलणी करताना सिद्दीच्या बंदोबस्तासंबंधी इंग्रज काय उपाययोजना करतात याबद्दल विचारले. त्याचा खुलासा निःसंधिग्दपणे न करता त्याबाबत ते सुरतकरांच्या सांगण्यावरून टोलवाटोलवीची उत्तरे द्यायला लागले. यावरून मराठ्यांना कळून चुकले की, इंग्रज सिद्दीला सुरतेस घालवू शकत नाही. म्हणून संभाजी महाराजांनी जाहीरनामा काढला की आपल्या मुलखातून

१ बेंद्रे, छ. संभाजी, पृ. ३३७.

२ कित्ता.

३ ओर्मे, व्हॉ. ११, पृ. ९-१० छत्रपती संभाजी महाराज, पृ. ३४०.

४ ओर्मे, व्हॉ. ११७-२, पृ. ४२-९.

इंग्रजांस अन्नधान्य नेण्यास देऊ नये.[१] इंग्रजांनी मराठ्यांच्या वकिलास २ महिने रखडून ठेविले. २० डिसेंबरला मराठ्यांच्या वकिलास इंग्रजांनी निरोप दिला. संभाजी महाराजांनाही रायगडावर भेटीस आलेल्या स्मिथ नावाच्या वकिलासही गोड बोलून काहीही न देता परत पाठविले.

इ. स. १६८३ च्या फेब्रुवारीपूर्वी संभाजी महाराजांच्या आरमाराची व इंग्रज जहाज " प्रेसिडेंट " यामध्ये महागिरीची लढाई झाली. या चकमकीत मराठ्यांची ३ गलबते बुडाली.[२]

त्यानंतर संभाजी महाराजांनी इंग्रजांस फर्मान व सही शिक्क्याचे कागद द्यावयाची त्यांच्याच पद्धतीने टाळाटाळ केली. दरम्यान संभाजी महाराजांनी पोर्तुगिजांविरुद्ध गोव्यात स्वारी केली व माहीम, केळवा, दंतोरा सारगाव व सुपारा ही ठाणी घेतल्यामुळे मुंबईकरांना मराठ्यांची धास्ती वाटू लागली. मराठ्यांनी कारंजा घेतल्यावर इंग्रजांना सुरक्षिततेची काळजी वाटू लागून त्यांचा धीर सुटला. स. १६८३ च्या अखेरीस संभाजीच्या फौजांनी मुंबईजवळ येऊन मुंबईला घेरले होते.[३] सुरतकरांनी मुंबईच्या सुरक्षिततेची काहीच व्यवस्था केलेली नव्हती. मुंबईकरांची परिस्थिती इतकी वाईट झाली होती की त्यांच्याजवळ रहिवाशांना पुरेल इतकीही अन्नसामग्री नव्हती. इतक्यात मुंबईजवळच्या कारंजा बंदराचा ताबा मराठ्यांस मिळाल्यामुळे मुंबईकर घाबरले आणि यातून मार्ग काढण्यासाठी सुरतकरांचा सल्ला विचारला.[४] दरम्यान मुंबईकर रहिवाशांनी चाइल्ड आणि वॉर्ड यांच्या जुलमी वर्तणुकीस कंटाळून त्यांजविरुद्ध बंड केले. तेव्हा ईस्ट इंडिया कंपनीने मुंबईला गव्हर्नर म्हणून रिचर्ड केगविनची नेमणूक केली. संभाजी महाराजांशी त्याने मैत्री करून मुंबईच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी त्याने आपल्यावर घेतली. मुंबईच्या बंडाची हकीकत वॉर्डने सुरतेस कळविली, " मुंबईचे रहिवासी सुरतकरांवर चिडल्याचे आणि गव्हर्नर केगविन हा मुंबई बंदर संभाजीराजांना ४०,००० पागोड्यांना विकणार असल्याचे त्याने लिहिले होते.[५]

यावर्षी सिद्दीने मराठ्यांस त्रास देण्याचा नवीन उपक्रम सुरू केला. संभाजी महाराजांच्या मुलखातून मुले पळवून आणून मुंबईत ते विकू लागले. ह्याचा बंदोबस्त इंग्रजांनी करावा

---

१ छत्रपती संभाजी महाराज, पृ. ३४०.

२ शिवपुत्र संभाजी, पृ. १४०.

३ कित्ता, पृ. १४२.

४ कित्ता.

५ शिवचरित्र साहित्य, खं. ९ ले. ६०.

म्हणून इंग्रजांस संभाजी महाराजांनी फर्मावले. संभाजी महाराजांनी कारंजा बेट काबीज केल्यानंतर इंग्रजांना त्याजबरोबर मैत्री करण्याची आवश्यकता वाटू लागली. त्यांनी सुरतकर इंग्रजांस यावर उपाय सुचविण्यास लिहिले तेव्हा सुरतकरांनी नेहमीप्रमाणे उडवाउडवीची उत्तरे दिली. ते पत्रात म्हणाले की, संभाजी राजे आपल्याशी (इंग्रजांशी) कधीच भांडले नाहीत. कारंजाहून मुंबई बेटावर येण्यास ते काय समुद्राचे मालक झालेले नाहीत. तेव्हा आमची शिफारस आहे की शत्रूचे भय न धरता आनंदाने राहा.[१]

इंग्रजांशी तह :

केगविनने मुंबईचा ताबा घेतल्यावर २६ एप्रिल १६८४ च्या सुमारास कॅ. गॅरीला संभाजीमहाराजांकडे तह करण्याकरिता पाठविले. कॅ. गॅरी, थॉमस विल्किन्स व राम शेणवी हे इंग्रजांचे प्रतिनिधी संभाजी महाराजांस बिरवाडी येथे भेटले. संभाजी महाराजांचे इंग्रजांना एवढेच सांगणे होते की त्यांनी सिद्दीस थारा देऊन आणि साहित्य पुरवून मराठ्यांच्या मुलखात उपद्रव देण्यास मदत करू नये व दिवसेंदिवस आपल्या मैत्रीचे संबंध दृढ होत जातील असे करावे. ‘ तुमचा मित्र तो आमचा मित्र आणि तुमचा शत्रू तो आमचा शत्रू ’ हे जाणून आपला मैत्रीचा तह करण्यास संमती असल्याचे त्यांनी कळविले. त्याप्रमाणे इंग्रज-मराठ्यांच्या तहाचा मसुदा तयार करण्यात आला. या तहाच्या मसुद्यात कर्नाटकासाठी ११ कलमे व मुंबईसाठी ३० कलमे संभाजी महाराजांनी मान्य केली. त्यातील कर्नाटकचा तह असा.

“ संभाजी राजा छत्रपती, राजशक १० (१५ मे १६८४ पर्यंत) मुंबईच्या गव्हर्नरने (कॅ. रिचर्ड केगविन) कॅप्टन हेन्री गॅरी आणि थॉमस विल्किन्स यांस वकील म्हणून व राम शेणवी यास दुभाषा म्हणून पाठविले. त्यांनी कर्नाटकामध्ये वखारी काढण्याबद्दल मनसुबा सांगितला. त्यावरून त्यांच्या विनंतीचा विचार करून पुढील अटी करार करून देत आहोत. त्या अशा—

(१) इंग्रजांनी वाटेल त्या ठिकाणी वखारी स्थापाव्यात. सांप्रत ते तिवेनापट्टम (Tivangpati) कुडालोर (Gudanor) आणि कोनिमेर (Canamer) येथे वखारी काढीत आहेत त्या काढाव्यात व नंतर जेथे त्यांस वाटतील तेथे त्या काढाव्यात. त्यांस

---

१ Sambhaji to Bom., (Kejwin) April १६८४, Sur. Vol. १०९. p. ५५ ; ऑर्म, व्हॉ. ११८-२, पृ. २३०-२ ; त्रैमासिक, भाइसंमं, भाग २, १९२२, पृ. ३१.

वखार बांधण्याकरीता ६० कोविद (Covids) लांब व पंधरा कोविद रुंद जमीन द्यावी, वखारीची उंची २।। कोविद व भिंतीची रुंदी अर्धा कोविद राहील. त्यापेक्षा अधिक नाही. आणि त्यांना अधिक जागेची जरूर भासली तर त्यांनी आणखी एक घर त्याच लांबी रुंदीचे बांधावे. तेही न पुरले तर व्यापारी जशी बाजारात दुकाने बांधतात त्याप्रमाणे दुकाने बांधावीत, (२) इंग्रजांशी व्यापार करण्यासाठी जे व्यापारी, रंगारी व विणकर येतील आणि त्यांच्याजवळ इंग्रजांचा माल असेल त्यांस हवालदार किंवा सुभेदारांनी त्रास देऊ नये. उलट त्यांस शक्य ती मदत करावी. (३) मालाची ने-आण करताना तो सांभाळण्यासाठी इंग्रजांनी मजूर किंवा रखवालीसाठी इतर लोक नोकरीत घ्यावेत. अशी माणसे मालाच्या दृष्टीने जरूर तेवढीच ठेवावीत आणि तसे केल्यास सुभेदार किंवा इतर अधिकारी त्यांना आडवणार नाहीत. परंतु ते जर जरुरीपेक्षा अधिक ठेवतील तर त्यांस परवानगी मिळणार नाही. (४) माझ्या राज्यात इंग्रजांची किंवा त्यांच्या व्यापाऱ्यांची व्यापार करताना. जर चोरी झाली तर त्या चोराला सुभेदार किंवा हवालदारापुढे नेऊन त्यांचेकडून न्याय करून चोराकडून भरपाई करून मिळेल. (५) जो माल इंग्रज आयात करतील त्यावर ते २।। % जकात देतील आणि निर्यात करतील त्यावर जकात नाही व इतर काही ताप होणार नाही. (६) माझ्या राज्यातील एखादा व्यापारी किंवा रहिवासी काही जिन्नस किंवा व्यापारी माल घेऊन इंग्रजांचे किंवा त्यांच्या व्यापाऱ्यांचे देणे लागत असेल व ते देत नसेल तर त्याला सुभेदाराकडे किंवा अधिकाऱ्याकडे नेले जाईल व तो जर खरोखरच देणे लागत असेल तर त्यांच्या मान-इतमामाकडे न पाहता त्यास कर्जफेड करावयास लावली जाईल. (७) इंग्रजांना माझ्या राज्यातील कोणाही माणसास गुलाम किंवा ख्रिश्चन करण्यासाठी विकत घेता येणार नाही. (८) वादळामुळे किंवा अन्य उत्पातामुळे जर एखादे जहाज, गुराब किंवा होडी माझ्या राज्यातील एखाद्या बंदरात लागली तर ती जप्त करून सरकारजमा होऊ नये, हा रिवाज इतर ख्रिश्चन लोकांच्याबाबत रूढ असेल तर ती सवलत इंग्रजांसही दिली जाईल. (९) इंग्रजांची सूचना की माझ्या राज्यातील कोणी सुभेदार यांना जो माल लागेल तो ते देतील ; परंतु राजांचे किंवा वरील अधिकाऱ्यांच्या विनंतीव्यतिरिक्त जो माल घेतील तो देणे किंवा न देणे इंग्रजांच्या इच्छेवर राहावे. माझ्या सरकारकुनांचे पत्र असेल तर माल दिला पाहिजे. परंतु त्याविना माल देणे किंवा न देणे इंग्रजांच्या मर्जीवर अवलंबून राहील. (१०) इंग्रजांनी सुचविले की, त्यांच्या नोकरांवर डोईपट्टी घेऊ नये.

जर इतर ख्रिश्चन लोकांबाबत असाच रिवाज असेल तर इंग्रजांनाही त्याचा फायदा मिळेल. (११) इंग्रजांची सूचना की, इतर ख्रिश्चन व्यापाऱ्यांना वर निर्देशित केलेल्या सवलतीपेक्षा अधिक सवलती मिळत असतील तर त्या त्यांनाही मिळाव्यात. तरी अशा सर्व सवलती इंग्रजांना मिळतील."

सेंट फोर्ट जॉर्ज येथील इंग्रजांच्या लिहिण्यावरून वरील तहाची अकरा कलमे इंग्रज वकिलांनी संभाजीराजांकडून मान्य करून घेतली. शिवाजीराजांच्या वेळी विकत घेतलेल्या माणसांमागे कडक जकात द्यावी लागत असे. परंतु संभाजीराजे यांनी गुलामांच्या व्यापाराला संपूर्णच बंदी घातली होती ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे.

इंग्रज वकिलांनी मुंबईसाठी मुख्य कलमे ठरविली ती तीस असून त्यात जुन्या भांडणाचा कायमचा निकाल लावलेला आहे. तो तह असा :

" संभाजी राजा, छत्रपती राजशक १० . . . . करार करून देत आहेत. (वरील तहाप्रमाणे सुरवातीचा मजकूर).


(१) माझ्या नोकरांकडून जो काही ताप इंग्रजांस दिला गेला किंवा माझ्याशी जे त्यांचे भांडण झाले ते त्यांनी विसरून जाऊन त्याचा विचार काढू नये किंवा त्याबद्दल आकस ठेवू नये. मीही तसेच करावे. हा तह करार झाल्यानंतर जर काही कमीजास्त चुकून घडले तर त्याचाही विचार न करता एकमेकांशी बोलून मैत्री राखावी. हा मुद्दा मान्य आहे. (२) इंग्रजाना व त्यांच्या व्यापाऱ्यांना माझ्या राज्यात व बंदरात येण्याची मुभा असावी. व्यापारार्थ माल आयात करणे व निर्यात करणे तो नेहमीची ठरीव जकात देऊन करावा. जकातीवरील अधिकाऱ्यांनी इतर निष्कारण त्रास देऊ नये. अशीच सवलत माझ्या व्यापाऱ्यांना व प्रजेला इंग्रजांच्या बंदरांत मिळेल. करार मान्य. (३) (प्रथम भाग कर्नाटकाच्या कलम ४ प्रमाणे) माझ्या राज्यात . . . . भरपाई करून मिळेल. माझ्या प्रजेच्या बाबतीतही इंग्रज हीच व्यवस्था पाळतील. (४) इंग्रजांची जहाजे, गुराबे किंवा होड्या व्यापारी माल आणण्या-नेण्यास रवाना झाल्या असता, त्यातील एखादे वादळी हवेमुळे जर राज्यातील बंदरात शिरले तर त्याला हवा निवळताच परत जाण्यास विनात्रास किंवा जकात न घेता परवानगी द्यावी. परंतु एखादे जहाज वगैरे वादळाने फुटून जर किनाऱ्यास लागले व माझ्या सुभेदारांनी वगैरे पकडले तर त्यांनी त्यास शक्य ती मदत करून त्यातील जो माल आयात होईल त्यावर नेहमीप्रमाणे जकात

घ्यावी. माझ्या वडिलांचे वेळी जो शिरस्ता होता तोच मी पाळीन व इतर ख्रिश्चन व्यापाऱ्यांना ज्या सवलती मिळतात त्या माझ्याही बंदरात मिळतील. करार मान्य. (५) माझा व इंग्रजांचा जो तह झाला आहे त्यात जर कोणी मतभेदाचा प्रश्न काढला तर तो दोघांनी विचारविनिमय करून मिटवावा. तहास कोणत्याही प्रकारे बाध आणू नये. दोघांस मान्य. (६) माझे व मोगलांचे सारखे युद्ध चालू आहे. त्यात माझ्या लोकांनी मोगली प्रदेशात लूटमार करिताना जर इंग्रजांच्या वखारीची लूट केली व माल नेला तर तो माल सुभेदारांनी किंवा हवालदारांनी परत करावा. तसेच एखादे वेळी जर आमच्या वखारीचे लोक किंवा अडते कैद केले गेले तर त्यांस त्रास न देता सोडून द्यावे. (७) माझी व मोगलांची अनेक गलबते समुद्रात वावरतात. तरी मोगलांचे एखादे जहाज माझ्या लोकांनी धरले आणि त्यात जर इंग्रजांचा माल असला व त्यावर त्यांच्या खुणा वगैरे असल्या तर त्या खुणा वगैरे पटवून दिल्यास त्यांना त्यांचा माल परत मिळावा. इंग्रजांनीही भरलेल्या जहाजांत, होड्यांत वगैरे माझ्या प्रजेचा माल आढळल्यास तो त्यांनी माझ्या प्रजेस परत द्यावा. दोघांस करार मान्य. (८) फोर्ट सेंट जॉर्जच्या कलम ५ प्रमाणे. (९) इंग्रजांनी सुचविले की राजापुराहून बालाघाटकडे जाणाऱ्या त्यांच्या मालावर आदिलशाहीत जशी जकात घेतली जाई तशी घ्यावी. तरी जी जकात आज रूढ असेल तीच घेतली जाईल. (१०) इंग्रजांस व त्यांच्या व्यापाऱ्यास माझ्या राज्यात व बंदरात माझ्या रहिवाशांकडून व व्यापाऱ्यांकडून न्याय्य किमतीस वाटेल तो माल विकत घेण्यास मुभा असावी. सुभेदार किंवा इतर अधिकाऱ्यांनी रीतसर जकात घ्यावी. त्याखेरीज आकसाने किंवा इतर कारणाने आडवू नये. (११) पोर्तुगीज, डच व इंग्रजांत लढा चालू आहे तरी आम्ही इंग्रजांना किंवा त्यांना लढ्यात मदत करणार नाही. इंग्रज व माझ्यात झालेला तह बिनविरोध दोघांकडून पाळला जावा. (१२) फोर्ट सेंट जॉर्जचे कलम ६ प्रमाणे, शेवटी पुस्तीः आणि इंग्रजही हाच करार माझ्या प्रजेच्या वगैरे बाबतीत पाळतील. (१३) एखादा इंग्रज किंवा त्यांचा अधिकारी गुन्हा करून माझ्या हद्दीत पळून आला आणि त्याबाबत माझ्या अधिकाऱ्यांकडे मागणी केली तर त्याला पकडून इंग्रजांच्या ताब्यात देण्याची माझे अधिकारी खबरदारी घेतील. असाच करार माझ्याही माणसांबाबत इंग्रज पाळतील. (१४) माझ्या प्रजाजनांपैकी कोणी जबरदस्तीने इंग्रजांच्या वखारीत शिरेल व भांडण करील तर त्याच्या गुन्ह्याचे पारिपत्य सुभेदार चौकशी करून करतील ; आणि जर दोष इंग्रज माणसाकडे असेल तर त्यास सुभेदार शृंखलाबद्ध करतील व मुंबईस कळवितील. त्यांचे उत्तराप्रमाणे त्याला शासन करतील किंवा सोडून देतील. (१५) मुंबई बेटावर जळणाची वाण असल्याने इंग्रजांना माझ्या प्रदेशात ते विकत घेण्यास

व जकातीविना नेण्यास परवानगी असावी. मागील प्रघात पुढे चालू राहील. जकात मागे घेतली जात होती. यापुढेही ती त्याचप्रमाणे घेतली जाईल. (१६) इंग्रजांची राजापूरला एक वखार होती. त्यावेळी राजापूराचे व्यापाऱ्यांस माल विकला होता. त्याबाबत इंग्रजांचे येणे आहे. तरी त्याबाबत सुभेदार व हवालदार यांनी चौकशी करून न्याय्य तो वसूल करून देणे. (१७) इंग्रजांनी नागोठणे व पेण येथे वखारी काढाव्यात, परंतु, त्यांना घाटावरून आयात-निर्यात केलेल्या सर्व मालावर राजापूरला जशी जकात देत होते तशी द्यावी लागेल. त्यांना इतर त्रास होणार नाही. (१८) फोर्ट सेंट जॉर्जच्या ७ व्या कलमाप्रमाणे. (१९) इंग्रजांकडून कुदाबंदापूर व इतर ठिकाणाहून जो माल घेतला होता त्याबाबत माझे वडील शिवाजीराजे यांनी १० हजार पाछाई होन देण्यास संमती दिली होती. त्या रकमेतून राजापूरची वखार बांधण्यास जो खर्च आला तो व त्यावर आणखी होणार तो आणि जी रक्कम आतापर्यंत दिली गेली ती वजा जाता जी बाकी राहील ती इंग्रजांना नारळ व सुपारी यांच्या रूपाने मी देईन. (२०) फॅक्टरी बांधकामाच्या तपशिलाचा मजकूर सेंट फोर्ट जॉर्जच्या कलम ९ प्रमाणे. शेवटी अधिक मजकूर असा : " मात्र अशी वखार बांधण्यास परवानगी फक्त ज्या इंग्रजांना कॅ. रिचर्ड केगविन यांनी मान्यता दिली असेल त्यालाच द्यावा, इतर इंग्रजांना देऊ नये." (२१) फोर्ट सेंट जॉर्जच्या कलम २ प्रमाणे. (२२) इंग्रजांनी फक्त टाकसाळीतच नाणी पाडण्याकरिता सोने व चांदी आणावी, इतरत्र नाही. अशा सोन्या चांदीवर नेहमीचे व्याज (usual interest) द्यावे लागेल. (२३) फोर्ट सेंट जॉर्जच्या तिसऱ्या कलमाप्रमाणे. (२४) फोर्ट सेंट जॉर्जच्या ९व्या कलमाप्रमाणे. (२५) इंग्रजांनी सूचना केली की, सुभेदारांनी मुंबईस वकील पाठवू नयेत. माझ्याशिवाय कोणीही वकील पाठवणार नाही; मोठा व महत्त्वाचा प्रश्न असेल तर मीच वकील पाठवीन. परंतु, इतर वेळी सामान्य बाबतीत सुभेदार एखाद्या माणसाबरोबर पत्र पाठवतील व उत्तर नेतील. (२६) फोर्ट सेंट जॉर्जच्या ११व्या कलमाप्रमाणे. (२७) इंग्रजांनी असे सुचविले की, त्यांचे सिद्दीशी वाकडे आले आहे. तेव्हा जर अशा परिस्थितीत माझी मदत लागली तर मी देईन. (२८) इंग्रजांनी असे सुचविले की, ते ज्या ठिकाणी माल विकत घेतात तेथे एकदाच जकात घ्यावी. नंतर तो नेत असता वाटेत अटकाव होऊ नये. परंतु जी चाल माझ्या पित्यापासून चालत आहे तीच यापुढे चालेल. ती सुरुवातीपासूनच लागू आहे. (२९) फोर्ट सेंट जॉर्जच्या १०व्या कलमाप्रमाणे. (३०) इंग्रजांनी असे सुचविले की, त्यांच्या फत्तेमारीस जाण्यायेण्यास संपूर्ण मुभा असावी. त्यांनी आणलेली व नेलेली पत्रे विनाविरोध जाऊ

द्यावी. असल्या फत्तेमारींनी इंग्रजांच्या सिलासह जी पत्रे आणली असतील तेवढीच फक्त सील तपासल्यानंतर अडवली जाणार नाहीत. या करार केलेल्या कलमांप्रमाणे काहीही भानगड न काढता वागू व कलमे पाळू."[१] वरील तहाने संभाजी महाराजांच्या इच्छेप्रमाणे इंग्रजांनी सिद्दीला मुंबईत थारा व साहित्य दिले नाही. त्यामुळे साहजिकच मराठ्यांच्या मुलखात सिद्दीचे उपद्रव देणे महाराजांच्या अंतापर्यंत बंद पडले.

□□



मराठा आरमार

---

१ ओर्मे, व्हॉ. १, पृ. १७७-१९२ ; त्रैमासिक, भा. २, १९३२, पृ. २७-३७.

३२. संभाजी महाराजांचा पोर्तुगिजांशी झगडा (इ. स. १६८०-१६८४)

शिवाजी महाराजांनी आपल्या निधनापूर्वी, १६८० सालच्या मार्च महिन्यात गोव्यावर स्वारी करण्याची तयारी चालविली होती. त्याच सुमारास संभाजी महाराजांनी पन्हाळ्यास असता १६८० च्या मे, महिन्यात आपला वकील रामोजी नाईक ठाकूर यास गोव्याचे हंगामी व्हाईसरॉय आंतोनियु पाईसूद सांदी याजकडे मित्रत्वाची बोलणी करण्यासाठी पाठविले होते. त्याजबरोबर कोकणचा सुभेदार रायाजी पंडितही होता. पोर्तुगीज व्हाईसरॉयने पत्र पाठवून आपली मित्रत्वाचा तह करण्याची तयारी दर्शविली. पण तह लांबणीवर पडला आणि इ. स. १६८२ साल उजाडले. संभाजी महाराज गोव्या नजीकच्या अंजदीव बेटावर किल्ला बांधणार असल्याची बातमी पोर्तुगिजांना समजली. तेव्हा त्यांनी आपले आरमार रवाना करून अंजदीव बेटावर तटबंदी करविली. व संभाजी महाराजांस विनंती केली की, आपल्याशी मित्रत्वाच्या तहाची बोलणी करण्यास अधिकृत माणसे पाठविली आहेत. परंतु संभाजी महाराजांनी अंजदीव बेट पोर्तुगिजांनी ताब्यात घेतले म्हणून जोरदार तक्रार केली. त्यावर विजरईने (व्हाईसरॉय) कळविले की अंजदीव बेट पोर्तुगिजांचेच असून त्याबाबत बोलण्यास संभाजी महाराजांस अधिकार नाही. अशारीतीने अंजदीव बेटासंबंधी मराठे व पोर्तुगीज यांत वाद सुरू झाला.[१] संभाजी महाराजांनी अंजदीव बेटावर किल्ला बांधल्यास गोव्यास उपद्रव झाला असता तो होऊ नये म्हणून पोर्तुगिजांनी तो किल्ला आपल्या ताब्यात घेऊन तटबंदी केली, तरीसुद्धा पोर्तुगीज व मराठे यांचे संबंध बिघडले नाहीत.

१६८२ ऑगस्टमध्ये पोर्तुगीज व्हाईसरॉयला बातमी समजली की मोगल फौज संभाजीविरुद्ध मोठ्या तयारीनिशी चाल करून जात आहे. व्हाईसरॉयने आज्ञापत्र काढून चौल, वसई व दमण येथील आपल्या अधिकाऱ्यास कळविले की त्यांनी मोगल फौजेस पोर्तुगिजांच्या मुलूखांतून जाऊ द्यावे.[२] पोर्तुगिजांनी कल्याणच्या नदीजवळ पारसिक टेकडीवर एक किल्ला बांधला. त्यांच्यामते संभाजीवर चाल करून मोगल सैन्य संभाजीचा

---

१ कमल गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. १६४.

२ पर्वते, पोर्तुगिज-मराठा रिलेशन्स्, पृ. ७९.

पराभव करून विजयी होईल आणि त्याच्याकडून दक्षिण कोकणातील प्रदेश त्यांना मदत करून त्या मोबदल्यात आपण मिळवू असा त्यांचा विचार होता.[१] पोर्तुगिजांनी मोगलांस मराठ्याविरुद्ध मदत करण्याचे ठरविल्यावर मराठे सैन्य आणि पोर्तुगीज यांच्यात मे, १६८२ पासून चकमकी झडू लागल्या.[२] मोगलांची जहाजे अन्न व दारूगोळा भरून ठाणे नदीतून जात असता पोर्तुगिजांनी त्यांना अडथळा निर्माण न करता सुखेनैव जाऊ दिले हे पाहून संभाजी महाराजांस राग येऊन त्यांनी उत्तर कोकणमध्ये पोर्तुगिजांवर चाल केली.[३] इ. स. १६८३ मध्ये संभाजी महाराजांनी चौलच्या किल्ल्यास वेढा घातला. तसेच काही मराठी सैन्य गोव्यावर चालून गेले. एक हजार घोडेस्वार, व दोनशे पायदळ यांच्या साहाय्याने संभाजी महाराजांनी पोर्तुगिजांच्या ताब्यातील तारापूरवर हल्ला करून ते जमीनदोस्त केले. चौलला घातलेला मराठ्यांचा वेढा तसाच चालू होता. करंजा, पंचबेट ताब्यात घेतले. ते मराठ्यांच्या ताब्यात वर्षभर राहिले. पोर्तुगिजांच्या ताब्यातील वसई आणि दमण यांच्या अनेक स्थळावर संभाजीने हल्ले करून त्यांचा नाश केला. संभाजीचा पेशवा निळू मोरेश्वर याने चौलच्या किल्ल्यास वेढा घातला तो सहा महिने चालला.[४] दिनांक १३ जुलै १६८३ रोजी मराठ्यांनी रेवदंडा किल्ल्यावर हल्ला चढविला पण पोर्तुगिजांनी तो परतवून लाविला. डॉन मनोन दोपोडो सिल्वेरीया हा वसईचा पोर्तुगीज अधिकारी होता. त्याने जंजिऱ्याच्या सिद्धी याकूब खानाकडे चारशे माणसांची मदत मागितली. ती त्याने दिली. तेव्हा ही चारशे माणसे समुद्रामार्गे पोर्तुगिजांनी रेवदंडा किल्ल्यावर पोहोचविली.[५]

दिनांक ८ ऑगस्टच्या सकाळी मराठ्यांनी चेऊलवर हल्ला केला. मोठमोठ्या शिड्या लावून किल्ल्याच्या तटावर चढून जाण्याचा प्रयत्न केला. हे कळताच पोर्तुगिजांनी मोठा भोंगा वाजवून आवाज काढला. त्यावेळी शहरातील लोक धावत येऊन त्यांनी शिड्या फेकून दिल्या.[६] मराठ्यांनी इ. स. १६८३ मध्ये चौलच्या तोंडाशी असलेला कुर्लाई हा लहानसा किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला पण तो यशस्वी झाला नाही. मराठ्यांनी किल्ल्याचे तट चढून जाण्यासाठी ६ गुप्तहेर पाठविले. ते तटबंदी चढून किल्यावर गेले तेव्हा त्यांना लगेच पकडून पोर्तुगिजांनी त्यांचा अनन्वित छळ करून त्यांच्या येण्याचा उद्देश त्यांच्याकडून वदवून घेतला आणि त्यांना कंठस्नान घातले.

---

१ पर्वते, पोर्तुगीज-मराठा रिलेशन्स, पृ. ८०.

२ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. १६१.

३ कित्ता, पृ. १६५.

४ कित्ता, पृ. १७३-१७४.

५ पर्वते, तत्रैव, पृ. ८२.

६ सरकार, औरंगजेब भाग ४, पृ. २२७.

पोर्तुगीज व मराठे युद्धाची तयारी आपापल्या परी करू लागले होते. ३१ जुलै १६८३ रोजी मराठ्यांनी चेऊलवर जोराचा हल्ला केला. व त्यास वेढा घातला काही महिने निकाराचा लढा झाला. पण मराठ्यांना ते जिंकून घेण्यात यश आले नाही.[१] चौलचा वेढा उठवण्यास मराठ्यांस भाग पाडण्यासाठी गोव्याचा व्हाईसरॉय कोंदी द ऑलव्होर याने १७ ऑक्टोबर रोजी फोंड्यावर स्वारी केली. मराठ्यांकडून फार प्रतिकार होईल अशी आलव्होरची कल्पना नव्हती. तरी २२ ऑक्टोबर रोजी पोर्तुगिजांचे सैन्य किल्ल्यावर अखेरचा हल्ला करण्याची तयारी करीत असताना संभाजी महाराज राजापूरवरून फोंड्यास तातडीने आले. मराठे पिछाडी मारून आपली परत जाण्याची वाट अडवतील म्हणून ऑलव्होरने वेढा उठविला व तो गोव्यास जाण्यास परत निघाला. त्यावेळी मराठ्यांनी पोर्तुगिजांवर हल्ला करून आल्व्होर त्यांचे बहुतेक लोक कापून काढले. व्हाइसरॉय २ वेळा मृत्यूच्या दाढेतून वाचला. जखमातून तो मोठ्या शिकस्तीने वाचला पण त्याच्या तोफा व इतर सामान मराठ्यांच्या हाती सापडले. संभाजी महाराजांनी शेवटपर्यंत त्यांचा पाठलाग केला.[२]

चौलचा वेढा तसाच चालू राहिला व फोंड्यातून संभाजी महाराज लवकर निघून जातील ही पोर्तुगिजांची समजूत चुकीची ठरली. तारीख २४ नोव्हेंबर रोजी रात्री ओहोटीच्या वेळी संभाजी महाराजांच्या सैन्याने जुवे या पोर्तुगिजांच्या बेटामध्ये जाऊन तेथील किल्ला हस्तगत केला. या बेटातून ओहोटीच्या वेळी पायवाटेने शहरात जाणे शक्य होते. दुसऱ्या दिवशी आलव्होरने चारशे शिपायांसह जुवे बेटावर हल्ला केला. पण मराठ्यांच्या घोडदळास भिऊन पोर्तुगिजांचे बरेचसे सैनिक नदीच्या तीराकडे पळाले. यावेळी संभाजी महाराज गोव्यानजीक गेल्यावर पालखींतून उतरून घोड्यावर स्वार झाले, आणि निकडीने जाण्यासाठी पाण्यात घोडा फेकला. त्यावेळी भरतीस सुरुवात झाली. महाराजांनी खासा घोडी यावरून जिनास पाणी लागेपर्यंत घोडा घातला. घोडा पोहणीस लागला, खंडोबल्लाळ यांनी उडी मारून महाराजांचा घोडा धरून पोहून बाहेर निघाले. ते समयी बहुत संतोष होऊन त्यास मोठे बक्षीस दिले.

पोर्तुगिजांनी पुन्हा तहाचे बोलणे लावले. संभाजी महाराजांनी ५० लाख रुपये दंड मागितला पण तो पोर्तुगिजांनी मान्य केला नाही. त्यामुळे या वेळीही तह असाच राहिला.

---

१ फु. रे. ईस्ट इंडिया कं. रेकॉर्डस्, मुंबई ते सुरत ८ ऑक्टोबर, १७८३.

२ सरकार, औरंगजेब भाग ४, पृ. २७४-७५.

तारीख १२ डिसेंबर रोजी मराठ्यांनी साष्टी व बारदेशाच्या मुलूखावर हल्ला करून सगळीकडे लूट व जाळपोळ केली. रायतर, मडगांव, आग्वाद, व रेईसमागुस या चार किल्ल्यांखेरीज इतर किल्ले मराठ्यांनी जिंकून घेतले. गोवे बेट घेण्यासाठी त्यांचा प्रयत्न चालू होता. अशीच लढाई चालू राहिली, तर हे बेट संभाजी घेणार, या धास्तीने आल्व्होरने जुन्या गोव्यातील बोंजेज् या देवालयामध्ये ठेवलेल्या सेन्ट फ्रान्सिस झेवियर यांच्या शवाच्या हातात आपल्या हातातील राजदंड दिला व त्याची संकट निवारणार्थ करुणा भाकली. त्याची करुणा ऐकूनच की काय शहाआलम जवळ आल्याची खबर संभाजीस मिळाली. त्या बरोबर संभाजीने गोव्याचा वेढा उठवला ; नाहीतर यावेळी गोवे मराठ्यांच्या हातात पडल्यावाचून राहिले नसते. थोड्याच दिवसात मराठे व पोर्तुगीज यामध्ये तह झाला. हा तह फार दिवस टिकला नाही. उत्तर कोकणात संभाजी महाराजांच्या सैन्याने तारापूर व मनोरा ही ठिकाणे घेतली. आयेरीचा गडही पुन्हा काबीज केला. करंजे, माहीम, व तारापूर या किल्ल्यास वेढा घालून वसईच्या महाद्वारापर्यंतच्या भूप्रदेशाचा मराठ्यांनी ताबा घेतला. मनोर येथील किल्ला आणि चर्च मराठ्यांनी जमीनदोस्त केले. याचा सूड घेण्यासाठी व्हाईसरॉयने कोकणातल्या बऱ्याच देसायांशी संगनमत करून त्यास संभाजीविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त केले. या देसाईंनी मराठ्यांविरुद्ध उठाव केला, छापे घातले आणि पुष्कळ लूट मिळविली. यावेळी शहाजादा अकबाराचा भाऊ शहाआलम याने मराठ्यांच्या प्रदेशात शिरून आक्रमणे सुरू केली. शहाजादा अकबराने संभाजी महाराज आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये तह घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू केला. संभाजी महाराजांस एकाच वेळी दोन आघाड्यांवर लढणे अशक्य झाल्याने त्यांनी पोर्तुगिजांशी तह करण्याची तयारी दर्शविली. यावेळी इटालियन प्रवासी मनूची गोव्यांत होता. पोर्तुगिजांनी मनूचीस विनंती केली की, तुम्ही जाऊन संभाजीस भेटा आणि त्याजबरोबर तह ठरवून आमचा बचाव करा, मनूचीने जाऊन संभाजी महाराजांची भेट घेतली. मनुचीच्या मध्यस्थीमुळे संभाजी महाराजांच्या वकिलाची व गव्हर्नरची भेट झाली. वकिलांनी सांगितले की संभाजीराजांनी गोवे प्रांताच्या चौथाईची मागणी केलेली आहे. ही मागणी गव्हर्नरने मान्य केली नाही. ह्या तहाच्या वाटाघाटीत कालहरण झाले ते पोर्तुगिजांच्या पथ्यावर पडले. पोर्तुगिजांशी युक्तीने तह करण्याची कामगिरी कलुशावर सोपवून संभाजी महाराज शहाआलमवर स्वत: चालून गेले. तहाच्या वाटाघाटी होऊन तारीख ७ जानेवारी १६८४ रोजी मुख्य बाबी कायम झाल्या.

तहाचा आशय खालीलप्रमाणे :

(१) युद्ध सुरू झाल्यापासून जे प्रदेश किल्ले, जहाजे, तोफा, सामाने वगैरे हस्तगत केले असेल ते उभयतांनी एकमेकांस परत करावे.

(२) एकमेकांनी पकडलेले कैदी परत करावे.

(३) वसई व दमण या तालुक्यातील गांवखंडी व चौथाई या दोन बाबींचा वसूल पोर्तुगिजांनी संभाजी राजांस द्यावा. आणि संभाजी राजे यांनी त्या प्रदेशातील परचक्राचे निवारण करावे.

(४) उभयतांना एकमेकांचे प्रदेशात व्यापारानिमित्त संचार करण्याची मोकळीक असावी.

(५) पोर्तुगिजांनी आपल्या हद्दीतून बादशहाचे फौजेस दारूगोळा व धान्यसामग्री वगैरे पोहचवू नये.

गोव्याच्या मोहिमेत मराठ्यांचे आरमार कृतिशील होते.[१] फोंडा येथे झालेल्या युद्धात सरदार येसाजी कंक व त्याचा मुलगा कृष्णाजी यांनी पराक्रम केल्याबद्दल त्या उभयतांना पत्रे लिहून संभाजी महाराजांनी शाबासकी दिली. आणि पारितोषिकेही दिली. या लढाईत कृष्णाजी कंक यास फार जखमा झाल्या त्या फुटून तो घरी मयत झाला. पारितोषिक प्रत्येकास एक सहस्र होन दिले.[२]

१८ फेब्रुवारी १६८५ नंतर कोकणातून शहाआलम जाताच पुन्हा पोर्तुगीज आणि मराठे यांच्या भांडणास सुरुवात झाली. सौंदेकराने कारवारच्या देसायाच्या मदतीने कारवारातील संभाजी राजे यांच्या आरमारातील ६० लढाऊ गलबते, दहा पाले व कारवारच्या नदीत असलेली दोन जहाजे आपल्या ताब्यात घेतली.[३]

पोर्तुगीज आरमार मराठी आरमारापेक्षा श्रेष्ठ होते. पोर्तुगिजांशी लढाई काढल्याने वेळ वाया गेला आणि मनुष्यहानीही झाली. औरंगजेब दक्षिणेत आल्यावर पोर्तुगिजांनी संभाजी राजे यांनी आपल्याशी मैत्री करावी म्हणून सुचविले होते. तेव्हा पोर्तुगिजांशी युद्ध टाळणे हे युद्धनीतीच्या दृष्टीने योग्य ठरले असते असे म्हणावे लागते.

वाडीकर सावंतांचा संभाजीस विरोध (सन १६८५-८६) :

वाडीकर सावंतांना पोर्तुगिजांनी चुचकारले आणि सांगितले की तुम्ही आम्ही शेजारी संभाजीराजे क्रूर आहे त्याचा पाडाव करण्यात तुमचे आमचे दोघांचेही हित आहे. सावंतांच्या कुडाळ प्रांतावर संभाजी राजांच्या कारकीर्दीच्या प्रारंभापासून छत्रपतींची सत्ता

१ पिसुर्लेकर, पोर्तुगीज-मराठे संबंध, पृ. ११४.

२ राजवाडे खंड १५, ले. ३६५.

३ पिसुर्लेकर, तत्रैव पृ. १२३.

चालत होती. ह्या प्रांतावर संभाजी राजांची सत्ता १६८६ सालच्या ऑक्टोबरपर्यंत होती.[१] त्या अगोदरच सावंत पोर्तुगिजांना सामील होऊन त्या उभयतांनी दिनांक ८ फेब्रुवारी १६८५ रोजी संभाजी महाराजांविरुद्ध तह केला. त्यातील मुख्य कलमे अशी :—

(१) उभयतांनी संभाजी महाराजांशी खुष्कीने व आरमाराने युद्ध चालवावे.

(२) जो प्रदेश हस्तगत होईल त्यातील दोन हिस्से सावंतास व एक हिस्सा पोर्तुगिजांस मिळावा.

(३) सावंताना दारूगोळा पोर्तुगीज पुरवितील.

(४) पोर्तुगिजांचे राज्यात सावंतास धर्माचाराचे स्वातंत्र्य राहील.

(५) पोर्तुगिजांनी परभारे संभाजी राजांशी तह करू नये.

(६) सावंतास खर्चाची जरूर लागल्यास युद्ध सुरू झाल्यावर पोर्तुगीज सरकार त्याची निभावणी करील.

संभाजीराजांविरुद्ध हा उठाव बादशहाने केलेला असावा. वरील तह झाल्याबरोबर दिनांक १२ फेब्रुवारी १६८५ रोजी सावंताने संभाजी राजांवर मोहीम सुरू केली. वेंगुर्ल्याचे खाडीत आरमार नेऊन पुष्कळ लूट पैदा केली. हे वर्तमान संभाजी राजांस समजताच ते कोकणात उतरून सावंतावर चालून गेले. तेव्हा काही काळ सावंत गप्प बसला. पोर्तुगीज गव्हर्नर आपल्या दिनांक २४ जानेवारी १६८६ च्या पत्रांत संभाजी राजे व पोर्तुगीज यांचे भांडण चालू असल्याचे मुंबईकर इंग्रजांस आपल्या पत्रात लिहितात.[२] दिनांक २९ जानेवारीच्या पत्रात पो. गव्हर्नर कळवितो की गोव्याच्या प्रांतात आता एक फोंड्याशिवाय दुसरे ठिकाणी संभाजीचा अंमल राहिलेला नाही. अशेरीचा किल्ला उत्तर कोकणातील वाघा जवळचा प्रांत संभाजीकडे गेलेला पोर्तुगिजांनी परत घेतला. अशारीतीने पोर्तुगिजांनी दिनांक १ ऑक्टोबर १६८७ पर्यंत मराठ्यांनी व्यापलेला आपला प्रदेश सोडविला. अशा रीतीने संभाजी राजांची सत्ता खालावत चाललेली आहे, असे पोर्तुगीज गव्हर्नरने आपल्या वरिष्ठांस युरोपात कळविले.[३]

□□

१ शिवचरित्र साहित्य खंड ४, ले. ७३८.

२ बेंद्रे, संभाजीचरित्र, पृ. ३२१.

३ कित्ता, पृ. ३२२.

३३. स्वराज्यावरील मुघली परचक्र---पश्चिम महाराष्ट्रात मोगलांची घुसखोरी (इ. स. १६८१ ते १६८५)

शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केले ते विजापूर राज्याच्या मराठी भागातून. मोगल अंमलाखालील मुलूख त्यांनी आपल्या अंमलाखाली आणला नाही. ह्याला अपवाद नाशिकजवळचा बागलाण हा होय. इ. स. १६७० मध्ये शिवाजी महाराजांनी मोगलांविरुद्ध युद्ध पुकारले आणि बागलाणातील अनेक किल्ले जिंकून घेऊन, जव्हार आणि रामनगर (गुजरातेतील धरमपूर) येथे आपली सत्ता स्थापिली. स्वराज्याच्या या विस्तारामुळे मराठ्यांना सुरतेची वाट मोकळी झाली.

हा धोका ओळखून मोगलांनी मराठ्यांना बागलाणातून काढून लावण्याचे सतत प्रयत्न केले. इ. स. १६८० पर्यंत त्यांच्या प्रयत्नांना फारसे यश आले नाही. बागलाणातील मुल्हेर हा एकच महत्त्वाचा किल्ला त्यांच्या ताब्यात राहिला होता. साल्हेर, अहिवंत, रामसेज, विश्रामगड आणि नाशिकजवळचा त्रिंबकेश्वर हे किल्ले मराठ्यांच्या ताब्यात राहिले होते. याच वाटेने मराठे सुरतेकडे जात. खानदेशात मिळविलेली लूट, मराठे साल्हेरच्या किल्ल्यात आणून ठेवीत. शहजादा अकबर हा कोकणात उतरला तोही बागलाणच्या वाटेने. औरंगजेबास हे ठावूक होते की मोगलांची कोकण स्वारी यशस्वी व्हावयाची तर बागलाणातील मराठ्यांचे किल्ले हस्तगत करणे आवश्यक होते.

दक्षिणेत निघण्यापूर्वी औरंगजेबाने उत्तरेत रजपुतांविरुद्ध सुरू असलेले युद्ध थांबविले. त्यांच्याशी तह करून दिनांक ५ सप्टेंबर १६८१ रोजी तो अजमीरहून निघाला. दिनांक १३ नोव्हेंबर १६८१ रोजी तो बऱ्हाणपूरला पोचला. स्वतः निघण्यापूर्वी त्याने आपला मुलगा शहजादा आजम याची दक्षिणच्या स्वारीवर जाण्यासाठी नेमणूक केली.

औरंगजेब दक्षिणेत उतरताच त्याने मराठी राज्यावर आक्रमण सुरू केले. ह्या आक्रमक हालचालींची व मराठ्यांच्या चढाईची माहिती खालील प्रकरणात दिली आहे. (१) पश्चिम महाराष्ट्रात मोगलांची घुसखोरी (२) कोकण प्रदेशात मोगलांचे आक्रमण (३) पश्चिम महाराष्ट्राच्या मध्य भागातील हालचाली (४) पश्चिम महाराष्ट्राच्या दक्षिण भागातील हालचाली.

औरंगजेब बादशहा आपला नाश करण्यासाठी दक्षिणेत येत आहे हे संभाजी महाराजांना समजले होते म्हणून त्यांनी युद्धाची तयारी केली. मोठमोठ्या गडावर साठे करून ठेविले. नाशिक जिल्ह्यातील बागलणांचा प्रदेश मराठ्यांकडून हिसकावून घेण्याचे औरंगजेब बादशहाने ठरविले आणि आपले लक्ष बागलणांकडे वळविले. त्यासाठी त्याने दिनांक १ मार्च १६८० रोजी खानजहान बहादूर यास शिवाजी राजांनी घेतलेले किल्ले ताबडतोब मोगलांच्या ताब्यात घेण्याचा हुकूम दिला. लगेच त्याने अहिवंत किल्ल्यास वेढा घातला. पण मराठ्यांनी तो वेढा मारून काढला.

ह्यावेळी महाराजांच्या हुकूमाने संभाजीराजे मोगलांचा हल्ला परतवून लावीत होते. मराठे हे मोगली मुलूखात पसरल्यामुळे बहाद्दूर खानाने आपले बाजारबुणगे बहाद्दूरगड येथे ठेविले. मराठे जमाव करीत जिकडे जात तिकडे त्यांचा पाठलाग करीत तो फिरू लागला. तो परंड्याच्या दिशेने रवाना झाला. त्याने काही काळ भीमा नदीच्या काठांवर तळ दिला, अहमदनगर आणि औरंगाबाद प्रांतात मराठे व मोगल यांच्या अनेक चकमकी होऊ लागल्या. इ. स. १६८० च्या ऑगस्ट महिन्यात पावसाळ्यानंतर मुघलांशी उघड सामना देऊ असे संभाजी महाराजांनी खानजहान बहाद्दूर यास कळविले होते.[१]

सप्टेंबर २९ ते ऑक्टोबर १२ चे दरम्यान पंतप्रधान मोरोपंत निवर्तले. निळो मोरेश्वर यास पेशवे पदी नेमिले. नोव्हेंबर १२ ते डिसेंबर ११ दरम्यान हंबीरराव यांनी बऱ्हाणपूर मारिले. औरंगजेब इ. स. १६८१ च्या डिसेंबरात बऱ्हाणपुरास आला. आणि २२ मार्च १६८२ रोजी औरंगजेब औरंगाबादेस पोहोचला. अहमदनगर व औरंगाबाद प्रांतात मराठे मुघल यांच्या अनेक चकमकी होऊ लागल्या. औरंगजेबाचे मोगली सैन्य औरंगाबादेस ३ मार्च १६८१ ला आले. यावेळी संभाजी महाराज दक्षिणेत लुटमार करण्यात गुंतले होते. संभाजी महाराजांनी मोगल सैन्यास औरंगाबादेत प्रवेश करण्यास संधी दिली. सैन्य स्थिरावल्यावर त्याने पाण्यात विष घालून व रस्ते अडवून त्याचा नाश केला त्यामुळे औरंगजेबाच्या सैन्याची फार मोठी हानी झाली.

इ. स. १६८१ च्या एप्रिल-मे महिन्यापासून नाशिक जिल्ह्यात मुघलांनी आक्रमक हालचाली सुरू केल्या होत्या. इ. स. १६८२ च्या सुरुवातीस महमद अजमशहाला औरंगजेबाने साल्हेरीचा किल्ला घेण्याची कामगिरी सांगितली [२] परंतु गडावर प्रत्यक्ष हल्ला होण्यापूर्वी मुल्हेरचा किल्लेदार व बागलाणचा सुभेदार यांनी साल्हेरच्या किल्लेदारास फितवून किल्ला मोगलास देवविला... साल्हेरचा गनीम किल्लेदार असोजी यांच्याशी

१ बेंद्रे, संभाजी महाराज, पृ. २२४.

२ कित्ता, पृ. २३३.

मैत्री घडवून व त्यांचेशी पत्रव्यवहार करून व नजराणे देऊन त्यास आपलासा करून घेतला. अशा तऱ्हेने त्यास मिंधा केल्यानंतर त्यास पादशहाचा कौल किंवा फर्मान पाठवून चार हजारी मनसब देवविली.[१] अशा तऱ्हेने तलवार म्यानातून न काढताच व भाल्याची एकही फेक करावी न लागताच तो किल्ला पादशहाच्या ताब्यात आला.[२] पातशहाचे लोकात प्लेगची साथ फार जोरात फैलावून त्यात दरदिवशी निदान ८८० लोक मरत असल्याची बातमी इंग्रजी पत्रातून समजते. मोगली गोट व कबिले लुटून मराठी सैन्य त्यावर ताव मारीत होते अशा रीतीने मराठी सैन्य चांगल्या स्थितीत राहिले. साल्हेर मुल्हेर, रामशेज, त्रिंबकगड यावरील मोगल आक्रमणाला मराठे चांगले तोंड देत होते. नाशिक जिल्ह्यात औढा-पट्टा, कंचनगड, अंकाई-टंचाई, हनवंत गड, आवळा-इवळा याठिकाणी मराठा सैन्याने मुघल सैन्यास चोप दिला.[३] त्यामुळे मोगलांना औंढा व पट्टागड मराठ्यांकडून जिंकून घेता आले नाही. १६८१ च्या एप्रिल-मे महिन्यापासून नाशिक जिल्ह्यात मुघलांनी आक्रमक हालचाली सुरू केल्या होत्या.

रामशेजचा वेढा :

रामशेज किल्ला नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यात दिंडोरीच्या दक्षिणेस चार मैलावर नाशिकच्या उत्तरेस आहे. शहाबुद्दीन खान ह्यास ह्या किल्ल्याची माहिती असल्याचे औरंगजेबास ठाऊक होते म्हणून बादशहाने एप्रिल १६८२ मध्ये रामशेजचा किल्ला जिंकून घेण्याच्या कामावर शहाबुद्दीन खान याची नेमणूक केली, त्याप्रमाणे शहाबुद्दीन खानाने रामशेज किल्ल्यास वेढा घातला.[४] मोगल सैन्याने सुरुंग लावून, दम दम तयार करून मोर्चे बांधून किल्ला सर करण्याची शिकस्त केली पण मराठा किल्लेदाराने दाद दिली नाही. नंतर बादशहाने शहाबुद्दीन खानला परत बोलावून त्याच्या जागी खान जहान बहाद्दूर कोकलताश यास किल्ला घेण्यासाठी पाठविले. त्यानेही ह्या वेढ्यात शिपाईगिरीची शर्थ केली. किल्ल्यातील मराठ्यांस फसविण्याच्या युक्त्या लढविल्या पण त्या त्यांचे अंगाशी आल्या. बादशहास हे समजल्यावर त्याने त्यास परत बोलाविले (ऑक्टोबर, १६८२) आणि त्या जागी कासीम खान किरमानी ह्या शूर आणि तडफदार सरदाराची ह्या वेढ्याच्या कामावर नेमणूक केली.[५] त्यानेही खूप परिश्रम केले. पण काम काही पार पडले नाही. शेवटी बादशहाने वेढ्याचे काम

१ पगडी, मोगल-मराठा संघर्ष, पृ. २३-२४.

२ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. २१७.

३ कित्ता.

४ शिवचरित्र प्रदीप, पृ. ३१-३२.

५ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. २२०.

तहकूब केले. कासीम खानला दुसऱ्या कामगिरीवर रवाना करण्यात आले.[१] या वेढ्यासंबंधी जेधे करीन्यात थोडक्यात माहिती दिली असून ती वर दिलेल्या माहितीशी जुळणारी आहे.[२] अशारीतीने रामशेज किल्ला जिंकण्याचे काम इ. स. १६८४ नोव्हेंबर पर्यंत रेंगाळले. डिसेंबर, १६८४ मध्ये मोगल सरदार इखलास खान बहाद्दूरने रामशेज किल्ल्याच्या आसपास जमलेल्या मराठा जमावावर हल्ला करून मराठ्यांकडील २०० माणसे यमसदनास पाठविली. दरम्यान रामशेजच्या अनुभवी व हुशार किल्लेदारांची संभाजी महाराजांनी बदली दुसऱ्या किल्ल्यावर केली आणि रामशेजवर नवीन किल्लेदार नेमला. त्यानेही २/३ वर्षे मोगलांच्या हल्ल्यास दाद दिली नाही. तदनंतर मुल्हेरचा किल्लेदार नेकनाम खान याने रामशेजच्या नवीन किल्लेदारास अब्दुल करीम नावाच्या जमीनदारामार्फत वश करून घेतले.[३] त्याने फितूर होऊन रामशेज किल्ला मोगलांचे स्वाधीन केला.

त्रिंबकगड :

नाशिकच्या आग्नेयीस २० मैलांवर त्रिंबकगड आहे. त्रिंबकगडचा अधिकारी किल्लेदार केशव त्रिमल हा मुघलांनी रामशेज किल्ल्यास वेढा घातला त्यावेळी रामशेजला दारूगोळा व युद्धसाहित्य पुरवीत असे.[४] इ. स. १६८२ च्या फेब्रुवारीत मुघल सरदार बाहारामत खान याने त्रिंबकगडच्या तीन वाड्या जाळल्या. जाळलेल्या तीन वाड्या मराठ्यांनी पुन्हा बसविल्या तरी १६८४ च्या नोव्हेंबरात मुघल अधिकारी अकरमत खान आणि मरहमत खान यांनी पुन्हा त्या वाड्या जाळून ते मराठ्यांवर चालून गेले व त्यांनी मराठ्यांचा पराभव केला.[५] तरीही त्रिंबकगड मुघलांस शरण आला नाही तेव्हा तो गड घेण्यासाठी मुघल सरदार मातबरखान याने १६८८ च्या ऑगस्ट महिन्यात वेढा घातला.[६] किल्ल्याभोवती चौक्या बसवून मातबरखानाने दाणागोटा बंद केला. किल्ल्यातील लोक हवालदिल झाले. दिनांक ८ जानेवारी १६८९ रोजी त्रिंबक किल्ल्याचे मराठे अधिकारी तैलंगराव श्यामराव हे किल्ल्यावरून खाली उतरले आणि त्यांनी किल्ल्याच्या

१ पगडी, मराठे व औरंगजेब, पुणे १९६३ पृ. ९-१० गोखले शि.पु.सं., पृ. २२१.

२ शि.च.प्र., पृ. ४८.

३ पगडी, मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध, पृ. ११.

४ शि.च.प्र., पृ. ४८.

५ अखबरांत २६-११-१६८४.

६ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. २२९.

चाव्या मोगल सरदारांच्या स्वाधीन केल्या.[१] मातबरखानाने त्रिंबकचा किल्ला जिंकून घेतला म्हणून औरंगजेब बादशहाने त्यास रुपये तीस हजार बक्षीस दिले.[२]

संभाजी महाराजांचे मुघल प्रदेशांत आक्रमण :

शिवाजी महाराजांनी आपल्या शेवटच्या काळात इ. स. १६७९-८०त मुघली हद्दीत आक्रमण करून मुघलांच्या ताब्यातील मुलूख उद्ध्वस्त करण्याचे तंत्र अवलंबिले होते. संभाजी महाराज गादीवर आल्यावर त्यांनी सेनापती हंबीरराव मोहिते यांस तेच धोरण अवलंबण्यास सांगून बऱ्हाणपुरात जाण्याची आज्ञा केली. इ. स. १६८० च्या नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात हंबीररावाने बऱ्हाणपुरास जाऊन ते शहर लुटले.[३] द्रव्य मिळाले. त्यानंतर मराठा सैन्याने फेब्रुवारी १६८१ मध्ये धरणगाव लुटले.[४] आतापर्यंत पातशहाची वंशपरंपरागत राजधानी बऱ्हाणपूर व औरंगाबाद यावर कधीही घाला घातला गेला नव्हता. पण संभाजी महाराजांनी धैर्य आणि शौर्य दाखवून प्रथम वऱ्हाडचा सुभा लुटला व तिथून पस्तीस कोस जलदीने कूच करून बऱ्हाणपुरापासून दीड कोसावरील बहादुदूरपुरावर हल्ला चढविला. तोही अचानकपणे ; मराठे चालून येणार ह्याची कुणकुणही मुघल अधिकाऱ्यांस नव्हती. बऱ्हाणपुरातील सर्व पुऱ्यात हत्पुरा, श्रीमंत व दाट वस्तीचा होता. या बहादुदूरपुऱ्या भोवती सतरा पुरे होते व ते मुख्य शहराच्या पलीकडे होते. बहादुदूरपुऱ्यास मराठी सैन्याने इतका जबरदस्त वेढा दिला की त्यातून कोणी पुऱ्यातील माणूस बाहेर जाऊ शकला नाही. तसेच आपली संपत्ती वाचवू शकला नाही. काकरखान अफगाण बऱ्हाणपुऱ्याचा नायब सुभेदार होता. बऱ्हाणपुरात त्यावेळी तोच हजर होता. त्यासही मराठ्यांस थोपवून धरणे शक्य झाले नाही कारण तोही वेढ्यात सापडला होता. त्याचवेळी मराठ्यांनी बऱ्हाणपुराच्या सतरा पुऱ्यातील मुख्य पुरे हसनपुरा, शहागंज, शहाजहानपुरा, खुर्रमपुरा व नवाबपुरा वगैरेस वेढा दिला. हे पुरे जरी शहर पुऱ्याच्या कोटाबाहेर वसलेले होते तरी ते शहराचे विभाग होते. प्रत्येक पुऱ्यात सावकार व मोठ्या व्यापाऱ्यांजवळ मौल्यवान माळ व द्रव्यसंच होते ते सर्व लुटले गेले व पुरे जाळून टाकण्यात आले असे काफीखान म्हणतो.[५] मराठ्यांनी शिड्या लावून तटावर चढण्याचा प्रयत्न केला. शहरांतील सर्व मनसबदारांनी वेशी, तट, बुरुज, इत्यादी ठिकाणी

१ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. २२९.

२ पगडी, मोगल मराठा संघर्ष, पृ. ३६.

३ शिवचरित्र प्रदीप, पृ. ३१.

४ ओर्मे, व्हा. ११६ पृ. २९७, बेंद्रे, संभाजी, पृ. २२५.

५ बेंद्रे, संभाजी, पृ. २२७.

मोर्चे बांधून निकराने मराठ्यांचा प्रतिकार केला त्यामुळे ते शहरात येऊ शकले नाहीत पण मराठ्यांनी पुऱ्यामधून सोने, चांदी, जड-जवाहीर आणि मौल्यवान सामान घेतले इतर जिनसांची पर्वा केली नाही. वाहून नेण्यास शक्य नाही ते सामान त्यांनी टाकून दिले व नंतर ते निघून गेले.[१] इ. स. १६८० च्या नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात मराठ्यांनी सुरू केलेली लूट बरेच दिवस पुढे चालू होती. त्याचे परिणाम डचांच्या व्यापारावर होऊन त्यांचे बरेच नुकसान झाले.

बऱ्हाणपुरच्या लुटीनंतर परत येताना संभाजी महाराज आपल्या सैन्यासह सुरतेपासून पाच कोसाच्या प्रदेशात थांबले. त्यांनी तो प्रदेश लुटून गाडीयापूर शहराला आग लावली.[२]

इतक्यात औरंगजेबाने बऱ्हाणपूरच्या सुभेदाराची बदली करून त्याजागी खान जमात याजला दिनांक १ जुलै १६८१ रोजी नेमण्यात आले.[३] औरंगजेब बऱ्हाणपूरला आपल्या लव्याजम्यानिशी दिनांक १३ नोव्हेंबर ८१ रोजी पोहोचल्यावरसुद्धा मराठ्यांनी आपली आक्रमक चढाई चालूच ठेविली. ते बऱ्हाणपूर आणि भोवतालच्या प्रदेशांची नासधूस करीतच होते. बऱ्हाणपुरातील राजवाड्यात लागून असलेल्या कोठारास आग लावणे, लाल बागेजवळच्या लुत्फुल्लाखान कोका यांच्या तळावर डाका घालणे आणि तेथील मालमत्ता लुटणे हे प्रकार मराठ्यांनी केले.[४]

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत मराठ्यांनी बऱ्हाणपूर गावांतील बहाद्दूरपुरा पूर्णपणे लुटला तेव्हा तेथील व्यापाऱ्यांचे संरक्षणासाठी त्यांना बऱ्हाणपुरातील तटबंदीत येऊन आपला धंदा करावा असे सांगण्यात आले.[५]

इ. स. १६८२ च्या सुरुवातीस महमद अजमशहास औरंगजेबाने साल्हेरी किल्ला घेण्याची कामगिरी सांगितली परंतु गडावर हल्ला होण्यापूर्वी मुल्हेरच्या किल्लेदाराने साल्हेरच्या मराठा किल्लेदारास फोडले. त्यामुळे युद्धाची वेळ न येताच किल्ला मोगलांच्या स्वाधीन झाला. यामुळे बादशहाला समाधान वाटले असे खाफीखान लिहितो.[६] मराठ्यांच्या पराक्रमापुढे मोगलांनी हार खाल्ली पण त्यांना आपल्या बाजूस घेण्यासाठी मोगल सरदारांनी अनेक प्रकारची आमिषे दाखविली त्यात त्यांना यश आले.

---

१ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. २३६.

२ कित्ता, पृ. २३८ डच रेकॉर्ड्स व्हॉ. २९.

३ पगडी, मराठे व औरंगजेब, पृ. २०.

४ कित्ता, पृ. २१.

५ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. २३८-२४०.

६ पगडी, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध (खाफीखानाचा साधन ग्रंथ), पृ. ८-९.

इ. स. १६८२ मध्ये अंकाईचा किल्लेदार चिमणाजी व कान्होजी शिर्के (येशूबाईंचा चुलत भाऊ) हे दोघे मोगलांस मिळाले. चिमणाजीला खिलतींची वस्त्रे देण्यात आली आणि कान्होजी शिर्के यास बादशहाने पाच हजारी आणि पाच हजार स्वारांचा मनसबदार केले.[१]

इ. स. १६८२ च्या फेब्रुवारी महिन्यापर्यंत विजापूरच्या राज्यावर आक्रमण करण्यासाठी आणि संभाजी महाराजांच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी औरंगजेब बऱ्हाणपुरातच राहिला होता. मराठी मुलूखातील सर्व प्रदेशावर सैन्य रवाना केले होते.

वऱ्हाडातील लूट :

इ. स. १६८० सालात मराठी सैन्याने बऱ्हाणपूर आणि आसमंतातील प्रदेशात धुमाकूळ उडवून दिल्यावर त्यांनी आपला मोर्चा वऱ्हाडांत वळविला. इ. स. १६८१ त मराठे बऱ्हाणपुरांतूनच वऱ्हाडांत पोहोचले. इ. स. १६८१ सालच्या डिसेंबर महिन्यात अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील कारंजा त्यांनी लुटले. लूट घेऊन जात असता मोगल अधिकारी ईरजखान याने त्यांचा पाठलाग केला.[२]

कारंजे लुटल्यावर मराठ्यांची फौज मलकापूरला गेली. तिथून ते सात कोसांवरील धामणगावला गेले तेथे मोगलांशी त्यांची लढाई झाली.[३] मराठ्यांनी ह्या लढाईतून काढता पाय घेऊन ते कारंजापासून वीस कोसापर्यंत पौसाना घाटापर्यंत पळत राहिले. तेथील एका गढीत मराठे व मुघल यांच्यात लढाई झाली. मराठे लूट घेऊन पळत असता त्यांजकडून ती हस्तगत करण्याचे काम रुहुल्लाखानाने केले.[४]

चौथाईची वसुली आणि लूट :

वऱ्हाडात मराठी सैन्य चौथाई वसुली करता घुसले व त्यांनी लुटालुटीस प्रारंभ केला त्यांच्यापैकी एक तुकडी चांदा जिल्ह्यातील खुद्द चांदा येथे पोचली. तेथून परतण्यापूर्वी मराठ्यांनी लुटालूट केली. वऱ्हाडचा सुभेदार ईरजखान यास मराठ्यांनी गुंगारा देऊन ते चौथाई वसुल करीत फिरत होते काही ठिकाणी लुटालूट करत होते. अकोला जिल्ह्यात लूट केल्यानंतर १६८२ च्या फेब्रुवारी महिन्यात मराठे बालाघाट (मेहेकरजवळ) आणि देवलगाव येथे त्यांनी चौथाई वसूल केली.[५]

---

१ पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. ३२.

२ अखबरात १-१-१६८२, गोखले, संभाजी, पृ. २३९.

३ अखबरात १०-१-१६८२.

४ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. २४०.

५ अखबरात १५-२-१६८२.

मराठा सरदार नागोजी बल्लाळ याने एप्रिल १६८२ मध्ये मोठ्या सैन्यासह जाऊन बुलढाण्यातील मेहेकर लुटले, त्याचे पारिपत्यासाठी मोगल सरदार मुर्करबखान त्यावर चालून गेला. मुघल-मराठ्यात चकमकी उडाल्या.[१] नंतर नागोजी बल्लाळची मुघलांशी वाशिम किल्ल्याजवळ गाठ पडली सामना झाला. तो अनिर्णीत राहिला.[२]

मराठ्यांनी मुघलांच्या प्रदेशांतील समृद्ध गावांवर रोख धरला होता तसेच मुघलांनी मराठी सरहद्दीवरील व इतर गडांना वेढे दिले होते ते परतवून लावण्याचे काम मराठे शिकस्तीने करत असता मुघलांचा प्रदेश उद्ध्वस्त करून तेथे लुटमार करण्याचे धोरण मराठे अवलंबित होते. वऱ्हाड समृद्ध असल्यामुळे तिथे लुटमार करण्यास मराठ्यांना चांगला वाव होता. अशा प्रकारच्या हालचालीत मराठ्यांचा दुहेरी फायदा होत असे. सैन्य वाढवून पोसण्यासाठी पैसा मिळे आणि नासधुसीमुळे शत्रूचे नुकसान होई. इ. स. १६८३ मार्चमध्ये मराठे वऱ्हाडात गेल्याचे कळताच मुघल सरदार खान जहान बहादूर त्यांना तंबी देण्यासाठी गेला.[३] मराठी फौजा वऱ्हाडात सारख्या फिरत होत्या एक तुकडी अकोल्याकडे गेल्याचे कळताच तिच्या पाठीवर बऱ्हाणपूरचा नाजीम सय्यदमुनव्वरखान गेला. मराठ्यांची एक तुकडी बाळापूर जिल्ह्यांत चौथ वसुलीसाठी गेली होती. बाळापूर फौजदार मुहम्मद हुसेन याने त्यांच्यावर स्वारी केली तेव्हा मराठ्यांना लुटीपैकी काहीच मिळाले नाही.[४]

मराठ्यांनी जामोधाजवळ चौथ वसुली करण्याचा प्रयत्न केल्यावर त्यांची मुघल शेखशहा याजशी लढाई झाली त्यात मराठ्यांकडील अनेक लोक मारले गेले.[५] दुसऱ्या मराठा तुकडीने बादशाही मुलूखांतील अकोला तालुक्यातील मौजे मकनगाव येथे जाऊन तेथील लोकांना लुटले.[६] जनावरे पळवली हे समजताच मुघल सरदार सैफुहखानाने त्यांचेवर जोराचा हल्ला करून नेलेली जनावरे व लोक परत मिळविले.[७]

खानजहान बहाद्दूरने मराठ्यांबरोबर तळेगाव येथे सामना दिला.[८] तेव्हा मराठे चांद्याच्या वाटेने हैदराबादकडे निघून गेले. काही मराठे एलिचपूरला गेले.[९]

---

१ अखबरात १०-४-१६८२.
२ अखबरात १५-४-१६८२.
३ अखबरात ३-३-१६८३.
४ अखबरात १२-३-१६८३.
५ अखबरात १९-३-१६८३.
६ अखबरात २१-३-१६८३.
७ अखबरात २४-३-१६८३.
८ गोखले, पृ. २४३.
९ अखबरात १२-३-१६८५.

ह्या सर्व बातम्या ऐकून औरंगजेब बादशहा हैराण झाला. त्याने आपल्या सरदारांना तंबी देऊन सांगितले की मराठ्यांना कैद करावे किंवा त्यांचा पाठलाग करावा हे त्यांना न जमल्यास त्यांची मनसब थांबविण्यात येईल.[१] यावरून असे दिसते की मराठ्यांनी गनिमी काव्याने लुटून मुघलांस हैराण केले विजयश्री मिळविली. पण औरंगजेबाने काही मराठे किल्लेदारांस व सरदारांस लाच देऊन पंचहजारीचे आमिष दाखवून फोडीले. त्यामुळे मराठ्यांच्या चपळाईने केलेल्या हालचालींस खो मिळाला.

औरंगाबादेत दहशत (फेब्रुवारी १६८१) :

औरंगजेबाच्या नावाने वसविलेले शहर औरंगाबाद. औरंगाबादेस सुभेदार खानजहान बहाद्दूर कोकल्ताश होता. तो बऱ्हाणपूरला लगबगीने निघाला. तो फर्दापुरास पोचल्यावर त्यास समजले की मराठे अहमदनगर आणि पैठण या मार्गाने येत असून औरंगाबादेवर हल्ला करण्याचा त्यांचा बेत आहे. इतिहासकार भीमसेन सक्सेना हा यावेळी बहाद्दूरखानाबरोबर होता. तो म्हणतो ; " बहाद्दूरखान दुपारी तातडीने निघून औरंगाबादेस पोहोचला. तो इतक्या तातडीने आला नसता तर अनर्थ ओढवला असता. बाईपुऱ्याच्या उपनगरात आणि जवळील सातारच्या खेड्यात मराठ्यांचे सैन्य जमले आहे अशी बातमी आली. राजा अनुपसिंग हा तयार होऊन आपल्या पुऱ्यातच उभा राहिला. पुढे चाल करून जाणे त्याच्याने शक्य होईना. बहाद्दूरखान हा तातडीने पोहोचला पण तो येण्यापूर्वीच मराठे हे बाईपुऱ्यापर्यंत चाल करून आले होते. त्यांनी तेथे धामधूम माजविली पण बहाद्दूरखानाशी युद्ध न करता ते निघून गेले. बहाद्दूरखानाने जसवंत सिंगाच्या तलावाच्या काठावर आपला तळ दिला.[२]

इ. स. १६८२ च्या एप्रिल महिन्यात दहा हजार मराठे सैनिक जालनाच्या बाजूस गेले. हेतू चौथाई वसूल करण्याचा. जालना येथील शेखजान महम्मद या फकिराने जालन्यातील लोकांस आश्रय दिला होता. पण त्याची पर्वा न करता मराठे सैनिकांनी जालना शहर लुटले.[३] अशाच चकमकीत मराठे मुघलांच्या हाती सापडत किंवा मुघल अधिकारी मराठ्यांच्या हाती पडत. ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीस मराठ्यांची एक तुकडी अन्तुर भागात औरंगाबादपासून ४० मैल, कन्नडच्या ईशान्येस ६ मैल, शिरली असता तेथील ठाणेदार अहमद याने मुकाबला केला.

मराठ्यांनी थोडा वेळ घाबरल्याचा देखावा केला आणि पुन्हा १०/१२ हजार मराठे ठाणेदाराशी मुकाबला करण्यासाठी सज्ज होऊन आले तेव्हा अन्तुरचा ठाणेदार घाबरला.

१ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. २४३.

२ पगडी, मोगल-मराठा संघर्ष, पृ. ६०.

३ अखबरात ६-४-१६८२.

त्याने औरंगाबादहून मदतीची याचना केली. तेव्हा शहाबुद्दीनखानला त्याच्या मदतीस जाण्यास सांगितले. तो लगेच मदतीसाठी रवाना झाला परंतु मराठ्यांचे अनेक ठिकाणी घातपाती हल्ले सुरू होते. त्यामुळे मुघल अधिकाऱ्यांची धावपळ होत असे. एके ठिकाणी जावयाचा हुकूम व्हावयाचा तोच दुसऱ्या ठिकाणी जावे लागे. मराठे अन्तुरमध्ये शिरले. त्यावेळी अब्दुल अजीजखानाचा मुलगा अब्दुल खैर खान अहमदच्या मदतीस धावला. दोघांनी मराठ्यांशी सामना दिला.[१]

अठ्ठावीस सप्टेंबरला १६८२ त बादशहाने शहाजादा महमद मुईजुद्दीन याला आठ हजार स्वारांचा मनसबदार बनवून त्याला रत्नजडीत कंठा, एक घोडा आणि खिलतीची वस्त्रे देऊन त्यास मराठ्यांचा मोड करण्यासाठी अहमदनगरच्या दिशेने रवाना केले.[२]

ऑक्टोबर १६८२ च्या अखेरीस मराठे अन्तुरहून वैजापूरकडे लुटमार करण्यास गेले. म्हणून खानजखान बहादुदूरचा मुलगा मुजफरखान याला तेथे नेमले.[३] इ. स. १६८२ च्या डिसेंबरात पहिल्या आठवड्यात चौथ वसूल करण्यासाठी मराठे पुन्हा जालन्याच्या परिसरात गेले. त्यांनी बीदर येथील चौथाईच्या वसुलीसाठी काही गावे लुटली.

□□

१ अखबरात ३-१-१६८२.

२ पगडी, मराठे व औरंगजेब, पृ. २३-२४.

३ अखबरात ३१-१०-१६८२.

३४. स्वराज्यावरील मुघली परचक्र—कोकण प्रांतात लढाया (१६८१-८४) भाग १ ला

शिवाजी महाराजांनी आपल्यास राज्याभिषेक करून घेतल्यापासून औरंगजेब बादशहास या काफिरी सत्तेचा नाश करण्याची हुरहुर लागली होती. म्हणून बादशहाने आपला मुलगा शहाआलम यास २०-४० हजार सैन्य देऊन त्यास दक्षिणेस रवाना केले. तो सुरवातीस औरंगाबादेस आला. ही मोठी सेना दक्षिणेतील मोगली सेनेच्या मदतीस येणार ही दिल्लीची बातमी मिळाल्यापासून या मोगली परचक्रास तोंड देण्याची तयारी शिवाजी महाराजांनी केली होती, पण थोड्याच दिवसात दिनांक ३ एप्रिल १६८० रोजी रायगडी शिवाजी महाराजांनी देह ठेविला ही बातमी बादशहास समजताच त्याने इ. स. १६८० च्या पावसाळ्यात काफिरी सत्तेचा नाश करण्यासाठी स्वतः दक्षिणेत स्वारीवर जाण्याचे ठरविले. दख्खनच्या मोहिमेवर येण्यापूर्वी बादशहाने आपला एक अधिकारी अब्बू महमद याच्याकरवी दख्खनच्या प्रदेशाची, भूभागाची संपूर्ण माहिती करून घेतली होती.[१] त्यावेळी त्याला हे समजून आले की भौगोलिकदृष्ट्या मराठ्यांच्या राज्यात कोकणचे स्थान अत्यंत महत्त्वाचे होते.

कोकण प्रदेशातून विशेष अडथळे येता दख्खनच्या उत्तर किंवा दक्षिण प्रदेशात हालचाली करणे त्यांना शक्य होत असे. सतराव्या शतकामध्ये मराठ्यांच्या सैन्याने कोकणपट्ट्यातून दख्खनच्या इतर भागात केलेल्या हालचाली पाहिल्यावर हा मुद्दा अधिक चांगल्या रीतीने स्पष्ट होतो. शिवाजी महाराजांनी आपल्या पराक्रमाने संपादन केलेल्या कोकण प्रदेशाच्या अधिकारास इ. स. १६८० मध्ये त्यांच्या मृत्यूपर्यंतच्या काळात कोणीही आव्हान देऊ शकला नाही. त्यामुळेच मराठी राज्यकर्त्यांनी कोकणावर आपले नियंत्रण ठेवण्याची सदैव धडपड केली.

---

१ सरकार, हिस्टरी ऑफ औरंगजेब भाग ४, पृ. १९७.

इ. स. १६८० मध्ये कोकणातील रामनगर, जव्हार, कल्याण, भिवंडी, चौल, दाभोळ, राजापूर आणि तळ कोकणातील कुडाळ, भीमगड, फोंडा आणि अंकोले ही ठिकाणे संभाजी महाराजांच्या ताब्यात होती.[१]

मराठ्यांना कोकण प्रदेशातून हुसकावून लावणे हे औरंगजेबाचे उद्दिष्ट होते. तर प्रत्यक्ष युद्ध मोगलांच्या प्रदेशात लढले जावे अशी संभाजी महाराजांची आत्यंतिक इच्छा होती. परंतु औरंगजेबाने रचलेला व्यूह आणि त्याने कार्यान्वित केलेले सामर्थ्य एवढे प्रचंड होते की, त्याचा योग्य तो प्रतिकार करण्याच्या प्रयत्नांत, संभाजी महाराजांचा मोगलांच्या मुलुखांत युद्ध लढण्याचा, आक्रमण करण्याचा विचार पूर्णपणे बाजूला पडला, अशक्यप्राय झाला कारण औरंगजेबास हे कळून आले होते की, स्वराज्याच्या प्रदेशात ३६० घाट होते. त्यापैकी केवळ ६५ घाटांमधून उंट-हत्ती नेणे शक्य होते. कोकणातील बाकीचे सर्व घाट अरुंद होते त्यानंतर औरंगजेबाने संभाजी महाराजांवर तिहेरी आक्रमण करण्याचे ठरवले. कोकण प्रांतात येण्याकरता त्याने शहाबुद्दीनला उत्तरेत कल्याणकडून चढाई करण्याचा आदेश दिला.[२]

शाहाजादा मुअज्जम बेळगांवहून निघाला. तो रामसेज घाटांतून येऊन, गोवेकर पोर्तुगिजांशी हातमिळवणी करून आला. त्यामुळे दक्षिणेत संभाजी महाराजांची कोंडी झाली. त्याचवेळी संभाजी महाराजांचे लक्ष मोहिमेतून अन्यत्र वेधण्याकरता आझमशहाने बागलणांत विध्वंस सुरू केला. या काळात मराठ्यांच्या सैन्याला होणारा धान्य, शस्त्रे, रसद पुरवठा बंद पाडण्याची कामगिरी सिद्दीवर सोपवण्यात आली होती. अशा प्रकारे संभाजी महाराजांच्या सैन्याला सर्व बाजूनी कोंडीत पकडण्याची योजना मोगलांनी आखली होती.

मराठ्यांचे मोगलांशी युद्ध चालूच होते. औरंगजेब बादशहाने दक्षिण सुभ्यावर असलेला आपला वडीलपुत्र शहाआलम यास राजपुतान्याशी चाललेल्या युद्धात भाग घेण्यासाठी परत बोलाविले आणि त्याचे जागी खानजहान ऊर्फ बहादूरखान यास दक्षिणेत पाठविले. ह्या खानाने मराठ्यांच्या ताब्यातील चांदवडजवळील अहिवंत किल्ल्यास

१ खोंबरेकर, कोंकणचा राजकीय इतिहास, पृ. ८०.

२ औरंगजेब - अखबरात १४-१-१६८२, गोखले, संभाजी, पृ. २६२.

जुलै, १६८० त वेढा घातला. पावसाळा संपताच संभाजी महाराजांनी त्याजवर आपली फौज रवाना केली. फौजेचे मुख्त्यार पद सेनापती हंबीरराव मोहित्यांकडे होते. त्याने धरणगाव लुटून बुऱ्हाणपुरावर चाल केली व बुऱ्हाणपूरचे बाहेरचे पुरे तीन दिवसपर्यंत लुटले. लाखो रुपयांची मालमत्ता पैदा केली ही बातमी बहादूरखानास समजताच तो फिर्दापूरचे घाटाने धावत बुऱ्हाणपूरचे बचावास आला. प्रवासात त्याच्या फौजेचे फार हाल झाले. खान आपल्यावर येतो असे कळताच हंबीररावांनी सर्व लूट बरोबर घेऊन ते साल्हेरच्या आश्रयास गेले. खानजहानकडून त्याचा प्रतिकार झाला नाही म्हणून बादशहाने त्यास ठपका दिला.

यावेळी जंजिऱ्याचा सिद्दी, गोव्याचे पोर्तुगीज व मोगल बादशहा ह्या तिघांशी संभाजी महाराजांनी झुंज दिली त्यापैकी सिद्दीचे अधिष्ठान रायगड राजधानीस लागून होते. घरात जैसा उंदीर तैसा महाराजांचे राज्यात सिद्दी असे त्याचे वर्णन सभासदाने केले आहे. औरंगजेब बादशहाचा मुलगा अकबर व दुर्गादास महाराष्ट्रात संभाजी महाराजांच्या आश्रयास गेले हे समजताच त्याने राजपुतांबरोबर चाललेल्या युद्धाची समाप्ती त्यांजशी तह करून केली आणि आपल्या सर्व फौजांस दक्षिणेत चाल करण्याचा हुकूम दिला. बादशहाने मनात ठरविले की दक्षिणेत स्वारी करून बंडखोर मुलाचा बंदोबस्त, मराठेशाहीचा विध्वंस आणि आदिलशाही व कुतुबशाही ह्या शाह्यांची समाप्ती करावयाची त्याकरता त्याने मोठी फौज बरोबर घेतली.

खुद्द बादशहा दक्षिणेत बुऱ्हाणपूर येथे दिनांक १३ नोव्हेंबर १६८१ रोजी दाखल झाला. त्यानंतर बादशहा औरंगबादेस दिनांक २२ मार्च १६८२ त आला आणि त्याने पुढील युद्ध स्वतःच्या देखरेखीखाली चालू केले.

मराठ्यांच्या सैन्याच्या हालचाली रोखण्याच्या दृष्टीने कोकण प्रदेश ताब्यात घेणे मोगलांना अत्यंत आवश्यक होते नाहीतर विजापूर किंवा मोगल मुलुखात आक्रमण करतेवेळी कोकणातील घाटमार्गाचा फायदा मराठा सैन्याला मिळाला असता.

उत्तर कोकणातील लढाया :

हसन अली म्हणून औरंगजाबाचा एक सरदार राजपुतान्यातील युद्धात लौकिक मिळवून त्याचे पसंतीस उतरला होता. त्यास बादशहाने संभाजी महाराजांवर रवाना केले.

इ. स. १६८२ च्या जानेवारी महिन्यात मोगलांनी कोकण प्रांत जिंकण्याचा पहिला प्रयत्न केला होता. त्यावेळी हसन अली खान[१] ह्याला वीस हजार घोडदळ आणि पंधरा हजार पायदळाची सरदारी बहाल करून संभाजीच्या राज्यात रवाना केले होते. हसन अली खान हा बादशहा जहांगीर यांच्या दरबारातील अलिवर्दीखान याचा मुलगा होय. हस्तगत केलेल्या कोकण प्रदेशाचा कारभार पाहणे आणि कोकणात मराठ्यांवर वचक ठेवण्याचे काम त्याच्यावर सोपवण्यात आले होते.[२] तो १६८२ च्या जानेवारीत नाणेघाट उतरून कल्याण, भिवंडी येथे पोचला. कल्याण येथे पोहोचेपर्यंत हसन अलिखानाने संभाजीच्या मुलुखातील गावांची जाळपोळ केली.[३] हसन अली खानाच्या सैन्याला दाणागोठा मिळावा म्हणून मेच्या अखेरीस मीर मुहम्मद मोमीन याला सहा हजारांची फौज घेऊन जहाजातून सुरतमार्गे रवाना केले होते. दिनांक २४ फेब्रुवारीला रणमस्तखानही कल्याणला येऊन दाखल झाला.[४] त्याच्या सैनिकांनीदेखील मराठ्यांच्या मुलुखाचे बरेच नुकसान केले.[५] शिवाजी महाराजांनी त्यांच्या अखेरीच्या काळात अवलंबिलेल्या धोरणाप्रमाणेच संभाजी महाराजांनी मुघल हद्दीस लुटमार करणे, मुलूख बेचिराख करणे इत्यादी गोष्टी सुरू केलेल्या होत्या. इ. स. १६८२ च्या सप्टेंबरअखेर औरंगजेबाने अहमदनगरच्या परिसरात धुमाकूळ घालणाऱ्या मराठ्यांना रोखण्याकरता आणि त्यांचे पारिपत्य करण्याकरता रणमस्तखानाची तिकडे रवानगी केली. पावसाळी मौसम उलटून गेल्यावर दंडाराजपुरीचा किल्लेदार सिद्दी याकुत याच्याकडून औरंगजेबाच्या कानी खबर आली की, मुघलांच्या सर्व हालचाली रोखण्याचा संभाजी महाराज प्रयत्न करीत होते. तळकोकणांत मुघल सैन्याच्या दौडीला अटकाव करण्याकरता संभाजी महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांना हुकूम देऊन मुघलांच्या वाटा अडविण्यास सांगितले.[६] त्यांनी येणाऱ्या संकटाची कल्पना आपल्या अधिकाऱ्यांस दिली.[७] इ. स. १६८२ मध्ये मराठ्यांनी कोकणचे सर्व मार्ग रोखले होते. कोणाही मोगल सरदारास घाटमार्गाने जाण्यास येण्यास

१ गोखले, संभाजी, पृ. २६०.

२ कुलकर्णी, मुघल-मराठा रिलेशन्स, पृ. २०.

३ खोबरेकर, कित्ता, पृ. १३३.

४ जोशी, संभाजीकालीन पत्रसार संग्रह, पृ. ११०.

५ उपरोक्त.

६ खोबरेकर, कित्ता, पृ. १३१.

७ कुलकर्णी, मुघल- मराठा रिलेशन्स, पृ. २०.

अटकाव केला जात होता. तेव्हा औरंगजेबाने दिनांक २८ सप्टेंबर १६८९ रोजी बहादूर खान आणि इतर सरदारांना तळकोकणांतील दऱ्याखोऱ्यांकडे कूच करण्यास सांगितले. [१]

ऑक्टोबर महिन्यात खान इ. जहान बहादूर यास मराठ्यांवर कोकणात चालून जाण्याचे आदेश दिले गेले. परंतु पुढे त्याला युद्धात अपेक्षित यश मिळाले नाही ; आणि तो युद्धातून निवृत्त झाला. ह्या घटनेनंतर औरंगजेबाने 'बहादूरखान' हा किताब रणमस्तखानास देऊन त्याला तळकोकणांतील मराठ्यांच्या ठाण्यांवर चालून जाण्यास फर्माविले.[२] अवघ्या सहा महिन्यांमध्ये तळकोकणांतील मराठ्यांवर पाठविलेली ही दुसरी आघाडी होती. रणमस्तखानाने आपल्या सैन्याच्या असमाधानकारक परिस्थितीविषयी आणि अपुऱ्या धान्यसामग्रीविषयी निवेदन केले. मुघल सैनिकांच्या वेतनाची थकबाकी मोठ्या रकमेची द्यायची होती. आणि त्या परिस्थितीत त्यांना आर्थिक मदत करू शकणारा कोणीही नव्हता.[३] ह्या सर्व अडचणी असूनसुद्धा रणमस्तखान तळकोकणच्या मोहिमेवर निघाला. अत्यंत थोड्या कालावधीतही त्याने नऊ हजार सैनिकांचे पायदळ सुसज्ज केले. मुघलाच्या सरदाराचे दोन हजार सैनिक त्यास येऊन मिळाले. बहादूर खान पण्णी मोहोजेच्या डोंगरमार्गाने कोकणात उतरला.[४] परंतु मराठ्यांनी नाशिक आणि परिसरात मुघल ठाण्यांची लुटालूट करून गोंधळ उडवून दिला हे वृत्त कळताच बहादूर खान तातडीने त्या प्रदेशात गेला.[५] नोव्हेंबर, १६८२ मध्ये मोगल सरदार शिहाबुद्दीन हा जुन्नरहून आपले सैनिक, शस्त्रे इ. सर्व लवाजम्यासह निघाला आणि त्याने तळकोकणावर आक्रमण केले. त्याने मराठ्यांची वीस गावे जाळली. सुमारे चार हजार माणसांची कत्तल केली, एक हजार माणसे कैद केली आणि चार हजार गुरे, वासरे इ. पकडली.[६] मराठ्यांच्या सर्व मुलुखाची माहिती असणाऱ्या एका स्थानिक जमीनदाराला हाताशी धरून

१ कुलकर्णी, मुघल-मराठा रिलेशन्स. पृ.२०.

२ कुलकर्णी, कित्ता, पृ. २१.

३ उपरोक्त.

४ उपरोक्त.

५ खोबरेकर, कित्ता, पृ. १.१३७ हे वृत्त बेंद्रे यांनी त्यांच्या संभाजीमध्ये स्पष्ट केले आहे.

६ खोबरेकर, कित्ता, पृ. १३७.

त्याच्या मदतीने शिहाबुद्दीनने त्या परिसरात गोंधळ उडवून दिला. त्याच्या ह्या पराक्रमाबद्दल औरंगजेबाने त्याला मानाची वस्त्रे देऊन त्याचा गौरव केला.[१]

पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे इ. स. १६८२ च्या जानेवारी महिन्यात हसन अलिखान यांस पंधरा हजारांचे सैन्य देऊन कल्याण, भिवंडी येथे नियुक्त केलेले होते. त्यावर्षी नोव्हेंबर महिन्यात सहा ते सात हजार पायदळ व घोडदळ असलेले मराठ्यांचे सैन्य कल्याण-भिवंडीत गेले. त्यांनी कल्याण-भिवंडी जवळच्या एका छोट्या किल्ल्याची डागडुज़ी केली आणि तेथे आपले ठाणे उभारले. दिनांक २८ नोव्हेंबर रोजी बहादूरखानाने त्यांच्याशी लढाई केली आणि त्यांचा पराभव केला.[२] इ. स. १६८२ च्या नोव्हेंबर महिन्यात कल्याण-भिवंडी प्रांतातील मोगलांच्या लष्करी हालचाली आणि युद्धे ऐन भरात आली होती. तेव्हा रणमस्तखानाने कल्याण काबीज केले.[३] त्याच्याशी मुकाबला करण्याकरता संभाजी महाराजांनी रूपाजी भोसले आणि निळोपंत पेशवे यांना रवाना केले.[४] त्याच्याबरोबर १० हजार स्वार व १२ हजार पायदळ होते. दिनांक ४ डिसेंबर रोजी बहादूरखान व या सैन्यात लढाई झाली. कल्याण-भिवंडीपासून ५ मैलांवर असणाऱ्या मेहेंदळी गावात मराठ्यांच्या दोन हजार स्वारांनी मुघल ठाण्याची लुटालूट केली होती. त्यावेळी मुकर्रबखान मराठ्यांना तंबी देण्यासाठी धावला. मुकर्रबखान आणि मराठे यांच्यात मेहेंदळी गावाच्या अलीकडे ३० कोसांवर असलेल्या उरण खेड्याजवळ लढाई झाली. त्यात दोन्हीकडील सैनिक मेले व जखमी झाले. त्या लढाईनंतर मुकर्रबखानाने मौजे मेहेंदळी येथे डेरा उभा केला.[५]

बहादूरखानाने स्वार होऊन मराठ्यांच्याकडील किल्ले बीतिंगावर कूच केले आणि तेथील वाडीस आग लावली.[६] ह्या लढाईनंतर थोड्याच काळात मराठ्यांनी रणमस्तखानाच्या सैन्यावर दोन-तीन वेळा रात्रीचे हल्ले केले. मोगलांनी त्याचा कडवा प्रतिकार केला. त्यांनी मराठ्यांचा पराभव केला.[७] बहादूरखान कल्याण-भिवंडी परिसरात आहे असे पाहून त्याला रोखण्याकरता संभाजी महाराजांनी सात हजार मराठी सैनिक

१ फार्सी साहित्य खंड. भाग ६ क्र. ३६५. पृ. २१६. क्र. ३६७. पृ. २१७.

२ कुलकर्णी. कित्ता. पृ. २१.

३ उपरोक्त.

४ गोखले. संभाजी. पृ. २५४.

५ शिवचरित्र प्रदीप. जेधे शकावली. पृ. ३२.

६ गोखले. संभाजी. पृ. २५४.

७ कुलकर्णी. कित्ता. पृ. २१.

पाठवले. बहादूरखानाने त्यांचा पराभव केला. बहादूरखानाने कल्याण शहराभोवती असणारी संरक्षक भिंत दुरुस्त करून घेतली. बहादूरखानाने त्याच्यावर आक्रमण करणाऱ्या मराठ्यांच्या, दहा हजार पायदळासह १२ हजार स्वारांचा सपशेल पराभव केला. तत्पश्चात बहादूरखानाने बीसिंगा किल्ल्याकडे कूच केले आणि त्याजवळील गावे जाळून टाकली.[१] बहादूरखानाने कल्याणच्या तटाच्या पहाऱ्यासाठी दोन हजार माणसे नेमली.

इ. स. १६८२ च्या डिसेंबरच्या अखेरीस संभाजी महाराजांनी तुकोजी सरदाराबरोबर मोठे सैन्य धाडले. या सैन्याने कल्याणपासून आठ मैलांवर असणाऱ्या गावी मुक्काम केला. तेथे त्याने मोर्चे लावले, खंदक खणले. हे कळताच बहादूरखानाने याकुतखान, रूमीखान, दाऊद खान यांच्या तीन तुकड्या करून मराठ्यांना तंबी देण्यासाठी रवाना केले. सिद्दी याकुतखान हा मोगल सैन्यासाठी दाणागोटा घेऊन आला होता. त्यानंतर दाऊदखानाचे मराठ्यांशी युद्ध झाले. या चकमकीत ढाल-तलवारीचेही युद्ध झाले. या चकमकीत मराठ्यांना माघार घ्यावी लागली. ह्या हल्ल्यानंतर मराठे जवळपासच्या डोंगरात निघून गेले.[२]

जानेवारी १६८३ मध्ये रणमस्तखान व बहादूरखान हे मोगल सरदार मोगलांच्या कल्याण-भिवंडी येथील लष्करी तळावर होते. तेथे त्याच्यावर मराठ्यांचे सैन्य वारंवार हल्ले करीत असे. त्यामुळे रूहल्लाखानाने यशवंतराव ह्या मोगल सेनाधिकाऱ्यास त्यांच्या मदतीसाठी पाठवून दिले.[३]

ह्या सुमारास कल्याण-भिवंडीतील मोगल छावणीस दाणागोटा आणि इतर वस्तूंची तीव्र टंचाई भेडसावीत होती. मोगल आरमारचा प्रमुख सिद्दी याकुतखान याचेवर छावणीला दाणागोटा पुरविण्याची कामगिरी सोपवलेली होती. गोव्याच्या पोर्तुगिजांनी आपल्या जहाजांमधून ठाणे-कल्याणमार्गे मोगलांना दाणागोटा व साहित्य नेण्याची परवानगी दिली होती. अशा प्रकारे मोगलांना दाणागोटा सुरक्षितपणे वाहतूक करून नेण्यास मदत करून पोर्तुगिजांनी मराठ्यांशी वैर स्वीकारले होते. कल्याण-भिवंडीकडे

---

१ कुलकर्णी, कित्ता, पृ. २१.

२ फार्सी साहित्य खंड, भाग ६. क्र. ३९० गोखले, पृ. २३०, संभाजी, पृ. २५४-२५५.

३ फार्सी साहित्य खंड, भाग ६. क्र. ४०५. पृ. २४९, कुलकर्णी, कित्ता, पृ. २२.

जाणारी मोगलांची जहाजे रोखण्याच्या हेतूने मराठ्यांनी पार्सिकच्या टेकडीवर किल्ला उभारण्याचे योजले. ही वार्ता पोर्तुगिजांच्या कानी येताच त्यांनी पार्सिकचा ताबा घेतला. आणि स्वतःच तेथे किल्ला बांधला. पोर्तुगीज मोगलांना सर्वतोपरी साहाय्यकारी असल्याचे दर्शविणारी अशीच त्यांची ही कृती होती.[१] पोर्तुगिजांनी रणमस्तखानच्या हाताखालील मोगल सैन्यास अन्नसामग्री पुरवल्याबद्दल आणि जाऊ दिल्याबद्दल संभाजी महाराज त्यांच्यावर चिडले होते. मराठ्यांनी ठाणे वसई भागात पोर्तुगिजांचे दोन किल्ले जिंकले. त्या किल्ल्यावर तोफखाना ठेवून सुरतेहून बहादूरखानाकडे जाणाऱ्या जहाजांची अडवणूक करण्याचा मराठ्यांचा विचार होता. म्हणून बहादूरखानाने याकुतखानाला तेथे धाडले. इ. स. १६८३ च्या जानेवारी महिन्यात मराठ्यांनी कल्याण येथे बहादूरखानच्या तळावर आश्चर्यकारकरीत्या तीन वेळा हल्ले चढविले. परंतु त्याने मराठ्यांचा पराभव केला. त्याने कल्याण भिवंडीच्या किल्ल्याची डागडुजी केली आणि औरंगजेबाच्या आदेशानुसार दोन हजार घोडदळ सैन्य कल्याणला तैनात ठेवले.[२]

तसेच काही काळानंतर बहादूरखान सिद्दी याकुतला येऊन मिळाला. दोघे मिळून मराठ्यांवर चाल करून गेले. ठाणे वसईला मराठ्यांनी जिंकलेल्या किल्ल्यांपैकी एक किल्ला त्यांनी जिंकून घेतला व तो जमीनदोस्त केला. आणि ते कल्याणला परत गेले.[३] त्यावेळी रसद घेऊन येणाऱ्या जहाजांचे मार्ग मराठ्यांकडून आपल्या हाती आले असे त्यांस वाटले. तरी मोगल फौजेला दाणागोटा मिळणे मराठ्यांनी कठीण करून ठेवले होते. बहादूरखानाला सहकार्य करण्याकरता १६८३ च्या फेब्रुवारीत औरंगजेबाने रूहुल्लाखानाची रवानगी केली.[४] त्याप्रमाणे १ मार्च १६८३ रोजी रूहुल्लाखान बहादूरखानास येऊन मिळाला.[५] तेव्हा बहादूरखानाने त्यास कल्याणच्या किल्ल्यात येऊन उतरण्यास सांगितले. किल्ला लहान असून रूहुल्लाखानजवळ डेरा मोठा असल्यामुळे तो बाहेरच डेरा टाकून राहिला. पुढे त्याने बहादूरखानास निरोप पाठविला की एक ठिकाणी बसून राहणे ठीक नाही. गस्त घालण्यासाठी स्वारी केली पाहिजे. त्यावेळी मराठ्यांची छावणी

१ गोखले, संभाजी, पृ. २५६.
२ पर्वते, पोर्तुगीज-मराठा रिलेशन्स, पृ. ९१
३ फार्सी साहित्य खंड, भाग ६, क्र. ३९८, पृ. २४४.
४ उपरोक्त, क्र. ४२९, पृ. २६६-२६७.
५ उपरोक्त, क्र. ४३४, पृ. २७०.

कल्याणपासून १२० कोसांवर होती. मोगल सैन्याने मोठी दौड मारून ८० कोसांचे अंतर कापले. १७ मार्च १६८३ रोजी मोगलांच्या तळकोकणातील छावणीतून सम्राटांकडे कळविण्यात आले की, मोगलांची छावणी मराठ्यांपासून अवघ्या चार कोस अंतरावर आहे आणि लौकरच हे अंतर पार करण्यात येईल असा विश्वासही कळविण्यात आला.[१] आतापर्यंतच्या हालचालीवरून कल्याणचा किंवा भिवंडीचा गड पडलेला असावा. यापैकी कोणतातरी किल्ला दुरुस्त करून बहादूरखानाला पावसाळ्यात तेथे राहता येईल की नाही असे तळकोकणात राहणाऱ्या मुहम्मद अफझल याला विचारण्यात आले होते. तेव्हा मोगल बादशहास त्या स्थानिक खबऱ्याकडून असा सल्ला मिळाला की, पावसाळी मोसमात कल्याणमध्ये मुक्काम ठेवू नये कारण पावसाळी दमट हवेत तेथील घोडे मरतात. परंतु त्याच्या अलीकडे १२ कोसांवर मेवली नावाच्या ठिकाणी राहता येईल.

इ. स. १६८३ च्या मार्चमध्ये मराठ्यांचा सेनाधिकारी विठोजी याने ४००० पायदळ, घोडदळाच्या सैन्यतुकडीसह मोगल सैन्याची कोकणातील वाट अडवली. ही बातमी समजताच रूहुल्लाखानने पद्‌मसिंह हरावत यास धाडून त्याला डावी बाजू आणि इतर अधिकाऱ्यांना उजवी बाजू सांभाळण्यास सांगितले. दिनांक १९ फेब्रुवारी १६८३ रोजी दोन्ही सैन्यांत लढाई झाली. त्यात मोगल सैन्याने मराठ्यांना हरविले. मराठ्यांकडील ४०० सैनिक मेले. काही जखमी झाले. परंतु ह्या चकमकीमध्ये मराठ्यांनी मोगलांच्या मौतमाजी दखनी नामक मनसबदारास ठार मारले. त्या चकमकीत पोर्तुगीज सैनिकही मोगलांना मदत करीत होते. औरंगजेब जसे आपले एक एक अधिकारी मराठ्यांवर रवाना करीत होता त्याचप्रमाणे संभाजी महाराजही कल्याण-भिवंडीच्या आघाडीवर आपल्या लढाऊ आणि शूर सेनापतीबरोबर कुमक धाडीत होते. फेब्रुवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात हंबीरराव व इतर तीन मोठे सरदार २० हजार घोडदळ आणि १० हजार पायदळ घेऊन कल्याण-भिवंडी येथे पाहोचले होते. ते पूर्ण तयारीनिशी होते. १० मार्च १६८३ रोजी बहादूरखानाने त्यांच्यावर चढाई केली. तेव्हा अतिशय घनघोर युद्ध झाले, ह्या चकमकीत स्वतः हंबीरराव बाणाने घायाळ झाल्यामुळे ते रणातून माघारे फिरले. ह्या लढाईत हंबीररावचा मेव्हुणा आणि त्याचे अन्य तीन अधिकारी मरण पावले.

१ फार्सी साहित्य खंड, भाग ६, क्र. ४३९, पृ. २७०.

हंबीरराव आणि त्याचा सरदार पद्मसिंह हे दोघेही अत्यंत शौर्याने लढत होते.[१] पद्मसिंहाला ३५ जखमा झाल्या तो मरण पावला. त्याच्यासह मोघल अधिकारीही जखमी झाले व मेले.[२] पद्मसिंह मेल्याचे समजल्यावरून रतन राठोडचा मुलगा रामसिंह हा आजारी असूनही चिलखत घालून मराठ्यांशी मुकाबला करण्यासाठी निघाला. परंतु तो तापाने इतका आजारी आणि अशक्त झाला होता की, लढाईत जाण्याची तयारी करून आजारात दांडगाई केल्यामुळे तो कोसळला आणि मरण पावला. पुरामल बुंदेलाचा मुलगा हरीसिंह हा मैदानात घायाळ होऊन पडला असता मराठ्यांनी त्यास उचलून नेले. तो वाटेतच मरण पावला. रघुनाथसिंग, काबुलसिंग माधोराम सिसोडिया आणि तुकोजी आणि इतर मोगल सैनिक घायाळ झाले. अशा प्रकारे मोठी फौज धाडूनही मोगलांना कल्याण-भिवंडीच्या आघाडीवर प्रगती करता आली नाही. मोगलांना १६८३ च्या मार्च-एप्रिल अखेर कोकणातून माघार घ्यावा लागली.[३]

□□

१ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड, भाग ७, पत्र २७४, पृ. २७५.

२ उपरोक्त पत्र क्र. २७७.

३ पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. ४६

३५. स्वराज्यावरील मुघली परचक्र - मराठ्यांशी कोकणात झुंज (ऑगस्ट, १६८३ ते १६८५)

औरंगजेब बादशहाने इ. स. १६८१ पासून स्वराज्याचा कोकण विभाग ताब्यांत घेण्यासाठी आपले नेकीचे सरदार कोकणस्वारीवर पाठविले. संभाजी महाराजांनीही पहिल्या अडीच वर्षांत मुघलांशी नेटाने सामना दिला. ह्या अटीतटीच्या सामन्यात मराठे विजयी झाले.

संभाजी महाराजांपुढे आपला इलाज चालत नाही असे पाहून औरंगजेबास जास्तच त्वेष चढला. डोकीवरचे पागोटे जमिनीवर रागाने आपटून तो बोलला, " संभाजीचा पाडाव करीपर्यंत मी हे पागोटे पुन्हा घालणार नाही " असे बोलून त्याने आपल्या उत्तर कोकणांतील मुघल सैन्यास चेतावणी दिली हे मराठ्यांस समजताच त्यांनी मुघलांवर कल्याण-भिवंडीत चढाई करण्यासाठी पुन्हा सैन्य जमविले.

दिनांक ६ एप्रिल १६८३ रोजी मराठ्यांचा तळ कल्याण-भिवंडीपासून चौदा मैलांवर असताना रुहल्लाखानाचा मुलगा सैफुल्ला खान मराठ्यांवर धावून चढाई करण्यास आला. दोन्ही सैन्यात लढाई झाली. सैफुल्ला खानाने जवळपासची दोन-तीन गावे जाळली. ह्या आक्रमणापुढे मराठ्यांचा निभाव लागला नाही. छत्र्या, हत्यारे तेथे टाकून मराठे जंगलात पळाले व लपले.[१] ह्या सुमारास संभाजी महाराजांनी कल्याण-भिवंडी परिसरात मोगल सैन्यास प्रतिकार अत्यंत तीव्र केला होता. तेव्हा दिनांक १९ मार्च ते १६ एप्रिलच्या दरम्यान मोगल सेनानी रोहिला खान कोकणात (कल्याणजवळच्या पौंड खोऱ्यात) उतरून गेला व रणमस्तखान घाटावर येऊन गेला. रुपाजी भोसले याने टिटवाळ्याजवळ (कल्याणच्या ईशान्येस ४ १/२ मैल) त्यांच्याशी लढाई केली. तेव्हा घनघोर रणसंग्रामात मराठ्यांनी मोगलांचे कित्येक सेनाधिकारी ठार केले.[२]

---

१ कुलकर्णी, मुघल-मराठा रिलेशन्स, पृ. २५. गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. २९८.

२ सरकार, मसीर-इ-आलमगिरी, पृ. १४५, शिवाजी गौरवग्रंथातील बेळगावमध्ये, पृ. ८७.

कल्याण-भिवंडी येथे झालेल्या लढायात संभाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी मोगलांच्या ताब्यातील प्रदेश उजाड केला होता. मराठ्यांनी सातत्याने येणाऱ्या मोगल सेनानीचा अत्यंत तीव्र प्रतिकार केला. त्यामुळे मदतीकरता इंग्रजांना पाचारण करणे मोगलांस अपरिहार्य झाले.[१] ऑगस्ट, १६८३ पर्यंत मोठी फौज धाडून आणि कित्येक मातब्बर सेनानी योजूनही मोगलांना कल्याण-भिवंडी परिसरात परिणामकारक प्रगती करता आली नाही.[२] एका वर्षाच्या मोहिमेत काहीच लभ्यांश झाला नाही. बादशहाचे मनास अत्यंत उद्वेग उत्पन्न झाला. इ. स. १६८३ च्या पावसाळ्यात त्याने आपले सरदार औरंगाबादेस समक्ष वाटाघाटीसाठी बोलविले.[३]

दक्षिण कोकणात मोगलांचा शिरकाव :

संभाजी महाराजांचे राज्य नष्ट करण्यासाठी औरंगजेबाने १६८२ सालापासून एकाच वेळी अनेक आघाड्या सुरू केल्या. त्यात पहिली उत्तर भागात होती. (कल्याण-भिवंडी) दुसरी आघाडी स्वराज्याच्या मध्यभागात (पुणे, सोलापूर, सातारा, उस्मानाबाद इत्यादी) तिसरी आघाडी शाही आलहमबहाद्दूर शहाजादा मुअज्जम याजकडे सोपविली. तो पन्हाळी कोल्हापूर येथे स्वारी करण्यासाठी इ. स. १६८२ च्या जानेवारी महिन्यात दुसऱ्या आठवड्यात निघाला. सुलतान आज्जमने दक्षिण कोकणात पहिली स्वारी केली. औरंगजेबाने दिनांक १५ सप्टेंबर १६८३ रोजी शाहआलम बहाद्दूर (शहाजादा मुअज्जम) ची कोकण, रामदरा (किंवा रामदुर्ग) आणि मराठ्यांच्या इतर प्रदेशातील पाळेमुळे खणून काढण्यासाठी नेमणूक केली.

शहाजादा मुअज्जम याची कोकणावर स्वारी :

बादशहाचा निरोप घेऊन शाहआलम रामदुर्ग (कोकणातील एक तालुका) जो संभाजी महाराजांच्या ताब्यात होता त्या दिशेने निघाला. रामदुर्ग हा तालुका पन्हाळ गडापासून तीस कोस अंतरावर आहे. स्वराज्याच्या सागर किनाऱ्यावर येऊन, किनारपट्टीवरील मराठ्यांच्या हाती असणारे गड किल्ले जिंकून घ्यावेत आणि तेथे आपली ठाणी उभारण्याच्या दृष्टीने त्या प्रातांत अधिकार जमवून शांतता प्रस्थापित करावी असा

---

१ खोबरेकर, तारिख-इ-दिलकशा, पृ. ३३९.

२ उपरोक्त.

३ उपरोक्त.

मुअज्जमचा हेतू होता.[१] ही मोगल सेनानीची कोकणात दुसरी चढाई होती. शाहआलम मोठ्या जिद्दीने कोकण जिंकण्यासाठी मोठा लवाजमा घेऊन निघाला होता. त्याच्या समवेत औरंगजेबाने तोफखान्याचा दारोगा आतिशखान, लतीफशहा दखनी ऊर्फ सरफराज खान, बहलोलखानचा भाऊ इखलासखान, ख्वाजा मुकर्रम, नागोजी मराठा (हा नामांकित आणि त्या प्रदेशचा जाणकार होता) आणि वीस हजार फौज देण्यात आली होती.[२] मराठ्यांनी अटीतटीने झुंज दिली तरीदेखील मराठ्यांची काही शहरे आणि किल्ले काबीज करण्यात मोगल सैन्य यशस्वी झाले. शहाजादा सप्टेंबर महिन्यात कोकणात निघाला. तेव्हा हसन अलि खान भीमेच्या काठावर होता. शहाजादा मुअज्जम यास येऊन मिळावे अशी त्याला आज्ञा देण्यात आली. मुअज्जमने मजल दरमजल करीत कृष्णा ओलांडली. वाटेत मराठ्यांच्या फौजेने प्रतिकार केला. वाटा अवघड आणि अरुंद असल्यामुळे शाहजाद्याच्या आघाडीवरील फौजेशी शत्रूची प्रखर युद्धे झाली. मराठ्यांनी कडवा संघर्ष केला. दोन्ही बाजूकडील कित्येक लोक मृत्युमुखी पडले.[३] शाहजादा मुअज्जम रामघाटाच्या (रामशेज घाटाच्या) तोंडाशी पोचला. त्या भागात घनदाट अरण्ये होती. नाइलाजाने शाहजादा याने घाटाच्या तोंडाशी चार मुक्काम केले. सैन्य आणि बुणगे यांना घाट ओलांडण्यास फार कष्ट झाले. नंतर शहाजादा आपली पथके घेऊन रामघाट पार करून गेला आणि सावंतवाडीत आला. ह्या मोहिमेचा अत्यंत रसभरीत वृत्तांत खाफीखानाने पुढे वर्णन केल्याप्रमाणे दिला आहे : रामशेज घाटाचा प्रदेश काटेरी वृक्षे आणि घनदाट अरण्ये असणारा होता. रस्त्यांच्या एका बाजूस उंचच उंच पर्वत होते, तर दुसऱ्या बाजूकडे खोल दरीखोरे. कित्येक सैनिक आणि बुणगे ह्या मार्गक्रमणादरम्यान मरण पावले. ख्वाजा अबुल मुकर्रम आणि सरदार यांनी यासमयी असाधारण धैर्य दाखविले. परंतु उपलब्ध असणारी खाद्यसामग्री आणि कोकणातील हवामान मोगल सैन्यास न मानवणारे अशा प्रकारचे होते. त्या हवामानात घोडे आणि उंटदेखील टिकाव धरू शकत नव्हते. त्यामुळे ह्या मोहिमेअंतर्गत कित्येक माणसे व जनावरे दगावली. सैन्यात घोडे शिल्लकही राहिले नाहीत. अशावेळी स्थानिक शत्रूसैन्याने मोगल सैन्याच्या सर्व मार्गांची कोंडी करून त्यांचा दाणागोटा तोडला. मोगल सैन्याची अवस्था अत्यंत बिकट, दैवाधीन झाली. शहाजाद्याला त्या प्रदेशात अधिक काळ राहणे अशक्य झाले. अखेरीस त्याने माघार घेण्याकरता सम्राट औरंगजेबाकडे अनुज्ञा मागितली.[४]

---

१ पगडी, खाफीखान (मराठी भाषांतर), पृ. १३-१४.

२ सरकार, औरंगजेब, भाग ४, पृ. २९०.

३ उपरोक्त.

४ खोबरेकर, कित्ता, पृ. १४३.

परतीच्या प्रवासात दिनांक २८ डिसेंबर १६८३ रोजी शाहआलमने कुडाळ आणि बांदे जाळले. यानंतर तो दिनांक १५ जानेवारी १६८४ ला डिचोलीस पोचला. तेथून तो वेंगुर्ल्याकडे गेला. दिनांक २० फेब्रुवारी रोजी तो मालवणला गेला आणि तेथून तो बारदेश नदीच्या काठावर जाऊन पोचला. यावेळी शाहआलमच्या सैन्यात धान्य सामग्रीची तीव्र टंचाई जाणवत होती. बारदेश नदी गोवा शहराच्या उत्तरेस आहे. गोव्यात पोर्तुगीज प्रबळ होते. त्यांच्या मदतीने सुरतहून मोगल सैन्याकरता जहाजातून रवाना केलेली अन्नधान्य सामग्री ताब्यात घेता आली असती. त्यावेळेस मोगल सैन्यात रसदेची महर्गता फार झाली. कधीकधी तीन-तीन, चार-चार रुपये देऊनही एक शेर गव्हाचे पीठ मिळणे कठीण झाले. एकाही सरदाराच्या तबेल्यात स्वारीयोग्य घोडा राहिला नाही. उपासमारीने लोकांचे प्राण कंठाशी आलेले होते. मोगल सैन्याची झालेली ही दुर्दशा बादशहाला कळविण्यात आली. त्याने सुरतेच्या सिद्दी खैरीयत खान आणि याकूत खान यांना आज्ञा करून हवे तितके धान्य जहाजात भरून समुद्रमार्गाने शाहाजादा याच्या सैन्याकरता पाठविण्यास सांगितले. परंतु मोगलांनी पाठविलेली रसद समुद्रकाठावर ठिकठिकाणी मराठ्यांचे किल्ले असल्यामुळे शाहआलमला मिळू शकली नाही.[१] सुरतेहून जहाजे निघाल्याची बातमी मराठ्यांना कळताच त्यांनी हल्ले करून ती लुटली. या हल्ल्यातून जी वाचली त्यातील थोडेच उरलेले धान्य शाहआलमच्या छावणीपर्यंत पोचले. लष्करातील प्रत्येक सरदारास ३०-४० पल्ल्यापेक्षा अधिक धान्य पोचले नाही. अखेर शहाजाद्याला परत यावयाची बादशहाने आज्ञा केली.[२] इ. स. १६८४ च्या मे महिन्यात जंजिऱ्याच्या सिद्दीने शाहआलमकडे थोडी रसद पोचवली होती.

पावसाळ्यापूर्वीच कोकण सोडण्याचे मुअज्जमने ठरविले. शाहजाद्याने पुन्हा एकदा सम्राटास कळवले की, " कोकणातील खराब हवामानामुळे सैन्यातील घोडे आणि इतर वाहतुकीची जनावरे मरू लागली होती. छावणीमध्ये अन्नधान्याची महागाई आणि टंचाई कळसास पोचली होती.[३] परतीच्या वाटेत रामघाट चढत असताना रसदेच्या टंचाईमुळे व मराठ्यांच्या हल्ल्यांनी व रोगराईमुळे मोगल सैन्याचे अत्यंत हाल झाले. तेव्हा दिनांक २० एप्रिल १६८४ रोजी औरंगजेबाने ताज्या दमाच्या सैन्यासह मोठी कुमक देऊन रणदुल्लमखान यास शहाआलमला मदत करून त्याला त्याच्या सैन्यासह सुरक्षितपणे परत आणण्याकरता रवाना केले.[४]

१ पगडी, खाफीखान, पृ. ८.

२ उपरोक्त.

३ खोबरेकर, कित्ता, पृ. क्र.

४ फार्सी साहित्य खंड, भाग ६, क्र. ५१०, पृ. ३२८-३२९.

अशा तऱ्हेने मोगलांची मराठ्यांविरुद्ध कोकणातील पहिली चढाई संपुष्टात आली. मराठे अतिशय शौर्याने लढले आणि लष्करी डावपेचांमध्ये ते मोगलांहून वरचढ ठरले. अशा प्रकारे रसदेच्या कमतरतेमुळे औरंगजेबाची कोकणात मोगल सैन्य घुसवून संभाजी महाराजांना नामोहरम करण्याची महत् योजना दुर्दैवाने फसली.[१] मराठ्यांविरुद्ध यश मिळत नाही असे जाणवताच काही काळ औरंगजेबाने आपला बंडखोर शाहजादा अकबर आणि संभाजी महाराज यांच्याविरुद्ध कारवाई बाजूला ठेवून दक्षिणेतील विजापूर आणि गोवळकोंडा ही मुसलमान राज्ये नेस्तनाबूत करून मोगल साम्राज्यांत ती विलीन करण्यावर आपले लक्ष केंद्रित केले. ह्या दोन्ही राज्यांकडून संभाजी महाराजांना प्रसंग परत्वे मदत मिळत असे तसेच ही दोन्ही राज्ये " शिया " पंथाची अनुयायी होती त्यामुळे फार पूर्वीपासूनच " सुनी " पंथांचा पुरस्कार करणाऱ्या औरंगजेबाला त्यांचा काटा काढण्याची इच्छा होती. याच दोन कारणास्तव औरंगजेबाचा ह्या दोन मुसलमान राज्यांवर रोष होता. संभाजी महाराज विजापूरचा सुलतान आणि गोवळकोंड्याचा सुलतान या तिघांनी तह करून औरंगजेबाला तोंड देण्याची तयारी केली होती. औरंगजेबाने संभाजी राजांशी मैत्री करणाऱ्या आणि त्यांच्या प्रभावाखाली असणाऱ्या ह्या दोन्ही सुलतानाच्या राज्यावर स्वारी केली. इ. स. १६८५ सालच्या एप्रिल महिन्यात औरंगजेबाने विजापूरचा वेढा सुरू केला. दिनांक २७ मार्चला त्याने विजापूरवर स्वारी केली आणि विजापूरकरांनी निकराने केलेल्या प्रतिकारास तोंड देऊन दिनांक २ सप्टेंबर १६८६ रोजी विजापूर जिंकून घेतले.

त्याचप्रमाणे दिनांक २८ जानेवारी १६८७ रोजी मोगल सैन्याने गोवळकोंड्यावर आक्रमण केले आणि त्याच वर्षी दिनांक १ ऑक्टोबरला गोवळकोंड्याने शरणागती पत्करली. ह्या तीन वर्षांच्या काळात विजापूर-गोवळकोंड्यातील मोहीम चालू असताना औरंगजेबाने कोकणातील मराठ्यांवर वचक ठेवण्याचे, मराठ्यांना कोकणात नामोहरम करण्याचे मुख्य उद्दिष्ट काहीसे बाजूला ठेविले.[२]

मोगलांच्या कोकणप्रदेशातील इ. स. १६८४ पासूनच्या आक्रमक हालचाली

औरंगजेबाने कोथळागड आणि कल्याण-भिवंडी येथील आपले सैन्य काढून घेतले तर त्याने कोकणातील आक्रमक हालचाली इ. स. १६८४ मध्ये सुरू केल्या. कोथळागड

१ फार्सी साहित्य खंड, भाग ६, क्र. ५११, पृ. ३३०.

२ उपरोक्त.

हा तळकोकणातील घाटाच्या डोंगरात आहे. तो ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात शहापूरच्या ईशान्येस १०-१२ मैलांवर आहे. औरंगजेबाने दिनांक १२ नोव्हेंबर १६८४ च्या सुमारास आपल्या काही सरदारांना संभाजी महाराजांच्या ताब्यातील किल्ले घेण्याकरता पाठवले. काझी मुहम्मद आणि अब्दुल कादर यांनी फितुरीने कोथळागड जिंकून घेताच अब्दुल कादर आणि त्याचे ३०० बंदूकधारी दिनांक ८ नोव्हेंबर १६८४ रोजी कोथळागडाच्या पायथ्याशी पोचले. मराठ्यांनी या लोकांना मागे हटवले. तरीदेखील काही लोक किल्ल्याच्या मगरकोट दरवाजाजवळ पोहोचले. दरवाजा उघडा म्हणून त्यांनी आरडाओरडा केला. किल्ल्यावरील मराठी सैनिकांना वाटले की, आपलीच माणसे हत्यारे नेण्यासाठी आली आहेत. किल्ल्यातील सैनिकांनी किल्ल्याचे दार उघडताच मोगल सैनिक किल्ल्यात शिरले. किल्ल्यांत मराठ्यांची फौजही होती. मराठे व मोगल यांच्यात लढाई झाली. तेवढ्यात अब्दुल कादरही गडावर चढला. झालेल्या चकमकींत मोगलांना यश आले. इ. स. १६८४ च्या नोव्हेंबर महिन्यामध्ये मराठे आणि मोगल यांच्यात वारंवार लढाया होऊन अखेरीस कोथळागड मोगलांनी सर केला.[१] मोगलांनी गड घेतल्याच्या दुसऱ्याच दिवशी मराठ्यांनी किल्ला वेढला. बाणांची व बंदुकीची लढाई झाली.[२] किल्ल्यातील दारूगोळा आगीच्या भक्षस्थानी पडला. गडावर जाणारी सामग्री मराठ्यांनी लुटली असल्याने मोगल सैन्याला किल्ल्यात दारूगोळा व दाणागोटा मिळेना. तेव्हा अब्दुल कादरने बादशहाला लिहून विनंती केली की, " मराठ्यांविरुद्ध किल्ला लढवण्याकरता मदतीची आवश्यकता आहे. माझ्या मदतीसाठी कोणी आले नाही तर मी जगेनसे वाटत नाही. तेव्हा औरंगजेबाने मोगल सेनानी अब्दुल करीम आणि इतर सरदारांना अब्दुल कादरची मदत करण्याकरता पाठविले.[३] १९-२० नोव्हेंबरच्या सुमारास जुन्नरचा किल्लेदार अब्दुल अजिजखान याने आपला मुलगा अब्दुलखान यास सैन्यासह अब्दुल करीमच्या मदतीकरता पाठवले. अब्दुलखान तेथे पोचला तेव्हा मराठ्यांचा सरदार नारोजी त्रिंबक याने मोगल सैन्याची वाट अडवण्याकरता तेथील खोरे रोखून धरले होते, म्हणून अब्दुल कादरने हल्ला केला. तलवार, खंजीरानी हातघाईची लढाई झाली. लढाईत नारोजी पकडला गेला. तो व मराठ्यांचे इतर सरदार धारातीर्थी पडले.[४] इहतमाम खानाने नारोजी त्र्यंबकजीचे डोके रस्त्यावर टांगले. ह्या अधम कृत्यात सहभागी

१ फार्सी साहित्य खंड, भाग ६, पत्र क्र. ५१४, पृ. ३३१-३३२.

२ उपरोक्त, क्र. ५१६, पृ. ३३२-३३३.

३ उपरोक्त, क्र. ५१६, पृ. ३३३.

४ उपरोक्त, क्र. ५३०, पृ. ३४२.

झालेला शिकारपूरचा मोगल ठाणेदार माणकोजी याने उदाजी बरोबर ह्या विजयाचा वृत्तांत आणि नारोजी त्र्यंबकचे शिर औरंगजेबाकडे पाठविले.[१] किल्ला जिंकून घेतला म्हणून गडाची सोन्याची किल्ली औरंगजेबाकडे पाठविली. औरंगजेबाने उदाजीलाही खुश होऊन "खिलत" दिली.[२] इ. स. १६८४ च्या डिसेंबर महिन्यात औरंगजेबाने कोथळागडाचे नाव बदलून "मिपताहुलफतह" असे नाव दिले.[३] नंतर औरंगजेबाने मोगल सेनानी मर्हरमखान याला कोथळागड किल्ल्यावर जाण्याचे आणि तेथे मराठे आक्रमण करतील याकरता सावध व सुसज्ज राहण्याचे आदेश दिले. हा गड घेण्यातही फितुरी झालेली दिसते. गोविंदराव आणि इतर मावळ्यांनी मनसबीच्या आशेने कोथळागड घेण्यास मदत केल्यामुळे औरंगजेबाने त्यांनाही २५०० होन बक्षिसादाखल दिले.[४]

एकीकडे अशा तऱ्हेची फितुरी झालेली दिसत असली तरी दुसरीकडे ध्येयनिष्ठ मराठ्यांनी कोथळागड परत जिंकून घेण्याचे प्रयत्न केलेले दिसतात. त्यांनी इ. स. १६८५ च्या जानेवारीत तळकोकणातील कोथळागड मोगलांकडून पुन्हा जिंकून घेण्याचा प्रयत्न केला. इ. स. १६८४ च्या डिसेंबर महिनाअखेर मराठ्यांनी गडाकडे जाणाऱ्या मोगल सैन्यास अडवले. तसेच पायदळाच्या एका तुकडीने किल्ल्यात प्रवेश मिळविला. किल्लेदार सय्यद अब्दुल करीम खानाबरोबर बाण व बंदुकीची चकमक उडाली. मराठ्यांनी मदतीकरता गडाकडे येत असणाऱ्या मोगल सैन्याला अडवले असल्यामुळे ती मदतही वेळेवर मिळाली नाही. या वारंवार घडणाऱ्या चकमकींबाबत औरंगजेबाला पत्रातून खबर देण्यात आली होती की, अशा उद्भवणाऱ्या अडचणीमुळे किल्ल्यातील लोकांना दाणगोटा इ. साहित्याचा पुरवठा नीट होत नाही. तेव्हा औरंगजेबाने जुन्नरचा फौजदार अब्दुल खैर यास कोथळागडावर धान्य, रसद पुरवण्यास आदेश दिला.[५] त्यानंतरही एकदा सातशे पायदळाच्या तुकडीने दोर घेऊन किल्ल्यात शिरण्याचा प्रयत्न

१ फार्सी साहित्य, खंड, पत्र क्र. ५३१, पृ. ३४३.

२ उपरोक्त, क्र. ५३८, पृ. ३४७.

३ फार्सी साहित्य खंड, भाग ६, क्र. ५५४, पृ. ३६०, क्र. ५५५, पृ. ३६१. क्र. ५५६, पृ. ३६२.

४ जेधे शकावली, पृ. ३२-३३.

५ फार्सी साहित्य खंड, भाग ६, क्र. ५७७, पृ. ३८३.

केला. दोरीच्या शिडीने २०० लोक किल्ल्यात शिरले. त्यांची किल्लेदार अब्दुल कादरशी चकमक झाली. पण यातही मराठ्यांना यश मिळाले नाही. मोगलांनी मराठ्यांच्या कित्येक सैनिकांना ठार मारले व जखमी केले. कोथळागड परत जिंकण्यात मराठ्यांना काही यश आले नाही. मराठ्यांना अनेक आघाड्यांवर लढावे लागत असल्यामुळे त्यांना तेथे कदाचित कुमक कमी पडली असल्याचा संभव होता.

मोगल मराठ्यांच्या मुलुखात शिरून आगेकूच करण्याचा प्रयत्न सर्व शक्तीनिशी करीत होते. मराठी मुलूख उद्ध्वस्त करीत होते. गावेच्या गावे लुटून बेचिराख करीत होते. इ. स. १६८५ च्या जानेवारी महिन्यात गाझीउद्दीन खान नामक मोगल सरदार पुण्याहून बोरघाटातून उतरून पुढे आला. निजामपूर नजीक येऊन त्याने मराठ्यांकडील तीन गावे जाळून भस्मसात केली. पुण्याजवळच जुन्नर, अहमदनगर इत्यादी ठिकाणी मोगलांची ठाणी होती. या ठाण्यांवरून पुणे जिल्ह्यात येणे त्यांना फारसे कठीण नव्हते. गाझीउद्दीन खानाने त्या गावांमधील माणसे, जनावरे पकडून नेली. तेथून तो पुढे पाचाडच्या रायगड वाडीस गेला जिथे संभाजी महाराज त्यांच्या नातलगांसह राहिले होते. मोगल येत असल्याची खबर मिळताच संभाजी महाराज त्या सर्व नातेवाईकांसह रायगडावर परत गेले. मग गाझीउद्दीन खानाने पाचाडवाडी, निजामपूर आणि जवळपासची गावे जाळली. नंतर खानाने रायगडापासून दोन कोस अंतरावर छावणी घातली असताना संभाजी महाराजांचे सेनापती हंबीरराव मोहिते आणि रूपाजी भोसले यांनी पंधरा हजार स्वारांसह जाऊन गाझीउद्दीन खानावर चढाई केली. खानाने मराठ्यांना घेरले, इतकेच नव्हे तर गांगोलीपर्यंत सात कोस अंतरापर्यंत मराठ्यांचा त्याने पाठलागही केला. नंतर गाझीउद्दीन खान पुन्हा आपल्या छावणींत परत आला आणि छावणीभोवतीची संपन्न गावे त्याने लुटून नेली.[१] राजधानी रायगडाच्या परिसरांत गाजलेल्या ह्या पराक्रमाबद्दल शहाबुद्दीन खानालाच “ गाझीउद्दीन खान बहादूर ” असा किताब देण्यात आला होता. ह्या हल्ल्याच्या वेळी मोगल सैन्य मराठ्यांचा गांगोलीपर्यंत पाठलाग करत गेले असावे. तेथे कवी कलशाने त्याचा सामना केला आणि खानाला घाटावर माघारी परतवून लावले.[२]

१ जेधे शकावली, पृ. ३३.
२ गोखले, संभाजी, पृ. ३०८.

इ. स. १६८५ च्या मार्च महिन्यात मराठ्यांनी कल्याण-भिवंडीतील सैफुल्ला खानावर हल्ले चढविले. त्यावेळी मोगल आणि मराठ्यांच्यात झालेल्या चकमकीमध्ये शिकारपूरच्या माणकोजी पांढरे (मोगल ठाणेदार) याच्या भावाने जीवजीने सैफुल्ला खानाला मदत केली नाही. म्हणून सैफुल्लाखानाने जिवाजीला आपल्या नोकरीवरून काढून टाकले.[१] यावरून असे दिसून येते की कल्याण-भिवंडी परिसरात मोगलांनी ताब्यात घेतलेला मराठ्यांचा मुलूख पुन्हा जिंकून स्वराज्यात आणण्याकरता ध्येयनिष्ठ मराठे सरदार सतत प्रयत्नशील होते.


इ. स. १६८३ च्या सप्टेंबर महिन्यापासून ते १६८५ च्या जानेवारी-फेब्रुवारी महिन्यापर्यंतच्या काळात मोगल सैन्याने तळकोकणात शिरकाव केला होता. कुडाळ प्रांताचा देसाई खेम सावंत याने संभाजी महाराजांविरुद्ध बंड करून मराठ्यांशी शत्रुत्व असणाऱ्या पोर्तुगिजांकडे आश्रय घेतला होता.[२] पोर्तुगिजांच्या मदतीने तो गोव्यानजीकच्या मराठ्यांच्या मुलूखात लूट करीत असे, जाळपोळ करीत असे. इ. स. १६८४ च्या जानेवारी महिन्यात मोगल सैन्याने डिचोलीवर चढाई केली. कुडाळ व बांदा येथे जाळपोळ केली, वेंगुर्ले लुटले. कुडाळ आणि सोंदे येथील देसायांनीही महाराजांविरुद्ध बंड पुकारले. राम दळवी देखील बंडखोरांना सामील झाला. कादरा येथील देसायानेही बंड करून संभाजी महाराजांच्या प्रजेची घरे लुटली आणि जाळली होती. संभाजी महाराज आक्रमण करतील या भीतीमुळे पोर्तुगिजांनी दिनांक ८ फेब्रुवारी १६८५ रोजी खेम सावंताशी एक गुप्त करार केला. खेम सावंत हे कोकणातील इतर सर्व देसायांचे प्रतिनिधित्व करीत होते. इ. स. १६८७ मध्ये मोगल सैन्याच्या एका तुकडीने सिंधुदुर्गावर आक्रमण केले आणि संभाजी महाराजांकडे असणारे कुडाळ लुटले. दक्षिणेत आदिलशाही, कुतुबशाही बुडाल्यावर मराठे आणि मोगल अशा दोनच प्रतिस्पर्धी सत्ता उरल्या. ह्या दोन्ही सत्ता वतनदार देसायांना आपल्याकडे ओढण्याचा सतत प्रयत्न करीत होत्या. विजापूर गोवळकोंड्यांची मोहीम सुरू करताना औरंगजेबाने दुसरीकडे मराठी राज्याच्या सरहद्दीवर असलेल्या दळवी, देसाई यांना संभाजी राजापासून फोडण्याचा प्रयत्न सुरू केला. त्याच्या अधिकाऱ्यांनी सरहद्दीवरील या वतनदारांना आपल्या पक्षात ओढण्याचे प्रयत्न सुरू केले. औरंगजेबाचा वजीर आसदखान याने खेम सावंताला चार हजारी

१ म्हामाई, द सावंतस् ऑफ वाडी अँड द पोर्तुगीज, पृ. ६.

२ उपरोक्त.

आणि चार हजार स्वाराची मनसब देऊन पातशहाची मर्जी राखली तर अधिक फायदा होईल असे त्याला आश्वासन दिले होते. मोगलांना मदत केल्याबद्दल खेम सावंतास कुडाळ देशमुखी देऊ केली होती.

□□



मराठा आरमाराचे प्रमुख केंद्र, किल्ले सिंधुदुर्ग

३६. आदिलशाहीचा नाश

दक्षिणेतील मुसलमानी सलतनत शियापंथी होत्या, औरंगजेब सुन्नी होता.

निजामशाही शहाजहान बादशहाकडून बुडत असता तिला वाचविण्याचा प्रयत्न शहाजी राजांनी आपले सर्वस्व पणास लावून केला. शिवाजी महाराजांनी राज्य कमविल्यावर कर्नाटकच्या स्वारीस जाण्याचे योजून ते हैद्राबादेस गेले. तेथे कुत्बशहाशी मैत्रीचा तह केला त्यातील मुख्य आशय असा, दक्षिणेत मराठ्यांचे राज्य, तसेच आदिलशाही व कुत्बशाही ही दोन राज्य मिळून तीनही राज्ये आहेत.[१] ती दक्षिणेकरिता आहेत पठाणांकरिता नाहीत. ह्या तीन राज्यापैकी कोणा एकावर परकीय आक्रमण झाल्यास ह्या तिन्ही सत्तांनी एकत्र येऊन आक्रमणाशी मुकाबला करावयास हवा. ह्या ठरावास तिन्ही सत्ताधीशांनी मान्यता दिली. इ. स. १६३६ मध्ये शहाजहान बादशहाने निजामशाही बुडविली. त्या राज्याचा उत्तर कोकणातील मुलूख त्यावेळी आदिलशहास देण्यात आला. त्यानंतर शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेस इ. स. १६४६ पासून सुरुवात केली. आयुष्याच्या अंतापर्यंत शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना व प्रसार आदिलशाही मुलूख जिंकून केला होता. तरीही आदिलशाहीवर ज्या ज्या वेळी मुघलांचे आक्रमण होई त्यावेळी शिवाजी महाराज आदिलशाही सुलतानास सर्व तऱ्हेने साहाय्य देत असत.

आदिलशाहीचा प्रमुख अली आदिलशहा दिनांक २४ नोव्हेंबर १६७२ रोजी निधन पावला. त्यानंतर चार वर्षांच्या शिकंदर आदिलशहास सुलतान करण्यात आले. आदिलशाही कारभार वजीर खवासखान पाहू लागला. त्यास पठाण बहलोल खानाने दिनांक ११ नोव्हेंबर १६७५ रोजी कैद केले आणि जानेवारी १६७६ त त्यास ठार करून सर्व सत्ता आपल्या हातात घेतली. खवास खानाने नेमलेल्या सर्व दक्षिणी लोकांना काढून बहलोल खानाने राज्यांत पठाणांचा भरणा केला. शिकंदर बादशहा लहान होता त्यामुळे त्यास पठाण बहलोल खानाच्या तंत्राने वागणे भाग पडले. ह्या वेळी दरबारात दोन पक्ष निर्माण होऊन त्यात स्पर्धा सुरू झाली. त्यामुळे उत्तरेकडील मोगलांना दक्षिणेस पाय रोवण्यास संधी मिळाली त्याचा फायदा मुघली सरदार बहादूर खान याने घेऊन विजापुरवर स्वारी केली. यावेळी दखखन दक्षिणी राज्याकरिता आहे. करिता दक्षिणची

१ महाराज म्हणाले की "आदिलशाहीत बहलोलखान पठाण हुकूमशहा झाला. दक्षिणचे पाशाहीस पठाण झाला हे गोष्टी बरे नव्हे, दक्षिणची पातशाही आम्हा दक्षणियांच्या हाती राहो ते करावे." पगडी, भा. इतिहास आणि संस्कृती त्रै. व. ११, पु. ४१, पृ. ५४.

पातशाही आम्हा दक्षिणियांच्या हातात राहील ते करावे. उत्तरेकडील मुघलांचा हात इकडे शिरकू नये हे दूरदर्शीपणाचे धोरण शिवाजी महाराज कुतुबशाहीचा सुलतान अबुल हसन यांच्यात ठरले होते. त्याप्रमाणे दक्षिणेतील दोन शाह्या व मराठी सत्ता ह्यांच्यात वरीलप्रमाणे तह झाला. अशा रीतीने शिवाजी महाराजांनी उत्तरेकडील मुघलांविरुद्ध दक्षिणी सत्ताधाऱ्यांचा गट निर्माण केला.[१] त्यावेळेस संभाजी महाराज, आदिलशाही आणि कुतुबशाही सुलतानाचे संबंध मैत्रीचे राहिले होते.[२]

औरंगजेब १६८२ च्या मार्च महिन्यात औरंगाबादला येऊन दाखल झाला, त्यावेळी आदिलशाही व कुतुबशाहीतील नामांकित सरदार त्यांला जाऊन भेटले. त्यांना योग्य ते मानमरातब देण्यात आले.[३] आदिलशाहीतील बेदिली यावेळी पराकोटीला गेली होती. त्यावेळचा वजीर सिधी मसऊद खान याने श्रमसायास करून आदिलशाहीत सुव्यवस्था राखण्याचा प्रयत्न केला पण तो अयशस्वी ठरला.[४] म्हणून त्याने कारभारातून अंग काढून घेतले. त्यानंतर आका खुशरब हा १९ मार्च १६८४ रोजी वजीर झाला. त्याने आदिलशाही कारभारात बराच बदल घडवून आणिला. त्याचवेळी औरंगजेब व शहाअलमची पत्रे विजापूरकरांस आली त्यात मोगली सैन्यास आदिलशाही मुलूखातून वाट देणे, पाच-सहा हजार स्वारांनिशी मोगलांस मदत करणे वगैरे कलमे होती. पण मुख्य कलम पुढीलप्रमाणे होते. (१) संभाजीशी मैत्री व सख्य अंतर्बाह्यात्कारी करण्याचे सोडून देणे व सर्वांनी एक दिल होऊन संभाजीचा समूळ फडशा करण्याकरिता विचार करणे. (२) विजापुरी सरदार सर्जाखान याजला जागा न देणे व त्याजला आपल्या मुलखांतून घालवून देणे. याचे उत्तर आदिलशहाने दहा कलमात दिले. त्यातील मुख्य कलमे पुढीलप्रमाणे : (१) बादशाही सर्व फौजा माझ्या मुलूखातून उठवून काढून न्याव्यात म्हणजे रयतेची आबादानी होऊन धंदा रोजगारही चालेल. (२) माझे मुलुखांतील ऐवज आपल्या दौलतीकडे खर्चास गेला आहे तरी तो मजला परत करावा. त्या पैशांतून सैन्य उभारून संभाचा मोड करतो. (३) बादशाही फौजांनी पुणे चाकण मार्गाने शत्रूवर चालून जावे आणि लुटालूट करून शत्रूस नामोहरम करावे. मी आपल्या फौजा मिरज, गदग, लक्ष्मीश्वर मार्गाने नेऊन शत्रूची खराबी करतो. (४) मजकडून आपल्या फौजांस

---

१ शि. च. सा. खं. ७, ले ६५.

२ कित्ता, ले. ३७६.

३ पगडी, सेतुमाधवराव, मराठे व औरंगजेब, पृ. २२.

४ बुसा, पृ. ७४३, बेंद्रे, संभाजी, पृ. ४६८.

मदत झाली म्हणजे मजवर आपली कृपा होईल. (५) माझ्या राज्यांतील जो मुलूख संभाकडे गेला आहे, त्यातील मुलूख जसजसा फौजा सोडवील तसतसा तो मजकडे परत देण्यात यावा. (६) संभाजी शरण येऊन बादशहाच्या चाकरीत येईल किंवा सख्य करेल तर त्याच्याशी सख्य करण्यापूर्वी माझा मुलूख त्याजकडून घेऊन मला परत देववावा व नंतर सख्य करावे. संभाजीचे पारिपत्य करण्याचे काम सिद्धीस गेल्यानंतर बादशही फौजांनी माझ्या मुलूखांत उपद्रव करू नये व माझ्या मुलूखात लढाई होऊ देऊ नये.[१]

वरील अटीचा विचार बादशहाने केला नाहा. बादशहाचे म्हणणे असे की, ज्यांना बादशहाच्या संरक्षणाखाली रहावयाचे असेल त्यांनी (प्रजेने) त्यांच्या पाठीशी राहून संभाजीचा नाश करण्यास मदत करावी. यावेळी आदिलशाहीची परिस्थिती अशी होती की त्यांना सैन्य ठेवण्याइतकी ताकद राहिली नव्हती. मोगलांनी त्यांना दर घोडेस्वारामागे रोज अर्धा रुपया द्यावा आणि संभाजी राजांबरोबर लढण्याकरिता त्यांची योजना होईल तेव्हा त्यास भरपूर मुशाहिरा मिळावा. दोघांनाही ह्या अटी मान्य असल्याचे सांगण्यात आले पण वस्तु स्थिती अशी होती की विजापूरकरांना संभाजीच्या विरुद्धही जाण्याची ताकद नव्हती आणि संभाजीस मदत करून मोगलांचा क्रोधही सहन करण्याची तयारी नव्हती. त्यामुळे आदिलशाही दरबारास बादशहाची एकही अट पुरी करण्याचे सामर्थ्य राहिले नाही. त्यांना बादशहाच्या क्रोधास बळी पडावे लागले.

औरंगजेब बादशहाने दिनांक २० ऑगस्ट १६८३ रोजी शहाजादे अजम व त्याचा मुलगा बेदारबख्त यांची विजापुरच्या मोहिमेवर नेमणूक केली.[२] ३० ऑक्टोबरला अजम आपल्या फौजेसह मोहिमेवर निघाला. या मोहिमेचा मूळ हेतू विजापुराकडील संभाजी राजांकडे असलेला मुलूख काबीज करणे हा होता. इ. स. १६८४ च्या सुरुवातीस ह्या फौजेस रसद न मिळाल्यामुळे फारच हालांत दिवस काढावे लागले. ही दैन्यावस्था बादशहास समजताच त्याने ४ फेब्रुवारी १६८४ रोजी अजम व बेदारबख्त भेटावयास आले असता त्यांस विजापुरांकडील मुलूख लुटण्याचा हुकूम दिला. त्या आज्ञेवरून त्यांनी सर्व मुलूख लुटून धारवाडच्या किल्ल्यांवर हल्ला चढविला आणि थोड्याच दिवसांत तो किल्ला फत्ते करून माघारे छावणीस गेले.[३] संभाजीचे राज्य जिंकून घेण्यासाठी

१ बुसा. उ., पृ. ७४४-४९ बेंद्रे संभाजी, पृ. ४६९.

२ बेंद्रे सं., पृ. ४७१.

३ बुसा पा., पृ. ७२, बुसा, उ, पृ. ७४६.

विजापूरकरांचा फारसा उपयोग होणार नाही हे औरंगजेबाच्या लक्षात आले म्हणून त्याने आदिलशहावर दडपण आणण्याचे प्रयत्न चालूच ठेविले. औरंगजेब आणि त्याचा मुलगा शहाआलम यांनी शिकंदर पातशहाकडे १७ एप्रिल १६८४ व ३० एप्रिल १६८४ रोजी फर्माने पाठविली. त्यांत खालील मुख्य कलमे विजापूरकरांसाठी होती :---

(१) स्वारीचा खर्च व रूखद विजापूरकरांनी काही एक सबब न सांगता पोहोचविणे.

(२) आपले मुलूखातून फौजेचा व रसद येण्याजाण्याचा मार्ग मोकळा ठेवणे.

(३) संभाजीची मैत्री व सख्य बाह्यात्कारी व अंतरयामी करून सोडून देणे व सर्वांनी एकदिल होऊन संभाजीचा समूळ फडशा करण्याकरिता विचार करणे.[१]

फर्मानांतील बहुतेक कलमे शिकंदर शहाने मान्य केली पण औरंगजेबाने पाठविलेल्या एकही फर्मानाची शिकंदरकडून अंमलबजावणी होऊ शकली नाही. तेव्हा औरंगजेबास आदिलशहा संभाजीशी मैत्री व सख्यत्व करतो असा संशय आला. मराठ्यांविरुद्ध मोहिमेत १६८४ मध्यापर्यंत सर्व आघाड्यांवर अपयशच आले होते. संभाजीविरुद्धच्या युद्धात टिकाव लागेना म्हणून औरंगजेबाने दिनांक ३० ऑक्टोबर १६८४ रोजी आदिलशहीविरुद्ध युद्ध पुकारले.[२] औरंगजेबाने ९ ऑक्टोबरला शहाअलमला फार मोठी मदत पाठविली. २८ डिसेंबरला एक मणाची तोफ व २०/२० शेरांची एक अशा चार तोफा रूहुल्लाखानाच्या मदतीस विजापुरास रवाना केल्या.[३] या हालचालीत इ. स. १६८४ हे साल गेले.

आदिलशाहीवर चाललेल्या चढाईचा प्रतिकार करण्यासाठी दक्षिणेतील तीन सत्ताधीश एकत्र आले होते. संभाजी महाराज आणि आदिलशाही सुलतान यांच्यात एकमेकांना मदत करण्यासंबंधी वाटाघाटी चालू होत्या.[४] कुतुबशहाने (अबुल हसनने) आदिलशहास लिहून धीर दिला. मोगल आपलेवर चालून आला असला तरी भिण्याचे कारण नाही. आम्ही पैसे पुरवू. तिघे एक होऊन मोगलांवर तुटून पडू यांत तुमच्या राज्यास धक्का लागणार नाही.[५]

---

१ बुसा. स., पृ. ५९४.

२ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. २०५.

३ मासिरे आलमगिरी, पृ. १५२, १५४.

४ गोखले, पृ. २०७.

५ बुसातीन उस, सलातीने, पृ. ५९९.

वर सांगितल्याप्रमाणे संभाजी महाराजांनी विजापुरकरांना मदत पाठविली. १६८५ च्या मार्च महिन्याच्या सुरुवातीस मराठ्यांची फौज आणि आदिलशाही सैन्य विजापुरापासून १५ कोसांवर एकत्र आले. ही बातमी बादशहापुत्र अज्जमशहा याला कळली त्याने ह्या एकत्र जमलेल्या फौजेवर रात्री हल्ला केला. लढाई झाली. दोन्हीकडील बरेच लोक मारले गेले तरी आदिलशाही व मराठी फौजेस पराभव पत्करावा लागला.[१]

संभाजी महाराजांनी आदिलशहास मदत करण्यासाठी कवीकलश यास पाठविले. त्याने पन्हाळ्यास जाऊन तिथून फौजा रवाना केल्या.[२] आदिलशाहीवरील आक्रमण हे एकट्या आदिलशाहीवरील संकट नसून सर्व दक्षिणियांवर आहे असे समजून गोवळकोंड्याचा सुलतान व संभाजी महाराज वागत होते.

कलशाने धाडलेली फौज १६८५ च्या ऑगस्टमध्ये विजापुरास पोचली. हैदराबादचे, आदिलशहाचे व संभाजी महाराजांचे सैन्य मिळून ५० हजार फौज एकत्र जमली होती. शाहीउद्दीन खानाने ह्या फौजेवर हल्ला केला त्या हल्यात दोन हजार सैनिक कामास आले. नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस मराठा सरदार नागोजी बल्लाळ ७००० फौज घेऊन विजापूरकरांच्या मदतीस निघाला होता त्याजवर मोगल सेनापती शाहीउद्दीन खानाने कृष्णानदीच्या काठांवर हल्ला केला लढाई झाली. नागोजी माने माघारी परतला[३] डिसेंबर (१६८५) महिन्यांत हंबीरराव सैन्यासह विजापुरास पोहोचला.[४] मुघलांना न जुमानता हंबीरराव मुघलांचा पाठलाग करत होता. मिरज व बेळगाव हे आदिलशहाच्या ताब्यात होते. मिरज मुघलांच्या हाती पडल्यानंतर बेळगाव त्यांच्या हातात जाऊ नये म्हणून हंबीररावाने जोराचा प्रयत्न केला होता.[५]

वेढ्याचे काम चालू असतानाच इ. स. १६८६ साल सुरू झाले. १७ मार्च १६८६ रोजी विजापुरी लढाई झाली. त्यानंतर बादशहाने अजमशहाला सक्त लढाई देण्याकरिता नेमला. बादशहा खुद्द जातीने सोनापूरचे किल्ल्यांतून १४ जून १६८६ ला निघून ३ जुलैला रसूलपूर येथे येऊन आपल्या लष्कराचे डेरे टाकिले.[६] ४ जुलैस मोर्चे वाढविण्यास व तोफांचे माऱ्याने बुरूज उडविण्यास व तटाखाली खणून सुरूंग लावण्यास बादशहाने

१ शि. च. सा. खं. २ ले ३९४.

२ ऐतिहासिक फार्सी साहित्य खं. ६, ले. ५८०.

३ शि. च. प्र., पृ. ३३.

४ अख ३/१२/१६८५.

५ बुसातीन, पु. ६०२.

६ शि.च. सा. खं. १२, ले ७.

हुकूम दिले. मोर्चाचे काम जोरात सुरू झाले खुद्द बादशहा घोड्यावर बसून स्वार होऊन किल्ला उडविण्याच्या तयारीकडे जातीने पाहत होता. शेवटी १० सप्टेंबरला विजापूर सरदारांनी बादशहाचा सरदार गाजी उद्दीनाची भेट घेतली व किल्ला मुघलांच्या स्वाधीन करण्याचे कबूल केले. १३ सप्टेंबरला विजापूरचा किल्ला बादशहाच्या हवाली झाला. व आदिलशाही प्रजा बादशहाचे अमलाखाली आली.[१] शिकंदररास बादशहाने दरबारांत बोलाविल्यावरून तो दरबारांत गेला. बादशहाने त्यास शिकंदरखान असा किताब दिला व सालीना १ लाख रुपयांची तैनात दिली. शिकंदर पुढे १४ वर्षे कैदेत राहिला. इ. स. १६९९त त्यास औरंगजेबाने विष घालून मारीले.

□□



विजापूरचा देखावा

१ बेंद्रे, संभाजी, पृ. ४८०

३७. कुत्बशाहीचा अंत

संभाजी महाराजांच्या चरित्रांत आदिलशाहीचा नाश व कुत्बशाहीचा अंत ही प्रकरणे देण्याचे कारण असे की शिवाजी महाराज पूर्णपणे स्वतंत्र राज्याचे धनी झाले. ते सांगण्यासाठी त्यांनी राज्याभिषेकही करविला. अशा ह्या स्वतंत्र छत्रपतीने दखखनची दुसरी दोन राज्ये विजापूरकर व गोवळकोंडेकर यांना एका मुख्य सूत्राच्या आधारे एकत्र आणले ते सूत्र असे : दखखन ही दक्षिण्यांकरिता आहे पठाणांकरिता नाही. तिन्हीपैकी एका राज्यावर परचक्र आल्यास त्याचे निवारण तिन्ही सत्तांनी सर्व शक्तीनिशी करावयाचे अशारीतीने उत्तरेतील मुघली सत्तेविरुद्ध दक्षिणी सत्ताधाऱ्यांचा गट शिवाजी महाराजांनी केला. आदिलशाहीवर मोगल बादशहाने आक्रमण केल्यावर आदिलशहाच्या मदतीस संभाजी महाराजांनी आपली फौज हंबीरराव मोहिते या सेनापतीबरोबर पाठविली, कुत्बशाहीकडून शस्त्रांची, सैन्याची व पैशाची मदत विजापूरकरांना झाली. पण वजीर फितूर झाल्यामुळे आदिलशाही संपुष्टात आली.

बहामनी राज्याच्या पाच शाह्या झाल्यावर कुत्बशाहीची स्वतंत्र सल्तनत इ. स. १५१२त सुरू झाली. शिवाजी महाराजांनी स्वराज्य संपादनाचा उद्योग सुरू केला त्यावेळी अब्दुल्ला कुत्बशहा राज्य करीत होता. तो २१ एप्रिल १६७२ रोजी निवर्तला. त्याच्यानंतर अबुल हसन ऊर्फ तानाशहा कुत्बशहा झाला. त्याने इ. स. १६७५ च्या अखेरीस मुसाफरखानास दिवाण पदावरून दूर केले. त्यावेळी राज्याचा सर्व कारभार मादण्णाकडे आला. मादण्णा व त्याचा भाऊ आकण्णा यांनी कर्नाटकाची व्यवस्था लाविली. शिवाजी महाराजांची भेट तानाशहाशी घडवून आणिली. हिंदू-मुसलमान धर्म भेदास गौणत्व देऊन जीवनात समरस झालेल्या सर्व दक्षिणियांस संघटित करण्याचे काम शिवाजी महाराज व तानाशहा यांनी घडवून आणिले.[1] आदिलशाहीचा मोगल बळी घेऊ पाहताच संभाजी महाराजांनी शक्य ती मदत देऊन आदिलशाही मोगलांपासून वाचविण्याचा प्रयत्न केला.

---

१ बेंद्रे, गोवळकोंड्याची कुत्बशाही, पृ. १४५-१५१.

औरंगजेबाने दारा शिकोहाचा मुलगा मोहमदशहा यास वकील म्हणून गोवळकोंड्यास दिनांक २ जानेवारी १६८२ रोजी पाठविले. दिनांक १४ मे १६८२ रोजी कुत्बशहाचा वकील मोहमद मासूम याने बादशहाची भेट घेऊन दोन लाख चव्वेचाळीस हजार रुपयांची पेशकश सादर केली, वकिलास पोषाख मिळाला.[१]

संभाजी महाराजांविरुद्ध लढाई सुरू करताच औरंगजेबाने आपले हेजीब आदिलशाहीत व कुत्बशाहीत पाठवून वरकरणी सख्य राखण्याचा देखावा चालू ठेविला आणि त्या शाह्यात अंतर्गत यादवी माजेल असे प्रयत्न सुरू केले. कुत्बशहाशी लढाई करण्याचे निश्चित केले, गुलबर्ग्याहून जान निसारखान व मालखेडहून पर्वीझ बेग यांनी जाऊन जून १६८५ च्या सुरवातीस सेरमची गढी घेतली. अबुल हसनने शेख मिनाज, रुस्तुमराव व बडा खान यांस गढी घेण्यासाठी रवाना केले. त्यांच्या मदतीस महमद इब्राहीम व हसनबेग ऊर्फ खलिलुल्ला खान यांना पाठविले. ते एक महिना मोर्चे बांधून राहिले. नंतर लढाई झाली. मोगल सैन्याचा बराच नाश झाला. हे ऐकून औरंगजेबाने शहाआलम यास कुत्बशहावर चालून जाण्याचा हुकूम दिला.[२] तत्पूर्वी औरंगजेबाच्या हाती कुत्बशहाने मुघलाविरुद्ध आपण कसकशी मदत करू इच्छितो या आशयाचे विजापूरकरांना लिहिलेले पत्र आले.[३] तेव्हा त्याने त्रिवर्गाची जूट मोडण्याचा प्रयत्न केला. त्याने गोवळकोंड्याच्या सुलतानास खालील अटी मान्य करावयास भाग पाडले. (१) कुत्बशहाने ताबडतोब मादण्णा व आकण्णा यांना दूर करावे. (२) राहिलेली खंडणी व पेशकश देऊन सैरम व कोहीर हे प्रांत परत मुघलांस द्यावे. (३) सर्वांत उत्तम असा जो कोहिनूर हिरा कुत्बशहाजवळ आहे तो त्याने मुघलांस द्यावा.

औरंगजेबाच्या वरील अटी मान्य करून कुत्बशहाने औरंगजेबाशी चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला. मादण्णा आणि आकण्णा यांचा दरबारातून परत येताना कुत्बशहाची पत्नी सरोमा जानी बेगम हिने वाटेत खून करविला. ज्या नोकराकडून दोघा मंत्र्यांचा खून करविला त्यांनी मादण्णाचे घर लुटले. पुष्कळ ब्राह्मण कारभाऱ्यांची घरेदारे लुटली गेली. पुष्कळ लोक मारले गेले.[४] (ऑक्टोबर-नोव्हेंबर ८५)

१ सरकार जदुनाथ, मासीरे आलमगिरी, पृ. १४६, बेंद्रे, संभाजी, पृ. ४९१.

२ बेंद्रे, संभाजी, पृ. ४९८.

३ सरकार जदुनाथ, मासीरे आलमगिरी, पृ. १४९.

४ बेंद्रे, संभाजी, पृ. ४९९.

कुत्बशहाने औरंगजेबाच्या अटी मान्य करूनही औरंगजेबाने गोवळकोंड्यास वेढा घातला. तो बरेच दिवस चालला. मोगल सैन्याकडून रोजच्या रोज हल्ले चढविले जात. कुत्बशहास बाहेरून मदत हवी होती ती संभाजी महाराजांनी मोठ्या राजकारणावर लक्ष ठेवून दिली.

तसेच मोगली सैन्य उत्तरेत खेचले जावे म्हणून रजपुतांच्या साहाय्याने संभाजी महाराजांनी मोगली हद्दीतच लढा सुरू केला होता. राजियांनी अकबरास साहाय्य दिल्याने अकबराचे मोठे सैन्य हिंदुस्तानाच्या मध्यापर्यंत नेऊन मिळविले होते. तसेच संभाजी महाराजांनी दुर्गादास व धनाजी जाधव यांच्या हाताखाली आपले सैन्य देऊन अकबराच्या नावाने ते मेवाड-बुंदेल खंडापर्यंत भिडविले होते.[१]

संभाजी महाराज मोगलांवर बाहेरून हल्ले चढविण्याकरिता व सर्वत्र रसद मारून मोगली सैन्य जेर करण्यासाठी आपल्या सैनिकासह गोवळकोंड्याभोवती हिंडत होते.[२] त्यांचे कर्नाटकातील सैन्यही नाकेबंदी करून राहिले होते. मच्छलीपटणचे दिनांक ४ एप्रिल १६८७ चे फोर्ट सेंट जॉर्जला लिहिलेल्या पत्रात संभाजीराजे १२ हजार स्वार व ५० हजार पायदळ लोकांसह गोवळकोंडा याच्या रोखाने गोवळकोंड्यापासून ४/५ दिवसांच्या मुक्कामावर आले आहेत असा मजकूर आहे.[३] गोवळकोंड्याचा सुलतान मोगलांच्या हल्ल्याचा जोरात प्रतिकार करीत होता. औरंगजेबाने कुतुबशाही सरदार फोडण्याची पराकाष्ठा चालविली होती. त्यात त्याला थोडे यशही आले होते.

बादशहा गुलबर्ग्याहून निघून बिदरच्या वाटेने गोवळकोंड्यास दिनांक १४ जानेवारी १६८७ रोजी पोहोचला.[४] गोवळकोंड्याच्या वेढ्याला सुरुवात झाली. अबुलहसन कुतुबशहा किल्ल्यात कोंडला गेला. मोगलांनी आपल्या तोफा किल्ल्याच्या तटापर्यंत नेल्या. गोवळकोंडा किल्ल्यास वेढा दिल्यानंतर काहीकाळ अवर्षणामुळे आणि मुघलसैन्यात प्लेगची साथ पसरल्यामुळे असंख्य सैनिक मेले. त्यातच भर म्हणजे संभाजी महाराजांचे कुत्बशहाच्या मदतीस धावणाऱ्या सैन्याने मुघल सैन्याला बाहेरून येणारी रसद लुटण्याचा सपाटा चालविला होता. अखेरीस फितुरीने बाजी मारली. अब्दुला पन्नी नावाचा अबुलहसनचा एक

१ फोर्ट सेंट जॉर्ज व्हा ४ नं. १११, पृ. १०३, मच्छालीपटन ते फोर्ट जॉर्ज दिनांक ३१ मार्च १६८७.

२ बेंद्रे, संभाजी, पृ. ५०५.

३ मच्छली पटण ते फोर्ट सेंट जॉर्ज व्हा. ४ नं., पृ. ११२.

४ पगडी, मोगल आणि मराठे, पृ. ९५.

सरदार होता त्याने मोगलांना किल्ल्यांत घेतले. (२२ सप्टेंबर १६८७)[१] अबुल हसनने शांतपणे राज्य मोगलांचे हवाली केले अशा रीतीने गोवळकोंड्याचे राज्य खालसा झाले. औरंगजेबाची त्याने भेट घेतल्यावर त्यास कैद करण्यात आले. पुढे अबुल हसनने १४ वर्षे दौलताबादेत कारागृहावास सोसला व तो इ. स. १७०० त निवर्तला.[२]

औरंगजेबाने हैदराबाद शहराचे नाव दारुल्जिहाद असे ठेविले. अधिकाऱ्यांच्या नेमणुका होईपर्यंत हैदराबाद व कर्नाटक प्रांताचे काम कासिम खानाकडे सोपविण्यात आले.[३]

औरंगजेबाने धूर्तपणे आदिलशाही आणि कुत्बशाही ही दोन स्वतंत्र राज्ये बुडविली आणि त्यानंतर मराठी राज्य गिळंकृत करण्याकडे आपली सर्व शक्ती केंद्रित केली.

संभाजी महाराजांनी विजापूर व गोवळकोंडा या सत्ता वाचविण्यासाठी पराकाष्ठेची मदत केली, ही राज्ये बुडल्यानंतर संभाजी महाराज एकाकी पडले. त्यांना ह्यापुढे सर्व आघाड्यावर एकाकीच लढावे लागले.

□□

१ पगडी, मोगल आणि मराठे, पृ. ९५.

२ बेंद्रे, संभाजी, पृ. ५०९.

३ पगडी, कित्ता, पृ. ९५.

३८. संभाजी महाराज आणि कर्नाटक

शहाजी राजे बंगलोरास राहून आदिलशहाकडून मिळालेली कर्नाटकची जहागीर सांभाळीत होते. शहाजी राजांच्या मृत्यूनंतर ह्या जहागिरीचा सांभाळ व्यंकोजी, शिवाजी महाराजांचा सावत्र भाऊ करीत होता. शिवाजी महाराजांनी कर्नाटकांत इ. स. १६७८/१६७९ त स्वारी केली. या स्वारीत त्यांनी जिंजी, वेलूर, तंजावर, कोलार, होसकोट दोड्डा, बाळापूर हा प्रदेश जिंकला. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी महाराजांनी आपण मराठी राज्याचे धनी होऊन स्वत:स राज्याभिषेक करवून घेतला ह्यावेळी त्यांना गृहकलहास तोंड द्यावे लागले. तसेच मराठी राज्यावर चहूकडून उठलेल्या शत्रूशी सामना द्यावा लागला. अशा अडचणीत असतानाही संभाजी महाराजांनी कर्नाटकातील प्रदेशांकडे दुर्लक्ष केले नाही.

शिवाजी महाराजांनी रघुनाथपंत हणमंते यास कर्नाटकाचे कारभारावर नेमिले होते. तिकडील प्रदेशांचा बंदोबस्त चांगला ठेवून त्यातून मोठी प्राप्ती त्याने काळजीपूर्वक पैदा केली.[१] शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजीस बाजूस ठेवण्याच्या कटांत पंताचे अंग असल्याचा संशय संभाजी महाराजांस आला म्हणून त्यास अटक करण्यात आली होती. लांबच्या प्रदेशांत विश्वासू माणसे नेमणे आवश्यक होते म्हणून संभाजी महाराजांनी आपला मेव्हणा हरजी राजे महाडीक यांची नेमणूक केली. त्याच्याबरोबर शामजी पुंडे यास कर्नाटकाचा कारभार सांगितला.[२] त्याजबरोबर जैताजी काटकर व दादाजी काकडे हे आणखी इसम नेमून पाठविले होते.[३] ही मंडळी सन १६८१ च्या एप्रिल महिन्यात दक्षिणेतून निघाली. परंतु ते जिंजीस पोचतात तोच शामजी नाईकास संभाजी महाराजांनी कैद करविले.[४] पुढे हरजी राजे एकटाच तिकडे कामावर होता. तो कारणपरत्वे देशी येऊन संभाजी महाराजांस आपल्या कारभाराचा झाडा देत असे. हरजीने आपला जम कर्नाटकात चांगला बसविला होता.

मराठ्यांच्या तंजावर जिंजी येथील राजसत्तेशिवाय कर्नाटकात म्हैसूर, मदुरा, रामगड, त्रिचनापल्ली, इक्केरी इत्यादी छोटी छोटी पाळेगारांची राज्ये होती. हरजी वगैरे मंडळी

१ सरदेसाई, रियासत उग्र प्रकृती, संभाजी, पृ.३४.

२ शि. च. प्र., पृ. ३०-३१.

३ जे. श. पारसनीस, तंजावरचा इतिहास, सरकारकृत औरंगजेब, रियासत, पृ. ९१.

४ शि. च. प्र. पृ., ३१.

कर्नाटकांत गेल्यापासून संभाजी राजांचा व म्हैसूरच्या चिक्कदेवरायाचा संबंध आला होता. स्वतः कर्नाटकांत लक्ष घालावयास संभाजी महाराजांस वेळ नसल्यामुळे त्यांनी हरजी महाडीकला कर्नाटकचे सर्वाधिकार देऊन कर्नाटकांतील सर्व गडकोटांचा अधिकार सोपविला होता. राजियांनी तेथील सर्व सुभेदार व इतर अधिकाऱ्यांवर हरजीच्या आज्ञेत वागण्याची आज्ञा केली होती.[१]

सन १६८२ च्या एप्रिलमध्ये श्रीरंगपट्टण व त्रिचनापल्लीकर याचा लढा सुरू झाला. त्यांत हरजीने त्रिचनापल्लीकरांस मदत केली. लढाई होऊन म्हैसूरचा कसलेला सेनानी कुमारच्या मारला गेला. हरजीने शत्रूचे दोन हजार घोडे जप्त करून आणिले, हरजीचा जय झाला त्यामुळे त्या प्रांतांत त्याचे वजन वाढले.[२]

विजापुरचा वेढा सप्टेंबर १६८६त संपला. १२ सप्टेंबर १६८६ रोजी विजापूर औरंगजेबाच्या हाती आले. आदिलशाही समाप्त झाली. विजापूरचे राज्य खालसा झाल्यामुळे स्वराज्याच्या दक्षिण आणि आग्नेय या सरहद्दीवर मोगलांचे राज्य झाले. औरंगजेबाने रूहुल्लाखान याची विजापूर प्रांताचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. मुघलांनी उत्तर कर्नाटकांतील भाग ताब्यात घेण्यास सुरुवात केली.

त्रिचनापल्लीच्या विजयाने हरजी पूर्वकर्नाटकाचा सर्वसत्ताधीश झाला. यापूर्वी संभाजी महाराजांनी कर्नाटकांत आतापर्यंत दोनदा स्वारी केली होती. संभाजी महाराजांनी आपला अधिकार कर्नाटकांत प्रस्थापित केल्याने तेथील प्रजा त्यांच्या वर्चस्वाखाली गेली असे मद्रासकर इंग्रज लिहितात.[३] संभाजी महाराजांस मुघलांविरुद्ध दक्षिणेकडील सत्ताधीशांच्या बरोबर एक फळी उभारावयाची होती.[४] पण म्हैसूरकरांनी मदुरेच्या राज्यातील काही भाग घेतल्याचे संभाजी महाराजांस समजल्यामुळे त्यांनी हा विचार सोडून दिला. म्हैसूरकरांच्या आक्रमक धोरणास विरोध करण्यासाठी राजियांनी म्हैसूरवर स्वारी करण्याचे ठरविले. [५] तत्पूर्वी संभाजी महाराजांनी इक्केरीचा नायक व गोवळकोंड्याचे सुलतान याजशी मैत्रीचा तह केला. त्याप्रमाणे ह्या दोघांचे पूर्ण साहाय्य घेऊन संभाजी महाराजांनी म्हैसूर राज्यावर स्वारी केली. चिकनहळ्ळीच्या पश्चिमास असलेल्या बाणावर ह्यास्थळी राजियांनी तळ दिला.[६] त्यावर चिकदेवराय जून १६८२ च्या सुमारास तुटून पडला. मोठी लढाई झाली. त्यात संभाजी महाराजांस हार खावी लागली. एकोजी संभाजी महाराजांच्या मदतीसाठी बाणावर येथे गेला पण चिकदेवरायापुढे त्याचा टिकाव लागला

१ फोर्ट सेंट जॉर्ज रेकॉर्ड, १६ सप्टेंबर, १६८१, २० सप्टेंबर १६८१.
२ बेंद्रे, संभाजी, पृ. ५२५, रियासत, पृ. ९१.
३ फोर्ट सेंट जॉर्ज, १० डिसेंबर, १६८१.
४ शि. च. खं. २ ले. ३९४.
५ शि. च. वृत्तसं. खं. १
६ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. ३२६.

नाही. त्यानंतर संभाजी महाराजंनी आपल्या सैन्याचा तळ बाणावर येथून त्रिचनापल्लीस हलविला. आणि त्रिचनापल्लीस वेढा घातला. कारण त्रिचनापल्लीकर ह्यावेळी मराठ्याच्या विरोधात गेले, तो वेढा चालू असतानांच मदुरेचा नायक चोककनाथ मरण पावला.[१] त्यानंतर संभाजी महाराजांनी तेघनापट्टण व पोटोनाव्हो ही शहरे जिंकून घेतली.[२] त्यामुळे तेथील व्यापाऱ्यांचे नुकसान झाले. या लढाईत एकोजीने संभाजी महाराजांना साहाय्य दिले होते. संभाजी महाराज एकोजी आणि हरजी यांच्या एकत्र हालचालीमुळे म्हैसूरकरांची गाळण उडाली म्हणून म्हैसूरकरांनी मुघलांची मदत मागितली. दरम्यान मदुरेच्या राज्याचे लचके मराठ्यांनी तोडले. मदुरेच्या राज्यांतील म्हैसूरकरांची सत्ता जवळजवळ नाहीशी झाली होती. म्हैसूरकरांस मराठ्यांनी सतत हल्ले करून जेरीस आणिले तेव्हा म्हैसूरच्या चिकदेवरायाने संभाजी महाराजांशी तहाची बोलणी सुरू करून संभाजीराजांना खंडणी देण्याचे कबूल केले. इ. स. १६८३ च्या सुरुवातीस संभाजी महाराज महाराष्ट्रात परत गेले.[३] राजे परत फिरल्यामुळे चिक्कदेवरायास थोडी शांतता मिळाली. दरम्यान त्याने आपला वकील मुघल दरबारी मदत मागण्यास पाठविला. दिनांक १७ एप्रिल १६८४ रोजी औरंगजेबाने सुजायतखानाला म्हैसूर येथे पाठवून म्हैसूरच्या नायकास साहाय्य दिले.[४] म्हैसूरच्या नायकांनी मागितलेली मोगलांची मदत ऑगस्ट १६८४ मध्ये म्हैसूरमध्ये पोहोचली. म्हैसूर व मुघल यांच्या जोडसैन्याला मराठे हिरिरीने तोंड देत होते.[५] मराठे धर्मपुरी नावाच्या कर्नाटकातील किल्ल्यास आठ महिने वेढा घालून होते त्याचवेळी संभाजी महाराजांस विजापूरकर व गोवळकोंडकरांनी खंडणी व नजराणा देऊन त्याचा मोठेपणा वाढविला यास्तव चिकदेवराय त्यांच्यावर रुष्ट झाला.[६] मुघलांची मदत चिक्कदेवरायाला येण्यापूर्वी म्हैसूरकर आणि मराठे यांच्यात लढाईचे आणि एकमेकांच्या प्रदेशांत जाऊन लुटमार करण्याचे प्रकार चालूच होते. औरंगजेब बादशहास त्याचे हस्तक बातमी पाठवीत असत. श्रीरंगपट्टणचा जमीनदार जगदेवराय याने बादशहास कळविले की संभाजीचा सरदार दादाजी काकडे ह्या सरदाराने २००० स्वार व २००० पायदळ बरोबर घेऊन म्हैसूरकरांच्या ताब्यातील किल्ले भिटोरवर हल्ला केला. त्याजशी जगदेवरायाच्या फौजेच्या बक्षीने ७००० स्वार व ५००० पायदळ घेऊन झुंज दिली. ह्या झुंजीत मराठा सरदार मुलासह ठार झाला. त्याचा भाऊ भिमाजी

---

१ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. ३२७.

२ कित्ता.

३ कित्ता, सेंट जॉर्ज, १४ नोव्हेंबर १६८३.

४ सरकार जदुनाथ, मासिरे आलमगिरी, पृ. १४८.

५ फोर्ट सेंट जॉर्ज, दिनांक २८ फेब्रुवारी १६८४.

६ शिवचरित्र वृत्तसं. खं. १, पृ. २९, ३२.

यास जिवंत पकडले. तिमाजी नावाच्या दुसऱ्या सरदारास जखमी केले. इतर १००० माणसे मारली व अनेकांना जखमी केले अशा रीतीने म्हैसूरकरांचा विजय झाला.[१] ह्या घडामोडी १६८४ च्या अखेरच्या आहेत. ही अखबारांतील बातमी अतिशयोक्तीची आहे. झुंजीत मराठा सरदार मुलासह कैद झाला.

डॉ. मुद्दाचारी यांनी कन्नड साधनांवर आधारित ' मायसोंर मराठा रिलेशन्स इन द सेव्हन्टिंथ सेंचुरी ' असा ग्रंथ लिहिला आहे, त्यावरून समजते की संभाजी महाराजांनी इ. स. १६८६ मध्ये म्हैसूर राज्यावर स्वारी केली हाती. यावेळी औरंगजेब विजापुर राज्य गिळंकृत करण्याच्या उद्योगात गुंतला होता. त्यास म्हैसूरच्या राजाने मदत केली होती. विजापूरकर व गोवळकोंडेकर हे औरंगजेबाचे विरोधांत होते. म्हैसूरच्या अनेक गडांवर पुरेशी शिबंदी नव्हती. त्याचे मांडलिक पाळेकर म्हैसूरच्या चिक्कदेवरायाविरुद्ध उठले होते. ही वस्तुस्थिती कळताच संभाजी महाराजांनी कर्नाटकांत म्हैसूर राज्यावर स्वारी केली. या स्वारीत मोरस, तामीळ, कोडग, व मलेय येथील नायक संभाजी राजांस मदत करण्यास सरसावले. ह्या नायकांना मानमरातब देण्याचे संभाजी महाराजांनी आमिष दाखविले तेव्हा त्यांनी मराठ्यांबरोबर म्हैसूर राज्यांचे केंद्रस्थान श्रीरंगपट्टणवर हल्ला केला.[३] यावेळी या भागांतील नायकांच्या राज्यांची स्थिती गोंधळाची झाली होती. त्यांना म्हैसूरकरांचे प्रभुत्व झुगारून देण्यासाठी ते हरजीस मदत करत होते. संभाजी महाराजांनी म्हैसूर प्रातांवर स्वारी केल्यामुळे या स्वारीचा खर्च निभावण्यासाठी लादलेल्या करामुळे त्रस्त होऊन म्हैसूरची जनता राजाविरुद्ध बंड करण्यास सिद्ध झाली. ७० हजार बंडखोरांचा एक पुढारी खास म्हैसूरच्या कोटावरच चालून गेला व त्याने राजाला कोंडले. दुसरा पुढारी ३० हजारांनिशी सत्यमंगलमच्या व त्या सभोवतालील प्रदेशात धुडगूस घालू लागला.[४] विजापूर १२ सप्टेंबर १६८६ रोजी औरंगजेबाच्या हाती पडले त्यानंतर मराठी राज्याच्या आग्नेय आणि दक्षिण सरहद्दीवर मुघल पसरले. सेनापती हंबीरराव मोहिते, रूपाजी भोसले, संताजी जगताप, रायाजी सामराज इत्यादी अधिकारी या भागात मोगलांशी लढत होते. काही मराठे सरदार मुघलांना मिळाले होते. त्यात नागोजी माने, बर्हिजी पांढरे, वाडीचे खेम सावंत, अर्जोजी महाडिक इत्यादी मंडळी होती.[५]

१ ऐतिहासिक फारसी साहित्य खं. ६, ले. ५२९, पृ. ३४१.

२ शि. च. वृत्त सं. खं १ पृ. ३०.

३ शि च. वृत्त सं., खं १, पृ. २९.

४ बेंद्रे, संभाजी, पृ. ५२७, श्री. बेंद्रे यांनी हीस्ट्री ऑफ नायकाझ ऑफ मदुरा या पुस्तकाच्या आधारे हा मजकूर घेतला आहे.

५ पगडी सेतुमाधवराव, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. ७१.

श्रीरंगपट्टणचा वेढा चालू असतानाच मराठ्यांनी म्हैसूर राज्यांतील प्रदेश लुटला तसेच पूर्वीच्या विजापूरच्या अंमलाखालील किल्ले व प्रदेश जिंकण्याचा सपाटा चालविला.[१]

कर्नाटकांत १६८६ नंतर हरजी महाडिकला मुघलांविरुद्ध लढा द्यावा लागला कारण मोगलांच्या तुकड्या त्या प्रदेशात उतरू लागल्या तेव्हा मराठ्यांनीही त्या प्रदेशांत बराच मुलूख काबीज केला. सरदार गोपाळ दादाजी व विठ्ठल पल्लवी यास हरजीराजे यांनी मुघलांचा पाठलाग करण्याची आज्ञा दिली.[२] पण त्यांची शक्ती अपुरी पडू नये म्हणून संभाजी महाराजांनी ऑक्टोबर-नोव्हेंबर १६८६ मध्ये केशव त्रिमल आणि संताजी घोरपडे यांना तिकडे जाण्याची आज्ञा केली. या आज्ञेनुसार ते दोघे फेब्रुवारी १६८७ मध्ये १२००० सैन्यासह कर्नाटकांत पोहोचले.[३] इ. स. १६८७ च्या सुरुवातीस औरंगजेबाने कुतुबशाही जिंकल्यानंतर कुत्बशाहीचे कर्नाटकांतील मुलूख व किल्ले घेण्यासाठी सरदार रवाना केले होते. १७ एप्रिल १६८७ पर्यंत मुघली सैन्याने बाळापुरमपर्यंत कूच केले. त्यास संभाजी महाराजांच्या मराठे सैनिकांकडून प्रतिकार झाला नसावा.[४] कुत्बशाहीतील महत्त्वाचा किल्ला कोंडापिली हा मुघलांनी फितुरीने काबीज केल्याची बातमी २९ जुलैला मद्रासला पोचली होती.[५]

हरजीराजे महाडीक व केसोपंतही मुघलांस तोंड देण्यासाठी पुढे गेले होते. कासीमखान हा कुत्बशाहीचा नोकर असता त्याने ११ जुलैला म्हैसूरकरांची मदत घेऊन फौजेनिशी बंगलूर घेतले.[६] तसेच कासीमने २७ सप्टेंबरला किल्लेदाराशी भेद करून पिळघेडे घेतले. केसोपंत, संतोजी व हरजी राजे हे आपल्या राज्यात मुघलांचा शिरकाव होऊ नये म्हणून मुघली सैन्याविरुद्ध जगदुमपर्यंत चालून गेले. केसोपंत सैन्याची आघाडी थोपवून धरण्यासाठी सप्टेंबर (१६८७) पर्यंत उभे होते. कुत्बशहा २२ सप्टेंबरला हवाली होण्यापूर्वीच कुत्बशहाचा अधिकारी कासीमखान हा मुघलांस शरण गेला. औरंगजेबाने त्यास कुत्बशाही मुलखाचा कारभार सांगितला. तेव्हा त्याने मुलूख घेण्यास सुरुवात केली. मुघल अधिकाऱ्याने कुत्बशहाचे पूर्वीचेच अधिकाऱ्यांना त्या त्या जागी ठेविले कारण त्यांना काढून टाकून नवीन अधिकाऱ्यास नेमल्यास काढून टाकलेले अधिकारी संभाजी राजांचे बाजूस जातील अशी भीती औरंगजेबास वाटत होती. मुघलांनी गोवळकोंड्याच्या सुलतानाच्या राज्यातील सर्व मुलूख ताब्यात घेण्याचे ठरविले. मुघलांचे

१ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. ३३१.
२ बेंद्रे, संभाजी, पृ. ५२८.
३ शि. च. प्र. पृ. ३३-३४.
४ कित्ता, सेंट जॉर्ज लेटर, १७ एप्रिल १६८७.
५ फोर्ट सेंट जॉर्ज कन्सलटेशन, २९ जुलै १६८७.
६ शि. च. प्र., पृ. ३४.

दहा हजार घोडेस्वार कर्नाटकात चालून गेले तेव्हा केसोपंत सरहद्दीवरून पळून गेला.[१] नंतर हे घोडदळ कासीमखानाच्या नेतृत्वाखाली चंदी प्रदेशात शिरले व लुटमार करू लागले.[२]

केशव त्रिमल कर्नाटकांत गेल्यापासून त्याच्यात आणि हरजीराजे यांच्यात मदभेद सुरु झाले होते. हे मतभेद शेवटपर्यंत तसेच राहिले हे इंग्रजी बातमीपत्रावरून दिसते.

हरजीराजे व इतर सर्व मराठ्यांनी मुघलांचा प्रतिकार चालूच ठेविला. पूर्वीच्या गोवळकोंडा राज्यांतील अनेक शहरे मराठ्यांनी घेतली.[३] हरजीने विठ्ठल पिलाजी, नेमाजी गायकवाड, गोपाळ दादाजी यांच्याबरोबर अर्काटला वेढा देण्यासाठी सैन्य रवाना केले. त्यांनी मुघलांकडून अर्काट जिंकून घेतले. ३० सप्टेंबर १६८८ च्या लंडनला लिहिलेल्या कर्नाटकातील मद्रासकर इंग्रज मुगली परिस्थितीचे वर्णन करतात ते असे, " कुत्बशाहीच्या मुलूखात सर्वत्र जुलूम जबरदस्ती व अस्थिरता चालू आहे. संभाजी राजांच्या सैन्याकडे जंजिऱ्यापासून पोर्टोनोव्होपर्यंत प्रदेश ताब्यांत आहे. त्यांनी सेंट थॉमसचा मुलूख लुटून फस्त केला आहे." इंग्रज वखारवाले आपल्या इंग्लंडमधील अधिकाऱ्यास कर्नाटकातील परिस्थितीची वारंवार बातमीपत्रे पाठवीत असत. दिनांक १३ नोव्हेंबर १६८८ ला पाठविलेल्या पत्रात लिहितात, " या भागातील सर्व मुघली प्रांत अगदी अस्थिर असेच आहेत. दर महिन्यास सुभेदार बदलले गेल्याने सर्वत्र अव्यवस्थितपणा आला आहे. मराठेही आपले सैन्यबळ वाढवीत असून गडकिल्ल्यांचा बंदोबस्त करून मुघलांस तोंड देण्यास तयार आहेत. त्यांनी आतापर्यंत आपल्या मुलूखांत मुघलांस पराजित करून बचाव केला आहे. मराठ्यांनी मुघली हद्दीतील मुख्य पेठांवर व शहरांवर छापे घालून लुटमार केली आहे.[३]"

एकमेकांत हेवेदावे असले तरी मुघलाविरुद्ध लढण्यात मराठे एक होत असत. याचप्पा नायक वांदिवाशहून तोफा आणण्यासाठी कांजीवरमला गेला होता. तेथे मुघल व मराठे यांच्यात लढाई झाली. मुघलांनी तोफांचा भडीमार केल्यामुळे मराठ्यांचा पराभव झाला. त्यानतर कांजीवरमपासून बारा मैलावर मुघल व मराठे यांच्यात लढाई झाली त्यांत मुघलांचा पराभव झाला.[४] इ. स. १६८८ अखेरपर्यंत मराठे व मुघल यांच्यांत संघर्ष चालूच होता. मराठे निर्धाराने प्रतिकार करत होते. व लढतही होते. हरजीराजे आजारी होऊन सप्टेंबर १६८९ अखेर वारले.[५]

□□

१ बेंद्रे, पृ. ५३७.

२ फोर्ट सेंट जॉर्ज व्हा. ३०, पृ. १३४-१३७ बेंद्रे, पृ. ५३८.

३ कित्ता, व्हा. २१, पृ. ३, १०८-१०९, बेंद्रे, पृ. ५४२.

४ कन्सलटेशन फोर्ट सेंट जॉर्ज, २७ एप्रिल १६८८ मद्रास ते इंग्लंड, ३० सप्टेंबर १६८८.

५ बेंद्रे, संभाजी, पृ. ५४३.

३९. मराठा-मुघल संघर्ष (इ. स. १६८४-१६८८)

हिंदवी स्वराज्य नष्ट करण्यासाठी व बंडखोर पुत्र अकबर याचा निकाल लावण्यासाठी औरंगजेब बादशहाने मुघली सैन्य दक्षिणेस पसरविले होते. पहिल्या चार वर्षांत मुघल सैन्यास सर्वत्र माघार घ्यावी लागली.

ऑक्टोबर १६८३ मध्ये शहाबुद्दीनने पुण्याचा ताबा घेतला होता त्याने कोकणात उतरावे आणि दक्षिण कोकणांतून वर येणाऱ्या मुअज्जमच्या फौजेस मिळावे असा औरंगजेब बादशहाचा उद्देश होता. त्याप्रमाणे बादशहाच्या हुकूमावरून खान व दल्पतराय हे कोकणात उतरले. त्यांनी रायगडाजवळील निजामपूर गाव युद्ध करून उद्ध्वस्त केले. (२७ डिसेंबर १६८३) पण ही शहाबुद्दीनची स्वारीही अयशस्वी झाली. परंतु औरंगजेबाने स्वराज्याचे लचके तोडण्याचे आपले प्रयत्न चालूच ठेवले. औरंगजेब आपणांवर जोराचा हल्ला करणार हे संभाजी महाराज जाणून होते. संभाजी महाराज नोव्हेंबर ते डिसेंबरअखेर १६८३ त गोव्याच्या मोहिमेत गुंतले होते. ह्या संधीचा फायदा घेऊन औरंगजेबाने आपला मुलगा शाहआलम यास कोकणच्या स्वारीवर जाण्याचे हुकूम दिले. १५ सप्टेंबर १६८३ रोजी शाहआलम औरंगाबादहून रामदेव घाटांतून दक्षिण कोकणच्या स्वारीवर रवाना झाला. शाहआलम अहमदनगरपर्यंत औरंगजेबाच्या बरोबरच होता. १३ नोव्हेंबर १६८३ रोजी बादशहा अहमदनगरपर्यंत पोहोचला.[१] तेथून शाहआलम बरोबर तोफखाना व २० हजार फौज घेऊन कोकणच्या स्वारीवर निघाला. शाहआलमची स्वारी संपगावास आली. हा उंच व मजबूत किल्ला होता, त्यास त्याने वेढा घातला. बऱ्याच दिवसांनी किल्ला मोगलांचे हाती आला. अब्दुल फैयाजखानाला तेथील किल्लेदार नेमले नंतर मोगली सैन्य रामदेव घाटाशी आले. तेथील अरुंद खिंडी, दाट जंगल, उभ्या दरडी म्हणून या भागांतील प्रवास फारच तापदायक झाला. धान्य व गवताचा दुष्काळ पडला.

माणसे व जनावरे मरू लागली अशा स्थितीत शाहआलम ससैन्य ५ जानेवारी १६८४ त गोवा हद्दीत शिरला. संभाजी महाराजांना मोगल सैन्यांच्या आगमनाची बातमी समजताच त्यांनी गोव्याहून पाय काढला. शाहआलमचे स्वागत पोर्तुगीज गव्हर्नरने केले. मनुची

---

१ पगडी, मराठे व औरंगजेब, पृ. २६.

ह्या स्वारीबरोबर होता तो लिहितो की " गोवा व्हाईसराय पत्रोपत्राने वेळकाढूपणा करीत आहे हे पाहून शाहआलमने बारदेशांत लुटालूट आणि जाळपोळ करण्यास सुरुवात केली. तेव्हा व्हाईसरॉयने त्याच्या गलबलांना वाट देण्याचा झटकन हुकूम काढला. मनुची त्यानंतर शाहआलमच्या नोकरींत गेला व शाहअलमच्या सैन्याबरोबर राहिला. शहाअलमने पोर्तुगिजांचा नजराणा स्वीकारला तद्नंतर शाहअलम सैन्यासह वेंगुर्ल्यास गेला. तिथून तो आल्या वाटेने कोकणांतून अहमदनगरास गेला. त्याने वाटेत शत्रूने छुपे हल्ले केल्याने किती त्रास झाला त्याचे वर्णन बादशहाला ऐकवले.[१]

इ. स. १६८४ च्या सुरुवातीस मोगल सरदार मामूरखान याने सुपे, बारामती आणि इंदापूर येथे मुघली ठाणी स्थापन केली. १३ फेब्रुवारी १६८४ रोजी शहाजादा आलम आणि त्याचा मुलगा बेदारबख्त यांना बादशहाने बहादूरगडाकडे रवाना केले.[२] ३१ मार्च रोजी शहाबुद्दीन ऊर्फ गाजिउद्दीन हा पुणे आणि करडे निमोणे या प्रदेशाकडे रवाना झाला. इ. स. १६८४ च्या जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात मराठ्यांच्या एका तुकडीने लोहगडच्या आसपास टोक उमराचा ठाणेदार फकरूद्दीन यांजशी मुकाबला केला. त्यानंतर मराठ्यांनी जुन्नर ठाण्यावर चढाई केली. दिनांक २१ सप्टेंबर १६८४ रोजी शहाबुद्दीन ऊर्फ गाजीउद्दीन यास बादशहाने रायगडच्या मोहिमेवर रवाना केले.[३] पुणे प्रातांत त्यांचे सैन्य येताच स्वराज्यातील काही अधिकारी आणि वतनदार माणसे मोगलांच्या धाकाला किंवा प्रलोभनाला बळी पडून मुघलांना मिळू लागली. कान्होजी शिर्के, यशवंतराव दळवी, नागोजी माने हे मराठे सरदार यापूर्वीच मुघलांच्या चाकरीत दाखल झाले होते.[४]

संभाजी महाराजांना विरोध म्हणून हे सरदार मुघलांना मिळाले असे समजण्याचे कारण नाही. मुघल सैन्य आले की वतनदारांची घालमेल होई. वतने सांभाळण्यासाठी ते मुघलांकडे रुजू होत. सुप्याचे देशपांडे, मसूरचे जगदाळे, इत्यादींची उदाहरणे कागदोपत्री नमूद आहेत. संभाजी महाराजांचे खरे बळ म्हणजे शत्रूला शरण न जाण्याचा त्यांचा स्वतःचा निर्धार हा होय. त्यामुळे काही अपवाद सोडता स्वराज्याच्या भागातील किल्लेदार संभाजी महाराजांच्या मृत्यूपर्यंत मोगलांचा प्रतिकार करत राहिले होते.[५]

१ बेंद्रे, छत्रपती संभाजी महाराज, पृ. ३४७.

२ अकबरनामा, खंड १२, पृ. ७.

३ बेंद्रे, संभाजी, पृ. ५६७.

४ नागोजी मानेचा पराक्रम अकबराने ऐकला होता. नागोजी मुघलांस १६८५ त मिळाला. त्यास मराठ्यांकडून हिस्कावून घेतलेली म्हसवड परगण्याची जहागीर बहाल करण्यात आली. खोबरेकर, रेकॉर्ड ऑन शिवाजी, क्र. ७७.

५ पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. ६०-६१.

ऑक्टोबर १६८४ मध्ये सुप्याच्या ठाणेदारीवर फकरुद्दीन, चारूणच्या फौजदारीवर अब्दुल्हादीखान आणि करडे निमोणे (गढनमूना) येथील ठाणेदारीवर नामदार खानाचा मुलगा मरहतखान (महमद जाफरवजीर याचा नातू) यांच्या नेमणुका बादशहाने केल्या. पुण्याजवळच जुन्नर, अहमदनगर इत्यादी ठिकाणी मुघलांची ठाणी होती.

इ. स. १६८४ च्या ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीस मुघलांनी शिवापूर जिंकले व त्या प्रदेशावर अब्दूरंखूलखान यास ठाणेदार म्हणून नेमिले.[१] मराठे यावेळी मुघलांशी शिरवळजवळ झगडत होते. कृष्णाजी दादाजी नरसी प्रभूच्या नेतृत्वाखाली अनेक चकमकी मुघलांशी उडत होत्या. मराठ्यांनी शिरवळचा मुघल ठाणेदार बहारामदखान याला तंबी दिली. तिचा काही उपयोग न होता मुघलांनी शिरवळजवळील ठाणे आपल्या कबजांत ठेविले.[२] पुणे प्रांतात मराठे व मुघल यांत चकमकी उडत होत्या. दरम्यान सर्जेराव व त्याचा भाऊ शिवाजी जेधे हे दोघेही शिरवळ येथे मुघलांस मिळाले. हे संभाजी महाराजांस समजताच त्यांनी सर्जाराव जेधे यांची कडक शब्दांत निर्भर्त्सना केली.[३] मुघलांकडील शिरवळ ठाणे काबीज करण्यासाठी मराठे शिरवळवर सारखे हल्ले करीत होते. १६८५ नोव्हेंबरमध्ये मराठ्यांनी शिरवळच्या बाजूस मुघलांवर प्रखर हल्ला चढविला. फौज बिजलीसारखी चमकली. त्यांत नाहरखानाचे तीन मुलगे जखमी झाले. आणि मराठ्यांकडील वाकेनिगार पकडला गेला. यानंतर मुघल सैन्य रोहिड खोऱ्यांत शिरले.[४] इ. स. १६८४ च्या डिसेंबरपासून मराठ्यांनी अहमदनगर जवळील पारनेर, संगमनेर, सोलापूर, उस्मानाबाद आणि बीड जिल्ह्यांत आपल्या आक्रमक हालचाली चालू केल्या.

डिसेंबर १६८४ मध्ये मराठे संगमनेरच्या आसपास गेले. त्यांचा मोड करण्यासाठी एतिकादखान यास रवाना केले. तरीही मराठ्यांनी जमतील तेव्हा आपल्या हालचाली करीत संगमनेरच्या आसपासचा मुलूख उद्ध्वस्त केला.[५]

अहमदनगरच्या पश्चिमेस १६ मैलांवर पारनेर आहे. १६८४ च्या अखेरीस मराठ्यांनी पारनेरच्या आसपास चढाई केली त्यांना काढण्यासाठी लुत्फुल्लहखानास बादशहाचे फर्मान गेले होते.[६] प्रत्यक्षात काहीच घडले नसावे. अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर,

---

१ ऐतिहासिक फारसी साहित्य खंड ६, अखबारात ४-१०-१६८४.

२ कित्ता, अख. १३-१-१६८५.

३ अखबारात ५-१०-१६८५, शिवच. साहित्य, खंड २, पृ. २३४, राज. खंड, १५ ले. ३४२.

४ अखबारात, दिनांक १८-११-१६८५.

५ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. २८३.

६ शिवचरित्र साहित्य, खंड १२, पृ. ५.

पारनेर, पेडगांव (बहादूरगड) या ठिकाणी मराठ्यांनी आक्रमण करून चौथाई वसूल करण्याचा घाट घातला. तसेच मराठा तुकडी चौथाईच्या वसुलीसाठी जामखेड व पातोंडा या ठिकाणी गेली होती.[१]

याच सुमारास सोलापूर जिल्ह्यांतील टेंभूर्णी, खवासपूर, सांगली, मंगळवेढे येथे मराठे व मुघल यांच्या चकमकी झडत होत्या. निकाली दोन्ही सैन्ये दमली होती. हंबीररावाने मुघलांस कोल्हापूरपासून बेळगावपर्यंत कसे हटविले याबद्दल हंबीरराव स्वतःच तिकडच्या बंडखोर देसाईंना सांगत आहेत.[२] की आमचे लष्कर या प्रांतात असताना तुमच्यासारख्या वतनदारांनी भिण्याचे कारण नाही. देसायांच्या मार्फत औरंगजेब मराठ्यांचा मुलूख काबीज करण्याचा प्रयत्न करीत होता. त्याकरिता त्याने खेम सावंतास मोठ्या मनसबीचे प्रलोभन दाखविले होते.[३] अशाच प्रकारची प्रलोभने हुकेरीचा मोघे गौडा देसाई, बंकापूरचा सैद आदमकरी मसर्जा खान आणि गौडा लक्ष्मेश्वर यांना देऊन सरकारी फौजेत सामील झाल्याबद्दल व शत्रूस पिटून काढण्याबद्दल निरनिराळी इनामे दिली होती.[४] असेच प्रयत्न संभाजी महाराज व कविकलश यांनी केलेले दिसतात.[५] इ. स. १६८४ पर्यंतच्या चार वर्षांत मोगली सैन्याने मराठ्यांच्या मुलुखांत धुमाकूळ घातला होता. त्यास तोंड देणे संभाजी महाराजांस आपणांकडील मर्यादित सैन्यामुळे कठीण जात होते. त्यांच्या पुढील आक्रमणास संभाजी महाराजांनी यशस्वीपणे तोंड दिले होते. हे शकावलीतील पुढील नोंदीवरून समजते.

ऑक्टोबर-नोव्हेंबर १६८३त शहाबुद्दीन खान पुण्यास येऊन बसला. दिनांक २७ डिसेंबर १६८३ रोजी शाहीदखानाने देवघाटे उतरून निजामपूर मारिले. दि. १८ मे १६८४ : कबजी रायगडास आले, २० ऑक्टोबर १६८४ : मानाजी मोरे व गंगाधरपंत वासुदेव पंत, राहूजी सामनाथ यांसी संभाजी राजे यांनी कैद केले. ७ नोव्हेंबर १६८४ : कोथळागड मोगलांनी घेतला, १४ जानेवारी १६८५ : शहीदखान पुण्याहून दौड करून बोरघाट उतरून गागोलीस आला. कविकलश जाऊन भांडण दिले. फिरोत

१ म. इ. सा., खंड १५, ले. २८०.
२ शि. व. सा., खंड १, ले. ६९.
३ कित्ता, ले. ६८, खंड २, ले. ६९.
४ कित्ता.
५ अखबारात : ७-१-१६८५.

घाटावरी घातला. मार्च-एप्रिल १६८६ : मिरज मोगली घेतली. जानेवारी १६८७ औरंगजेब विजापुरास आला शहादीखानास गाजदीखानी दिली. अदवानी पाठविले. तेथे जाऊन वेढा घातला. सर्जेराव जेधे समेत भाऊ व लोक राजमाचीस राजश्री निळोपंत प्रधान याजवळ सेवेशी होते. मार्च १६८८ अजमशहा यांनी बेळगाव घेतले व कित्येक किल्ले घेतले. १६८३ च्या ऑक्टोबरपर्यंत मराठ्यांच्या ताब्यांत सुपे इंदापूर ही ठाणी होती. तसेच कऱ्हे पठारावर मराठ्यांचा अंमल १६८४ च्या सुरुवातीपर्यंत होता.[१] सुपे ठाण्यावर १६८४ च्या ऑक्टोबरात फकरूद्दीन यास नेमण्यात आले. सुप्यावर मराठ्यांचे हल्ले चालूच होते मुघलांनी हे हल्ले परतवून लावण्यासाठी लुतफुल्लाह खानला स्वार नेमण्याचा हुकूम देण्यात आला.[२]

इ. स. १६८५ च्या जानेवारीत मुघल सरदार गाझीउद्दीन खान बोरघाटाने उतरून निजामपूरच्या परिसरांत पोचला. निजामपूरची तीन ठाणी त्याने नष्ट केली. यावेळी संभाजी महाराज रायगडावरच होते. शहाबुद्दीन खानाने रायगडच्या किल्ल्याजवळील मौजे पाचाड जाळले व ४ मैलांवर छावणी घातली. १६८५ च्या जानेवारीत मराठे मुघलांस मलढण, शिखर, शिलापूर या भागातून हुसकावून लावण्यासाठी त्यांजवर चारीबाजूने हल्ले करीत होते. मुघलांना इतर जागांकडून कुमक मिळत होती त्यामुळे मुघलांनी मराठ्यांपुढे नमते घेतले नाही.[३]

निमोणेच्या दक्षिणेस ७ मैलांवर असलेल्या सरस गावाला मराठा सरदार खंडोजी याने फेब्रुवारी १६८५त वेढा घातला हे समजताच मुघल सरदार खोजा हमीद याने मराठ्यांशी झुंज दिली व त्यांचा भीमेपर्यंत पाठलाग केला.[४] मराठे चाकण व जुन्नर भागांत धुमाकूळ घालीत होते त्यास शह देण्यासाठी मुघल सरदार किलिचखान मराठ्यांच्या भीमानदीच्या भोवती असलेल्या मुलुखात शिरला तेव्हा सेनापती हंबीरराव २० हजार सैन्यासह त्यास सामोरा गेला तेव्हा व्यूहरचना करून किलिचखानाने मराठ्यांवर जोरदार हल्ला चढविला. पाच कोसपर्यंत मराठ्यांचा पाठलाग केला तेव्हा मराठे डोंगरात

१ म. इ. सा. खंड १८, ले. ३२.

२ अखबारात : ५-२-१६८५.

३ अखबारात : १२-१-१६८५, २१-१-१६८५, २९-१-१६८५.

४ अखबारात : ७-२-१६८५.

लपले.[१] पुण्याच्या आसमंतात मराठ्यांशी सामना देण्यासाठी मुघल सरदार शहाबुद्दीन खानाने मराठी मुलुखांत धुमाकूळ घातला मराठ्यांची १८ खेडी बरबाद केली.[२] त्यानंतर शहाबुद्दीन खानाने पुण्यास तळ ठोकला आणि तिथूनच रायगडाच्या बाजूस त्याने लढाई सुरू केली. शिवनेर प्रांतात चौथाई वसूल करण्यासाठी मराठा सरदार अधलराव याला नेमले असता तो मुघलांकडे चाकरीकरिता जाण्यासाठी शिवनेरचा मुघल ठाणेदार मुहमदखलील यांस भेटला.[३]

१६८५च्या मार्च महिन्यापर्यंत मुघलांनी पुण्याच्या परिसरातील मुलुखांत लुटमार केली मुलूख उद्ध्वस्त केला तरी त्यांनी पुणे प्रांतावर पूर्णपणे ताबा मिळविला नव्हता. भोर, वीर, न्हावी (भीदऱ्या पूर्वेस ५ मैल) इत्यादी प्रदेश मराठ्यांच्या ताब्यांत राहिले.[४] संभाजी महाराज एक हजार स्वारांसह मुघल सरदार रअद अंदाज खान व कमरूद्दीन यांजवर सिंहगडाच्या बाजूस चालून गेले. लढाई १६८५ च्या जानेवारीत झाली त्यांत मराठे विजयी झाले.[५] यामुळे मराठ्यांस जोर आला, त्यांनी पुण्याच्या आसमंतातील किल्ले यावर दोरीचे जिने व दोरखंड लावून २९ ऑक्टोबर १६८५ रोजी वेढा दिला. मुघल सावध होते. मराठे मुघलांची दहा दिवस धनुष्यबाणांची लढाई झाली. त्यांत मुघलांनी मराठ्यांचे बरेच नुकसान केले व रोहिडा किल्ला जप्त केला.[६] २७ एप्रिल १६८७ पर्यंत सिंहगड मराठ्यांच्या ताब्यात होता.[७] तसेच मराठ्यांनी रोहिडा किल्लाही मुघलांकडून जिंकून परत घेतला होता.[८] मुघलांच्या प्रत्येक हालचालीचा मराठे तत्परतेने प्रतिकार करीत होते. रोहिडखोऱ्यांत कृष्णाजी दादाजी नरस प्रभू सबनीस होता. त्यास शंकराजी नारायणने १६८५-८६ मध्ये लिहिले की “ मावळ प्रांती गनिमानी चाल केली त्यास कोरडखिंड, ढवळा घाट व मांडरदेवचा सडा येथील जागा-जागा चौक्या घालून गनिमाची खबर राजगडी देणे. १६८८ सालापर्यंत रोहिडा, पुरंदर, श्रीवर्धन, राजमाची इत्यादी गड मराठ्यांच्या ताब्यात होते. संभाजी महाराजांना पकडल्यानंतर हे गड मुघलांना घेता आले हे ध्यानात ठेवले पाहिजे. विजापूर व गोवळकोंडा ह्या राज्यांचा बळी घेतल्यावर

१ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. २७४.

२ अखबारात : ७-१-१६८४.

३ अखबारात : २३-१०-१६८४.

४ पे. द. ३१ ले. ४४, पृ. १६२.

५ अखबारात : १३-१-१६८९, गोखले, कित्ता पृ. २७६.

६ अखबारात : १३-११-१६८५.

७ म. इ. सा., खंड १८, ले. ५७.

८ शि. च. सा., खंड २, पृ. २३४.

इ. स. १६८६-८७ मध्ये मुघली सैन्याच्या एकावेळी अनेक ठिकाणी हालचाली चालू झाल्या. अनेक ठिकाणी किल्लेदारास वतनाचे आमीष दाखवून परिश्रमाशिवाय मुघलांनी मराठ्यांचे किल्ले काबीज केले. उस्मानाबाद जिल्ह्यातील परिंडा, इंदापूर व हदगाव या ठाण्यांवर मराठ्यांनी जानेवारी १६८५ च्या अखेरीस हल्ले केले. मुघल सैन्य ह्यावेळी विजापुरचा पाडाव करण्यात गुंतले होते. तथापि मराठ्यांचा नाश करण्यास टपलेल्या औरंगजेबाने परिंड्याच्या बचावासाठी व मराठ्यांस पिटाळून लावण्यासाठी गझफरखानाला हुकूम दिला.[१] उस्मानाबादच्या आग्नेयीस ३० मैलांवर नळदुर्ग आहे. मराठे १६८४-८५ मध्ये नळदुर्ग आणि कल्याणीच्या आसपास लुटमार करीत राहिले.[२] तसेच मराठ्यांची दुसरी तुकडी बीड जिल्ह्यातील पाटोदे गावी चौथ वसूल करण्यासाठी गेली होती तेव्हा तेथील मुघल ठाणेदाराने तिजवर हल्ला करून त्यांस पिटाळून लावले. इ. स. १६८५ च्या फेब्रुवारीत मुघलांनी कारवारचा किल्ला आणि शहर काबीज केले. ह्याच मुघल सैन्याने विजापुरकरांकडून गोकाक आणि हुबळी घेतली.[३]

खेम सावंत आणि कारवार गोव्याच्या हद्दीवरील देसायांनी बादशहाच्या चिथावणीवरून संभाजी महाराजांविरुद्ध बंड केले. विजापुरचा वेढा सप्टेंबर १६८६ मध्ये संपला. १२ सप्टेंबर १६८६ रोजी विजापूर औरंगजेबाचे हाती पडले, आदिलशाही समाप्त झाली. विजापुर मोगलांच्या हाती पडल्यावर मराठी राज्याच्या पूर्व दक्षिण सरहद्दीवर मुघल पसरले त्यामुळे हंबीरराव मोहिते, रूपाजी भोसले, संताजी जगताप, रायाजी सामराज इत्यादी अधिकारी या भागांत मुघलांशी लढत होते.[४] वतनाच्या आशेने काही मराठे मुघलांस मिळाले होते हे वर सांगितले आहे. तसेच विजापूरचे काही सरदार मराठ्यास मिळाले. रहिमदाद खान हा बेळगाव जिल्ह्यातील पाच्छापूर येथील अधिकारी होता त्याने विजापुर पडल्यावर मोगलांविरुद्ध बंड केले आणि तो मराठ्यांस मिळाला. मराठ्यांचा सेनापती हंबीरराव मोहिते याने स्वराज्याच्या पूर्व सीमेवरील मुघल आक्रमण रहिमदादखानाच्या मदतीने मोठ्या शर्थीने थोपवून धरले होते. इ. स. १६८६च्या नोव्हेंबरात त्याने रुहुल्लाखान आणि रणमस्तखान यांचा पराभव केला होता. इ. स. १६८७च्या ऑक्टोबर

---

१ अखबारात : ३१-१-१६८५.

२ कित्ता.

३ गोखले, संभाजी, पृ. ३०७.

४ उपरोक्त.

मध्ये मुघलांनी वाईपर्यंत धडक मारली. त्यांच्याशी निकराची झुंज देत असताना हंबीरराव गोळा लागून ठार झाला.[१] इ. स. १६८८ पासून वाईला मुघलांचा ठाणेदार निहारखान घोरी हा कायम झाला.[२] इ. स. १६८८ च्या डिसेंबरात मनाजी शंकर निळकंठराव ह्या मराठ्यांच्या सरदारास पुरंदर तालुक्यातील चाली, किकवी, जेजोरी, नारायणपूर येथे त्यांचे इनाम होते. त्याला कौल देऊन निहारखानाने शिरवळास आणले होते. त्याच्या मागून त्याचा कबीला येत असता, आसवलीजवळ मराठ्यांनी तो लुटला होता. पुणे सातारा भागांत मराठ्यांनी मुघलांशी १६८२ ते १६८८ पर्यंत चांगली झुंज दिली. अनेक ठिकाणी मुघलांचा पराभव केला त्यांना पळवून लावले पण त्यांना गडकोटांवर ताबा मिळविता आला नाही. पुण्याच्या काही भागात १६८६ पर्यंत मुघलांचा अंमल बसला होता. पुणे प्रांतातील मुघल अधिकारी पुण्याच्या परिसरातील देशमुख देशपांडे यांना वतनाची लालूच दाखवून आपल्या बाजूस ओढण्याचा प्रयत्न करीत असलेले दिसतात. पण मराठे वतनदार मुघलांशी सहकार्य करण्यास नाखूश होते हे या पत्रांवरून दिसते. मुघल अधिकाऱ्यांनी याच सुमारास रोहिडखोऱ्याच्या देशमुखांना, पुरंदरचे बाजी घोलप आणि बनाजी नावडकर यांना अभयपत्रे पाठविली होती आणि प्रत्यक्ष बादशहाला भेटल्यावाचून वतनाची सनद देता येणार नाही असा दमही त्यांना देण्यात आला होता.

रोहिडखोऱ्यांत कृष्णाजी दादाजी नरसप्रभू सबनीस होता त्यास शंकराजी नारायण यांनी पत्र लिहून कृष्णाजी दादाजीने शिरवळास मर्दुमकी गाजविल्याबद्दल त्याचे अभिनंदन केले. तीच मर्दुमकी सर्वांनी दाखवावी. आणि गनिमास नामोहरम करावे असे पत्रात लिहिले. दिनांक ४ मार्च १६८७ पर्यंत रोहिडगड मराठ्यांच्या ताब्यात होता. त्यानंतर केव्हातरी तो मुघलांनी आपल्या ताब्यात घेतला. इ. स. १६८८ सालापर्यंत रोहिडा, पुरंदर, श्रीवर्धन, राजमाची इत्यादी गड मराठ्यांच्या ताब्यांत होते. राजे पकडले गेल्यानंतरच हे गड मुघलांच्या ताब्यात गेले.

१६८६ सालच्या मार्च महिन्यापासून मिरज, कोल्हापूर, पन्हाळा या भागांत मुघलांनी मराठ्यांविरुद्ध जोर केला. १२ एप्रिल १६८६ रोजी मुघलांनी मिरज घेतले.[३] यानंतर

१ पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. ७४.

२ तत्रैव.

३ गोखले, संभाजी, पृ. ३९७.

मुघलांचे सैन्य कोल्हापूर, पन्हाळा, बेळगाव या भागांत शिरले. सेनापती हंबीरराव मोहिते यांनी सेना समुदायानिशी मुघलांचा पाठलाग केला व त्यांस जेरीस आणिले.[१] इ. स. १६८८ मध्ये स्वराज्याची स्थिती पुढीलप्रमाणे :—

कोकणांत मुघलांचा शिरकाव होऊ शकला नव्हता. घाटावरील मैदानी भागात मुघलांनी बऱ्याच ठिकाणी आपली ठाणी बसविली होती. चाकण, शिरवळ, वाई, सुपे, बारामती, इंदापूर, कोल्हापूर या आणि इतर काही ठिकाणी मुघल ठाणेदार नेमले गेले होते. मराठ्यांशी त्यांच्या चकमकी सारख्या चालू होत्या. उत्तर कर्नाटकांत मराठे आणि विजापुरचे काही जुने सरदार एकत्र होऊन मोगलांशी लढत होते. मराठ्यांचे मोठे बळ म्हणजे किल्ले. पन्हाळगड, विशालगड, पुरंदर, सिंहगड, राजगड, तोरणा, प्रतापगड, रायगड, इत्यादी किल्ले संभाजी महाराजांच्या ताब्यांत होते. ते लढविण्याची संभाजी राजांनी जय्यत तयारी केली होती. १६८७ अखेरीस पाटस, नीरथडी, सांडस, कऱ्हेपठार येथे मुघलांचा अंमल बसला. शिलापूरचा मुघल ठाणेदार माणकोजी याजवर मराठा सरदार नारोजी याने जोराचा हल्ला करून त्याचा पराभव केला.[२]

औरंगजेब बादशहा व संभाजी महाराज यांच्या इ. स. १६८६-१६८९ सालांतील हालचालीवरून असे दिसते की स्वत: औरंगजेब हा १४ जून १६८६ रोजी सोलापूराहून निघून ३ जुलै रोजी विजापुरजवळ पोहचला. ह्यावेळी शहाजादा अकबराने उत्तरेस जाऊन राजपुतांस आपलेसे करून औरंगजेबाविरुद्ध उठाव करावा असा विचार केला. पण छत्रपती संभाजी महाराजांनी ह्या विचारास उचलून धरले नाही. हंबीररावाच्या निधनाने (१६८६ डिसेंबर) मराठ्यांचे अतोनात नुकसान झाले. संभाजी महाराजांना स्वत:वर लष्कराची जास्त जबाबदारी घ्यावी लागली. इ. स. १६८७-८८ मध्ये संभाजी महाराज स्वराज्यांत चौफेर फिरत होते. किल्ल्यांच्या बंदोबस्ताकडे लक्ष देत होते. मुघल-मराठा संघर्ष उत्तर कर्नाटकांत विजापूर मुघलांनी काबिज केल्यावर चालूच राहिला. १६८८ मध्ये मुघलांनी बेळगाव, अधोंनी किल्ले काबीज केले. याचवर्षी बागलणांत मुघल सरदार मातबर खान याने इगतपूरजवळील कुलगजगड उंडाकावनी, हरीशगड हे किल्ले घेतले.

गोवळकोंडा मोघलांच्या हाती आल्यानंतर औरंगजेबाने मुकर्रब खान याची नेमणूक कोल्हापूर प्रांतावर केली. १६८८ मध्ये मुघलांनी घाटावरील मैदानी भागात बऱ्याच

१ पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. ७९.

२ बेंद्रे, संभाजी चरित्र, पृ. ५७७.

ठिकाणी ठाणी बसविली होती. चाकण, शिरवळ, वाई, सुपे, बारामती, इंदापूर, कोल्हापूर या ठिकाणी मुघल ठाणेदार नेमले गेले होते. मुघल व मराठे यांचा संघर्ष सतत सुरू झाला. बुरूजावरील तोफा मुघलांच्या हल्ल्याला तोंड देण्याकरिता सिद्ध होत्या. संभाजी महाराजांनी अविश्रांत श्रम करून गड सुसज्ज ठेवले, लोकांमधील हिंमत कायम राखली. संभाजी महाराज रायगडावरून मुघलांच्या हालचाली लक्षपूर्वक पाहत होते. अशावेळी शिर्क्यांनी बंड केल्याची बातमी महाराजांना मिळाली. ते मोडून काढण्यासाठी स्वतः जातीने जाण्याचा निर्णय छत्रपती संभाजी महाराजांनी घेतला त्यांची हकिगत पुढीलप्रकरणी.

□□



बादशहा औरंगजेब

४०. संभाजी महाराजांस पकडण्यासाठी औरंगजेबाचे प्रयत्न व दुर्दैवी शेवट

हैदराबाद व विजापूरची राज्ये खालसा केल्यानंतर औरंगजेबाने संभाजी महाराजांना पकडण्यासाठी अनेक उपाय योजिले. त्यासाठी त्याने प्रथम संभाजी महाराजांचा चहूबाजूनी कोंडमारा करण्याचा प्रयत्न केला. नाशिककडून मराठ्याच्या फौजा मोगली प्रदेशास फार त्रास देत म्हणून त्या बाजूस बादशहाने आपला पुत्र अजमशहास ठेवून दिले. तसेच संभाजी महाराज डोंगरीवाटांनी बाहेर पळून जातील त्यास अटकाव व्हावा म्हणून निरनिराळ्या नाक्यांच्या जागी त्याने मोगली फौजा पाळतीवर ठेविल्या व सह्याद्रीतील चोरवाटांवर आपले पहारे बसविले. तसेच औरंगजेबाने मराठ्यांकडील किल्ले, मुलूख व सरदार यांना जिंकून आपल्याकडे आणण्यासाठी फितुरीचा मार्ग अवलंबिला, त्यात त्यांस यश आले. फितुरीने किल्ले घेतले ते असे : १६८६ च्या अखेरीस साल्हेरचा किल्ला किल्लेदार असूजीने शत्रूकडून मनसब स्वीकारून मुघलांच्या हवाली केला. रामशेजचा किल्लाही मुघलांनी फितूर करून घेतला. नाशिक बागलाण भागात मुघल सैन्य रोरावत होते पण त्यांना सन १६८६ पर्यंत गड जिंकून घेता आले नाहीत बागलणांतील जवळजवळ सर्व मुलूख १६८६ पर्यंत मराठ्यांच्या ताब्यात होता. त्यानंतर १६८७ सालापासून त्या भागांत फितुरीला यश आले.

कर्नाटकातील बंगलोर, दोड्ड बाळापूर, तुमकूर, चिक्कन हल्ली, ही ठिकाणे इ. स. १६८७-८८ च्या सुमारास मुघलांनी घेतली तरी जिंजी, वेलोर, तंजावर व त्यांच्या भोवतालचा प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात राहिला होता. फितुरीच्या मार्गाने मुघलांनी इ. स. १६८८ मध्ये पुणे, शिरवळ, शिवापूर, पारस, पुरंदर, कऱ्हे पठार नाशिक, साल्हेर, मुल्हेर, रामशेज, जुन्नर, मिरज, सातारा, कोल्हापूर, कऱ्हाड, सोलापूर, मंगळवेढा, सांगोला या बहुतेक भागांवर आपला अंमल सुरू केला. मराठी राज्याच्या सरहद्दीवर असलेल्या दळवी, देसाई, यांना संभाजी महाराजांपासून फोडण्याचा प्रयत्न केला. तसेच सरहद्दीवरील ह्या वतनदारांना आपल्या पक्षात ओढण्याचे प्रयत्न केले. दळवी, देसाईप्रमाणेच औरंगजेबाने संभाजी महाराजांकडे असलेल्या नोकरांना, अधिकाऱ्यांना जहागिरी मनसब यांचे आमिष दाखवून त्यांना आपल्या नोकरीत घेतले. संभाजी महाराजांस अशा फितुरांचा त्रास झाला. आणि त्यामुळेच त्यांचा शेवटही झाला.

संभाजी महाराजांची कारकीर्द सुरू झाल्यावर वतनाचे आकर्षण असणारी इतर मंडळी व संभाजी महाराजांचे नातेवाईकही बादशाही सेवेत हजर झाले. शिवाजी जेधे आणि सर्जेराव जेधे व त्याचा मुजगा बाजी सर्जेराव हेही मुघलांस मिळाले होते.[१] ह्या फितुरीचे मुख्य कारण कवी कलशाच्या तंत्राने संभाजी महाराज चालत होते हे असावे.

कवी कलशाच्या तंत्राने संभाजी महाराज चालत होते ह्याबद्दल दरबारांतील अधिकाऱ्यांत आणि जनसामान्यांत तिरस्काराची भावना निर्माण झाली होती. संभाजी महाराजांच्या नातलगासही त्याचा राग होता. असे बखरकार सांगतात.

शाक्तपंथीय कलुशाने संभाजी महाराजांस शाक्तपंथांत ओढले :

गागाभट्ट, मोरोपंत पिंगळे, स्वतः शिवाजी, जिजाबाई इत्यादी सर्व शिवकालीन प्रमुख माणसे शैव किंवा वैष्णव होती. शिवकालांत या दोन पंथाचे महाराष्ट्रात दृढ बीजारोपण झाले होते. शिव-छत्रपतींच्या पहिल्या राज्याभिषेकापर्यंत ही परिस्थिती कायम होती. पण निश्चलपुरी गोसावी तंत्रविद्यानिपुण म्हणजे शाक्त होता. त्याने शिव-छत्रपतींना दुसरा राज्याभिषेक करविला, यांतच तांत्रिकांच्या उदयाची बीजे आहेत.

महाराष्ट्राला शाक्तपंथाचे शिक्षण बनारस व बंगालमध्ये मिळाले. संभाजीचा शाक्तपंथीय गुरू शिवयोगी याने तेथे जाऊन शिक्षण घेतले व तो महाराष्ट्रात परत आला. प्रारंभी हा पंथ समाजाच्या खालच्या थरांतील लोकांत थोडा फार पसरला, पण त्याला मोठेपणा मिळाला नाही. बंगाल व गोवा या प्रांतांतील गौड व सारस्वत ब्राह्मणांनी शक्तीची पूजा स्वीकारल्यानंतर मात्र, तो समाजाच्या वरच्या थरात मान्यता पावू लागला.

अन्य पंथीयाप्रमाणेच शाक्तांनी श्रेष्ठ तत्त्वज्ञान निर्माण करण्याचे ध्येय ठरविले होते, स्वतःच्या मनावर व देहावर पूर्ण स्वामित्व मिळविणे, अज्ञात शक्तीस आपले दूत अगर दास बनविणे व अंती मोक्षसाधन करणे, हेच त्यांचेही उद्दिष्ट अगर ध्येय होते. वशीकरणादी प्रकारांस तेही सामान्य गोष्टीच मानीत, पण पंथप्रचाराकरिता ते या गोष्टी अवलंबीत.

शाक्त तत्त्वज्ञानी शिवयोगी याने शृंगारपूर येथे आपली मठी स्थापून शाक्तपंथाच्या प्रचारास प्रारंभ केला. त्याची कीर्ती प्रसृत होऊन गणेश अनंत जांभेकर व केशवभट्ट उपाध्याय हे दोन कऱ्हाडे ब्राह्मण त्याचे शिष्य झाले व त्यांनी शाक्तपंथाचा अभ्यास केला.

---

१ रा. खंड १५ ले. ३४२, २८१.

निश्चलपुरीकृत शिवराज्याभिषेक हा महाराष्ट्रातील शाक्तपंथाचा पहिला ठळक विजय होय. संभाजीच्या कारकीर्दीत शाक्तांना दुसरा महत्त्वाचा विजय मिळाला. शिवाजीच्या अष्टप्रधानांतील ब्राह्मण वैदिक पंथाचे होते व त्यांनीच संभाजीविरुद्ध जाऊन राजारामाचे मंचकारोहण घडविले होते. संभाजीच्या आगमनानंतर त्यांचे राजकीय महत्त्व नष्ट होऊन तंत्रविद्येचा उत्तरेकडील जाणता अनुयायी कवी कलश याने एकट्याने त्यापैकी अनेकांच्या जागा व्यापिल्या. त्यामुळे शाक्तपंथ राजसत्तेशी पूर्ण निगडित झाला. कवी कलश अष्टपैलू विद्वान होता. तो उत्कृष्ट काव्य करी. अगोदर नसेल, तर शिवराज्याभिषेकाच्यावेळी तो महाराष्ट्रात आला असावा. एका जुन्या ग्रंथांत केशवभट्ट कबजीचा उल्लेख आला आहे, त्यावरून त्याचे नाव केशवभट्ट असावे, त्यालाच पुढे संभाजीने छंदोगामात्य हा किताब बहाल केला. शिवचरित्रप्रदीप पृष्ठ ३२, ३३ वर म्हटले आहे की पोर्तुगिजांवरील साष्टीबारदेशची स्वारी संपवून संभाजी रायगडास आला व त्याने कवी कलश यास कुल् अखत्यार दिला. यावरून त्याच्या पूर्वोदयाचा काल इ. स. १६८३ चा प्रारंभ हा निश्चित होतो. मुंबईकरांनी इ. स. १६८२ नोव्हेंबर २८ रोजी सुरतेस लिहिलेल्या पत्राचा व पोर्तुगीज साधनांचा, या विधानाशी चांगला मेळ बसतो. या कवी कलशाने संभाजी व शिवयोगी यांचा दृढसंबंध घडवून आणला होता.

गादी मिळविल्यानंतर संभाजी महाराजांस वाटू लागले की वारस पुत्र पाहिजे. वैदिक ब्राह्मणांनी सांगितलेल्या व्रतवैकल्याचे योगाने आपणांस पुत्रप्राप्ती होईल, असे त्यांना वाटेना[१] तेव्हा शिवयोगीने सल्ला दिला की संभाजीने कालीची पूजा बांधावी. योगायोग असा की हा पूजेचा विधी झाल्यानंतर मे १६८२ मध्ये शाहूचा जन्म झाला व संभाजीच्या छत्रपतीत्वास वारस उत्पन्न झाला. यायोगे तांत्रिकांचे महत्त्व रायगडवरच्या दरबारांत कळसास पोहोचले.

तांत्रिकांच्या अंधारातील पूजेच्या क्रिया, मांसाशन, मांससन्तर्पण, मद्यप्राशन इत्यादी प्रकारांमुळे महाराष्ट्राने या विद्येची मोठी धास्ती घेतली होती. तरीही राजसत्तेच्या आश्रयामुळे शाक्तपंथास महत्त्व प्राप्त झाले.

संभाजी व कवी कलश महाराष्ट्रात अप्रिय का झाले होते, याचा अदमास आपणांस, या प्रकारामुळे लागतो. विजापूर, गोवळकोंड्याच्या मोहिमेनंतर औरंगजेबाने महाराजांस जिवंत पकडण्याचा व्यूह रचला.

१ रा. खंड १५ ले. ३४२, २८१.

औरंगजेबाचे हेर खाते अतिशय कार्यक्षम होते. हेरांकरवी औरंगजेबास संभाजी महाराजांच्या हालचालींची बातमी मिळत असे. कोकणच्या प्रदेशाचे माहीतगार शिर्के सरदार मंडळी इ. स. १६८८ त औरंगजेबास मिळाले होते. त्यांस कोकणात पाठवून त्यांजकडून त्याने संभाजी महाराजांच्या प्रदेशात बंडावा सुरू करण्यास सांगण्यात आले.

संभाजी महाराजांचा हृदयद्रावक शेवट

इ. स. १६८८ चा पावसाळा संपला होता. मुघल मराठा युद्धाला तोंड लागणार होते. मुघलांनी स्वराज्यांत तीन मार्गांनी घुसावयाचे असे ठरविले. शहजादा अज्जम याने चाकणवरून कोकणांत उतरावे, फिरोज जंगला राजगड भागात चाल करण्यासाठी हुकूम झाले होते, शेखनिजाम मुकर्रबखान याला कोल्हापूर पन्हाळा भागात नेमण्यात आले होते. स्वतः औरंगजेब हा आज्जमच्या पाठोपाठ निघण्याच्या तयारीत होता. याच सुमारास म्हणजे ऑक्टोबरमध्ये शिर्क्यांनी संभाजी महाराजांविरुद्ध बंड पुकारले. स्वराज्यावर संकट आले आहे. मुघलांनी मुघलांची प्रचंड चढाई स्वराज्यावर होणार आणि मुघल सत्ता आपल्यावर आपली वतने बुडणार तेव्हा अगोदरच मुघलांच्या सेवेत गेल्यास आपली वतने अबाधित राहतील हा विचार करून या अगोदर नागोजी माने, खेम सावंत, बागलणातील मराठे किल्लेदार मुघलांकडे गेले होते. शिर्क्यांपैकी कान्होजी शिर्के यापूर्वीच मुघलांना मिळाला होता. वतने सांभाळण्यासाठी पुणे, सुपे या प्रांतातील वतनदार मुघलांशी सहकार्य करू लागले होते. अशावेळी आपण आपली सोय पाहावी ह्या भूमिकेतून शिर्क्यांचे बंड उद्‌भवले होते. त्या बंडाचा मोड करण्यासाठी कवी कलश शिर्क्यांवर चालून गेले, पण पराभव पावून पळून ते खेळणा किल्ल्यावर आश्रयार्थ गेले.[१] संभाजी महाराजांस हे समजताच ते कलशाचे मदतीस धावून आले. त्यांची मुक्तता करण्यासाठी ते सैन्यासहित शिर्क्यांवर चालून गेले. त्यांनी शिर्क्यांची बंडाळी मोडून काढली. शिर्क्यांचा पराभव करून संभाजी महाराज खेळणा गडावर गेले.[२] त्यानंतर १ फेब्रुवारी १६८९ रोजी कवी कलश व संभाजी महाराज खेळण्याहून राजगडाला जात असता त्यांनी वाटेत संगमेश्वरास मुक्काम केला.[३]

पराभूत झालेला मुघल सरदार निजाम हैदराबादी हा गोवळकोंडेकराच्या सेवेत होता. तो मुघलांच्या सेवेत आल्यावर त्यास औरंगजेबाने मुकर्रबखान ही पदवी दिली. त्याला

१ जेधे शकावली व करीना, सं. द. वि. आपटे व स. म. दिवेकर.

२ शिवचरित्र प्रदीप, पृ. ३४.

३ संभाजीकालीन पत्रसारसंग्रह, संभाजी शकावली, पृ. ११९.

गुप्तहेरांकडून राजे व कलुशा संगमेश्वरास आल्याची बातमी समजली. तेव्हा तो आपल्या निवडक लोकांसह संभाजी महाराजांवर चाल करून गेला. संभाजी महाराजांच्या हेरांनी महाराजांस बातमी दिली. की मुघल फौज चाल करून येत आहे. पण महाराजांनी तिकडे लक्ष दिले नाही. मुकर्रबखानाकडे २००० स्वार व एक हजार पायदळ होते. मुकर्रबखान एकाएकी चालून आलेला पाहून संभाजी महाराजांनी हाताशी असलेल्या ३०० मराठे भालाइतांना घेऊन हल्ला केला. मुघलांचा एक बाण कवी कलशाला लागला व तो पडला. शत्रूकडील भारी फौजेबरोबर आपला टिकाव लागणे नाही हे लक्षात येताच संभाजी महाराज सरदेसाईंच्या वाड्यात आश्रयास गेले. बातमीदारांनी चौकशी करून महाराज हवेलीत लपल्याची बातमी मुकर्रबखानास दिली. तेव्हा त्याचा मुलगा इखलासखान हा आपल्या शूर सहकाऱ्यांसह जिन्याच्या वाटेने तळघरात घुसला. त्याने संभाजी महाराजांचे केस धरून ओढीत त्यांना मुकर्रबखानाच्या स्वारीच्या हत्तीच्या पायापाशी आणले. कबजी हा आधीच पकडला गेला होता. संभाजी महाराजांसह त्यांच्या पंचवीस माणसांस कैद केले.[१] संभाजी महाराजांना पकडले त्यावेळी सेनापती म्हाळोजी घोरपडे त्यांच्यापाशी असून ते त्या गर्दीत ठार झाले आणि त्या हल्ल्याची बातमी देण्यासाठी त्यांचे पुत्र रायगडाकडे गेले.[२] मुघलांनी संभाजी महाराज आणि कवी कलश यांना कैद केल्यानंतर संगमेश्वर येथे लष्करी ठाणे स्थापन केले. यावेळी औरंगजेब हा विजापुरहून निघून अकलूज येथे पोहोचला होता.[३] या बातमीने त्याला अतिशय आनंद झाला. मुकर्रबखानाने संभाजी महाराजांस मोठ्या बंदोबस्ताने आणले. बादशाही सैन्याने अकलूजहून कूच करून बहादूरगड येथे छावणी केली. (१५ फेब्रुवारी १६८९) तेव्हा कैद्यांना लष्करात आणण्यात आले. बादशहाने आज्ञा केली की, " संभाजीला लष्करापासून दोन कोसांवर नेऊन त्यास इराणमध्ये गुन्हेगारांच्या अंगावर जसा पोशाख घालतात तसा घालावा आणि विदुषकासारखी लाकडी टोपी चढवावी. त्याच्या सहकाऱ्यांच्या अंगावर विदुषकी वस्त्रे घालावी, त्यांना तऱ्हेतऱ्हेने पीडा देऊन त्यांची विटंबना करावी. त्यांना उंटावर स्वार करणे, ढोल बडवीत शिंगे, कर्णे वाजवीत त्यांना लष्करात आणि दरबारात आणावे."[४] त्याप्रमाणे संभाजी महाराजांची लष्करातून धिंड काढून बादशहासमोर आणण्यात आले. बादशहाने त्याचवेळी आज्ञा केली की, "त्यांना कैदखान्यात घेऊन जा"

१ पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. ८२-८३.

२ का. सं. प. या. ३, सरदेसाई, संभाजी, पृ. ९७.

३ मासिरे आलमगिरी (पगडी भाषांतर-मराठे व औरंगजेब, पृ. ३५.

४ पगडी, मोगल आणि मराठे (तारिके दिलकशाचे भाषांतर), पृ. ९९.

बादशहासमोर संभाजी महाराजांना उभे करण्यात आले तेव्हा त्यांनी बादशहाला ताजीम देऊन यत्किंचितही मान लवविली नाही. यानंतर दोन दिवसांनी बादशहाने रुहुल्लाखानास आज्ञा केली की त्याने जाऊन संभाजी महाराजांपाशी चौकशी करावी, " की तुझे खजिने जडजवाहीर आणि इतर संपत्ती कुठे आहे तसेच बादशाही सरदारापैकी कोणकोण तुझ्याशी संबंध ठेऊन पत्रव्यवहार करीत होते. " हे विचारल्यावर राजे संभाजी यांनी बादशहासंबंधी अनुद्‌गार काढले आणि त्यांची निंदानालस्ती केली. जीविताची आशा सुटल्यामुळे संभाजी महाराजांनी अनुदार उद्‌गार काढले असणार. संभाजी राजांनी बादशहासंबंधी जे अनुद्‌गार उच्चारले होते त्यांचा सारांश रुहुल्लाखानाने बादशहास सांगितला. त्यावर बादशहाने आज्ञा केली की, " संभाजी महाराजांच्या डोळ्यांत सळई फिरवून त्याला नवीन दृष्टी द्यावी. " त्याच रात्री (१७ फेब्रुवारी १६८९) संभाजी महाराजांचे डोळे काढण्यात आले. दुसऱ्या दिवशी कवी कलशाची जीभ उपटण्यात आली.[१]

संभाजी महाराजांचे डोळे काढण्यात आले त्या दिवसापासून त्यांनी जेवणखाण सोडले. त्यांच्या पहारेकऱ्यांनी त्याला अन्न सेवन करण्यास पुष्कळ सांगितले. पण त्याचा कांही उपयोग झाला नाही. त्यांना काही उपास घडले. शेवटी ही बातमी बादशहास कळविण्यात आली तेव्हा बादशहाच्या आज्ञेने त्यांना व कवी कलश या दोघांचा अनन्वित छळ करून त्यांच्या दहा/अकरा साथीदारांसह ठार मारण्यात आले. (११ मार्च १६८९) त्यांच्या तमाम शरीरात पेंढा भरण्यात आला. दखखनमधील काही गावांतून ती प्रेते, नगारे, कर्णे, शिंगे इत्यादी वाद्यांच्या गजरात मिरविण्यात आली.[२] संभाजी महाराजांचा अंत्यविधी औरंगजेबाने करविलाच नाही. शिर तेवढे वडूच्या लोकांनी आणून त्यास तुळापूर येथे संगमावर अग्नी दिला. महाराजांचे वृन्दावन वडू बुद्रुक येथे आहे असा अस्सल पुरावा वा. सी. बेंद्रे यांना मिळाला.[३] तो त्यांनी पुणे जमाव, वडू बुद्रुक, रूमाल नं. ११९३ यांतून शोधून काढला. तसेच " संभाजी राजे धरून आणिला आणि मौजे वडू कोरेगावात मारीला. मग त्याचा लेक साहूराजा व बाईका आपल्या जाळीत ठेवली. " असा उल्लेख दिनांक १४ जानेवारी १७१९ च्या धनकवडीच्या कुलकर्णीच्या कागदात आला आहे[४]. दिनांक १८ जानेवारी १७१५ च्या कागदांत वृन्दावनाच्या जागी नंदादीप, धूप, नैवैद्य

१ कित्ता, पृ. १००.

२ पगडी, मासिरे आलमगिरी, पृ. ३६.

३ केसरी, ६ मार्च, छत्रपती संभाजी महाराजांचे वृंदावन, ले. वा. सी. बेंद्रे, संभाजी, पृ. ६१८.

४ शि. च. सा. खंड ५, पृ. ७९.

करावयास इनाम जमीन दिल्याचा उल्लेख पेशवे दप्तर कागदातच आहे.[१] शाहू महाराज औरंगजेबाच्या कैदेतून सुटून आल्यावर इ. स. १७१५ पूर्वी त्यांनी आपल्या वडिलांचे वृन्दावन बांधले. ह्या वृन्दावनावर एक सुंदर मेघडंबरी गावकऱ्यांनी बांधली आहे. प्रतिवर्षी फाल्गुन अमावास्येला इथे उत्सव साजरा होत असतो.

संभाजी महाराजांची योग्यता

संभाजी महाराज गादीवर आले त्यावेळी राज्याचे यंत्र दुहीमुळे ढिलावले होते. असे ढिलावलेले यंत्र घेऊन त्यांनी औरंगजेबाशी टक्कर दिली. याबद्दल त्यांची तारीफच करावयास हवी असे म. म. पोतदार म्हणतात. शिवाजी महाराजांनी घालून दिलेले दंडक आणि तयार केलेली राजनीती त्यांनी चालूच ठेवली होती. संभाजी महाराज म्हणतात, " आबासाहेबांचे संकल्पित आहे ते आम्हास चालवणे अगत्य " (छ. संभाजी स्मारक ग्रंथ, पृ. ५१६) इंग्रजांशी झालेल्या एका मैत्रीच्या करारात संभाजी महाराज म्हणतात, " माझ्या वडीलांचे वेळी जो शिरस्ता होता तोच मी पाळीन " (कित्ता) गादीवर आल्यानंतर राज्ययंत्रणेवर आपली जरब बसविली. त्यामुळे वतनदार लोक दचकून वागू लागले. धडाडी व हिंमत संभाजी महाराजांस खचित होती. संभाजी महाराजांच्या वेळचे हिंदुस्थानचे राजकारण फारच गुंतागुतीचे होते. ते सोडविण्यासाठी त्यांना अष्टप्रधानांची मदत असावयास हवी होती. पण अष्टप्रधानांची जागा छंदोगामात्य कबजी कलुशाने घेतली होती.

राज्यकारभाराचे व न्याय निवाड्याचे संभाजी महाराजांचे कित्येक कागद उपलब्ध आहेत. त्यावरून असे दिसते की, ते निष्पक्षपाती न्याय देत असत. सामान्यतः मनुष्याची कदर व औदार्य हे त्यांचे गुण पुष्कळ ठिकाणी व्यक्त झालेले आहेत. धर्माच्या क्षेत्रांत, साधुसंत, देवदेवता, विद्वान ब्राह्मण यांच्याविषयी शिवाजी महाराजांसारखाच संभाजी महाराजांनी आदरभाव ठेवलेला आढळतो. बाटून मुसलमान झालेल्या अनेक ब्राह्मणांना शुद्ध करून पुन्हा हिंदुधर्मांत घेण्याचे धाडस संभाजी महाराजांनी दाखविलेले दिसते. दुर्दैवाने शत्रूच्या अफाट सैन्यांशी बरोबरच्या २/३ शे सैनिकांसह मुकाबला करावा लागल्यामुळे महाराजांना बंदिस्त होऊन विनाशकाळास सामोरे जावे लागले.

संभाजी महाराजांचा असा शेवट झाला. त्यांच्या आत्मबलिदानामुळे त्या अद्भुत आणि रोमांचकारी आयुष्याचा कळस झाला. संभाजीराजांचे सर्वांत मोठे गुण म्हणजे

---

१ शाहू दप्तर, रु. नं. ११, पेद.

साहस आणि निर्धार हे होत. त्यांनी औरंगजेबाच्या मुलाला आश्रय देऊन मोगलांना फार मोठे आव्हान दिले. प्रचंड सैन्यासह औरंगजेब दक्षिणेत उतरला असता ते मुळीच डगमगले नाहीत. मोगलांशी निकराच्या झुंजी देऊन त्यांनी त्यांची आक्रमणे परतवून लाविली, स्वराज्यातील कारस्थाने त्यांनी हाणून पाडली. फितूर लोकांना त्यांनी कडक शिक्षा केल्या. त्यांची बंडे मोडून काढली. पोर्तुगिजांना तंबी दिली. विजापुर आणि गोवळकोंडा या राज्यांना यथाशक्ति मदत केली आणि हे सगळे त्यांनी नऊ वर्षांच्या अल्पावधीत करून दाखविले. मोगलांचा सेनासागर स्वराज्य बुडवून टाकण्यासाठी खवळून उठला होता, पण संभाजीराजांच्या तोंडी शरणागतीची भाषा नाही, निराशेचा एक उद्‌गार नाही हा त्यांच्या चरित्रातील एक अद्‌भूत भाग आहे, आणि शेवटी ते मोगलांच्या कैदेत सापडले. त्यावेळीही त्यांचे वर्तन अतिशय बाणेदारपणाचे होते. त्यांनी औरंगजेबासमोर मान वाकविली नाही. त्यांनी दयेची याचना केली नाही. त्यांनी निर्भयपणे मृत्यूला कवटाळले. औरंगजेबासमोर त्यांनी आपली मान ताठ ठेविली हे दृश्य मराठ्यांनी सदैव मनात बाळगावे असेच आहे. आपले प्राण पणाला लावून त्याने नऊ वर्षेपर्यंत स्वराज्य सुरक्षित ठेवले आणि औरंगजेबाची आक्रमणे हाणून पाडली हे संभाजीचे खरे व्यक्तिमत्त्व आहे. आणि यामुळेच मराठ्यांचा हा लाडका राजा, शिवपुत्र संभाजी, मराठ्यांच्या इतिहासात अमर झाला आहे.

□□

४१. राजाराम महाराजांचा जन्म, बालपण आणि राज्यप्राप्ती

श्री छत्रपती शिवाजी महाराजांना दोन पुत्र होते. पहिले छत्रपती संभाजी महाराज यांचा जन्म मातुश्री सईबाईसाहेब यांचे पोटी पुरंदर गडावर १४ मे १६५७ रोजी झाला. ५ सप्टेंबर १६५९ रोजी मातोश्री सईबाई साहेबांचे निधन झाले. दुसरा मुलगा राजाराम हा मातोश्री सोयराबाईसाहेब यांचे पोटी २४ फेब्रुवारी १६७० रोजी जन्मला. जेधे शकावलीत फाल्गुन शुद्ध २५, शके १५९१ (२४ फेब्रुवारी १६७०) अशी नोंद आहे.[१] राजाराम महाराज आपल्या मातोश्री सोयराबाई व आजी जिजाबाई यांच्या सानिध्यात वाढले. दुर्दैवाने आजी जिजाबाई ह्या राजाराम महाराजांच्या वयाच्या पाचव्या वर्षी निवर्तल्यामुळे राजाराम महाराजांस संभाजी महाराजांसारखी तिजकडून शिकवणूक लाभली नाही. मात्र राजाराम महाराज संभाजी राजांच्या पत्नी येसूबाईसाहेबांजवळ वाढले आणि त्यांचाच त्यांना लळा लागलेला दिसतो. पण राणी येसूबाई यांनी बाहेरच्या लोकांशी राजाराम महाराजांचा संपर्क फारसा राहू दिला नाही.[२] राजाराम महाराजांचे पहिले लग्न प्रतापराव गुजरांच्या मुलीशी १५ मार्च १६८० रोजी झाले. त्या अगोदर ७ मार्च १६८० रोजी राजारामाची मुंज झाली.[३] छत्रपती शिवाजी महाराज ३ एप्रिल १६८० रोजी निवर्तले. शिवाजी महाराजांच्या हयातीतच त्यांच्या पश्चात राज्यपद कोणाला मिळावे याविषयी चर्चा सुरू झाली होती. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर संभाजी महाराजांचे हक्क डावलून आपला मुलगा राजाराम यास गादी मिळावी अशी खटपट सोयराबाईंची चालू होती. त्यास यश आले.[४] सोयराबाईंच्या संमतीने अण्णाजी दत्तो, मोरोपंत पिंगळे आदी मंत्र्यांनी राजाराम महाराजांस सिंहासनावर बसविले. यावेळी संभाजी राजे पन्हाळगडी होते. राजारामास मंचकारोहण केले हे संभाजी महाराजांस पन्हाळ्यावरच समजले. त्यांनी सेनापती हंबीरराव मोहिते यांस आपल्याकडे ओढून घेतले. त्यांच्या साहाय्याने पन्हाळगडाचा बंदोबस्त केला आणि मोरोपंत व अण्णाजी दत्तो यांना गिरफतार करून कैदेत ठेविले.

---

१ जेधे शकावली, शिवचरित्र प्र., पृ. २४.

२ बेंद्रे, राजाराम महाराज, पृ. १२.

३ जेधे शकावली, शिवचरित्र प्र., पृ. ३०.

४ सभासद, बखर, पृ. ८७.

रायगडी येऊन राजाराम महाराज व आई सोयराबाई यांना नजर कैदेत टाकले आणि स्वत:स मंचकारोहण केले. अशा रीतीने संभाजी महाराज हिंदवी स्वराज्याचे छत्रपती बनले. (२० जुलै १६८०) दुसऱ्या वर्षी औरंगजेबाचा पुत्र अकबर महाराष्ट्रांत संभाजी महाराजांच्या आश्रयास आला. मराठा राज्याचे विसर्जन करण्यासाठी व पुत्र अकबर यास पकडण्यासाठी इ. स. १६८१ मध्ये मोठे सैन्य घेऊन औरंगजेब दिल्लीहून दक्षिणेत आला. त्यांने संभाजी महाराजांविरुद्ध सिद्दी, पोर्तुगीज, सावंत यांना उठविले. महाराजांवर आपले सरदार पाठविले. संभाजी महाराजांच्या मराठा सरदारांस फितूर केले. कालांतराने काही शिर्के सरदार फितूर करण्यात बादशहास यश आले आणि फितुरांकडून संभाजी महाराजांच्या संगमेश्वर येथील मुक्कामाची बातमी कळताच मोगल सरदाराने महाराज बेसावध असता संगमेश्वरास पकडले.

मराठेशाहीवरील दुर्घट प्रसंग :

संभाजी महाराज मुघल सैन्यांकडून पकडले गेल्याची बातमी रायगडावर येऊन थडकली, तेव्हा रायगडावर राज्यकारभाराची नवी व्यवस्था करण्यात आली. ह्या वेळपर्यंत राजाराम किल्ल्यातील आदबखान्यात नजरकैदेत होते. त्यांना रायगडाचा किल्लेदार चांगोजी काटकर व येसाजी कंक यांनी माघी अमावस्येस (९ फेब्रुवारी १६८९) बाहेर आणून फाल्गुन शुद्ध तृतीयेस मंचकी बैसविले. त्यावेळेस संभाजी महाराज हयात होते. त्यांचा वध ११ मार्च १६८९ रोजी झाला. मानाजी मोरे व वरकड जे संभाजी महाराजांनी धरिले होते ते सोडीले व त्यांचे कार्यभाग त्यांसी देऊन राजाराम महाराज राज्य करू लागले.

" इ.स. १६८६ च्या फेब्रुवारी महिन्यापासून ते वर्ष संपेपर्यंत मोगलांनी मराठ्यांकडील बरेच किल्ले घेतले. द. कोकणात संगमेश्वर, राजापूर, पन्हाळा, मलकापूर, इ. प्रदेश आणि वर घाटावरील सातारा, परळी, निंब, चंदन वंदन हे किल्ले व कऱ्हाड, माजगाव, मसूर, इत्यादी प्रदेश मराठ्यांच्या ताब्यांत सप्टेंबर १६८९ पर्यंत राहिलेले दिसतात. (गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. ३१६) अशी परिस्थिती आल्यामुळे स्वराज्यातील वतनदार वर्ग आपली वतनें सुरक्षित राखण्यासाठी त्यावेळी मोगलांशी सहकार्य करीत होता हे जेधे, खोपडे आदी मराठा मंडळीच्या राजवाडे खंड १५ पान नं. ३९५ वर प्रसिद्ध झालेल्या सर्जेराव जेधे यांच्या मुलाच्या कैफियतीवरून ध्यानात येते.

संभाजी महाराज पकडले गेले त्यावेळी रायगडावरील कारभार राणी येसूबाईच पाहत होत्या. खरे पाहता संभाजी महाराजांच्या मृत्यूपर्यंत दोन महिने मराठी राज्याचा कारभार

संभाजी महाराजांच्या नावेच सांभाळावयास हवा होता. तसे न करता रायगडावरील सरकारकुन जे संभाजी महाराजांवर रुष्ट झाले होते, त्यांनी शब्दांची आणि वाणीची खैरात करून येसुबाईंना राजाराम महाराजांना गादीवर बसवण्यास संमती देण्याची गळ घातली असावी आणि ह्या संकटावस्थेत आपले पाठीराखे जवळ नसल्याने राणी येसुबाईंना सरकारकुनांच्या सूचनेस संमती देणे भाग पडले असावे.

संभाजीराजांच्या मृत्यूमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा मोगलांनी पुरेपूर फायदा घेतला. बागलाणांतील किल्ले मोगलांनी किल्लेदारांना वश करून ताब्यात घेतले होते. मातबरखान हा ११ मार्च १६८९ रोजी म्हणजे संभाजीराजांचा वध झाला, त्याच दिवशी, कोकणांत उतरला. २७ मार्च रोजी त्याने कल्याण घेतले, १७ जुलैला त्याने प्रबळगड (माथेरानजवळ) घेतला. जुलैच्या अखेरीस माहुलीचा किल्लेदार द्वारकोजी याने किल्ला मोगलांच्या हवाली करून मोगलांची मन्सब पत्करली. यानंतर कर्नाळा, मुकुटगड, मलंगगड, चंदेरी, खाहुदा, माणिकगड, संकिया, दुगड हे कोकणातील किल्ले भराभर मोगलांच्या हाती पडले. ठाणे जिल्ह्यातील बिगर पोर्तुगीज म्हणजे मराठी भाग हा ऑगस्ट १६८९ पर्यंत मोगलांच्या ताब्यात गेला. वर घाटावर पन्हाळा भागात रुहुल्लाखानाचे सैन्य, फीरोजजंगाचे सैन्य रायगड भागात, व शहजादा आज्जम याचे सैन्य चाकण भागात असे मोगल पसरले होते. स्वतः औरंगजेब हा पुण्याजवळ कोरेगाव येथे ३ मार्च १६८६ पासून ठाण मांडून बसला होता. १६८८ साल संपण्यापूर्वीच मोगल सरदार इतलादखान (झुल्फिकारखान) हा शहाजादा आज्जम याचा निरोप घेऊन रायगड घेण्याच्या उद्देशाने कोकणात उतरला होता.

मोगल रायगडाला वेढा घालतात :

"या सुमारास बादशहाला कळले की संभाजीचे सरदार खेलोजी आणि केशवजी यांनी संभाजीची बायकामुले यांना रायरी (रायगड) च्या किल्ल्यात ठेवले असून तोफा आणि युद्धाचे इतर सामान जमविले आहे. त्यांनी बरेच सैन्य जमविले असून शहाजादा आज्जम याजबरोबर सैन्य त्या भागात पोहोचले आहे त्याजबरोबर लढण्याची तयारी करीत आहेत. शहाजादा आज्जम याच्याबरोबर असलेले बहरामदखान वगैरे सरदार हे मराठ्यांचे किल्ले जिंकून घेण्यासाठी गेले होते. त्यांनी किल्ले जिंकून घेतले आणि त्याची बातमी त्यांनी बादशहाला कळविली."

बहरामदखानाच्या सैन्यात दिलेरखान, रुस्तमखान, राजा अनुपसिंग वगैरे सरदार होते. त्यांना बादशहाने शहाजादा आज्जम याजपाशी तैनात केले. याशिवाय सिद्दी मिफताहखान, मानसिंग राठोड, सिद्दी अब्दुल्लकादिरखान, हाजी अफजल इत्यादी सरदारांनाही शहाजादा आज्जम याजकडे पाठविण्यात आले. थोड्याच दिवसांनी झुल्फिकारखान बहादुर हा बादशहापाशी आला. रायगडचा किल्ला जिंकून घेण्याचे बादशहाने ठरविले. यापूर्वी शहाजादा आज्जम आणि गाजिउद्दीन खान हे त्या किल्ल्यावर चालून गेले होते पण त्यांच्या मोहिमेचा काही उपयोग झाला नाही. यामुळे रायगड जिंकून घेण्यासाठी बादशहाने झुल्फिकारखानबहादूर याची नेमणूक केली. शहाजादा आज्जम याजकडून हवी ती मदत घेऊन किल्ला जिंकून घ्यावा अशी बादशहाने त्यास आज्ञा केली. बादशहाची आज्ञा घेऊन झुल्फिकारखान निघाला तो प्रथम शहाजादा मुआझम याजकडे गेला. तेथे तो तीन दिवस राहिला. नंतर त्याने शहाजाद्याकडे असलेले काही सरदार निवडून आपल्याबरोबर घेतले आणि तो तडक रायरीच्या पायथ्याशी आला. रायरीपासून दोन कोसांवर त्याने आपला तळ दिला.

बादशहाने झुल्फिकारखान यास रायगडला वेढा घालण्याचा हुकूम दिला झुल्फिकारखान सैन्यासह कूच करून महाड येथे मार्च ८, १६८९ रोजी आला. तो मुअज्जमला लिहितो गांगोलीच्या मुक्कामी शत्रूने आमच्यावर रात्री हल्ला केला, त्यांनी आमच्यावर बाण फेकले, आणि गोळ्यांचा वर्षाव केला. पण आमचे शूर सैनिक सावध होते. त्यांनी शत्रूंचा प्रतिकार करून त्यांना परतवून लाविले. आजही महाडच्या वाटेवर असलेल्या सोनगडच्या डोंगरावर शत्रू जमले होते आणि त्यांनी आमच्यावर तोफांचा आणि बंदुकीचा मारा केला. आमचे सैन्य डोंगरावर चढले. आमच्या सैनिकांनी शत्रूंना मार देत किल्ल्याच्या दरवाजापर्यंत रेटले.

" तोपर्यंत समुद्राच्या खाडीला भरती आली आणि किल्ल्याच्या पायथ्याशी जाण्या-येण्याची वाट होती ती फक्त तीन चार हातच रुंद होती. त्यातच दिवस मावळून रात्र झाली. या चकमकीत खैर अंदेशखान आणि त्याचे मोगल यांनी चांगलीच कामगिरी बजावली. "

" मला बंदुकची, बेलदार, सुतार, जंगले तोडणारे, जमिनी खणणारे, मशालजी इत्यादी लागतील. याबद्दल यापूर्वी मी आपणांस विनंती केली होती. येथे जास्त काम पायदळ शिपायांचेच आहे. ते आमच्यापाशी विशेष नाहीत. कर्नाटकी, बेलदार आणि इतर युद्धसाधने यांची आवश्यकता आहे. चार-पाच हजार माणसे लवकर पाठवावीत.

त्यापैकी एक हजार तरी बहेलिये (पायदळ बंदुकची) हवेत. दारू आणि लहान आणि मोठे गोळे लवकर पाठवावे. जंगले तोडणारेही लवकर पाठवावे. आतापर्यंत कोंकणात (घाटाखाली) ठाणी कायम झाली आहेत. आता रायरी (रायगड) च्या जवळ ठाणी कायम करावयाची आहेत. माझ्यापाशी किती थोडे सैन्य आहे हे आपल्याला माहीतच आहे. म्हणून आधिक सैन्य पाठवावे." ह्या पत्रांतील विनंतीनुसार झुल्फिकारखानला युद्धसामुग्री पुरविण्यात आली. त्यानंतर रायगडाला वेढा घालण्यासाठी त्याने चाल केली.

राणी येसूबाईची कैद :

राजाराम महाराजांस राणी येसूबाईच्या संमतीने सरकारकुनानी दिनांक १२ फेब्रुवारी १६८९ रोजी मंचकी बसविले व ते राज्य करू लागले. ही बातमी औरंगजेबास तो कोरेगावी असता समजली. ताबडतोब त्याने वजीर आसदखानचा पुत्र ईतिकदखान यास रायगड काबीज करून राजारामास पकडून आणण्याची आज्ञा केली, खानाने दिनांक २५ मार्च १६८९ रोजी रायगडास वेढा दिला. यावेळी आदील मुत्सद्दी व सरदार मंडळीस बहुत संकट प्राप्त झाले व त्यांनी पुढील संकट टाळण्याकरिता मसलती सुरू केल्या. इतक्यात ईतिकदखान (झुजा फिकारखान) याने किल्ल्यापासून काही अंतरावर बुजुर्ग वाडीचा दर्गा आहे तेथे आपली छावणी कायम केली. तो अद्याप छावणीत पोहोचला नव्हता. इतक्यात साताऱ्याच्या दिशेने हंबीरराव (दुसरा) त्याच्यावर चालून आला. मुघलांची रसद तोडणे हा त्यांचा उद्देश होता. झुल्फिकारखान आणि हंबीरराव यांचे निकराचे युद्ध झाले. मराठ्यांची १५०० माणसे ठार झाली. मुघलांचे सुमारे ९०० सैनिक ठार झाले मराठे टिकाव धरू शकले नाहीत व त्यांनी माघार घेतली. रसद तोडण्यासाठी तुकड्या नेमल्या होत्या त्याही निघून गेल्या.[१] " त्यामुळे किल्यांतील मुत्सद्दी व सरदार मंडळीच्या मसलतीस जोर चढला. त्यांना दिसून आले की खजिन्यात पैसा नाही, पागा, फौज सर्व मोडले, पूर्वीची अनुभवी माणसे मरून गेली. मोगलांच्या निरनिराळ्या फौजा मराठी राज्यांत सर्वत्र घुसून नाश करू लागल्या अशा स्थितीत किल्ला लढविण्याचे व राज्य राखण्याचे काम कठीण होऊन बसले. शत्रूंशी उघड टक्कर देणे शक्य नव्हते, हा विचार मुत्सद्यांनी राणी येसूबाईंना बोलून दाखविला तेव्हा येसूबाईने सांगितले की,

१ पगडी सेतुमाधवराव, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. ८९.

तुम्ही सर्व पराक्रमी सरदारांनी एक विचारे चालून, राजारामांनी त्यांचे कबिलासह बाहेर पडावे. आम्ही मुलांसह रायगडावर सुखरूप राहू. तुम्ही सर्व बाहेर पडल्यावर शत्रू तुमचे अंगावर जातील. तुमचा सर्वांचा जमाव एके ठिकाणी पोक्त झाला म्हणजे आम्हांस काढून तिकडे न्यावे."[१] ही राणी येसूबाईंची पोक्त विचारसरणी ऐकून सर्वांना धीर आला. परंतु येसूबाईंस मागे एकटी टाकून जाणे राजाराम महाराजांच्या जीवावर आले. तथापि प्रसंगावर दृष्टी ठेवून सर्वांचे समाधान करून राजाराम महाराज बोलले. "राज्याचे अधिकारी शिवाजी राजे पूर्वीचे तेच हे ऐसे लक्ष ठेवून, आम्ही कारभारी, आमचे आज्ञेत राहून, पूर्वीहून विशेष पराक्रम करून, औरंगजेबास जिंकून राज्य रक्षावे येविशी सर्वांची शपथाप्रमाणे व्हावी." येणेप्रमाणे सर्वांच्या शपथा झाल्या आणि राजाराम महाराज ५ एप्रिल १६८९ रोजी रायगडाबाहेर पडले.[२] निघताना राजाराम महाराजांनी राणी येसूबाईंचे चरणी मस्तक ठेवून श्रमी झाले तेव्हा राणी साहेबांनी त्यांच्या मस्तकी हात ठेवून बोलल्या, यशस्वी व्हावे, गेलेले राज्य मिळवावे, श्रमी होऊ नये. तद्नंतर राजाराम महाराजांनी नेत्र पुसून संभाजीपुत्र शिवाजीस पोटाशी धरले व पुन्हा भेट होईल तो सुदीन असे म्हणून निरोप घेतला. संताजी घोरपडे, धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे इत्यादी मंडळी बरोबर होती.[३]

बादशहास राजाराम महाराज आणि मंडळी प्रतापगडावर गेल्याचे समजले. यावेळी रायगड किल्ल्यावर राणी येसूबाई, शिवाजी महाराजांची पत्नी सकवार बाई, संभाजी महाराजांची दुसरी बायको चंपा व ३ मुलगे व २ मुली अशी पाच मुले पदरी होती. त्यांना पकडून आणण्यासाठी बादशहाने झुल्फीकारखानास सांगितले.[४] खानाने सभोवतालचा बंदोबस्त करून मार्च १६८९ मध्ये रायगडास मोर्चे देण्याचे काम सुरू केले. ह्या मोर्चाचे सहायार्थ जंजिऱ्याचा सुभेदार खैरियतखान सिद्दी बादशहाच्या हुकूमाने मदतीस आला होता. किल्ल्यात तोफा व युद्धाचे इतर सामानही होते पण बेताचे होते.[५] झुल्फिकारखान याने किल्ल्याला चहूकडून वेढले. किल्ल्याच्या वाटा त्याने बंद केल्या आणि किल्ल्यावर

१ सरदेसाई, राजाराम, पृ. ८.

२ जेधे शकावली, शिवचरित्र, पृ. ३४, का.ना. साने (सं) चिटणीसविरचित संभाजी महाराज व राजाराम महाराज यांची चरित्रे, पृ. २६.

३ मासिरे आलमगिरी, पृ. १९७.

४ जेधे शकावली, शिवचरित्र प्र., पृ. ३२.

५ फुतुहाते आलमगिरी, पृ. २३.

तोफांचा मारा चालू केला. किल्ला मोगलांच्या हवाली करण्याशिवाय गत्यंतर नव्हते हे येसूबाईंस सूर्याजी पिसाळाने पटवून दिले. किल्लेदारांनी झुल्फिकारखानाबरोबर तहाचे बोलणे लाविले. त्यांनी मोगलांकडून अभय मागितले. काल—करार झाले. त्यांत सर्वांना मानाने व सुरक्षित ठेवण्याचा करार झाला. संभाजी महाराजांची पत्नी राणी येसूबाई मुले व इतर मंडळी मोगलांच्या छावणीत आली. झुल्फिकारखानाने सर्वांना सन्मानाने वागविले. किल्ला दिनांक ३ नोव्हेंबर १६८९ रोजी झुल्फिकारखानाच्या ताब्यात आला तेव्हा त्याने महाराजांचा दप्तरखाना जाळला व सिंहासन फोडीले. हे त्याने बादशहास कळविले व किल्याच्या बंदोबस्ताला अधिकारी नेमले. रायगडाला उत्तमगड इस्लाम हे नाव देण्यात आले.[१]

बादशहाने झुल्फिकारखान यास संभाजीची बायको मुले बरोबर घेऊन दरबारात यावे म्हणून आज्ञा केली. झुल्फिकारखानाने संभाजीची सावत्र आई सकवारबाई साहेब, बायको राणी येसूबाई व मुलगा शाहू, संभाजीचे दोन दासीपुत्र मदनसिंह व माधवसिंह व इतर मंडळी यांना बरोबर घेतले आणि तो बादशहाकडे गेला. संभाजीच्या मालमत्तेपैकी जड जवाहिराने भरलेल्या दोन पेट्या बादशहासमोर ठेवण्यात आल्या. बादशहाने त्या फाजलखानाच्या अमानती दिल्या.[२]

रायगडाहून ही मंडळी छावणीत दाखल होताच बादशहाने त्या सर्वांस आपल्या राहत्या तंबूजवळ लालकनातीच्या आवारात स्वतंत्र जागा नेमून दिली. त्या ठिकाणी सर्वांस पुरेसे तंबू उभारून त्यांच्या राहण्याची व जनानखान्याच्या पडद पोशीची तजवीज केली. नोकरचाकरांची जागा वजीराच्या मुक्कामाशेजारी ' राणीचा बाजार ' या नावाने ठरवून दिलेली होती. प्रत्येकास इलमाच्या खर्चास ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे सालाच्या उक्त्या नेमणुका बादशहाने बांधून दिल्या. शाहूला त्याने राजा ही पदवी आणि जात व स्वार मिळून सप्तहजारी मनसब मुक्रर केली. त्याची राहण्याची जागा आई-आजींच्या जागेत होती. स्वतंत्र नव्हती. आरंभी तरी खाण्यापिण्याची कमतरता नव्हती. पण पहारा मात्र अगदी सक्त होता.[३]

मराठ्यांचे स्वराज्य आता पूर्णपणे आपल्या हाती आले आहे या समजुतीने औरंगजेब स्वराज्याची मुलकी व्यवस्था नीटपणे लावण्याच्या मागे लागला. देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी इत्यादींना बोलावून त्यांची वतने कायम केली. त्यांचे आपसातील

---

१ खोबरेकर, तारिके-दिलकशा, पृ. १७०.

२ जेधे शकावली (शिवचरित्र प्रदीप), पृ. ३५.

३ सरकार, औरंगजेब भा. ५, पृ. २०३, सरदेसाई, राजाराम रियासत, पृ. १०२-३.

काही तंटे तोडले, शेतसाऱ्याच्या वसुलीची व्यवस्था केली. जिंकलेल्या मराठी प्रदेशात शेकदार, अमीन, किल्लेदार इत्यादी अधिकाऱ्यांस नेमिले. वतनदारांची धडपड आपली वतने सांभाळण्याची होती, करीता काही वतनदार मोगलास मिळाले.'

टीप.— छावणीच्या मधोमध बादशहाची कचेरी व निवासस्थान असे. याला दौलतखान म्हणत. निवासस्थानाचा घेर निदान एक कोसाचा असे त्यांच्याभोवती लाकडी फळ्यांचे कंपौंड असे या फळ्यांचा रंग गुलालाचा असल्यामुळे बादशहाच्या निवासस्थानाला गुलालबार म्हणू लागले.

□□



छत्रपती राजाराम

१ पगडी, हिंदवी, स्वराज्य आणि मोगल, पृ. १११.

४२. राजाराम महाराजांचे जिंजीस आगमन आणि राज्यकारभार चालू

राजाराम महाराज आपले निवडक अनुयायी रामचंद्रपंत, प्रल्हाद निराजी, संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांना बरोबर घेऊन रायगडावरून ५ एप्रिल १६८९ रोजी मोगलांच्या वेढ्यातून निसटून प्रतापगडावर चालून जाण्यास सांगितले. तेव्हा प्रतापगडावर फार काळ न थांबता राजाराम महाराज वासोटा-सातारा-परळी असे मुक्काम करीत पन्हाळ्यास आले. तेथून त्यांनी सर्व मराठे किल्लेदारास हुशार राहून मोगलांचा पाडाव करण्यासाठी आपल्या सहीची पत्रे पाठविली. औरंगजेबास राजाराम महाराज प्रतापगडावर गेल्याचे समजताच त्याने शहाजादा अलिजाहा महंमद आज्जम यांस प्रतापगडावर हल्ला करण्यास सांगितले पण राजाराम महाराज प्रतापगडावर फार काळ न थांबता ते पन्हाळ-गडावर आले. राजाराम महाराजांचा प्रतापगडावर मुक्काम ५ एप्रिल ते ऑगस्ट १६८९ पर्यंत होता. पण येथेही संभाजी महाराजांना पकडणारा शेख निजाम ह्यासच औरंगजेबाने पन्हाळ्यास जाऊन राजाराम महाराजांना पकडण्याची कामगिरी दिली. म्हणून तो पन्हाळ्यावर चाल करून गेला. रामचंद्रपंतांना ही बातमी लागल्यावर त्याने संताजी व धनाजी यांना त्यांचे पारिपत्य करण्यास पाठविले. त्यांनी त्यांच्या सैन्यावर हल्ले करून त्यास साफ लुटून घेतले. त्याचे हत्ती, घोडे वगैरे हिरावून आणिले. तेव्हा अंगावर जखमा झालेला निजाम कसाबसा जीव बचावून करवीरास पळून गेला.

राजाराम महाराज ज्या गडावर जात तिकडे मोगली फौज त्यांना पकडण्यास धावत असे. स्वराज्यातील इतर गडासही वेढे पडले होते. त्यापैकी अनेक मोगलांच्या ताब्यांत गेले होते. काही अजूनही मोगलांशी झगडत होते. किल्लेदार व ठाणेदार यांनी घाबरून न जाता मोगलांशी दोन हात करावेत म्हणून राजाराम महाराज त्यांचे नीतिधैर्य वाढविण्याचा प्रयत्न करत होते. पण मोगल आक्रमणाची लाटच एवढी जबरदस्त होती की, मराठ्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ होत होते.

पन्हाळ्यावर सर्व मुत्सद्दी व सरदार यांनी एकत्र येऊन विचारविनिमय केला. मोगलांशी झुंज देण्यासाठी, निदान मराठे अजून शाबीत आहेत यांची बादशहाला जाणीव व्हावी, या हेतूने एका मोहिमेची आखणी करण्यात आली. संताजी घोरपडे व धनाजी

जाधव यांच्या हाताखाली फौज देऊन त्यांना बादशाही मुलूखात-फलटणच्या परिसरात रणमस्तखान व शाहाबुद्दीन खान यांच्या ठाण्यावर हल्ला करण्यास पाठविण्याचे ठरले.

संभाजी महाराजांच्या पाशवी हत्येचे वृत्त आल्यापासून संताजी घोरपडेंच्या मनांत त्यांच्या व आपले पिता म्हाळोजी घोरपडे यांच्या बलिदानाचा बदला घेण्याची आकांक्षा ते बाळगून होते. त्यांनी पाहिले की औरंगजेब बादशहा संभाजी महाराजांचा वध केल्यापासून अजूनही भीमानदीच्या काठी तुळापूर येथेच छावणी करून आहे व येथूनच तो महाराष्ट्रातील गडकोट घेण्यासाठी मोहिमा पाठवत आहे. या बादशहाच्या छावणीवरच हल्ला चढवावा आणि मोगली आक्रमणाचे केंद्रस्थानच धास्तावून टाकावे अशी अचाट कल्पना संताजीने धनाजीस सुचविली. कारण एक-दोन ठिकाणी छापे घालून व जय मिळवून मराठ्यांचे नीतिधैर्य वाढणार नाही.

बादशाही छावणीचे कळस कापले :

त्याप्रमाणे त्यांनी आपल्या फौजा गोळा केल्या व ते शंभु महादेवाच्या डोंगरांकडे आले. तेथे ठरले की, बादशाही छावणीवर संताजीने हल्ला करावा व त्याच वेळी फलटण-बारामती भागांत असणाऱ्या रणमस्तखान व शहाबुद्दीन खान या खानांचा समाचार धनाजीने घ्यावा. धनाजीने संताजीच्या मदतीस विठोजी चव्हाण हा दुसरा शूर सेनानी व दोन हजार स्वार दिले. याशिवाय संताजीचे बहिर्जी व मालोजी हे दोन बंधू सोबत होते. प्रसंगाचे वर्णन करताना मल्हार रामराव म्हणतात—

" त्या समयीं जाधवराव यांस संताजी घोरपडे बोलिले की, " पादशहा याची फौज एक-दोन मुक्कामांवर आली आहे. फलटणचे आश्रयास आपण (धनाजीने) लढाई द्यावी. पाठीवर डोंगर असावा. माझ्याबरोबर दोन हजार स्वार सडेएकांडे निवडक द्यावे. शिवाय माझे पथकानिशी तुळापूरचे मुक्कामी जाऊन बरायबुद पादशाहा यांजवर मी छापा घालतो. (आम्ही) मराठे आहोत असे खाशास (औरंगजेबास) कळवून येतो. " याप्रकारे बोलिले असतां जाधवराव, फार चांगले शाब्बास, असे बोलून घोरपडे यांचे खास पथकाशिवाय दोन हजार निवडक एकांडे व विठोजी चव्हाण असे बरोबर दिले.

संताजीने ही योजना आखण्यापूर्वी मोगलांच्या फौजफाट्याची, त्यांच्या मुक्कामांची, त्यांच्या तंबूतील व्यवस्थेची संपूर्ण माहिती गोळा केली होती. झोपण्याच्या जागा, झोपण्याच्या वेळा, पहारे बदलण्याच्या वेळा, वगैरेंची खडानखडा माहिती त्यांनी आपल्या

हेरांकडून मिळविली होती. संताजीने आपल्या स्वारांसह डोंगरांच्या आश्रयाने जेजुरीस येऊन दिव्या घाटाखाली जाऊन झाडींत मुक्काम केला. तेथून मध्यरात्रीचे तुळापूर छावणीस जाताना तीन कोस अलीकडे छबिन्याचे (राम पहाराचे) स्वारांची गाठ पडली. लष्करातील हिंदू सरदार शिर्के-मोहिते यांच्या पथकांतील आपण सैनिक आहोत, पहारा पालटल्याने छावणीत माघारी येत आहोत अशी बतावणी करून त्यांनी छावणीत प्रवेश मिळविला. नंतर निरनिराळ्या ठिकाणी अशीच बतावणी करीत त्यांनी " गुलालबार " या बादशहाच्या मुख्य तंबूकडे जाण्याचा मार्ग मोकळा केला आणि ते मुख्य गोटात शिरले. पहारेकऱ्यांना ठार करून संताजी, बहिर्जी, मालोजी व विठोजी चव्हाण या चौघांनी सर्वांत मध्यभागी उठून दिसणाऱ्या बादशहाच्या तंबूकडे धाव घेतली. परंतु बादशहाच्या डेऱ्याजवळ पोहोचताच त्यांची मोठी निराशा झाली. कारण औरंगजेब बादशहा नेमका यावेळी आपल्या डेऱ्यात नव्हता. नाहीतर या वेळीच औरंगजेब ठार झाला असता व मोगलांची दक्षिणेतील मोहीम संपुष्टांत आली असती. आपली शिकार साधली नाही यामुळे संताजीची निराशी झाली खरी, पण आपण येऊन गेल्याची साक्ष बादशहाच्या चिरकाल स्मरणात राहावी, म्हणून त्यांनी डेऱ्यांचे तणाव तोडले व शामियान्यावरील सोन्याचे दोन कळस काढून घेतले आणि कापाकापी करीत सर्वत्र गोंधळ माजवून संताजी आपल्या साथीदारांसह छावणीतून बाहेर पडला, जे जे कोणी प्रतिकारासाठी धावले ते सर्व कापले गेले.

त्याच रात्री दौडत संताजी घोरपडे व त्यांची फौज सिंहगडच्या पायथ्याशी असलेल्या झाडीत पोहोचली. गडावर प्रतापराव गुजरांचा मुलगा सिधोजी गुजर हा किल्लेदार होता. तो गडाखाली संताजीस भेटावयास आला. आपल्या फौजेतील जखमींना शुश्रुषेसाठी त्यांच्या स्वाधीन केले व आपल्या लष्करास दोन दिवस विश्रांती देऊन संताजी रायगडाचे संधान राखून त्या रोखाने घाट उतरला. रायगडाला वेढा देऊन बसलेल्या झुल्फिकारखानाच्या लष्करावर विजेसारखा कोसळला. लढाई तेज झाली. मोगलांची मोठी हानी करून व त्यांचे पाच हत्ती पकडून संताजी आपल्या लष्करासह त्वरेने पारघाट चढून वाई साताऱ्यावरून तो राजाराम महाराजांच्या समोर किल्ले पन्हाळा येथे हजर झाला. (सप्टेंबर १६८९).

छत्रपती राजाराम महाराज संताजीच्या या अद्वितीय साहसी मोहिमेच्या यशस्वी वार्तेने खूष झाले. निरनिराळ्या वीरांचा वस्त्रे, भूषणे देऊन त्यांनी सत्कार केला व संताजी घोरपडे यास " मामलकतमदार " (राज्याचा आधार), बहिर्जी घोरपडे यास " हिंदूराव " मालोजी घोरपडे यास अमीर-अल्-उमराव व विठोजी चव्हाण यांस " हिंमत बहाद्दूर " हे किताब दिले.[१]

या हल्ल्याचे महत्त्व फार मोठे होते. संभाजी महाराजांच्या वधानंतर निर्माण झालेल्या अंधाऱ्या काळरात्री एखादी विद्युल्लता चमकावी त्याप्रमाणे संताजीचा हा पराक्रम सर्व महाराष्ट्रात चमकला. हिंदवी स्वराज्याला संताजी घोरपडेंच्या रूपाने एक आशेचा किरण दिसला. छत्रपतींच्या दरबारात असणारा ज्येष्ठ मुत्सद्दी रामचंद्रपंत यानेही हा अद्‌भूत पराक्रम पाहून उद्‌गार काढले. " पादशहाचे डेऱ्याचे कळसच आणून झुल्फिकारखान याचे पाच हत्ती आणिले. त्यापेक्षा यांची (संताजीची) मर्दुमकी कोठवर वर्णावी [२] "
(जयसिंगराव पवार, सेनापती संताजी घोरपडे, पृ. २४)

विजयादशमीनंतर पन्हाळ्यास मुघल सैन्याने वेढा दिला. तेव्हा राजाराम महाराजांनी सरदार मंडळींशी विचार करून शंकराजी नारायण सचिवाकडे कोरीगडाभोवतालचा भाग सोपविला, बाकीचा भाग रामचंद्रपंतांकडे दिला. तसेच महाराष्ट्रांतील स्वराज्याचा कारभार रामचंद्रपंतांकडे सोपविला. संताजी, धनाजी व शंकराजी आणि पायदळ व घोडदळ ही रामचंद्रपंतांच्या हवाली केली आणि राजाराम महाराजांनी २६ डिसेंबर १६८९ रोजी पन्हाळगड सोडला.[३] मुघलांचा किल्ल्यास वेढा पडलेला होता, म्हणून राजाराम महाराज आणि त्यांच्याबरोबर असलेल्या मंडळींना मोठ्या हुशारीने मुघलांना चकवून जावे लागले.[४]

राजाराम महाराजांबरोबर मानसिंग मोरे, प्रल्हाद निराजी, कृष्णाजी अनंत सभासद (ह्यानेच १६९४ मध्ये सभासद बखर लिहिली), निलकंठ कृष्ण, खंडोबल्लाळ व इतर कार्यस्थ मंडळी, बाजी कदम, खंडोजी कदम, केशव पंडित, बहिर्जी व मालोजी घोरपडे

---

१ बेंद्रे, छत्रपती राजाराम महाराज, पृ. ५६.
२ कित्ता.
३ बेंद्रे, संपादित केशव पंडीतकृत जिंजीचा प्रवास, पृ. ६२-६३.
४ पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. १०१.

इत्यादी मंडळी होती. राजाराम महाराज कर्नाटकाच्या वाटेवर आहेत असे औरंगजेबास समजताच त्याने त्याचा पाठलाग करून त्यास पकडावे असे तातडीचे हुकूम सोडले.[१]

राजाराम महाराज आणि त्यांच्याबरोबर असणारी मंडळी घोड्यावरून निघाली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी २७ सप्टेंबर रोजी ही सर्व मंडळी कृष्णातीरी पोहचली. तिथे त्यांनी यथाविधि स्नान व पितृतर्पण वगैरे केले, त्यांना पाणी गुडघ्यापर्यंत लागले व उतारवाट मिळाली म्हणून ते नदीपार झाले.[२] राजाराम महाराज शत्रूच्या मुलूखातून चालले होते. त्यावेळी मुघलांना राजाराम महाराजांचा पाठलाग करण्याचे हुकूम मिळाले म्हणून मुघल सरदार राजाराम महाराजांस पकडण्याच्या इच्छेने त्यांच्या सर्व वाटा रोखून धरल्या. महाराष्ट्रीय सरदार जे राजाराम महाराजांबरोबर होते ते मुघल सरदारांवर चालून गेले पण त्यांची संख्या कमी असल्यामुळे मुघलांशी झगडण्यात आपला टिकाव लागणार नाही हे त्यांच्या लक्षात आले, तसेच ज्या घोड्यांवरून ते प्रवास करीत होते तीही वहाने थकून गेल्याचे त्यांना जाणवले. तेव्हा त्यापैकी रूपसिंह भोसले व संताजी जगताप ह्या दोघांनी राजाराम महाराजांस संरक्षणाचे कडे घातले. मुघलांच्या हे लक्षात आल्यावर त्यांनी रूपसिंह व संताजी जगताप यांजवर चाल केली. त्या दोघांचे मुघलांशी तुंबळ युद्ध झाले, ते सर्व लोकांनी व राजाराम महाराजांनीही पाहिले.[३] तदनंतर महाराजांनी मोगलांचा समाचार घेण्यासाठी संताजी जगतापला मागे ठेविले. बरोबर रूपसिंहाला घेतले व पुढे चालले. गांव, गवळीवाडे, दुर्गखेडी, चांडाळ गृहे मागे टाकीत राजे तुंगभद्रेच्या तीरावर पोचले. मुघल सैन्य पाठलाग करीत असल्याचे ह्या मराठी पथकाच्या लक्षात आले, तेव्हा बहिर्जी याने रामराजास खांद्यावर घेतले व त्याने तुंगभद्रेचे पात्र पार केले. यावेळी राजाराम महाराजांबरोबर सुमारे तीनशे लोक असावेत व ते सर्व अश्वारूढ असावेत. त्यांच्या अस्तित्वाची चाहूल मुघलांना हुबळी आणि बंकासूर या दरम्यान हे लोक प्रवास करीत असता लागली असावी. लक्ष्मेश्वराजवळ रूपाजी भोसले याने सय्यद अब्दुला खानास जखमी केले. त्याप्रसंगी रूपाजी आदी ७० असामी मुघलांनी

१ पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, १०१-१०२.

२ बेंद्रे, संपादित जिंजीचा प्रवास, पृ. ४.

३ कित्ता.

पकडले. तुंगभद्रेजवळ सुभान गड येथे मुघलांनी त्यास पुन्हा वेढले. त्या वेढ्यातून बहिरजी घोरपडे (संताजीचा धाकटा भाऊ) याने राजाराम महाराजांस खांद्यावर उचलून घेऊन सुरक्षितपणे पार नेले.[१] पण पुढे बहिरजी आणखी १०० इसम पकडले गेले. त्या सर्वांस बादशहाने विजापूरच्या किल्ल्यात कैदेत ठेविले. तेथून बहिरजीसह २० असामी निसटले व पुढे पळून गेले. तेव्हा बाकीच्या ८० चा बादशहाने शिरच्छेद केला.[२] यापुढे सर्वांनी एकत्र प्रवास करणे धोक्याचे समजून काहींनी यात्रेकरूंचा वेष घेतला, काही भिकारी बनले, काहींनी बैराग्याचा वेष घेतला काहींनी व्यापाऱ्यांचा वेष घेतला. काही तसेच तेथे गुप्तपणे राहिले. राजाराम महाराज वाट चालत असता लोकांबरोबर संभाषण करीत असता, घोडे किंवा रत्ने विकत घेत असताही, कासीमखानाच्या गुप्तपणे फिरणाऱ्या हेरांनी राजाला व बहिरजीला ओळखले नाही. यावेळी राजाराम महाराज बहिरजीसह बेदनूर राज्यात राणीच्या आश्रयास गेले. मुघलांना हे समजताच बेदनूरच्या राणीस शासन करण्यासाठी मुघल सेनानी जाननीसारखान पुढे सरसावला. तेव्हा राणीने मुघलांस खंडणी देऊन राजाराम महाराजांस पळविले व प्रकरण मिटविले. बेदनूरहून राजाराम महाराज अंबूर येथे मराठ्यांच्या कर्नाटकात आले. तेथील अधिकारी बाजी काकडे यास बहिर्जीने बहुधा वेरोळास जाऊन सर्व वृत्तांत कळविला व त्यास राजाराम महाराजांस भेटविले. अंबूर हे मजबूत ठिकाण आहे. येथे बाजी काकडे यांनी राजाराम महाराजांचे स्वागत केले. राजाराम महाराज व साथी यांना वेलोर येथे पोहचविले. प्रवासात अनेक ठिकाणी जिवावरची संकटे आली, त्याची रसभरीत वर्णने बखरींत वाचावयास मिळतात पण यांतील सर्व वर्णने निराधार व कल्पित आहेत असे रियासतकार सरदेसाई व बेंद्रे आदी संशोधक सांगतात.[३]

मार्टीन डायरीची नोव्हेंबर, १६८९ ची नोंद सांगते की राजाराम महाराज योग्याचा वेष घेऊन चार ब्राह्मण सरदारांसह वेलोर येथे दाखल झाले. मुघलांनी ओळखू नये म्हणून त्यांनी वेष पालटले होते. वेलोरच्या अधिकाऱ्यांनी त्यांस ओळखून ठाण्यात घेतले. हरजी महाडीकच्या पत्नीने (शिवाजी महाराजांची कन्या) काही वेळा खळखळ केली कारण वेषात असलेल्या मराठ्यांना तिने ओळखले नसावे, शिवाय मोगल

१ कित्ता, सर्ग ५.

२ सरकार जदुनाथ, हिस्टरी ऑफ औरंगजेब, भाग ५, पृ. ४८२.

३ बेंद्रे, छत्रपती राजाराम महाराज, पृ. ६९९.

राजारामाचा पाठलाग करीत होते व त्यांची धाड आपल्यावर येईल ह्या भीतीने तिने ठाणे त्यांच्या हवाली केले, आपला धनसंचय राजाराम महाराजांस दिला. जिंजीच्या अधिकाऱ्यांनी आणि लष्कराने राजाराम महाराजांची हुकूमत मानली. जिंजीस मराठी राज्याचा कारभार चालू लागला.[१] या ठिकाणी शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय येतो (Strategic depth) कारण शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहीम घेऊन जिंजीस मराठी सत्ता स्थापिली. शिवाजी महाराजांनी गोवळकोंडे सुलतानाच्या साहाय्याने कर्नाटकात इ. स. १६७७त स्वारी केली. त्यांनी जिंजीचा अजिंक्य किल्ला घेऊन, ती मराठा सत्तेची कर्नाटकातील राजधानी केली. शिवाजी महाराजांनी ह्या वेळी जिंजी व वेलोर ह्या दोन बळकट किल्ल्यांच्या आसपासचा बावीस लाख होन उत्पन्नाचा मुलूख काबीज केला व त्याच्या बंदोबस्तासाठी पुष्कळ पायदळ व घोडदळ ठेवून दिले. त्यांनी १४ मोठे किल्ले व ७२ मजबूत टेकड्या काबीज केल्या. कर्नाटकांतील बहुतेक सधन लोकांकडून अपार द्रव्य घेतले. महाराजांनी कर्नाटकांत जिंकलेल्या किल्ल्यांची डागडुजी व जिंकलेल्या प्रांतांचा बंदोबस्त रघुनाथ नारायण हणमंते यांनी केला म्हणून शिवाजी महाराजांनी त्यास २६ सप्टेंबर १६७७ या दसऱ्याच्या मुहूर्तावर दख्खनची मजमू व जिंजी प्रांताचा सरसुभा असे महत्त्वाचे अधिकार सोपविले. हणमंते यांनी कर्नाटक प्रांताचा बंदोबस्त चांगला ठेवून त्यांत आणखी भर घातली. पण संभाजी महाराजांविरुद्ध जे कट रायगडला शिजले त्यांत हणमंते यांचे अंग आहे असे संभाजी महाराजांस कळून आले तेव्हा त्यास कैद करवून त्या प्रांताचा कारभार हरजीराजे महाडीक या आपल्या मेहुण्याकडे सोपविला. त्याच्या मदतीस जैताजी काटकर आणि दादाजी काकडे ह्या दोन मराठे सरदारांना जिंजीस पाठवून दिले. हरजीने आपला जम कर्नाटकात चांगला बसविला होता. संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत कर्नाटकातील म्हैसूर, मदुरा, रामनाड, त्रिचनापल्ली एक्केरी इत्यादी पाळेगारांची छोटी-छोटी राज्ये होती. त्यांचेवर संभाजी महाराजांनी दबाव आणून त्यांना हरजीच्या आज्ञेत वागण्याची आज्ञा केली होती. इ. स. १६८२ त हरजीराजाने त्रिचनापल्ली म्हैसूरच्या लढ्यांत त्रिचनापल्लीच्या राजाची बाजू घेतल्यामुळे त्रिचनापल्ली राजाचा जय झाला. ह्या विजयाने हरजी राजे महाडीक पूर्व कर्नाटकाचे सर्वसत्ताधीश झाले. कर्नाटकात १६८६ नंतर हरजी महाडीकला मोगलांविरुद्ध लढा द्यावा लागला, त्याच्या मदतीस संभाजी महाराजांनी केशव त्रिमल व संताजी घोरपडे यांना फेब्रुवारी

१ मार्टीन डायरी, नोव्हेंबर १६८९, बेंद्रे, कित्ता, पृ. ६८.

१६८७त १२,००० सैन्य देऊन रवाना केले. इ. स. १६८८ अखेरपर्यंत मराठा-मुघल संघर्ष चालू होता. हरजी महाडीक निर्धाराने मुघलांशी लढत होते, ते आजारी होऊन सप्टेंबर १६८९ अखेर निवर्तले.[१]

राजाराम महाराज जिंजीस १५ नोव्हेंबर १६८९ ला पोचले.[२] मागाहून त्यांजबरोबर प्रवास करणारी मंडळी हलके-हलके येऊन त्यांस मिळाली. प्रल्हाद निराजी व खंडोबल्लाळ यांनी जिवाची बाजी करून, राजाराम महाराज व त्याजबरोबरचा लवाजमा जिंजीस आणला. जिंजी येथे राजधानी जमली सर्व लोक सावधतेने राहू लागले. थोडी स्थिरस्थावर होताच मराठ्यांचे राज्य कायम आहे ह्याची जाणीव सर्वत्र होण्यासाठी राजाराम महाराजांनी अष्ट प्रधानांच्या नेमणुका करून राज्याचा व्यवस्थित कारभार चालू केला. स्वतः छत्रपतीपद व राजचिन्हे धारण केली. राज्याभिषेक समारंभ मुद्दाम करविला नाही.[३]

अष्टप्रधानांच्या नेमणुका :

राजाराम महाराजांनी निळो मोरेश्वर पिंगळे यास पेशवा नेमले. कृष्णाजी अनंत सभासद यास या पेशव्याचा मुतालिक नेमले. रामचंद्रपंत निळकंठ बावडेकर यास सचिव नेमले. वरील पदांशिवाय प्रल्हाद निराजी हा गोवळकोंडा दरबारी शूर मुत्सद्दी होता. त्यास प्रतिनिधी असे नवीन पद दिले. कारण राजाराम महाराजांस जिंजीस आणून तेथे राज्य थाटण्याचे काम त्यांनी केले. म्हणून महाराजांनी त्यास सर्वांवर हुकूमत चालविण्याचे पद बहाल केले. संताजी घोरपडे यांस सेनापती पद दिले. महाराजांचे जावई हरजी महाडीक यांनी जिंजी प्रांती बहुत द्रव्य जमा केले होते. जिंजी प्रांत हा सुवर्णाचा मुलूख असे समजत. हा द्रव्य खजिना राजाराम महाराजांच्या हाती आला. जिंजीस गेल्यावर राणी राजसबाई हीस मुलगा झाला (इ. स. १६९३) त्याचे नांव महाराजांनी आपल्या थोरल्या बंधूचे " संभाजीराजे " असे ठेविले.[४]

राजाराम महाराज जिंजीस राज्य करू लागल्यावर त्याजकडे महाराष्ट्रातून भोसले, पवार, पांढरे, बंडगार, कोकाटे महार्णव, कड्, वाघमोडे, ढमढेरे, थोरात वगैरे सरदारांनी जाऊन आपणास सरंजाम चौथाई देशमुखीचा वसूल करण्याचा अधिकार द्यावा, किताब

१ मार्टिन डायरी, ऑक्टोबर १६८९.

२ राजवाडे, खंड १५ ले. ३४७, खोबरेकर, तारीके-दिलकशा, पृ. १७०.

३ सरकार जदुनाथ, हिस्टरी ऑफ औरंगजेब, भाग ५, पृ. ५०.

४ बेंद्रे, छत्रपती राजाराम, पृ. ७४.

देऊन सनदा द्याव्या म्हणजे त्या प्रांती जाऊन अंमल बसवतो असे सांगू लागले. म्हणून त्यांस किताब व सरंजामच्या सनदा देऊन रवाना केले.[१]

यावेळी वतनासाठी काही मराठे किल्लेदारांनी आपले किल्ले भराभर मुघलांच्या स्वाधीन केले. माने, खोपडे, जगदाळे इत्यादी वतनदार मुघलांस मिळाले. जावळीचे वतनदार दरेकर, मालुसरे व नऱ्हेकर ज्यांना शिवाजी महाराजांनी वाढविले, अधिकार प्राप्त करून दिले तेही मुघलांस मिळाले.[२] औरंगजेबास आता कृतार्थ झाल्यासारखे वाटले. पण एका गोष्टीची त्याला चिंता वाटू लागली. ती म्हणजे राजारामाचे जिंजीला वास्तव्य हे होय.

औरंगजेबाने विजापूर व गोवळकोंडा ही राज्ये खालसा केली या राज्यातील सैन्याचा नाश केला. त्या राज्यातील सुभेदारांस मुघलांच्या सेवेत घेऊन नेमणुका दिल्या. मराठ्यांच्या बाबतीत त्यांच्या राजास संभाजी महाराजांस पकडून मारीले. रायगड राजधानीचा विध्वंस केला. प्रतापगड, सिंहगड, राजगड, तोरणा, रोहिडा, लोहगड, पुरंदर ह्या किल्ल्यांवर मुघलांनी ताबा मिळविला. पण मराठ्यांच्या सैन्यावर औरंजेबास आपली हुकूमत बसविता आली नाही. मराठा सैन्य मुक्त राहिले.

संभाजी महाराजांच्या वधाने काही मराठे सरदारांस मुघल सत्तेचा वीट येऊन ते हिंदवी स्वराज्य रक्षणासाठी मुघलांबरोबर झगडण्यास तयार झाले. रूपाजी भोसले व संताजी जगताप हे पूर्वीपासून धारवाड बेळगांव भागात सैन्यासह फिरत होते. शिवाजी शिर्के, नामाजी आपदेव लांडे, शिवाजी कवडे, खंडेराव दाभाडे, सिवाजी दाभाडे, हणमंत घोरपडे, नागोजी पाटणकर, धनाजी जाधव आदी फौजबंद मराठे सरदार राजाराम महाराजांतर्फे रामचंद्र पंडीत सचिव यांच्या आज्ञेवरून ठिकठिकाणच्या मुघल सैन्याशी मुकाबला करीत त्यांचा समाचार घेत होते, पाडाव करीत होते व मराठी राज्य जिवंत आहे हे मुघल सैन्यावर वरचढ हल्ला करून व त्यांचा पराभव करून दाखवून देत होते. आपल्या पराक्रमाची कैफियत जिंजीस राजाराम महाराजांकडे जाऊन मांडीत होते व महाराजांकडून शाबासकी व वतने मिळवीत होते. याबद्दलची पुष्कळ उदाहरणे 'रेकॉर्डस् ऑन शिवाजी पिरियड' या ग्रंथात वाचावयास मिळतात.[३]

---


१ बेंद्रे, छत्रपती राजाराम, पृ. ७३.

२ शि. च. साहित्य, खंड ५, पृ. ७९.

३ खोबरेकर, रेकॉर्डस् ऑफ द शिवाजी पिरियड, पृ. १७४-७५.

मद्रास येथील इंग्रज व्यापारी राजाराम जिंजीस येण्याचे कारण लिहितात " राजाराम महाराज जिंजीस जाण्याचा हेतू, स्वराज्यांतून मोगल सैन्य बाहेर खेचणे, मद्रास प्रांतातील हिंदू सरदारांची संघटना घडवून आणणे आणि सैन्य जमवून विजापूर व गोवळकोंडा ही राज्ये परत जिंकून घेणे.[१] " ह्याला प्रल्हाद निराजीच्या खालील वाक्याने पुष्टी मिळते, (" सत्वर कर्नाटकास जावे आणि निरलसपणे स्वराज्य रक्षणाचा प्रयत्न करावा.") राणी येसूबाईचा सल्ला असा " शत्रूचे प्राबल्य विशेष. त्याअर्थी चंदीचंदावर प्रांती दम खाऊन पुन्हा मसलत बळवून राज्य साधनही करणे पडेल ते करावे " ह्यावरून मराठ्यांच्या लष्करी धोरणाचा उलगडा होतो.[२]

□□



जिंजी किल्ला

१ सरकार, औरंगजेब, खंड ५, पृ. ६३.

२ पगडी, सेतु माधवराव, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. ११३.

४३. राजाराम महाराज जिंजीस असता महाराष्ट्रात स्वराज्य राखण्यासाठी मराठ्यांनी केलेला स्वातंत्र्य संग्राम (१६९० ते १६९५)

औरंगजेब बादशहा इ. स. १६८१ त दक्षिणेत आला. त्याचा हेतू मराठ्यांचे राज्य जिंकून घ्यावे किंवा त्या राज्यास मांडलिक बनवावे. तसे झाल्यावर महाराष्ट्रात जे हिंदू लोक आहेत त्यास मुसलमान करावे हा आपला हेतू सिद्धीस नेण्यासाठी त्याने मराठी राज्यावर चहूकडून हल्ला चढविला. औरंगजेबाने हिंदवी स्वराज्यातील बहुतेक गडकोट केव्हा झगडून तर बऱ्याच वेळा गडकऱ्यांना लाच देऊन, वश करून ताब्यात घेतले. मराठा सरदारांना वतनाची आमिषे दाखवून त्यांना फोडण्याचा प्रयत्न केला. छत्रपती संभाजी महाराजांस फितुरीने पकडून त्यांचा वध केला. राणी येसूबाई व बाल शिवाजीस कैद करून आपल्यापाशी ठेविले. अशा रीतीने महाराष्ट्र राज्य उद्ध्वस्त झाले असे औरंगजेबास वाटले म्हणून त्याने मराठ्यांची उरलीसुरली सत्ता नाहीशी करण्याकरिता व छत्रपती राजाराम महाराजांस हुसकावून लावण्यासाठी फौजबंद हालचाली केल्या. संभाजी महाराजांचा निर्घृण वध, रायगड राजधानीचा कबजा, राणी येसूबाई व बाळ शिवाजी याचा कैदेत निवास ह्या अंतःकरण हेलावणाऱ्या घटनांची बातमी सर्व मराठी जनतेत पसरली. त्यांचे म्होरके मराठे सरदार यांनाही जाग आली. शिवाजी-संभाजी कालात स्थानिक प्रजेने स्वातंत्र्याची फळे चाखली होती. त्यांना मोगलांच्या परवशतेचा पाश नको होता. शिवकालात त्यांना जी शिकवण मिळाली तिच्या जोरावर त्यांनी मोगलांशी लढा दिला. त्या लढ्यात त्यांनी वतनदार, जमीनदार, लढवय्ये सरदार यांनाही सामील करून घेतले. तेही मोगलांविरुद्ध पेटून उठले आणि महाराष्ट्र राज्याचे रक्षण करण्याकरिता मोगलांशी लढले. हा लढा त्यांनी कसा दिला आणि यशसिद्धी खेचून आणली हे आता पाहावयाचे आहे.

औरंगजेबाचे फौजेत उत्तरेकडील राजपूत व दक्षिणेतील मराठे यांचाच मुख्य भरणा होता. म्हणजे हिंदूच्या साहाय्याने तो मोगल बादशाही राखीत होता. त्या सर्वांस स्वधर्मात आणून प्रत्यक्ष दिल्ली काबीज करून हिंदवी स्वराज्य निर्माण करण्याची छत्रपती शिवाजी

महाराजांच्या वेळची सुखस्वप्ने ह्या संकटसमयी मराठ्यांनी उराशी बाळगली होती हे राजाराम महाराजांनी हणमंतराव घोरपडेस दिनांक ४ जून १६९१ ला लिहिलेल्या पत्रावरून समजते. त्यात ते म्हणतात की, " तुम्हास ६ लक्ष होन द्यावयाचा निश्चय केला आहे. पैकी (१) रायगड प्रांत (२) विजापूर (३) भागानगर व औरंगाबाद काबीज केल्यावर दर कामगिरीस पाऊण लाखप्रमाणे एकंदर तीन लाख आणि बाकीचे तीन लाख प्रत्यक्ष दिल्ली घेतल्यावर द्यावयाचे असा निश्चय केला आहे.[१] " ह्या वेळेपर्यंत मराठ्यांचे नीतिधैर्य खचले होते व किल्ले हवाली करण्याखेरीज गत्यंतर नाही अशीच मराठा किल्लेदारांची समजूत झाली होती. अशा वेळी संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव या दोन सेनानीनी आपल्या भीम पराक्रमाने सामान्य मराठ्यांचे नीतिधैर्य उंचाविण्याचा महान प्रयत्न केला. मोगलांना दहशत बसविण्यासाठी याचवेळी संताजी घोरपडे यांनी प्रत्यक्ष बादशहाच्या छावणीवर छापा घालून बादशहाच्या तंबूचे कळस कापून आणले हे दुसऱ्या प्रकरणात सांगितले आहे. तिकडे धनाजी जाधव यांनी फलटणचे मैदानात पादशहाचे फौजेबरोबर आमने-सामने लढाया पाच वेळा उभे राहून दिल्या. मोगल सरदार शाहिस्तेखान व रणमस्तखान यांच्या पाच तोफा पाडाव केल्या. नामोहरम जाले. जाधवराव यांनी तोफा घेऊन आपल्या सैन्यासह पन्हाळ्यास येऊन पोचले. त्यांना महाराजांनी बहुमान वस्त्रे-भूषणे देऊन जयसिंगराव हा किताब दिला. पातशहा यांनी मनात विस्मय केला की, " मराठी फौज बुडाली म्हणत होतो. परंतु कायम दिसती[२]." यानंतर राजाराम महाराज आपल्या कर्तबगार व विश्वासू सेवकांसह जिंजीस गेले. राजाराम महाराज जिंजीस जाऊन पोहोचताच तिकडे मराठ्यांना मोठे बळ प्राप्त झाले. राजाराम महाराजांच्या जिंजीप्रयाणामागे तीन हेतू होते. पहिला स्वराज्यातील भयंकर परिस्थितीतून निघून सुरक्षित स्थळ गाठण्याचा, स्वराज्यात गुंतलेली मोगल सैन्ये दक्षिणेकडे ओढण्याचा आणि तिसरा म्हणजे जिंजीला नवी सैन्ये तयार करून स्वराज्यात पाठविण्याचा.

तामिळनाडूकडे जाणाऱ्या मराठी सैन्यास अडवून धरणे आणि तामिळनाडूमधील मोगल सेनापतींना मदत करणे ह्या दुहेरी हेतूने औरंगजेबाने विजापूरजवळ असलेल्या कृष्णाकाठच्या गलगली या स्थळी आपली छावणी कायम केली. तेथे तो इ. स. १६९५ च्या मार्च महिन्यापर्यंत होता. औरंगजेबाचे हे स्थलांतर मराठ्यांना अतिशय उपकारक ठरले. औरंगजेब व झुल्फिकारखान हे दोघे स्वराज्याच्या बाहेर गेले त्यामुळे

---

१ शि. च. सा. खंड ५, ले. ६.

२ मल्हार रामराव कृत, थो. राजाराम म. चरित्र, साने (सं), पृ. २९.

मराठ्यांना आपल्या गनिमीकाव्याची युद्धे करण्यास अवसर मिळाला. या संधीचा त्यांनी पुरेपूर फायदा घेतला.

सुदैवाने स्वराज्यास यावेळी अगदी योग्य नेते लाभले होते. या नेत्यानीच स्वातंत्र्य लढा जिंकला, स्वराज्याचा इतिहास घडविला असे म्हणावयास हरकत नाही. रामचंद्रपंतांनी मराठे सरदारांसाठी आपले पत्रात धोरण व्यक्त केले ते असे " पोख्तीच्या जमावे स्वार शिकारी करून जे गड गनिमीने घेतले ते फिरवून हस्तगत करणे. गनिमांची ठाणी जागो-जाग असतील ते कुल मारून काढणे [१] " औरंगाबादला सुभ्याचे ठिकाण होते. तिथून दक्षिणेकडे जाणारी रसद मारून काढणे, लहान-सहान लष्करी ठाणी गारद करणे आणि एके ठिकाणी स्वतःला कोंडून न घेता सारखी धामधूम चालू ठेवणे हे उद्देश मराठ्यांनी यावेळी आपल्या समोर ठेवले होते.

मराठ्यांच्या या हालचालीस सुरुवात नोव्हेंबर १६८९ पासूनच झाली. मुख्य प्रेरक शक्ती रामचंद्रपंतांची होती.

रामचंद्रपंतांनी दोन दिशांनी मराठी सैन्ये मोगलांवर पाठविली. त्यावेळी कोल्हापूर भागात मुघल सेनानी मुकर्रबखान वावरत होता. त्याच्याविरुद्ध संताजी घोरपडेना रवाना केले आणि दुसरे दक्षिण कोकणांतील मोगल ठाणी उधळून लावण्याकरिता शंकराजी नारायण यास पाठविले. संताजी घोरपडे हा मुकर्रबखानावर चालून गेला. कोल्हापूरजवळ मोगलांचे आणि मराठ्यांचे तुंबळ युद्ध दोन घटका चालले. संताजी घोरपडे यांनी मुकर्रबखानाचा प्रथम पराभव केला व नंतर त्याचे हत्ती, घोडे पुष्कळ द्रव्य हरण केले. तेव्हा जखमा अंगावर पेलून जीव वाचविण्यासाठी पर्वताच्या पायथ्याशी वसलेल्या करवीरास गेला.[२] ह्याचवेळी मराठा सरदार शंकराजी नारायण सचिव यांनी दक्षिण कोकणांत घुसलेल्या मोगलांना काढून लाविले. मोगली ठाणे संगमेश्वरी होते त्यास व सर्जाखान साताऱ्यास वेढा घालून होता त्यास मारून काढले. त्याप्रमाणे पंत सचिव जमावानिशी स्वार होऊन साताऱ्यास सर्जाखानवर लष्करानिशी चालून गेले. तेथे युद्ध करून सर्जाखानाचा कबिलादेखील पाडाव केला.[३]

---

१ पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. ११४.

२ कित्ता, पृ. ११५-११६.

३ मावजी व पारसनीस, सनदा पत्रांतील माहिती, पृ. १६७.

इ. स. १६९० मध्ये मराठ्यांनी स्वराज्यातील मोगली ठाणी उधळून लावणे, किल्ले हस्तगत करणे आणि मोगल सैन्यावर हल्ले चढविणे हे प्रकार यशस्वीपणे सुरू केले. मराठी राजमंडळाच्या लक्षात आले की काही वतनदार मंडळी आपल्या वतनासाठी म्हणून नाइलाजाने का होईना मोगलांशी सहकार्य करीत होती. त्यांची वतने कायम ठेवून नवीन वतने देण्याचे आश्वासन मराठी राजमंडळाने वतनदारांना आपल्याकडे ओढून त्यांस राष्ट्रकार्यास लावण्यासाठी दिले. या प्रयत्नास इ. स. १६९० पासून यश येऊ लागले.

मोगलांनी मराठ्यांस कौल देऊन हिंदवी स्वराज्यापासून तोडण्याचे प्रयत्न केले. राजा व राजधानी महाराष्ट्रातून गेल्याने जनतेचा व कार्यकर्ते लोकांचा धीर खचला. त्यामुळे मोगलांना मराठा अधिकाऱ्यांस व वतनदारांस फोडून आपल्या चाकरीत ओढण्यास बरेच यश आले. परंतु ज्यांना परधर्मीय व परकीय अंमलाचा वीट आला होता त्यांनी आपली सामाजिक व धार्मिक व्यवहारात येणारी संकटे व गुलामगिरी टाळण्याकरिता जिंजीस जाऊन राजाराम महाराजांकडे आपला मनोदय सांगितला. इ. स. १६९० मध्ये जेध्यांनी आपल्या प्रयत्नाने रोहिडा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आणला व प्रदेश शत्रुमुक्त केला. हे राजाराम महाराजांस सांगून जेधे महाराजांस म्हणाले की, " पुढे जमाव करून गडकोट देश गनिमांकडून घेतो. परंतु स्वामीनी कृपाळू होऊन पूर्वीप्रमाणे आमचे वतन आम्हास चालविण्यास द्यावे." यास महाराजांनी तत्काळ मान्यता देऊन सनदाही ताबडतोब करून दिल्या.[१] तसेच लोकांस उत्तेजन देण्यासाठी इनामे, जहागिरी, बक्षिसे वगैरे सढळ हाताने देण्याचा राजाराम महाराजांनी परिपाठ सुरू केला. अशा इनामातील बराच मुलूख मोगलांच्या ताब्यात होता. त्यामुळे सनद मिळालेली जहागीर आपल्या कब्जात घेण्याकरिता जो तो मोगलांचे मुलुखात शिरू लागला हे कळताच राजाराम महाराजांनी सांगितले की, " तुम्हास साधेल त्या रीतीने मोगलांकडून आपला देश काबीज करा आणि महाराष्ट्र राज्याची सेवा करा." (मल्हाररामरावकृत थोरले राजाराम यांचे चरित्र, पृ. ३५) म्हणून ह्या वतनदार मंडळींना कार्य करण्यास पूर्ण स्वातंत्र्य मिळाले. ह्या कृतीमुळे राजाराम महाराजांची कीर्ती पसरली. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल लोकांस अभिमान वाटू लागला. लोकांस पूर्वीच्या धारेप्रमाणे सरंजाम गाव लावून दिले. जे जे गेले त्यांस त्यांची पूर्वीची पदे ज्यांची त्यांच्याकडे ठेऊन ज्यांची जशी योग्यता त्यांस तसे वाढवून दिले.[२] रामचंद्रपंतानीही वतनदारांना खालीलप्रमाणे आश्वासन दिले.

---

१ राजवाडे, खं. ५, ले. ३४८.

२ कित्ता, ले. ३४७ व ३४८, सरदेसाई, राजाराम रियासत, पृ. ४९.

" जो कोणी वतनदार एक निष्ठा धरून येईल, गडकोट हस्तगत करून देईल त्यास इसाफती व वतन भाग चालिला असेल तेणे प्रमाणे दुमाला करून लिहून पाठविणे. सनद सादर होईल तेणेप्रमाणे मजुरा असे[१] " यामुळे मुलूख मोगलांकडून घेण्यात येऊ लागला. जी मंडळी वतनदार वगैरे मोगलांस मिळाली होती. त्यांनाही आपला मुलूख आपल्या ताब्यात येणार याची खात्री वाटू लागताच तेही मोगली लष्कर सोडून स्वराज्यात येऊन मिळू लागले. त्यामुळे मोगलांची बाजू अधिकाअधिक दुर्बल होऊ लागली. यामुळे बादशहाच्या मनोराज्याला लोकांच्या व्यक्तिगत प्रचाराने व कर्तृत्वाने फार मोठा धक्का बसला व तो रंजिस आला. इ. स. १६९० च्या सुरुवातीपासूनच रामचंद्रपंत, संताजी, धनाजी आणि शंकराजी हे सैन्य घेऊन मोगलांवर तुटून पडू लागले होते. रामचंद्रपंत वैशाखात (मे महिन्यात) वाईस गेले. वाईचा कोट रगडून घेतला प्रतापगड आदी करून किल्ले हस्तगत केले.[२]

बादशहाला कळविण्यात आले की, वाईचा ठाणेदार खिदमत तलबखान याच्यावर मराठ्यांनी हल्ला केला. लढाई निकराची झाली. मोगलांनी शर्थीची लढाई केली. शेवटी मराठ्यांचा जय होऊन ते खिदमत तलबखान यास कैद करून घेऊन गेले.[३] यावेळी सुदैवाने महाराष्ट्रास संताजी घोरपडे सेनापती म्हणून लाभला. इ. स. १६८९ मध्ये मोगलांनी इतके किल्ले घेतले होते की ते अजिंक्य आहेत अशीच भावना काही काळ मराठ्यांत पसरली होती. सेनापती संताजीने मोगलांचे पराजयावर पराजय करून आणि तेही उघड्या मैदानात, मराठ्यांमध्ये प्रचंड आत्मविश्वास निर्माण केला. ही त्यांची सर्वांत स्पृहणीय कामगिरी होय. त्यांच्या या वेळच्या देदीप्यमान कामगिरीचा तपशील पाहू.

सर्जाखानावर प्रचंड विजय : खानास कैद

इ. स. १६९० च्या सुरुवातीस सातारा किल्ला जिंकून घेण्यासाठी मोगल सरदार सर्जाखान त्यास वेढा देऊन बसला होता. किल्ला मराठ्यांच्या ताब्यात होता. किल्ल्यात हंबीरराव मोहिते (दुसरा) पाच हजार शिबंदीसह होता. सर्जाखान हा पूर्वी आदिलशाही दरबारातील मोठा पराक्रमी सेनानी होता. आदिलशाही वाचविण्याचा त्याने मोठ्या जिद्दीचा प्रयत्न केला होता. शेवटी आदिलशाहीचा अस्त झाल्यावर तो मोगल बादशाहीचा नोकर बनला. सातारा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात असलेला बादशहास पहावले नाही. त्याने सर्जाखान ऊर्फ रुस्तुमखान या सरदारास मोठ्या फौजेनिशी सातारा किल्ला काबीज

१ राजवाडे, खं. १५, पृ. ३७६.

२ राजवाडे, खं. १७ ले. २०.

३ पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. ११९.

करण्यासाठी पाठविले होते. त्यावर स्वारी काढून त्याला शासन करण्याची मोहीम रामचंद्रपंत, शंकराजी नारायण, संताजी आणि धनाजी या चौघांनी आखली. त्याप्रमाणे मराठी सैन्य साताऱ्याच्या प्रदेशात आले. लवकरच सर्जाखानाशी मराठ्यांनी गनिमीकाव्याची लढाई दिली. लढाई ऐन रंगात आली असता हत्तीवर बसलेल्या सर्जाखानाच्या अंगावरील कपड्यांनी अचानक पेट घेतला. त्यास बंदुकांच्या गोळ्या घालून तो बेशुद्धावस्थेत आपल्या हत्तीवरून खाली जमिनीवर पडला. त्यास मराठ्यांनी पकडून आपल्या फौजेत नेले. सर्जाखानाचा मुलगा गालीबखान याने आपल्या सैन्यासह मराठ्यांवर हल्ला केला. तोही जबर जखमी होऊन मैदानात पडला. हे होत असता साताऱ्याचा किल्लेदार हंबीरराव हा पाच हजार स्वार आणि पायदळ घेऊन किल्ल्यातून बाहेर पडला. त्याने मोगलांच्या फौजेवर हल्ला केला आणि सर्जाखानची आई, बायको व मुलगी यांना पकडून सातारा किल्ल्यावर नेले.[१] सर्जाखानाने मराठ्यांना एक लाख होन देऊन आपल्या बायका-मुलींची सुटका करून घेतली. बादशहास हे समजल्यावर त्याने सातारा किल्ला जिंकून घेण्यासाठी गाजीउद्दीनखान बहादूर व दिलेरखान या दोन सरदारांची नेमणूक केली.[२] सातारच्या परिसरात सर्जाखानावर हा विजय मिळविल्यावर मराठी फौजा ह्या चार सेनानींच्या अधिपत्याखाली वाईवर घसरल्या. वाईचा कोट घेऊन तेथील मोगल ठाणेदार खिदमतखान यास त्यांनी कैद केले. लवकरच प्रतापगडावर हल्ला करून मराठ्यांनी तोही काबीज केला. यानंतर अल्पावकाशात मराठ्यांनी विजयामागून विजय प्राप्त केले. रोहिडा, राजगड, तोरणा इत्यादी लष्कराच्या दृष्टीने महत्त्वाचे किल्ले त्यांनी जिंकून घेतले आणि त्यांच्या परिसरांतील सह्याद्रीचा पर्वत प्रदेश त्यांनी पुन्हा आपल्या ताब्यात आणला.[३]

खटाव परिसरातील गनिमी लढाया :

मराठ्यांच्या या विजयामुळे त्यांचा दरारा पुन्हा प्रस्थापित होऊ लागला. सातारच्या पूर्वेस दहा-बारा मैलांवर असणाऱ्या खटाव परिसरातील वर्धनगड किल्ल्याच्या पायथ्याशी मराठ्यांची एक फौज छावणी करून होती हे ऐकून खटावचा ठाणेदार सिद्दीहिलालखान याने पळ काढला. तेव्हा मराठ्यांनी पुढे होऊन ते ठाणे काबीज केले. इतक्यात मराठ्यांस समजले की मोगल सरदार मरहमतखान खटावसाठी कुमक घेऊन औंधपर्यंत आला

---

१ फुत्तुहाते आलमगिरी-मोगल मराठा संघर्ष, पृ. ४१-४२.

ज. सरकार, औरंगजेब भा. ५ पृ. २८.

२ फुत्तुहाते आलमगिरी-मोगल मराठा संघर्ष, पृ. ४२-४३.

३ राजवाडे, खं. १५ ले. ३, पृ. १६ (मसूरचा महादजी जगदाळे याची कैफियत)

आहे. त्याचा समाचार घेण्यासाठी मराठी सैन्याने खटावहून कूच केले. मराठ्यांना चकवून तो दुसऱ्याच मार्गाने खटावकडे येऊन डागडुजी करून बंदोबस्ताने राहू लागला. मराठ्यांनी ह्या स्थळास वेढा दिला. ठाण्याबाहेर पडण्याचे धाडस खानाने न केल्यामुळे मराठे वेढा उठवून दुसरीकडे निघून गेले. खटाव परिसरात मराठी फौजांचा जोर होता आणि मोगलांनी प्रतिष्ठा गमावली होती. ती प्रतिष्ठा पुन्हा मिळविण्यासाठी व मराठ्यांना धडा शिकविण्यासाठी बादशहाने रणमस्तखान ह्या नामांकित सरदारास खटावकडे पाठविला. तो तिथे बारा दिवस राहिला आणि लवकरच बादशाही हुकुमाप्रमाणे तो मसूरकडे रवाना झाला. खान मसूरकडे निघून जाताच मराठे वर्धनगडावरून खाली उतरले आणि खटाव परिसरात जाळ-पोळ, लुटालूट करण्याचा उद्योग वीस दिवस केला. परिणामी, खटावचा परिसर पूर्णपणे ओसाड व निर्मनुष्य बनला. इतक्यात बादशहाने खटावचा ठाणेदार म्हणून मामूरखान यास पाठविले. तो मोठ्या बंदोबस्ताने खटावास येऊन राहू लागला.[१] खटाव परिसरातील मराठ्यांची आक्रमणे थोपविण्यासाठी बादशहाने आपल्याकडील पराक्रमी सरदार झुल्फिकारखान यास पाठविले होते. त्याने खटावच्या वाटेवर कसबे पिलीव येथे मुक्काम केल्यावर मराठ्यांनी त्यावर हल्ला करून त्यांच्या सैन्यास चोहोकडून कोंडले. युद्धाला सुरुवात होऊन लढाई संध्याकाळपर्यंत चालली. त्यात मराठ्यांकडील माणसे मेली व त्यांचा पराभव आपल्या सैन्याने केला असे लुत्फुल्लाखान म्हणतो.[२]

मावळात (१६९०)

जेध्यांच्या प्रयत्नाने मराठ्यांनी रोहिडा किल्ला मोगलांकडून जिंकून घेतला. याचवर्षी त्यांनी तोरणा घेतला. तसेच प्रचंडगडही घेतला तेव्हा कान्होजी जेधे यास राजारामानी पत्र लिहून त्यांच्या ह्या पराक्रमाबद्दल कौतुक करण्यात आले व राजगड, सिंहगड हस्तगत झाले पाहिजेत याचे स्मरण करून दिले.[३]

मराठे राजगड घेतात (१६९०)

राजगड जून १६८९ च्या सुमारास मोगलांच्या ताब्यात आल्यावर औरंगजेबाने या किल्ल्यावर अबुल्खैरखान याची नेमणूक केली होती. मराठ्यांचे बळ वाढू लागले. त्यांनी आपल्या बळाचे प्रदर्शन करून अबुल्खैरखानाला किल्ला खाली करून देण्यास

---

१ भा. इ. सं. मंडळ, त्रैमासिक वर्ष ८, अंक ३, पृ. १५६ सरकार, औरंगजेब, भा.५, पृ. २९. लुत्फुल्लाची पत्रे मोगल-मराठा संघर्ष, पृ. ११४-११५.

२ सरकार, औरंगजेब, भा. ५, पृ. २९.

३ राजवाडे, खं. १६ ले. २७, पृ. ४३.

सांगितले. तेव्हा त्याने घाबरून मराठ्यांकडे आपले व बायका-मुलांचे जीवदान मागितले. रात्रीच्यावेळी तो जडजवाहीर घेऊन बायका-मुलांसह किल्ल्याबाहेर आला. त्यास मराठ्यांनी पूर्णपणे लुबाडले. अशा परिस्थितीत तो मध्यरात्रीच्या सुमारास फिरोजजंगच्या छावणीत पोहोचला. त्याला आपल्या नादानपणाचा पश्चात्ताप होऊन तो दु:ख करू लागला. बादशहाला हे कळताच त्याने त्याला बडतर्फ करून जबरदस्तीने मक्केच्या यात्रेस पाठविले.[१]

रामचंद्रपंत, संताजी आणि धनाजी यांसारख्या जिद्दीच्या मंडळींनी राजाराम महाराजांचा पक्ष उचलून धरला. त्यामुळे मोडलेले स्वराज्य सावरू लागले. मराठ्यांनी १६८९ मध्ये गेलेली ठाणी आणि किल्ले परत जिंकून घेतली.[२] मोगल फौजा पराभूत होऊ लागल्या. स्वराज्य नष्ट न होता पुन्हा जोमाने वाढत आहे हे लक्षात येताच मोगलांना मिळालेले सरदार वतनदार आता स्वगृही परतू लागले. राजाराम महाराजांनीही त्यांच्या पूर्वीच्या अपराधाकडे दुर्लक्ष करून त्यांना स्वराज्य रक्षणाच्या कामात जुंपले. यावेळी मोगलांना सोडून स्वराज्यात येण्याची एकच लाट निर्माण झाली होती. या लाटेचाच एक भाग म्हणजे जिंजीच्या समोर प्रत्यक्ष झुल्फिकारखानाच्या फौजेत मोर्चे बांधून बसलेले नेमाजी शिंदे, मालकोजी पांढरे व नागोजी माने हे तीन पराक्रमी मराठे सरदार मोगलांना पारखे होऊन जिंजीत राजाराम महाराजांच्या पायाशी रुजू झाले.[३] (नोव्हेंबर १६९०) स्वराज्यांत येत असता या सरदारांना त्यांची पूर्वीची वतने तर परत दिली गेलीच, शिवाय काही नवी वतने, इनामे जहागीर अशीही बक्षिसे राजाराम महाराजांनी बहाल केली. ११ एप्रिल १६९१ रोजी नागोजी मान्यास राजाराम महाराजांनी सरदेशमुखाच्या वतनाची सनद दिली. त्यात महाराज म्हणतात, " तुम्ही पूर्वी तांब्रांकडे (मोगलांकडे) होते. ऐसियास स्वामीचे राज्य म्हणजे देवताभूमी. या राज्यास तांब्रांचा उपद्रव न व्हावा, मराठा धर्म रहावा, स्वामीच्या राज्यांची अभिवृद्धी व्हावी या उद्देशाने स्वामींच्या पायापाशी एकनिष्ठा धरून कर्नाटकांत चंदीचे मुक्कामी स्वामीपाशी आले. तिथे येऊन विनंती केली की आपणांस देशात सरदेशमुखीचे वतन करून दिले पाहिजे तेवी तपशील त्यापुढे १२ महालांची नावे दिली आहेत. ऐसियासी तुम्ही स्वामी सेवेवरील एकचित्त वर्तीत आहात म्हणून स्वामी तुम्हांवर कृपाळू होऊन नूतनवतन सरदेशमुखींचे बारा महालांचे करून दिले आहे."[४] नागोजी मानेचा पिता रतनोजी माने हा पराक्रमी व राजकारणी होता.

१ खाफीखानाचा साधन ग्रंथ-मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध पृ. २३.

२ मल्हार रामरावकृत थो. राजाराम महाराज चरित्र, पृ. ५३-५४.

३ शिवचरित्र प्रदीप, पृ. ३५-३६.

४ रेकॉर्डस् ऑफ शिवाजी पिरियड, पृ. १४४.

हा १६८५त मोगलांस मिळाला. बादशहाने त्यास म्हसवड परगण्यात १३ लक्ष ५० हजार दामांची जहागीर दिली. तसेच त्यास म्हसवडची ठाणेदारीही दिली होती.[१] इ.स. १६९० च्या सुरवातीस हणमंतराव निंबाळकर, सटवोजी निंबाळकर व इतर काही सरदार मोगलांकडून पारखे होऊन महाराष्ट्र राज्यात चाकरीस आले.[२] २४ सप्टेंबर १६९० रोजी कसबा नांदगज, परगणे कडेकळींत हा मराठ्यांनी लुटला व एक लक्ष रुपयांची लूट घेतली.[३] इ. स. १६९१ च्या एप्रिलमध्ये झुल्फिकारखानाच्या सैन्यांत दुष्काळ पडला. मराठ्यांनी मोगलांची रसद तोडली. भीम सक्सेना म्हणतो " झुल्फिकारखानाबरोबर असलेले अनेक दखनी मनसबदार त्याला सोडून राजारामाला मिळाले."[४]

यावेळचे प्रमुख राष्ट्र चालक (१) रामचंद्रपंत (२) शंकराजी नारायण (३) परशुराम त्रिंबक (४) संताजी घोरपडे (५) धनाजी जाधव (६) खंडोबल्लाळ चिटणीस हे होते. यानाच पुढे हणमंतराव निंबाळकर आणि नेमाजी शिंदे हे सहकारी लाभले. इ.स. १६८९ चे साल मराठ्यांना अत्यंत निराशेचे गेले. पण एक वर्षाच्या आत सर्व परिस्थिती पालटली. रामचंद्रपंत, शंकराजी नारायण, संताजी आणि धनाजी या चौघांनी सर्जाखानाचा पराभव करून मावळातील किल्ले बादशहाने घेतले होते ते एकेक परत आणिले.[५]

रामचंद्रपंत अमात्य :

हा शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झालेला मुत्सद्दी, अनेकांची मर्जी सांभाळून त्यास कार्यप्रवण करणारा दूरदर्शी व शांतवृत्तीचा होता. शत्रूचा पाडाव करून शिवाजी महाराजांचे राज्य कायम राखणे एवढेच त्याचे ध्येय होते. रामचंद्रपंतांनी राज्याचे हद्गत सांगणारा ' राजनीती ' हा ग्रंथ लिहिला.

रामचंद्रपंतांइतकी उज्ज्वल व्यक्ती इतिहासांत बहुधा दुसरी मिळणार नाही, असे सरदेसाई सांगतात.[६] तथापि इतिहास संशोधक वा. सी. बेंद्रे यांचे मत निराळे आहे. ते असे की संभाजी महाराजांविरुद्ध कट करण्यात रामचंद्रपंत अमात्य आणि प्रल्हाद निराजी हे प्रमुख होते. तसेच राजाराम महाराजांनी त्यांच्यावर महाराष्ट्रातील राज्यभागावर सर्वाधिकार सोपविले होते. परंतु रायगडला मदत न केल्यामुळे आणि पन्हाळाही आपण विशालगडास स्वस्थ राहून मोगलास घेऊ दिल्यामुळे, हिंदवी स्वराज्यवादी सरदार व

१ कित्ता, पृ. १३७.

२ बेंद्रे, छत्रपती राजाराम चरित्र, पृ. २६६.

३ कित्ता.

४ तारिखे दिलकशा, पृ. १७३.

५ सरदेसाई, राजाराम रियासत, पृ. ३२.

६ कित्ता, पृ. ३३.

देशमुख यांचा रामचंद्रावरील विश्वास उडाला. त्यांनी आपली हिंदवी स्वराज्य राखण्याची इच्छा रामचंद्रपंतांस न सांगता थेट जिंजीला जाऊन ते राजाराम महाराजांकडे सांगू लागले.[१] बेंद्रे पुढे म्हणतात की रामचंद्रपंताने सुरवातीस केवळ धनाजी जाधवांवरील द्वेषामुळे कारवाई केली. त्याची फळे हिंदवी स्वराज्याला भोगावी लागली आणि राजाराम महाराजांना बिन लढ्याने चंदी झुल्फिकारखानाच्या ताब्यात द्यावी लागली व चंदीचे राज्यही मोगलांकडे गेले.

बेंद्रे पुढे म्हणतात की रामचंद्रपंत पुढे फारच दूषित झाला. हिंदवी स्वराज्याची घडण देशी भाषेवर व स्वदेशी संस्कार संस्कृतीवर आधारली जावी आणि प्रजेत स्वदेशाभिमान जास्त निर्माण व्हावा म्हणून शिवाजी महाराजांनी आपल्या पत्रव्यवहारात विशिष्ट प्रथा घालून दिल्या होत्या. त्या संभाजी महाराजांनी व्यवस्थितपणे पाळल्या होत्या. परंतु रामचंद्रपंतांनी त्या प्रथांना तिलांजली दिली. त्यांनी आपल्या पत्रव्यवहारात शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्या कारकीर्दीबाबतचा आपला द्वेष अधिक प्रज्वलित केला. रामचंद्रपंत आपल्या राजपत्रांवर राज्याभिषेक शक न देता हिजरीसन व तारखा देऊ लागले. सरदार सेनापतीस ज्या पदव्या द्यावयाच्या त्या संस्कृत किंवा मराठी भाषेने व्यक्त करण्याऐवजी फारशी भाषेत देण्याचे चालू केले. राजाराम महाराजांच्या खास पत्रव्यवहारांत ह्या नवीन प्रथांचा पुरस्कार केला. त्यांना एकच तोडगा माहीत होता तो म्हणजे राजारामांस कैद करून आपल्या अंकित ठेवणे, परंतु तोही जुल्फिकारखानाच्या विचारसरणींमुळे राजाराम महाराजांस जाऊ दिल्यामुळे साधता आला नाही.

शंकराजी नारायण :

रामचंद्रपंत अमात्याचा जोडीदार शंकराजी नारायण होय. तो मोठा व हरतऱ्हेने कार्य सिद्धीस नेणारा होता. शंकराजीने मावळी फौज जमवून मोगलांचा उच्छेद करून अल्पावकाशांत मावळातील किल्ले बादशहाच्या कब्जातून परत घेतले. जून १६९० च्या पहिल्या आठवड्यात शंकराजी नारायण स्वारी करून वाईस आला. वाईचा किल्ला व प्रतापगड जिंकले आणि महादजी सामराज यास त्या प्रांताचा सुभा म्हणून नेमणूक केली.[२] त्यानंतर लगेच प्रचंडगड किल्ला मराठ्यांचे ताब्यात आला. राजगड, सिंहगड याविषयी खटपट होईल ते करीत आहोत व हे किल्ले जिंकण्याचा प्रयत्न चालू आहे

---

१ बेंद्रे, राजाराम महाराज चरित्र, पृ. २६३.

२ राजवाडे, खं. १६, पृ. २७.

असे त्याने जिंजीस कळविले.[१] तसेच देशमुख, देशकुलकर्णी, खासनीस, मुतालीक, चौगुले वगैरे वतनदारांस हक्काची रोख रक्कम ठरवून शिवाजी महाराजांनी वतने खालसा केली होती ती पुन्हा दिल्याशिवाय पोटतिडीक लागत नाही व मुलूख आबाद होत नाही हे नजरेस आल्यावरून शंकराजी नारायण व रामचंद्रपंत यांनी सर्व वतनदारांची वतने पूर्वीच्या मालकांच्या स्वाधीन केली. हा प्रकार शंकराजीनेच प्रथम घडवून आणला हे राजवाड्यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रांवरून दिसते. शंकराजीने राजगड, प्रतापगड, तोरणा हे किल्ले ऑक्टोबर १६९० त मोगलांकडून घेतले. पुरंदर किल्लाही घेतला. शंकराजीची ही कामगिरी रामचंद्रपंताने राजाराम महाराजांकडे जिंजीस लिहून पाठविली. शेख निजामाने संगमेश्वरी ठाणे घेतले व सर्जाखान साताऱ्यास वेढा घालून बैसला त्यांशी युद्ध प्रसंग करून शंकराजीनी गनिमांचे पारिपत्य केले.[२] राजाराम महाराजांनी ह्या कामगिरीबद्दल शंकराजीस सचिव पद केले आणि रायगडापासून कोकणपट्टी त्याचे स्वाधीन केली. रामचंद्रपंतांस मुअज्जमचा कार्यभाग सांगितला. त्यांच्या स्वाधीन कऱ्हाडपासून वर घाट-पावेतोची कामगिरी सोपविली. लष्कर दुतर्फा वाटून दिले. धनाजी जाधव यांनी शंकराजी नारायणाकडे असावे, संताजी घोरपडे यांनी रामचंद्रपंतांकडे असावे असे ठरविले.[३] अशा रीतीने मावळ आणि कोकण या प्रदेशाचा कारभार सर्वस्वी रामचंद्रपंत आणि शंकराजी नारायण यांनी ठरविला.

परशुराम त्रिंबक :

तिसरा राष्ट्र चालक परशुराम त्रिंबक हा प्रतिनिधी घराण्याचा संस्थापक, हा प्रथम मजमू (जमाखर्चाचे दस्त ऐवज ठेवण्याचे काम) म्हणून रामचंद्रपंत अमात्याकडे होता नंतर त्याची नेमणूक मुतालिकपदी झाली.[४] नंतर तो युद्ध संग्रामांत भाग घेऊन पराक्रम गाजवू लागला आणि किल्ल्याचा बंदोबस्त ठेवून त्याने लोकांचे ठिकाणी स्वराज्याभिमान उत्पन्न करून मिरजपासून रांगण्यापर्यंतचा प्रदेश मोगलांचे ताब्यातून सोडविला. पावनगड व पन्हाळा राजाराम महाराज जिंजीस जाताच बादशहाने १६८९ च्या अखेरीस हस्तगत केले. परशुरामपंताने चिकाटीने सारखे दोन वर्ष खपून १६९२ च्या जून महिन्यात परत काबीज केला. (जे. श.) पुढील पाच वर्ष पन्हाळा मोगलाईत येण्यासाठी बादशहाने जंग जंग पछाडले पण परशुराम त्रिंबकने तो हातचा जाऊ दिला नाही.

---

१ राजवाडे, खं. १७-२०, २१.

२ स. प., पृ. १६७.

३ ऐ. सं. साहित्य ले. ७६.

४ राजवाडे, खं. १५-२१.

संताजी घोरपडे :

भोसले व घोरपडे ही दोन्ही घराणी उदयपूर येथील एकाच सिसोदिया वंशापासून उगम पावली. पिते म्हाळोजी (मालोजी) घोरपडे हे शिवाजी महाराजांच्या सेवेतील एक निष्ठावंत व शूर सेनानी होते. संभाजीराजांस पन्हाळगडी ठेविले होते. त्यावेळी युवराजांवर नजर ठेवण्याचे मोठ्या जोखमीचे व नाजूक काम शिवाजी महाराजांनी म्हाळोजीवर सोपविले होते. संपूर्ण संभाजी-काळात म्हाळोजी घोरपडे हे पन्हाळगडावरील सरनौबत म्हणूनच काम पहात होते.[१] संगमेश्वरी मोगल सैन्याने टाकलेल्या छाप्यात संभाजी महाराज पकडले गेले त्याप्रसंगी मोगल सैन्याशी जी लढाई झाली, तिच्यात म्हाळोजी स्वामी कार्यावर खर्ची पडले.[२]

संभाजी महाराजांच्या वधानंतरच्या संकट काळात संताजीने स्वराज्याचे रक्षण करून औरंगजेबास दहशत कशी लावली याचे वर्णन रामचंद्रपंत अमात्य यांनी मिरज प्रांताच्या मराठा सुभेदारास लिहिलेल्या पत्रात केले आहे. " राजश्री संताजी बिन म्हाळोजी घोरपडे सेनापती लष्कर यासी राजश्री छत्रपती स्वामी कर्नाटकात जाते समयीं या प्रांते (महाराष्ट्रात) ठेऊन गेले होते. त्या समयीं इकडे गनिमाची धामधूम होऊन कुल देश व दुर्ग हस्तगत केली होती. राज्यामध्ये कांही अर्थ उरला नव्हता. कुल मऱ्हाटे याही इनामास खता करून गनिमाकडे गेले. याही (संताजीने) राजश्रीच्या पायासी बहुतच एकनिष्ठा धरून इनामास खता न करीता जमाव करून शेख निजाम व सर्जाखान व रणमस्तखान व जानसारखान येसे उमदे वजीर बुडविले. जागा-जागा गनिमास कोटगा घालून नेस्तानाबूद केले आणि देश सोडविला. राज्य रक्षणतेच्या प्रसंगास असाधारण श्रम केले. औरंगजेबास दहशत लावली."[३] (दिनांक ९ जुलै १६९२)

धनाजी जाधव :

धनाजी जाधव हा सिंदखेडकर लखुजी जाधवाचा वंश. यांचा जन्म १६५० च्या सुमारास झाला. मोठा झाल्यावर तो प्रतापराव गुजराचे हाताखाली काम करू लागला. उंबराणी व नेसरी येथील लढायांत धनाजीचा पराक्रम शिवाजी महाराजांच्या नजरेस विशेष आला. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर त्याचा पराक्रम झळकू लागला. राजाराम महाराज जिंजीस गेल्यावर धनाजीने अजोड पराक्रम करून बादशाही फौजांवर विजय मिळविले म्हणून राजाराम महाराजांनी त्यास जयसिंहराव किताब दिला.[४]

---

१ कापशीकर, सेनापती घोरपडे घराण्याचा इतिहास, पृ. २७.

२ पवार जयसिंग, सेनापती संताजी घोरपडे, पृ. १२.

३ कित्ता, पृ. १८७.

४ शिवचरित्र प्रदीप, पृ. ३७.

खंडोबल्लाळ :

खंडोबल्लाळ चिटणीसांची गणना त्यावेळच्या प्रमुख पुढाऱ्यात व निष्ठावंत सेवकांत अवश्य केली पाहिजे. संभाजी महाराजांच्या वधानंतर तो राजाराम महाराजांबरोबर जिंजीस असताना महाराजांसाठी अनेक संकटे व प्राणांतिक हालअपेष्टा त्यास सहन कराव्या लागल्या. राजाराम महाराजांची आपल्यावर पूर्ण कृपा आहे हे पाहून विनंती केल्यावर दाभोळ प्रांतीची सरदेशमुखी वतन वंश परंपरा करून दिले. हे त्याने आपले वतन गणोजी शिर्क्यास देऊन त्याचे मार्फत राजाराम महाराजांची सुटका जिंजीतून करविली.

मोगलांना सोडून मराठे सरदार राजाराम महाराजांकडे येऊ लागले. त्यापैकी शिवाजी कवडे यास संताजी घोरपडे याच्या सांगण्यावरून महाराजांनी खटाव तालुक्यातील मौजे दरुज येथील जमीन त्यास इनाम दिली. राजाराम महाराजांस आंताजी नामदेव यांचे पुत्र नामाजी आपदेव व बंधू आंताजी नामदेव व यादव नामदेव उपनाव लांडे देशपांडे कुलकर्ण कर्यात मावळ हे जिंजी येथे भेटले व महाराजांस विनंती केली की आम्ही सेवा करीत आहोत पण ह्या वृत्तीस इनाम गाव नाही म्हणून महाराजांनी कृपाळू होऊन एकगांव किर्कटवाडी इनाम दिला.[१] त्याचप्रमाणे गणेश निळकंठ यास मौजे गराडे येथे इनाम दिले तर शंकराजी राम अत्रे यास मौजे कोढीत येथील जमीन राजाराम महाराजांनी हे लोक जिंजीस गेल्यावर दिलेली दिसते.[२] अशाप्रकारे राजाराम महाराजांनी तुको त्रिमल पुरंदरे यास मौजे सुपे येथील जमीन इनाम दिली. नरसिंह भट जोशी यांच्याकडील पांडवेश्वर येथील इनाम जमीन पूर्ववत चालू केली. नरसी भट यांस मालसिरस येथे नैवेद्य नंदादीपाबद्दल हणमंतराव बिन कृष्णाजी घोरपडे देशमुख यास सातारा प्रांत परली येथील देशमुखीचे वतन अशाप्रकारे राजाराम महाराजांनी इनामांची खैरात केल्याचे मजकूर सापडतात.[३] इ. स. १६९२ मध्ये मराठे महत्त्वाचे किल्ले मोगलांकडून सर करून घेण्याच्या उद्योगास लागले. खुद्द राजधानी रायगडावर हल्ला करून ती काबीज करण्याचा एक धाडसी प्रयत्न शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झालेल्या आबाजी सोनदेव या मराठा सेनानीने केल्याचे कागदपत्रांत नमूद आहे.[४] पण या प्रयत्नांत मराठ्यांना यश आले नाही तथापि अपयशाने मराठे खचून गेले नाहीत. राजाराम महाराज पन्हाळगडी

१ शिवचरीत्र प्रदीप, पृ. ३२.
२ कित्ता, पृ. ३३-३४.
३ कित्ता, पत्रे अनु. ३५ पृ. ४०.
४ कित्ता, पत्र क्र. ४३, ४४.

असता त्यांस पकडण्यासाठी मोगलांनी पन्हाळ्यास वेढा दिला व राजाराम महाराज निसटल्यावर काबीज केला. तदनंतर १६९२ च्या मध्यास परशुरामपंत प्रतिनिधी यांनी पन्हाळगडावर एका रात्री छापा घालून तो किल्ला काबीज केला. एक दणदणीत विजय संपादन केला. मराठे कोणाला चाहूल लागू न देता गुप्तपणे शिड्या लावून तट चढले. आणि किल्लेदारांच्या मुसक्या बांधून तो किल्ला ताब्यात घेतला.[१] पन्हाळा हातचा गेलेला पाहून बादशहास धक्का बसला. पन्हाळा ताब्यात राहणे म्हणजे दक्षिण महाराष्ट्र ताब्यात असणे, असे त्यावेळचे राजकीय व लष्करी गणित होते.

बादशहाने शहाजादा मुअज्जमचा मुलगा शहाजादा मुइजुद्दीन याला नोव्हेंबर, १६९२ त पन्हाळगडाविरुद्ध रवाना केले. शहाजादा मुइजुद्दीन याने पन्हाळ्याला वेढा घातला. पण किल्ला जिंकून घेण्याचे त्याला जमेना. ऑक्टोबर १६९३ मध्ये रामचंद्रपंत, शंकराजी आणि धनाजी जाधव हे पन्हाळगडाला मदत करण्यासाठी चालून आले. २० ऑक्टोबरपासून चकमकी सुरू होऊन त्या काही दिवस चालू राहिल्या. मराठ्यांनी किल्ल्यात रसद आणि कुमक पोहचविली. याच वर्षी बारामतीचा, मोगलांतर्फे असलेला ठाणेदार हणमंतराव निंबाळकर हा मराठ्यांना येऊन मिळाला. इ. स. १७०४ मध्ये याचा मृत्यू होईपर्यंत याने मोगलांस सळो की पळो करून सोडले. इ. स. १६९४ त पन्हाळगडचा वेढा मोगलांकडून चालूच होता. औरंगजेबाने ७ मार्च १६९४ रोजी पन्हाळ्याकरिता मोगलांना आणखी ६ हजार सैन्याची कुमक पाठविली. पण ती पोचण्यापूर्वीच शहाजादा मुइजुद्दीन हा पन्हाळा सोडून ८ मार्च १६९४ रोजी निघाला होता. हे समजल्याबरोबर बादशहाने शहाजादा आज्जमचा मुलगा बेदारबख्त, यास पन्हाळ्याच्या वेढ्यासाठी पाठविले. तरीही मोगलांस पन्हाळा किल्ला काबीज करणे जमले नाही. म्हणून औरंगजेब बादशहाने पन्हाळ्याचा मराठा किल्लेदार परशुराम त्रिंबक यास ३१ ऑक्टोबर १६९९त पत्र लिहिले, " किल्ला हवाली केल्यास आमच्याकडून मोठी मनसब मिळेल न ऐकिल्यास तुम्हास व तुमच्या कुटुंबांतील लहानथोर बायकामुलांस पकडून ठार मारण्यात येईल." ह्या पत्रास किल्लेदार त्रिंबक याने भीक घातली नाही. पन्हाळ्याला घातलेला मोगल वेढा चालूच राहिला. तो चालू असता धनाजीने बाहेरून मोगलांचा अतिशय उच्छेद केला. ता. २१ जानेवारी १७०१ रोजी धनाजीची व समस्त मोगल फौजेची पन्हाळ्याचे जवळ मोठी लढाई झाली. तशाच आणखी लढाया वारंवार चालूच होत्या. शेवटी २८ मे १७०१ रोजी बादशहाने तर्बियत खानातर्फे किल्लेदारास

१ शिवचरित्र प्रदीप, पृ. ३६.

द्रव्य ५५ हजार रुपये देऊन किल्ला आपलासा केला. पन्हाळगड पुढे सन १७०५ साली मराठ्यांकडे आला. त्यानंतर ताराबाई व शिवाजी यांचे वास्तव्य तिथे झाले.

याच सुमारास मराठ्यांचे सेनानी संताजी आणि धनाजी हे बेळगाव धारवाड या कर्नाटकाच्या सीमेवर धुमाकूळ घालीत होते. प्रथम त्यांनी बेळगावच्या परिसरातील किल्ले आणि ठाणी जिंकून घेतली. उभ्या पिकांत लष्कराची घोडी घालून त्यांची नासधूस केली. एवढेच नव्हे तर त्यांनी बेळगावच्या किल्ल्यास वेढा दिला. तदनंतर विचार बदलून ह्या दोघां मराठा सेनानीनी धारवाड किल्ल्यास वेढा दिला.[१] मराठ्यांनी स्वातंत्र्ययुद्धात शेकडो लढाया मोगलांशी दिल्या त्याची माहिती अखबारातून मिळते. २७ ऑक्टोबर १६९२ चे बातमीपत्र म्हणते. " हरकाऱ्यांच्या तोंडून बातमी आली की, धनाजी जाधव एवं धनाजी आजामनगर बेळगांव भागांतून बाहेर पडले ते धारवाडला पोचले असून त्यांनी धारवाडच्या किल्यास वेढा दिला आहे."[२] याच दिवशीच्या बातमी पत्रात नमूद करण्यात आले की, बीड जिल्ह्यातील चौसाला भागाचा रक्षक मतलब खान हा मराठ्यांचा मोड करण्यासाठी धारूरकडे गेला होता. तेथे मराठ्यांशी युद्ध झाले.[३]

१८ डिसेंबरला बादशहास समजले की, धनाजी जाधव हा जिंजीच्या अलीकडे राजारामाच्या फौजेत पोहोचला आहे व संताजी हा कोपळहून निघाला व जिंजीकडे रवाना झाला आहे.[४]

रामचंद्रपंत अमात्य यांनी आपला गुमास्ता देशमुख मलंग गौडा यास पाठवून त्याजकडे चौथाईची मागणी केली. चौथाई न दिल्यास सैन्य पाठवून तुमची खेडी बेचिराख करू अशी धमकी दिली. त्यावर देशमुखाने एक पालखी व चार घोडे रामचंद्रपंताकडे पन्हाळगडावर पाठविले. त्यानंतर पंताकडून काही हालचाल झाली नाही.

राष्ट्र कार्यांत झीज सोसणाऱ्यांचा पुरस्कार करण्यात मराठा मंडळ सदैव जागरूक असे. त्यांनी जुनी वतने कायम केली, नवीन वतने दिली, इनाम जमिनी दिल्या, मोगलांच्या अनुकरणाने पंच हजारी, सप्त हजारीसारख्या पंचसहस्री, सप्तसहस्री अशा

१ मोगल दरबारची बातमीपत्रे, पृ. ८-९.

२ कित्ता, पृ. ९.

३ हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. १४०.

४ तारिखे दिलकशा, पृ. १८६.

मनसबी दिल्या. सरंजाम दिले, रणांगणांवर कामास आलेल्यांच्या कुटुंबांचे संरक्षण केले. सारांश कोणी दिलगीर राहू नये सर्वांनी या आणीबाणीच्या प्रसंगी राष्ट्रकार्यांत भाग घ्यावा याबद्दल राजाराम महाराज व त्यांचे मंत्री सदैव झटत असत.

मराठे सिंहगड घेतात (१ जुलै, १६९३) :

तामिळनाडूमध्ये मोगलांची दुर्दशा चालू असता इकडे स्वराज्यात मराठ्यांनी मोगलांकडून सिंहगड जिंकून घेतला. त्याचे श्रेय नावजी बलकवडे यास आहे. सिंहगड गनिमापासून जिंकून घेण्याचा विचार शंकराजी नारायण सचिव याने केला. किल्ला हस्तगत करण्यात पंच हजारी सरदार नावजी बलकवडे तयार झाला. त्याच्या मदतीस विठोजी कारके गेला. नावजी बलकवडे यांनी सांगितले की किल्ला हस्तगत झाल्यावर मौजे सावरगाव तालुके पौन मावळ हा गाव आपणास इनाम दिला पाहिजे. त्याप्रमाणे गाव इनाम द्यावयाचे ठरले. त्यानंतर विठोजी कारके यांनी तटासी शिडी लावली. नावजीने एकचित्ते शर्तीने शिड्यांवरी चढून पहारा चोपून सात रोजी (१ जुलै १६९३) किल्ला हस्तगत केला तेव्हा त्यास मौजे सावरगांव नूतन इनाम दिला.[१]

ऑक्टोबर १६९३ मध्ये धनाजी, रामचंद्रपंत आणि शंकराजी यांनी पन्हाळगडाला कुमक पोहचविली. याचवर्षी बारामतीचा, मोगलातर्फे असलेला ठाणेदार हणमंतराव निंबाळकर हा मराठ्यांना येऊन मिळाला. त्याने मोगलांना सळो की पळो करून सोडले. यावेळी मोगलांना जिंजीस रसद पोचविणे मोठ्या मुष्कीलीचे होऊन बसले. असे असता मराठ्यांनी सहा हजार बैल घेऊन पन्हाळगडावर रसद पोचविण्याच्या उद्देशाने निघाले त्यावर मोगल सैन्याने हल्ला करून त्यांचा मोड केला. ओझ्याचे बैल पकडण्यात आले. या सुमारास मराठ्यांच्या सैन्याची तीन हजाराची तुकडी महादेवाच्या डोंगरातून चालून आली पुन्हा लढाई झाली. मुहमद अस्करी, अली मुराद आणि इतर अधिकारी पराभव पाहून पळून गेले. मराठ्यांनी मोगलांची सुमारे पाचशे माणसे ठार मारली आणि ते धान्याची रसद सोडवून घेऊन गेले.[२]

मराठे यशाच्या शिखरावर :

मराठे यावेळी यशाच्या शिखरावर होते. राजाराम महाराजांनी जिंजीहून जाहीरनामा काढला होता की, (मद्रास, कर्नाटक) मधील मुलूख त्यांचा झाला असून केशव रामण्णा

---

१ शिवचारित्र साहित्य, खं. ५, पृ. १८८.

पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. १४७-४८.

२ मोगल दरबारची बातमीपत्रे, २५ एप्रिल १६९३.

हा मराठ्यांतर्फे त्यावर सुभेदार म्हणून नियुक्त केला आहे. तसेच ह्या सुभेदारास गोवळकोंडा कर्नाटकांतील सर्व प्रदेश ताब्यात घेण्याचा आदेश देण्यात आला आहे.[१]

संताजी महाराष्ट्रात :

१६९३ च्या जानेवारीत राजाराम महाराजांनी जुल्फिकार खानाशी सल्ला केला. महाराजांस १ लाख ६० हजार रुपये किमतीचे जडजवाहीर झुल्फिकारखानाने दिले. तेव्हा झुल्फिकारखान जिंजीचा वेढा उठवून वांदिवाशला गेला.[२] राजाराम महाराज व झुल्फिकार खान यांचेमध्ये झालेला व्यवहार मराठा सेनापती व लढणाऱ्या सरदारांना कळला तेव्हा ते राजाराम महाराजांवर रुष्ट झाले. संताजीने यावेळी चित्रनापल्लीस वेढा घातला होता. त्याने २३ एप्रिलला त्रिचनापल्लीकराशी सल्ला केला. नंतर तेही राजाराम महाराजाशी बिघाड करून देशास परत गेले.[३]

त्यावरी धनाजीस नामजाद केले. राजाराम महाराजांनी संताजीची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. संताजीस त्यांनी कळविले की, झुल्फिकारखानाचा व माझा गुप्त करार झाला आहे की बादशहा आता फार दिवस टिकत नाही. त्यांचे पश्चात गोवळकोंड्याचा प्रदेश जुल्फिरकारखानाने घ्यावा व विजापूरचा राजारामाने घ्यावा. राजाराम महाराजांनी संताजीस भेटून त्यास बक्षीस देऊन त्यास संतोषी केले. संताजी लगेच महाराष्ट्रात जाण्यास निघाला तेव्हा संताजीच्या जागी धनाजी जाधवराव यास नेमिले. संताजीकडे वीस हजार घोडदळ होते. ह्या फौजेनिशी तो महाराष्ट्रात १६९३ च्या दसऱ्याच्या सुमारास सातारा प्रदेशात आला. अमृतराव निंबाळकर हाही मराठ्यांना येऊन मिळाला होता. ऑक्टोबर १६९३ मध्ये त्याने भीमा ओलांडली आणि बादशाही मुलूखांत धामधूम करण्यास सुरुवात केली. हिंमतखानाने त्याचा पाठलाग केला. इतक्यात ठाणेदार रामदुल्लाखान याने त्यास लिहून पाठविले की संताजी हा शिवनिहालग भूपाळगड येथे गेला आहे म्हणून त्याने संताजीचा पाठलाग सुरू केला. संताजी मांडवगडला व त्याच्या पाठीवर हिंमतखान होता, दोघांची लढाई भूपाळ गडाजवळ झाली त्यात मराठ्यांनी माघार

१ हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. १४१-४२.

२ मोगल दरबारची बातमीपत्रे, दि. १४-१९ नोव्हेंबर १६९३, ८ मार्च, १६९४.

३ बेंद्रे, राजाराम, पृ. १८४.

घेतली. पुढे दोघांची गाठ विक्रम हल्ली येथे पडल्यावर युद्धास तोंड लागले तेव्हा संताजी निसटून मळखेड येथे १९ नोव्हेंबरला गेला. त्याचा पाठलाग हिंमतखान बहादूर, हमीदुद्दीन खान ख्वाजाखान यांनी केला. मोठी लढाई झाली असे मोगलांचे बातमीपत्र सांगते.

इ. स. १६९४ साल उजाडले तरी पन्हाळगडचा वेढा चालूच होता. पन्हाळ्यास मुइजुद्दीन वेढा घालून बसला असता मराठ्यांनी पन्हाळगडाचा वेढा मारून काढला. त्यात मराठ्यांच्या बाजूने काशी रंगनाथ बोर्डे ह्या मराठा सरदाराने तेथे स्वामीसेवा केली म्हणून त्यास राजाराम महाराजांकडून प्रांत मलकपूर येथील इनाम देण्यात आली.[१]

संताजीच्या हालचाली :

६ मार्च १६९४ रोजी संताजी आणि हिंतमखान यांची पुन्हा चकमक झाली. त्यानंतर थोड्याच दिवसांनी औरंगाबादेहून गलगली बादशाही छावणीकडे तोफा नेण्यात येत होत्या. संताजीने अडविण्याचा प्रयत्न केला. मोगल सरदार मतलबखान याने तो हाणून पाडला.[२]

मोगल तोरणा घेतात :

मोगलांनी मार्च १६९४ मध्ये पन्हाळगडचा वेढा उठविला पण गाझीउद्दीन फिरोजजंग यांच्या फौजांनी मावळांतील तोरणा किल्ला जिंकून घेतला त्यावेळी स्वामी कार्यार्थ जानो आबाजी प्रभू याचा बाप आबाजी विश्वनाथ युद्ध प्रसंगी पडले. त्याचे कुटुंबाचे चालवावे हे अगत्य जाणून त्यांनी सनद करून दिली.[३]

किल्ले कारीगड हाही मोगलांनी १६९४ च्या अखेरीस घेतला होता. शंकराजी नारायण सचिव याने वर्ष सहा महिन्यांच्या आतच मोगलांकडून तोरणा व कारीगड हस्तगत केले.[४] याची हकीकत जेधे शकावलीत आहे.

इ. स. १६९५ :

स्वराज्यात मोगलांच्या हालचालीना यश येण्याचे दिसेना. स्वराज्यातील प्रमुख असे बहुतेक किल्ले मराठ्यांच्या ताब्यात गेले होते. आता मराठे भीमापार होऊन बागलाण,

१ वेंद्रे, राजाराम, पृ. १८६.
२ मोगल दरबारची बातमीपत्रे, १८ मार्च, ६४.
३ इतिहास संग्रह, डिसेंबर १९०९, पा. २८.
४ हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. १५९.

खानदेश, वऱ्हाड या भागात संचार करू लागले. हे पाहून औरंगजेबाने मार्च १६९५ मध्ये आपली छावणी गलगली येथून हलविली आणि तो मे १६९५ मध्ये भीमातीरावर ब्रह्मपुरी (सोलापूर जिल्ह्यात) येथे येऊन दाखल झाला.[१]

राजाराम महाराजांनी समस्त मराठे सरदारांस आज्ञा केली की, त्यांनी मोगलाईत धामधूम करून पाळेगारीने मुलुख मारून, चौथ सरदेशमुखी घांसदाणा घेऊन अंमल बसवावा. स्वामींचे आज्ञेप्रमाणे बुवाजी पवार वगैरे सरदार चंदीहून देशी येऊन रामचंद्र अमात्य बावडेकरांशी मसलत करून मोगलाईत सर्वत्र धामधूम करू लागले. रामचंद्र पंत बावडेकर यांनी धनगरांचे भारी जमावाने किल्ले विशालगड, रांगणा, गगनगड, बावडा, वगैरे स्थाने, पाटणकरांनी पाटण खोऱ्यात राहून कऱ्हाड व वाई प्रांती जवामर्दीने स्वाऱ्या करून किल्ले कोट कबज करू लागले. सिदोजीराव निंबाळकर यांनी आटोले बरोबर गंगाखोऱ्यात, परसाजी भोसले यांनी देवगड चांदेपासून गोंडवणपावेतो, खंडेराव दाभाडे यांनी बागलाणपासून गुजरातपावेतो धुमाकूळ घातला. बुवाजी पवार यांनी भारी जमाव जमवून गंगथडीपासून खानदेश तापीतीर पावेतो मोगलांस तोंड दिले. रात्रंदिवस छापा घालून पाठलाग करून मोगलांचा पाडाव केला. त्यांचे डेरे लुटून हत्ती, घोडे व खजिना मालमत्ता घेऊन तापी तीरापर्यंत स्वराज्याचा अंमल बसविला. मोगल घाबरून किल्ल्यात शिरून बसले. इतक्यात बुवाजी पवार यास मोगलांनी भारी जमावाने दगा करून पकडून अशीर मुक्कामी घेऊन गेले. त्यास सांगितले की, तुम्ही बादशहाचे चाकरींत आलेत तर तुम्हास इतर मराठे सरदारांप्रमाणे खुदावंत भारी मानमरातब व मोठा सरंजाम देतील. बुवाजी पवार यांनी आवजी आधाल, रामचंद्र खटावकर, नागोजी माने, सटवाजी व बाजीराव डफळे, बहिरजी पांढरे, अमृतराव निंबाळकर, महादजी नारायण वगैरे मराठे सरदार व स्वामींचे आप्तवर्गीय अचलोजीराव व कान्होजी शिर्केप्रमाणे स्वामींची सेवा सोडून हरामखोरी करून बादशहाची मनसबदारी करणे बद्दल नकार दिला. उपरांत मोगलांनी बुवाजी पवार यास किल्ल्यांचे बुर्जात टाकून गोदाखोऱ्यापासून खानदेश तापीपर्यंत मुलूख कबजा केला.

" ......स्वामींनी (बुवाजी पवाराचा भाऊ) संभाजी पवार यास...... आज्ञा करून चंदीहून स्वदेशी भावाचा सूड घेणेबद्दल मोगलांचा पाडाव करावयास पाठविले....... चंदीहून निरोप घेऊन स्वदेशी येऊन पुतणे कालोजी व संभाजी यास बरोबर घेऊन भारी जमावाने

१ पगडी, मोगल दरबारची बातमीपत्रे, पृ. १०८.

चारपाच वर्षेपर्यंत रात्रंदिवस छापे घालोन लुटालूट व जाळपोळ करून गंगातीरापासून खानदेश तापीतीरापावेतो मोगलांचा पाडाव करून पल्लेगारीने मुलूख मारून चौथ सरदेशमुखी घासदाणा बळजबरीने घेऊन स्वामींचा अंमल बसविला....."[1]

□□



संताजी घोरपडे

१ राजवाडे, खं. १५ ले. २८३, पृ. २९०-२९१ व पृ. ३७८-३७९.

४४. छत्रपती राजाराम महाराज जिंजीस असता मराठे-मोगल यांचा कोकणातील संघर्ष

राजाराम महाराज छत्रपती झाले त्यावेळी मराठे राज्याची स्थिती अत्यंत बिकट होती. स्वराज्याच्या तत्कालीन परिस्थितीविषयी मनुचीने लिहून ठेवले आहे की, " संभाजी महाराजांच्या मृत्यूमुळे मराठ्यांचे स्वराज्य जिंकले जाऊन, जणू काही दक्षिणेच्या समुद्रापर्यंतचा हिंदुस्थानाचा संपूर्ण भूप्रदेश औरंगजेबाला प्राप्त होणार, औरंगजेब संपूर्ण हिंदुस्थानचे सार्वभौम सम्राटपद प्राप्त करणार अशीच समस्त मोगलांची जाणीव होती. परंतु ह्या दुर्दैवी राजाच्या (संभाजी महाराजांच्या) महत्पराक्रमी पित्याचे - शिवाजी महाराजांचे सैनिक ह्या काळापर्यंत मोगल सैन्याशी मुकाबला करण्यास तरबेज झाले होते. परकीय सत्तांशी लढण्याचा किंवा आपला पक्ष सोडून जाणाऱ्या फितुरांचा बंदोबस्त करण्याचा मराठे सैनिकांना चांगलाच सराव झालेला होता. मराठे सैनिकांनी मोगलाविरुद्ध शर्थीची झुंज देण्याचा ठाम निर्धार केला. त्यांनी मोगलांच्या हाती सापडून अत्यंत दुर्दैवी अवस्थेत मृत्यू झालेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या लहान भावाला राजारामाला आपला छत्रपती म्हणून राज्याभिषेक केला आणि त्याच्या नावे मोगलांशी झुंज चालू ठेवण्याचा निश्चय केला. अशा प्रकारे इ. स. १६८९ मध्ये मराठे-मोगलांचा संघर्ष नव्या जोमाने अधिकच प्रखरतेने सुरू झाला त्यामुळे सम्राट औरंगजेबावर आपल्या उत्तर हिंदुस्थानाच्या मूळ राज्यापासून दूर राहावे लागले आणि दखखनच्या मोहिमेदरम्यान जिंकलेले विजापूर, गोवळकोंडा हे प्रदेश शत्रूच्या हाती पुन्हा लागू नयेत म्हणून ते राखण्याकरता दख्खन-मध्येच छावणीत राहण्याचे औरंगजेबाने पसंत केले.[१]

अशावेळी ह्या परिस्थितीशी सामना करण्याकरता छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या जवळच्या अत्यंत विश्वासू, निष्ठावान आणि कर्तव्यतत्पर अशा माणसाची निवड केली. राज्यकारभार नीट चालवण्याकरता अत्यंत कार्यक्षम अशा मंत्र्यांचीही त्यांनी नियुक्ती केली. राजारामांनी निवड केलेल्या मंत्री गणांमध्ये रामचंद्रपंत निळकंठ, व पानसंबळ यांना सेनापती म्हणून नियुक्त करण्यात आले होते. जिंजीला सुखरूपपणे पोहोचल्यानंतर राजाराम महाराजांनी महाराष्ट्राची (मराठी राज्याची) दोन भागात विभागणी केली. कऱ्हाड, तळकोकण आणि गोकर्ण हा मराठी राज्याचा दक्षिण भाग त्यांनी

१ मनुची, स्टोरिया दो मोगोर, भा-२, पृ. ३१०-१२.

रामचंद्रपंत अमात्य यांच्या अधिपत्याखाली दिला. कऱ्हाडपासून वरघाटच्या उत्तरेकडील प्रदेश, उत्तर कोकणचा उत्तरेकडील प्रदेश राजाराम महाराजांनी शंकराजीपंत सचिव यांच्या अधिपत्याखाली दिला.[१] राजाराम महाराजांनी रामचंद्रपंताची नेमणूक पश्चिम राज्याचे प्रमुख कारभारी (विश्वस्त) म्हणून केली. तसेच त्यांना " हुकुमत-पन्हा " असा किताबही दिला. प्रत्यक्षात राज्यकर्ता तेथे नसलेल्या अशा त्या राज्याचा कारभार रामचंद्रपंतांनी अत्यंत प्रशंसनीय अशा चांगल्या पद्धतीने आणि कार्यकुशलतेने सांभाळला. राजाराम महाराजांनी आपल्या भेटीस आलेल्या सरदारांस ते जो प्रदेश काबीज करतील त्या प्रदेशातील चौथाईचा हक्क त्यांना दिला.[२]

छत्रपती राजाराम महाराजांचे पाठबळ लाभलेल्या मराठे सरदारांनी आपल्या पद्धतीस अनुसरून स्वपराक्रमावर गनिमीकाव्याने मोगल सैन्याशी युद्ध आरंभले होते असे चिटणीस म्हणतो [३] आणि अशा प्रकारे ठिकठिकाणी युद्धे सुरू झाल्यामुळे मोगल सैन्याची खूपच हानी झाली. त्यांना युद्धांत आगेकूच करण्यात खूप अडथळे आले. त्या काळी औरंगजेब मराठी सैनिकांना जहागिर किंवा इनामांचे आमिष दाखवून मोगल सैन्यात येण्यास आकर्षित करीत होता. त्याच्या ह्या कारवायांना आळा घालण्याकरता म्हणून राजाराम महाराजांनी पराक्रमी सरदारांना वतने, इनाम गाव देण्याची पद्धत अनुसरली, हेतू हा की मराठी सैनिक मोगलांच्या आमिषास बळी पडून त्यांना सामील होऊ नयेत.

छत्रपती राजाराम महाराजांनी कोकणचा सरदार कृष्णाजी गोळे यांना १२ एप्रिल १६८९ रोजी पत्र लिहिले होते. त्या पत्रामध्ये छत्रपतींनी गोळे यांना असे आवाहन केले होते की, " सरदार गोळे यांना आपल्या अनुयायांसहित चरितार्थाकरता योग्य ती व्यवस्था इनाम गांवे जोडून केली जाईल.[४] छत्रपती राजाराम महाराजांनी स्वीकारलेली इनामांची ही पद्धती त्यांना आपले मराठे सरदार, सैनिक राखण्यासाठी निश्चित सहाय्यकारी झाली. हे औरंगजेबाच्या कानी येताच त्याने मोगल अधिकाऱ्यांकरवी त्यात गोळे कुटुंबातील चार सदस्यांना आदेश कळविले की, मोगल बादशहाची निष्ठेने सेवा करण्याची अट पाळण्यास जर ते (सरदार गोळे) तयार असतील तर बादशहा त्यांना चार गांवे इनाम देऊन सातगावांची जहागीरही देतील जी निरंतर त्यांना उपभोगावयास मिळेल.[५] परंतु देवदयेने ह्या मसलतीमध्ये रामचंद्रपंत अमात्यांच्या प्रयत्नास यश आले.

१ शि. छ. सा. भा. २ क्र. २, पत्र २२५, पृ. २२२-२३.

२ सरकार, औरंगजेब, भा. ५ पृ. १५०.

३ उपरोक्त.

४ आवळसकर, ऐ. सा. प. ५३, पृ. ७८, ७९.

५ उपरोक्त, पत्र क्र. ५६, पृ. ८२.

गोळे स्वराज्यातच राहिले आणि मोगल बादशहाने रंगवलेली भवितव्याची स्वप्ने भंग पावली.[१]

तळकोकणाच्या सीमेवरील विशालगड ह्या आपल्या राहत्या ठिकाणावरून रामचंद्रपंतांनी बहुसंख्य मराठी सरदारांच्या कृत्यांवर बारकाईने आणि अत्यंत दक्षतेने लक्ष ठेवले होते. उत्तरेत बुऱ्हाणपूरपासून ते दक्षिणेत जिंजीपर्यंत अनेक ठिकाणी कार्यान्वित केलेले युद्ध करणारे मराठे सैनिक आपली कामगिरी चोखपणे पार पाडत आहेत किंवा नाही याकडे रामचंद्रपंतांचे सतत लक्ष होते. कोकणामधून ताज्या दमाची स्वराज्य प्रेमाने प्रेरित झालेली बहुसंख्य तरुण मुले मराठ्यांच्या सैन्यात येऊन भरती झाली आणि त्यांनी रामचंद्रपंतांचे आदेश आणि योजना कार्यान्वित केल्या. अशा तडफदार धडाडीच्या तरुणांपैकीच एक कान्होजी आंग्रेही होता. त्याने आपल्या पराक्रमाने शत्रूपक्षात निर्माण केलेल्या दहशतीचे वर्णन पुढे येईल. मोगल बादशहास कोकणांमधून मराठ्यांच्या सत्तेचे समूळ उच्चाटन करावयाचे होते. एव्हाना उत्तर कोकणातील पठारी प्रदेश मोगलांच्या अधिकाराखाली आलेला होता. औरंगजेबाने लगेच मातब्बरखान नावाच्या एका धूर्त आणि शूर मोगल सरदाराची येथे नेमणूक केली. उत्तर कोकणांतील महत्त्वाचे प्रदेश ज्यामध्ये सध्याचा ठाणे जिल्हा, नाशिक आणि संगमनेर ह्या प्रदेशांची देखभाल करण्याकरता आणि व्यवस्था पाहण्याकरता महाबतखानाची तेथे नेमणूक केली गेली. त्यावेळी औरंगजेबाने महाबतखानास पुढीलप्रमाणे आदेश दिले होते. " कादीम कुली खान कल्याणला येऊन पोचला म्हणजे मोगल सैन्याने सर्व बाजूंनी कोकणात शिरावे. माहुली आणि त्या परिसरातील इतर किल्ले जिंकून घ्यावेत जेथे आवश्यक असेल तेथे मोगल सैन्याची ठाणी उभारावीत. कल्याण-भिवंडी येथे सैनिकांची ठाणी व छावणी उभारावीत. या पुढील आदेश मिळेपर्यंत मोगलांनी पादाक्रांत केलेला हा सर्व प्रदेश तुमच्या अधिकाराखाली राहील."[२]

११ मार्च १६८९ रोजी मातब्बरखानाला औरंगजेबाने माहुलीवर चालून जाण्याचे आदेश दिले. मोगल ठाणेदारांकडून पुरेसे सैन्यबळ संघटित केल्यानंतर तो नाशिकहून निघाला. बिरवड्याच्या चार मैल ईशान्येकडे असणारा काष्टीघाट उतरून १७ मार्चला तो खर्डी येथे आला. खर्डी माहुलीच्या ईशान्येस ९ मैलांवर आहे. [३] संपूर्ण कोकण मातब्बरखानाच्या

---

१ सरदेसाई, न्यू हिस्टरी ऑफ मराठाज, भाग १, पृ. २२३.

२ पगडी, स्टडीज इन मराठा हिस्टरी, भाग २, पत्र क्र. ५, पृ. २४.

३ उपरोक्त, पत्र क्र. ७, पृ. २५ ह्या पुस्तकामध्ये मातबरखान यांच्या जेठामल नामक प्रमुख लेखनिकाने मुळात पर्शियन भाषेमध्ये लिहिलेल्या पत्रांचे इंग्रजी भाषांतर आहे. हे भाषांतर श्री. सेतुमाधवराव पगडी यांनी केलेले असून हे पुस्तक १९७१ मध्ये शिवाजी विद्यापीठाने प्रसिद्ध केले आहे.

अधिपत्याखाली कसे आले आणि त्या प्रदेशातील सुमारे पन्नास किल्ल्यांचा तो कशाप्रकारे अधिकारी बनला ह्याचा वृत्तांत यापुढे दिला आहे.

इ. स. १६८९ च्या जून महिन्याअखेर सावंतवाडीच्या खेम सावंताने मराठ्यांविरुद्ध बंड केले. त्याने औरंगजेबास निवेदन केले की, " मोगल सैन्याला दाणागोटा आणि इतर आवश्यक गोष्टींचा पुरवठा करून मी मोगलांना मदत करीन आणि मोगलांना तेथे आपली ठाणी उभारण्याच्या कामातही मदत करीन. " तसेच खेम सावंताने गोव्याकडे जाणारा रस्ताही तयार करण्याचे आश्वासन दिले.[१] मातब्बरखान कल्याणला पोचल्याबरोबर तो संपूर्ण मुलूख बेचिराख झाला असल्याचे मातब्बरखानाला आढळून आले. तेथे पाणी, गवत किंवा अन्नधान्य यापैकी कोणतीही जीवनावश्यक साधने उपलब्ध नव्हती. अशा परिस्थितीत मोगल सैन्याकरता सुरतहून रसद मागविण्यात आली.

१८ मार्च १६८९ रोजी खर्डी गाव सोडून मातबरखान पुढे निघाला. माहुली गडावरून एक हजार घोडेस्वार सैनिक आक्रमण करण्याकरता निघाले असल्याची त्याला वार्ता कळली. मराठे सैनिकांनी अवघड खिंडीचा व ठिकाणांचा आश्रय घेतला होता. हे वृत्त मातबरखानाला समजल्यावर त्याने हाजी अहमद बेग, विक्रम श्रीपत हा जव्हारचा जमीनदार आणि इतर अधिकाऱ्यांना घोडेस्वार, पायदळ आणि बंदुकधारी सैनिकांसह लढण्याकरता रवाना केले. तेव्हा सुमारे तीन तास बंदुका आणि बाणांचे युद्ध झाले. कित्येक मराठे सैनिक मरण पावले, जखमी झाले आणि युद्धातून पळून गेले. असे वृत्त मातबरखानाने औरंगजेबास पत्राने कळविले.[२]

मातबरखान माऊलीहून २७ मार्च १६८९ रोजी कल्याणला आला. नंतर त्याने कल्याणकडील दुर्गाडी किल्ल्याला वेढा घातला. अगदी अल्प काळातच ह्या किल्ल्याचा शासन कारभार सुरळीतपणे चालवण्याचे त्याने औरंगजेबास आश्वासन दिले. माहुलीगड म्हणजे तळकोकणचे प्रमुख ठाणे असल्याचे त्याने औरंगजेबाला कळवले. परंतु त्याच्या परिसरात मोगल साम्राज्याची कोठेही ठाणी नव्हती. किल्ल्यात दाणागोट्याचा साठा मुबलक होता आणि किल्ला अत्यंत बळकट होता. दुर्गाडीच्या किल्ल्याला वेढा घालण्याच्या दृष्टीने त्या किल्ल्याच्या सभोवतालच्या परिसरात मोगलांची सुसज्ज अशी लष्करी ठाणी बसवणे महत्त्वाचे होते. आणि अशी ठाणी उभारण्याकरिता सुमारे पाच ते सहा हजार घोडदळ सैन्य आवश्यक होते. तेव्हा मातबरखानाने फितुरीच्या तंत्राने

१ पगडी, स्टडीज इन मराठा हिस्टरी, भा. २ पृ. २६.

२ सरकार, औरंगजेब, भाग ५, पृ. ११५.

माहुली सर करण्याचे ठरविले. त्याने गडावरील द्वारकाजी हवालदाराशी संधान बांधले. द्वारकाजी आणि त्याच्या सैन्याच्या तुकडीतील काही सैनिकांनी बादशहाची चाकरी स्वीकारावी असे आवाहन मातबरने आग्रहपूर्वक केले. मोगलांना जे सामील होतील त्यांना मनसब देण्याचे, बक्षीस आणि इतरही शाही मानमरातब देण्याचे आश्वासन खानाने दिले. मोगल बादशहाकडून त्यांना सनदा दिल्यावर द्वारकाजी व त्याच्या अनुयायांनी माहुली आणि त्याच्या परिसरातील महेंद्रगड, पासलगड वगैरे किल्ले मोगलांच्या स्वाधीन करण्याचे मान्य केले.[१] मातब्बरखानाच्या पत्रातील हा सर्व वृत्तांत कळताच औरंगजेब अत्यंत हर्षित झाला. मातब्बरखानाने केलेल्या सर्व सूचना स्वीकारल्या असल्याचे त्याने कळविले. मातब्बरखानाने माहुलीगडाच्या किल्लेदाराला २५०० सुवर्ण मोहरा दिल्या आणि किल्ल्याचा ताबा घेतला. बादशहाच्या आदेशानुसार किल्लेदार खान किल्ल्याचा प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात आला. तसेच औरंगजेबाने मुहम्मद साफीची चौल किल्ल्याचा दरोगा (तोफखाना प्रमुख) म्हणून नेमणूक केली.[२] तळकोकणच्या परिसरातील सर्व मुलूख मोगल अधिकारात आल्यानंतर मातबरखानाच्या मनात दौलतखान यास चौलचा ठाणेदार म्हणून नेमावे असे होते. तेव्हा दौलतखान माहुलीपासून १२ कोसावर आणि कल्याणपासून १८ कोसावर असणाऱ्या खर्डी येथे होता. परंतु चौलचा फौजदार म्हणून अहमदखानाची नेमणूक करण्यात यावी आणि कल्याणसह भोवतालच्या परिसराची आणि खर्डीवर देखरेख करण्याचे काम दौलतखान याजकडे सोपवण्यात यावे असा औरंगजेबाचा मातबरखानाला आदेश होता. [३] या आदेशाची मातबरखानने अमंलबजावणी केली.[४] या घटनेनंतर मातबरखानाने आपले लक्ष प्रबळगड जिंकून घेण्याकडे केंद्रित केले. प्रबळगड कोकणातील सर्व गड किल्ल्यापैकी अत्यंत बळकट आणि अजिंक्य असा किल्ला होता. कोकणाची सत्ता मराठ्यांच्या हाती असताना प्रबळगड हे त्या जिल्ह्याचे महत्त्वपूर्ण असे सत्ता केंद्र होते. महाबतखानाने युद्ध करून आपल्या सामर्थ्याच्या बळावर प्रबळगड जिंकण्याचे योजले. त्या दृष्टीने ताबडतोब त्याने त्या मुलुखातील ९०० कोळी आणि भिल्ल लोकांचे पायदळ जमवले. त्याशिवाय जमीनदारांनी मदतीकरता दिलेले सैन्य होतेच. ह्या सैन्याला सर्वतोपरी मदत करण्याकरता मातबरखानाने आपल्या काही अधिकाऱ्यांची रवानगी केली. औरंगजेबाने मुहम्मद साफीची तोफखाना प्रमुख म्हणून नेमणूक केली. मोगल सैन्याने अचूक संधी साधली.

---

१ पगडी, स्टडीज इन मराठा हिस्टरी. भा. २, क्र. ९, पृ. २७.

२ कित्ता, पत्र क्र. ११, पृ. २८.

३ उपरोक्त स्टडीज इन मराठा हिस्टरी. भाग २, पत्र क्र. १०, पृ. २८.

४ उपरोक्त पत्र ११, पृ. २८.

१७ जुलै १६८९ रोजी अंधाऱ्या पावसाळी रात्रीच्या वेळी मोगल सैनिक प्रबळगडाच्या तटाच्या भिंती चढून गेले. मराठे आणि मोगल सेनेचे गडावर तुंबळ युद्ध झाले. पहाटे उजाडेपर्यंत हे युद्ध चालू होते. कित्येक मराठे सैनिक मारले गेले तर कित्येक जखमी झाले. कित्येक लढवय्ये गडावरून खाली फेकले गेले आणि मेले. गडाच्या शिबंदीतील काही सैनिकांनी शरणागती पत्करली त्यांना कैद करण्यात आले. मोगलांचे देखील कित्येक सैनिक मरण पावले कित्येक घायाळ झाले. प्रबळगड मात्र मोगलांनी जिंकून घेतला. दोराच्या साहाय्याने सर्वप्रथम गडाची भिंत चढून जाणाऱ्या शेख अब्दुल्ला सलाम याच्या हाती मातबरखानाने गडाच्या किल्ल्या बादशहा औरंगजेबाकडे पाठविल्या. शेख अब्दुल सलामने ह्या मोहिमेमध्ये आपली कामगिरी उत्तम प्रकारे पार पाडल्याबद्दल त्याला मनसबदारी देण्यात यावी अशी मातबरखानाने औरंगजेबाजवळ शिफारस केली. तसेच मोगलांनी काबीज केलेल्या प्रबळगडाची व्यवस्था पाहण्याकरता, त्याचे शत्रूपासून रक्षण करण्याकरता कार्यक्षम किल्लेदाराची सैनिकासंह नेमणूक करण्यात यावी अशी विनंती मातबरखानाने औरंगजेबाला केली. त्याने बादशहास असेही कळविले की पूर्वी बादशहाच्या सेवेत असणारा केसर सिंग नामक अधिकारी गडाची व्यवस्था पाहण्याकरता आपण नेमलेला आहे. औरंगजेबाच्या आदेशानुसार नियुक्त किल्लेदार गडावर येऊन दाखल होईपर्यंतच्या काळात गडाचे रक्षण करण्याकरता मातबरखानाने शेख मुहम्मद इशाक याला सैन्य दिमतीस देऊन प्रबळगडावर ठेवले. थोडक्या काळात मातबरखानाने कर्नाळ, मुकुटगड, सोतोरा, जामधरी, तिलंगगड, माणिकगड, सांक्षी आणि दुर्गाडी हे किल्ले काबीज केले.[१] अशा तऱ्हेने मातबरखानाने उत्तर कोकणातील कोळ्याच्या प्रदेशापासून ते मुंबईच्या दक्षिणेकडे असणाऱ्या मराठी मुलुखातील बहुतेक सर्व किल्ले व प्रदेश जिंकून घेतला आणि तो मोगलांच्या अधिकाराखाली आणला.[२]

या सर्व वृत्ताबरोबर मातबरखानाने मोगलांनी जिंकून घेतलेल्या ह्या नव्या प्रदेशाचा कारभार पाहण्याकरता केलेल्या अधिकाऱ्यांच्या नेमणुकीबद्दल माहिती औरंगजेब बादशहास विदित केली. नव्याने जिंकलेल्या ह्या प्रदेशाची मोगल साम्राज्यात कार्यन्वित असलेली व्यवस्था या पुढील परिच्छेदामध्ये वर्णन केली आहे.

जव्हारचा राजा विक्रम श्रीपत हा मोगल साम्राज्याचा एक अधिकारी भिवंडी आणि त्या परिसरातील लष्करी ठाण्याचा प्रमुख म्हणून नेमण्यात आला. पनवेल आणि सांक्षी येथील ठाण्याचा अधिकार ओऊलराव याच्याकडे सोपवण्यात आला. हातोली ठाणे अहमदखानाकडे दिले तर कासगाव-मुरबाडच्या ठाण्यावर अधिकारी म्हणून गोविंदरावाची नेमणूक केली.[३]

---

१ हा किल्ला रायगड जिल्ह्यात पेणच्या ईशान्येस, पाच मैलांवर आहे. शिवाजी गौरव ग्रंथ, पृ. ८०.

२ पगडी, उपरोक्त, पत्र क्र. १२ पृ. २९-३० सरकार, औरंगजेब भाग ५, पृ. ११६.

३ सरकार, औरंगजेब, भाग ५, पृ. ११७.

अशाप्रकारे मातबरखानाने कोकणातील कल्याण, भिवंडी, पेण, पनवेल आणि मुरबाड येथे मोगल लष्कराची बलशाली ठाणी उभारली. मराठ्यांच्या जोरदार हल्ल्यांना समर्थपणे तोंड देत मातबरखानाने जिंकून घेतलेल्या मुलुखाची नेटाने व्यवस्था लावली. मातबर खानाच्या ह्या यशस्वी कर्तृत्वामुळे कोकणातील त्या भागामध्ये असलेल्या मोगलांच्या लष्करी छावणीचा गौरव कसा वृद्धिंगत झाला हे मातबर खानाचा लेखनिक जेठामल ह्याने आपल्या पत्रसंग्रहामध्ये प्रस्तावनेत वर्णन केले आहे. ते असे की शिवाजी महाराजांनी आपल्या कारकीर्दीत हस्तगत केलेले आणि राखलेले सुमारे पन्नास कोट मातबरखानाने जिंकून घेतले. औरंगाबादपासून पश्चिम सागरापर्यंतच्या भूभागातील बहुतेक डोंगर पर्वत, डोंगरी किल्ले त्याने पादाक्रांत केले. ह्यामध्ये विशेषकरून निजामशाही कोकणचा पठारी प्रदेश आणि जुन्नर जिल्ह्यातून त्याने शत्रूला हटविले. कल्याणचे ठाणे आणि इतर परगणे वीस वर्षांच्या मराठे यांच्या अबाधित सत्ताकालात उद्‌ध्वस्त झाले होते. हे प्रदेश मातबरखानाने पुन्हा जिंकले, तेथील लष्करी ठाणी बलशाली केली, तेथे त्याने पेठा वसविल्या आणि पुन्हा त्या प्रदेशात नवे चैतन्य आणले. वस्ती वसविली. तसेच त्याने सुंदर इमारती, बागा, खंदक इ. बांधल्या.[१] मातबरखान कोकणात साधारणतः वर्षभर लढला होता. त्याने त्या प्रदेशातील सर्व गड कोट जिंकून घेतले, कल्याण येथील मोगल ठाण्यामध्ये (शहरामध्ये) त्याने उत्तमोत्तम सुंदर इमारती बांधल्या आणि त्याने ठाण्यात आपला काळ आनंदाने व्यतीत केला.

(१) तेथे त्याने स्वतःकरता एक वाडा बांधला. त्या वाड्यामध्ये एक विस्तीर्ण दिवाणखाना होता, समोर सुंदर बाग होती, एक खंदक आणि कारंजेदेखील होते.

(२) त्याने एक मशिद उभारली. एक न्हाणीघर, एक सुंदर बाग, एक करमणुकीकरता सभागार उभारले. तसेच कल्याण शहरात एक बळकट किल्ला बांधला. उत्सव आणि समारंभ साजरे करण्याकरिता त्याने अत्यंत भव्य, सुंदर आणि आकर्षक असा दिवाणखाना बांधला. हे बांधकाम इ. स. १६९५-९६ मध्ये झाले.

(३) इ. स. १६९६-९७ साली मातबरखानाची पत्नी मरण पावली. कल्याणमधील सेनाळा तलावाजवळ त्याने पत्नीच्या स्मृतिप्रीत्यर्थ थडगे बांधले. त्या इमारतीचे बांधकाम इ. स. १७०६-१७०७ मध्ये पूर्ण झाले.[२]

१ पगडी, स्टडीज इन मराठा हिस्टरी, भा. २, पृ. ३१.

२ पगडी, कित्ता, पत्र क्र. १४, पृ. ३२.

इ. स. १६९३ च्या ऑक्टोबर महिन्यात मातबरखानाने आपले लक्ष माहुली गडापासून बारा कोसांवरील सिद्धगड जिंकून केंद्रित केले. मराठे सैनिकांनी सिद्धगडावर आपले बस्तान बसविले होते आणि त्याच्या आश्रयाने माहुलीवर हल्ला करण्याचा त्यांचा हेतू होता. त्यामुळे सुमारे सहा महिन्यांपासून मोगल सैनिक सिद्धगड हस्तगत करण्याच्या प्रयत्नात होते. २० ऑक्टोबर १६९३ रोजी मोगल लष्करातील लोमाणजी मावळा याने आणि इतर सैनिकांनी संधी साधली. रात्रीच्या सरत्या प्रहारात त्यांनी सिद्धगडाच्या तटाच्या भिंतीवर दोर फेकले आणि ते किल्ल्याच्या भिंती चढून गेले. तेव्हा गडावर तुंबळ युद्ध झाले. त्या चकमकीत सिद्धगडाचा किल्लेदार जखमी झाला आणि मोगलांच्या हाती लागला. अशा प्रकारे सिद्धगड जिंकून घेण्यास मोगल सैनिक यशस्वी झाले. मोगलांनी सिद्धगड जिंकून घेतला हे कळल्याबरोबर प्रचंड सैन्य सांगाती घेऊन खंडोजी कदम आणि दामू नारायण हे मराठी सेनानी राजमाचीहून निघाले. ही बातमी मातबरखानाला समजताच त्याने सिद्धगडावरील मोगल शिबंदीला तीनशे आणि पंधराशे पायदळ घोडदळाची कुमक मदतीकरता रवाना केली. अत्यंत त्वरेने हे मोगल सैन्य सिद्धगडाच्या पायथ्याशी जाऊन पोहोचले. घनघोर युद्ध झाले. तोफांचा भडिमार करण्यात आला. ही लढाई पहाटे उजाडेपर्यंत चालूच होती. मात्र अखेरीस मोगलांनी लढाई जिंकली. जिंकलेल्या मोगल सैन्याने सिद्धगडाच्या परिसरातील इतर किल्ले काबीज करण्याकडे मोर्चा वळविला.[१]

बहुधा या घटनेनंतर मोगलांनी कर्नाळा जिंकून घेतला असावा. तेव्हा रायगड जिल्ह्यातील बहुतेक प्रदेश जंजिरेकर सिद्दीच्या ताब्यात होता. पनवेलचा अपवाद वगळता रायगडचे स्थान वेगळ्या जिल्ह्यात सामावलेले असावे त्यामुळे रायगड आणि परिसर मातबरखानाने जिंकलेल्या प्रदेशात नव्हता. मराठ्यांचा आरमारी प्रमुख आणि बलाढ्य सेनानी कान्होजी आंग्रे हा अलिबागच्या आपल्या मुख्य आरमार तळावरून मोगलांनी हस्तगत केलेल्या किनारपट्टीवरील मुलुखात दहशत निर्माण करीत होताच. मोगलांच्या लष्करी तळावरील हल्ला चढविण्याची एकही संधी मराठे सैनिक वाया घालवित नव्हते. २९ मार्च १६९४ रोजी त्यांनी पेण येथे मोगल छावणीवर हल्ला केला. ह्या हल्ल्याचा तपशील पुढे वर्णन केला आहे.

---

१ पगडी, स्टडीज इन मराठा हिस्टरी, भाग २, पृ. १७.

" नजीकच्या काळातच मोगलांनी कोकणात ठिकठिकाणी आपली लष्करी ठाणी स्थापन केली होती. आंजी अधलराव हा मोगलांच्या पेण येथील ठाण्याचा मुख्य अधिकारी होता. त्याची बदली करण्यात आली होती. मातबरखानाने तेव्हा तेलंगरावचा मुलगा मोगल अधिकारी शिवाजी याला पनवेल, उरण आणि पेणच्या लष्करी तळाचा अधिकार सांभाळण्यास सांगितले. शिवाजी तेलंगरावाने चारशे स्वारींची शिबंदी पेण येथे सज्ज ठेवली होती. आणि ठाणे अधिक मजबूत बनवले. त्या प्रदेशातील मराठ्यांचे कारभारी शंकराजी पंडित यांना ही खबर कळताच त्यांनी मराठी सैन्याला पेणचे मोगलांचे ठाणे जिंकून घेण्याचा हुकूम दिला. त्यानुसार राजमाची गडावर मराठ्यांचे सैन्य एकत्र जमले त्यांनी २९ मार्च १६९४ रोजी पेण जिंकून घेतले.[१] उत्तर कोकणातील मुलुख इ. स. १६९३ मध्ये मोगलांनी जिंकून मोगल साम्राज्यात समाविष्ट केला होता. तरीदेखील कल्याणचा मोगल सर्वाधिकारी म्हणून आपल्या कारकीर्दीदरम्यान मातबरखानाला कोकण प्रदेशात मराठे सैन्याशी सतत लढत राहावे लागले.

मातबरखानाने मोगल सत्तेची साधने न वापरता त्या सर्व प्रदेशातील किल्ल्यांचे रक्षण करण्याचे आश्वासन बादशहास दिले. आपल्या हाताखालील लष्करी ठाण्यांमध्येही त्याने रक्षणाची अशीच व्यवस्था केली. पायदळामध्ये नव्या सैनिकांची भरती करण्याकरता आणि घोडदळाची व्यवस्था पाहण्याकरता त्याने शासकीय नियमांना बगल देऊन ५०० माणसांची भरती केली. २,५०,००० रुपयांचे कर्ज काढले. त्यामुळे मातबरखानाने बादशहाकडे आर्थिक साहाय्याची मागणी केली आणि औरंगजेबाने त्याला ५०,००० रुपये दिले.[२]

त्यापूर्वी मोगलांच्या बाजूने नाशिकला लढत असताना राजा श्रीपत मरण पावला होता. त्यासमयी चार वर्षाच्या त्याच्या मुलाचे- विक्रम श्रीपतचे पालन पोषण राजा श्रीपतची पत्नी गौराई हिने नीटपणे केले. तसेच आपल्या राज्याची व्यवस्थाही चांगल्या प्रकारे सांभाळली होती. त्या दोघा मायलेकरांकडून आलेल्या विनंती अर्जास मान्यता देऊन औरंगजेबाने विक्रम श्रीपतला मनसब किताब दिला. त्यानंतर श्रीपत मोगल सम्राटाच्या सेवेत रुजू झाला. त्याने शत्रूच्या आक्रमणाच्यावेळी जव्हार राज्याचे रक्षण केले. त्याने कोहीज आणि इतरही चार किल्ले काबीज केले आणि त्यांचा मोगल साम्राज्यात समावेश

१ पगडी, स्टडीज इन मराठा हिस्टरी, भाग २, पृ. ३६.

२ पगडी, स्टडीज इन मराठा हिस्टरी, भाग २, पत्र २०, पृ. ३६.

केला. मोगल साम्राज्याच्या सीमा वाढवण्यामध्ये विक्रम श्रीपत सतत क्रियाशील होता. कोकणात आल्यावर मातबरखानाने त्या भागात लष्कराची ठाणी स्थापन केली आणि त्याने विक्रम श्रीपतला भिवंडी ठाण्याचा प्रमुख म्हणून नियुक्ती केले. विक्रम श्रीपतने भिवंडी ठाणे उत्तम राखले. मोगलांच्या बाजूने लढत असताना एका लढाईत विक्रम श्रीपतचा अंत झाला. (१६९४) विक्रम श्रीपतच्या मृत्यूमुळे त्या प्रदेशातील कोळी समाज अत्यंत व्यथित झाला. त्यांना दिलासा देण्याकरता मातबरखानाने केलेल्या शिफारशीवरून बादशहाने विक्रम श्रीपतच्या मुलाला मनसब दिली.[१]

रामनगरचा राजा नारायण देव हा औरंगजेबाच्या चाकरीत होता. त्याला पंधराशे जाट सैनिक आणि सहाशे घोडेस्वारांची मनसब दिलेली होती. आणि तो मातबरखानाच्या हाताखाली काम करीत होता. तो एका चकमकीत कामास आला. त्या सुमारास त्या प्रदेशामध्ये मोगल सरदारांना फितवून आपल्या सैन्यात घेण्याचा मराठे सरदार प्रयत्न करीत होते. अशा परिस्थितीत नारायण देवच्या मुलाने मोगलांच्या चाकरीत राहावे, मराठ्यांना जाऊन मिळू नये ह्याकरता औरंगजेबाने नारायण देवचा चौदा वर्षाचा मुलगा हरदेव यास दहा हजार रुपये आणि एक हत्ती भेट दिला. तसेच हरदेवला पूर्वीची मनसबदारीही चालू ठेविली.[२]

दरम्यान मराठे सैनिकांनी मोगलांशी लढण्याचे एक नवे तंत्र अनुसरले होते. धनाजी जाधव, संताजी घोरपडे, आणि राणोजी घोरपडे इ. मराठे सरदार स्वराज्यात निरनिराळ्या ठिकाणी हल्ले करून, मोगल छावणीवर छापे घालून मोगल सैन्याला नामोहरम करीत होते. जेथे मोगलांचे लष्कर कमकुवत किंवा कमी संख्येचे होते अशा प्रदेशात मराठे सैनिक धुमाकूळ घालीत. अशा हल्ल्यांनी मोगलांचे मनोबल खच्ची करण्याचा आणि मोगलांवर छापे घालून मराठ्यांचा खजिना, सामग्री वाढविण्याचा त्यांचा उद्देश असे. १६९७ मध्ये धनाजी जाधव आणि त्याच्या सैनिकांनी मोगलांनी जिंकून घेतलेल्या विजापूरवर आक्रमण केले. पुढे मातबरखानाला खबर मिळाली की, धनाजीचा कल्याण भिवंडीवर आक्रमण करण्याचा मानस आहे. त्यामुळे मातबरखानाने आपल्या अधिपत्याखालील ठाण्यांचे रक्षण करण्याची उत्तम प्रकारे व्यवस्था ठेवली. परंतु

१ पगडी, स्टडीज इन मराठा हिस्टरी भा. २, पत्र १८, पृ. ३४

२ उपरोक्त, पत्र २६, पृ. ३९.

मराठ्यांनी ठिकठिकाणी माजवलेल्या धुमश्चक्री चढायांबद्दल त्याने औरंगजेबाला माहिती कळविली. स्वतः मातबरखानाच्या हाताशी मोजकेच सैन्य असल्यामुळे कोकणातील मराठे सैनिकांच्या वाढत्या हालचाली रोखणे त्याला कठीण झाले.[१] मराठे सैनिकांनी आणि सरदारांनी कोकण प्रदेशात चालवलेल्या चकमकी, कारवाया इतक्या प्रखर होत्या की कोणीही मोगल अधिकाऱ्याने मराठ्यांशी समोरासमोर लढण्याचा किंवा मराठे सरदाराला रोखण्याचा किंवा हटविण्याचा प्रयत्न केला नाही.[२]

इ. स. १६८९ मध्ये मराठे सरदार व लढणारे स्वातंत्र्य सैनिक हतबल झाले की, काय असे वाटण्याइतकी त्यांची परिस्थिती बिकट झाली होती. परंतु इ. स. १६९३ च्या सुमारास हळूहळू परंतु निश्चितपणे त्यांनी साधारणपणे सर्वत्र महाराष्ट्रात आणि विशेषतः कोकणपट्ट्यांत जोर धरला होता. आणि आपल्या शत्रूविरोधी कारवाया नेटाने सुरू ठेवल्या. जिंजीच्या संग्रामात आणि त्या परिसरात संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव या शूर मराठे सरदारांनी गाजवलेल्या मर्दुमकीपासून व त्यांना मिळालेले यश पाहून महाराष्ट्रातील आणि कोकणातील मराठ्यांच्या स्वाभिमानाचे, पराक्रमाचे पुनरुज्जीवन झाले. त्यांच्यात नवचैतन्य निर्माण झाले. या दोघा शूर सरदारांनी मोगल अधिकाऱ्यांच्यात आणि मोगल सैनिकांत निर्माण झालेली दहशत आणि जिंजी येथील त्या दोघांचा पराक्रम या दोन्हीचा स्वराज्यावर, मराठे सैनिकांवर अत्यंत तीव्र प्रभाव पडला. त्यामुळे मराठे सैनिकांचे मनोधैर्य खूपच उंचावले. स्वराज्याच्या अस्तित्वाबद्दल त्यांच्या मनात असणारी श्रद्धा ही दृढ झाली, जी मध्यंतरीच्या काळात नष्टप्राय होऊ लागली होती. त्यामुळे कोकणसहित संपूर्ण महाराष्ट्रातील स्वराज्यातील प्रदेश आणि सैनिकांचा विश्वास दुणावला आणि मराठ्यांच्या सैन्याच्या महाराष्ट्रातील हालचाली व कारवाया अधिक तीव्र झाल्या.[३]

पोर्तुगीज गुप्तपणे मराठ्यांना मदत करीत आहेत असे मातबर खानाला कळविले. तेव्हा त्याने पोर्तुगिजांच्या वसईवर हल्ला चढवला. त्यामुळे पोर्तुगिजांनी मातबर खानाविरुद्ध औरंगजेबाकडे तक्रार नोंदविली. यावर औरंगजेबाने मातबर खानास पोर्तुगिजांशी सलोख्याचे व सामोपचाराचे संबंध ठेवण्यास सांगितले.

---

१ पगडी, स्टडीज इन मराठा हिस्टरी, पत्र ३३, पृ. ४३.

२ कुलकर्णी, द मुघल, मराठा रिलेशन्स, पृ. १५६.

३ पगडी, कित्ता, पत्र ३८, पृ. ४६.

औरंगजेबाकडून ही सूचना कळताच मातबरखानाने सिद्दी याकूतखानाला कळविले की पोर्तुगीज बादशहा औरंगजेबाच्या आज्ञेप्रमाणे वागत असून यापुढे पोर्तुगिजांशी शांततेचे सौहार्दाचे संबंध ठेवण्याचे निश्चित केले आहे. अशाच आशयाचे एक पत्र मातबरखानाने पोर्तुगीजांकडे पाठविले आणि सलोखा राखण्याची ग्वाही दिली.[१] चौल बंदराचा प्रदेश मात्र मातबरखानाच्या अधिकाराबाहेरील होता. तसेच मातबरखानाने चौल बंदराचा फौजदार हकीम मोहसीनखान याच्याकडे एक पत्र पाठवून असे कळविले की, मराठ्यांनी सर्वत्र चालवलेले हल्ले लक्षात घेता खानाने किमान तीनशे घोडेस्वार आणि १००० इतके पायदळ तैनात ठेवून दक्षतेने राहणे आवश्यक आहे.[२] नाशिकहून कल्याणला आल्यानंतर मातबरखानाने दुर्गाडी किल्ल्याला वेढा घालून तो जिंकून घेतला. परंतु तेव्हा कोकण प्रदेशाची परिस्थिती फारच हलाखीची झाली होती. गावेच्या गावे बेचिराख झाली होती. मोगलांनी जिंकून घेतलेल्या प्रदेशांमध्ये व्यापाऱ्यांनी अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तू आणाव्यात असा आदेश व्यापाऱ्यांना देण्याबद्दल मातबरखानाने सिद्दी याकूतखानाला विनंती केली कारण अन्न पदार्थ व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या अभावामुळे मोगल अधिकाऱ्यांचे आणि सैनिकांचे अतोनात हाल होत होते.[३]

दरम्यानच्या काळात मातबरखानाला असे समजले की औरंगजेबाने एक फर्मान काढून फातजंगखान याला रायगडाचा फौजदार आणि राखणदार म्हणून नेमले. त्याच्याकडे इंग्रजांनी आपल्या गैरकृत्याबद्दल क्षमायाचना केली.[४] बादशहा औरंगजेबाने मातबरखानाला आदेश दिला की त्याने (मातबरखानाने) संभाजीच्या काळामध्ये तळकोकण प्रदेशात मशिदींची किंवा धार्मिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची काय काय हानी झाली आहे याबद्दल पाहणी करावी. त्यावर मातबरखानाने मोगल बादशहास सादर केलेला वृत्तांत असा आहे की, " ह्या प्रदेशात पूर्वी मुसलमान वस्ती बहुसंख्येने असणारी ठिकाणे

१ पगडी, स्टडीज इन मराठा हिस्टरी, पत्र ५१, पृ. ५०.

२ उपरोक्त. पत्र ५२, पृ. ५०.

३ पगडी, कित्ता. पत्र ५४, पृ. ५१.

४ उपरोक्त, पत्र ६८, पृ. ५८.

होती. येथे मशिदी होत्या, धार्मिक शाळा होत्या. धार्मिक वृत्तीचे मुसलमान लोक ह्या संस्थाचा वापर करीत असत. मध्यंतरी संघर्षाच्या काळात मराठे सैनिकांनी त्या प्रदेशात धुमाकूळ घातला. हल्ले केले. त्यामुळे मराठ्यांनी निर्माण केलेल्या दहशतीमुळे येथील मुसलमान रहिवासी आपली घरेदारे सोडून पळून गेले. ही गावे बेचिराख आणि निर्मनुष्य झाली. "

परंतु हे धर्मपरायण मुसलमान आता ह्या प्रदेशात परत राहायला आले आहेत. शरीयतच्या आदेशानुसार आपले व्यवहार त्यांनी पूर्ववत सुरू केले आहेत. कल्याण शहर, भिवंडी, पनवेल, सोनाळा ह्या शहरांमध्ये आणि आपल्या (मातबरखानच्या) अधिकारातील इतरही महालांमध्ये व गावांमध्ये पुन्हा एकदा मशिदी आणि मुसलमानांच्या इतरही धार्मिक शाळा आणि संस्था कार्यरत झाल्या आहेत. मशिदी धर्मशाळा आणि इतरही धार्मिक शिक्षण संस्थांना अत्यंत वाजवी प्रमाणात मागणी आहे. आणि त्यांचा विकास होऊन त्या स्थिरस्थावर होणेही अगत्याचे आहे.[१]

पुढे काही कालांतराने तळकोकणामध्ये मराठ्यांच्या कारवायाचा जोर अधिकच वाढला आणि मातबरखानाच्या हाताखालील तळकोकणातील मोगल अधिकाऱ्यांनी त्याच्याशी सहकार्य नाकारले असावे, त्यामुळे आपल्या प्रांताचा महसूल मराठ्यांशी सामोपचाराने राहून विभागून घ्यावा अशा धोरणाप्रत मातबरखानाला यावे लागले. ठिकठिकाणी छावण्या उभारून असणाऱ्या मोगल अधिकाऱ्यांना जेव्हा मोगल बादशहाकडून मिळणारी मदत अपुरी पडू लागली तेव्हा काही जिल्ह्यातील मोगल सेनाधिकाऱ्यांनी-देखील असेच धोरण अवलंबिले.

इंग्रजांनी केलेल्या नोंदीनुसार इ. स. १७०० च्या नंतर मातबरखानाने त्याच्या प्रांताचा १/२ महसूल मराठ्यांना देण्यास सुरुवात केली. मातबरखानाने कल्याणमध्ये अनेक इमारती बांधल्या. त्यापैकी त्याच्या पत्नीची कबर आणि एक मशीद आजमितीस टिकून आहे. मातबरखान इ. स. १७०५ च्या सुमारास मरण पावला असावा. त्याच्या पश्चात

१ पगडी, स्टडीज इन मराठा हिस्टरी, भा. २, पृ. ५८-५९.

त्याचा एक निकटवर्ती झैमुद्दीन अलिखान याने फौजदार म्हणून कार्यभार हाती घेतला. झैमुद्दीन अलिखान हा दुसऱ्या शिवाजीच्या काळात कल्याणचा प्रमुख असणाऱ्या मुल्ला अहमदचा भाचा होता. इ. स. १७१९ पर्यंत झैमुद्दीन त्या पदावर होता. इ. स. १७१९ मध्ये मोगल-मराठा यांच्या सनदेनुसार कल्याण प्रांत मराठ्यांना प्राप्त झाला.[१]

□□



दंडाराजपुरी देखावा

१ पर्वते, पोर्तुगीज ॲण्ड मराठाज, पृ. ४.

४५. राजाराम महाराज जिंजीच्या वेढ्यात, भाग १ ला (नोव्हेंबर १६८९ ते फेब्रुवारी १६९३)

राजाराम महाराज जिंजीस नोव्हेंबर १६८९ त आले आणि त्यांनी जिंजीचा कारभार हाती घेतला.[१] त्यांनी जिंजीस मराठ्यांची कर्नाटकांतील राजधानी निर्माण केली. कर वसूल करणे, नव्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका करणे, ठाणी व किल्ले यांचा बंदोबस्त राखणे, नवे लष्कर उभारणे, मोगलांशी लढण्यासाठी कर्नाटकांतील हिंदू नायकांचे सहकार्य मिळविणे आणि राज्यकारभार आणि मोगलांशी युद्ध करण्यासाठी पैसा मिळविणे यासारखी कार्ये आता जिंजीमध्ये सुरू झाली. राजाराम महाराजांजवळ द्रव्यसंग्रह नव्हता. गिरजोजी यादवाने महाराष्ट्रातून बोचके बांधून बरोबर आणलेले जडजवाहीर अडीच लाखांचे होते. शिवाय हरजी राजे महाडीक ह्यांच्या पत्नीने नवऱ्याचा व तिचा धनसंचय होता तोही तिने राजाराम महाराजांस दिला. जिंजीच्या अधिकाऱ्यांनी व लष्कराने राजाराम महाराजांची हुकूमत मानली. जिंजीस मराठी राज्याचा कारभार चालू झाला. पण पैशाशिवाय फौज उभी राहणार नाही. तेव्हा महाराजांस मोठी अडचण पडली ती पैशांची. अडचण निवारण्याचे उद्योग राजाराम महाराजांस जिंजीस सांभाळून आणणारे प्रल्हादपंत यांनी केले.[२] कर्नाटकातील राजे, पाळेगार वगैरेना मुघली राजवट नको होती. कारण मोगल बादशहाच्या हुकूमाने मुसलमान लोक हिंदूची मंदिरे पाडू लागले ते त्यांना नको होते.[३] त्यांनी राजाराम महाराजांच्या हिंदवी स्वराज्यास सुरुवातीस भरघोस पाठिंबा दिला. परंतु द्रव्याची टंचाई दिवसेंदिवस अधिक भासू लागली. मार्टीनच्या

१ ऐतिहासिक सं. निबंध (खं. ५, पृ. ९२ मार्टीन डायरी, पृ. ६४).

२ कित्ता, मार्टीन डायरी, पृ. ६७.

३ कित्ता, मार्टीन डा., पृ. ५१, जेधे शकावली शि.च.प्र., पृ. ३५-३७.

रोजनिशीत खालीलप्रमाणे प्रयत्न करून द्रव्य मिळविण्याच्या नोंदी सापडतात. द्रव्य मिळविण्यासाठी राजाराम महाराजांच्या प्रधान मंडळाने अनेक प्रयत्न केले. जिंजीत आल्यावर एक हुकूम काढून सर्व नोकर-चाकरांस व सरदारांस, पाळेगारांना फर्माविले की, त्यांनी राजाराम महाराजांचे दर्शन घ्यावे व दर्शनाच्यावेळी राजाच्या चरणी मोठा नजराणा ठेवावा. शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ संताजी भोसले यांनी राजाराम महाराजांस एक हजार पगोडे नजर केले. फ्रेंच आणि डच यांनी प्रत्येकी चौदाशे पगोड्यांचा ऐवज नजराणा म्हणून दिला. इंग्रजांनी मात्र ६०० पगोडे किमतीचा नजराणा दिला. त्याशिवाय राजाराम महाराजांनी दर्या किनाऱ्यावर सहल काढून नजराण्याच्या रूपाने पैसा गोळा करण्याचा प्रयत्न केला.[१] मार्टीन डिसेंबर १६८९ च्या रोजनिशींत लिहितो की कारभारी प्रल्हादपंताने पैसे जमविण्यासाठी एक न्यायासन उभारले. त्यापुढे पूर्वीच्या अमलातील सर्व ब्राह्मण व इतर अंमलदारांस आणून त्यांजकडून पैशाची मागणी केली. नंतर व्यापारी, सावकार, दुकानदार ज्या कोणाजवळ पैसा आहे अशी खबर लागली, त्याजकडून पंताने पैसे जमविले.[२] पण हे सहाय्यसुद्धा अपुरे पडू लागले. मोगलांनी महाराष्ट्र राज्य व्यापल्यामुळे राज्याच्या उत्पन्नात बरीच घट झाली होती. तेथून मदत येण्याची आशा नव्हती त्यामुळे जिंजीतील सैनिक चाकरी सोडून जाऊ लागले व इतरांनी जिंजी प्रदेशांत लूटमार वगैरे करून आपला निर्वाह करून घेण्याची खटपट केली. मार्टीनची डायरी सांगते की, " जिंजीस उघड लूट चाललेली आहे. लष्करास पगार नाही. लष्करी लोक दुकानात व कोठारांत शिरून वाटेल तो माल घेऊन जाऊन धनिकांकडून पैसा उकळतात. शत्रू मुलुखाप्रमाणे आपल्या मुलखाची नासधूस चालली आहे ".[३] राजाराम महाराज जिंजीस जाण्यापूर्वी हरजीराजे महाडीकांनी मुघली सरदारांशी झुंज देऊन कुतुबशाहीचा कर्नाटकातील मुलूख जिंजीच्या राज्यांत सामावून घेतला होता. कुतुबशाही मोगलांनी

१ कित्ता मार्टीन, पृ. ६९.

२ राजवाडे, म. इ. सा. खं. १५, ले. २८२.

३ ऐ.सं.नि.खं. ५, मार्टीन, जाने. १६९०, पृ. ७५.

घेतल्यामुळे कर्नाटकातील राजे पाळेगार यांच्यात भीतीचे वातावरण पसरले होते. त्यांना मोगलांचा शत्रू राजाराम महाराज कर्नाटकात आल्यामुळे एक प्रकारे आधार वाटला. व सर्व हिंदूनी मिळून मोगली सत्तेला पायबंद घालावा असे ठरविले. तंजावरच्या एंकोजीराजांचे पुत्र शहाजी राजे यांनी आपल्या जवळच्या नातेवाईकास मदत म्हणून सैन्य व द्रव्यही पुरविले. राजाराम महाराजांनी मोगलांकडून फुटून ससैन्य येणाऱ्या अधिकाऱ्यास आपल्या चाकरीत ठेवून त्यांची मदत घेंतली.[१] (बेंद्रे पृ. १५१)

शिवाजी महाराज व संभाजी यांनी युरोपीयन व्यापारी डच, इंग्रज, फ्रेंच यांना त्यांची सत्ता स्वदेशांत वाढू नये म्हणून वखारी भोवती मर्यादित स्वरूपाची तटबंदी उभारण्यास बंदी केली होती. असे असता राजाराम महाराजांचा प्रतिनिधी प्रल्हाद पंत याने ह्या परकीय वखारवाल्यांकडून लाखो रूपयांचे नजराणे घेऊन त्यांना त्यांच्या वखारी भोवती तट उभारण्यास इतकेच नव्हे तर मजबूत किल्ले व त्यांच्या सभोवतातील २-३ मैलांतील शहरे व खेडी त्यांच्या खास मालकीची करून दिली, मराठी राज्यांत इंग्रजांच्या मालावरील जकात माफ केली.[२] वरीलप्रमाणे पैशांची टंचाई भरून काढण्यासाठी राजाराम महाराजांच्या सुभेदाराने कर्नाटकातील आपल्या ताब्यातील गडांची विक्री इंग्रज, फ्रेंच व डच व्यापाऱ्यांना केली यांची माहिती फोर्ट सेंट जॉर्जच्या १ मे व ७ मे १६९० या दिवशी झालेल्या सभेच्या वृतांत मिळते.[३] जिंजी किल्ला घेऊन राजाराम महाराजांस पकडण्यासाठी झुल्फिकार खानाची नेमणूक झाली होती. मार्टीन म्हणतो की, " रामचंद्र पंतानी राजाराम महाराजांस खुशाल चैनीची चटक लावली. पहिल्या तीन महिन्यात त्याने तीन-चार स्त्रियांशी राजाराम महाराजांचे विवाह जमविले. हिंदूचा कोणताही समारंभ म्हटला की त्यास नर्तकी तर अवश्य पाहिजेत. प्रल्हाद पंताने नर्तकींचे तांडे राजाराम महाराजांस आणून दिले. मग त्यांच्या उपभोगास सीमा काय ? "[४]

१ बेंद्रे, राजाराम महाराज, पृ. १५१.

२ रेकॉर्डस् ऑफ फोर्ट सेंट जार्ज, डायरी अॅन्ड कन्सल्टेशन बुक ऑफ १६९०, पृ. ७१-७२, ७६.

३ कित्ता.

४ फ्रॅन्सिस मार्टिनच्या रोजनिशीतील उतारे, ऐ.सं. निबंध खंड, पृ. ९३.

राजाराम महाराज अनेक संकटांना तोंड देत जिंजीस २ नोव्हेंबर १६८९ रोजी पोहचले. हे औरंगजेब बादशहास त्याचा मुक्काम कोरेगावास असता समजले. यावेळी झुल्फिकार खान रायगडावर होता त्यास कोरेगावला आपल्याकडे बोलावून घेतले. झुल्फिकार खान रायगडाहून निघाला तो २३ नोव्हेंबर १६८९ रोजी कोरेगावास बादशहास भेटला. त्यानंतर महिना-पंधरा दिवसांच्या आतच औरंगजेबाने झुल्फिकार खानला जिंजीकडे पाठविले. झुल्फिकार खान कूच करीत रायचूरला आला. रुहुल्लाखान हा रायचूरला वेढा घालून होता. झुल्फिकार खानच्या फौजेत सय्यद कबीर, महम्मद जाहिद इत्यादी सरदार होते. त्यानंतर झुल्फिकार खान जिंजीला रवाना झाला. तो गुरमकोंडा येथे पोचला. हा किल्ला त्यावेळी मराठ्यांच्या ताब्यात होता. तो जिंजीच्या अलीकडे ६० मैलांवर आहे. मराठ्यांचे सरदार इस्माईल मक्का, अचप नायर वगैरे सरदार जमीनदार एक झाले. त्यांच्यापाशी असंख्य सैन्य होते. त्यांनी झुल्फिकार खानावर चाल करून एकच गर्दी केली. झुल्फिकार खानाकडे सैन्य थोडे होते, पण त्याने लढाई जिंकली. मराठ्यांचा पराभव करून तो पुढे रवाना झाला. शत्रूंचे अनेक किल्ले आपल्या ताब्यात आणून तो जिंजीच्या किल्ल्याच्या पायथ्याशी सप्टेंबर १६९०त पोहोचला.[१]

जिंजीचा घेर तीन मैलांचा, शिवकांची व विष्णुकांची अशी दोन देवालये जिंजीस प्रसिद्ध आहेत. ती भव्य असून त्यांची तटबंदी बळकट व विस्तार दांडगा आहे. जिंजीचा किल्ला तीन टेकड्या व्यापून आहे. त्या टेकड्या म्हणजे राजगिरी, कृष्णागिरी आणि चंद्रायन दुर्ग या होत. झुल्फिकार खानाने चंद्रायन गिरीच्या दिशेने मोर्चे बांधावयास सुरुवात केली. वास्तविक पहाता किल्ल्याच्या मुख्य दरवाजाच्या दिशेने मोर्चे बांधण्यास हवे होते, त्याने चंद्रायन दुर्गाच्या पायथ्याशी तोफा आणून उभ्या केल्या.[२] दोन्हीकडून तोफांचा मारा सुरू झाला, पण १६९१ चा पावसाळा सुरू झाला. पाऊस फार पडू लागला. सैनिकांना रोज टेकड्यांवरून ये-जा करावी लागे.

---

१ सेतुमाधवराव पगडी, मोगल आणि मराठे, पृ. १०२-१०३.

२ ज. सरकार, औरंगजेब भा. ५, पृ. ५५-५६.

लष्करात धान्याची कमालीची महर्गता झाली. मोर्चात दिवसरात्र काळ काढावा लागल्यामुळे व अन्न टंचाईमुळे कमालीचे हाल होऊ लागले. रावदलपतला मोर्चा बंदोबस्ताचे काम दिले. तोफखान्याचा अधिकारी महमद मोमीन याने टेकड्यांच्या कुशीत निवाऱ्याच्या जागा बांधून काढल्या होत्या. याशिवाय टेकड्यांच्या आसऱ्याने त्याने प्रशस्त दालने तयार करविली होती. त्या स्थळापासून लष्कराभोवती चोवीस तळी पसरलेली दिसत. पावसामुळे तर भोवतालचा प्रदेश पाण्याखाली बुडाल्याप्रमाणे वाटे. महंमद मोमीन यास जवळच असलेल्या दुसऱ्या मोर्चावर पाठविण्यात आले. मराठ्यांनी ह्या संधीचा फायदा घेऊन किल्ल्याबाहेर येऊन मोगल सैन्यावर रात्री हल्ला केला हे समजल्यावर महंमद मोमीन, खानबहाद्दूर आणि दलपतराय हे हल्लेखोरांस सामोरे जाऊन त्यांनी हल्ला परतवून लावला. मराठे मोगलांची जादा माणसे पाहून किल्ल्यात परत गेले. दलपतरायने खंदकांचा ताबा घेऊन ते आपल्या देखरेखीखाली आणले[१].

औरंगजेबानेही आपल्या सैन्यासह १८ डिसेंबर १६८९ रोजी कोरेगाव सोडले आणि विजापूरजवळ असलेल्या कृष्णाकाठच्या गलगली येथे आपली छावणी कायम केली. तेथे तो इ. स. १६९५ च्या मार्च महिन्यापर्यंत होता. गलगली कृष्णाकाठावर आहे. तिथे छावणी करण्याचा हेतू असा असावा की स्वराज्यांतून तामिळनाडूकडे जाणाऱ्या मराठा सैन्याला अडवून धरणे आणि तामिळनाडूमधील मोगल सेनापतीना मदत करणे. पण औरंगजेबाचे हे स्थलांतर मराठ्यांना अतिशय उपकारक ठरले असे म्हणावे लागेल. कारण औरंगजेब व झुल्फिकार खान हे स्वराज्यांच्या बाहेर गेले. त्यामुळे मराठ्यांना आपली गनिमी काव्याची युद्धे महाराष्ट्रात करण्यास अवसर मिळाला. ह्या वेळी मोगलांनी मराठ्यांचे किल्ले ताब्यात घेतले होते. स्वराज्यात मोगलांनी ठाणी बसविली. हे सर्व झाले तरी मराठी सैन्ये शाबूत होती. सैन्याचा मोड झाला नव्हता. हे लक्षात ठेवून मराठे नेत्यांनी आपआपले लष्करी आणि राजकीय डावपेच आखले.

१ खोबरेकर, तारिख इ. दिलकशा पृ. १८३ ; जदुनाथ सरकार, औरंगजेब भा. ५, पृ. ६१.

झुल्फिकार खानाजवळ एवढा अवाढव्य गड जिंकून घेण्यासाठी लांब पल्ल्याच्या तोफा नव्हत्या व भरपूर दारूगोळाही नव्हता. त्याने १९ सप्टेंबर १६९० त मद्रास इंग्रजाकडे २०० मण दारूगोळा आणि ५०० पायदळाची मागणी केली. कालांतराने ५०० मण दारू पावडर व दारूगोळे ५०० पायदळ आणि ३० तोफजाणकार यांची मागणी केली. नोव्हेंबर ९० मध्ये झुल्फिकार खानाने फ्रेंच कंपनीकेडेही दारूगोळा आणि युरोपियन सैनिकांची मागणी केली. इंग्रज कंपनी व फ्रेंच कंपनीतील सुमारे १०० सैनिक मोगलांच्या मोठया पगाराला भाळून जिंजीच्या वेढ्यांत सामील होण्यासाठी मोगलांच्याकडे गेले. अशा रीतीने झुल्फिकार खानाने छावणी मजबूत केली.[१]

एप्रिल १६९१ मध्ये जिंजीस वेढा घालणाऱ्या मोगल सैन्यांत फार वाढ झाली. त्यांना मुबलक रसदही मिळू लागली. तेव्हा लोकांचा समज झाला की जिंजीचा पाडाव लवकर होणार पण किल्ल्यात जाणारी रसद मोगल सैन्याकडून थांबविली जाणे अशक्य झाले. त्याबरोबरच मराठा सैन्य वेढा घालून बसलेल्या मुघल सैन्यांवर जोराचे हल्ले करू लागले.[२] नोव्हेंबर १६९० त मराठे सरदार नेमाजी शिंदे, माणकोजी पांढरे आणि नागोजी माने यांनी पश्चिम महाराष्ट्रात असताना मोगलांचा त्याग केला आणि ते २००० घोडेस्वारासह जिंजीस राजाराम महाराजांस येऊन भेटले, त्यांनी किल्ल्यांच्या चमापुरी भागाचे संरक्षण करण्याची जबाबदारी उचलली. कर्नाटकातील लहान मोठ्या पाळेगारांना मोगलांविरूद्ध लढण्याची हाक दिली. पण पाळेगारांच्या आपसातील भांडणामुळे त्यांची एकी होऊन राजाराम महाराजांस मदत मिळू शकली नाही. मात्र तंजावरच्या शहाजीराजाने पैसा, माणसे यांची मदत महाराजांस जिंजी मोगलांच्या ताब्यात जाईपर्यंत केली.[३] भीमसेन सक्सेना म्हणतो, " झुल्फिकार खानाबरोबर असलेले

---

१ रेकॉर्डस् ऑफ फोर्ट जार्ज, डायरी कन्स्लटेशन बुक ऑफ ६९१, पृ. ६०-६१ ; बेंद्रे, छ. राजाराम म., पृ. १२६.

२ मार्टीन, भा. ३, पृ. १३५.

३ जदुनाथ सरकार, औरंगजेब, भा. ५, पृ. १५२.

अनेक मराठे मनसबदार त्याला सोडून राजाराम महाराजांस मिळाले. त्यामुळे झुल्फिकार खानापाशी फार थोडे सैन्य राहिले. त्यांच्या लष्करात भयंकर धान्य टंचाई भासू लागली. बादशहाने सय्यद लष्कर खान यास आज्ञा केली की तुम्ही हुजूरातून खजिना आणि असदखान याजकडून धान्य घेऊन झुल्फिकार खानापाशी पोहोचावे. त्याप्रमाणे सय्यद लष्कर खानाने केले. त्यामुळे लष्करांतील रसदीची चणचण कमी झाली. झुल्फिकार खानाने कांचीचा फौजदार अलीमर्दानखान यांस आपल्याकडे बोलावले आणि आपली छावणी मजबूत केली. तंजावर व त्रिचनापल्ली ही राज्ये जिंजीपासून ६० कोस अंतरावर आहेत. त्या मुलुखावर आक्रमण करण्यासाठी झुल्फिकार खान निघाला (ऑगस्ट १६९१) तेथील जमिनदारांकडून खंडण्या घेऊन तो परत आला. [१]

जिंजीचा वेढा चालू असता कर्नाटकात गुलबर्गा जिल्ह्यातील बेडर जमातीने डोके वर काढले. त्यांचा वाकिणखेडा हा किल्ला जिंकून घेण्यासाठी औरंगजेबाने शहाजादा कामबक्ष यास रवाना केले. (२७ मे १६९१) पण वेढा अर्धवट टाकून शहाजाद्यास जिंजीला जाण्यासाठी बादशहाने सांगितले. वाकीणखेडा लढ्याचे काम चालविण्यासाठी बक्षी रुहुल्लाखान याला पाठविण्यात आले. या वेढ्यात मोगलांतर्फे लढत असता रणमस्त खान ऊर्फ बहाद्दूर खान गोळा लागून ठार झाला. बेडराशी कसाबसा तह करून रुहुल्ला खान हा डिसेंबर १८, १६९१ रोजी बादशहाकडे परत आला.[२] येणे प्रमाणे सन १६९१ चे साल संपले.[३]

१६९२ मधील जिंजीचा वेढा :

१६९२ च्या सुरुवातीस झुल्फिकार खानने राजाराम महाराजांकडे असलेल्या ईस्माईल खान मका ह्या सरदारास मोगलांकडे ओढले, झुल्फिकार खानाने आपला मुलगा हिंमतखान यास धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांस वश करून मोगली चाकरीत येण्याबद्दल खटपट करण्यास सांगितले, परंतु त्याचे प्रयत्न निष्फळ ठरले.

---

१ सेतुमाधवराव पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. १३४.

२ खोबरेकर (सं.) तारिके-दिलकशा, पृ. १७८-७९.

३ सरकार, औरंगजेब भा. ५, पृ. ५९.

तंजावरच्या शहाजीराजाने राजाराम महाराजांकडे मोठी रक्कम पाठविली होती. त्यामुळे जिंजीच्या बचावास बराच जोर चढला. कृष्णा अंताजीने १६९२ च्या जानेवारींत लढाई करून व्हिलेनुरातून मोगलांस काढून लावून ते ठाणे काबीज केले. कामबक्ष जिंजीस आल्यानंतर तो वेढ्यात सामील झाला. वेढा १६९२ च्या फेब्रुवारीत बराच कडक बनला.[१] याचवेळी जिंजीच्या सहाय्यार्थ दक्षिणेतून नवीन मराठी फौज येत असल्याचे जिंजीतील मराठ्यांस समजले, तसेच बादशहाने महाराष्ट्रात काबीज कलेली मराठ्यांची ठाणी ते भराभर परत जिंकून घेत असल्याची बातमी जिंजीस कळली. तेव्हा जिंजीतील मराठ्यास नवीन हुरुप चढला. त्यांनी मोगलांच्या लष्करावर दोन तीन छापे घातले, तर झुल्फिकार खान मराठ्यास अनुकूल असल्याची दाट वदंता ऐकू येते असे मार्टीन लिहीतो.[२]

१ मार्च रोजी मराठ्यांची आणि मोगलांची एक चकमक पांडेचरी जवळ उडाली. मराठे धान्य विकत घ्यायला आले होते. त्यांचा झगडा २०/२५ दिवस चालूच राहिला. याच महिन्यात झुल्फिकार खान तीन हजार स्वार घेऊन मुलुखात लूट करण्यास गेल्याचे पाहून मराठे सरदारांनी मोगलांचे घोडे, दारू सामान अशी पुष्कळशी सामुग्री पकडून घेतली.[३] १६९२ च्या एप्रिल मध्येही मराठे-मोगलांच्या झटपटी चालू होत्या.[४]

मे, जून मध्ये सुद्धा चकमकी, जाळपोळ, लूट हे प्रकार चालूच होते. जुलैमध्ये मोगलांनी एका बुरूजास खिंडार पाडले व खिंडारात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. त्यांत मुघल सैन्याचे बरेच लोक जखमी झाल्यामुळे त्यांनी माघार घेतली.[५] सप्टेंबर १६९२ मध्ये मराठ्यांनी मुघलांवर दोनदा हल्ला करून यश मिळविले. ऑक्टोबरमध्ये मोगलांच्या फौजा जिंजीच्या तटापर्यंत पोचल्या. त्यास मराठ्यांनी शौर्याने तोंड दिले. त्यामुळे जिंजी मोगलांच्या हाती लवकर येईल असे वाटत नाही असे मार्टीन लिहितो.[६]

१ मार्टीन, पृ. १८० ऐ.सं.सा.भा. ५, पृ. ९७.

२ कित्ता, पृ. १८३.

३ कित्ता, पृ. १९८.

४ बेंद्रे, छ. राजाराम, पृ. १५३.

५ मार्टीन, पृ. २०५, २/४ ऐ.से.सा.भा. ५, पृ. ९८.

६ कित्ता.

मोगलांचे लष्करावर मराठ्यांचे छापे चालूच राहिले. मार्टीन म्हणतो की राजाराम व मुघल यांचे अंतस्थ सूत आहे हे औरंगजेबास समजल्यावर बादशहाने झुल्फिकार खानास तंबी दिली की तझावे (तंबूचे कनात) कापून तुम्हास उघड्या मैदानांत बसवू.[१]

इ. स. १६९२ चा पावसाळा संपताच संताजी आणि धनाजी ह्या दोन मराठा सेनानींनी ३० हजार फौज घेऊन ते मद्रासकडे येण्यास निघाले. त्या सैन्याचा मुक्काम प्रथम कांजिवरम जिल्ह्यात झाला. मराठी सैन्याच्या आकस्मिक उग्र चालीमुळे मद्रासमधील लोकांत घबराट पसरली आणि ते मद्रास किल्ल्याच्या आश्रयास ११ ते १३ डिसेंबरमध्ये गेले. संताजीची फौज कावेरी पाकजवळ आल्याचे कळताच, कांचीचा मोगल फौजदार अली मर्दानखान त्याजवर चालून गेला. संताजीच्या जाळ्यांत तो व त्याचे सैन्य पकडले गेले. आपला काही इलाज नाही हे खानाच्या लक्षात येताच त्याने कांजीवरमला परतण्याचा प्रयत्न केला तेव्हा मराठी सैन्याने त्याला त्याच्या १५०० घोडेस्वारांसह पकडले तसेच ६ हत्ती पकडले. खानाच्या सैन्याचे तंबू लुटले, सामानही लुटले (१३ डिसेंबर १६९२) खानाला पकडून त्यास मराठ्यांनी कैद केले व त्यास जिंजीस घेऊन गेले. त्याजकडून एक लाख होनाचा जबर दंड घेऊन मराठ्यांनी सोडून दिले. ही दंडाची रक्कम त्याचा मेहुणा अलिकादीर याने उभी केली होती. हा महत्त्वपूर्ण विजय मिळवून संताजी अतिउत्साहाने जिंजीच्या पायथ्याशी आला. तेथे मोगल आणि मराठे यांच्या युद्धास तोंड लागले. धुमश्चक्रीची युद्धे सुरू झाली. मराठ्यांचे सैन्य ३० हजाराहून अधिक होते. मोगल फौज थोडी होती. त्यापैकी बरीच फौज छावणीचे रक्षण आणि शहाजाद्यांवर पहारा करण्यात गुंतली होती. काही फौज असदखानाच्या तैनातीत होती. मोगली सैन्यास संताजीच्या फौजेच्या कारवाईमुळे रसद मिळणे कठीण झाले. संताजी वेढा घालून बसलेला मोगल सैन्यास घेरून त्यांचा रसद आपल्या कबजांत घेऊन त्यांना जिंजीचा वेढा उठविणे भाग करून कसे टाकले हे मार्टीन डायरीवरून समजून घ्यावयास हवे.

१ ऐ. सं. नि. खंड ६, मार्टीन पृ. २६६.

डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यांत औरंगजेबाचा मुलगा कामबख्श आणि वजीर असदखान हे झुल्फिकार खानाच्या मदतीसाठी १६ डिसेंबर १६९२ रोजी जिंजीस पोहोचले. त्यांच्या छावण्या झुल्फिकार खानाच्या छावणीपासून दीड कोसावर होत्या. २० तारखेस सेनापती धनाजी जाधव आठ हजार स्वारांसह जिंजीस दाखल झाला. जिंजीच्या पश्चिम दरवाजापुढे त्याचा मोगलांशी मुकाबला झाला. मराठे रोज रात्री शहाजाद्याच्या छावणीत घुसून बाण (रॉकेट) फेकीत. हे त्यांचे कमालीचे धाडस फ्रेंचास समजले. एके रात्री पाच-सहा हजार मराठे स्वार जिंजीच्या किल्ल्यांतून बाहेर पडले आणि मोगल सैन्यावर हल्ला चढविला. हे पाहून झुल्फिकार खान, रायदलपत आणि इतर सरदार घोड्यावर स्वार होऊन मराठ्यांवर तुटून पडले. झालेल्या युद्धांत मराठ्याचे अनेक लोक मारले गेले. पण धोका टाळण्यासाठी कामबख्श व वजीर असदखान यांनी आपली छावणी हलवून झुल्फिकार खानाच्या शेजारी नेली.[१] ह्यावेळी कामबक्षाने राजाराम महाराजांशी पत्रव्यवहार गुप्तपणे सुरू केला. आम्ही तुमचे सहाय्यास येतो घाबरू नये असा मजकूर पत्रांत होता. ही पत्रे झुल्फिकार खानास सापडली त्याने बादशहाकडे यासंबधी काय करावे म्हणून विचारणा केली. तेव्हा बादशहाने कामबक्षास पकडून कैदेत घालावे असा हुकूम दिला. त्याप्रमाणे खानाने त्यास अटक केली.[२] मोगलांचे प्रचंड सैन्य जिंजीच्या भोवती गोळा झाले हे रामचंद्रपंतास कळताच त्याने स्वराज्यात सैन्ये उभारून ती धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांच्या नेतृत्वाखाली जिंजीकडे रवाना केली. संताजी उत्साहाने जिंजीच्या पायथ्याशीं आला. तेथे मोगलांकडे येणारी रसद व युद्ध सामुग्री व्यवस्थित पोचविण्याचे कामावर अली मर्दानखान याची नेमणूक जिंजीबाहेरच्या मैदानात होती. या महिन्यात खान पुष्कळसे सामान मोगलांसाठी आणीत आहे. ही बातमी सेनापती संताजी घोरपडे यांस मिळताच त्या हिकमती लढवय्याने युद्धाचे डाव पूर्ण ओळखून आणि मोगलांच्या हालचालींची बातमी पक्की मिळवून त्यांच्या वाटा रोखून धरल्या. समग्र क्षेत्राची रचना

१ खोबरेकर (सं), तारिके दिलकशा, पृ. १८५-१८६.

२ मार्टीन, पृ. २६७, ऐ.सं.नि. ५. पृ. ९८-९९.

पूर्ण लक्षात घेऊन मोगलांस कोठे कसें अडवता येईल याची सूक्ष्म कल्पना त्यांच्या मनांत बिंबली आणि मोगल आपल्या आटोक्यात आले अशी खात्री होताच त्यांनी आपला एक लष्करी भाग हूल दाखविण्यासाठी मागे फिरविला आणि जवळ फक्त दोन-तीन हजार स्वार घेऊन अलिमर्दानखानाशी सामना देण्यास आले. खानाला वाटले आपण मराठ्यांना सहज नरम करू. अशा भावनेने खान संताजीवर चालून गेला. संताजीने पड घेतल्याचा देखावा केला, आणि मोगलांना अशा बिकट जागी आणिले की त्याची राखीव तुकडी एकदम चालून आली. त्यांनी खानास लगेच पूर्णपणे वेढून घेतले. कित्येक तासपर्यंत हातघाईचा संग्राम दोघांचा झाला. संताजीकडे सैनिक थोडे असता खानाचा पाडाव झाला. तो स्वतः त्याचे पुष्कळसे सरदार कित्येक व्यापारी खानाला आश्रयाने माल घेऊन चालले होते ते सर्व, शिवाय पाच हत्ती, तीनशे घोडे, मोगलांचा समस्त अजबाब, त्याचे सर्व काही वित्त व सामान व जनावरे ही सर्व मराठ्यांचे हातांत पडून सेनापती संताजीने खुशाल जिंजीच्या किल्यांत पोचविली. मोगलांकडून काही अटकाव झाला नाही. मोगलांना यामुळे विशेष धोका उत्पन्न झाला. त्यांनाच वेढा पडला असून बचावाची पंचाईत वाटू लागली. धान्य, सर्पण, जनावरांचा चारा या सर्वांची टंचाई मोगलांना तीव्र भासू लागली.[१] नवीन आलेल्या मराठ्यांचे सैन्य तीस हजारांवर गेले.[२] त्यामुळे मोगली सैन्यासच वेढ्याचा धोका उत्पन्न झाला. त्यांना बचावाची पंचाईत वाटू लागली. झुल्फिकार खान जिंजीहून १२ कोसांवर असलेल्या वांदीवाशहून रसद आणण्यास आपल्या सरदारांसह गेला होता. वांदिवाशला तो रात्री पोहोचला. तेथून दुसऱ्या दिवशी वंजाऱ्यांना घेऊन निघाला. त्यावर मराठ्यांनी चोहीकडून हल्ले करण्यास सुरुवात केली. त्यांनी निकराचे हल्ले चढविले. इतक्या गोळ्या झाडल्या की मोगल सैनिक आणि सैन्याबरोबर असलेले वंजारी हवालदिल झाले. झुल्फिकार खान आणि रायदलपत हे लढत

१ कित्ता, ऐ. सं. नि. मार्टीन, पृ. ९९-१००.

२ फोर्ट सॅंट डेव्हीड व्हा. ९ नं. ४८, पृ. १०९-१११.

झगडत मोठ्या कष्टाने आपल्या छावणीत पाहोचले.[१] उपासमारीने मोगल सैन्याची परिस्थिती अत्यंत कठीण झाली.माघार घेण्याचीही सोय राहिली नव्हती. उपासमारीमुळे मुघल फौज तेथून निघून जाऊ लागली. तेव्हा मोगलांनी जिंजीचा वेढा १६९३ च्या जानेवारींत उठविण्यांचे ठरविले.[२] झुल्फिकार खान व आसदखान यांनी आपले वकील राजाराम महाराजांकडे पाठवून आपणांस बिनविरोध परत जाऊ द्यावे अशी मागणी केली.

संताजी घोरपडे आल्यावर जबाब देऊ असे सांगण्यात आले. परंतु जुलफीकार खानाने राजाराम महाराजांस एक लाख रुपये घेऊन-भरून बिनविरोध परत जाऊ देण्याची परवानगी मिळविली. शिवाय ६० हजार पगोडे किंमतीचे जडजवाहीर खानाने राजारामास दिले. उलट राजाराम महाराजांनी खानास पंधरा हजार पगोड्यांचे जवाहीर, एक हत्ती, दोन घोडे, पुष्कळशी उंटे आणि सामानाकरिता २००० बैल, असा नजराणा देऊन खानास निरोप दिला. १६९३ च्या २२ जानेवारीस झुल्फिकार खान याने जो सल्ला घडवून आणला त्यात लढाई थांबविण्याचे कलम नव्हते. तसे करणे बादशहाच्या हाती होते. सल्ला करून चंदीचा वेढा काढून दिनांक २३ जानेवारी १६९३ रोजी वांदिवाशला निघाले.[३] उपासमारीमुळे लष्करातील घोडे, उंट इत्यादी ओझे वाहाणारी जनावरे नष्ट झाली होती. बहुतेक सैनिकांनी आपले सामान जाळून टाकले. सैनिक गोंधळलेले व बावरलेले होते. जो-तो आपल्यापुरतेच पाहत चालू लागला. मोगल फौजेतील सगळे सामान सामग्री सरदारांचे सरंजाम जेथल्या तेथे पडून राहिले. मोगल सैन्य छावणीतून बाहेर पडल्यावर सुमारे एक हजार मराठे स्वार सैन्याच्या मागे मागे येऊ लागले. त्यांनी मोगल सैन्याचे बाजार बुणगे आणि सामान सुमान

१ सेतुमाधवराव पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. १४५.

२ बेंद्रे, श्री. छत्रपती राजाराम महाराज, पृ. १४५.

३ ज. सरकार, हाऊस ऑफ शिवाजी, ३री आ., पृ. २४७-२४८.

मनसोक्त लुटले. तीन दिवसांनंतर मोगल सैन्य वांदिवाशला आले.[१] इतक्यात कर्नाटकचा फौजदार कासीमखान रसद घेऊन कावेरी पाकला आला त्यावर संताजीने हल्ला चढविला. पण कासीमखानने कांचीच्या देवळात आश्रय घेतला म्हणून तो बचावला नाही- तर कैद झाल्याशिवाय राहिला नसता. झुल्फिकार खानने शहाजादा कामबक्ष यास वांदिवाशच्या किल्ल्यात सुरक्षित ठेवले. आणि तो कासीम खानच्या मदतीस गेला. त्याने वंजाऱ्याना दिनांक ७ फेब्रुवारी १६९३ रोजी रसदीबरोबर सुरक्षित आणले. झुल्फिकार खान याने वांदिवाशाला आपला तळ दिला.[२] मार्टीनच्या भाष्याप्रमाणे झुल्फिकार खानास जिंजी ताबडतोब सर करण्याचे सामर्थ्य होते, पण तसा प्रयत्न त्यांनी न करता तो वेढा लांबणीवर टाकत होता. हे उपकार स्मरून राजाराम महाराजांनी त्यास युद्ध तहकुबीची सवलत दिली.[३]

राजाराम महाराज व झुल्फिकार खान यांचेमध्ये झालेला हा व्यवहार बाहेरील मराठा सेनापती व लढणाऱ्या सरदारांना कळला. तेव्हा ते राजाराम महाराजांवर रुष्ट झाले व ह्या बाबतीत महाराजांनी आमचा सल्ला न घेता प्रधानाच्या सांगण्यावरून हा निर्णय घेतला हे त्यांना रुचले नाही. त्यांचे असे म्हणणे पडले की आम्ही युद्ध लढतो तर आम्हास एका शब्दाने तरी विचारावे की नाही? प्रधानांनी लाच खाऊन खिसे भरावे आणि आम्ही मात्र मरावे. १६९३ च्या मार्च मध्ये बहिरजी घोरपडे व याचम्मा नायक राजाराम महाराजांवर राग धरून गेले.[४] संताजी घोरपडे रुसून जिंजीहून काही कोस बाहेर जाऊन बसले.

राजाराम महाराजांनी संताजीची समजूत घालून त्याचा रुसवा घालविला. संताजीस महाराजांनी कळविले की झुल्फिकार खानाचा व माझा गुप्त करार झाला आहे की, बादशहा आता फार दिवस वाचत नाही. त्याचे

---

१ खोबरेकर (सं), तारिक इ. दिलकशा, पृ. १८८-१८९.


२ कित्ता.

३ मार्टीन. २८५-२८७ ऐ.सं. नि. खं. ५, पृ. १०१.

४ लेटर्स फ्रॉम फोर्ट सेंट जॉर्ज, व्हा. ५ (१६९३-१६९४), पृ. १.

पश्चात गोवळकोंड्याचा प्रदेश झुल्फिकार खानाने घ्यावा व विजापूरचा राजारामाने घ्यावा. संताजीस भेटून व त्यास बक्षीस देऊन राजाराम महाराजांनी त्याचे तात्पुरते समाधान केले. त्यानंतर संताजी घोरपडे महाराष्ट्रात गेला. अशाप्रकारे अठ्ठावीस महिने चाललेला जिंजीचा संग्राम संपला.[१] (फेब्रु. १६९३).

□□



वेलोर

[१] मार्टीन, पृ. २८६ ऐ.सं.नि.खं. ५, पृ. १०२.

४६. राजाराम महाराजांच्या जिंजी वास्तव्यात मराठ्यांच्या कर्नाटकातील हालचाली व जिंजीहून पलायन

झुल्फिकार खान वांदिवाशला :

जिंजीचा वेढा उठवून झुल्फिकार खान ७ फेब्रुवारी १६९३ रोजी वांदिवाशला येऊन राहिला. येताना त्याने मराठ्यांच्या छळापासून कासिमखानचे रक्षण करून त्यासही आपल्याबरोबर वांदिवाशला आणिले. झुल्फिकार खान वांदिवाशला (७ फेब्रुवारी ते मे १६९३) पर्यंत चार महिने जिंजीच्या वेढ्यांतून मुक्त होऊन राहिला. तिथे राहून तो बादशहाच्या हुकूमाची वाट बघत राहिला. त्या प्रांतातील पाळेगार आणि जमीनदार हे रसद आणणारे वंजारी आणि प्रवासी यांना लुटण्याचा उद्योग करीत होते. त्याचा मोड करण्यासाठी झुल्फिकार खान हा कासिमखान यास बरोबर घेऊन निघाला. त्याने तामिळनाडूमधील जमीनदारांची बंडे मोडण्यात यश मिळविले. पुंड पाळेगारांनी काही किल्ले बळकाविल्याचे झुल्फिकार खानास समजले. त्यांना तंबी देण्यासाठी झुल्फिकार खान रवाना झाला. त्याने प्रथम पेरुमुक्कल (पाँडिचरीपासून अठरा मैलांवर) च्या किल्ल्यावर हल्ला चढविला. या हल्ल्यात रायदलपतच्या राजपुतांनी बराच पराक्रम केला. ते किल्ल्यांच्या तटांवर चढले आणि किल्ल्यातील अनेक लोकांना त्यांनी ठार मारले (फेब्रुवारी १६९३) त्यांनी किल्ला जिंकून घेतला.[१] पेरुमुक्कल जिंकून घेतल्यानंतर मोगलांनी अनेक किल्ले आपल्या ताब्यात आणले. बरेचसे किल्ले म्हणजे प्रचंड देवालयेच होती.

तंजावरचा पाडाव :

त्यानंतर झुल्फिकार खानाने तंजावरावर स्वारी केली. मोगल सैन्य तंजावर जवळ मार्च १६९३ ला पोचले. त्रिचनापल्लीच्या राजाने आपला

---

[१] तारीख-इ-दिलकशा (संपादक, खोबरेकर). पृ. १९४.

कारभारी याजबरोबर आपले सैन्य देऊन झुल्फिकार खानाकडे पाठविले. बरोबर खंडणी पाठविली आणि खानाला विनंती अर्ज पाठविला तो असा, " तंजावर राजाने माझा काही मुलूख व किल्ले बळकाविले आहेत. आपण ती त्यांच्याकडून सोडवून द्यावीत." झुल्फिकार खानाने अनेक किल्ले आणि ठाणी जिंकून घेऊन त्रिचनापल्लीच्या राजाच्या हवाली केली.

यानंतर झुल्फिकार खानाच्या सैन्याने तंजावर शहरावर हल्ला केला. रायदलपत याची आणि तंजावर सैन्याची चकमक झाली. त्यांत तंजावरची अनेक माणसे ठार झाली. हे पाहून तंजावरच्या शहाजी राजाने घाबरून योग्य ती खंडणी पाठविली. झुल्फिकार खानाने तंजावर राजा बरोबर चाळीस लाख चक्रे घेऊन सल्ला केला (१५ एप्रिल ते १२ मे १६९४). तंजावरशी निगडित असलेल्या पालमकोटा येथील अधिकाऱ्यांकडून खंडणी मागितली. त्याने निरनिराळी कारणे सांगून ती देण्याची टाळाटाळ केली. झुल्फिकार खानाने तंजावरहून परत येताना पालमकोट्याला वेढा घातला. तो सहा दिवस चालला. रायदलपतने किल्ल्याच्या समोर असलेली गढी काबीज केली तेव्हा किल्यातील लोक मोगलास शरण आले. किल्ल्यातील माणसांना मोगलांनी अभय दिले.[१]

पालमकोटा जिंकून घेतल्यावर झुल्फिकार खान परत फिरला. त्याने वेतावळच्या जंगलात ठाणी बसविली.[२]

याच्चमा नायक या सरदाराच्या निष्ठेविषयी झुल्फिकार खानाला संशय आला. त्याने बादशहाकडे यासंबंधीचा वृत्तांत दिला. बादशहाची आज्ञा झाली की, त्याचा वध करावा. झुल्फिकार खानाने सल्ला मसलतीला म्हणून नायकाला बोलावून दुसऱ्या दिवशी त्यास ठार केले (सप्टेंबर १६९४). याच्चमा नायकाची सगळी मालमत्ता लुटण्यात आली.[३]

झुल्फिकार खानाने जिंजीचा वेढा उठवल्यावर संताजीने त्रिचनापल्लीवर हल्ला करून त्या राजास नमविले. नंतर राजाराम महाराजांनी जिंजीहून

---

१ कित्ता पृ. १९६.

२ कित्ता.

३ कित्ता पृ. १९५.

निघून त्रिचनापल्लीस भेट दिली. त्यानंतर संताजीने मदुरा नायकाचा पराभव केला व त्याने राजाराम महाराजांशी १० एप्रिल १६९३ ला तह केला व मराठ्यांचे स्वामित्व कबूल केले. मराठे सैन्याने यावेळी म्हैसूर राज्यातील परमथी, नामकळ आणि धरमपुरी ह्या ठिकाणांवर ताबा मिळविला.[१] राजाराम महाराजांनी झुल्फिकार खानास जिंजीचा वेढा उठविण्याची परवानगी दिल्याचे संताजीस न आवडून तो मे १६९३ मध्ये महाराष्ट्रात गेला.[२]

ऑक्टोबर १६९४ ची शकावलीची नोंद सांगते की, राजश्री शंकराजी पंत सचिव यांनी सेनापती संताजी घोरपडे यांना जिंजीस जाऊन मर्यादेने राहून जिंजीचा वेढा उठवावा. बेमानी करू नये ऐसे बोली करून शपथ घेतली. उभयतांनी बोल करून कार्तिक मासी (ऑक्टोबर १६९४) रवानगी केली. त्याणी फौज भारी करून भांडीयांच्या (तोफांच्या) आवाजाने कूच करून मजल दर मजल कर्नाटकात गेले.[३] (७ नोव्हेंबर १६९४).

इ. स. १६९३-९४ मध्ये स्वराज्यातून मराठ्यांची प्रबळ सैन्ये उत्तरभाग आणि चित्रदुर्ग, बेल्लारी, चिट्टूर या भागात तामिळनाडूमध्ये घुसत होती. त्यांना प्रथम अडविण्याचा प्रयत्न मोगल करीत, पण शहाजादा कामबख्श व मतलबखान विजापूर कर्नाटकचा फौजदार कासिमखान (ठाणे, शिरा, उत्तर म्हैसूर) यांच्या अडथळ्याला न जुमानता धनाजी व संताजी हे तामिळनाडूमध्ये पोहोचले. स्वराज्यापासून तामिळनाडूच्या सरहद्दीपर्यंत पसरलेले मराठे सैनिक व त्यांना येऊन मिळालेले कर्नाटकातील लढाऊ बेडर शिपाई यांची संख्या ७० हजारांच्यावर होती.[४]

तामिळनाडू १६९५ :

झुल्फिकार खानाने तामिळनाडूमधील बारीक मोठी राज्ये आणि स्थळे जिंकून घेतल्यानंतर त्याने जिंजीच्या आसमंतातील अनेक किल्ले जिंकून

१ मायसोर मराठा संबंध, १७ वे शतक, पृ. १२७.

२ शिवचरित्र प्रदीप, पृ. ३७.

३ कित्ता.

४ मोगल दरबारची बातमीपत्रे, पृ. ७२.

घेतले.[१] पण जिंजीला वेढा घालण्याचे लांबणीवर टाकले. ऑक्टोबर १६९५ मध्ये मराठ्यांच्या वेलोर या किल्ल्यास त्याने वेढा घातला. हा किल्ला जिंजीच्या खालोखाल महत्त्वाचा किल्ला होय. खानाच्या वेढ्यांमुळे किल्ल्यातील शिबंदी हैराण झाली. इतक्यात धनाजी येऊन वेलोरला दाखल झाला.

झुल्फिकार खानाने आपले बाजार बुणगे व सरंजाम हे रायदलपतच्या बरोबर तेथून आठ कोसांवर असलेल्या आर्काट येथे पाठविली. आणि वेढा उठवून स्वतः धनाजीशी लढण्याची तयारी करू लागला. अशाप्रकारे लढाई न देताच धनाजी वेलोरचा वेढा उठविण्यात यशस्वी झाला.[२] (डिसेंबर १६९५) त्या वेळी धनाजीने तिरुवादी या गावी जाऊन त्या गावास वेढा घातला. तिरुवादीला सादतमंदखान हा फौजदार होता. त्याच्या मदतीस झुल्फिकार खान धावून गेला आणि धनाजीस त्या ठिकाणचा वेढा उठविण्यास त्याने भाग पाडले.[३]

मागे सांगितल्याप्रमाणे संताजी शंकराजीपंतांचा निरोप घेऊन जिंजीला जाण्याच्या उद्देशाने प्रथम हैद्राबाद प्रांतात घुसले. पण बादशहाने आपल्यावर फौजबंद सरदार रवाना केले आहेत हे समजल्यावर त्या सरदारांस चकविण्यासाठी त्याने हैद्राबाद प्रांतातून जाण्याचे सोडून तो विजापूरच्या भागांत गेला. बादशहाने हिंमतखान बहाद्दूर संताजीच्या पाठीवर सोडला. पण हिंमतखान बहाद्दूर याजपाशी संताजीचा मोड करण्याएवढे सैन्य नव्हते म्हणून त्याच्या मदतीस गाजिउद्दीनखानास पाठविण्यात आले.[४] तीस नोव्हेंबर (१६९४) रोजी हिंमतखानाने संताजी घोरपडेशी बाणूर गावाजवळ (भूपाळ गडजवळ, खानापूर तालुका, सांगली जिल्हा) लढाई केली. यात संताजीने माघार घेतली.[५] हे ऐकून बादशहाने हिंमतखानाला खिलतीची वस्त्रे व एक तलवार भेट म्हणून पाठविण्याचा हुकूम दिला.[६] जानेवारी १६९५ च्या पहिल्या आठवड्यात रायचूरजवळ हिंमतखान बहाद्दूर आणि

१ पब्लिक डिसपॅचेस टू इंग्लंड, १६९४-९६, पृ. १९.

२ शिवचरित्र प्रदीप, पृ. ३८.

३ तारीख-इ-दिलकशा, पृ. २००.

४ मो. द. बातमीपत्रे, पृ. ९७.

५ कित्ता, पृ. ९९.

६ कित्ता, पृ. १०१.

संताजीचे युद्ध झाले. त्यांत दोन्हीकडील माणसे जखमी व घायाळ झाली.[१] हिंमतखानाशी संताजीच्या ज्या लढाया झाल्या त्या निर्णायक नव्हत्या. धावपळीच्या लढाया होत्या. गनिमीकाव्यांने शत्रूशी धावत पळत लढत दिल्याचे दिसते.[२] जूनच्या सुमारास उत्तर कर्नाटकातून संताजीने आपल्या फौजेसह थेट औरंगाबादच्या दिशेने कूच केले. त्याने मानवत, अंबड व वाशिम या भागात धुमाकूळ घातला होता. त्याचे पारिपत्य करण्यासाठी अलिमर्दान खान (वऱ्हाडचा सुभेदार) ला बादशाहाचे हुकूम झाले.[३] मोगल सैन्य येण्यापूर्वीच संताजीने औरंगाबादच्या प्रदेशात धुमाकूळ घालून ठिकठिकाणी लूट केली आणि जानेवारी १६९६ च्या सुमारास उत्तरेकडे खानदेशातील धरणगावाकडे कूच केले. लवकरच संताजीने धरणगावाहून तापी तीरावरील बुऱ्हाणपुरावर झडप घातली आणि बुऱ्हाणपूर सुभेदारांकडून चौथाईची मागणी केली. अशी मागणी मान्य करणे ही नामुष्कीची गोष्ट होय म्हणून मोगली सुभेदाराने चौथाई देण्याऐवजी तो लढाई देण्यास सिद्ध झाला व आपल्या सैन्यानिशी लढण्यासाठी शहराबाहेर आला. पण त्याच्या फौजेचा टिकाव संताजीपुढे लागला नाही. मोगल फौजेचा संताजीने धुव्वा उडविला आणि तो सैन्यासह शहरात घुसला. मोगल फौजेची वाताहात झाल्यानंतर बुऱ्हाणपूर शहर संताजीच्या ताब्यात आले. संपूर्ण शहराची लूट करण्यात आली. मराठ्यांच्या हाती अमाप संपत्ती आली. बुऱ्हाणपूर लुटले गेल्याची बातमी बादशहास समजली व त्याचा संताप अनावर झाला. सुभेदाराची जाहीर बेईज्जत करण्याच्या उद्देशाने त्याच्याकडे बांगड्यांचा अहेर बादशाहाने पाठविला असे सुरतकर इंग्रज लिहितात.[४] संताजीचा पाठलाग करून त्याचा पराभव करण्यासाठी बादशाहाने गाजीउद्दीनखान या आपल्या सरदारास हुकूम दिले.[५] संताजी सुरतवर घाला घालून ती लुटणार अशा अफवा इंग्रजांना समजल्या तेव्हा त्यांनी सुरतेवरील आपल्या वखारींचे संरक्षण करण्यासाठी जादा तोफा व दारूगोळा पाठविण्यास मुंबईकर इंग्रजांना विनंती

१ कित्ता, पृ. १०६.

२ कित्ता, पृ. ११२.

३ बेंद्रे, राजाराम, पृ. २३८.

४ सुरत ते लंडन ७ फेब्रुवारी १६९५ चे पत्र, बेंद्रे, राजाराम, पृ. २३७.

५ कित्ता, पृ. २३८.

केली.[1] पण सुरतकरांच्या सुदैवाने संताजीने आपला बेत बदलला आणि सुरत ऐवजी नंदुरबार शहरांवर त्याची दृष्टी वळली. बुऱ्हाणपूर ते सुरत या मार्गावरील नंदुरबार हे महत्त्वाचे लष्करी ठाणे होते. त्या शहरास संताजीने वेढा घालून तेथील फौजदारांकडे चौथाईची मागणी केली.[2] फौजदाराने मराठ्यांशी युद्ध करण्यासाठी बादशहाकडे मदत मागितली. ती मदत येण्यापूर्वीच मराठे सैनिकांनी नंदूरबारच्या प्रदेशात मोठा धुमाकूळ माजविला आणि मोगल सैन्य येण्यापूर्वीच त्यांनी संताजीच्या नेतृत्वाखाली साताऱ्याकडे परतीच्या प्रवासाचा रस्ता धरला. (मार्च १६९५)[3] दुसरीकडे शंकराजी नारायण व हणमंतराव निंबाळकर मराठा सेनापती आपल्या फौजांसह नाशिक-बागलाण भागात मोहिमा करीत होते आणि मोगलांचा प्रसिद्ध सरदार मातबरखान हा त्यांचा प्रतिकार करत होता.[4]

कर्नाटकातील मोगलांच्या हालचाली :

त्रिचनापल्ली, तंजावर ह्या राजांकडून खंडणी घेऊन झुल्फिकार खानाने वांदिवाशला तळ दिला. (सप्टें.-ऑक्टोबर १६९४) तिथे काही दिवस राहून त्याने ऑक्टोबरच्या शेवटी चांगमन या किल्ल्यास वेढा दिला. चांगमन किल्ला जिंजीपासून ४२ मैलांवर आहे. किल्ल्याच्या उत्तर बाजूस त्याने छावणी दिली. मराठ्यांनी ह्या छावणीस घेरून मोगलांना फार त्रास दिला. मोगलांच्या पिण्याच्या पाण्याच्या झऱ्यांत आणि तळ्यांत विष टाकून त्यांनी त्यांचा पाणीपुरवठा विषारी करून टाकला. त्यामुळे अनेक सैनिक मृत्युमुखी पडले. यामुळे किल्ला जिंकून घेण्याचा विचार झुल्फिकार खानाने सोडून दिला.[5]

डिसेंबरमध्ये वेलोरचा वेढा उठवल्यावर डिसेंबर १६९५ मध्ये धनाजी जिंजीस राजाराम महाराजास भेटण्यासाठी निघाला, पण जिंजीस न जाता त्याने जिंजीच्या दक्षिणेस असणाऱ्या तिरुवाडी मोगली ठाण्याच्या फौजदारास घेरले. झुल्फिकार खान तिथे गेला व त्याने धनाजीशी लढाई दिली. खानाचा

१ कित्ता.
२ कित्ता, पृ. २४०.
३ कित्ता, पृ. २३९-२४०.
४ सेनापती संताजी घोरपडे, पृ. ८०.
५ लेटर्स फ्रॉम कोर्ट्स डायरी ॲन्ड कन्सलटेशन बुक, १६९४, पृ. १२७-१२८.

विजय झाला पण त्याला आपल्या सुरक्षिततेसंबंधी खात्री नसल्याने त्याने माघार घेऊन अर्काटच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. धनाजीही आपल्या ६ हजार घोडदळानिशी राजाराम महाराजांच्या दर्शनासाठी जिंजीस येऊन दाखल झाला.[१]

याच सुमारास दोड्डेरीचा लढा जिंजीकडे येण्यासाठी संताजी आपल्या सैन्यासह निघाला. त्याला अडविण्याची आज्ञा मोगल बादशहाने दक्षिण कर्नाटकातील सीरा (जिल्हा तुमकुर बंगळूरच्या उत्तरेस सुमारे ऐंशी मैल) येथील सुभेदारास केली. कासिमखान हा सीरा प्रांताचा अधिकारी होता. त्याने बादशहाच्या आज्ञेप्रमाणे संताजीस रोखण्यासाठी अधोनीच्या जवळ तळ दिला. बादशहाला ठावूक होते की एकटा कासीमखान संताजीस रोखणे शक्य नाही म्हणून त्याच्या मदतीस दुसरे नामांकित सरदार खानजादखान, सफशिकनखान, सय्यद असालत खान, महमद मुरादखान यांना जाण्याचे हुकूम दिले. तसेच निवडक मनसबदार मुबलक सैन्य आणि तोफखानाही देण्यात आला.[२] दिनांक १३ नोव्हेंबर १६९५ रोजी मोगलांची सैन्ये संताजी जाण्याच्या वाटेपासून सहा कोसावर एकत्र आली. कासिमखानाचे सर्व सामान अधोनीच्या किल्ल्यांत होते. खानाजादखान हा बादशहाच्या मावशीचा नातु होता. बादशहाची त्याजवर खास मर्जी होती, त्याचप्रमाणे बादशाही छावणीतून येणारे सरदार दरबारांतील प्रसिद्ध व्यक्ती होत्या. ह्या सर्व सरदारांना मेजवान्या द्याव्या असे कासीम खानाने ठरविले. त्याने अधोनीच्या किल्ल्यांतून आपले उत्तमोत्तम सामान बाहेर काढले. कोरे करकरीत असे कर्नाटकी तंबू, सोन्या-चांदीची पात्रे, तांब्याची आणि चिनी मातींची भांडी इत्यादी सामान गोळा करून ते आपल्या आणि इतर सरदारांच्या पेशखाना-बरोबर (पुढील मुक्कामासाठी पाठविण्याचा लवाजमा याला पेशखाना म्हणतात) तीन कोस पुढे पाठविला.[३]

---

१ तारिख-इ-दिलकशा आणि डायरी ॲन्ड कन्संलटेशन बुक, १६९५, पृ. १६१.

२ मराठे व औरंगजेब (मासिरे आलमगिरी), पृ. ६१.

३ कित्ता.

संताजीची व्यूहरचना :

संताजीने मोगल फौजेच्या हालचालींची बातमी आपल्या गुप्त हेरांकडून मिळविली. यावेळी संताजीने आपल्या सैन्याचे तीन विभाग केले. एका तुकडीने हल्ला करून पेशखाना लुटण्यास सुरुवात करावयाची, दुसऱ्या तुकडीने मोगल सैन्यावर चालून जाण्यासाठी सज्ज राहावयाचे, तिसरे दल राखीव म्हणून ठेवण्यात आले.

पहाटे चार घटका गेल्यावर मराठ्यांच्या खड्या तुकडीने पेशखान्यावर हल्ला केला. त्यांनी अनेकांना ठार केले. कित्येकांना जखमी केले आणि सगळा पेशखाना लुटून फस्त केला ही बातमी कासिम खानाला समजली. त्याने खानजादखानाला झोपेतून उठविले नाही. तो स्वतः लढावयाच्या स्थळी चालून आला. पेशखान्याच्या दिशेने एक कोस गेला असेल नसेल तोच मोगल सैन्याशी मुकाबला करण्यास तयार असलेली संताजीची दुसरी तुकडी त्यांच्यावर चालून गेली. कासीम खान आणि मराठे यांच्यातील युद्धास तोंड लागले.[१] इकडे खानजादखान झोपेतून जागा झाला. कासीम खानावर मराठ्यांनी हल्ला केला हे त्याला समजले. आपली छावणी सोडून तो तडक कासीमखानापाशी आला. मराठ्यापाशी असंख्य घोडेस्वार होते. त्यांच्या पायदल सैन्यात बंदूकधाऱ्यांचा (मस्केटीअर्स) सपाटून भरणा होता. यामुळे उभय दलात घनघोर युद्ध होऊन उभय दलातील अनेक माणसे ठार झाली, मोगल सरदार आणि सैनिक यांनी निर्धाराने युद्ध केले. मराठ्यांकडील अनेक सैनिक ठार अगर जखमी झाले. पण मराठे एक पाऊलही मागे हटले नाहीत. त्यांचा निश्चय थोडासुद्धा डळमळला नाही.[२] मराठ्यांची तिसरी तुकडी राखीव म्हणून ठेवण्यात आलेली होती. मोगल सैन्य आपली छावणी आणि बाजारबुणगे सोडून पेशखान्याच्या दिशेने पुढे आले होते. त्यावर मराठ्यांच्या या तुकडीने हल्ला केला आणि तो तळ पूर्णपणे लुटून फस्त केला.

---

१ कित्ता, पृ. ६२.

२ कित्ता.

कासीमखान आणि खानजादखान हे मराठ्यांशी लढण्यात गुंतले होते. आपली छावणी गारद झाली ही खबर त्यांना युद्धाच्या धुमश्चक्रीत समजली. त्यांचा धीर सुटला. त्यांनी आपापसांत सल्ला मसलत केली. तेथून जवळच दोड्डेरीचा किल्ला होता व जवळच तलावही होता, तेव्हा लढत लढत मोगल सैन्य तलावापाशी पोचले. मराठ्यांनी या सैन्याच्या वाटेला न जाता जवळच आपला तळ दिला.[१]

दोड्डेरीच्या किल्यांत मोगलांची शिबंदी होती. तिने किल्ल्याचे दरवाजे लावून घेतले आणि कसीमखान व खानजादखान यांच्या सैन्याला ते किल्यात येऊ देईनात. तेव्हा निरूपाय होऊन मोगली फौज गडाच्या तटाजवळच थांबली. तिथेच त्यांनी मोर्चे बांधले व मराठ्यांशी लढणे चालू ठेवले.

एवढ्यात मराठी लष्करात बातमी पसरली की बादशहाने हिंमतखान बहादुरास मोगल सरदारांच्या सहाय्यासाठी पाठविले असून तो चालून येत आहे. ही बातमी मिळताच संताजीने लगेच आपल्या सैन्याचे दोन भाग केले. एक भाग मोगल सैन्याच्या तोंडावर ठेविला व स्वतः हिंमतखानाच्या समाचारास गेला.[२] यावेळी संताजीकडे १० हजार घोडदळ व १२ हजार पायदळ अशी २२ हजारांची जंगी फौज होती.[३] हिंमतखान बहादूर हा धाडसी आणि पराक्रमी होता. त्याच्याजवळ सैन्य कमी होते त्याने बादशहाकडे मदत मागितली पण ती येण्यापूर्वीच संताजी त्याजवर चालून गेला. त्याने ही चाल बसवपट्टणच्या गढीतून केली. मराठा-मोगल सैन्याची मोठी लढाई जुंपली. उभयपक्षी अनेक सैनिक रणांगणी पडले तेव्हा संताजीनी राखून ठेवलेल्या तुकडीकडे न वळता बरोबर असलेल्या तुकडीसह तो रणातून पळून जाण्याचा देखावा केला. खानास असे वाटले की, संताजी पळून जात आहे म्हणून खानाने संताजीचा पाठलाग केला. संताजी पुढे आणि खान त्याच्या मागे अशा रितीने धावा धाव चालली असता संताजी आपली पहिली तुकडी ज्या रानांत दबा धरून बसली होती तिथे तो आला. इतक्यात खान आपले सैन्य घेऊन संताजीच्या पाठीवर चालून आला. संताजीने

१ कित्ता, पृ. ६३.

२ मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध, तारीखे खाफीखान, पृ. ३३.

३ पवार, सेनापती घोरपडे, पृ. १०१.

आपल्या राखीव सैन्यासह खानावर चाल केली. त्यास त्याच्या सैन्यासह घेरले. जंगलात लपून बसलेल्या संताजीच्या सैन्याने खानावर व त्याच्या सैनिकांवर गोळ्यांचा वर्षाव केला. मोगल सैनिक त्यांच्या गोळ्यांना बळी पडू लागले. खानाने आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली. हत्तीवर बसून लढाई करत होता. ऐन लढाईत त्याच्या कपाळाला गोळी लागली. तो जबर जखमी होऊन अंबारीत कोसळला. माहुत नसलेला त्या अंबारीचा हत्ती लढाईच्या गर्दीने बेफाम होऊन मोगलानाच तुडवीत इतस्ततः निघाला होता. गोळी लागलेल्या खानाचे रात्री प्राणोत्क्रमण झाले.[१]

हिंमतखानाच्या मरणाची बातमी कळल्यावर मराठ्यांना आणखी चेव चढला. त्यांनी किल्ल्याचा एक बुरूज मुळापासून उखडून टाकला. त्यांनी चहूकडून एकच गर्दी केली. खानजादखानाने मराठ्यांपाशी तहाची याचना केली. पुढील अटीवर तह ठरला. कासीम खानाचे हत्ती, घोडे, जडजवाहीर, नगदी सोने-नाणे ही सर्व संपत्ती संताजीला देण्यात यावी. कासीम खानाचा विश्वासू सेवक आणि खाजगीचा कारभारी बालकिशन याचा मुलगा याने ओलीस रहावे.[२]

त्याप्रमाणे अंमलबजावणी झाली. संताजीने सांगून पाठविले की किल्यातील लोकांनी आता भय न बाळगता बाहेर यावे. किल्याबाहेर त्यांनी दोन रात्री काढण्यास हरकत नाही. त्यांना कोणत्याही प्रकारचा उपसर्ग होणार नाही. त्यांना हव्या त्या जिनसा माझ्या लष्करातून विकत घेण्यास माझी परवानगी आहे. किल्ल्यात दाखल झाल्यापासून तेरा दिवसांनी बादशाही लष्कर किल्यातून बाहेर पडले. मराठे सैनिकांनी मोगल सैनिकांना एकीकडून भाकरी आणि एकीकडून पाणी ह्या जिनसा पुरविल्या. अशा रितीने मोगल सैन्य किल्ल्याच्या बाहेर दोन रात्री मुक्काम करून होते. त्यामुळे संताजी निश्चिंत झाला. त्याने तेथे आपले जासूद ठेवले आणि तो परत कासिमखानाच्या समोर आला. कासिमखान आणि इतर सरदार भयंकर पेचात सापडले होते. कासिमखान, रुहुल्लाखान, सफशिकनखान यांचे तळ जवळ होते.

१ हिंदवी स्वराज्य आणि मोगल पृ. १६९.

२ कित्ता पृ. १७०.

त्यांनी गढीत शिरून आश्रय घेण्याची गुप्त मसलत केली. गढीत शिरल्यावर कासीमखान व इतर सरदार कोंडले गेले.

मोगल सरदार जवळजवळ एक महिना त्या गढीत कोंडले गेले. त्यांची अवस्था कठीण होऊ लागली. शेवटी लष्करातील गुरेढोरे, घोडे, इत्यादींचा निकाल लागला. उरलेली जनावरे लोकांनी मारून खाल्ली. अंबरखान्यात काही धान्य साठविले होते. कासिमखानाने ते काढले. सैन्यातील प्रमुख लोकांना प्रत्येकी अच्छेर पावशेर ज्वारी देण्यात आली. बरोबर थोडीशी अरजन (हिंदी चीना) नावाचे धान्य देण्यात येई. कणिक किंवा चणे यात मिसळून ते उकडून खात. बाकीच्या सामान्य लोकांची उपासमार झाली. उपासमारीमुळे काहीजण गढीवरून उडी मारून मराठ्यांच्या आश्रयाला गेले. त्यापैकी अनेकांच्या कमरेला रुपये आणि अश्रफ्या होत्या. संताजीच्या सैनिकांनी त्यांच्या कमरा मोकळ्या करून त्यांचे सोने-नाणे काढून घेतले. मराठ्यांच्या छावणीतील लोक मेवामिठाई इत्यादी जिनसा घेऊन गढीच्या भिंतीपर्यंत येत आणि मन मानेल त्या किमतीत विकत. रुपयांच्या पुरचुंड्या गढीतून टाकून लोक खाण्याच्या वस्तू विकत घेत. ते कसेबसे जगत होते, शेवटी गढीतील अन्नसामूग्री संपली. रोगराई पसरली. सर्वत्र घाण जमू लागली. धान्य आणि पाण्याची टंचाई भासू लागली. त्यामुळे लोकांना जीव नकोसा झाला. ह्या परिस्थितीत कासिमखान मरण पावला. काही लोक म्हणत त्याने विष घेतले, काही म्हणत तो अफूचा भक्त होता. ती त्याला न मिळाल्यामुळे तो मेला. पराभवाचा विलक्षण क्षोभ त्याला आला होता. वरील कारणांनी तो मेला.[१] रुहुल्लाखान आणि इतर सरदार यांनी निरुपायाने तडजोडीची बोलणी सुरू केली. जिवाचे अभय मिळावे. सरदारांना घोडा आणि अंगभर वस्त्र इतक्या सामानानिशी जाऊ द्यावे. याच्या मोबदल्यात ज्यांना देणे शक्य असेल त्यांनी जबर रकमा द्याव्या

१ पगडी, संताजीच्या पराक्रमाचा कळस, दोड्डेरीचा वेढा,
भा. इ सं त्रै व १९, पु. ७५, पृ. ७८.

असे ठरले. रुहुल्लाखानाचा दिवाण, काही सरदार आणि एक दखनी (दक्षिणेतील मुसलमानाना दखनी म्हणत) सरदार असे मिळून संताजीकडे गेले आणि काय रकमा देऊन सुटका होऊ शकेल याबद्दल बोलणी सुरू केली. संताजी म्हणाला तुमच्या जवळ असलेले हत्ती, घोडे, सामानसुमान आणि नगद तर घेईनच याशिवाय एक लाख होन म्हणजे साडेतीन लाख रुपये हवेत. यापेक्षा कमी नाही. शेवटी सर्व सरदारांवर मिळून सात लाख रुपये लावण्यात आले. सरदारांनी जीवदान दिल्याबद्दल रकमांचे मुचलके लिहून दिले. रक्कम वसूल होईपर्यंत सरदारांनी आपले आप्त मातब्बर माणसे ओलीस ठेवली. संताजीने गढीच्या दरवाजावर माणसे नेमली. सरदार एक घोडा आणि अंगावरील कपड्यानिशी बाहेर पडले. इतर सैनिकांनी नेता येतील तितके कपडे घेऊन जाण्याची परवानगी मागितली. बाकी सर्व सामान हत्ती, घोडे, जडजवाहीर मराठ्यांनी जप्त केले. लिहून दिलेली रक्कम मराठ्यांना मिळाली नाही. ओलिस असलेली माणसे संधी साधून पळून गेली. आणि थोड्याच दिवसात संताजीला आपल्या दुष्कर्माची शिक्षा मिळाली (मारला गेला) ह्या मोहिमेत बादशाही सैन्याची फार दुर्दशा झाली. मोगलांची संपत्ती, सामानसुमान, सरदारांचे जडजवाहीर हे मराठ्यांचे हाती सापडले. त्याची किंमत पन्नास साठ लाखांपेक्षा जास्त होती.[१]

ही बातमी बादशहाला सांगण्यात आली. जे काही घडले ते परमेश्वरी इच्छेने झाले. सरदारांच्या हातची ती गोष्ट नव्हती. पण बादशहाला फार वाईट वाटले. त्याने सरदारांना आपल्यासमोर येऊ दिले नाही. त्याने संबंधित अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. निरनिराळ्या सुभ्यांवर त्यांना नेमून त्याने त्यांना प्रेमाने निरोप दिला. दोड्डेरीची मोहीम संपल्यावर संताजी बसवापट्टणहून जिंजीकडे आला. झुल्फिकार खानाने त्यास अरणीच्या मुकामी गाठून मागे रेटले.[२]

संताजीचा राजाराम महाराजांशी बिघाड :

संताजीच्या मोंगलांवरील दणदणीत विजयाच्या वार्ता सर्व कर्नाटकात पसरल्या होत्या. यामुळे कर्नाटकातील मराठे शेर बनून सर्वत्र वावरत होते. मद्रासकर इंग्रज २० जानेवारी, १६९६ रोजी लिहीतात की, झुल्फिकार खानाच्या मदतीस मोगल बादशहाने तातडीने मोठी फौज पाठविली नाही

१ कित्ता पृ. ७९.

२ हिंदवी स्वराज्य आणि मोगल पृ. १७१.

तर सर्व मद्रास व कर्नाटक मराठ्यांच्या मालकीचा झाल्यातच जमा आहे.[१] महाराष्ट्राच्या दुर्दैवाने याच प्रसंगी संताजी आणि धनाजी ह्या दोन मराठा सेनानीची भांडणे विकोपास गेली. भीमसेन सक्सेना हा समकालीन फारसी इतिहासकार लिहितो की, संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्यात पूर्वीपासूनच वैमनस्य होते. संताजी कडक लष्करी शिस्तीचा, स्वराज्याचा मोठा कट्टर अभिमानी तर धनाजी ढिला व चालढकल करणारा होता. संताजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झालेला व महाराजांनी घालून दिलेले शिस्तीचे काटेकोरपणे पालन करणारा होता. त्यामुळे त्याचे वर्तन कठोर पण न्यायी बनले होते. गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांना संताजी दया माया मुळीच दाखवित नसे. त्याचप्रमाणे न्यायाच्या ठिकाणी पक्षपाती वृत्ती त्याने कधीच दाखविली नाही. धनाजीचा रिवाज याच्या उलट होता, पण संताजी तापट वृत्तीचा व कोणाचेही न ऐकणारा होता. संताजीच्या कडक शिस्तीला कंटाळून हाताखालचे काही सरदार धनाजी जाधवांकडे चाकरीस जात. धनाजीस संताजीच्या पराक्रमामुळे त्याचा हेवा वाटू लागला. संताजीसुद्धा धनाजीचा पाणउतारा करी. संताजी मोठा कल्पक सेनानायक होता. कशाही अडचणीचा प्रसंग आला तरी काहीतरी शक्कल काढून त्यातून निभावून जाण्याचे चातुर्य संताजीच्या अंगी अप्रतिम होते. परंतु संताजीच्या वृत्तीत एक प्रकारचा दिमाख होता. लोकांना तो आढ्यतेखोर वाटे. लहान असो वा मोठा, तो कुणाचीही फारशी पर्वा करीत नसे. प्रसंगी छत्रपतींना सुद्धा नडवून धरी. " राजेश्री स्वामीजवळ मुद्दे न घालता मर्यादेने रहावे." असे रामचंद्रपंत त्यांना वारंवार सांगे.[२]

दोड्डेरी आणि बसवपट्टण येथे मिळालेले दणदणीत विजय हे संताजीच्या यशाचे परमोच्च बिंदू होते. ह्या विजयानंतर संताजी ८ मे १६९६ च्या सुमारास जिंजीस आपल्या फौजेसह आले.[३] जिंजीच्या किल्ल्यांत संताजीचा मुक्काम महिनाभर होता असे दिसते. यावेळी दुर्दैवाने अत्यंत वाईट घटना घडून आली आणि ती म्हणजे संताजीचा राजाराम महाराजांशी बिघाड घडून आला. कदाचित त्यावेळी संताजीचे राजाराम महाराजांशी वागणे

१ डायरी ॲन्ड कन्सलटेशन बुक १६९६, पृ. ९.

२ शिवचरित्र प्रदीप पृ. ३७-३८.

३ पवार, संताजी घोरपडे पृ. १११.

अहमन्यतेचे झाले असावे व त्याच मनःस्थितीत त्यांचा महाराजांशी खटका उडाला असावा. त्याचे निश्चित कारण काय झाले ते स्पष्टपणे नमूद झालेले नाही. जेधे शकावलींत फक्त एवढाच उल्लेख आहे की, चैत्रमासी राजारामाच्या दर्शनास संताजी घोरपडे चंदीस गेले. ज्येष्ठ मासी बिघडोन कंची (कांजीवरम्) अलिकडेच भांडण झाले.[१]

ता. ६ सप्टेंबर १६९१ चे संताजीचे लिहीलेले एक पत्र उपलब्ध झालेले आहे. त्यात "आमच्या राज्यात नवी वृत्ती करुन द्यावी असा दंडक नाही."[२] असे वाक्य आहे, हे वाक्य छत्रपती शिवाजी महाराजाच्या राजानितीत नेहमी आढळते. यावरून अनुमान होते की सरसहा जहागिरी देण्याचा जो सपाटा राजाराम महाराजांनी सुरू केला होता, तो संताजीस बिलकूल मान्य नव्हता. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या कडक शिस्तीत तयार झालेल्या संताजींचे मन, कुठल्याही प्रकारचे नरमाईचे धोरण व शिथिलता, निदान मोगलांच्या बाबतीत तरी मानायला तयार नव्हते. मोंगल सरदार एकदा हाती सापडल्यावर, त्याला सोडून देऊ नये. निदान त्याचा उपद्रव होणार नाही. एवढे तरी त्याचे बळ खच्ची करावे, असे संताजीस वाटत होते. मराठ्यांच्या हाती गवसलेले आसदखान, झुल्फिकार खान, शहाजादा कामबक्ष यांना वांदिवाशला जाण्याची वाट मोकळी करून दिल्याबद्दल त्याला राजाराम महाराजांचा राग येणे स्वाभविक होते.[३]

ही घटना मे १६९६ च्या अखेरीस अगर जूनच्या प्रारंभीच घडून आली असावी. त्यानंतर संताजी महाराजाच्या वर रुसून किल्ल्याबाहेर आपल्या वीस हजार फौजेनिशी पडला हे महाराजांस धोकादायक वाटले असावे. भीमसेन सक्सेना म्हणतो की, धनाजीने राजाराम महाराजांस भासविले की संताजीचा जोर खूप वाढला आहे. तो शूर व कुशल शिपाई आहे. तो स्वतंत्र होण्याच्या मार्गावर आहे. त्याला ठार मारले पाहिजे.[४] स्वाभाविकच संताजीच्या पारिपत्याचा विचार राजाराम महाराजांनी केला आणि ते धनाजी जाधव, अमृतराव निंबाळकर, हणमंतराव घोरपडे इत्यादी मराठा सरदारांसह

१ शि. च., पृ. ३८.

२ जि. द. खं. ३१, पृ. ४८.

३ ज. पवार, संताजी घोरपडे, पृ. १६९.

४ तारीखे दिलकशा (इं.), पृ. २०६.

संताजीशी लढाई देण्यासाठी जिंजीबाहेर पडले. कांचीपुरमजवळ आयेवारकुटी येथे मराठ्यांचे छत्रपती व सेनापती यांची ही अभूतपूर्व लढाई मोठी धुमश्चक्रीची झाली. ह्या लढाईत राजाराम महाराजांचा पराभव होऊन ते संताजीचे कैदी बनले. धनाजी जाधवांनी रणांगणातून पळ काढीला. अमृतराव निंबाळकर कैद होऊन त्यास हत्तीच्या पायी देण्यात आले.

दुसरे दिवशी स्वतः संताजी आपले हात बांधून राजाराम महाराजासमोर उभा राहिला. आपल्या हातून घडलेल्या अपराधाबद्दल त्यांनी महाराजांची क्षमा मागितली व म्हणाले मी तुमचा सेवक आहे. तुम्ही धनाजीला माझ्या बरोबरचा दर्जा देऊ इच्छित होता म्हणून मला असे उद्धटपणे वागणे भाग पडले. आपण आता जी आज्ञा कराल त्याप्रमाणे मी वागेन.[१] अशाप्रकारे छत्रपतीसमोर क्षमा मागून संताजीने त्यांना मुक्त केले आणि जिंजी किल्ल्यात सुखरुपपणे पोहोचविण्याची व्यवस्था केली. (जून १६९६)

मराठ्यांच्या सेनापतीचा खुद्द मराठ्यांच्या राजाशीच संघर्ष घडून आल्याने त्याचे पडसाद सर्व दक्षिणभर उमटणे स्वाभाविक होते. संताजीने राजाराम महाराजांना कैद केल्यानंतर त्यांना आपल्या ताब्यात द्यावे म्हणून झुल्फिकार खानाने बादशहाच्यावतीने मोठे इनाम देऊ कले, एवढेच नव्हे तर खुद्द बादशहाने संताजीस बारा हजारी उमराव करतो, म्हणून आश्वासन दिले. पण ही दोन्ही प्रलोभने संताजीने धिक्कारली. स्वराज्यावर संताजीने केलेला हा महान उपकार मानावा लागेल. कारण यावेळी राजाराम महाराज मोगलांच्या ताब्यात गेले असते तर मराठ्यांच्या स्वातंत्र्यांचा लढाच संपुष्टात आला असता.

संताजी-राजाराम महाराज यांच्यामधील या लढाई संबंधाने दोन महत्त्वाच्या बाबी नमूद करावयास पाहिजेत. पहिली बाब अशी की, राजाराम महाराज धनाजीसह संताजीवर चालून गेल्यावरच निरुपाय होऊन संताजीस धन्याशी लढावे लागले. त्यात राजाराम महाराजांचा पराभव झाला व ते संताजीच्या हाती सापडले, यात संताजीचा काही अपराध नाही. दुसरी बाब अशी की खुद्द छत्रपतींशी लढूनसुद्धा संताजी मोगलांना मिळाला नाही. तो काळ असा होता की, मोठ-मोठे नामवंत मराठे सरदार आपल्या वतनासाठी

१ शि. च. प्र., पृ. ३८.

बिनदिक्कत मोगलांना जाऊन मिळत असत. क्षुद्र स्वार्थापोटी त्यांना स्वराज्यावरील प्रेम फिक्के वाटत असे. या पार्श्वभूमीवर संताजीचे हे कृत्य खास उल्लेखनीय व स्त्युत्य वाटते.[१]

ह्या परिस्थितीत तरी राजाराम महाराजांनी मनाचा मोठेपणा दाखवायला हवा होता. संताजीची समजूत घालून राजाराम महाराजांना त्यांना आपल्याकडे वळविता आले असते. परंतु तेवढा मुत्सद्दीपणा त्यांच्याजवळ नव्हता असेच म्हणावे लागेल. खांद्याला खांदा भिडवून छत्रपती राजाराम महाराज व धनाजी जाधव हे संताजीशी लढा देत असताना ऐन झटापटीत संताजीची सरशी होण्याचा रंग दिसू लागताच धनाजी जेव्हा संधी साधून एकाएकी रणांगणांतून पळून गेला त्याचवेळी राजाराम महाराजांच्या लक्षात या दोघा सरदारांच्या विचार सरणीचा अन् इमानीपणाचा अंदाज यायला पाहिजे होता.

कदाचित हे वैमनस्य एवढ्या थराला पोचले नसते असे जदुनाथ सरकार यांनी मत व्यक्त केले आहे. त्यांच्यामते आतापर्यंत प्रल्हाद निराजी प्रतिनिधी यांनी अतिशय कुशलतेने आणि युक्ती युक्तीने संताजी व धनाजी या दोन सेनानींची स्पर्धा विकोपास जाऊ दिली नाही. आणि दोघांच्या बाबतीतही छत्रपती भेदभाव न करतां सारख्याच भावनेने वागवितात, असे जाणून देण्याची सतत खटपट केली. पण आता प्रल्हाद निराजी निधन पावले होते. अष्टप्रधानांत त्यांची जागा घेणारा तेवढा चाणाक्ष कोणी नव्हता. त्यामुळे दोन्ही सेनानींचा समतोल राहू शकला नाही. राजाराम महाराजांनी धनाजीची बाजू उचलून धरली.[२]

संताजी सेनापती पदावरून दूर :

संताजीशी वाकडेपणा आल्यावर महाराजांनी त्यास सेनापती पदावरून दूर केले. (जून १६९६) आणि महाराजांनी संताजीच्या फौजेतील बहुसंख्य सरदार व त्यांचे सैन्य आपल्याकडे बोलावून घेतले. ह्या महाराजांच्या आव्हानास प्रतिसाद देऊन संताजीचे बहुसंख्य सहकारी त्यास सोडून गेले. त्याच्या सैन्याचे बळ दिवसेंदिवस कमी होत गेले. पण त्याही परिस्थितीत

१ अखबरात, १०-४-१६८२.

पवार जयसिंगराव, सेनापती संताजी घोरपडे, पृ. १५.

२ गर्गे (सं.) कापशीकर सेनापती घोरपडे, पृ. ७०.

मराठी राज्याचा शत्रू झुल्फिकार खान यांच्याशी कर्नाटकात स्वराज्यातील एकनिष्ठ असलेला संताजी लढाया देत राहिला (ऑक्टोबर १६९६) पण हळूहळू संताजीकडून फौज काढून घेण्यात राजाराम महाराज यशस्वी झाले आणि संताजीची बाजू लंगडी पडली. अशा परिस्थितींत तो मोगलांशी संघर्ष टाळून महाराष्ट्राकडे निघाला. यावेळी संताजीच्या दुर्दैवास खरी सुरुवात झाली.

संताजी कर्नाटकातून महाराष्ट्राकडे मार्गस्थ होताच राजाराम महाराजांनी धनाजी व हणमंतराव निंबाळकर या दोघां सरदारांना त्यांच्या पाठलागावर पाठविले. हणमंतराव हा अमृतराव निंबाळकराचा बंधू. संताजीच्या हातून अमृतरावाच्या झालेल्या वधाने सुडाच्या भावनेने पेटून उठलेला होता. धनाजीने हणमंतरावांच्या या भावनेचा पुरेपुर उपयोग करून घेतला. हणमंतरावास आपल्या फौजेच्या आघाडीवर ठेवून धनाजी झपाट्याने संताजीच्या पाठलागावर निघाला. कर्नाटक-महाराष्ट्राच्या सीमाप्रदेशात त्याने संताजीस गाठले व संताजीवर हल्ला चढवला. संताजीचे सरदार छत्रपतींच्या हुकमाने धनाजीला मिळाले होतेच. धनाजींची फौजही हणमंतरावाबरोबर होती. तेव्हा संताजीची राहिली सवरली फौज मोडली. त्याचे सामान-सुमान, बाजार बुणगेही लुटले गेले. (नोव्हेंबर-डिसेंबर १६९६) संताजीची ही शेवटची लढाई. या स्थितीत तो साताऱ्याजवळच्या शिंगणापूरच्या (शंभू महादेवाच्या) डोंगराच्या आश्रयास आला. धनाजीने संताजीचा पुरता मोड केला तरी त्याचा पाठलाग सोडला नव्हता. बादशाही हुकमाप्रमाणे मोगल सरदार गाजिउद्दीन खान फिरोजजंग यानेही आपली फौज घेऊन संताजीचा पाठलाग सुरू केला. अशारीतीने "एकीकडून बादशाही फौज व दुसरीकडून धनाजी जाधवाची फौज यांनी संताजीस मृत्यूच्या जाळ्यात पकडले", असे खाफीखान म्हणतो.

एके दिवशी आषाढ महिन्यात (साधारणपणे १५ ते १८ जून १६९७ च्या दरम्यान) शंभुमहादेव डोंगरातील निवासस्थानाच्या जवळच्या ओढ्याकाठी संताजी आंघोळीला आले. सूर्याला अर्घ्य देण्यासाठी ते उगवतीकडे तोंड करून डोळे मिटून नतमस्तक झाले असताना जवळपास लपून बसलेल्या मारेकऱ्यांनी त्यांच्यावर प्राणघातक वार करून त्यांचा बळी घेतला. "देवपूजा करीत असताना, आंघोळीच्या वेळी सूर्याला अर्घ्य देत असताना किंवा नामस्मरण करीत असताना कोणीही भेटावयास आला तरी आपले

लक्ष काढून मागे पाहावयाचे नाही" असा दंडक आजही पाळला जातो असे म्हणतात. नेमकी हीच वेळ वध करणाऱ्या वैऱ्यांनी निवडली होती. कारण इतर वेळी संताजीच्या समोर उभे राहणेसुद्धा त्यांना जमले नसते.

विशेष म्हणजे संताजी घोरपडेच्या हत्येनंतर लगेचच नागोजी माने मोगलांना जाऊन मिळाले. कोणत्याही मार्गाने का होईना नागोजी पुन्हा औरंगजेबाच्या छत्राखाली जातो ही घटनाच मुळी त्याच्या वर्तनाविषयी संशय निर्माण करणारी आहे. त्याच्या स्वार्थी वृत्तीवर या घटनेमुळे विदारक प्रकाश पडतो.

संताजी व धनाजी यांचे वाकडे पडण्यास जरी बादशहा कारण नसता तरी त्याचा खून मात्र बादशहाच्याच कारवाईने घडून आला, हे खालील पत्रावरून सिद्ध होते. हे पत्र बादशहाचा सरदार लुत्फुल्लाखान याने संताजीच्या मृत्यूनंतर लगेच ता. ९ जुलै १६९७ रोजी नागोजीस लिहिले. "तुम्ही निश्चयें करून आमचे दौलतीचा आश्रय करून हुजूर येऊन रुजू जाहला व दुस्मानासही दूर केला. संताजीचा पळावयाचा रस्ता तुम्ही बंद केला. त्यास पळून जाऊ दिले नाही. येणेकरून तुम्ही सरकारची नोकरी एक निष्ठेंने बहुत चांगली बजावली. तुमची विनंती मान्य झाली आहे. तुमचे अपराध क्षमा होऊन पातशहाची मेहरबानी व इनायत होऊन येईल."[१]

इ. स. १६९० मध्ये नागोजी माने बादशहास सोडून स्वराज्यात आला परंतु त्याचे चित्त इकडे स्थिर झाले नाही. संताजी पळू लागल्यावर नागोजी लुत्फुल्लाखानाला भेटला आणि त्याच्यामार्फत पुन्हा बादशहाची कृपा संपादण्याकरिता त्याने संताजीचे शीर कापून ते बादशहाला नजर केले. हे कृत्य त्याने केवळ बायकोच्या शिकवणीने केले असेल असे म्हणवत नाही. मराठेशाहीपेक्षा बादशहाची सेवा लोकांस जास्त फायदेशीर वाटत होती. असा निष्कर्ष रियासतकार सरदेसाई यांनी काढला आहे.

---

१ सरदेसाई, राजाराम, पृ. २३१.

संताजी घोरपडे : थोरवी

सेनापती संताजी घोरपडे यांच्या मृत्यूने मराठी राज्याची फार मोठी हानी झाली, युद्ध नेतृत्व, संघटना कौशल्य, साहसीवृत्ती आणि अतुल पराक्रम या चार गुणांच्या जुटीला संपूर्ण मराठेशाहीत संताजी एवढा दुसरा वीरपुरुष क्वचित झाला असेल असे म्हटल्यास वावगे ठरू नये. त्यांच्या वैयक्तिक स्वभावातील काही दोषांची अतिशयोक्ती करणारी वर्णने आढळतात. त्यांची करडी शिस्त, आडदांडपणा, उद्दामपणा, प्रसंगी छत्रपतींशी वाद घालण्याची पद्धत इत्यादी दोष त्यांच्या स्वभावात होते हे खरे आहे. पण ज्याला युद्धात हमखास विजय मिळवावयाचा असतो त्यांना प्रसंगी अत्यंत कठोर व्हावे लागते, अशी अनेक योद्ध्यांची वर्णने आहेत. म्हणून या दोषांवरच भर देऊन संताजीची कामगिरी कमी लेखता येणार नाही.

जबाब द्यावा, तो संताजीनेच. त्याचे हुकूम निःसंदिग्ध व सुटसुटीत असत. एकदा हुकूम सोडला की त्याची सर्व जबाबदारी तो स्वतःकडे घेई. अपयशात सुद्धा ती दुसऱ्याच्या अंगावर टाकून तो मोकळा होत नसे. हाताखालचे अंमलदार त्याचे आदेश बिनतक्रार पाळीत. आणि अवज्ञा करणाऱ्यास तो घोर व निष्ठुर शासन करीत असे, तो आपले करार व वचने बिनचूक पाळी. पराभूताना मृदु भावाने वागवी. आणि कोणतेही कृत्य दूरदृष्टीने व उदार वृत्तीने सिद्धीस नेई. मोगल सरदारांनी त्यांच्या थोर अंतःकरणाची मुक्तकंठाने प्रशंसा केलेली आढळते.[१] शिवाजीच्या शिस्तीत संताजी मुरलेला असून तिचेच अनुकरण करण्याचा तो प्रयत्न करी. परंतु त्याचे चीज करणारा शिवाजीसारखा धनी त्यास मिळाला नाही ही दुःखाची गोष्ट आहे. तथापि "गनिमी काव्याचा आद्यजनक" ही पदवी त्यास यथार्थाने देता येईल.[२] गनिमी काव्याच्या पद्धतीने त्याने मोगलांना टेकीस आणले होते. गनिमी काव्याचा उपयोग पूर्वी शिवाजी महाराजांनी प्रसंगानुसार केला असला तरी त्याचा विशेष फैलाव राजारामाच्या वेळी परिस्थितीनुसार झाला आणि त्याचे श्रेय संताजीला व धनाजीला दिले पाहिजे.[३]

---

१ ज. सरकार, हिस्टरी ऑफ औरंगजेब, भा. ५, पृ. १२७, पृ. २३१.

२ सरदेसाई, राजाराम, पृ. २३२.

३ गर्गे, कापशीकर सेनापती, पृ. ८७.

गनिमी युद्धाची काही वैशिष्ट्ये चिटणीसांच्या बखरीत वर्णन केली आहेत. " मराठे यांनी आज या ठायी तर उद्या २०-२५ कोसावर जावे. पुन्हा एकाएकी येऊन छापा घालावा. पातशहाची ठाणी असतील ती उठवावी, मुलूख मारावा ..... अशारीतीने त्यास चैन पडू देऊ नये. मोगलांचे घोडे पाण्यावर आले असता पाणी न पीत त्यास मोगली लोकांनी म्हणावे जे पाण्यात संताजी व धनाजी दिसतो की काय ? रात्री दिवसा कोणीकडून येतील, काय करतील असे केले. मोगलाई फौजेत आठही प्रहर भय बाळगीत पातशहासी बहुदा आश्चर्य जाहले की... हे मराठी आदमी नव्हता, भुतखाना आहे.[१]

संताजीचा केवढा मोठा धाक मोगल सरदारांना वाटत होता याचे वर्णन फारसी इतिहासकार खाफीखानाने लिहून ठेवले आहे. फारशी इतिहासकार मोगलांचे पक्षपाती हे उघडच आहे. तरीही त्यांनी केलेल्या वर्णनातून संताजीचा मोगलावरील जबरदस्त वचक दिसून येतो. खाफीखान लिहितो " मराठे सरदारांत संताजी घोरपडे हे प्रमुख होत. समृद्ध शहरांवर हल्ला करून त्यांचा नाश करणे आणि नामांकित सेनानीवर तुटून पडणे यात त्याची खूपच प्रसिद्धी झाली. ज्याला ज्याला म्हणून संताजीशी मुकाबला करण्याचा आणि लढण्याचा प्रसंग आला त्याच्या नशिबी खालील तीनपैकी एक परिणाम ठेवलेला असे. एक तर तो मारला जाई किंवा जखमी होऊन संताजीच्या कैदेत सापडे किंवा त्याचा पराजय होई आणि त्याचे सैन्य आणि बाजारबुणगे गारद होत. आपण जिवानिशी सुटलो हाच आपला पुनर्जन्म झाला असे त्यास वाटे.....युद्ध करण्यासाठी जिकडे जिकडे म्हणून तो नालायक आणि हलकट संताजी तयार होऊन जाई तिकडे तिकडे त्याचा मुकाबला करण्यास बादशहाच्या प्रतिष्ठित सरदारांपैकी एकही तयार होत नसे. जगात धडकी भरून सोडणारी फौज घेऊन तो कोठेही पोहोचला की व्याघ्राप्रमाणे असलेल्या अनुभवी योद्ध्यांची हृदये कंपायमान होत.[२]

१ मल्हार रामरावकृत थोरले राजाराम यांचे चरित्र, पृ. ४६.

२ खाफीखान, पृ. ३९९-३.

मराठी राज्य घोर संकटात सापडले होते. फौजफाटा मोडलेला, खजिना रिकामा झालेला, किल्ले मोगलांच्या ताब्यात गेलेले, जुनी अनुभवी माणसे नाहीशी झालेली, मोठमोठे नामांकित सरदार हिंदवी स्वराज्याकडे पाठ फिरवून औरंगजेबाला मिळालेले, कोणावर भरवसा ठेवावा, अथवा कोणाचा आधार घ्यावा, असा एकही महापुरुष अस्तित्वात नव्हता. रायगड पडल्यामुळे महाराणी येसूबाई व शाहू महाराज मोगलांच्या कैदेत, राजाराम महाराज जिंजीकडे परागंदा, अशा दारुण अवस्थेत शिवाजी महाराजांचे हिंदवी स्वराज्य जवळ-जवळ बेवारशी बनले होते. आणि मराठ्यांचे नीतिधैर्य पार खचले होते. यावेळी दिसलेला एकमेव आशेचा किरण म्हणजे "सेनापती संताजी घोरपडे" होय.

मराठा-मोगल संघर्षात त्याची कामगिरी निर्णायक मानली जाते. मोगल अजिंक्य आहेत, त्यांना कोणतीही सत्ता जिंकू शकणार नाही. त्यांच्या सामर्थ्यापुढे टिकाव धरणे अशक्य आहे, यासारख्या अनेक समजुती त्या काळांत प्रसृत झालेल्या होत्या. त्या किती भ्रामक होत्या हे संताजीने आपल्या पराक्रमाने सिद्ध केले.

संताजीचे सामर्थ्य मोठे होते तशीच राजनिष्ठाही जबरदस्त होती. राजाराम महाराजांशी अनेकदा खटके उडाले तरी तो छत्रपतींना सोडून गेला नाही. माने, निंबाळकर, मोरे, घाटगे, शिर्के अशा मोठमोठ्या मराठे सरदारांनी औरंगजेबाच्या आमिषाला बळी पडून मराठी राजा आणि मराठी राज्य यांची निष्ठा सोडली. पण राजद्रोहाचा विचारही संताजीच्या मनात आल्याचे दिसत नाही. महाराजांशी वितुष्ट येऊनही त्याची राजनिष्ठा अढळ राहिली.

रियासतकार सरदेसाई यांनी म्हटल्याप्रमाणे एवढे रणशौर्य व अप्रतिम सेनानीत्व धारण करणारा संताजीसारखा मराठ्यांचा मोहरा बंडखोरीस पात्र होऊन फुकट जावा हे राष्ट्राचे मोठेच दुर्भाग्य होय आणि असा धाडसी आणि कल्पक सेनानायक खुनास बळी पडावा यापेक्षा दुसरी राष्ट्रहानी कोणती ?[१]

१ पगडी, हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. १७४-१७५.

जिंजीचा पाडाव :

संताजीचा अंत घडवून आणण्यात औरंगजेबाचा हात होता. संताजीच्या मृत्यूनंतर झुल्फिकार खानाच्या सैन्याने इ. स. १६९७ च्या पावसाळ्यात जिंजीस वेढा घातला. यावेळी राजाराम महाराजांकडे सैन्य नव्हते म्हणून रामचंद्रपंतास धनाजीस सैन्यासह ताबडतोब पाठविण्यास लिहिले. नंतर आणखी आणीबाणीची पत्रे पाठविली. परंतु महाराष्ट्रातून सैन्य लवकर येण्याची शक्यता न वाटल्यामुळे राजाराम महाराजांनी झुल्फिकार खानाबरोबर तहाचे बोलणे लाविले. बोलणी करण्यासाठी आपला दासीपुत्र कर्ण यास कारकुनासह वांदिवाशला रवाना केले. २ ऑगस्ट १६९७ रोजी राजा कर्ण व कारकून मंडळी वांदिवाशला गेली. त्यांचे बोलणे ऐकून घेऊन झुल्फिकार खानाने ते बादशहास कळविले. ह्या बोलण्यात राजाराम महाराज मोगलांचे स्वामित्व पत्करण्यास तयार असून त्याप्रमाणे तह घडून यावा असा आशय त्यांत होता. परंतु औरंगजेबाने तहास मान्यता न देता जिंजी काबीज करण्याचाच कडक आदेश दिला. तेव्हा झुल्फिकार खानाने कर्ण यास परत पाठविले. यानंतर ८ नोव्हेंबर १६९७ त झुल्फिकार खानाने जिंजीचा वेढा कडक केला. किल्ल्याभोवती ठाणी बसवून ती सरदारांत वाटून दिली. दाऊदखान चिखली दुर्गाच्या पायथ्याशी ठाणी वसवून होता. त्याने धाडसाने चमार टेकडीवर हल्ला चढविला आणि एका रात्रीत त्याने किल्ला जिंकून घेतला. झुल्फिकार खानाने मनात आणले असते तर तो जिंजीला ज्या दिवशी पोचला त्याचदिवशी तो किल्ला हस्तगत करू शकला असता पण राजारामास सुखरुपपणे जिंजीहून पळून जाण्यासाठी त्याने मुद्दाम मोहीम लांबविली. राजाराम महाराजांपाशी युद्धसामग्री पुरेशी नव्हती. चमार टेकडी हातची गेली होती हे सर्व पाहून राजाराम महाराज घाबरले. त्यांनी खंडोबल्लाळ यांजला खानाकडे बोलणी करण्यास पाठविले. आपण कोणत्या बाजूने हल्ले करणार, तुम्हास बाहेर निघून जाण्यास कोणीकडून कशी संधी ठेविली आहे इत्यादी प्रकार खानाने खंडोबल्लाळ मार्फत राजाराम महाराजांस कळविले. खानाच्या सैन्यांत गणोजी शिर्के सरदार होते. त्याजला खंडोबल्लाळ भेटले आणि छत्रपतीच्या आणि त्याच्या कुटुंबीयांचा बचाव करण्याविषयी त्यास त्याने गळ घातली. गणोजी शिर्के यांना दाभोळीच्या देशमुखीचे वतन हवे होते ते राजाराम महाराजांनी खंडोबल्लाळास दिले होते. खंडोजीने ते वतन लगेच गणोजीच्या हवाली

करण्याचे कबूल केले आणि छत्रपतीकडून त्याच्या लेखी सनदा लिहून घेऊन शिर्क्यांचे हवाली करण्याचे कबूल केले.[१] नंतर शिर्के यांनी राजाराम महाराजांस बुरख्याच्या पालखीत बसवून आपल्या आप्तांच्या बायका असे सांगून स्वतःच्या गोटांत आणिले. दुसरे दिवशी शिकारीचे निमित्त सांगून शिर्के राजाराम महाराजांस बरोबर घेऊन बाहेर पडला. जवळच धनाजीची फौज आली होती, तिच्या हवाली राजाराम महाराजांस केले तेथून राजाराम महाराज वेलोरास दि. १ डिसेंबर १६९७ रोजी गेले. वेलोरचा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात होता. मानाजी मोरे नावाच्या किल्लेदाराने राजाराम महाराजांची सर्व व्यवस्था नीट ठेवली. अशा रीतीने राजाराम महाराजांची सुटका करवून झुल्फिकार खानाने राजाराम महाराजांशी मैत्री जोडण्यात त्याचा अंतिम हेतू बादशहाच्या मृत्यूनंतर गोवळकोंड्याचे राज्य घ्यावयाचे व राजाराम महाराजांस विजापूरचे राज्य द्यावयाचे हा होता किंवा काय हे समजण्यास पुरेसा पुरावा उपलब्ध नाही असे बेंद्रे म्हणतात.[२]

जिंजी किल्ला मुसलमानांच्या ताब्यात

राजाराम महाराज निघून गेल्यावर रावदलपत आणि मोगलांकडील दाऊद खानाची माणसे किल्ल्याच्या तटापर्यंत पोचली. रावदलपत किल्ल्यात आला. किल्ल्यातील लोक मागे हटले. त्यांनी किल्ल्यात कालाकोट म्हणून एक कोट होता तेथे आश्रय घेतला. तेव्हा दलपतचे सैनिक कालाकोटमध्ये शिरले आणि शत्रूपैकी अनेकांना ठार मारून त्यांनी कालाकोट आपल्या ताब्यात घेतला. त्यानंतर झुल्फिकार खान किल्ल्यात आला. तेथून त्याने कृष्णगिरीकडे चाल केली. किल्ल्यात सुमारे चार हजार लोक होते त्यांनी तहाची याचना केली. झुल्फिकार खानाने आपले निशाण किल्ल्यावर चढविल्यावर जी मराठा मंडळी झुल्फिकार खानास शरण आली त्याचे समाधान झुल्फिकार खानाने केले. राजाराम महाराजांच्या बायका-मुलांसाठी पालख्या पाठविल्या. ती सर्व माणसे किल्ल्याबाहेर आली. झुल्फिकार खानाने त्यांची काळजीपूर्वक निगा राखली. किल्ल्यांत स्त्री पुरुष मिळून चार हजार माणसे होती. पण त्यांत लढवय्ये असे फार थोडे होते, युद्धात भाग घेणाऱ्यांपैकी राजाराम महाराजांच्या अनेक सैनिकांना ठार मारण्यात

१ शिवचरित्र साहित्य भा. ३. ४३८, बेंद्रे, छत्रपती राजाराम, पृ. २१५.

२ बेंद्रे, छत्रपती राजाराम, पृ. २२१.

आले असे वर्णन भीमसेन सक्सेना याने तारिखी दिलकशामध्ये दिलेले आढळते.[१] अशा रीतीने राजाराम महाराज जिंजीकडून महाराष्ट्रात विशालगडी आल्यावर झुल्फिकार खानाने जिंजीचा किल्ला इ.स. १६९८ च्या जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात मराठ्यांकडून जिंकून घेतला.

जिंजीहून महाराष्ट्रात परत आल्यानंतरच्या राजाराम महाराजांच्या हालचाली :

जिंजीहून राजाराम महाराज २ जानेवारी १६९८ रोजी निसटले व वेलोरच्या किल्ल्यात मुक्कामास आले. जिंजीच्या किल्ल्यांतील सर्व व्यवस्था लावण्यासाठी झुल्फिकार खानाने दुसऱ्या दिवशी किल्ल्यात मुक्काम केला. इतर अमीर उमराव आपआपल्या निवासस्थानी परतले. त्यापैकी राजारामाची बायकां-मुले व युद्ध कैदी घेऊन झुल्फिकार खान हा किल्ल्याबाहेर आला. राजाराम महाराजांच्या बायकां-मुलांची मात्र त्याने काळजी घेतली. त्यांना पालख्या देऊन वेलोर येथे पोचविण्यात आले. त्यात ताराबाई, राजसबाई, शिवाजीराजे व सोयराबाई ही मंडळी होती. परतीच्या प्रवासांत त्यांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्रांतून पाच हजारांची फौज आल्यावर राजाराम महाराज आणि कबिला यांनी फेब्रुवारी १६९८ मध्ये वेलोर सोडले. राजाराम महाराजांच्या मदतीस येत असलेल्या सैन्यास रोखण्याकरिता व राजाराम महाराज निसटले म्हणून त्यांचा पाठलाग करण्याचे नाटक झुल्फिकार खानाने केले. त्याने राजाराम महाराजांचा पाठलाग करण्यासाठी १६९८ च्या फेब्रुवारी २६ तारखेस जिंजीहून कूच केले. खानाने गुरुमकोंड्यापर्यंत त्यांचा पाठलाग करण्याचे नाटक केले. राजाराम महाराजांनी मंडळीसह कोपल-भुदरमार्गे प्रवास केला. मार्चच्या शेवटच्या आठवड्यात ते भुदरगडास आले. तिथून २२ मार्च १६९८ रोजी विशालगडला आले.

□□

४७. महाराष्ट्रात परतल्यानंतर राजाराम महाराजांच्या हालचाली

राजाराम महाराज २२ मार्च १६९८ रोजी विशालगडास आल्यावर त्यांनी दोन अडीच महिने निरनिराळ्या गडांवर जाऊन पाहणी केली. त्यामुदतीत मराठे वऱ्हाड खानदेश भागात पसरू लागले. बागलाणात येसाजी व खंडोजी दाभाडे, खानदेशात नेमाजी शिंदे, आणि बुवासाहेब ऊर्फ विश्वासराव पवार, वऱ्हाडांत परसोजी भोसले, मध्य महाराष्ट्रात धनाजी जाधव आणि हणमंतराव निंबाळकर आणि दक्षिण महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटक या भागांत बहिर्जी हिंदुराव घोरपडे आणि संताजी घोरपड्यांचे चिरंजीव राणोजी घोरपडे अशा रीतीने मराठ्यांच्या हालचालीस सुरुवात झाली.

बुऱ्हाणपुरावर हल्ला :

इ. स. १६९८ मध्ये मराठे सरदार नेमाजी शिंदे, धनाजी आणि इतर सरदार हे मोठी फौज घेऊन बुऱ्हाणपुरास आले व त्यांनी बुऱ्हाणपुराला वेढा घातला. नजाबतखान सुभेदार आणि मोगल अधिकारी यांनी बाहेर येऊन शत्रूचा पाडाव करण्याची शिकस्त केली. तीन दिवस ते हत्तीवर स्वारी करून होते. यानंतर मराठे शहर सोडून निघून गेले.[१] अकबरपूरच्या उतारावरून नर्मदा ओलांडून माळव्यांत आक्रमण करावे असा त्याचा उद्देश होता असे खाफीखान लिहितो. नंदुरबार शहरावर हल्ला करून मराठ्यांनी मर्दुमकी केली त्याचे वर्णन खाफीखान देतो ते असे.[२] " या सुमारास नेमाजी शिंदे आणि राजाराम महाराजांचे इतर सरदार हे आठ हजार स्वारांचे सैन्य घेऊन नंदुरबार परगण्यांत पोहोचले. त्यांनी या परगण्यांतील अनेक गावे उद्ध्वस्त केली. हुसेन अलिखान थाळनेरहून निघून त्यांच्यावर चालून

१ हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. ३९.

२ कित्ता, पृ. ४०.

गेला. मराठ्यांनी त्याचा समाचार घेतला. थाळनेरपासून दोन कोसांवर उभयपक्षांचे युद्ध झाले. हुसेन अलीने शौर्याची शर्थ केली पण नेमाजी शिंदेपाशी फौज मोठी होती. त्याने हुसेन अलिखान यास चहूकडून घेरले. आणि त्याच्यावर मारा केला. तेव्हा तो रक्तबंबाळ होऊन हत्तीवरून खाली पडला. तेव्हा मराठ्यांनी त्यास कैद केले. त्याचे हत्ती, घोडे, बाजारबुणगे, सर्व काही गायब झाले. याशिवाय मराठ्यांनी त्याजकडे खंडणी म्हणून दोन लाख रुपयांची मागणी केली. त्याजवळ एवढी रक्कम नव्हती म्हणून ती शहरातून शेट सावकारापासून मिळविण्याचा प्रयत्न त्याने केला. त्यांतही त्यास यश आले नाही म्हणून त्याने मराठ्यास नंदुरबारला वेढा घालण्याचे सोंग करा म्हणजे गावांतील शेट-सावकार, धनिक माणसे इत्यादींना पकडावे व त्यांजकडून खंडणी घ्यावी व आपली मुक्तता करावी. ह्या पद्धतीने एक लाख चाळीस हजार रुपये मराठ्यांच्या हाती पडले. हुसेन अलिखानाने स्वत:करता ३० हजार रुपये गोळा केले. ही बातमी बादशहास कळल्यावर तो म्हणाला की " आपल्यात लढण्याचे बळ नव्हते तर व्यर्थ लढण्यात काय हंशील होते ? "

औरंगजेबाने शहाजादा बेदारबख्त यास पन्हाळा भागात ठेवले. गाजिउद्दीन फिरोजजंग हा विजापूरच्या सरहद्दीवर बिदर प्रांतात (गुलबर्गा जिल्हा) होता. त्याला औरंगजेबाने वऱ्हाडच्या सुभेदारीवर पाठविले. उत्तरेकडे मराठ्यांची आक्रमणे वाढत्या प्रमाणात होऊ लागली याकरिता ही खबरदारी घेण्यात आली. खुद्द स्वराज्यांत मोगलांच्या लष्करी ठाण्यावर मराठ्यांचे हल्ले चालूच होते. राजाराम महाराज विशाळगडला आले त्यावेळी पुरंदर व रायगड हे दोन किल्ले सोडले तर बाकीचे सर्व प्रमुख किल्ले मराठ्यांच्या ताब्यात आले होते. कोकणात आंग्रे यांचे आरमार सिद्दींना हळूहळू पायबंद घालत होते. मराठ्यांचा आरमारी प्रमुख आणि बलाढ्य सेनानी कान्होजी आंग्रे हा अलिबागच्या आपल्या मुख्य आरमार तळावरून मोगलांनी हस्तगत केलेल्या किनारपट्टीवरील मुलुखात दहशत निर्माण करीत होता.

कोकणात कान्होजी आंग्रे यांनी सिद्दीने जो मराठ्यांचा मुलूख संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर बळकावला तो सिद्दीकडून जिंकून घेण्याचे ठरविले.

दिनांक १५ नोव्हेंबर १६९८ च्या सुमारास मराठ्यांची एक तुकडी बारदेशमध्ये घुसली व तेथील लोकांकडून माणशी तीन रुपये पट्टी सक्तीने वसूल केली. तर पोर्तुगिजांनी मराठ्यांच्या आचरे बंदरात जाऊन तेथे जाळपोळ केली.[1] इ. स. १६९९ मध्ये कान्होजी आंग्रे यांनी सिद्दी, मोगल व पोर्तुगीज यांच्या संयुक्त फौजांचा सपशेल पराभव केला आणि रायगड किल्ला व त्याभोवतालील प्रदेश काबीज केला.[2]

राजाराम महाराजांची कर्नाटकात स्वारी (१६९९) :

सन १६९९ च्या सुरुवातीस राजाराम महाराजांनी कर्नाटकाच्या स्वारीवर जाण्याचे धाडस केले. स्वारीवर जाण्यापूर्वी ताराबाई आणि शिवाजी राजे यांना त्यांनी सज्जनगडाकडे पाठविले. कर्नाटकाच्या स्वारीवर राजाराम महाराज निघण्याचा हेतू बहुधा बादशहाचे मन द्विधा करणे हा असावा. त्यांनी धारवाड, हुबळी, सावनूर, शिमोगापर्यंत ही स्वारी केली असावी. ह्या स्वारीचा काल दोन महिन्याचा होता.

मार्च, १६९९ च्या सुरुवातीस महाराज कर्नाटकातून पन्हाळ गडावर परतले व तेथून विशाळगडावर आले.

१६९९ मध्ये मराठ्यांची आक्रमणे औरंगाबाद, वऱ्हाड आणि खानदेश या सुभ्यातून मोठ्या प्रमाणांवर चालू झाली. औरंगजेबास १६ एप्रिल १६९९ रोजी हरकाऱ्याच्या तोंडून कळले की कृष्णा सावंत हा मोठे सैन्य घेऊन वऱ्हाड प्रांतांत हालचाल करीत होता.[3] औरंगजेबास हेरांनी कळविले की जालन्याजवळ मराठे सरदारांनी चार हजार सैन्यांसह बादशाही मुलूख लुटला. त्यांजवर मोगल सरदार तरबियतखान तातडीने चालून गेला. ३ एप्रिल १६९९ ला तुंबळ युद्ध झाले. मराठ्यांचा पराजय झाला. खूप लूट बियतखानाच्या हाती पडली.[4]

१८ एप्रिलला बादशहास समजले की मराठ्यांचे सहा हजार स्वार गुलबर्ग्याच्या जवळ येऊन त्यांनी कित्येक खेडी लुटून जाळपोळ केली.

१ हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. १८७.

२ पिसुर्लेकर, पृ. १३१-२३९.

३ राजवाडे, खंड १६, ले. ३५.

४ मो. द. बा. प., १६ एप्रिल १६९९.

हीरापेठ लुटली. बादशहाने त्याचे पारिपत्य करण्यासाठी तरबियतचा भाऊ कामयाब यास रवाना केले.

६ मे रोजी धनाजी जाधव वगैरे सरदार २५ हजार स्वारांचे सैन्य घेऊन बीदर जिल्ह्यात गेले. त्यांचा पाडाव करण्याची कामगिरी तेथील किल्लेदार व फौजदार सजावरखान याजवर बादशहाने सोपविली.[१]

मराठ्यांनी ८ मे १६९९ रोजी सिद्धगड काबिज केला व एक हजार पायदळ सैनिक व किल्ला चढून जाण्याची सामग्री (दोराच्या शिड्या वगैरे) माहुलीकडे पाठविली. बादशहाला हे कळताच त्याने माहुली किल्ला लढविण्याची कामगिरी कल्याण-भिवंडीचा ठाणेदार मातबरखान याजवर सोपविली.

याच सुमारास अहमदनगर जिल्ह्यातील शेगांव परगण्यांतील खेडी मराठा सरदार हणमंतराव याने लुटली. त्याचे पारिपत्य तेथील मुसलमान फौजदार इल्तिफातखान याजकडे पथके नसल्यामुळे झाले नाही.[२]

१३ मे १६९९ ला हरकाऱ्याकडून बादशहास समजले की धनाजी जाधव याने पिठूरच्या गढीला वेढा घातला. तेथील देशमुखाने ७ दिवस गढी लढविली. शेवटी धनाजीने देशमुखास कैद केले आणि त्याजकडून ४० हजार रुपये चौथ म्हणून घेतले. हे बादशहास कळताच त्याने चीनकुलीजखान बहादूर यांस धनाजी जाधवाचे पारिपत्य करण्याची आज्ञा केली त्याप्रमाणे तो जाधवाच्या पारिपत्यासाठी परंडा भागात पोहोचला.[३]

इतक्यात बादशहास हरकाऱ्याकडून बातमी कळली की धनाजी जाधव हा हैदराबाद सुभ्याच्या हद्दीवरून परतून बादशहाच्या छावणीपासून (ब्रह्मपुरीपासून) अकरा कोसावर जीवणी या गावी आला. तेव्हा दहा जून रोजी चीनकुलीजखान व जबरदस्त खान हे आपल्या सैन्यासहित धनाजी जाधवाच्या पारिपत्यासाठी माण नदीवरून सत्तावीस कोस पुढे गेले. भानावली मुक्कामी युद्ध झाले. उभय पक्षाचे अनेक लोक ठार झाले.

१ पगडी (सं) मोगल दरबारची बातमीपत्रे, मे, १६९९.

२ कित्ता १० मे, १६९९.

३ कित्ता २ जून, १६९९.

सुमारे दोनशे घोडे, नगारे, निशान वगैरे लूट मोगलांना मिळाली. धनाजी जाधवांसह सर्व मराठे पळून सातारा प्रांताकडे गेले. त्यांचा पाठलाग चीनकुलीजखान बहादूर याने केला.[१] तरबियतखान हा दारूगोळ्याचा अधिकारी याने धनाजी जाधवास गाठून त्याचा पराभव केला आणि आपल्या विजयाची बातमी सांगण्यासाठी तो बादशाही तळाजवळ १२ जून १६९९ रोजी पोहचला. वरील हकिगतीवरून दिसते की मराठे औरंगाबाद, बीड, नळदुर्ग, बीदर या ठिकाणी लुटालूट करीत होते.[२] याचवेळी बादशहास हेरांनी सांगितले की मराठ्यांचे पन्नास स्वार जालन्याभोवती फिरून लोकांची लुटालूट करीत होते. बादशहाने त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी औरंगाबादच्या सुभेदारास व फौजदारास हुकूम पाठविले. बादशहाला २१ जूनला बातमी समजली की नागपूरजवळील देवगडचा किल्ला मोगलांनी काबीज केला.

२ जुलै १६९९ रोजी बादशहास सांगण्यात आले की, राजाराम महाराज आपल्या किल्ल्यांची पहाणी करण्यासाठी तळकोकणांत गेले होते तेथून ते साताऱ्याला परत आले. साताऱ्यास ते चार दिवस राहिले तेथून ते मावळांत गेले. तेथील जमीनदारांचा पाहुणचार घेऊन ते प्रतापगडावर आले. तेथे त्याचा मुलगा संभाजी राजांचा जावळ क़ाढण्याचा समारंभ करण्यात आला. तेथून राजसबाई व संभाजीराजे यांच्यासह कूच करून महाराज सातारा सज्जनगडमार्गे वसंतगडावर आले. तेथे त्यांचा मुक्काम असता विशाळगडावरून ताराबाई, शिवाजीराजे व अंबिकाबाई हे येऊन पोहचले. वसंतगडावरून मग सर्वजण ऑगस्टमध्ये साताऱ्यास गेले.[३] तेथे ते ऑक्टोबर १६९९ पर्यंत होते.

साताऱ्यासच स्वराज्याची राजधानी स्थापण्याचे राजाराम महाराजांनी ठरविले. स्वराज्याची पूर्वीची राजधानी रायगड मोगलांच्या ताब्यात होती, तसेच नव्याने स्थापन केलेली जिंजी ही राजधानीही शत्रूच्या हाती पडली होती. स्वराज्याचा कारभारी रामचंद्रपंत अमात्य गेली आठ-नऊ वर्षे विशाळगडाहून कारभार हाकत असल्याने त्या गडास राजधानीचे स्वरूप आले होते. तथापि, विशाळगड हा स्वराज्याच्या केंद्रस्थानी येत नसल्याने

१ पगडी (सं) मोगल दरबारची बातमीपत्रे, ११ जून १६९९.

२ ताराबाईकालीन कागदपत्रे खं. १, पृ. ५४८-५४९.

३ कित्ता.

त्यावरून कारभार हाकणे आडवळणी पडत होते म्हणून सर्व स्वराज्यावर चौफेर नजर टाकण्यास सातारा हे मध्यवर्ती ठिकाण राजाराम महाराजांनी पसंत करून तेथेच आपली राजधानी थाटली.[१]

मोंगल दरबारच्या बातमी पत्रावरून समजते की परसोजी भोसले आदी मराठे सरदार गुलबर्ग्याच्या प्रदेशांत पसरले होते. राजाराम महाराज साताऱ्याहून निघून वसंतगडला पोचले.[२] मराठ्यांचे यमाजी वगैरे सरदार दहा-बारा हजार स्वारांसहित देवराई या गावात ठाण मांडून बसले होते. पुरंदर किल्ल्याच्या दरोग्याने कळविले की मराठ्यांचे सैन्य त्या भागांत पसरले आहे. जुन्नरला तीनशे मराठे लोहगडापाशी आले. वरील बातम्या बादशहास मिळत होत्या. त्याबरोबर बादशहाच्या हेही लक्षात येत होते. की मोगल अधिकारी आणि सरदार मराठ्यांच्या ठिकठिकाणच्या उठावाबद्दल काहीच करत नाहीत. त्याचवेळी औरंगाबाद सुभ्याचे रक्षणाकरिता भाग पाडण्याची योजना झुल्फिकार खान याने खालीलप्रमाणे मांडली[३] :—

(१) झुल्फिकार खान बहादूर याजकडे अहमदनगर, पुणे, संगमनेर, शिरवळ.

(२) औरंगाबादचा फौजदार नजाबत खान याजकडे, जालना, अंबड, वैजापूर, कन्नड, फर्दापूर, गोदावरीवरील शहागडापर्यंत.

(३) बीडचा फौजदार इल्तिफातखान याजकडे फत्तेहाबाद, शेवगांव, शहागड, बादशाही, छावणी (ब्रह्मपुरी).

(४) धारूरचा फौजदार उजबेगखान याजकडे औसा, नलेगांव, गोदावरीपर्यंत.

(५) नळदुर्गचा किल्लेदार व फौजदार मिहदीखान, याजकडे हद्दी गुलबर्गा, सोलापूर, अफझलपूर.

बादशहाने ह्या मांडणीस मान्यता दिली व निक्षून पुन्हा सांगितले की मराठ्यांना आपल्या हद्दीत राहू देऊ नये, तसेच त्यांना छावणी करू देऊ

१ भारत वर्ष पंतप्रतिनिधींची बखर, पृ. ३९.

२ ता. का. प. पृ. १९८, ४७९ शिवचरित्र साहित्य खंड ३, पृ. ८६-८७.

३ मो. द. बा. प., १६ ऑगस्ट १६९९.

नये व २४ ऑगस्ट १६९९ रोजी बादशहास समजले की सहा हजार मराठे स्वारांनी येरवळ व कंधार (नांदेड जिल्हा) येथे छावणी केली तेव्हा बादशहाने नांदेड सुभेदार व धारूर किल्लेदार यांना लिहून कळविले की त्यांचे पारिपत्य करणे. याचवेळी वऱ्हाडांत परसोजी भोसले मोगलांविरुद्ध हालचाली करत होता. आज्जमगड पुरंदर भागात मराठा सरदार परशुराम हा दोन हजार स्वार घेऊन दंगल करीत होता. ऑक्टोबर २३ (१६९९) रोजी काही मराठे सरदार मंगळवेढ्याच्या भोवती आल्याचे बादशहास समजले. याचवेळी बादशहास हेरांनी कळविले की राजाराम महाराज सातारा किल्ल्यावर असून तिथे आपली बायकांमुले ठेवून सुरत बंदरांकडे ते जाऊ इच्छित होते. याचवेळी बादशहास कळविण्यात आले की राजाराम महाराजांनी रामचंद्रपंत अमात्य व निळोपंत यांना सातारा किल्ल्यात सोडले असून ते स्वत: साताऱ्याहून चार कोस पुढे गेले आणि निगुनबक्त ह्या गौंडच्या बंडखोर राजास भेटले.[१] अशारीतीने मराठे बादशाही मुलुखावर पसरू लागले. त्यांचे धाडस व उच्छाद ही वाढतच चालली. त्यांच्या धामधुमीच्या बातम्या बादशहाच्या कानावर वरीलप्रमाणे सारख्या येऊ लागल्या तेव्हा बादशहाने ठरविले की, मराठ्यांचे निवासस्थान म्हणजे किल्ले. ते जिंकून घ्यावे आणि त्याची पाळेमुळे खणून काढावी. अशारीतीने बादशहाने स्वत: मोहिमेवर जाण्याचा पक्का निर्धार केला. याच सुमारास बादशहास कळले की मराठा नर्मदा ओलांडून माळव्यांत घुसले. कृष्णा सावंत १५ हजार स्वारांनिशी नर्मदापार झाला. त्याने धामूनी या गावाजवळच्या प्रदेशांत धामधूम उडविली. त्यानंतर तो परत फिरला. मुसलमान सुलतानच्या काळापासून आजपर्यंत मराठे कधीच नर्मदापार झाले नव्हते असे भीमसेन म्हणतो.[३] मराठे बीदर, हैदराबाद, वऱ्हाड, खानदेश या सुभ्यांत पसरून माळव्याच्या रोखाने जाऊ लागले हे पाहून औरंगजेबाची मती गुंग झाली आणि त्याने १९ ऑक्टोबर १६९९ रोजी मराठ्यांचे किल्ले घेण्याच्या उद्देशाने आपल्या सैन्यासह ब्रह्मपुरी सोडून तिकडे रवाना झाला. त्यावेळी सैन्यांतील लोकांना वाटले होते की बादशहा काही येथून लांबचा प्रवास करणार नाही पण बादशहाने सैन्यासह निर्धाराने कूच करून वसंतगडास मोर्चे लाविले. तो गड ताब्यात घेऊन वीस दिवसांच्या मजला करून बादशहाने

१ पगडी (सं) मोगल दरबारची बातमीपत्रे, २५ ऑक्टोबर १६९९.

२ खोबरेकर, तारिख-इ-दिलकशा, पृ. २१६.

३ मोगल-मराठा संघर्ष, पृ. १४३.

सैन्यासह मिरज ऊर्फ मुर्तुजाबाद येथे छावणी दिली. बादशहाने आपला मुलगा महंमद आज्जम यांस वडगांवहून बोलाविले होते तो या मुक्कामावर बादशहास येऊन मिळाला. बादशहास ही मोहीम मरेपर्यंत पुरली.[१] ह्यावेळी मराठ्यांनी आपले पूर्वीचे धोरण चालू ठेविले ते असे, किल्ला शक्यतो लढवावा, वेढा घालणाऱ्या मोगल सैन्याचे सगळे रस्ते रोखून धरावे, रसद तोडावी. मोगल सैन्याची उपासमार करावी. मोगल सैन्यावर सारखे छापे घालीत रहावे. मोगलांच्या लहान-लहान तुकड्या गारद कराव्या. शेवटी किल्ला जिंकता येणे अशक्य आहे असे वाटले की मोगलांकडून भक्कम रक्कम घेऊन तो त्यांना द्यावा आणि त्यांची पाठ फिरली की किल्ला पुन्हा जिंकून घ्यावा. मराठ्यांच्या एकेका किल्ल्यांत दोन-तीन हजारापेक्षा अधिक शिबंदी नसे. पण एकेका किल्ल्याच्या समोर पन्नास पन्नास हजार सैन्य घेऊन औरंगजेब महिनोमहिने बसू लागला. मराठ्यांना संचार करण्यास मोगलांचे दक्षिणेतील आणि माळवा गुजरात हे सुभे मोकळे सापडले. हजारांच्या संख्येने ते या सुभ्यांतून अनिर्बंध संचार करू लागले, सुभ्यांतून ठाण मांडून बसू लागले, आपले अधिकारी नेमू लागले आणि चौथाई सरदेशमुखी वसूल करू लागले. मराठ्यांच्या संचाराला आळा घालण्यास मोगल सेनापती असमर्थ ठरले या चुकीच्या धोरणाचा परिणाम असा झाला की मोगलांनी कष्टाने घेतलेले किल्ले लवकर गमावून शेवटी दक्षिण गुजरात, माळवा इत्यादी सुभे गमावण्याची पाळी त्यांच्यावर आली.[२]

राजाराम महाराजांची योजना :

औरंगजेब स्वतः स्वारीवर निघाल्याचे राजाराम महाराजांस समजताच त्यांनी वऱ्हाड खानदेशात स्वारी करण्याची योजना आखली. ही योजना विदर्भातील देवगड नागपूरचा गोंडराजा बख्त बलंद याच्या प्रेरणेने झाली होती. २६ ऑक्टोबर १६९९ रोजी बादशहास कळले की, पुणे व बारामावळ येथे मराठे ठाण मांडून आहेत. बहुतेक खेडी म्हणजे बंडखोरांची आगरे बनली आहेत. याच दिवशी राजाराम महाराज साताऱ्याहून बाहेर पडले. साताऱ्याच्या पायथ्याशी राणोजी घोरपडे यास तैनात करण्यात आले.

१ मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ४१.

२ हिंदवी स्वराज्य आणि मोगल. पृ. १८८.

राजाराम महाराजांबरोबर सात हजार स्वार असून धनाजी जाधव, रामचंद्रपंत अमात्य, दादो मल्हार आदी सरदार होते. चंदनवंदन किल्ल्यापाशी महाराजांना बारा हजाराचे आणखी सैन्य येऊन मिळाले असे ४ नोव्हेंबर (१६९९) च्या मोगल दरबारच्या बातमीपत्रावरून समजते.[१]

राजाराम महाराजांची अयशस्वी स्वारी :

इकडे औरंगजेबानेही मराठ्यांचे बेत हाणून पाडण्याची तयारी केली. राजाराम महाराज स्वारीवर निघाले आहेत हे समजल्यावर बादशहाने शहाजादा अज्जमचा मुलगा बेदारबख्त याची महाराजांचा पाठलाग करण्यासाठी नेमणूक केली. त्याने राजाराम महाराजांस परंड्याजवळ अडविले. तेव्हा महाराजांनी पाठ फिरवून ते परंडा किल्ल्यांच्या मार्गाने टेंभूर्णीजवळ आले आणि भीमानदी ओलांडून साताऱ्यास परत आले. वाटेत महाराजांनी धनाजी जाधव आणि इतर सरदार यांना ब्रह्मपुरीच्या मोगल छावणीवर पाठविले. त्यांनी ब्रह्मपुरीजवळ धाडशी आक्रमणे केली. त्यांचा पाठलाग झुल्फिकार खानाने रहिमतपुरापर्यंत केला व तो त्यांच्या मागोमाग मिरजेपर्यंत गेला. याचवेळी बादशहाने रुहुल्लाखान बख्शी आणि हमीनुद्दीनखान खान बहादूर यांना सातारा आणि पन्हाळा प्रांत उद्ध्वस्त करण्याच्या कामावर नेमले.[२] बादशहा सैन्यासह मिरजेहून निघाला आणि त्याने २१ नोव्हेंबर १६९९ रोजी वसंतगडच्या अलीकडे तीन कोसांवर मसूर येथे मुक्काम केला, वसंतगडाच्या वेढ्याची हकिगत खाफीखानच्या शब्दात येणेप्रमाणे "तरबियतखान हा तोफखान्याचा मुख्य अधिकारी होता. वसंतगड किल्ल्याला वेढा घालून मोर्चाचा बंदोबस्त करण्याचे काम त्याला देण्यात आले. किल्ल्यातील लोकांनी उंच जागेवरून तोफांचा आणि इतर अस्त्रांचा भडिमार केला. बादशहाचा निर्धार व धाडस पाहून किल्ल्यातील लोकांचे अवसान गळाले. बादशहाचे हवाली त्यांनी किल्ला देण्याचे ठरवून ते रात्रीच्यावेळी किल्ल्यातून पळून गेले. किल्ला मोगलांनी आपल्या ताब्यात

१ पगडी (सं) मोगल दरबारची बातमीपत्रे, ४ नोव्हेंबर १६९९.

२ कित्ता, ६ नोव्हेंबर १६९९.

घेतला ".[१] वसंतगडचा किल्ला २५ नोव्हेंबर १६९९ रोजी मोगलांनी घेतल्यावर मोगलांचे सैन्य ८ डिसेंबर १६९९ रोजी साताऱ्याच्या किल्ल्यासमोर आले. बादशाही सरदारांनी किल्ल्याच्या भोवती जागोजाग आपले तळ ठोकले. थोड्याच वेळात त्यांनी मोठमोठ्या तोफा बांधलेल्या उंच अशा दमदम्यावर चढविल्या. तोफांचा मारा सुरू झाल्यावर किल्ल्यातील लोकांनी रात्रंदिवस बाण, तोफांचे गोळे, बंदुकीच्या गोळ्या यांचा अक्षरशः पाऊस पाडला. किल्ल्यातील लोक सतत हजारो दगड किल्ल्यावरून टाकीत. माणसे व जनावरे यांच्यावर दगड पडून ती कामातून गेली. मराठ्यांनी मोगलांच्यावर हल्लेच्या हल्ले केले, किल्ल्याभोवतीच्या कोसकोसांचा प्रांत त्यांनी उद्ध्वस्त केला त्यामुळे मोगल सैन्यास रसद येईनाशी झाली.[२] किल्ल्यांच्या बाहेर पसरलेल्या असंख्य मराठा सैन्याने रसदेच्या ने-आणीवर हल्ले केले. त्यांनी वीस कोसांच्या प्रदेशात गवत, चारा इत्यादी जाळून फस्त केली. किल्ल्यातील लोक गोळ्यांचा सतत वर्षाव करीत किल्ल्यांतील मराठे किल्ल्याबाहेर पडून वरचेवर हल्ले करीत. किल्ल्याबाहेर चहुकडे पसरलेल्या मराठा सैन्याच्या आक्रमक हल्ल्यामुळे मोगल जेरीस आले. धनाजी जाधवाने आपल्या सैन्याचे तीन विभाग केले आणि तो ब्रह्मपुरी येथील बादशाहाच्या छावणीवर चालून गेला. मोगलांनी त्याचा हल्ला परतविला. २७ डिसेंबर रोजी बादशाही छावणीपासून अवघ्या चार मैलांवर हणमंतराव निंबाळकर याने मोगलावर हल्ला चढविला. मोगल सरदार इखलासखान आणि त्याचा मुलगा महंमद या हल्ल्यात ठार झाले.

सातारा किल्ल्याचा तट म्हणजे भिंत नाहीच तो डोंगरच होता. त्यामुळे तोफांच्या माऱ्याने त्यांच्यावर परिणाम होईना.[३] किल्ल्यावर मराठ्यांचे अधिकारी सुभानजी आणि प्रागजी प्रभू हे होते. त्यांनी मोठ्या निकराने वेढा लढविला. साकी मुस्तैदखान लिहितो की, साताऱ्याचा किल्ला म्हणजे

१ पगडी (सं) मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ४३.

२ मराठे व औरंगजेब, पृ. ८१.

३ कित्ता, पृ. ७८.

मराठ्यांची राजधानी होती. किल्ल्यात तोफा, रसद, इत्यादी सामग्री भरपूर होती. किल्ल्यावर पाण्याचे झरे होते. उन्हाळ्यातही ते आटत नसत. किल्ल्यात कसलेले वीर होते. त्यांना आपले प्राण देणे म्हणजे क्षुल्लक गोष्ट वाटे.[१] सातारा किल्ला हा नऊशे फूट उंच आहे. किल्ल्याची लांबी पूर्व-पश्चिम अकराशे यार्ड आणि उत्तर-दक्षिण सहाशे यार्ड आहे. किल्ल्याचा आकार (टोकावर) त्रिकोणाचा आहे. किल्ल्याला दोन दरवाजे आहेत. एक उत्तरेच्या दिशेने आणि दुसरा दक्षिणेकडे. किल्ल्याच्या ईशान्य कोपऱ्यापासून थोडासा पश्चिमेकडे असा मंगळाई दरवाजा होता. तो आता बंद आहे. इकडे मराठे स्वस्थ नव्हते. किल्ल्यातील माणसे किल्ल्याबाहेर पडून वरचेवर हल्ले करीत. याशिवाय सगळ्या प्रदेशभर मराठ्यांची दले पसरली होती. मोगलांच्यावर ते दिवसरात्री छापे घालीत आणि रसद लुटून नेत. अखबाराच्या आधारावर जदुनाथ सरकार म्हणतात, "किल्ल्याभोवती पडलेला मोगलांचा वेढा पाहिजे तितका कडक नव्हता. अगदी वेढा संपेपर्यंतच्या काळापर्यंत मराठे किल्ल्यातून ये-जा करू शकत. किल्ल्यात माणसे पोहोचत व रसदही पोहोंचे" शहाजादा आज्जम तिकडे कानाडोळा करतो असा संशय होता. रुहुल्लाखानाच्या मोर्चाच्या पलीकडे आणि आज्जमच्या छावणीस लागून एक झरा होता. किल्ल्यातील लोक तिकडे पाणी आणण्यास जातात असे ६ जानेवारी १७०० रोजी बादशहास कळले. त्यांच्या आज्ञेने १३ जानेवारी रोजी आज्जमच्या सैनिकांनी झऱ्याचा ताबा घेतला.[२]

३० डिसेंबरला मराठ्यांविरुद्ध मोठ-मोठे सरदार पाठविण्यात आले. पण मराठे हाती लागले नाहीत. ७ जानेवारीला मराठ्यांनी मोगलांवर हल्ला केला. मोंगलांची परिस्थिती कठीण झाली. बादशाही छावणीतून सैन्य पाठवून त्यांची सुटका करावी लागली.[३] १० जानेवारी १७०० रोजी

---

१ मराठे व औरंगजेब, पृ. ८०-८१.

२ कित्ता, पृ. ८२.

३ कित्ता.

रहमतपुरापलीकडे मराठे सरदार धनाजी जाधव, हणमंतराव निंबाळकर आणि राणोजी घोरपडे हे एकीकडे आणि मोगल सरदार झुल्फिकार खान, बहरामंदखान, हमीदुद्दीन खान हे दुसरीकडे असे प्रखर युद्ध झाले. मराठ्यांची फौज १५ हजार होती. निकराच्या युद्धानंतर मराठे १ मैल मागे हटले. या लढाईत पाचशे मराठे मारले गेले. २२ जानेवारी रोजी धनाजीने हल्ला करून खानापूरचा मोगल सरदार धरला. मराठ्यांचे मुख्य ठाणे चंदनवंदन किल्ल्यात होते तेथून ते मोगलांची उत्तरेकडील वाट अडवीत.[१] आपले सरदार कामात कुचराई करतात अशी औरंगजेबाची तक्रार होती. औरंगजेबाने लष्करातील मुख्य काजी महंमद इकराम यास बोलावून त्याजकडे आपल्या मनातले वरील विचार बोलून दाखविले.[२]

मोगलांचा सातारगडाचा वेढा चालूच होता. ८ फेब्रुवारी १७०० रोजी सातारगडावरील लोकांनी किल्ल्यातून दमदम्यावर दगडांची सतत वृष्टी केली. यावेळी बादशहाचे आज्ञेने उमरांवाजवळचे दीडशे पाणी वाहणारे भिस्ते मोर्चात ठेवण्यात आले. मराठ्यांनी आगी लावल्या तर विझविण्यासाठीही तजवीज करण्यात आली.[३].

१४ फेब्रुवारी रोजी रात्री बादशाही छावणीतील मावळे सातारा किल्ल्याच्या दरवाजापर्यंत गेले. दरवाज्यांसमोर मराठ्यांचा चौकी पहारा होता. त्या ठिकाणीच चकमक झाली. २१ फेब्रुवारी रोजी बादशहास कळले की, बीडहून वंजारी लोक रसद घेऊन येत होते. त्यावर मराठ्यांनी चंदन-वंदन किल्ल्यातून बाहेर पडून हल्ला केला. उभय पक्षाची बरीच माणसे मृत वा जखमी झाली. मराठ्यांनी वंजाऱ्यांचे बैल, रसद व धान्य लुटून नेली. त्यांचे पारिपत्य करण्याची आज्ञा बादशहाने जुदातुल्मुल्क असदखान यास दिली. बादशहा २६ फेब्रुवारी रोजी किल्ल्याच्या पायथ्याशी पोचला. त्याने तेथील परिस्थितीची विचारपूस केली व दोन घटकांनी ते आपल्या

१ मो.द.बा.प., ३० जानेवारी १७००.

२ मो.द.बा.प., ८ फेब्रुवारी १७००.

३ कित्ता.

छावणीत परतले. मार्चच्या पहिल्या आठवड्याच्या सुरुवातीस ब्रह्मपुरीहून लोकांचा एक मोठा तांडा उत्तरेकडे जाण्यासाठी निघाला असता हणमंतराव निंबाळकर याने अहमदनगरहून दौड करून औरंगाबाद व जळगाव या स्थळांच्यामध्ये कबिला गाठला व तो लुटून फस्त केला. त्यांच्या पारिपत्यासाठी बादशहाने मुसलमान सरदार पाठविला.

राजाराम महाराजांचे अयशस्वी प्रयत्न :

सातारा येथे मोगल मराठे यांची निकराची झुंज चालू असता राजाराम महाराजांनी आपल्या फौजा चहुकडे होत्या त्या जमा करून पातशहाचे मुक्कामावर छापा घालावा व आई येसूबाई व शाहू महाराज यांची सुटका करावी असा बेत केला. सर्व मराठे मुत्सद्द्यांचा विचार घेऊन चालून गेले. पातशाही लवाजमा हुशारीत होता. राजाराम महाराजांनी त्याजवर रात्री छापा घातला. दोन टोळ्या केल्या. पूर्व भागास पाच हजार स्वार, दरस्वारापांशी एक एक बाण जाऊन त्यांनी बाणाची मारामारी करावी. आपण गुपित घाला घालून दक्षिणेकडून जाऊन शाहू महाराज यांस हस्तगत करावे म्हणून संकेत करून अशा रीतीने छापा घातला. पण औरंगजेब त्यावेळी सातार्‍याच्या वेढ्यात गुंतला असून शाहू सातार्‍यासच त्यांच्या छावणीत होते. त्यामुळे राजाराम महाराजांचा हा प्रयत्न निष्फळ झाला. त्यानंतर राजाराम महाराज गंगातीरी आंबेड, पैठण, बीड इत्यादी काही शहरे लुटून जाळून काही खंडण्या घेऊन पुण्यास येण्यास परतले. वाटेत कात्राबाद मांडवगड येथे महाराजांच्या स्वारीवर पातशहाकडील लोकांनी हल्ला केला. त्या हल्लेखोरांचा पाडाव करून त्यास शिक्षा दिल्या व पुण्यास सुखरूप पोहोचले.[१]

राजाराम महाराजांचा मृत्यू :

काही दिवस पुण्यास राहून नंतर सिंहगडावर राजाराम महाराज गेले. महाराजांना छातीचा विकार असावा. सिंहगडावर महाराज आल्यावर त्यांना

१ मल्हार रामरावकृत थो.रा.च., पृ. ६६.
बेंद्रे, छत्रपति राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन हिंदवी स्वराज्याचा मोगलांशी झगडा, पृ. २७९-८०.

अल्पकाळ ताप आला, छातीच्या विकाराने रक्ताच्या गुळण्या होऊन त्याच आजारात ते फाल्गुन व।। ९, ता. २ मार्च १७०० रोजी कालवश झाले. विठोजी राजे भोसले यांच्या वंशातील जीवाजीराजे भोसले बावीकर यांनी विधी केला. मृत्यूसमयी त्यांचे वय ३० पेक्षा अधिक नव्हते. मृत्यूसमयी त्यांचे दोन मुलगे व दोघी स्त्रिया पन्हाळगडावर होत्या. एक अंबिकाबाई विशाळगडावर होती ती सती गेली. मरण समयी राजाराम महाराजांच्या सानिध्यात सिंहगडावर रामचंद्रपंत हजर होता. त्याने दानधर्म बहुत केला. महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अस्थींवर वृन्दावन उभारण्यात आले व त्यांची पुण्यतिथी पूजा-अर्चा वगैरेच्या खर्चास सरंजाम नेमून दिला. वृन्दावनाजवळ शिवाजी महाराज ज्या जागरूक बाणाची पूजा करीत असत तो बाण ठेवण्यात आला.

राजाराम महाराजांसमोर असलेले स्वराज्य रक्षणाचे आव्हान प्रचंड होते. हे आव्हान पेलणे पुढील दोन कारणांसाठी कठीण होते. औरंगजेबासारखा धूर्त पाताळयंत्री व धर्मवेडा मोगल बादशहा मराठी राज्य चिरडण्यासाठी सर्व सामर्थ्यानिशी महाराष्ट्रांत येऊन १८-१९ वर्षे झाली होती. ह्या काळात त्याने मराठ्यांचे गुणदोष पाहिले होते. मराठी वतनदारांचे वतनप्रेम हा सगळ्यात मोठा दोष तो अचूक हेरून मराठी वतनदारांना मुक्त हस्ताने वतने देऊन त्यांची निष्ठा त्याने विकत घेतली. शिवाजी महाराजांनी महत्प्रयासाने उभारलेल्या स्वराज्यांत फूट पडली. अनेक मराठी सरदार वतनाच्या लोभाने मोगलांना मिळाले. त्यांना मराठी राज्याशी बांधून ठेवण्यासाठी राजाराम महाराजांनाही सढळपणे वतने देण्याचे धोरण अवलंबणे भाग पडले. शिवाजी महाराजांप्रमाणे राजाराम महाराजांनाही मराठी सरदार शिपायात देशभक्तीची भावना चेतविण्यासाठी वतनाचा आधार द्यावा लागला. संभाजी राजांच्या क्रूर वधामुळे मराठी समाजाचा आत्मविश्वास ढळला होता. स्वराज्याच्या स्थैर्याविषयी शंका उत्पन्न झाली होती. मराठी समाजातील पराभूत मनोवृत्ती नाहीशी करून त्यांचा आत्मविश्वास, स्वदेशाभिमान व स्वधर्माभिमान जागृत करण्याचे व परिणामस्वरूप मराठी

राज्य मोंगल साम्राज्याच्या पाशवी व लष्करी सत्तेपासून सुरक्षित ठेवण्याचे अमूल्य व महत्वपूर्ण कार्य राजाराम महाराजांनी केले.

राजाराम महाराजांची योग्यता :

रियासतकार सरदेसाई यांनी राजाराम महाराजांस स्थिरबुद्धी म्हटले आहे ते यथार्थच आहे. राजाराम महाराजांना त्यांच्या मातोश्रीने संभाजी महाराजास बाजूला सारून मराठी राज्याचे धनी केले. संभाजी महाराजांनी स्वतः सिंहासनाधिष्ठित होऊन राजाराम महाराजांस ९ वर्षे नजर कैदेत ठेविले. ह्या मुदतीत स्थिर मन राखून महाराजांनी एकही दूषणास्पद शब्द संभाजी महाराजांच्या बाबतीत उच्चारला नाही. मातोश्रीस झालेल्या यातनांचे दुःख त्यांनी गिळले. भावजय, पुतण्या ह्यांवर अतीव प्रेम केले. हे राज्य शाहू महाराजांचे. त्यांची मोगलांच्या कैदेतून सुटका झाली म्हणजे तेच राज्याचे धनी होतील असा सुज्ञ विचार त्यांनी संभाजी महाराजांचा वध झाल्यावर बोलून दाखविला.[१]

राज्य प्राप्त झाल्यावर स्वराज्याची पुन्हा प्राणप्रतिष्ठा करण्याचे काम त्यांच्यापुढे दत्त म्हणून उभे होते. त्याकरिता जनतेस वतन इनामाच्या खिरापती वाटून लोकसंग्रह केला. जिंजीच्या ७/८ वर्षांच्या वास्तव्यात परकीयास औदार्याने जिंकले. सत्यप्रियता व स्वकार्यदक्षता, स्वाभिमान आणि स्वधर्मप्रियता हे अलौकिक गुण त्यांच्या ठिकाणी होते. ते अजातशत्रू होते. त्यांनी शत्रूच्या छावणीवर हल्ला करून येसूबाई व शाहू यांना सोडवून आणण्याचा प्रयत्न केला पण तोही निष्फळ ठरला. त्यांनी वतनदार मंडळीचे सहकार्य मिळविले. जे वतनदार मोगलांकडे गेले होते त्यांना स्वराज्य सेवेकरता परत बोलाविले. त्यांची वतने कायम ठेवून त्यांना नवीन वतने देण्याची आश्वासने देऊन त्यांना राष्ट्रकार्यास लावण्याचा यशस्वी प्रयत्न राजाराम महाराजांनी केला. ह्यामुळे मराठा वीरांनी स्वबळावर इ. स. १७०१ च्या सुमारास राजाराम महाराजांच्या प्रेरणेने नर्मदेच्या दक्षिणेस

१ राजवाडे, खंड १५, पृष्ठ ७६.

खानदेश, वऱ्हाड, कोकण ह्या प्रांतातील प्रदेशातून आणि खेड्यातून मराठे सत्ताधीश बनत चालले. इंग्रज प्रवासी विलियम नॉरिस इ. स. १७०१ च्या फेब्रुवारीत म्हणतो की, "मोठमोठे मोगल अधिकारी प्रवास करण्यास कचरत, इतका त्यांना मराठ्यांचा धाक वाटत होता[१]" एवढा मराठ्यांचा दरारा केवळ राजाराम महाराजांच्या वतन पद्धतीने केला. मुलूख जिंकावा व जहागीर म्हणून तो आपणच लाटावा हा प्रघात राजाराम महाराजांनी सुरू केल्यामुळे पुढे मराठे अटकेपर्यंत जाऊ शकले. यातच मराठ्यांच्या विनाशाची बिजे पेरली गेली.

□□



ताराबाई

१ हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. २३०.

४८. ताराबाई काल (इ. स. १७००-१७०७) : मराठ्यांची चढती कमान ताराबाईने राज्यकारभार हाती घेऊन किल्ले लढविले (इ. स. १७०० ते १७०२)

राजाराम महाराजांचा मृत्यू २ मार्च १७०० मध्ये सिंहगडावर अल्पआजाराने झाला. बादशहास राजाराम महाराजांच्या मृत्यूची बातमी कळताच राजारामास नेल्याबद्दल त्याने परमेश्वराचे आभार मानले.

राजाराम महाराजांचे कुटुंबीय व आप्त :

१५ नोव्हेंबर १६८९ रोजी राजाराम महाराज जिंजी किल्ल्यात आले व त्यांच्या राण्या मार्च १६९१ च्या सुमारास तेथे येऊन पोहचल्या. राजाराम महाराजांची पहिली पत्नी जानकीबाई ही प्रतापराव गुजर यांची कन्या. राजाराम महाराजांची दुसरी पत्नी ताराबाई. ही सेनापती हंबीरराव मोहिते यांची कन्या. हिचे लग्न महाराजांशी १६८४-८५ च्या सुमारास झाले. यानंतर लवकरच कागलकर घाटगे घराण्यातील राजसबाईशी राजाराम महाराजांचे तिसरे लग्न झाले. अहिल्याबाई (अंबिकाबाई), नावाची आणखी चौथी पत्नी महाराजांची पारगांवकर निंबाळकर यांचेकडील होती. अशा प्रकारे राजाराम महाराजांच्या चार राण्या व सगुणाबाई ही नाटक शाळा होती. ह्या नाटक शाळेस कर्ण नावाचा मुलगा होता. तो राजाराम महाराजांच्या जिंजी वास्तव्यात राजाराम महाराजांतर्फे जुल्फिकारखानाशी बोलणी करीत असे. जिंजीस राजाराम महाराजांबरोबर असताना राणी ताराबाईंना ९ जून १६९६ रोजी पुत्ररत्न झाले. नाव धाकटे शिवाजी. महाराजांची पत्नी राजसबाई हिला २१ मे १६९८ रोजी पुत्रप्राप्ती झाली नाव संभाजी (दुसरा) ठेविले. ह्या संभाजी महाराजांनी कोल्हापूर राज्याची स्थापना केली. एवंच राजाराम महाराजांच्या ४ बायका, तीन मुले, दोन मुली व इतर संबंधित माणसे व सेवक यांना झुल्फिकार खानाने सोबत

देऊन कर्नाटकातील वेलोर किल्ल्यात पाठवून दिले.[१] फेब्रुवारी १६९८ मध्ये त्यांनी वेलोर सोडून ती मंडळी मार्चच्या शेवटच्या आठवड्यात पन्हाळ्यास पोहचली. तेथून सर्वजण विशाळगडास आले. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांचा दासीपुत्र कर्ण हा गादीवर बसल्याचे मोगल इतिहासकार सांगतात. पण तो तीन आठवड्यातच वारला.[२] वास्तविक ताराबाई राणीने आपल्या मुलाचा शिवाजी राजांचा मंचकारोहण समारंभ श्रावण शु. ५ (ललिता पंचमी) या शुभमुहूर्तावर करविला.[३] तेव्हा राजाराम महाराज २ मार्च रोजी निवर्तले असता त्यानंतर कर्णाला गादीवर बसविण्यात आले व तो तीन आठवड्यातच वारला. त्यानंतर शिवाजी राजांचे मंचाकारोहण व्हावयास हवे. पण तसे न घडता राजाराम महाराज २ मार्च रोजी इहलोक सोडून जातात व जेधे शकावलीप्रमाणे १० मार्चला म्हणजे ८ दिवसांनीच शिवाजी महाराजांना मंचकारोहण होते याचा अर्थ कर्ण राजाराम महाराजांच्यानंतर गादीवर आलेच नाहीत असा होतो.

राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांना मोगली अतिक्रमणास तोंड द्यावे लागले. त्यांनी डावपेच ठरविले ते असे :—

१. औरंगजेबाचे छावणीभोवती सतत घिरट्या घालीत राहणे. संधी मिळाल्यास छावणीबाहेर हल्ले करणे, रसद आणण्यास निघालेल्या पथकांवर हल्ले करणे.

२. औरंगजेबाला किल्ले घेणे जितके अवघड व दिरंगाईचे करता येईल तितके करणे. किल्ला लढविता येईल तितका लढविणे.

३. मोगल सेनापतींना पाठीवर घेऊन शेकडो मैल पायपीट करावयास लावणे.

४. दक्षिणेत सर्वत्र संचार करून मोगलांची ठाणी मारणे, मोगल प्रदेश उद्ध्वस्त करणे, अधिकाऱ्यांना कैद करून भक्कम खंडणी घेऊन सोडून देणे, ठिकठिकाणी चौथाई गोळा करणे, आणि मोगल प्रदेशात जागोजाग स्वतःच्या छावण्या घालणे.

५. वऱ्हाडातून पुढे सरकून माळव्यात व पश्चिम किनाऱ्यावरून उत्तरेकडे सरकून गुजरातेत जाण्याचा प्रयत्न करणे.

---

१ मराठे व औरंगजेब, पृ. ६९-७०.

२ हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. २०७.

३ शिवचरित्र प्र., पृ. ३०.

६. नागपूरचे गौड राजे, बुंदेलखंडांतील बुंदेल व कर्नाटकातील गुलबर्गा विजापूर भागातील बेरड जमातीचे सरदार यांचे सहकार्य मिळविणे.

या युद्धाचे नेतृत्व राणी ताराबाईंकडे होते. तिला सल्लामसलत देणारे रामचंद्रपंत अमात्य, परशुरामपंत प्रतिनिधी व शंकराजी नारायण हे होते. युद्धाचा सरसेनापती धनाजी जाधव होता. या कालखंडात (१६९९-१७००) त्याने उत्कृष्ट कामगिरी बजावली. त्याने झुल्फिकार खानाला हजार दीड हजार मैल पायपीट करून महाराष्ट्रभर फिरविले. ब्रह्मपुरीच्या मोगल तळावर पुन्हा पुन्हा हल्ले करून त्याने अशी काही दहशत निर्माण केली की औरंगजेबाला शेवटी स्वतः व मुलीला सुरक्षिततेसाठी म्हणून विजापूरला हलवावेसे वाटले आणि शेवटी त्यांना दौंडजवळील पेडगांवच्या छावणीत आणून ठेवावे लागले. साधा लाकूडफाटा व गवत चारा आणण्यासाठी औरंगजेबाला भक्कम पथके बरोबर देऊन सरदारांना छावणीबाहेर पाठवावे लागे. छावणीत आणि खुद्द बादशहाच्या निवासस्थानाभोवती सतत गस्त आणि पहारे यांची व्यवस्था करावी लागली.

सेनापती धनाजीने साताररच्या मोगल छावणीवर पुन्हा पुन्हा हल्ले चढविले. मे, १६९९ ते वर्ष अखेर १७०० या कालखंडात धनाजीच्या हालचाली महाराष्ट्रांतील नांदेड जिल्ह्यापासून पुण्यापर्यंत चालू होत्या. इतर मराठे सरदारांत कृष्णा सावंत याने १७०० मध्ये नर्मदा ओलांडली. राणोजी घोरपडे, संताजीचा मुलगा बहिर्जी घोरपडे, हणमंतराव निंबाळकर, दादो मल्हार, कृष्णा मल्हार, परसोजी भोसले, शहाजी निंबाळकर, खंडोजी दाभाडे, मकाजी पांढरे इत्यादी प्रमुख सरदारांनी मोगल फौजांवर हल्ले करून त्यांस जेरीस आणिले होते.

औरंगजेबाने आपल्या सरदारांवर चालढकलपणाचा आळ घातला. आपण मराठ्यांचे किल्ले अल्पावधीत सर करू अशी त्यांची समजूत असावी. पण रसद तोडून, छावणीवर हल्ले करून, किल्ले लढवून मराठ्यांनी बादशहाचे बेत हाणून पाडले. मराठ्यांचे सातारा, परळी, पन्हाळगड, विशाळगड, सिंहगड, राजगड व तोरणा हे किल्ले घेण्यात १६९९-१७०४ अंशी पाच वर्षे गेली. या अवधीत मराठे गुजरात व माळवा या प्रांतात घुसले. दक्षिण सुभ्यांस त्यांनी जागोजागी छावण्या केल्या, चौथाई व खंडणी वसूल करण्यास सुरुवात केली आणि मोगलांची राज्य यंत्रणा त्यांनी खिळखिळी करून सोडली.

---

१ ब्रह्मपुरीस औरंगजेब बादशहाचा तळ सोलापूर शहरापासून १२ कोस दूर भीमानदीच्या तिरावर.

सातारा किल्ला आपण हां हां म्हणता घेऊ अशी बादशहाची समजूत होती. राजाराम महाराजांच्या मृत्यूने तर तो हर्षभरित झाला. बारा मार्च १७०० च्या अखबारावरून समजते की राजाराम महाराज २ मार्चला निवर्तल्यावर राणी ताराबाईने आपल्या वकिलामार्फत दिनांक १२ रोजी पुढील मुद्दे बादशहाकडे तहासाठी पाठविले. (१) आपल्या पुत्रास ७ हजारी मनसब व दक्षिणेच्या देशमुखीचे हक्क मिळावेत. (२) त्यासाठी दक्षिणेच्या मोगल सुभेदाराच्या सेवेत पाच हजार मराठी फौज राहील. आणि मोगलांना पन्हाळा, सातारा, चंदनवंदन, परळी इत्यादी सात किल्ले मिळतील आणि (३) छत्रपती शिवाजी महाराज (थोरले) किंवा उदयपूरचा महाराणा यांना जशी दरबारी येऊन मोगल बादशहास मुजरा करण्याची सक्ती नव्हती तशी सक्ती शिवाजीराजे यांच्यावरही नसावी. यांत राणी ताराबाईंचा हेतू कालहरणाचाही असावा. पण औरंगजेबाने ह्या अटी धुडकावून लावल्या. त्याचे म्हणणे पडले की, राणीने मराठ्यांच्या ताब्यातील सर्वच्या सर्व किल्ले दिले पाहिजेत. अर्थात ह्या अटी मराठ्यांनी कधीच मान्य केल्या नाहीत.

किल्ले घेण्यात मोगल गुंतलेले असत, त्यावेळी मराठ्यांच्या फौजा बाहेरून हल्ले करून त्यांना हैराण करून सोडीत. अशा फौजांचा पाठलाग करून त्यांना मोडून काढण्यासाठी औरंगजेबाने झुल्फिकार खान याची नेमणूक केली. मराठ्यांचे धोरण असे की धावपळीची लढाई चालू ठेवून ते मोगलांना शेकडो कोस पायपीट करण्यास लावीत. लढाईचे सोंग करावयाचे पण आपले बळ वाया जाऊ न देता माघार घ्यावयाची. मोगलांना वाटे मराठ्यांचा पराजय झाला पण पहावे तो दुसऱ्या दिवशी काही कोस अंतरावर मराठे पुन्हा उभे.

मराठ्यांचा उठाव हा सार्वत्रिक उठाव होता. खेड्यापाड्यातून असंख्य माणसे मराठ्यांच्या सैन्यात सामील होत. झुल्फिकार खानच्या वऱ्हाडच्या मोहिमेत एकदा ६० हजार मराठे आपल्यावर चालून आले असे भीमसेनने लिहिले आहे. यावरून असे दिसते की मोगलांच्या विरुद्ध मराठ्यांनी जो उठाव केला त्याचे स्वरूप सार्वत्रिक होते यात संशय नाही. मोगलांची सैन्ये कमी होऊ लागली त्यांना नवीन माणसे मिळेनाशी झाली. औरंगजेबाने प्रांतोप्रांतीच्या सुभेदारांना पत्रे लिहून ताज्या दमाचे सैनिक पाठविण्याची आज्ञा केली. पण सहा-सहा महिन्याचे आगाऊ पगार देऊनही सैनिक येईनात. जिल्ह्याजिल्ह्यांचे फौजदार (जिल्हाधिकारी) मराठ्यांच्या

आक्रमणाविरुद्ध बादशहाकडून वेळेवर मदत येत नाही हे पाहून मराठ्यांच्या भीतीने घराबाहेर पडेनासे झाले. भीमसेनाने नमूद केले आहे की इ. स. १७०० च्या सुमारास मराठे हे टोळ आणि मुंग्याप्रमाणे दख्खनच्या खेड्यापाड्यांतून पसरले होते. अनेक जिल्ह्यांच्या मोगल अधिकाऱ्यांनी मराठ्यांशी तडजोडी केल्या. मराठ्यांनी प्रत्येक जिल्ह्यांतून चौथ आणि सरदेशमुखी नावाखाली रकमेची वसुली करण्यास सुरुवात केली. मराठ्यांनी सुभेदार, कमाविसदार, मोकाशी आणि सरदेशमुख असे आपले अधिकारी ठिकठिकाणी नेमले. त्यांच्या फौजा, पायदळ, घोडेस्वार आणि तोफखाना यांनी सुसज्ज राहू लागल्या आणि हे सगळे औरंगजेबाच्या डोळ्यादेखत घडू लागले. इतकेच नव्हे तर मराठ्यांचे यश पाहून कर्नाटकात बेरड, बुंदेलखंडात बुंदेल राजपूत आणि मथुरा भागात जाट इत्यादी जमातींनी धामधूम करण्यास सुरुवात केली. पंचवीस वर्षांच्या या मोगल-मराठा संघर्षात मोगल साम्राज्य खिळखिळे होऊन गेले.[१]

राजाराम महाराज दिवंगत झाल्यानंतर राणी ताराबाई हिने राज्यकारभार हाती घेतला इतकेच नव्हे तर तिने सैन्याचे नेतृत्व, मोहिमांची आखणी व अंमलबजावणी करण्याची कामेही हाती घेतली असे खाफीखान म्हणतो.[२]

अष्टप्रधानांच्या नेमणुका :

ताराबाई हिने मराठी राज्याचा कारभार हाती घेतल्यावर राज्यकारभार चालविण्यासाठी तिने अष्टप्रधानांच्या नेमणुका केल्या. राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत निळो मोरेश्वर हा मुख्य प्रधान होता. तो मिरज येथे मोगलांशी झालेल्या लढाईत मारला गेला. (ऑक्टोबर १६९९) त्याजागी परशुराम त्रिंबक यांची नेमणूक राजाराम महाराजांनी केली. तो ताराबाई कालातही काही दिवस होता.[३] त्यानंतर मुख्य प्रधानपदी निळो मोरेश्वरचा भाऊ बहिरो मोरेश्वर यास नेमण्यात आले.[४]

---

१ मराठे व औरंगजेब, प्रस्तावना पृ. १३.

२ मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ४९.

३ ताराबाईकालीन कागदपत्रे, पृ. ४८०.

४ सनदापत्रे, पृ. १८४, १९२.

राजाराम महाराजांनी तिमाजी पंत हणमंते मोगलांच्या कैदेतून सुटून परत आल्यावर त्यास प्रतिनिधीपद दिले. आणि निळो मोरेश्वराच्या मृत्यूमुळे मुख्य प्रधानपद रिकामे पडले होते त्या पदावर परशुरामपंताची नेमणूक करण्यात आली. पुढे सन १७०१ मध्ये ताराबाईंनी तिमाजीकडून प्रतिनिधीपद काढून घेतले व ते परत परशुरामास दिले आणि बहिरो मोरेश्वरास मुख्य प्रधानपदी नेमिले.[१] ताराबाईंच्या राजवटीत रामचंद्रपंत अमात्यपदी राहिले, धनाजी जाधव यांना सरसेनापतीपद दिले. पंडितराव हे पद श्रीशंकराचार्यांकडेच राहिले.[२] यावेळी औरंगजेब बादशहाने मराठ्यांची शक्ती जे किल्ले ते जिंकून घेण्याचे ठरविले. ह्याप्रमाणे बादशहाने सातारा, सज्जनगड, भूषणगड, पन्हाळगड, विशाळगड, रांगणा ऊर्फ प्रसिद्धगड हे किल्ले घेण्याचा उद्योग चालू ठेवला.

सातारा काबीज :

राजाराम महाराज जिवंत असता म्हणजे ८ डिसेंबर १६९९ रोजी औरंगजेबाने सातारा किल्ल्यास वेढा घालण्यासाठी मोगली सैन्यास रवाना केले होते व स्वतःही गेला होता. हा वेढा २३ एप्रिल १७०० पर्यंत म्हणजे ४ महिने १८ दिवस चालू होता. मोगलांनी सुरक्षिततेसाठी गडाखाली कातळात भुयारे खणण्याचे काम चालू केले. एक भुयार चार यार्ड रुंदीचे व दुसरे दहा यार्ड रुंदीचे तयार झाले. परंतु त्याचा उपयोग सैन्यास होत नाही असे समजताच भुयारात दारू भरून सुरूग करण्यास बादशहाने आज्ञा दिली. सुरूंग उडवून शत्रूची दाणादाण उडून गोंधळ माजताच किल्ल्यावर अचानक हल्ला करण्यासाठी गडाखाली मोगलांनी सैन्य तयार ठेविले होते. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर १४ एप्रिल १७०० रोजी हे दोन्ही सुरूंग उडविण्यात आले.[३] पहिल्या चार यार्ड सुरुंगाने किल्ल्याचा जो भाग उडविला तो किल्ल्यात जाऊन पडल्याने किल्ल्यावरील ४०० लोक मारले गेले. परंतु दुसऱ्या मोठ्या सुरुंगाचा भलामोठा भाग उडाला तो सर्व मोगली सैन्यांवर पडल्याने ते तयार ठेविलेले सैन्य त्याखाली गाडले

१ तारा. कागदपत्रे, पृ. १४१ सप्र. पृ. १०५.

२ म. सा. खं. २ पृ. २७३, मइसा ३, पृ. २९, खं. २० पृ. ३९६.

३ म. इ. सा. खं. १५, पृ. १८.

गेले. हजारो सैनिक ठार झाले.[१] त्यामुळे वेढा लढविणे अशक्य झाले. उलट किल्ल्यावरील लोकांनी तोफांचा व दगडांचा मारा जोरात चालू केला या अपघातात मोगलांकडील मावळे व हिंदू फौज बरीच कामास आली. त्यांना ओळखणे त्यांच्या नातेवाईकांस जमले नाही. तेव्हा मृतदेहास अग्निसंस्कार देण्याचे राहून गेले. तेव्हा त्यांनी खंदक पेटवून दिले. ही आग विझविण्यास पाणी नसल्यामुळे मोगली सैन्याचे फारच नुकसान झाले. या मृतदेहांच्या जाळपोळींत आणखीही सैन्याचे लोक सापडले व ठार झाले व कित्येक जखमी झाले.[२]

राजाराम महाराज निवर्तल्यावर परशुरामपंताने व सुभानजी भांडवलकर या सातारा किल्लेदाराने मोगलांशी तहाच्या वाटाघाटीस सुरुवात केली. शहाजाद्याच्या साहाय्याने या वाटाघाटीस बादशहाने मान्यता दिली व किल्ल्यावरील लोक उतरून किल्ला मोगलांचे हवाली केला. किल्ल्याचे नाव २४ एप्रिल १७०० रोजी अजमतारा असे ठेवण्यात आले. छत्रसाल राठोड तेथे किल्लेदार म्हणून नेमण्यात आला.[३]

परळी ऊर्फ सज्जनगड काबीज :

सातारा किल्ला हाती येताच त्यापासून सहा मैलांवर असलेला परळी ऊर्फ सज्जनगड ह्या किल्ल्यास वेढा घालण्यासाठी बादशहानें फतुल्लाखानास रवाना केले. वेढ्यास लागणारी सामग्रीही तिकडे पाठविण्यात आली आणि तीन दिवसाच्या प्रवासानंतर बादशहानेही परळीच्या दरवाजासमोर येऊन तळ दिला. शहाजाद्याचा तळ बादशहाच्या छावणीसमोर कायम करण्यात आला. रूहुल्लाखान यास वेढ्याचा सेनापती म्हणून नेमण्यात आले. इतर निरनिराळ्या सरदारांनी किल्ल्याला चहुकडून वेढले. ४ जून १७०० ला शिड्या लावून हल्ला चढविला. आपले लोक गडासमोरील टेकडीवर आणण्यासाठी तो गडाखाली गेला. इतक्यात मराठ्यांना टेकडीवरील दारू गोळ्याची बातमी लागताच त्यांनी तो पेटवून दिला.[४] त्यांत फत्तेखानाचा

१ मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ४६.

२ मराठे व औरंगजेब, पृ. ८२-८३, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ४५.

३ मोगल व मराठे, पृ. १४८, मराठे व औरंगजेब, पृ. ८७, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ४९.

४ मराठे व औरंगजेब, पृ. ९१.

नातू फकिरूल्लाखान आणि इतर ६०/७० माणसे मारली गेली. पावसाळ्याने मोगली सैन्य हैराण झाले. नद्यांना पूर आलेले, रसद कोणीकडूनही येईना. यामुळे भयंकर दुष्काळ पडला तेव्हा तहाची खटपट चालू झाली. तह बादशहाने मान्य करून किल्ल्यावरील लोकास सुखरूपपणे जाऊ देऊन किल्ला आपल्या ताब्यात घेतला. परळीगडास नौरसतारा असे नाव दिले. ही हालचाल ९ जून १७०० ला झाली. बादशहाने २१ जून १७०० ला सैन्यासह कूच केले.[१]

बादशहाचे सैन्य भूषण गडाजवळ :

परळीपासून बादशहाला सैन्यासह भूषणगडाकडे जावयाचे होते. भूषणगड परळीपासून रस्त्याने ४५ मैल अंतरावर. परळीहून बादशहाने भूषणगडाकडे जाण्यासाठी भर पावसाळ्यात २१ जून १७०० ला कूच केले. ज्या जनावरांवर सामानाची ओझी लावली होती ती जनावरे पटापट मरू लागली. कृष्णा नदीला पूर होता. त्यातून सैन्य मोठ्या मुष्किलीने पैलतीरी पोहोचले. शेकडो उपासमारीने मेले, पुढे हळूहळू मार्ग आक्रमत मोगली लष्कर २५ जुलै रोजी भूषणगडास पोहोचले व गडाचा ताबा मिळविला.[२] येथे बादशहाने आपल्या शहाजाद्याला व इतर सरदारांना सैन्यासह निरनिराळ्या शहरात जाऊन विश्रांती घेण्यास पाठविले. त्यांनी त्याप्रमाणे केले व त्यामुळे त्यास व त्यांचे घोड्यांस भरपूर दाणागोटा मिळाल्यामुळे ते आनंदित झाले. बादशहा ३० ऑगस्ट १७०० ला खवासपुरी येथे जाऊन राहिला. तेथे असताना माण नदीस अचानक मोठा पूर आल्याने चार-पाच हजार लोक, हत्ती, घोडे, वगैरे वाहून गेले व लष्कराचे फार नुकसान झाले. नंतर १६ डिसेंबर १७०० ला बादशहाने मिरजेस जाण्यासाठी आपला तळ हालविला व १ जानेवारी १७०१ ला बादशाही सैन्य मिरजेस आले. त्यानंतर तो २ महिने तिथेच मुक्काम ठोकून राहिला. त्या मुदतीत त्याने पन्हाळगडावर स्वारी करण्याचे ठरविले. त्यासाठी उत्तर हिंदुस्थानातील ताज्या दमाची फौज व सामानसुमान मिरजेस येऊन पोहचले.[३]

१ पगडी (सं), मराठे व औरंगजेब, पृ. ९२.

२ कित्ता, पृ. ९२.

३ कित्ता, पृ. ९३.

कर्नाटक :

सन १६९९ च्या ऑक्टोबरात मोगल आणि मराठे या दोघांनीही परस्परांच्या प्रदेशांवर मोहिमा उघडल्या होत्या. घोरपडे सरदारांच्या हालचाली प्रामुख्याने महाराष्ट्र कर्नाटक प्रदेशात असत. बहिर्जी ऊर्फ हिंदुराव घोरपडे याने हुबळीचा जमीनदार आपलासा करून त्या प्रदेशात मोठीच धामधूम उडवून दिली. मराठे सरदार केदारजी सूर्यवंशी, भानजी रघुनाथ, अप्पाजी सुरो, जिवाजी शिंदे, सर्जेराव, भालेराव यांनी हुबळीच्या किल्ल्यापासून एक कोसावर छावणी दिली व सतत तीन महिने मोगल लष्कराशी लढाई देऊन हुबळी कसबा जिंकला.[१]

घोरपडे सरदारांनी दक्षिणेकडे मोहीम चालू असतानाच मागे सांगितल्याप्रमाणे कृष्णा सावंत या पराक्रमी मराठा सरदाराने आपली फौज नर्मदा पार करून माळव्यात प्रवेश केला आणि धामूनीच्या प्रदेशात धामधूम माजविली. माळव्यात मोहिम काढणारा हा पहिला मराठा वीर होय.[२]

झुल्फिकार खान हा सोलापूर भागात असता धनाजी आणि राणोजी घोरपडे यांनी आपले पूर्वीचे शत्रूत्व विसरून सख्य केले. भीमानदीच्या काठी असणाऱ्या फिरोजाबाद येथे दोघांच्या फौजा एकत्र जमल्या. जुल्फिकार खानाने या संयुक्त फौजांना फिरोजाबादेजवळ गाठले. झुल्फिकार खानाच्या सैन्यात दाऊदखान, रावदलपत बुंदेला व रामसिंग हाडा हे सेनानी होते. मराठ्यांचे सैन्य ३५ हजार होते. तर मोगल फक्त ३० हजार होते. मराठे व मोगल यांच्या अनेक चकमकी घडून आल्या. भीमसेन सक्सेना म्हणतो की, या मोहिमेच्या काळात झुल्फिकार खानाच्या सैन्याने दोन हजार कोसांच्यावर हालचाली केल्या असतील.[३] इ. स. १७०० च्या ऑक्टोबरात सिद्दीने मराठ्यांचा अंजनवेलचा किल्ला घेतला. मनुचीने मोगल-मराठे यांच्या लढायांतील डावपेच उल्लेखिले आहेत[४]. त्यातील मुख्य डावपेचांचा उल्लेख इथे करणे आवश्यक वाटते.

---

१ तारिक दिल्कशा, पृ. २१९.

२ शि. च. सा. खं. ६, पृ. ८ व ९७.

३ मोगल व मराठे, पृ. १४३.

४ कित्ता, पृ. १४५-१४७.

गनिमी काव्याची युद्धे (इ. स. १७०१) :

बादशहाच्या हुकुमावरून झुल्फिकार खानाने बादशहाची मिरज मुक्कामी भेट घेतली व त्यानंतर त्या दोघांनी पन्हाळगडाच्या पायथ्याशी छावणी केली. बादशहाच्या आज्ञेप्रमाणे झुल्फिकार खानाने कोकणी दरवाजासमोर आपला तळ दिला. किल्ल्यावरून तोफांचे गोळे येऊन मोगलांच्या लष्करात पडू लागले. बादशहाकडून तोफखान्याचा अधिकारी मीर आतिश हा येऊन पोचला. त्याने आपल्याबरोबर तोफा, दारूगोळा आणि वेढ्यासाठी लागणारी इतर साधनसामग्री आणली होती. किल्ल्याचा वेढा जोरात चालू व्हावा अशी त्याने ताकीद केली.

ताराबाईंनी सेनापती धनाजी जाधव याजवर मोगलांशी जरूर तिथे लढण्यासाठी मराठे सैनिकांना मार्गदर्शन करण्याची कामगिरी सोपविलेली होती. त्याप्रमाणे धनाजी जाधव हा नेहमी बादशहाच्या छावणीजवळ येऊन ठेपत असे व विलक्षण धुमाकूळ घालीत असे. त्याजवर बादशहाने अनेक मोगल सरदार सोडले पण हुलकावणी देणाऱ्या मराठी सैन्याच्या पाठीवर मोगल सैन्य गेले म्हणजे ते दमूनभागून जाई. अशा प्रकारे गनिमी काव्याचे युद्ध मराठ्यांनी विजापूर सुभ्याच्या हुकेरी तालुक्यातील चिकोडीपर्यंत केले. त्यानंतर धनाजीला पळून जाणे योग्य वाटले.[१] झुल्फिकार खानाने पन्हाळ्यास येऊन सावधपणे मोर्चाचे रक्षण सुरू केले. हे ताराबाईस समजल्यावर त्यानी मराठे सरदारांस पुन्हा एक होऊन पन्हाळगडाभोवती असलेले मोगलांचे मोर्चे उधळून लावावे असे हुकूम सोडले. या उद्देशाने ते पन्हाळगडाजवळ आले. त्यांनी वंजारी लोकांचा तांडा धान्य घेऊन मोगलांकडे जात होता त्यास अडविले. शहाजादा बेदारबख्त याने वंजाऱ्यांच्या मदतीसाठी आपले पथक पाठविले. सर्फराजखान व दखनी याजबरोबर आणखी सरदार मदतीस गेले व ते सर्व मराठ्यांवर चालून गेले. मराठ्यांचे जबरदस्त पायदळ सैन्य मैदानात आले होते. पण त्यांचा टिकाव मोगलासमोर लागला नाही, तेव्हा ते तिथून निघून गेले.[२]

संताजी घोरपड्यांचा मुलगा राणोजी हा गुलबर्गा जिल्ह्यात धामधूम करीत होता. त्याचा मोड करण्याची बादशहाने फिरोजजंगला आज्ञा केली.

---

१ मोगल व मराठे, पृ. १५०-१५१.

२ किता, पृ. १५२.

आज्ञेप्रमाणे फिरोजजंग हा गुलबर्ग्याला गेला आणि त्या प्रांतात तळ देऊन राहिला. झुल्फिकार खान पन्हाळ्याच्या पायथ्याशी आल्याचे मराठ्यांस समजताच त्यांनी फौज गोळा करून शत्रूवर चाल केली आणि मराठ्यांना जय मिळाला. त्यांनी झुल्फिकार खानाला नामोहरम केले. सर्व मोगल तोफखाना आणि सामानसुमान मराठ्यांच्या हाती पडले. सैनिक सापडले त्यांचे उजवे हात व नाके छाटली. ठिकठिकाणी हल्ले करून त्यांची रसद बंद केली. पन्हाळ्यास वेढा घालून बसलेल्या आपल्या सैन्याची दुर्दशा झाल्याचे ऐकून बादशहाने तिकडे जाण्याचा निश्चय केला व तो त्याप्रमाणे ९ मार्च रोजी पन्हाळ्याच्या पायथ्याशी येऊन पोहचला. गडावर पाण्याच्या विहिरी व शेतजमिनी होत्या. वेढ्याच्या काळात गडावरील शिबंदीतील अन्नधान्य पाणी व गवतचारा यांचा फारसा तुटवडा पडत नसे. किल्ल्यात शिरण्यासाठी बादशाही सैन्यांतील सरदारांनी दोन भुयारे खोदली होती. तोफखान्याच्या लोकांनी किल्ल्यावर मारा करण्यासाठी दमदमे उभारले होते. महाराणी ताराबाई आपले सरदार पन्हाळ्याकडे मोगलांवर हल्ले करण्यास पाठवीत होत्या.[१] मोगलांनी आपल्या तोफखान्याचा मारा पन्हाळ्याच्या तटबंदीवर सुरू केला. तसेच मोगलांनी पावनगडालाही वेढा घातला होता. या दोन्ही ठिकाणी मराठे सरदार व शिबंदी शर्थीने लढत होते. पावसाळा सुरू होण्याअगोदर किल्ले आपल्या ताब्यात आणण्यासाठी मोगलांनी मराठ्यांशी वाटाघाटी सुरू केल्या. शहाजादा कामबक्ष आणि तर्बियतखान या दोन मोगल सरदारांनी किल्लेदारास रोख ५५ हजार रुपये देण्याचे कबूल केले. तेवढ्यावर तडजोड होऊन मराठ्यांनी पन्हाळा व पावनगड हे दोन किल्ले २८ मे १७०१ रोजी बादशहाच्या स्वाधीन केले. पन्हाळ्यास बादशहाने नबीशाहदुर्ग व पावनगडास बानीशाह दुर्ग अशी नावे दिली. इस्माईल खान मका यास पन्हाळ्याचा किल्लेदार म्हणून नेमण्यात आले.[२]

मनुचीने मोगल-मराठे यांच्या लढायातील डावपेचांचे उल्लेख केलेले आहेत. मोगली सरदारांस युद्धांत ज्या सवलती मिळत असत त्यासाठी ते युद्धे निर्णायक स्वरूपाची न करिता ते लांबणीवर टाकण्याचाच त्यांचा

१ ता. का., पृ. ५६०-५६१.

२ मराठे व औरंगजेब, पृ. ९९, म. स्वातंत्र्ययुद्ध. ६३-६४.

प्रयत्न असे. मराठे उलट आपले नुकसान आणि विशेषत: सैनिकांची हत्या होऊ नये या दृष्टीने मोगली लढ्यास तोंड देण्याची कोशीश करत. अचानक छापा घालावयाचे. जाळपोळ करावयाची, लुटालूट करून शत्रू सैन्य लढाईस उभे राहाताच दुसरीकडे निघून जावयाचे आणि शत्रू सैन्य बेसावध आहे हे पाहून पुन्हा एकदा छापा घालून दाणागोटा पळवायचा हे त्यांचे तंत्र होते. मोगल मोठ्या सैन्यानिशी लढा देत तर मराठे या मोठ्या सैन्यांची चाल दुसरीकडे झालेसे पाहून आपला प्रदेश परत घेत असत. मोगली अधिकाऱ्यांच्या हातून हा मुलूख शत्रूकडे गेल्याचे ऐकून बादशहाला खेद होई. परंतु गडकोट लढून घेण्यासाठी मोगल शिपाई शत्रूबरोबर टिकाव धरत नाहीत असे समजून आले. गडकोट मोठ्या सैन्यानिशी आज घेतले तरी ते थोड्या दिवसांत सवड काढून मराठे परत घेत. अशी परिस्थिती उत्पन्न झाल्याचे पाहून बादशहा बराचसा चिंतातुर झाला. ह्या घटना स्थानिक लोकांच्या मनात स्वातंत्र्याच्या भावनेने जोर धारला होता म्हणून होत होत्या.[१]

ताराराणीच्या मराठे सरदारास सूचना :

ताराराणीने मराठे सरदारांस कळविले की बादशहाची मुख्य फौज अधिकाधिक काळापर्यंत एकेका किल्ल्यापुढे अडकवून ठेवावयाची आणि मराठ्यांच्या फौजांनी सर्व दक्षिणभर निर्वेध संचार करावयाचा हे मराठ्यांचे धोरण होते. पावसाळा तोंडावर आल्यावर मोगलांशी वाटाघाटी करून भक्कम रक्कम घेऊन किल्ला द्यावयाचा. पावसाळ्यांत मोगलांचे अतिशय हाल होत. मोगलांची पाठ फिरली की मराठे तो फिरून घेत. प्रत्येक किल्ल्यावर भक्कम शिबंदी ठेवण्याइतके मनुष्यबळ मोगलांपाशी नव्हते. त्यामुळे किल्ले पुन्हा जिंकून घेणे मराठ्यांना जड जात नसे.[२]

ताराबाईंनी आपल्या फौजेत स्फूर्ती निर्माण केली ती अशी :

राज्याचा धनी (दुसरा शिवाजी) अल्पवयस्क, राज्यकारभार बाईच्या हातात, अशी स्थिती असल्यामुळे सर्वांनी भगीरथ प्रयत्न करून बादशहाची तिरपीट उडवून द्यावी, असा मराठ्यांनी निश्चय केला. राज्याच्या हिताचे

१ बेंद्रे, छत्रपती राजाराम म., पृ. ३१९-३२०.

२ हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. २३६-२३७.

वर्तन करण्यास ताराबाईंकडून सर्वांस पूर्ण मुभा असल्यामुळे जो तो या राष्ट्रीय कामात मी मी म्हणत पुढे आला. एकदा तलवार गाजवून आपले व आपल्या घराण्याचे चिरंतन कल्याण करून घेण्याची संधी हीच आहे असे प्रत्येकास वाटू लागले. तेव्हा केवळ स्वतःच्या बचावाचे प्रयत्न सोडून त्यांनी शत्रूचा निःपात करण्यास सुरुवात केली आणि शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर वीस वर्षांनी मराठ्यांनी बचावाचे युद्ध सोडून चढावाचे युद्ध हाती घेतले त्याचे वर्णन ग्रँटडफ करतो ते असे, "मराठ्यांचे सामान म्हटले म्हणजे, थोडीशी कांदा भाकरी व एक घोंगडी एवढे काय ते असे. रात्री कोठे उतरले तर ते घोड्यांचे लगाम हातात धरूनच घोंगडी पसरून त्यावर काही वेळ अंग टाकून राहत. त्याचप्रमाणे दिवसा दोन प्रहरी काही खाण्याकरिता किंवा ऊन टाळण्याकरिता ते उतरले, म्हणजे पाच पाच सहाजण एखादे झाडझूड असले तर त्याचे छायेखाली उतरत, परंतु उघडे मैदान असले तर ते जमिनींत भाले रोवून त्यात ते आपले घोडे बांधून भाल्यांचे टोकावरून एकादी घोंगडी आडवी पसरून देत व तिच्या लहानशा छायेत फक्त डोकी ठेवून बाकी सर्व अंगास दुपारचे ऊन लागत असताही जमिनीवर घोरत पडलेले आढळत. आपल्या तलवारींना ते कधी विसरत नसत. त्या ते उशाशी ठेवत. त्या जवळ ऊंट, बैल वगैरे काही नसून फक्त लहान खुरी, चपळ व काटक अशी तट्टे असत. मिळालेली लूट त्यावर लादून ती ते फार जलदीने लांबवीत. येणेप्रमाणे मराठ्यांची फौज अगदी सुटसुटीत असल्यामुळे मिजासी व काही अंशी बेबंद अशा बादशहाच्या फौजेस तिचा पाठलाग करणे कठीणच पडे. त्यातूनही ती कधी गाठली जाऊन तिचा पराभव झालाच तर तिचे नुकसान ते काय होणार ? उलटपक्षी मोगलांचे फौजेचा पराभव झाला म्हणजे लुटीने मराठ्यांची चंगळ उडून मोगलांचे हाल होत अशा ह्या कट्टर मेहनतीची फळे मराठ्यांस मिळत."[१]

याउलट मोगलाच्या फौजेची स्थिती कशी होती याचे वर्णन विल्यम नॉरिस या इंग्रज वकिलाने केले आहे ते चिंतनीय आहे. इंग्लंडचा राजा तिसरा विल्यम याने जुनी ईस्ट इंडिया कंपनी संपुष्टात आणून तिच्या जागी नवीन कंपनी स्थापण्याचे ठरविले होते. नवीन कंपनीला सवलती मिळाव्या

१ मराठी रियासत भा. २, पृ. ७०१.

म्हणून त्याने विलियम नॉरिस नावाच्या इसमास आपला वकील म्हणून औरंगाबादेकडे पाठविला. त्याने दैनंदिनीत आपला प्रवास वृत्तांत लिहून ठेवला आहे. या वृत्तावरून औरंगजेबाच्या सैन्याची, सरदारांची, त्यांच्या आपापसांतल्या हेवादाव्यांची, आणि मराठ्यांच्या हालचालीची खूप माहिती मिळते. विल्यम नॉरिस हा सुरतेहून निघून नवापूर, विसारवाडी, खानापूर, दहिवेल, गाळणा, चंदनपूरी, साक्री, देवगाव ही गावे करीत १८ फेब्रुवारी रोजी औरंगाबादेस पोहोचला. २२ फेब्रुवारी १७०१ रोजी तो गोदावरीकाठी शहागड येथे आला. तो म्हणतो, मोठमोठे मोगल अधिकारी प्रवास करण्यास कचरत इतका त्यांना मराठ्यांचा धाक वाटत होता. बीड येथून मोगल सैन्याला तंबूचा पुरवठा होत असे. ६ मार्च रोजी नॉरिस ब्रह्मपुरी येथील बादशाही तळावर पोहोचला. या तळाचे रक्षण औरंगजेबाचा वजीर असदखान हा करीत होता. ब्रह्मपुरीच्या मोगल छावणीबद्दल नॉरिसचे मत काही चांगले झाले नाही. नॉरिसच्या मते छावणीत एकंदरीत एक लाख माणसे असावीत. बादशहाचे आणि सरदारांचे जनानखाने, मुले माणसे, नोकर-चाकर, व्यापारी, सराफ, दलाल, फार-काय वेश्या आणि कुंटीणी यांचाही छावणीत समावेश होता. नॉरिस म्हणतो, यापैकी लढण्यायोग्य माणसे चार हजाराच्यावर निघतील असे वाटत नाही. त्यातूनही निधड्या छातीचे असे कसेबसे पाचशे निघतील. वजीर असदखान याविषयी नॉरिस लिहितो त्याला ३० बायका आणि बऱ्याच उपस्त्रिया होत्या. असदखान आपला सर्वकाळ स्त्रियांच्या संगतीत घालवीत असतो. वजीर आणि इतर अधिकारी दारूचे मोठे भोक्ते आहेत. तो लिहितो मिरजेच्या आसपास मेलेले हत्ती, ऊंट, इत्यादी जनावरांच्या मुळे विलक्षण दुर्गंधी सुटली होती.

नॉरिसने बादशहाकडे लबाड्या करून खोटे मस्टररोल ठेवून मनसबदार कसे गबर होत हे लिहिले आहे, तो म्हणतो आठ हजार स्वारांच्या मनसबदाराचा पगार महिन्याला २५ हजार स्टर्लिंग (सुमारे ६० हजार रुपये) होता. पण मनसबदार इतके स्वार बाळगीत नसत. दीड हजार स्वार त्यानी बाळगले तर डोक्यावरून पाणी गेले असे समजण्यात येई. बाकीच्या साडेसहा हजारांच्या स्वारांच्याबद्दलचा पगार मनसबदारांच्या खिशात जाई. यादीत (मस्टर रोल) मात्र आठ हजारांचा हिशोब लिहिलेला असे अशा लबाड्या सर्रास चालत. लष्कराचा पगार चुकता करताना औरंगजेबाची

तारांबळ उडे. महिनेच्या महिने लष्कराला पगार मिळत नसे. मोगल सैनिकांत असंतोष वाढू लागला होता. लोक बादशहा व अधिकारी यांजबद्दल कडू शब्द उच्चारू लागले होते.[१]

मोगल पन्हाळा व पावनखिंड हे किल्ले काबीज करतात :

राणी ताराबाईंच्या हाती सत्ता आल्यावर त्यांचे वास्तव्य १७०१ मध्ये विशाळगडावर होते. तिथून त्या मराठे शूर वीरांना मोगलांचे मोर्चे उधळून लावण्यासाठी रवाना करत होत्या. मोगलांनी पन्हाळा किल्यास गराडा घालून तो जिंकून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे औरंगजैबाने पन्हाळ्यास लागूनच पूर्वेस अर्ध्या मैलावर पावनगड किल्ला आहे. त्यावरही स्वारी करण्यास मोगल सरदारांना पाठविले. मोगल तोफखाना पन्हाळ्याच्या तटबंदीवर मारगिरी करू लागला. किल्ल्यांत जाण्यासाठी तटाखालून दोन तीन भुयारे खोदण्यात आली. मोगल सरदार मुरादखान याने पन्हाळा व पावनगड यांच्यामध्ये असणाऱ्या टेकडीपर्यंत मुसंडी मारून तेथे आपले निशाण लावले होते. त्याबद्दल बादशहाने त्याचे कौतुक केले व त्यांच्या मदतीस रूहुल्लाखान, हमीद्दीन खान यांना जाण्याची आज्ञा केली. ह्या दोन्ही सरदारांना मुरादखानाबद्दल मत्सर व हेवा वाटत होता. खाफीखानाच्या म्हणण्याप्रणाणे बादशाही दक्षिणेतील जी मोहीम लांबली तिचे मुख्य कारण म्हणजे सरदारांतील मतभेद आणि त्यांच्यातील एकीचा अभाव हे होय.[२]

राणी ताराबाईंनी मोगल बादशहाप्रमाणे युद्धाची सूत्रे हातात घेतली व मराठे सरदार एसोजी साटम व सूर्याजी साटम यांना औरंगजेब वेढा घालून असलेल्या पन्हाळा किल्ल्यावर रवाना केले. त्यांनी जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात मोगलावर पन्हाळ्याकडे हल्ला केला. ताराबाईंना कळून चुकले की हे दोन्ही सरदार स्वामी सेवेशी तिळमात्र अंतर करीत नव्हते.[३] तसेच मराठे सरदारांनी केलेला पराक्रम समजल्यावर त्यापैकी माणकोजी, हिरोजी, बापूजी व प्रतापजी या सरदारांना तरवारीची शर्थ केल्याबद्दल शाबासकी दिली.[४] पावनगडाचा किल्लेदार विठोजी केसरकर होता.

१ हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. २३३.

२ मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध काफीखान, पृ. ६०-६३.

३ ताराबाई कागदपत्रे, पृ. ५६०-६१.

४ कित्ता, पृ. ५६३-५६४.

मोगलांनी किल्ल्यास वेढा घातला होता तो मारून काढण्यासाठी ताराबाईंनी त्र्यंबक इंगळे व राजश्री कान्होजी इंगळे यांस किल्लेदाराच्या मदतीस पाठविले व आज्ञापिले की (५ फेब्रुवारी १७०१) मोर्चा वरी जाऊन मोर्चा शर्थीनिशी मारून काढणे.[१] मोर्चा मारून काढणाऱ्या मराठे सरदारांची रवानगी खुद्द ताराबाई करीत होत्या तसेच त्यांना औरंगजेबाचा हिसाब न धरता स्वामीची जागा (किल्ला) जतन करणे स्वामी उर्जित हरबाब करतील असा दिलासाही देत होत्या हे दिनांक १२ मार्च १७०१ च्या पत्रावरून दिसते.[२]

फेब्रुवारी महिन्यातच गडावर अन्नधान्याची टंचाई पडू नये म्हणून राणी ताराबाईंनी रामचंद्रपंतांबरोबर वीस हजारांचे सैन्य देऊन पन्हाळ्यावर रसद पोहोचविण्याची कामगिरी दिली. पंत रसद घेऊन निघाल्याचे झुल्फिकार खान यास समजताच तो पंतांवर चालून गेला. शर्थीची लढाई झाली (२४ फेब्रुवारी १७०१) तरीपण रसद किल्ल्यांत पोहोचविण्यात पंत यशस्वी झाले.[३]

पन्हाळा ते सातारा ह्या प्रदेशांत मराठ्यांनी माजविलेली धामधूम :

सर्व दक्षिणभर मराठ्यांच्या फौजांनी निर्वेध संचार करावयाचा ह्या त्यांच्या धोरणानुसार मार्च महिन्यात बादशहा पन्हाळ्याच्या पायथ्याशी आला. त्यावेळी धनाजी जाधव, कृष्णा मल्हार, दादो मल्हार, हिंदुराव घोरपडे व राणोजी घोरपडे यांनी पन्हाळा ते सातारा या प्रदेशात व इतरत्र मोठी धामधूम माजविली. पन्हाळ्याकडे जाणाऱ्या मोगली रसदीचे मार्ग त्यांनी धोक्यात आणले. सरसेनापती धनाजीने कृष्णा मल्हार यास दहा हजार घोडदळ देऊन पन्हाळा ते सातारा या दरम्यानच्या प्रदेशातून येणाऱ्या बादशाही रसदी लुटण्यासाठी नेमिले होते. त्याचवेळी कोकणात सिद्दी याकूत खानाशी लढाई देण्यासाठी रामचंद्रपंत, दादो मल्हार व इतर मराठे सरदार उतरले होते. धनाजीच्या हालचाली विजेसारख्या होत होत्या. झुल्फिकार खान त्याचा पाठलाग करीत असतानाही त्याने त्यास दाद दिली नाही.[४]

---

१ हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. २३०.

२ हिस्टरी ऑफ औरंगजेब, भा. ५, पृ. १४४.

३ कित्ता पृ. १४३-१४४, मोगल व मराठे, पृ. १५२.

४ राजवाडे, खं. १५, ले. ४.

पन्हाळा काबीज केल्यानंतर १७०१ चा पावसाळा नजदीक आला हे पाहून औरंगजेबाने विशाळगडावर न जाता बादशहाने खटावनजीक येरळा नदीच्या काठी आपली छावणी उभारण्यास हुकूम सोडले. पावसाळा ह्या छावणीत घालविला. या अवधीत कोरेगावच्या पूर्वेस वर्धनगड व सातान्याच्या बाजूला असलेले नंदागिरी व चंदनवंदन हे किल्ले मोगल सैनिकांनी काबीज केले.[१]

खटाव येथे असता बादशहाने वजीर असदखानास आपल्याजवळ बोलावून गाझिउद्दीन फिरूजजंग यास ब्रह्मपुरीचे रक्षणार्थ ठेविले.

मराठ्यांचे किल्ले काबीज करण्याची बादशहाची घाई.

बादशहास मराठ्यांकडून किल्ले घेण्याच्या कार्यक्रमाप्रमाणे विशाळगड, सिंहगड, राजगड व तोरणा हे किल्ले ताब्यात घ्यावयाचे होते. आपले वय झाले आहे जगण्याची शाश्वती नाही करीता घाई करून मराठ्यांचे किल्ले आपल्या ताब्यात घेण्याचे काम १७०५ च्या पावसाळ्यापर्यंत बादशहाने केले.[२]

ऑक्टोबर १७०१ मध्ये शहाजादा बेदारबख्त याने सामानगड व कलानिधी हे गड काबीज केले.[३] पन्हाळ्यास मोगलांचा वेढा पडताच ताराबाईंनी आपली राजधानी तेथून हालवून ती विशाळगडावर नेली होती. त्यामुळे विशाळगडास पुन्हा महत्त्व प्राप्त झाले होते. हा गड जिंकण्याचे बादशहाने ठरवून स्वतः खटावहून विशाळगडाकडे कूच केले. विशाळगडाला फुत्तुल्लाखानाने अतोनात श्रम घेऊन वेढ्याचे काम चालविले होते. वेढ्याचे काम सतत ६ महिने चालले. त्यामुदतीत मोगल सेनापती जुल्फिकार खान याला सर्वत्र धुमाकूळ घालणाऱ्या मराठ्यांच्या पाठीमागून पळावे लागले. मराठे सरदारांचा बंदोबस्त करण्याची कामगिरी सांगत असता बादशहाने त्यास एक कानमंत्र दिला होता, "जेव्हा तुला शत्रूचा निःपात करावयाचा असतो तेव्हा फसवाफसवी, सबबी, खोट्या आणाभाका यांपैकी कोणत्याही साधनांचा वापर कर, परंतु पराभव पत्करू नकोस. कारण खुल्या युद्धात काहीही करावयास मुभा असते."[४]

१ हिस्टरी ऑफ औरंगजेब, भा. ५, पृ. १४३-१४४.

२ मराठे व औरंगजेब पृ. ९९, म. खा. पृ. ६३-६४, शि.च.प्र., पृ. ६७.

३ शिवचरित्र प्र, पृ. ६७.

४ मो. द. बा. पत्रे, पृ. १६४.

जुल्फिकार खानाच्या मराठ्यांशी चकमकी :

जुल्फिकार खानाजवळ बेताची फौज होती. कारण मोगल फौज ठिकठिकाणचे किल्ले मराठ्यांकडून काबीज करण्याच्या कामात गुंतली होती. खान आपल्या फौजेनिशी मराठ्यांचा पाठलाग करत परांड्याजवळ पोहोचला. तेथे मराठ्यांना गाठून त्याने त्यांच्याबरोबर संग्राम केला. परांडा आणि चारठाणा यांच्या परिसरात मराठ्यांशी अनेक लढाया झाल्या. मराठे पळत पळत लढाई देत असत. त्यांच्या मागे धावत असता जुल्फिकार खान आपल्या सैन्यासह वऱ्हाडात आला. वऱ्हाड व खानदेश या मुलखात मराठे व स्थानिक जमीनदार यांच्या सैन्यांची संख्या साठ हजार झाली होती. खानाने मराठ्यांचा पाठलाग केला तेव्हा मराठ्यांबरोबर लढाई होऊन मराठे नांदेडकडे पसार झाले. जुल्फिकार खानाने त्यांचा पिच्छा सोडला नाही तो त्यांच्या पाठलागावर गेला.

मराठ्यांच्या मागून धावपळीच्या लढाया करावयास मोगल सरदार कचरत असत. कारण मराठ्यांकडून आपणास केव्हाही कैद होईल असे मोगल सरदारांस वाटत असे. जुल्फिकार खानाची मराठ्यांबरोबर लढाई तामलोनी गावाजवळ झाली. मराठे एकसारखे मोगलांच्या पिछाडीवर हल्ले करीत होते. उलट मोगल सरदारांनी तीन कोसपर्यंत मराठ्यांचा पाठलाग केला. मोगलांचे अनेक सरदार मृत्युमुखी पडले, अनेकजण जखमी झाले रात्र झाल्यावर मराठे पळून गेले.[१] यानंतर नांदेड प्रांतात बाणगंगेच्या मुद्गल येथे मराठे गोळा झाले होते मराठ्यांची सैन्यसंख्या प्रचंड होती. जुल्फिकार खान मराठ्यांचा पाठलाग करीत नदीच्या काठांवर पोहोचला. मोगल मराठ्यांचे युद्ध झाले. त्यात मोगलांचा विजय झाला शत्रूपैकी अनेक लोक ठार व जखमी झाले.[२] असे भीमसेन सक्सेना औरंगजेबास खूष करण्याकरता लिहितो.

इ. स. १७०२ च्या सुमाराची मराठ्यांची स्थिती :

भीमसेन म्हणतो की नर्मदेच्या दक्षिणेस, दख्खन, खानदेश, वऱ्हाड या प्रांतातील परगण्यातून आणि खेड्यांतून सर्वत्र मराठे हे टोळ आणि मुंग्या प्रमाणे पसरले होते. पूर्वी जहांगीर आणि शहाजहान बादशहांनी दक्षिणदेश

१ मों. म., पृ. १५३-१५६.

२ तारिके दिलकशा, पृ. १५६.

जिंकून घेतला. जो जो भाग जिंकण्यात आला त्यावर फौजबंद व मातबर अशा अमीर उमरावांना नेमण्यात आले. त्यांनी खरोखरच चांगली व्यवस्था ठेविली. पण आता असे सरदार राहिले नाहीत. त्यामुळे लहान सैन्य बाळगणाऱ्या मन्सबदारांकडून ही कामे करून घेणे भाग पडले. जिल्ह्याचे लहान सहान पथके बाळगणारे फौजदार मराठ्यांच्या डोळ्यांत भरेनासे झाले. मराठ्यांचा जोर वाढला त्यांनी आपली सत्ता स्थापन केली. मोगल फौजदारांनी मोहिमांची संकटे पत्करणे टाळले. ते मराठ्यांना सामील झाले व त्यामुळे मराठे शिरजोर झाले. मन्सबदारांना सरंजामासाठी प्रदेश तनखा म्हणून लावून देण्यात आले होते. पण मन्सबदारांपाशी फार थोडी फौज असल्यामुळे त्या प्रदेशाची व्यवस्था ते बरोबर करू शकत नव्हते. प्रातांतील जमीनदार, लहान-मोठे राजे यांचाही जोर वाढला आणि ते मराठ्यांना मिळाले. त्यांनी सैन्ये उभी केली आणि ते प्रांतोप्रांती धुमाकूळ घालू लागले.

बादशहाच्या कानावर आले की मराठे हे बादशाही मुलखांतील रयतेला जाऊन मिळाले आहेत. तेव्हा ज्या ज्या खेड्यांत घोडे आणि शस्त्रे आढळतील ती जप्त करण्याची बादशहाने आज्ञा केली. बऱ्याच खेड्यातून हा प्रकार घडून आला हे पाहून खेड्यांतील लोक आपली हत्यारे आणि घोडे घेऊन मराठ्यांना जाऊन मिळाले.[१] भीमसेन सक्सेना आणि मनुची यानी तत्कालीन परिस्थितीचे वर्णन केले आहे त्याचा सारांश खाली दिला आहे.

"बादशहाने जहागीरदारांना तनखा म्हणजे सरंजाम म्हणून ज्याप्रमाणे तालुके लावून दिले त्याचप्रमाणे मराठ्यांनीही सगळा प्रांत सरंजाम म्हणून वाटून दिला. प्रत्येक प्रातांत एकाच्या ऐवजी दोन दोन जहागिरदार (सरंजामदार) निर्माण झाले.[२] मराठे प्रत्येक परगण्यांतून आणि प्रत्येक स्थळातून मनमानेल तशा रकमा घेत. पिकांमध्ये आपली जनावरे चरण्यासाठी सोडत. पिके उद्ध्वस्त करत, त्यांच्या पाठोपाठ मोगलांची सैन्ये येत. पण उद्ध्वस्त शेतीवर सैन्याने कसे जगावे? सगळी व्यवस्था नष्ट झाली. असे असूनही राजाराम महाराजांची पत्नी ताराबाई सर्व कारभार पहात

१ मोगल व मराठे, पृ. १५८.

२ कित्ता.

असे. तिने इतकी उत्तम व्यवस्था केली होती की मराठे सरदार तिच्या आज्ञेशिवाय काही करत नसत. वेळच्यावेळी पगार मिळण्याची आशा राहिली नाही म्हणून बादशाही मुलखाची लूट करणे हेच बरे समजून ते वागू लागले. मराठ्यांचे बळ आणि त्यांची संख्या वाढू लागली कारण हे की तमाम दखखन प्रातांत जेथे बंडखोर आणि लुटारू नाहीत असे एकही स्थळ शिल्लक नव्हते. मराठ्यांपाशी एका लाखापेक्षा अधिक सैन्य जमले."

इ. स. १७०२ च्या सुरुवातीपासून मराठ्यांनी औरंगाबाद ते दमणपर्यंतच्या भागात लुटालूट चालविली होती. कारवारातही पावसाळ्यात लुटमार दोन तीन महिने चालविली होती. फोंड्यांचा किल्ला ऑक्टोबर १७०२ मध्ये मराठ्यांनी घेतला. नंतरही कारवारच्या नायकाच्या भागात लुटालुटीचे प्रकार चालूच राहिले.

वरील तत्कालीन हकिगतीवरून हे लक्षात येते की राजाराम महाराजांचे जे धोरण होते तेच ताराबाईने चालू ठेवले. मराठी सत्तेचा राज्यकारभार ताराबाईच्या हातात आल्यावर त्यांनी रामचंद्रपंत अमात्य, परशुराम पंत प्रतिनिधी, सेनापती धनाजी जाधव यांसारख्यांच्या अव्वल दर्जाच्या आधार-स्तंभावर बादशहाची तिरपीट उडवून दिली. केवळ बचावाचे प्रयत्न सोडून त्यांनी शत्रूचा निःपात करण्यास सुरुवात केली. अशा रीतीने शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर वीस वर्षांनी मराठ्यांनी बचावाचे युद्ध सोडून चढावाचे युद्ध हाती घेतले. मोगलांच्या ताब्यातील मुलूख आपल्या ताब्यात घेतला व त्या मुलखातून नक्त आणि ऐन जिन्नसी अशा दोन्ही स्वरूपांत वसूल घेऊ लागले आणि ह्या वसुलावर सैन्याचे पोषण होऊ लागले. अशा रीतीने चढाईचे धोरण मराठ्यांनी स्वीकारल्यामुळे त्यांची चढती कमान सुरू झाली. मुसलमानी फौजेच्या ठिकाणी आता लढण्याचे त्राण राहिले नाही हे मराठ्यांच्या लक्षात आले. फार दिवस सोसल्यामुळे मोगली फौजेस आता लढण्याचा कंटाळा आला होता. हे औरंगजेबास समजल्यामुळे तो अगदीच नाउमेद झाला. मराठ्यांची लुटालूट त्याला अगदीच बंद करता येईना. मराठे केवळ लूट करून स्वस्थ बसत नव्हते. त्यांनी जिकडे तिकडे आपला कायमचा अंमल बसविण्यास सुरुवात केली. जो-जो मुलूख त्यांचे हाती लागे ; त्यांत बादशाही अंमलाप्रमाणे आपला अंमल सुरू करून सुभेदार कमाविसदार, शहदार वगैर अधिकारी त्यांनी नेमिले. सुभेदार म्हणजे प्रातांचा मुख्य, त्यांच्या ताब्यात सर्व फौज असावयाची, एखादे लमाण बादशहाकडे आहे, अशी बातमी लागताच, तो सुभेदार सहा-सात

हजार लोक घेऊन ते लमाण लुटून आणीत असे. तो आपले कमाविसदार चौथाई गोळा करण्याकरिता पाठवीत असे आणि जमीनदार व फौजदार लोक चौथाई देण्यास हरकत करीत, त्या ठिकाणी सुभेदार स्वतः जाऊन शहरे व गाव जमीनदोस्त करून कमाविसदारांचा पाठपुरावा करी. रहदारीच्या जागी नाक्यावर बसून, गाड्या व जनावरे यांजपासून कर घेण्याचे काम ते करत. याप्रमाणे दक्षिणेतून गुजरातेत अहमदाबादपर्यंत आणि माळव्यांत उज्जनीपर्यंत मराठ्यांनी आपला दरारा बसविला. ताराबाईच्या अधिपत्याखाली गुजरातेत अहमदाबादपर्यंत व माळव्यात उज्जैनपर्यंत मराठ्यांचा भगवा झेंडा फडकू लागला. कर्नाटक प्रातांतही फडकू लागला. त्यामुळे औरंगजेबाच्या दक्षिणेकडील किल्ले काबीज करण्यावर सर्व बाजूने ताण पडू लागला. त्याची पर्वा न करता बादशहाने दक्षिणेतील किल्ले जिंकण्याचे काम नेटाने सुरू केले.

विशाळगड किल्यास मोगलांचा वेढा :

औरंगजेब बादशहाने आपला सरदार फत्तेउल्लाखान यास विशाळगड किल्ल्यास वेढा घालण्यासाठी ऑक्टोबर १७०१ मध्ये रवाना केले. स्वतः बादशहा नोव्हेंबर महिन्यात विशाळगड किल्ल्याजवळ आला. त्याने आपल्या फौजेचे तीन भाग केले आणि किल्ल्याला वेढा दिला. हे समजल्यावर ताराबाईंनी प्रतापराव मोरे व संताजी पांढरे यांना आज्ञा करून सांगितले की “ औरंगजेब विशाळगडास बिलगला आहे. याजकरिता त्यांचे कबिलाबाड मारून हमेशा गोटावर हल्ले करावे तरीच तो बलकबुल राहतो.”[१] मोगलांनी मोर्चे कायम केले. पश्चिमेकडील दरवाजाचा संरक्षक बुरूज त्यांचे हाती आला. किल्ल्यातील लोक क्षणाचीही विश्रांती न घेता रात्रंदिवस तोफा बंदुका इत्यादींचा सतत मारा करीत होते. महमद अमीन याने माचीच्या बाजूने बुरुजाला लागून जी एक टेकडी होती तिच्यावर हल्ला करून ती ताब्यात घेतली (४ मार्च १७०२) त्यानंतर एके दिवशी किल्ल्यांतून फेकलेला एक मोठा दगड फत्तेखानाच्या डोक्यावर पडला. त्यामुळे त्यास एक महिनाभर अंथरूणाला खिळून राहावे लागले. म्हणून औरंगजेबाने शहजादा बेदारबख्त, सवाई जयसिंग यांना किल्ला सर करण्याच्या कामासाठी बोलावले. त्यांनी २७ एप्रिल १७०२ रोजी हल्ला करून रेवणीचा बुरूज (प्रवेशद्वाराचा संरक्षक) आपल्या ताब्यात घेतला. बुरूज हाती आला म्हणून किल्ला हाती आला नव्हता. इतक्यात पावसाळ्याला सुरुवात झाली. दहा-दहा आणि वीस-वीस दिवस अहोरात्र पावसाचा वर्षाव होत असे. कुणाला डोळे उघडण्याची किंवा डोके वर काढण्याची सोय

१ हिंदवी स्व. आणि मोगल, पृ. २४३.

नव्हती.[१] हे पाहून मोगलांचे धाबे दणाणले. कित्येक मोगल सेनापतीनी परशुरामपंताकडे माणसे पाठवून याचना केली की " कसेही करून किल्ला घेतला एवढे श्रेय आम्हास पदरात पाडू द्या, रक्कम मागाल ती देतो " हा किल्ला काबीज करण्याचे काम चालू असता औरंगजेब व परशुरामपंत यात पत्रव्यवहार झाला. औरंगजेबाने पंतास ता. २७ मे १७०२ रोजी पत्र पाठविले ते असेः "मुसलमानी धर्मावर निष्ठा ठेवून परशुराम याने जाणावे की तुम्ही आमचे इतके अपराध केले आहेत की त्यांना क्षमाही नाही. पण शहाजादा बेदारबख्त यांच्या लिहिण्यावरून समजले की तुम्हाला आपल्या कृतकर्माचा पश्चात्ताप झाला आहे. पुढील खेळण्याचा किल्ला (विशाळगड) देण्यास तयार आहात. मोगल सैन्य यापुढे मराठ्यांचे किल्ले न घेता आपल्या मुलुखाकडे परत जाईल. तुम्ही आणि तुमचे सहकारी यांचे अपराध माफ करून त्यांना जीवदान देण्यात यावे. शहाजाद्यापाशी तुम्ही विनंती केली ती मान्य करण्यात येत आहे. ती अशी तुम्ही शहाजाद्यांना भेटावे आणि खेळण्याचा किल्ला ताब्यात द्यावा. नंतर तुमचे अपराध माफ करण्यात येऊन तुम्हाला आणि तुमच्या सहकाऱ्यांना जीवदान देण्यात येईल. आमची सैन्ये तुमचा मुलूख आणि किल्ले जिंकून घेण्यासाठी पुढे चाल करून जाणार नाहीत उलट ती आपल्या मुलूखाकडे परत फिरतील.[२]"

यानंतर बोलणे चालून बेदारबख्ताने दोन लाख रक्कम परशुराम पंताकडे भरली. बख्शी रूहुल्लाखान आणि बेदारबख्त याची निशाणे मराठ्यांनी किल्ल्यांवर लावली व तो किल्ला मराठ्यांनी खाली केला. या प्रसंगावरून मराठ्यांचे त्यावेळचे धोरण स्पष्ट होते. जितके दिवस किल्ला लढविता येईल तितके दिवस तो लढवावयाचा व शेवटी आपले कोणतेही नुकसान करून न घेता दंड घेऊन तो शत्रूच्या हवाली करावयाचा. बादशहाच्या पत्राप्रमाणे पैसे मिळाल्यावर परशुरामपंत तारीख ७ जून १७०२ रोजी आपल्या लोकांसह किल्ला खाली करून निघून गेला. ही बातमी बादशहाला समजली तेव्हा तो " सकरलाना " असे म्हणाला. पुढे तेच नाव बादशहाने त्या किल्ल्याला ठेविले. १० जूनला बादशहा गडावर आला. त्याने जातिबखानाची किल्लेदार म्हणून नेमणूक केली.[३]

□□

१ मराठे व औरंगजेब, पृ. १०७.

२ मोगल व मराठे फारसी साधने, पृ. ७३.

३ शि. च. प्र., पृ. ६७-६८, म. औ., पृ. १०८-१०९, म. स्वा., पृ. ७१.

४९. औरंगजेबाच्या हालचाली व ताराबाईचे कर्तृत्व

(इ. स. १७०२ ते १७०७)

४ जून १७०२ ला परशुरामपंतांनी खेळणा किल्ला ताराबाईंच्या आदेशावरून मोगलांच्या स्वाधीन केला. ७ जूनच्या रात्री आपली सगळी माणसे आणि शक्य तितके सामान घेऊन तो किल्ल्यातून निघून गेला. किल्ल्यात शेकडो मराठे होते त्यांना बादशहाने किल्यातून बाहेर पडण्यास दिले. २६ डिसेंबर १७०१ पासून किल्ल्याचा वेढा सुरू झाला तो ४ जून १७०२ ला किल्ल्याचा ताबा परशुरामपंतांनी पैसे घेऊन दिल्यावर संपला. मोगलांच्या ताब्यात हा किल्ला जास्त दिवस राहिला नाही. अल्पावधीतच मराठ्यांनी तो परत मिळविला.

ताराबाईंनी मोगलांची हलाखीची स्थिती कशी निर्माण केली ते खाफीखान सांगतो :

ह्या प्रदेशातील दुर्गम डोंगर, खोल दऱ्या, विषारी प्राणी आणि काटेरी वृक्ष यांना इतकी माणसे बळी पडली की एकाही माणसाच्या अंगावर धड कपडा शिल्लक राहिला नव्हता.[१] अनेक किल्ल्यांना बादशाही सरदार वेढे घालीत, शौर्य गाजवीत आणि किल्ल्यातील शिबंदीला जेरीस आणीत शेवटी किल्लेदाराला भक्कम रक्कम देऊन बादशाही सरदार ते किल्ले आपल्या ताब्यात घेत. किती रक्कम किल्लेदाराला देण्यात आली याचीही बातमी हरकाऱ्यांच्या द्वारे बादशहाला लागे. रात्रं-दिवस पाऊस पडत होता आणि नदी नाले यांना पूर आले होते. लष्करात धान्याची महर्गता होती. लष्कराचे बरेच सामान चिखलात रुतून बसले होते. पुढे चाल करण्यासाठी बादशहाने जो ओढा पार करण्यास लष्करास सांगितले होते तो ओढा पावसामुळे पूर येऊन भयंकर बनला होता. ओढ्याच्या काठावर पावला

---

१ मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ७१.

पावलांवर माणसे आणि जनावरे मरून पडली होती. त्याची इतकी दुर्गंधी सुटली होती की जिवंत माणसांना जीव नकोसा झाला. मराठ्यांनी त्याच्या लष्करावर हल्ला करून त्याचे ५ अधिकारी पकडले. खेळण्याहून बादशहा १७ जून रोजी निघाल्यावर चोवीस दिवसांनी बादशहा आणि त्याचे सैन्य मोठ्या कष्टाने ओढ्या पार झाले.[१] खेळण्याहून चाळीस कोसांचा रस्ता अडतीस दिवसांत आक्रमून मोगल सैन्य १७ जुलै १७०२ ला पन्हाळा येथे पोहोचले. तशाच हालअपेष्टा सोशीत मोगल सैन्य वडगाव (पन्हाळ्याच्या पूर्वेस तेरा मैलांवर) येथे ३० जुलै १७०२ ला पोहोचले. तेथे १ महिना ८ दिवस बादशहाने मुक्काम केला आणि सैन्याला विश्रांती दिली. त्यानंतर बादशहाने बहादूरगडला लष्करासह जाण्याचे ठरविले. त्याकरता पाण्याने तुडुंब भरलेली कृष्णा नदी पार करावयाची होती. हा विचार लष्करांतील लोकांस समजताच त्यांना धडकी भरली. लष्कराने नऊ कोसांचा प्रवास सोळा टप्प्यात पूर्ण केला. १९ सप्टेंबर १७०२ ह्या दिवशी लष्कर कृष्णेच्या काठावर पोहोचले. नदीचे उतारही सापडेनात. नदीवर थोड्याशा नावा होत्या. त्याही जुन्या आणि मोडलेल्या. भांडखोर नावाडी आणि बेमुर्वत जुलूम करणारी माणसे लोकांना नदी पार करताना सर्वस्व काढून घेण्यास टपून बसलेली असत. अशा स्थितीत काहींनी नदी पोहून जाण्याचा प्रयत्न केला तो निष्फळ ठरल्यामुळे आणि नाव बुडाल्यामुळे कित्येक माणसे नदीत बुडाली. अशी हर प्रकारची संकटे सहन करून ते मोगल सैन्य बहादूरगडला नोव्हेंबर १७०२ ला पोहोचले.

१३ नोव्हेंबरला तेथे पोहोचल्यावर औरंगजेबाने एक महिना आणि काही दिवस तेथे मुक्काम केला. हेतू सैन्यास विश्रांती मिळावी हा होता. मोगल लष्करात आता कोठे चैतन्य येऊ लागले होते. तोच बादशहाने कोंडाणा किल्ला जिंकून घेण्यासाठी सैन्यास कूच करण्याचा आदेश दिला. २७ नोव्हेंबर १७०२ ला मोगल सैन्य कोंडाण्याच्या पायथ्याशी पोहोचले."[२]

वरीलप्रमाणे सैन्याची बिकट स्थिती खाफीखानाने वर्णन केल्यावर दुसरा तत्कालीन लेखक भीमसेन सक्सेना मोगलाच्या हलाखीच्या स्थितीबद्दल लिहितो, ते असे :---

१ पगडी, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध (खाफीखानाचा साधनग्रंथ), पृ. ७४-७५.

२ कित्ता, पृ. ७६-७७.

बादशहाने दक्षिणेत उतरल्यावर सारख्या मोहिमाच मोहिमा चालू केल्या त्यामुळे सरदार व सैनिकांना एकाकी जीवन कंठावे लागले त्यामुळे ते बेजार झाले. त्यांनी आपली बायकामुले लष्करात बोलावून घेतली आणि लष्करातच त्यांनी आपला संसार थाटला. तेथेच त्यांना मुलेबाळे झाली. ती लष्करांत वाढून मोठी झाली आणि लष्करातच म्हातारी झाली आणि लष्करातच मरण पावली. दगड-मातीच्या घरांची तोंडे काही त्यांच्या दृष्टीस पडली नाहीत.[१]

मराठ्यांच्या स्थितीचे वर्णन :

इतिहासकार खाफीखान हा बादशहाच्या सैन्याबरोबर होता. तो मराठ्यांच्या स्थितीबद्दल लिहितो, "बादशहाने मराठ्यांच्या मुलुखांत शिरून त्यांचे गगनचुंबी किल्ले घेतले. मराठ्यांना त्याने बेघर करून सोडले, पण मराठ्यांचा पराक्रम वाढतच गेला. बादशहा आणि त्याचे अमीर उमराव दूर डोंगराळ मुलुखांत आहेत, हे पाहून मराठे मोठमोठी सैन्ये घेऊन बादशाही मुलूखात आक्रमण करून उच्छाद मांडू लागले. ताराबाईचे सरदार जेथे जात तेथे आपले कायम बस्तान बसवीत. तेथे आपले कमाविसदार नेमीत, तेथे आपली बायका-मुले, माणसे, हत्ती, तंबू इत्यादींना घेऊन वर्षेच्या वर्षे ते राहू लागले. त्यांनी प्रदेश जिंकून घेऊन त्यातील परगणे आपआपसात वाटून घेतले आणि बादशाही पद्धतीप्रमाणे त्यांनी सुभेदार, कमाविसदार, राहदार इत्यादी अधिकारी नेमले. मराठ्यांनी चौथ वसूल करण्यासाठी सर्वत्र कमाविसदार नेमले होते. मराठे व्यापाऱ्यांकडूनही कर वसूल करीत. प्रत्येक सुभ्यात मराठ्यांनी गढ्या बांधल्या होत्या. त्यात भोवतालच्या प्रदेशातून लुटून आणलेली मालमत्ता ते ठेवीत. बादशाही अधिकाऱ्यांबरोबर ते करारमदार करू लागले. मराठ्यांनी अहमदाबाद आणि माळव्याच्या सरहद्दीपर्यंत लुटालूट करून सर्व काही धुळीस मिळविले."[२] ह्या धोरणाचा असा परिणाम झाला की एका परगण्यात किंवा प्रातांत दोन, दोन सरंजामदार निर्माण झाले. पूर्वीचा मोगल सरंजामदार व नंतरचा मराठा सरंजामदार.

१ हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. २५५.

२ मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ८२-८३.

मोगल-मराठा संघर्ष (जून-डिसेंबर १७०२) :

विशाळगडाच्या वेढ्याच्या काळात मराठे व मोगल सेनापती जुल्फिकार खान यांच्या धावपळीच्या लढाया एकंदर १९ झाल्या. दोन-तीन हजार कोसांची पायपीट करावी लागली.[१] जून महिन्यात पावसाळा तोंडावर आला तरी खान व धनाजी यांचे पाठशिवणीच्या खेळासारखे युद्ध चालूच होते. शेवटी धनाजी विश्रांतीसाठी सिंहगडावर निघून गेला परंतु खानाने त्याची पाठ सोडली नाही. धनाजी सिंहगडातून बाहेर येण्याची वाट पाहत तो पुरंदराजवळ छावणी करून राहिला.[२]

इतक्यात औरंगाबाद भागात मराठ्यांनी धामधूम केल्याची बातमी बादशहाला कळली. तेव्हा पुरंदराजवळ तंबू ठोकून असलेल्या झुल्फिकार खानास त्याचा मोड करण्यास आज्ञापिले. खानाने औरंगाबादेकडे कमी फौजेनिशी कूच केले. तेव्हा मराठ्यांकडील भारी सैन्याने खानाचा पाठलाग करून खानाची अनेक माणसे ठार केली. परंतु खानाचा पुरता मोड त्यांना करता आला नाही. तेव्हा मराठे वऱ्हाडकडे गेले. त्यांनी मार्गातील प्रदेश लुटून फस्त केला.[३]

दक्षिण कोकणात सिद्धोजी हिंदुराव घोरपडे याने भीमगडावर हल्ला करून तो काबीज केला आणि त्या गडावरील हवालदार व इतर अधिकारी यांना कैद केले.[४] पुढे दसरा होताच हिंदुरावाने पुन्हा दक्षिण कोकणात उतरून फोंड्याच्या प्रदेशावर (अंत्रूज महालावर) स्वारी केली.[५] हा प्रदेश फोंड्याचा किल्ला सोडून बाकी सर्व महाल मोगलांनी सन १६८२ साली मराठ्यांकडून जिंकून घेतला होता. सन १६८९ च्या सुरुवातीस मोगलांनी फोंड्याचा किल्लाही हस्तगत केला होता. हा प्रदेश परत आपल्या कबजात आणण्याचे हुकूम ताराबाईंनी दिले. म्हणून त्यांनी फोंडामहाल काबीज

१ तारीके दिलकशा, पृ. १६१.

२ कित्ता.

३ कित्ता.

४ ता. का., पृ. १५९-१६०.

५ पोर्तुगीज-मराठे संबंध, पृ. १२७-१२८.

करून फोंड्याचा किल्ला व त्याच्या जवळच असलेला मर्दनगड जो संभाजी महाराजांनी बांधला होता, त्यांस मराठ्यांनी वेढा घातला. मोगलांनी पोर्तुगीज, सोंध्याचा राजा व खेम सावंत यांच्याकडे मदतीची याचना केली या सर्वांनी मोगलांना मराठ्यांविरुद्ध सहाय्य केले. पण ह्या मदतीचा काही उपयोग झाला नाही. कारण मराठ्यांनी फोंड्याची नाकेबंदी करून सर्व रस्ते रोखून धरले होते. त्यामुळे मराठ्यांविरुद्ध पोर्तुगिजांना दारूगोळ्यांची मदत फोंड्याचे किल्लेदारास पाठविता आली नाही. इतक्यात हिंदुराव घोरपडे यांच्या विनंतीस मान देऊन विठोजी राम नाईक सरदेसाई यांनी आपला हस्तक केदारजी सूर्यवंशी याजबरोबर फौज देऊन त्यास फोंड्याच्या कोटाजवळ पाठविले. मोठी झुंज दिली आणि कोट हस्तगत जाहला.[१] डिसेंबर १७०२ मध्ये फोंडा किल्ला मराठ्यांनी सर केला. फोंड्याचा किल्लेदार म्हणून कृष्णाजी अनंत यांची नेमणूक ताराबाईंनी केली. ह्यावेळी बादशहाचा मुक्काम भीमेच्या काठावर असलेल्या बहादूरगडावर होता.[२] फोंडा किल्ला काबीज केल्यानंतर मराठ्यांनी बहादूरगडावर असणाऱ्या बादशाही छावणीभोवती धामधूम उडविली होती. तरीही बादशहास अद्यापि मराठ्यांचे अनेक किल्ले जिंकावयाचे होते. मागे सांगितल्याप्रमाणे तो २ डिसेंबरला कोंडाणा ऊर्फ सिंहगड जिंकून घेण्यासाठी निघाला. वाटेत त्याने जेजुरीच्या खंडोबाच्या देवालयाची नासधूस केली. श्रीचा कळस व मंडप जाळून टाकला. जेजुरीहून कूच करून बादशाह कोंडाण्याच्या पायथ्याशी २७ डिसेंबरला पोहोचला.[३]

इ. स. १७०२ पासून राणी ताराबाईंनी आक्रमक धोरण स्वीकारले. बादशहा राज्यांतील किल्ले घेण्याच्या उद्योगात मग्न असता मोगल साम्राजाच्या इतर सुभ्यांवर स्वाऱ्या योजून त्या यशस्वी केल्या. माळवा प्रांतात कृष्णा सावंत या शूर सरदाराची रवानगी केली. तो इतर मराठे सरदारांना बरोबर घेऊन नर्मदा पार झाला आणि तिकडील भागात धामधूम करून सुरक्षितपणे ते आपल्या देशी परत आले.[४]

१ शि. च. सा. खंड ८, पृ. ५४.

२ हिस्टरी ऑफ औरंगजेब व्हा. ५, पृ. १५२.

३ महाराणी ताराबाई, पृ. १७३.

४ मोगल मराठे, पृ. १६१.

बादशहा विशाळगडास वेढा घालून बसला असता मराठ्यांनी बुऱ्हाणपूर शहरावर हल्ला चढविला. त्यांनी शहर उद्ध्वस्त केले. सुभेदारास कैद करून त्याजकडून जबर खंडणी घेऊन त्यास सोडून दिले.[१] यानंतर मराठ्यांनी गोवळकोंड्यात प्रवेश केला. खंडणी नाही तर सर्व शहर बेचीराख करू अशी धमकी त्यांनी गोवळकोंड्याच्या सुभेदाराला दिली. मराठ्यांच्या लष्करी सामर्थ्यापुढे सुभेदार हतबल झाला. त्याने शहराच्या रक्षणार्थ भली मोठी खंडणी मराठ्यांस देऊन आपली सुटका करून घेतली.[२] ह्यावेळी मराठ्यांच्या काही विजयी फौज़ा वऱ्हाड प्रदेशात घुसल्या. त्यांनी लूट व जाळपोळ करण्यास सुरुवात केल्यावर त्यांचे पारिपत्य करण्यासाठी वऱ्हाडचा सुभेदार अली मर्दानखान आपल्या सैन्यानिशी मराठ्यांवर चालून गेला. मराठ्यांनी त्यांच्या सैन्याला कापून काढून त्यास कैद केले. यापूर्वी संताजीने अलीमर्दान खानास इ. स. १६९२ त जिंजीच्या वाटेवर कैद केले होते.[३]

जिंजीचा किल्ला झुल्फिकार खानाने मराठ्यांकडून घेतल्यावर बाकीची मराठ्यांच्या अंकित असलेली सर्व ठिकाणी मोगलांनी घेतली. मराठ्यांच्या ताब्यातील वेलोर किल्लाही खानाने पैसे देऊन मिळविला, असे मुनशी म्हणतो.[४] बादशहाने खानास आज्ञा केली की त्याने तंजावर राजा, त्रिचनापल्ली आणि कर्नाटकांतील इतर पाळेगार यांजकडून ते मराठ्यांस देत असलेली खंडणी वसूल करावी. अशी आज्ञा बादशहाने दाऊदकडे पाठविली.[५]

इ. स. १७०२ मध्ये मोगलांची परिस्थिती :

इ. स. १७०१ पासून मराठे सरदारांनी मोगल मुलखांत आपला कारभार सुरू केला. बादशहाने विशाळगड किल्ल्याला वेढा घातला. त्यावेळी मराठ्यांचा जोर सर्वत्र वाढला होता. त्यांनी ठिकठिकाणच्या वाटा बंद पाडल्या. लुटमार करून ते संपन्न बनले. धान्य कमालीचे महाग झाले. विशेषत: बादशहाच्या लष्करात तर उपासमारीने अनेक माणसे नष्ट झाली. लष्करांत परिस्थिती सर्व प्रकारे विचित्र झाली.

१ स्टोरीया द मोगर भाग ३, पृ. ४१४.

२ कित्ता.

३ कित्ता, पृ. ४२०-४२१.

४ कित्ता, पृ.

५ राणी ताराबाई, पृ. १७६.

बादशहा दक्षिणेत उतरल्यापासून मराठ्यांचे राज्य बुडविण्याचा त्याचा प्रयत्न अव्याहत सुरू होता. संभाजी महाराजांचा वध केल्यावर त्याला वाटले मराठेशाही बुडाली आपण मराठ्यांचे राज्य जिंकले. परंतु मोगलांस तोंड देण्याचे उपाय मराठ्यानी शोधून काढले. मराठ्यांचे सेनापती संताजी घोरपडे, धनाजी जाधव यांनी मोगलांचा पिच्छा पुरविला. ठिकठिकाणी चालून आलेल्या मोगल सेनापतींचा पराभव केला. काहींना पकडले आणि त्यांच्याकडून जबर खंडणी घेऊन त्यांना सोडून दिले. पुढे राजाराम महाराज जिंजीहून महाराष्ट्रात आल्यावर ठिकठिकाणी मराठे लष्कर मोगलांशी लढत राहिले. मोगल सरदारांनी मराठा किल्लेदारास लाच देऊन मराठ्यांकडील किल्ले ते घेत राहिले. मोगलांच्या ताब्यात किल्ला गेल्यानंतर काही दिवसांतच मराठे तो किल्ला जिंकून घेऊ लागले. असा कार्यक्रम चालत असता राजाराम महाराजांचे मार्च १७०० मध्ये अचानक निधन झाले. तेव्हा बादशहाच्या महत्त्वाकांक्षेला पुन्हा एकदा पालवी फुटली. मराठ्यांना जिंकण्याची आणखी एक संधी परमेश्वराने आपल्याला दिली आहे, असे त्याला वाटले.[१] परंतु राजाराम महाराजांच्या मृत्यूने ढासळलेली बाजू ताराबाई मुख्य असलेल्या मराठा सरदारांनी सावरून धरली व मोगलांचा ठिकठिकाणी पराभव होत राहिला. बादशहास कळून चुकले होते की मराठ्यांनी आपल्यास दमविले पण इज्जतीखातर बादशहा मराठ्यांशी लढत राहिला.

मनुची म्हणतो की बादशहाला दक्षिणेच्या युद्धाविषयी पश्चात्ताप होत असून तो दिल्लीला जाण्यास उत्सुक आहे. तथापि तो जाऊ शकत नाही. याचे कारण तो उत्तरेकडे गेला की, मराठे सर्व दक्षिण जिंकून उत्तरेतील साम्राज्याचेही लचके तोडतील, अशी त्याला भीती वाटते.[२] शिवाय पंजाब मधील शीख, राजपुतान्यातील रजपूत, आग्राजवळचे पठाण बुंदेले या जमातीनी बंडाळी माजवून साम्राज्याचे स्वास्थ्य बिघडवून लचके तोडण्याच्या तयारीत असल्याचे तो ऐकत होता. अशा वेळी दक्षिणेतून माघार घेऊन तो उत्तरेत जाता, तर या बंडखोरांना अधिकच चेव चढला असता. मराठ्यांनी पराभूत करून उत्तरेत पाठविलेला बादशहा म्हणून त्याची इज्जत राहिली नसती.

१ स्टोरिया द मोगर, भाग ४, पृ. ५१.

२ कित्ता, पृ. ९७.

तथापि, बादशहा संकटाची पर्वा करीत नव्हता. त्याचे म्हणणे असे की, आपला पूर्वज तैमूरलंग याला जेता म्हणून जी किर्ती मिळाली त्यावरही आपल्यासारखी अनेक संकटे कोसळली होती.[१] बादशहा नव्वदीचा झाला असताही पालखीतून जात असता आपली तलवार म्यानातून बाहेर काढून हवेत तीन-चार वार करीत असे व पुन्हा ती पुसून म्यान करीत असे. अद्यापही आपण शत्रूशी लढू शकतो हे दाखविण्यासाठी त्याचे हे सर्व नाटक असे.[२] या युद्धात मोगल साम्राज्याची अपार साधन संपत्ती नष्ट होत होती. उत्तरेतील संपन्न सुभ्यांचे उत्पन्न दक्षिणेतील मराठ्यांच्या किल्ल्यांना वेढे घालण्यात खर्च होत असे. त्यापैकी बरीच संपत्ती मराठे मार्गातच लुटून नेत. जीवितहानी तर त्यापेक्षा कितीतरी पटीने होती. दरवर्षी बादशाही लष्करात एक लाख लोक मृत्युमुखी पडत. घोडा, बैल, उंट, हत्ती इत्यादी जनावरांची मृत्युसंख्या तीन लाखांच्या घरात होती.[३]

बादशहा कित्येक वर्षे दक्षिणेत असल्यामुळे साम्राज्यांतील अधिकाऱ्यांवरील त्याचा वचक कमी होत चालला होता. मनुची म्हणतो की, दूर अंतरावरचे अधिकारी बादशहाच्या हुकूमाकडे दुर्लक्ष करतात, सबबी आणि अडचणी सांगून हुकूमाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ करतात तसेच दरबारांतील उमरावाना पैसे चारून त्यांच्याकडून बादशहाची आपल्यावर गैरमर्जी होणार नाही हे पाहतात.[४]

बादशहाने जिझिया कर वसूल करण्यास जे अमीन नेमलेले असत ते कोट्यवधी रुपये वसूल करून त्यापैकी फार थोडी रक्कम सरकारी खजिन्यात भरत असत.[५] खुद्द बादशहाचे छावणीत पैशांच्या लबाड्या बादशहाच्या डोळ्यादेखत होत असत. बादशहाने हिंदुवर जिझिया कर बसविला त्याची वसुली मोगल अधिकारी करीत. या जाचाला कंटाळून हिंदूनी इस्लामचा स्वीकार करावा म्हणून बादशहाने हा कर बसविला होता ; ह्या कराच्या वसुलीने खजिन्यात भर पडून त्याचा उपयोग युद्धासाठी

---

१ अखबरात १०-४-१६८२.

२ कित्ता, पृ. १००.

३ स्टोरिया द मोगर, भाग ४, पृ. ९६-९७.

४ कित्ता, पृ. १००.

५ मोगल व मराठे पृ. १५८.

व्हावा हाही त्याचा एक आर्थिक हेतू होता. जिझिया वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यांशिवाय ठाण्याचे फौजदार, किल्ल्यांचे हवालदार, परगण्यांतील देशमुख आणि जमीनदार हे त्या निमित्ताने रयतेकडून पैसे गोळा करीत असत.[१] रयतेस कोणी वाली राहिला नव्हता. अशा परिस्थितीत मराठ्यांच्या फौजा येत. त्या गावेच्या गावे लुटून फस्त करीत. मोगल अधिकारी त्यांना प्रतिकार करण्याऐवजी पळून जात अथवा खंडणी देऊन स्वतःचे संरक्षण करीत. या अस्थिर परिस्थितीमुळे दक्षिणेतील व्यापार उद्योगधंदे बुडाले. हिंदुस्थान देशात बेबंदशाही चालू आहे असे मद्रासचा इंग्रज गव्हर्नर थॉमस पीट आपल्या पत्रात लिहितो.[२]

ताराबाई काळात मराठ्यांनी बचावाचे धोरण न स्वीकारता आक्रमक धोरण स्वीकारले. ते राजरोसपणे बादशाही मुलखांवर धाडी घालू लागले होते. तेव्हा आपल्या सुभ्यांचा बचाव करण्याची पाळी बादशहावर आली.

तसेच वाचकास आठवत असेल की, राजाराम महाराजांनी मराठी फौजा जगविण्यासाठी व मराठी राज्याचे अस्तित्व टिकविण्यासाठी जो प्रदेश मराठे सरदार जप्त करीत त्यांना तो मनसब म्हणून वाटून टाकण्याचे धोरण स्वीकारले होते. तेच धोरण ताराबाईंनी चालू ठेविले. बऱ्याचवेळा ताराबाई एखाद्या सरदाराला जहागीर म्हणून एखादा मुलूख देत असत तो मोगली मुलुखच असे. तो जिंकून तेथे आपला अंमल प्रस्थापित करण्याची सर्वस्वी जबाबदारी त्या सरदाराची असे.

सिंहगडचा वेढा

विशाळगड जिंकून घेतल्यानंतर बादशहाने आपल्या सैन्यांस २ डिसेंबर १७०२ रोजी कोंडाण्याकडे कूच करण्याची आज्ञा केली हे पूर्वी सांगितले आहे.

बादशहाने आज्ञा केली की तोफखान्याचा प्रमुख तरबियतखान याने विशाळगडावर तोफा आदी युद्धसामग्री ठेवलेली आहे ती सिंहगडला घेऊन येणे.[३] त्याप्रमाणे तो मोगल सरदार विशाळगडाहून परत येताना मराठ्यांनी

१ हिंदवी स्वराज्य आणि मोगल पृ. २३२-२३३.

२ मोगल व मराठे पृ. १५८.

३ स्टोरिया द मोगर, भाग ४, पृ. १२३.

त्यास रहिमतपुराजवळ घेरले. परंतु ऐनवेळी झुल्फिकार खान त्यांच्या मदतीस आल्यामुळे तो बचावला. याच सुमारास विजापुरी कर्नाटकचा फौजदार चीन किलीचखान हा विजापूरच्या सुभेदारीवर रुजू होण्यासाठी जात असल्याची बातमी मराठा सेनापती धनाजी जाधव यास समजली. तेव्हा धनाजीने त्यांच्यावर चाल केली. मराठ्यांच्या भीतीने त्याने महागलच्या किल्ल्यात आश्रय घेतला तेव्हा मराठे गुलबर्ग्याच्या दिशेने निघून गेले. त्यांचा पाठलाग झुल्फिकार खान करीत होता. तो गुलबर्ग्यास पोहोचताच बादशहाने त्याला तातडीने आपल्यापाशी बोलावले. तो कोंडाण्याच्या पायथ्याशी बादशहास येऊन भेटल्यावर बादशहाने त्यास शिवापूरच्या बाजूने मोर्चे उभे करण्यास आज्ञा केली. त्यानंतर बादशहास बातमी मिळाली की मराठ्यांनी नर्मदा ओलांडली आणि उज्जैनपर्यंत त्यांनी मोठा धुमाकूळ घातला. त्या भागातील अफगाणानीही बंडे उभी केली. ह्या बंडाचा मोड करण्यासाठी बादशहाने झुल्फिकार खानाला तिकडे रवाना केले. बादशहा स्वतः कोंडाण्याला वेढा घालून बसला होता.[१]

सिंहगडाच्या तटबंदीवर तोफांची मारगिरी मोगलांनी केली. पण किल्ला तोफांच्या मारगिरीने हस्तगत होईल असे मोगलांना वाटत नव्हते. तेव्हा तरबियतखानाने मराठा शिबंदीशी वाटाघाटी केल्या. भली मोठी रक्कम किल्लेदारास दिल्यावर किल्ला ८ एप्रिल १७०३ रोजी मोगलांचे ताब्यात आला. त्या किल्ल्याचे नाव बाख्शीदाबख्श (ईश्वरदत्त) असे ठेविले.[२]

बादशहा पुण्यास येतो :

सिंहगड काबीज केल्यावर बादशहा २३ एप्रिलपर्यंत तिथेच राहिला आणि नंतर त्याने पुण्याकडे कूच केले. पुण्यास तो १ मे रोजी आला. तेथे तो ६/८ महिने राहिला. वसंतगड, सातारा, परळी, पन्हाळा, विशाळगड इत्यादी महत्त्वाचे किल्ले हातातून गेले तरी ताराबाई नाउमेद झाल्या नाहीत कारण त्यांना खात्री होती की आपण हे किल्ले मोगलांच्या हातातून हिसकावून घेऊ. मनुची म्हणतो की, मराठे कावेबाज आहेत ; बऱ्याच वेळा मोगलांना ते किल्ले घेऊ देतात ; मोगलांकडून त्या किल्ल्यात साधन सामग्रीची

१ मराठे व औरंगजेब, पृ. ११५, मो. म., पृ. १६४, म.स्वा., पृ. ७७.

२ मराठ्यांचे स्वातंत्र्य युध्द, पृ. ७७-७८.

चांगली व्यवस्था होईपर्यंत थांबतात आणि मग मोगलांनी किल्ला काबीज करताना दाखविलेल्या तत्परतेहून अधिक तत्परतेने तो पुन्हा हस्तगत करतात.[१] बादशहाला मराठ्यांच्या शौर्याच्या गोष्टी कानावर आल्याबरोबर त्याचा भरवशाचा सरदार झुल्फिकार खानला मराठ्यांवर चालून जाण्यास तो आज्ञा करीत असे. अशा आज्ञा त्याने अनेक प्रसंगी झुल्फिकार खानास केल्या आहेत हे वाचकांच्या लक्षात येईल.[२]

झुल्फिकार खान मराठ्यांच्या पाठलागावर असता त्याला कळले की, धनाजी जाधवाच्या मुलाने सुल्तानपूर नंदुरबारला वेढा घातला आहे तेव्हा तो तिकडे निघाला तोच त्यास बातमी मिळाली की मराठे बागलाणच्या वाटेने निघून गेले आहेत. तदनंतर त्यास कळले की धनाजीचा मुलगा बादशाही छावणीकडे निघाला. तेव्हा झुल्फिकार खान मजला मारीत त्याच्या पाठलागावर निघाला आणि शिरवळ या गावी येऊन धनाजीचा मुलगा बादशाही छावणीकडे जाणार नाही अशी व्यवस्था त्याने केली. याच सुमारास शहजादा कामबक्ष याचे मध्यस्थीने मराठ्यांबरोबर तडजोड करण्याचा प्रयत्न मोगलांनी केला त्यास यश आले नाही.[३] ह्यावेळी मराठ्यांचे ४० हजार सैन्य खानदेश भागात पसरल्याचे बादशहास समजले तेव्हा त्यांचा मोड करण्यासाठी झुल्फिकार खान यास आज्ञापिले.

बादशहाची छावणी पुण्यास असताना :

मराठ्यांच्या धामधुमीमुळे बादशाही छावणीत धान्य आणि इतर रसदही येईनाशी झाली. दख्खनमध्ये त्यावर्षी पाऊस पडला नाही. त्यामुळे पिके आली नाहीत. महर्गता एवढी वाढली की लोक आपली घरेदारे सोडून परागंदा झाले. नर्मदेच्या दक्षिणेस रुपयाला सहा शेरपेक्षा धान्य कोठेच मिळेनासे झाले.[४] यावेळी मराठ्यांचा जोर सर्वत्र वाढला. त्यांची आक्रमणे वाढली. त्यांना अडविण्याचे काम कोणाच्याने होईना असे भीमसेन लिहितो.[५]

---

१ स्टोरिया द मोगर, पृ. ३०६.

२ मोगल मराठे पृ. १६५.

३ कित्ता, पृ. १६७.

४ कित्ता.

५ मोगल-मराठे, पृ.१६८.

राजगडला मोगलांचा वेढा :

बादशाही लष्करात धान्याची धारणा रुपयाला दोन शेर अशी झाली. इतकी महर्गता असूनही बादशहा पुण्याच्या छावणीतून निघून तारीख १० नोव्हेंबर रोजी राजगड आणि तोरणा जिंकून घेण्याच्या उद्देशाने रवाना झाला. तो सैन्यासहित राजगड व तोरणा ह्या किल्ल्यांच्या परिसरात दिनांक २८ नोव्हेंबर १७०३ रोजी पोहोचला.[१] राजगड हा अतिशय उंच, त्याची उंची पाहाता तो सर्व किल्ल्यात श्रेष्ठ असे म्हणता येईल. त्याचा घेर बारा कोसांचा आहे. त्याच्या मजबुतीची आणि उंचीची कल्पनाही करवत नाही. या डोंगराच्या दऱ्या खोऱ्यांतून आणि घनघोर अरण्यातून वाऱ्याशिवाय काही फिरकू शकत नाही. येथे पावसालाच फक्त वाट मिळते.

आदिलशाहीकडून शिवाजी महाराजांनी हा किल्ला स्वतःच्या ताब्यात घेतल्यावर महाराजांनी या किल्ल्याच्या भोवती तीन माची बांधिल्या. संजीवनी, पद्मावती आणि सुबेला ह्या माची म्हणजे तीन किल्लेच म्हटले पाहिजे. शिवाजी महाराजांनी भक्कम तटबंदी करून इतरांना हा किल्ला जिंकून घेणे अशक्य करून सोडले. ह्या तटांच्या खाली भयंकर दऱ्या होत्या. आणि अतिशय अवघड अशा वाटा आहेत. बादशहाने आपले सेनापती हमीदुद्दीखान आणि मीर आतिश आणि तरबियतखान यांना किल्ला जिंकून घेण्याची आज्ञा केली. दोन्ही तट जेथे एक होतात त्या स्थळांच्या समोर दोघां सेनापतीनी एका टेकडीवर युद्धास आवश्यक असणारे सामान चढविले. किल्याचा बुरूज तीस गज उंच होता म्हणून उभय सरदारांनी त्या टेकडीवर एक दमदमा (तोफा ठेवण्याची उंच जागा) बांधला. तो किल्ल्याच्या तटाएवढाच उंच झाला.

किल्ल्यांतील लोकांनीही अनेकदा दमदमे बांधले पण त्याचा जास्त उपयोग झाला नाही. मोगलांच्या तोफानी किल्ल्यांच्या तटांची, बुरुजांची आणि किल्ल्यातील इमारतींची बरीच नासाडी केली. मोगल सैनिक बुरूजावर चढले आणि त्यांच्यापैकी काहींनी बुरुजावर ठाण मांडले. किल्ल्यातील लोकांनी तोफा, बंदुकी, बाण आणि दगड धोंडे यांचा वर्षाव केला त्यामुळे मोंगलांचे अनेक लोक ठार झाले.[२] मोगल सैन्याधिकाऱ्यानी

१ मोगल-मराठे, पृ. १६९.

२ कित्ता.

नमते घेतले म्हणून किल्लेदार फिरंगोजी नरसाला आणि हमानजी (हनुमंतजी) यांनी मोगल सेनानी रुहुल्लाखानापाशी तहाची बोलणी करण्यासाठी माणसे पाठविली. बादशहास ही हकिगत कळविण्यात आली तेव्हा बादशहाने संमती दिली व पैसेही दिले. खंडणी घेतल्यावर किल्लेदाराने फेब्रुवारी १७०४ रोजी आपल्या हातांनी मोगलांचा झेंडा किल्ल्यावर चढविला. सेनापतीना बादशहाने बढती व बक्षिसे दिली. किल्ल्याचे नाव नबीशाहगड असे ठेवण्यात आले.[१]

तोरणा काबीज :

राजगडावर बादशहाने एक आठवडा मुक्काम करून २३ फेब्रुवारी १७०४ रोजी तेथून चार कोसांवर असणाऱ्या तोरणा किल्ल्याकडे कूच केले. एक दोन कोसांची मजल मारून बादशहा किल्ल्याच्या पायथ्याशी पोहोचला.[२] तोरण्याचा वेढा चालू झाला. किल्ल्यांतून मराठे बंदुकी व तोफा यांचा मारा करीत. सुलतान हुसेन ह्या मोगली सरदाराने किल्ल्यात रसद नेणाऱ्या ८० मराठ्यांवर हल्ला करून त्यांना कैद केले.[३] मोगल सेनापती अमानुल्लाखानाने शक्कल लढवून ह्या प्रदेशातील किल्ले घेण्यात पटाईत असे मावळे गोळा केले व त्याने त्यांच्या साहाय्याने किल्ला काबीज करण्याचा मनसुबा आखला. ह्या मावळ्यांना बादशहाच्या ८९ व्या वाढदिवशी दिनांक १० मार्च रोजी अमानुल्लाखानाने किल्यावर चढण्यास पाठविले. दोरीच्या साहाय्याने मावळे भराभर किल्ला चढले. त्यांच्यामागून अमानुल्लाखान व त्याचा बंधू अताउल्लाखान हे दोघेही किल्ला चढले. मोगल सैन्यही दोरीच्या साहाय्याने किल्ल्यात उतरले. किल्ल्यातील शिबंदी बेसावध होती. मोगलांनी रणशिग फुंकून शिबंदीशी लढाई सुरू केली. त्याबरोबरच त्यांनी किल्लेदाराशी तहाची बोलणी सुरू केली. मोगलांच्या अटी कबूल करून भरपूर लाच घेऊन किल्ला दिला. मोगलांनी अनेकांना कापून काढले. शेवटी मराठ्यांना हार खावी लागली. बादशाही आज्ञेने त्यांना निःशस्त्र करून किल्ल्याबाहेर जाऊ देण्यात आले. बादशहाने तोरण्याचे नाव फुतूहल्गैब १ (दैवी विजय) असे ठेविले.[४] बादशहाने १५ मार्च रोजी तोरण्याहून कूच केले आणि महिन्यांच्या प्रवासानंतर

१ मराठे व औरंगजेब, पृ. ११६-११९.

२ मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ८६.

३ कित्ता.

४ मराठे व औरंगजेब, पृ. ११८-११९.

तारीख १७ एप्रिल १७०४ पर्यंत तो सिंहगडाखाली येऊन पोहोचला. याठिकाणी त्याचा मुक्काम २१ ऑक्टोबर १७०४ पर्यंत होता. याच दरम्यान मोगलांनी राजमाची आणि लोहगड हे मराठ्यांचे किल्ले लाच देऊन ताब्यात घेतले.

मराठे फौजांची चौफेर भरारी :

बादशहा राजगड मोहिमेत गुंतला असता ताराबाईंनी आपल्या फौजा मोगली मुलखांत चौफेर घुसविल्या होत्या. मराठ्यांची एक फौज विजापूरच्या प्रदेशात ठिकठिकाणच्या मोगल अंमलदारांकडून चौथाई वसूल करीत होती. जे चौथाई देण्यास नकार देत त्यांना मराठे कैद करीत व त्यांचा सर्व प्रदेश लुटून फस्त करीत.[१] यावेळी नेमाजी शिंदे, केसो त्रिमल व परसोजी भोसले हे मराठा सेनानी वऱ्हाडांत धामधूम करीत होते. त्यांनी रुस्तुमखानास कैद करून पन्नास हजार स्वारांच्या फौजेनिशी नर्मदा पार केली आणि अनेक खेडी व शहरे लुटून सिरोंजला वेढा दिला. (जाने.-फेब्रु. १७०४)[२] शिवचरित्र प्रदीप सांगते की, मराठ्यांच्या फौजा काळाबाग (हे ठिकाण सिरोंज ते नरवर या मार्गावर आहे) पसरल्या होत्या. न जाणो मराठे आगऱ्यावरही घसरतील अशी धास्ती बादशहाला वाटली.[३] तेव्हा त्याने औरंगाबादेस असणाऱ्या शहजाद्यास व वऱ्हाडांतील फिरोजजंग यास मराठ्यांचा पाठलाग करून त्यांचा मोड करण्याच्या आज्ञा सोडल्या.[४] मराठ्यांना माळव्यांतून हुसकावून लावण्याएवढी मोठी फौज शहाजाद्याजवळ नव्हती म्हणून मराठ्यांसी सरळ सामना देण्याचे टाळून तो उज्जैनकडे गेला व बादशहाचे बोलावणे आल्यावर आपण आजारी असल्याच्या सबबी-खाली शहाजाद्याने दरबारात येण्याचे टाळले.[५] वऱ्हाडात गाजिउद्दीन मराठ्यांचा पिच्छा करीत होता. माळव्यांतील मराठ्यांचा बीमोड कर अशी त्याला बादशाही आज्ञा झाली तेव्हा तो (गाजिउद्दीन फिरोजजंग) नर्मदा ओलांडून सिरोंजपर्यंत पोहोचला पण त्याने नेमाजीशी युद्ध केले नाही. उलट नेमाजीचा

१ स्टोरिया द मोगर, भाग ३, पृ. ५००.
२ कित्ता भाग ५, पृ. ३१५-२१६.
३ स्टोरिया द मोगर, पृ. ५०९.
४ हिस्टरी ऑफ औरंगजेब, पृ. ३१६.
५ स्टोरिया द मोगर, भाग ३, पृ. ५०९.

युद्ध करून पराभव केल्याचे खोटे वृत्त बादशहाला कळविले. खरी वस्तुस्थिती बादशहाला समजल्यावर फिरोजजंगच्या पदव्या बादशहाने काढून घेतल्या, तेव्हा फिरोजजंगखान वऱ्हाडला परतला.[१] इकडे वऱ्हाडमध्ये रुस्तुमखान याचा पूर्ण पराभव करून मराठ्यांनी त्यास पिटाळून लावले. रुस्तमखानचा मोड केल्यावर पुन्हा मराठे बुंदेलखंडाच्या रोखाने जात असता गाजिउद्दीन फिरोजजंग याने पाठलाग करून त्यांचा पराभव केला. माळव्यांतील गाजिउद्दीनाच्या विजयाची वार्ता तोरण्यास वेढा घालून बसलेल्या बादशहाकडे आली त्याने त्यांना बढत्या दिल्या याच सुमारास उत्तरेकडून दोन कबिले व खजिने आले. बऱ्हाणपुराहून ते औरंगाबादेकडे येत असता फर्दापूर जवळ मराठ्यांनी त्यांना पूर्णपणे लुटले.[२]

धान्याची महर्गता आणि जहागिरीच्या उत्पन्नाचा अभाव यामुळे मोगल सरदार आणि सैनिक यांची दशा शोचनीय झाली. लुटमारीमुळे मराठ्यांचे बळ अतिशय वाढले. मराठ्यांनी हैदराबाद शहरावर आक्रमण केले. धनाजी जाधव, हणमंतराव (निंबाळकर) आणि हिंदुराव (घोरपडे) हे कर्नाटक प्रांतात शिरले. झुल्फिकार खानचा नायब दाऊद खान हा पंच हजारी मन्सबदार होता. त्यांची मराठ्यांबरोबर अनेक युद्धे झाली.[३]

मराठ्यांची काही फौज माळव्यांत धुमाकूळ घालीत असता त्यांची दुसरी फौज हैदराबादेहून पुढे होऊन मच्छलीपट्टणपर्यंत जाऊन पोहोचली (फेब्रुवारी १७०४) या फौजेत बारा हजार घोडदळ आणि दहा हजार पायदळ होते असे मनुची सांगतो. मच्छलीपट्टण जवळच्या पाळाकोळू या ठिकाणावर मराठ्यांनी हल्ला केला व तेथून आजूबाजूच्या प्रदेशात फौज पाठवून चौथाई सक्तीने वसूल केली. तेथील मोगल अंमलदार मराठ्यांना प्रतिकार करू शकले नाहीत. मच्छलीपट्टणांत इंग्रज व डच यांच्या वखारी होत्या. त्यांनी आपल्या वखारीचा व शहराचा बंदोबस्त चांगल्या प्रकारे केला होता. परंतु मराठे त्या शहरावर न घसरताच परत फिरले.[४] तोरणा जिंकून घेतल्यावर

१ मो.म, पृ. १७२.

२ कित्ता, पृ. १७३.

३ कित्ता.

४ स्टोरिया द मोगर, भाग ३, पृ. ५००.

बादशहाचा मुक्काम खेडवर असता मे १७०४ मध्ये मराठे सेनापती धनाजी जाधव, हणमंतराव निंबाळकर व हिंदुराव घोरपडे साठ हजार फौजेनिशी कर्नाटकात शिरले.[१] या मोठ्या फौजेस कर्नाटकातील अनेक पाळेगार व किल्ले शरण गेले. कर्नाटकातील सिरा या प्रमुख शहरी पोहोचल्यावर मराठ्यांनी आपल्या फौजेचे तीन विभाग केले. एक फौज दक्षिणेस गेली व तिने तेथील राजाकडून तीस लाख खंडणी वसूल केली. त्रिचनापल्लीकडून व त्या राज्याच्या आसपासच्या प्रदेशातून त्यांनी बरीच रक्कम गोळा केली. यावेळी कर्नाटकात मोगलांचा मातब्बर सरदार दाऊदखान फौजेसह होता. त्याने मराठ्यांस खंडणी देऊन तह करण्यासाठी माणसे पाठविली तेव्हा त्या माणसांना मराठ्यांनी परत पाठविले. तेव्हा खानाने अर्काट सोडून वेलोरच्या किल्ल्यात स्वतःला कोंडून घेतले.[२] मराठ्यांनी कर्नाटकातून निघून जावे म्हणून दाऊद खानाने त्यास पाच लाख रुपये दिले. मराठ्यांनी ती रकम घेतली पण ते अदोनी व सिरा यांच्या आसपासचा प्रदेश लुटीत बराच काळ रेंगाळत राहिले. बादशहाला यावेळी महाराष्ट्रात मराठ्यांनी हैराण करून सोडल्यामुळे तो दाऊदखानास ऐन वेळी कुमक पाठवू शकला नाही.[३] खान अदोनीकडे जात असता मराठ्यांनी त्यास सर्व बाजूंनी घेरले असता खानाने चपळाईने श्वरमवरम किल्ल्याचा आश्रय घेऊन मोर्चे बांधून आपल्या फौजेचे रक्षण केले. शेवटी खानाकडून ७ लाख रुपये दंड घेऊन त्यांनी दुसरीकडे कूच केले.[४]

औरंगजेब वाकिण खेड्याकडे :

उत्तर कर्नाटकात बेरडांच्या लढावू जमातीने मोगलांविरुद्ध सारखी बंडे चालविली होती. बेरड आणि मराठे यांची युती झाली होती. बेरड बंदुकीच्या नेमबाजीत निष्णात असत. संताजी, बहिर्जी, हिंदुराव, राणोजी या घोरपड्यांच्या सैन्यात ते बर्कंदाज म्हणून सामील असत. त्यांचे मुख्य ठाणे कृष्णा भीमा संगमापाशी गुलबर्गा जिल्ह्यात वाकिण खेडा येथे होते. त्यांचा बंडावा वाढत वाढत शेवटी विजापूर त्यांच्या हाती पडते की काय अशी धास्ती निर्माण

१ स्टोरिया द मोगर, भा. ३, पृ. ५०३.

२ कित्ता, भाग ३, पृ. ५०३-५०४, राजाराम रियासत, पृ. १७३.

३ कित्ता, पृ. ५०९.

४ स्टोरिया द मोगर, भाग ३, पृ. ५९, बेंद्रे, छत्रपती राजाराम, पृ. ३८३३८४.

झाली. मराठ्यांचे बेरडांशी सूत जमले होते. अनेक मराठा सरदारांचे कबिले सुरक्षिततेसाठी म्हणून वाकिण खेड्यात ठेवण्यात आले होते. यापूर्वी दिलेरखान, रुहुल्लाखान, रणमस्तखान, कामबक्ष, फिरोजजंग इत्यादींनी बेरडांचा मोड करण्याचे प्रयत्न केले होते. पण त्यात त्यांना यश आले नाही. यावेळी औरंगजेबाने स्वतः वाकिणखेडा जिंकून घेऊन बेडरांना जिंकून घेण्याचे ठरविले होते. २२ ऑक्टोबर १७०४ रोजी त्याने खेडहून वाकिण खेड्याकडे कूच केले.

बादशहाने ५ फेब्रुवारी १७०४ ला वाकिण खेड्यापासून एक कोसावर आपला तळ दिला. विजापूरचा सुभेदार आणि गाजिउद्दीन फिरोजजंग याचा मुलगा चीन किलीचखान (निजाम उल्मुल्क) हमीदुद्दीनखान बहादूर, तरबियतखान बहादूर, मीर आतिश (तोफखान्याचा अधिकारी) महमद अमीरखान बहादूर सदरूसुदूर (मुख्य न्यायाधीश) मतलबखान आणि इतर सरदार यांना बादशहाने किल्ल्यांच्या भोवती मोर्चे बांधण्याची आज्ञा केली. सरदारांनी किल्ल्यांच्यासमोर मोर्चे तयार केले. मोगल मोर्चे पुढे सरकविण्याच्या प्रयत्नाला लागले. त्यावेळी असंख्य बेरड टेकडीवर पोहोचले. त्यांनी मोगलांवर बंदुकीचा असा काही मारा केला की त्यांच्या माऱ्यापुढे मोगल सैन्य जेरीस आले. टेकडीवर जे मोगल सरदार चढले होते त्याना बेरडांनी हाकलून लावले, बेरडांच्या माऱ्यापुढे मोगल सैन्य जेरीस आले.[१] इतक्यात धनाजी जाधव आणि हिंदूराव हे ५ हजार स्वार, २० हजार बेडर पायदळ घेऊन पोहोचले आणि त्यांनी भयंकर धुमाकूळ घातला. मराठ्यांनी एकीकडे मोगलांना युद्धात गुंतवून ठेविले आणि दुसरीकडे त्यांनी किल्ल्याच्या दुसऱ्याबाजूने आपले कबिले काढून नेले, मराठ्यांनी बेरडांना सल्ला दिला की, तुमच्या आणि आमच्या सर्व सामग्री सरंजामा निशी आपण बादशहा समोर टिकू शकत नाही.

औरंगजेबाच्या ठाण्याभोवती भक्कम भिंत उभी करण्यात आली होती पण किल्ल्यातील सैन्य रोज रात्री बाहेर पडे आणि बाण व बंदुका यांचा छावणीवर वर्षाव करी. छावणीच्या बाहेर पाऊल टाकण्याची एकाही मोगल सैनिकास हिंमत होईना. धान्य आणि चाराही अतिशय महाग झाला.

१ मोगल व मराठे, पृ. १७४-१७५.

बेरडांनीही तहाच्या गोष्टी सुरू करून मोगलांना झुलवीत ठेविले. मोगल सैन्याची दुर्दशा होत असलेली पाहून औरंगजेबाने झुल्फिकार खानास तातडीने बोलावून घेतले. तो २७ मार्च १७०५ रोजी बादशहापाशी येऊन रुजू झाला. दाऊदखान पन्नी याला तामिळनाडूहून बोलावण्यात आले, तोही छावणीत येऊन दाखल झाला.[१] इकडे हणमंतराव निंबाळकर बेरडांना येऊन मिळण्यासाठी म्हणून रवाना झाला पण वाटेतच त्याचा मृत्यू झाला.

जुल्फिकारखान आल्यावर मोगलांनी निकराचा हल्ला करून २७ एप्रिल १७०५ रोजी वाकिण खेड्याचा किल्ला जिंकून घेतला. यानंतर औरंगजेबाने जवळच असलेल्या देवापूर या मुक्कामी छावणी केली. तेथे तो भयंकर आजारी पडला. त्यातून कसाबसा बरा होऊन २३ ऑक्टोबर १७०५ रोजी तो बहादुरगडास पोहोचला. रमजानचा उपासाचा एक महिना तिथे घालवून तो अहमदनगरास रवाना झाला. २० जानेवारी १७०६ रोजी तो अहमदनगरास पोहोचला[२]

कोपलचा किल्ला मोगलांच्या ताब्यांत राहिला हे राणी ताराबाईस समजल्यावर तिने नरहरी रूद्र या सरदारास कोपल किल्ला मोगलांकडून घेण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे नरहरी रूद्र याने लष्कराचा जमाव करून कोपल किल्ला मोगलांकडून घेतला.[३]

१७०५ सालाच्या प्रारंभी धावजी विसार आणि चाफाजी शिंदे या दोन मराठे सेनानीनी लोहगड किल्ला माळ लावून काबीज केला.[४] हे ताराबाईंना कळताच त्यांनी धावजी विसाराव यास जानेवारी १७०५ ला शाबासकीचे पत्र लिहिले. "तुम्ही चांगली मेहनत करून लोहगड हस्तगत केला हे काम थोरच केले तुमचे सेवेचा मुजरा जाहला."

१ शि. च सा. खंड ६, पृ. २८-२९.

२ कित्ता.

३ भा.इ.सं.मं. त्रै. वर्ष ६, अंक क्र. १-४, पृ. ८७-८८.

४ सनदापत्रे प.नं. ४३, पृ. १९२.

मराठे सिंहगड घेतात :

१७०५ एप्रिल महिन्यात त्र्यंबक शिवदेव, पंताजी शिवदेव आणि रामजी फाटक यांनी सिंहगडावर हल्ला केला आणि तेथील मोगल शिबंदीचा पराभव करून तो किल्ला आपल्या ताब्यात आणला. गडाचा मोगल किल्लेदार देवीसिंग यास कैद केले.[१] हे ताराबाईंना समजताच त्यांनी २९ एप्रिल १७०५ रोजी रामजी फाटक यास पत्र लिहिले, " तुमच्या सेवेचा मुजरा जाहला. तुम्ही मर्दानी सेवक आहात या उपरीही आपण स्वामी कार्य करीत जाणे म्हणजे कुलास उर्जीत होईल."[१] जून १७०५ मध्ये मराठा सरदार गुणाजी सावंत याने राजमाची किल्ला मोगलांकडून जिंकून घेतला म्हणून ताराबाईंनी त्यास पत्र लिहून त्याच्या पराक्रमाचेही कौतुक केले.[२]

बादशहा बहादूरगड मुक्कामी असताना औरंगजेबाचा एक अधिकारी सियादत्त खान हा शिकारीसाठी म्हणून छावणीच्या बाहेर गेला होता. मराठे त्याच्यावर तुटून पडले. प्रहरभर लढाई होऊन सियादत खान हा मराठ्यांच्या कैदेत सापडला. खंडणी भरून त्यास आपली सुटका करून घ्यावी लागली. लढाईत जखमी होऊन तो कायमचा आंधळा बनला. बहादूर गडाहून बादशहाने नगरास जाण्यास दिनांक १४ जानेवारी १७०६ रोजी प्रयाण केले व तो २० जानेवारीस अहमदनगरास पोहचला. या ६ दिवसाच्या प्रवासात मराठ्यांनी बादशही सैन्यावर धाडशी हल्ले केले व अनेक मोगलांना मारले आणि अनेकांना धरून नेले. औरंगजेब बादशहा सिंहासनवजा उघड्या पालखीतून[३] जात असताना त्यांना दिसला. बादशहाबद्दल आदराची भावना म्हणून मराठे लांबून त्याला पाहत होते. मराठे असे वागले हे बादशहाचे भाग्यच म्हटले पाहिजे.[४]

बादशहाने झुल्फिकार खान यास कोंडाणा जिंकून घेण्यासाठी पाठविले. त्याने कोंडाण्याला वेढा घातला. त्याने किल्ल्यातील लोकांवर कठीण प्रसंग

१ हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. १९२.

२ पिसुर्लेकर, पृ. १३१-२३९.

३ कित्ता.

४ मराठे व औरंगजेब पृ. २६७.

आणला त्यामुळे किल्ल्यातील लोकांनी रामसिंग लाल यांच्या मध्यस्तीने वाटाघाटी केल्या व त्यांना सुरक्षितपणे किल्ल्यातून जाऊ दिले. कोंडाणा किल्ला मोगलांचे हाती आला. मराठे खानदेश व गुजरात या भागात तेथील मोगल फौजदारांशी लढत होते. गुजरातेत नजरअलीखान हा सुभेदार फौजदार होता. तो सैन्य घेऊन मराठ्यांशी लढण्यासाठी म्हणून आला. ४ मार्च १७०६ ला त्याचा पराजय होऊन तो आणि इतर मोगल अधिकारी मराठ्यांच्या हाती सापडले.[१]

इ. स. १७०६ मध्ये मराठ्यांनी वसंतगड जिंकून घेतला. राजगडचा किल्लाही मराठ्यांनी परत जिंकून घेतला.[२]

सेनापती धनाजी जाधव रतनपुरची लढाई जिंकतो (४ मार्च १७०६) :

मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धात सेनापती संताजी घोरपडे यांनी कर्नाटकातील दिंडोरी येथील मोगलांविरुद्धची लढाई जिंकली होती. संताजी घोरपडेच्या मृत्यूनंतर धनाजी जाधव सेनापती झाला. मराठा सैन्याचे नेतृत्व त्याजकडे आले. त्याने १६९८ पासून १७०७ पर्यंत वायू वेगाने मोगल सैन्याविरुद्ध धावून त्यांना सळो की पळो करून सोडले. त्याने मराठा फौजेस माळवा व गुजरात या प्रदेशात आक्रमण करण्यास प्रोत्साहन दिले. गुजरातेवरील आक्रमणाचे नेतृत्व धनाजीने आपल्याकडे ठेविले. राजारामकाळी मराठी राज मंडळाने वतनदारांना आपल्याकडे ओढून त्यांना राष्ट्रकार्यास लावण्याचा जो यशस्वी प्रयत्न केला त्याची राणी ताराबाईने री ओढली आणि मराठ्यांना गडकोट आणि देश गनिमापासून सोडविण्याचे आदेश दिले.

इ. स. १७०१ पासून १७०५ अखेरपर्यंत औरंगजेबाचा मुलगा शहजादा आज्जम हा गुजरातेचा सुभेदार होता. त्याच्या विनंतीवरून बादशहाने त्याची बदली केली आणि त्याजागी गुजरातचा दिवाण ख्वाजा अब्दुल हमीदखान यास सुभेदारी दिली. ख्वाजा अब्दुल हमीदखान हा अहमदाबाद सुभ्याचा हंगामी सुभेदार म्हणून डिसेंबर १७०५ पासून काम पाहू लागला. त्यावेळी मराठा सेनानी धनाजी जाधव याने गुजरातेत शिरून मोगल मुलुखात

१ मोगल व मराठे, पृ. १८३.

२ भा.इ.सं.मं.त्रै. वर्ष ६, पृ. ८८.

चहूकडे धामधूम उडवून दिली. त्याला काढून लावण्यासाठी मोगल सुभेदार आणि फौजदार यांना औरंगजेबाने हुकुम दिले होते ते असे, "मराठ्यांनी आक्रमणे केली आणि धामधूम सुरू केली तर सर्व अधिकाऱ्यांनी एक होऊन राजमार्गाचे संरक्षण करावे आणि मराठ्यांना काढून लावण्यांच्या कामात झटावे." या आज्ञेस अनुसरून जेव्हा जेव्हा मराठ्यांच्या आक्रमणाच्या बातम्या मोगल अधिकाऱ्यास लागल्या तेव्हा तेव्हा ते एक होऊन नर्मदेच्या बाबापिराया उतारावर तातडीने जाऊन पोहचले.[१]

मराठ्यांनी गुजरातेत प्रवेश केल्याची बातमी अहमदाबादेस नायब सुभेदार ख्वाजा अब्दुल्हमीदखान यास कळली. तेव्हा उताविळपणे मराठ्यांविरुद्धच्या मोहिमेस त्याने पुढील अधिकारी नेमले. (१) नजर अलीखान (२) सफरखान बाबी जुनागड (३) इल्तिफा खान (४) सय्यद इद्रिस खान (नाडियाचा फौजदार) (५) महमद बेग खानाचा मुलगा अलि मर्दान, इतर सरदार, मनसबदार यांना आज्ञा करण्यात आली की त्यांनी सुरतपर्यंत पोहोचून मराठ्यांचा प्रतिकार करावा. याप्रमाणे वर उल्लेखिलेले सरदार रवाना झाले. त्यांनी नर्मदेच्या बाबापिराया उतारावर आपला तळ दिला. त्यांना मराठे गुजरातेत येऊन त्यांनी सुरतेच्या बाजूला तळ दिल्याचे समजले. ही बातमी अब्दुल्हमीद खानास कळविण्यात आली. त्याने घाई-घाईने फौजेची जमवाजमव केली. फौजदार ठाणेदारांना बोलावणे पाठविले. नर्मदेच्या काठावर मजा मारीत रेंगाळत राहिलेल्यांना त्यांनी मराठे आले असता काहीच केले नाही असा टोमणा दिला. मराठ्यांचे सैन्यबळ किती आहे ह्याचा विचार न करता जितके काही जमले तितके सैन्य आणि सरंजाम घेऊन तो बाहेर पडला. सुरतेच्या अधिकाऱ्यांपाशी भरपूर सैन्य नव्हते. सरदारांनी अब्दुल्हमीद खानाची वाट न पहाता त्यांनी नर्मदा ओलांडून पलीकडच्या तीरावर तळ दिला. दुसऱ्या दिवशी सकाळी ते सातकोस पुढे चालून गेले. नर्मदेच्या काठावर रतनपूर (भडोचच्या पूर्वेस १४ मैलांवर) हे गाव आहे तिथे आपली छावणी कायम केली. प्रत्येकाने आपल्याला योग्य वाटेल त्या जागेवर तंबू ठोकला.[२]

---

१ मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ८३.

२ मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पृ. ८३-८४.

इकडे मराठ्यांस समजले की मोगलांचे सैन्य संख्येने थोडे आहे त्यात दम नाही. मोगल सैन्यास मराठ्यांच्या आघाडीची पथके दिसली म्हणून त्यांनी स्वार होऊन ते मराठ्यांवर चालून गेले. मराठ्यांनी आपली आघाडीची पथके मैदानातून मागे घेतली तेव्हा मोगलांस वाटले की आपला जय झाला. त्यानंतर ते आपल्या तळावर येऊन स्वयंपाकपाणी करण्यात गढून गेले. इतक्यात मराठ्यांचे प्रचंड सैन्य चालून येत असल्याचे दिसले. मराठे प्रथम मोगल सरदार सफरखान बाबी याच्या तळावर चालून गेले व तळाभोवती कडे घातले. मोठी झुंज झाली त्यात त्याचा मुलगा महमद उस्मान आणि इतर अनेकजण मारले गेले. स्वतः सफरखान यास भयंकर जखमा झाल्या. तो जमिनीवर कोसळला. मराठ्यांनी त्यास कैद करून त्याचा सगळा सरंजाम लुटला.[१] नंतर मराठे मोगल सरदार पुरदिल शेरांनी याच्या तळावर तुटून पडले. मोठी निकराची लढाई झाली. काही लोक मारले गेले. महंमद पुरदिल हा नदीत उडी घेऊन पळाला. मोगल घाबरून गेले होते. त्यांच्यापैकी ज्यांना शक्य झाले ते पळून गेले. काहीजण मराठ्यांच्या तावडीत सापडले. नजर अलीखान आणि त्याचे सैनिक यांनी मराठ्यांशी लढण्याची तयारी केली. दुसऱ्या दिवशी पहाटेस मराठे प्रचंड संख्येने मोगलावर तुटून पडले. प्रचंड संख्येच्या मराठ्यांशी लढून आपण जीव गमावण्यात अर्थ नाही हे मोगलांस कळून चुकले, इतक्यात मराठ्यांनी त्यास शरण येण्यास निरोप पाठविला तेव्हा नजर अलीखान आणि त्याचे सहकारी हे मराठ्यांपाशी गेले. त्यांनी त्यांना आपल्या ताब्यात घेतले व सन्मानाने वागविले.[२]

अब्दुल्हमीद खानाच्या हालचाली :

मराठ्यांना अब्दुल्हमीद खानाच्या हालचाली ठावूक झाल्या. अब्दुल्हमीद खान मोगल सरदार व अधिकारी यांना घेऊन बाबापियाराच्या उतारावर पोहोचला. त्याचवेळी मराठे रातोरात बाबापियारा उताराजवळ नर्मदा पार झाले. त्यांनी अब्दुल्हमीद खानाच्या छावणीवर रात्रीच हल्ला केला. मोगलांच्या सैन्यांत एकच हाहाकार उडाला. अनेक लोक जीव घेऊन पळत सुटले. पहाटेस मराठे-मोगल यांचे युद्ध जुंपले. मराठ्यांनी मोगल सैन्यांवर

१ मराठ्यांचे स्वांतत्र्ययुद्ध, पृ. ८५.

२ कित्ता.

चहूकडून हल्ले करून एकच गोंधळ उडवून दिला. मोगल सेनानी महमद शेर जखमी झाला आणि पडला. त्याला महमद अश्रफने बरोबर घेऊन तो अहमदाबादेत दाखल झाला. ख्वाजा अब्दुल्हमीद खान आणि त्याचे सहकारी मैदानांत लढत राहिले. त्यांना मराठ्यांनी कैद केले व मोगलांचा सरंजाम पूर्णपणे लुटला. मराठ्यांनी तेथेच काही दिवस मुक्काम करून आसपासच्या प्रदेशातून खंडणी वसूल करण्यास सुरुवात केली.[१]

गुजरातच्या सुभ्यात विलक्षण गोंधळ उडाला. दंगेधोपे सुरू झाले. अब्दुल्हमीद खानाच्या पराभवाची बातमी अहमदाबादेस आली. इकडे मराठ्यांनी कैद केलेल्या मोंगल अधिकाऱ्यांशी चौकशी करून प्रत्येकांवर सुटकेची खंडणी लादली. अब्दुल्हमीद खान आणि नजर अलीखान हे दोघे मातबर सरदार होते. मराठ्यांनी अब्दुल्हमीद ख्वाजावर तीन लाख खंडणी लादली. ही रक्कम बरीच होती. आपल्याजवळील सर्व संपत्ती सोने, चांदी ही सर्व एकत्र करून मराठ्यांकडे पाठविण्यात आली पण तीन लाखांची भरपाई काही होऊ शकली नाही. जमलेली संपत्ती घेऊन मराठ्यांनी त्यास सोडून दिले.[२]

शहजादा बेदारबक्तची नेमणूक बादशहाने अहमदाबाद सुभ्यावर केली. तो एक जुलै १७०६ रोजी अहमदाबादेस पोहोचला. मराठ्यांना त्याच्या येण्याची बातमी लागली. पावसाळाही जवळ आला होता. म्हणून मराठ्यांनी जवळपासच्या इलाख्यांतून खंडणी गोळा केली आणि ते दक्षिणेकडे परत गेले.[३] औरंगजेब हा अहमदनगरास राहिला होता. मराठे सरदार धनाजी जाधव, नेमाजी शिंदे, दादो मल्हार, संताजी भोसले, संभाजी निंबाळकर हे सर्व एकत्र होऊन बादशाही छावणीवर शाहूस कैदेतून सोडवून आणण्यासाठी चाल करून आले. पण त्यांचा बेत सिद्धीस गेला नाही. यावेळी त्यांना खाने आलम ह्या मोंगल मन्सबदाराने आपल्याकडील कसलेल्या फौजेच्या मदतीने मागे हटविले.[४]

१ हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. २८७.

२ हिस्टरी ऑफ गुजरात, पृ. १६१-१६२.

३ हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पृ. २८८.

४ मोगल व मराठे, पृ. १८५.

इ.स. १७०६ च्या पावसाळ्यात झुल्फिकार खान हा मिरजेपासून १२ कोसांवर मुक्काम करून राहिला. धान्याची भयंकर टंचाई भासली. सैन्याची अतिशय दुर्दशा झाली. पावसाळा संपल्यावर धनाजी जाधवाने बादशाही मुलखांवर आक्रमणे करण्याचा बेत केला. झुल्फिकार खान त्याचा पाठलाग करीत निघाला. मग मराठे विजापूर प्रांतात शिरले. झुल्फिकार खानाने त्याचा पाठलाग कृष्णा नदीच्या काठापर्यंत केला.[१] यावेळी बादशाही खजीना, घोडे, उंट इत्यादी प्रचंड सामग्री औरंगाबादेहून बादशाहाची जेथे छावणी होती त्या अहमदनगरास जाण्यास निघाली. मराठ्यांस ही बातमी समजताच त्यांनी नगरपासून १२ कोसांवर असणाऱ्या पांदा या ठिकाणी धाड घातली आणि ती पूर्णतया लुटून घेतली.[२] अहमदनगरी बादशहा आपल्या मृत्यूपूर्वीचे दिवस मोजीत होता. त्यावेळी मनुची हा तत्कालीन परिस्थितीचे हुबेहुब चित्र रेखाटतो. तो म्हणतो, "मराठ्यांशी युद्ध करण्यात आपली चूक झाली असे वाटून औरंगजेबास पश्चात्ताप होत आहे. कारण त्याच्या कल्पनेप्रमाणे त्याला या युद्धात यश आले नाही. दक्षिणेत जो काही प्रदेश जिंकला होता, तो कब्जात ठेवण्यासाठी त्याला दक्षिणेत राहणे आवश्यक झाले होते. ही मोहीम पुढे चालू ठेवील असा त्याच्या पुत्रात कुणी नाही. आता मराठ्यांच्या फौजा बादशाही साम्राज्यांत सर्व दिशांना धुमाकूळ घालून लुटालूट करत आहेत. मराठ्यांचे सामर्थ्य आणि धाडस इतके वाढले की त्यांनी आपले लष्कर दिल्लीपर्यंत घुसविले आणि ते जिथे गेले तेथे त्यांनी लुटालूट केली. याचवेळी त्यांनी गोवळकोंड्याचीही लूट केली अशाप्रकारे प्रति दिवशी ते आपल्या वाढत्या सामर्थ्याचे मोगली साम्राज्याच्या प्रत्येक सुभ्यांत प्रदर्शन करीत असतात."[३]

इ. स. १७०७ औरंगजेबाच्या आयुष्याची ८८ वर्षे पूर्ण झाली होती. त्यापैकी २६ वर्षे मराठ्यांशी झगडण्यात गेली. त्याने मराठ्यांचे किल्ले जिंकून घेण्यास जिवापाड मेहनत घेतली. तसेच मराठ्यांनी ते परत जिंकून घेतलेले त्यास पहावे लागले. मराठे दक्षिणभर तर पसरले होतेच आता ते गुजरात आणि माळवा या प्रांतावर धाडशी आक्रमणे करू लागले होते.

---

१ मोगल व मराठे ,पृ. १८५.

२ पृ. १८६.

३ स्टोरिया द मोगर भाग ४, पृ. २७४.

मोगलांचा राज्यकारभार मोडकळीस आला होता. आपल्या डोळ्यांसमोर रक्तपात होऊ नये म्हणून त्याने कामबक्ष याची विजापूरच्या सुभ्यावर नेमणूक केली. तो ९ फेब्रुवारी रोजी छावणीतून विजापुरी जाण्यास रवाना झाला. नंतर ४ दिवसांनी १३ फेब्रुवारीस शहाजादा अज्जम याची माळव्याच्या सुभेदारीवर रवानगी करण्यात आली. यानंतर ४ दिवसांनी औरंगजेब आजारी पडला. तीन दिवसांच्या आजारानंतर २० फेब्रुवारी १७०७ रोजी त्याचा मृत्यू झाला.[१]

औरंगजेबाच्या पश्चात मराठे व मोगल :

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर एक-दोन महिन्यांच्या आत मराठ्यांनी मोगलांकडून सिंहगड, पुरंदर, पन्हाळगड, विशाळगड, सातारा, परळी हे किल्ले घेतले. विशाळगडचा किल्लेदार अवधूतसिंग (ओरजाचा राजा) सातारा आणि परळी येथील किल्लेदार रामचंद्र बुंदेला (रावदलपत बुंदेला याचा मुलगा), पन्हाळगडचा किल्लेदार रावतमल झाला यांनी आपले किल्ले मराठ्यांच्या स्वाधीन केले आणि ते उत्तरेकडे रवाना झाले. सिंहगड शंकराजी नारायण सचिव यांनी घेतला. पुरंदरचा किल्ला पुण्याचे शितोळे देशमुख यांच्या प्रयत्नाने त्यांच्या हाती आला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शहजादा आज्जम हा तडक अहमदनगरला आला. त्याने स्वतःला बादशहा म्हणून जाहीर केले आणि सगळे सैन्य बरोबर घेऊन तो उत्तरेकडे रवाना झाला. हंडीयापाशी आज्जमने नदी ओलांडली आणि तो दोराहाच्या सरहद्दीत दाखल झाला. शिवाजीचा नातू राजा शाहू याजबरोबर झुल्फिकार खानाचे खास आणि घनिष्ठ संबंध होते. पूर्वीपासून तो शाहूच्या सर्व कारभारांकडे आस्थापूर्वक लक्ष देत असे. झुल्फिकार खानाने अज्जमशहाला विनंती करून शाहू व त्यांचे सोबती यांना मुक्त करविले (८ मे १७०७) शाहूच्या बरोबर पन्नास-साठ माणसे होती त्यांना घेऊन शाहूराजा मोहनसिंगाकडे गेला. सरकार बीजागड, सुलतानपूर आणि नंदुरबार या परगण्यांमधील डोंगराळ आणि दुर्गम प्रदेशांत मोहनसिंगाचे ठाणे होते. मोहनसिंगाने शाहूचा सरंजाम, माणसे इत्यादी बाबतीत शाहूची सोय लावून दिली. तसेच अमृतराव कदमबांडे नावाजलेला

१ मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध, पृ. १०९.

एक मोठा मराठा सरदार होता. त्याने शाहूला फौजफाटा दिला आणि त्याला त्याचे देशी रवाना केले. मराठ्यांचे काही सरदार शाहू महाराजांस येऊन मिळाले. त्यावेळी त्याच्याजवळ २० हजारांची जय्यत फौज तयार झाली ती घेऊन तो औरंगाबादेहून आपल्या देशाकडे रवाना झाला.

औरंगजेबाच्या मृत्यू बरोबरच मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध संपले. मराठ्यांचे स्वराज्य नष्ट करण्याची भाषा यापुढे मोगलांनी काढली नाही. यानंतरच्या काळात मोगल आणि मराठे यांची युद्धे झाली त्यावेळी मराठे, गुजरात, माळवा, बुंदेलखंड, ओरिसा इत्यादी मोगल साम्राजाचे भाग जिंकून घेण्यात गुंतले होते. दक्षिणेत निजामाला काबूत आणण्याचा प्रयत्न करीत होते. दिल्लीच्या राजकरणांत प्रभाव गाजवू लागले होते. त्यातून उद्‌भवलेल्या मोगल-मराठा संघर्षाचे स्वरूप हे मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धापेक्षा भिन्न होते. औरंगजेबाच्या काळात मोगलांनी प्रचंड सैन्यानिशी हिंदवी स्वराज्यावर आक्रमण करून मराठ्यांचे राज्यच नष्ट करण्याचा चंग बांधला होता. इ. स. १६८० पासून १७०७ पर्यंत मराठ्यांनी निकाराची झुंज देऊन मोगलांना माघार घेण्यास लावली. मोगलांचे मुख्य सैन्य एकेका किल्ल्यासमोर अडकून पडू लागले तशी सारी दक्षिण मराठ्यांना मोकळी झाली. हजारोंच्या संख्येने मराठे विदर्भ, खानदेश, माळवा, गुजरात या प्रांतात पसरले त्यांचा पाठलाग करण्यास लागणारे मनुष्यबळ मोगलांपाशी नव्हते. मोगल प्रांताचे सुभेदार चौथ व सरदेशमुखी या नावाखाली ते मराठ्यांना खंडणी देऊ लागले. अशा रीतीने मोगल साम्राज्य क्षीण होत गेले. आणि औरंगजेबाच्या मृत्यूनंतर ५० वर्षांच्या आत मराठ्यांच्या ताब्यात भारताचा बव्हंश भाग आला.

□□

५०. शिवकालीन स्वराज्याचा मुलकी कारभार

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात " हिंदवी स्वराज्य स्थापून नूतन सृष्टीच निर्माण केली " ह्या नूतन स्वराज्याचा मुलकी कारभार पाहू :—

महाराजांचे राज्य हे विजापूरच्या आदिलशाहीचे लचके तोडूनच निर्माण झाले. विजापूरचे राज्य चोवीस जिल्ह्यांत विभागले होते. महाराजांच्या मृत्यूच्यावेळी यापैकी बारा जिल्हे मराठी राज्यांत समाविष्ट झाले होते. मोंगलांचा एकच जिल्हा बागलाण हा मराठी राज्यात आला होता.

महाराजांच्या दक्षिण दिग्विजयानंतर हिंदवी स्वराज्यांत पुढीलप्रमाणे मुलुख होता :—

(१) रामनगरच्या राज्यापासून ते बेदनूरच्या राज्यापर्यंत सागरी किनाऱ्यावर शिवाजी महाराजांची सत्ता असून त्या प्रदेशांत त्यांनी अनेक मोक्याच्या जागी तटबंदी केली होती. ह्या किनारपट्टींत इंग्रजांची मुंबई, सिद्दीचा जंजिरा, पोर्तुगिजांचा गोवा ही ठिकाणे मोडत नव्हती, (२) देशावरील पुढील प्रदेश स्वराज्यांत मोडत होते—नाशिक, बागलाण, कल्याण, कुलाबा, पुणे, सातारा, कोल्हापूर, बेळगाव-धारवाडपर्यंतचा प्रदेश, (३) म्हैसूरच्या पठारांवरील पुढील प्रदेश स्वराज्यांत होते—गदग, चितळदुर्ग, बाळापूर (तामिळनाडू) वेलोर, जिंजी, आरणी, पोर्टोनोव्हो, चेगापट्टम्, पाँडेचरी, तंजावरचा काही भाग. या हिंदवी स्वराज्याचे महाराजांनी चार विभाग पाडले होते. पहिला विभाग उत्तर कोकण व साल्हेर ते पुणे पर्यंतचा प्रदेश, यावर मोरोपंत पेशव्यांची नेमणूक केली होती. दुसरा विभाग पुणे व धारवाड-कोपल प्रदेश, यावर दत्ताजीपंत वाकेनीस यांची नेमणूक केली होती. तिसरा विभाग दक्षिण व कारवार बेदनूरपर्यंतची किनारपट्टी, यावर अण्णाजी दत्तोजीची नेमणूक केली होती, चौथा विभाग म्हैसूर व तामिळनाडूतील प्रदेश, त्यावर जनार्दनपंत हणमंते यांची नेमणूक केली होती.

वरील चार विभागांचे अधिकारी यांना सरसुभेदार किंवा सरकारकून म्हणत असत. या चार विभागांचे राज्यकारभारांचे सोईसाठी चौदा विभाग पाडले होते, त्याला प्रांत म्हणत. या प्रत्येक प्रांताचा अधिकारी सुभेदार असे. महाराजांचे राज्यकारभारांत सुभेदारांच्या नेमणुका इ. स. १६५७ नंतर झाल्या. राज्याभिषेकानंतर या शब्दाचे उच्चाटन होऊन राज्यव्यवहार कोषात सांगितल्याप्रमाणे देशाधिकारी [१] हा शब्द सुभेदाराचे जागी आला.

स्वराज्यातील प्रांताची विभागणी महालात केली होती आणि प्रत्येक महालावर हवालदार म्हणून अधिकारी होता. देशमुख, देशपांडे हे परगणा अधिकारी होते. अनेक गावांचा परगणा व अनेक परगण्यांचा महाल बनविला होता. प्रत्येक गावाला पाटील आणि कुळकर्णी होते. ते गाव आणि परगणा यांचा कारभार चालविण्यासाठी शासनाला मदत करीत असत.

श्रीशिव छत्रपतींची राज्ययंत्रणा—शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकासाठी जो कानूजाबता[२] घालून दिला होता तो आज उपलब्ध आहे. कानूजाबता म्हणजे राज्यव्यवस्था सुसूत्र राखली जावी म्हणून निरनिराळ्या दर्जाच्या व खात्याच्या अधिकाऱ्यांवर त्यांच्या कामाचे अधिकारांवर नियंत्रण घालून देणारा तक्ता. या कानूजाबत्याप्रमाणे महाराजांनी अष्टप्रधानांची नेमणूक केली व त्यांच्या कार्याची निश्चिती केली. कारभारातील नवीन व्यवस्थेतील प्रधानांची नावे व हुद्दे असे :---

(१) मुख्यप्रधान . . (पेशवे) मोरोपंत पिंगळे.

(२) अमात्य . . (मुजूमदार) महसूलमंत्री नारो निलकंठ व रामचंद्र नीलकंठ.

(३) सेनापती . . सेनाप्रमुख--सरनौबत हंबीरराव मोहिते.

(४) सचिव . . (सुरनीस) राज्यपत्रव्यवहार मुख्य- अण्णाजी दत्तो.

---

१ राज्य व्यवहार कोश, शिवचरित्र प्रदीप, पृ. १५९.

२ कानूजाबता---राज्य कारभाराविषयी माहिती सांगणाऱ्या कागदास कानू जाबता असे म्हणतात. हा कानू-जाबता 'सनदापत्रे' (इ. स. १९१३), पृ. १२२-१२४ व का. पे. इ. सं. पत्रे यादी (३ स. १९३०) ले. २ या दोन ग्रथांत मिळून दोनदा आला आहे.

(५) मंत्री . . (वाकनीस) राज्यदप्तरदार व खाजगी सल्लागार, दत्ताजी त्रिंबक.

(६) सुमंत . . विदेशमंत्री—रामचंद्रपंत डबीर.

(७) न्यायाधीश . . (मुख्य न्यायाधीश)—निराजी रावजी

(८) पंडितराव . . (सदक्त : सुंदर) धार्मिक व सांस्कृतिक कार्यप्रमुख—रायाजीराव रावजी.

मुख्य प्रधानांचा सालिना पगार पंधरा हजार होन, अमात्यांचा बारा हजार होन व इतर सहा मंत्र्याचा प्रत्येकी दहा हजार होन होता. या अष्टप्रधानांच्या हुद्याप्रमाणे राजकीय कारभार वाटला गेला होता. त्याचा थोडक्यात तपशील असा---

(१) मुख्यप्रधान :

यांनी सर्व राज्यकारभार करावा. सेना घेऊन नित्य नवीन प्रदेश जिंकण्याचा प्रयत्न करावा. नेमून दिलेल्या प्रदेशाचा कारभार करावा. शत्रूची बातमी काढून त्याचा पराभव करावा. सर्वांशी समान बुद्धीने, सर्वांचे अनुमते, कोणाशी द्वेषबुद्धी न करिता सर्वांस घेऊन चालावे. छत्रपती महाराजांकडून मुद्रा होऊन आलेल्या पत्रांवर आपली मुद्रा करावी.

(२) अमात्य (अर्थमंत्री) :

यांनी सर्व राज्यांतील उत्पन्नाचा व खर्चाचा जमाखर्च पहावा. हे काम दप्तरदार व फडणीस यांजकडून करून घ्यावे. लिहिणे विचार करून करावे. फडणीस, चिटणीशी पत्रांवर आपली मुद्रा करावी. लष्कराचे अधिपत्य करून युद्धे करावी. छत्रपती जो प्रदेश नेमून देतील त्याचा कारभार दक्षतेने करावा.

(३) सेनापती :

सर्व सेनेचे रक्षण करावे. सैनिकांचे वेतन वेळच्यावेळी द्यावे. सेनेत जे पराक्रम गाजवतील त्यांचा गौरव छत्रपतींची मंजुरी घेऊन छत्रपतींच्या हस्ते करावा. त्यांना छत्रपतीकरवी मान-सन्मान व बक्षिसे द्यावीत. सेनेचे अधिपत्य करून युद्धादिप्रसंग करावे.

(४) सचिव :

यानी छत्रपतींचा सर्व पत्रव्यवहार स्वतः पाहावा, त्यांत न्यूनाधिक अक्षर मजकूर यांचा शोध करून नीट करवावे. तसेच महाल परगणे यांचे हिशेबाची तपासणी करावी. हिशेबांवर व राजपत्रावर "संमत" असे लिहावे. युद्धादिप्रसंग करून जिंकलेल्या मुलुखाचा कारभार पहावा.

(५) मंत्री :

याने राज्याच्या राजकीय व राजनैतिक बाबी सांभाळाव्या. परदरबारांतून आलेल्या पाहुण्यांचे आगत-स्वागत करावे. छत्रपतींची दिनचर्या लिहावी. त्यानी केलेल्या कार्यांची नोंद ठेवावी. छत्रपतींच्या भोजनातील पदार्थांची तपासणी करावी. राजकार्याविषयी दक्ष राहून युद्धादिप्रसंग करावे. राजपत्रांवर संमत असे चिन्ह करावे.

(६) पंडितराव :

यानी सर्व धार्मिक बाबींवर अधिकार चालविणे. पंडित, विद्वान ब्राह्मण यांचे सन्मान करावे. अपराध्यास शिक्षा करावी. समाजांतील परंपरा, आचार-विचार, प्रायश्चित संबंधीच्या पत्रांवर सह्या कराव्या व "संमत" असे चिन्ह करावे.

(७) न्यायाधीश :

राज्यांतील सर्व प्रकारच्या खटल्यांवर अधिकार चालवावा, खटल्यांत धर्म-अधर्म पाहून अपराध्यास शिक्षा करावी. न्यायाच्या निवाडपत्रांवर "संमत" चिन्ह करावे. छत्रपतींच्या चारित्र्यास दोष न लागेल असे निष्पक्षपातीपणे करावे.

(८) सुमंत :

यानी परराष्ट्र व्यवहार पहावा. परराज्यातील राजकारणावर लक्ष ठेवावे. परराज्यांतील वकील येतील तेव्हा त्यांचे स्वागत करावे व त्यांची बडदास्त राखावी. परराज्यांतील राजकारणे छत्रपतीस निवेदन करावी. युद्धादिप्रसंग करावे व राजपत्रावर "संमत" असे चिन्ह करावे.

शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारातील पेशवा सेनापतीपासून अगदी खालच्या पातळीवरील शिपाई-कारकुनापर्यंत प्रत्येकाने आपला पगार धान्याच्या किंवा रोकडीच्या स्वरूपात सरकारी खजिन्यातून व कोठारांतून घ्यावा असा महाराजांचा दंडक होता. पगाराची रक्कम निश्चित ठरलेली होती व ती नियमित वेळी मिळत असे. महाराजांनी आपल्या प्रधान मंडळातील एकाही प्रधानास जहागीर दिलेली नव्हती. जहागीर पद्धतीत जहागिरास एखादा प्रांत दिला जातो. त्या प्रांताचा महसूल तो घेतो सैन्य बागळतो व बंडखोरी करून आपले स्वतंत्र राज्य स्थापन करतो.

महाराजांना हे संकट टाळावयाचे होते म्हणून त्यानी प्रधान अथवा अन्य कोणी अधिकाऱ्यास जहागिरी दिली नाही.

राज्याच्या महत्त्वाच्या निर्णायक कागदपत्रांवर, प्रधान मंडळातील महत्त्वाच्या प्रधानांच्या मुद्रा व्हाव्या लागत. मुद्रा करणे म्हणजे, "सही करणे" होय. सर्व महत्त्वाच्या कागदपत्रांवर मुख्यप्रधाान, अमात्य, सचिव, मंत्री, सुमंत यांच्या मुद्रा (सह्या) व्हाव्या लागत. ही महत्वाची पद्धत महाराजांनी रूढ केली. त्याचे कारण उघड होते. महत्त्वाचे निर्णय घेताना चुका होऊ नयेत. तसेच तो निर्णय सर्वांच्या नजरेखालून जावा. अशाप्रकारे प्रधान मंडळात राज्यकारभाराची जाणीव वाढावी व कारभार अधिक कार्यक्षम व्हावा म्हणून महाराजांनी ही प्रथा पाडली होती. अष्टप्रधानांच्या हाताखाली अठरा कारखाने व बारा महालावरील अधिकारी असत, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे :—

१८ कारखाने व १२ महाल[१] :

राज्यकारभाराची विभागणी आठ प्रधानांमध्ये केल्यावर पुन्हा त्यांच्या हाताखाली अनेक लहान खाती निर्माण करण्यात आली होती. या खात्यांना कारखाना अथवा महाल असे म्हणत. असे १८ कारखाने पुढीलप्रमाणे :—

१. खजिना.

२. जव्हारखाना (जवाहीर).

३. अंबारखाना (धान्यकोठार).

४. आबादारखाना (पेये).

५. नगारखाना (वाद्ये).

---

१ सभासद, शिवछत्रपतीचे चरित्र, पृ. ५९६.

६. तालीमखाना (व्यायाम).
७. जामदारखाना (धनालय).
८. जिरातेखाना (शस्त्रालय).
९. मुदपाकखाना (स्वयंपाक).
१०. शरबतखाना (औषधालय).
११. शिकारखाना (खेळ).
१२. दारूखाना (दारूगोळा).
१३. शहतखाना (मत्स्यालय).
१४. पीलखाना (हत्तीशाला).
१५. फरासखाना (तंबू, राहुट्या).
१६. उष्टरखाना (उंटशाला).
१७. तोफखाना.
१८. दप्तरखाना.

याशिवाय १२ महाल असे---

१. पोते महाल (कोषागार).
२. थट्टी महाल (गोशाला).
३. सेरी महाल (तृप्तीघर)
४. वहिली महाल (रथशाला).
५. कोठीशाला (धान्यकोठी).
६. सौदागीर महाल (व्यापारी माल).
७. टंकसाळ महाल (नाणी).
८. दस्ती महाल (अंतःपूर).
९. पागा महाल (अश्वशाला).
१०. इमारत महाल (बांधकाम).
११. पालखी महाल (पालखी).
१२. छबिना महाल (रात्ररक्षक).

या प्रत्येक कारखान्यावर व महालावर स्वतंत्र अधिकारी, हिशेब ठेवणारे कारकून व सेवक लोक नेमलेले असत.

चिटणीस व इतर अधिकारी :

छत्रपतींचे चिटणीस म्हणजे सामान्य अधिकारी नव्हते. राजदरबारी त्यांना प्रधानसारखाच मानमरातब होता. किंबहुना ते प्रधानाहून अधिक राजाच्या खास विश्वासातील समजले जात. बाळाजी आवजी प्रभू हा महाराजांचा चिटणीस होता. त्याची हुशारी व कार्यक्षमता पाहून महाराजांनी त्यास अष्टप्रधान मंडळातील पद देऊ केले होते. परंतु विनयी बाळाजी आवजीने ते सविनय नाकारले. राजाचा खास पत्रव्यवहार व राजनैतिक पत्रव्यवहार लिहिण्याचे काम चिटणीसाकडे असे त्याबद्दल चिटणीसी वतन राजाकडून मिळाले होते.[१] मल्हार रामराव चिटणीस हा बखरकार चिटणीसाच्या कामाबद्दल म्हणतो, "चिटणीस पत्रलेखक यांनी सर्व राजपत्रे लिहावी. राजकारणी पत्रे लिहावी. राजाचे हृदगत जाणून तत्काल नाना प्रकारचे, कल्पना करून चतुरपणे लेखन करावे. जे युद्ध करून आयासे करून कार्य होणे ते पत्राचे भाव पाहूनच कार्य होत असावे ऐसे लेखन करावे."

वतनपत्रे, दानपत्रे, इनामपत्रे तयार करण्याचे काम फडणीस या दुसऱ्या अधिकाऱ्याकडे असे. सर्व किल्लेदारांच्या पत्रांना उत्तरे देणारा गडवई नावाचा आणखी एक अधिकारी दरबारी असे. परकीय सत्ताशी सुमंत (डबीर) या मंत्र्याच्या कार्यालयातून पत्रे जात. पारसनीस या आणखी एका अधिकाऱ्याकडे मोगल बादशहा, मोगल वजीर, सरदार अशा बड्या मंडळींशी करावयाच्या पत्रव्यवहाराचे काम सोपविलेले असे. अशा प्रकारे राजाचा पत्रव्यवहार पाहण्याचे काम चिटणीसांवर असले, तरी हे इतर अधिकारी त्याच्यावरील कामाचा भार बराच हलका करीत असत. फडणीस हा जवळजवळ चिटणीसाच्या तोडीचा अधिकारी समजला जात असे. पुढे पेशवाईंत फडणीसास मोठे महत्त्व प्राप्त झाले. नाना फडणीस हा तर मराठी राज्याचा मुख्य कारभारीच झाला.

प्रत्येक प्रधानाच्या कार्यालयात त्यांच्या हाताखाली पुढीलप्रमाणे अधिकारी असत :—

१. दिवाण.

२. मुजूमदार.

---

१ शि. सा. खंड ३ : २७०६.

३. फडणीस.

४. सबनीस.

५. कारखानीस.

६. चिटणीस.

७. जामदार.

८. पोतनीस.

चिटणीसांस सालिना ६००० होन व फडणीसास ३००० होन असे वेतन असे. (एक होन म्हणजे साडेतीन रुपये. रुपयांची किंमत ही त्या वेळची, आजची नव्हे).

छत्रपतीचे स्थान :

महाराजांनी निर्माण केलेल्या राज्यकारभार यंत्रणेच्या केंद्रस्थानी स्वत: छत्रपती होते. अष्टप्रधान, त्यांच्या खात्यातील लहान-मोठे अधिकारी, १८ कारखाने व १२ महाल, सरसुभेदार, पायदळ, घोडदळ व आरमार या तीन दलांतील लहान-मोठे लष्करी अधिकारी व हिशेब ठेवणारे चिटणीस, किल्लेदार इत्यादी अधिकारी मिळून राज्यात एक मोठी कारभार यंत्रणा उभी राहिली होती. या यंत्रणेची कार्यक्षमता बऱ्याच प्रमाणावर छत्रपतीच्या कर्तबगारीवर अवलंबून होती. छत्रपतीच्या हाती सर्व प्रकारचे अंतिम अधिकार होते. त्यामुळे छत्रपती म्हणजे राज्यकारभाराच्या यंत्रणेचा कणाच समजला जात होता. पुढचा इतिहास असे सांगतो की, महाराजांनी उभारलेली यंत्रणा सांभाळण्याची कुवत संभाजीनंतरच्या छत्रपतींत हळूहळू कमी कमी होत गेली. अष्टप्रधानांतील सात प्रधान यामुळेच निकामी झाले व पंतप्रधान (पेशवा) हाच सर्वाधिकारी बनला.

महसूल व्यवस्था :

राज्याचा प्रमुख महसूल म्हणजे जमीन महसूल होय. शिवाजी महाराजांनी वतनदारांकडून महसूल गोळा करण्याचे रद्द करून तो महसूल पाटील/कुळकर्णी यांनी शेतकऱ्यांकडून गोळा करण्याचे ठरविले. व देशपांडे/देशमुख यांचा महसुलांतील भाग कुळकर्णी आणि पाटील यांनी त्यांना देऊन बाकी महसूल राज्याच्या तिजोरीत भरण्याच्या आज्ञा दिल्या. अशा प्रकारे त्यानी वतनदारांची सत्ता निर्माल्यवत केली.

राज्याच्या कारभाराच्या जबाबदारीची वाटणी जरी प्रधान मंडळाकडे देण्यात आली असली तरी कारभारविषयक कामकाजाच्या अंमलबजावणीची सूत्रे ठरावीक कारभाऱ्यांकडे म्हणजे चिटणीस, फडणीस आदी आपल्या खास अधिकाऱ्यांकडे ठेविली होती. ते राजालाच जबाबदार असत आणि राज्यातील सर्व लेखकवर्ग याच अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली राही. त्यामुळे देशमुखादी सत्ताधीशांची सत्ता शिरजोर होऊ न देण्याची सुरुवातीपासून काळजी घेतली होती. त्याचप्रमाणे इस्लामी सलतनतीमध्ये स्वतंत्रपणे वागत असलेले वजीरादि अंमलदार सहज बंडास प्रवृत्त होत ; तशी आपत्ती येऊ नये म्हणून प्रत्यक्ष राज्यकारभाराच्या अंमलबजावणीची व्यवस्था स्वतंत्र ठेवून ती खास सरकारच्याच हाती ठेविली. पुढील चिटणीशी, फडणीशी आदी जाबत्यांवरून राजसत्ता सरकारांत केंद्रित केली असे दिसते.

या कारभाराची अंमलबजावणी करताना जी जमाखर्चाची मोठी बाब तिच्याही बाबतीत फडणीसाच्या यंत्रणेतर्फे पूर्ण खबरदारी घेतली गेली होती ; अमात्यांच्या देखरेखीखाली जमाखर्चाचे खाते असतानासुद्धा त्यांच्या जाबत्यांत "सर्व राज्यांतील जमाखर्च चौकशी करून दप्तरदार फडणीस त्यांचे स्वाधीन असावे. लिहिणे चौकशीने आकारावे" ह्या वाक्याचा विचार केला तर फडणीस जमाखर्चादी बाबतीत राजाला किती जबाबदार होता याची कल्पना येते. तसे पाहिले तर सर्व तऱ्हेच्या खर्चाला परवानगी देणारा म्हणजे मुजुमदार. परंतु त्याने हुजूरच्या हुकूमाप्रमाणे फडणीसाकडे जे देण्याघेण्याचे व्यवहार येतील त्यांची चौकशी ठेवून अंमलबजावणीत मार्गदर्शन करावयाचे, फडणीशी फडांत सबनीस, बक्षी, कारखानीस, पोतनीस, दप्तरदार, जमेनीस, वगैरे उपखाती किंवा विभाग असत. फडणीस हा चिटणीसासारखा खास राजाचा आयव्ययाचा अधिकारी सरकारी अधिकाऱ्यांवर सत्ता गाजवीत होता. अंमलबजावणी करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना, अगदी हल्लीच्या पद्धतीप्रमाणे अर्थ खात्याची अनुमति आवश्यक असते तशीच शिवशाहीत फडणीसाच्या लेखी मान्यतेची आवश्यकता असे. त्यामुळे सर्व कारखान्यांचे व अधिकाऱ्यांचे आयव्ययाचे तक्ते हिशेब तपासणीसाठी यावेच लागत. तत्कालीन परिस्थितीप्रमाणे चिटणीस व फडणीस सरकारी सत्तेची अंमलबजावणी करणाऱ्या दोन मुख्य शाखा होत्या. इतर सर्व कारखाने यांच्याच हुकूमानुसार कार्यभाग

उरकीत. मात्र फडणीशी कारभार चिटणीशीसारखा वंशपरंपरेने चालत राहिला नाही.

शिवाजी महाराजांची राज्ययंत्रणा म्हणजे तत्कालीन राजकीय व सामाजिक आचारधर्मात क्रांतीच होती. परंतु शिवाजी महाराजांची अष्टप्रधान परंपरा सामान्यपणे शाहूच्या पूर्वकालापर्यंत कायम राखली गेली. कालमानाप्रमाणे राणी येसुबाईंनी त्यात थोडी भर टाकली. संभाजी महाराज युद्धात सारखे गुंतल्याने त्यांनी राणी येसुबाईसाहेबांकडे जे अंतर्गत राज्यव्यवस्थेसाठी प्रतिनिधीपद आचारांत आणले होते त्याची पदसिद्ध योजना जाणत्या युवराजाच्या अभावी राणी येसुबाईसाहेबांसाठी केली. राजारामास पुनर्मंचकारोहणाकरिता ती निराळी करून प्रल्हाद निराजीस ते पद दिले. त्यानंतर पूर्वीच्या अष्टप्रधानांत प्रतिनिधीपदाची भर पडली. अष्टप्रधाना-व्यतिरिक्त शिवाजीमहाराजांनी दानाध्यक्ष, छंदोगामात्य यासारखी उपमंत्रीपदे निर्माण केली होती. त्या पदाधिकाऱ्यांनाही पंडितरावांच्या वंशपरंपरेतील लायक पुरुषाच्या अभावी महत्त्व प्राप्त झाले.

राजाराम महाराज जिंजीकडे गेल्यानंतर अष्टप्रधानांत साहजिकच फाटाफूट झाली व प्रतिनिधी मोरोपंत पेशव्यांसारखी राज्यकारभाराची धुरा चालविण्या-इतके लायक व एकनिष्ठ नसल्याने कारभार " राजमंडळ " तर्फे करण्याची प्रथा पडली. राजारामाच्या गैरहजेरीत अर्थात दोन राजमंडळे काम करीत होती. एक जिंजीस व दुसरे पन्हाळगडी, जे प्रधान जिंजीच्या " राजमंडळा " वर हजर नसत त्यांचेऐवजी त्यांचे कारभारी प्रतिनिधित्व करीत व महाराष्ट्रातील " राजमंडळ " वर जिंजी येथील प्रधानांच्या सुभ्यावरील अंमलदार " सभासद " म्हणून हजर राहून काम विल्हेस लावीत. राजाराम महाराज परत आल्यावरही हा राजमंडळाचा कारभार चालू राहिला. तो पुढे शाहूच्या कारकीर्दीतही चालू होता. परंतु पेशव्यांनी आपले ठाणे पुण्यास नेल्याने व सारखे स्वारी शिकारीवर राहावे लागल्याने पेशवे व त्याप्रमाणे इतर प्रधानही अशाच कारणांवरून आपापले कारभारी या " राजमंडळ " च्या कामाकडे नियोजित करू लागले. स्वाभाविकच ह्या " राजमंडळ " च्या कारभाराला फारसा मान राहिला नाही व शाहूनंतर तर " राजमंडळ " नाहीसे झाले. ना राजमंडळ ना राजा अशी परिस्थिती निर्माण करण्यात आली.

मुलकी कारभार : राजकीय विभाग व त्यावरील अधिकारी :

शिवकालात महाल हा सर्वांत लहान राजकीय विभाग होय. हे देशमुखाच्या परगण्यावर ठरविलेले असत. त्यामुळे महालांची व परगण्यांची नावे बहुतेक एकच असत. परगण्याप्रमाणे महालही लहान मोठा असे. हवालदार हा महालावरचा अधिकारी. त्याचा दिवाण मुजूमदार. हवालदार व कारकून मुजूमदार या जोड नावाने त्याला पत्रे जात. महालातील वसुलाच्या बाबी, दिवाणी-फौजदारी स्वरूपाचे दावे आणि राजकीय उलाढाली यावर हवालदाराची देखरेख असे आणि मुजूमदार हिशेबी व्यवहार उलगडी. महालाच्या व्यवस्थेकरिता हवालदाराच्या हाताखाली शिपायांची तुकडी असे. या तुकडीचे अंमलदार नाईकवाडी या नावाने ओळखले जात[१]. गाव व वतनदार व परगणे वतनदार आपली कामे कशी करतात ते हवालदार पाही. परगणा मोठा असल्यास त्याच्या तर्फा-तर्फाने हवालदार नेमले जात. पुणे आणि वाई असे मोठे परगणे होते शिवाय कुडाळचा परगणा होता.[१]

अनेक हवालदार व परगणे वतनदार यावरील सुभेदार हा वरिष्ठ अंमलदार होय. याची कचेरी तो सुभा. सुभेदार म्हणजे देशाधिकारी. सुभेदाराला मुजूमदार असून त्याच्याजवळ शिबंदीही असे. त्याला चिटणीस, दप्तरदार, पोतनीस, सभासद वगैरे निरनिराळ्या हिशेबी विभागांच्या कामाकरिता कारकून असत. लाख सव्वा लाख उत्पन्नाच्या प्रदेशावर एकेक सुभेदार असे.

सरसुभेदार :

सुभेदाराच्या वरचा अधिकारी सरसुभेदार आणि त्याचा देशी प्रतिशब्द "मुख्य देशाधिकारी". शिवकालात पाच सरसुभेदार होते. महाराजांचा पत्रव्यवहार हा अष्ट प्रधानांशी तसेच सुभेदार व सरसुभेदार यांजशी होत होता. या पत्रव्यवहारावरून समजते की, महाराज, अष्ट प्रधान व अधिकारी राज्यकारभारात जातीने लक्ष देत होते.

१ शि. च. सा. खं. ५ ; ९७५.

शिवकाली मुलकी कारभाराच्या सोईसाठी जे विभाग केले होते त्यातील मौजे हा सगळ्यांत लहान विभाग होता. त्याचे मुख्य मुलकी अधिकारी पाटील व कुलकर्णी. मौजाच्या वरचा विभाग तर्फ किंवा तरफ. त्यावरील अधिकारी तरफदार. हा परगण्याचा पोटविभाग म्हणून तरफदार परगण्यावरील अधिकारी जो मामलेदार त्याच्या ताब्यात असे. कमाविसदार हा स्वतंत्र अधिकारी व्यवस्थापक किंवा वहिवाटदार म्हणून वावरताना दिसतो. नवीन प्रदेश जिंकून तो मराठी राज्यास जोडल्यावर त्याचा बंदोबस्त करण्यास ज्या अधिकाऱ्यास नेमीत त्यासही कमाविसदार म्हणत. लहान कमाविसदार मामलेदारांच्या अंकित असत. काही परगणे किंवा तालुके मिळून होणाऱ्या विभागास प्रांत किंवा सरकार म्हणत प्रातांवरील मुलकी अधिकाऱ्यास सुभेदार किंवा सरसुभेदार म्हणत.

गावचा वसूल करणारे पाटील कुळकर्णी हे वतनी अधिकारी व त्यांचे मदतनीस चौगुला, पोतदार व महार असे वतनी नोकर असत. यांच्या वरचा मोठा मुलकी अधिकारी मामलेदार. त्याच्या हाताखाली शिबंदी असे. तिचा उपयोग परगण्यांत शांतता राखण्याचे कामी होऊन खेरीज वसुलाचे बाबतीत पाटील-कुळकर्ण्यांस मदत करण्याकरिता गावगन्ना पाठविण्यात येत असे.

पावसाळ्याच्या प्रारंभी मामलेदार पाटीलास बोलावून घेई ; विहित जमीन किती, खराब जमीन किती, नवीन लागणीस दिलेली जमीन किती व अंदाजे वसुली किती याची माहिती पाटील मामलेदारास सांगे. पाटील आपल्या गावी परत गेल्यावर शेतकऱ्यास लागवड करण्यास उत्तेजन देई व त्यास सावकारापासून कर्ज व सावकारातून तगाई मिळवून देई. वर्ष अखेर आपल्या तालुक्यात पाहणी करण्यास मामलेदार निघे व पाटील-कुळकर्णी आणि सुभेदार यांच्या मदतीने जमाबंदी करीत.

मुलकी कारभारात गावचा राजा पाटील व प्रधान कुळकर्णी. यांजवर गावाच्या संरक्षणाची, व्यवस्थेची व सरकारी वसुलाची जबाबदारी असे. गावांवर परचक्र आल्यास त्यापासून गावाचा बचाव करण्याकरिता गावची शिबंदी पाटलाने जमवून शत्रूला तोंड द्यावे ; शत्रूचा मोड न झाल्यामुळे तो शिरजोर होऊन गावांजवळ खंडणी मागू लागल्यास पाटील कुळकर्ण्यांनीच

ती भरावी. कित्येकदा गावांवर धाडी येऊन गाव उठून जाई व रयत परागंदा होऊन गावच्या शिवारातील लावणी व संचणी बंद पडण्याची पाळी येई. त्यावेळी पाटलानेच गावची वसाहत फिरून करावी व लावणी संचणीसाठी रयतेला उत्तेजन द्यावे. गावचा सरकारी वसूल सक्तीने वसूल करणे, आल्यागेल्याची सरबराई करणे ही कामे पाटील-कुळकर्णी करीत.

गावात पाटील व कुळकर्णी यांनी गावचा वसूल जमा करून जमविलेला पैसा देशमुख व देशपांडे यांजकडे पाठवावयाचा. पाटील व कुळकर्णी यांना सहाय्य करण्यासाठी गावात वतनदार नोकर असत, तसेच देशाच्या मुख्य गावी देशमुख व देशपांडे यांच्याही मदतीकरितां वरिष्ठ प्रतीचे वतनदार नोकर असत.[१] शेतसारा वसूल होण्याचे बाबतीत अधिकार चालवावयाचा देशमुखाने व देशमुखाच्या अधिकाराने वसूल झाल्यावर त्याचा हिशेब ठेवावयाचा देशपांड्याने. त्याचे नोकर म्हणून हिशेब तपासनीस मुजूमदार, दस्तऐवज नोंदणी फडणिसाची, जाबजबाब लिहिणे सचिवाची. अशी देशमुखाच्या कचेरीतील कामाची व्यवस्था होती. पाटील-कुळकर्णी यांच्यावरचा मुलकी अधिकारी मामलेदार. तो पगारी असल्यास त्यास सालिना पाच हजारपर्यंत तनखा मिळे. त्याच्या हाताखाली शिबंदी असे. मामलेदार कचेरीत दिवाण नावाचा दुय्यम अधिकारी असे. तो आपली सही मामलेदाराच्या सही शेजारी करीत असे. हिशेब तपासनिसाचे काम मुजूमदार करीत असे. फडणीस सनदापत्रे नोंदवी. या सर्वांना वतनाखेरीज पगार मिळत असे. दिवाणाला सालिना रुपये ५९०, मुजूमदाराला रुपये ४९०, फडणीस रुपये ६१०, दप्तरदार रुपये २०० व चिटणीस रुपये १००. हे सर्व अधिकारी मिळून मामलेदार कचेरी. मामलेदार एकटा पगारी व त्याच्या मदतीला हे सर्व अधिकारी मुख्यतः वतनी व अंशतः पगारी असत. कमाविसदार तरफदार व शेखदार हे मामलेदार कचेरीतील अधिकारी असून त्यांची नेमणूक वसुलांच्या बाबतीत मामलेदारास मदत करण्यासाठी तालुक्याच्या पाडलेल्या लहान लहान पोट विभागात केलेली असे. हे अधिकारी आपल्या विभागातील गावी जाऊन पाटील-कुळकर्ण्यांच्या मदतीने

१ शि. च. सा. ५ ; ९७५ पेद ३१ : २१.

वसुलाची अंदाजपत्रके आगाऊ तयार करीत. मामलेदार त्या त्या विभागात जाऊन त्याची प्रत्यक्ष पाहणी करीत व पिके तयार झाल्यावर पिकांच्या प्रत्यक्ष पाहणीनंतर ती पक्की करीत. वर्षअखेर वसूल झाल्यावर मामलेदार वसूल हिशेबाचे कागद छत्रपती सरकारकडे पाठवी. त्याच्या कागदावर देशमुखांच्याही सह्या असत. याचा अर्थ असा की, त्याने ते तपासलेले असत. मामलेदाराचा मुख्यत्यार छत्रपतीच्या दरबारांत असून त्याजमार्फत सरकारी हुकूम त्याच्याकडे येत ; त्याचे जबाब तो देई.

कमाविसदार, मामलेदार व सरसुभेदार यांच्या नेमणुका, बदल्या व बडतर्फ्या छत्रपतीकडून होत. कमाविसदार व मामलेदार यांचा मानमरातब सरकारातून चांगला ठेवण्यात येई. त्यांच्या तैनातीस चोपदार व दिवट्या अफदागिऱ्या असे. चोपदारास दरमहा पगार रुपये ३, दिवट्या पगार रुपये ४, व अफदागिऱ्यास पगार रुपये ५ असे. हा पगार बारा महिन्यांत फक्त आठ महिन्यांचाच आकारला जाई. कमाविसदारास राहावयाची घरे जरूर त्या ठिकाणी सरकारातून बांधून मिळत.

अशा रीतीने मराठ्यांच्या मुलकी खात्यास एका टोकाला पाटील-कुळकर्णी व दुसऱ्या टोकाला छत्रपती.

□□

५१. लष्करी प्रशासन (सैन्य)

पहिल्या नेपोलियनप्रमाणे आपल्या काळात शिवाजी महाराज हे महान संघटनाकार आणि प्रजेच्या जीवनाला उपयोगी पडणाऱ्या संस्थांचे विधाते होते. शिवाजी महाराजांच्या कारभाराची पद्धत ही पूर्वीच्या मुसलमान किंवा हिंदुराज्य पद्धतीची नक्कल नव्हती. शिवाजी महाराजांची आकांक्षा आपल्या जनतेला स्वातंत्र्य मिळावे, एक राष्ट्र या नात्याने जनता एकजुटीने नांदावी, ह्या जुटीत स्वसंरक्षणाची आणि आपले हक्क दुसऱ्यांना पाळावयास लावण्याची शक्ती असावी अशी होती. ह्यासाठी महाराजांनी ज्या राज्य कारभाराच्या संस्था निर्माण केल्या त्या खास हिंदवी स्वराज्याच्या प्रदेशासाठी होत्या.

शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापना केली ती केवळ एकनिष्ठ, स्वामीभक्त सेनेच्या भरवशावर स्वराज्य उभारण्याचे काम शिवरायांनी जातीनिशी केले. आपल्या सैन्याची पुनर्रचना केली. सैन्याला विशिष्ट शिस्त घालून दिली. निष्ठावंत सैन्याच्या उभारणीसाठी त्या सैन्याला नियमितवेळी वेतन मिळणे व ते सर्व दृष्टींनी भरपूर असणे आवश्यक आहे. हे ठरवून राजियांनी त्या वेळपर्यंत चालू असलेल्या सरंजामी लष्कर पद्धतीचा त्याग केला. कारण सरंजामी पद्धतीत राज्यातील सेनानीना जहागीर म्हणून प्रदेश दिले जात असत. या जहागिरीतील महसूल त्या सेनानीना मिळे व त्याच्या मोबदल्यात ते सेनानी आपल्या मालकाची लष्करी चाकरी करत. अनेकवेळा हे सरंजामदार सेनानी आपल्या जहागिरीतील रयतेवर अत्याचार करत, अनेकवेळा मालकाचा हुकूम ते मानत नसत. ते पगार थकला की बंड पुकारण्यास अथवा शत्रूस मिळण्यास हे सैन्य मागे-पुढे पहात नसे. हे लक्षात घेऊन शिवाजी महाराजांनी आपल्या सैनिकांस भरपूर वेतन ठरलेल्या तारखेस देण्याचे ठरविले. शिवाजी महाराजांच्या सैन्याचे पायदळ व घोडदळ असे दोन भाग होते. हत्ती व उंट यांचाही सैन्योपयोगी साहित्यासाठी त्यांनी उपयोग करून घेतलेला होता.

वरील शिवाय महाराजांचे शरीर संरक्षक दल होते. महाराजांचा स्वराज्य संपादण्याचा व्याप जसजसा वाढू लागला तसतसे त्याना शरीर संरक्षणाच्या दृष्टीने विशेष प्रकारचे सैन्यदल ठेवण्याची आवश्यकता भासू लागली. ह्या सैन्याचा उपयोग दोन प्रकारचा होता. एकतर राजाच्या शरीराचे संरक्षण व दुसरे आणीबाणीच्या प्रसंगी राखीव सैन्य म्हणून.

लष्करामधले जे अतिशूर, लढवय्ये, एकनिष्ठ आणि हुशार सैनिक असत त्याना महाराजांच्या शरीर संरक्षक दलांत घेतले जाई. महाराज त्यांच्या प्रामाणिकपणाची परीक्षा स्वतः घेत असत. हे सैनिक महाराजांच्या खास विश्वासातील असत. महाराजांच्या निवासस्थानी या दलांतील सैनिकांची नेमणूक होत असे. महाराज स्वारीवर असता त्यांच्या अवतीभवती ते महाराजांचे संरक्षण करत असत. या दलाची शिस्त अत्यंत कठोर असे. ह्या दलाविषयी सभासद आपल्यास खालील माहिती देतो :—

" पुढे राजियांनी आपल्या पालखीबरोबर सचोट माणूस पाहून निवडक आसामी ठेविले चार पादशहाचे आपण दावेदार, एखादे वेळेस प्रसंग पडतो तेव्हा जवळ आहेत ते कार्यास येतील असे जाणून मावळे लोकात पहाणी करून निवडक माणूस पाहून पतके (विभाग) केली. मावळ्या-मावळ्यांमध्ये लोक उत्तम निवडला. निवडक भरती करून चार पतके मिळून दोन हजार माणूस ठेविले. त्यात काही बंदुकी, काही विटेकरी, वरकड आड हत्यारी, फिरंगीवाले असे माणूस सजले. तितके माणसास राज करून दिले. डोईस मंदिल, दोही हाती दोन सोन्याची कडी, कोणास रूप्याची कडी, बंदुकीस कट रूप्याचे, कानात जोडी कुटक्याची येणे प्रमाणे.......अवघे लोकांस साज सरकार निसबतीने देऊन लोका सजविले."

ह्या हुजूर पायदळाप्रमाणे हुजूर पागाही होती. तीत पाच हजार घोडी असत. त्यांचे जीनसामान सोन्यारूप्याचे असे व त्यावरील करोल किंवा स्वार चांगले हुशार व शूर बारगीर म्हणून ठेवले जात. ह्याशिवाय आणखी दोनशे उमदी घोडी खाशांसाठी म्हणून निराळी ठेवलेली असत. ह्या घोड्यावरील जीनसामान फारच उंची असे. खाशांची स्वारी निघाली म्हणजे ह्या उभय प्रकरणाच्या हुजूर सेनेतील लोकांनी ठरलेल्या पद्धतीने पुढेमागे व दोन्ही बाजूस अंतराअंतराने चालावे लागे. अजूनही ही पद्धत आपले राष्ट्रपतींच्या बाबतीत चालू आहे.

प्रत्येक सुभेदाराच्या व हजारी सरदाराच्या हाताखाली एक ब्राह्मण सबनीस व प्रभू कारखानीस असे हुद्देदार दिलेले असत. ह्या हुद्देदारांच्या हाताखाली कमी जास्त कारकून असत.[१]

लष्कर विभाग.— याचे दोन विभाग पायदळ व घोडदळ. पायदळात घाटमाथ्यावरचे मावळे आणि कोकणातील शेतकरी यांचा भरणा असे. मावळे तलवार बहाद्दर व शेतकरी अचूक नेम मारण्यात कुशल असत. प्रत्येकापाशी ढाल, तलवार व बंदूक ही स्वतःची अस्त्रे असत. त्यास लागणारा दारूगोळा सरकारातून मिळे. ते धावण्यात चपळ व डोंगर कड्यावर चढण्यात अत्यंत कुशल असत. पायदळात दहा माणसांचा एक दाहिजा केलेला असे. त्यावर एक नाईक मुख्य असे. अशा पाच नाईकांवर एक हवालदार असे व दोन हवालदारांवर एक जुमलेदार असे. दहा जुमलेदारांवर एक हजारी असे. ह्याशिवाय काही सात हजारी सरदार असत. हे सगळे हजारी आणि सात हजारी सरदार सरनोबतांच्या हुकूमात बसत. सर्व पायदळावर एक सरसेनापती असून त्यास सरनोबतही पदवी होती. तिरकमठे, पट्टे, इटे, बरच्या, सांग या शस्त्रांपैकी जो जे शस्त्र चालविण्यात कुशल असे त्याने ते शस्त्र स्वखर्चाने बाळगावे असा नियम असे. दारूगोळा सरकारातून मिळे. नोकरीत ठेविताना नुसते धान्य देऊन ठेवीत; परंतु पुढे हुशारी दिसून येई त्याप्रमाणे त्यास एकपासून तीन होनापर्यंत दरमहा पगार मिळे. जुमलेदारास सालिना शंभर होन, एक हजारी यास सालिना पाचशे होन व पंचहजारी यास अडीच हजार होन पगार असत. शिवाय पंच हजाऱ्यास सरकारातून पालखी, अबदागीर वगैरेच्या नेमणुका असत.

घोडदळात बारगीर व शिलेदार असे दोन प्रकार असत. बारगीराच्या घोडदळास पागा अशी संज्ञा असे. पागेतील सगळी घोडी सरकारी असत व सरकार मार्फत त्यांची निगा होत असे. शिलेदार स्वतः घोडा आणीत असे. त्याची निगाही स्वतःच राखी. याकरिता त्यास सरकारातून जादा तनखा मिळत असे. सरकारी घोड्याच्या मागील चौड्यावर ओळखीसाठी

१ सरदेसाई रियासत, भाग १ ला, पृ. ३७५.

शिक्के मारीत असत. घोडेस्वारांजवळ कमरेत तलवार, हातात भाला व काहींच्या हातात बंदुका अशी शस्त्रे स्वतःची असत. बारगिरास दारूगोळा सरकारातून मिळत असे व शिलेदारांनी तो आपल्या पदराचा आणावा असा नियम असे. घोडेस्वाराचा पोशाख-पायात तंग तुमान, अंगात खाकी अंगरखा, कमरेस शेला गुंडाळलेला व डोकीस पागोटे असा असे. तलवार कमरेच्या भात्यात अडकवलेली असे व पाठीवर ढाल लटकावलेली असे.[१]

महाराजांच्या घोडदळात पंचवीस बारगीर किंवा शिलेदार यांजवर एक हवालदार असे. पाच हवालदारांवर एक जुमलेदार, पाच जुमलेदारांवर एक सुभेदार व दहा सुभेदारांवर एक पंचहजारी असे. हे सगळे सुभेदार व पाच हजारी सरनोबतांच्या हुकमात असत. घोडदळाचा सरनोबत अर्थात निराळा असे. पंचवीस घोड्यामागे एक पखाली व एक नालबंद असे.

वेतन.— घोडदळातील प्रत्येक बारगीरास त्याच्या दर्जाप्रमाणे दोनपासून पाच होनपर्यंत पगार दरमहा असे. शिलेदारास सहा होनपासून बारा होनापर्यंत पगार असे. जुमलेदारास अडीचशे होन तैनात व पालखी यांची तैनात असे. सुभेदारास वर्षाचे सहाशे होन तैनात व पालखी, पाच हजारीस दोन हजार होन वार्षिक तनखा पालखी व अबदागीर अशी नेमणूक असे. शिलेदाराचे सुभेदार अर्थात निराळे असून ते सगळे सरनोबताच्या हुकमात असत. पगाराची रक्कम रोख दिली जाई. सैनिकांचे पगार हे ठिकठिकाणी "वराता" (चेकसारख्या प्रकाराने) पाठवून व्यापाऱ्यांकडून रोख रकमा घेऊन तो सैनिकांना देण्यात येई.[२] घोडेस्वारास घोडा शिवाजी महाराज घेऊन देत असत व घोड्याची निगा राखण्याकरिता खिदमतगारही नेमीत असत. याप्रमाणे प्रत्येक घोडेस्वाराचा सालिना पगार ९६ ते १२० रुपये प्रमाणे त्यास द्यावा लागे. शिवाजीचे सैन्य पन्नास हजार घोडेस्वारांचे होते असे इंग्रजी साधनांवरून दिसते. ह्या पन्नास हजार घोडेस्वारांचा खर्च दरसाल कमीत कमी अठ्ठेचाळीस लाख व जास्तीत जास्त साठ लाख रुपये शिवाजी महाराजांस करावा लागे.

१ सभासद, शिवप्रभूचरित्र, (गाडगीळ संपादित), पृ. ३४.

२ सेतुमाधवराव पगडी, मोगल आणि मराठे पृ. ७४-७५.

पायदळातील शिपायाचा पगार घोडेस्वाराच्या पगाराच्या निम्मा धरला तर पाऊण लाख पायदळाचा खर्च तीन लक्ष पंचाहत्तर हजार रुपये येई. असा घोडदळ व पायदळ मिळून सर्व सैन्याचा खर्च त्रेसष्ट लक्ष पंचाहत्तर हजार रुपये शिवाजी महाराजांस करावा लागे असे दिसते. सैन्याच्या या पगाराशिवाय बंदुका, तोफा, भाले, बरच्या, तलवारी, बाण, दारूगोळा, घोडे, तंबू, राहुट्या इत्यादिकांसाठी खर्च करावा लागे तो निराळाच.

सैन्यातील हत्यारे व एकंदर सैन्यव्यवस्था.— तत्कालीन सैन्यात बहुतेक पुढील लष्करी अंगांचा समावेश झाला होता ; पायदळ, घोडदळ, तोफखाना, मोदीखाना (Commissariat), वाहतुकीची साधने वगैरे (transport), बेलदार व कुऱ्हाजे (engineers) sappers & miners (छप्परमैना), हेर, टेहळ्ये यांचे नजरबाज खाते (intelligence department) वगैरे खाती मराठ्यांच्या सैन्यात होती.[१]

पायदळाची हत्यारे.— पायदळाची हत्यारे बंदूक व तलवार हीच मुख्य असत. तलवारीचा उपयोग हातघाईच्या प्रसंगी होत असे आणि बंदुकीचा प्रयोग गोळीबाराच्या लढाईमध्ये (fire action) होई. पूर्वीच्या पायदळांतील वीट, खांडा, सांग वगैरे निरनिराळ्या प्रकारची हत्यारे वापरणाऱ्या लोकांवर एक शिस्तीचा व एक हुकमतीचा ताबा राहण्याइतकी आवश्यकता नव्हती.

घोडदळाची हत्यारे.— घोडदळाची मुख्य हत्यारे तलवार व भाला ही असत. शिवाय बंदूक, पट्टा वगैरे इतर हत्यारेही कोणाकोणाजवळ असत. त्याकाळी घोडदळाचे मुख्य काम हातघाईच्या लढाईस लागणाऱ्या डावपेचांचे असे. ज्यांच्याजवळ बंदुका असत ते विशिष्ट प्रसंगी आपल्या बंदुकांचा उपयोगही करीत. सर्व घोडदळाजवळ बंदुका नसल्यामुळे सर्वांनाच गोळीबाराची (Fire action) लढाई करण्याचा प्रसंग नेहमी येत नसे. प्रसंगविशेषी घोडदळाला हातघाईच्या लढाईच्या वेळी बंदुका बाजूला सारून तलवार व भाला यांचा उपयोग करता येई. अशा वेळी केव्हा केव्हा घोडेस्वार

१ राज्य व्यवहार कोश, शिवचरित्र प्रदीप, पृ. १५४.

हा हातघाईचा प्रसंग जवळ आणण्याकरिता पायउतारा होऊन बंदुकीने पायदळ शिपायाप्रमाणे ही कामे करी. म्हणजे घोडदळातील प्रत्येक शिपायास दोन्ही कामांची (घोडेस्वाराची व पायदळ शिपायाची) माहिती असणे अत्यंत आवश्यक असे.

तोफखाना (Artillery).— तोफखाना हे सैन्याचे मुख्य अंग असे. महाराजांकडे तोफखाना होता. हत्तींचा उपयोग मुख्यतः अवजड तोफा ओढण्याकडे केला जाई. तसेच निशाण नेण्याकरिता, स्वारीकरिता व किल्ल्याचे दरवाजे फोडण्याकरिताही हत्ती सैन्यात बाळगीत असत.

हलक्या तोफा (Light artillery).— जड व भारी तोफा डोंगराळ व पहाडी मुलुखांत जेथे त्या नेण्याला रस्ते नसतात अशा ठिकाणी फारशा उपयोगी पडत नसत अशा जागी लहान व हलक्या तोफांचा उपयोग चांगला होई.

तोफांचे सर्वसाधारण प्रमाण :— जड तोफांचे प्रमाण दर हजार शिपायामागे कमीत कमी व जास्तीत जास्ती सहा ते आठ असे राही. (राज्य व्यवहारकोश).

शस्त्रास्त्रे :

मराठी लष्करात पुढील प्रकारची शस्त्रे वापरत असत :---

(१) तलवार, (२) कठारा, (३) जमदाडा, (४) पट्टे भाले, (५) बांक, (६) बिचवे, (७) सैन्य, (८) टाकण्या, (९) तिरकमाना, (१०) बंदुकी, (११) बखतरे, (१२) घुग्या, (१३) टोप, (१४) दुपट्टा, (१५) चिलखते, (१७) ताज, (१८) हुक्के (१९) दारुगोळा, (२०) बाण इत्यादी.

□□

मराठ्यांची युद्ध पद्धती :

शिवकालात मराठे लढाईसाठी तलवारी, भाले ह्यांचा वापर नेहमी करत. ह्या शस्त्रांच्या जोडीस बंदुका आणि तोफा यांचाही उपयोग होई. तलवारी व भाले ही हत्यारे वापरताना शत्रूला भिडावे लागे. सुरुंगाच्या दारूचा उपयोग किल्ल्यांच्या तटाला भगदाड पाडण्यासाठी होई.

महाराष्ट्राचा प्रदेश डोंगराळ. दळणवळण करणे अत्यंत अवघड. अशावेळी जलदगतीने अंतर तोडण्याचे साधन, म्हणजे घोडा होय. त्या काळात मराठी माणसाचे घोड्यावर फार प्रेम होते. महाराष्ट्रातील घोडीदेखील तेथील भूमीला अनुरूप अशीच म्हणजे उंचीला लहान पण तरतरीत व चपळ असत. त्यावेळच्या दळणवळणाचे साधन म्हणजे बैल व बैलगाडी हे होय. युद्धामध्ये सामान वाहून नेण्यासाठी बैलांचा उपयोग केला जाई. युद्धातंत्रातील हत्यारे व अंतराचा प्रश्न सोडविण्यासाठी अश्व दलाला मराठी राज्यात महत्त्व मिळाले.

शस्त्रे, घोडा, बैल व बैलगाड्या विकत घेण्यासाठी महाराजाजवळ पैसा नव्हता. तो मिळविण्यासाठी मराठ्यांना लुटीवर भिस्त ठेवावी लागे. महाराजांच्या कारकीर्दीत अनेकदा लुटी झाल्या पण लुटी करताना रयतेला कमीत कमी त्रास व्हावा याची काळजी घेतली जाई. शिवाजी महाराजांनी लुटीबाबत अतिशय पद्धतशीर असे नियम केलेले होते. लुटीतील संपत्ती सरकारी तिजोरीत नोंद होऊन जमा होत असे. महाराजांनी लुटीचा उपयोग हा स्वार्थाकरता न करता व्यापक अशा राज्य साधनेसाठी केलेला होता.

आपल्याकडे पैसा कमी, हत्यारेही कमी व शत्रूच्या मानाने सैन्यबल कमी, प्रदेश डोंगराळ अशी वस्तुस्थिती असल्यामुळे शत्रुशी लढण्यासाठी महाराजांनी एका खास लढाईच्या पद्धतीचा आश्रय घेतला. एक नवीन युद्धतंत्र अंमलात आणले. त्यास आपण **गनिमी काव्याचे युद्ध** असे म्हणतो. यात जास्तीत जास्त बचाव करून शत्रूची जास्तीत जास्त नुकसानी करावयाची असे.

याशिवाय युद्ध करण्याच्या दुसऱ्या अनेक पद्धती आहेत. त्यास अनुसरून फौजेची रचना, संघटना, धोरण, हत्यारांचे शिक्षण व सैन्याच्या हालचाली निरनिराळ्या कराव्या लागतात. या पद्धतीत सुधारलेली किंवा शास्त्रीय,

मान्याच्या जागा बळकट धरून बसण्याची, वरील प्रकारच्या जागा एकामागून एक ताब्यात घेण्याची, वेढ्याची, डोंगरी व पहाडी, जंगली, झाडी-झुडपातील, समयानुकूल शस्त्रशास्त्रांची व गनिमी इत्यादी निरनिराळे प्रकार आहेत. लढाईत ही एकेक पद्धत अथवा ह्या सर्व पद्धतीचे उत्कृष्ट मिश्रण शिवाजी महाराजांनी युद्धात शत्रूवर विजय मिळवण्यासाठी उपयोगात आणले, म्हणून त्यात सुधारलेल्या परदेशी नेत्यांशी टक्कर देऊन युद्धात यश मिळविता आले.

अत्यंत कडक, कठोर, चोख शिस्त हे महाराजांच्या युद्ध विद्येचे दुसरे लक्षण होय. मुस्लिम लष्करातील शिपाई लूट करीत व स्त्रियांची विटंबना करीत. महाराजांनी असा दंडक घातला की लष्करांत स्त्री केव्हाही दिसता कामा नये व कोणीही बरोबर आणता कामा नये आणि हा दंडक अंमलातही मोठ्या कसोशीने आणला.

पावसाळ्यात लष्करी मोहिमा बंद असत. त्यावेळी लष्करातील सैन्यास प्रशिक्षण दिले जाई. लष्कराने पावसाळा सोडून आठ महिने मुलूखगिरीवर राहाणे. परमुलुखांत खंडण्या घेऊन पोट भरावे. लष्करात बायको, बटकी, कलावंतीण नसावी. जो बाळगील त्याची गर्दन मारावी. पर मुलुखांत पोर, बायको न धरावी. खंडणी गोळा केल्या जागा गोळीप्रमाणे पैका द्यावा. कोणी बदअंमल न करावा. लुटीतील सामानाचे जाबते रुजू घालावे. कोणी वस्तू चोरून ठेविल ती दाखल सरदारांस जाहलियाने त्यास शासन करावे अशी लष्कराची रीत ठेविली.[१]

कडक राहणी.— काटक, कडक जीवन, ऐष-आराम शून्य राहणी, अत्यंत मर्यादित गरजा हे छत्रपतींच्या युद्धपद्धतीचे तिसरे लक्षण होते. मराठा शिपायाजवळ लवाजमा असा मुळी नसेच. त्यामुळे लष्कराच्या हालचाली अत्यंत चपलतेने होत असत. मराठा शिपायाकडे त्याची तलवार, भाला, बरची व फारतर बंदूक ही त्याची हत्यारे व थोडीशी भाकरी, घोड्याच्या तोबऱ्याचे हरभरे आणि एखादे घोंगडे एवढे सामान असे. घोंगडे अंगाखाली वर घेऊन ते जमिनीवरच निजत असत. घट्ट घोड्याचा लगाम मनगटालाच बांधून ठेवित. स्वारी मोठी असली तरी महाराजांसाठी व मंत्र्यांसाठी एक-दोन तंबू असत. बाकी सर्व लष्कर उघड्यावर रहात, झोपत असे. त्यामुळे विद्युत वेगाने वाटेल तशा हालचाली करून शत्रूला गाठणे, झोडपणे आणि क्षणार्धात नाहीसे होणे हे मराठ्यांना सहज शक्य होत असे.[२]

१ सभासद (गाडगीळ सं.) पृ. ३४.

२ कित्ता, पृ. ३५.

एक हुकमी सेना.— महाराजांची सेना ही वतनदारांची किंवा सरंजामदारांची सेना नव्हती. ती राष्ट्रीय सेना होती. प्रारंभीच्या काळी काही दिवस महाराजांनी देशमुख वतनदार यांच्या सेना जमा करून काम चालवले पण लवकरच त्यांनी हे सेनेचे रूप बदलले. सर्व एका हुकमाखाली चालणारी राजसेना करून टाकली. मराठा लष्करात दोन प्रकारचे घोडेस्वार असत बारगीर आणि शिलेदार. बारगीरचा घोडा व सामान सरकारी असे. शिलेदाराजवळ स्वतःच्या मालकीचा घोडा, हत्यारे व सामान असे. सरकारी घोडदळास पागा म्हणत. शिवाजी महाराजांनी पागेचे प्रमाण हळूहळू वाढविले आणि शिलेदारांना पागेच्या हुकुमतीत कायम केले त्यामुळे लष्कर एक हुकमी झाले आणि करडी शिस्त सांभाळणे अगदी सोपे झाले.

महाराजांची वक्रयुद्धपद्धती होती. मराठ्यांचा सुप्रसिद्ध गनिमी कावा तो हाच. वक्रयुद्ध म्हणजे चार-पाच फौजेच्या टोळ्या कराव्या, शत्रूस समजू न देता संकेतांनी चालावे. एकाने तोंड लावावे. ते परसैन्य अल्पसैन्यावर घे घे मार करीत उठले, मग त्या लोकांनी पळ काढावा म्हणजे सैन्य मोडले म्हणून पाठी लागणारांस इतर टोळ्यांनी चहूकडून घेरावे. अल्प सैन्य मोठे सैन्यास मारते होऊन, मोठे सैन्यास किती फौज आहे, तिची गणती न सापडता हतवीर्य होते तेणे करून फतेह वक्रयुद्धी जाणावी. वक्रयुद्धाला अत्यंत अनुकूल असा सह्याद्रीच्या दऱ्या खोऱ्यांचा भूप्रदेश असल्याने महाराजांनी त्याच पद्धतीचा आश्रय करण्याचे ठरवून अनेक शत्रूंना येथेच गारद केले. नम्र बोलून, भ्यालेसे दाखवून शत्रूचा विश्वास संपादन करावयाचा आणि त्यास हुलकावण्या देत हव्या त्या ठिकाणी आणून त्याच्यावर हल्ला करावयाचा.

आक्रमण हेच संरक्षण या तत्त्वाची अंमलबजावणी करून महाराजांनी एका लहानशा जहागिरीपासून सुरुवात करून हिंदवी स्वराज्य स्थापन केले हे त्यांना सतत अखंड आक्रमक धोरणाचा अवलंब केल्यावाचून गत्यंतर नव्हते. वेडे साहस, समयसूचकता व कुशल नेतृत्व इत्यादी दुर्मीळ गुण महाराजांपाशी होते. आदिलशाहीपेक्षा शतपट बलाढ्य अशा मोगलांशी वैर ओढवून घेणे, महाराष्ट्रांत स्वराज्याचा बंदोबस्त पुरता लागलेला नसताना जिंजि वेलोर येथे स्वारी करणे ही वेडी साहसे शिवाजी महाराजांनी केली आणि यश मिळविले. शत्रूची सर्व संपत्ती लुटून आणावी या प्राचीन राजनीतीस अनुसरून महाराजांनी शत्रू प्रदेशातील धनाढ्य शहरांवर छापे घालून अपार द्रव्यसंचय केला. छापे घालण्यापूर्वी त्या त्या शहरांतील

अधिकाऱ्यांना, व्यापाऱ्यांना, सावकारांना ते पत्र धाडून कळवीत असत की तुम्ही आम्हाला सरकारी वसूलाच्या चौथ्या हिश्याइतकी रक्कम म्हणजेच चौथाई, जर बिनतक्रार दिली तर तुम्हाला कसलाच त्रास देणार नाही. ज्या शहराचे लोक त्यांना चौथाई देण्याचे कबूल करत. त्या शहरांना शिवाजी महाराज कधीही उपसर्ग देत नव्हता. अनेक शहरांवर छापे घालून स्वराज्य स्थापनेसाठी अपार धन मिळवावे आणि धनाच्या सहाय्याने मोठी सेना उभारून स्वराज्याची स्थापना केली.[१]

हेर यंत्रणा.— महाराजांच्या सैन्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांची हेर यंत्रणा होय. महाराजांच्या हेरांचे वास्तव्य लष्कर, आरमार, छावण्या, किल्ले, सरकारी खाती इत्यादी ठिकाणी होते. राज्य कारभारास व संरक्षणास आवश्यक असणारी बातमी ते महाराजांना देत असत. एवढेच नव्हे तर शत्रूंच्या दरबारात, त्यांच्या छावण्यात, नगरात व इतर ठिकाणीही महाराजांचे हेर असत. महाराज स्वतःच पुष्कळदा हेरगिरीचे काम करीत. ते वाटेल तो वेष धारण करून हेराचे काम करण्यास कचरत नसत असे फॉरेन बायाग्रॅफीज सांगते, महाराज वेषांतर करण्यात अतिशय पटाईत होते. आग्रा प्रकरणावरून हे दिसून येते. महाराजांच्या पदरी जे अनेक गुप्तचर होते. त्यात बहिर्जी नाईक सर्वश्रेष्ठ होता. सभासद हेर खात्याचे वर्णन देतो " पुढे जितकी शहरे मोगलाईत होती, ते जागा चार-पाच माणसे वेषधारी करून पाळतीस ठेविली. पाळती घेऊन दोघे खबर सांगावयास यावे. दोघानी तेथे हुशार रहावे, मग लष्कर पाठवून हवेली या शहरे मारावी, ही तजवीज केली." महाराज आपल्या हेरांना भरपूर द्रव्य देत असत व त्यायोगे महाराजास यश प्राप्ती होण्यास सुलभ जात असे.

द्रव्य देऊन मित्र कसे मिळवावे हे महाराज उत्तम जाणत होते. द्रव्य देऊन मिळविलेले मित्र महाराजांस सतत माहिती पुरवीत. ह्या युक्तीचा उपयोग महाराजांनी आपली आग्र्याहून सुटका करून घेण्यासाठी केला असे वाटते.

□□

१ खोबरेकर, मराठा अंमलाचे स्वरूप. पृ. ४७.

५२. स्वराज्यातील गड-कोट-दुर्ग

शिवाजी महाराजांचा जन्म दुर्गात झाला. महाराजांना वैभव प्राप्त झाले तेही सर्व दुर्गांच्यामुळे झाले. व त्यांच्या ताब्यातील दुर्गांना जे सामर्थ्य प्राप्त झाले तेही त्यांच्याच प्रयत्नाने झाले. त्यांचे दुर्ग म्हणजे भारतातील त्यांच्या शत्रूंना धाक होता. त्यांच्या राष्ट्राची ती संवर्धन भूमी होती. त्यांच्या विजयाचा तो पाया होता. त्यांच्या वाढत्या महत्त्वाकांक्षेचा तो जिना होता. दुर्ग हेच त्यांचे निवासस्थान आणि तेच त्यांच्या आनंदाचे निधान होते. कित्येक दुर्ग त्यांनी स्वतः बांधले व जे आधी बांधले होते त्या सर्वांना महाराजांनी बळकटी आणली.[१]

शिवकालीं महाराष्ट्रात ३६१ किल्ले होते, असे चित्रगुप्त श्रीशिवछत्रपतींच्या दुर्गांची संख्या देऊन सांगतो. मल्हार रामराव चिटणीस यांनी शिवछत्रपतींच्या दुर्गांची एकंदर संख्या ३१७ दिली आहे. सभासदांच्या परिगणनेप्रमाणे ती संख्या २४० होती.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूसमयी स्वराज्यात एकुण ३६० किल्ले होते. त्यापैकी १४५ महाराजांनी बांधलेले होते. असे रायगडची जीवनगाथा लेखक शां. वि. आवळसकर सांगतात. मराठी रियासत भाग १ शककर्ता शिवाजी पृ. ४१०-४११ वर एकूण किल्ले १४५ यांचा तपशील दिला आहे. तो असा :—

१.	सुभा सातारा	२ किल्ले
२.	सुभा कऱ्हाड	५ किल्ले
३.	सुभा वाई	७ किल्ले
४.	सुभा जावळी	६ किल्ले
५.	सुभा दाभोळ	४ किल्ले
६.	प्रांत खटाव	४ किल्ले

१ डॉ. बाळकृष्ण, शिवाजी दि ग्रेट, भाग २, पृ. ७९.

७.	सुभा माण	१	किल्ला
८.	सुभा राजापूर	१	किल्ला
९.	सुभा पुणे	३	किल्ले
१०.	सुभा मावळ	८	किल्ले
११.	सुभा चौल	१	किल्ला
१२.	सुभा जुन्नर	१	किल्ला
१३.	सुभा पन्हाळा	३	किल्ले
१४.	कोट कोल्हापूर	१	किल्ला
१५.	सुभा कोल्हापूर	४	किल्ले
१६.	सुभा तारळे	१	किल्ला
१७.	प्रांत आजरे	५	किल्ले
१८.	सुभा नवलगुंद	३	किल्ले
१९.	सुभा कोपळ	२	किल्ले
२०.	सुभा बिलगोळी	१	किल्ला
२१.	प्रांत मिरज	१	किल्ला
२२.	सुभा भिमगड	२	किल्ले
२३.	सुभा प्रांत कुडाळ	४	किल्ले
२४.	सुभा राजापूर	३	किल्ले
२५.	सुभा दाभोळ	६	किल्ले
२६.	सुभा प्रांत चौक	४	किल्ले
२७.	सुभा कल्याण	६	किल्ले
२८.	सुभा चौल	३	किल्ले
२९.	सुभा दाभोळ	३	किल्ले
३०.	सुभा जावळी	२	किल्ले
३१.	सुभा राजपुरी	१४	किल्ले
३२.	प्रांत अंकोला	७	किल्ले
३३.	कोट सुपा	१	किल्ला
३४.	रत्नाकर दुर्ग	१	किल्ला
३५.	कोट हळसा	१	किल्ला
३६.	फिरंगाण	२	किल्ले

३७.	सावंताच्या ताब्यात	८ किल्ले
३८.	फोंडे	३ किल्ले
३९.	कोळवण	११ किल्ले
	एकूण	१४५ किल्ले

डॉ. बाळकृष्ण यांनी २/३ बखरीतील याद्या पडताळून पाहून आपल्या शिवचरित्रात शिवाजी महाराजांच्या ताब्यात ३५० किल्ले होते असे लिहिले आहे.[१] स्वराज्यातील जी जी स्थळे महाराजांना दुर्गम व सुंदर वाटली त्या प्रत्येक स्थळी असलेले जुने दुर्ग त्यांनी अधिक उत्कृष्ट बांधले. नवे निर्माण केले व मातीच्या गढ्या पाडून त्याजागी नवीन दुर्ग वसविले. शत्रू व आपल्यातील पुंड लोक यांजवर वचक रहावा हे मनात आणून किल्ले बांधले.

तत्कालीन पाश्चिमात्य लिहितात की, शिवाजी महाराजांनी शिल्पकलेचा सूक्ष्म अभ्यास केल्यामुळे निष्णात शिल्पज्ञ ओळखावयास व कामावर योजावयास त्यांना अडचण नव्हती. दुर्गांची पुर्नरचना करण्याची कला उत्कृष्ट स्थापत्य विशारदांपेक्षाही त्यांना अवगत होती.[२]

किल्ल्यांची व्यवस्था :—महाराजांच्या ताब्यात सुमारे २८० किल्ले होते. हे किल्ले बहुशः अवघड डोंगरावर, राज्यास बळकटी देण्यासाठी व राज्यांच्या संरक्षणासाठी बांधले होते. शत्रूवर मैदानी प्रदेशावर हल्ला करून तो जेरीस येईपर्यंत त्यांच्या हातून निसटून ह्या किल्ल्यांत सुरक्षित येऊन रहाण्याची उत्तम सोय असे. थोड्या लोकांच्या साहाय्याने शत्रूच्या मोठमोठ्या सैन्याशी टक्कर देण्याचे सामर्थ्य ह्या किल्ल्यांच्या योगाने चांगले होत असे. हे किल्ले म्हणजे स्वराज्याचे जीव की प्राण असे महाराजांस वाटे. किल्ल्यावर दाणागोटा, दारूगोळा व इतर निर्वाहाच्या व उपयोगाच्या वस्तू यांचा नेहमी भरपूर साठा असे.

प्रत्येक किल्ल्यावर कुलवंत मर्द शहाणा मराठा हवालदार, त्याच्या हाताखाली एक ब्राह्मण सुभेदार व फडणीस, सारस्वत सबनीस व प्रभू

१ डॉ. बाळकृष्ण, शिवाजी दि ग्रेट, व्हा. २ पार्ट २, पृ. ८१.

२ सेन, फॉरेन बायाग्राफी ऑफ शिवाजी, भा. १, पृ. २४५.

जातीतील कारखानीस असे.[१] हवालदाराकडे किल्ल्याचा एकंदरीत कारभार असे. किल्ल्याच्या दरवाजाची व्यवस्था त्याच्याकडे असे. सुभेदाराकडे मुलकी कारभार असे. आसपासच्या गावांतील वसुलीची व्यवस्था त्याजकडे असे. हा सगळा कारभार त्याने हवालदाराच्या अनुमतीने करावा, सबनीसाकडे किल्ल्यासंबंधीचे लिखाण करण्याचे काम असे. कारखानीसाकडे कोठीची आणि दारूगोळ्याची व्यवस्था असे, तसेच किल्ल्याची दुरुस्ती व इमारतींची देखरेख ठेवण्याचे काम त्याजकडे असे. ह्याप्रमाणे प्रत्येक किल्ल्यासंबंधीची कामे निरनिराळ्या मुख्य जातीच्या हाती ठेवल्यामुळे दगाफटका होण्याची किंवा बंड होण्याची फारशी भीती नसे.

तटाखालील माची : माचीला पेठ असे. ती राखण्यासाठी जागोजागी पेठेकरी ठेवलेले असत. त्यांनी आपल्या चौकीवर रात्रंदिवस राहून आसपास शत्रूंची हालचाल होत असल्यास त्यांच्यावर नजर ठेवावी व तेथले रान राखावे असा शिरस्ता असे. किल्ल्याच्या पायथ्याशी वाटांवर रामोशी, पटवारी, महार, मांग, बेरड वगैरे लोकांच्या चौक्या असत. त्यांनी हर एक प्रकारची बातमी ठेवून काही कमी जास्त असल्यास त्याची वर्दी किल्लेदारास तात्काळ द्यावी व त्यास सावध करावे. सगळ्या हुद्देदारांच्या व अंमलदारांच्या वागणुकीचे जाबते (याद्या) नियम करून ठेवलेले असत. त्याबर हुकूम सर्वांनी वागण्यास कसूर करू नये असा नियम असे. किल्ल्यावरील लोकांस अडसेरी, नगदी वगैरे वेतन वेळच्यावेळी प्राप्त व्हावे, त्यांची नाराजी कोणत्याही कारणाने होऊ नये असा सक्त बंदोबस्त ठेवलेला असे. प्रत्येक किल्ला आसपासच्या तालुक्याचे निसबतीत लावून दिला असून त्यावर सामानसुमानाची भरती करण्याचे काम तालुकादाराने किंवा सुभेदाराच्या सल्ल्याने करावे असे ठरविलेले असे.

महाराजांपाशी तोफखाना होता. प्रत्येक किल्ल्यावर तोफा ठेवलेल्या असत. शिवाय बरोबर चालविण्यासाठी सुमारे दोनशे तोफा गाडीवर घातलेल्या असत. गाडे बैल ओढीत. सुतार, लोहार, चांभार, रस्सीदार, तलफदार, गोलंदाज वगैरे काम करणाऱ्यांचा भरणा असे. प्रत्येक तोफेस गारदी पायदळ असे. तोफखान्यास लागणारा दारूगोळा वगैरे सामान दक्षतेने तयार ठेवावे लागे. ह्या तोफा फिरंगी, फ्रेंच, इंग्रजी वगैरे

---

१ सभासद, पृ. २७-२८.

व्यापाऱ्यांकडून विकत घेऊन त्यांचा संग्रह केला जाई. तोफखान्यावरील गोलंदाजाला सालिना ३० पौंड (१ पौंड = १० रु.) म्हणजे ३०० रुपये किंवा मासिक रुपये २५ पगार मिळे.

शिवकालात महाराजांनी किल्लेबांधणीस व किल्ले रक्षणास फार महत्त्व दिले होते. गडकोटाचे महत्त्व सांगताना अमात्य आपल्या आज्ञापत्रांत लिहितात, "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग (किल्ले) ! दुर्ग नसता मोकळा देश. परचक्र येतांच निराश्रय, प्रजा भग्न होऊन देश उध्वस्त होतो. देश उध्वस्त झाल्यावरी राज्य असे कोणास म्हणावे? याकरता पूर्वी जे जे राजे झाले त्याणी आधी देशामध्ये दुर्ग बांधून तो तो देश शास्वत करून घेतला आणि आले परचक्र संकट दुर्गाश्रयी परिहार केले. अमात्य पुढे म्हणतात, "हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामीनी (शिवाजी महाराजांनी) गडावरून निर्माण केले. जो जो देश स्वशासन वशा न होय त्या त्या देशी स्थळ विशेष पाहून गड बांधिले, तसेच जलदुर्ग बांधले; त्यावरून आक्रमण करीत करीत सालेरी अहिवंतापासून कावेरी तीरपर्यंत निष्कटंक राज्य संपादिले. औरंगजेबासारखा महाशत्रू चालून येऊन विजापूर भागानगरसारखी महासंस्थाने आक्रमिली, संपूर्ण तीस-बत्तीस वर्षे या राज्याशी अतिश्रम केला, त्याचे यत्नास असाध्य काय होते? परंतु राज्यांत किल्ले होते म्हणून अवशिष्ट तरी राज्य राहिले. पुढे पूर्ववत करावयास अवकाश नव्हता..................... गडकोट विरहीत जे राज्य त्या राज्याशी स्थिती म्हणजे अभ्रपटल न्याय आहे याकरिता ज्यांस राज्य पाहिजे त्याणी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वस्तीस्थळे, गडकोट म्हणजे सुख निद्रागार किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राण संरक्षण, असे पूर्ण चित्तांत आणून, कोणाचे भरवशावर न रहाता आहे त्याचे संरक्षण व नूतन बांधण्याचा हव्यास स्वताच करावा, कोणाचा विश्वास मानू नये."[१]

अमात्यांच्या वरील उद्‌गारात शिवाजी महाराजांनी स्वतः आचरिलेले राजनैतिक धोरण दिसून येते.

---

१ अमात्याची राजनिती, पृ. २७-२८.

स्वराज्याच्या प्रदेशात महाराज कोणत्या हेतुच्या सिद्धीस्तव गड बांधीत असत ते वरील उताऱ्यावरून समजते.

शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीच्या अखेरपावेतो दुर्गांचे महत्त्व कायम होते. महाराजांच्या पश्चात औरंगजेबाने प्रचंड सैन्य घेऊन दक्षिणेवर स्वारी केली तेव्हापासून ते त्याच्या (औरंगजेबाच्या) निधनापर्यंत दुर्गांचे महत्त्व शिवकालाइतकेच फार मोठे समजले जात होते.

शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची मजबुती त्याच्या ताब्यातील किल्ल्यांत आहे व त्याचे किल्ले हस्तगत केल्याशिवाय त्याच्या राज्यातील प्रदेशावर आपली राजकीय सत्ता प्रस्थापित करता येणार नाही, हे औरंगजेबाच्या पूर्णपणे लक्षात आल्यामुळे त्याने महाराष्ट्रात पाय ठेवताच, हाताखालील सैन्याधिपतीकरवी शिवाजी महाराजाच्या राज्यातील मजबूत किल्ल्यास वेढे देऊन ते हस्तगत करण्याचा उपक्रम, स्वराज्यांतील एक एक किल्ला हस्तगत करण्यास सुरुवात करून आरंभिला. शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत त्यांने मोगलांची स्वराज्यावर स्वारी केव्हा होईल याचा नेम नसल्यामुळे युद्धोपयोगी सामग्रीने व सैन्याने सज्ज असे आपले किल्ले ठेविले होते. या कारणामुळे औरंगजेबास शिवाजी महाराजांचे किल्ले सर करून ताब्यात घेण्यास बरेच द्रव्य व काळ खर्च करावा लागला. राजाराम महाराजांचे कारकिर्दीत औरंगजेबाने एक एक महत्त्वाचा किल्ला सर केल्यावर तो व त्याचे सैन्य जसजसे दक्षिण दिशेकडे सरकत जात असे, तसतसे राजारामछत्रपतीचे मराठे सरदार औरंगजेबाने हस्तगत केलेले किल्ले मोगलांकडून परत काबीज करीत. अशा रितीने सर्व महाराष्ट्रभर सुमारे पंचवीस वर्षे एक प्रकारचा हुतूतूचा खेळच मराठे व मोगल सैन्य यांचे मध्ये सुरू होता. या खेळाचे पर्यावसन महाराष्ट्र देश काबीज करण्याची औरंगजेबाची आकांक्षा विराम पावून निराशेत तो मृत्यूवश होण्यात झाले. अमात्याच्या आज्ञापत्रातील सुरुवातीस जो उतारा दिला आहे त्यात "परंतु राज्यात किल्ले होते, म्हणून अवशिष्ट तरी राज्य राहिले[१]" या लहानशा वाक्यांत औरंगजेबासारख्या प्रचंड शत्रूच्या कचाट्यातून राजारामछत्रपतीचे कारकीर्दीत स्वराज्याचा बचाव कसा झाला याचे मर्म ग्रंथित केले आहे.

१ प्र. न. जोशी (सं.) आज्ञापत्र प्र ८, पृ. ३१.

दुर्ग हे राष्ट्राचे अगर राज्याचे जे महत्त्वाचे अंग ते जर मजबूत असेल तर प्रचंड अशा परचक्रापासून राष्ट्राचे अगर राज्याचे रक्षण करता येते या गोष्टीचा प्रत्यय राजाराम छत्रपतीचे काळी महाराष्ट्रास उत्तमप्रकारे आला ही गोष्ट निर्विवाद आहे.

किल्ल्यांची बांधकामे : शिवकालीन बांधकामांचा विचार करावयाचा झाल्यास किल्ल्यांचे बांधकाम, किल्ल्यांवरील इमारतींचे बांधकाम, किल्ल्यांची दुरुस्ती, इत्यादी विषय प्रामुख्याने डोळ्यासमोर येतात. कारण संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय प्रजा भग्न होऊन देश उध्वस्त होतो. असे शिवकालीन राजनिति सांगते.[१]

शिवछत्रपतींनी गडावरून राज्य केले. कित्येक नूतन दुर्ग बांधले, जुने दुरुस्त केले, त्यांची तटबंदी भक्कम केली. त्यांना गडकोटांचे महत्त्व किती होते ; गडकोटांच्या बांधणीबाबत त्यांचे काय धोरण होते, त्यांचे सुंदर प्रतिबिंब आज्ञापत्रांत पडलेले आहे. देशोदेशी स्थळे पाहून, किल्ले बांधावे. किल्ल्यांसमीप दुसरा पर्वत असू नये. कदाचित असला तर सुरूंग लावून गडाचे आहारी आणावा. सुरुंगास असाध्य असला तर ती जागा मोकळी न सोडता बांधून मजबूत करावी. तट, बुरूज, चिलखते, पहारे, पडकोट जेथे जेथे असावे ते मजबूत बांधावे. नाजूक जागा ज्या असतील त्या सुरूंगति प्रयत्नांनी अवघड करून पक्की इमारत बांधून गडाचा अैब टाळावा. खालून होऊ शकणारा मारा चुकविता येईल असे दरवाजे बांधावे. दरवाजांचे पुढे बुरुजांचा रोख येताजातानाच्या मार्गावर असेल अशी रचना करावी. गडाचा आकार पाहून एक, दोन किंवा तीन दरवाजे व तशाच चोरदिंड्या कराव्या त्यापैकी ज्यापैकी ज्यांच्यातून रोजचा राबता असेल तेवढेच उघडे ठेवून बाकीचे दरवाजे व दिंड्या चिणून टाकाव्या. भुईकोट किल्ला असेल तर तटाभोवती खोल व रुंद खंदक खणून ठेवावा. गडाची राखण करण्याकरिता झाडी वाढवावी. गडाभोवती नेहमी मेढे असावे. गडाखाली इमारतीचे घर किंवा घराभोवती दगडाचे कुसू कधीही असू न द्यावे. गड बांधताना पाण्याची सोय मुख्यः पहावी, गडावर तळी किंवा टाकी बांधावी. गडावरील मुख्य बांधकाम म्हणजे राजवाडा. राजवाड्याच्या

१ प्र. न. जोशी (सं.) आज्ञापत्र प्र ८, पृ. ३१.

भिंती विटांच्या बांधून त्यांस चुना दाट गच्च द्यावा. उंदीर, विंचू, मुंग्या रहतील अशी फट ठेवू नये. घरास कुसू निर्गुडी आदिकरून झाडांचे पातळ घालावे. दारूखाना घरापासून दूर बांधावा. तो भोवती निर्गुडी आदि करून झाडाचे दाट कुसू घालून बांधावा, त्यात तळघर करावे तळघरात गच करावा. त्याच माच घालून त्यांवर दारूचे बस्ते, मडकी ठेवावी, तटास झाडे वाढली की ती खणून काढावी. तटावरील गवत जाळून टाकावे. गडावरून मात्र झाडे भरपूर वाढवावी. शिवकालीन किल्ल्यांच्या बांधकामाचा हा तपशील पुरेसा बोलका आहे.[१]

बांधकामाची हत्यारे : कुदळी (कुद्दळ), फावडे (खनित्रक), कुऱ्हाड (कुठार), कोयिता (छेदिक), करवत (क्रकच), पहार (फाल), खुरपे (तृणक्षुर) बांधकामविषयक हे एवढे शब्द राज्यव्यवहारकोशात ज्यावेळी येतात, त्यावेळी ते बांधकामाचे एक स्वतंत्र खाते राज्ययंत्रणेत असल्याचे किंवा बांधकाम हा विषय राज्ययंत्रणेचा एक महत्त्वाचा भाग असल्याचे सूचित करतात. सभासदानेही " बारा महाल " आणि " अठरा कारखाने " यांची यादी देताना इमारत (बांधकाम) शिल्पकार्य या खात्याचा समावेश बारा महालात केलेला आहे.[२] इमारत कामावर स्त्रियासुद्धा मजुरीवर ठेवल्या जात असे दिसते.[३]

शिवाजी महाराजांनी पाली प्रांत काबीज केल्यानंतर पूर्वी जे व्यावसायिक किंवा धंदेवाईक लोक बाहेरदेशी पळून गेले होते ते परत येऊन त्या प्रांती सुखाने राहू लागले, त्यांची यादी कवींद्र परमानंदाने दिली आहे. त्यात " पलगण्ड " (गवंडी) व " तक्षाण " (सुतार) यांचाही समावेश आहे.[४] त्याच प्रांतात " विरदुर्ग " नावाचा गड पाहून कारागिरांकडून शिवरायांनी त्यावर उंच तट बांधविले व त्याची भक्कम तटबंदी केली व त्यास " मंडणगड " असे नाव दिले, अशी माहितीही परमानंद देतो.[५]

१ प्र. न. जोशी (सं.) आज्ञापत्र प्र ८, पृ. ३६-३७.

२ साने (स.) शिवछत्रतीचे चरित्र, पृ. ९६.

३ राजवाडे म. इ, सा. खं. ८, ले. ३२०.

४ शिवभारत ३१.१८.

५ कित्ता, ३१.२२.

आता शिवरायांनी केलेल्या विविध बांधकामांचे उल्लेख पाहू. शिवाजी महाराजांनी राजगड हा स्वतः बांधला. तेथे त्यांना आपली राजधानी स्थापावयाची होती असे त्याच्या नावावरून स्पष्ट होते. कारण त्याचे पहिले नाव मुरुमदेव असे होते. या किल्ल्याच्या बांधकामास इ.स. १६४८ त सुरुवात झाली असावी व १६७० पर्यंत ते चालू असावे. वास्तूशास्त्राप्रमाणे पूर्वेकडून आरंभ करण्यात आला. जी माची तेथे बांधली तिला " सुवेळा " असे नाव देण्यात आले. नंतर दक्षिणेचा भाग बांधीत असता अपघाताने दारूखान्याचा स्फोट होऊन तेथील हवालदार दूर उडाला. पण तो वाचला. म्हणून त्या बाजूच्या माचीला " संजीवनी " असे सूचक नाव मिळाले. अफजलखान स्वारीच्या वेळी राजगडावरील बालेकिल्ल्याचे काम सुरू होते. नंतर १६६३ पर्यंत उत्तरेकडील पद्मावती माची बांधण्यात आली. तेथेच महाराजांच्या राजवाड्याची सदर आहे. त्याची वास्तूशांती गुंजवणेकर पुरोहित यांनी केली.[१] या तीन माची शिवाजी राजांनी बांधल्याचा उल्लेख " मासीर-इ-आलमगिरी " या फारशी तवारीखेत आहे.[२]

टॉमस निकल्स हा इंग्रज व्यापारी १६७३ च्या मे महिन्यात शिवाजी महाराजांच्या भेटीसाठी रायगडावर आला होता. त्याने रायगडावरील विविध इमारतींचे व बांधकामांचे वर्णन लिहून ठेवले आहे. तो लिहतो, " वाटेत पायऱ्या खोदल्या आहेत. दरवाजावरील पायऱ्या पक्क्या खडकात खोदल्या आहेत. जेथे टेकडीस नैसर्गिक अभेद्यता नाही, तेथे २४ फूट उंचीचा तट बांधला आहे. चाळीस फुटावर दुसरी भिंत (तटबंदी) बांधून किल्ला इतका अभेद्य बनविला आहे की अन्नपुरवठा पुरेसा असल्यास थोड्या शिंबदीच्या साहाय्याने तो सर्व जगाविरुद्ध लढू शकेल. पाण्यासाठी मोठे तलाव बांधलेले असोन ते पावसाळ्यात भरल्यावर पाणी वर्षभर पुरून उरेल. टेकडीच्या माथ्यावर मोठे शहर वसले आहे. घरे सामान्य प्रतीची आहेत. अत्युच्च जागी शिवाजीचा चौसोपी वाडा आहे. त्यांच्या मध्यभागी मोठी इमारत आहे. तेथून तो कारभार पहातो. "[३]

१ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खं. १, पृ. ११८-११९.

२ मासिरे आलमगिरी, पृ. २८४.

३ इंग्लिश रेकॉर्ड ऑन शिवाजी, भा. १, पृ. २६२..

त्यानंतर आणखी एका वर्षाने (२२ मे १६७४) ऑक्झिन्डेन हा इंग्रज वकील शिवराज्याभिषेकाच्या निमित्ताने रायगडावर आला. त्यानेही रायगडाचे थोडक्यात वर्णन आपल्या रोजनिशीत केले आहे. तो म्हणतो, "गड फितुरीखेरीज अभेद्य असून वर राजमहाल, दरबार, प्रधानांची घरे मिळून सुमारे तीनशे इमारती आहेत.[१]"

शिवाजी महाराजांचे १६७१-७२ चे किल्ल्यांच्या बांधकामासाठी व दुरुस्तीसाठी केलेले एक अंदाजपत्रक उपलब्ध आहे त्यात रायगडासाठी ५०,००० होन, सिंहगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, विशालगड, प्रतापगड, पुरंधर, राजगड या किल्ल्यांसाठी प्रत्येकी १०,००० होन, प्रचंडगड, प्रसिद्धगड, महिपतगड, सुधागड, लोहगड, सबळगड, श्रीवर्धनगड, मनरंजनगड यांसाठी प्रत्येकी ५,००० होन, कोटीगडासाठी ३,०००, सारसगडासाठी व महिधरगडासाठी २,०००, मनोहरगडासाठी १,००० व किरकोळ दुरुस्ती व बांधकामासाठी ७,००० होन असे खर्च करावयाचे ठरवून दिले आहे. अर्थात ही सर्व रक्कम एकाच वर्षी खर्ची पडली असेल असे नाही.[२]

पण १६७२ मध्ये शिवाजी महाराजांनी आपल्या मुलुखात मोठाली बांधकामे सुरू केली असतील असे मुंबईहून सुरतेच्या वखारदारांना गेलेल्या पत्रांवरून स्पष्ट होते. या इमारत बांधकामावरील मजुरांचा रोजगार प्रमाणापेक्षा अधिक वाढवून शिवाजी महाराजांनी येथील त्या मजुरांना मोठ्या प्रमाणात कामे देण्याचा उपक्रम आखला. त्यामुळे देशातील मजुरांना कामे व वाढता रोजगार मिळालाच, पण सुरत व मुंबईकडील वाकबगार समजल्या जाणाऱ्या मजुरांचा ओघ पण शिवरायांच्या बांधकामाकडे जाऊ लागला व सुरत-मुंबईकडे इंग्रजांना मजुरांची चणचण भासू लागली.[३]

यावरून असे दिसून येते की, शिवाजी महाराज आपल्या मजुरांना पुरेसे नियमित वेतन देत होते. नाहीतर मजूर असंतुष्ट राहिले असते व बांधकामे व दुरुस्त्यांची कामे अर्धवट राहिली असती. शिवाजी महाराज उत्तम कारागिरांच्या नेहमी शोधात असत. सिंधुदुर्ग बांधण्यासाठी त्यांनी पोर्तुगीज

१ इंग्लीश रेकॉर्ड ऑन शिवाजी, पृ. ३७२.

२ राजवाडे खड ८, ले. २२.

३ इंग्लीश रेकॉर्ड ऑन शिवाजी, भा. १, पृ. २१५.

कारागिरांची मदत घेतली. जिंजी किल्ल्याची दुरुस्ती करण्यासाठी त्यांनी मद्रास येथील इंग्रज वखारदारांना मजूर पाठविण्याची विनंती केली. सिंधुदुर्ग किल्ल्याच्या बांधकामाचा विस्तृत तपशील चित्रगुप्ताने दिला आहे. पण त्यात वास्तव किती व कल्पनारम्यता किती हे सांगणे कठीण आहे. शिवाय चित्रगुप्त हा समकालीनही नव्हे.

मार्च १६७० मध्ये शिवाजी महाराजांच्या सैन्याने कर्नाळा किल्ल्याला वेढा घातला आपल्या समोरून रक्षणाकरिता फळ्या व चिखल यांच्या भिंती बांधीत बांधीत ते तटाशी जाऊन भिडले व संरक्षणार्थ आपल्यासमोर फळ्या धरू लागले असा इंग्रजी पत्रव्यवहारांत उल्लेख आहे.[१]

मीमले प्रभावळी भागात शिवाजी महाराजांनी पद्मदुर्ग बांधला. हा किल्ला इतका भक्कम होता की, "पद्मदुर्ग वसवून राजपुरीच्या उरावरी दुसरी राजपुरी केली आहे" असे त्यांचेच उद्गार आहेत.[२] एप्रिल १६७५ रोजी शिवाजी महाराजांच्या सैन्याने फोंड्यास वेढा घातला. शत्रूने तोडीस तोड सामना दिला. सुरुंगाचा जबाब सुरुंगाने दिला. तेव्हा स्वतःच्या सैन्याच्या रक्षणाकरिता शिवाजी महाराजांना किल्ल्यापासून १२ फुटांवर भिंत बांधावी लागली. पुढे किल्ला ताब्यात आल्यावर त्याची डागडुजी करण्याचे काम शिवाजी महाराजांनी अण्णाजी सुभेदारावर सोपविले.[३]

एप्रिल १६७६ शिवाजी महाराजांनी दमणजवळ (सुरतेपासून दीड दिवसाच्या अंतरावर) पारनेर नावाची टेकडी घेतली व तिची तटबंदी केली. त्यानंतर पुढील महिन्यांत रामनगरच्या कोळी राजाचा मोड करून सुरतेपासून आठ दिवसाच्या अंतरावर असलेल्या पिंडवोल टेकडीवर मजबूत किल्ला त्यांनी बांधला.[४]

दक्षिण दिग्विजयांत शिवाजी महाराजांनी जिंजी व वेल्लोरचे किल्ले जिंकल्यानंतर शत्रूचे बळ लक्षात घेऊन भविष्यकाळी त्याच्या सर्व एकवटलेल्या सामर्थ्यानिशी प्रतिकार करता यावा म्हणून शिवरायांनी तेथील बंदोबस्तास

१ शिवकालीन पत्रसारसंग्रह, १२०२.

२ राजवाडे खंड ८, ले. ३१.

३ न. चिं. केळकर, डी. व्ही. काळे (सं.), इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी भा. २, पृ. ५.

४ कित्ता, पृ. १६३.

सुरुवात केली. निसर्गत:च दुर्गम असलेल्या जिंजी किल्ल्याची त्यांनी पुनः डागडुजी केली. पहिले तट पाडून नवे तट व बुरूज असे कौशल्याने बांधले की, ते काम हिंदी लोकांचे नसून युरोपीयनांचेच असावे असे वाटू लागले. काही जुने निरुपयोगी किल्ले पाडून त्यांनी कित्येक नवे भुईकोट व किल्ले बांधले. पाश्चात्यांच्या पद्धतीचे अवलंब करून त्यांनी मोठे खडक फोडले, तलाव बांधले आणि युद्धोपयोगी इतर इमारती वगैरे बांधल्या. यासाठी त्यांनी अपार संपत्ती खर्च केली.[१]

कर्नाटकात करावयाच्या या बांधकामाबाबत खुद्द शिवाजी महाराजांनी फोर्ट सेंट जॉर्ज (मद्रास) चा गव्हर्नर लॅघॉर्न याला पत्र लिहिले आहे. त्यावरून त्यांच्या बांधकामाबाबतच्या धोरणाचे महत्त्व पटते. ते लिहितात (ता. २२ सप्टेंबर १६७७) "मी कर्नाटकांत आल्यापासून अनेक किल्ले जिंकले. कित्येक किल्ल्यांत मला नवीन बांधकामे करावयाची आहेत. मोठ्या तोफांचे गाडे कसे करावे आणि सुरूंग कसे लावावे हे जाणणारी माणसे तुमच्याकडे असतील तर आम्हांला अशा लोकांची आणि विशेषत: सुरुंग लावून दगडी भिंती उडविणाऱ्या कसबी लोकांची जरुरी आहे. गोव्याहून व वेंगुर्ल्याहून आलेले सर्व लोक कामामध्ये खपून जाऊन जेव्हां त्यांच्याकडे आणखी माणसांबद्दल विचारणा केली तेव्हा ते सर्व चिनापट्टण व पुलकीतकडे गेल्याचे त्यांनी सांगितले. तेव्हा आपल्या तिकडे (मद्रासला) चौकशी करून सुमारे वीस पंचवीस किंवा निदान दहा पाच सुरुंगे लोक मिळतील तेवढे पाठवावे. त्यांना चांगला तनखा देऊन माझ्या अनेक किल्ल्यांवर त्यांना काम देईन."[२]

कर्नाटक मोहिमेवरून परत आल्यावर शिवाजी महाराजांनी मुंबई बेटानजीक खांदेरी, उंदेरी ही बेटे ताब्यात घेऊन तेथे किल्ला बांधण्याचे ठरविले (ऑगस्ट १६७९) शिवाजी महाराजांच्या या उपक्रमास मुंबईकर इंग्रजांनी प्रखर विरोध केला." " ही बेटे इंग्लंडच्या राजाच्या मालकीची आहेत " असे सांगून बघितले. पण शिवाजी महाराजांनी त्यांना दाद दिली

१ हिस्टॉरिकल मसलनी जेसुईट लेटर्स, पृ. १०-११

२ न. चिं. केळकर, डी. व्ही. काळे (सं.), इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी भा. २, ले. २५१.

नाही. ६ सप्टेंबर १६७९ च्या दरम्यान मराठ्यांचे ४०० बांधकामाचे कामगार खांदेरी बेटावर आले. बेटावर चढण्यासाठी जागा होत्या त्या सर्व बंद करून घेण्यासाठी १ यार्ड उंचीची तटबंदी मराठ्यांनी सुमारे ४७० मजूर लावून व अहोरात्र काम करून बांधून घेतली.[१] मधल्या काळात इंग्रज-मराठ्यांच्या चकमकी सतत चालूच होत्या. इकडे शिवाजी महाराजांनी इंग्रजांशी सामन्याची तयारी ठेवून खांदेरीवरील बांधकाम वेगाने सुरू ठेवले. आखाताच्या बाजूने भिंत बांधण्यासाठी २०० मजूर कामाला लावले होते. १९ डिसेंबर १६७९ पर्यंत या बेटातील तटांच्या भिंतीचे बरेचसे बांधकाम पुरे करीत आले होते. त्यासाठी त्यांचा अहोरात्र परिश्रम चालला होता. ११ जानेवारी १६८० पर्यंत हेन्री-केन्री टेकडीच्या शिखरावर ६ ते ८ फुटाची भिंत चुन्यांत बांधून काढली गेली.[२] खांदेरीस मजबूत किल्ला बांधून तेथे ८०० लोकांची वसाहत शिवाजी महाराजांनी केली. हा किल्ला अशा ठिकाणी बांधण्यात आला की त्याच्या पल्ल्यांतून शत्रूचे कोणतेही जहाज सुटून जाऊ शकणार नव्हते. मधल्या काळात जंजिऱ्याचा सिद्दी मध्ये पडून त्याने उंदेरी ताब्यांत घेतली व त्याने तेथे नवा किल्ला बांधला.[३]

मराठ्यांच्या इतिहासाची साधने या ग्रंथाच्या ८ व्या खंडातील २२ व्या लेखाप्रमाणे इ. स. १६७१-७२ च्या कालखंडात निरनिराळ्या गडांवरील बांधकामाप्रीत्यर्थ महाराजांनी एक लक्ष पंचाहत्तर सहस्र होनांच्या खर्चास मान्यता दिली होती. त्यापैकी पन्नास सहस्र होन त्यांनी स्वराज्याची राजधानी रायगड येथे घरे, तळी इत्यादी बांधण्यासाठी ३५,००० होन व तटांकरिता १५ सहस्र होन, याप्रमाणे योजिले होते व इतर महत्त्वाच्या गडावरील बांधकामासाठी सव्वा लक्ष होनांच्या खर्चास मान्यता दिली होती.

श्रीशिवाजी महाराजांचा गडावर होणारा हा अवाढव्य खर्च त्यांच्या काही मुत्सद्यांना मान्य नव्हता असे म्हणतात. त्यांनी एकदा साहस करून ती गोष्ट महाराजांच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला. महाराजांनी त्यांचे त्यांना योग्य उत्तरही दिले. शिवदिग्विजयात म्हटलें आहे :—

" असें असतां, किल्ल्याचे हिशेब इमारतीचे आले. ते मोरोपंत पेशवे व निराजीपंत मुजूमदार यांनी पाहून, महाराजांस विनंती करते जाले की,

१ इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी, ले. ३७०.

२ कित्ता, ले. ४७२.

३ कित्ता, ले. ४७२.

"किल्ल्याचे इमारतीस पैका फार लागतो व लोकांचाही खर्च फार वाढतो. याकरिता विचारें जे करणें असेल ती आज्ञा असावी ; म्हणजे ठीक पडेल". हें ऐकून "दौलत आहे" जें करवणे ते समजोनच करावीत आहों. आपणांस धर्मस्थापना करणें व राज्य संपादणे, सर्वांस अन्न लावून, शत्रूप्रवेश न होय, तें किल्ल्यामुळे होते. सर्वांचा निर्वाह आणि दिल्लींद्रासारखा शत्रू उरावर आहे ; तो आला तरी नवे जुने तीनशे साठ किल्ले हजेरीस आहेत. एक एक किल्ला वर्ष वर्ष लढला तरी, तीनशे साठ वर्षे पाहिजेत. मसलत पडेल तेथे कुमक करून, शत्रूस पाहता दुसरा लाविला असतां शेकडो वर्षांनी राज्य जाणार नाही. दोन रुपये कमजास्त खर्च हा प्रपंच नव्हे, आदा पाहून करावा हे राज्यभाराचे विचार अल्पकार्याकरिता, कोट्यवधी खर्च करून हजारों माणसे, उत्तम प्रकारची मारवावी आणि केली योजिली गोष्ट सिद्धीस न्यावी. राज्यांत सावकार हेच जामदारखाना ; वख्तशीर घेऊन फेड करावी, असे आहे. तुम्हांस किती सांगावे ? असें सांगोन पुढे इमारत चालती करण्याची परवानगी देऊन चालविते जाले.[१]"

यावरून शिवछत्रपतींचा दुर्गविषयक दृष्टिकोन सुस्पष्ट होतो. शिवछत्रपतींचा प्रत्येक दुर्ग त्यांच्या प्रत्यक्ष स्वामित्वाखाली म्हणजे मध्यवर्ती सत्तेच्या स्वामित्वाखाली होता. कोणत्याही वतनदार अथवा जहागीरदाराला स्वतंत्र गड बांधणे तर लांबच राहिले पण आपल्या निवासस्थानाभोवती साधी गढी बांधायलाही अनुज्ञा नव्हती. प्रत्येक गडावर सरकारी सैन्य असे व प्रत्येक गडाच्या कारभाराची स्वतंत्र व्यवस्था होती.

गडावरील सैन्यात चैतन्य निर्माण करण्याचे धोरण महाराजांनी ठरविले. क्षात्रधर्माचे पालन करणे हे सैनिकांचे आद्यकर्तव्य त्यांच्या मनावर ठसविण्यासाठी मुद्गल कवीच्या रामायणातील युद्धकांडाचे पारायण प्रत्येक किल्ल्यावर शिबंदीच्या लोकांत दररोज रात्री जेवण झाल्यावर वाचले जाई. अशा रीतीने युद्धकांडाची पारायणे किल्ल्या-किल्ल्यातून होत राहिल्यामुळे मराठ्यांचा क्षात्रधर्म जागृत झाला.[२]

□□

१ श्रीशिवदिग्विजय (बगेदा, ई १८९५) पृ. १९०-९१

२ खोबरेकर, मराठा अमलाचे स्वरूप, पृ. ४६.

५३. आरमार

शिवाजी महाराजांच्या सुरुवातीला हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील सर्व व्यापार मोगलांच्या व विजापूरच्या सुलतानांच्या स्वामित्वाखालील जहाज मालक असलेल्या भारतीय व्यापाऱ्यांच्या हातात होता. परंतु युरोपीयन लोकांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी पश्चिम किनाऱ्यावरील बहुसंख्य महत्त्वाच्या बंदराचा ताबा घेतला. डचांनी आपले वेंगुर्ला येथे वर्चस्व स्थापन केले होते. पोर्तुगिजांच्या हातात वसई, चेऊल, दमण व गोवा ही बंदरे होती. सिद्दीकडे कुलाबा जिल्ह्यातील जंजिरा होते. आणि ब्रिटिशांच्या मुंबई, कारवार, सुरत, वगैरे ठिकाणी व्यापारी पेठा होत्या. परदेशी नाविक सत्तांबरोबर त्यावेळी त्या परिस्थितीतसुद्धा मुकाबला करणे शिवाजी महाराजांस केवळ अशक्य होते. कारण त्यांचे स्वतःचे असे नौदल नव्हते आणि म्हणून शिवाजी महाराजांस जहाज बांधणीचा कार्यक्रम सुरू करणे क्रमप्राप्त झाले. त्यांनी हा आपला कार्यक्रम सर्व अडचणींवर मात करून पूर्ण केला.

कोकण जिंकल्यावर शिवाजी महाराजांच्या लक्षात आले की, ठाणे व कुलाबा जिल्ह्यात विविध प्रकारची झाडे असलेली मोठी अरण्ये असून ही अरण्ये डोंगराच्या उतारावर व डोंगरमाथ्यावर आहेत. या अरण्यात होणारे प्रमुख लाकूड वृक्ष म्हणजे सागवान. आणि कुलाबा सागवानी लाकूड हे मलबार सागवानी लाकडाच्या खालोखाल समजले जात असे. सागवानी लाकूड जहाज बांधणीसाठी वापरले जाते कारण ते टिकाऊ असते व आखूड होत नाही किंवा कुजत नाही. कल्याण भिवंडीला जहाज बांधणीचे धंदे सुरू करता आले ते याच कारणांमुळे म्हणजे इथल्या सागवानी लाकडाच्या उच्च दर्जाविषयी ईस्ट इंडिया कंपनीलासुद्धा माहिती होती तसेच शिवाजी महाराजांच्या या प्रदेशातून ती मिळविण्याची कंपनीची इच्छा होती.

जहाज बांधणीचा उद्योग शिवाजी महाराजांनी इ.स. १६५३-१६८० या काळांत फार मोठ्या प्रमाणांवर केला. एकंदरीत ४५ प्रकारची वेगवेगळी

जहाजे किंवा नौका होत्या. त्यापैकी महत्त्वाच्या नौकांचे तपशील खाली दिले आहेत. नौदलांतील गुराबी युद्धनौका तोफांनी सज्ज असत. त्यांना दोन डोलकाठ्या असून त्यांची गती संथ असे. गलबते ही जलद प्रवासासाठी तयार केलेली असून शिबार ही व्यापारी जहाजे होत. मंच जातीची जहाजे व्यापारी शिबाराहून अधिक मजबूत बांधणीची असत. तरांडे हे मोठे जहाज. गोलाकार ३ ते २० टन वजनाचे आणि दोन डोलकाठ्या असलेले मचवे असत. सपाट तळ, चौरसकृती वसम (Stern) व २ डोलकाठ्या असलेले पण डेक नसलेले शिबार असे, सभासदाने दर्यासारंग मुसलमान व मायनाक भंडारी जातीचा हिंदू होता असे म्हटले आहे.

परंतु मुंबई इंग्रजांनी दि. २१ नोव्हेंबर १६७० रोजी लंडनला पाठविलेल्या पत्रांत, मराठ्यांचा नौदलाध्यक्ष सारंग असून त्यास दर्यासारंग असे सामान्यतः म्हणण्यात येते असे म्हटले आहे, तर १९ सप्टेंबर १६७९ रोजी मुंबईहून पाठविलेल्या पत्रात नमूद केले की, कल्याणला शिवाजी महाराजांनी एका साध्या अशा नौदलाची कोनशिला बसविली. या कामात त्याने पोर्तुगिजांची मदत घेतली. जहाज बांधणीत तरबेज असलेल्या पोर्तुगीज कारागिरांच्या मार्गदर्शनाखाली लढाऊ जहाजे बांधणीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. पोर्तुगीज जहाज बांधणीकराच्या हाताखाली तीनशे चाळीस पोर्तुगीज व इतर कामगार काम करीत होते. १६५६ साली शिवाजीचे नाविक दल हे इतके विस्तृत झाले की, त्यामुळे पोर्तुगीज धास्तावून गेले आणि पोर्तुगीज व्हाइसरॉयने पोर्तुगालच्या राजाला लिहिलेल्या एका पत्रांत असे लिहिले आहे की, शिवाजी महाराजांनी वसई जिल्ह्यात आता भिवंडी, कल्याण व पनवेल या बंदरात लढाऊ जहाजे बांधण्यास सुरुवात केली.

अमात्यांच्या म्हणण्यानुसार शिवाजी महाराजांच्या मते नौदल हे मराठा राज्याचे एक स्वतंत्र अंग आहे. सागरी सार्वभौमत्व हे शिवाजीच्या नौदलाचे मुख्य लक्ष्य किंवा ध्येय होते. इ.स. १६५७ व १६५९ च्या दरम्यान शिवाजी महाराजांनी आपले नौदलातील पहिल्या जहाजाचे सुकाणू कल्याणच्या खाडीत चालू केले होते. पुढील दोन वर्षात या प्रवेशाच्या कमकुवतपणाने शिवाजी महाराजांचे लक्ष वेधून घेतले.

कोकण किनारा ताब्यात घेतल्यावर शिवाजी महाराजांनी अनेक जहाजे बांधली जेणेकरून त्याचे नौदल विस्तारित झाले. निसर्गानेही मराठी नौदलाच्या वाढीला साहाय्य केले. असंख्य खाड्यांनी कात्रीसारखा झालेला कोकण किनारा हा जहाजांना उत्तम प्रकारचा किनारा होता. सैन्य असलेले किल्ले शत्रूपासून संरक्षण पुरवीत असत. त्यामुळे नौदल उभारणे शिवाजी महाराजांस सोपे गेले. तसेच प्रजेला शत्रूपासून संरक्षण देणे आणि बंदराची भरभराट करणे त्यांना शक्य झाले.

जंजिऱ्याच्या सिद्दीबरोबर नाविक सत्ता म्हणून त्याचा पहिला मुकाबला झाला. शिवाजी महाराजांच्या नौदलाच्या पथकांनी आणि भूमिदलांनी सिद्दीवर हल्ला चढविला. तळे, घोसाळे आणि रायरी येथील किल्ले शिवाजी महाराजांनी जिंकून घेतले. जंजिरा येथील कोटही सर करण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला पण निष्फळ ठरला.

हिंदी महासागरात आपले स्थान दृढ करण्याच्या प्रयत्नात असलेल्या युरोपियन सत्तांबरोबरही शिवाजी महाराजांचा संघर्ष झाला. या युरोपियन सत्ता एकमेकांचा मत्सर करीत असत आणि आपल्या शत्रूला नामोहरम करण्यासाठी शिवाजी महाराजांचे साहाय्य घेण्यास ते मागे पुढे पहात नसत. जंजिरा काबीज करण्यासाठी डचांनी शिवाजी महाराजांस मदत देऊ केली होती. मात्र त्यांस एक अट होती की, या मोबदल्यात शिवाजी महाराजांनी त्यांस मुंबई काबीज करावयास मदत करावयाची.

हिंदी महासागर हा फक्त त्यांच्या रहदारीसाठी आहे असे पोर्तुगिजांना वाटत होते. त्यांच्या परवानगीशिवाय त्याचा कोणी वापर करू नये असे त्यांचे मत होते. जी जहाजे पोर्तुगिजांचा परवाना असलेले कागदपत्र न घेता प्रवास करतील त्यांना तो स्वतःच्या जबाबदारीवर करावा लागत असे. हे परवाने किंवा पोर्तुगीज भाषेत त्यांना कार्ताझ म्हणत असत ते स्वस्त दरात विकले जात असत. पण परवानाधारकांवर अत्यंत जाचक असे निर्बंध घातले जात असत. त्याप्रमाणे पोर्तुगीज जो माल केवळ आपली मक्तेदारी आहे असे समजत असत त्या मालाची खरेदी-विक्री करण्याची त्यांना मनाई होती. ख्रिश्चन गुलाम जहाजातून न्यायचे नाहीत. अशी त्यांच्यावर सक्ती होती आणि पोर्तुगिजांच्या शत्रूच्या कोठल्याही बंदरांत भेट देण्याची त्यांस बंदी होती. ज्या जहाजांजवळ कार्ताझ (परवाने) नसायची

ती जहाजे पकडली जाण्याची शक्यता असायची आणि पुष्कळदा तशी ती पकडली जातही असत, व त्यांच्याकडून जबरदस्त दंड वसूल केला जात असे किंवा क्वचितप्रसंगी ती जहाजे बुडविली जात असत, हिंदी राजांना व मोगल बादशहालासुद्धा कार्ताझ (परवाना) च्या बाबतीत सूट नव्हती. प्रत्येक जहाज तपासणीचा हक्क पोर्तुगिजांनी राखून ठेवला होता. एखादा नौदलाच्या कॅप्टनच्या हुद्याचा माणूस समुद्रात जाणाऱ्या कोणत्याही जहाजाला थांबवून त्याची झडती घेऊ शकत असे. कार्ताझ (परवाना) मिळाल्याशिवाय हिंदी व्यापारी समुद्र प्रवासाला निघण्याचे धाडस करीत नसत. पोर्तुगिजांव्यतिरिक्त सिद्दी हा फार ताकदवान होता. मराठा राज्याचा कट्टर असा शत्रू होता. मराठ्यांच्या किनाऱ्यावरून जाताना तो नेहमी तोफखाना व हत्यारे बाळगीत असे. त्याची लुटमार थांबवून, उपासमार करून, अरबी समुद्रावर सार्वभौमत्व स्थापन करण्याच्या उद्देशाने शिवाजी महाराजांनी नौदल उभारण्याचा प्रयत्न केला.

जंजिरा जिंकून आपली अधिसत्ता सागरापर्यंत पोहचविण्याची शिवाजी महाराजांची महात्त्वाकांक्षा होती. त्याप्रमाणे आरमारासाठी जहाजे बांधण्याचाही त्याचा विचार होता. ही जहाजे पुढील प्रकारची होती. गुराब, तारंडी, गलबत, दुबारे, सिबाडे, पगार मचवा, वाभोर, तीरकती व पाल. या वेगवेगळ्या प्रकारच्या जहाजांपैकी चारशे ते पाचशे बांधून झाली होती व त्यासाठी पाच ते सहा लाख खर्च आला होता. आरमारामध्ये लढाऊ वृत्तीच्या लोकांना घेण्यात आले होते.

युरोपियन (टोपीकर) लोकांचा समुद्रात संचार होता. त्यांच्यावर हल्ले करण्यात आले आणि त्यांची जहाजे व माल लुटण्यात आला. ही सगळी लूट सरकारी तिजोरीत जमा करण्यात आली. आरमाराचा प्रचंड खर्च या पैशातून केला जाई. राजापूरला शिवाजी महाराजांनी तीन शिडाची गलबते बांधली आणि मस्कत व इतर ठिकाणी गलबतातून व्यापार सुरू केला. शिवाजी महाराजांच्या कल्याणच्या सुभेदाराने मस्कत व मोचा येथे मिठाचा व्यापार करण्यासाठी एक मोठे गलबत बांधले.

चित्रगुप्तानुसार शिवाजी महाराजांनी आरमारासाठी ६४० गलबते बांधली. यातील ३० मोठ्या आकाराची "गुराब" गलबते होती. ही गलबते म्हणजे पश्चिम किनाऱ्यावरील वैशिष्ट्यपूर्ण जहाजे होती. सुमारे ३०० मध्यम आकाराची व इतर लहान होती. यांत रोनाद, पल, मचवा, जुगवे इतर यांचा समावेश होता.

शिवाजी महाराजांचे आरमार व सिद्दीचा जंजिरा :

शिवाजी महाराजांच्या आरमाराची उत्पत्ती जंजिऱ्याच्या सिद्दीमुळे झाली. जंजिरा म्हणजे पाण्यातला किल्ला. अरबी शब्द जझीरा म्हणजे बेट या शब्दाचा अपभ्रंश होय. कोकणांत महाड दासगांवावरून सावित्री नदी बाणकोटाजवळ समुद्रास मिळते. ही नदी रत्नागिरी जिल्ह्याची उत्तर हद्द व जंजिरा संस्थानची दक्षिण हद्द होय. सावित्रीच्या मुखाजवळ दक्षिण बाजूस बाणकोट व उत्तर बाजूस हरेश्वर व श्रीवर्धन हीं प्रसिद्ध स्थळे आहेत. तेथून किनाऱ्या किनाऱ्याने मुंबईकडे जाऊ लागले म्हणजे थोड्या अंतरावर दुसरी एक खाडी लागते, ती राजपुरीची खाडी. ह्या खाडीच्या उत्तर टोकावर राजपुरी नावाचे लहानसे गाव असून ते मराठेशाहीच्या वेळी आरमाराचे ठाणे होते. राजपुरी खाडीच्या मुखाजवळ समुद्रात एक अवघड बेट असून त्याजवर मजबूत किल्ला आहे, तोच जंजिरा ह्या विशेष नावाने प्रसिद्ध आहे. तेथून पुढे आणखी उत्तरेस जाऊ लागले म्हणजे रेवदंड्याची खाडी लागते. तिच्या उत्तर बाजूस रेवदंडा व चौल ही ठिकाणे व दक्षिण बाजूस कोर्लाईचा किल्ला आहे. चौलच्या उत्तरेस थोड्या अंतरावर अलिबाग शहर मुख्य किनाऱ्यावर आहे, तेथील किल्ल्यास कुलाबा म्हणतात. कुलाबा व मुंबई यांचे दरम्यान समुद्रात दोन अवघड बेटे आहेत त्यास खांदेरी व उंदेरी अशी नावे आहेत. जंजिरा प्रांतास हबसाण असेही नाव आहे. निजामशाहीचा संस्थापक अहमद निजाम-उल्-मुल्क याने सन १४९० त दंडाराजपुरी व जंजिरा ही ठिकाणे घेतली व याकुतखान सिद्दी यास तेथील बंदोबस्ताचे काम सांगितले. तेव्हांपासून जंजिरा येथे या हबशी सरदारांचे हाताखाली निजामशहाचे आरमार राहू लागले. जलमार्गाने परदेशांशी चालणाऱ्या व्यापारावर देखरेख ठेवावी आणि मक्केस जाणाऱ्या यात्रेकरूंची ने-आण करावी, ही दोन कामे ह्या आरमाराने करावयाची होती. सन १५७१ त खाडीच्या मुखाशी असलेल्या ओसाड खडकावर

हबशी सरदारांनी जंजिरा किल्ला बांधला. सन १६२१ त सिद्दी अंबर नावाचा एक हबशी सरदार निजामशहाचे वतीने जंजिरा येथील आरमारावर मुख्य झाला. तो ते काम पाहत असता सन १६३६ त जंजिरासुद्धा कोकण प्रांत विजापुरकरांकडे गेला, तेव्हा सिद्दी अंबर हा विजापूरचा ताबेदार झाला. आदिलशहाने जंजिऱ्याचे अधिकाऱ्यास "वजीर" हा किताब दिला. अंबर सिद्दी सन १६४६ त मरण पावल्यावर त्याचा मुलगा सिद्दी युसूफ हा जंजिऱ्याचा अधिकारी झाला. तो सन १६५५ त मरण पावला, तेव्हा फत्तेखान सिद्दीकडे ते काम आले. त्याचे हाताखालील सिद्दी संबूळ, कासम व खैर्यत हे तीन अधिकारी मराठ्यांचे कट्टे वैरी बनले. फत्तेखान इ. स. १६६७ त मरण पावला. सरहद्दीचा बंदोबस्त ठेवणे हे राज्य संरक्षणाचे मुख्य काम असल्यामुळे कारवारपासून सुरतपावेतो पश्चिम किनाऱ्यावर आपणांस कोणी शत्रू नसावा, अशी व्यवस्था शिवाजी महाराजांस करावयाची होती. हा हेतू सिद्धीस नेण्यास एका सिद्दीचीच काय ती अडचण त्यास उत्पन्न झाली. म्हणून सिद्दीचा पाडाव करणे शिवाजी महाराजांस क्रमप्राप्त झाले; आणि त्यातूनच त्यांच्या आरमाराची उत्पत्ती झाली.

ता. ३१ जुलै १६५७ रोजी जंजिरा काबीज करण्यास शिवाजी महाराजांनी निळोपंत व रघुनाथपंथ यांजबरोबर आरमार व फौज देऊन पाठविले.[१] आरमारावर दर्यासारंग, दौलतखान व मायनाक भंडारी हे नाविक अंमलदार होते. ह्या स्वारीत सिद्दीची व मराठ्यांची जंजिरा किल्ल्याचे सभोवार निकराची लढाई होऊन मराठ्यांचा मोड झाला आणि ते वेढा उठवून परत आले.[२]

त्याच साली शिवाजीमहाराजांनी कल्याण प्रांत हस्तगत केला तेव्हा दक्षिणेकडे वळून त्यानी बिरवाडी, सुरगड, तळा घोसाळा, सुधागड, कांगोरी व रायरी हे किल्ले व त्याखालील प्रदेश काबीज केला, त्यामुळे सिद्दीची किफायत पुष्कळ कमी झाली. पुनः सन १६५९ च्या पावसाळ्यात शिवाजी महाराजांनी अण्णाजी दत्तोंचा भाऊ व्यंकोजी दत्तो याबरोबर दुसरी फौज जंजिऱ्यावर पाठविली आणि मागून मोरोपंत पिंगळे यासही व्यंकोजीच्या मदतीस पाठविले. दर्यासारंग व दौलतखान यांनी नवीन उत्कृष्ट आरमार

१ सरकार, शिवाजी, पृ. ४३.

२ कुलाबा गॅझेटीअर पृ. ८२.

वाढवून जंजिऱ्यास वेढा घातला आणि लढाईचे काम निकराने चालविले. सिद्दी खैर्यतही मोठ्या शिकस्तीने लढला. तेव्हा नाइलाजाने शिवाजी महाराजांना दंडराजपुरी देऊन सिद्दीने तह केला.[१] फक्त पाण्यातला जंजिरा तेवढा त्याच्या हाती राहिला. शिवाजी महाराजांनी लगेच जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था ठरवून व्यंकोजीपंताला सुभेदार नेमिले आणि त्याचे हाताखाली सिद्दीच्या बंदोबस्तासाठी सात हजार फौज कायमची ठेवून दिली.[२] परंतु त्याचवेळी शिवाजी महाराजांवर अफझलखान चालून आल्यामुळे त्याचे सिद्दीवरील दडपण काही काळ नाहीसे होऊन पुढे आठ वर्षेपावेतो सिद्दीने आरमाराच्या जोरावर दक्षिणेकडील शिवाजीच्या मुलूखास उपद्रव मांडिला.[३] ते पाहून भरपूर आरमार असल्याशिवाय आपला ताबा कोकण प्रदेशावर बसणार नाही अशी शिवाजी महाराजांची खात्री झाली, आणि मध्यंतरीच्या काळात त्याने आपले स्वतःचे आरमार तयार केले. लहान मोठी चार-पाचशे जहाजे बांधून, त्यांचे मुख्य ठिकाण कुलाबा हे केले. तसेच सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग येथेही काही जहाजे ठेवून दिली. त्या सर्वांवर दर्यासारंग इब्राहीमखान व मायनाक भंडारी हे दोन मुख्य सरदार नेमून त्यांचे हाताखाली कोळी खलाशी व तोफा वगैरे सज्ज करून बंदोबस्त केला. ह्या आरमारामुळे पोर्तुगीज लोकांवरही शिवाजी महाराजांचा वचक बसला. त्यांनी आपला वकील शिवाजी महाराजांकडे पाठवून तह केला की शिवाजीने पोर्तुगीज मुलूखास उपद्रव करू नये आणि त्यांनी तोफा, दारूगोळा वगैरे सामान शिवाजीस पुरवावे.[४] अशा रीतीने लवकरच शिवाजी महाराजांनी आपलाच वचक चहूकडे बसविला. इ. स. १६६४ पासूनच इंग्रजांना शिवाजी महाराजांच्या आरमाराची भीती पडू लागल्याचे उल्लेख आढळतात.

इ.स. १६६५ त जयसिंहाने शिवाजीमहाराजांवर मोहीम सुरू केली, तेव्हा त्यास आरमाराची अत्यंत जरूर भासली, आणि सिद्दीला त्याने मोगल बादशहाचा आधार देऊन शिवाजी महाराजांवर उठविले. सुरतेच्या बंदरातून

१ ग्रँट डफ, मराठ्यांचा इतिहास, भा. १. पृ. ३१.

२ ज. सरकार, शिवाजी, पृ. ५८.

३ कुलाबा गॅझेटीअर, पृ. ८२.

४ खोबरेकर, कोकणचा राजकीय इतिहास, पृ. ११५.

मक्केस जाणाऱ्या यात्रेकरूंची ने-आण सिद्दीने करावी असे जयसिंहाने बादशहाचा हुकूम आणून ठरवून दिले, तेव्हापासून सिद्दी हे हळूहळू मोगल बादशहाचे आरमारी सरदार बनले; आणि विजापूरशी त्यांचा संबंध होता तो बहुतेक सुटला.

सिद्दीला मोगल बादशहाचा ॲडमिरल झाल्यावर पश्चिम किनाऱ्यावर त्याला सत्ता समतोल राखण्यात बराच भाव चढला. मराठ्यांशी व पाश्चात्त्य सत्तांशी समुद्रावर भांडण्यास सिद्दी तुल्यबळाने उभा ठाकला. शिवाजी महाराजांस यामुळे जंजिऱ्यावर हल्ला करून जंजिरेकरांचा पाडाव करता आला नाही. मोगलांच्या समर्थ पाठिंब्यामुळे सिद्दीची कोकण किनाऱ्यावर अनिर्बंध सत्ता गोवा ते गुजरातपर्यंत नांदू लागली. म्हणून शिवाजी महाराजांच्या हयातीत मोगलांची सत्ता सिद्दीच्या आरामारामुळे दक्षिणेत राहिली. तसेच औरंगजेब बादशहाने दक्षिण विजयाचा कार्यक्रम इ. स. १६८१ ते १७०७ कालात घेतला त्यासही सिद्दीच्या नाविक दलाची मदत फारच झाली.

सिद्दी मोगलांचा आरमाराधिपती झाल्यावर शिवाजी महाराजांनी आपले आरमार उभारले. जानेवारी १६६४ मध्ये सुरतवर आरमारी स्वारी केली. नाविक दलाला पाहून सुरतेच्या मोगल अधिकाऱ्याने पळ काढला ; आणि तो सुरत किल्ल्यात लपून राहिला. ह्या स्वारीतून महाराजांस फार फायदा झाला नाही. त्यानी आपले आरमार घेऊन इ. स. १६६५ मध्ये आणखी एकदा सुरतवर हल्ला केला. यावेळी मोगल गव्हर्नरने इंग्रजांची मदत मागितली व त्या मोबदल्यात सुरतचा एक वर्षाचा वसूल इंग्रजांस लावून दिला.

दरवर्षीच्या पावसाळ्यात मुंबई बंदरात मोगलांचा नाविक ताफा आणि सिद्दीचे आरमार मुक्काम करीत असे. ही पद्धत इ. स. १६७२, १६७३, १६७४ सालापर्यंत इंग्रजांनी चालू दिली. नंतर ते सिद्दीच्या वाढत्या आरमारी सत्तेचा हेवा करू लागले. एकदम परवानगी नाकारावी तर मोगलांचा रोष पत्करावा लागतो. हेही त्यांच्या लक्षात आले. म्हणून इंग्रजांनी सिद्दीस माजगाव बंदरात आपली जहाजे उभी करण्यास सांगितले. त्या समोरील खंदेरी-उंदेरीवर शिवाजी महाराजांचे आरमार होते. सिद्दीच्या व मराठ्यांच्या

आरमाराच्या चकमकी झडू लागल्या. इंग्रजांनी सिद्दीस माजगावला राहण्याची परवानगी दिल्यामुळे इंग्रज सिद्दीस साहाय्य करतात असा संशय शिवाजी महाराजांनी घेतला व इंग्रजास जाब विचारला. गव्हर्नर आंजीयर याने या आक्षेपाचे निरसन करण्याचा प्रयत्न केला.

इ. स. १६७२ त शिवाजी महाराजांच्या आरमारावर सिद्दी संबाळने आरमाराच्या मदतीने जैतापूरजवळ हल्ला केला. जैतापूर हे राजपूर नदीच्या तोंडावर आहे. ह्यात मराठ्यांची बरीच नुकसानी झाली.

पुन्हा त्याच वर्षाच्या हिवाळ्यात मुंबईकर इंग्रजांनी सिद्दीच्या आरमारास मुंबई बंदरात आसरा दिला. हे पाहून शिवाजी महाराज चिडले. इंग्रजांची स्थिती मोठी विचित्र झाली होती. सिद्दीस आश्रय न द्यावा तर त्यांच्या बंदरांतून व मुलूखांतून आपण व्यापार करतो. ते मोगल आपला व्यापारी परवाना रद्द पाडतील. बरे मराठ्यांना दुखवावे तर ते त्यांचे तेल व अन्न सामुग्री बंद करतील.

मुंबईकर इंग्रज सिद्दीस मराठ्यांविरुद्ध मदत गुपचूप करत असत. हे शिवाजी महाराजांस कळताच त्यांनी इंग्रज गव्हर्नर आंजीयर यास जाब विचारला.

शिवाजी महाराजांचे गव्हर्नर आंजीयरच्या सांगण्याने समाधान झाले. त्यांनी आपला प्रधान मोरोपंत पिंगळे याजबरोबर भले मोठे आरमार देऊन त्यास सुरतेवर रवाना केले. सुरतेचे आरमार मोगलांच्या हुकूमाने बांधले होते. त्याचा नाश करण्याचे मुख्य उद्दिष्ट मोरोपंत पिंगळ्यांच्या स्वारीचे होते. मोरोपंताने आपला मुक्काम मुंबईच्या नजीक केला. इंग्रजांनी सिद्दीच्या आरमारास आश्रय देण्याचे नाकारले. तेव्हा सिद्दी रागाने जंजिऱ्याचा आश्रय घेण्यासाठी गेला. पण जंजिरा बंदरात सिद्दी उतरू शकत नव्हता कारण त्यावेळी जंजिरा मराठ्यांनी वेढला होता.

इंग्रजांची आपल्याला मदत मिळत नाही हे हेरून सिद्दीने सुरतेकडील मोगलांच्या आरमाराची मदत मागितली. सिद्दी संबळच्या या विनंतीप्रमाणे औरंगाजेबाने सुरतच्या मोगल गव्हर्नरास हुकूम पाठवून सिद्दी कासिमच्या अधिपत्याखाली मोगल आरमार रवाना केले. ह्या आरमाराकडे भरपूर दारूगोळा होता. काही माणसे मुंबई बंदरात सोडून हे आरमार शिवाजी महाराजांच्या आरमारावर चालून गेले. दोन्ही आरमारांची गाठ वेंगुर्ल्यानजीक

पडली. आरमारी लढाई जुंपली त्यात सिद्दी कासमच्या अधिपत्याखालील आरमाराने वेंगुर्ला जाळले. मराठ्यांना हार खावी लागली. या लढाईत सिद्दीकडे २ लढाऊ जहाजे, ५ फ्रीगेट, आणि दोन हजार आरमारी लोक होते. शिवाजी महाराजांकडे गुराबे होती. शिवाय गलीवट आदी करून एकंदर ५७ जहाजे होती.

राज्याभिषेकाच्या वेळी शिवाजी महाराजांचे आरमार बरेच प्रचंड होऊन युद्धसामुग्रीचा संग्रहही चांगला झाला होता. त्याचा उपयोग शिवाजी महाराजांस तर झालाच, पण पुढे संभाजी महाराजांनी या आरमाराच्या मदतीने पुष्कळ विजय संपादिले. तथापि सिद्दीला पश्चिम किनाऱ्यावरून साफ उखडून देण्याची शिवाजी महाराजांची मनीषा तृप्त झाली नाही. "घरांत जैसा उंदीर तैसा आमचे राज्यास सिद्दी" असे शिवाजी महाराज नेहमी म्हणत असत तेच सर्व मराठेशाहीत परिणामास आले.

समुद्रावर जहाजे ठेवून आपली सत्ता वाढविण्याची शिवाजी महाराजांस अनिवार इच्छा होती. इंग्रज म्हणत, "तो स्वतः खलाशी नव्हता म्हणून बरे, नाही तर त्याने जमिनीचा पृष्ठभाग साफ करून टाकिला, त्याप्रमाणेच समुद्राचाही टाकिला असता". शिवाजी महाराजांना समुद्र स्नानाची अतिशय आवड असल्यामुळे ते लहान असता मुद्दाम महाड येथे बाणकोटच्या खाडीवर येऊन राहिले होते.[१] त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग किल्ला बांधण्यात तो स्वतः खपत होता. त्याचे समुद्रावरील पराक्रम कमी योग्यतेचे नाहीत. त्याने दाभोळ बंदर व त्याच्या टापूंतील अनेक ठिकाणे बादशहा औरंगजेबापासून हिसकावून घेतली. पश्चिम किनाऱ्यावर अनेक किल्ले ताब्यात ठेवून त्यांच्या योगाने समुद्रावर आपला ताबा चालविण्याची तजवीज केली. जंजिऱ्याच्या सिद्दीशी सतत झुंज चालविले. कुलाबा येथे आरमाराचे मुख्य ठिकाण करून, तेथे दारूगोळ्याची तजवीज ठेविली, तिचा पुढे चांगला उपयोग झाला. त्यांच्या आरमारात आरंभी, म्हणजे बार्सिलोरवर हल्ला करण्याच्या वेळेस (१६६५), ३० पासून १५० टन आकाराची लहान मोठी ८५ जहाजे असून, त्यात ३ मोठ्या डोलकाठ्यांची होती. परंतु पुढे सहा वर्षांनी त्याचे आरमारात १६० जहाजे झाली. इंग्रजांस आपली शक्ती दाखविण्याकरिता त्यानी हे सर्व आरमार एकदा मुंबईच्या

१ आवळसकर, रायगडची जीवनकथा, पृ. १४.

कॅबे बंदरात आणिले होते. दमण नजीक पोर्तुगीज लोकांचे एक मोठे लढाऊ जहाज त्यानी पकडून घेतले ; व कारवार काबीज केले. किनाऱ्यावर लागलेल्या निर्वासी मालावरील आपला हक्क राजियानी कधी जाऊ दिला नाही ; आणि मरणापूर्वी थोडा वेळ त्यानी दर्यावर्दी कामात कधी काळी आपणांस इंग्रजांचे आरमार वरचढ होईल ह्या भीतीने त्यांजवर दाब ठेवण्याकरिता खांदेरी बेट काबीज करून तेथे नाविक दलाची मजबुती केली.

शिवाजी महाराजांच्या आरमार खात्यात एकंदर लोक पाच हजार होते. ठिकठिकाणच्या बंदरी किल्ल्याकडेच शिवाजी महाराजांनी आरमाराची व्यवस्था सोपविली होती. प्रसंगानुसार लष्कराचे कामगारही आरमारावर पाठविण्यात येत असत. मोरोपंत पिंगळे, नेताजी पालकर, रघुनाथ बल्लाळ यांनी आरमारी युद्धात पुढाकार घेतलेला दिसतो. भिंवजी गुजर व कान्होजी आंगरे हे शिवाजीमहाराजांच्या आरमारात नोकरी करून पुढे प्रसिद्धीस आले.

सिद्दी संबळचे वाढते आरमारी वर्चस्व आणि स्वतःचे बळ वाढविण्याचा त्याचा कल औरंगजेबास नाकापेक्षा मोती जड झाल्याचे भासू लागले. औरंगजेबाने याची धास्ती घेऊन इ.स. १६७७ मध्ये सिद्दी कासीम जंजिऱ्यास होता त्यास औरंगजेब बादशहाने मुंबईस जाऊन सिद्दी संबळकडून मोगल आरमाराचे अधिपत्य स्वीकार म्हणून आज्ञा केली.

मराठ्यांची आरमारी शक्ती वाढतच होती. ह्या वाढत्या शक्तीची धास्ती मोगल, इंग्रज, व पोर्तुगीज या तिघांनी सारखीच घेतली. दंडाराजपुरी आपल्याकडे असावी असा मानस सिद्दी कासीमचा होता. त्याकरिता सिद्दी कासीम मुंबई बंदरांत नोव्हेंबर, १६७७ मध्ये आला. तिथे इंग्लिश कौन्सिलच्या सभेत हजर राहून तो कंपनीच्या केनेरी जवळील आरमारास येऊन मिळाला. इंग्रज व सिद्दी यांना धडा शिकविण्यासाठी शिवाजी महाराजांनी आपले आरमार मायनाईक व दौलतखान यांच्या अखत्यारीत देऊन खांदेरी बेट घेण्यास फर्माविले. मुंबई बंदराच्या समोरही खांदेरी व उंदेरी अशी दोन्ही बेटे असल्यामुळे ती ताब्यात ठेविल्यास तिथून जंजिरा आरमारास शह देता येईल. असा शिवाजी महाराजांचा विचार होता. त्याप्रमाणे मराठ्यांच्या आरमाराचे दौलतखान याने दोन्ही बेटे काबीज केली (१६७९).

जंजिऱ्याचा अभेद्य किल्ला जिंकण्याच्या हेतूने खांदेरी बेटावर आपला नाविक दल उभारण्याचा शिवाजी महाराजांचा हेतू होता. इ. स. १६७४ त खांदेरीवर किल्ला बांधण्याचा प्रयत्न शिवाजी महाराजांनी केला. इंग्रजांचा त्याला विरोध होता. वरील बेट १६७९ त काबीज केल्यावर मायनाकने माती व दगड यांची मजबूत भिंत बेटाभोवती बांधण्यास सुरुवात केली. पण सिद्दीला हे खपले नाही. त्याने आपल्या आरमारातून खांदेरीवर गोळे सोडण्यास सुरुवात केली. तेव्हा मराठ्यांचे आरमार नागोठण्यास आश्रयास गेले. छत्रपतींच्या आरमारास दाऊदखान यास सिद्दीस खांदेरीहून पळवून लावण्यास यश आले नाही. दोन्ही आरमारे समोरासमोर ठाकली होती. शेवटी १६८० च्या जानेवारीत दोघा आरमारात लढाई होऊन मराठ्यांच्या आरमारास माघार घ्यावी लागली. कान्हेरी संबंधात मराठ्यांनी इंग्रजांशी तह करून ते बेट आपल्या ताब्यात ठेविले होते.

स्वराज्याच्या नौकादलाचा धाक याप्रमाणे महाराजांनी मोंगल, विजापूरकर, फ्रेंच, इंग्रज, डच व पोर्तुगीज या सर्वांच्याच मनात उत्पन्न केला होता.

शिवछत्रपतींचे हे नाविक दल सर्व भारतीयांचा समावेश करणारे होते. त्यांतील योद्धे व कर्णधार भंडारी, कोळी, किसान, मलबारी, मराठे, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी सर्व जमातींचे होते. ते राष्ट्रीयत्वाच्या भावेनेने भारलेले होते, व महाराजांच्या ठिकाणी त्यांची अविचल निष्ठा होती.

शिवाजी महाराजांच्या नौदलांचे कार्य पुढीलप्रमाणे सांगता येईल :—

(१) त्यांनी कोकण किनाऱ्यावरील जलव्यापाराच्या मालाचे युरोपियन, मोगल, व सिद्दी या आक्रमकांपासून संरक्षण केले.

(२) त्यांनी स्वत:ची व्यापारी जहाजे व आपल्या प्रजाजनांचा व्यापार यांचे समुद्रकिनारा व उघडा समुद्र यावर पूर्णपणे संरक्षण केले.

(३) त्यांच्या लगतच्या समुद्रावर आपला अधिकार प्रस्थापित करण्याची व बंदरांत येणाऱ्या सर्व जहाजांवर नियंत्रण ठेवण्याची संधी या नौदलानेच त्यांना मिळवून दिली.

□□

५४. शिवकालीन ग्राम समाज व ग्रामपंचायती

प्राचीन कालापासून मराठी राजवट संपेपर्यंत स्वराज्यातील ग्राम-समाज हा एक मूळ गाभा असून त्याच्या भोवती सर्व आर्थिक, सामाजिक यंत्रणा निर्माण व विकसित करण्यात आली होती. लोकजीवनात, खेड्यास शासन पद्धतीतील एक महत्त्वाचा घटक म्हणून स्थान होते. शेती व्यवसाय हाच जीवनाचा प्रमुख मार्ग असल्याने बहुतांशी लोक प्रामुख्याने त्यावरच अवलंबून असत. खेड्यांची वसाहत राजाज्ञेवरून जंगले तोडून साफसफाई करून तेथील जमीन लागवडीस आणून झाली असावी. आदिलशहाने रत्नागिरीच्या मावळंकर-सरदेसाईंना इ. स. १६०५ मध्ये काही गावांच्या खोतीच्या सनदा देऊन ती गांवे वसाहतीस आणा अशी आज्ञा केलेली आढळते. गावातील लोकांचे जमीन हेच निर्वाहाचे एकमेव साधन असल्याने ज्यांना गावात जमीन असे तेच गावचे प्रमुख रहिवाशी असत. यात प्रामुख्याने गावचे वंशपरंपरागत अधिकारी आणि ग्राम सेवक यांचाच प्रामुख्याने समावेश होत असे. खेडेगावाची आर्थिक रचना ही प्रत्येक ग्रामस्थांच्या वंशपरंपरागत उद्योगधंद्यावर आधारलेली होती. पाटील हा खेड्याचा प्रमुख अधिकारी होता. "वतनपत्र" नावाच्या शासकीय आदेशानुसार आपले पद व सत्ता प्राप्त होई. पाटलाच्या पदाचे शासकीय चिन्ह [Insignia] नांगर असे, पाटलाचे हे अधिकृत चिन्ह प्रत्येक अधिकृत शासकीय कागदावर त्याच्या नावासमोर उमटविले जाई.[१] सर्व पडीक जमीन लागवडीखाली आणून तिच्यामधून पीक काढणे हे कर्तव्य होते. खेडेगावचा पाटील हा मूळचा सरकारी अधिकारी असून कुळकर्णी या दुसऱ्या अधिकाऱ्याच्या सहकार्याने त्यास काम करावे लागे. पाटील-कुलकर्णी व्यतिरिक्त खेड्यातील लोकांची सेवा करणाऱ्या लोकांस बलुतेदार म्हणत. त्यांना त्यांनी केलेल्या गांव व गावकरी यांच्या सेवेप्रीत्यर्थ कृषी उत्पन्नाच्या स्वरूपात (धान्य स्वरूपात) वार्षिक मोबदला देण्यात येई, या मोबदल्यास

१ राज व्यवहार कोश : ९ : ५२ शिवचरित्र प्रदीप भा.इ.सं.मं., पुणे १९२५.

बलुते असे म्हणत. बलुते घेणारा तो बलुतेदार हे गावचे प्रतिष्ठित नागरिक होते. ग्रामपंचायतीच्या कामात त्यांना हक्काने भाग घेता येत असे. पाटील हा गाव सत्तेचा प्रमुख असल्यामुळे या सत्तेच्या सर्व सभांचे संचलन तो करीत असे. कारागीर आणि चाकर यांना ठरावीक वस्तूरूपाने मेहनताना देऊन अथवा सारामुक्त जमीन देऊन त्याच्या मोबदल्यात गावांची सेवा करून घेण्याची प्रथा भारतात फार पुरातन काळापासून चालत आलेली आहे. सरकारचा हिस्सा आपल्या उत्पादनातून काढण्यापूर्वी शेतकरी प्रथम या बलुतेदारांचा वाटा काढून ठेवीत असे. कारागिराला माल पुरवून गावकरी आपले काम करून घेत. फक्त त्याला त्याच्या श्रमाचा मोबदला प्रत्येक कामाच्या वेळी दिला जात असे. तो फक्त वर्ष अखेरीस धान्यरुपाने दिला जाई. गावांचा एकंदर विस्तार दोन बाजूने असायचा. एक बाजू कृषियोग्य अशी असायची व दुसरी बाजू ही निवासासाठी. त्या वेळी गावांना वेगळे शब्द वापरण्याची पद्धत होती.[१] याबाबतीतले जे मूळ साहित्य उपलब्ध आहे. त्यात ग्राम, देहे, मौजा, खेडे वगैरे शब्द आढळतात.[२]

कोकणात ग्रामसंस्थेला "पांढरी" असे नामाभिमान होते. याची रचना पुढीलप्रमाणे होती :— वतनदार, मिरासदार आणि उपरी वतन या शब्दावरून हे स्पष्ट होते की, वतनाच्या मालकाला करमुक्त जमीन जी वंशपरंपरेने मिळत असे व ती तो जन्मभर कब्जात ठेवीत असे. या सवलतीबद्दल वतनदाराला सरकारला विविध स्वरूपात मदत करावी लागत असे. पाटील हा मुळात कुलकर्णी नावाच्या सरकारी अधिकाऱ्याला सहाय्य करण्यासाठी व त्याच्याशी सहकार्य करण्यासाठी नेमलेला अधिकारी होता. उभयतांनी ग्रामस्थांकडून एक विशिष्ट रक्कम जमा करावी असे ठरविण्यात आले होते. कुलकर्णी यांनी जमीनदारांना दिलेल्या रकमांचा हिशेब ठेवायचा. सरकारला देय असलेली, जमीन महसुलीची रक्कम व्यवस्थितपणे गोळा करून सरकारी तिजोरीत भरणा झाली आहे की नाही हे पाहण्याचे काम पाटील यांच्याकडे सोपविले होते. सरकारी यंत्रणेचा प्रत्यक्ष जमीन मालकाशी संबंध येत नसे. सर्व सरकारी देणी व्यवस्थितपणे

१ मराठी साधनामध्ये याचे "काळी व पांढरी" असे उल्लेख केले गेले आहेत.
(आत्रे, एल. गावगाडा, पृ. १, शि.च.सा. खंड १, ले. २६)

२ राजवाडे, म.इ.सा. खंड २५, ले. २७४.

गोळा केली जातात की नाही याची खात्री करण्याची वैयक्तिक जबाबदारी पाटलावर होती आणि महसुलाची ठरावीक रक्कम कमी झाल्यास पाटलास जबाबदार धरले जाई.[१] ग्रामस्थ मोठ्या संखेने जमीन महसूल भरीत असत. त्यांना मिरासदार म्हणत.[२] मिरासदार हा अरबी शब्द असून त्याचा अर्थ वंशपरंपरागत मालक असा होतो. मूळ शब्द थळकरी असा होता त्याचा अरबी मिरासदार झाला. जी कुळे मालक नव्हती त्यांना " बाहेरचे " असे म्हणत असत. इतर आणखी लोक होते ते गावाची विविध प्रकारची कामे करीत असत. त्यांना बलुतेदार म्हणत असत. त्यांना त्यांच्या सेवेबद्दल कृषिउत्पादन (धान्य) वर्षासन म्हणून देण्यात येत असे. या अभिधनाला " बलुता " म्हणत असत. बलुतेदारांची संख्या गावोगावी बदलत असे. कुलकर्णी व जोशी यांच्या कार्यालयाकडून गावांतले मिरासदार व बलुतेदार यांना अनुदान देण्यासंबंधी एक दस्तऐवज आहे. या दस्तऐवजात जवळजवळ दहा बलुतेदारांचा त्यांच्या व्यावसायिक निशाणासह [३] उल्लेख आहे. त्यात या बलुतेदारांचे स्थान कोणते हे या दस्तऐवजात नमूद करण्यात आले आहे. वंशपरंपरागत चालू असलेले अधिकारी मिरासदार व बलुतेदार यांना गावांच्या महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य होते. बलुतेदारांमध्ये पुष्कळसा कारागिरांचा समावेश होतो. उदा. धोबी, न्हावी, मांग, कुंभार, सुतार, तेली, लोहार, मोची वगैरे. त्यांच्याकडून प्रामाणिक सेवा करून घेतली जात असे आणि त्यांच्या सेवेचे वेतन किंवा मोबदला म्हणून त्यांना दरवर्षी पैसे न देता वस्तूच्या रूपाने दिला जात असे.[४] हे सगळे पूर्वापार रुढीनुसार केले जात असे. गावच्या इतर सेवकांमध्ये जोशी, गुरव आणि मुलाणी वगैरेचा समावेश होतो. ग्रामस्थांच्या धार्मिक गरजा भागविण्याचे काम ते करीत असत. त्यांना मोबदला दोन प्रकारे दिला जात असे. पहिली पद्धत म्हणजे ग्राहकांनी वस्तूच्या रूपाने दिलेले शुल्क म्हणून द्यायचे. दुसरी पद्धत म्हणजे खंडरहित जमीन त्यांना द्यायची. देशकांना त्यांच्या वाट्याच्या असलेली सर्वच जमीन कसता येत नसत. म्हणून या जमिनीचा

१ राजवाडे, म.इ.सा. खंड १८, ले. ५.

२ शि.च.सा. खंड ४, ले. ६९२.

३ कित्ता, म.इ.सा. खंड १६, पृ.२२.

४ शि.च.सा. खंड ४, ले. २७.

काही भाग इतर व्यक्ती कसत असत या दुसऱ्या शेतकऱ्यांना कुळे म्हणत असत, व त्यांचा उल्लेख " उपरी " असा केला जात असे. हे " उपरी " खंडाने जमीन कसून देत असत.[१] अशा रीतीने वतनदार, थळकरी, बलुतेदार व उपरी हे ग्रामसंस्थेला तिचा कारभार सहकार्याने चालविण्यास मदत करणाऱ्या चौकटीचे चार खांबच होते असे म्हणता येईल.

गावातील जमीन धारणेच्या मुख्यत्वेकरून तीन प्रकारच्या भूधारण पद्धती होत्या. मिराशी किंवा तालवाहिका, उपरी आणि वतन जमीन धारणा पद्धती म्हणजे ग्रामअधिकारी व कारागीर यांच्या ताब्यात असलेली म्हणजेच बलुतेदार यांनी कसलेली जमीन. मिराशी जमीन धारणा पद्धतीमध्ये जमिनीची मालकी जमीन कसणाऱ्याकडे असायची. मालमत्ता वंशपरंपरागत व विक्रीलायक असायची. मिरासदार किंवा तालवाहिका म्हणजे, मिराशीच्या जमिनीचा मालक, ह्यास तो जोपर्यंत जमिनीचा सारा भरतो तोपर्यंत जमिनीपासून वंचित करता येत नसे. त्याजकडून जमीन काढून घेतली तरी तीस वर्षांच्या कालावधीतनंतरसुद्धा त्याला ती परत मिळविता येत असे.[२]

" उपरी " जमीनधारणा पद्धतीमुळे, शेतकऱ्याला त्याची स्वतःची नसलेली जमीन कसण्याचा हक्क होता. ही जमीन त्याने तात्पुरती खंडाने घेतलेली असायची. खंडाचे दरही सगळीकडे सारखे नसायचे. म्हणजे उपरी एक कुळ होता व तो जमीनीचा मालक नव्हता.[३] गाव या घटकाचा उगम कसा झाला या परंपरागत गोष्टी व अख्यायिका सांगितल्या जातात. त्या पाहिल्यास असे दिसून येते की सर्व जमीन ही पूर्वी मिरास जमीन होती. जे मूळचे स्थायिक झालेले लोक होते त्यांनी ती आपसात वाटून घेतली होती. सध्याचे मिरासदार हे सार्थपणे त्या मूळ वसाहतदारांचे वंशज आहेत. उपरी ह्यांस, जुलमी मुसलमान राजवटीखाली भरडले गेलेले जुने जमीनीचे मालक म्हणून प्रस्थापित करण्यात आले. खरी गोष्ट अशी आहे की, उपऱ्यांनी कसलेल्या बहुसंख्य जमिनी गावच्या खातेवहीत या जमिनी

---

१ राजवाडे, म.इ.सा. खंड १८, से.३३ : २०, ले. ३१.

२ एलफिन्स्टन रिपोर्ट.

३ गुणे, ज्युडीशिअल सिस्टम ऑफ मराठाझ, पृ.६०-६३.

अस्तित्वात[१] नसलेल्या मालकांच्या म्हणून नोंदविल्या आहेत, असे एल्फिन्स्टन म्हणतो. वतन जमीन धारणा हा तिसरा प्रकार होता.

ग्रामपंचायती : ग्रामपंचायतीचे अस्तित्व काकतीय, चालुक्य व यादव काली होते. त्यानंतरच्या मुसलमान सत्ताधिशांच्या कालखंडात ग्रामपंचायतीचा ठसा उमटलेला दिसत नाही. मुस्लिम सत्ताधिशांच्या गावगाडा पद्धतीमध्ये अरबी व फारशी शब्दांचे उपयोग दिसत नाही. फारशी देहे अरेबिक मौजा हे शब्द खेड्याकरिता त्यांनी वापरले. त्यांचा वापर मराठेशाहीत चालू राहिला. त्यांनी गावच्या मुख्यास मुकादम शब्द वापरला. रयत म्हणजे शेतकरी. शेतकऱ्याला रयत म्हणण्याचा प्रकार मुसलमान कारकीर्दीत सुरू झाला. मुसलमान सत्ताधाऱ्यांनी गावगाड्याच्या कारभाराच्या तत्कालीन व्यवस्थेत फेरफार केला नाही किंवा नवीन काही सुचविले नाही. प्रत्येक गावाची सामाजिक, आर्थिक जडणघडण स्वयंपूर्ण, स्वायत्त होती. सामाजिक स्थैर्य निर्माण करणारी व विज्ञान कला संस्कृति यांच्या अभिवृद्धीस अनुकूल परिस्थिती देणारी, जातिसंस्था ही हिंदूच्या फायद्याची शहाणपणाची गोष्ट होती.[२] जातिसंस्था, पंचायती व जातिनिहाय न्यायालये यांच्याद्वारे शहरे व खेडी यामधील जीवनावर नियंत्रण राखी. हिंदू लोक त्यांच्या बहुतांश खटल्याचा, कायदेविषयक तंट्याचा निवाडा मित्रांच्या मध्यस्थीने लवादाने किंवा जातीप्रमुखाच्या द्वारा करत. ते अत्यंत महत्त्वाच्या खटल्यांचा न्यायनिवाडा जिल्ह्यांतील सर्व जातींच्या प्रमुखांच्या सभेमध्ये त्याची चर्चा करून व न्यायनिर्णय त्यांच्यावर सोपवून करत. तसेच ते साध्यासुध्या विविध गोष्टींच्या निर्णयासाठी आपआपल्या गावांच्या प्रमुखांकडे जात व ते न्यायनिवाड्याची जबाबदारी व पद संभाळत असल्याने दोन्ही पक्षांमध्ये त्याविषयी तडजोड घडवून सामोपचाराने निर्णय देत असत.[३]

कोकणातील खेडी ही जवळजवळ स्वयंपूर्ण व परस्परांशी संबंध नसलेली छोटी गणराज्येच होती. बीव्हरीज म्हणतो की, खेडी स्वयंपूर्ण आर्थिक आणि सामाजिक घटक असून ती साध्यासुध्या ग्रामीण

१ गुणे, ज्युडीशिअल सिस्टम ऑफ मराठाझ, पृ.६०-६३.

२ बिव्हरीज-हिस्टरी ऑफ इंडिया, खंड २, पृ. १४, १५.

३ मिल, हिस्टरी ऑफ इंडिया, पृ.२४०.

हस्तव्यवसायाधिष्ठित अर्थव्यवस्थेची व सुसंघटित लोकजीवनाची केंद्रे ही होती.[१] कोकणातील खेड्यात, शहरात पंचायत न्यायालये अस्तित्वात होती. त्यांचा उपयोग न्यायासंबंधी प्रशासनासाठी होई. पंचायत न्यायालयाचे सदस्य हे समाजाचे प्रतिष्ठित व मान्यवर घटक होते.[२] पेशवेकाळांत पंचायतीचे सभासद सामान्यतः सरकारकडून नियुक्त होत. परंतु सरकार त्यांची नियुक्ती करताना संबंधित पक्षांशी विचारविनिमय करून त्यांच्या सूचनांची दखल घेई.[३] ही पंचायत न्यायालये चांगल्या शासनास उपकारक व सहाय्यभूत साधने होती व वाईट जुलमी शासनाची धैर्यशाली विरोधक होती. शासनाने अन्याय निर्णय दिल्याने एका पंचायत सदस्याने गाव सोडून जाण्याचा निश्चय केला. त्या सदस्यांच्या पाठोपाठ सुमारे तीनशे नागरिकांनी गाव सोडण्याचा निर्णय घेतला. परिणामी जुलूम जबरदस्ती तोबडतोब थांबविण्यात आली आणि त्या अपमानित पंचायत सदस्याची मनधरणी करण्यात येऊन त्या प्रकरणावर पडदा टाकण्यात आला.[४]

पंचायतप्रमुख वादी-प्रतिवादींशी व्यक्तिशः परिचित असल्याने व विविध विषयांची त्यास माहिती असल्याने तो अचूक न्यायनिवाडा करू शके.

गावातील बारीकसारीक तंटे दोन्ही बाजूचे लोक गावातील फौजदारा (पाटील) कडे घेऊन जात असत आणि त्याचा निकाल तिकडे लागत असे. पण तंटा जास्त कटकटीचा आणि गुंतागुंतीचा असला किंवा त्यात मोठ्या रकमेचे अपहरण असले तर मामलतदार तो तंटा पंचायतीकडे सोपवीत असे. इथे असे नमूद करावेसे वाटते की, बहुतेक अधिकारी प्रत्येक प्रकरण किंवा तंटा पंचायतीकडे पाठवीत असत. कारण दोन्ही बाजूंचे समाधान करणारी दुसरी कोणतीही व्यवस्था अस्तित्वात नव्हती.

पंचायत कशी स्थापली जात असे ते पाहू. गावातील दोन्ही गटांना सांगण्यात येत असे की, तुम्ही योग्य माणसांची पंचायतीचे सदस्यासाठी नावे सूचवा. पंचायतीचे सदस्य निवडण्यासाठी सरकारी कारकून निवडणुकीवर

---

१ बिव्हरीज-हिस्टरी ऑफ इंडिया, खंड २, पृ. ९१-९२.

२ मालकम्- खंड २, पृ. २८३, २८६.

३ एलफिन्स्टन, पृ. ७८.

४ मोलकम्- खंड २, पृ. २८३, २८६.

देखरेख करत असे. पंचायतीसाठी निवडलेले सदस्य किंवा पंचायतीत बसणारे सदस्य हे सभ्य पुरुष, तल्लख बुद्धीचे प्रामाणिक किंवा सचोटीचे लोक असावे ही धारणा होती. पण पंचायतीने सुरुवात कशी करावी या संबंधीचे नियम केलेले नव्हते. पंचायत शास्त्राधार आणि देशातील चालत असलेल्या चालीरीती ह्यांचा आधार घेऊन पंचायती किंवा (कज्जेदलाल पंचायती) ही एकाच जातीच्या लोकांची व्यापाराची किंवा स्थानिक लोकांची नसे. त्यातून कोणत्याही जातीचा निषेध करणे किंवा कोणत्याही जातीला बाजूला ठेवीत नसत. गावचा पाटील गाव पंचायती सभा बोलवीत असे. हे काम तो मामलेदाराच्या सूचनेनुसार करीत असे. जातीबाहेर ठेवलेल्या लोकांशिवाय पंचायतीचे सदस्यत्व सर्वांना खुले होते. पाटील हा पंचायतीचा सदस्य होत असे. ज्याला जीवनातील अनुभव आणि माणसाच्या स्वभावाची पारख असेल, असे सदस्य पंचायतीवर निवडून देण्यावर भर असे. पंचायतीची सभा भरल्यावर स्थानिक शासकीय अधिकारी त्यातून अध्यक्ष निवडीत. जर एखाद्या प्रकरणात शासन गुंतलेले असले तर पंचायतीच्या सर्व सदस्यांची निवड अधिकृतरीत्या होत असे. जर एखाद्या पक्षकाराने पंचायतीने दिलेला निर्णय मानला नाही तर सरकार त्यास पंचायतीने दिलेला निर्णय मान्य करण्यास भाग पाडीत असे. गावकरी पंचायतीस "पंच परमेश्वर" असे संबोधित. हे संबोधन तिच्या लोकप्रियतेचे द्योतक होते. पंचायतीची सभा भरली असता दोन्ही पक्षांचे सदस्यांनी एकमेकांना आव्हान देत आपले म्हणणे मांडले, नेमणुका केल्या, ठराव संमत केले आणि जमलेल्या सदस्यांपैकी अर्ध्या सदस्यांस आव्हान करण्यास उद्युक्त केले तर पंचायतीचे काम लौकिकास साजेसे चालले आहे असे लोक म्हणत. लांच घेणाऱ्या पंचायती सदस्यास दंड किंवा शिक्षा होत असे हे कोठेही लिहिलेले नाही. कमिशनर चॅपलिनच्या म्हणण्याप्रमाणे लाचलुचपत हा गुन्हा न मानता उपेक्षणीय किंवा अपराध समजला जाई.

मुलकीप्रमाणे गावचे फौजदारी अधिकारही पाटलाला होते. आणि मुलकी कामात ते त्याचे मदतगार व वरिष्ठ तेच फौजदारी कामात असत. गावचे सगळे बदमाश जागल्याला माहीत असत. दिवाणी काम एकदम सोपे होते. पाटलाकडे फिर्याद नेली म्हणजे तो प्रतिवादीला बोलावी आणि दोन्हींबाजू ऐकून घेऊन निकाल देई. यात पाटील गोताचाही विचार करीत

असे. गोत म्हणजे गावातील निरनिराळ्या जातीच्या व धंद्याच्या लोकांची सभा. ती सर्व जातींच्या लोकांच्या गावकी स्वरूपाच्या वादाचा निवाडा करी. पाटील वगैरे अधिकाऱ्यामार्फतच फिर्याद आली पाहिजे असा निर्बंध नसे. तिच्या निवाड्यास स्थळ पत्र, गोतपत्र किंवा गोत मजहर म्हणत. गोताकडे फिर्याद आली म्हणजे फिर्यादीचे म्हणणे गोत ऐकून घेत असे. पक्षकाराचे म्हणणे पंच ऐकून घेत. तसेच पक्षाकारांचे कथन, जबाब व लेखी तोंडी पुरावा घेऊन पंच सारांश लिहून काढीत ; त्यात पुराव्याचा गोषवारा आणि शेवटी निवाडा असे. पंचायत ज्या गावात भरे तेथील कुलकर्णी तेथे लेखी काम करी. जो दावा जिंकी तो सरकारात हाडकी किंवा शेरणी देई व जो हरे तो गुन्हेगारी देत असे. पंच कोणाचेही बांधलेले चाकर नसल्यामुळे ते वक्तशीर जमत नसत व पंचायतीचे काम रेंगाळत चाले. मूठजारीचा प्रकार असल्यामुळे पुष्कळसे दावे पायरीपायरीने थेट दरबारापर्यंत जात. ज्याच्यातर्फे निवाडा होई तो अंमलात आणण्यासाठी तो प्रतिपक्षाकडे गोडीने मागणे करी. त्याने दाद दिली नाही तर तगादा लावी. तगातदाराकडून त्याचे खाणेपिणे बंद करी, त्याच्या डोक्यावर धोंडा देई व त्याला घरात कोंडून ठेवी ; इतके करूनही वळले नाही तर त्याच्या घरी बहुदा ब्राह्मणांचे धरणे बसवी. ब्राह्मण मागमागून थकला म्हणजे शिवी शाप देई ; आपली शेंडी खुंटीला बांधी, डोक्यावर धोंडा घेई, किंवा अन्नपाणी वर्ज्य करी. ब्राह्मणांना याप्रमाणे यातना भोगण्यास लावून आपण फार मोठे पाप करतो असे वाटून ऋणको देण्याचा फडशा करून टाकीत. निवाड्याचा अंमल खाजगी तगाद्याने झाला नाही तर पाटील मामलेदाराकडे दाद मागत.[१]

पंचायतीच्या निर्णयाविरुद्ध अपील करता येत असे. सर्वसाधारण पद्धतीत प्रतिवादीने आपले अपील करताना नवीन अर्ज करावा लागत असे. त्या अर्जात जर प्रतिवादीने खोटी विधाने केली तर त्यास सरकारातून दंड किंवा शिक्षा होत असे. अयोग्य अपील केल्यास त्याची दखल न्यायालयात घेतली जाई व प्रतिवादीस कठोर शिक्षा होत असे. प्रतिवादीने अपील केल्यास त्या अपीलाच्या सुनावणीकरता नवीन पंचायत नेमत असत. जर अपीलाचा निकाल झालेल्या शिक्षेच्या विरुद्ध लागला तर शिक्षा तहकूब होत नसे किंवा त्याबद्दल भरपाई दिली जात नसे. पंचायतीच्या निवाड्याविरुद्ध प्रतिवादींनी अपील केल्याची उदाहरणे फार क्वचित.

१ गुणे, ज्युडीशियल सिस्टीम ऑफ मराठाज, पृ. २३.

गावात पाटील पंचायतीचा निकाल अमलात आणीत असत. विजयी पक्षाला बक्षीस मिळे व जो कोण केस हरेल तो भयास्तव प्रतिकार करीत नसे. जो फिर्यादी जिंके तो निकालाची अंमलबजावणी अटीप्रमाणे करीत असे. पंचायतीच्या सदस्यत्वासाठी फी ठरलेली नसे. पण सदस्य वादी आणि प्रतिवादी दोघांकडून पैसे घेत असत. आणि ते पैसे योग्य कारणासाठी दिले असल्यास ते क्षम्य असे. पण बहुतेक खटल्यामध्ये जो हरे तो पंचायत सदस्यास खर्ची देत असे. शासन वादी आणि प्रतिवादीकडून सारखेच पैसे घेई. जो दावा जिंकेल तो सरकारात हाडकी किंवा शेरणी भरे व जो दावा हरे तो गुन्हेगारी देत असे. लहानशा दाव्यामध्ये सरकार काही घेत नसे. ज्यावेळी मोठ्या इस्टेटीचा दावा गुजरण्यात येई तेव्हा फिर्यादी दावा गुजरल्यावर सरकारला नजराणा पेश करत असे. ह्या नजराण्याची किंमत सर्व जिंदगीच्या १/४ असे. ह्या जुन्या खटल्यात एक महत्त्वाची गोष्ट नजरेत भरते ती म्हणजे ह्या खटल्यांत वकील कुठेही दिसत नाही.

कोकणातील ग्रामपंचायत व महाराष्ट्रातील इतर भागांतील ग्रामपंचायत यांत फरक होता. सध्याच्या ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा हा कोकणप्रांत. यात ब्राह्मण, मराठे, कुणबी, याखेरीज आगरी, खारवी, कोळी, जंगम गोसावी, गोसावी, कातकरी, ठाकूर, वारली, वंजारी, धनगर, वडारी, गोंधळी, कैकाडी, धेड, कोल्हाटी आदि मागासलेल्या जाती तसेच महार, चर्मकार व मांग ह्या अस्पृश्य जाती यांच्या वस्त्या ठिकठिकाणी, जातीवारी वेगवेगळ्या प्रत्येक जाती जमातीची वस्ती म्हणजे एक बेटच. प्रत्येक जातीची पंचायत वेगळी. एक गाव दुसऱ्या गावापासून चार पाच कोसावर. एका गावावर अन्याय झाला तर दुसऱ्या गावाला खबर मिळत नसे. एका गावातून दुसऱ्या गावी जायचे म्हणजे चार पाच तास डोंगर कपारीतून, नद्या-नाले पार करून चालत जावे लागत असे.

कोकणातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या खोत किंवा उच्चवर्गीयावर अवलंबून असलेला. गावात वाडीची पंचायत असे. आपआपसातील निवाडे ह्या पंचायती करीत असत. पंचायतीत निर्णय लागला नाही तर तंटा खोताकडे जाई आणि खोताचा निर्णय मानला जाई. महत्त्वाच्या सर्व फिर्यादी अतिशय पद्धतशीर चालत. सर्वांच्या जबान्या शपथेवर घेतल्या जात. पुराव्याच्या कागदांची छाननी कसोशीने होई. न्यायदानात सत्ता ढवळाढवळ करीत नसे.

शासकीय अधिकारी पंचायतीचा सल्ला वारंवार घेत असत. गुन्हा शोधून काढण्यासाठी गुन्हेगाराने केलेल्या कैफीयतीस साक्ष म्हणून पंचायतीची गरज सरकारी अधिकाऱ्यांस होतीच. शिवाय अर्जात नमूद केलेल्या गुन्हेगारांस शोधून काढण्यासाठी वा त्यांची नावानिशी सांगण्यासाठी पंचायतीचा उपयोग होत असे. तसेच गुन्ह्यांबाबतीत पाटीलसुद्धा पंचायतीची मदत घेई. पंचायतीची मदत शिक्षा देण्यासाठी घेतली जात नसे. पण गुन्हेगार शोधून काढण्यासाठी व आरोप ठेवण्यासाठी पंचायतीची मदत पाटील घेई.

एखाद्यावेळी दारू पिणे, शिनळकी किंवा बदफैली करणे सारखे गुन्हे ब्राह्मण सभेकडे (उत्तरासभा) निकालासाठी नेत. या ब्राह्मण सभेला सर्वात मोठ्या आचार्यापेक्षा मान दिला जात असे. तसेच त्यांच्याकडे अधिकारही विशेष होता. ज्यावेळी जाती पंचायत गुन्हेगारी प्रकरणात निकाल देत असे त्यावेळी या निकालावर शिक्कामोर्तब होण्याची गरज नसे. सामाजिक गुन्ह्यांची संख्या कमी ठेवण्यात जात पंचायतीस असलेले बेसुमार अधिकार कारणीभूत होत. कधी-कधी तर न्याय देण्याचा राजाचा सर्वसामान्य हक्क नाकारून जातीच्या भांडणाचा निकाल जातीनेच केला पाहिजे हा विचार पुढे येई. सरकारही तो मान्य करी.[१] एकंदरीत गावातील सामान्य लोकांकडून पंच म्हणून तंट्याचा निकाल केला जाई. अशा लोकांना एकतर्फी निकाल करण्याचे धैर्य क्वचितच होत असे. सरकारी बोलावणे आल्यावर हजर न होण्याचे धाडसही लोक करीत नसत.

एकंदरीत न्याय करण्याच्या पद्धतीला शास्त्रीयता प्राप्त झाली नसली तरी मराठी राज्यात लोकांवर अन्याय होत नसे असे मानण्यास बिलकूल आधार नाही. उभय पक्षकारांच्या संमतीने पंचायती करणारे इसम नेमण्यात येत असत. आपल्या गाव-गावाच्या लोकांकडून पक्षपात होण्याचा संभव आहे असा संशय आल्यास पक्षकार आपला दावा चालविण्यास अन्य ठिकाण मागून घेई. यालाच "स्थल नेमून देणे" म्हणत. आपणच सुचविलेल्या लोकांनी निर्णय दिला, म्हणजे तो मुकाट्याने मान्य करणे भाग पडे. एखाद्या दाव्यात चालीरीतींचा प्रश्न उद्भवत असला तर

१ वाड, भाग २-३०.

पक्षकारांच्या जातीतील लोकांच्या साहाय्याने तंट्याचा निकाल करण्यात येई.[१] वतनाचा प्रश्न असल्यास गावातील सर्व वतनदार, बलुतेदार यांच्या सल्ल्याने किंवा मदतीने त्या प्रश्नाचा निकाल लागत असे. शेतीवर निर्वाह करणाऱ्या लोकात किंवा समाजात भानगडीचे प्रश्न फारसे उद्‌भवत नसत. सामान्य माणसांच्या पंचायतीकडून जरी तंटे तोडले जात असत तरी त्यामुळे अन्याय होण्याचा संभव नव्हता.[२] गावातील सर्व प्रमुख लोकांसमक्ष पक्षकारांचे म्हणणे व साक्षीपुरावा ऐकिला जाई त्यामुळेही अन्याय होण्याची भीती राहत नसे व हरवलेल्या माणसाला तक्रार करण्यास जागा उरत नसे.

पंच जसा निकाल करतील त्याप्रमाणे वादी प्रतिवादीस वागण्यास लावण्याचे काम सरकारी अधिकाऱ्यांकडे असे. जातीसंबंधीचे तंटे त्या त्या जातीच्या मुख्याकडे म्हणजे मेहतर याजकडे निकालासाठी जात व त्या त्या जातीच्या सभेमार्फत निकाल होत. पेशवाईत न्यायदानाचे सुलभ व सोयीचे साधन म्हणजे पंचायत. एलफिन्स्टन व त्यांचे सहकारी यांचा पंचायती पद्धतीबद्दल चांगला ग्रह झाला होता. न्यायदानाची ही पंचायत पद्धत मुंबई, महाराष्ट्र व कोकण यात चालू होती. अदालतीपेक्षा पंचायतीतर्फे गावोगावी तंट्याचा निकाल लावण्याची पद्धती श्रेष्ठपणाची होती. गावात देवघेवीसंबंधी कोणी पाटलाकडे फिर्याद नेल्यास तो प्रथम वादी प्रतिवादीची समजूत स्नेही या नात्याने करून वादी त्यात यशस्वी न झाल्यास मग तो पंचायत भरून तिच्यामार्फत निकाल लावी. एलफिन्स्टन म्हणतो की पंचायत पद्धतीमध्ये ज्या थोड्या उणिवा आहेत त्या दूर करून सुधारणा केल्यास या पद्धतीसारखी न्याय देणारी लोकशाही पद्धती दुसरी नाही. सर्व गुन्हे खून मारामाऱ्यापासून पैशाआडक्यासंबंधी लहान भांडणे ही पंचायंत न्याय पद्धतीच्या कक्षेत येत असत. मराठ्यांच्या कारकीर्दीत पंचायत न्याय पद्धतीमुळेच लोकांना न्याय मिळत असे. त्याशिवाय श्रीमंत किंवा गरीब यांना न्याय मिळण्याचे साधन नव्हते. तत्त्वतः आणि नित्याच्या सवयीने पंचायत पद्धती इतकी न्याय देणारी दुसरी सोपी पद्धती नाही. ही पद्धत खेड्यातील अशिक्षित शेतकऱ्यांस व काबाडकष्ट करणाऱ्या मजुरासही फार सोईची वाटत असे.

---

१ पेशवाईच्या सावलीत, पृ. १०३.

२ ना.गो. चाफेकर, सरदेसाई स्मारक ग्रंथ, पृ. ४३.

ग्रामपंचायतीने दिलेले निवाडे हे तारतम्य राखून उचित असल्यामुळे ग्रामपंचायतीच्या कीर्तीत भर पडत असे. पंचायत पद्धतीत एक मोठी असामान्य मौल्यवान गोष्ट म्हणजे दुसऱ्यांचे चांगले स्वीकारणे. पंचायत न्याय पद्धतीचा उपयोग भांडणतंटा, वतनीवाद, साध्या व गुंतागुंतीचे खटले यापैकी कोणत्याही निवाड्यासाठी केला जाई. अशाच प्रकारची न्यायपद्धती यादव, काकतीय आणि चालुक्य यांच्या कारकीर्दीत चालू होती. त्यावरून असे दिसते की, यादव काल व मराठे यांच्यामधील कालखंडात मुस्लिम सत्ताधिकाऱ्यांनी काम केले. त्यावर पंचायत पद्धतीचा किंवा नागरी पद्धतीचा ठसा उमटला नव्हता. त्यांच्या गावगाडा पद्धतीमध्ये अरबी व फारशी शब्दाचे उपयोग झाले. फारशी देह, अरेबीक मौजा हे शब्द खेड्याकरता त्यांनी वापरले त्यांचा वापर मराठेशाहीत चालू राहिला. त्यांनी गांवच्या मुख्यास मुकादम शब्द वापरला.

सामान्यतः गावात चार प्रकारच्या सत्ता रूढ होत्या.[१] दिवाण सत्ता, यात हवालदार, कारकून इत्यादी राज्याधिकारी मंडळी असत व त्यांच्यामार्फत राजा आपली सत्ता बजावीत असे. दुसरी आणि गावाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची सत्ता वतनदारी होय. वतन हे एक प्रकारचे इनामच होय. वतने किंवा इनामे ही राजसत्तेकडून बहाल केली जात. राजाला जसे वतन देण्याचा अधिकार होता तसा तो रद्दबातल किंवा जप्त करण्याचाही अधिकार असे. एखाद्याचा निरवंश झाला तर ते वतन अथवा इनाम सरकार जमा होत असे. आणि योग्य वारस पुढे आला तरच सरकार ते वतन सर्व हक्कासह त्या व्यक्तीकडे सुपूर्द करीत असे. शिवाजी महाराज वतनदाराचे कज्जे स्वतः जातीने लक्ष घालून सोडवीत असत. रयत म्हणजे शेतकरी, शेतकऱ्यांना रयत म्हणण्याचा प्रकार मुसलमान कारकीर्दीत सुरू झाला. गावांच्या गावकारभारात मुसलमान सत्ता असतानाची कारभारी पदे अस्तित्वात आली. मुसलमानानी गावगाड्याच्या तत्कालीन अवस्थेत फेरफार केला नाही किंवा नवीन काही सुचविले नाही. तथापि जमीनसारा कोणत्याही प्रकारच्या प्रतिकाराशिवाय वसूल करणे मुस्लिम सत्ताधीशांचे परम कर्तव्य होते.

१ शि.च.सा. खंड ५, ९२०, पृ. १६६.

वतनदार :

वतन या अरबी शब्दाचा वापर महाराष्ट्रात मुसलमानी अंमलाच्या काळात रूढ झाला. सरकारकडून एखाद्या ग्रामाधिकाऱ्याला मिळालेली जमिनीची देणगी म्हणजे वतन होय. तत्त्वतः जोपर्यंत तो ग्रामाधिकारी गावाचे काम पाही तोपर्यंत ती जमीन त्याच्याकडे राही. पण वस्तुतः ती जमीन व्यक्तीच्या मालकीची राहत नसून, कुटुंबाच्या मालकीची बनत असे, आणि जोपर्यंत कुटुंबातील एखादी व्यक्ती प्रामाणिकपणे आणि प्रभावीपणे गावाची नोकरी करीत राही तोपर्यंत ती जमीन वंशपरंपरेने त्या कुटुंबातच राही.[१]

वतनदारांचे पालनपोषण सारा गाव करीत असे.[२] गावकऱ्यांकडून त्याला रोख, ज्याला "नख्त" म्हणून अथवा वस्तूच्या रूपाने ज्याला "गला" म्हणत, त्याच्या चाकरीचा मोबदला मिळत असे. हे त्याचे हक्क त्याच्या सनदेत नमूद केले असल्यामुळे गावकऱ्यांकडून त्याची वसुली तो कायदेशीरपणे करून घेत असे. वतनदारांच्या या मोबदल्यास "हक लाजिमा" असे म्हणत.

गावचा कारभार कार्यक्षम होण्यास या शाश्वत ग्रामाधिकाऱ्यांची अत्यंत गरज त्या काळांत भासत असे. त्यामुळे राजवटीत जरी बदल झाला तरी वतनदार बदलत नसत. कारण नव्या राजवटीलादेखील या ग्रामाधिकाऱ्यांच्या सेवेची तितकीच निकड भासे. निजामशाहीच्या अथवा आदिलशाहीच्या राजवटीत सत्ता उपभोगणारी वतनदार मंडळी शिवाजी राजाच्या काळात देखील सुरक्षित राहिली होती. शिवाजीराजाने त्यांना काढून अन्य नेमणुका सहसा केल्या नाहीत.

सारा वसुली आणि शेतीचा विकास ही वतनदारांची प्रमुख कर्तव्ये[३] असली तरी गावाशी निगडीत आणि इतर बरीच कामे त्यांना करावी लागत. उदा. गावचे छोटे छोटे तंटे हे गांवकऱ्यांच्या सभेतच निकालात काढणे, गावच्या जत्रा अथवा स्थानिक उत्सव पार पाडणे, गावाचे वसाहतीकरण, लावणी-संचयनीच्या कामाकडे लक्ष पुरविणे, गावात शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करणे, संकटकाळी लोकांचे संरक्षण करणे, ही या ग्रामाधिकाऱ्याची जबाबदारी असे.

---

१ कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र, पृ. १४-१५.

२ कित्ता.

३ कित्ता, पृ. १७.

मराठी माणसाने आपल्या जीवनात वतनाला फार महत्त्वाचे स्थान दिले होते. राजकीय सत्ता प्राप्त करून घेण्याचे वतन हे एक साधन होते. वतनदारांचा योगक्षेम केवळ वतनावरच चालत असे. व्यक्तीचा सामाजिक दर्जा आणि प्रतिष्ठा यांचे वतन हे एक गमक होते. त्यामुळे दिवाणसत्तेतील अथवा सरकारातील उच्च पदापेक्षा लोक वतनच अधिक पसंत करीत. वतनाला फार महत्त्व प्राप्त झाले. समाजातील भांडणतंट्याचे मूळ आपल्याला या वतन संस्थेतच आढळते. वतनावरील अधिकारी-प्रत्याधिकार यातून कज्जा-खटल्यांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली. वतनामुळे गावात दंगेधोपे, कारस्थाने, हिंसक कृत्ये, खून, फसवेगिरी इत्यादी गुन्ह्यांना ऊत येत असे.

वतनसंस्थेमार्फत सत्तेचे विकेंद्रीकरण साधण्यात आले होते. स्थानिक बाबींचा निर्णय जेथला तेथे घेऊन केंद्रीय सत्तेकडे निर्णयासाठी जाण्यात होणारा विलंब टाळता यावा हाच या विकेंद्रीकरणाचा हेतू होता. थोडक्यात असे म्हणता येईल की, गावच्या स्थैर्यासाठी आणि विकासासाठी सुनियंत्रित अशी वतनसंस्था ही मध्ययुगातील एक अनिवार्य संस्था होती. गावच्या प्रमुख वतनदारात पाटील, कुलकर्णी, चौगुला, शेटे-महाजन, आणि देशमुख, देशपांडे या परगण्याच्या वतनदारांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

वतनदारांचे पालनपोषण सारा गाव करीत असे. गावकऱ्यांकडून ज्याला रोख म्हणत, ज्याला नगद म्हणत अथवा वस्तूच्या रूपाने गल्ला म्हणत त्याला चाकरीचा मोबदला मिळत असे. गावचा कारभार कार्यक्षम होण्यास या शाश्वत ग्रामाधिकाऱ्याची अत्यंत गरज त्या काळात भासत असे. त्यामुळे राजवटीत जरी बदल झाला तरी वतनदार बदलत नसत.[१] निजामशाही अथवा आदिलशाही राजवटीत सत्ता उपभोगणारी वतनदार मंडळी शिवाजी राजाच्या काळातदेखील सुरक्षित राहिली होती. सारा वसुली व शेतीचा विकास ही वतनदारांची दोन प्रमुख कर्तव्ये असली तरी गावचे छोटे छोटे तंटेबखेडे हे गावकऱ्यांच्या सभेतच निकालात काढणे, गावाच्या जत्रा अथवा स्थानिक उत्सव पार पाडणे, गावची वसाहत करणे, लावणी सरणीच्या कामाकडे लक्ष पुरविणे, गावात शांतता आणि सुव्यवस्था

१ म.इ.सा. खंड २०, ले.१०, २३७, खंड २१, ले. २, पृ.३,
शि.च.सा. भाग १, ले. १९, भाग ३ : ५८४

प्रस्थापित करणे, संकटकाळी लोकांचे संरक्षण करणे ही या वतनदारांची जबाबदारी असे. शेतसारा जमा करणे, शेतकऱ्यांना जमिनीत शेती करण्यासाठी उत्तेजन देणे ही कामे वतनदारांची. त्याशिवाय वतनदार गावातील लहान-सहान भांडणे मिटवणे, पंचायतीतील सदस्यांचे आपसातील तंटे तोडणे, गावातील उत्सवात व जत्रेत भाग घेणे, ओस जमीन लागवडीस आणणे, नवीन वस्त्या वसविणे अशी कामे करीत. बाळाजी आवजी प्रभूने शिवाजी महाराजांस स्वराज्य संपाद्नाच्या कामी अनिवार्य मदत केली. त्यांच्या एकनिष्ठ, अतुल सेवेने महाराज भारावून गेले. त्यांनी बाळाजी आवजीस मंत्रीपद देऊ केले. ते नाकारून "महाराजांनी राज्याचे चिटणीस वतन आमच्या घराण्याकडे सोपवावे" अशी विनंती बाळाजी आवजीने महाराजांकडे केली. महाराजांनी बाळाजी आवजींची ही विनंती मान्य केली. अशा प्रकारे बाळाजी आवजीने मंत्रीपद नाकारून वतन स्वीकार केला.[१] यावरून मराठ्यांस इतर गोष्टींपेक्षा वतनाचा लोभ जास्त होता. स्वतः शिवाजी महाराजांना स्वराज्य संपादण्यापूर्वी वतनदार म्हणून घेण्यात भूषण वाटत असे. वतनदारीमध्ये मराठ्यांस भूषणलौकिक व कीर्ती वाटे. कुडाळ, राजापूर, दाभोळ, पुणे, जावळी, कल्याण, सुपा भिवंडी ही स्थळे शिवाजी महाराज आपल्या वतनी जागा मानीत. शिवाजी महाराजांस आपल्या वतनदारीचे एवढे आकर्षण होते की, त्यांनी राज्याभिषेकापूर्वी दोन वर्षे अगोदर आपल्या अधिकाऱ्यांस आपल्या वतनी मालमत्तेचे निराळे जमाखर्च ठेवण्यास सांगितले होते. महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांस अशी सक्त ताकीद दिली होती की, आपले वतनी उत्पन्न राज्याच्या कामी खर्च करू नये. ते उत्पन्न वतनदारीतील पीडित शेतकऱ्यांवर व चांगले पीक काढण्यावर खर्च व्हावे, तसेच वतनावर शत्रूची धाड आली तर ती निवारण्यासाठी खर्च व्हावी.[२] मध्यवर्ती राजसत्ता कमकुवत राहू नये तिला बळकटी यावी, तिने प्रजेचे संरक्षण करावे म्हणून वतनदार निर्माण झाले. पूर्वी उद्योगधंदे वृद्धी व प्रवास सोय नसल्यामुळे आणि बहुतेक पगारी व वतनी अंमलदार मिजासखोर बनल्यावर राजे फिरतीवर निघाले

१ शि.च.सा. संग्रह, भाग २ : १६५४.

२ म.इ.सा. भाग ८, ले. २१.

म्हणजे त्यांना गावगन्ना असतील नसतील तितक्या वतनदारांच्या सेवेची गरज पडे. याचा तत्कालीन परिणाम असा झाला की राजसत्ता विकेंद्रित झाली. कारण जे तंटे उद्‌भवत त्यांचे निकाल तिथल्यातिथे वतनदारांकडून ताबडतोब लागत. त्यामुळे मध्यवर्ती सत्तेस मदतीसाठी हाक मारावी लागली नाही. एवंच अगदी साचेबद्ध वतनदारी पद्धत ही राज्याच्या स्थैर्याला पोषक होती.[१] शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात वतन पद्धतीतील दोष काढून टाकले. त्यांना माहीत झाले की पूर्वीच्या राजसत्तेत वतनदारांना प्रजेकडून राजापेक्षा जास्त मान मिळत असे. वतनदारांनी शेतसारा वसूल करण्याची पद्धत पडून गेली, त्यामुळे सबंध शेतसारा वसूल करून त्यांतील मुख्यभाग स्वत:कडे ठेवून नाममात्र सारा ऐवज सरकारात भरणा करण्याची पद्धत पडून गेली. काहींच्या बाबतीत वतनदार सरकारने ठरवून दिलेल्या शेतसारा आकाराच्या जास्त आकार लावून शेतकऱ्यांना लुबाडीत असत. अशा रीतीने स्वत:च्या तुंबड्या भरत असत. त्यामुळे वतनदारांचे सरकारात वजन वाढले होते.

वतनदारांचे कज्जे शिवाजी महाराज स्वत: जातीने लक्ष घालून सोडवीत असत.[२] असे असले तरी वतनदार त्याकाळी गबर होऊन मोठमोठाल्या हवेल्या, किल्ले, बुरूज बांधीत. तसेच बंदूकधारी सैनिक नोकरीत ठेवीत.[३] ते शासकीय अधिकाऱ्यांशी झगडा करण्यास कचरत नसत. एखादे समयी शासकीय अधिकाऱ्याने शेतसाऱ्याचे जास्त पैसे मागितले तर ते देण्यास नकार देत. इतकेच नव्हे तर त्यांच्या मागणीला विरोध करीत.[४] शिवाजी महाराजांनी वतनदारांचे वाडा, बुरूज पाडले त्यांना निशस्त्र केले. त्यांचे हक्क बांधून दिले. उरलेल्या बुरुजांवर आपले अधिकारी नेमले ह्या अधिकाऱ्यांना शेतकरी जशा घरात रहात त्या पद्धतीच्या घरात रहाण्यास भाग पाडले. काही लोकांची वतने जप्त केली तर काही लोकांना त्यांचे हक्क बांधून दिले. अशा रीतीने राजसत्तेने वतने देऊन त्यांचे कार्य ठरवून

१ कुलकर्णी, महाराष्ट्र इन ध एज ऑफ शिवाजी, पृ. २९-३०.

२ पैद ३१ : ४१.

३ कुलकर्णी, तत्रैव, पृ. ३०.

४ शं. ना. जोशी (संपादीत) सभासद, शिवछत्रपतीचे चरित्र, पृ. २७.

दिले.[१] ह्याचा परिणाम असा झाला की राजसत्ता वतनदारांना बाजूला ठेवून शेतकऱ्यांशी हातमिळवणी करू शकली नाही. राजाला जसे वतने, इनामे देण्याचा अथवा चालू ठेवण्याचा अधिकार होता तसा तो रद्दबातल अथवा जप्त करण्याचाही अधिकार असे. पुण्याच्या देश कुलकर्ण्याने मोगलांशी हात मिळवणी केल्यामुळे राजाने त्याचे वतन जप्त केले.[२] शिवाजी महाराजांनी मोगलांशी हात मिळवणी करणाऱ्या काही मुजोर वतनदारांना निःशस्त्र करून त्यांना गावकीच्या कामास जुंपले. वतनदारांनी गावाचे काम चोख करावे, शेतकऱ्यांवर जुलूम, जबरदस्ती, अन्याय करू नये म्हणून त्यांचे हक्क बांधून दिले. वतनदार वठणीवर आला म्हणजे त्याचे जप्त केलेले वतन परत दिले जात असे.[३] गावकीची कामे पार पाडण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी शिवाजी महाराजांनी नवी वतने निर्माण केली. ज्यांना पूर्वी वतने दिली होती. ती कायम केली.[४] पिढीजात वतनदार आणि त्यांची अनेकविध कामे लक्षात घेऊन वतनदार वठणीवर आला म्हणजे त्याचे जप्त केलेले वतन परत दिले जात असे, आणि रयतेच्या चांगुलपणाने त्यांच्या सहकार्याने वतनदार राजसत्तेने नेमून दिलेली कामे करीत असत. मुख्य वतनदार असेः—पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, चौगुला.

पाटील : पाटील हा गावचा राजा होय. त्याचा पाटील, गाव पाटील, मोकादम पाटील, मोकादम, ग्रामणी, ग्रामप असा मराठी साधनात उल्लेख सापडतो. राज्य व्यवहार कोशांत "ग्रामगोपक" असे म्हटले आहे.[५] त्यास वतनपत्र नावाच्या शासकीय पत्रानुसार आपले पद व सत्ता प्राप्त होई. त्या वतनपत्रात त्याची कर्तव्ये, हुद्दा, दर्जा, हक्क विशिष्ट आणि वतनानुसार आणि पदानुसार गावच्या जमिनीच्या भागावरचा त्याचा हक्क (लाजिमा) याचा उल्लेख असे. कागदपत्रातून निव्वळ मोकादम असा


१ शं. ना. जोशी (संपादीत) सभासद, शिवछत्रपतीचे चरित्र, पृ. २६-२७.

२ पेद ३१, ले. ३८.

३ शि. च. सा. भाग ३, ले. ४२६, म. इ. सा., भाग ८, ले. ३०.

४ शिवकालीन पत्रसार संग्रह, भाग ३ : २७३९.

५ शिवचरित्र-साहित्य, भाग १ : ४९.५५, २ : ९३, म.इ.सा., खंड २१, ले.६, राज्यव्यवहार कोश : ९ : ३२.

जेव्हा उल्लेख येतो तेव्हा त्याचा अर्थ पाटील असा होतो. पण मुकादम पाटील असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा त्याचा अर्थ असा की गावात इतर पाटील असतील तर त्यांचा तो पुढारी म्हणूनच गावचा सर्वाधिकारी होय. पाटील ह्या पदास इतका मान असे की, अत्यंत अडचणी, संकटाच्या प्रसंगी वतनाचा एखादा भाग जरी विकण्यात आला तरी विकणारी व्यक्ती रयतेच्या ज्येष्ठतेचे हक्क रयतेसाठी सांभाळण्याची काळजी घेई. त्यास वडीलपणाची तक्षीम असे म्हणत.[१] अशावेळी पाटलाचे हक्क आणि कर्तव्येही विभागली जात. तरी स्वतःच्या ज्येष्ठतेचे हक्क सांगणारी व्यक्तीच मुख्य पाटील म्हणून काम करी. त्यास मोकादम या विशेष संज्ञेने ओळखले जाई व तो वतनाशी संबंधित काही विशेष हक्कांचा उपभोग घेई. पाटलाच्या पदाचे शासकीय चिन्ह () नांगर असे. ते त्याच्या जमिनीसंबंधी कर्तव्यांचे निदर्शक आहे. पाटलाचे हे अधिकृत चिन्ह प्रत्येक अधिकृत शासकीय कागदावर त्याच्या नावासमोर उमटविले जाई.[२]

काळ्या जमिनीवर जेव्हा वसाहतीला सुरुवात झाली तेव्हापासून पाटीलकीचा उदय झाला असे स्थूलमानाने म्हणता येईल. कागदपत्रातून काळीवर पांढरी रचली असा शब्द प्रयोग केलेला आढळतो. तो पाटलाच्या वसाहतींच्या कार्याचा निदर्शक होय. सर्व पडीक जमीन लागवडीखाली आणून तिच्यातून धान्योत्पादन करणे हे त्याचे मुलभूत आवश्यक कर्तव्य होते.[३] राजवाडे यांनी खं. १७ लेखांक २१ मध्ये पाटलांची कामे थोडक्यात सांगितली आहेत. शिवाजीच्या काळांतही दादाजी कोंडदेवाने शिवाजीच्या जहागिरीतील सर्व पडीक जमीन लागवडीखाली आणण्याच्या अटींवर काही व्यक्तींना पाटीलकी देऊ केली होती.[४]

खेड्याच्या महसुलाची निश्चिती करण्यापूर्वी कारकुनास पाटलाशी सल्लामसलत करावी लागे. कुलकर्ण्यांच्या साहाय्याने दरवर्षी पिकाचा अंदाज बांधणे व नंतर गावाच्यावतीने कारकुनाशी वाटाघाटी करणे, हे पाटलाचे काम असे. महसुलामध्ये सूट देण्याबद्दल सरकारला विनंती करणे

१ म.इ.सा. भाग १५. पृ. ३७८.

२ शि.च.सा. भाग २, ले. ९२, ४ : ७२१.

३ हणंमते रघुनाथ : राज्यव्यवहार कोश : ९ : ५२ (शिवचरित्र प्रदिप).

४ शि.च.सा. भाग २ : १०४.

हे पाटलाचे मुख्य कर्तव्य होते.[१] जमीनमहसूल (शेतसाऱ्या) बाबत शेती करणाऱ्या लोकांची मते सरकारला कळविणे हेही पाटलांचे काम असे. गावातील जमिनी, त्यामध्ये दरवर्षी येणारी पिके आणि जमा झालेला महसूल याबद्दल सरकारला अचूक आणि तपशिलवार माहिती पुरविणे ही पाटलाची जबाबदारी होती.[२] तो जमीन महसुलाबद्दल पूर्णतः जबाबदार होता. त्याला गावातर्फे एक विशिष्ट ठरवून दिलेली रक्कम जमीनमहसूल म्हणून सरकारात जमा करणे ही जबाबदारी पत्करावी लागे. महसुली रक्कम गोळा करताना तूट आल्यास पाटलास खोट सहन करावी लागे. नुकसान सहन करावे लागे.[३] पाटलाला आपले वंशपरंपरा पद गहाण ठेवून सावकराकडून ३५० रुपयांचे कर्ज घेऊन महसुलात कमी पडलेल्या रकमेची भरपाई करावी लागली होती, असे उदाहरण आढळते.[४] याचे कारण प्रत्येक शेतजमीन कसणाऱ्या जमीनधारकाकडून शेतसारा वसूल करण्याऐवजी सरकारने पाटलास भाडेमुक्त जागा बक्षीस म्हणून बहाल केली होती. काही वेळा पाटील जमीनधारकासाठी जामीन राही. त्याबद्दल गावकरी पाटलास काही ठरावीक रक्कम आणि वस्तू इत्यादी, प्रथा म्हणून बहाल करीत. गावपंचायतीचा पाटील हा माननीय सभासद असे. ग्रामपंचायतीच्या सभांचे संचालन पाटीलच करी.[५] कोणत्याही कायद्याविषयी कागदपत्रावर त्याची सही आवश्यक असे.[६] गावात शांतता व सुव्यवस्था राखणे हे पाटलाचे एक महत्त्वाचे कर्तव्य होते.[७] जर गावकरी दुष्काळ, अवर्षण, लढाया इत्यादी कारणांसाठी गाव सोडून गेले तर विशेष प्रयत्नांनी गावी परतण्याबद्दल आणि त्यांच्यासाठी, सरकारकडून कौल (सामान्य करारपत्र) व तगाई (बयाना) घेऊन पुनःशेती करण्यासंबंधी त्यांचे मन वळविणे हीसुद्धा पाटलाची मुख्य जबाबदारी असे. काही वेळा पावसाळ्याच्या प्रारंभी मामलेदार, पाटील व कुलकर्णी यांच्यासह जिल्ह्यात दौरा करून,

---

१ म.इ.सा. १७ : १२, २४ शि.च.सा. १ : ३९

२ तत्रैव : १५ : ३४०.

३ तत्रैव : १७ : २१.

४ तत्रैव : २८ : २७ जोशी, एस.एन. " पाटीलकी वतन " भा.इ.सं.मं. त्रैमासिक वर्ष १३, खंड ३.

५ शि.च.सा. ३ : ५६७.

६ तत्रैव : १ : २६.

७ तुलना : विल्सन-शब्दकोश : पृ. ४०७.

पाटलांशी विचारविनिमय करून हंगामाच्या महसुली रकमेची निश्चिती करत. महसूल भरणा करण्याचे वेळी, महार ज्यांनी पाटलास महसूल दिला असेल अशा रयतेस बोलावी आणि कुलकर्णी, पोतदाराच्या समक्ष त्यांना पावती देई. जर आवश्यकता वाटली तर पाटलास महसूल गोळा करताना शिबंदीचे साह्य घेता येत असे. महसूल गोळा केल्यानंतर चौगुला आणि महार यांच्या देखरेखीखाली तो मामलेदाराकडे पाठवून त्यांच्याकडून पावती घेणे ही पाटलाची नंतरची जबाबदारी असे.[१]

पाटलास दंडाधिकाऱ्याचे (मॅजिस्ट्रेटचे) अधिकार असत. त्यास बारीक सारीक गुन्हे हाताळणे, त्यांचा तपास करणे ही कामे त्यांच्या प्राथमिक दंडाधिकाऱ्याच्या जबाबदारीवर करावी लागत. शेती करणाऱ्या जमीन-धारकांची गाऱ्हाणी दूर करणे व गावातील तंटेबखेडे सोडविणे ही त्याची कामे असत. क्षुल्लक गुन्ह्याच्या बाबतीत गुन्हेगाराची कान उघाडणी करणे किंवा त्यास फटक्याची शिक्षा देणे, ह्यांचे त्यास अधिकार असत. पण त्यास द्रव्यरूप दंड करण्याचा अधिकार नव्हता. गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडल्यास, त्याविषयी सरकारात खबर द्यावी लागे.[२] न्यायाधिकार म्हणून पाटलाची कर्तव्ये न्यायाधिशांची नसून गावकामगारांची होती. वादी-प्रतिवादीमध्ये समेट घडवून आणणे हे त्याचे मुख्य कार्य. ब्राह्मण आणि मराठे ह्यांनी पाटलाचे पद सांभाळले आहे. पाटीलकीचे वतन राजाकडून प्राप्त होई किंवा खरीदता येई.[३]

शांततापूर्ण ग्राम-प्रशासनासाठी पाटील हा अत्यावश्यक अधिकारी होता.[४] "जो पाटलाचा रोष स्वतःवर ओढवून घेतो, तो खेड्यात राहू शकत नाही" असे संत तुकारामही म्हणतात.[५]

(१) मानपान :—

पाटलास, गावच्या आणि ग्रामपंचायतीच्या इतर सदस्यांसह सणासुदीच्या उत्सवाच्या प्रसंगी मानापनाचा अधिकार होता. सामान्यतः गावच्या सर्व

१ एलफिल्स्टन, रिपोर्ट ऑन दी टेरिटरीज कॉन्कर्ड फ्रॉम धी पेशवाज.
२ पेशवे रोजनिशी : खंड १, क्र.३०१, यादी-सनदा आणि पत्रे, पृ. ६१.
३ शि.च.सा. २ : ९५.
४ तत्रैव : ३ : ६११.
५ तुकाराम गाथा अभंग क्र. ६७३, ३८८१.

उत्सवात पाटील मुख्य असे. तसेच होळीच्या दिवशी पुरणपोळी, भाद्रपदात गणेशमूर्ती, संक्रातीचा तिळगुळ आणि नागपंचमी, पोळा, दसरा, गुढीपाडवा यासारख्या सणासुदीच्या दिवशी इतर अनेक गोष्टी पाटलास मान म्हणून मिळत.[१]

(२) द्रव्यरूप प्राप्ती :—

खेड्याच्या शेतसाऱ्यातील ठरावीक भाग द्रव्यरूपाने व काही भाग वस्तुरूपाने (गल्ला) घेण्याचा हक्क असे.[२]

(३) वस्तुरूप प्राप्ती :—

" पळकी " पाटलास प्रत्येक शेतजमिनीतून काही धान्य उदा. " घुगरी ", " फस्की ", " हुरडा " मिळण्याचा हक्क असे. तद्वतच गावच्या कारकुनाकडून नित्योपयोगी वस्तू, उदा. जोडे, पासोडी, चोळखण, तेले, नारळ, तूप, मांस इत्यादी वस्तू मोफत मिळण्याचा हक्क असे. त्यास ' पळकी ' असे म्हणत. [३]

(४) सेवा :—

पाटलास गावातील महार, ताशेवाले, चौघडेवाले, नगारावादक आणि इतर कारागिरांकडून निःशुल्क (मोफत) सेवा घेण्याचा अधिकार असे.[४]

(५) विविध कर (Levies) :—

पाटलास सरकारने शेतजमीनधारकांवर बसविलेल्या करातूनही ठरावीक भाग मिळे. त्या करांमध्ये विवाह कर, काडीमोड कर, स्थानांतर कर (Transit Tax) यांचा समावेश असे.[५]

ह्या हक्कांचा आणि विशेष करांचा प्रत्येक सनदेत किंवा महजरात उल्लेख येत नाही. काही बाबतीत हे हक्क आणि कर कुटुंबात पुढे चालू राहावेत असे उल्लेख येतात. या करांची शेतजमीनधारकांना परंपरेने आणि रीवाजीमुळे माहिती होती. आणि म्हणून प्रत्येक सनदेत किंवा महजरात त्यांचा उल्लेख अर्थातच आवश्यक वाटत नसे.

१ शि.च.सा. : २ : ९८ जोशी, एस. एन., मराठेकालीन समाजदर्शन : पृ. ४-१५.

२ शिवचरित्र साहित्य : २ : १०४ ; ३ : ६२७.

३ कित्ता : २ : ९८.

४ कित्ता : २४९.

५ कित्ता.

पाटलांच्या न्यायदानासंबंधी तसेच कार्याविषयी कोठेही स्पष्ट उल्लेख आढळत नाहीत परंतु काही कागदपत्रात पाटलास काही तंटेबखेडे सामोपचाराने तडजोडीने मिटविण्याचे अधिकार होते असे उल्लेख आढळतात. मिराशी घरात एखाद्यास राहू देणे, मालकाने फार पूर्वीच सोडलेल्या घराचा ताबा घेणे यासारखे त्यास अधिकार असत.[१]

पाटील गावातील पोलीस व्यवस्थेचा प्रमुख असे. याबाबतीत महार हा त्याचा विश्वसनीय व भरवशाचा मदतनीस असे. गावात नवीन येणारे व गावातून जाणारे इसम यांची नोंद ठेवणे हे महाराचे कर्तव्य असे. पाटलाचे हकलाजिमे हे परंपरेने आणि रूढीने ठरविले असल्याची कल्पना गावकऱ्यांना असे.

गस्त घालणाऱ्या गावकामगारांवर-वेसकरांवर देखरेख ठेवून सुरक्षेची व्यवस्था करणे ही पाटलाची जबाबदारी होती. त्याला नेहमीच्या महाराव्यतिरिक्त शांतता सुव्यवस्था राखण्यासाठी जादा पोलीस दल ठेवण्याचे अधिकार होते.[२] सामान्यतः जादा पोलीस दलासाठी लागणारे पोलीस रामोशी, बेरड, भिल्ल यांच्यामधून भरती करण्यात येत. आपल्या जातीचे लोक गुन्ह्याकडे प्रवृत्त होणार नाहीत आणि गुन्हे घडल्यास गुन्हेगारांचा मार्ग शोधणे ही त्यांची प्रमुख कर्तव्ये होती.[३] अर्थातच अंतिम जबाबदारी पाटलावरच असे. कोणत्याही प्रयत्नाने चोर शोधणे किंवा चोरीच्या मालाची भरपाई करणे हे त्याचे कर्तव्य असे.[४] सरकारने स्वीकारलेली ही पोलीस यंत्रणा व व्यवस्था एकमेवाद्वितीय होती. चोरी झाल्याची खबर येताच, गावचा पहारेकरी (वेसकर-जागल्या) चौकशी व तलाश सुरू करी. सामान्यतः चोराचा माग त्यांच्या पावलांच्या खुणामुळे लागे. जर वेसकर-जागल्या चोराचा भार दुसऱ्या गावापर्यंत शोधू शकला किंवा त्या गावात चोराचा माग त्यास सापडला, पण चोरीचा माल सापडला नाही, तर पुढल्या गावात चोराचा शोध घेणे, गावातच माल हस्तगत करणे ही दुसऱ्या गावातील वेसकर जागल्याची जबाबदारी असे. जर गावात चोरीचा माल सापडला नाही तर गावकऱ्यांकडून त्याची भरपाई वसूल करण्यात येई.[५]

१ पेशवे रोजनिशी : क्र. ११२, १२३-१२६.

२ एल्फिन्स्टन, पृ. ३६.

३ पुरंदरे दप्तर क्र. १२२-१२६.

४ कित्ता.

५ एलफिन्स्टन : पृ. ३५-३६.

कुलकर्णी :

तत्कालीन कागदपत्रांतून कुळकर्णीचा उल्लेख गावकुळकर्णी किंवा ग्रामलेखक असा केला आहे.[१] कुळकर्णींच्या वतनाचे वर्णन लेखनवृत्ती असे केलेले आहे.[२] कुळकर्ण्यांस ग्रामलेखी किंवा गावचा लेखापाल असेही म्हणत.[३] प्रत्येक मिरासदाराकडे गावची जमीन किती आहे आणि त्याच्यावर सरकारी सारा किती आकारला आहे याचा तपशील कुळकर्णींच्या दप्तरात असे. शेतसारा गोळा करण्याचा मोसम संपल्यावर, त्यास शेतकऱ्यांकडून येणे असलेली शेतसाऱ्याची रक्कम व प्रत्यक्ष जमा झालेली रक्कम यांची जुळवणी करून शेतसाऱ्याची थकबाकी किती आहे, तिची दखल नोंद घ्यावी लागे.[४] ज्यायोगे गावातील अधिकाधिक जमीन लागवडीखाली येईल. त्यासाठी शेतकऱ्यांना शेतीसाठी उद्युक्त-आकृष्ट करणे हा त्याचा कर्तव्याचा एक भाग होता.[५] अर्थातच ही गोष्ट त्याच्याकडून अपेक्षित असली तरी त्याना ती अनिवार्य नव्हती. जर कुलकर्ण्याने गावचे हिशेब योग्य रीतीने ठेवण्यात चूक किंवा हलगर्जीपणा केला तर तो शिक्षेस पात्र होई.[६]

शासन पद्धतीच्या यंत्रणेत कुलकर्णी हा प्रत्येक गावच्या शासन पद्धतीमध्ये अनिवार्य किंवा अत्यावश्यक घटक होता असे वाटत नाही. याचे कारण कारकुनी काम करण्यास पात्र अशा पुरेशा सुशिक्षित माणसाची कमतरता हे असू शकेल.[७] किंवा त्याच्या वाट्यास जे काम असे ते स्वतंत्र पदाची नियुक्ती करण्याइतके पुरेसे वाटत नसावे हेही कारण प्रत्येक गावात कुलकर्णी नसण्याचे असू शकेल. हे अनुमान बरोबर आहे असे वाटते ; कारण काही ठिकाणी ११ खेड्यांसाठी मिळून एकच कुलकर्णी नेमलेला होता असे आढळते.[८] काही ठिकाणी गावात नेमलेला कुलकर्णी ब्राह्मण

१ पुरंदरे दप्तर क्र. १२-१२६.

२ तत्रैव.

३ एलफिन्स्टन, पृ. ३५-३६.

४ पे. द. भाग ३१ : २४; शि. च. सा. ५:९७५.

५ शि. च. सा. : ३ : २५९२; म. इ. सा. १८:१९.

६ कित्ता : ३ : २६१०.

७ शि. च. सा. : १ : २८.

८ तत्रैव : १ : २९ : १ : ३०.

असे आणि त्यास ग्रामजोशी व कुलकर्णी अशी दोहोंची कामे करावी लागत. तेव्हा एकाच कुलकर्ण्यांच्या देखरेखीखाली अनेक गावे असत. त्यास वेगवेगळ्या गावात हिशेब चोख ठेवण्यासाठी सहायक नेमण्याची मुभा असे.[१] कुलकर्णी पदावर काम करणाऱ्या अप्रामाणिक माणसास शेतजमीन कसणाऱ्याकडून वाजवीपेक्षा अधिक शेतसारा वसूल करून त्याचा अनुचित उपयोग/अपहार करणे अगदी शक्य व सोपे होते. "अप्रामाणिकपणाचा आणखी एक वाईट प्रकार म्हणजे जमा झालेल्या शेतसाऱ्याची नोंद न करणे, किंवा चुकीची नोंद करणे आणि अजिबात थकबाकी नसताना हिशेबात ती आहे अशी दाखविणे हा होता.[२] शिवाजी महाराजांनी चौलच्या कुलकर्ण्यांची " आपले कर्तव्य नीट न बजावल्याबद्दल " कानउघाडणी केल्याची नोंद ऐतिहासिक कागदपत्रात आढळते.[३] पाटलाने शासनाच्या प्रतिनिधीस दिलेल्या रकमेचा समावेश गावाच्या हिशेबात करणे हेही कुलकर्ण्यांचे काम असे. कुलकर्णी अनुपस्थित असल्याने गावकऱ्यांनी भरलेला शेतसारा महसूल येणे थकबाकी म्हणून सतत दाखविण्यात आला अशी तक्रार जुलै १६६६ रोजी केलेली आढळते.[४] जेव्हा कुलकर्ण्यांचे काम वंशपरंपरेने करण्यास व्यक्ती उपलब्ध नसे तेव्हा गावकरी कुलकर्णीचे काम करण्यासाठी एखाद्या व्यक्तीची तात्पुरती नेमणूक करीत. तरीही ते वंशपरंपरेने कुलकर्णी वतन चालवू इच्छिणाऱ्या व्यक्तीचा शोध घेण्यात तत्पर असत. परंतु अशी योग्य व्यक्ती न आढळल्यास ते वतन विकण्यात येई, कुलकर्णी पद-वतन १५० होनांना विकले गेल्याचा उल्लेख आढळतो.[५] त्याला " शेरणी " म्हणत. कुलकर्णी गावाचा लेखापाल असल्याने त्याचा ग्रामशासनासंबंधी अनेक बाबींवर पुष्कळच प्रभाव पडे. प्रशासनासंबंधी अनेक गोष्टींच्या बाबतीत पाटलास कुलकर्ण्यांचा वारंवार सल्ला घ्यावा लागे. वास्तविक पहाता दोहोंनी परस्पर सहकार्याने व सामंजस्याने काम करावे. गावचा कारभार चालवावा अशी अपेक्षा

१ शि. च. सा. : १ : ३१; शि. प. सा. सं. १ : २८.

२ म. इ. सा. : १८ : २३.

३ सरदार, गं. बा ; संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती (महाराष्ट्र साहित्य परिषद-पुणे : १९५०) ३ : २६१०.

४ म. इ. सा. : १८ : २३.

५ शि. प. सा. सं. ३ : २७२५.

होती.[१] तरीही पाटील कुलकर्ण्यांहून ज्येष्ठ असे. पण त्यास काहीवेळा कुलकर्ण्यावर अवलंबून राहावे लागे. साहजिकपणे काही प्रसंगी कुलकर्णी पाटलास नामोहरम करू शके, निष्प्रभ बनवू शके. आपण केवळ प्रमुख असून खरी सत्ता कुलकर्ण्यांच्या हातीच आहे. अशी तक्रार एका पाटलाने केलेली आढळते.[२] इतर पदाप्रमाणेच कुलकर्णी पदही वंशपरंपरा झाले. ग्रामीण भागांत साक्षर व पुरेशा शिक्षित व्यक्तींची कमतरता हेही कदाचित त्याचे कारण असू शकेल.[३] एकदा एक व्यक्ती कुटुंबात साक्षर-शिक्षित झाल्यावर, सुशिक्षित झाल्यावर, साक्षरता/शिक्षणाची परंपरा त्या कुटुंबात पुढे सातत्याने चालू राहील हे गृहित धरले जाई. कुटुंबाचे एखादे व्यक्तीस गावचे हिशोब इत्यादी लिहिण्यासाठी गावच्या सेवेस देणे ही एक कृपा मानली जाई. कुलकर्ण्यांने केवळ गावाचे व शेतजमीनीचे दप्तर आणि हिशोब ठेवावेत असे नव्हे तर त्याने खरेदी-विक्री व्यवहाराचे कागदपत्रही तयार करावेत व गावकऱ्यांचा खाजगी पत्र व्यवहारसुद्धा बघावा हेसुद्धा त्याच्यापासून अपेक्षित होते.[४]

जर कुलकर्ण्यांचा वंश नष्ट झाला तर गावकरी त्याच्या जागी कायम "कुलकर्णी" नेमला जाईपर्यंत थोड्या कालावधीसाठी मुतालिकाची नेमणूक करीत. त्यानंतर गाव-पंचायतीचे अधिकारी कुलकर्णी पद व वतन विकू शकत. त्या विक्रीपासून मिळालेला पैसा साऱ्याची थकबाकी चुकविण्यासाठी वापरण्यात येई अथवा गावच्या खात्यात जमा होई.[५] कुलकर्णी पद वतन खरेदी करणाऱ्यास अर्थातच त्या पदासंबंधीचे सर्व हक्क प्राप्त होत ; गावकरीही नवीन कुलकर्ण्यास आश्वासन हमी देत की, जर पुनः कोणी नव्याने कुलकर्णी पदावर हक्क सांगितल्यास त्याची जबाबदारी त्यांच्यावर राहील.[६] कुलकर्णी पदास पात्र अशा व्यक्ती मोजक्याच असल्याने, गावकऱ्यांना कुलकर्णी पद खरेदी करणे क्वचितच जमे. अतएव गावकरी योग्य त्या व्यक्तीस कुलकर्णी पद तिच्याकडून कोणतेही द्रव्य

१ कर्वे मुंजेरी पाटील कुलकर्णी यांमधील करार : (भा.इ.स.मं. त्रैमासिक : खंड २४ : पृ. ११८.)

२ शि. प. सा. सं. : ३ : २३८२.

३ शि. च. सा. : १ : २९ : ३४७९.

४ एल्फिन्स्टन, वरीलप्रमाणे : पृ. १७.

५ शि. च. सा. : ४ : ९६९२ शि. प. सा. सं. ३ : २७२५.

६ तत्रैव : ४ :

न घेता नेमण्यास राजी असत.[१] कुलकर्ण्यांचा शासनाच्या प्रतिनिधींशी नेहमीच संबंध येई, म्हणून त्याची नेमणूक करताना गावकऱ्यांना सरकारची परवानगी घ्यावी लागे. जर सरकारने कुलकर्ण्याविरुद्ध त्याच्या अपराधाबद्दल कारवाई करण्याचे ठरविले तर त्याचे पद वंशपरंपरा असले तरीही त्यास शासन दूर करू शके. अशी परिस्थिती उद्‌भवल्यास सरकार इतर कुटुंबाच्या हक्काची दखल घेऊन योग्य त्या व्यक्तीस कुलकर्णी पदावर नेमी.[२] कोकणामध्ये कुलकर्ण्यांची नेमणूक प्रथम शिवाजी महाराजांनी केली. तोपर्यंत आदिलशाही अंमलाखाली असलेल्या चौल सुभ्यामध्ये वतनदार कुलकर्ण्यांची नेमणूक झाली नव्हती. गावाचे हिशेब ठेवण्याचे काम हुजूरदारांवर सोपविण्यात आले होते. त्याचा दर्जा कारकुनाचा असून ते दोन ते चार गावांचा हिशेब ठेवत. त्यास रोख वेतन मिळे. जेव्हा शिवाजी महाराजांनी हा प्रदेश (चौलसुभा) जिंकला, तेव्हा या हुजूरदारांना देण्यात येणारे रोख वेतन थांबविण्यात आले. कुलकर्ण्यांस द्यावयाचे द्रव्य इत्यादी पाटलामार्फत सुगीच्या हंगामात गावकऱ्याकडून वसूल करण्यात येई आणि कुलकर्ण्यांस देण्यात येई.[३] शिवाजी महाराजांनी "सरसुभेदाराच्या" साहाय्याने चौल सुभ्यासाठी कुलकर्ण्यांचे हक्क ठरवून दिले.[४] कुलकर्ण्यांच्या वतनपत्रात त्याचा "हक्क" असा उल्लेख येतो. ते खालीलप्रमाणे आहेत :---

(१) रोख रक्कम (नक्त).—आपल्या पगाराव्यतिरिक्त, कुलकर्ण्यांस अतिरिक्त रोख रक्कम मिळण्याचा हक्क असे. काही कागदपत्रात लेखनसामग्रीबद्दल मिळणाऱ्या रोख रकमेचा उल्लेख आहे.[५]

(२) महसूल.— कुलकर्ण्यांस ठरवून दिलेल्याप्रमाणे दर खंडीत महसूल मिळे.[६]

(३) पायपोशी.— प्रतिवर्षी कुलकर्ण्यांस गावच्या चांभाराकडून जोडे मिळत.

---

१ शि. च. सा. : ४ : ६९२.

२ कित्ता. म. इ. : १५ : २७०.

३ भा. इ. सं. मं. त्रैमासिक : शके १८६९-७० : क्र. ३, पृ. ९

४ पे. द. : ३१ : २४.

५ शि. च. सा. : ४ : ६९२.

६ कित्ता.

(४) खर्चपट्टी आणि सादिलवारपट्टी.— खर्चपट्टी म्हणजे ग्रामसंस्थेचे अधिकारी व सेवक यांस गावकऱ्यांनी द्यावयाच्या परंपरागत गोष्टी होत. सादीलवारपट्टी म्हणजे स्थानिक अधिकाऱ्यांनी लादलेल्या योग्य महसूलाव्यतिरिक्त अतिरिक्त देय रक्कम होय. प्रसंगोपात्त होणारे खर्च भागविण्यासाठी ती गोळा करण्यात येई. जर सादीलवारपट्टी गोळा करण्यात आली तर कुलकर्ण्यांस त्यातला रास्त हिस्सा मिळे.

(५) तूप.— गावच्या लोणी विक्र्यापासून कुलकर्ण्यांस ठरावीक प्रमाणात तूप मिळे.

(६) वेठबिगारी.— वेठबिगारी म्हणजे सत्ताधारी अधिकाऱ्याने व्यक्तीकडून घेतलेली निर्वेतन सेवा होय.

(७) घुगरी.— घुगरी म्हणजे तयार झालेल्या पिकातील हिस्सा होय. सुगीच्या हंगामात कुलकर्ण्यांच्या हजेरीत तयार पीक मोजले जाऊन त्याचा वाटा बाजूस राखण्यात येई. त्यास " सलई "(Salai) असे म्हणतात. त्यास " हुरडा व लोंब्या " घेण्याचा हक्क असे.[१]

(८) वानवळा .— सरकारी अधिकारी व खेड्यातील वंशपरंपरागत अधिकारी तयार झालेल्या पिकांचे व फळांचे नमुने गोळा करत, त्यास वानवळा म्हणत. प्रत्येक ठिकाणी कुलकर्ण्यांचे हक्क सारखे नव्हते तर ते त्या-त्या ठिकाणच्या रुढीनुसार वहिवाटीप्रमाणे ठरलेले असत.[२]

कुलकर्ण्यांच्या कामात ग्रामपंचायतीचे हिशेब ठेवण्याखेरीज, गावातील सर्व जमिनीचे तपशीलवार दप्तर नोंदीत जमिनीचे नाव, आकार-क्षेत्रफळ, मालकाचे नाव याचे तपशीलवार वर्णन नोंदलेले असे. तद्वत थळझाड्यात, गावाच्या सर्व रहिवाशांची ते शेती करणारे असोत वा नसोत नोंद असे. याबाबतीत कुलकर्ण्यांस पाटलांच्या सहकार्याने काम करावे लागे.[३]

कुलकर्ण्यांस शेती करणाऱ्याकडून (मुशहिरा) मासिक भत्ता घेण्याचा पदसिद्ध अधिकार होता. त्याला घर बांधण्यासाठी मिराशी जमीन देण्यात येई. तद्वतच सरकारात पूर्ण महसूल भरल्यानंतर जे बक्षिस मिळे ; त्यास बहुमानाचा पोशाख म्हणत. कुलकर्ण्यांस तेल्याकडून प्रतिदिनी ९ " टक "

१ शिवचरित्र सा.

२ तत्रैव : ४ : ६८२ ; १ : ३१.

३ मुंजेरी पाटील-कुलकर्णी यामधील करार (भा. इ. सं. मं. त्रैमासिक. खंड २४, पृ. ११८).

तेल, दरवर्षी चांभाराकडून एक पायताण जोड. सणावारी सरपणाची मोळी, दसरा दिवाळीच्या दिवशी पाटलाच्या मानानंतर त्याच्या घरासमोर सनई-चौघडा वाजविण्याचा मान, तांबोळ्याकडून पाटलांस मिळत त्याच्या निम्मी विड्याची पाने, माळ्याकडून भाज्या या गोष्टी मिळत. शाई तयार करण्यासाठी तेल आणि दप्तराचे कागदपत्र बांधण्यासाठी कापड यांची तरतूद गावाच्या राखीव निधीतून होई.[१] कुलकर्णी पदावरील व्यक्ती सामान्यतः ब्राह्मण असे. कुलकर्ण्यांस "जोश्यांचे" (ज्योतिष्याचे) काम करावे लागे. त्याचा उल्लेख वर आलेलाच आहे. त्याला त्याच्या ह्या अधिक कर्तव्याबद्दल जादा मेहनताना मिळे.[२] ही गोष्ट येथे नमूद केली पाहिजे. कुलकर्णी पद वंशपरंपरागत असे ; पण ते विकत किंवा गहाणही टाकता येई.

□□

१ शि. च. सा. खंड १ : क्र. २८३.

२ तत्रैव.

५५. शिवकालीन ग्रामशासन व्यवस्था

या काळातील ग्रामीण वस्त्या प्रशासकीय दृष्ट्या स्वायत्त आणि आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होत्या. गावकऱ्यांची एकजूट आणि संघटीतपणे गावचे प्रशासन पाहण्याची त्यांची पद्धत प्रशंसनीय होती. त्या समाजाचे घटक म्हणजेच गावकरी हे विविध सामाजिक गटांमधील आणि विविध स्तरांमधील लोक होते. ते सर्वजण गावातील प्रशासन एकत्रपणे आणि सुसंबद्धपणे पहात असत. यावरून त्या ग्रामीण स्वायत्त शासनाचे वेगळेपण, वैशिष्ट्य स्पष्ट होते. प्रत्येक गाव हे वेगळे पडल्यासारखे व एकमेकापासून दूर-दूर अंतरावर वसलेले असे. त्यामुळे गावकऱ्यांच्यात संघटीतपणाची व गावांतील सर्वजण एक असल्याची भावना साहजिकच दृढ होत असे.

प्रत्येक ग्रामीण वस्ती संरक्षण आणि आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत स्वयंपूर्ण असणे आवश्यक असे. गावकऱ्यांच्या दैनंदिन अगर नैमित्तिक गरजा भागवताना गावातल्या गावातच उपलब्ध साधनांचा वापर करून वस्तु निर्माण करीत असत. तसेच सर्वसाधारण लोकोपयोगी काम करताना गावाच्या उपयोगाची एखादी निर्मिती करताना गावातील साधनांचा वापर केला जाई. प्रसंगी सर्व गावकरी एकत्रितपणे पैसा उभारून ते काम पूर्ण करीत. शेजारच्या गावाशी कधी भांडण-तंट्याचा प्रसंग उद्‌भवला असता सर्व गावकरी एकत्र येऊन गावाच्या हिताकरता एक भक्कम फळी उभारत असत.

प्रत्येक गावाचे स्वतःचे असे वैशिष्ट्य बनलेले असे. गावातील समाजजीवन वैशिष्ट्यपूर्ण होते. ही समाजरचना चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आधारित, उच्चनीच जाती मानणारी नव्हती. किंबहुना त्या समाजात जातीभेद-वर्ण दोष यांना स्थानच नव्हते.

मराठ्यांच्या राज्यात ग्रामीण शासन व्यवस्था पूर्वापार पद्धतीनेच चालत होती. प्राचीन काळापासून दृढमूल झालेल्या शासन व्यवस्थेमध्ये गांवातील रहिवाशी हे केंद्रस्थानी असून गावांची आर्थिक किंवा सामाजिक व्यवस्था त्याच्या सभोवती एकवटलेली असे. गावातील रहिवाशांच्या जीवनास

उपयोगी व त्यांच्या विकासात पूरक असेच सामाजिक आणि आर्थिक व्यवहार तेथेच होत असत. आणि ते गावकऱ्यांच्या जीवनाशी संपूर्णपणे निगडित असत.[१] जवळजवळ सर्वच लोकांचे (गावकऱ्यांचे) चरितार्थाचे साधन म्हणजे शेती[२] हा एकमात्र व्यवसाय असल्यामुळे सर्वच आर्थिक व्यवहार शेती आणि जमिनी आणि त्यांच्या उत्पन्नापासूनच सुरू होत असत. गावातील रहिवाशी मात्र एकाच प्रकारचे जीवन जगणारे किंवा एकसमान राहणीचे असे नव्हते; एकाच जातीचे किंवा रीतीचेही नव्हते. वेगवेगळ्या प्रदेशातील वस्त्यांमधील लोक, वेगवेगळ्या प्रकारचे जीवन जगणारे, वेगवेगळे राहणीमान, आचार, विचार असणारे होते. सर्वसाधारणपणे ग्रामीण वस्त्यांच्या व्यवस्थापनाचे रयतवारी आणि सामाईक (Joint-Village) असे दोन प्रकार होते. रयतवारी पद्धतीमध्ये गावातील वेगवेगळे गावकरी आपआपल्या जमिनीचे मालक होते. तर सामाईक पद्धतीमध्ये गावातील सर्व पिकाऊ आणि पडिक मिळून सर्व जमीन सर्व गावकऱ्यांच्या एकत्रित मालकीची असे.[३] गावाच्या संपूर्ण जमिनीचे दोन प्रकार म्हणजे (१) शेत जमीन जी शेती करण्यालायक असे आणि, (२) वस्तीची जमीन, ज्यावर घरे, वसाहत बांधण्यात येत असे. उपलब्ध दस्तऐवजांमध्ये गावाचा तत्कालीन उल्लेख ग्राम, देहे, मौजे, खेडे इ. अनेक नावांनी केलेला आढळतो. गावाच्या उप विभागांना माजरा, वाडीपाडी, खारी इ. नावे आढळतात. ग्राम, मौजे, देहे, खेडे ही समानार्थी नावे होती परंतु मौजे हे अधिक प्रचलित नाव होते. दोन गावे जर एकमेकालगत वसलेली असतील तर त्यातील मोठ्या गावठाणास "बुद्रुक" आणि लहान गावठाणास "खुर्द" म्हणत असत.[४] त्या गावातील वस्ती जर काही कारणाने विखुरली किंवा घटली तर बुद्रुक, खुर्द ही नावे बदलण्यात येत असत. एखादे गाव जेव्हा अतिशय भरभराटीस येत असे, इतके की त्यास वेगळ्या प्रशासकीय विभागाचे स्वरूप प्राप्त होत असे, तेव्हा त्याला त्याच्याहून पूर्वी मोठे असलेल्या गावाचे नाव प्राप्त होत असे व यापुढे खुर्द असे म्हणण्यात येई. मूळ मोठे असणाऱ्या गावाचा मोठेपणा टिकवण्याचा

१ बोडेज-पोवेल, इंडियन व्हीलेज कम्युनिटीज, पृ. ६२०-२१.

२ मराठी दप्तरात याचा उल्लेख काळी आणि पांढरी असा केलेला आढळतो. आत्रे, गावगाडा, पृ. १.

३ राजवाडे, म. इ. सा. खंड १५, ले. २७४.

४ बुद्रुक आणि खुर्द यांना संस्कृतमध्ये बृह्त आणि "लघू" असे संबोधन आहे.

हा काहीसा प्रकार म्हणता येईल. उदा. नेवासे बुद्रुक आणि नेवासे खुर्द.[१] गावाच्या उप विभागाला/उप नगराला सामान्यतः माजरा म्हणत. जेव्हा गावातील काही कुटुंबे त्यांच्या शेती जमिनीवर जाऊन वस्ती सुरू करीत, नवीन घरे वस्ती तयार होत असे[२] तिला "माजरा" असे म्हणण्यात येत असे. काही वेळा त्या शेत जमिनीवर ती वस्ती तयार होत असे त्या जमिनीच्या नावाने ओळखण्यात येत असे. वाडी, पाडी, खारी. आणि माजरा ही अशी वस्त्यांची समानार्थी संबोधने होती. देशावर "वाडी" हे संबोधन जास्त प्रचलित होते तर कोकणात वाडी आणि पाडी ही दोन्ही नावे प्रचलित होती.[३] समुद्र किनाऱ्यालगत असणाऱ्या गावाला "खारी" अर्थातच खारट जमिनीचे म्हणत असत. समुद्रालगतची जमीन खाजणाची खारट असल्यामुळे तिला खारी असे नाव पडले.[४]

जेव्हा गावातील रहिवाशांसमोर कारागीर, कसबी कलाकारांचे प्रमाण जास्त असे आणि ते कारागीर स्वतःचे छोटेसे दुकान एखाद्या जवळपासच्या गावात चालवीत असत तेव्हा त्या वस्तीला "कसबा" असे नाव देण्यात येत असे. अशा कसब्यामध्ये आठवड्याचा बाजार भरत असे. अशाप्रकारे दर आठवड्याला बाजार भरून, त्या वस्तीत खूप गर्दी गजबज होत असे. तिथे खूप देवाणघेवाण आणि आर्थिक उलाढाली होत असत तेव्हा त्यास "पेठ" असे म्हणत.[५] काही वेळा शासन एखाद्या जबाबदार व्यक्तीस बोलावून एखाद्या ठिकाणी पेठ वसविण्याची जबाबदारी आणि अधिकार देत असे. थोडेसे कर्ज व काही अटीचे बंधन घालून त्या त्या व्यक्तीस पेठ वसविण्याचे सर्व अधिकार दिलेले असत. ज्यायोगे अशा वस्तीच्या ठिकाणी रहिवाशांना इतर जवळपासच्या गावातील वस्तू विकत घेणे शक्य होत असे.[६] समुद्रकिनाऱ्यावरील बंदरास "मिरा" असे म्हणत. गावामध्ये काही काही पूर्वापार राहत असलेले रहिवाशी असत. ते गावाचे प्रशासन आणि इतर घडामोडी यांचे निरीक्षण करीत. वंशपरंपरेने ते गावाची व्यवस्था

१ म. इ. सा. खंड १५, ले २७४.

२ म. इ. सा. खंड ३१, ले. ४१.

३ शि. च. सा., पृ. ८७६.

४ शि. च. सा. खंड ८, ले. ७६.

५ ग्रटँडफ, मराठाझ, खंड १, पृ. २८.

६ म. इ. सा., पृ. २०, १०७.

पाहत असत, पिढीजात गावाचे प्रशासन पाहणाऱ्या ह्या अधिकाऱ्यांचा दर्जा फार श्रेष्ठ होता. गावातील काही जमिनीचे ते मालक असत. आणि शासनातर्फेही त्यांना अधिक उत्पन्न प्राप्त होत असे. अधिकाऱ्यांना " देशक " असे नाव होते.[१] गावातील हवालदार, मुजुमदार इ. अधिकाऱ्यांपेक्षा " देशक " वेगळे होते.[२] त्यांची नियुक्ती परगणा, कसबा, पेठ किंवा गाव अशा ठिकाणी केली जात असे.[३] कागदपत्रांमधील पुराव्यावरून असे समजते की, देशक हा कोणी एक विशिष्ट अधिकारी नसून तो देसाई, देशमुख, कुलकर्णी किंवा पाटील, देशकुलकर्णी, देशपांडे यांच्यासारख्या उच्च दर्जाचा पिढीजात अधिकारपद असणारा एक अधिकारी होता.[४] काही वेळा तर देशक या नावामधून देशमुख, देशपांडे, पाटील आणि कुलकर्णी यासारख्या पिढीजात अधिकाऱ्यांचा निर्देश करण्यात येई. काही देशकांना शेतसारा माफ केलेला असे. त्यांना स्वतःच्या जमिनीवरील महसूल सरकारात (राज्यकर्त्यांकडे) भरावा लागत नसे. आणि त्या करमाफीबद्दल ते सरकारची चाकरी करीत असत. अशा मक्तेदार लोकांना " वतनदार " म्हणण्यात येत असे. वतनदारी पद्धत या प्रदेशात जुन्या काळापासून रूढ झालेली होती. वतन या शब्दाचा अर्थ करमाफी करून दिलेली जमीन. वतनदाराला अशी जमीन कायमस्वरूपी प्राप्त होत असे. वतनदार अशा वतनाच्या मोबदल्यात सरकारच्या वतनी गावात काम करीत असे. गावातील पाटील हा राज्यकर्त्यांने गावात नियुक्त केलेला शासकीय अधिकारी असून तो " कुलकर्णी " म्हणून अशाच दुसऱ्या शासकीय अधिकाऱ्याच्या सहकार्याने गावात काम करीत असे.[५] गावातील सर्व जमीनधारक गावकऱ्यांकडून जमिनीचा महसूल गोळा करून तो सरकारी खजिन्यात जमा करणे हे पाटील आणि कुलकर्णी याचे काम असे. कुलकर्णी विविध जमीनधारकांनी दिलेल्या शेतसाऱ्याचा हिशोब व्यवस्थित नोंद करून ठेवत असे. प्रत्येकाकडून शेतसाऱ्याची वसुली व्यवस्थितपणे करण्यात आली आहे की नाही आणि तो सरकारी खजिन्यात योग्यप्रकारे

---

१ कुलकर्णी, शिवाजी, पृ. २६.

२ शिवचरित्र साहित्य ४ : ६९९.

३ म. इ. सा. १६ : ५६.

४ शि. च. सा. २ : ३४६, ४ : ६९९, ५ : ९५९.

५ शि. च. सा. ९ : ८, ३४ : ४०.

जमा केला आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी पाटलाची असे. अशाप्रकारे राज्यकर्त्यांचा प्रत्यक्ष जमीनधारकांशी व्यक्तिगतरीत्या संबंध येत नव्हता. पाटील हा सरकार आणि सामान्य गावकरी यांच्यातील मध्यस्थ होता. या कामात काही चालढकल झाल्यास शासन त्याला जाब विचारीत असे व वसुली करून घेत असे. अर्थात कर जमा करण्याच्या कामात काही त्रुटी राहिल्यास पाटलाला त्याचा भरणा पूर्ण करावा लागत असे.[१] गावात शेतसारा भरणारे गावकरी बहुसंख्येने होते.[२] त्यांना "मिरासदार" असे म्हणत असत. मिरासदार हा पिढीजात वतनदार असे. ज्या गावकऱ्यांच्या मालकीची भाडोत्री थोडीसुद्धा जमीन नव्हती अशा भूमिहीन लोकांना शेतमजूर म्हणत असत. त्यांना स्वत:चे असे स्थान नसल्यामुळे त्यांना उपरे किंवा परके म्हणत असत.

गावात लोकोपयोगी कामे करून लोकांच्या गरजा भागविणारे, सेवा उपलब्ध करणारे अनेक गावकरी असत. त्यांना बलुतेदार म्हणत असत. त्यांच्या सेवांबद्दल त्यांना अन्नधान्याच्या स्वरूपात वार्षिक मोबदला दिला जात असे. ज्यायोगे त्यांच्याही जीवनावश्यक गरजा भागविल्या जात. या मोबदल्यास "बलुत" असे म्हणत.[३] गावागावामध्ये गावाच्या गरजांप्रमाणे बलुतेदारांची संख्या बदलत असे. कुलकर्णी आणि जोशी यांच्या कार्यालयातील कार्यक्षेत्रांच्या मर्यादांमध्ये अशा प्रकारच्या मिरासदारांचा व बलुतेदारांचा उल्लेख ह्या दस्तऐवजांमध्ये दहा बलुतेदारांच्या त्यांच्या व्यवसायाच्या चिन्हासह केलेला आढळतो.[४] त्यामध्ये गोतसभेमध्ये बलुतेदाराचा निश्चित दर्जा कोणता, याचेही स्पष्टीकरण केलेले आहे. मिरासदार आणि बलुतेदार ह्या गावातील पिढीजात अधिकारी व व्यावसायिकांना गावात उद्‌भवलेल्या समस्येवर महत्त्वाचे निर्णय एकामेकांच्या विचाराने घेण्याचे योग्य अधिकार दिले होते. बलुतेदारांमध्ये धोबी, न्हावी, मांग, कुंभार, महार, सुतार, तेली, लोहार, नकलाकार इ. व्यावसायिक आणि कलावंत/कारागिरांचा समावेश

१ म. इ. सा. १८ : २७, जोशी एस. एन., मराठेकालीन समाजदर्शन, पृ. ९.

२ म. इ. सा, ६ : ६९२.

३ कित्ता, बावडा दप्तर १ : ९, म. इ. सा. खंड १६, पृ. २२ साधने, १६, पृ. २२.

४ शिवचरित्र साहित्य, खंड ३, ले. ४२६.

केला जात असे. बलुतेदार त्यांनी निर्माण केलेल्या वस्तू आणि सेवा गावाकरिता उपलब्ध करून देत असत. आणि गावकरी त्याचा उचित मोबदला वस्तुरूपाने त्यांना देत असत. बलुतेदारांना सालिना ठरवून दिलेला मोबदला धान्य-वस्तू स्वरूपात मिळत असे. हा वस्तुनियम परंपरागत पद्धतीने नियमांप्रमाणे चालत असे.[१] गावाच्या इतर सेवेकऱ्यांमध्ये जोशी, गुरव आणि मुलाणी यांचीही गणना केली जात असे. ते गावकऱ्यांची धार्मिक कृत्ये पार पाडत असत. देवकार्य करीत असत. त्यांना त्यांच्या सेवेचा मोबदला दोन प्रकारे मिळत असे. वस्तुरूपाने किंवा कर माफी केलेली जमीन त्यांना दान देण्यात येत असे. देशक त्याला शासनाकडून मिळालेली स्वतःची सर्वच्या सर्व जमीन नांगरणीकरिता/शेतीकरिता एकटा वापरू शकत नसे. त्यामुळे त्या जमिनीचा काही भाग तो इतर लोकांना शेतीच्या वापराकरिता देत असे. ते म्हणजे भूमिहीन शेतमजूर-भाडोत्री शेतकरी त्यांना उपरे असे संबोधन होते. जमीनमालकाला उत्पन्नातील ठरावीक हिस्सा किंवा भाडेपट्टी देऊन उपरे त्या जमिनीवर शेती करत असत.[२] अशाप्रकारे वतनदार, बलुतेदार आणि उपरे या सगळ्यांनी मिळून गावातील वस्ती तयार होत असे. एकमेकांच्या सहकार्याने आणि सुसंवादाने त्यांचे सामाजिक जीवन संपन्न होत असे. गावामधील शेतीचे किंवा जमीनमालकीचे तीन प्रकार होते. मिराशी किंवा तळवाहिका, सुखवस्तू उपरे आणि वतनदार म्हणजे गावातील अधिकारी, कारागीर, बलुतेदार यांच्या सर्वांची मिळून असणारी जमीन होय. मिराशी पद्धतीमध्ये जमिनीची मशागत करणारा शेतकरी हा जमिनीचा प्रत्यक्ष मालक असे. ही त्याची वैयक्तिक मालमत्ता होती. जी वंशपरंपरेने त्याची होती आणि तिचा विनियोग/विक्री करण्याचे सर्व अधिकार त्याला होते. तालवाहिकेचा मिरासदार जोपर्यंत जमिनीचा महसूल सरकारात भरत असे तोपर्यंत त्याला जमिनीवरून कोणीही काढून टाकू शकत नसे. इतकेच नव्हे तर तीस वर्षांचा काळ मध्ये उलटला तरी त्या जमिनीवर त्याला हक्क सांगता येत असे. उपरा पद्धतीमध्ये शेतकरी ज्या जमिनीवर शेती करत असे ती त्याची

१ शि. च. सा. खं. ३, ले. ४२६.

२ म. इ. सा. खंड १८, ले, ३३, खंड २०, ले. ३१.

स्वतःची मालकी नसे. ती जमीन त्याला काही काळापुरती कसण्यासाठी करारानुसार मिळत असे. त्या कराराच्या अटी सर्व गावात समान/एकच नसत. अशाप्रकारे उपरे हे केवळ भाडोत्री शेतकरी होते. ते जमीन मालक नव्हते. परंपरेप्रमाणे किंवा दंतकथांच्या आधारे गावे निर्माण होत असताना सुरुवातीला गावातील सर्व जमिनीही "मिरासदारी" पद्धतीने विभागलेली व मालकी गावच्या मूळ रहिवाशांनी (वसाहत करणाऱ्यांसाठी) ठरवल्याप्रमाणे विभागलेली असे. तेव्हा मराठा काळातील तत्कालीन मिरासदार हे मूळच्या मिरासदारांचे वंशज होते. उपरे म्हणजे मुसलमान राज्यकर्त्यांच्या जुलमी राजवटीमध्ये ज्यांचे जमीन जुमले बळकावले गेले असे जुने जमीन मालक होत. एलफिन्स्टनच्या मते उपरे ज्या जमिनीची मशागत करीत असत त्यापैकी बऱ्याचशा जमिनींची नोंद मालक अनुपस्थित किंवा अज्ञात अशा प्रकारे केलेली सापडते.

प्रत्येक गावाच्या सीमा निश्चितपणे ठरवलेल्या आणि स्पष्ट केलेल्या असत. आणि गावकरीही कटाक्षाने त्या जपत असत. गावाची एकूण जमीन वेगळ्या जमिनीच्या खंडामध्ये विभागलेली असे. त्या भूखंडाची मालकी आणि त्यांच्या सीमारेषादेखील निश्चितपणे सर्वांना माहीत असत आणि त्या जपल्या जात. सर्वसाधारणपणे जमिनीच्या या खंडांना नाव दिलेले असे आणि त्या भूखंडाचा मालक बदलला तरी त्या खंडाचे नाव बदलत नसे. प्रत्येक गावात पिकाऊ शेतजमिनीखेरीज काहीशी पडीक जमीनही असे. त्या जमिनीचा उपयोग सर्वच गावकरी आपल्या गुरांना चरायला म्हणून करीत असत म्हणून त्या जमिनीला "गायरान" असेही नाव होते. गावाच्या एकूण वस्तीवरून आणि त्यांच्या सूचनेवरून, व्यवहारावरून असे जाणवते की गावातील सर्व व्यवस्था शेतीधिष्ठित जमिनीवर आधारित होती.

अशा प्रकारे गावातील रहिवासी म्हणजे शेतकरी, व्यापारी, कलाकार, कारागीर आणि शासकीय अधिकारी यांनी मिळून बसलेला समूह होता. जे आपापले काम करून परस्परांच्या गरजा भागवीत असत. दुसऱ्या प्रकारे असे म्हणता येईल की गावात तीन प्रकारचे जनसमूह होते. शेतकरी, बलुतेदार आणि गावांतील अधिकारी आणि व्यापारी ह्या तीन गटांमधून व तीन प्रकारच्या जमीनधारणा/जमीनमालकी प्रचलित झाल्या. (१) मिराशी, (२) उपरे, (३) वतन. यापैकी बलुतेदार आणि पाटील, देशमुख, देशपांडे इत्यादी अधिकाऱ्यांना वतन मिळत असे.

शेती करणाऱ्यांचे जमीन मालकी असणारे मिराशी आणि मालकी नसणारे उपरे असे दोन प्रकार होते.[१] मिराशी म्हणजे जमिनीची पिढीजात मालकी असणारे भूधारक शेतकरी. गावामध्ये न्यायनिवाडा असणाऱ्या सभेमध्ये त्यांना खूप मानाचे स्थान असे. सर्व गावकरी त्यांना मान देत. गावच्या सभेमध्ये त्यांच्या शब्दाला खूप मान व महत्त्व असे. उपरे शेतकरी म्हणजेच जे स्वतःच्या जमिनीचे मालक नव्हते अशा शेतकऱ्यांना गावातील सभेस येण्याची परवानगी असे. परंतु त्यांना चर्चेत भाग घेण्याचा अधिकार नव्हता. "वतन" या शब्दामधूनच त्या माणसाला परंपरेने मिळणारा अधिकार आणि त्यापासून त्याला होणारे फायदे स्पष्ट होतात.[२] हा अधिकार पिढीजात होता. वतनदारी पद्धतीमध्ये परगण्याचे सर्वोच्च अधिकारी देशमुख-देशपांडे यांच्यापासून ते गावातील पाटील-कुलकर्णी या अधिकाऱ्यांना राजाकडून वतन मिळत असे.

तथापि, पुष्कळवेळा गावातील अधिकाऱ्यांनी गावाकरता केलेल्या कार्याबद्दल सेवेबद्दल "इनाम" देण्यात येत असे. तसेच त्यांना प्रसंगवशात काही खास अधिकार आणि सवलती देण्यात येत असत.[३] वतन हे त्या अधिकाऱ्यास वंशपरंपरेने मिळत असे आणि ती जमीन विकण्याचा त्यास अधिकार असे. गावातील समाजात सर्वच वतनदारांचा दर्जा एक समान नव्हता. गावातील अधिकारी आणि कारागीर यांना वतन म्हणून देण्यात येणारी जमीन एकसमान किंवा एकाच प्रकारची नसे. वतन देताना जातीच्या श्रेष्ठ कनिष्ठतेचा विचार केला जात नसे. तर ज्या व्यक्तीस वतन द्यावयाचे त्याचा उपयोग ग्रामसमाजास कितपत होऊ शकेल हे शासन पाहत असे. जमिनी वतन मिळालेले वतनदार आणि मिरासदार हे गावातील सामाजिक आणि आर्थिक सुव्यवस्थेबद्दल दक्ष असत आणि गावातील शासन सुसंगतपणे चालविण्यासाठी ते जबाबदार धरले जात.

□□

१ गुणे, ज्युडीशीयल सिस्टीम, पृ. ६०-६३.
२ कित्ता, पृ. ५१-५२.
३ कित्ता, पृ. ६२.

५६. शिवकालीन शेती, महसूल व्यवस्था व जमीन धारणा

महाराष्ट्रावर मुसलमान पूर्वकाळी यादवांची सत्ता होती. ती नष्ट झाल्यावर मुसलमान सत्ताधीश झाले. बहामनी पातशाही इ. स. १३४७ मध्ये सुरू झाली. ह्या मुसलमान सत्ताधीशांचा हेतू फक्त राज्य चालवायचे हा होता. गावे वसाहतीस आणणे किंवा शेतीस वगैरे उत्तेजन देणे हा नव्हता. त्यामुळे मुसलमान काळात जमिनीची मालकी पाटलाची व गावची राहिली, त्यात राजसत्ता ढवळाढवळ करीत नसे. गावकऱ्यांचे व शेतकऱ्यांचे बरे वाईट हित राजसत्ता क्वचितच पाही. इतकेच नव्हे तर क्रमाक्रमाने जमिनीचा सारा वाढविण्याची पद्धती निजामशाहींत होती.[1]

शिवछत्रपतींची शेतकी व्यवस्था

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ताब्यात जो मुलूख आला त्यातील गावे वसाहतीस आणून त्यात शेतीची व्यवस्था करणे हे एक मुख्य काम होते. ह्या कामाची मुख्य अंगे तीन (१) नापिकी जमीन पिकाऊ करणे ; (२) पिकांचे व गावकरी आणि शेतकरी ह्यांचे रक्षण करणे व (३) राज्यांतील सर्व जमिनीचे मोजमाप करून सारा आकारणी करणे. ह्या तिन्ही गोष्टीस त्यावेळी लावणी, संचणी, व उगवणी आणि चकबंदी, टकबंदी आणि जमाबंदी ही नावे होती. सामान्यतः प्रत्येक वर्षी जमीनझाडा पाहून त्या त्या गावाचे पाहणीपत्रक तयार करीत. त्यात जमिनीवरील सरकारी दस्त दरवर्षी ठरत असे.

शेती

मराठेशाहीमध्ये स्वराज्यांत आर्थिक जीवन शेतीशी निगडित होते. महाराष्ट्रांतील प्रदेशावर परिपूर्ण ताबा मिळाल्यानंतर शिवाजी महाराजांनी प्रशासकीय सोयीसाठी त्या प्रदेशाचे तीन विभाग केले. हे विभाग पेशवे मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो आणि दादाजीपंत वाकनीस यांचे देखरेखीखाली महाराजांनी ठेवले. पेशव्यांकडे कल्याण, भिवंडी ते वारघाट आणि कोकण

---

१ शि. च. सा. खंड १, ले. ३.

असा प्रदेश होता. अण्णाजी दत्तोकडे दाभोळ, राजापूर, कुडाळ, व बांदे धरून चौल ते कोपल असा भाग होता. वाईपासून तुंगभद्रा नदीपर्यंतचा प्रदेश दत्ताजीपंत वाकनीसांच्या देखरेखीखाली होता.[१] अण्णाजी दत्तोंचे म्हणून सांगण्यात येणाऱ्या एका पत्रात जमिनीच्या तेरा प्रकारांचा उल्लेख केलेला आहे.[२] एका यादीत भात पिकणाऱ्या जमिनीचे वर्गीकरण अवल, दुम, सीम, चारहम, बाविल, खारवट, रहू, खारी, कदायत व तुरवट इतक्या प्रकारे केले आहे.[३] परंतु सामान्य व्यवहारांत मात्र हे वर्गीकरण अवल, दुम, सीम व कधीकधी चारहम असेच असे.[४]

जमिनीला भूमाता समजत असत.[५] शेतकऱ्यांनी शेती केल्यावर ती उपजाऊ होत असे. शेतकरी हा समाजाचा उत्पादक घटक असे. तत्कालीन कागदपत्रात शेतकऱ्यांचा उल्लेख कुणबी, मुजारी, रय व रयत असा केलेला आढळतो.[६]

मराठी राज्यात म्हणजे स्वराज्यात ह्या शेतकऱ्यांस प्राधान्य मिळाले. त्यास नापीक जमीन पिकाऊ करण्यासाठी; म्हणजे ती लागवडीस आणण्यासाठी मोठमोठ्या सवलती दिल्या. जो शेतकरी पड पडलेल्या जमिनीस पिकाऊ करील, पीक काढेल त्याला पहिली पाच वर्षे सारा माफ; पुढे काही वर्षे फारच थोडा म्हणजे आठवा हिस्सा, मग सहावा व मग चवथा, निम्मा आणि पूर्ण आकार आकारावा अशा प्रकारे काही वर्षांच्या प्रमाणात वाढत्या साऱ्याने जमिनी लागवडीस आणण्यासाठी शेतकऱ्यांशी करार केले.[७] ज्या जागी झाडी असेल ती जागा झाडी तोडून खत माती घालून पेरणीयोग्य करण्यास त्यास उत्तेजन दिले. नदीच्या पाण्यामुळे अदृश्य झालेल्या जागेस दृश्य स्वरूपात आणण्यासाठी पाण्याला बांध बंदिस्ती घालून त्या जमिनीला अनेक वर्षे मेहनत मशागत करण्यास सवलती दिल्या. खेडुतांनी गाव वसवावे ह्याकरिता त्यांना गुरेढोरे, बैल पुरविले.[८] बिजास व खाण्यास

१ सभासद, पृ. १०६.
२ जोशी, म. इ. रा. अ. भाग १, पृ. १४९.
३ भा. इ. सं. म. वार्षिक संमेलन १८३५, पृ. ३२३-३२७.
४ राजवाडे, म. इ. सा. भाग २१, ले. २०३.
५ तत्रैव.
६ शि. च. सा. भाग ९, पृ. ५५.
७ शि. च. साहित्य खंड ८, ले. २६.
८ ९१ कलमी बखर, २१.

प्रथम धान्य दिले.[१] एखाद्या गावातील कुणबी शेतकरी अवर्षणामुळे उठून गेले, तर त्यांस गुराढोरांसह परत आणविण्यासाठी पट्ट्या माफ केल्या. लष्करामुळे पिकांची पायमल्ली होई, टोळधाड पडे, रोगसाथ येई, त्याकाळी वारंवार हल्ले, स्वाऱ्या शिकाऱ्या होऊन शेतीस हवे असणारे स्वास्थ्य बिघडे, गावांवर धाड पडे, धान्याची कोठारे लुटून नेत, गुरा माणसांच्या मुसक्या बांधून नेत, इत्यादी कितीतरी अडचणी त्याकाळी देशावर येत. त्या निवारून शेतकऱ्याला निर्भय करावयाचे काम शिवाजी महाराजांच्या राजवटीने केले.[२] खोत, पाटील महाजन ह्या गावप्रमुखांनी जमिनी स्थिरस्थावर करण्यास उत्तेजन देऊन योग्य ती मदतही दिली. पडीक जमिनी लागवडीस आणल्या जाव्या ह्या हेतूने त्या देवस्थाने, मठ, मशिदी ह्यांना इनाम दिल्या. कोकणातील खाड्यांच्या काठच्या नवीन खाजणात भात जमीन बनावी म्हणून विशेष सवलती देण्याचे सुरू केले. खार जमिनी खाडी काठी, समुद्रालगत असल्याने भरतीचे उधाण पाणी खारीच्या बांधास जोराचा आघात देऊन बांध फोडण्याचा धोका नेहमीच असतो. हा धोका पावसाळ्यात मोठ्या उधाणांच्या वेळेस मोठा असतो. त्याने बांध बंदिस्ती ढासळू नये म्हणून खार मालकांस जागरूक राहावे लागते. पाण्याच्या जोराने एखाद्या जागी बांध कमजोर झाल्यास लगेच दुरुस्ती फेरबांधणी करावी लागे. नाहीतर खारीची वाट लागली म्हणून समजावे.[३] काही वेळा हे काम फार मोठ्या खर्चाचे व मेहनतीचे असते म्हणून सरकारांतून जाहीर केले की, जो कोणी बांध बंदिस्ती करील व नवीन खार जमीन पिकास आणील त्यास पहिली काही वर्षे माफी देण्यात येईल, नंतर एकरी चार आणे महसूल घेण्यात येईल.[४]

गावकरी, शेतकरी आणि पिकांचे रक्षण करणे :

त्यावेळी लागवडीखाली जास्तीत जास्त जमीन आणण्याकरिता उत्तेजन दिले जात असे. लागवडीखाली येणाऱ्या जमिनीत बागायत आणि भातशेती होई व त्यापासून उत्पन्न निघे.

---

१ सभासद बखर, पृ. २६.

२ शि. च. सा. खंड ८-८४, ऐतिहासिक फारसी साहित्य खंड २, १५, २७.

३ खोबरेकर, मराठा अंमलाचे स्वरूप, पृ. ४३-४४.

४ सेन, ॲडमिनिस्ट्रेटीव्ह सिस्टीम ऑफ द मराठाझ, पृ. ५४.

शिवरायांची पहिली जहागीर जी कर्यात मावळ ती ३६ गावांची. पण त्यांनी राज्यविस्तार कोकणातही केला. कोकणात भातशेती व बागायती जमिनी. त्या दोन्हीही लागवडीस आणण्याकरिता उत्तेजन दिले. बागायत जमिनीत नारळ, सुपारी, उंडी, फणस, ताड इत्यादी झाडे येत. बागायतीचा मोठा शत्रू वादळे होय. पावसाळ्यात प्रचंड वादळे होऊन झाडे मोडत, घरे पडत, वाड्यांचा नाश विलक्षण होई, तेव्हा पुन्हा बागायतीची पाहणी होऊन जेवढी मोडतोड झाली असेल तेवढीच विचारात घेऊन सरकार आकारात सूट देई.[1]

अतिवृष्टी आणि अवर्षण

शेतीचा मोठा शत्रू अतिवर्षाव, अवेळी पर्जन्य आणि अवर्षण हा होय. त्यावेळी पर्जन्य नसल्यास गावातील मंदिरात पर्जन्यकुंड उघडीत. होमहवन झाल्यावर कधीकधी पर्जन्यवृष्टी होई. कोकणात मृगाचा पाऊस पडला नाही आणि आर्द्रा नक्षत्रापासून पाऊस सुरू झाला तर लावणीचा व पिकांचा हंगाम लांबे. लावणीच्या वेळी पर्जन्य अल्प पडत गेला तर जोरदार पाऊस पडावा म्हणून देवळातून प्रार्थना होत असत. पर्जन्यवृष्टी कमी झाली म्हणजे पटणी, वरंगळ, आंबेमोहर इत्यादीचे पीक कमी येई. दुष्काळाचे स्वरूप येई. अवर्षण झाले म्हणजे दुष्काळ पडे, लोक उपासमारीने मरू लागत, अर्भके विकली जात, म्हणजे रयतेवरील सर्व प्रकारचे कर रद्द केले जात. सैन्यात भरती जोराची होई. दुसरीकडून धान्य आणून उपासमार थांबविण्याचे इलाज होत.[2] पण अतिवृष्टी झाली म्हणजे शेतात पाणी तुंबे, नद्या ओढे वाहू लागत. अशावेळी सगळे पीक हाती लागत नसे. हाती लागे ते भिजके होई. वर सांगितल्याप्रमाणे नैसर्गिक कारणांमुळे पिकांचे उत्पन्न दरवर्षी बदलत असणार म्हणून सरकार शेतांत पीक उभे असताना वसूल किती होईल याची पाहणी करीत असे.[3] शिवाजी महाराज तिला "अजमास पाहणी" अगर "कलित पाहणी" असे म्हणत. पिके तयार होण्याच्या

---

१ म. इ. सा. खंड १८, ले. ३३; खंड २०, ले. २८.

२ शि. च. सा. ७:४४.

३ कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र, पृ. ६२.

सुमारास ही पाहणी सरकारी अंमलदार करीत. शेतीच्या उत्पन्नाचा अंदाज बांधीत. आणि गतवर्षी जेवढे वसूल झाले असेल तो आकडा आधार मानून शेतकऱ्यांना शेतसाऱ्यांत सूट मिळे.[१] ऐन जिनसी वसूल सरकार करीत असे म्हणजे नक्त व गला रोकड व धान्यरूपाने महसूल होत असे. गावशिवारांत जर बाद जमीन असेल तर ती किर्दीस म्हणजे लागवडीस आणण्यासाठी शेतकऱ्यास पाटलाकडून नांगर दिला जाई. शेतीच्या मशागतीसाठी बैलाची जोडी, विशेषतः धुरवीचे बैल प्रसंगी दिले जात आणि पेरणीसाठी बीजही दिले जाई. त्यासाठी सरकारी म्हणजे खालसा जमिनीच्या उत्पन्नात "बीजहुर्डा" म्हणून स्वतंत्र गल्ला जमवून ठेवणे तो पेरणींच्या हंगामात कुळांना दिला जात असे.[२]

राज्यातील सर्व जमिनींचे मोजमाप करून सारा आकारणी करणे :

शिवाजी महाराजांनी आपल्या ताब्यात आलेल्या जमिनीचे मोजमाप करून त्यावर सारा आकारण्याचे काम मुख्यतः अण्णाजी दत्तो या सचिवास सांगितले. अण्णाजी दत्तोने विशेषतः कोकणातील जमीन मोजणी करून सारा आकारणी केली आणि सरकारी दस्त ठरविला. अण्णाजी दत्तोप्रमाणे शिवाजीच्या इतर प्रधानांनी राज्यातील अन्य प्रांत विभागात जमीन मोजणी व सारा आकारणीचे काम केलेले तत्कालीन कागदपत्रावरून दिसून येते.[३]

आदिलशाही, निजामशाही काळात काही ठिकाणी "मीर जुमले पद्धतीने" तर काही ठिकाणी मलिक अंबर पद्धतीने जमीन मोजणी होत होती. शिवकाली कोकणच्या जमीन मोजणीचे काम अण्णाजी दत्तो ह्यांनी इ. स. १६६२ मध्ये केल्याचे पेशवे दप्तरांतील उत्तर कोकण या रुमालातील माहितीवरून समजते. अण्णाजी दत्तोच्या बिघावणी पद्धतीबरोबर मीरजुमले पद्धतीचा उल्लेख ह्या कागदात सापडतो. पण तिचे स्पष्टीकरण ह्या कागदात आढळत नाही.

---

१ कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र, पृ. ६३.

२ राजवाडे खंड १५: ३४०.

३ सभासद पृ. २६, २७: चिटणीस, पृ. १८३.

जमिनीचे प्रकार

शिवकालीन जिरायती जमिनीचे अनेक प्रकार मानले जात होते. (१) अव्वल म्हणजे वरच्या प्रतीचे, (२) दूम म्हणजे दुसऱ्या प्रतीचे, (३) सीम म्हणजे कनिष्ठ प्रतीची. अशी प्रतवारी ढोबळ मानाने करीत. कोकणात यासमवेत आणखी प्रकार व फरक होते ते असे (१) पेरणू, (२) मुरमाड, (३) धुळपट, (४) दरवट, (५) खारी, (६) खस्ती. शिवाय जेथे रहू करून भाताची पेरणी होई, त्या जमिनीस पेणू आणि जीत आवण म्हणजे भाताची रोपे करून नंतर लावावयाची तिला अवलू म्हणत. लावणी, रब्बी, खरीप, एकपिकी, दुपिकी, कोरडवाहू म्हणजे जिराईत व बागाईत. बागाईतांतही मोटस्थळ व पाटस्थळ, बागमळा, राई असे भाग असून हे सर्व मिळून एकूण पोटभाग ठोकळ १७ आहेत.[१]

जमिनीवरील सरकारी सारा आकारणे व तो कायम करण्याचे तीन टप्प्याने होत असे. पहिला टप्पा जमिनीची बिघावणी होऊन पिकांचा निमताना करणे. बिघावणीची पद्धती पेशवाई संपेपर्यंत होती. ८२ तसूंच्या काठीने जमीन मोजीत.[२] शेत अगर जमीन पेटाऱ्या लावून समपातळीत आणित. पहाणी करणारा अमीन, कारकून, काटकर म्हणजे काठीस काठी लावून मोजणी करणारा, ह्या सर्व कामदारांना महिना वेतन मिळे. पाहणी पूर्ण झाल्यावर पाहणी खर्च रयतेवर आकारला जाई. तसा शिरस्ता होता. जमिनीचे मोजमाप होऊन जमीन अमुक बिघे हे ठरे, ह्यालाच चावराणा आणि चकबंदी म्हणत. बिघे ठरले म्हणजे अमुक चावर वा चाहूर हे ठरलेच आणि त्यांच्या सीमा ठरल्या म्हणजे चकबंदी झाली.[३] अमक्या गावाचे शिवार इतक्या चाहुराचे असे उल्लेख शिवकालीन कागदात सापडतात. जमीन मोजणी केल्यानंतर त्यातील प्रतवारी ठरली, मिरासदार, कुळे रयताव्याने शेती करू लागली. शेतकरी ह्यांच्या नावांच्या सनदा ठरल्या, सनदामधून शेताचा उल्लेख होऊन "जमीनझाडा" गाववार

१ सेन, उपरोक्त, पृ. ९१.

२ भा.इ.सं.मं.त्रै. वर्ष ६, पृ. ८८.

३ कुलकर्णी, उपरोक्त, पृ. ६२.

(४) खर्चपट्टी आणि सादिलवारपट्टी.— खर्चपट्टी म्हणजे ग्रामसंस्थेचे अधिकारी व सेवक यांस गावकऱ्यांनी द्यावयाच्या परंपरागत गोष्टी होत. सादीलवारपट्टी म्हणजे स्थानिक अधिकाऱ्यांनी लादलेल्या योग्य महसूलाव्यतिरिक्त अतिरिक्त देय रक्कम होय. प्रसंगोपात्त होणारे खर्च भागविण्यासाठी ती गोळा करण्यात येई. जर सादीलवारपट्टी गोळा करण्यात आली तर कुलकर्ण्यांस त्यातला रास्त हिस्सा मिळे.

(५) तूप.— गावच्या लोणी विक्र्यापासून कुलकर्ण्यांस ठरावीक प्रमाणात तूप मिळे.

(६) वेठबिगारी.— वेठबिगारी म्हणजे सत्ताधारी अधिकाऱ्याने व्यक्तीकडून घेतलेली निर्वेतन सेवा होय.

(७) घुगरी.— घुगरी म्हणजे तयार झालेल्या पिकातील हिस्सा होय. सुगीच्या हंगामात कुलकर्ण्यांच्या हजेरीत तयार पीक मोजले जाऊन त्याचा वाटा बाजूस राखण्यात येई. त्यास "सलई "(Salai) असे म्हणतात. त्यास "हुरडा व लोंब्या" घेण्याचा हक्क असे.[१]

(८) वानवळा .— सरकारी अधिकारी व खेड्यातील वंशपरंपरागत अधिकारी तयार झालेल्या पिकांचे व फळांचे नमुने गोळा करत, त्यास वानवळा म्हणत. प्रत्येक ठिकाणी कुलकर्ण्यांचे हक्क सारखे नव्हते तर ते त्या-त्या ठिकाणच्या रुढीनुसार वहिवाटीप्रमाणे ठरलेले असत.[२]

कुलकर्ण्यांच्या कामात ग्रामपंचायतीचे हिशेब ठेवण्याखेरीज, गावातील सर्व जमिनीचे तपशीलवार दप्तर नोंदीत जमिनीचे नाव, आकार-क्षेत्रफळ, मालकाचे नाव याचे तपशीलवार वर्णन नोंदलेले असे. तद्वत थळझाड्यात, गावाच्या सर्व रहिवाशांची ते शेती करणारे असोत वा नसोत नोंद असे. याबाबतीत कुलकर्ण्यांस पाटलांच्या सहकार्याने काम करावे लागे.[३]

कुलकर्ण्यांस शेती करणाऱ्याकडून (मुशहिरा) मासिक भत्ता घेण्याचा पदसिद्ध अधिकार होता. त्याला घर बांधण्यासाठी मिराशी जमीन देण्यात येई. तद्वतच सरकारात पूर्ण महसूल भरल्यानंतर जे बक्षिस मिळे ; त्यास बहुमानाचा पोशाख म्हणत. कुलकर्ण्यांस तेल्याकडून प्रतिदिनी ९ "टक"

१ शिवचरित्र सा.

२ तत्रैव : ४ : ६८२ ; १ : ३१.

३ मुंजेरी पाटील-कुलकर्णी यामधील करार (भा. इ. सं. मं. त्रैमासिक. खंड २४, पृ. ११८).

तेल, दरवर्षी चांभाराकडून एक पायताण जोड. सणावारी सरपणाची मोळी, दसरा दिवाळीच्या दिवशी पाटलाच्या मानानंतर त्याच्या घरासमोर सनई-चौघडा वाजविण्याचा मान, तांबोळ्याकडून पाटलांस मिळत त्याच्या निम्मी विड्याची पाने, माळ्याकडून भाज्या या गोष्टी मिळत. शाई तयार करण्यासाठी तेल आणि दप्तराचे कागदपत्र बांधण्यासाठी कापड यांची तरतूद गावाच्या राखीव निधीतून होई.[१] कुलकर्णी पदावरील व्यक्ती सामान्यतः ब्राह्मण असे. कुलकर्ण्यांस "जोश्यांचे" (ज्योतिष्याचे) काम करावे लागे. त्याचा उल्लेख वर आलेलाच आहे. त्याला त्याच्या ह्या अधिक कर्तव्याबद्दल जादा मेहनताना मिळे.[२] ही गोष्ट येथे नमूद केली पाहिजे. कुलकर्णी पद वंशपरंपरागत असे ; पण ते विकत किंवा गहाणही टाकता येई.

□□

---

१ शि. च. सा. खंड १ : क्र. २८३.

२ तत्रैव.

५५. शिवकालीन ग्रामशासन व्यवस्था

या काळातील ग्रामीण वस्त्या प्रशासकीय दृष्ट्या स्वायत्त आणि आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होत्या. गावकऱ्यांची एकजूट आणि संघटीतपणे गावचे प्रशासन पाहण्याची त्यांची पद्धत प्रशंसनीय होती. त्या समाजाचे घटक म्हणजेच गावकरी हे विविध सामाजिक गटांमधील आणि विविध स्तरांमधील लोक होते. ते सर्वजण गावातील प्रशासन एकत्रपणे आणि सुसंबद्धपणे पहात असत. यावरून त्या ग्रामीण स्वायत्त शासनाचे वेगळेपण, वैशिष्ट्य स्पष्ट होते. प्रत्येक गाव हे वेगळे पडल्यासारखे व एकमेकापासून दूर-दूर अंतरावर वसलेले असे. त्यामुळे गावकऱ्यांच्यात संघटीतपणाची व गावांतील सर्वजण एक असल्याची भावना साहजिकच दृढ होत असे.

प्रत्येक ग्रामीण वस्ती संरक्षण आणि आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत स्वयंपूर्ण असणे आवश्यक असे. गावकऱ्यांच्या दैनंदिन अगर नैमित्तिक गरजा भागवताना गावातल्या गावातच उपलब्ध साधनांचा वापर करून वस्तु निर्माण करीत असत. तसेच सर्वसाधारण लोकोपयोगी काम करताना गावाच्या उपयोगाची एखादी निर्मिती करताना गावातील साधनांचा वापर केला जाई. प्रसंगी सर्व गावकरी एकत्रितपणे पैसा उभारून ते काम पूर्ण करीत. शेजारच्या गावाशी कधी भांडण-तंट्याचा प्रसंग उद्‌भवला असता सर्व गावकरी एकत्र येऊन गावाच्या हिताकरता एक भक्कम फळी उभारत असत.

प्रत्येक गावाचे स्वतःचे असे वैशिष्ट्य बनलेले असे. गावातील समाजजीवन वैशिष्ट्यपूर्ण होते. ही समाजरचना चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आधारित, उच्चनीच जाती मानणारी नव्हती. किंबहुना त्या समाजात जातीभेद-वर्ण दोष यांना स्थानच नव्हते.

मराठ्यांच्या राज्यात ग्रामीण शासन व्यवस्था पूर्वापार पद्धतीनेच चालत होती. प्राचीन काळापासून दृढमूल झालेल्या शासन व्यवस्थेमध्ये गांवातील रहिवाशी हे केंद्रस्थानी असून गावांची आर्थिक किंवा सामाजिक व्यवस्था त्याच्या सभोवती एकवटलेली असे. गावातील रहिवाशांच्या जीवनास

उपयोगी व त्यांच्या विकासात पूरक असेच सामाजिक आणि आर्थिक व्यवहार तेथेच होत असत. आणि ते गावकऱ्यांच्या जीवनाशी संपूर्णपणे निगडित असत.[१] जवळजवळ सर्वच लोकांचे (गावकऱ्यांचे) चरितार्थाचे साधन म्हणजे शेती[२] हा एकमात्र व्यवसाय असल्यामुळे सर्वच आर्थिक व्यवहार शेती आणि जमिनी आणि त्यांच्या उत्पन्नापासूनच सुरू होत असत. गावातील रहिवाशी मात्र एकाच प्रकारचे जीवन जगणारे किंवा एकसमान राहणीचे असे नव्हते; एकाच जातीचे किंवा रीतीचेही नव्हते. वेगवेगळ्या प्रदेशातील वस्त्यांमधील लोक, वेगवेगळ्या प्रकारचे जीवन जगणारे, वेगवेगळे राहणीमान, आचार, विचार असणारे होते. सर्वसाधारणपणे ग्रामीण वस्त्यांच्या व्यवस्थापनाचे रयतवारी आणि सामाईक (Joint-Village) असे दोन प्रकार होते. रयतवारी पद्धतीमध्ये गावातील वेगवेगळे गावकरी आपआपल्या जमिनीचे मालक होते. तर सामाईक पद्धतीमध्ये गावातील सर्व पिकाऊ आणि पडिक मिळून सर्व जमीन सर्व गावकऱ्यांच्या एकत्रित मालकीची असे.[३] गावाच्या संपूर्ण जमिनीचे दोन प्रकार म्हणजे (१) शेत जमीन जी शेती करण्यालायक असे आणि, (२) वस्तीची जमीन, ज्यावर घरे, वसाहत बांधण्यात येत असे. उपलब्ध दस्तऐवजांमध्ये गावाचा तत्कालीन उल्लेख ग्राम, देहे, मौजे; खेडे इ. अनेक नावांनी केलेला आढळतो. गावाच्या उप विभागांना माजरा, वाडीपाडी, खारी इ. नावे आढळतात. ग्राम, मौजे, देहे, खेडे ही समानार्थी नावे होती परंतु मौजे हे अधिक प्रचलित नाव होते. दोन गावे जर एकमेकालगत वसलेली असतील तर त्यातील मोठ्या गावठाणास "बुद्रुक" आणि लहान गावठाणास "खुर्द" म्हणत असत.[४] त्या गावातील वस्ती जर काही कारणाने विखुरली किंवा घटली तर बुद्रुक, खुर्द ही नावे बदलण्यात येत असत. एखादे गाव जेव्हा अतिशय भरभराटीस येत असे, इतके की त्यास वेगळ्या प्रशासकीय विभागाचे स्वरूप प्राप्त होत असे, तेव्हा त्याला त्याच्याहून पूर्वी मोठे असलेल्या गावाचे नाव प्राप्त होत असे व यापुढे खुर्द असे म्हणण्यात येई. मूळ मोठे असणाऱ्या गावाचा मोठेपणा टिकवण्याचा

१ बोडेज-पोवेल, इंडियन व्हीलेज कम्युनिटीज, पृ. ६२०-२१.

२ मराठी दप्तरात याचा उल्लेख काळी आणि पांढरी असा केलेला आढळतो. आत्रे, गावगाडा, पृ. १.

३ राजवाडे, म. इ. सा. खंड १५, ले. २७४.

४ बुद्रुक आणि खुर्द यांना संस्कृतमध्ये बृहत आणि "लघू" असे संबोधन आहे.

हा काहीसा प्रकार म्हणता येईल. उदा. नेवासे बुद्रुक आणि नेवासे खुर्द.[१] गावाच्या उप विभागाला/उप नगराला सामान्यतः माजरा म्हणत. जेव्हा गावातील काही कुटुंबे त्यांच्या शेती जमिनीवर जाऊन वस्ती सुरू करीत, नवीन घरे वस्ती तयार होत असे[२] तिला " माजरा " असे म्हणण्यात येत असे. काही वेळा त्या शेत जमिनीवर ती वस्ती तयार होत असे त्या जमिनीच्या नावाने ओळखण्यात येत असे. वाडी, पाडी, खारी. आणि माजरा ही अशी वस्त्यांची समानार्थी संबोधने होती. देशावर " वाडी " हे संबोधन जास्त प्रचलित होते तर कोकणात वाडी आणि पाडी ही दोन्ही नावे प्रचलित होती.[३] समुद्र किनाऱ्यालगत असणाऱ्या गावाला " खारी " अर्थातच खारट जमिनीचे म्हणत असत. समुद्रालगतची जमीन खाजणाची खारट असल्यामुळे तिला खारी असे नाव पडले.[४]

जेव्हा गावातील रहिवाशांसमोर कारागीर, कसबी कलाकारांचे प्रमाण जास्त असे आणि ते कारागीर स्वतःचे छोटेसे दुकान एखाद्या जवळपासच्या गावात चालवीत असत तेव्हा त्या वस्तीला " कसबा " असे नाव देण्यात येत असे. अशा कसब्यामध्ये आठवड्याचा बाजार भरत असे. अशाप्रकारे दर आठवड्याला बाजार भरून, त्या वस्तीत खूप गर्दी गजबज होत असे. तिथे खूप देवाणघेवाण आणि आर्थिक उलाढाली होत असत तेव्हा त्यास " पेठ " असे म्हणत.[५] काही वेळा शासन एखाद्या जबाबदार व्यक्तीस बोलावून एखाद्या ठिकाणी पेठ वसविण्याची जबाबदारी आणि अधिकार देत असे. थोडेसे कर्ज व काही अटीचे बंधन घालून त्या त्या व्यक्तीस पेठ वसविण्याचे सर्व अधिकार दिलेले असत. ज्यायोगे अशा वस्तीच्या ठिकाणी रहिवाशांना इतर जवळपासच्या गावातील वस्तू विकत घेणे शक्य होत असे.[६] समुद्रकिनाऱ्यावरील बंदरास " मिरा " असे म्हणत. गावामध्ये काही काही पूर्वापार राहत असलेले रहिवाशी असत. ते गावाचे प्रशासन आणि इतर घडामोडी यांचे निरीक्षण करीत. वंशपरंपरेने ते गावाची व्यवस्था

१ म. इ. सा. खंड १५, ले २७४.
२ म. इ. सा. खंड ३१, ले. ४१.
३ शि. च. सा., पृ. ८७६.
४ शि. च. सा. खंड ८, ले. ७६.
५ ग्रटँडफ, मराठाझ, खंड १, पृ. २८.
६ म. इ. सा., पृ. २०, १०७.

पाहत असत, पिढीजात गावाचे प्रशासन पाहणाऱ्या ह्या अधिकाऱ्यांचा दर्जा फार श्रेष्ठ होता. गावातील काही जमिनीचे ते मालक असत. आणि शासनातर्फेही त्यांना अधिक उत्पन्न प्राप्त होत असे. अधिकाऱ्यांना " देशक " असे नाव होते.[१] गावातील हवालदार, मुजुमदार इ. अधिकाऱ्यांपेक्षा " देशक " वेगळे होते.[२] त्यांची नियुक्ती परगणा, कसबा, पेठ किंवा गाव अशा ठिकाणी केली जात असे.[३] कागदपत्रांमधील पुराव्यावरून असे समजते की, देशक हा कोणी एक विशिष्ट अधिकारी नसून तो देसाई, देशमुख, कुलकर्णी किंवा पाटील, देशकुलकर्णी, देशपांडे यांच्यासारख्या उच्च दर्जाचा पिढीजात अधिकारपद असणारा एक अधिकारी होता.[४] काही वेळा तर देशक या नावामधून देशमुख, देशपांडे, पाटील आणि कुलकर्णी यासारख्या पिढीजात अधिकाऱ्यांचा निर्देश करण्यात येई. काही देशकांना शेतसारा माफ केलेला असे. त्यांना स्वतःच्या जमिनीवरील महसूल सरकारात (राज्यकर्त्यांकडे) भरावा लागत नसे. आणि त्या करमाफीबद्दल ते सरकारची चाकरी करीत असत. अशा मक्तेदार लोकांना " वतनदार " म्हणण्यात येत असे. वतनदारी पद्धत या प्रदेशात जुन्या काळापासून रूढ झालेली होती. वतन या शब्दाचा अर्थ करमाफी करून दिलेली जमीन. वतनदाराला अशी जमीन कायमस्वरूपी प्राप्त होत असे. वतनदार अशा वतनाच्या मोबदल्यात सरकारच्या वतनी गावात काम करीत असे. गावातील पाटील हा राज्यकर्त्यांने गावात नियुक्त केलेला शासकीय अधिकारी असून तो " कुलकर्णी " म्हणून अशाच दुसऱ्या शासकीय अधिकाऱ्याच्या सहकार्याने गावात काम करीत असे.[५] गावातील सर्व जमीनधारक गावकऱ्यांकडून जमिनीचा महसूल गोळा करून तो सरकारी खजिन्यात जमा करणे हे पाटील आणि कुलकर्णी याचे काम असे. कुलकर्णी विविध जमीनधारकांनी दिलेल्या शेतसाऱ्याचा हिशोब व्यवस्थित नोंद करून ठेवत असे. प्रत्येकाकडून शेतसाऱ्याची वसुली व्यवस्थितपणे करण्यात आली आहे की नाही आणि तो सरकारी खजिन्यात योग्यप्रकारे

---

१ कुलकर्णी, शिवाजी, पृ. २६.

२ शिवचरित्र साहित्य ४ : ६९९.

३ म. इ. सा. १६ : ५६.

४ शि. च. सा. २ : ३४६, ४ : ६९९, ५ : ९५९.

५ शि. च. सा. ९ : ८, ३४ : ४०.

जमा केला आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी पाटलाची असे. अशाप्रकारे राज्यकर्त्यांचा प्रत्यक्ष जमीनधारकांशी व्यक्तिगतरीत्या संबंध येत नव्हता. पाटील हा सरकार आणि सामान्य गावकरी यांच्यातील मध्यस्थ होता. या कामात काही चालढकल झाल्यास शासन त्याला जाब विचारीत असे व वसुली करून घेत असे. अर्थात कर जमा करण्याच्या कामात काही त्रुटी राहिल्यास पाटलाला त्याचा भरणा पूर्ण करावा लागत असे.[१] गावात शेतसारा भरणारे गावकरी बहुसंख्येने होते.[२] त्यांना " मिरासदार " असे म्हणत असत. मिरासदार हा पिढीजात वतनदार असे. ज्या गावकऱ्यांच्या मालकीची भाडोत्री थोडीसुद्धा जमीन नव्हती अशा भूमिहीन लोकांना शेतमजूर म्हणत असत. त्यांना स्वतःचे असे स्थान नसल्यामुळे त्यांना उपरे किंवा परके म्हणत असत.

गावात लोकोपयोगी कामे करून लोकांच्या गरजा भागविणारे, सेवा उपलब्ध करणारे अनेक गावकरी असत. त्यांना बलुतेदार म्हणत असत. त्यांच्या सेवांबद्दल त्यांना अन्नधान्याच्या स्वरूपात वार्षिक मोबदला दिला जात असे. ज्यायोगे त्यांच्याही जीवनावश्यक गरजा भागविल्या जात. या मोबदल्यास " बलुत " असे म्हणत.[३] गावागावामध्ये गावाच्या गरजांप्रमाणे बलुतेदारांची संख्या बदलत असे. कुलकर्णी आणि जोशी यांच्या कार्यालयातील कार्यक्षेत्रांच्या मर्यादांमध्ये अशा प्रकारच्या मिरासदारांचा व बलुतेदारांचा उल्लेख ह्या दस्तऐवजांमध्ये दहा बलुतेदारांच्या त्यांच्या व्यवसायाच्या चिन्हासह केलेला आढळतो.[४] त्यामध्ये गोतसभेमध्ये बलुतेदाराचा निश्चित दर्जा कोणता, याचेही स्पष्टीकरण केलेले आहे. मिरासदार आणि बलुतेदार ह्या गावातील पिढीजात अधिकारी व व्यावसायिकांना गावात उद्‌भवलेल्या समस्येवर महत्त्वाचे निर्णय एकामेकांच्या विचाराने घेण्याचे योग्य अधिकार दिले होते. बलुतेदारांमध्ये धोबी, न्हावी, मांग, कुंभार, महार, सुतार, तेली, लोहार, नकलाकार इ. व्यावसायिक आणि कलावंत/कारागिरांचा समावेश

१ म. इ. सा. १८ : २७, जोशी एस. एन., मराठेकालीन समाजदर्शन, पृ. ९.

२ म. इ. सा, ६ : ६९२.

३ कित्ता, बावडा दप्तर १ : ९, म. इ. सा. खंड १६, पृ. २२ साधने, १६, पृ. २२.

४ शिवचरित्र साहित्य, खंड ३, ले. ४२६.

केला जात असे. बलुतेदार त्यांनी निर्माण केलेल्या वस्तू आणि सेवा गावाकरिता उपलब्ध करून देत असत. आणि गावकरी त्याचा उचित मोबदला वस्तुरूपाने त्यांना देत असत. बलुतेदारांना सालिना ठरवून दिलेला मोबदला धान्य-वस्तू स्वरूपात मिळत असे. हा वस्तुनियम परंपरागत पद्धतीने नियमांप्रमाणे चालत असे.[१] गावाच्या इतर सेवेकऱ्यांमध्ये जोशी, गुरव आणि मुलाणी यांचीही गणना केली जात असे. ते गावकऱ्यांची धार्मिक कृत्ये पार पाडत असत. देवकार्य करीत असत. त्यांना त्यांच्या सेवेचा मोबदला दोन प्रकारे मिळत असे. वस्तुरूपाने किंवा कर माफी केलेली जमीन त्यांना दान देण्यात येत असे. देशक त्याला शासनाकडून मिळालेली स्वत:ची सर्वच्या सर्व जमीन नांगरणीकरिता/शेतीकरिता एकटा वापरू शकत नसे. त्यामुळे त्या जमिनीचा काही भाग तो इतर लोकांना शेतीच्या वापराकरिता देत असे. ते म्हणजे भूमिहीन शेतमजूर-भाडोत्री शेतकरी त्यांना उपरे असे संबोधन होते. जमीनमालकाला उत्पन्नातील ठरावीक हिस्सा किंवा भाडेपट्टी देऊन उपरे त्या जमिनीवर शेती करत असत.[२] अशाप्रकारे वतनदार, बलुतेदार आणि उपरे या सगळ्यांनी मिळून गावातील वस्ती तयार होत असे. एकमेकांच्या सहकार्याने आणि सुसंवादाने त्यांचे सामाजिक जीवन संपन्न होत असे. गावामधील शेतीचे किंवा जमीनमालकीचे तीन प्रकार होते. मिराशी किंवा तळवाहिका, सुखवस्तू उपरे आणि वतनदार म्हणजे गावातील अधिकारी, कारागीर, बलुतेदार यांच्या सर्वांची मिळून असणारी जमीन होय. मिराशी पद्धतीमध्ये जमिनीची मशागत करणारा शेतकरी हा जमिनीचा प्रत्यक्ष मालक असे. ही त्याची वैयक्तिक मालमत्ता होती. जी वंशपरंपरेने त्याची होती आणि तिचा विनियोग/विक्री करण्याचे सर्व अधिकार त्याला होते. तालवाहिकेचा मिरासदार जोपर्यंत जमिनीचा महसूल सरकारात भरत असे तोपर्यंत त्याला जमिनीवरून कोणीही काढून टाकू शकत नसे. इतकेच नव्हे तर तीस वर्षांचा काळ मध्ये उलटला तरी त्या जमिनीवर त्याला हक्क सांगता येत असे. उपरा पद्धतीमध्ये शेतकरी ज्या जमिनीवर शेती करत असे ती त्याची

१ शि. च. सा. खं. ३, ले. ४२६.

२ म. इ. सा. खंड १८, ले, ३३, खंड २०, ले. ३१.

स्वतःची मालकी नसे. ती जमीन त्याला काही काळापुरती कसण्यासाठी करारानुसार मिळत असे. त्या कराराच्या अटी सर्व गावात समान/एकच नसत. अशाप्रकारे उपरे हे केवळ भाडोत्री शेतकरी होते. ते जमीन मालक नव्हते. परंपरेप्रमाणे किंवा दंतकथांच्या आधारे गावे निर्माण होत असताना सुरुवातीला गावातील सर्व जमिनीही " मिरासदारी " पद्धतीने विभागलेली व मालकी गावच्या मूळ रहिवाशांनी (वसाहत करणाऱ्यांसाठी) ठरवल्याप्रमाणे विभागलेली असे. तेव्हा मराठा काळातील तत्कालीन मिरासदार हे मूळच्या मिरासदारांचे वंशज होते. उपरे म्हणजे मुसलमान राज्यकर्त्यांच्या जुलमी राजवटीमध्ये ज्यांचे जमीन जुमले बळकावले गेले असे जुने जमीन मालक होत. एलफिन्स्टनच्या मते उपरे ज्या जमिनीची मशागत करीत असत त्यापैकी बऱ्याचशा जमिनींची नोंद मालक अनुपस्थित किंवा अज्ञात अशा प्रकारे केलेली सापडते.

प्रत्येक गावाच्या सीमा निश्चितपणे ठरवलेल्या आणि स्पष्ट केलेल्या असत. आणि गावकरीही कटाक्षाने त्या जपत असत. गावाची एकूण जमीन वेगळ्या जमिनीच्या खंडामध्ये विभागलेली असे. त्या भूखंडाची मालकी आणि त्यांच्या सीमारेषादेखील निश्चितपणे सर्वांना माहीत असत आणि त्या जपल्या जात. सर्वसाधारणपणे जमिनीच्या या खंडांना नाव दिलेले असे आणि त्या भूखंडाचा मालक बदलला तरी त्या खंडाचे नाव बदलत नसे. प्रत्येक गावात पिकाऊ शेतजमिनीखेरीज काहीशी पडीक जमीनही असे. त्या जमिनीचा उपयोग सर्वच गावकरी आपल्या गुरांना चरायला म्हणून करीत असत म्हणून त्या जमिनीला " गायरान " असेही नाव होते. गावाच्या एकूण वस्तीवरून आणि त्यांच्या सूचनेवरून, व्यवहारावरून असे जाणवते की गावातील सर्व व्यवस्था शेतीधिष्ठित जमिनीवर आधारित होती.

अशा प्रकारे गावातील रहिवासी म्हणजे शेतकरी, व्यापारी, कलाकार, कारागीर आणि शासकीय अधिकारी यांनी मिळून बसलेला समूह होता. जे आपापले काम करून परस्परांच्या गरजा भागवीत असत. दुसऱ्या प्रकारे असे म्हणता येईल की गावात तीन प्रकारचे जनसमूह होते. शेतकरी, बलुतेदार आणि गावांतील अधिकारी आणि व्यापारी ह्या तीन गटांमधून व तीन प्रकारच्या जमीनधारणा/जमीनमालकी प्रचलित झाल्या. (१) मिराशी, (२) उपरे, (३) वतन. यापैकी बलुतेदार आणि पाटील, देशमुख, देशपांडे इत्यादी अधिकाऱ्यांना वतन मिळत असे.

शेती करणाऱ्यांचे जमीन मालकी असणारे मिराशी आणि मालकी नसणारे उपरे असे दोन प्रकार होते.[१] मिराशी म्हणजे जमिनीची पिढीजात मालकी असणारे भूधारक शेतकरी. गावामध्ये न्यायनिवाडा असणाऱ्या सभेमध्ये त्यांना खूप मानाचे स्थान असे. सर्व गावकरी त्यांना मान देत. गावच्या सभेमध्ये त्यांच्या शब्दाला खूप मान व महत्त्व असे. उपरे शेतकरी म्हणजेच जे स्वतःच्या जमिनीचे मालक नव्हते अशा शेतकऱ्यांना गावातील सभेस येण्याची परवानगी असे. परंतु त्यांना चर्चेत भाग घेण्याचा अधिकार नव्हता. "वतन" या शब्दामधूनच त्या माणसाला परंपरेने मिळणारा अधिकार आणि त्यापासून त्याला होणारे फायदे स्पष्ट होतात.[२] हा अधिकार पिढीजात होता. वतनदारी पद्धतीमध्ये परगण्याचे सर्वोच्च अधिकारी देशमुख-देशपांडे यांच्यापासून ते गावातील पाटील-कुलकर्णी या अधिकाऱ्यांना राजाकडून वतन मिळत असे.

तथापि, पुष्कळवेळा गावातील अधिकाऱ्यांनी गावाकरता केलेल्या कार्याबद्दल सेवेबद्दल "इनाम" देण्यात येत असे. तसेच त्यांना प्रसंगवशात काही खास अधिकार आणि सवलती देण्यात येत असत.[३] वतन हे त्या अधिकाऱ्यास वंशपरंपरेने मिळत असे आणि ती जमीन विकण्याचा त्यास अधिकार असे. गावातील समाजात सर्वच वतनदारांचा दर्जा एक समान नव्हता. गावातील अधिकारी आणि कारागीर यांना वतन म्हणून देण्यात येणारी जमीन एकसमान किंवा एकाच प्रकारची नसे. वतन देताना जातीच्या श्रेष्ठ कनिष्ठेतेचा विचार केला जात नसे. तर ज्या व्यक्तीस वतन द्यावयाचे त्याचा उपयोग ग्रामसमाजास कितपत होऊ शकेल हे शासन पाहत असे. जमिनी वतन मिळालेले वतनदार आणि मिरासदार हे गावातील सामाजिक आणि आर्थिक सुव्यवस्थेबद्दल दक्ष असत आणि गावातील शासन सुसंगतपणे चालविण्यासाठी ते जबाबदार धरले जात.

□□

१ गुणे, ज्युडीशीयल सिस्टीम, पृ. ६०-६३.

२ कित्ता, पृ. ५१-५२.

३ कित्ता, पृ. ६२.

५६. शिवकालीन शेती, महसूल व्यवस्था व जमीन धारणा

महाराष्ट्रावर मुसलमान पूर्वकाळी यादवांची सत्ता होती. ती नष्ट झाल्यावर मुसलमान सत्ताधीश झाले. बहामनी पातशाही इ. स. १३४७ मध्ये सुरू झाली. ह्या मुसलमान सत्ताधीशांचा हेतू फक्त राज्य चालवायचे हा होता. गावे वसाहतीस आणणे किंवा शेतीस वगैरे उत्तेजन देणे हा नव्हता. त्यामुळे मुसलमान काळात जमिनीची मालकी पाटलाची व गावची राहिली, त्यात राजसत्ता ढवळाढवळ करीत नसे. गावकऱ्यांचे व शेतकऱ्यांचे बरे वाईट हित राजसत्ता क्वचितच पाही. इतकेच नव्हे तर क्रमाक्रमाने जमिनीचा सारा वाढविण्याची पद्धती निजामशाहींत होती.[१]

शिवछत्रपतींची शेतकी व्यवस्था

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ताब्यात जो मुलूख आला त्यातील गावे वसाहतीस आणून त्यात शेतीची व्यवस्था करणे हे एक मुख्य काम होते. ह्या कामाची मुख्य अंगे तीन (१) नापिकी जमीन पिकाऊ करणे; (२) पिकांचे व गावकरी आणि शेतकरी ह्यांचे रक्षण करणे व (३) राज्यांतील सर्व जमिनीचे मोजमाप करून सारा आकारणी करणे. ह्या तिन्ही गोष्टीस त्यावेळी लावणी, संचणी, व उगवणी आणि चकबंदी, टकबंदी आणि जमाबंदी ही नावे होती. सामान्यतः प्रत्येक वर्षी जमीनझाडा पाहून त्या त्या गावाचे पाहणीपत्रक तयार करीत. त्यात जमिनीवरील सरकारी दस्त दरवर्षी ठरत असे.

शेती

मराठेशाहीमध्ये स्वराज्यांत आर्थिक जीवन शेतीशी निगडित होते. महाराष्ट्रांतील प्रदेशावर परिपूर्ण ताबा मिळाल्यानंतर शिवाजी महाराजांनी प्रशासकीय सोयीसाठी त्या प्रदेशाचे तीन विभाग केले. हे विभाग पेशवे मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो आणि दादाजीपंत वाकनीस यांचे देखरेखीखाली महाराजांनी ठेवले. पेशव्यांकडे कल्याण, भिवंडी ते वारघाट आणि कोकण

---

१ शि. च. सा. खंड १, ले. ३.

असा प्रदेश होता. अण्णाजी दत्तोकडे दाभोळ, राजापूर, कुडाळ, व बांदे धरून चौल ते कोपल असा भाग होता. वाईपासून तुंगभद्रा नदीपर्यंतचा प्रदेश दत्ताजीपंत वाकनीसांच्या देखरेखीखाली होता.[१] अण्णाजी दत्तोंचे म्हणून सांगण्यात येणाऱ्या एका पत्रात जमिनीच्या तेरा प्रकारांचा उल्लेख केलेला आहे.[२] एका यादीत भात पिकणाऱ्या जमिनीचे वर्गीकरण अवल, दुम, सीम, चारहम, बाविल, खारवट, रहू, खारी, कदायत व तुरवट इतक्या प्रकारे केले आहे.[३] परंतु सामान्य व्यवहारांत मात्र हे वर्गीकरण अवल, दुम, सीम व कधीकधी चारहम असेच असे.[४]

जमिनीला भूमाता समजत असत.[५] शेतकऱ्यांनी शेती केल्यावर ती उपजाऊ होत असे. शेतकरी हा समाजाचा उत्पादक घटक असे. तत्कालीन कागदपत्रात शेतकऱ्यांचा उल्लेख कुणबी, मुजारी, रय व रयत असा केलेला आढळतो.[६]

मराठी राज्यात म्हणजे स्वराज्यात ह्या शेतकऱ्यांस प्राधान्य मिळाले. त्यास नापीक जमीन पिकाऊ करण्यासाठी; म्हणजे ती लागवडीस आणण्यासाठी मोठमोठ्या सवलती दिल्या. जो शेतकरी पड पडलेल्या जमिनीस पिकाऊ करील, पीक काढेल त्याला पहिली पाच वर्षे सारा माफ; पुढे काही वर्षे फारच थोडा म्हणजे आठवा हिस्सा, मग सहावा व मग चवथा, निम्मा आणि पूर्ण आकार आकारावा अशा प्रकारे काही वर्षांच्या प्रमाणात वाढत्या साऱ्याने जमिनी लागवडीस आणण्यासाठी शेतकऱ्यांशी करार केले.[७] ज्या जागी झाडी असेल ती जागा झाडी तोडून खत माती घालून पेरणीयोग्य करण्यास त्यास उत्तेजन दिले. नदीच्या पाण्यामुळे अदृश्य झालेल्या जागेस दृश्य स्वरूपात आणण्यासाठी पाण्याला बांध बंदिस्ती घालून त्या जमिनीला अनेक वर्षे मेहनत मशागत करण्यास सवलती दिल्या. खेडुतांनी गाव वसवावे ह्याकरिता त्यांना गुरेढोरे, बैल पुरविले.[८] बिजास व खाण्यास

१ सभासद, पृ. १०६.
२ जोशी, म. इ. रा. अ. भाग १, पृ. १४९.
३ भा. इ. सं. म. वार्षिक संमेलन १८३५, पृ. ३२३-३२७.
४ राजवाडे, म. इ. सा. भाग २१, ले. २०३.
५ तत्रैव.
६ शि. च. सा. भाग ९, पृ. ५५.
७ शि. च. साहित्य खंड ८, ले. २६.
८ ९१ कलमी बखर, २१.

प्रथम धान्य दिले.[१] एखाद्या गावातील कुणबी शेतकरी अवर्षणामुळे उठून गेले, तर त्यांस गुराढोरांसह परत आणविण्यासाठी पट्ट्या माफ केल्या. लष्करामुळे पिकांची पायमल्ली होई, टोळधाड पडे, रोगसाथ येई, त्याकाळी वारंवार हल्ले, स्वाऱ्या शिकाऱ्या होऊन शेतीस हवे असणारे स्वास्थ्य बिघडे, गावांवर धाड पडे, धान्याची कोठारे लुटून नेत, गुरा माणसांच्या मुसक्या बांधून नेत, इत्यादी कितीतरी अडचणी त्याकाळी देशावर येत. त्या निवारून शेतकऱ्याला निर्भय करावयाचे काम शिवाजी महाराजांच्या राजवटीने केले.[२] खोत, पाटील महाजन ह्या गावप्रमुखांनी जमिनी स्थिरस्थावर करण्यास उत्तेजन देऊन योग्य ती मदतही दिली. पडीक जमिनी लागवडीस आणल्या जाव्या ह्या हेतूने त्या देवस्थाने, मठ, मशिदी ह्यांना इनाम दिल्या. कोकणातील खाड्यांच्या काठच्या नवीन खाजणात भात जमीन बनावी म्हणून विशेष सवलती देण्याचे सुरू केले. खार जमिनी खाडी काठी, समुद्रालगत असल्याने भरतीचे उधाण पाणी खारीच्या बांधास जोराचा आघात देऊन बांध फोडण्याचा धोका नेहमीच असतो. हा धोका पावसाळ्यात मोठ्या उधाणांच्या वेळेस मोठा असतो. त्याने बांध बंदिस्ती ढासळू नये म्हणून खार मालकांस जागरूक राहावे लागते. पाण्याच्या जोराने एखाद्या जागी बांध कमजोर झाल्यास लगेच दुरुस्ती फेरबांधणी करावी लागे. नाहीतर खारीची वाट लागली म्हणून समजावे.[३] काही वेळा हे काम फार मोठ्या खर्चाचे व मेहनतीचे असते म्हणून सरकारांतून जाहीर केले की, जो कोणी बांध बंदिस्ती करील व नवीन खार जमीन पिकास आणील त्यास पहिली काही वर्षे माफी देण्यात येईल, नंतर एकरी चार आणे महसूल घेण्यात येईल.[४]

गावकरी, शेतकरी आणि पिकांचे रक्षण करणे :

त्यावेळी लागवडीखाली जास्तीत जास्त जमीन आणण्याकरिता उत्तेजन दिले जात असे. लागवडीखाली येणाऱ्या जमिनीत बागायत आणि भातशेती होई व त्यापासून उत्पन्न निघे.

---

१ सभासद बखर, पृ. २६.

२ शि. च. सा. खंड ८-८४, ऐतिहासिक फारसी साहित्य खंड २, १५, २७.

३ खोबरेकर, मराठा अंमलाचे स्वरूप, पृ. ४३-४४.

४ सेन, अॅडमिनिस्ट्रेटीव्ह सिस्टीम ऑफ द मराठाझ, पृ. ५४.

शिवरायांची पहिली जहागीर जी कर्यात मावळ ती ३६ गावांची. पण त्यांनी राज्यविस्तार कोकणातही केला. कोकणात भातशेती व बागायती जमिनी. त्या दोन्हीही लागवडीस आणण्याकरिता उत्तेजन दिले. बागायत जमिनीत नारळ, सुपारी, उंडी, फणस, ताड इत्यादी झाडे येत. बागायतीचा मोठा शत्रू वादळे होय. पावसाळ्यात प्रचंड वादळे होऊन झाडे मोडत, घरे पडत, वाड्यांचा नाश विलक्षण होई, तेव्हा पुन्हा बागायतीची पाहणी होऊन जेवढी मोडतोड झाली असेल तेवढीच विचारात घेऊन सरकार आकारात सूट देई.[१]

अतिवृष्टी आणि अवर्षण

शेतीचा मोठा शत्रू अतिवर्षाव, अवेळी पर्जन्य आणि अवर्षण हा होय. त्यावेळी पर्जन्य नसल्यास गावातील मंदिरात पर्जन्यकुंड उघडीत. होमहवन झाल्यावर कधीकधी पर्जन्यवृष्टी होई. कोकणात मृगाचा पाऊस पडला नाही आणि आर्द्रा नक्षत्रापासून पाऊस सुरू झाला तर लावणीचा व पिकांचा हंगाम लांबे. लावणीच्या वेळी पर्जन्य अल्प पडत गेला तर जोरदार पाऊस पडावा म्हणून देवळातून प्रार्थना होत असत. पर्जन्यवृष्टी कमी झाली म्हणजे पटणी, वरंगळ, आंबेमोहर इत्यादीचे पीक कमी येई. दुष्काळाचे स्वरूप येई. अवर्षण झाले म्हणजे दुष्काळ पडे, लोक उपासमारीने मरू लागत, अर्भके विकली जात, म्हणजे रयतेवरील सर्व प्रकारचे कर रद्द केले जात. सैन्यात भरती जोराची होई. दुसरीकडून धान्य आणून उपासमार थांबविण्याचे इलाज होत.[२] पण अतिवृष्टी झाली म्हणजे शेतात पाणी तुंबे, नद्या ओढे वाहू लागत. अशावेळी सगळे पीक हाती लागत नसे. हाती लागे ते भिजके होई. वर सांगितल्याप्रमाणे नैसर्गिक कारणांमुळे पिकांचे उत्पन्न दरवर्षी बदलत असणार म्हणून सरकार शेतांत पीक उभे असताना वसूल किती होईल याची पाहणी करीत असे.[३] शिवाजी महाराज तिला "अजमास पाहणी" अगर "कलित पाहणी" असे म्हणत. पिके तयार होण्याच्या

१ म. इ. सा. खंड १८, ले. ३३; खंड २०, ले. २८.

२ शि. च. सा. ७:४४.

३ कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र, पृ. ६२.

सुमारास ही पाहणी सरकारी अंमलदार करीत. शेतीच्या उत्पन्नाचा अंदाज बांधीत. आणि गतवर्षी जेवढे वसूल झाले असेल तो आकडा आधार मानून शेतकऱ्यांना शेतसाऱ्यांत सूट मिळे.[१] ऐन जिनसी वसूल सरकार करीत असे म्हणजे नक्त व गला रोकड व धान्यरूपाने महसूल होत असे. गावशिवारांत जर बाद जमीन असेल तर ती किर्दीस म्हणजे लागवडीस आणण्यासाठी शेतकऱ्यास पाटलाकडून नांगर दिला जाई. शेतीच्या मशागतीसाठी बैलाची जोडी, विशेषतः धुरवीचे बैल प्रसंगी दिले जात आणि पेरणीसाठी बीजही दिले जाई. त्यासाठी सरकारी म्हणजे खालसा जमिनीच्या उत्पन्नात "बीजहुर्डा" म्हणून स्वतंत्र गल्ला जमवून ठेवणे तो पेरणींच्या हंगामात कुळांना दिला जात असे.[२]

राज्यातील सर्व जमिनींचे मोजमाप करून सारा आकारणी करणे :

शिवाजी महाराजांनी आपल्या ताब्यात आलेल्या जमिनीचे मोजमाप करून त्यावर सारा आकारण्याचे काम मुख्यतः अण्णाजी दत्तो या सचिवास सांगितले. अण्णाजी दत्तोने विशेषतः कोकणातील जमीन मोजणी करून सारा आकारणी केली आणि सरकारी दस्त ठरविला. अण्णाजी दत्तोप्रमाणे शिवाजीच्या इतर प्रधानांनी राज्यातील अन्य प्रांत विभागात जमीन मोजणी व सारा आकारणीचे काम केलेले तत्कालीन कागदपत्रावरून दिसून येते.[३]

आदिलशाही, निजामशाही काळात काही ठिकाणी "मीर जुमले पद्धतीने" तर काही ठिकाणी मलिक अंबर पद्धतीने जमीन मोजणी होत होती. शिवकाली कोकणच्या जमीन मोजणीचे काम अण्णाजी दत्तो ह्यांनी इ. स. १६६२ मध्ये केल्याचे पेशवे दप्तरांतील उत्तर कोकण या रुमालातील माहितीवरून समजते. अण्णाजी दत्तोच्या बिघावणी पद्धतीबरोबर मीरजुमले पद्धतीचा उल्लेख ह्या कागदात सापडतो. पण तिचे स्पष्टीकरण ह्या कागदात आढळत नाही.

---

१ कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र, पृ. ६३.

२ राजवाडे खंड १५: ३४०.

३ सभासद पृ. २६, २७: चिटणीस, पृ. १८३.

जमिनीचे प्रकार

शिवकालीन जिरायती जमिनीचे अनेक प्रकार मानले जात होते. (१) अव्वल म्हणजे वरच्या प्रतीचे, (२) दूम म्हणजे दुसऱ्या प्रतीचे, (३) सीम म्हणजे कनिष्ठ प्रतीची. अशी प्रतवारी ढोबळ मानाने करीत. कोकणात यासमवेत आणखी प्रकार व फरक होते ते असे (१) पेरणू, (२) मुरमाड, (३) धुळपट, (४) दरवट, (५) खारी, (६) खस्ती. शिवाय जेथे रहू करून भाताची पेरणी होई, त्या जमिनीस पेणू आणि जीत आवण म्हणजे भाताची रोपे करून नंतर लावावयाची तिला अवलू म्हणत. लावणी, रब्बी, खरीप, एकपिकी, दुपिकी, कोरडवाहू म्हणजे जिराईत व बागाईत. बागाईतांतही मोटस्थळ व पाटस्थळ, बागमळा, राई असे भाग असून हे सर्व मिळून एकूण पोटभाग ठोकळ १७ आहेत.[१]

जमिनीवरील सरकारी सारा आकारणे व तो कायम करण्याचे तीन टप्प्याने होत असे. पहिला टप्पा जमिनीची बिघावणी होऊन पिकांचा निमताना करणे. बिघावणीची पद्धती पेशवाई संपेपर्यंत होती. ८२ तसूंच्या काठीने जमीन मोजीत.[२] शेत अगर जमीन पेटाऱ्या लावून समपातळीत आणित. पहाणी करणारा अमीन, कारकून, काटकर म्हणजे काठीस काठी लावून मोजणी करणारा, ह्या सर्व कामदारांना महिना वेतन मिळे. पाहणी पूर्ण झाल्यावर पाहणी खर्च रयतेवर आकारला जाई. तसा शिरस्ता होता. जमिनीचे मोजमाप होऊन जमीन अमुक बिघे हे ठरे, ह्यालाच चावराणा आणि चकबंदी म्हणत. बिघे ठरले म्हणजे अमुक चावर वा चाहूर हे ठरलेच आणि त्यांच्या सीमा ठरल्या म्हणजे चकबंदी झाली.[३] अमक्या गावाचे शिवार इतक्या चाहुराचे असे उल्लेख शिवकालीन कागदात सापडतात. जमीन मोजणी केल्यानंतर त्यातील प्रतवारी ठरली, मिरासदार, कुळे रयताव्याने शेती करू लागली. शेतकरी ह्यांच्या नावांच्या सनदा ठरल्या, सनदामधून शेताचा उल्लेख होऊन "जमीनझाडा" गाववार

१ सेन, उपरोक्त, पृ. ९१.

२ भा.इ.सं.मं.त्रै. वर्ष ६, पृ. ८८.

३ कुलकर्णी, उपरोक्त, पृ. ६२.

तयार झाला, म्हणजे आकारणीचा पहिला टप्पा संपे.[१] रयतेने जर ह्या आकारणीबद्दल असमाधान व्यक्त केले आणि पुन्हा पाहणी आकारणी करण्याचा अर्ज केला तर पुन्हा आकारणी होत असे. आणि हे काम रयतेच्या मनपसंत झाले म्हणजे धारा गोळा करण्यास जड जात नसे. पण दोनदा आकारणी करूनही रयतेची त्या कामास पसंती मिळाली नाही तर ते काम अण्णाजी दत्तोपंतानी देशमुख, कुलकर्णी, मोकादम, पोख्तर व चार रयता ह्यांच्या मेळाव्यावर सोपवून त्यांना शेतीच्या सिरी बैसवून साक्ष पाहून आकार करण्यास सांगितले आहे, हे दिसून येते.[२]

सरकारी नोकर पाठवून आकारणी केली तर गाववाले ती मानण्यास फारसे उत्सुक नसत. तेव्हा पंत देशमुखांना वा पाटलांना लिहीत की, " पन्नास पाऊणशे वर्षापूर्वी मलिक अंबरने जी आकारणी केली त्या आकारणीशी आपल्या ह्या आकारणीची तुलना करा, शेत शिवारामध्ये इतक्या अवधीत काही कमी अधिक झाले की काय हे लक्षात घ्या; चार जाणत्या मंडळीना जमवून एकमताने ठरवा; ह्या कामास तुम्हास आजपासून फुरसत पुढील सालपावेतो दिली आहे. इतक्यामध्ये आकार करून आम्हास कळवा. "

देशमुख व पाटील ह्यांजकडून सारा आकारणीचा पाहणी खर्डा तयार होऊन आल्यावर पंत स्वतः त्या तर्फात जात. आपल्या पाहणीसाठी गावे तीन तीन प्रतीची निवडीत. गावात एक डोंगर, एक खाचर, तळे, जमीन एक, काळी एक असा गाव तपासणीसाठी निवडीत. गावाची चौकशी, त्यांतील पिके ह्यांची पाहणी कारकुनासह स्वतः पाहून गावांतील चार प्रतिष्ठित माणसांस बोलावून आणून त्यांची समजूत घालून मलिकंबरी जमान्याहून आता पिकांची सवाई दिढी दुणी बेरीज झाली आहे हे समजावून सांगून सारा वाढ करण्याचे मनात असले तर तेही सांगून सारा आकारणीचे काम पुरे करीत असत. अशा रीतीने जमीन मोजणी, पीक पाहणी व सारा आकारणी ही कामे होत असत. हे काम अण्णाजी दत्तोने इतक्या चोख रीतीने बजाविले म्हणून मराठेशाहीत " अण्णाजी पंतांचा धारा " रूढ झाला.[३]

---

१ म. इ. सा. १७, ले. २१.

२ स्टोरिया द मोगर, भाग ३, पृ. ५००.

३ राजवाडे, खंड १५, ले. ३४०.

अण्णाजीपंतांच्या ह्या कार्यात इतर प्रधानांचाही वाटा होता. जमीन मोजणी व सारा आकारणीचे हे काम त्यांनीही शिवाजी महाराजांच्या राज्यातील अन्य प्रांत विभागात केलेले आहे. मोरोपंत प्रधान ह्यांनी शिरवळ परगण्यात जाऊन परगणा मोजून कीर्दी जमिनीस धारा बांधोन दिल्याचा तपशील उपलब्ध आहे.[१]

पीक पाहणी :

चिटणीस बखर सांगते की, शिवकालात दादाजी कोंडदेव याने इ. स. १६३६ च्या सुमारास पुणे, मुठे-मावळ या भागात धारा ठरविण्याचे काम केले. त्यानंतर शिवाजी महाराजांनी कसबे पुण्याची पाहणी करून दस्त ठरविण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे अधिकाऱ्यांनी शेतजमिनीची पाहणी केली. कसब्यातील बागायत, जिरायत व इनामती जमिनीची मागणी केली. व शेतकऱ्यांनी किती खंडणी द्यावयाची हे ठरविले.[२] कसबे रहिमतपूर तर्फ कोरेगांवच्या जमिनीचे मोजमाप करण्याचे हुकूम इ. स. १६७५ला शिवाजी महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांस दिले त्याप्रमाणे जमिनीची बिघावणी केली गेली.[३] सुभा मावळांतील रोहिडा खोऱ्याच्या शेतकऱ्यांनी शिवाजी महाराजांस विनंती केली की, शेती जमीन मोजून सारा ठरविण्यात यावा हे काम महाराजांनी अण्णाजी दत्तो सुरनीस यास दिले.[४] परगणा शिरवलमधील मौजे न्हावी गावची लागवडीची ४१ वावर जमिनीची मोजणी मोरो त्रिमल प्रधान यांनी केली. त्या गावची ८ वावर जमीन वाजट (ओसाड) निघाली. ती मोजणीत धरली नाही.[५] वरकस किंवा डोंगरी जमिनीची मोजणी नांगराने करीत, बिघ्याने नव्हे.[६]

१ राजवाडे, खंड २०, ले. ५५-५८.
२ शि. च. सा. ७/५४.
३ राजवाडे, खंड ८, ले. ८४.
४ राजवाडे, खंड १५, ले. ३४०.
५ राजवाडे, खंड २०, ले. ५५.
६ जेरवीस, पृ. ९४,९७.

शिवकालातील धरण व पाटबंधारे यावरील शेती :

ऊस, आले (ginger), हळद आणि भाज्या यांच्या लागवडीकरिता वर्षभर पाणी लागते हे पाणी विहिरी आणि कालवे किंवा पाटबंधारे यातून मिळते. शिवाजी महाराज शिवापुरास आल्यावर त्याना आंबराई तयार करण्याची इच्छा झाली म्हणून त्यांनी पाण्यासाठी कालवा खणण्याचे काम हाती घेतले.[१] जे कोणी पुढाकार घेऊन पाटबंधारा बांधून ते पाणी शेतीसाठी वापरीत. त्यास शिवाजी महाराज शेतजमीन इनाम देत असत.[२] वाई परगण्यांतील गोवा गावी कालव्याचे पाणी शेतीसाठी वापरले जाई. सरकारातून दिनांक १५ फेब्रुवारी १६५० ला अशी आज्ञा केली गेली की, शेतीसाठी कालव्याचे पाणी दर आठ दिवसांनी एकदाच वापरावे.[३] कालव्याच्या पाण्याचा वापर शासनाच्या अखत्यारीत आला. पिकांसाठी नाल्याच्या पाण्याचा वापर कसा करावयाचा ह्यासंबंधी शासकीय हुकूम त्यावेळी निघाला होता.[४] केळीच्या वनासाठी कालव्याचे पाणी मिळत असल्यास एका बिघ्याच्या लागवडीस ३ होन व २ होन आकार केला जाई.[५]

स्वराज्य मुलुखाची कारभाराच्या सोईसाठी विभागणी :

स्वराज्य मुलूख तीन प्रांतात विभागला होता. एका प्रांतात दोन किंवा अधिक जिल्हे. चिटणीस बखरीतील उल्लेखाप्रमाणे शिवाजीरायांचे राज्य चौदा जिल्ह्यांचे होते. ते असे—सातारा, वाई, कराड, पन्हाळा, मावळ, कोकण (भंडारी आणि जलदुर्ग), ठाणी, त्रिंबक, बागलाण, बिदनूर, कर्नाटक, येलूर, बानगड, कोल्हार आणि चंदी. स्वराज्याची विभागणी प्रांत तर्फ व मौजा यात केली होती. प्रत्येक प्रांत सरकारकडे किंवा सरसुभेदार यांच्या अखत्यारीत असे. तर्फच्या मुख्यास कारकून किंवा हवालदार म्हणत. मौजा किंवा गाव (खेडे) हा सर्वात लहान गट, गाव पाटलाच्या अखत्यारीत असे.

---

१ शिवकालीन पत्रसार संग्रह भाग, १, ६५७.

२ राजवाडे. खंड १५, ले. ७०.

३ कित्ता, ८८.

४ कित्ता.

५ शिवचरित्र साहित्य, खंड ७, ६७.

महसूल वसुली :

शिवाजी महाराजांच्या हुकूमाप्रमाणे अण्णाजी दत्तो सुरनिसाने महाराजांच्या ताब्यातील कोकणच्या मुलुखाची मोजणी इ. स. १६६२ मध्ये केली.[१] शिवाजी महाराजांच्या ताब्यात निरनिराळ्या कालखंडात कमी-अधिक गावे असत. त्याप्रमाणे कमी-अधिक महसूल आकारला जाई. इ. स. १६६७ मध्ये शिवाजी महाराजांना तर्फ पुण्यातील वीस गावे गमवावी लागली. तसेच मावळ तर्फातील ३६ गावे गमवावी लागली म्हणून परगणे पुणे प्रांतातील २२४ गावांचा रोख महसूल रुपये २२५८९ ठरविण्यात आला.[२] सारा म्हणून भाताची वसुली सरकार मे व ऑक्टोबर या दोन महिन्यांत करीत असे. सारा वसुली भात आणि नक्त रक्कम यात केली जाई. शिवाजी महाराजांनी भात वसुली करणाऱ्या कारकुनासाठी काही नियम केले होते. त्या नियमांचे पालन सारा वसुली करताना कारकुनास करावे लागे. शेतकऱ्याचे जमिनीतून पीक कमी आल्यास त्यास गतवर्षीच्या आकाराएवढा सारा भरण्याची सक्ती न करता त्याला सूट द्यावयास हवी अशा महाराजांच्या आज्ञा असत.

शेती, महसूल व्यवस्था आणि जमीन धारणा :

शिवाजी महाराजांची महसूलविषयक व्यवस्था कोकणात खालीलप्रमाणे होती :—

वसईचा सुभेदार, कल्याण प्रांताचा सुभेदार, दाभोळ प्रांताचा सुभेदार अशा शिवाजी महाराजांनी नेमणुका केल्या होत्या. महसूल संदर्भात सुभेदारांना भरपूर अधिकार असत. कमाविसदारांची संख्या, त्यांचे वेतन, त्यांना द्यावयाची उचल कमी-जास्त करणे वगैरे सर्व गोष्टी ठरविण्याचे त्यांना अधिकार असत. परगण्याच्या महसुलाची चौकशी करणे, त्याचे तपशिलवार हिशेब मागून घेणे, त्यांना योग्य वाटेल त्याप्रमाणे महसुलात सूट देणे आणि फडणिसांना नेमणे व काढून टाकणे इत्यादी अधिकारही

१ चिटणीस बखर, पृ. ३१५-३२३.

२ राजवाडे, खंड १८, ले. १३.

त्यांना होते. मामलेदार आणि कमाविसदार हे शासकीय यंत्रणेचे महसुलाच्या बाबतीत महत्त्वाचे घटक असत. आणि त्यांना आपले वेतन अन्य देय गोष्टी व अवांतर अनुज्ञेय वसुली घेण्याचे अधिकार असत. कोकण प्रांत जिंकून घेतल्यावर कोकणातील जमीन महसुलाची आकारणी करण्यासाठी शिवाजी महाराजांनी अण्णाजी दत्तोची नेमणूक केली. शिवाजी महाराजांच्या राज्यात प्रांताची परगण्यात परगण्यांची तरफांत व तरफांची मौजेमध्ये विभागणी असे. कोकणातील जमीन जिरायत (पाणीपुरवठा नसलेली) व बागायत पाणीपुरवठ्याची अशी दोन प्रकारची आहे, बागायत जमिनीत बहुतेक नारळी व अन्य फळझाडांची लागवड असे. जेरविसाच्या म्हणण्यानुसार डोंगरी भागात नांगर पद्धतीचा वापर करत.[१] नांगर पद्धतीत जमिनीचे स्थान किंवा स्वरूप लक्षात घेता तिला किती नांगर लागतात त्यावरून महसूल ठरवीत असत. त्या काळी परगण्याचे अधिकारी, गावातील अधिकारी व ग्रामस्थ यांच्या साहाय्याने शासकीय अधिकारी दरवर्षी जमीन महसूल ठरवीत असत. शिवाजी महाराजांचे पंतप्रधान मोरोपंत पिंगळे यांनी अशा प्रकारच्या एका महसूल निर्धारणाच्या प्रकरणाला अंतिम स्वरूप दिले होते. असे करताना त्यांनी भाताला निरनिराळ्या कारणाने झालेले नुकसान विचारात घेतले होते.[२] स्थानिक लोकांनी मोरोपंतांच्या पद्धतीला नापसंती दाखवली आणि अण्णाजी दत्तोंनी[३] ठरविलेला महसूल वसूल करावा असे सांगून तो भरण्याची तयारी दाखवली. तेव्हा मोरोपंत पिगळ्यांनी कडक ताकीद देऊन आपण ठरविलेल्या महसुलाची वसुली करविली. कोकणात मुख्य उत्पादन तांदूळ व नारळ यांचेच होते. अण्णाजी दत्तोंनी दाभोळ सुभ्यात पिकाची आणेवारी ठरवून उत्पनाच्या २/५ शासकीय महसूल ठरवून दिला, असे सभासद म्हणतो. शासकीय भाग अपेक्षेपेक्षा अधिक असल्याचे लोकांनी शासनाला दाखवून दिले. आणि नजर पाहणीने महसूल ठरवावा असे सुचविले. अण्णाजी दत्तोने हे मान्य केले व शासनाचा हिस्सा पन्नास

१ जेर्व्हिस, कोकण, पृ. ७४.

२ शि. च. सा. भाग ९, ले. ५६.

३ जोशी, महाराष्ट्रेतिहास राज्यकारभार, पृ. ८०.

हजार नारळांवरून वीस हजार नारळांवर आणला.[१] इ. स. १६७६ च्या डिसेंबर महिन्यात पेशवे मोरोपंत पिंगळे आणि नारायण शेणवी चौलला आले आणि त्यांनी हिशेब तपासून महसूल व्यवस्थापनाचे काम पुरे केले. तसेच मोरोपंत पिंगळे यांनी शिरवळ परगणा मोजून किर्दी जमिनीस धारा बांधून दिला होता.[२] इ. स. १६७७ मध्ये शिवाजी महाराजांनी महसूल-विषयक आपले नियम व पद्धती कोकण प्रांताला लागू केले.

कोकणातील पीक पाहणी करणे व महसूल निर्धारणाचे काम अण्णाजी दत्तो यांचेकडे होते. त्यांनी इ. स. १६७८ मध्ये रत्नागिरी तालुक्यातील तर्फ संगमेश्वरमधील देशमुख, देशकुलकर्णी, मुकादम आणि पाटील यांना एक पत्र लिहून त्यांनी प्रत्येक गावाला भेट देण्याचे आदेश दिले. या अधिकाऱ्यांनी गावांमध्ये जाऊन नीट पाहणी व चौकशी करून जमिनीची प्रत ठरवावी, कोणती पिके घेतली आहेत याची नोंद करावी आणि जमीन महसूल निश्चित करावा असे आदेश दिले होते. त्यांनी आपले सविस्तर अहवाल अण्णाजी दत्तोला पाठवायचे होते. अण्णाजी दत्तोने असेही कळविले होते की, तीन निरनिराळ्या विभागातील म्हणजे डोंगराळ, पाणथळ आणि काळ्या कसदार जमिनीची तीन गावांत स्वतः जाऊन ते पाहणी करणार होते. म्हणून अण्णाजी दत्तोचे जमीन महसूल निर्धारण शासकीय अधिकारी आणि वंशपरंपरागत वतनदार यांनी केलेल्या पाहणीवर आधारित होते. म्हणून डॉ. बाळकृष्ण यांनी अण्णाजी दत्तोंचे महसूल निर्धारण हे लोकांनी केलेले निर्धारण होते असे जे वर्णन केले होते ते बरोबर आहे.[३]

कोकणात सामान्यतः तांबडी जमीन आढळते. नापीक जमिनीला वरकस म्हणतात. समुद्रकाठच्या खाऱ्या जमिनीला खारवट म्हणतात.[४] शिवाजीच्या काळी कोकणातील जीवन शेतीभोवती केंद्रित झालेले होते. कोकणात

१ शि. च. सा. सं. भाग २, ले. १८८५.

२ राजवाडे, खंड २०, पृ. ९४-१११, जोशी, तत्रैव, पृ. १५६.

३ बाळकृष्ण, शिवाजी ध ग्रेट, भाग ४, पा. १०९.

४ मुंबई इलाख्याचे गॅझेटिअर्स - भाग १० कुलाबा जिल्हा.

एप्रिलच्या अखेरीस पेऱ्यासाठी जमीन तयार केली जाते आणि भाताची रोपे अधिक मोठ्या क्षेत्रावर लहान लहान मळ्यात पाऊस जोरात सुरू झाल्यावर लावतात. कोकणात रत्नागिरी जिल्ह्यात भात, नागली (नाचणी) ही मुख्य पिके होती आणि अळशी, तीळ व ताग (अंबाडी) ज्याचा उपयोग दोऱ्या आणि शेडे करण्यासाठी करत, याचीही पिके घेत.

महसूल निर्धारणाची तत्त्वे :

पाहणी किंवा प्रत्यक्ष निरीक्षणाच्या आधारानेच नेहमी महसूल निर्धारण केले जाई. प्रत्येक बिघ्यामागे उत्पन्नाच्या दोन पंचमांश हिस्सा इतका शासकीय म्हणून मागणी करावी असे शिवाजीने निश्चित ठरवून दिले होते.[१] अण्णाजी दत्तोने एकूण उत्पन्नाच्या ४० टक्के शासकीय वसूल ठरविला होता. परंतु नंतर शिवाजी महाराजांनी इतर कर व जादा जकाती वगैरे रद्द[२] करून एकत्रित शासकीय वसूल म्हणून ४० टक्के महसूल नक्की केला. जमिनीची प्रत आणि घेतलेले पीक यांच्याप्रमाणे महसूल कमी-अधिक होत असे. नंतरच्या काळातील एका पत्रावरून जमिनीच्या प्रतीप्रमाणे महसुलात होणारे फरक कळू शकतात. काळ्या कसदार जमिनीला प्रत्येक बिघ्यामागे[३] दोन मण आणि बागायत जमिनीत धान्योत्पादन केल्यास दर बिघ्यामागे पाच मण महसूल असे.[४] नापीक जमिनीसाठी दर बिघ्यामागे सरासरी सव्वा मण वसूल असे. असे दिसते की जिरायत जमीनही अव्वल (चांगली), दुम (सामान्य) अणि सिम (कनिष्ठ) अशी प्रतवारी करून त्यानुसार महसूल ठरविला जात असे. अव्वल, दुम आणि सिम जिरायत जमिनीचा महसूल अनुक्रमे तेरा, नऊ आणि पाच मण असे.[५] गावच्या वसूल निर्धारणाच्या वेळी बहुधा ओसाड शेती न होण्यासारखी जमीन

१ सभासद, पृ. २६.
२ जेर्व्हिस, कोकण, पृ. ९३.
३ शि. च. सा. भाग ८, पृ. २६.
४ कित्ता.
५ शि. च. सा. भाग ७, पृ. ६७.

वगळण्यात येई.[१] महसूल निर्धारणापूर्वी पुष्कळदा पेशवे सरकार गावात आणि परगण्यात पाहणी आणि तपासणी पथके पाठवीत असत. आणि परगण्यांत पाहणी व तपासणी पुरी होइपर्यंत पेशवे सरकार अमीन व कारकून यांना दरमहा प्रत्येकी ८ रुपये पगार देत असे.[२]

मलिक अंबरच्या पद्धतीतही नजर पाहणीची व्यवस्था होतीच. लागवडीखालील जमीन फक्त त्याने विचारात घेतली व सरासरी उत्पन्न ठरविले. महसूल संबंधीच्या कागदपत्रात खालील तीन प्रकार उल्लेखिलेले आहेत :—

(१) एका व्यक्तीच्या मालकीची जमीन ;

(२) दोघांच्या मालकीची जमीन ;

(३) धार्मिक संस्थांची जमीन.

वरील जमीन सोडून बाकीची खालसा जमीन महसूल निर्धारणासाठी विचारात घेत. शिवाजीने मलिकंबरची पद्धत मान्य केली व स्वीकारली व ती पुढे मराठा अंमल संपेपर्यंत पुष्कळ काळ चालू राहिली.

शिवाजी महाराजांनी नवीन माप सुरू केले. त्याला शिवशाही काठी म्हणत. त्याची लांबी पाच हात आणि पाच मुठी असे. जमीन मोजण्याचे बिघा हे परिमाण त्याने चालू ठेवले. तोडरमल व मलिकंबर यांनी हे परिमाण आधीच (पूर्वी) वापरले होते. पुढे दिलेला तक्ता शिवाजी महाराज वापरत असत.[३] :—

२५ अंगुळे = १ हात (१८ इंचाचा)

पाच हात पाच मुठी = १ काठी

२० काठ्या = १ पांड

२० पांड = १ बिघा

महसूल निर्धारणासाठी बिघा वापरत असल्याने महसूल निर्धारणाला बिगोटी किंवा बिघोटी म्हणत. शिवशाही काठी ही पाच हात आणि पाच मुठी इतक्या लांबीची असे.

१ म. इ. सा. भाग २०, ले. ९४.

२ राजवाडे, म. इ. सा भाग ३, ले. ३३०.

३ सभासद बखर (सं. साने), पृ. २९.

मराठेशाहीतील जमीन महसूल पद्धतीचा प्रसिद्ध भाष्यकार मेजर जेर्विस म्हणतो की, शिवाजीने जरी जमीन महसूल उत्पन्नाच्या बटाईच्या ५० टक्के ठरविला तरी प्रत्यक्षात त्याने तेवढा महसूल वसूल केला नाही. प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या किंवा मालकीच्या जमिनी बिघ्यामध्ये कमी मोजल्या जात आणि जमीन महसुलाची आकारणी बेताने केली जाई. बसुली पैशात न करता वस्तूंच्या स्वरूपात करावी असे शिवाजीचे आदेश होते.[१] शिवाजीच्या महसूल निर्धारणाची मुख्य सूत्रे अशी होती :—

(१) नवीन बिघा ;

(२) शिवशाही काठीचे नवीन माप ;

(३) विविध घटक विचारात घेऊन केलेली जमिनीची प्रतवारी ;

(४) शेतकऱ्यांचे कल्याणाचे उद्दिष्ट आणि मध्यस्थाना कमी करणे ;

(५) गाव जमिनीच्या महसुलाची निश्चिती करून अंमलबजावणी ;

(६) महसूल रोख पैशात किंवा वस्तूंच्या स्वरूपात भरण्याचा पर्याय ;

(७) बेताची सारा आकारणी (महसूल) ;

(८) शेतकऱ्याने जमिनीवर प्रेम करावे यावर जोर.

संभाजीच्या वेळी सर्व कोकणावर अबाधित सत्ता मिळवण्यासाठी कलुशाने प्रयत्न केले. त्याने अण्णाजीची पद्धत न वापरता महसुलात वाढ केली. आकारणी पद्धतशीरपणे न करता स्थूलपणे केली. आकारणीसाठी सर्वच प्रदेश लागवडीखाली आहे असे समजून आकारणी करण्याची पद्धत त्याने सुरू केली. अनुभवी अधिकारी नेमण्यात आले. निम्या उत्पादनाचे नवे जिल्हे ठरविण्यात आले. ही भयंकर पद्धत पुढे सहा वर्षे म्हणजे जिल्ह्यातील एक महत्त्वाचा बाजार संगमेश्वर येथे कलुशा पकडला जाईपर्यंत चालू होती.

---

१ सभासद बखर (सं. साने), पृ. २९.

तांदूळ आणि इतर अन्नधान्याखेरीज कोकणातील जमीन बागायतीसाठी प्रसिद्ध आहे. नारळ आणि पोफळी किंवा सुपारीसाठी कोकण प्रसिद्ध आहे. या दोहोंनी कुलाबा आणि रत्नागिरी जिल्ह्यांची सुमारे ९५ (टक्के) जमीन व्यापली आहे. उडीद आणि कुळीथसुद्धा कोकणात पेरतात. तीळ, वाल, नाचणी, वरीसुद्धा पेरतात.

बागायती जमिनीचा महसूल ठरविण्याचे नियम अधिक गुंतागुंतीचे होते. फळे येणारी झाडे मोजून प्रत्येक झाडाचा महसूल दर ठरवीत आणि अशा सर्व झाडांचा मिळून त्या बागेचा महसूल दर धरला जाई. ठरावीक दराने त्या नारळांची किंमत धरून बागेचा महसूल ठरवीत. नारळांचा दर काय धरत ते सांगता येत नाही. फणसाला दर झाडामागे ३ आणे दर होता. पानमळावाल्याला प्रत्येक १०० वेलींमागे १२ आणे द्यावे लागत. ताडीच्या झाडांना दर झाडामागे १ रु. असे. नारळांच्या झाडाला त्यांच्या दर्जाप्रमाणे प्रत्येक झाडामागे ५० ते २१/२ १/२ नारळ द्यावे लागत. पोफळीला पोफळीच्या दर्जाप्रमाणे ३ १/२ ते १/८ शेर सुपारी द्यावी लागे.[२] आंब्याच्या झाडांची आकारणी निराळी करत असत.

राजापूरची रयत धान्याचा भरणा करत नसत म्हणून त्यांच्याकडून खंडीमागे रुपये १५ (पंधराप्रमाणे) रोख वसुली घ्यायला परवानगी होती. तर्फ नानामवल आणि पोनमावच्या नारो केशव यांनीसुद्धा महसुलाची काही बाकी धान्याच्या स्वरूपात न घेता पैशात घ्यावी अशी शासनाला विनंती केली होती.

वरकस अणि डोंगरी जमिनीची वसूल आकारणी बिघ्यांनुसार न करता नांगरावर करत. किती नांगर वापरीत त्यावर बहुधा आकारणी अवलंबून असते.

शासन दोन प्रकारे आकारणी करी, कर जमिनीच्या प्रतीप्रमाणे आणि दोन काढलेल्या पिकाप्रमाणे.

---

१ आवळसकर, शि. च. सा. भाग १०, ले. ५५.

२ चोक्सी-एकॉनॉमिक लाईफ इन ध बॉम्बे कोकण, पृ. ४१-४२.

कोकणात तांदळाचे महसुलाचे दर ठिकठिकाणी बदलत. खारेपाटण व पोलादपूर या गावात चागल्या प्रतीच्या जमिनीसाठी हे दर बिघ्याला दहा मण आणि अन्य जमिनीसाठी बिघ्याला सहा मण असे. देवरूख येथे हा दर बिघ्याला साडेसात मण होते [१] महसूल व्यवस्थापनातील खाबूगिरीला शिवाजीमहाराजांनी काबूत आणले. प्रभानवल्लीच्या सुभेदाराला त्यांनी अशी ताकीद दिली की, महसुलापैकी काहीही त्याने आपल्यासाठी राखून ठेवू नये [२] त्याने शासनाशी एकनिष्ठ राहिले पाहिजे आणि भाजीपाल्याची एकही काडी स्वतःसाठी घेऊ नये. शेतकऱ्यांकडून शासकीय येण्यापेक्षा अधिक काही घेऊ नये. महसूल अधिकारी शेतकऱ्यांकडून कापणी झोडणीच्या वेळी धाऱ्याच्या स्वरूपात जमीन महसूल करीत असत. शिवाजी महाराजांनी असे आदेश दिले होते की वसूल केलेले धान्य नीट साठवून ठेवून योग्यवेळी विकून टाकावे. वसुली अधिकाऱ्यांना असे आदेश होते की त्यांनी बाकीसाठी शेतकऱ्यांना तगादा लावू नये आणि रयतेपासून वसूल पिकाचे पिकावर घ्यावा.[३]

शेतकऱ्यांना प्रोत्साहन :

शिवाजी महाराज शेतकऱ्यांना दुष्काळ, पूर, जीवनोपयोगी वस्तूंचा तुटवडा इत्यादी नैसर्गिक आपत्तीमध्ये आणि सैन्याच्या हालचालींमुळे झालेले नुकसान लक्षात घेऊन भरपाई देऊन साहाय्य करीत असत. शेतकऱ्यांचे कल्याण आणि शेतीसुधारणा या दृष्टीने ते नेहमी प्रयत्नशील असत. बी-बियाणे, शेतीची अवजारे, गुरेढोरे, पैसे वगैरे शेतीला आवश्यक अशा सर्व सवलती शिवाजी महाराज शेतकऱ्यांना देत असत.[४] कधीकधी तर शेतकऱ्यांना केवळ शेतीच्या कामासाठीच फक्त नव्हे तर खावटीसाठीही सरकारकडून पैसे मिळत. सभासदाने अशा एका आदेशाचा उल्लेख केला आहे की ज्याच्यानुसार नवीन ठिकाणी आलेल्या रयतेला त्यांच्या गरजेनुसार

---

१ राजवाडे, म. इ. सा. २१, ले. ४७.

२ शिवचरित्र साहित्य भाग ९, ले. ५५.

३ साने, सभासद बखर, पृ. २९.

४ कित्ता.

गुरेढोरे, धान्य, पैसासुद्धा देण्यास सांगितले आहे. वंशपरंपरागत वतनदारी अधिकाऱ्यांच्या जुलमी वसुलीपासूनही शिवाजी महाराज शेतकऱ्यांचे संरक्षण करण्याचे प्रयत्न करीत असत.[१]

जेथे पिके घेतली जात नसत अशी पडीक, खराब जमीनही शेतीखाली आणण्यासाठी शिवाजी महाराज प्रयत्न करीत असत. शेतीखाली नवीन आणलेल्या जमिनीचा महसूल हळूहळू वाढविला जाई. जो शेतकरी पडीक जमीन लागवडीखाली आणि त्याने पहिल्या वर्षी बिघ्यामागे फक्त एक बारांश रूका द्यावा; दुसऱ्या वर्षी एक चतुर्थांश रूका द्यावा आणि चवथ्या वर्षी तीन चतुर्थांश रूका व पाचव्या वर्षी चार रूके, सहाव्या वर्षी आठ रूके, सातव्या वर्षी एक रुपया आणि यानंतर शेवटी नेहमीच्या नियमाप्रमाणे वसूल त्याचेकडून घ्यावा, अशी सामान्यतः पद्धत होती.[२] अशा प्रकारे ही सवलत सात वर्षे असे. वसुलीची आकारणी कमी दराने शेतकऱ्याकडून करावी असे आदेश असताना एखाद्या वर्षी पीक चांगले येत नसे. (नुकसान साल) अशा परिस्थितीत त्या वर्षाच्या वसुलाचा आकडा एकूण आकारणीतून वजा जाई. शासकीय वसूल भरताना एखाद्या शेतकऱ्याला अडचण आली तर भरण्याची रक्कम व आकारणी कमी करण्यात येई.[३] प्रभानवल्ली मामलतच्या सुभेदाराला शिवाजी महाराजांनी प्रत्येक गावात जाऊन शेतकऱ्यांना एकत्र बोलावून घेण्यास सांगितले व ज्यांच्याजवळ बैल, नांगर, धान्य नसेल त्यांना त्या गोष्टी पुरवून त्यातून त्यांचेकडून पीक घेऊन धान्य उत्पादन करून घेण्याचे आदेश दिले होते. अशा प्रकारे शेतकऱ्यांना पुरविलेल्या वस्तूंसाठी झालेल्या खर्चावर सुभेदाराने व्याजही घ्यायचे नव्हते.[४]

महसूल वसुलीची जबाबदारी पाटलावर असे. दक्षिणेतील इतर ठिकाणाप्रमाणेच कोकणातसुद्धा वसुलीची वेळ आली म्हणजे महार करदात्यांना चावडीवर बोलावी व तेथे पाटील आपली कचेरी थाटी.

---

१ सभासद बखर (सं. साने) पृ. २२.

२ कित्ता.

३ वाकसकर, ९१ कलमी बखर, पृ. २१.

४ शिवचरित्र साहित्य, खंड ७-५०.

शेतीवर लक्ष ठेवून गुराढोरांपासून तिचे रक्षण करणे व पाटलाचे आदेश पाळणे आणि हमाली कामे करणे हे महारांचे काम असे. दुसऱ्या बाजीरावाने शेती आधारित महसूल वसुली पद्धत चालू करीपर्यंत परंपरागत चालत आलेले महार, पाटील, कुलकर्णी, सरहवालदार, जमेनीस, देशमुख, देशपांडे हे सर्व महसूल अधिकारी कोकणातही होते. यांची कामे थोडक्यात अशी होती. कोकणात काही ठिकाणी कुळकर्णी असे. परंतु पुष्कळ ठिकाणी गावचा हिशोबनीस म्हणून तलाठी असे. याचेकडे ८ ते १० गावचे काम असे व वर्षाला त्याला १२० ते १८० पर्यंत वेतन असे. दर महिन्यात प्रत्येक गावात जाणे, लोकांच्या गरजा, आवडीनिवडी समजून घेणे, कमाविसदाराला हिशोब देणे, प्रत्येक मालकाला त्याच्याकडील झालेली वसुली व येणे बाकी दाखविणे ही कामे असत. तलाठ्यानंतर पाटील हा महत्त्वाचा अधिकारी. गावात नवीन स्थानिक होणारे लोक यांच्याबद्दल अहवाल देणे, शेतीला चालना व प्रोत्साहन देणे, जमीन महसूल निश्चित करणे, गावची वसुली करून ती कमाविसदाराचे कार्यालयात भरणे ही पाटलाची कामे असत.[१] त्याला पोलिसांचे अधिकार असत. आणि रयतेचे जुलूमापासून रक्षण करणे व तंटेबखेडे सोडविणे ही पण त्याची कामे होती. त्याचे वेतन निरनिराळ्या ठिकाणी वेगवेगळे असे. कल्याण तालुक्यात गावच्या महसुलाच्या पाच टक्क्यांतील दोन तृतीयांश (२/३) हिश्श्याइतके त्याचे वेतन असे. किनारपट्टीच्या भागात त्याला वेतनाऐवजी अर्धा ते १० बिघे किंवा २० बिघ्यापर्यंत जमीन मिळे.[२]

कुलकर्णी :

तत्कालीन कागदपत्रात कुलकर्णींचा गावकुलकर्णी असा उल्लेख आहे. पाटलाबरोबरच कुलकर्णी हा पण महत्त्वाचा अधिकारी असून त्यालाही गावात विशिष्ट कामे व अधिकार असत.[३] विक्री खाते, गहाण खाते, वतनासंबंधी केवलनामे लिहिण्याचे काम कुलकर्णी करत. ही कागदपत्रे

१ शिवचरित्र साहित्य, खंड ९, ले. ५५.

२ साने, [सं] सभासद बखर, पृ. २९.

३ कित्ता.

लिहिण्याच्या वेळेबद्दल पाटलाला माहिती द्यावी लागे आणि बहुधा पाटील अशी कागदपत्रे लिहिण्यासाठीच्या बैठकीला उपस्थित राही. गावाची व्यवस्था पाहण्याबाबत पाटील कुलकर्ण्याला विश्वासात घेऊन ते काम करी. महसूल वसुली आणि गावाकरिता करावा लागणारा खर्च पाटील व कुलकर्णी मिळून एकत्रितपणे करीत. भांडणातील व्यक्तींनी केलेल्या तक्रारी कुलकर्ण्याला लिहून द्याव्या लागत. त्याच्या कामाचे शुल्क म्हणून त्याला काही रक्कम मिळे. गावाचा महसूल वसूल करण्याची जबाबदारी पाटील व कुलकर्णी या दोघांची असे याचा उल्लेख केला आहेच. जर त्यांनी यात कधी कुचराई केली तर महसुलाच्या रकमेचा भरणा होईपर्यंत कधी कधी त्यांना कोठडीत ठेवत असत.[१] शासकीय महसूल आणि गावात झालेला अवांतर खर्च वजा करून बाकी वसुली पाटील व कुलकर्णी विभागून घेत.[२]

□□

१ वाकसकर, [सं] सभासद बखर, पृ. २६.

२ कित्ता.

५७. शिवकालीन स्वराज्याचे उत्पन्न

शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. स्वतःस राज्याभिषेक करून घेतला. अष्टप्रधानाच्या नेमणुका केल्या राज्य चालविताना पत्रव्यवहार होऊ लागला. राज्याच्या वार्षिक आयव्ययाचे तक्ते तयार झाले. पत्रव्यवहार, सनदापत्रे, आणि आयव्ययाचे तक्ते व्यवथित राखण्यासाठी राजवाड्याजवळ दप्तरखाना बांधिला. ह्या दप्तरखान्यात शिवकालीन व संभाजीकालीन राज्याचे दप्तर राखून ठेविले होते. झुल्फिकारखानाने रायगड सन १६८९ त काबीज केल्यावर राजवाडा जाळला व इतर इमारतींची पाडापाड केली. त्याचवेळी त्याने दप्तरखानाही जाळला. त्यातच शिवकालीन आयव्ययाचे तक्ते भस्मसात झाले. ह्यामुळे शिवकालीन स्वराज्याचे उत्पन्न किती होते ह्यासंबंधीचे आकडे मिळत नाहीत. त्यामुळे कानुजाबत्यामध्ये १४ महालांचे उत्पन्न दाखविले आहे तेच स्वराज्याचे उत्पन्न असे समजले जाते. म्हणून स्वराज्याचे उत्पन्न कानूजाबत्यांतील जमा तपशिलाप्रमाणे होते असे म्हणावे लागते.

शिवाजी महाराजांचे राज्यारोहण प्रसंगी मोगल सम्राट हिंदुस्तानावर राज्य करीत होते व त्यांचे साम्राज्य एकंदर बावीस सुभ्यात विभागलेले होते. या सुभ्यातील एकूण उत्पन्नाची बेरीज दाखविणारा जाबता शिवाजी महाराजांनी राज्यारोहण प्रसंगी मिळविला होता. त्यात जमेचा व खर्चाचा तपशील दाखविला असून दक्षिणेतील सहा सुभ्यांपैकी शिवाजी महाराजांकडे वर निर्देशिलेला जो मुलूख होता तो १४ महालात विभागला होता. ह्यालाच पुढे स्वराज्य मुलूख म्हणू लागले.

या दक्षिणेतील सहा सुभ्यांपैकी शिवाजी महाराजांकडे "स्वराज्याचा" म्हणून जो मुलूख होता त्याचा जमा तपशील पुढीलप्रमाणे सापडतो :--

अकलूज महाल ५,००,३११, बेळगांव १३,२४,३८९, दाभोळ १६,९१,०८४, राजापूर ९,३१,९७०, तोरगल १६,७१,१२६, बंकापूर १०,००,१७२, मिरज ५५,९१०, रायबाग ९,८२,६७३, पन्हाळा ५,९६,१०४, कल्याण २,०७,०००, रामगिरी ७,८२,८४४, येतगिरी १,३४,३६५, अक्कलकोट ४,८०,०००, टाकलीखेड १,१४,५६८, म्हणून एकूण जमा १,०४,७२,५१६ रुपये.

साम्राज्याच्या सुभ्यातील एकूण उत्पन्नाची बेरीज दाखविणारा वर उल्लेखिलेला जाबता शिवाजी महाराजांनी मिळविला. त्याचे कारण असे असावे की, एवढ्या अफाट साम्राज्यात आपण संपादिलेले स्वराज्य हे २२ सुभ्यांपैकी एका सुभ्यातील काही महालाचे आहे ही जाणीव आपल्या अष्टप्रधानास होऊन त्यांनी राज्यवृद्धी करावी.

त्या काळात शेती हेच उत्पन्नाचे मुख्य साधन होते. शेतीचे उत्पन्न जास्तीत जास्त मिळण्याकरिता शिवाजी महाराजांनी जो मुलूख स्वराज्यात आणला त्यातील शेतजमिनीची पाहणी व मोजमाप नव्याने करण्याची कामगिरी अण्णाजी दत्तो या मंत्र्यावर सोपविली, ह्याबद्दलची माहिती इतरत्र दिली आहे. शेतकऱ्यांकडून शेतसारा धान्याच्या रूपाने वसूल करीत असत. एकूण उत्पन्नाच्या ३३ टक्के सारा द्यावा लागे. त्याशिवाय स्वराज्याच्या उत्पन्नाच्या आणखी काही बाबी होत्या, कर, जकात, अबकारी उत्पन्न, गुन्हेगारी, अपराध्यांना दंड, जंगलातील मालाचे उत्पन्न ह्या उत्पन्नाच्या मुख्य बाबी होत्या. त्या अशा :—

(१) नारळ, सुपारी, भात यांच्या उत्पन्नावर सारा आकारला जाई त्याची उदाहरणे शिवचरित्र साहित्य खंडात भरपूर आहेत. (२) माडावर कर. (३) घरावर कर. (४) मिठावर कर. (५) व्यापाऱ्यांवर व्यवसाय कर. (६) गाई, म्हशींवर कर, (७) दत्तक घेणाऱ्यास कर. (८) उत्पन्न कर. (९) हळद, ऊस, आले, हळद, भाजीपाला, कांदा, बटाटे, केळी यावर कर आकारणी होत असे. (१०) पाटाच्या पाण्यावर कर. (११) वतनदारांना पाणपट्टी द्यावी लागे. (१२) इनामदारांकडून खंडणी वसूल केली जाई. (१३) मिरासपट्टी. (१४) व्यवसाय कर. (१५) सराफी किंवा सराफपट्टी. (१६) सुतार, न्हावी, गुरव, सोनार, धोबी, लोहार, साळी, कोष्टी, कुंभार या सर्व धंदेवाल्यांना कर द्यावा लागे. (१७) वेठबिगारी गुलामावर कर आकारणी केली जाई. (१८) सिंहासन पट्टी अथवा तक्त पट्टी हा राज्याभिषेक समारंभाचे वेळी सर्व वतनदारांकडून वसूल केलेला एक प्रासंगिक कर होता. (कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र पृ. १०९) (१९) खालील मालावर निर्यातीसाठी कर भरावा लागे : गूळ, मसाले, ऊस, सुंठ, तंबाखू, कापड, ब्लँकेट्स, घोडे, म्हशी, बैल इत्यादी. (२०) परप्रांतातून येणाऱ्या

मालावर कर आकारला जाई. (२१) धनगर पट्टी. (२२) विणकर पट्टी. (२३) हेजीब पट्टी. (२४) खर्च पट्टी. (२५) मोहतर्फा. (२६) तूट पट्टी. (२७) जनावरांच्या खरेदी-विक्रीवर कर आकारला जाई.

आयात-निर्यात कर :

शिवाजी महाराज, संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत इंग्रज व्यापाऱ्यांशी तह होऊन इंग्रजांनी आयात-निर्यात केलेल्या मालावर जकात घेतली जाई.

जकातीसंबंधी तपशीलवार माहिती संभाजी महाराज आणि इंग्रज यांच्यात सन १६८४ साली झालेल्या तहात आढळते.

(१) इंग्रजानी व्यापारासाठी माल आयात व निर्यात करणे तो नेहमीची ठरीव जकात देऊन करावा.

(२) एखादे जहाज वादळाने फुटून जर किनाऱ्यास लागले तर त्यांतील जो माल आयात होईल त्यावर नेहमीप्रमाणे जकात घ्यावी.

(३) जो माल इंग्रज आयात करतील त्यावर २ ½ टक्के जकात देतील. निर्यातीवर जकात नाही.

(४) राजापुराहून बालाघाटाकडे जाणाऱ्या इंग्रजी मालावर आदिलशाहीत जी जकात घेतली जाई तशीच घेतली जावी.

(५) इंग्रज व्यापाऱ्यांकडून सुभेदार किंवा इतर अधिकाऱ्यांनी रीतसर जकात घ्यावी.

(६) इंग्रज मुंबई बेटावर जळणासाठी मराठी राज्यातून लाकूड नेतील त्यावर मागील प्रघाताप्रमाणे जकात घ्यावी.

(७) इंग्रजांनी नागोठणे व पेण येथे वखारी काढल्यावर त्यांना घाटावरून आयात-निर्यात केलेल्या सर्व मालावर राजापूरला जशी जकात घेत असत. तशीच ती घेण्यात येईल.

इंग्रजांच्या मालावर जकात घेण्याची जी चाल शिवाजी महाराजांपासून चालत आली तीच संभाजी, राजाराम, व ताराबाईच्या कारकीर्दीत इ. स. १७०७ पर्यंत चालू राहिली.[१]

१ भा. इ. सं. मं., चै. व्हा. २, पृ. २७-३७.

इंग्रजाशी व्यवहार करताना मराठ्यांनी शिवाजी महाराजानंतर महाराजांची नीती व धोरण १७०७ पर्यंत चालू ठेविले होते.

गुलामावरील कर :

इंग्रज वखारवाले हिंदुस्तानात गुलाम विकत घेऊन त्यांची विक्री करत असत. शिवाजी महाराजांनी प्रत्येक गुलामामागे दोन ते तीन पागोडे कर म्हणून घेण्याची प्रथा पाडली होती. संभाजी महाराजांनी हा गुलामावरील कर २-३ पागोड्यापासून १२ पागोड्यापर्यंत वाढविला त्यामुळे सरकारी उत्पन्नात भर पडून गुलामाच्या व्यापाराला आळा बसला. ही प्रथा मराठी राज्यात १७०७ अखेरपर्यंत चालू राहिली.[१]

जकात :

सतराव्या शतकात मराठी राज्यातील प्रदेशामध्ये बाजारपेठामधून जो व्यापार होई त्या निमित्ताने हरेक प्रकारच्या मालाची जी ने-आण होई त्यावेळी जकात या नावाचा कर घेतला जाई.

जकातीच्या कारभारव्यवस्थेचे मुख्यत: खालील विभाग होते :—

१. पुणे जुन्नर कडे रांजणगाव
२. कल्याण भिवंडी
३. सरकार संगमनेर
४. तापी दक्षिण तीर
५. जकात बंदर रोहे अष्टी
६. जकात रेवदंडा
७. परगणे नाशिक

वरील प्रत्येक विभागाचे खालीलप्रमाणे पोट विभाग किंवा महाल होते. त्या सर्वांची वसुली कमाविसदारामार्फत होत असे.

१ गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. ३७७.

ते महाल खालीलप्रमाणे :—

१. नकाशा कसबे पुणे	१६. महाल पाबल
२. चौकी गणेश खेड	१७. महाल निरोज भाईरे
३. चौकी वडगाव हवेली	१८. महाल अवसरी
४. महाल पारस	१९. कसबे तळेगाव ढमढेरे
५. यात्रा मोरगाव	२०. चौकी बाभूळ कोरेगाव
६. चौकी वडकी	२१. घाट चोंढा
७. चौकीयवत सांडस	२२. चौकी किर्द पिंपळे
८. महाल लोहीगाव	२३. महाल बोरी
९. राजूर	२४. महाल ओतूर
१०. चौकी वडगाव वडे	२५. घाटनाणा
११. महाल निरथडी	२६. आळंदी
१२. इंदोरी तळेगाव	२७. पेठ
१३. चौकी चांदरखेडी	२८. सांडस
१४. महाल चाकण	२९. भोर
१५. महाल खेड	

वरील जकातीचे उत्पन्न कमाविसदार कारकुनास नेमून जमा करीत असे. जकात उत्पन्न जमा झाल्यावर सरकारकडे जो हिस्सा पाठवावयाचा त्याचे नियम व पद्धत ठरलेली असे. ह्या जकात वसुलीवर खर्चाचे ताळेबंद शिवकालाचे तसेच इ. स. १७०७ पर्यंत दप्तरात मिळत नाहीत. जकात वसुलातून दोन प्रकारचे खर्च होत. एक जकात वसुलीसाठी जी कारभार-यंत्रणा होती त्यासंबंधातील खर्च आणि दुसरा खर्च जकातीच्या व्यवहाराशी अर्थाअर्थी काहीच संबंध नसताना काहींच्यासाठी केला जाणारा खर्च.

वरील विभागाच्या प्रदेशांतून व्यापारासाठी जी ने-आण होई त्यावरील जकातीचे वार्षिक उत्पन्न सुमारे एक लाख रुपयापेक्षा अधिक मिळे. त्यापैकी सुमारे $^3/_4$ इतके उत्पन्न सरकारला मिळत असे.[१] छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूपासून (इ. स. १६८०) ते औरंगजेबाच्या इ. स. १७०७ मधील निधनापर्यंत मराठे आपले स्वराज्य टिकविण्यासाठी लढत होते.

१ आपटे, भा. इ. सं. पु. २१, पृ. १५-२१.

सतत चाललेल्या २७ वर्षांच्या जीवनमृत्यूच्या लढ्यात संभाजी, राजाराम व ताराबाई या तिघांनाही शासनाच्या इतर अंगाकडे लक्ष देण्यास फुरसत मिळाली नाही. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांनी शासन कार्यासाठी उभारलेली कार्यपद्धती अबाधितपणे चालू ठेविल्याशिवाय संभाजी, राजाराम व ताराबाई यांना गत्यंतर नव्हते. या तीन राजकीर्दीत शिवाजी महाराजांनी घालून दिलेली शासन यंत्रणा व शासन पद्धती चालू राहिली.

शिवाजी महाराजांनी आपल्या कारकीर्दीत शेतातून येणाऱ्या उत्पन्नाच्या ३३ टक्के एवढा शेतसारा शासनाकडे भरावा असे ठरविले होते. परंतु नंतर त्यांनी शेतकऱ्यांना द्यावे लागणारे विविध कर आणि उपकर रद्द करून सरसकट ४० टक्के शेतसारा ठरवून दिला होता. इ. स. १७०७ पर्यंत ही कर पद्धती चालू राहिली.

नगदी पिकांवरील कर :

पाटाच्या पाण्यावर बागायती जमिनीतून ऊस, हळद, आले ही पिके तसेच कांदे, बटाटे इ. भाजीपाला पिकविला जात असे. ही पिके विकून गुजराण करणारेही लोक होते. नगदी पिकांवर कर ही उत्पन्नाची बाब म्हणून मराठी राज्यात शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीपासून ते १७०७ पर्यंत वसूल केला जात असे.

डिसेंबर, १७०३ च्या कानू जाबत्यापासून (पे.द. ३१, क्र. १०४) असे समजते की, शिवकालीन (१६४७-१७०७) इनामदार, पाटील, कुलकर्णी, सुतार, वाणी, दुकानदार, लोहार, हजाम, परीट, कुंभार, गुरव, तराल, कोळी, तेली, सोनार, मोमीन या सर्वांकडून शासन त्यांच्या उत्पन्नावर कर आकारून तो वसूल करीत असे.

शिवकालात जेव्हा शासन आर्थिक पेचात असे तेव्हा तेव्हा इनामदारांवर इनामपट्टी बसविली जाई. शिवचरित्र साहित्य भा. १, लेखांक ५५ वरून असे समजते की, शिवकालात मिरासदारीच्या उत्पन्नावर मिरासपट्टी बसविली जात असे.

शिवाजी, संभाजी, राजाराम व ताराबाई काळांत जवळजवळ सर्वच व्यावसायिकांवर कर बसवून कर वसूल केला जात असे.

अप्रत्यक्ष कर :

अप्रत्यक्ष कर ही सरकारी उत्पन्नाची खास बाब असे. त्याकाळी मुख्य गावात आठवड्यांतून एकदा बाजार भरे आणि त्यामध्ये कापड, नारळ, लोणी, विड्याची पाने, सुपाऱ्या, फळे, भाज्या, मांस आणि इतर अनेक वस्तूंची खरेदी-विक्री होई. अशा बाजाराच्या व्यवस्थेस जबाबदार असणाऱ्या व्यक्तीस शेटे म्हणत. त्यास त्यांच्या सेवेप्रीत्यर्थ भाडेमुक्त जमीन देण्यात येई.[१] शेटे म्हणजे मुख्य व्यापारी. त्यास दुकानदारांवर लादलेला कर गोळा करण्याची परवानगी होती. (शिवचरित्र साहित्य ३ : ५१,५३,४३९) त्यास बाजारपेठेतील विक्रेत्यांची यादी ठेवावी लागे.

जकात (Octroi) वसूल करण्याच्या कामात "घाट पांड्यास" मदत करावी लागे आणि स्थानिक अधिकाऱ्यांस प्रसंगोपात साहाय्य करावे लागे.[२]

कोकण व देश प्रदेशातून रहदारी खिंडीतून व घाटाद्वारे होत असे. कोकणातील आंबाघाट, फोंडाघाट, आंबोली घाट यामधून लोकांची ये-जा व मालाची ने-आण चाले. प्रख्यात नाना (नाणे) घाट हा पुणे जिल्ह्यातील जुन्नर आणि ठाणे जिल्ह्यातील मुरबाड या शहरांना जोडतो. याप्रसिद्ध घाटांखेरीज लोकांची ये-जा असलेले छोटे-मोठे मार्गही होते.[३] प्रत्येक रस्त्यावर जकात वसूल करण्यासाठी चौक्या असत त्यावरील "घाटपांडे" हा अधिकारी प्रत्येक घाटात वंशपरंपरेने नेमलेला असे. ज्याच्यावर जकात गोळा करावयाचे काम सोपविले असेल त्याच्यावर देखरेख ठेवणे हा त्याच्या कर्तव्याचा भाग होता. पत्कीडांगी, पानसरे, मोडवी, मेटकरी हे आणि इतर "घाट पांड्या" चे सहायक अधिकारी असत. पत्की हा चौकीचा प्रमुख असून, पानसरे मालाचे वजन करून त्यास मदत करी, हे दोघे जकात गोळा करण्याच्या कामात घाटपांड्यास मदत करीत, घाटात व्यापाऱ्यांच्या मालाचे संरक्षण करण्यासाठी शासन पहारेकरी आणि रखवालदार नेमत असे त्यांस शासन वेतन देई.[४] वंशपरंपरेने नोकरी करणाऱ्या अधिकाऱ्यांस सरकारने ठरवून दिलेला वसूल जकातीसह घेण्याचा हक्क असे या अधिकाऱ्यांना दरमहिनाअखेर गोळा

१ शिवचरित्र साहित्य खंड, १०-२२.

२ भा. इ. सं. मं. त्रैमासिक ३५, १, २, पृ. ४.

३ कित्ता, पृ. ११-१२.

४ शिवचरित्र साहित्य, खं. ५ : ७७१.

केलेल्या जकातीचा हिशेब देशपांड्यांना द्यावा लागे आणि योग्य ते देणे वजा करून ती उरलेली जकातीची संपूर्ण रक्कम सरकारला भरावी लागे. जर ही रक्कम सरकारांत भरली गेली नाही तर सरकारकडून ताकीदपत्र येई.[१] मोडवी ह्या पदनामाचा शिपाई घाटपांड्यास जकात गोळा करण्याच्या कामात मदत करी. राज्याचा वंशपरंपरा अधिकारी शेटे महाजन यांच्यातर्फे जकात चुकविणाऱ्या व्यापाऱ्यांकडून जकात वसूल करण्यासाठी बाजारपेठेत एक खास जागा पत्कीस देण्यात येई.[२] अशा रीतीने स्वराज्यांतील रयतेकडून अप्रत्यक्ष कर वसूल केला जात असे.

स्वराज्याचा विविध भागात जीवनोपयोगी वस्तूंची ने-आण होत असे. त्या वस्तूंच्या आयातीवर जकात वसूल करणाऱ्याचा प्रघात स्वराज्यात होता. अशा वस्तूंत अन्नधान्य, मसाल्याचे पदार्थ, केशर, कस्तुरी, गूळ, साखर, कांदे, बटाटे, लसूण, काकवी, हळद, चिंच, काळीमिरी, घोंगड्या, विविधप्रकारचे कापड व सूत, टोप्या, कलिंगडे, नारळ, फणस, सुपारी, काचेच्या वस्तू, छोट्या होड्या, बैलगाडी (खटारा) पालखी इत्यादींचा समावेश होता.[३] शिवकालात राज्यकर्ते स्वराज्यातील रयतेकडून लग्नावर लग्नटका किंवा वराडटक्का कर वसूल करत असत. तसेच पाट लावण्यास (पुनर्विवाह केल्यास) पाट दाम व प्रत्येक घरमालकास घरटक्का इ. कर वसूल केला जाई.[४] शिंगे असणाऱ्या प्राण्यांची खरेदी-विक्री करणाऱ्यास शिंगोटी नावाचा कर द्यावा लागे. तसेच मीठावरही कर होता.[५]

युद्धातील लुटीचे उत्पन्न :

मराठ्यांनी मोंगलाच्या ताब्यातील प्रदेशात घुसून लुटालूट केल्यास तिचा पैका, सरकारात भरावा लागे. भाडेपट्टीने दिलेल्या मुलुखाची दरसाल भाडे पट्टी सरकारात जमा होई तेही सरकारचे उत्पन्न असे. अशी भाडेपट्टी सोंधेचा राजा, गोवळकोंडेकर यांजकडून मराठ्यांस मिळत असे. हासुद्धा एक प्रकारचा करच होता.[६] अशा रीतीने मराठी राज्याचे उत्पन्न सुमारे १ कोटी होन म्हणजे ३ ते ४ कोटी रुपये होते. असे ९१ कलमी बखरीत म्हटले आहे ते योग्य असावे.

---

१ भा. इ. सं. मं. त्रै., ३५ :२.

२ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य ४ : १५-१७.

३ वेंद्रे, महाराष्ट्रतिहासाची साधने खं. २, ले. १५८.

४ पे. द. खं. ३१, ले. १०४.

५ शिवचरित्र साहित्य खं. ९, ले. ६९, पृ. ७३-७५

६ शि. च. सा. खं. ३, ले. ४८३, पृ. ८८-८९

शिवकालीन चलन व्यवस्था :

शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकात महाराष्ट्रांत स्वराज्याची स्थापना केली त्यावेळी त्यांच्या राज्यात व भोवतालील मुस्लिम प्रदेशात वेगवेगळ्या आकाराची व वजनाची " होन " नावाची एकंदर २६ सोन्याची नाणी प्रचलित होती. होन हा कानडी शब्द असून त्याचा अर्थ सुवर्ण असा आहे. त्यावेळी दक्षिणेत स्वराज्य प्रदेशात मोगल, विजापूर गोवळकोंडे, पोर्तुगीज, इंग्रज सत्तांची नाणी प्रचलित होती. मोगलांनी दक्षिण देश काबीज केला तेव्हा त्यांनी जुनी चलन पद्धती चालूच ठेविली. तरीही त्यांनी अकबरी/आलमगिरी मोद आणि चांदीचीही स्वतःची नाणी सुरू केली. मोगल सरकारने बाजार पेठांमध्ये त्यांचे स्वतःचे मूल्य मान्य केले. उत्तर आणि दक्षिण भारतातील चलन पद्धतीमध्ये एक महत्त्वाचा फरक होता. त्यावेळी उत्तर भारतात चांदीचा रुपया मुख्यतः प्रसारात असून सोन्याची मोहर पूरक नाणे होते.[१] परंतु दक्षिण भारतात विशेषतः कृष्णेच्या दक्षिणेस सोन्याची नाणी मोठ्या प्रमाणवर प्रसारात होती व चांदीचे रुपये हे पूरक नाणी मानण्यात येत. शिवाजी महाराजांच्या काळी वेतन होनामध्ये मंजूर केलेले आढळते.

राज्याभिषेक झाल्यावर इंग्रजांनी महाराजांशी व्यापारविषयक तह केला. त्यात शेवटचे कलम मराठी राज्यात इंग्रजांची नाणी चालावीत असे होते. शिवाजी महाराजांनी ह्या कलमास विरोध केला. इंग्रज आमच्या राज्यात त्यांच्या नाण्याचा वापर चलनासाठी-देवघेवीसाठी करू इच्छितात. कोणतेच सार्वभौम राज्य हे मान्य करणार नाही. आमच्या राज्यात आमचेच नाणे असले पाहिजे.[२] अशाप्रकारे स्वतंत्र नाणे हे स्वराज्याचे अंग असले पाहिजे हे महाराजांनी राज्याभिषेकापूर्वीच निश्चित केले होते.

राज्याभिषेकापासून महाराजांनी रायगडी टाकसाळ सुरू केली. त्यावेळी आदिलशाही-निजामशाही रुपये फार मोठ्या प्रमाणात प्रसारात होते असे न्या. रानडे सांगतात.

---

१ न्या. रानडे. मिसेलेनिअस रायटिंग, पृ. ३३२.

२ फ्रायर जॉन : अ न्यू अकाऊंट ऑफ इस्ट इंडिया अँड पर्सिया (सं.), विल्यम कूक, खंड १, पृ. ३४५.

सभासद सांगतो की, महाराजांच्या खजिन्यांत ३२ प्रकारची सुवर्ण नाणी होती.[१] तसेच ६ प्रकारची चांदीची नाणी होती. रायगड येथील टाकसाळीत सोन्याच्या नाण्यांशिवाय चांदीची, तांब्याची नाणी पाडण्यात येत.[२] तांब्याच्या नाण्याच्या एका बाजूवर " श्री शिवराज़ " असे शब्द व दुसऱ्या बाजूस " छत्रपती " असे कोरलेले असे त्यास शिवराई असे म्हणत. हे नाणे सुमारे १५० वर्षे चलनात रूढ होते. त्याचे वजन १०/१२ तोळे इतके होते. ढबूचे (२ पैशाचे) नाणेही पाडण्यात येई, त्याचे वजन २२ मासे असे.

शिवकालीन देवघेवीचे व्यवहार मोगली मुलुखात रुपये, आणे, मोहरा या नाण्यांत होत असत. आदिलशाही व शिवाजी महाराजांच्या राज्यात होन व त्याचे लहान भाग, ससगाणी खुर्दा म्हणजे रूके व त्यांच्या पटी इत्यादी नाण्यात व्यवहार चालत असत. कोकणात लारी हे नाणे विशेष प्रचारात होते. पोर्तुगीज व इंग्रज लोकांचे व्यवहार त्यांनी पाडलेल्या नाण्यात होत असत. सतराव्या शतकात दक्षिण भारतात राजकीय परिस्थिती अस्थिर होती. शिवाजी महाराज जसजसे आदिलशाहाचा मुलूख घेत गेले, दक्षिणेतील गोवळकोंडे सुलतानाच्या ताब्यातील मुलूख स्वराज्यात आणिला, पाळेगाराचा मुलूख मिळविला त्या त्या वेळी राज्याच्या सीमा बदलत राहिल्या. तेव्हा राज्यकारभाराच्या सोईसाठी दक्षिणेत त्यावेळी प्रचलित जी नाणी होती त्याचा वापर शिवराज्यांतही केला जाऊ लागला. पण सर्वच नाणी सारख्या दर्जाची व कसाची मिळणे शक्य नसे. म्हणून नाण्यांची दर्शनी किंमत व ऐन किंमत हा फरक ठरवून त्यावेळचे आर्थिक व्यवहार होत असत. ही नाणी पारखणारे सराफ त्यांचे बाजारभाव ठरवीत असत. शिवपूर्वकाळात सजगनी हे हलक्या किमतीचे नाणे कोकणात प्रचारात होते. शिवकाली कोकणात लारी नाणे प्रचलित होते. लारी नाणे इराणातील लार नावाच्या शहरात पाडले गेले. त्या ठिकाणी पाडल्या जाणाऱ्या एका विशिष्ट आकाराच्या नाण्यास कोकणांत लारी म्हणू लागले. कालांतराने लारी नाणे फारच लोकप्रिय झाले. टाकसाळीच्या नावावरून पाडल्या जाणाऱ्या नाण्यांना दाभोळी लारी, चौली लारी, इत्यादी नावांनी ओळखू लागले. कोकणात चांदीच्या दाभोळी लाऱ्या फार प्रचारात होत्या. हे चांदीचे नाणे असून ते साडीस लावावयाच्या पीनसारखे लांबट होते.

---

१ साने (सं.) सभासद, ९६-९७

२ रानडे, पूर्वोक्त, पृ. ३३२.

शिवाजी महाराजांनी नाण्यांच्या बाबतीत मुसलमानी राज्यांची नक्कल केली नाही. त्यांची नाणी अत्यंत साधी वाटतात. शिवाजी महाराजांच्या नाण्यावर देव-देवतांची चिन्हे किंवा चित्रे आढळत नाहींत. टाकसाळींची खूण किंवा निर्देश नसतो. कालाचाही (तारीख वगैरे) निर्देश नसतो; नाण्याचे (होन, प्रताप वगैरे) नावही त्यावर नसते आणि नाण्याच्या दर्शनी किमतीचाही उल्लेख आढळत नाही. शिवाजी महाराजांनी वर निर्देशिलेले उल्लेख नाण्यावर करण्याचे का टाळले असावे ? शिवराई हे शिव काळातील सर्वांत लहान नाणे होय. बारा शिवराई-अगर सहा ढबूंची एक लारी होई. अशर्फी (अश्रफा) हे अर्ध्या रुपयाच्या किमतीचे नाणे कोकणात प्रचलित होते. विजयनगर साम्राज्याच्या सोन्याच्या नाण्याचे होन हे नाव शिवाजी महाराजांनी स्वीकारले होते. शिवकालीन कागदपत्रात नाण्यासंबंधीची माहिती क्वचित सापडते. सभासद आणि चित्रदुर्ग बखर नाण्यांची माहिती देतात. सभासदाने २१ प्रकारच्या होनाची यादी दिली आहे. शिवकालात खालील होन प्रचारात होते असे सभासद सांगतो. गाहर, मोहरा, पुतळ्या, पातशाही होन, सणगरी होन, अच्युतराई होन, देवराई होन, रामचंद्रराई होन, गुत्ती होन, धारवाडी होन, सतलाम्या, इब्राहीमी, शिवराई, कावेरी, पाला, प्रलरबटी होन, पालाब नाईकी होन, आदवणी होन, जडमाल होन, ताडपत्री होन व फलम.

शिवराई होनाशिवाय बाकीचे होन महाराष्ट्राबाहेरून आलेले. त्यापैकी देवराय, अच्युतराय, रामचंद्रराय हे होन विजयनगर राजे देवराय, अच्युतराय आणि रामचंद्र देवराया यांनी पाडलेले होते. काही होन टाकसाळींच्या जागावरून पाडलेले होते. जसे कावेरी पाक, गुत्ती, धारवाडी, अडवानी, ताडपत्री, गडमळ, हुकेरी, शैलगुत्ती, एलोरी.

विजापूरच्या आदिलशहाने कावेरी पाक, धारवाडी, हुकेरी, अडवानी, वेलोरी होन ही नाणी पाडली होती. गोवळकोंड्याच्या कुतुबशहाने गुत्ती व शैलगुत्ती ही दोन होन नाणी पाडली होती.

पातशाही आणि इब्राहीमी होन विजापूर पातशहाने पाडले होते. मोहर नाणे मोगल बादशहाने सुरू केले. इंग्लिश, डच व पोर्तुगीज व्यापारी स्वतःची नाणी एतद्देशीय सत्ताधाऱ्यांच्या परवानगीने वापरीत असत. डॉ. फ्रेअरचे म्हणणे असे की, हुबळीच्या इंग्लिश फॅक्टरीने टिपकी हा होन काढला, वेंगुर्ला पगोडा डच फॅक्टरीने काढला.

शिवाजी महाराजांनी चांदीची नाणी पाडली नसावीत, शिवकालीन होन व त्याच्या खालोखाल प्रताप, धरण, चवल, दुवळ, ब्याल, व वीस ही नाण्यांची नावे राज व्यवहार कोशातील ३८ ते ४१ श्लोकात आढळतात.[१]

ह्या नाण्यांचे एकमेकांशी असलेले किमतीचे नाते व पटी याचे कोष्टक खालीलप्रमाणे :—

२ प्रताप = १ होन

४ धरण = १ होन

८ चवल = १ होन

१६ दुवल = १ होन

३२ ब्याल = १ होन

६४ वीस = १ होन

होनाच्या खालोखाल शिवकाळात टक्का हेही नाव प्रचलित होते. टक्क्याच्या खालचे तांब्याचे नाणे रूके होय. एक टक्का म्हणजे ४८ रूके असा हिशोब दिसतो. सजगाणी व शिवराई ही एकाच किमतीची पण नावाने भिन्न असलेली नाणी शिवकालात प्रचारात होती आणि त्याची किंमत ६ रूके होत असे.[२]

सांप्रत शिवाजी महाराजांचा एक होन मुंबई येथील प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम मध्ये आहे. (२) एक होन सातारा राजा प्रतापसिंह यांच्या वंशजाकडे (३) एक होन दिल्लीच्या नॅशनल म्युझियममध्ये. (४) इंग्लंडच्या म्युझियममध्येही एक होन आहे. महाराष्ट्रातील वस्तुसंग्रहालयात होनाच्या प्रतिकृती प्रदर्शनात ठेविलेल्या आहेत.

□□

१ शिवचरित्र प्रदीप, पृ. १४७.

२ ल. वि. दीक्षित, शिवकालीन नाणी, भा.इ.सं. त्रै. वर्ष, पु. ४३, पृ. ३४..

५८. शिवपूर्वकालीन व शिवकालीन लोकजीवन

शिवपूर्वकाळ :

मुसलमान सत्ता महाराष्ट्रात स्थापन झाल्यावर सर्व राज्यांतील अधिकाराच्या जागा परदेशी मुसलमानांच्या ताब्यात राहिल्या. तिथपासून हिंदू प्रजा मुसलमानी जुलुमाखाली भरडून गेली होती. ही स्थिती १६व्या शतकाच्या उत्तरार्धात थोडी सुधारली, कारण १६व्या शतकात मुसलमान सलतनीमध्ये काही मराठे सरदार उच्च पदाला चढले होते. इब्राहीम आदिलशाह दुसरा (१५८०-१६२७) हा तर मराठी बोलणारा होता. तो आपणास जगद्‌गुरू म्हणवी. वाङ्‌मयीनदृष्ट्या सोळावे शतक हे जनार्दन स्वामी, एकनाथांचे म्हणावे लागेल. असे असले तरी मुसलमानी अंमलात बाटवाबाटवी, गाईचा वध करणे, ब्राह्मणांची विटंबना करणे, हिंदू देवतांच्या मूर्ती लहर आल्यास फोडून टाकणे. हिंदू बायकांच्या अब्रूवर निर्दयपणे धाड घालणे हे प्रकार सर्रास कुठे ना कोठेतरी चालू असत. त्यावेळच्या शासन पद्धतींत गावचा पाटील व कुलकर्णी यांच्या खेरीज बाकीच्या सर्वसामान्य जनांचा राजसत्तेशी किंवा राजकीय घडामोडीशी फारच थोडा संबंध येत असे. त्यामुळे एक सुलतान जाऊन दुसरा आला किंवा राजा आला किंवा एक राजवट संपून दुसरी राजवट आली, तरी त्यामुळे खालच्या थरातील लोकांच्या दैनंदिन जीवनात फारसा फरक पडत नसे. कित्येक राजवटी आल्या आणि गेल्या परंतु शूद्रातिशूद्रांची आर्थिक पिळवणूक थांबली नाही. मुसलमान प्रजा आणि तदितर प्रजा असा पंक्तीप्रपंच बहुतेक मुसलमान सत्ताधीश करीत होते. हिंदू प्रजेने नेहमी नम्रतेने, लाचारीने राहिले पाहिजे अशी अपेक्षा मुस्लिम राज्यकर्ते बाळगू लागले. त्यामुळे मुसलमानास खूष ठेवण्यासाठी हिंदू पिरांच्या दर्ग्यांत प्रसाद म्हणून उच्छिष्टांच्या मिटक्या मारायला कचरेनासे झाले होते. हिंदू देवतांच्या ऐवजी पिरांचे महात्म्य हिंदू समाज श्रद्धेने आळवू लागला.[१]

---

१ न. र. फाटक, श्री एकनाथ वाङ्‌मय आणि कार्य, पृ. ७.

संत एकनाथ (इ. स. १५३३-१५९९) यांनी तत्कालीन समाजाचे अवलोकन केले आणि समाजसन्मुख अशी साहित्यविषयक भूमिका स्वीकारली. काही ठिकाणी हिंदू अधिकारी होते. गावगाड्याचे देशमुख, देशपांडे, पाटील हेही होते पण मुसलमानी जुलूम त्यांना मुकाट्याने सहन करावा लागत होता हे संत एकनाथांनी आपल्या कवनाद्वारे दाखवून दिले आहे. देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी हे कसे हरामजादे, कामचुकारू होते त्यामुळे लोकजीवनाची कशी पडझड झाली हे संत एकनाथांनी आपल्या अर्जदस्तात दाखवून दिले आहे ते असे :—

"अर्जदस्त अर्जदार बंदगी बंदेनवाज साहेब आलेकम् सलाम। कायापुरीकर जिवाजीपंत सुभेदार। बुधाजीपंत फडणीस। परगणे शरीराबाद। हकीगत। दंभाजी शेटे। कामाजीराव महाजन। मानाजीराव देशमुख। ममतार्ई देशमुखीण। रसनाईक पाटलीण। केसोजीपंत कुलकर्णी। जराजीराव देशपांडे। हे फार हरामजादे आहेत. कचेरीत जोम धरून बसतात, सरकारचे काम सुरू होऊ देत नाहीत। त्या धास्तीने तमाम परगणा ओस पडला। - - - दिवे लावणी मोडली दोन गावे तर पार उजाड झाली." त्या काळातील व्यभिचार, बलात्कार, फितुरी, जाळपोळ, लुटालूट या हिंसक प्रवृत्तीचे बेधडक चित्रण नाथांनी केले आहे. गोरगरीब लोकांना त्याकाळी जगणे कसे कठीण होऊन बसले होते. याचेही हृदयविदारक चित्रण नाथाचा एक "महार" करतो. तत्कालीन ग्रामजीवन कसे उद्ध्वस्त झाले होते व अनैतिकता कशी बोकाळली होती हे नाथांची 'महारीण' सांगते ते असे :-

"गावची पाटलीण ओढाळभारी। दिवसा नागवी रस्तेचारी। गावातील रयत पळाली सारी। वाडगी हाव धरीता भारी। सुढे बरे नाही ।।३।।[२]

अवतीभवतीच्या हिंसक राजकीय स्थितीविरुद्ध प्रक्षोभ व्यक्त करणारे "बया दार उघड "सारखे उद्गार नाथांच्या वाणीतून बाहेर पडतात.[३] हे मुसलमान सलतनीत हिंदूची स्थिती म्हणण्यासारखी वाईट नव्हती असे म्हणणाऱ्यांनी लक्षात घ्यायला हवे.

---

१ डॉ. शीला टेंबे, एकनाथांची भारुडे, (संकलक) भारूड अर्जदस्त (१६०), पृ. ७१-७२.

२ कित्ता, भारूड ४ थे महारीण (४) ओवी ३ री, पृ. ११०.

३ मोगल-मराठे कालीन मराठवाड्यांतील प्रबोधन -लेखक डॉ. यशवंत साधू व सोमनाथ शेंडे- भा. इ. सं. वर्ष २०, पृ. ८०.

लोकस्थिती :

आपणांस जगद्गुरू म्हणवून घेणाऱ्या आदिलशहाने एक हुकूम काढून हिंदूनी सार्वजनिक रीतीने उत्सव करण्यास बंदी घातली. शिवपूर्व काळांत महाराष्ट्रातील जमीनदारवर्ग, मग तो कोणत्याही भागांतील वा जातीचा असो वतनाच्या किंवा मनसबीच्या लालसेने परकीय सत्तेपुढे (मुसलमान सत्तेपुढे) लाळ घोटण्यास नेहमीच तयार असे.

त्याकाळी मराठे सरदारांच्या स्वाभिमानशून्यतेची उदाहरणे फारसी कागदपत्रात सापडतात. ह्या कागदापत्रांतील हकिगती प्रसिद्ध करणारे डॉ. गो. त्र्यं. कुळकर्णी सांगतात[१] की कृष्णाजी भोसले सरदाराची मुलगी नगर जवळील करडे निमोणे या गावी रहमत नावाच्या एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या हाती सापडली. त्याने तिला सन १६३६ च्या माहुलीच्या मोहिमेतील् मोगल सरदार खान जमान यांजकडे पाठविले. मालोजी भोसले याने तिला सोडविण्यासाठी रु. ३००० देण्याचे मान्य केले. तेव्हा कृष्णाजीच्या मुलीस सोडून देण्यात आले. हा प्रसंग शिवकालीन मराठे सरदारांच्या मनोवृत्तीवर विदारक प्रकाश टाकणारा आहे. कृष्णाजी भोसल्यांसारख्या प्रतिष्ठित आणि मोगल बादशहाशी एकनिष्ठ मराठा सरदाराची मुलगी मोगलांनी पळवावी आणि तिला सोडविण्यासाठी शिवाजी महाराजांचे चुलत चुलते मालोजी भोसले यांनी पैसे भरावेत यापरता दैवदुर्विलास कोणता ? आपल्या मराठे सरदारांनी शांतीब्रह्म राहून षंढपणाने स्त्रीची होत असलेली विटंबना सहन केली. अशाच प्रकारचे दुसरे उदाहरण असे की, शहाजी महाराजांचा एक चुलत भाऊ खेळोजी भोसले यांच्या बायकोला मुघल सरदार महाबतखान याने पळवून नेले तिच्या सुटकेसाठी मोठी रक्कम त्याला मुघलांना द्यावी लागली.[२]

मुसलमान सत्ताधीश हिंदूची देवळे पाडून त्या जागेवर कबरी व मशिदी बांधीत. इ. स. १६०३ च्या सुमारास नाशिक भाग अहमदनगरच्या ताब्यात होता तो मोगलांच्या ताब्यात गेला तेव्हा १६०३ च्या सुमारास नाशिकच्या श्रीसुंदर नारायणाचा उच्छेद मोगलांनी केला. देवालय जमीनदोस्त करून त्या ठिकाणी कबरी व मशिदी बांधल्या.[३]

१ गो. त्र्यं. कुळकर्णी, भा.इ.सं. त्रै. व १२, पु. ४८, पृ. ५६-५७.

२ कित्ता.

३ भा.इ. सं. मंडळ, वार्षिक इतिवृत्त, शके १८३५, पृ. ३१६-१७.

देशावर मुसलमान सत्ताधीश तर कोकण भागात पोर्तुगीज हिंदू प्रजेस छळीत होते.

शिवाजी महाराजांचे स्वराज्य संपादण्याचे कार्य चालू असतानाच गोव्यातील पोर्तुगीज व्हाईसरायने बारदेस, गोवा प्रांतात हिंदूविरुद्ध धार्मिक मोहीम चालविली. पोर्तुगीज सत्ताधीश हिंदूना नोकऱ्या देत नसत. त्यांच्या मालकीच्या जमिनीही ते हिरावून घेऊ लागले. हिंदूना हाकलण्याचे धोरण होते. हिंदूना ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याखेरीज राहणे मुश्कील होते. तीन महिन्यांत हिंदूना हद्दपार करण्याचा बेत होता. प्रार्थना मंदिरात सक्तीने जायला लावीत. हिंदूची देवालये पाडण्यात आली. धर्मोपदेश केल्याबद्दल शिक्षा करण्यात आल्या. हिंदूना बाटवून ख्रिस्ती धर्म स्वीकारावयास लावणे, न ऐकल्यास जिवंत जाळणे (इन्क्वीझीशन) असे हिंदू प्रजेवर जुलूम होत होते.[१]

शिवकालातील लोकस्थितीचे चित्र रामदासांच्या दासबोध ग्रंथात यथातथ्य आढळते. रामदासांचे वडील कुलकर्णीपण करीत होते. त्यांना सुलतानाकडून त्रास होत होता. हे त्यांनी सुरुवातीस अनुभवले होते. मुसलमान रियासतींत रामदासांनी बारा वर्षे तीर्थयात्रेत घालविली. इस्लामी राज्यकारभाराच्या अनर्थामुळे जे देवासंबंधी अनुभवले ते असे : देव चोरीस जाणे, दुराचारी लोकांनी देव फोडणे, इस्लामच्या भीतीने देवांना पाण्यात ढकलणे, मुसलमानांनी फोडलेल्या देवळाच्या मूर्ती मशिदीच्या पायात गाडणे, तीर्थे उद्ध्वस्त करणे, चोहोकडे मारामाऱ्या, कलह, हेवेदावे, लुटालूट होत होती. दरोडे, खून, जाळपोळ, पळापळ हे तर नित्याचे होते. निर्वासित होऊन कोणाच्यातरी आश्रयाची मागणी करीत, नकार मिळाल्यास लाचार होऊन हातापाया पडून कोणासही विनवणी करीत, किंवा आश्रय न मिळाल्यास कबरस्थानाचा, पडक्या देवालयाच्या - मंदिराच्या भिंतीचा निवारा शोधीत, झोपडीत आश्रय न मिळाल्यास झाडाखाली विश्रांती घेणे वगैरे प्रकार विशेष करून हिंदू जनतेच्या बाबतीत सर्वत्र आढळून येत. हिंदूना रोजच्या निर्वाहाच्या दृष्टीने दिवस कठीण होते. फकीर, अवलिया, गोसावी, बैरागी व इतर भीक मागणारे पुष्कळच होते. कोणत्यावेळी कशा रूपाने हे लोक चोऱ्या करतील, कसे फसवतील, मुस्लिम अधिकाऱ्यांना गुप्तपणे खोटी

१ सरकार, शिवाजी (५वी आवृत्ती), पृ. ३५४.

साक्ष, खोटी माहिती देऊन कटकटी, उपद्रव देतील हे केव्हाच कळत नसे. कोण काही लोक जमवून कसा घाला घालील, सर्वस्व लुबाडील, प्रसंगी प्राणही घेईल याबद्दल सांगता येत नसे. तत्कालीन हिंदू, ख्रिस्ती, जैन, बौद्ध, लिंगायत या सगळ्यांचे जीवन अस्थिर बनलेले होते. काफरांना लुबाडणे हे प्रत्येक मुसलमानाचे पवित्र कर्तव्य असा खोटा अपप्रचार जनतेत मुस्लिम मौलवी, फकीर करीत व हिंदूना हाकलले जाई किंवा त्यांच्यावर जुलूम जबरदस्ती करून दंड वसुली करण्यात येई.

शिवपूर्वकालीन सामान्य माणसाचे व्यवहार अथवा लोकव्यवहार देश विभागामध्ये कसे काय चालत याबद्दल विस्तृत माहिती तत्कालीन पाश्चात्त्य प्रवासी बर्नियर व टॅव्हर्नियर हे देतात. ते म्हणतात की, राजे, धनिक व्यापारी, जमीनदार, सुलतान उमराव वर्ग यांचे जीवन चैनीचे ख्यालीखुशाली, ऐषारामाचे, नाच, गायन व तरुणी यांच्यात मग्न झालेले. सामान्य वर्ग, मध्यम वर्ग, शेतकरी, कारागीर, श्रमिक व मजूर हे सदैव दारिद्र्याने पीडलेले होते. लढाया, मारामाऱ्या, खून यामुळे निर्वासित झालेले सैरावैरा हिंडत - भटकत असलेले लुटालुटीत सापडलेल्यांचे सर्वस्व गेल्यामुळे भीक मागणाऱ्यांची संख्या वाढीस लागलेली ; त्यातच मुस्लिम, फकीर, अवलिया, बुवाबाजी करणारे महंत साधु-बैरागी यांची भर पडलेली. अशांची अन्न, वस्त्र, निवारा ह्या माणसांच्या तीन आवश्यक गरजापासून वंचना झालेली. त्या तीन गरजा धामधुमीच्या वेळी आणि मुस्लिमांच्या जुलूमशाहीत भागतील ही आशाच सगळ्या गरीब व काही वशिले नसलेल्या धनिकांनी सोडलेली होती. त्या काळात साधे खाद्यपदार्थ कांदा, भाकर, चणे-फुटाणे, नाचणी, वऱ्याची रोटी, भुईमुगाच्या शेंगा नाही मक्याची कणसे खायला मिळणेही गरीबांना मुश्कील व दुरापास्त झालेले होते. अंगावर फारसे वस्त्र नाही, फक्त लंगोटी किंवा पंचावजा कमरेभोवती गुंडाळण्याजोगा कपडा अथवा आखूड धोतर, डोक्याला घालायला असेलच व टिकून राहिले असेल तर तसे मुंडासे-फेटा, पटका, अंगामध्ये बाराबंदी किंवा बंडी असेल नसेल असे प्रकार वस्त्र प्रावरणाचे होते.

शिवपूर्वकाली जुलूम तर इतक्या प्रकारे होत की जनता त्रस्त होऊन दडपून टाकलेली, विरोधी आवाज व प्रतिक्रिया करणारांचा छळ अमानुषरीत्या होई. हाताखालील नोकरांच्या चुकाबद्दल त्यांना चाबकाने, दांडक्याने, छडीने

चोपण्यात येई. मुस्लिम धनिक तरुण रूपवतींना आणून जनानखान्यात डांबीत ; थोडासा विरोध वा राग दाखविल्याबद्दल चाबकाचे फटकारे खावे लागत. गुलामगिरी अशा प्रकारची होती. मुस्लिमात गुलाम स्त्रीपुरुषांची विक्री होई आणि त्यांच्याकडून निरनिराळी कामे करवून घेऊन त्यांना पुरेसे अन्नपाणीदेखील मिळत नसे. कोणाही धडधाकट माणसास वाटेने जात असता श्रीमंताकडील नोकरचाकर एकदम अचानक पकडून वाड्यातील कामे सक्तीने करावयास भाग पाडीत. त्यास वेठबिगार म्हणत; बरे, श्रमाचे मूल्य मोबदला मजुरी म्हणून मिळेल ही बिलकूल आशा नसे; दोन-तीन दिवस अथवा धनिकास वाटेल तितके दिवस त्यास राबवून मग हाकलले जाई ; तेवढ्या काळात त्यास खाण्यास मिळाले तर मिळाले तेही धनिकांच्या मर्जीनुसार. सामान्येकरून गरीब लोक बहुसंख्य आणि तेही धनिक व सत्ताधारी अधिकारी वर्गाच्या छळामुळे गांजून लाचार झालेले. सामान्य लोक दरिद्री, पण जुनाट अंधश्रद्धा लोकभ्रम, जादुटोणा, ज्योतिष, मंत्रतंत्र, दैववाद यावर विसंबून आयुष्य विफल आणि निराशामय परिस्थितीमध्ये व्यतीत करणारे.

शेतकरी लोक शेतीची मेहनत मशागत स्थिरबुद्धीने करीत नसत कारण जीवनाला सुरक्षितताच नसे. मुस्लिम अधिकारी पिकांच्या उत्पन्नाच्या निम्म्यापेक्षा जास्त वसुली करणारे, तसेच जमिनीचा सारा भरला नाही म्हणून केव्हा घरावर जप्ती येऊन घरातील सगळे धान्य दंड म्हणून घेऊन जातील ह्याची आगाऊ सूचना किंवा कल्पनाही येत नसे. तसेच गुंड केव्हा येऊन जमिनीतले उभे पीक कापून नेतील हे सांगता येत नसे. त्यामुळे शेतीवर खपून दुसऱ्याची धन कशास करावी या विचाराने शेतकरी वर्ग उदासीन असे. ज्या शेतकऱ्यांना अधिकाऱ्यांचा व धनिकांचा पाठिंबा मिळे तेच शेतीमध्ये खपत.

कारागीर लोक उद्योगधंदे करण्यामध्ये फारसे लक्ष घालीत नसत ; ज्यांना सैनिक अधिकारी, धनिकाकडील हत्यारबंद लोक यांचे साहाय्य सुरक्षिततेबद्दल तेच कारागिराचे काम करीत अथवा दुकाने उघडून व्यापार उदीम करीत. बक्षीस दिल्याशिवाय कोणताही उद्योग सुरळीत चालत नसे. फकीर बैराग्यांना द्रव्य दिले नाही तर मुस्लिम फकीर दुकानदाराने, व्यापाऱ्याने कुराणाची अल्लाची निंदा, हेटाळणी केली, शिव्या दिल्या, अपमानास्पद भाषा वापरली असे खोटे आरोप व खोट्या साक्षी, साक्षीदार करून त्या व्यापाऱ्यांस, दुकानदारास, कारागीरास काजीपुढे पकडून नेत व तेथे त्यास

दंड होई, फटके मारले जात किंवा तुरुंगात घातले जाई, हे मागे सांगितले आहेच. पण त्या तशा जुलुमांमुळे कारागिरांची कामे स्वतंत्ररीत्या करण्यास कोणीच धजत नसे. धनिकांचे, उमरावांचे राजे, जमीनदार, मनसबदार यांचे आश्रयाने कारागीर वर्ग कसातरी प्राण मुठीत, कंठात धरून सदैव धास्ती बाळगून आयुष्य घालवी. तरीपण सोने, चांदी, जडावाची, लाकूड, हस्तिदंत, संगमरवर यावरील कोरीव कामे कारागीर वर्ग उत्कृष्टतेने करीत असे बर्नियरने म्हटले आहे.[१]

मुस्लिमांच्या शिक्षाही जबर व निदर्यतेच्या, छळणुकीच्या द्योतक होत्या. हात तोडणे, डोळे काढणे, डोळ्यांत तापलेल्या सळ्या खुपसणे, उपाशी ठेवणे, मारहाण - दांडकी चाबकाने करणे, राखेचे तोबरे देणे, तापलेल्या सळ्यांनी डागणे, शरीराचे निरनिराळे अवयव प्रत्येक दिवशी छाटून त्यास वेदना सोसावयास लावणे, तुरुंगात डांबणे, खडी फोडावयास लावणे, वगैरे कित्येक प्रकार असत.

वरील कारणांमुळे व्यक्तिगत स्वार्थासाठी किंवा स्वतःची कातडी बचावण्याकरता कोणतेही निंद्य किंवा अनिंद्य, सुष्टदुष्ट, बरे वाईट प्रसंगोपात्त कृत्ये करण्यास कोणताही माणूस कचरत नसे, तशी मनोभूमिका माणसाची बनलेली. फितुरी, द्वेष, मत्सर, परस्पर हेवेदावे यांनी माणसांना झपाटलेले असे. परस्पर फसवाफसवी, वंचना, कारवाया, डावपेच स्वार्थपद असे प्रत्येकाचे कृतीत असे.

मुस्लिम प्रदेशामध्ये जमिनीचा सारा दुप्पट वसूल केला जाई म्हणजे अर्थात प्रजेची अगदीच नागवण करण्यात येई ; भात-तांदूळ, शिवपूर्वकाली पिकांची पाहणी करून निम्मे उत्पन्न सरकारचे व निम्मे जमीन मालकाचे असा प्रकार होता. विजापूरच्या राज्यात हिंदू प्रजाजनाना जिझीया कर द्यावा लागे. त्याचा आकार दर महिन्याला पुढीलप्रमाणे होता. जो हिंदू व्यापार व कसब न करता एक वर्ष किंवा एक वर्षावर प्रपंच करील त्याच्याकडून एक तोळा पावणे पाच गुंजा रूपे घेतले जाई. जो हिंदू सरासरी द्रव्यवान असे परंतु व्यापार केल्याशिवाय प्रपंच निर्वाह करू शकत नसे व जो काहीतरी व्यापार अगर कसब करून राही त्यापासून आधी सांगितल्याच्या निम्मे रूपे घेतले जाई. ब्राह्मण भटजी मंडळी व जंगम लोक सर्वांशी देवघेवीचा व्यापार करतात म्हणून त्यांच्याकडून जिझिया कर घेतला जात

१ बर्नियर्स, ट्रॅव्हल्स इन इंडिया, पृ. २५४.

असे. ब्राह्मणांची स्थिती छत्रपती शिवाजी महाराजांचा जो समकालीन विजापूरचा बादशाहा महंम्मद होता त्याच्या कारकीर्दीत अशी होती की, ते फक्त एकच वेळ जेवण करून राहत असत.[१]

शिवकाल :

श्री शिवाजी महाराज सन १६४० साली बंगलोरास आपल्या मातोश्री जिजाबाई यासह गेले. तिथे शहाजीराजांनी शिवाजी महाराजांस दोन वर्षे राष्ट्रोद्योगास लागणारे सर्व शिक्षण दिले. त्यानंतर दोन वर्षांनी त्यांना बंगळूरहून पुण्यास पाठविले. त्यावेळी त्यांच्याबरोबर, राज्यकारभारास लागणारे पेशवे, मुजुमदार, डबीर, सबनीस इत्यादी अधिकारी दिले. यावेळी शिवाजी महाराजांकडे "प्रतिपच्चंद्ररेखेव" हा शिक्का होता. बंगळूरला आईवडील व मुलगा असे तिघेही दोन वर्षे राहिले. त्यावेळी ह्या तिघांनी स्वराज्य निर्मितीबाबत खल केला असावा. शेवटी असे ठरले असावे की, शिवाजी राजांनी मातोश्रींच्या साहाय्याने व मार्गदर्शनाखाली स्वराज्य स्थापण्याचा उद्योग सुरू करावा व स्वराज्य स्थापन करावे. त्याप्रमाणे बंगलोरहून शिवाजी महाराज पुण्यास आले. ते आपल्याबरोबर वर निर्देशिलेला शिक्का व स्वराजाचा ध्वज घेऊन पुण्यास आल्यानंतर मावळ फिरले. त्यात त्यांना मावळांतील लोकांची हीनदीन स्थिती, मुसलमानी अत्याचार, धर्माचा प्रतिदिन होणारा ऱ्हास, स्त्रियांचे अपहरण या गोष्टी दिसल्या. हे पाहून मुसलमानी सत्तेविरुद्ध त्यांचे मन विटून गेले. म्हणून महाराजांनी मावळापासून स्वराज्य स्थापनेस सुरुवात केली. बंगळूरहून आल्यानंतर महाराजांनी एक तप गावोगांव हिंडून मावळातील देशमुख शेतकरी आणि कष्टकरी प्रजा यांना आपलेसे केले. ह्या चळवळीपासून आपला फायदा आहे हे मावळवासीयांस महाराजांनी पटविले आणि स्वराज्य स्थापनेसाठी जिवास जीव देणारे मावळे शिवाजी महाराजांबरोबर मुसलमान सत्तेशी लढू लागले. "हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे" हा मंत्र मावळ्यांच्या मनावर ठसवून त्यांच्या साहाय्याने स्वराज्य विस्तार केला. कोकण व देश स्वराज्यांत आणिले आणि हिंदुत्वाच्या रक्षणासाठी सिंहासन, छत्रचामरे, बिरूदावली, अष्टप्रधान, स्वतंत्र शक, अठरा कारखाने,

१ आपटे द. वि., शिवकालीन आदिलशाही, भा. इ. सं. मं. त्रै. वर्ष २ अं. १ ते ४, पृ. २३. श्री. आपटे यांनी ही माहिती श्री. मोडक यांच्या विजापूरचा इतिहास ह्या ग्रंथाधारे दिलेली आहे. प. शं. जोशी भ. इ सं. पु. ४१, पृ. ९२-१०५.

स्वतंत्र नाणे, ध्वज, राजव्यवहारकोश या विविध गोष्टी निर्माण केल्या. त्याकाळी शेती हा प्रधान उद्योग होता. महाराजांनी शेतकऱ्यास खूश राखण्यासाठी स्वराज्यातील जमिनीची मोजणी करून तिचा सारा एकदा कायमचा ठरवून दिला व तो गोळा करण्याकरिता सरकारी अंमलदार नेमिले. शिवाजी महाराज प्रजापालन दक्ष होते. ते स्वराज्यातील लोकस्थिती पाहण्याकरिता स्वतः सर्वत्र हिंडत असत. कर्नाटकात जाण्यापूर्वी त्यांनी असाच मोठा दौरा काढला होता. त्यावेळी महाराजांनी किल्ल्यांची पाहणी करून त्यांवर सामग्रीचा जय्यत पुरवठा केला. सर्व लोकांना भेटून त्यास न्याय मिळेल अशी व्यवस्था केली ; सर्वत्र शांतता, सुव्यवस्था व आबादानी राहावी इकडे महाराजांनी लक्ष पुरविले. शिवाजी महाराजांनी जे स्वतंत्र राज्य स्थापिले त्यात परशत्रूपासून आपल्या प्रजेस संरक्षण दिले. तसेच सामाजिक अन्याय, आर्थिक, धार्मिक पुष्कळसे कमी होतील हे पाहिले. चोऱ्या, दरवडे, फसवणुकीचे प्रकार होता कामा नयेत असे अधिकाऱ्यांकरवी लोकांना जाहीर केले. महाराजांचे हुकूम हेच कायदे असत. ते कोणी मोडू नयेत यावर त्याची सक्त नजर असे. स्वराज्यात मारामाऱ्या, चोऱ्या, दरोडे कोणी घातले तर महाराज त्यास देहान्त शासन करीत. स्वराज्यातून प्रवास करणाऱ्यास प्रजेकडून कसलाही उपसर्ग पोचू नये अशी त्यांची आज्ञा असे. महाराजांवर जसे प्रजेचे प्रेम होते तसे त्यांची भीतीही प्रजेला वाटत असे. कास्मा दि गार्डा लिहितो :—

"स्वतंत्र सत्ता स्थापून हिंदूजनतेचा धर्मछळ, आर्थिक पिळवणूक थांबविली. लुटीच्या वेळी स्त्रियांचा छळ शिवाजीचे सैनिक करीत नसत असे काफीखान म्हणतो. शिवाजी महाराजांनी स्वतंत्र हिंदवी राज्य स्थापिले त्यांतील प्रजाजनास आपआपल्या देवतांची पूजाअर्चा करण्यास स्वातंत्र्य दिले. देवतांची मिरवणूक काढण्यास स्वातंत्र्य दिले. तीर्थयात्रा करण्यास स्वातंत्र्य दिले. बहुसंख्य हिंदू प्रजाजनांचा धर्मछळ, आर्थिक पिळवणूक होणार नाही प्रजा सुखी राहील हे पाहिले. त्यामुळे जुलमी राजवटीला आळा घातला गेला. शिवाजी महाराजांनी लोकसंग्रह पुष्कळ केला. जिवास जीव देणारे वीरपुरुष मिळविले. महाराजांना एकाच विचाराने व ध्येयाने भारून टाकले होते. तो विचार म्हणजे हिंदूधर्म प्रेम आणि स्वराज्य प्राप्ती. ह्याच विचारांचा जप महाराजांनी आपल्या पिढीस करण्याचा मंत्र दिला. लोकात निर्भयपणा आणून त्याना चढाईचे धोरण शिकविले. अशा रीतीने शिवाजी महाराजांनी मराठ्यांचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण केले.

१ लोकराज्य, १६ एप्रिल १९८५, पृ.४७.

सहिष्णुता आणि लोकरंजन याचे दिग्दर्शन शिवाजी महाराजांनी केले असे काफीखान म्हणतो. शिवसैनिकांनी कोठेही लुटालूट केली तरी स्त्रियांना उपद्रव देता कामा नये ह्या महाराजांच्या हुकूमाचे त्यांनी पालन केले. तसेच सैनिकांस कुराणाची प्रत सांपडल्यास ते त्यास वंदन करीत. महाराजांनी ख्रिस्ती स्त्रिया, बायबल याबद्दल आदरभाव व्यक्त करण्याची शिकवण आपल्या प्रजेस दिली. शिवाजी महाराजांनी आपल्या कामगिरीने प्रजेमध्ये स्वातंत्र्य प्रेरणा व देशाभिमान निर्माण केला. महाराजांनी आपली सैन्य भरती केवळ मराठ्यांमधून केली असे नसून, मेंढपाळ, गुजराथी, धनगर, शेतकरी, कातकरी, रामोशी, मोलमजुरी करणारे ह्यातून केली. त्याच्यामध्ये लढण्याची ईर्षा उत्पन्न केली ; शस्त्रे वापरण्याचे शिक्षण दिले आणि देश परकीय मुसलमानांच्या हाती जाऊ नये यासाठी शत्रूबरोबर झगडण्याचे शिक्षण दिले.

शिवाजी महाराजांनंतर छत्रपती संभाजीची कारकीर्द सुरू झाली. त्यांनी प्रजेस आश्वासन दिले की, थोरले महाराजांनी जसे प्रजाहित साधले तीच चाल आपल्या कारकीर्दीत चालू राहील. स्वराज्याला चारी बाजूने शत्रूने वेढले होते. अंतर्गत कलह चालूच होते. अशा परिस्थितीतून जात असता संभाजी महाराजांनी प्रजेकडे दुर्लक्ष केलेले दिसत नाही. शत्रूने मुलूख लुटला तर तेथील रयतेला सवलती देण्यात येत असत. कोणी काही कारणाने परागंदा झाले तर त्यांना प्रोत्साहन देऊन पुनर्वसन करण्यासाठी सूट दिली जाई. ओसाड पडलेल्या जमिनीत लोकांनी पुन्हा शेती करावी म्हणून जास्तीत जास्त सवलती देण्यात येत असत. संभाजी महाराज आणि त्यांच्या अधिकाऱ्यांकडून अभयपत्रे कौलनामा दिला जात असे. काही लोक वसुलीबाकी थकली म्हणजे गाव सोडून जात. अशा प्रसंगी त्यांनी आपआपल्या गावी येऊन राहावे म्हणून अधिकारी त्यांना पत्रे देऊन अभय देत. कोणत्याही कारणाने शेतीचे नुकसान होता कामा नये याची दक्षता घेतली जाई. लोकांना हरप्रकारे दिलासा देऊन राज्यांत स्थिरस्थावर राहून कारभार नीट चालू व्हावा म्हणून काळजी घेण्यात येई.[१]

१ कमल गोखले, शिवपुत्र संभाजी, पृ. ३८३.

राजारामकाल :

संभाजी महाराजांचा वध इ. स. १६८९ त झाल्यावर औरंगजेबाने मराठी मुलूख व किल्ले ताब्यात घेण्याचा सपाटा चालविला. यावेळी मोगल-मराठा संघर्ष चालू झाला. मोगलांना उत्तरेतून लष्कर भरती होऊन येत होती पण मराठ्यांना स्थानिक लोकांच्या जमावाने सहकार्य केले. राजाराम महाराज कर्नाटकी गेल्यावर इकडे जमाव लष्कर चाळीस हजार व एक लाख पंचवीस हजार जहाला आहे.[१] अशारीतीने मराठेही मोगलांशी युद्ध करण्यासाठी मोठ्या फौजा उभारीत होते.

ह्यावेळी मोगल-मराठे युद्ध हे स्वातंत्र्ययुद्ध होते. शिवाजी महाराजांनी जनतेला स्वराज्याचा मंत्र दिला त्याची जतणूक करण्यासाठी महाराष्ट्रातील आम जनतेने शत्रूशी लढा चालू ठेविला. तत्कालीन कवी विठ्ठलदास म्हणतो की, गावच्या पाटलापासून ते मुलांच्या पर्यंत सर्वांनी हे युद्ध आपले मानले आणि मिळेल त्या साधनांनी शत्रूस तोंड दिले. त्यावेळच्या मराठी पिढीने गनिमी काव्याने मोगलांशी लढा दिला. मोगलांनी जिंकलेला मुलूख ते बळजबरीने आपल्या ताब्यात घेत असत. मराठ्यांच्या तुफानी हालचाली पुढे मोगल सैन्याची दमछाक होऊ लागली. ते मराठ्यांच्या सैन्यास भुताटकी असे संबोधू लागले.

मोगल सैन्याच्या हालचालीमुळे प्रदेश उजाड पडला. त्यांच्या उर्मट वागणुकीमुळे स्थानिक जनतेस त्रास होऊ लागला. म्हणून मराठा सरदार जिंजीस राजाराम महाराजांकडे गेले. त्यांची भेट घेतली व महाराजांकडून मोगलांशी लढून हिंदवी स्वराज्यातील प्रदेश मुक्त करून घेण्यासाठी त्यांना स्वातंत्र्य असावे व जमावाच्या खर्चासाठी गावकीची वगैरे पूर्वीच्या इनामती लोकांस परत मिळाव्यात अशी मागणी केली. राजाराम महाराजांनी त्यांच्या मागण्या सनदा देऊन पुऱ्या केल्या. इतकेच नव्हे तर त्यांनी मोगली हद्दीतील केलेली लुटमारही राजाचे बक्षीस म्हणून घ्यावी असे सांगून त्यांना स्वराज्याचा प्रदेश सोडविण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे मराठा सरदारांना फारच हुरूप चढून त्यांनी स्वदेशास परतून आपल्या कार्यास स्वतंत्रपणे सुरुवात केली. मोगली सैन्यावर छापे घालून ते डोंगरात पळून जाऊ लागले. स्थानिक लोकांची त्यांच्या कार्यास सहानुभूती असल्यामुळे त्यांना अन्न पाण्याची मदत त्यांचेकडून होत असे. मोगली सैन्याकरिता जाणारा दाणागोटा लुटायचा व त्यातील निम्मे अधिक भाग गावकऱ्यांच्या स्वाधीन करायचा. त्यामुळे मोगलांशी छुपे युद्ध करणाऱ्या मराठे सरदारांस स्थानिक

---

१ राजवाडे खं. १५, पृ. ३७७.

लोकांकडून प्रोत्साहन मिळू लागले. त्यामुळे हिंदवी स्वराज्याचा मुलूख मुक्त करणारांना जास्त जोर चढत असे. अशा रीतीने मराठ्यांच्या डोंगरदरींच्या प्रदेशात त्यांच्या युद्धविषयक धावत्या हालचालींना तोंड देण्यात मोगली सैन्य अयशस्वीच होत राहिले. हे पाहून औरंगजेब बादशहा हताश झाला आणि तो अहमदनगरास विश्रांतीकरता आला. तिथेच त्यास मृत्यूने गाठले. (इ. स. १७०७)

राजाराम महाराजांचा मृत्यू इ. स. १७०० मध्ये झाला. त्यानंतर पत्नी महाराणी ताराबाई ह्यांनी अल्पवयीन मुलाच्या नावे राज्यकारभार चालविला. त्यांनासुद्धा स्वराज्याकरिता "जीवनमरणाचा लढा औरंगजेबाशी" द्यावा लागला. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या वेळेपासून चालत आलेल्या शासन यंत्रणेत त्या बदल करू शकल्या नाहीत.

त्यांनी स्वराज्यातील शेती हा जो मुख्य व्यवसाय त्यावर भर दिला. शेतकऱ्यांच्या गरजा भागविल्या. शेतांतून येणाऱ्या उत्पन्नाचा ३३ टक्के एवढा शेतसारा सरकारला मिळावयाचा असे ठरले होते. पण शेतकऱ्यांना द्यावे लागणारे विविध कर लक्षात घेऊन सरसकट ४० टक्के शेतसारा ठरवून दिला. शिवाजी महाराजांनी नगदी पिकांवरील, प्रत्यक्षकर, इनामपट्टी, मिरासपट्टी, व्यवसाय कर बसविले होते. ते महाराणी ताराबाई यांनी इ. स. १७०० ते १७०७ या काळात चालू ठेवले होते. तसेच मराठ्यांच्या फौजेने मोगलांच्या ताब्यातील प्रदेशांवर स्वाऱ्या करून जी लूट मिळविली तिचा भरणा सरकारात करावयास सांगितले. त्यामुळे शासनाच्या उत्पन्नात भर पडली.

इ. स. १६८९ ते १७०० पर्यंत महाराष्ट्रातील जनजीवन ओढाळ स्त्रीचे होते. ताराबाईंकालीन मराठ्यांची सर्व बाजूने सरशी झाली. मराठी सैन्याने, बागलाण, औरंगाबाद, वऱ्हाड, माळवा, गुजराथ, खानदेश या प्रदेशात घुसून लुटालूट करून पैसा मिळविला. मोगलांची भीती नाहीशी झाली. जनजीवनांत आबादी आली.

□□

५९. कुटुंब, विवाह आणि स्त्रियांचे सामाजिक स्थान

या काळाचे जात हे महत्त्वाचे अंग होते. त्या काळात एखाद्या व्यक्तीच्या वर असलेला जाती संस्थेचा पगडा हा कुटुंबसंस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. अशा प्रकारे कुटुंब हे संघटित समाजाचे प्रमुख माध्यम होते.

महाराष्ट्रात पितृसत्ताक कुटुंबपद्धती ही पूर्णत्वास पोहोचलेल्या अवस्थेत अस्तित्वात होती. घरातील मोठा पुरुष हा कुटुंबातील सर्वांचा वादातीत प्रमुख असून त्यास सर्व मान देत व त्याचेपुढे नम्र होत असत.

त्या काळातील कुटुंबपद्धती एकत्र कुटुंबपद्धती होती आणि ती म्हणजे प्राचीन काळापासून हिंदू समाजात चालत आलेली पद्धत होती असे म्हणता येईल.

भारतीय समाजात कुटुंब हे नवरा, बायको व मुले यापुरतेच मर्यादित नव्हते. त्या काळचे कुटुंब म्हणजे पितृकुलांतले नातेसंबंधातील प्रथा ज्याला पितृकुलोत्पन्नत्वाचीच मान्यता होती. एकत्र कुटुंबात घटक दोन किंवा तीन पिढ्या एकत्र राहत आणि त्यांचा प्रमुख हा पिता असे. काही बाबतीत सर्व भाऊ एकत्र राहत, सावत्र भावासहितदेखील. आणि त्यांचा प्रमुख हा मोठा भाऊ असे. काही कुटुंबात, विधवा आज्या, बहिणी आणि त्यांची अपत्ये, दूरच्या नात्यांतील अनाथ आणि तसेच इतरही काही यांचा समावेश करण्याची पद्धत होती. भारतीय समाजाला ह्याची जाणीव होती की, कुटुंब हे पुढील पिढीच्या निर्माणाची इच्छापूर्ती आणि शिशूची काळजी घेऊन त्यांना वाढविणे यांसारख्या मूलभूत सामाजिक गरजांकरता आवश्यक आहे. भारतीय कुटुंब आई-वडिलांच्या अतीव काळजीसाठी उल्लेखनीय आहे. आणि भारतीय आई-वडिलांचे मुलांवरील प्रेम हे अगदी स्फटिकासारखे असते. प्रामुख्याने मुलग्यांची इच्छा असते, कारण कुटुंबाचे सातत्य आणि

परंपरा त्यांच्यापुढे राखल्या जातात. शिवाय हिंदूत मृतांची सर्व कार्ये मुलाने करावयाची असत आणि आजही आहेत आणि ती पवित्र कर्तव्य समजली जातात.[१] मुलगा झाला नाहीतर दत्तक घेण्याला मान्यता होती. आणि तसे हिंदू कुटुंबात केलेही जात असे. हिंदू व मुस्लिम दोनही कुटुंबात मुलाचा जन्म हा उत्सव मानला जाई तर मुलीचा जन्म ही वाईट व दुर्घटना समजली जाई.

कुटुंब प्रमुख हा सम्राट समजला जाई व त्याला कुटुंब व्यवस्थेत सर्वश्रेष्ठ स्थान असे. कुटुंबातील सर्व त्याला मान देत व त्याच्या आज्ञेत असत. त्याचप्रमाणे आर्थिक व्यवहारही पूर्णपणे त्याचे अखत्यारित असत. धार्मिक विधी, कामे, समारंभ आणि घरातील स्त्रियांना त्यांच्या माहेरी किंवा सासरी जाणे यासारख्या व्यक्तिगत बाबतीतही कुटुंब प्रमुखाची संमती मिळवावी लागे.

कुटुंबाच्या कल्याणासाठी कुटुंब प्रमुख परंपरांचे काटेकोरपणे पालन करीत असे. उदा. कुटुंबाच्या देवतांचे पूजनअर्चन, श्राद्धकर्म, पूर्वजांचे वर्षश्राद्ध धार्मिक कृत्ये आणि समारंभ. तसेच कुटुंबातील माणसांची लग्ने आणि उच्चजातींतील कुटुंब असेल तर मुलांचे उपनयन संस्कार ह्या गोष्टीही त्याला पाहाव्या लागत.

कुटुंब प्रमुखाला प्रथम जन्माला आल्याबद्दल अधिकार असे. कुटुंबातील वाटपाचे वेळी मोठ्या मुलाला जादा हिस्सा दिला जाई. मात्र हा अधिकार ब्राह्मण जातीत नव्हता.[२] वतनदार व जमीनदार यांस खास कौटुंबिक परंपरा होत्या. वतन असलेल्यांना काही खास अधिकार होते. त्यांतील काही उत्सवाचे प्रसंगी प्राधान्य, शिक्का वापरणे, सरकारकडून बक्षीस घेणे इ. ज्यांना वडीलकीचे अधिकार म्हणत ते ज्येष्ठतेवरच अवलंबून असत आणि मोठाभाई किंवा ज्येष्ठ मनुष्यच त्यांना पात्र असे.[३]

---

१ फॉर्बस्, ओरियंटल मेमोआयर्स भा. २, पृ. ११०.

२ ऐतिहासिक संकीर्ण साहित्य भा. ५ (भा. इ. सं. म. काळगावकर आणि खटावकर यांचे गृह कलह), पृ. ५३.

३ राजवाडे, म. इ. सा. भा. २४, ले. १०९, पृ. ७२.

कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे उत्पन्न जरी वेगवेगळे असले तरी वाटणीचे वेळी किंवा सैन्यांतील सेवेबद्दल मिळालेली मिळकत ही एकत्र कुटुंबाची समजली जात असे. त्याचप्रमाणे कुटुंबाच्या देण्यालाही कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती जबाबदार असे.[१] एकत्र कुटुंबातून विभाजन झाल्यावर कोणाही व्यक्तीला दुसऱ्याने व्यक्तिगत प्राधान्यावर मिळविलेल्या संपत्तीवर हिस्सा सांगता येत नसे.[२] कुटुंबाच्या कल्याणासाठी कुटुंबातील दुसऱ्या व्यक्तींच्या संमतीशिवाय कुटुंब प्रमुखाला मिळकतीची विल्हेवाट लावता येत असे.[३] फार मोठ्या दुष्काळांतील टंचाईत पाटलांनी पाटीलकीचे वतन विकावे लागल्याची उदाहरणे आहेत. त्यावेळी आपल्या कुटुंबातील कोणीही या वतनावर हक्क सांगणार नाही असे कबूल केलेले असे.

स्त्रियांकडून आलेल्या मिळकतीच्या समाज विरुद्ध होता. मूळ वतन आपल्या कुटुंबात राहण्यासाठी जावयाला देण्याचे किंवा दत्तक मुलाला देण्याचे असल्यास न्यायालयाला ते मान्य नव्हते.[४]

कुटुंबाचे कार्य :

स्थूलमानाने पाहता एक कुटुंब चार सामाजिक कामे करीत असे. शरीरसंबंध, पुनरुत्पादन, आर्थिक आणि शैक्षणिक. यापैकी पहिली दोन ही मनुष्याची शारीरिक आणि सामाजिक गरज भागविणारी होती आणि म्हणून कुटुंब हे पायाभूत एकक मानलेले होते. प्रत्येक ठिकाणी कुटुंब ही कार्ये करीत असते. आणि सामाजिक नियम आणि परंपरा याप्रमाणे प्रत्येक समाजात कुटुंबाचे काम बदलत असते. संदर्भीय कालात मुलाला सामाजिक रीतीरिवाज, सामाजिक वर्ग, वांशिक क्रियाविधी यांच्या शिक्षणात कुटुंबाने उत्तम शाळा म्हणून काम बजावले आहे. अशाप्रकारे मूल कुटुंबात संस्कृती आणि समाज याबद्दल मूलभूत गोष्टी शिकत असे. कुटुंब प्रत्येक व्यक्तीला चांगली वर्तणूक चालचालवणूक यांचे शिक्षण देत असे. मोठ्यांच्या बाबतीत आदर, नम्रता, आणि लहानांच्या बाबतीत हळुवारपणा

१ आठले, आठले घराण्याचा इतिहास, ले. ६४, ६८.

२ कित्ता. पृ. २२७-२२८.

३ गुणे, सोशल डेव्हलपमेंट इन महाराष्ट्र, पी. के. गोडे कमामोरेशन व्हा, पृ. १४७.

४ गुणे, ज्युडिशियल सिस्टीम ऑफ द मराठाझ, पृ. ७२.

व प्रेम या गोष्टी तेथे शिकवल्या जात. मुलगा वडिलांच्या आज्ञेशिवाय त्यांच्या उपस्थितीत बसत नसे. लहान मुलांनी मोठ्यांच्या समोर धूम्रपान करणे अपमानास्पद समजले जाई.

मृतांचे अंत्यविधी हे कुटुंबातील महत्त्वाचे कर्तव्य होते. परलोकात गेलेल्यांच्यासाठी आवश्यक समजले जाणारे विधी, क्रिया या अत्यंत कोटेकोरपणे केल्या जात.[१] एकत्र कुटुंबपद्धती शेकडो वर्षे चालू राहिली याची कारणे आर्थिक बाबी संदर्भात शोधावी लागतील. शेती हा अर्थव्यवस्थेचा पाया होता. संधीची अनुपलब्धी आणि अस्थलांतरिता यामुळे मनुष्य कुटुंबाच्या व्यवसायावर अवलंबून असे. म्हणून त्याच्या स्वत:च्या हितासाठी त्याला कुटुंबाशी धरून राहावे लागे की जेणेकरून त्याला चांगले नाव मिळेल आणि आपल्या धंद्यातील कौशल्य मिळविता येईल. कारण कुटुंबाशिवाय धंदेशिक्षण देणाऱ्या औपचारिक संस्था नव्हत्या.

विवाह :

भारतीय समाजात लग्न ही सार्वत्रिक सामाजिक रीत होती. विवाह कुटुंबाकडून ठरविले जात. जोडप्याच्या निवडीत त्यांच्या क्षमतेचा विचार फारच थोड्या प्रमाणात केला जात असे. सामाजिक आदर्शात लग्न हे स्त्रीच्या जीवनाचा आवश्यक भाग मानला जाई आणि म्हणून आईवडिलांना मुलींचे विवाह योग्य वयात करावे लागत. जोडप्यांच्या निवडीत महत्त्वाचा घटक म्हणजे त्यांच्या कुंडल्या, कौटुंबिक पार्श्वभूमी, जात, गोत्र, प्रवर यांची योग्यता. जातीयतेमुळे उपजातीतील विवाहदेखील निषिद्ध मानले जात. जातीबाह्य वर्तन जातिबहिष्कृत करणे किंवा आपल्या जातीकडून सरकारकडून शिक्षेस पात्र होत असे. उदाहरणार्थ, आपल्याला एके ठिकाणी असे आढळते की नवऱ्यामुलाच्या कुटुंबात सप्रवर विवाह झाल्यामुळे मुलीच्या वडिलांनी लग्नास नकार दिला.[२] दुसऱ्या ठिकाणी मुलीचा विवाह सगोत्राशी केला या गुन्ह्याबद्दल एका इसमावर खटला भरण्यात आला.[३] ज्या कालखंडाचा अभ्यास चालू आहे त्यात विवाह हे मुलामुलींच्या आईवडिलांनी अगर पालकांनी ठरविलेले असत.

---

१ फोर्बस् भा. १, पृ. ५५-५७, भा. २, पृ. १८८.

२ राजवाडे म. इ. सा. व्हा. २ ले. ६७, भा. ६, ले. ९९.

३ कित्ता, ले. १७३.

लग्नसमारंभ :

जेव्हा उच्च जातीय हिंदू कुटुंबात विवाह निश्‍चित केला जाई तेव्हा दोन्ही बाजूंचे पुरोहित शुभदिवस आणि तास (घटिका) एकमेकांच्या विचाराने नक्की करीत. आज ज्या प्रकारचे लग्नविधी केले जातात तेच विधी तेव्हाही केले जात होते. वाङ्‌निश्‍चय म्हणजेच साखरपुडा (बेट्रोथल), सीमान्तपूजन, मधुपर्क, अंतरपाट, सूत्रवेष्टन, लाजाहोम, सप्तपदी, आणि अयरणीप्रदान धर्मशास्त्राच्या बंधनाप्रमाणे खालीलप्रमाणे विधी केले जात असत.

अक्षद :

लग्नाचा दिवस नक्की केल्यावर गृहदेवतेपासून सुरुवात करून पत्राद्वारे सर्वत्र निमंत्रणे धाडण्यात येत. नवरामुलगा व नवरीमुलगी यांचे नातेवाईक मिरवणुकीने गणपती व देवीच्या देवळांत जाऊन त्यांना नारळ, पानसुपारी, हळदकुंकू अर्पण करून एका शुभदिवशी आमंत्रणे जाण्याची परंपरा होती.[१] बरोबर असलेल्या पुरोहिताचे देवतेला जागृत करून विवाहाला येऊन त्यावेळी येणारी विघ्ने टाळण्याचे आवाहन करणे हे कर्तव्य होते. हे झाल्यावर एक विवाहित जोडपे नातेवाईक व मित्रमंडळी यांना आमंत्रण करण्यास जात असे.[२]

सीमान्तपूजन :

विवाहाच्या पूर्वीच्या संध्याकाळी सीमान्तपूजन किंवा सीमेची पूजा केली जात असे. मुलीचे आईवडील त्यांच्या नातेवाईकांसमवेत मुलाचे घरी भेटी घेऊन जात. तेथे त्यांना गणपती (सुपारीत प्रतिकृत), वरूण (पाण्याच्या भांड्यात प्रतिकृत), दीप आणि भूमी यांची पूजा करावी लागे. नंतर नवऱ्या मुलाचे पाय धुवून त्याला पोशाख दिला जात असे. नंतर मुलीची आई नवऱ्यामुलाचे पाय धूत असे. त्यांच्या व आपल्या स्त्रीनातेवाईकांच्या ओट्या भरीत असे. (ओटीत तांदूळ, नारळ भरीत) जमलेल्या पाहुण्यांना विडासुपारी व ब्राह्मणाला दक्षिणा दिली जाई.[३]

---

१ देशमुख, शारदा, शिवकालीन आणि पेशवेकालीन स्त्री जीवन, पृ. ६०.

२ महाराष्ट्र गॅझेटिअर, ठाणे जिल्हा, पृ. ३१४.

३ चापेकर, बदलापूर, पृ. २००.

वाङ्निश्चय :

वाङ्निश्चय किंवा तोंडी वचन देण्याचा समारंभ रात्रीच्या वेळी होत असे. नवऱ्यामुलाचे आईवडील आणि नातेवाईक नवऱ्यामुलीच्या घरी पोशाख व दागिने घेऊन जात. वधू-वरांचे आईवडील एकमेकांना नारळ देऊन भेटत. वराच्या वडिलांनी वधूला दागिने व कापड देण्याचा हा समारंभ असे. पानसुपारी वाटल्यावर ते परतत.[१]

हळदीसमारंभ :

लग्नाच्या दिवशी सकाळी वधूच्या अंगाला तिच्याकडील व वराकडील सुवासिनी हळद लावीत व उरलेली हळद वराच्या घरी नेऊन त्याच प्रकारे त्याच्याही अंगाला चोळीत.[२]

विवाहित स्त्रियांनी वधूला उष्णोदकाने स्नान घातल्यावर देवक बसविण्याचा कार्यक्रम सुरू होई. त्यानंतर मुलीचे आईवडील ग्रहांची पूजा अविन्धकलशाने सुरुवात करीत. अविन्धकलशात हळदीची मुळे, सुपारी, तांब्याचे नाणे आणि गोड पदार्थ ठेवलेला असे. त्यांची विघ्न हरण्यासाठी प्रार्थना केली जाई. हाच विधी मुलाच्याकडेही केला जाई. गौरीपूजन नवऱ्यामुलीनेच करावयाचे असे. "गौरी गो, मला चांगले वैवाहिक जीवन दे, आणि दारी आलेल्याला आयुष्य दे"[३] (गौरी गौरी आवतण दे, दारी आलेल्याला आयुष्य दे)

रूखवत :

जेव्हा विवाह समारंभाची वेळ समीप येई तेव्हा, मुलाकडचे काहीजण गोड पदार्थांची ताटे घेऊन नवरा, त्याचे नातेवाईक यांना देत आणि नवऱ्या मुलाचे स्वागत करून त्याला पोशाख आणि इतर भेटवस्तू अर्पण करीत.[४]

मंगलाष्टक :

वधूच्या घरी मिरवणुकीने आल्यावर वराला विवाह वेदीवर नेले जाते. त्यांना एकमेकांना पाहू नये म्हणून अंतरपाट (स्वस्तिक काढलेला पडदा) मध्ये धरला जातो. मंगलाक्षता (रंगीत तांदूळ) वाटल्या जातात. पुरोहित

१ महाराष्ट्र गॅझेटिअर, ठाणे, पृ. ३५१.

२ चापेकर, बदलापूर, पृ. २०१.

३ कित्ता.

४ कित्ता, पृ. २०३.

मंगलाष्टका म्हणतात. आणि शेवटी सनई चौघडा, टाळ्या यांच्या गजरात वधू-वर एकमेकांना हार घालतात. नंतर मित्र, नातेवाईक, पाहुणे यांचे आदरातिथ्य केले जाते.[१] त्यांनतर कन्यादान, लाजाहोम, किंवा विवाहातील आहुती आणि सप्तपदी हे विधी केले जातात.

साडीसमारंभ आणि सुनमुख :

वधूला नवीन साडीचोळी, दागिने देऊन तिची गहू, नारळ यांनी ओटी भरण्यात येते. ही ओटी पुरोहित आणि काही सुवासिनींनी भरावयाची असते. नंतर मुलीच्या वडिलांनी आलेल्या सर्वांना भोजन द्यावयाचे असते. नंतर वधू-वरांना घोड्यावर किंवा गाडीत बसवून वाजंत्री, मुलाकडील व मुलीकडील नातेवाईक मित्र, स्त्री, पुरुष यांनी मिरवणुकीत वराचे घरी पोचविण्याची प्रथा आहे. नंतर लक्ष्मीपूजन, नाव ठेवणे व मानपान झाल्यावर समारंभाची सांगता होई.

खालच्या जातींत आणि जमातीच्या लोकांत जोडा जमविण्याचे आणि विवाहसंबंध जोडण्याचे काम तिसऱ्या मनुष्यावर सोपविलेले असे. त्यांना मध्यस्थ म्हणत. बऱ्याचदा हे मध्यस्थ धंदेवाईक असत. त्यांनी केलेल्या मदतीसाठी हे मध्यस्थ काही शुल्क घेत असत.[२]

वधूसंबंधी मध्यस्थाने माहिती दिल्यावर वराकडील लोकांनी जाऊन वधू पाहण्याचा कार्यक्रम होत असे. नंतर वधूची उंची, पत्रिका, कुटुंब इत्यादी, विषयी समाधानकारक आढळल्यास तो स्वतःविषयी माहिती सांगत असे. किंवा विवाह ठरवून देत असे. तारीख, वार निश्चित करून आईवडिलांना तशी माहिती देत असे.[३]

मराठा आणि तत्सम जातीत सोयरीक किंवा मागणी म्हणजे विवाह निश्चित झाल्याची उद्घोषणा करण्याची प्रथा होती.

वराकडील मंडळी वधूला दागिने व तिच्या आईवडिलांना पैसे किंवा धान्य देत. तसेच त्याच वेळी लग्न मुहूर्त ठरविण्यांत येई.[४]

१ चापेकर, बदलापूर, पृ. २०४.

२ राजवाडे, भा. २ क्र. २६०, २६७, भा. २६, नं. २१.

३ ओतुरकर, पेशवेकालीन सामाजिक व आर्थिक पत्रव्यवहार, ले. ४८, पृ. १०८, वैद्य दप्तर, भा. ५, नं. ४०, पृ. ३६.

४ पे. द. भा. ३०, ले. २२, पृ. १३-१५.

मराठा आणि काही इतर समाजात मुलींची किंमत घेण्याची प्रथा होती. मराठ्यांच्यात मुलीकरिता पैसे मिळतात. मुलीसाठी तिच्याबरोबर वाटा द्यावा लागत नाही. अशी माहिती सापडते. मुलीच्या दुसऱ्या विवाहाचे वेळी-देखील बापाला पैसे मिळतात.[१]

संपूर्ण समारंभात गावकऱ्यांना सहभागी करून घेतले जाई. त्यांचा सल्ला विचारला जाई व त्यांचा आदरसत्कार करण्यात येत असे. विधी साधारणपणे पाच दिवस चालत. वेदीची उभारणी, हळदीसमारंभ व देवक, पहिल्या दोन दिवसात केले जाई. मुख्य विवाहसमारंभ तिसऱ्या दिवशी असे. वरात चौथ्या दिवशी आणि पाचव्या व अखेरच्या दिवशी " धागासोड " (हळकुंड सोडण्याचा) समारंभ केला जाई.

हे विधी आणि त्यांचा क्रम हा मराठी बोलणाऱ्या सर्वच जातींमध्ये सर्वसाधारणपणे तोच असतो. विवाहवेदी तयार करण्याच्या कामाला " मांडवडहाळे " म्हणतात. मांडव म्हणजे मंडप आणि डहाळे म्हणजे तो तयार करताना वापरावयाच्या डहाळ्या. खोबऱ्याचे तुकडे आमंत्रण म्हणून वाटीत असत. यजमान गावातील लोकांना योग्यप्रकारे निमंत्रण गेले की नाही आणि प्रत्येकजण काही अपरिहार्य अडचण आली नाहीतर या कार्यक्रमाला हजर राहील हे जातीने पाहत असे. गावातील महाराचे काम, हे पाच पानाचा आंब्याचा टहाळा मंडपाला लावणे हे असे. तो मध्यभागी किंवा प्रवेश दाराजवळ लावला जाई. त्याला तोरण म्हणत.[२] आजही गावातील लोकांना सायंकाळीचे जेवण देण्याची प्रथा आहे. बहुधा शाकाहारी भोजन दिले जाई. काही बोकडाचे जेवण देत.[३] वधू व वर यांच्या घरचे मंडप तयार झाल्यावर सायंकाळी दोन्ही घरी तीन विधी केले जात. त्यांतील पहिला तांदूळ सडण्याचा विधी त्याला घाणा म्हणतात. दुसरा तेल शिंपडण्याचा त्याला तेलवण म्हणतात. तिसरा आणि शेवटचा देवरेवड किंवा देवकार्य यांत गृहदेवतांची पूजा केली जाई. हे सर्व विधी सामान्यपणे कोकणात सर्वच हिंदू कुटुंबात केले जात.

१ ब्राउटन, लेटर्स फ्रॉम ध मराठा कॅम्प, पृ. १४०.

२ चापेकर, बदलापूर, पृ. ३८.

३ कित्ता.

ब्राह्मणेतर कुटुंबातील वरांना विवाहाच्या दिवशी आदल्या दिवसाप्रमाणे समारंभपूर्वक स्नान घातले जाते. त्यानंतर तो वधूच्या घरी विवाहासाठी जातो. त्यामुळे लग्नाच्या मुहूर्ताचा विचार करून स्नानाची वेळ काटेकोरपणे पाळावी लागते.[१] गावामधून जाताना किंवा गावाजवळ आल्यावर या मिरवणुकीला समारंभाचे स्वरूप येत असे. वधूच्या गावाबाहेर मिरवणूक थांबत असे. त्यादिवशी वधूकडील लोक वराकडच्या मंडळीचे स्वागत करण्यास येत असत. वाजंत्री व वराकडील सुवासिनी मुलीची साडी व इतर वस्तू घेऊन निघत असत. ते झाल्यावर वधूचे आईवडील, नातेवाईक, पाहुणे आणि गावकरी मिरवणुकीने जाऊन वराला लग्नविधीसाठी घेऊन येतात. अशाप्रकारे वराला वधूकडे मिरवणुकीने आणण्यात येते. लग्नमंडपाच्या प्रवेशदारात वधूच्या आईने वराचे स्वागत केल्यावर वर मंडपात प्रवेश करतो. त्यानंतर विवाहाचा मुख्य विधी सुरू होत असे. वराच्यासमोर पुरोहित व पाटील किंवा दुसरा एखादा प्रतिष्ठित माणूस अंतरपाट धरीत. वधू व वर एकमेकांसमोर उभे राहिल्यावर तलवार किंवा काठी वधू-वरांच्या मस्तकांवर धरली जाई. आणि पुरोहित मंत्र म्हणण्यास सुरुवात करीत. या मंत्राना मंगलाष्टके म्हणतात. जेव्हा पुरोहित हे मंत्र संपवीत तेव्हा टाळ्या वाजवून वधू-वरांना एकमेकांना हार घालण्यास सांगत. त्याचवेळी वाजंत्री घोष करतात, वधू-वर पती-पत्नी होतात.[२] लग्नविधी कित्येक दिवस खूप खर्च करून केले जात. त्या काळात गावकऱ्यांचा सहभाग विवाहात महत्त्वाचा मानला जाई. बलुतेदार, गावातील कारागीर यांना यात विशिष्ट काम असे आणि तसेच त्यांना काही खास अधिकारही असत.[३]

समाजातील स्त्रीचे स्थान :

हिंदू कुटुंबात स्त्रियांना आपल्या वडिलार्जित संपत्तीत वाटा नसे. कारण धर्माने त्यांना तो वारसा हक्क दिलेला नाही.

१ घुर्ये, ध महादेव कोळी, पृ. १२६.

२ चापेकर, बदलापूर, पृ. ३७, २०४.

३ पेशवा डायरी, भा. ७, क्र. ७६८.

प्रचलित दृष्टिकोनात स्त्रीने सुशील पत्नीत्व आणि विनम्रता यांचे पालन करणे हेच महत्त्वाचे ध्येय ठरलेले होते. आपण अभ्यासित असलेल्या काळांत स्त्रियांना सर्व प्रकारच्या सामाजिक त्रुटींचा सामना करावा लागे. काही अपवाद सोडले तर त्यांना चांगले शिक्षणही मिळत नव्हते. तिचे लहान वयात लग्न होत असे. आपला जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य तिला नव्हते. लग्नाच्यावेळी वधूपित्याला वराला मोठा हुंडा द्यावा लागे.[१] पती व पत्नी यांचे कुटुंबात जवळचे संबंध नव्हते. पती हा आपल्या पत्नीपेक्षा आई बहिणींच्या प्रभावाखाली असे. अशा प्रकारे तरुण सून ही आपल्या विशेषकरून सासूच्या हुकूमात असे व ती करीत असलेल्या सुनेच्या छळात तिचा पतीदेखील सामील झालेला दिसे. अशा छळाचा परिणाम म्हणून सुनांनी आत्महत्या केल्याची उदाहरणे आहेत. बालविवाहाची पद्धत प्रचलित होती. १६४० मध्ये शिवाजीचे सईबाईशी लग्न झाले त्यावेळी शिवाजी १० वर्षांचा व सईबाई फक्त ६ वर्षांची होती. येसुबाईंचे लग्न १६६७ मध्ये झाले तेव्हा ती आठ वर्षांची होती. गोपिकाबाई ५ वर्षांची असताना १७३० मध्ये ८ वर्षाच्या बाळाजी बाजीरावाशी तिचा विवाह झाला. ही पद्धती खालच्या जातीतही रूढ होती. बालविवाहात नवऱ्याचे वय १३ ते १४ वर्षांचे असे आणि मुलीचे वय १० ते ११ वर्षे असे.[२]

जर दुर्दैवाने काही वर्षांनंतर पत्नीचा मृत्यू झालाच तर त्याला पुनर्विवाह करण्याची सवलत असे. ८ किंवा ९ वर्षांवरील मुली मिळत नसत आणि त्यामुळे लहान वयाच्या मुलीशी त्याचे दुसरे लग्न होत असे. या पद्धतीमुळे वयात खूपच अंतर असलेले विवाह घडून येत. त्याचमुळे कुटुंबात स्त्रीचे जीवन अतिशय कष्टमय असे. बहुभार्या आणि उतारवयातील विवाह यामुळे मुलींना लहान वयात वैधव्य प्राप्ती होण्याची भीती असे. विधवा

---

१ खरे, ऐ. ले. सं., पृ. २७३.

२ ऐ. सं. सहित्य, भा. १, ले. ४५, पृ.४४.

विवाहाला धर्मशास्त्राची अनुमती नसल्याने स्त्रीला मात्र एकदाच विवाह करता येई. अशी परिस्थिती असल्याने बालविधवांचा जटिल प्रश्न निर्माण होई. पत्नीचे जीवन जगता यावे म्हणून गवळी जातीतील एक स्त्री कल्याण प्रांतातील आबटे गावी एका हरजी गवळ्याकडे सेवक म्हणून राहिली होती. तिला त्याच्यापासून संभाजी नावाचा मुलगा झाला आणि संभाजीला जातीत घेण्याची व्यवस्था त्यांनी केली. परंतु त्याच्या मृत्यूनंतर लगेचच त्यांनी त्याचा वारसा तोडून टाकला आणि आपले उर्वरित आयुष्य त्याला अनाथ म्हणून घालवावे लागले. विधवेला सती जाण्यापासून परावृत्त करण्यासाठी दत्तक घेणे किंवा तिला काही आर्थिक आश्वासन देणे या गोष्टीही केल्या जात.[१]

महाराष्ट्रात सतीची चाल फार मोठ्या प्रमाणात होती. ब्राह्मण, मराठा आणि तत्सम लढवय्या जमातीत ही प्रथा प्रामुख्याने होती. आपल्याला असेही आढळते की, केवळ पत्नीचे नव्हे तर रखेल्या आणि दासीदेखील आपल्या मालकाच्या चितेवर स्वतःला जाळून घेत.[२] मात्र ही प्रथा तेवढी प्रचारात नव्हती. उच्च वर्गात हुंडापद्धती प्रचलित होती. काही जातीत मुलींच्या बापाला मुलाकडून चांगल्या प्रकारची रक्कम मिळत असे. लग्नासाठी मुलींची खरेदी केली जाई.[३] ब्राह्मणांच्या मुलीचे लग्न ९ वर्षे वयापूर्वी करण्याचा कायदा होता. मराठा राजवटीत ब्राह्मणेतर कुटुंबातील विधवांना पुनर्विवाहाची परवानगी होती. आपले धार्मिक वर्चस्व वाढण्यासाठी प्रभू आणि सोनार ह्यांनीदेखील आपापल्या जातीत विधवा विवाहाला बंदी घालण्याचा प्रयत्न केला. मराठ्यात विधवा विवाहाला "पाट" असे म्हणतात. "पाट" लावलेल्या दुसऱ्या लग्नाच्या पत्नीला पहिल्या लग्नाच्या पत्नीप्रमाणे हक्क नसत. वतन देताना तिच्या मुलांना दुय्यम स्थान दिले जाई.[४] स्त्रीचे समाजातील स्थान तिच्या नवऱ्याच्या स्थानावर अवलंबून असे. जोपर्यंत तिचा पती जिवंत आहे तोवरच तिला कुटुंबात हक्क असे. यावर भर दिला जाई. पतीवरील आपल्या प्रभावामुळेच तिला घरातील

१ महाराष्ट्र गॅझेटिअर्स, रत्नागिरी जि., पृ. २३२.

२ राजवाडे, भा. २१, ले. २१५.

३ खोबरेकर, मराठेकालीन कोकणचे सामाजिक व आर्थिक जीवन, पृ. ५५.

४ गुणे, ज्युडिशियल सिस्टीम ऑफ द मराठाझ, पृ. ७१.

व्यवहारात वादातीत हक्क असे आणि घरच्या आणि धार्मिक समारंभात, उत्सवात, मेळाव्यात ती मार्गदर्शक होत असे.[१] हिंदू स्त्रीला आपल्या पतीचा विश्वास कमवीत आणि कुटुंबाची मिळकत, पैसा, दागदागिने आदी सर्वांच्या त्या रक्षक असत. कुटुंबाची व्यवस्था मुलांचे विवाह यांत त्याचे म्हणणे प्रभावी असे. कोकणांत स्त्रियांचे तीन वर्ग होते. घरंदाज स्त्रिया, सामान्य (देवदासी) स्त्रिया आणि वेश्या.

वर सांगितल्याप्रमाणे धर्मशास्त्रानुसार विवाहित स्त्रिया या घरंदाज स्त्रिया होत्या. देवळाशी संबंधित असलेल्या देवदासी त्यांना कोकणात भावीण म्हणत. भाविणी देवळाशी जोडलेल्या असत. दररोज त्यांना पूजेच्या वेळी नाचगाणे करावे लागे तसेच देवाच्या मिरवणुकीत सामील व्हावे लागे. गावातील श्रीमंत जमीनदार त्यांचा आश्रयदाता असे. क्रॉफर्ड त्यांना "सुखाला समर्पित केलेल्या" म्हणतो.[२] खरोखरच त्या त्या काळच्या सर्वांत अद्ययावत वर्गातील स्त्रिया होत्या. त्यांचे सर्व जीवन हे विविध अनुभवांनी समृद्ध झालेले असे. त्याच्या पद्धती श्रीमंती आणि भडक असत. त्यांच्या कला सुख देणाऱ्या व वश करणाऱ्या असत. रेमाल आणि ग्रॉस यांनी त्यांच्या बाह्य देखाव्याचा मोहकपणा टिकविण्यासंबंधात बरेच लिहिले आहे.[३]

नायकिणीच्या हातात पडलेल्या दासींना वेश्या व्यवसाय करावा लागे. काही स्त्रीगुलामांना केवळ आपल्या मालकिणीची अगर मालकाची कामे करावी लागत. काहीवेळा गुलाम स्त्रिया या मालक शारीरिक भूक भागविण्यासाठी ठेवत असत. राजे राजवाड्यांच्यात गुलाम मुलींना नाचगाणी शिकविले जाई व त्यांना जनानखान्यात ठेवण्यात येत असे. अशाप्रकारे "बटक्या" ठेवणे हे सतराव्या शतकांत नेहमीचेच होते.

श्रीमंत लोकांत मुली पळवून नेऊन त्यांच्याशी जबरदस्तीने विवाह करण्याची प्रथा होती. रानटी जमातीत ही प्रथा प्रचलित होती. मात्र आदिवासी तरुणांच्या विवाहाकरिता पैशांची गरज असे.[४] मुलगी पळवून

१ खोबरेकर, मराठेकालीन कोकणचे सामाजिक व आर्थिक जीवन, पृ. ५५.

२ कित्ता.

३ रघुवंशी, इंडियन सोसायटी इन ध एटीन्थ सेंच्युरी, पृ. २३३.

४ अॅन इंट्रोडक्शन टू सोशल अॅन्थ्रोपोलॉजी, पृ. ८७.

जबरदस्तीने विवाह केल्याची उदाहरणे ब्राह्मण कुटुंबातदेखील आहेत. मुलींचा विक्रय करून लोक अमाप पैसा मिळवीत, असे आपणांस आढळून येते. भिवूबाई व्यास नावाच्या महिलेने १७७०-१७७१ मध्ये आपल्या मुलीचे दोनदा लग्न करून दिले व दोन्ही नवऱ्यांकडून पैसा वसूल केला. जेव्हा पेशव्याना हे कळले तेव्हा त्यांनी त्या स्त्रीला तिच्या भावाला व मुलीला कैद करण्याचा आदेश दिला. जबरदस्तीने केलेल्या विवाहापासून सुटका मागता येत नसे. त्याकरिता विवाह हा विशिष्ट धार्मिक संस्काराशिवाय घाईगर्दीने झाला असल्याचे सिद्ध करावे लागे.

बहुपत्नीत्व आणि जरठविवाह यामुळे मुलींना बालवैधव्याचे भय असे. ब्राह्मणात विधवा विवाहाला बंदी असल्याने बालविधवांचा प्रश्न अधिक जटिल होत असे. खालच्या जातींत लग्न मोडण्याची " काडीमोड " प्रथा होती. पतीच्या चितेवर स्वतःला जिवंत जाळून घेण्याचे दिव्य करण्याची चाल होती. पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीची दयनीय अवस्था या प्रकारच्या भयानक निर्णयाचा आश्रय करण्याचे प्रमुख कारण होती. पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीचे दागदागिने घेतले जात, तिचे केशवपन करण्यात येई आणि अशा विद्रूप अवस्थेत तिला गुलामापेक्षादेखील हलके जिणे जगावे लागे. ह्या कठीण परिस्थितीमुळेच जीवनाचा उद्वेग येऊन आयुष्यभर जगाकडून तिरस्कार आणि धिक्कार सहन करीत राहण्यापेक्षा आपल्या पतीच्या चितेवर स्वतःला जिवंत जाळून घेण्याचा मार्ग तिला अनुसरावा लागे.[१] त्यांच्या पतीच्या मृत्यूनंतर त्यांचे वपन केले जाई व त्यापासून त्याच्या पदरी उपेक्षित जीवन येत असे.[२]

जर एखाद्या विधवेचा पती कुटुंबातून विभक्त झाला असेल आणि त्याला वारस नसेल तरच विधवेला त्याची मालमत्ता मिळत असे. एकत्र कुटुंबात विधवेला केवळ अन्नवस्त्राचाच अधिकार होता.[३] एकत्र कुटुंबात वडील किंवा पती यांच्या संपत्तीतील स्त्रीचा हिस्सा समाज़ संमत करत नव्हता. परंपरा आणि सामाजिक विचारसरणी यांनी विविध बंधने घालूनदेखील त्या काळच्या स्त्रियांनी कोणती प्रत्यक्ष कामगिरी केली ते आपण पाहू.

१ टॅव्हर्नियर ट्रॅव्हल्स इन इंडिया, खं. २, पृ. २०९.

२ टेरी, अ व्हॉएज टू ध इस्ट इंडिज, पृ. २७४.

३ पेशवे रोजनिशी, भा. ३, क्र. १७४, १७५.

आपण अभ्यासत असलेल्या काळांत सरदार घराण्यांतील स्त्रिया लिहायला व वाचायला शिकत. हिंदुस्थानांतील इतर कोणत्याही समाजात आढळणार नाही अशी तीव्र नजर मराठा स्त्रियांची होती असे ब्रावटनने म्हटले आहे.[१] मराठी स्त्रिया धीट होत्या. त्या पडदा घेत नसत. स्त्रियांच्या सर्वच वर्गांवर रूढी आणि धार्मिक नियमांचा परिणाम होत नसे. कामकरी वर्गात स्त्री व पुरुष दोघांनाही उदरनिर्वाहासाठी काम करावे लागे आणि स्त्रीची आर्थिक मदतही कमी असली तरी महत्त्वाची असे. शेतकरी कुटुंबातील स्त्रियादेखील महत्त्वाचे कार्य करीत. अशाप्रकारची उल्लेखनीय मदत हीच स्त्रीचे खालच्या वर्गात महत्त्व वाढण्याचे कारण असले पाहिजे. खालच्या जातींत घटस्फोट आणि पुनर्विवाहाला मान्यता होती. त्या स्त्रिया विद्रूपता आणि सती यापासून मुक्त होत्या. शिवाय या जातींत विवाहविषयक कायदे काटेकोरपणे पाळले जात नसत. थॉमस् कोटस म्हणतो की बहुपत्नीत्व मान्य असले तरी सर्वसाधारण नव्हते. केवळ श्रीमंताना पहिल्या लग्नापासून अपत्य नसेल तरच ते दुसरे विवाह केले जात.[२]

मध्यमवर्गीय स्त्रियांचीच परिस्थिती इतरांपेक्षा भयानक होती. बहुपत्नीत्व आणि रखेल्या, तसेच घटस्फोटाला बंदी यामुळे त्यांना अनिश्चिततेच्या वातावरणांत राहावे लागे.[३]

□□

१ ब्रॉवटन, लेटर्स फ्रॉम मराठा कँप, पृ. ११६.

२ सुधा देसाई, सोशल लाईफ इन महाराष्ट्र अन्डर ध पेशवाज, पृ. ८८.

३ कित्ता, पृ. ८९.

६०. धार्मिक आणि सामाजिक चालीरीती

धर्म आणि समाज

धार्मिक श्रद्धा-परंपरावादी (कर्मठ) हिंदूंचे धार्मिक जीवन हे प्रामुख्याने जातीय जथ्याच्या ज्या गटामध्ये ते असत त्यांच्या परंपरांनी मुख्यत्वे व्यापलेले असे. जात पाळणे म्हणजेच धर्मपालन म्हणता येईल.

धार्मिक चालीरीतींच्या बाबत महाराष्ट्रातील समाज खालीलप्रमाणे विभागता येईल :—

(१) ब्राह्मण (२) ब्राह्मणेतर (३) अस्पृश्य (४) मुसलमान (५) ख्रिश्चन, इत्यादी. धार्मिक आणि सामाजिक चालीरीतींबाबत ब्राह्मणांवर नियंत्रण करणारे प्रमुख मिताक्षर आणि धर्म व निर्णयसिंधू होते. ब्राह्मणांच्या देशस्थ, चित्पावन, कऱ्हाडे अशा जाती होत्या. सामान्यपणे ब्राह्मण दैनिक प्रार्थना-संध्या करीत. प्रभू आणि गौड सारस्वतदेखील त्यांच्या देवाच्या दररोज पूजा करीत. वाणी (व्यापारी) जे जातीसंस्थेत दुसऱ्या क्रमांकावर होते त्यांना दररोजची पूजा नव्हती. त्याचप्रमाणे मराठा, कुणबी आणि इतर कारागीर जातींच्या बाबतीतही होते. सकाळच्या स्नानानंतर गृहदेवतेची पूजा करणे किंवा देवळात जाणे हे त्यांच्याकडून अपेक्षित होते. घरातील देवाची पूजा ही घरातील प्रमुखाने किंवा वयोवृद्ध माणसाने करावयाची प्रथा होती. पण सामान्यपणे घरातील आश्रित माणसावर अगर लहान मुलांवर किंवा शेवटचा आधार म्हणून स्त्रियांवर सोपविली जात असे. सुस्थितीतील कुटुंबात या पूजेसाठी ब्राह्मणाची नेमणूक केली जाई.

ब्राह्मण आणि उच्चवर्णीय हिंदूच्या घरात एक देवघर नावाची खोली देवपूजेसाठी राखून ठेवलेली असे. (आजही हिंदूच्या घरात आपल्याला देवघर आढळते.) या घराण्यांच्या देवांत पंचायतन, महादेवाचे दगडी लिंग, विष्णूची प्रतिमा म्हणून दगडाचा शाळीग्राम, शंख, कोक्रा (ताटली), धातूचा तुकडा (देवी दुर्गा म्हणून) सूर्य म्हणून स्फटिक आणि गणेश लाल दगडाच्या स्वरूपात असे. पंचायतनाशिवाय काही कुटुंबात त्या कुलदैवतांच्या मूर्ती

असत. उदा. भवानी, खंडोबा, विठोबा इत्यादी.[१] तसेच दत्ताच्या पादुका व गुरूची प्रतिमा ही देवघरात असे. सकाळी प्रातर्विधीनंतर मराठे काम सुरू करण्यापूर्वी आपल्या देवघरात काही वेळ व्यतीत करीत.[२] उच्चवर्णीय दररोजच्या क्रियाकर्मात अधिक पैसा व वेळ खर्च करीत. एकादशी, सोमवार, शनिवार, पौर्णिमा असे खास दिवस आणि इतर काही दिवस हे हिंदूचे उपासाचे दिवस असत. आणि या दिवशी सार्वत्रिक पूजा किंवा विशिष्ट देवतेला धूप, फुले, फळे आणि इतर काही उपचार ब्राह्मणांकडून केले जात.[३] सामान्य माणसांचा धर्म त्यांच्या देवतांच्यावरून अभ्यासता येतो. कोकणांतील हिंदूंच्या देवता खालीलप्रमाणे विभागता येतील. (१) लोकप्रिय देवताची पूजा, (२) ग्रामदेवता, (३) कुलदैवत, (४) इष्टदेवता, (५) गृहदेवता, (६) वास्तुदेवता या प्रकारच्या देवता घरावर सत्ता चालविणाऱ्या होत आणि त्यांची प्रतिष्ठापना गृहशांतीच्या किंवा वास्तुशांतीच्या वेळी करण्यात येई.

महाराष्ट्रातील प्रमुख ग्रामदेवता अशा होत्या आणि आहेत---बहिरोबा किंवा भैरव, हनुमान किंवा मारुती, म्हसोबा, चंडिका, दुर्गा, गणेश, भवानी, वाघेश्वरी, शिव, रवळनाथ आणि इतर लोकप्रिय देवतांमध्ये महाराष्ट्रांतील पंढरपूरचा विठोबा, तुळजापूरची भवानी, जेजुरीचा खंडोबा आणि कोल्हापूरची महालक्ष्मी या प्रमुख आहेत. त्यांची ब्राह्मणांपासून ते अस्पृश्यांपर्यंत सर्वच भक्ती करतात.

विठोबा :

या देवतेची दोन नावे रूढ आहेत. विठोबा आणि पांडुरंग. त्याची मुख्य मूर्ती पंढरपूर येथे आहे, आणि तेच वारकरी संप्रदायाचे मुख्य पीठ आहे. आषाढी आणि कार्तिकी एकादशी हे दोन दिवस पंढरपूरच्या यात्रेसाठी पवित्र मानतात. देशाच्या कानाकोपऱ्यातून या वार्षिक उत्सवाला लाखो भाविक विठ्ठल पूजेसाठी पंढरपूरला येतात.[४]

---

१ महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर्स, भाग ३ (मराठा विभाग), पृ. २३३.

२ दिवेकर संपादित ९१ कलमी बखर.

३ पर्णालपर्वता ग्रहणाख्यान, पृ. ३०-३१.

४ खरे, ग. ह., महाराष्ट्रातील चार दैवते. पृ. १८७.

तुळजापूरची भवानी :

बहुतेक मराठे तुळजापूरच्या भवानीचे भक्त आहेत. ही देवता वाघावर बसलेली, सुंदर आणि नेहमी पापी कुटिल राक्षसांचा नाश करण्याच्या पावित्र्यांत दर्शविलेली असते.[१] ही मराठ्यांची पालनकर्ती मानली जाते. शिवाजी महाराजांनी भवानीपासूनच स्फूर्ती घेतली होती.[२] महाराजांनी तिच्या सन्मानार्थ प्रतापगड येथे मंदिर बांधले आहे.[३]

खंडोबा :

जेजुरीचा खंडोबा ही मराठ्यांची पालनकर्ती देवता असून तिला भक्तगणांच्यात भवानीदेवी इतकेच स्थान आहे.[४] खंडोबा याचा शब्दशः अर्थ तलवारीचा (बा) बाप, की जो प्रदेश रक्षण करतो तो, दक्षिणेचा पालनकर्ता किंवा ईशदेव होय. उजव्या हातात तलवार घेऊन घोड्यावर स्वार अशी याची प्रतिमा असून त्याच्या शेजारी त्याची पत्नी म्हाळसा बसलेली असते. सतराव्या शतकातील मराठ्यांची खंडोबा आणि भवानी मोठी दैवते होती.

महालक्ष्मी :

ही महाराष्ट्राची प्राचीन देवता आहे. ती अंबाबाई या नावानेही ओळखली जाते. तिची मुख्य मूर्ती कोल्हापूरला आहे. महाराष्ट्रातील सर्व जातीचे लोक हिचे भक्त आहेत.

लोक नाशिक, त्र्यंबकेश्वर, पैठण आणि हरेश्वर या ठिकाणांनाही भेटी देतात.

वर उल्लेखिलेली स्थाने आणि देवता यांच्या यात्रा करणे हेदेखील एक पुण्यकर्म मानले जाते. आयुष्यांत एकदा तरी यातील एक किंवा त्यापेक्षा अधिक स्थानांना भेट देण्याची तीव्र इच्छा मनात वास करीत असते.

१ चिटणीस, शिवाजी महाराजांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, पृ. १५.

२ सभासद बखर, पृ. ८,९,२९,४८ आणि ८७.

३ कित्ता.

४ ९१ कलमी बखर, कलम ७०, सभासद, पृ. २१.

५ शिवचरित्र साहित्य, खंड २, ले. १४१.

कर्मकांड-क्रियाविधी :

हिंदूंच्या चालीरितींचा बराचसा भाग हा धार्मिक विधींशी निगडित असतो. त्याला संस्कार म्हणतात. हे समारंभ ज्यात विशेषतः शुद्धीकरणाचे क्रियाविधी असतात, ते परंपरागत पद्धतीने ब्राह्मण पुरोहितांच्या अधिपत्याखाली केले जातात. सर्व जातीत ६ संस्कार केले जातात. त्यातील प्रमुख संस्कार पुढीलप्रमाणे होत. मौजीबंधन, विवाह, गर्भादान, आणि अन्य संस्कार. गर्भादान (मुलगी वयात आल्यानंतरचा) संस्कार मोठ्या धामधुमीने केला जात असे. कारण त्या काळांत मुलींची लग्ने फार लहान वयात केली जात असत. ब्राह्मण नित्यकर्म करीत. उदा. स्नान, संध्या, तर्पण इत्यादी. यज्ञांना प्रोत्साहन दिल्याने धार्मिक कर्तव्य पार पाडल्याचे समाधान लोकांना मिळत असे. वसई विभागातील रयतेने पोर्तुगिजांचे अंमलाखाली दीर्घकाळ राहिल्यामुळे धर्मकार्यात दुर्लक्ष झाल्याने भरपाई करण्यासाठी कल्याणच्या ब्राह्मणाला त्याने केलेल्या सोमयज्ञासाठी धर्मादायवृत्ती दिली होती. अशा रीतीने त्या भागात स्वधर्माचरण झाल्याचे समाधान त्यांना लाभले. अर्थात कोणाही व्यक्तीच्या भक्तिमार्गाचे आणि पद्धतीचे नियंत्रण जातच करीत असे. काही जातींना काही मंदिरात जाण्याची अगर तेथील देवतांना स्पर्श करण्याची मनाई होती. आपल्या जातीधर्माबाहेर जाणाऱ्या माणसाला बहिष्कृत केले जाई. धर्म बदललेल्या माणसाचा धर्मच केवळ बदलत नसे तर त्याचे जातीनिहाय स्थानही नष्ट होत असे. सालसेटीचे पारथरेपंच काळसे यांना पोर्तुगिजांनी धर्मांतरित केल्यावर त्यांचे शिवाजी काळात फिरून हिंदू होण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न हे एक उदाहरण सांगता येईल.

स्थानिक देवता :

गावाची स्थापना करताना ग्रामदेवतेची स्थापना करण्याची प्रथा होती. प्रामुख्याने भजल्या जाणाऱ्या स्थानीय देवता म्हणजे—हिंगलज्, जाखमाता भगवती, महिकावती, चंपावती आणि गोलमबादेवी.

महाराष्ट्रात मुस्लिम आणि ख्रिश्चन सर्वत्र पसरलेले दिसत. बहुसंख्य ख्रिश्चन हे ठाणे जिल्ह्यातील वसई तालुक्यात होते. सुमारे १.५० लाख ख्रिश्चन कोकणात वस्ती करून राहिल्याचा अंदाज आहे. कोकणातील ठाणे जिल्हा हा अगदी मूळच्या लोकांचे वस्तीस्थान म्हणून ओळखला

जातो. त्यांना आदिवासी म्हणतात. अभ्यासाच्या कालखंडात त्याची संख्या एकूण जिल्ह्याच्या लोकसंख्येच्या १/४ होती. दुसरी अनुसूचित जमात म्हणजे वारली. जिल्ह्याच्या अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या ४५% इतकी त्यांची लोकसंख्या आहे. संख्येने ते कोणत्याही जमातीपेक्षा सर्वाधिक आहेत.[१] या प्रदेशातील लोक पाच प्रमुख प्रकारात मोडतात. ब्राह्मण, कुलकर्णी, वाणी, गवळी, उत्पादक, कारागीर, खेळे, चाकर, धनगर, कोळी, श्रमिक, आदिवासी, चांभार, अत्यंज आणि भक्त.[२]

आपण वर हिंदूच्या धार्मिक आचाराविषयी थोडक्यात माहिती घेतली आहे. आता या विभागातील ख्रिश्चनांच्या धार्मिक आचाराविषयी थोडक्यात पाहू.

महाराष्ट्रातील ख्रिश्चनांचे धार्मिक आचार आणि उत्सव हे जगभरच्या रोमन कॅथॉलिक नीतीनियमानुसार नियंत्रित आहेत. परंतु प्रत्यक्ष शासन व अंमलबजावणी यासाठी या प्रदेशातील रोमन कॅथॉलिक सुरुवातीपासून गोव्याच्या बिशपाच्या कार्यकक्षेत आहेत. त्याच्याखाली विकार जनरल आणि विकार जनरलच्या हाताखाली विभागवार चर्चचे धर्मगुरू असून लहान चर्च हे विभागीय चर्च व प्रमुख चर्चला जोडलेले आहेत.[३] विभागीय चर्चमध्ये धर्मगुरू महार, धर्मांतरित व अनौरस मुले यासारख्या हलक्या वर्गाखेरीज सर्व वर्गातून निवडले जातात. प्रीस्टचे शिक्षण गोव्यात केले जाते व वयाच्या २४व्या वर्षी गोव्याचे आर्चबिशप किंवा त्यांच्या प्रतिनिधीकडून त्यांना दीक्षा दिली जाते व ते आयुष्यभर ब्रह्मचारी राहतात. महाराष्ट्रातील रोमन कॅथॉलिकांची भक्तिस्थाने म्हणजे व्हर्जिन मेरी, सेंट ॲनी, सेंट फ्रॅन्सीस झेवीयर, सेंट ॲन्टोनीओ, सेंट सेबातशीयन आणि सेंट जोसेफ असून त्यांच्या प्रतिमा ख्रिस्ताच्या प्रतिमेबरोबर प्रार्थनेसाठी त्यांच्या घरात ठेवलेल्या असतात व क्रॉसवरील ख्रिस्ताची मूर्ती आणि आवडत्या संताची प्रतिमा ही आदराने वेदीवर अगर कोनाड्यात ठेवलेली असते. त्यांतील

१ सेन्सस ऑफ इंडिया, १९६१ भाग १०, विभाग ७ बी, फेअर्स ॲन्ड फ्रेस्टीवल इन महाराष्ट्र, पृ. ७८-७९.

२ कित्ता, ठाणे जि., पृ. २०१.

३ कित्ता, पृ. २५०.

सर्वात धार्मिक लोक दिवसांतून पाच वेळा प्रार्थना करतात; सकाळी उठल्यावर, मध्यान्ही, सूर्यास्ताच्यावेळी, सूर्यास्तानंतर लगेच आणि झोपण्यापूर्वी.[१]

महाराष्ट्रातील मुसलमानांत अरब आणि पर्शियन रक्तांचे दृढ संबंध आहेत. परकीय मूळ प्रेषित पैगंबरच्या (५७०-६३२ इ. स.)[२] पासून तसेच सातव्या आणि दहाव्या शतकातील मुस्लिम सत्तेच्या प्रसाराच्या काळातील असावे. कारण अरब हे मोठ्या प्रमाणात भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर खलाशी, व्यापारी, नशिबाची परीक्षा पाहण्यासाठी म्हणून आले. कोकणातील राजांमध्ये बल्हार इतका अरबांच्या बाजूचा दुसरा राजा नव्हता आणि त्याच्या प्रजेने त्याचे अनुकरण केले. दहाव्या शतकात अरब मोठ्या संख्येने कोकणातील शहरात स्थायिक झाले. तेथील स्त्रियांशी त्यांनी विवाह केले आणि तेव्हापासून ते त्यांच्या धार्मिक कायद्याप्रमाणे जीवन जगत आहेत.[३]

चौदाव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत खलाशी अरबांच्या सेवेस खूप मागणी होती. कोकणी मुस्लिमांच्या परंपरेनुसार आणि मुस्लिम इतिहासकारांच्या म्हणण्यानुसार ७व्या शतकाच्या (इ. स. ८००) सुमारास युफ्रेटीसच्या खेड्यातून हजारो मुसलमान, हजाज बिन युसुफ या भयानक सत्ताधिशांच्या हातून कत्तल होऊ नये म्हणून भारतात पळून येऊन पश्चिम किनाऱ्यावर स्थानिक झाले.[४] कोकणी मुसलमान चार प्रमुख जमातीत विभागले जातात. हैदर, शेख, मुघल आणि पठाण.

प्रत्येक गुरुवारी मुसलमान लोक मशिदीत अगर खास बांधलेल्या घरात एकत्र येऊन प्रार्थना करतात आणि ईश्वर व प्रेषित यांची गौरवगीते गातात. त्यानंतर चहापान होते व मिठाई वाटली जाते.[५]

१ ब्राऊटन, लेटर्स रिटन इन मराठा कँप डुरिंग ध इयर १८०९, पृ. ७६-७७.

२ जंजिऱ्यास पहिली अरबांची भेट झाली असे पेरिप्लस सांगतो.

३ महाराष्ट्र गॅझेटिअर्स, रत्नागिरी जि., पृ. २६३ वर प्रत्येक गुरुवारी मुसलमान लोक प्रार्थना करतात असे सांगितले आहे.

४ कित्ता.

५ कित्ता.

जातीव्यवस्था, गाव आणि धर्म यांनाही मध्ययुगीन लोकांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान होते. त्यामुळे मध्ययुगीन समाजाला स्थैर्य आणि सुरक्षितता लाभली होती. मध्ययुगीन महाराष्ट्राचे धार्मिक जीवन दोन प्रकारचे होते. एक उच्च धर्म तात्त्विक निदान, हे केवळ शिक्षित आणि विद्वानासाठी राखीव होते आणि दुसरे साधा उपासनेचा मार्ग, सामान्याचे पठडीतील प्रचलित रीतीरिवाज. श्रेष्ठ धर्माचा अर्थ विश्वात व्यापून राहिलेले परम तत्त्व म्हणजेच प्रत्येक माणसाचा आत्मा होय. आणि म्हणून ब्रह्माबरोबर मीलन हे प्रत्येक माणसांचे अंतिम साध्य होय.[१] त्याकरिता पवित्र आचरणाची आवश्यकता असे. भक्तिमार्गाने वासनेवर विजय मिळवून जन्ममृत्यूचा फेरा टाळणे हे जीवनाचे अंतिम ध्येय. श्रद्धेची सत्त्वपरीक्षा झाल्यावर जो आत्मा ब्रह्माच्या शरीराला चेतना देतो तो या कृपेला सर्वांत अधिक पात्र असतो.[२] मोक्ष हाच जीवनमृत्यूचा फेरा चुकवू इच्छिणाऱ्या हिंदूचे अंतिम साध्य असते. त्यासाठी तीन मार्ग आहेत. कर्म मार्ग, ज्ञान मार्ग आणि भक्ती मार्ग. मध्ययुगीन महाराष्ट्रांत मुक्तीसाठी सामान्यतः सर्व मार्गांचे आचरण लोक करीत. ईश्वरी अंश हाच केवळ जगराहाटीसाठी व त्याच्या अस्तित्वासाठी कारणीभूत नाही, असे मानले जात होते. प्रकृतीदेखील त्यात आपला खेळ करीत असते. प्रकृती ब्रह्माचे, विष्णूचे आणि शिवाचे अनुक्रमे निर्माण, स्थिती आणि विलयाचे रूप घेतले आहे. देवांनी त्यांच्या पत्नींबरोबर (स्त्रियांबरोबर) कठीण समयी आपल्या कार्यासाठी पुष्कळ अवतार घेतले.[३]

विष्णूच्या अवताराची कल्पना फार प्रसिद्ध होती. या अवताराच्या कथांनी कित्येक कथा, नाटके व इतर धार्मिक करमणुकींना कथावस्तू पुरविल्या आहेत.

ग्रामदेवतांची उपासना :

ग्रामदेवता आणि दुष्ट आत्मे यांच्या उपासनेला खास करून वाढविणारा एक लोकप्रिय धर्माचा प्रकार रूढ असावा असे दिसून येते. प्रत्येक गावात नियमितपणे ग्रामदेवतांची उपासना व आराधना केली जाई. यमाई, सटवाई,

१ सेन, फॉरेन बॉयॉग्राफी ऑफ शिवाजी, भाग २, पृ. १६१-१६३.

२ ग्रँट डफ, हिस्ट्री ऑफ ध मराठाज, भाग १, पृ. ८-९.

३ शिवभारत, पृ. ४३,४७.

वेताळ, वाघोबा, कल्याणी, विनयी, काळी, कनकेली इत्यादी प्रमुख ग्रामदेवता होत्या. त्याशिवाय मारुती, खंडोबा, मुंजा, पीर, तुकाई, गीरमाई आणि सुरी या देवताही होत्या आणि आहेत.[१]

मॉनीयर विल्यम्सच्या मते ह्या ग्रामदेवता प्राचीन जमातीच्या लोकांनी निर्माण केलेल्या काल्पनिक मूर्ती असून त्यांना हिंदूंतील चतुर ब्राह्मणांनी आपल्या धर्माकडे सामान्यांना वळविण्यासाठी सामावून घेतले. ग्रामदेवता ही संकट काळांत शक्ती देणारी समजली जाई व ती शक्ती गावकऱ्यांचा आनंद आणि भरभराटीविषयी असे. दसरा, होळी इ. सारख्या खास उत्सवांचे दिवशी या देवांना रेडा, बकरा यांचे बळी गावच्या वेशीवर त्यांना खूश करण्यासाठी आणि त्यामुळे गावाला भरभराट येण्यासाठी देण्याची प्रथा होती. ग्रामदेवतेचे काम हे गावाचे रक्षण करणे हे होते. परंतु खास करून रोग आणि आपत्ती यांच्यापासून रक्षण करण्याची शक्ती त्यांच्यात होती असे मानले जाई.[२] विशिष्ट प्रकारचे धार्मिक समज आणि समारंभाला उपयुक्त म्हणून ग्रामदेवतांची वैशिष्ट्ये निश्चित झाली होती. त्यांची पूजा करणारे केवळ ब्राह्मणच नसत तर इतर जातींतीलही असत. उच्च किंवा नीच जातीपैकी कोणीही आपण पूर्वजांचे वारस आहोत असे म्हणविताना अभिमान किंवा मत्सर बाळगीत नसत.[३] जर ग्रामदेवतांना त्यांची परंपरागत देणी दिली नाहीत किंवा त्यांना सताविले अगर डिवचले तर संतापाने त्या सूड घेतात असे मानले जाई.

ग्रामदेवतेस प्रत्येक पौर्णिमेला नारळ तसेच पेरणी, कापणीच्या वेळी बकरा, कोंबडा अशी देणी दिली जात. रवळनाथ, मौली, वेताळ, रामेश्वर, जैन आणि हनुमान या देवता सामान्यपणे सर्वत्र पुजल्या जातात. ग्रामदेवता कॉलरा, देवी, प्लेग यासारखे रोग सूड घेण्यासाठी आणतात असे मानले जाई. हे रोग टाळण्यासाठी गावकरी योग्यवेळी प्राणी आणि इतर देणी देऊन त्यांची वैशिष्ट्यपूर्ण पूजा वेळोवेळी करीत. देवीच्या रोगाची देवता लक्ष्मी हिची आराधना करण्यासाठी तिच्याकरता जत्रा भरवून प्रार्थना करण्यात आल्याचे पुरावे दाखल आहेत.[४] एखादे रोगी मूल अगर माणूस

१ जोशी, मराठेकालीन समाजदर्शन, पृ. २१२.

२ बेंद्रे, महाराष्ट्र ऑफ शिवशाही पिरीयड, पृ. १७.

३ आत्रे, गावगाडा, पृ. १४३-१४४.

४ राजवाडे, भाग २१, ले. २१५.

ज्याला देवीच्या रोगाने ग्रासले आहे त्यात बायांनी प्रवेश केला आहे असे मानून त्यांची पूजा अबीर, फुलांचे हार यांनी करीत असत. त्या देवीची काही दिवस सतत पूजा करण्यात येई.

साथीचे रोग हे खालच्या जातीच्या लोकांनी केलेले चेटूक समजण्यात येई आणि ते टाळण्याची क्षमता ग्रामदेवतेत असल्याचे मानीत. गावकरी त्यांना कोंबडे, बकरे आणि नारळ देऊन प्रसन्न करीत.

हिंदू अपत्यप्राप्तीसाठी किंवा तसेच काही मिळविण्यासाठी नवस करीत आणि इच्छापूर्ती झाल्यावर तो नवस फेडीत. शंकराकरिता लघुरूद्रासारखे खास समारंभ करीत. पेढ्यांसारख्या गोडाच्या वस्तू नवसपूर्तीसाठी देवाला अर्पण करीत. धर्मशाळा बांधणे, नवीन विहिरी खणणे, गरीबांना अन्न आणि कपडे दान करणे यांसारख्या गोष्टी नवस फेडण्यासाठी करीत. स्त्रिया औदुंबर किंवा पिंपळाला प्रदक्षिणा घालणे, नारळ, साखर, गूळ, तांबे, चांदी, इत्यादी आपल्या मुलांच्या वजनाइतके दान करणे असे नवस सामान्य रोग किंवा कौटुंबिक आपत्ती टाळण्यासाठी करीत. राजा किंवा शासन यांचे प्रजेचे कल्याण हे कर्तव्य समजले जाई. व्यक्तीच्या जीवनातील भविष्य काळांतील प्रसंग किंवा महत्त्वाचे कालखंड यांचे भविष्य वर्तविण्यासाठी कुंडल्या तयार करीत. स्त्रिया या चेटूक करणे व भुते उठविणे यात तरबेज असत. अशिक्षित खालच्या समाजात श्रेष्ठ व्यक्ती या मृत्यूनंतर सामान्यपणे भूत होऊन अदृश्य फिरत असतात या समजुतीने गोंधळ उडून जाई आणि त्यामुळे त्या अदृश्य जगातील भुतांची पूजा केली जाई. त्यांना संतुष्ट करणे भाग असे कारण ते वेळोवेळी सजीवांना भिववीत असत.[१] कुठे अनाकलनीय रोग, आजार, दुर्दैवी आघात आणि कधीकधी मृत्यूदेखील घडवून आणण्याचे चाळे करतात असे मानले जाई. मराठा राजवटीत जे लोक एखाद्या व्यक्तीला अगर कुटुंबाच्या विरुद्ध उठवीत, त्यांनी जर त्या व्यक्तीला त्यातून मुक्त केले नाही तर फार मोठी शिक्षा त्यांना दिली जाई. ज्या रोगांचे निदान होत नसे ते भुतांनी केले असे मानून मांत्रिकाला बोलाविले जाई. हे मांत्रिक हा एक धंदेवाईक वर्ग होता. त्यांना भगत, दरवेश, तांत्रिक आणि पंचाक्षरी म्हणून ओळखत आणि ते अंगात आलेल्या भुताला

१ ब्राऊटन, पृ. १७८-१७९.

ओळखून बंधन करण्यात तरबेज असे समजले जात. चेटूक किंवा जादुटोणा करणाऱ्या माणसाचा गुन्हा सिद्ध झाल्यास त्याला मृत्यूदंडाची शिक्षा मिळे. त्याला कामावरून कमी करून त्याचे वतन असल्यास रद्द करण्यात येत असे. काहीवेळा त्याला हद्दपार करण्यात येई. उच्चकुलीन लोकदेखील या तंत्रविद्येवर विश्वास ठेवीत.

दुष्ट नजर-दृष्ट लागण्याची भीती ही अंधश्रद्धा सार्वत्रिक होती. मुलाच्या जन्माच्यावेळी दुष्ट आणि मत्सरी माणसाची नजर टाळण्याचा प्रयत्न केला जाई. लोक नजर लागू नये म्हणून आपल्या मुलांना हलक्या प्रतीचे कपडे घालीत असल्याचे पुरावे आहेत.[१]

संतांची भक्ती

हिंदू व मुस्लिम साधुसंतांची आराधना आणि सन्मान सर्व समाजांत करीत असत. त्यांना अलौकिक शक्ती असल्याने त्यांचा आदर करण्यात येत असे. ते चारित्र्याचे प्रतीक असे. ईश्वराने त्यांना काही खास शक्ती बहाल केल्या आहेत असा विश्वास असे. संतांना गुरू मानीत आणि हिंदू व मुस्लिम संतांच्या वारसांना मान दिला जाई व मंदिरे, मशीद, मठ किंवा समाधी यांच्या धारणेसाठी त्यांना धर्मदाय निधी देत.[२]

वारकरी पंथ

वारकरी पंथ किंवा वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्र आणि कोकण यातील मध्ययुगीन वैष्णव संप्रदायाचे रूप होय. या संप्रदायात केवळ विष्णू आणि विष्णूचीच म्हणजे कृष्णावतारांतील विष्णूची भक्ती शिकविली जाई. आणि तोच मार्ग मुक्तीचा मार्ग म्हणून ओळखला जात असे. वारकरी संप्रदायानुसार पंढरपूरच्या विठोबारायाची केवळ भक्ती हे तत्त्व सर्वमान्य होते. पंढरपूरच्या प्रमुख देवता म्हणजे विठोबा व रखुमाई. दरवर्षी पंढरपूरला चार यात्रा भरतात आणि वर उल्लेखिलेल्या वेळी वारकरी या जत्रांना जातात. या देवळाच्या बांधकामाबद्दल मतभेद आहेत. मात्र मंदिर फार काळापासून आहे असा विश्वास आहे. असे मानतात की १११७ ते ११३७ मध्ये सदर देवालय बांधले गेले. होयसाल राजघराण्यांतील विष्णुवर्धन राजाने मूळचा जैन धर्म टाकून वैष्णव पंथ स्वीकारल्यावर पुंडलिक नावाच्या भक्ताच्या विनंतीवरून हे देऊळ बांधल्याचे सांगतात. मंदिराचे बरचसे बांधकाम

१ ब्राऊटन, पृ. २०७-२०८.

२ राजवाडे, भाग ३, ले. ११.

१६ व १८ व्या शतकात झाले आहे. हेमाद्रीच्या चातुवर्ग चिंतामणी या सुमारे १२७० मध्ये लिहिल्या गेलेल्या कृतीवरून आपणास असे समजते की, भीमतरीच्या तीरावर पंढरपूर हे क्षेत्र होते आणि तेथे पांडुरंगाची भक्ती केली जाई. यावरून असे स्पष्ट होते की त्यावेळी यात्रेचे एक प्रसिद्ध ठिकाण म्हणून पंढरपूर प्रसिद्ध होते.[१] वारकरी हा एक पंथ आहे. एका विधीनंतर या पंथात प्रवेश करता येतो. त्याला पंथाची शपथ घ्यावी लागते. तसेच पंथाची तत्त्वे स्वीकारावी लागतात. ती त्याला जो धार्मिक मनुष्य देतो त्याला महाराज किंवा बुवा म्हणतात.[२] त्या माणसाला गुरू म्हणतात. गुरू मंत्र देतो. (लहान प्रार्थना- " ओम नमो भगवते वासुदेवाय " सारखी शिष्याला काही गोष्टी-दारू, मटण मासळी, परदारा सोडण्याची शपथ घ्यावी लागते. त्यांना " म " ने सुरू होणाऱ्या गोष्टी म्हणतात. मद्य, मोह, मत्स्य, मुद्रा, मैथुन.[३] गळ्यात तुळशीची माळ घालावी लागते. शरीराच्या काही भागावर व चेहऱ्यावर गोपीचंदनाचे टिळे लावावे लागतात. प्रत्येक एकादशीला उपवास, विठोबाची पूजा वर्षातून एकदा पंढरपूरच्या विठोबाचे दर्शन करावे लागते. या वार्षिक यात्रेला वारी म्हणतात. म्हणून वारकरी याचा अर्थ वारंवार पंढरपूरला जातो तो. मराठी साहित्याची परंपरा ज्ञानेश्वरांनी १३ व्या शतकात लिहिलेल्या भगवद्गीतेवरील " ज्ञानेश्वरी " या टीकाग्रंथापासून होते. हा ग्रंथ वारकरी पवित्र मानतात व ते ज्ञानेश्वरांना पहिला वारकरी म्हणून ओळखतात. ज्ञानेश्वरांनंतर सर्व संतांनी त्यांचे अनुकरण केले. ते सर्व जातीचे होते.[४] दरवर्षी भक्त पंढरपूरला जथ्थ्याने जातात. त्याला दिंडी म्हणतात. या दिंडीत पंढरपूरला जाईपर्यंत वैष्णव संताच्या काव्याचे गायन केले जाते. या अभंगातून शेकडो वर्षे भक्तिपूर्ण आणि तात्त्विक विचार अशिक्षित समाजापर्यंत पोचविले जात आहेत. हे एकत्र चालणे, एकत्र गाणे, सर्व पालख्या पंढरपूरच्या बाहेर एकत्र होणे यामुळे संपूर्ण मराठी भाषिकांत शेकडो वर्षे एकात्मतेची भावना दृढ झाली आहे. त्यात कोकणी लोकांचाही समावेश आहे. महाराष्ट्रातील माणसांच्या मनांत एकत्वाची भावना जोपासण्यासाठी ह्या इष्टदेवता म्हणून करण्यात येणाऱ्या विठ्ठलभक्तीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

---

१ वारकरी पंथ आणि विठोबा यावरील विद्वानांचे लिखाणाचा सारांश येथे दिला आहे.

२ इरावती कर्वे, महाराष्ट्र लँड अँड इट्स पिपल, पृ. १८८.

३ एम्.डी.साठे तंत्रशास्त्र व शाक्त संप्रदाय या विषयी कांही विचार, नवभारत, सप्टेंबर १९६६, इरावती कर्वे, उपरोक्त, पृ. १८८.

४ इरावती कर्वे, तत्रैव, पृ. १८८-१८९.

गोतदंड :

निषिद्ध केलेल्या समाजांतील लोकांबरोबर भोजन करणाऱ्या व्यक्तीला, "अधिकाऱ्यास" एक शेला द्यावा लागत असे. त्याशिवाय व्यक्तीस आपल्या पवित्र ग्रंथात नेमून दिलेली अथवा त्याच्या गोताच्या रीतीप्रमाणे सर्व प्रायश्चित्ते भोगावी लागत असत. ती म्हणजे त्याच्या गुन्ह्याच्या गांभीर्यानुसार दानधर्म किंवा यात्रा.

शेटे :

गावकीच्या कामात गुंतलेल्या आणखी वतनदारांचा वर्ग म्हणजे वंशपरंपरागत शेटे महाजनांचा होय. शेटे गावच्या पेठेचे अधिकारी होत. प्रत्येक गावात पेठ असेच असे नाही. मात्र पेठ वसावायची असेल तर ते काम शेटे-महाजनाकडे असे. चौल ही एक महत्त्वाची बाजारपेठ होती. त्यातील शेटे म्हणजे बाजारपेठेची व्यवस्था पाहणारे अधिकारी ; सामाजिकस्तरात त्यांचे स्थान उच्च दर्जाचे होते. त्यांना नगरशेट या नावाने ओळखत असत. धर्माजी गंभीरराव शेटे याने दशकांपुढे (ग्रामसभेचे सभासद) इ. स. १६०० मध्ये त्यांचे पूर्वजांना प्राचीन काळापासून ज्या अनेक सवलती मिळत होत्या, त्या तशाच सतत चालू ठेवाव्या असा अर्ज केला. शेटे यांना मिळणाऱ्या काही सवलती पुढे दिल्या आहेत ; कोणाचाही विवाह झाल्यास एक शेला, कुटुंबात मुलगा जन्माला आला की एक लारी ; चौलमधील प्रत्येक घरातून दरवर्षी एक मेजवानी व बारी ; गावातील कारागिरांची म्हणजे न्हावी, शिंपी, सुतार, सोनार, लोहार, गवंडी, रंगारी, बांधकाम करणारे यांना मेजवानी ऐवजी एक लारी किंवा अर्धी लारी ; आणि बाजारातील व्यापाऱ्यांनी काही नगद रक्कम द्यायची. शेटे यांना मिळणाऱ्या या होत्या काही सवलती. छत्री, दिवटी, नेजा, (भाला) गुलाम (नफर) चाकर व घोडा हे वापरण्याचा हक्काचा मान पण त्यास देण्यात आला होता. स्वतःच्या जामातीच्या मंडळाचा अध्यक्ष म्हणून तो आपल्या सेवेबद्दल शुल्क वसूल करीत असे. जारकर्म आणि मुलगा नसणे अशा बाबींमध्ये त्यास पैसे मिळत असत. त्यांच्या परवानगीशिवाय "दिव्य" उरकता येत नसे. ग्रामसभेचा एक सभासद म्हणून गावातल्या सर्व कार्यामध्ये त्याला महत्त्वाची भूमिका बजावयाची असे. शेटे यांच्याबरोबर झालेल्या करारात असे नमूद केलेले असायचे की यापैकी कोणत्याही वहिवाटीचा भंग झाल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. शेटे यांस विरोध करणाऱ्या

व्यक्तीला किंवा त्याच्या हक्कांकडे दुर्लक्ष करणाऱ्या व्यक्तीला आपले प्राण गमवावे लागत असत, किंवा त्यास साखळीने बांधण्यात येत असे.[१]

ब्राह्मण :

ब्राह्मणांना सरकारकडून अनुदाने व सवलती मिळत असत. त्याप्रमाणे जनतेकडून त्यांना निर्वाहासाठी शुल्क मिळत असे. प्रत्येक गावात एक जोशी किंवा गावाचा फलज्योतिषी असे. गावच्या "बलुता" पद्धतीचा तो एक सदस्य असायचा आणि राजकीय स्थित्यंतरामुळे गावचे कामकाज अडून राहत नसे किंवा बदलत नसे. आपल्या अशीलांना कसे उपयोगी पडावे हे त्यांना माहीत होते. ज्योतिषी त्यास पंचाग वाचून दाखवीत असे. नववर्षाच्या दिवशी पंचांग पाहणे हा एक महत्त्वाचा कार्यक्रम होता. सर्व ब्राह्मण त्या दिवशी पंचांग पालखीत घालून दिंडी काढीत असत.[२]

तथापि, जोशीबुवांनी प्रथम कोणास पंचांग वाचून दाखवावे असा प्रश्न निघाला. जमीनदारांना की सरकारी अधिकाऱ्यांना. चौलमध्ये हा एक मोठा यक्षप्रश्न ठरला. इ. स. १७०१ मध्ये मोगलांच्या हवालदाराने दंड वसूल केला. जमीनदारांना पंचांग प्रथम वाचून दाखविल्याबद्दल केलेला हा द्रव्य दंड होता. जोशी जमीनदार यांनी फौजदाराकडे संयुक्त अपील केले. त्याचा मुद्दा असा होता की ही एक जुनी वहिवाट राजकीय बदल झाले तरी बदललेली नव्हती. जोशी व जमीनदार यांचे हे प्रतिपादन मान्य करण्यात आले, फौजदाराने दंड परत केला आणि सरकारी अधिकाऱ्यांना जुन्या पद्धतीप्रमाणे कृती करण्यास सांगण्यात आले.[३] देशसत्ता ही स्थिर व "दिवाणसत्ता" ही अशाश्वत आहे असे ग्रामस्थांनी नेहमीच मानले होते.

जोशींना त्यांनी केलेल्या धार्मिक कार्याबद्दल शुल्क घेण्याची परवानगी होती. ही कार्ये म्हणजे गावातील वेगवेगळ्या जमातींच्या विवाह, मौजीबंधन, गणेशमूर्तीची स्थापना वगैरे सारखे सोहळे. एका जोशी मंडळींनी आपले शुल्क जवळजवळ दुपटीने वाढविल्यामुळे, लोकांनी सरकारकडे जुने दर पुन्हा लागू करावे अशी मागणी केली. मजलीसने या विषयावर चर्चा करून जुन्या दराच्या बाजूने निकाल दिला.

१ आवळसकर, शिवचरित्र साहित्य, खंड ९, ले. १६.

२ आवळसकर, आंग्रेकालीन पत्रव्यवहार, पृ. ५८.

३ कित्ता, पृ. २१.

धर्म :

चौलची लोकसंख्या मिश्र स्वरूपाची होती. त्यात हिंदू, मुसलमान व ख्रिश्चन होते. मुसलमान राज्यकर्ते मुस्लिमेतरांच्या धर्मात ढवळाढवळ करीत नसत व हिंदूंच्या धार्मिक विधींमध्ये हस्तक्षेप करीत नसत. उदा. चौलमध्ये सतीची काही स्मारके व हिंदूंची देवळे होती. तेथे पुष्कळ ठिकाणाहून हिंदू लोक पूजाअर्चेसाठी व भेटीसाठी येत असत. हिंदू लोक यांची परतफेड म्हणून कारकून, हवालदार वगैरे नोकरांत मलिकअंबर यांनी धार्मिक बाबतीत घालून दिलेला धडा गिरवावा असा सल्ला देत असत.[१]

कोकणात नारळी पौर्णिमा हा महत्त्वाचा दिवस, त्यादिवशी मोठ्या मिरवणुकीने नारळ समारंभपूर्वक सागरास अर्पण करण्यात येत असे. चौलचे रहिवाशी परंपरेनुसार मिरवणूक काढून या समारंभासाठी रेवदंड्याला जात असत. रेवदांडा नंतर पोर्तुगिजांनी काबीज केले. चौलचा फौजदार, रेवदांड्याच्या कॅप्टनला संदेश पाठवीत असे की नारळ घेऊन मिरवणूक अमूक वाजता रेवदांड्याला पोहोचेल आणि म्हणून कृपया वाटेतली झाडे-झुडपे काढून टाकण्याची व्यवस्था करावी. नारळी पौर्णिमेचा उत्सव साजरा करण्यासाठी लागणारा पैसा व्यापाऱ्यांकडून व शेतकऱ्यांकडून घेतला जात असे. व चौल शहराच्या ख्यातीला साजेल अशा इतमामाने व शोभेने खर्च केला जात असे. जवळ जवळ १०० ते १२५ रेशमांच्या गोंड्यांनी नारळाची झाडे शोभिवंत दिसतील अशा तऱ्हेने तयार केली जात असत व ती काही अधिकाऱ्यांना भेट म्हणून दिली जात असत. यात रेवदांड्यांचा पोर्तुगीज कॅप्टन अधिकारीसुद्धा असे. तो या मानाची परतफेड विड्याची पाने व पाच रुपयांचे बक्षीस देऊन करीत असे.[२] ही प्रथा काही दिवस थांबविण्यात आली होती, कारण पोर्तुगिजांनी नारळी पौर्णिमेचा संदेश घेऊन येणाऱ्या मोगल जासुदाला ठार मारले. त्यांच्यापैकी काही लुटारूवृत्तीचे होते. पुष्कळदा ते चौलमध्ये घुसून उभी पिके कापून नेत असत. घरे जाळीत असत. दुकाने लुटीत असत आणि काही लोकांना गुलाम म्हणून पकडून नेत असत. फिरंग्याची ही घुसखोरी शेतीला बाधक ठरत असे व त्यामुळे शेतकऱ्यांना सरकारकडून केल्या जाणाऱ्या जमीन महसुलाची पूर्तता करणे कठीण होत असे. परिणामी हे शेतकरी चौल सोडून लांबच्या गावी राहावयास गेले.

---

१ शिवचरित्र साहित्य, खंड १०, पृ. ५२.

२ कित्ता, खंड ९, पृ. १०, १३, १९, २३.

फिरंग्यानी चौलमधल्या काही जमिनी ताब्यात घेतल्या होत्या ; परंतु सरकारला ते कसलाही महसूल भरीत नसत.

तथापि चौलच्या मुसलमान सरकारने पोर्तुगिजांना चौलमध्ये कसलीही स्थावर मिळकत घेण्यास मज्जाव केला होता. फिरंग्यांना जमीन विकणाऱ्या एका व्यक्तीला मृत्युदंडाची शिक्षा भोगावी लागली ; चौलचे जोशी यांच्या वतनाच्या तंट्यात तपासांती असे आढळून आले की तंट्यातील एका भागीदाराने-दादा वर्तक याने हा हुकूम मोडला होता. त्याने सरकारच्या परवानगीशिवाय फिरंग्यास जमीन विकली होती. त्याचा गुन्हा शाबीत झाला आणि त्यास मृत्युदंडाची शिक्षा झाली.

वेगळ्या धर्माच्या व्यक्तीबरोबर भोजन घेतल्यास असे कृत्य करणाऱ्या व्यक्तीस बहिष्कृत मानले जाई. परंतु ज्ञातिसभेचे नियम हे काटेकोरपणे पाळले जात नसत आणि याबाबतीतचे अनेक व्यवहार गुप्तरीतीने केले जात असत. मुंबईचे रहिवाशी असलेले श्री. रामजी कामत यांनी चौलचे देसाई, देशकुलकर्णी व अधिकारी यांच्या नजरेस अशी अनेक प्रकरणे आणून दिली होती आणि त्यांस ज्ञातिविषयक नियम अधिक कडकपणे अमलात आणून त्यास कस्पटासमान (तीळ-तूल्य) मानू नये अशी विनंती केली आहे. चौलचा एक गोसावी अशा तऱ्हेने बहिष्कृत व्यक्तींना हिंदू धर्मात परत घेत असे, अर्थातच काहीतरी चिरीमिरी घेऊन एखाद्या व्यक्तीला समाजातील बहुसंख्य लोकांची मान्यता असल्यास त्यास बहिष्कृत किंवा समाजात परत घ्यावे आणि ढोंगी गोसाव्याला शिक्षा करावी अशी मागणी करण्यात आली.[१]

वेठबिगार :

गावचा पाटील महार, वाजंत्री आणि कारागीर यांजकडून विनामूल्य काम करून घेत असे, त्यास वेठबिगार म्हणत असत. कोकणात कुळकर्णी पदाच्या हक्काच्या सनदेत खाजगी कामासाठी वेठबिगारींचा समावेश असे. वेठबिगार म्हणजे जबरदस्तीने करून घेतलेले काम. ही सरंजामशाहीतील पद्धत अस्तित्वात होती. शारीरिक श्रमाच्या स्वरूपात किंवा श्रमाऐवजी नगद रकमेच्या स्वरूपात ही वेठबिगार करून घेतली जात असे. त्यातून सुटका करून घेण्यासाठी काही रयत रेवदांड्याला पळून जात असत व

---

१ शिवचरित्र साहित्य, खंड ९, पृ. ८६-८८.

आपल्या जमिनी तशाच न कसता ठेवत असत.[१] सरकारला जमिनी कसलेल्या हव्या असल्यामुळे, जुन्या पद्धतीनुसार वेठबिगार वसूल करावी असा आदेश काढण्यात आला, जेणेकरून या पद्धतीने जनतेला त्रास सोसावा लागू नये.

एखादा किल्ला ताब्यात असणे हे शासकीय अधिसत्तेच्या कायमपणाचे एक मुख्य अंग आहे असे मध्ययुगीन काळात समजले जात असे. म्हणून सरकार किल्ले दुरुस्त करण्यासाठी, ते मजबूत करण्यासाठी किंवा बांधण्यासाठी प्रजेची मदत घेत असे. जनता त्यांच्या कामाच्या मोबदल्याबद्दल फारशी चिंता करीत नसे. त्यांना अर्थातच या कामामुळे त्यांच्या जमिनी पडीक राहत असत आणि याची काळजी अधिक वाटायची. मुसलमानी राजकर्त्यांनी त्यांना वेठबिगारीतून वगळले होते, कारण त्यांना शेती अधिक महत्त्वाची वाटत होती. मराठ्यांनी चौल शहर जिंकून घेतल्यानंतर (१६७०-१६७१) वेठबिगारीसाठी किल्ल्यात माणसे नेण्याची जुनी प्रथा परत सुरू केली. तेव्हा जनतेने नव्या सरकारला अर्ज करून या प्रदेशाच्या भरभराटीसाठी वेठबिगारीची चाल नष्ट करावी असे त्यात म्हटले होते. सतत चालू असलेल्या लढाया संपल्या, शांतता प्रस्थापित झाली की ही पद्धत ताबडतोब नष्ट करण्यात येईल असे मराठा सरकारकडून अभिवचन देण्यात आले होते.[२] रयतेला वेठबिगारीमुळे त्रास होता कामा नये अशा अर्थाचे आदेश काढण्यात आले.[३] वडवाल (जनजाती समाज) व अनाडी (अकुशल समाजातील लोक) जे सिंचनयुक्त व सिंचनरहित जमिनीत शेती करत असत, अशा लोकांना वेठबिगारीसाठी मुख्यता राबविण्यात येत असे. त्यामुळे शेतीत, सिंचनाच्या कार्यात, खतपाणी देण्यात आणि बागांच्या सभोवताली कुंपणे घालण्यास व्यत्यय येत असे. म्हणून १६८५ मध्ये मराठा सुभेदाराने आपल्या अधिकाऱ्यांना असा आदेश दिला की रयतेचे वेठबिगारीमुळे नुकसान होता कामा नये व त्यांना त्यांची शेतीची कामे कोणताही अडथळा न येता करून द्यावी.[४]

□□

१ शिवचरित्र साहित्य, खंड ९, पृ. ८६-८८.

२ शिवचरित्र साहित्य, खंड १०, पृ. २२.

३ कित्ता, खंड ९, पृ. ७१-७२.

४ कित्ता, पृ. ६३.

६१. व्यापार उद्योगधंदे

शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य महाराष्ट्रात स्थापन केले. त्या महाराष्ट्रातील कोकण किनारा महाराजांच्या ताब्यात होता. सतराव्या शतकाच्या आरंभी पाश्चिमात्यांनी नारळ, सुपारी, मसाल्याचे पदार्थ, कापड यांसारख्या व्यापारातून प्रचंड नफा मिळविला. अशा ह्या नफेबाज व आक्रमक युरोपियनांच्या बंदोबस्तासाठी आणि पश्चिम किनाऱ्यावर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी कोकण किनाऱ्यावरील बंदरात लढाऊ व व्यापारी गलबते बांधिली व परदेशाशी व्यापार सुरू केला. महाराष्ट्रात त्यावेळी ग्रामीण उद्योगधंदे प्रचलित होते. महाराष्ट्र शेती प्रधान देश असल्यामुळे शेतीवर आधारित उत्पादने उदा. सुती, रेशमी वस्त्रे, साखर, तंबाखू, अफू तसेच जहाजे बांधणे, मीठ पिकवणे, तेले, सुगंधी द्रव्ये, मसाले वगैरे किरकोळ उद्योगधंदे चालू होते. ह्याबरोबर भरतकाम, कापडावर छपाई, रत्नकाम हेही उद्योग काही खेड्यांत चालू होते.

शिवकालात महाराष्ट्रातील अंतर्गत व्यापार पूर्णतः स्थिरस्थावर अवस्थेत होता. शिवाजी महाराजांच्या काळापासून अस्तित्वात असलेले उद्योगधंदे व व्यापार कोणताही खंड न पडता इ. स. १७०७ पर्यंत व पुढेही पेशवे काळांत चालू होते. परमानंदाच्या शिवभारतात सर्वांत ठाऊक असलेल्या कारागिरांची कारू-नारूची माहिती दिली आहे.[१] तिच्यावरूनही महाराष्ट्रात भरभराटीत असलेल्या उद्योगधंद्यांची कल्पना येते. राज्यव्यवहारकोश-मधल्या उल्लेखावरून या माहितीस दुजोरा मिळतो. पादत्राणे, कांबळी, कापड, लाकडी वस्तू कसब्याच्या बाजारात विकण्यास येत. सुवर्णकाराची कला तर परिपूर्णतेस पोचली होती. सुवर्णकार विविध प्रकारच्या सोन्या-चांदीच्या वस्तू व दागिने बनवीत. परमानंद आणि सामराज यांसारख्या

---

१ परमानंद, शिवभारत, अध्याय ३१, श्लोक १७-२३.

कवींनी या व्यवसायाचे तपशीलवार वर्णन केले आहे.[१] बर्नियरने सुवर्णकारांच्या कौशल्याची अत्यंत वाखाणणी केली आहे. त्याच्या माहितीवरून या कवीच्या वर्णनास दुजोरा मिळतो. बर्नियर म्हणतो, " इतर वस्तूंप्रमाणेच भारतीय कारागीर उत्तम अलंकार बनवितात आणि युरोपियन सुवर्णकारांच्या तोडीचे सुंदर सुवर्णालंकार तयार करतात ".[२]

त्या काळी मुख्य मुख्य गावांत आठवड्यातून एकदा बाजार भरत असे आणि त्यामध्ये कापड, नारळ, लोणी, विड्याची पाने, सुपाऱ्या, फळे भाज्या, मांस आणि इतर अनेक वस्तूंची खरेदी-विक्री होई याचा उल्लेख वर आलेलाच आहे. या बाजारांत धान्याचीही मुबलक विक्री होई. अशा बाजारांच्या व्यवस्थेस जबाबदार असणाऱ्या व्यक्तीस शेठ (श्रेष्ठिन्) म्हणत. त्यास त्याच्या सेवेप्रीत्यर्थ भाडेमुक्त जमीन देण्यात येई.[३] जेव्हा कायम बाजाराचे स्थळ-पेठ उघडण्यात येई, तेव्हा ती स्वयंपूर्ण होईपर्यंत तिला सरकार जकात आणि इतर करांपासून माफीची विशेष सवलत देई. ही सवलत शिवाजीच्या काळापासून मराठा राज्यकर्त्यांनी अवलंबिलेल्या धोरणाचा एक भाग होता आणि पेशव्यांनी कटाक्षाने आणि दक्षतापूर्वक ते धोरण पुढे अनुसरले, चालू ठेवले. बाजारपेठेचा विकास करणे हे त्या " शेठ " चे कर्तव्य असे.[४] मुख्य व्यापाऱ्यास दुकानदारांवर लादलेला कर गोळा करण्याची परवानगी होती. त्यास पोलीस आणि मॅजिस्ट्रेटची कामेही करावी लागत. ग्रामपंचायतीचा सदस्य आणि मिरासदार या नात्याने, त्याला बाजारपेठेत खास राखीव घर आणि कामकाजासाठी जागा असे. त्यास बाजारपेठेतील विक्रेत्यांची यादी ठेवावी लागे.[५] जकात (Octroi) वसूल करण्याच्या कामात " घाटपांड्यास " मदत करावी लागे आणि स्थानिक अधिकाऱ्यांस प्रसंगोपात्त साह्य करावे लागे. कधी कधी सरकारने दिलेल्या सनदेनुसार " पेठे " ची स्थापना करण्यात येई. (उदा. जिजाबाईच्या स्मरणार्थ पासन (Posan) येथे स्थापना झालेली जिजापूर पेठ, मलपुरा,

१ शिवभारत, अध्याय ६, श्लोक ८२-९०.

२ बर्नियर्स ट्रॅव्हल्स, पृ. २५४.

३ शिवचरित्र साहित्य, खंड १० : २२.

४ कित्ता, खंड ३, पृ. ५१, ५३, ४३९.

५ भा.इ.सं. त्रैमासिक क्र. ३५, १-२, पृ.४.

खेलपुरा, पारसपुरा, विठापुरा इत्यादी)[१] नवीन विक्रेत्या-सभासदांस बाजारपेठेत प्रवेश मिळाल्यावर, जुन्या व नव्या सभासदांची यादी बनविण्यात येई. इंदापूर बाजारपेठेच्या यादीमध्ये : ३ सराफ, १ सोनार, ५ तेली, २ शिंपी (जुने सदस्य) आणि ५ सराफ, २ सोनार, ९ तेली (नवे सदस्य) यांचा उल्लेख आढळतो. परंतु निवासी आणि बाहेरील सभासदांमध्ये भेद करण्यात येई ही गोष्ट लक्षणीय आहे. बाजारपेठेचे संरक्षण करण्याची व तिच्याभोवती गस्त घालण्याची जबाबदारी सरकारची होती. शिराळे कसब्यातील व्यापाऱ्यांना पेठेच्या संरक्षणाबद्दल पूर्ण हमी देण्यात आली होती आणि जर पेठेवर दरोडा पडला तर सरकारने नुकसान भरपाई म्हणून सोन्याची साखळी देण्याचे वचन दिले होते. आणि ही गोष्ट रामचंद्रपंत अमात्यांनी आखून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगतच होती. राजधानीच्या बाजारपेठेत मोठमोठे व्यापारी येऊन स्थायिक होतील, यासाठी विशेष काळजी घेण्यात येई. त्याकाळी महाराष्ट्रात पोर्तुगीज, इंग्रज, डच, फ्रेंच, डेन्स इत्यादी विविध राष्ट्रांचे व्यापारी राहत होते.[२] सामान्यतः व्यापाराच्या अभिवृद्धीसाठी रस्त्याचे जाळे आवश्यक असते. परंतु महाराष्ट्रातील व्यापारांसाठी बुरहानपूर-गोवळकोंडा हा एकमेव राजमार्ग उपलब्ध होता. महाराष्ट्रात विशेषतः ठाणे, कुलाबा आणि रत्नागिरी जिल्ह्यात जलमार्ग (खाड्या) अस्तित्वात होते. छोटी जहाजे सागर किनाऱ्यांलगत प्रवास करून खाड्यात पोचू शकत. रत्नागिरी जिल्ह्यांत, बाणकोट, हर्णे, देवगड, दाभोळ, राजापूर, संगमेश्वर, मालवण आणि वेंगुर्ला ही बंदरे प्रसिद्ध होती. आणि त्यांमध्ये येणाऱ्या जहाजांची नेहमी वर्दळ असे. गोदावरी आणि कृष्णा ह्या महाराष्ट्रातील मोठ्या नद्या होत्या. गोदावरी नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद आणि नांदेड या जिल्ह्यातून वाहते. भीमा आणि नीरा या इतर दोन छोट्या नद्या होत. अंबा नावाची छोटी नदी नागोठणे व पेण या गावांना उपयुक्त होती. ईस्ट इंडिया कंपनीने आपल्या व्यापार उदीमाच्या संदर्भात नद्यांच्या उपयुक्ततेचा अभ्यास करण्यासाठी थॉमस निकोलला पाठविले होते.[३] बैल, उंट, घोडे, गाढवं, रेडे, बैलगाड्या आणि जहाजे ही वाहतुकीची मुख्य साधने होती.

---

१ शिवचरित्र साहित्य, खंड ८, पृ. १, पृ. ३

२ इंग्लिश रेकॉर्ड ऑन शिवाजी, भाग १, पृ. ३१८-३२०.

३ कित्ता, पृ. २४३-३०२.

व्यापाऱ्यांचे मोठे तांडे शेकडो बैलांसह लांब पल्ल्याच्या मजला गाठीत आणि अन्नधान्ये वाहून नेत. बुरहानपुराहून औरंगाबाद येथे तोफा नेण्यासाठी शंभर बैल खरीदण्यात आले असे एका जुन्या वार्तापत्रावरून समजते. तद्वतच शत्रूस लुटून मिळालेली धनदौलत वाहून नेण्यासाठी नेहमी बैलांचा वापर करण्यात येई. डॉ. फ्रायरने ३०० बैल नाणेघाटातून मीठ वाहून नेताना पाहिले. साखरेची वाहतुकही अशाच प्रकारे होई. गाढवे, घोडे आणि उंट हे अशाच कामासाठी उपयुक्त असत. बाहेरून महाराष्ट्रात प्रवास करणारे प्रवासी आपले अवजड सामान वाहून नेण्यासाठी उंट वापरीत. परंतु कधी कधी या कामासाठी मजुरांचा-हमालांचा उपयोग करणे अधिक स्वस्त आणि किफायतीचे होई.[१]

भात, नागली, मीठ इत्यादी पदार्थ वाहून नेण्यासाठी जहाजांचा उपयोग करण्यात येई.[२] कोकणातील माल सुरतेस सागरी मार्गाने जाई. शिवाजी महाराज आपल्या राज्यांतील आठ-नऊ बंदरांतून इराण, बसरा, मोचा येथे आपली जहाजे धाडीत असत. नद्या व खाड्या ओलांडण्यासाठी मचव्यांचा (ferry boats) उपयोग करण्यात येई. आरामशीर प्रवासासाठी लोक पालख्या वापरत. थेव्हेनॉट आणि ट्रॅव्हर्नियर यांनी पालख्यांचे तपशीलवार वर्णन दिले आहे. बैलगाड्या एक दिवसात ३५-४५ मैल या वेगाने ६० दिवसांत लांबचा पल्ला गाठू शकत. म्हणून लोकांमध्ये वाहतुकीचे साधन म्हणून सर्रास प्रचलित होत्या. घोडे आणि बैल हे प्रत्यक्ष पाठीवर बसून जाण्यासाठी उपयुक्त होते. ट्रॅव्हर्नियरने, स्वानुभवावर आधारित घोड्यावर बसण्यासंबंधी सूचना दिलेल्या आहेत. फ्रेंच प्रवासी ॲबे कॅरे यास जलमार्गाचा आणि खुष्कीच्या प्रवासाचा वाईट अनुभव आला. ट्रॅव्हर्नियरच्या मते सुरक्षित प्रवास करू इच्छिणाऱ्या आपल्या वाहनासोबत २० ते ३० सशस्त्र माणसांचा लवाजमा घ्यावा. त्या काळी रस्त्यावरून प्रवास करणे धोक्याचे होते आणि दरोडेखोर व्यापाऱ्यांना व प्रवाशांना रस्त्यावर एकटे गाठून लुटत, असे इंग्लीश रेकॉर्ड्समध्ये उल्लेख आढळतात. थेव्हेनॉट आणि कॅरे यांनी अशा सशस्त्र माणसांच्या संरक्षक लवाजमा घेण्याच्या गरजेचे समर्थन केले आहे. प्रवाशांकडे ज्या राज्यातून तो प्रवास करत

१ शिवचरित्र साहित्य, खंड ५; १९; ॲबेकॅरे १, पृ. २२६-२२७.

२ कित्ता, खंड १०:६.

असेल त्या राज्याच्या अधिकाऱ्याचा प्रवास परवाना असे. बैलगाडीचे भाडे दर दिवशी रु. १ असे तर रथाचे भाडे दरमहा रु. ३४ असे.[१] मराठीतील मूळ साधने व फॅक्टरी रेकॉर्डवरून समजते की, १७व्या शतकात कोकण प्रदेश भरभराटीत होता. अधूनमधून दुष्काळाची झळ लागत होती पण त्याचा व्यापारावर परिणाम होत नसे. कोकणातील चौल, दाभोळ, कल्याण, भिवंडी, पेण, वेंगुर्ला ही गावे व्यापार उद्योगासाठी प्रसिद्ध होती. चौल व दाभोळ ही सुरत गोव्याइतकीच महत्त्वाची बंदरे होती. डहाणू, तारापूर, जैतापूर, आगाशी, कळवे, माहीम, वसई, वांद्रे, खारेपाटण, नागोठणे, श्रीवर्धन ही कोकणातील इतर महत्त्वाची व्यापार-उद्योगाची केंद्रे होती. मुंबईचा राजापूर, दाभोळ, केळशी आणि वसई, चौल या शहरांशी घनिष्ठ व्यापारी संबंध होता. चौल हे दख्खनच्या सर्व प्रकारच्या विक्रीच्या वस्तूंचे मोठे वस्तूभांडार emporium होते. पण मोगल मराठे संघर्षामुळे त्यास हानी पोचून त्याचा विनाश झाला.[२] तशाही अवस्थेत १६७४ पर्यंत चौल हे कुलाबा जिल्ह्यातील सर्वात महत्त्वाचे बंदर होते. १६७४ मध्ये उद्‌भवलेल्या आकस्मिक आगीने ३००० घरांचा बळी घेतला आणि तेथल्या रहिवाशांनी तेथून पळून जाऊन बेटाचा आसरा घेतला. चौलचे रेशीम विणणारे कारागीर व घोडे प्रसिद्ध होते. चौलहून अफू, नीळ आणि रेशीम मोठ्या प्रमाणावर निर्यात होई. १६ व्या शतकात रेशीम उत्पादन व्यवसाय इतक्या बरकतीत होता की ते गोव्यासह संपूर्ण भारतास रेशीमाचा पुरवठा करी. चौलच्या रेशमास चिनी रेशमापेक्षा अधिक दर्जेदार मानण्यात येई. चौलमध्ये सुंदर पेट्या, छोटे कोरीव जिन्नस, लाखेचे पदार्थ तयार होत.[३] चौल दरवर्षी ५००० टफेट्याचे पदार्थ तयार करी. नंतर चौल येथील विणकरांनी मुंबईत स्थलांतर केले. या प्रदेशातील ठिकाणांमध्ये दाभोळ शहर अत्यंत दाट लोकवस्तीचे व भव्य होते. त्यामध्ये सरदारांचे वाडे, उत्तम इमारती, श्रेष्ठ मंदिरे व जुन्या मशिदी होत्या. मलबार व खंबायत येथून येणारी जहाजे दाभोळ येथे भेटत आणि मालाची अदलाबदल करीत. माल लादलेल्या बैलांचे तांडे अंतर्भागातून येत. शिवाजीच्या काळातही दाभोळ हे प्रसिद्ध

---

१ इंग्लिश रेकॉर्ड ऑन शिवाजी, भाग २, पृ. १०१.

२ अॅबेकॅरे, खंड १, पृ. १९०.

३ कुळकर्णी, अ. रा., पृ. २२०.

बंदर होते आणि तेथून मुंबई आणि परत अशी जहाजांची ये-जा चाले. शिवाजीची आरमारी जहाजे दाभोळ बंदरात नांगर टाकून असत. मुंबईकर इंग्रजांनी दाभोळचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान ओळखले होते. याचे कारण मुंबईतील व्यापार-उदीमासाठी दाभोळची अत्यावश्यक गरज होती. कारण सुरत आणि इतर ठिकाणापेक्षा तेथे उपलब्ध माल स्वस्त दराने मिळे. त्या वस्तूंमध्ये मिरी, जाडे भरडे कापड इत्यादींचा समावेश असे. कंपनी या वस्तू युरोपात निर्यात करी. दाभोळप्रमाणेच कल्याण हे दाट लोकवस्तीचे शहर असून तेथे मोठ्या प्रमाणावर व्यापार चाले. गोवळकोंडा, कॉरोमांडेल इत्यादी प्रदेशातील अनेक प्रकारच्या मालाचा ओघ कल्याणकडे वाही. फ्रॉयरने मुंबईहून "बंडखोरांच्या (शिवाजीच्या) मुलूखात जाण्याचे द्वार" असे कल्याणचे वर्णन केले आहे.[१]

भिवंडी शहर हे व्यापार व उत्पादन ह्यांचे केंद्र म्हणून मशहूर होते. इंग्रजांनी भिवंडीच्या विणकरांना तेथून मुंबई येथे नेण्याचे प्रयत्न केले. पण त्यांनी इंग्रजांची विनंती मानली नाही. त्यांनी इंग्रजांना कापड पुरविण्याचे कबूल केले.[२]

कल्याण व भिवंडी येथे लाकूड मोठ्या प्रमाणात होई. ते घरे व जहाजे बांधण्यासाठी अत्यंत उपयुक्त असे. इंग्रज त्या लाकडास "भारताचे ओक" म्हणत. ते लाकूड मुंबईची अत्यावश्यक गरज होती. ते मुंबईजवळ मिळू शकत असल्याने त्याचे दर भारी होते. इंग्रज ते लाकूड तोफगाड्या बनविण्यासाठी आणि इतर कारणांसाठी वापरत. पण या शहराच्या स्वामित्वाबद्दल झालेल्या मराठा-मोगल संघर्षामुळे इंग्रजांना या शहरातून लाकूड मिळणे अशक्य झाले. १६७४ च्या सुमारास मराठ्यांनी मोगलांपासून ही शहरे पुन्हा जिंकून घेऊन त्यांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. जहाज-बांधणीच्या कार्यासाठी लाकडाची गरज लागे. लाकूड भिवंडी कल्याण येथे उपलब्ध असल्याने, ती जहाज बांधणीची केंद्रे बनली. शिवाजीची अनेक आरमारी जहाजे येथे बांधण्यात आली असे मानले जाते.[३]

---

१ फ्रायर जॉन, खंड १, पृ. ३०८-३०९.

२ इंग्लिश रेकॉर्ड ऑन शिवाजी, खंड २, पृ. १११, ११५.

३ शिवकालीन पत्रसारसंग्रह, भाग २, १५०५.

रामचंद्रपंत अमात्यांनी नौदलाच्या महत्त्वाचे पूर्ण समर्थन केले आहे.[१] रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर हे आणखी एक उद्योग-केंद्र होते. ते पूर्वीपासूनच मिरी, चिटाचे कापड, कापसाचे सूत यांच्या व्यापाराचे केंद्र म्हणून महत्त्वाचे होते. राजापूरमध्ये बस्तान टाकलेल्या फ्रेंचांना कोकणातील सर्व बंदरातून व्यापार करण्याची मुभा होती. राजापूर येथे फ्रेंच मुख्यतः शिसे आणि लोखंड यांचा व्यापार करीत. कॅरे म्हणतो : " राजापूरमध्ये प्रामुख्याने हिंदूची वस्ती असून मूर आणि इतर परकीय तेथल्या व्यापारात गुंतले आहेत. ज्यांची जहाजे लाल समुद्र बसरा, इराण आणि सर्व भारत यांच्याशी व्यापार करतात असे काही धनाढ्य व्यापारीही आहेत.[२] पण इंग्रजांनी मराठ्यांशी संघर्ष उद्‌भवल्याने आपली वखार बंद करून टाकली. वेंगुर्ला हे सदैव जहाजांची वर्दळ असलेले बंदर होते; तेथे डचांची पूर्वी वखार होती. बटॅलिया, जपान, लंका, पर्शियन आखात, तांबडा समुद्र इत्यादी प्रदेशांतील जहाजे या बंदरास भेट देत. महाड, चिपळूण, पेण, नागोठणे ही उदयास येणारी केंद्रे होती. राजापूर, दाभोळ, केळशी येथून मुंबईकरांनी घेतलेले जिन्नस सुरतेस मिळणाऱ्या जिन्नसापेक्षा तुलनेने स्वस्त होते म्हणून मुंबईकरांना ही बंदरे महत्त्वाची वाटत. मीठ उत्पादन हा कोकणातील एक लोकप्रिय, मोठ्या प्रमाणावर चालणारा उद्योग होता आणि ठाणे, पनवेल, पेण आणि नागोठणे येथे सर्व वर्षभर मीठ काढणारी मिठागरे होती. ठाणे हे मुख्य मीठ उत्पादन केंद्रे होते. मीठ उत्पादन शेतीस पूरक उद्योग होता.

या ठिकाणाहून मीठ भारताच्या सर्व भागातच जाई असे नाही तर त्याची परदेशात निर्यातही होई.[३] कोकणातील मीठ उत्पादन उद्योग महाराष्ट्रातील जहाज बांधणी उद्योगाच्या वाढीस प्राधान्याने कारणीभूत होता असे मानण्यात येते. मराठ्यांनी मीठ उत्पादनाच्या स्थानिक उद्योगास उत्तेजन देण्यासाठी आणि त्याच्या अभिवृद्धीसाठी कल्याण भिवंडीहून येणाऱ्या मिठावर भारी कर लादला होता. नंतर आयात होणाऱ्या सर्व वस्तूंवर अधिभार लादण्यात आला. या धोरणाने केवळ उद्योगास संरक्षण मिळाले असे नाही तर राज्याच्या महसुली उत्पन्नांत भर पडली.[४] इंग्रज, डच,

१ आज्ञापत्र (सं. खरे, भिडे), पृ. २४७-२४८.

२ ॲबेकॅरे खंड १, पृ. २०१.

३ इंग्लीश रेकॉर्ड ऑन शिवाजी, भाग १, पृ. २८२.

४ म.इ.सा. खंड ८ : २७.

पोर्तुगीज, मुसलमान, इराणी व्यापाऱ्यांनी महाराष्ट्रातील व्यापारी केंद्रात खालील पदार्थांची भर घातली. गहू, मूग, उडीद, वाल, मसूर, तीळ, मका, नाचणी, वाटाणे, इत्यादी धान्यपदार्थ, तांदूळ, दाळ, महवार तालियासट, खिविसाल इत्यादी प्रकारचा होता.[१] मसाल्याच्या पदार्थात लवंगा, हिंग, जायफळ, लसूण, कांदा, मिरी, केशर, कापूर, गुलाल, दालचिनी, हळद, पारा, गूळ, गोपीचंदन, साखऱ्या, अफू, सुगंधी तेले, तूप, मध, सुंठ, हदीकी इत्यादी पदार्थांचा समावेश असे. त्याचप्रकारे तेलंगण, गुजरात, वऱ्हाड, मलबार, बंगाल, अयोध्या इत्यादी भागातून महाराष्ट्रातील विविध व्यापारी केंद्रात अनेक प्रकारचे कापड येई. सामराज ह्या कवीने महाराष्ट्रांत लोकप्रिय असलेल्या वेगवेगळ्या कपड्यांचे वर्णन केले आहे.[२] त्यामध्ये टाफेटा, चिनफेटा, सेल, महाबन, कोको, मुंगी पाटण, मुसदार, पाटव, महमुदी, कद, पीतांबर, सखनीय, खर, जाडे भरडे कापड, पुर्तकळी, पासोडी, गोधडी, अष्टपुतळी, घाटी, साड्या, धोतरे, कांबळी, शाली, रंगीत चिटे, किनखाब, खंबायत, मखमली टोप्या, रुमाल इत्यादींचा समावेश होता. याखेरीज कलिंगडे, नारळ, फणस, ऊस, लिंबे, केळी, काजू, आंबे, अक्रोड, बदाम, भाज्या, सुपाऱ्या, विड्याची पाने, दूध, लोणी, मासे इत्यादी पदार्थही बाजारपेठेत येत. किरकोळ वस्तूंत, पादत्राणे, पंखे, छोटी जहाजे, लाकडी पेट्या, ताग, साबू, गाड्या, खाटा, कंदील, थाळ्या, तांबे, शिसे, घर, कागद, घोडे, बैल, रेडे-म्हशी, मेंढ्या, दास-दासी इत्यादींचा समावेश होई. भारतातील डच, फ्रेंच, इंग्रज, पोर्तुगीज यांपैकी काही पदार्थ पुरवीत. ईस्ट इंडिया कंपनी ही भारतातील प्रमुख परदेशी व्यापार संघटना होती.[३]

ईस्ट इंडिया कंपनी तांबे, शिसे, लोखंडी बंदुकीची दारू, तोफा-बंदुका, जस्त, पारा, वेगवेगळ्या दर्जाचे कापड, रंगीत कापड, कापसाचे लाल सूत, दोर इत्यादींचा पुरवठा करी.[४] तांबे मुख्यतः जपानहून डच आणीत आणि त्याचा सर्व महाराष्ट्रांत पुरवठा करण्यात येई. शिवाजीच्या कारकीर्दीत कोकण युद्धक्षेत्र बनल्याने त्याचा कोकणातील व्यापारउदीमांवर घातक

१ सरकार, हाऊस ऑफ शिवाजी, पृ. १८७.

२ शं.गो. तुळपुळे (सं) सामराज रुक्मिणीहरण खंड ३, पृ. ४१.

३ इंग्लिश रेकॉर्ड ऑन शिवाजी, भाग १, पृ. ३१८, ३२०.

४ कित्ता भाग १ : ४३, १५१, १६२.

परिणाम झाला व त्यांचा हळूहळू ऱ्हास झाला. पण शिवाजीच्या स्वाऱ्यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारी कार्यावर घणाघाती प्रहार केला.[१] शिवाजीला व्यापारउदीमाच्या महत्त्वाची पूर्ण जाणीव असल्याने त्याने व्यापारउदीमास उत्तेजन देण्याची पराकाष्ठा केली. त्याने ईस्ट इंडिया कंपनीला तिचा व्यापारी माल विकण्यासाठी घाटमाथ्यावर देशात नेण्याची परवानगी दिली नाही. पण तो व्यापार-उदीमापुरते इंग्रजांशी सलोख्याचे संबंध ठेवण्यास राजी होता. ईस्ट इंडिया कंपनीस व्यापाराच्या बाबतीत शिवाजी महाराजांकडून प्रोत्साहनाची वागणूकच मिळाली. तरीही कंपनी लोकांच्या साध्या राहणीमुळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर व्यापार करू शकली नाही. शिवाजी महाराजांस त्यांच्या जवळ असलेल्या मोठ्या प्रमाणावरील मालाच्या विक्रीसाठी मुंबईस आपल्या व्यापाऱ्यांसाठी एक गोदाम बांधावयाचे होते आणि कंपनी ह्या गोष्टीचा स्वागतार्हसंधी म्हणून उपयोग करून शिवाजी महाराजांच्या मुलखात आपला व्यापार वाढविण्यास उत्सुक होती.[२]

कोकण प्रदेशात मीठ, जहाजे बांधणी, सुकी मासळी, आंबे, काजूच्या बिया, सागवानी लाकूड, नारळ व काथ्याचे दोरखंड वगैरे धंदे आढळतात.

कोकणात मिठाचा धंदा किनाऱ्यालगतच्या प्रदेशात भरभराटीला आला. वसई, पेण, पनवेल व इतर किनारपट्टीवरील गावांमध्ये मीठ बनविले जात असे.[३] मीठ भरपूर प्रमाणात तयार केले जाऊन ते या गावांतून इतर ठिकाणी निर्यात केले जात असे. परंतु कोकणातील बनविलेल्या मिठाला पोर्तुगीज प्रदेशातून होणाऱ्या मिठाबरोबर स्पर्धा करावी लागत असे. शिवाजी महाराजांस या मिठाच्या गृहउद्योगाला या स्पर्धेपासून संरक्षण द्यावयाचे होते. म्हणून त्यानी पोर्तुगीज प्रदेशातून आयात केल्या जाणाऱ्या मिठावर भक्कम कर बसविला. याचा दुहेरी फायदा झाला. बाहेरून आयात होणाऱ्या मिठावर नियंत्रण घातल्यामुळे स्थानिक मिठाची निर्यात व विक्री वाढली आणि सरकारी तिजोरीतही भर पडायला लागली. शिवाजी महाराजांस मिठाच्या धंद्यापासून होणाऱ्या उत्पनाची चांगली कल्पना होती.[४]

---

१ शिवचरित्र पत्रसारसंग्रह भाग १, १०४३, १०६१, १०७४.

२ इंग्लिश रेकॉर्ड ऑन शिवाजी भाग १ : ३१५.

३ कित्ता, पृ. ३८२.

४ इकॉनॉमिक आस्पेक्टस ऑफ मेडिकल इंडिया. पृ. २८१.

कोकण किनारा म्हणजे उद्याने व फळबागा यांचे एक मनोहारी चित्रच होते. समुद्रातला गाळ, वाळू यांनी संपन्न अशी कुलाबा जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यालगतची जमीन ही फळबागांना सुयोग्य अशी जमीन होती. देशावरच्या व कोकणातल्या पाण्याने शिंपल्या जाणाऱ्या जमिनी फळबागाच्या वाढीला योग्य होत्या. या बागातून आंबे, नारळ, रताळी, सुपाऱ्या, दारू, खाण्याची पाने, ताड, अननस, फणस, आणि विविध प्रकारच्या भाज्या मुबलक मिळत असत. फळबागांचा धंदा करणे हा पुष्कळ कुटुंबाचा किफायतशीर उद्योग होता. रामदासांनी फळबागांवरच्या प्रकरणात या विषयी विस्तृत माहिती दिली आहे. आंबा, नाना, ऐन, हेदू, कळंब, आसन, सावी, जांभूळ, भिसू, विजापाटा, हिरडा, महुवा (मोह) ही आणखी झाडे जी या अरण्यात होत असत. संत रामदासांनी महाराष्ट्राच्या अरण्यात होणाऱ्या विविध प्रकारच्या झाडांचे वर्णन केले आहे.

आंब्याच्या लाकडाचा उपयोग शेतीच्या अवजारासाठी होत असे. ऐन लाकूड हे सागवानी लागडाच्या बरोबरीचेच समजले जात असे व ते सर्व प्रकारच्या बांधकामात उपयोगात आणले जात असे. कळंब लाकडाचा उपयोग हलक्या बांधकामासाठी केला जात असे. शिसू किंवा शिसे हे एक उत्तम प्रतीचे लाकूड होते व ते मुख्यतः उत्तम प्रतीचे फर्नीचर बनविण्यासाठी वापरले जात असे. जे लाकूड कोणत्याही वस्तू बनविण्यासाठी वापरले जात नसे ते मोठ्या प्रमाणात जळण म्हणून वापरले जात असे. बांबूचा उपयोग इमारतीच्या बांधकामात होत असे. बांबूपासून टोपल्या, वेगवेगळ्या प्रकारच्या पराती व इतर वस्तू बनविल्या जात असत. या अरण्यामध्ये लाख, डिंक वगैरे उत्पादन केले जात असे. येथे मसाल्याच्या वनस्पती, औषधी वनस्पती, आवळा, हिरडा, मिळत असे. एका विशिष्ट प्रकारच्या पानापासून विड्या तयार केल्या जात असत. इतर प्रकारच्या पानाचा उपयोग टोपल्या, पत्रावळी, इरली वगैरे बनविण्यासाठी केला जात असे.[१]

शिवाजीच्या कारकीर्दीच्या सुरवातीला हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील सर्व व्यापार मोगलांच्या व विजापूरच्या सुलतानाच्या स्वामित्वाखालील जहाज मालक असलेल्या भारतीय व्यापाऱ्यांच्या हातात होता. परंतु युरोपिय

१ कर्णिक, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. १०५.

लोकांचे आगमन झाल्यानंतर त्यांनी पश्चिम किनाऱ्यावरील बहुसंख्य महत्त्वाच्या बंदरांचा ताबा घेतला. डचांनी आपले वेंगुर्ला येथे वर्चस्व स्थापन केले होते.[१] पोर्तुगीजांच्या हातात वसई, चेऊल, दमण व गोवा ही बंदरे होती. सिद्द्यांकडे कुलाबा जिल्ह्यातील जंजिरा होते. आणि ब्रिटिशांच्या मुंबई, कारवार, सुरत, वगैरे ठिकाणी व्यापारी पेठा होत्या. परदेशी नाविक सत्तांबरोबर त्यावेळी त्या परिस्थितीतसुद्धा मुकाबला करणे शिवाजीला केवळ अशक्य होते कारण त्याचे स्वतःचे असे नौदल नव्हते आणि म्हणून शिवाजीला जहाज बांधणीचा कार्यक्रम सुरू करणे क्रमप्राप्त झाले. त्यांनी हा आपला कार्यक्रम सर्व अडचणींवर मात करून पूर्ण केला.

वस्तुतः कोकणातील बंदरे विजापूरच्या आदिलशहाच्या अधिसत्तेखाली होती. पोर्तुगिजांनी १५ डिसेंबर १६३८ त विजापूरकरांशी तह केला होता. या तहनाम्यास एकंदर बारा कलमे आहेत. अकराव्या कलमान्वये विजापूरकर व पोर्तुगीज यांच्यामध्ये असे ठरले होते की जहाजे, गलबते व होड्या राजेसाहेबांच्या शाही बंदरातून सफर करतील त्यांस पोर्तुगिजांनी मलबारी व इतर यांच्यापासून संरक्षण दिले पाहिजे व त्यास सोबत दिली पाहिजे.[२] त्याचप्रमाणे त्यांनी सर्व प्रकारच्या सवलती दिल्या पाहिजेत आणि ज्या अर्थी पोर्तुगिजांना या तहनाम्याचे पालन करणे अपरिहार्य होते, त्या अर्थी पोर्तुगिजांनी राजेसाहेबांच्या जहाजांना संरक्षणाच्या दृष्टीने अभय दिले व चाच्यांच्या भीतीने विजापूरकरांना सवलत म्हणून आपली जहाजे त्यांच्या प्रदेशात पाठविण्याचे सोडून दिले.

विजापूरकर व शिवाजी यांच्यामध्ये तद्नंतर झालेल्या शांतता करारानुसार (१९ सप्टेंबर १६६१) पोर्तुगिजांचे समुद्रमार्गे त्यांच्या हद्दीतून जाणाऱ्या जहाजांना मुक्त वाट द्यावी असे ठरले.[३]

१५३० मध्ये साष्टी (सालसेत) ताब्यात घेतल्यावर पोर्तुगिजांना आजूबाजूच्या प्रदेशात आपली अधिसत्ता विस्तारित करण्यास वाव मिळाला. त्यानंतर त्यांनी वसईवर आपला कब्जा स्थापित केला. ख्रिश्चन धर्माचा प्रचारही

१ सरकार, शिवाजी ॲन्ड हिज टाईम्स, (५ वी आ.), पृ. २६०.

२ बेंद्रे, महाराष्ट्रातील पोर्तुगिजांच्या हालचाली, पृ. ६०-६३.

३ सरकार, शिवाजी, पृ. ३०३.

त्यांनी धूमधडाक्याने चालवून कोकण प्रदेशातील हिंदूचा धार्मिक छळ, हिंदूना फूस लावून त्यांचे धर्मांतर करणे या गोष्टीमुळे शिवाजी महाराज व पोर्तुगीज यांच्यामध्ये तंटा निर्माण झाला.[१] समग्र कोकण प्रदेशातील ज्या एका राज्याची पोर्तुगिजांना भीती वाटत होती ते म्हणजे अहमदनगर. विजापूरकरांपेक्षा आपला या राज्यावरील हक्क अधिक बळकट आहे असे शिवाजी महाराजांस वाटत होते. विजापूरच्या सुलतानाने महाराष्ट्रात बळजबरीने प्रवेश केला आहे असे शिवाजीस वाटत असे. इ. स. १६५६ मध्ये मोगलांनी विजापूरच्या राज्यावर हल्ला केला. सागरी प्रवेश साध्य करण्यासाठी ही संधी साधून घेतली. २३ एप्रिल १६५७ रोजी औरंगजेब बादशहास लिहिलेल्या एका पत्रात त्याने बादशहास विनंती केली आहे की, त्यावेळी शिवाजीच्या ताब्यात असलेले विजापूरकरांचे सर्व किल्ल्यावर त्याचा (शिवाजीचा) हक्क मान्य करावा.[२] औरंगजेबाने ही विनंती मान्य केली आणि दाभोळ बंदराचा काही भाग त्याला जोडून असलेला काही प्रदेश ताब्यात घेण्याची परवानगी दिली.

कोकण जिंकल्यावर किरवाडी, लिंगाणा, कल्याण व भिंवडी येथील किल्ल्यांचे रूपांतर नाविक तळात करण्यात आले. कल्याणचा उपयोग शेजारचे पोर्तुगीज प्रदेश लुटण्यासाठीही करण्यात आला.

शिवाजी महाराजांनी किल्ले बांधणी व असलेले किल्ले दुरुस्त करण्याची मोहीम उघडली. त्यामुळे कामगारांस रोजगार मिळू लागला. प्रदीर्घ अशा किनारपट्टीचे संरक्षण करण्यासाठी सागरी किल्ले बांधण्याचे शिवाजीने ठरविले. दांडाराजापूरी येथील डोंगरावर त्याने एक किल्ला बांधला. त्या प्रदेशातले डोंगरमाथे त्याने निवडले. त्याची तटबंदी केली. १६५३ ते १६८० या काळांत शिवाजीने विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग व कुलाबा हे सागरी किल्ले बांधले.

कोकणच्या इतिहासात पुढे महत्त्वाची भूमिका बजावलेले अनेक किनारपट्टीवरील किल्ले बांधण्याचे काम त्याने हाती घेतले. किल्ले बांधण्याचे काम सुरू करून शिवाजीने कोकणच्या लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. किल्ले म्हणजे नौदलाचे एक अंग होते. युद्धकाळात

१ टी. व्ही. पर्वते (ट्रान्सलेटर) पोर्तुगीज-मराठा रिलेशन्स, पृ. ५२.

२ इंग्लिश रेकॉर्ड ऑन शिवाजी, खंड १, पृ. २७५, २३३.

युद्धसामग्रीचा पुरवठा करण्याची केंद्रे आणि नौदलाला युद्धकाळातील आश्रयस्थाने म्हणून या किल्ल्यांचा उपयोग होत असे. युद्धनौका त्यांना लागणाऱ्या सामग्रीचा पुरवठा या किल्ल्यांमधून करून घेत असत. दरवर्षी पावसाळ्यात नौदल एखाद्या चांगल्या किल्ल्याच्या दृष्टिक्षेपात असलेल्या बंदरात आश्रय घेत असे. अशा रीतीने शिवाजीने सागरावर आपले आधिपत्य स्थापन केले.[१]

मध्ययुगीन काळापासून कोकण प्रदेश उत्पादन, संग्रहण व वितरण यांसाठी प्रसिद्ध होता. परदेशी व्यापारी कोकणच्या किनाऱ्यावर आकर्षिले जात असत. दोन मुसलमान सत्तांमध्ये कोकण विभागला गेला होता. उत्तर कोकण हे निजामशाहीत होते आणि विजापूरचा राजा दक्षिण कोकणात राज्य करीत होता. पोर्तुगिजांनी १५१० साली गोवा जिंकून घेऊन कोकण किनाऱ्यावर आपली अधिसत्ता स्थापन केली. पुढे पोर्तुगिजांनी पश्चिम किनाऱ्यावर विशेष करून कुलाबा व ठाणे जिल्ह्यांत आपले स्थान बळकट केले.[२] गोवा, दमण व दीव या प्रदेशावर त्यांनी आपली अधिसत्ता स्थापन केली. चौल या बंदरात पोर्तुगिजांची एक वसाहत होती. परंतु आजूबाजूची गावे ही निजामशाही राज्याच्या ताब्यात होती. इ. स. १६२५ पर्यंत हा प्रदेश इ. स. १६व्या व १७व्या शतकातील सर्वांत मोठा निजामशाही राज्यातील व्यापारी केंद्र म्हणून अस्तित्वात होता.[३] बार्बोझा व पिरश या १६व्या शतकात आलेल्या पोर्तुगीज प्रवाशांनी दिलेल्या माहितीवरून आपणांस किनारपट्टीवरील व्यापाराच्या एकंदर स्वरूपाची कल्पना येते. बार्बोझाने चौल व दाभोळ येथील व्यापारी समुद्रमार्गी दिवसा कसे जात असत याचे वर्णन केले आहे.[४] चौलचे व्यापारी तलम मलमलचे कापड विकत घेऊन अरबस्थानला व पर्शियाला पगड्या बनविण्यासाठी पाठवीत असत. १६व्या शतकाच्या शेवटच्या भागात दाभोळ, चौल, खंबायत व दीव ही किनारपट्टीवरील वाहतूक वाढविण्यात अग्रेसर अशी बंदरे होती. आदिलशहाने गोवा घेतल्यावर समुद्रमार्गाने चालणाऱ्या व्यापाराचा मोठा हिस्सा पोर्तुगिजांच्या

१ इंग्लिश रेकॉर्ड ऑन शिवाजी (१६६८-१६६९), पृ. ७३-७४.

२ कित्ता (१६५५-१६६०), पृ. ३६४.

३ कुलकर्णी, शिवकालीन महाराष्ट्र, पृ. ८५.

४ शिवचरित्र साहित्य, भाग १, पत्र क्र. १०१९.

हातात गेला. या कालावधीत कोकणच्या प्रदेशाचा तांबडा समुद्र व पर्शियन आखात या प्रदेशांशी फार भरभराटीत व्यापार चालला होता.[१] आणि कोकणच्या बंदरातून पोर्तुगालला जाण्यासाठी मालाने भरलेली जहाजे जात असत. १६व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात चौल हे शहर तेथील रेशमासाठी कशिदा केलेल्या शाली आणि सुती मालासाठी प्रसिद्ध होते.[२] ठाणे, कल्याण व भिवंडी ही शहरेसुद्धा वस्त्रोद्योगासाठी प्रसिद्ध होती. उत्तर कोकणातील दुसरे महत्त्वाचे बंदर म्हणजे वसई. परंतु वसई पोर्तुगिजांच्या ताब्यात होती. दाणागोट्याचे म्हणजे उत्तर कोकणातील १६व्या शतकाच्या अखेरच्या काळातले वसई हे एक महत्त्वाचे केंद्र होते. जहाज बांधणीच्या उद्योगाचे ते प्रमुख व्यापारी केंद्र होते आणि लाकडाचा फार मोठा पुरवठा सबंध देशाला होत असे.[३]

दाभोळ हे प्रमुख व्यापारी केंद्र होते. दाभोळ व्यापारी आग्नेय आशियातील देशांशी व्यापार करीत असत. इ. स. १६३१ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने हिंदुस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावर व्यापारी संबंध जोपासण्याच्या योजनामध्ये दाभोळचा समावेश करून घेतला होता.[४] मिडलटनने १६१२ साली दाभोळला भेट दिली. तेथील गव्हर्नरने त्याचे स्वागत केले. इ. स. १६१७ साली सर टॉमस रो यांनेसुद्धा गव्हर्नरला पत्र लिहून ब्रिटिशांबरोबर व्यापार सुरू करण्याची विनंती केली.[५] जैतापूर आणि वेंगुर्ला ही आणखी दोन महत्त्वाची बंदरे होती. तेथील रेशीम, नीळ व मिरी ही फार प्रसिद्ध होती. इ. स. १६३७ ते ३९ मध्ये प्रथमतःच ज्याला खुला व्यापार म्हणतात तो सुरू झाला.[६] सर विल्यम कोर्टीन यांच्या संस्थेने राजापूरला फॅक्टरी उघडली. फ्रेंचांनीसुद्धा १६६७ मध्ये फॅक्टरी उघडली होती. राजापूर व चौल येथे प्रवासाला असताना थांबलेल्या अबें कारे या फ्रेंच प्रवाशाला चांगली वागणूक देण्यात आली. डच लोकांची वेंगुर्ल्याला वसाहत होती. बंदरात नांगर टाकून जहाजांना माल पुरविण्याचे काम ते करीत असत.

१ गुहा जे. पी. (संपा.), धी व्हॉयजीस ऑफ थॅवेनॉट अॅन्ड करेरी, पृ. २२१.

२ तमास्कर, लायफ अॅन्ड वर्क ऑफ मलिकअंबर, पृ. ३५५.

३ कुलाबा गॅझेटिअर्स (जुने), पृ. ७३३.

४ शिवचरित्र साहित्य भाग १०, पत्र क्र. २२.

५ गुहा जे. पी., कित्ता, पृ. २११.

६ गुहा जे. पी., (संपा.) इंडिया इन धी सेवटींथ सेंच्युरी, खंड २, पृ. १४०.

बटेरीआ, जपान, बंगाल, सिलोन आणि सुरतकडे किंवा मस्कत व तांबड्या समुद्राच्या दिशेने जाणारी अथवा येणारी सर्व जहाजे येथील उत्तम असे पाणी व दाणागोटा घेण्यासाठी या बंदरांत नांगर टाकीत असत. उत्तम प्रकारचे मसाले व वेलदोडा यासाठी वेंगुर्ला प्रसिद्ध होते. त्याचप्रमाणे येथले जाडेभरडे कपडे व ताग फार प्रसिद्ध होते. कारण त्याचा उपयोग मालाचे गठ्ठे बांधण्यासाठी होत असे.[१]

कोकणात मिळणाऱ्या व परदेशात जाणाऱ्या किनारपट्टीवरील खप असणाऱ्या वस्तू म्हणजे वस्त्रे, मलमल आणि कशिदा काढलेल्या शाली व त्याशिवाय नीळ, मिरी व इतर मसाल्याचे पदार्थ, सोरामीठ, अन्नधान्य आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे लाकूड आणि रत्ने. वरील वस्तूंची भरलेली जहाजे कोकणच्या बंदरातून तांबड्या समुद्रात पर्शियन आखातात इंडोचायना वगैरे ठिकाणी जात असत.[२] पर्शियन आखातांत जाणारी व मस्कतच्या बेटात जाणारी जहाजे राजापूरला थांबत असत. इंग्लंडच्या मार्गावर असलेली व सुरत येथे ज्या जहाजात माल कमी असल्यास कोकणच्या बंदरात माल घ्यायला जात असत. द लाव्हल म्हणतो मस्कत व बसरा येथून युरोपला परत जाणारी जहाजे कोकणच्या बंदरात माल भरण्यासाठी आलेली त्याने पाहिली होती. चौलहून बसऱ्याला जाणाऱ्या एका जहाजातून त्याने माल नेला होता.[३] सोळाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात हिंदुस्थानात असलेल्या लिन्शोटेन याने नमूद केले आहे की, चौलहून तांबड्या समुद्रात मक्केच्या आखातात जहाजे जाताना त्यांनी पाहिली आहेत. दाभोळची जहाजे इ. स. १६१९ पासून तांबड्या समुद्रात व्यापार करीत असत. परंतु डच लोकांनी त्यांच्यावर हल्ला केला. इ. स. १६३५ नंतर ईस्ट इंडिया कंपनीची जहाजे दाभोळ, राजापूर व जैतापूर या बंदरात व्यापारासाठी येऊ लागली. या बंदरातून त्यांना सोरामीठ व मिरी मिळत असे. मराठ्यांच्या लढायामुळे अडथळे निर्माण झाले तरी १६७० साली मीठ उतरल्यावर आणि रिव्हेंज, हंटर व फिल्कॅम या जहाजांना गाठल्यावर इंग्लिश फॅक्टऱ्यांना राजापूरहून मीठ घेता आले. चौलच्या वरच्या भागात स्थानिक

१ शिवकालीन पत्रसारसंग्रह, भाग २, पत्र क्र. १५३६, पृ. ४४२.

२ सेन एस. पी., फॉरेन बायोग्राफीज ऑफ शिवाजी, पृ. ५०.

३ शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे-पत्र क्र. १७.

लोक ज्याला ट्रगेज रेशीम म्हणत असत त्या रेशमाचा व्यापार करण्याचा त्याचा विचार होता. ब्रिटिश व्यापारी राजापूरहून इंग्लंडला जहाजातून माल थेट नेत असत. राजापूरची जहाजे सुमात्राच्या पश्चिम किनाऱ्यालगतच्या देशांबरोबर व्यापार करीत असत.[१] बाजारपेठेतल्या अनिश्चित परिस्थितीमुळे व्यापार नेहमीच सुरक्षित चालत असे असे नाही. अशा परिस्थितीत ब्रिटिशांनी कोकण किनाऱ्याचा त्यांच्या फायद्यासाठी जास्तीत जास्त उपयोग करून घेतला. पुष्कळदा त्यांच्या जहाजांना ते ती युरोपला जाताना वाटेत कोकणच्या किनाऱ्यावरच्या बंदरात जाऊन स्वस्त किंमतीला ज्या वस्तू मिळतील त्या विकत घेण्यास सांगत असत. हेच धोरण तांबड्या समुद्राच्या व पर्शियन आखाताच्या परिसरात वावरणाऱ्या जहाजांच्या बाबतीतही अवलंबण्यात आले. दुसरी सर्वसामान्य अंगीकारण्यात आलेली पद्धत म्हणजे ब्रिटिश गलबतांतून माल नेण्याची सवलत. ही सवलत पर्शियन व इतर देशांना माल घेऊन जाणाऱ्या कोकणच्या व्यापाऱ्यांना होती.[२]

पोर्तुगिजांची कार्ताझ (परवाना) पद्धती डच व ब्रिटिश लोकांनीही चालू केली. डच जहाजे कोकणातील गलबतांना परवाने देत असत आणि मगच ती तांबड्या समुद्राच्या परिसरात जाऊ शकत असत. डच लोक कार्ताझ पद्धत फार काटेकोरपणे आचरणात आणीत असत.[३] जेथे मोगल बादशहा अकबर व औरंगजेब यांनासुद्धा पोर्तुगिजांनी कार्ताझ परवाने घेणे भाग पाडले तेथे कोकणातल्या व्यापाऱ्यांनी कार्ताझ पद्धत अंगीकारली यात आश्चर्य ते काय? शिवाजी महाराजांनी एतद्देशीय तथा युरोपियन व्यापाऱ्यांना कोकण किनाऱ्यावर व्यापार करण्याची मुभा दिली. या संबंधात दोन नावे विशेषकरून घेतली जातात. निराजी पंडीत आणि मोरो पंडीत. ब्रिटिशांशी बोलणी करताना हे दोघे शिवाजी महाराजांचे प्रमुख मध्यस्त म्हणून असावयाचे.[४]

इतर ठिकाणच्या प्रमाणे कोकणातील व्यापारी हे निरनिराळ्या धर्माचे व वंशांचे असत. बाळाजी चौरोजी व बाजी शिवपत यांसारखे काही श्रीमंत व्यापारी होते. नारायण शेणवी यांसारखे काही लहान व्यापारी इंग्लिश

१ इंग्लिश फॅक्टरी इन इंडिया (१६४६-१६५०), पृ. ६०.

२ कित्ता, पृ. ११६.

३ कित्ता (१६१८-१६२१), पृ. ३२४-३२५.

४ कित्ता (१६६८-१६६९), पृ. ७३-७४.

कंपनीचे दलाल म्हणून काम करीत असत.[१] दलालांमध्ये आपल्याला बेनीदेश, बेमुलदास, रामचंद्र, हरी, मेहता, वाणीजी ही नावे आढळतात. हे सगळे कोकणी होते की बाहेरचे होते हे स्पष्ट होत नाही, तत्कालीन मराठी अभिलेखात त्याचप्रमाणे ईस्ट इंडिया कंपनीच्या अभिलेखात राजापूर, दाभोळ या बंदरांचा उल्लेख शिवाजी महाराजांच्या अधिपत्याखालील भरभराटीस आलेली व्यापारी केंद्रे असा केला जातो.[२] थेवनाट आपल्या प्रवासवर्णनात म्हणतो, चौल ते गोव्यापर्यंत सबंध २५० मैलाची किनारपट्टी महाराष्ट्राची शिवाजी महाराजांच्या ताब्यात होती. त्यांचे कितीतरी किल्ले होते व शहरेही होती.[३] शिवरायांच्या काळी महाराष्ट्रातील व्यापारी केंद्रे कोकण प्रदेशात अधिक भरभराटीला आली. यापैकी कल्याण, भिवंडी, चौल, राजापूर, दाभोळ, वेंगुर्ला, पेण ही एकदम भरभराटीला आलेली उद्योगधंदे असलेली व्यापारी केंद्रे होती. सुरत व गोवा यांच्याशी तुलना करू शकणारी दाभोळ व चौल ही महत्त्वाची व्यापारी केंद्रे गणली जात होती व त्याशिवाय परदेशी व आंतरदेशीय व्यापार करणारी उत्तम बंदरे होती. सतराव्या शतकात कल्याण, भिवंडी, पनवेल ही शहरे विणकाम वस्त्रोद्योगाबद्दल प्रसिद्ध होती. धुवट कापड, शेले व पागोटी बनविण्याची ही केंद्रे होती. तेथे बनविलेला माल मुंबईला निर्यात केला जात असे.[४] चेऊल हेसुद्धा व्यापारी कारखानदारीचे केंद्र होते. शिवरायाने या शहराचा ताबा इ. स. १६७० मध्ये मिळविला. येथील रेशीम जगप्रसिद्ध होते. त्याचप्रमाणे तेथे तयार होणारे रंगीत कापडपण प्रसिद्ध होते. शहरातले विणकर वर्षाला पाच हजार टाफेटा कापडाचे तागे तयार करीत असत.[५] त्यासाठी लागणारे कच्चे रेशीम मुंबईहून आयात करीत असत. परदेशी प्रवाशांच्या वर्णनात चेऊलच्या औद्योगिक प्रगतीसंबंधी पुष्कळ संदर्भ सापडतात. डॉ. फ्रायर यांच्या मते हे शहर म्हणजे त्या काळातील दक्षिण हिंदुस्थानातल्या सर्व वस्तू मिळणारी एक बाजारपेठच होती. पण शिवाजी

१ इंग्लिश फॅक्टरी इन इंडिया (१६४६-१६५०) पृ. ६०.

२ खोबरेकर, कोकणचा राजकीय इतिहास, पृ. ६०-६१.

३ धी व्हायजीस ऑफ थॅवेनॉट ॲन्ड करेरी, पृ. २२१.

४ तमास्कर, लाइफ ॲन्ड वर्क ऑफ मलिकंबर, पृ. ३५५.

५ शिवचरित्र साहित्य, भाग १०, पत्र क्र. २२.

व मोगल यांच्यामधल्या लढायामुळे या शहराचे नुकसान झाले. थेवनॉट म्हणतो चेऊलच्या बंदरात प्रवेश करणे फार कठीण होते पण हे बंदर वादळी हवेपासून सुरक्षित होते.[१]

चेऊल हे एक दमदार शहर होते आणि डोंगरावर बांधलेल्या एका बालेकिल्ल्याकरवी त्याचे संरक्षण केले जात असे. टोमास निकोलसने १६७३ साली भेट दिल्यानंतर त्या शहराचे पुढील शब्दात वर्णन करून ठेवले आहे. 'या शहरात सुंदर इमारती आहेत. परंतु त्यातल्या तीन तृतीयांश मोडकळीस आलेल्या आहेत. त्यामुळे शहराची लोकसंख्या घटली आहे.' कोस्मदाद गार्दा याने १७ व्या शतकांतील या नगराचे चांगले वर्णन दिले आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे चेऊलच्या वरच्या भागात मुसलमान व हिंदू लोकांची वस्ती होती. हे सर्व श्रीमंत व्यापारी होते. त्याचप्रमाणे बरेचसे विणकर व्यापारी होते व त्यांच्याकडे सुंदर माल मिळत असे. सर्व लोक फार कष्ट करून आपला उद्योगधंदा भरभराटीला आणण्यासाठी व आपल्या शहराचा उत्कर्ष साधण्यासाठी प्रयत्नशील असत.[२]

बालाघाट, कल्याण, भिवंडी येथून निर्यात करण्यासाठी आणण्यात येणारे आणि हिंदुस्थानाबाहेरून वरील शहरासाठी येणारे कापड येऊन येथे एकत्र करण्यात येत असे.[३] सोरामीठ, मिरी येथून रास्त दराने घेतले जात असे. राजापूर, सुरत व मुंबई येथील बाजारपेठेत येथील माल मोठ्या प्रमाणात संपत असे. येथे गुजराथी व्यापारी आणि श्रीमंत व्यावसायिक त्याचप्रमाणे अत्युत्तम असा माल विकायला आलेले विणकर राहत. त्या सर्वांच्या अथक परिश्रमामुळे आणि त्यांच्या व्यापार करण्याच्या कौशल्यामुळे त्या भूमीला प्रगतशील केले होते. हे शहर महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल हिंदुस्थानचे प्रमुख व्यापारी केंद्रे बनले होते. देशाच्या वेगवेगळ्या भागातून आलेले सुती कापड गोळा करण्याचे हे शहर एक केंद्र होते.[४]

बालाघाटामधून येणारे निरनिराळ्या कापडाचे नमुने बालाघाट, कल्याण व भिवंडी येथून येणारे विविध प्रकारचे कापड आणि हिंदुस्थानाबाहेरील येणारे रंगीत कापड जे बालाघाट, कल्याण, भिवंडी येथे जात असे, चेऊल येथे एकत्र केले जात असे. सोरामीठ, मिरी येथे अल्प किमतीला मिळत असे. इतर बंदराशी चेऊलचा भरभराटीचा व्यापार चालला होता. यात राजापूर, सुरत व

१ गुहा जे. पी. (संपा.) इंडिया इन धी सेवंटींथ सेंच्युरी, खंड २, पृ. १४०.

२ सेन एस.पी., फॉरेन बायोग्राफीज ऑफ शिवाजी, पृ. ५०.

३ शिवचरित्र साहित्य, भाग १०, ले. २२ व ६.

४ शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे, पृ. १७.

मुंबई यांचा समावेश होता. या शहरात श्रीमंत व गुजराथी व्यापारी वास्तव्य करीत असत. म्हणून शिवाजीने चेऊलच्या सेनापतीला या गुजराथी व्यापाऱ्यांकडून दोन लाख रुपये वसूल करून ते कर्जाऊ म्हणून मला पाठव अशा अर्थाचे पत्र लिहिलेले होते. चेऊलला एक टाकसाळ होती.[१] तेथे चेऊल लड्या पाडल्या जात असत. अशा रीतीने १७ व्या शतकात कल्याण, भिवंडी, चेऊल ही शहरे उद्योगधंदे व कला याबद्दल प्रसिद्ध होती त्यामुळे ही शहरे आकाराने व लोकसंख्येने वाढली.

दाभोळ १६६२ साली स्वराज्याचा भाग झाले. १७ व्या शतकातील मीठ व मिरी यांच्या व्यापाराचे हे शहर महत्त्वाचे केंद्र होते. परदेशी जाणाऱ्या मालाचे हे शहर वाहतुकीचे महत्त्वाचे केंद्र बनले होते.[२] असंख्य जहाजे येथे माल भरून इराण, मस्कत आणि इतर देशांना जात असत.[३] शहरामध्ये एक टाकसाळही होती आणि या टाकसाळीत पाडल्या जाणाऱ्या नाण्यांना दाभोळ लारी म्हणत असत. १७ व्या शतकातले कोकणातले महत्त्वाचे व्यापारी बंदर म्हणजे राजापूर. फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीने येथे आपला कारखाना काढला होता.[४] १६६४ मध्ये राजापूर शिवाजीच्या ताब्यात आले. ईस्ट इंडिया कंपनीच्या (इंग्लिश) कागदपत्रांमध्ये नमूद केल्याप्रमाणे राजापूर त्याकाळी कारवारप्रमाणे एक भरभराटीला आलेले केंद्र होते. येथे सुरतपेक्षा २० टक्क्यांनी माल स्वस्त मिळत असे. शिवाजीने इ. स. १६६० व १६७० मध्ये राजापूरची इंग्लिश फॅक्टरी लुटली होती.[५] परदेशी माल आयात करण्याचे त्याचप्रमाणे देशी माल निर्यात करण्याचे हे एक केंद्र होते. येथील गलबते माल भरून मुंबई, सुरत, मक्का, इराण व मस्कतला जात असत.[६] मुंबई व राजापूर यामधील वाहतूक नियमितपणे चालत असे. मिरी, नारळ, सुपारी व कापड हा माल मुख्यत्वेकरून असावयाचा. १६६० साली हेन्री रॅव्हिंग्टन याने असे मत व्यक्त केले होते की, राजापूर भविष्यात सोरामीठ, मिरी, कॅलिको (साधे सफेद कापड) यांच्या व्यापाराचे मोठे केंद्र होईल.[७]

१ सभासद बखर, पृ. ९७.

२ शिवचरित्र साहित्य भाग २, ले. १६८८.

३ शिवशाही-पोर्तुगीज कागदपत्रे, ले. ७९, पृ. ८१.

४ कुलकर्णी, शिवाजी. पृ. २३९.

५ रत्नागिरी गॅझेटिअर्स, पृ. ७८६.

६ शिवचरित्र पत्रसारसंग्रह भाग २, ले. ८८६.

७ इंग्लीश रेकॉर्डस् ऑन शिवाजी भाग १, ले. ३५२.

शहरातील काही श्रीमंत व्यापाऱ्यांच्या मालकीची जहाजे होती. ती लाल समुद्र, बसरा व पर्शिया येथपर्यंत जात असत.[१]

वेंगुर्ला हे दुसरे महत्त्वाचे बंदर होते व ते औद्योगिक केंद्रही होते. (१७ व्या शतकात) डच फॅक्टरीने जाडे भरडे व पातळ कापड तयार करण्याची केंद्रे काढली होती. वेंगुर्ला हे एक मोठे शहर (१६६०). हिंदुस्थानातले सर्वांत चांगले रस्ते तेथे होते.[२] किनारपट्टीवरील व्यापारी केंद्र म्हणून नव्हे तर हिंदुस्थानातील इतर भागातही वेंगुर्ला व्यापारी केंद्र म्हणून गाजले होते. बारसोरलार आणि कर्नाटकांतल्या पुष्कळ भागांतून या बंदरात जहाजे येत असत व तांदूळ व सोरामीठ घेऊन जात असत.[३] मिठाने भरलेली ही जहाजे मणेरीला नेली जात असत. बव्हेरीया, जपान, बंगाल, सिलोन येथील जहाजे या बंदरात येत असत व तेथून ही गलबते माल भरून सुरत, ओर्मुझ, बसरा व लाल समुद्र या भागात पाठविली जात असत.[४] शिवाजी महाराज अरब राष्ट्रांशी या बंदरातून व्यापार करीत असत. मराठे या बंदरात कर्नाटकात खरेदी केलेला माल मस्कतला जाणाऱ्या गलबतातून त्या प्रदेशात पाठवून देत असत. निशाणी होन नावाचे नाणे पाडणारी टाकसाळ शहरात होती.[५] भौगोलिक, आर्थिक कारणामुळे नसली तरी राजकीय कारणांमुळे या शहराची प्रगती झाली. डिचोली हे या मराठी राज्यातले एक मोठे ठाणे होते. येथे इंग्लिश, फ्रेंच, डच व पोर्तुगीज व्यापारी जमातींनी आपली घरे बांधली होती[६] आणि यामुळे परदेशी नागरिकांचे वास्तव्यामुळे वेंगुर्ला या शहराची वाढ झाली आणि त्याची लोकसंख्या वाढली. केळशी, नागोठणे व पेण येथून मुंबईला विविध प्रकारचे व्यापाराचे जिन्नस, तांबे व पत्रा यांसारख्या वस्तू फार मोठ्या प्रमाणात पुरविल्या जात असत. शिवाजीच्या प्रदेशातील पुष्कळशा वस्तू पेणहून मुंबईला पाठविल्या जात असत. महाड हे शहर १७व्या शतकातील महाराष्ट्राची व्यापारी पेठ बनले हा ते असे दिसते.[७] रायगडाचे सानिध्यामुळे पेणचे महत्त्व वाढले असावे असे वाटते. रायगड शिवाजीची राजधानी होती हे निराळे सांगायला नको[८] देश व कोंकण यांच्या देवघेवीचा दुवाच जणू काय रायगड बनले होते. तांदळाची निर्यात देशातून कोकणात व कोकणातून देशावर करण्याचे एक केंद्र म्हणून महाडचा उपयोग केला जातो.[९]

□□

१ कित्ता, ले. १६.
२ रत्नागिरी गॅझेटिअर्स, पृ. ८१२.
३ शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे क्र. ६२-६३.
४ कित्ता, पत्र क्र. ४८.
५ रत्नागिरी गॅझेटिअर्स, पृ. ८१२.
६ कुलकर्णी, शिवाजी, पृ. २३९.
७ इंग्लिश रेकॉर्ड ऑन शिवाजी, भाग २, पृ. ७७.
८ कुलाबा गॅझेटिअर्स, पृ. ३५२.
९ आपटे बी. के., मराठा नेव्ही अॅन्ड मर्चंटशिप्स, पृ. ६८.

६२. सिंहावलोकन

येथपर्यंत शिवशाही संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि राणी ताराबाई यांच्या कर्तृत्वाचे कथन उपलब्ध माहितीच्या आधाराने साधेल तेवढे सुसंगत केले आहे.

शहाजी महाराज अभूतपूर्व प्रयोग आणि असामान्य कर्तृत्व करून परक्यांचे राज्य टिकविण्यासाठी झटले व नंतर स्वतःचे राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आपल्या बापाच्या पराक्रमाच्या कथा आपल्या मातोश्रीकडून ऐकून बाल शिवरायांनी ठरविले की आपण आपले स्वतःचे राज्य उभारू. ह्या विचारास वडील शहाजी महाराज, मातोश्री जिजाबाई, आणि इतर हितचिंतकांनी उचलून धरले. त्यावेळी शहाजी महाराज वडीलपुत्र संभाजीराजे यांसह बंगलोरास होते.

त्याकरिता शहाजी महाराजांनी संभाजीराजे व शिवरायास दोन वर्षे बंगलोरात प्रशिक्षण देऊन त्यांना स्वराज्य स्थापण्यासाठी प्रखर ध्येयवादी बनविले. पुण्यास गेल्यावर बारा मावळातील लोकांच्या सुख-दुःखाशी समरस होऊन त्यांची मैत्री संपादन करणे व वतनदारांचा बंदोबस्त करणे ही दोन कामे शहाजी महाराजांनी शिवरायास सुचविली होती. कर्तव्यदक्ष शिवरायांनी ही दोन्ही कामे केली ती अशी :---

मावळांतील मावळ्यांचे प्रेम संपादन करणे :

इ. स. १६४२त शिवराय, मातोश्री जिजाबाई व कारभारी दादाजी कोंडदेव यांजबरोबर पुण्यास आले. त्यावेळेपासून शिवरायांचा जहागिरीचा कारभार मातोश्रींच्या व दादाजी कोंडदेवांच्या नेतृत्वाखाली सुरू झाला. शहाजी महाराजांच्या पुणे जहागिरीत बारा मावळे समाविष्ट होती. त्यावेळी बारा मावळातील मुलूख राजकीय अंदाधुंदीमुळे उद्ध्वस्त व बेचिराख झाला होता. तिथे लोक आणून वसविणे, गावे स्थिर करणे, जमीन लागवडीखाली आणणे, लोकांना अभय देणे ही कामे केली आणि उजाड भाग पुन्हा एकदा उत्पादक व समृद्ध बनविण्याचे मोठे काम जिजाबाई

व दादाजी कोंडदेव यांनी केले. ही कामे करीत असता शिवरायांनी मावळांतील लोकांशी संपर्क साधून त्यांच्याशी दोस्ती केली. त्यांजबरोबर फिरून सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांचे, अरण्यांचे आणि एकूण महाराष्ट्राचे भौगोलिक ज्ञान मिळविले. सह्याद्रीच्या कडेकपारी, वाटा आणि चोरवाटा त्यांनी लक्षपूर्वक पाहिल्या. तसेच आदिलशाही राजवटीत सरकारी अधिकारी व वतनदार प्रजेचा कसा छळ करीत असत तेही त्यांनी न्याहाळले होते. ह्या बाबतीत मराठ्यांचा इतिहासकार ग्रँट डफ याने शिवरायांचे कौतुक केले आहे. तो म्हणतो " आपणाला आपल्या घराची वास्तू, त्यातली दालने, त्याच्या वाटा आणि ठिकठिकाणच्या खाणाखुणा जशा मिट्ट काळोखात माहीत असतात तसा शिवाजीस महाराष्ट्राचा संपूर्ण भूगोल माहीत होता."

देशज्ञान हा शिवाजी महाराजांच्या कर्तबगारीचा पायाच होता. सेनापती म्हणून इतिहास आणि भूगोल यांचे शिवरायांचे ज्ञान अलौकिक होते. परमानंद सांगतात की, शिवरायांची वाणी मिठ्ठास होती. ह्या मिठ्ठास बोलण्याने महाराजांनी सर्वांचीच मने कशी जिंकली ह्याबद्दल सभासद म्हणतात, " मातब्बर चहु जागचे मराठे यासी आप्तपणा करावा, पत्रे लिहावी; त्यास आणवून भेट घ्यावी ; आपण त्याजकडे जाऊन आम्हास अनुकूल व्हा असे बोलावे ; असे करण्यात ज्यानी महाराजांचे बोलणे परम आदराचे व पराक्रमाचे ऐकावे त्यास वेध लागून वाटावे की, हे परमथोर आहेत ; यांचेच संमते चालावे ; हे सांगतील तैसे करावे ; प्राणही गेले तरी जावोत; परंतु सेवा करून त्यांचे आज्ञेत राहावे अशी सर्वांची चित्ते वेधून घेतली."

ह्या गुणविशेषांमुळे बारा मावळांतील प्रजा आणि किल्लेदार हे सगळे शिवरायांकडे आकर्षित झाले. त्यामुळे मावळ्यांना हाताशी धरून शिवरायांनी रोहिडा, राजगड, तोरणा, सिंहगड, पुरंदर हे किल्ले जिंकून घेतले. ह्या किल्ल्याभोवतालचा मुलूख ताब्यात आल्यावर त्याची व्यवस्था लावण्याचे दुर्धर काम शिवरायांनी दादाजी कोंडदेव व मातोश्री यांच्या साहाय्याने केले. त्यामुळे शिवराय जनतेचे लाडके राजे झाले.

शिवरायांनी रोहिडा किल्ला जिंकून घेतल्यावर रोहिडा खोऱ्याचा देशपांडे दादाजी नरसप्रभू यास विजापूर दरबाराकडून तंबी मिळाली, ती अशी " तू शिरवळ ठाण्यावर रुजू हो, नाहीतर विजापुरी नेऊन गर्दन

मारतील." हे पत्र दादाजीचे वडील नरसीबाबा यांनी राजियांस पाठविले, त्यावर राजियांनी त्यांना पत्र लिहून धीर दिला. त्यात राजे म्हणतात, "शहासी बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाही. श्री रोहिडेश्वर तुमचे खोरीयांतील आदिकुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर स्वयंभू आहे. त्यांनी आम्हास यश दिले व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरवणार आहे. राजश्री दादापंताचे विद्यमाने बावाचे व तुमचे आमचे श्रीपाशी इमान झाले ते कायम वज्रप्राय आहे. त्यात अंतर आम्ही व आमचे वंशज वतन चालावण्याविषयी कमतर करणार नाही. हे राज्य व्हावे हे श्रींचे मनांत फार आहे. " दादाजी नरसप्रभू भूमिगत झाले. घोरपडे बंधू सुभ्यावर आले. परंतु त्यांस कारभारात यश आले नाही. शहाजी महाराजांवर आपली मर्जी असल्याचे आदिलशहाने पुन्हा जाहीर केले आणि दादाजीस सुभा दिला. यानंतर शिवरायांनी वतनदार-जहागिरदारांना दहशत कशी बसविली· ते पाहण्यासारखे आहे.

शिवाजी महाराजांचे वतनविषयी धोरण :

वतन याचा अर्थ सरकारकडून एखाद्या ग्रामाधिकाऱ्यास पाटील, कुलकर्णी, देशमुख यांना त्यांच्या सेवेच्या मोबदल्यात मिळालेली देणगी. ही वंशपरंपरागत असे. शिवराय वतन संस्थेच्या पूर्ण विरोधात होते. कारण एकतर हे देशमुख, देशपांडे, वतनदार, मोकासेदार मन मानेल तशी रयतेकडून वसुली करत आणि जनतेला लुबाडीत. तसेच ह्या वतनदारांच्या गढ्या बळकट असत त्याच्याजवळ फौज असे. त्यामुळे ते सत्तेच्या विरुद्ध भांडत आणि आपले वतन सुरक्षित ठेवण्यासाठी केव्हाही शत्रूला सामील होत. वतनदारांना स्वतःचे चैन, भोगविलास असत. त्यामुळे स्त्रीची अब्रू सुरक्षित नव्हती. पुरुषाचा स्वाभिमान सुरक्षित नव्हता, हे सारे स्वधर्मीय लोक होते या पुंड-पाळेगारांचा बंदोबस्त ही महत्त्वाची कामगिरी महाराजांनी बजाविली. स्वराज्यातील मुलखात शिवरायांनी अशी काही व्यवस्था लावली की तिच्याकडून होणारी बहुजन समाजाची पिळवणूक बंद पडली. रयतेच्या शोषणावर आधारलेली वतन संस्था प्रथम निष्प्रभ करावयाची व नंतर तिचे समूळ उच्चाटन करावयाचे अशी राजियांची योजना होती. ह्या योजनेनुसार शिवरायांनी अफझलखान वधानंतर वाईपासून कोल्हापूरपर्यंतचा प्रदेश जिंकून स्वराज्यात आणिल्यावर त्या प्रदेशांतील वतनदारांची वतने, इनामे, हक्क लाजिम्यासह अनामत केली. तसेच गोसावी, ब्राह्मणांची इनामे बरखास्त केली. सारांश, शिवाजी महाराजांनी स्वराज्यात मुलूख आल्यावर

त्यांतील कुलवतनदाराच्या वृत्ती अमानत केल्या, त्याबरोबर ब्राह्मणांच्याही वृत्ती अनामत केल्या. सातारा प्रांतातील कृष्णा-वेण्णा संगमावरील माहुली गाव ब्रह्मवृंदास अग्रहार होता. हे अग्रहार इनाम खालसा करून महाराजांनी ब्राह्मणांच्या योग्यता व कुटुंबे पाहून त्या त्या योग्य ब्राह्मणास धान्य देवविले होते. यानंतर शिवरायांनी आदिलशाही प्रदेश जिंकून घेण्याचा क्रम चालूच ठेवला. विजापूर सुलतान महमदशहा ४ नोव्हेंबर १६५६ रोजी मरण पावल्यावर औरंगजेबाने आदिलशाहीचे लचके तोडण्यास प्रारंभ केला. विजापूरच्या ताब्यातील काही किल्लेही काबीज केले. तेव्हा राज्य वाचविण्यासाठी आदिलशाहीस औरंगजेबाशी अपमानास्पद तह करावा लागला. तहाप्रमाणे काही मुलूख, किल्ले व दीड कोटी रुपये खंडणी मोगलांस द्यावी लागली. त्याचवेळी शिवरायानीही आदिलशहाच्या ताब्यातील जिंकलेल्या प्रदेशास औरंगजेबाची मान्यता मिळविली. " सांप्रत जे किल्ले व मुलूख विजापुरकरांकडील तुमचे हाती होते, ते पेशजीप्रमाणे होऊन तुमचे मनोगतान्वये बंदर दाभोळ व त्याखालील मुलूख तुम्हास दिला आहे." शिवरायांचा वकील सोनोपंत डबीर यास औरंगजेबाने असे फर्मान दिले. त्यामुळे शिवरायांस जोर येऊन त्यांनी विजापुरकरांच्या ताब्यातील उत्तर व दक्षिण कोकणमधील मुलूख जिंकून घेण्याचा सपाटा चालविला.

१६५७ च्या ऑक्टोबरात शिवरायांस कुणकुण लागली की कल्याण-भिवंडी प्रांताचे बहुतेक स्थानिक प्रमुख आदिलशाही सत्तेचे अन्यायी जूं झुगारून देऊन मुक्त होऊ इच्छित होते. शिवाजी महाराजांनी आपले सरदार आबाजी सोनदेव यास कल्याण-भिवंडी जिंकून स्वराज्यात आणण्यास पाठविले. ते काम ह्या अधिकाऱ्याने केल्यावर महाराजांनी ५ जानेवारी १६५८ला माहुली काबीज केली. नंतर राजमाची, लोहगड हे डोंगरी किल्ले ताब्यात घेतले. अशा रीतीने प्रजेच्या अनुकूलतेने उत्तर कोकण महाराजांच्या ताब्यात आले. त्यानंतर एक-दोन वर्षांत महाराजांनी कुडाळपर्यंत दक्षिण कोकण काबीज करून तेथे आपला अंमल बसविला.

कल्याण १६५७त ताब्यात आल्यावर महाराजांनी कल्याण बंदरात नाविक तळ बनविला आणि गलबते उभी करण्यासाठी गोदीही बांधली.

आरमार हे महाराजांचे वैशिष्ट्य :

आरमारी सामर्थ्याचे महत्त्व जाणणारे शिवाजी महाराज हे सतराव्या शतकातील एकटेच हिंदू राजे होत. राजियांच्या नौदलासंबंधीची विशेष

माहिती 'राज्यकारभार' ह्या प्रकरणात दिली आहे. महाराजांनी प्रचंड नौदल उभारून समुद्रसत्ता स्थापन केली. महाराजांनी आरमार म्हणजे एक स्वतंत्र राज्यांगच मानले. ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र याकरिता आपणांस अवश्यमेव आरमार हवे असा मनाशी दृढ निश्चय करून कल्पकतेने बलाढ्य आरमाराची उभारणी केली.

अशा रीतीने शिवाजी महाराजांच्या आरमाराने भारतीय समुद्रात पाश्चिमात्यांची चालू असणारी अनिर्बंध सत्ता निकालात काढली. शिवरायांची लोकजागृती करण्याची यंत्रणा विलक्षण होती. "हे राज्य व्हावे हे श्रींचे मनात फार आहे" हा श्रींचा संदेश व स्वराज्याचा मंत्र महाराष्ट्राच्या घराघरांत पोचविण्याची यंत्रणा शिवरायांनी उभारली. त्यावेळचे वारकरी, वासुदेव, गवळी, शेतकरी यांना शिवरायांचा स्वराज्याचा संदेश मिळाला. शिवरायांचे कार्य हे आपलेच कार्य आहे असे त्याकाळी महाराष्ट्रातील तमाम रयतेस वाटू लागले. अशी ज्योत जनतेच्या मनात शिवाजी महाराजांनी प्रथम पेटवली म्हणून शतकानुशतके जनता त्यांना आपला त्राता, उद्धारकर्ता मानत आली.

शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यात पददलित कष्टकरी व गोरगरीब शेतकरी होते. दादोजीचे हाताखालील कारकून मंडळी व कित्येक सलगीचे सोबती यांच्या साहाय्याने शिवराय मावळांत गुप्त मसलती करू लागले. येसाजी कंक, तानाजी मालुसरे, बाजी पासलकर वगैरे तरुण मंडळीच्या कान्होजी जेधे, गोमाजी नाईक वगैरे वृद्धांशी वाटाघाटी चालू झाल्या. बरेच देशमुख त्यांना अनुकूल झाले. परंतु बांदल देशमुख, सुपेकर मोहिते, जावळीकर मोरे इत्यादींनी त्यांना विरोध केला. उच्चवर्णीय ब्राह्मणांनीही शिवरायांस त्यांच्या स्वराज्य उद्दिष्ट कामी विरोध केला. त्यास पुढे अवसर सापडताच नरम केले.

राजियांनी अफझलखानास यमसदनास पाठविले व त्याच्या सैन्याचा नाश केला. राजियांनी या विजयाबद्दल पुष्कळ दानधर्म केला. ज्यांनी विशेष पराक्रम केले, त्यास बक्षीस वगैरे देऊन संतुष्ट केले. स्वराज्य स्थापनेस

शिवरायांचा हा अद्‌भूत पराक्रम मुख्यतः कारणीभूत झाला. अचाट कल्पना, साहस, प्रसंगावधान इत्यादी थोर पुरुषाच्या अंगी असणारे गुण त्यांजमध्ये आहेत अशी लोकांची एकदम खात्री होऊन हा कोणीतरी अद्वितीय पुरुष आहे आणि हा म्हणेल ते करील, असा त्यांचा लौकिक सर्वत्र झाला. महाराजांनी आपल्या वैयक्तिक सामर्थ्यांचे दर्शन जनतेस घडविले.

औरंगजेबास अफझलखानाला मारल्याचे वृत्त कळताच त्याने शिवरायांच्या पारिपत्यासाठी आपला मामा शायिस्ताखान याची नेमणूक दक्षिण सुभ्यावर करून त्यास शिवरायांचा पराभव करण्यास सांगितले. शायिस्ताखान स्वतः पुण्यास येऊन त्याने शिवरायांच्या वाड्यात लाल महालात मुक्काम केला. शिवरायांनी शायिस्ताखानावर ५ एप्रिल १६६३ रोजी रात्री छापा घातला. शायिस्ताखानावरील छापा म्हणजे शिवरायांच्या धाडसी वृत्तीचे एक महत्त्वपूर्ण दर्शन होय. हा छापा म्हणजे एक युद्धाचाच भाग होता.

शिवाजी महाराज साधारणतः पंचवीस हजार चौरस मैल क्षेत्रफळ असलेल्या महाराष्ट्राचे राजे होते. पण महाराजांची राजधानी कोकणात रायगडी, नाविक राजधानी कोकणातील सिंधुदुर्ग किल्ल्यावर, कोकण ताब्यात घेऊन कोकणास लागून असलेल्या समुद्रावर नौदलाच्या साहाय्याने त्यांनी स्वामित्व मिळविले. त्यामुळे महाराज वास्तवात कोकणाचे राजे होते. सुरत लुटण्याअगोदर बार्सिलोनवर स्वारी करण्याअगोदर त्या त्या स्थळांची माहिती महाराजांनी गुप्तहेरांकडून मिळविली होती. कर्नाटकात स्वारीवर निघण्यापूर्वी हैदराबाद शहरात एक महिना मुक्काम करून जिंजीपर्यंतच्या भूभागाची माहिती महाराजांनी मिळविली होती. महाराजांच्या दूरदर्शीपणाचे एक ठसठशीत उदाहरण म्हणजे जिंजी जिंकून महाराष्ट्राच्या संकटकाली उपयोगी पडेल असे बचावाचे एक साधन महाराजांनी उभे केले.

शिवराय आणि मोगल :

औरंगजेबाने आपल्या राज्यात जिझिया कर सक्तीने वसूल करायला सुरुवात केली. त्याची प्रतिक्रिया म्हणून शिवरायांनी प्रचंड धाडस करून सुरतेवर धाड घालून ते शहर चार दिवस लुटले आणि सुमारे एक कोटीची दौलत प्राप्त केली. लुटीतून मिळालेला पैसा आरमार उभारण्यात खर्च केला; आरमारी राजधानी सिंधुदुर्ग किल्ला बांधला.

औरंगजेबाने शिवरायांचा पिच्छा सोडला नाही. त्याने शिवरायांस पराभूत करण्यासाठी राजा जयसिंगासारखा पहिल्या दर्जाचा सरदार सर्व अधिकार देऊन दक्षिणेत रवाना केला. शिवरायांनी त्याजपुढे नमते घेतले कारण 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धंत्यजती पंडीतः' या न्यायाने महाराजांनी आपल्या भेटीत राजे जयसिंगास हिंदवी स्वराज्याची कल्पना दिली. राजे महाराजांचे मित्र बनले. राजा जयसिंगाने शिवरायास बादशहाच्या भेटीस जाण्यास उद्युक्त केले. आपल्या सुरक्षिततेची हमी घेतल्यावर शिवराय आग्र्यास गेले. आग्रा भेटीत शिवरायांचे धाडस जास्त की युक्ती जास्त असा संभ्रम होतो.

महाराजांची आग्र्याहून अकल्पित सुटका

आग्र्याहून सुटका करून घेण्यात शिवरायांनी विलक्षण बुद्धिमत्ता दाखविली. जगाच्या इतिहासात जे रोमहर्षक प्रसंग आहेत त्यापैकीच हा एक आहे.

शिवाजी महाराज आग्र्याहून सुटून महाराष्ट्रात परत आल्यावर जनतेने आनंदोत्सव साजरा केला. किल्ल्यांस तोफांची सरबत्ती अहोरात्र चालू झाली. शिवरायांच्या पाठीमागे राज्ययंत्र शिस्तीत चालले होते, फौजा निष्ठेने उभ्या होत्या. प्रजेने उठाव किंवा बंड केले नाही. ह्याचे कारण शिवरायांनी निर्माण केलेला प्रचंड विश्वास आणि जनतेच्या श्रद्धा शिवरायांच्या पाठीशी होत्या. शिवराय महाराष्ट्रात आल्यावर त्यांनी बादशहास न दुखविता नरमाईने वागून कारभारात जास्त लक्ष घातले. जीव बचावण्यासाठी मला पळून यावे लागले. परंतु बादशहाशी मी कोणताही विरोध करू इच्छित नाही. मी वाटेल ती सेवा करण्यास सिद्ध आहे असे नरमाईचे पत्र शिवरायांनी औरंगजेबास पाठविले. तद्नंतर औरंगजेबाशी तह केला आणि उठाव करणार नाही याची खात्री दिली. मुलुखात शांतता नांदू लागली. तो शांततेचा काळ १६६९त संपून इ. स. १६७० सालचा पावसाळा लागण्यापूर्वीच शिवरायांनी पुरंदरच्या तहात जे गमावले ते सारे मिळवून अधिक प्रदेश आपल्या ताब्यात आणला. स्वतंत्र राज्यस्थापनेचा चंग बांधून शिवरायांनी मोगलांशी चार हात केले. मोगलबादशाहीच्या कारस्थानास ते पुरून उरले. मोगलबादशाहीचे सामर्थ्य अफाट. शिवरायांची गाठही औरंगजेबासारख्या समर्थ, धूर्त, दूरदृष्टी, हरतजविजी माणसाशी, पण अफाट मोगली फौजापुढे धीर न सोडता शिवरायांनी स्वतंत्र राज्याची ध्वजा

फडकत ठेवली. जगाच्या इतिहासातील ही एक अतर्क्य गोष्ट होय असे शेजवळकर म्हणतात ते खरेच होय. स्वतंत्र राज्याची निर्मिती केल्याने महाराजाची दूरदृष्टी व तजवीज याही बादशहाच्या दूरदृष्टीपुढे व तजविजीपुढे श्रेष्ठ ठरल्या, असेच इतिहास सांगतो.

राज्याभिषेकाची आवश्यकता :

शिवाजी महाराजांनी स्वतंत्र राज्याची स्थापना केली तरी आदिलशाहीच्या दृष्टिकोनातून महाराज म्हणजे आपल्या जहागिरदाराचा बंडखोर पुत्र. तसेच महाराष्ट्रातील मोरे, सुर्वे, दळवी, निंबाळकर इत्यादी आदिलशाहीतील मराठे सरदार महाराजांना आपल्यासारखेच आदिलशाहीचे चाकर समजत होते. महाराजांनी राज्याभिषेक करण्याचे ठरविल्यानंतर महाराष्ट्रातल्या ब्रह्मवृंदांनी त्याला विरोध केला. त्यांच्या मते हिंदूधर्म शास्त्राप्रमाणे राजा होण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांना आणि क्षत्रियांनाच होता. त्यांच्या मते शिवाजी महाराज क्षत्रिय नव्हते तर क्षुद्र होते. राज्याभिषेकाच्या आवश्यकतेसंबंधी सर जदुनाथ सरकार आपल्या शिवचरित्रात म्हणतात, "शिवाजीने अफाट पराक्रम केले. पुष्कळ प्रांत जिंकले, अगणित संपत्ती मिळविली, शूर फौजा पदरी बाळगल्या, लढाऊ जहाजे बांधली. यामुळे परमेश्वरी संकेताप्रमाणे हजारो लोकांचे जीवित त्यांच्या इच्छेवर अवलंबून राहिले. तथापि, राज्याभिषेकयुक्त राजा ही पदवी प्राप्त झालेली नसल्यामुळे राजकीय संबंधात इतर बादशहांशी वागताना त्याला मोठीच अडचण भासत असे. त्याच्या अलोट साहसाने व प्रखर बुद्धिसामर्थ्याने सर्व जग थक्क होऊन गेले. तरीही औरंगजेब बादशहा त्याला एक लहानसा जमीनदार समजत असे. गोवळकोंड्याची कुतुबशाही दक्षिणेतील असल्याने तेथील बादशहाचीही शिवाजीविषयी भावना आदिलशाहीहून भिन्न असण्याचे कारण नव्हते. या अशा कारणामुळे शिवरायांचा राज्याभिषेक करून घेण्याचा निर्णय अचूक होता. पण शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला महाराष्ट्रातल्या ब्रह्मवृंदांनी विरोध केला. त्याच ब्राह्मणांनी पैशाच्या लोभाने मिर्झाराजे जयसिंग यांना शिवरायांविरुद्ध जय मिळावा म्हणून कोटीचंडी यज्ञ केला, अकरा कोटी अनुष्ठाने तीन महिने केली आणि दोन कोट रुपये, जयसिंगाकडून मिळविले हे महाराजांना ठाऊक असल्यामुळे त्यांनी जरी

काशीहून मूळ नांदेडच्या विद्वान ब्राह्मण गागाभट्ट यास आणवून त्याजकडून साग्रसंगीत राज्याभिषेक वैदिक पद्धतीने करवून घेतला तरी त्यासमयी शिवरायांनी ब्राह्मणास दक्षिणा म्हणून इतके सोने दिले की, त्यांना ते मदतीशिवाय गडावरून खाली आणता येईना. इ. स. १६७८-७९ मध्ये त्यानंतर दक्षिण दिग्विजयाची मोहिम शिवाजीराजांनी काढली. जिंजी, वेलोर हे किल्ले स्वराज्यात आणिले. वीस लाख होनांचा प्रदेश आणि शंभर किल्ले स्वराज्यात सामील केले. या मोहिमेमुळे पूर्व किनाऱ्यावरील शत्रूंचा बिमोड झाला.

शिवाजी महाराजांच्या ध्येयाचा विकास त्यांच्या आयुष्याचा व पराक्रमाच्या विकासाबरोबरच होत होता. दिल्लीच्या तक्तावरून औरंगजेबाची हकालपट्टी करून त्यावर विराजमान होण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्या उतारवयात त्यांच्या मनात होती, ही गोष्ट ईस्ट इंडिया कंपनीस तिच्या हिंदुस्थानातील एका अधिकाऱ्याने इ. स. १६७७-७९ मध्ये लिहिलेल्या एका पत्रात नमूद केली आहे. तो लिहितो, " शिवाजी महाराज अलेक्झांडरसारखा तरबेज असून तो पक्ष्यांप्रमाणे चपळ असलेल्या आपल्या शिपायांच्या साहाय्याने किल्ले काबीज करतो. दक्षिणेची राजधानी विजापूर शहर सर करण्याची व ते ताब्यात घेतल्यावर दिल्लीस कूच करून त्या शहरांत औरंगजेबास कोंडून टाकेपावेतो आपली तलवार म्यानांत घालावयाची नाही अशी शपथ त्याने देवासमोर घेतली आहे. " शिवाजी महाराजांची ही महत्त्वाकांक्षा त्यावेळी सर्वांस विदित झाली होती.

महाराजांची चोख राज्यपद्धती :

शिवाजी महाराज प्रजापालनदक्ष होते. त्यांना राज्यकारभारात लक्ष घालण्यास युद्धाच्या धामधुमीत फुरसत थोडी मिळे. पण ती मिळाली की, स्वराज्य हे सुराज्य बनविण्यात आणि राज्यकारभाराची घडी आपल्या मंत्र्यांच्या साहाय्याने नीट बसविण्यात ते कसूर करीत नसत. स्वराज्यातील लोकस्थिती पाहण्याकरिता स्वतः ते सर्वत्र हिंडून येत.

शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्यास कडक शिस्त लाविली होती. महाराज आपल्या सैन्यास भरपूर वेतन देत असत. स्वराज्य स्थापण्यासाठी

त्यांना सैन्यात नवचैतन्य निर्माण करावे लागले. क्षात्रधर्माचे पालन करणे हे सैनिकांचे आद्य कर्तव्य. त्यांच्या मनावर ठसविण्यासाठी मुद्‌गल कवीच्या रामायणातील युद्धकांडाचे पारायण प्रत्येक किल्ल्यावर शिबंदीच्या लोकात दररोज रात्रौ जेवण झाल्यावर वाचले जाई. अशा रीतीने युद्धकांडाची पारायणे किल्ल्या-किल्ल्यातून होत राहिल्यामुळे मराठ्यांचा क्षात्रधर्म जागृत झाला. तसेच महाराजांनी सैनिकी अधिकाऱ्यास लिहिले, " तुम्ही बाजारात जाल व फुकट वस्तू घ्याल. शेतकऱ्यांना लुबाडून कणसे आणाल म्हणून तुमच्यासाठी सर्व व्यवस्था केली आहे. गवताची काडी फुकट घेतली तर लोक म्हणतील यापेक्षा मोगलाई बरी. " यात मोगलाईचे स्वरूप स्पष्ट करताना स्वराज्याची रूपरेषा मांडली आहे.

शिवरायांची गुरू मातोश्री जिजाबाई :

सर्वगुणसंपन्न ईश्वर प्रेषित शिवाजी महाराज हा एक मराठी मातीने घडविलेला चमत्कार आहे, असे बुद्धिनिष्ठ इतिहासकार मानतात. त्या काळात जनतेच्या मनावर साधुसंत वगैरे धार्मिक पुरुषांचे विशेष वजन असे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता राजियांनी ठिकठिकाणच्या साधु-पुरुषांचा उपदेश ग्रहण केला किंवा त्यांच्या परिमार्थाकरिता इनामे देऊन त्यांचा यथायोग्य गौरव केला. ह्याचे कारण त्यांना लोकसंग्रहाचे उद्दिष्ट गाठायचे होते.

खरे पाहता शिवाजी महाराजांच्या अंगी राज्यसंस्थापक, सेनापती, मुत्सद्दी आणि राष्ट्रसंवर्धक समाजधुरीण अशा चारी क्षेत्रातील अंगच्या प्रवृत्ती होत्या. त्या इतक्या शुद्ध समतोल नैसर्गिक, व्यापक, विधायक आणि श्रेष्ठ दर्जाच्या आढळतात. त्या त्यांना कोणीही पढविल्या नव्हत्या. तसेच चिंचवडचे संत देव व चाफळचे संत रामदास यांचेशी महाराजांचे घरोब्याचे संबंध होते. (चिंचवडचे संत देव यांना मोगल कैदेत असलेल्या राणी येसुबाईंनी दिनांक १९ एप्रिल १७०५ च्या पत्राने पैशांची मदत करावी असे लिहिले.) शिवाजी महाराज कृतीवीर होते. त्यांचे बेत ते ठरवीत आणि ते स्वतः अमलात आणीत, अशी अनेकांनी त्यांच्या आश्चर्यकारक आणि अनपेक्षित हालचालींबद्दल मीमांसा केलेली आहे.

शिवाजी महाराजांचे खरे गुरू मातोश्री जिजाबाई. शिवराय आईच्या सानिध्यात वाढले. आईचे अनुमोदन घेतल्याशिवाय हूडपणे त्यांनी कोणतीही

गोष्ट केली नाही. मातोश्रींकडून शिवरायाला वडिलांची धोरणे, आजोबांची धोरणे व राजकारणे यांची माहिती मिळाली. ती शिवरायांचे लाड मोठ्या कौतुकाने पुरवी.

मातोश्रीनेच शिवरायास रामायण व महाभारत हे दोन राष्ट्रीय स्फूर्तीचे थोर ग्रंथ ऐकविले. शिवरायांस योग्य शिक्षण व प्रोत्साहन देऊन त्याजकडून मराठ्यांचे स्वराज्य स्थापण्याची सिद्धता जिजाबाईंने करून दिली. नानाविध विपत्ती सहन करून जो हा सुयोग तिने घडवून आणविला त्यामुळे तिला "विरसू" "राजमाता" ही स्पृहणीय पदे लाभून महाराष्ट्राचा भाग्योदय झाला. शिवरायांनी आपल्या सर्व मसलती तिच्याच सल्ल्याने पार पाडल्या. शिवराय राज्य चालू झाल्यावर अनेक वाटाघाटीत व घडामोडीत आईचे मार्गदर्शन घेत असत. (रियासत, पृ. ११६) शिवरायांनी आग्र्यास जाण्यास निघण्यापूर्वी आपल्या नूतन राज्याचा मुख्य कारभार मातोश्री जिजाबाईंवर सोपविला आणि मातोश्रीच्या आज्ञेत राहा असे मंत्रिमंडळास सांगितले. तिच्या अंतापर्यंत शिवराय आईच्या सल्ल्याने चालत असत. तीच त्यांचा गुरू होती. अन्य कोणी नव्हते.

□□

[illegible]

[illegible] शिवाजी महाराजांच्या अंगी राज्यसंस्थापक, सेनापती, मुत्सद्दी [illegible]

[illegible]

जनतेचे राज्य स्थापन करणारे युगपुरुष श्री शिवाजी महाराज

शिवरायांचे धार्मिक धोरण :

शिवरायांच्या बालपणी इस्लामी परधर्मीयांचे राज्य महाराष्ट्रात सर्वत्र होते. त्यावेळी हिंदू प्रजा सर्वार्थाने परदास्यात पिचत होती. हिंदूना बाटवून त्यांना इस्लाम धर्माची दीक्षा देणे, त्यांची मंदिरे, मूर्ती वगैरे श्रद्धास्थाने उद्ध्वस्त करणे, हिंदू स्त्रियांचे अपहरण इत्यादी अनेक अत्याचारांना मुस्लिम राज्यात हिंदू प्रजा तोंड देत होती. हे शिवरायांनी लहानपणी पाहिले आणि स्वजनांचे स्वतंत्र राज्य स्थापावयाचे ठरविले. त्याकरिता त्यांनी नियोजनपूर्वक साहसे केली. जीवन मरणाचे लढे दिले आणि हिंदवी स्वराज्याची स्थापना करून आपणांस राज्याभिषेक करवून घेतला. परदास्यात पिळल्या जाणाऱ्या विस्कळीत अशा हिंदू समाजाची जमेल तेवढी एकजूट करण्याचे महाराजांनी आपले धोरण ठरविले.

" हे राज्य व्हावे हे श्रींचे मनात फार आहे " असे महाराज तत्कालीन देशपांडे व वतनदार वीर यांना आपल्या स्वराज्यसिद्धीच्या संकल्पनेत सामील करून घेण्यासाठी सांगत असत. यावरून त्यांच्या संकल्पनेस ईश्वराचे अधिष्ठान होते. इ. स. १६४६ त शिवरायांनी जी मुद्रा पत्रावर केली ती स्वतःच्या राज्याभिषेकानंतरही चालू ठेवली होती. " प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णू विश्ववंदिता। शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते। " म्हणजे प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे हळूहळू वाढणारी आणि विश्वाने वंदिलेली असून विश्वकल्याणासाठीच तिचे अस्तित्व आहे, ही मुद्रा त्यांनी संस्कृत भाषेत केली.

शिवरायांनी परकीय राज्यकर्त्यांचे धार्मिक आणि राजकीय आक्रमण थांबून धरण्यासाठी हिंदवी स्वराज्याची स्थापना करणे हा एकच रामबाण तोडगा आहे, अशी शिकवण तत्कालीन महाराष्ट्रीयांस दिली व स्वराज्याची स्थापना केली.

स्वराज्य संपादनाचे काम चालू असता महाराजांनी स्वराज्यातील ठिकठिकाणच्या साधूसंतांच्या भेटी घेतल्या. तसेच अनेक प्रसंगी मंदिरांना व मठांना मुद्दाम भेटी दिल्या. त्या काळात धार्मिक स्थाने ही जनतेची श्रद्धास्थाने होती. तिथल्या भेटीत तेथे जमणाऱ्या सामान्यजनांचा संपर्कही त्यांना साधता येत असे. शिवकालीन पत्रसारसंग्रहात ब्राह्मणास वर्षासने, अग्रदान, दान व इनाम दिल्याची अनेक पत्रे आहेत. त्यापैकी काही पत्रे सारांशरूपाने इथे दिली आहेत. इ. स. १६५३ मध्ये वेदमूर्ती गोपाळ भट यांनी मातोश्री जिजाबाईंना मंत्रोपदेश दिला. त्याबद्दल त्यांना वर्षासन व दानपत्र देण्यात आले. जुलै १६५३त महाराजांनी सिद्धेश्वर भट यांना त्यांच्या अनुष्ठानबळे आपण राजाधिकारी जालो म्हणून वर्षासन दिले. १६५६ साली दोन काजींना तत्पूर्वी तुटलेली सनद चालू केली, हजरत पीराला इनामती शेतीची सनद दिली.

तसेच १६७१ साली आळंदी येथील ज्ञानदेवाच्या मंदिरास इनाम दिले इ. स. १६७७त चिंचवड देवस्थानातील अन्नखर्च भागविण्यासाठी वतन इनाम दिले.

तिरुपती व चिपळूणजवळील परशुराम क्षेत्रास महाराजांनी वर्षासने दिली होती.

महाराजांनी केलेले शुद्धिकरण :

मुसलमान सत्ताधारी हिंदूवर सतत अत्याचार करीत होते. त्यात हिंदू समाजाच्या व देशाच्या दीर्घकालीन हानीस कारण झालेला सर्वांत मोठा अत्याचार म्हणजे छळ बळाने शेकडो हिंदूचे त्यांनी केलेले धर्मांतर. मुसलमानांनी बाटविलेल्यांना हिंदू धर्मात परत घेण्यास हिंदू समाजाचा फार मोठा विरोध होता. समाजाचा हा विरोध मोडून काढणे, मोठमोठ्या प्रतिष्ठित व्यक्तींनाही त्याकाळी शक्य नसे. उलट बाटविलेल्यांना स्वधर्मात घेण्याची गोष्ट राहोच, त्यांच्याशी अन्नपाण्यादी व्यवहार करणाऱ्यांनाही स्वधर्मास मुकावे लागे. अशा त्या कठीण काळांत विशेषतः सर्व देशभर मुसलमानी सत्तेचा फार मोठा प्रभाव असता शिवाजी महाराजांनी बजाजी निंबाळकर ह्या प्रतिष्ठित व बलाढ्य सरदारास तो विजापूर दरबारच्या बळजबरीने मुसलमान झाला होता, त्यास शुद्ध करून हिंदू धर्मात परत घेतले.

अफझलखानाने बळाने बजाजीस बाटविले असल्याने त्याचा काही दोष नसल्याचे शिवाजी महाराज व मातोश्री जिजाबाई यांनी समाजास पटवून दिले व त्याची शुद्धिकरणास मान्यता मिळविली व शिखर शिंगणापूरच्या उपाध्याकडून हे शुद्धिकार्य करून घेतले. तसेच अशा शुद्धिकरणानंतर शुद्ध झालेली व्यक्ती हिंदू समाजात एकरूप होऊन जाण्यासाठी तिला समाजात समाविष्ट करून घेणे अवश्य असते ही महत्त्वाची बाब लक्षात घेऊन शिवाजी महाराजांनी आपली मुलगी सखुबाई हिचा बजाजीचा मुलगा महादजी याच्याशी विवाह लावून देऊन त्याला पुणे परगण्यातील वाल्हे येथील पाटीलकी दिली व अशा रीतीने या शुद्धिकरणास समाजात प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

दुसरे शुद्धिकरण प्रसिद्ध योद्धा नेताजी पालकरचे. नेताजी पालकर मुसलमान बनून जवळजवळ दहा वर्षे तो औरंगजेबाच्या चाकरीत राहिला. तो १६७६ च्या शिवाजी महाराजांवर औरंगजेबाने काढलेल्या मोहिमेत महाराष्ट्रात दिलेरखानाबरोबर आला आणि सरळ रायगडावर जाऊन महाराजांच्या पाया पडला. महाराजांचे मोठेपण हे की, आठ वर्षे इस्लाम धर्मात काढलेल्या नेताजीला त्यांनी शुद्ध करून परत हिंदू धर्मात घेतले. त्याच्या बायका-मुलांनाही शुद्ध करून घेतले. जबरदस्तीने ख्रिस्ती वा मुसलमान झालेल्या लोकांनी आपल्यालाही शुद्ध करून घ्यावे अशी मागणी केली. अशा मागण्यांची पूर्तता करण्याकरिता शिवाजी महाराजांनी शुद्धिकरण खाते सुरू केले आणि राजियांनी हे शुद्धिकरणाचे काम अष्टप्रधानापैकी पंडितराव यांच्याकडे जी अनेक धार्मिक कामे होती, त्यात शुद्धिकरण हेही एक महत्त्वाचे काम दिले. बाजी देशपांडे यांचा सुपुत्र पिलाजी यांना जंजिऱ्याच्या सिद्दीने कैद करून बाटविले होते. पिलाजी व रामाजी नरसी देशकुळकर्णी यांचा मुलगा शामजी यांची शुद्धिकरणे याच पद्धतीने करण्यात आली.

बाटाबाटी करून हिंदूना ख्रिश्चन धर्म स्वीकार करण्यास लावणाऱ्या गोव्यातील पाद्र्यांस शासन :

हिंदूधर्माच्या व लोकांच्या रक्षणासाठी शिवाजी महाराज कसे वागत याचे एक उद्‌बोधक उदाहरण ३० नोव्हेंबर १६६७ रोजी गोव्याहून लिहिलेल्या इंग्रजी बातमीपत्रांत आले आहे. यावेळी गोव्याच्या व्हाईसरॉयने ख्रिस्ती

धर्मप्रसाराचे कंकण पुन्हा बांधले व तेथील चार पाद्र्यांनी बारदेशांतून बाहेर पडून जवळच्या मुलुखातील हिंदूंना पेचात पकडून ख्रिस्ती करण्यास व जे तसे करण्यास तयार नसतील त्यांचा नाश करण्यास सुरुवात केली. हे ऐकून शिवाजी महाराज संतापले व त्यांनी त्या प्रदेशावर स्वारी करून पोर्तुगिजांना दहशत बसविण्यासाठी पुष्कळ ख्रिस्ती लोकांना त्यांनी ठार मारले आणि पुष्कळांना कैद केले. चार पाद्र्यांचा शिरच्छेद करविला, ही बातमी ऐकून गोवा व्हाईसरॉयला धडकी भरली व त्याने आपली हिंदूंचा नाश करणारी धर्माज्ञा मागे घेतली. शिवाजी महाराज धर्माच्या बाबतीत दुराग्रही नव्हते पण स्वधर्मनिष्ठ खास होते.

विद्येच्या प्रगतीसाठी योजनाबद्ध व्यवस्था :

शिवछत्रपतींचा जीवनपट संघर्षाच्या धाग्यांनी विणलेला होता. तरीपण दूरदर्शी छत्रपतींनी भारतीय विद्येच्या प्रगतीसाठी योजनाबद्ध व्यवस्था केलेली दिसते. चिटणीस लिहितात " वेदशास्त्र अगदी उच्छिन्न जाले, त्यास एक ग्रंथ अधीत जाला त्यास मणभर धान्य, दोन ग्रंथ त्यास दोन मण, पंचग्रंथी, दशग्रंथी यास पाचमण-दहामण परीक्षा करून द्यावे; तसेच पंडित जसा जसा जो विद्वान त्यास योग्यता पाहून, स्वदेशीचे त्यास भात व द्रव्य, विदेशी यास द्रव्य याची वर्षासने व श्रावणमासी सर्वांस पंडितराव यांमनी परीक्षा करून (देत जावी) अधिक मोईज वाढवावी. मोठमोठे पंडित वैदिक, प्रतिष्ठित येतील त्यांच्या सभा करून, सत्कार करून त्यांस शंभर-पन्नास अधिकही रुपये योग्यतेनुसार द्यावे ऐसे करून दिले. त्याजमुळे दिवसेंदिवस अधिक विद्या वृद्धीस पावती जाली. तसेच जागोजागी अन्नछत्रे उघडली ."

करमणुकीची साधने :

सततच्या युद्धजन्य वातावरणातही पोवाडे गाणारे, कीर्तनकार, गोंधळी, तमासगीर जनतेची करमणूक करीत. पोवाडे हे शूरवीरांचे गुणगान करीत. लावण्या सामाजिक चालीरीतीचे दर्शन घडवीत. पोवाडे गाणाऱ्यास लोकाश्रय चांगला असे. शिवकालीन प्रसंगावर दत्ताजी जाधव, अफझलखानाचा वध, तानाजीची मर्दुमकी, बाजी पासलकर यांच्या प्रसंगाचे पोवाडे उपलब्ध आहेत. तानाजीचा पोवाडा तुळशीदासाने रचिला. तो पुण्यास राहत होता. महाराज राजगडावर होते, त्यांनी तुळशीदासास बोलावून घेतले. तुळशीदासाने महाराजापुढे तानाजीचा पोवाडा गायिला.

सिंहगडची हकीगत ऐकून महाराज खूश झाले आणि त्यांनी तुळशीदासाच्या हातात एक हजार रुपयांचा तोडा घातला. त्याच पोवाड्यात शिवाजी महाराज राजगडावरून प्रतापगडी गेले त्याचे हृद्य चित्रण आहे. शिवाजी महाराजांच्या शौर्याचा उल्लेख करून तुळशीदास म्हणतो " शूर मर्दाचा पोवाडा शूर मर्दाने ऐकावा शिवरायाच्या राज्यात ऐसा उमराव होणे नाही " यावरून प्रत्यक्ष महाराज गुणीजनांचे योग्य ते मूल्यमापन करून त्यांचा गौरव करीत असे दिसून येईल.

निष्ठावान दृष्टिकोन :

शिवाजी महाराजांनी प्रजेच्या सुखासाठी स्वराज्य स्थापन करण्याचे ध्येय पत्करले. महाराज धार्मिक स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. हिंदू धर्माची प्रतिष्ठा वाढविण्याचा त्यांनी प्रयत्न केला असला तरी अन्य धर्मीयांच्या किंवा पंथियांच्या बाबतीत ते अत्यंत सहिष्णूच होते. इस्लामी राज्यांत हिंदूना स्वातंत्र्य आणि सुरक्षितपणा नव्हता. तो त्यांनी मिळविला. त्याचवेळी त्यांनी इस्लाम किंवा इसाई धर्मीयांना त्यांच्या धर्मश्रद्धेसाठी कधीच छळले नाही. मुसलमान फकिरांना हिंदू साधूसंतांसारखीच अनुदाने, इनामे दिली. शिवाजी महाराज वतननिवृत्ती चालू ठेवण्याच्या विरुद्ध असले तरी धार्मिक कारणासाठी त्यांनी वतने, इनामे, अनुदाने मुक्तहस्ते दिलेली आढळतात.

शिवाजी महाराजांनी या महाराष्ट्रभूमीत स्वराज्याची स्थापना केली. महाराजांनी यावनी आक्रमकांना नामोहरम करून त्यांनी स्वतंत्र हिंदू राज्य स्थापिले होते. प्राचीन भारतीय अस्मितेच्या पायावर स्वराज्य स्थापून दिल्लीपतीला पदच्युत करण्याचे त्यांचे अंतिम धोरण होते असे पाश्चिमात्य तत्कालीन लेखकांनी लिहिले आहे. हिंदूंच्या प्राचीन संस्कृतीचे रक्षण करणे आणि हिंदूच्या स्वतंत्र राष्ट्राचे पुनरुत्थान करणे हे त्यांचे ध्येय होते. ते एक राष्ट्रनिर्माते होते. म्हणूनच ते एक राष्ट्रपुरुष होते.

शिवाजी महाराजांचे मुसलमान चाकर :

शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. ती करत असता त्यांना आदिलशाही व मोगलशाही ह्या सत्तांशी लढावे लागले. तसेच जुलमी हिंदू सरदारांविरुद्धही ते लढले. शिवराय कुशल प्रशासक होते. आपापल्या धर्माप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य त्यांनी जसे हिंदू पुजाऱ्यास दिले तसे मशिदीमध्ये नमाज पढणाऱ्या मुसलमानांनाही दिले.

शिवाजी महाराज जरी हिंदवी स्वराज्य संस्थापक होते तरी ते मुसलमान फकीर, संत व हिंदू साधू यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव करीत नसत. ते मुसलमान फकिरांच्या समाध्यांना व मशिदींना नेहमी देणग्या देत असत. हिंदूचे हक्क मुसलमानानांही त्यांच्या राज्यात मिळत. त्यांचे काही अंमलदार मुसलमान होते. शिवाजी महाराजांनी आपल्या मुसलमान प्रजेच्या कल्याणार्थ मशिदींना वर्षासने दिली होती.

शिवाजी महाराजांनी आपल्या प्रजेच्या कल्याणार्थ अनेक जाहीरनामे व हुकूम काढले. मुसलमान प्रजेच्या कल्याणार्थ जे जाहीरनामे काढले त्यातील मुख्य असे :—

(१) मुसलमानांचा धर्मग्रंथ कुराण याची प्रत आक्रमणाच्या वेळी कोणाच्या हाती लागल्यास त्याने तिचा आदर करावा व आदरपूर्वक कोणत्याही मुसलमानास परत द्यावी.

(२) आपल्या सैन्याने परक्या राज्यात युद्ध करीत असता शत्रूकडील स्त्रिया व मुले हाती लागल्यास त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास न देता आदराने वागवावे.

(३) मुसलमान साधूपुरुषांच्या वास्तव्य ठिकाणी आपल्या सैन्याचे जाणे झाले तर त्यांनी लुटालूट करून त्यांना त्रास देऊ नये. वरीलप्रमाणे सक्त हुकूम काढले होते.

(४) मशिदींना व फकिरांच्या भकबऱ्यांना (समाध्यांना) ते देणग्या देत असत.

विजापूरकरांच्या सेवेतून परावृत्त होऊन पाच-सहाशे पठाण नोकरी मिळविण्याकरिता शिवाजी महाराजांकडे आले असता महाराजांनी आपल्या सल्लागारांशी विचारविनिमय करून त्यांना नोकरीत घेतले. शिवाजी महाराज मनुष्यपारखी होते. त्यांनी ज्या मुसलमानास नोकरीत घेतले त्यांनी मराठ्यांना यश मिळविण्यात हातभार लावला असे ग्रँट डफ म्हणतो.

शिवाजी महाराजांनी पश्चिम किनाऱ्यावर आरमाराची उभारणी केली. समुद्रावर आपली सत्ता प्रस्थापित केली. इ. स. १६७४ मध्ये मराठा आरमाराचा मुख्याधिपती दौलतखान हा अतिशय विश्वासू अधिकारी होता. त्यास दर्यासारंग म्हणत.

अफजलखान भेटीचे वेळी शिवाजी महाराजांनी जे १० लोक आपल्या बरोबर नेले होते, त्यांत सिद्दी इब्राहिम हा विश्वासपात्र सेवक होता. शमाखान बेग नावाचा मुसलमान महाराजांच्या सेवेत सिलेदार पदावर होता. मुनशी काजी हैदर हा शिवाजी महाराजांचा खाजगी सचिव होता. तो महाराजांच्या फारशी पत्रव्यवहाराचा विभाग सांभाळीत होता. शिवाजीच्या मृत्यूनंतर संभाजी महाराजांशी त्याचे न पटल्यामुळे तो दिल्लीस निघून गेला. औरंगजेबाने त्यास मुघल साम्राज्याचा प्रधान न्यायाधीश नेमले. इब्राहिमखान हा महाराजांच्या सैन्यात सरदार होता. त्याने फोंडा किल्ला जिंकून घेतला. मदारी मेहतर हा सोळा-सतरा वर्षांचा तरणा पोरगा महाराजांबरोबर सावलीसारखा असे. मदारीचे महाराजांवर अतिशय प्रेम होते. निष्ठाही जबरदस्त. आग्र्यास जाताना ह्या मदारीला महाराजांनी बरोबर घेतले होते. आग्र्याहून औरंगजेबाच्या कैदेतून निसटण्याची योजना महाराजांनी बनविली तेव्हा हिरोजी फर्जन्द व मदारी मेहतर या दोघा विश्वासपात्र सेवकांनाच ती सांगितली होती. शिवाजी महाराज निसटल्यावर हिरोजी फर्जन्द व मदारी मेहतर यांनी "महाराजांचे शीर दुखते आहे, गडबड करायची नाही. त्यांना औषध आणावयास जातो" असे सांगून ते दोघेही निसटले. ते महाराष्ट्रात आले. रायगड येथील हत्ती तलावाच्या समोर उत्तरेस असणारी कबर मदारी मेहतरची आहे.

शिवाजी महाराजांनी हिंदूना एक स्वतंत्र राष्ट्र मिळवून दिले. भीमसेन सक्सेना हा औरंगजेबाबरोबर दक्षिणच्या स्वारीत होता. त्याने शिवाजी महाराजांनी मोगलांबरोबर दिलेल्या लढाया पाहिल्या होत्या. शिवाजी महाराजांच्या मृत्यूची नोंद आपल्या लिखाणात (दिलकशात) केल्यावर महाराजांचे गुणवर्णन तो खालीलप्रमाणे करतो. "शिवाजी हा एक सत्पुरुष होता. शिपाईगडी म्हणून तो अद्वितीय होता. तो राजनीतीनिपुण होता. एकनिष्ठ सैनिकांना तो जीव की प्राण करी. प्रत्येक मोहिमेत तो आपल्या एकनिष्ठ सेवकांचा सल्ला घेई. पण त्याला जी मसलत योग्य वाटे आणि जी योजना पटे ती तो अमलात आणी. तो ती प्रत्यक्ष अमलात येईपर्यंत कुणालाही तिची वार्तासुद्धा लागत नसे. शिवाजी हा अतिशय धूर्त आणि चतुर होता. त्या कला त्याला पूर्णपणे अवगत होत्या. शिवाजी आपले सैन्य चहूकडे पसरवून धामधूम उडवीत असे. शिवाजीपाशी चाळीस हजार

घोडे होते. मोहिमेतून मालमत्ता हाती येई ती सरकारांत दाखल करावी लागे. शिवाजीने आपले गुप्तहेर नेमले होते. सैनिकांपैकी कुणी माल लपवून ठेविला आहे याची माहिती त्याला आपल्या हेरांकडून लागे आणि मग सैनिकांना तो माल सरकारांत दाखल करावा लागे. त्या काळी शेती हा प्रधान उद्योग होता. महाराजांनी शेतकऱ्यांस सुखी राखण्यासाठी स्वराज्यातील जमिनीची मोजणी करून तिचा सारा एकदा कायमचा ठरवून दिला व तो गोळा करण्याकरिता सरकारी अंमलदार नेमिले. शिवाजी महाराज प्रजापालन दक्ष होते. ते स्वराज्यातील लोकस्थिती पाहण्याकरिता स्वतः सर्वत्र हिंडत असत. कर्नाटकात जाण्यापूर्वी त्यांनी असाच मोठा दौरा काढला होता. त्यावेळी महाराजांनी किल्ल्यांची पाहणी करून त्यांवर सामग्रीचा जय्यत पुरवठा केला. सर्व लोकांना भेटून त्यास न्याय मिळेल अशी व्यवस्था केली. सर्वत्र शांतता, सुव्यवस्था व आबादानी राहावी इकडे महाराजांनी लक्ष पुरविले. शिवाजी महाराजांनी जे स्वतंत्र राज्य स्थापिले, त्यात परशत्रूपासून आपल्या प्रजेस संरक्षण दिले. तसेच सामाजिक, आर्थिक, धार्मिक असे पुष्कळसे अन्याय कमी होतील हे पाहिले. चोऱ्या, दरवडे, फसवणुकीचे प्रकार होता कामा नयेत असे अधिकाऱ्यांकरवी लोकांना जाहीर केले. महाराजांचे हुकूम हेच कायदे असत. ते कोणी मोडू नयेत यांवर त्यांची सक्त नजर असे. स्वराज्यात मारामाऱ्या, चोऱ्या, दरोडे कोणी घातले तर महाराज त्याला देहान्त शासन करीत. स्वराज्यातून प्रवास करणाऱ्यास प्रजेकडून कसलाही उपसर्ग पोचू नये अशी त्यांची आज्ञा असे. महाराजांवर जसे प्रजेचे प्रेम होते तसे त्यांची भीतीही प्रजेला वाटत असे, असे कास्मा दि गार्डा लिहितो. स्वतंत्र सत्ता स्थापून हिंदू जनतेचा धर्मछळ, आर्थिक पिळवणूक त्यांनी थांबविली. लुटीच्या वेळी स्त्रियांचा छळ शिवाजीचे सैनिक करीत नसत असे काफीखान म्हणतो.

शिवाजी महाराजांनी स्वतंत्र हिंदवी राज्य स्थापिले. त्यांतील प्रजाजनास आपापल्या देवतांची पूजाअर्चा करण्यास स्वातंत्र्य दिले. देवतांची मिरवणूक काढण्यास स्वातंत्र्य दिले. तीर्थयात्रा करण्यास स्वातंत्र्य दिले. बहुसंख्य हिंदू प्रजाजनांचा धर्मछळ, आर्थिक पिळवणूक होणार नाही, प्रजा सुखी राहील हे पाहिले. त्यामुळे जुलमी राजवटीला आळा घातला गेला.

शिवाजी महाराजांनी लोकसंग्रह पुष्कळ केला. जीवास जीव देणारे वीर पुरुष मिळविले. महाराजांना एकाच विचाराने व ध्येयाने भारून टाकले होते. तो विचार म्हणजे स्वराज्य प्राप्ती. ह्याच विचारांचा जप महाराजांनी आपल्या पिढीस करण्याचा मंत्र दिला. लोकांत निर्भयपणा आणून त्यांना चढाईचे धोरण शिकविले. अशा रीतीने शिवाजी महाराजांनी मराठ्यांचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण केले.

सहिष्णुता आणि लोकरंजन याचे दिग्दर्शन शिवाजी महाराजांनी केले असे काफीखान म्हणतो, "शिवसैनिकांनी कोठेही लुटालुट केली तरी स्त्रियांना उपद्रव देता कामा नये." ह्या महाराजांच्या हुकुमाचे त्यांनी पालन केले. तसेच सैनिकांत कुराणाची प्रत सापडल्यास ते त्यास वंदन करीत. महाराजांनी ख्रिस्ती स्त्रिया, बायबल याबद्दल आदरभाव व्यक्त करण्याची शिकवण आपल्या प्रजेस दिली. शिवाजी महाराजांनी आपल्या कामगिरीने जनतेमध्ये स्वातंत्र्यप्रेरणा व देशाभिमान निर्माण केला. महाराजांनी आपली सैन्यभरती केवळ मराठ्यांमधून केली असे नसून मुसलमान, मेंढपाल, गुराखी, धनगर, शेतकरी, कातकरी, रामोशी, मोलमजुरी करणारे ह्यांतूनही केली. त्यांच्यामध्ये लढण्याची ईर्षा उत्पन्न केली. शस्त्रे वापरण्याचे शिक्षण दिले आणि देश परकीय मुसलमानांच्या हाती जाऊ नये यासाठी शत्रूबरोबर झगडण्याचे शिक्षण दिले. असा हा शिवशाहीचा मूळ पुरुष, हिंदवी स्वराज्याचा शिल्पकार पस्तीस वर्षे खपला आणि हिंदवी स्वराज्य स्थापन करून कीर्तिवंत होऊन इ. स. १६८० मध्ये पंचत्वात विलीन झाला.

२. शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व--(स्वकीय आणि परकीय यांनी त्यांचे केलेले वर्णन) :

(अ) शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे कुतूहल तत्कालीन पिढीस तसेच आजपर्यंतच्या सर्व पिढ्यास आहे. शिवाजी महाराज आग्र्यास गेल्यावर रामसिंगाच्या राजपूत अधिकाऱ्यानी त्यांना पाहिल्यावर त्यांचे वर्णन डुंगल भाषेत करून ते पत्र त्यांनी जयपुरास पाठविले. त्यांत तो अधिकारी लिहितो, "शिवाजी महाराज दिसण्यात बांध्याने किरकोळ आहेत पण स्वरूपाने विलक्षण गोरे आहेत. त्यांच्याकडे पाहताच कुणालाही असे वाटावे की, हे राजेच असले पाहिजेत. ते अतिशय हिमतीचे व मर्द माणूस दिसतात.

शिवाजीराजांस दाढी आहे. त्यांचा मुलगा नऊ वर्षांचा आहे. तोही विलक्षण स्वरूपवान व गोऱ्या वर्णाचा आहे."

राजपूत बातमीदार शिवरायांस पाहिल्यावर महाराजांशी बोलताना फार भारावून गेलेले दिसतात. तो बातमीदार लिहितो, "दख्खनच्या राजाला आम्ही प्रत्यक्ष पाहिले, त्याचा वर्ण गोरा आहे, नासिका सरळ आहे. डोळे भेदक आहेत. दुसरा लिहितो, मी त्यांच्याशी बोललो, काही प्रश्न विचारले, त्याची समर्पक उत्तरे मला मिळाली. त्याचा युक्तिवाद काय वर्णावा ? आपण ऐकतो आणि लगेच ते शब्द आपल्याला पटतात, आवडतात. राजे अंतर्बाह्य सज्जन आहेत."

शिवराय दिसायला तेजस्वी होते. शिवराय हैदराबादच्या सुलतानास भेटण्यास दाद महालात गेले असता भेटीचा सोहळा पाहणाऱ्या स्त्रिया महाराजांच्या रूपामुळे थक्क झाल्याचा उल्लेख सभासदाने केला आहे. सुरत स्वारीत एका डच चित्रकाराने शिवरायांचे चित्र काढिले. ह्यातील राजियांच्या अस्सल व्यक्तिचित्राचे वर्णन संशोधक कलावंत द. ग. गोडसे यानी केले आहे, ते म्हणतात, " शिवरायाचे रेखीव, बाकदार नाक आणि तीक्ष्ण बारीक डोळे एकदम लक्ष वेधून घेतात. तसेच ओठावरचं स्मित व चेहऱ्यावरचा आत्मविश्वास यांत उठून दिसतो."

(ब) शिवाजी महाराजांच्या कामगिरीचे महत्त्व इंग्रज, फ्रेंच, डच वगैरेना समजून आले होते. म्हणून ते म्हणतात की, शिवाजी महाराज हा सीझर, अलेक्झांडर, हानिबॉल, ॲटिला, सरटोरियस, ॲकीलस, पीऱ्हस यांचेसारखा मोठा योद्धा, कमालीचा धाडसी, अशक्य गोष्टी शक्य करून दाखविणारा होता.

शिवाजी महाराजांचे कर्तृत्व पाहून इंग्रज, फ्रेंच, डच आदी पाश्चिमात्य लेखकांनी त्यांची तुलना सीझरशी केली आहे. पण सीझर हा सांघिक दृष्ट्या शूर होता पण वैयक्तिकदृष्ट्या डरपोक होता. ताप आला तर तो रडायला लागायचा. तो नदीत बुडत असता त्याने आकांडतांडव केले. सीझरचे चारित्र्य इतके संशयास्पद होते की, रोममधील सर्व स्त्रियांचा तो पती आहे असे म्हटले जात होते. राज्य तृष्णेपायी अखेर त्याच्या मित्राकडून त्याचा वध झाला. ज्युलियस सीझर व शिवराय हे दोघेही धोरणी, कुशल

राजकारणी होते. रोमन राष्ट्राच्या विस्तृत व संपन्न पायावर सीझरने पराक्रम गाजविले व मुळांत काहीच नसता शिवरायांनी आपल्या राष्ट्रास स्वातंत्र्य मिळवून देणे, यांत पुष्कळ फरक आहे. सरटोरियस याने अनेक लष्करी विजय संपादन केले. पण सीझरप्रमाणेच तो व्यसनी व चैनी निघाला. त्याचाही त्याच्या मित्राकडून वध झाला.

ग्रीसचा सिकंदर बादशहा इतिहासात मोठा पराक्रमी गणला जातो. सिकंदरास सर्व जग जिंकण्याची हाव होती. जिंकलेल्या प्रदेशाची सुधारणा करून राज्यव्यवस्था ठरविण्यात त्याने लक्ष घातले नाही. शिवाजी महाराज त्याच्यासारखे जगज्जेतृत्वासाठी किंवा दिगंत कीर्तीसाठी हपापले नव्हते. हानिबीलने आल्प्स पर्वत ओलांडण्याचा विक्रम केला, पण शेवटी त्याच्यावर त्याच्या देशांतून परागंदा व्हावयाची वेळ आली. शत्रूच्या हाती सापडण्यापेक्षा विष घेऊन त्याने आपला शेवट करून घेतला. शिवरायाच्या अंगी या सर्व वीरांचे गुण एकवटले होते. पण अशा दोषांपासून ते अलिप्त होते. धुतल्या तांदळाप्रमाणे धवल असे त्यांचे चारित्र्य होते. शिवाजी महाराजांनी आपल्या अद्वितीय पराक्रमाने शून्यातून हिंदवी राज्य स्थापिले. स्वदेश, स्वभाषा व स्वधर्म यांचे संगोपन केले. रयतेस पोटच्या मुलाप्रमाणे वागविले म्हणून महाराष्ट्राने महाराजांना आपले दैवत म्हणून स्वीकारले.

सर्वगुणसंपन्न शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्यांनी महाराष्ट्रीयांच्या मनात स्वातंत्र्यज्योत आज तीनशे वर्ष तेवत ठेवली आहे. त्यामुळे शिवाजी महाराज महाराष्ट्रातल्या घरोघरी भक्तीचा विषय होऊन राहिले आहेत. सतत तीनशे वर्षे शिवाजी महाराज जनमानसावर आपले अधिराज्य गाजवीत आहेत व पुढेही जगाच्या अंतापर्यंत ते चालूच राहील. म्हणून सर्व माणसे महाराजांना शिवाचा अवतार मानतात. छत्रपती संभाजीची कारकीर्द सुरू झाल्यावर त्यांनी प्रजेस आश्वासन दिले की, थोरले महाराजांनी जसे प्रजाहित साधले तीच चाल आपल्या कारकीर्दीत चालू राहील, स्वराज्याला चारी बाजूंनी शत्रूने वेढले होते. अंतर्गत कलह चालूच होते. अशा परिस्थितीतून जात असता संभाजी महाराजांनी प्रजेकडे दुर्लक्ष केलेले दिसत नाही. शत्रूने मुलूख लुटला तर तेथील रयतेला सवलती देण्यात येत असत. कोणी काही कारणाने परागंदा झाले तर त्यांना प्रोत्साहन देऊन पुनर्वसन करण्यासाठी सूट दिली जाई. ओसाड

पडलेल्या जमिनीत लोकांनी पुन्हा शेती करावी म्हणून जास्तीत जास्त सवलती देण्यात येत असत. संभाजी महाराज आणि त्यांच्या अधिकाऱ्यांकडून अभयपत्रे कोलनामा दिला जात असे. काही लोक वसुली बाकी थकली म्हणजे गाव सोडून जात. अशा प्रसंगी त्यांनी आपापल्या गावी येऊन राहावे म्हणून अधिकारी त्यांना पत्रे देऊन अभय देत. कोणत्याही कारणाने शेतीचे नुकसान होता कामा नये याची दक्षता घेतली जाई. लोकांना हरप्रकारे दिलासा देऊन राज्यात स्थिरस्थावर राहून कारभार नीट चालवावा म्हणून काळजी घेण्यात येई.

संभाजी महाराज गादीवर आल्यापासून त्यांच्याविरुद्ध त्यांचे काही मंत्री तसेच प्रल्हाद निराजी, गणोजी शिर्के, भांडवलकर ही मंडळी कट करीत होती. संभाजी महाराजांनी ह्या कटवाल्यास पकडून शिक्षा केल्या. त्याच वेळी औरंगजेब २ लाख सैन्य घेऊन महाराष्ट्रात आला. त्याने संभाजी महाराजांवर चौफेर हल्ले चढविले. ते सर्व हल्ले संभाजी महाराजांनी आपली शक्ती पणास लावून परतवले. नऊ वर्षे मोगलांशी संभाजी महाराजांनी लढत दिली व ते यशस्वी झाले. हतबल झालेल्या औरंगजेबाने संभाजी महाराजांस पकडण्याकरिता महाराजांविरुद्धच्या सरदारांस सरदारकीची व वतनाची आमिषे दाखविली म्हणून कटवाले मंत्री, प्रल्हाद निराजी, गणोजी शिर्के, भांडवलकर आदी सरदार मंडळी औरंगजेबास मिळाली. तरी संभाजी महाराज डगमगले नाहीत. मोगलांकडे जाणाऱ्या सर्जेराव जेधेसारख्या सरदारांना खरमरीत पत्रे लिहून तंबी दिली. प्रल्हाद निराजीला अटक केली. गणोजी शिर्के याचे बंड मोडले. तरीही तो मोगलांच्या सेवेत गेला. संभाजी महाराजांस पकडण्याच्या कटात सामील झाला. संभाजी महाराजांस पकडण्याच्या कटात औरंगजेबास सामील झालेल्या मंत्र्यांच्या गटाचा असा मनसुबा होता की, संभाजी महाराज पकडले गेल्यावर गादीवर त्यांचे लहान मुलांस (शाहूस) बसवून 'हिंदवी स्वराज्य' मोगली मांडलिक म्हणून वावरावयाचे पण संभाजी महाराजांस पकडले गेल्यावर कटवाल्यांच्या मनात पाल चुकचुकली की, धाकट्या शिवाजीला (शाहूला) राज्यावर आणल्यास तो आपल्या बापाचा सूड उगवील या भीतीने त्यांनी राजाराम महाराजांस मंचकारूढ केले असावे.

संभाजी महाराजांनी कबजी कलुशा ह्या उत्तर हिंदुस्थानी ब्राह्मणास छंदोगामात्य पद दिले. हे शिवाजी महाराजांच्या तालमीत तयार झालेल्या महाराष्ट्रीय सरदारांस रुचले नाही. छंदोगामात्याचा कारभार सुरू झाल्यावर ह्या मंडळींनी दरबारांत रायगडी फिरकण्याचे बंद केले. त्यामुळे शिवकालीन सरदारांच्या मदतीस व उपदेशास संभाजी महाराजांस पारखे व्हावे लागले. संभाजी महाराज कबजी कलुशाने चालविलेल्या यज्ञ यागात एवढे गुरफटले गेले होते की, त्यांनी "हेरांकडून समजलेल्या मोगल आपल्यावर दौडत येत आहेत" ह्या बातमीस किंमत दिली नाही. कलुशाने मांडलेल्या अनुष्ठानांकरिता आपणांस गुंतवून घेतले. परिणामी कलुशा व संभाजी महाराज पुरेसे सैन्यबळ नसल्यामुळे पकडले गेले. संभाजी महाराजांस व कबजी कलुशास मुकर्रबखानाने कैद करून तो त्यांना संगमेश्वराहून निघून तुळापुरास हत्तीवरून घेऊन आला.

संभाजी महाराज व कलुशा यांना जीवे मारल्यावर औरंगजेबाने रायगड राजधानीस वेढा घालण्यास आपला सरदार झुल्फिकारखान यास सांगितले, ही बातमी रायगडावरील येसूबाईंना समजल्यावर त्यांनी मराठा मंडळास आपला विचार सांगितला याचे कारण की, सभाजी महाराजांच्या गैरहजेरीत येसूबाईंनी सर्व अंतर्गत कारभार पूर्ण जबाबदारीने चालविला होता. आपल्या अनुपस्थितीत सर्व राजपत्रे देणे व राज्य व्यवस्थेचे आवश्यक ते हुकूम काढण्याचा अधिकार संभाजी महाराजांनी येसूबाईंना बहाल केला होता. येसूबाई हे सर्व हुकूम "राजाज्ञा" या नावाने काढीत असत. एवढेच नव्हे तर येसूबाईंना "सखी राज्ञी जयति" असा शिक्का व मोर्तबही दिला होता. म्हणून राजाराम महाराजांनी मंडळीसह जिंजीस जावे आणि स्वराज्यातून मोगल सैन्य बाहेर खेचणे, मद्रास प्रांतातील हिंदू सरदारांची संघटना घडवून आणणे आणि सैन्ये जमवून कर्नाटक प्रांत जिंकून घेणे हे राजारामाचे धोरण असावे (सरकारकृत औरंगजेब खंड ५, पृ. ६३) असे येसुबाईंनी सांगितले.

राजाराम महाराज :

राजाराम महाराज निवडक, निष्ठावान व विश्वासार्ह सरदारांसमवेत लपतछपत नोव्हेंबर, १६८९त जिंजीस पोहोचले. महाराजांनी जिंजीस जाऊन

राज्यकारभार सुरू केल्यावर त्यांचे मंत्री लाच घेणे हा आपला धर्म मानू लागले. जिंजीस आल्यावर राजाराम महाराजांना द्रव्याची टंचाई फार भासू लागली. जिंजीतील सैनिकांचे पगार वेळेवर देता येईनात म्हणून प्रल्हादपंत प्रतिनिधी या मंत्र्यांने कोरोमांडल किनाऱ्यावरील फ्रेंच, डच व इंग्रज या युरोपीय वखारवाल्यांकडून मोठ्या रकमा घेऊन त्यांच्या वखारीभोवती त्यांना तटबंदी उभारण्यास परवानगी दिली. ह्या व्यवहारातील निम्मे पैसा मंत्र्यांनी आपल्या खिशात घातला. तसेच ह्या मंत्र्यांने इंग्रजांकडून लाच घेऊन इंग्रजांच्या सर्व राज्यातील व्यापारावर कस्टम माफी केली.

राजाराम महाराजांचे लक्ष राज्यव्यवस्थेवर राहू नये म्हणून मंत्र्यांनी त्यांना अफूची सवय लावली. तसेच राजाराम महाराजांस खूश ठेवण्यासाठी त्यांचे आणखी एक लग्न करून दिले. नर्तक्या, तमासगीर, नाटकशाळाही त्यांना पुरविल्या. त्यामुळे राजाराम महाराजांस राजकारणात मिळावा तसा अनुभव मिळाला नाही.

जी शिस्त मराठी राज्यात शिवाजी महाराजांनी घालून दिली होती ती ह्या अंदाधुंदीच्या काळांत पार नाहीशी झाली. ह्याच काळांत वतनदार लोक वतनाच्या हव्यासापायी खरे-खोटे करू लागले. तसेच सरकारचे अधिकारी शंकराजी नारायण सचिव, सुंदर तुकदेव, प्रत्यक्ष रामचंद्रपंत अमात्य ही मंडळीसुद्धा दुसऱ्याची वतने हिरावून आपला स्वार्थ साधत होती. ह्या बाबतीत शंकराजी नारायणास राजाराम महाराजांनी ठपका दिल्याचे उदाहरण आहे (सरदेसाई, राजाराम रियासत, पृ. ९६) अशा रीतीने राज्यात सर्व थरात अविश्वासार्हता व खाबूगिरी वाढल्यामुळे राज्यशकट हाकणे राजाराम महाराजांस कठीण गेले. राजाराम महाराज जिंजीस गेल्यावर औरंगजेबाने जणू काही मराठ्यांचे राज्य आता आपल्या हाती आले या समजुतीने स्वराज्याची मुलकी व्यवस्था लावण्याचे काम हाती घेतले. शिवाय त्याने आपल्या बाजूस शूर मराठे सरदार वळविण्यासाठी सरदारांच्या हुद्याप्रमाणे ४ ते ७ गावे त्यांना इनाम देण्याची प्रथा सुरू केली. मराठे लोकांस मालकीची जमीन (वतन) प्राणाहून प्रिय. ते जमिनीचा त्याग प्राण गेला तरी करणार नाहीत. या स्वभावगुणाचा फायदा घेऊन औरंगजेब मराठे सरदारांस भराभर नवीन वतने देऊ लागला. तेव्हा राजाराम महाराजांस

व त्याच्या कारभाऱ्यांसही तोच मार्ग पत्करावा लागला, नाहीतर बादशहाशी लढण्यास कोणीच पुढे आला नसता.

यावेळी स्वराज्याचे अस्तित्व टिकविण्यासाठी राजाराम महाराजांना वतनदारीचे व सरंजामशाहीचे पुनरुज्जीवन करावे लागले. याचा फायदा समाजातील वतनलोभींनी घेऊन नवीन सनदाकरिता जिंजीस राजाराम महाराजांसमोर रांग लाविली. राजाराम महाराजांनी जिंजीस आलेल्याना मूळ इनामती परत करून त्यास जमाव करून आपापल्या कुवतीप्रमाणे लढा देत राहून मोगली ठाणी उठविण्याची आज्ञा केली. इतकेच नव्हे तर मोगली मुलुखातही उठाव करून तेथील लूट महाराजांचे बक्षीस म्हणून घ्यावे अशा प्रकारचे प्रोत्साहन दिले. ही मंडळी देशी परत आली. आपआपल्या परी आपला प्रदेश मिळविण्याच्या खटपटीस लागली. हा ठिकठिकाणी केलेला स्थानिक लोकांचा धुमाकूळ औरंगजेबास हैराण करू लागला. तो इतका की प्रत्येक वतनदार पूर्ण स्वतंत्रतेने वागू लागला. मुलूख जिंकावा व जागीर म्हणून तो आपणच लाटावा हा प्रघात महाराष्ट्रात सुरू झाला.

याच काळात कर्नाटकात संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनी आपल्या पराक्रमाने मोगलांस चीत केले. ह्या परिस्थितीबद्दल औरंगजेब झुल्फिकारखानास लिहितो, "झुल्फिकारखान, याद रखो, मुकाबला संताजी आणि धनाजी आणि त्यांची कडवी फौज यांच्याशी आहे. संताजी तो बहोत खतरनाक गनीम. अकस्मात हमला चढवतो, बगळ्याने मासळी टिपावी तसे हा लचके तोडतो, शिपाईगिरीची शर्थ करतो आणि बघता बघता पसार होतो. संताजी आणि त्याचे फौजी जवान खाण्यापिण्याची दरकार बाळगीत नाहीत. घोड्यावरच चणे, भाकरी, चटणी कांदा खाऊन धावतात. ऊन, पाऊस, थंडी, अंधेरी रात कशाचीही पर्वा करीत नाहीत. एका मुलुखात हे 'आले आले' म्हणून फौज धाडावी, तर हे दुसरीकडेच उपटतात आणि मुलूख मारून ठाणी घेतात. खरोखर हे आदमी नव्हेत, भूतखाना आहे, भूतखाना" राजाराम महाराजांनी जहागिरदारांस व वतनदारांस स्वातंत्र्य दिल्यामुळे त्यांनी हिंदवी स्वराज्याचा बराचसा मुलूख मोगली परचक्रातून सोडविला, इतकेच नव्हे तर काही मराठे सरदार नर्मदा नदी ओलांडून उज्जैनपर्यंतच्या मोगली मुलुखातून चौथाई वसूल करू लागले. राजाराम महाराजांनी कारभाऱ्यास बिलकूल विरोध केला नाही. राजाराम

महाराज जिंजीस गेल्यावर त्यांनी खरे तर शत्रूवर मात करून स्वतंत्र लौकिक मिळवावयास पाहिजे होता. महाराजांना कल्पक बुद्धी नव्हती. तसेच रणांगणावर तलवार गाजवून शत्रूस पाणी पाजण्याचे शौर्यही नव्हते. प्रल्हाद निराजीच्या तंत्राने वागण्याचे राजाराम महाराजांनी ठरविले. प्रल्हाद निराजीने महाराजांचा काळ विलासात जाण्यासाठी वर निर्देशिलेली तरतूद केली. हे कळताच राणी ताराबाई जिंजीस जाऊन राजारामातर्फे राज्यकारभार पाहू लागल्या.

जिंजी किल्ला लढविण्यास महाराष्ट्रातून वेळी मदत न आल्यामुळे तो झुल्फिकारखानाच्या हवाली करून राजाराम महाराज महाराष्ट्रात आले. स्वारीस गेले असता थकवा येऊन रक्ताच्या गुळण्या झाल्या. त्याच आजारात सिंहगडी त्यांचे निधन झाले.

राणी ताराबाई :

इ. स. १७००त राजाराम महाराज निवर्तल्यावर राणी ताराबाईने सर्व सत्ता आपल्या हाती घेतली. ताराराणीने आपला मुलगा शिवाजी याची मुंज व राज्याभिषेक करण्याचे ठरविले. त्यावेळी रामचंद्रपंत अमात्यांशी तिचा खटका उडाला. तरीही तिने आपला मुलगा शिवाजी यास राज्याभिषेक करविला व मुलगा लहान असल्यामुळे राज्याचा कारभार तीच पाहू लागली. त्यानंतर शाहूचे दोन तोतये उभे राहिले. त्यांना समक्ष बोलावून संपूर्ण चौकशी करून ठार मारले. राणीच्या कारकीर्दीत धनाजी जाधव व हिंदूराव घोरपडे या दोन्ही सेनानीचे एकमेकांशी पटत नव्हते. ताराबाईने दोघांचाही उपयोग करून घेतला. तिने दोघा सेनापतींना आपल्या वरचढ होऊ दिले नाही. धामधुमीच्या काळात ताराबाई प्रत्येक किल्ल्यावर जाऊन तेथील तरतूद पाहून मोगल बादशहाच्या हालचाली लक्षात घेऊन आपले युद्धधोरण ठरवीत असे. बादशहाने मराठ्यांचे किल्ले घेण्याची जोरदार मोहीम सुरू केली, तेव्हा राणी ताराबाईने आक्रमक धोरण स्वीकारले. बादशाही मुलूख सरंजाम म्हणून तिने आपल्या सरदारांस वाटला. त्यामुळे प्रत्येक प्रांतात एकाच्या ऐवजी दोन-दोन जहागिरदार निर्माण झाले. आपल्या सरदारांना कृतिस्वातंत्र्य देऊन त्यांना गुजरात, माळवा, तेलंगण इत्यादी मोगली प्रदेशात चौथाई वसूल करण्यासाठी पाठविले. ताराबाईचे सरदार जेथे जात तेथे आपले बस्तान बसवीत आणि बादशाही परगणे आपापसात वाटून घेत. राणी ताराबाईने मराठी राज्याचे संरक्षण तर केलेच आणि राज्याचा कारभार चोख ठेवला. दैनंदिन राज्यकारभार त्या स्वतः पाहत होत्या शिवाय बादशाही मुलखावरील लष्करी मोहिमांचे संयोजनही त्या

करीत होत्या. शिवाजी महाराजांची न्यायनिष्ठुरता तिच्यामध्ये होती. तसेच शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरणही तिने चालू ठेवले.

सारांश, शिवरायांनी लोकराज्याची मुहूर्तमेढ रोविली. राज्याभिषेक करवून घेऊन हिंदवी लोकराज्याची स्थापना झाल्याचे वर्तविले. त्यावेळेपासून हे आपले राज्य आहे आणि आपल्या पराक्रमाने आणि त्यागाने टिकविले पाहिजे असे साऱ्या समाजाला आंतरिक आग्रहाने वाटले. राजा आणि प्रजा यांचे हे अतुट नाते हा या कालातील अभिनव उपक्रम होता. या उपक्रमाची महती शिवरायांच्या निर्वाणानंतर अधिक प्रकर्षाने सिद्ध झाली. राजियांचा काळ झाल्यावर औरंगजेब बादशहा हिंदवी स्वराज्य नष्ट करण्याची प्रतिज्ञा करून आपल्या साऱ्या सामर्थ्यानिशी महाराष्ट्रात आला. प्रथम संभाजी महाराजांनी व नंतर राजाराम महाराजांनी औरंगजेबाशी मुकाबला केला. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रात जो स्वातंत्र्य संग्राम घडला तो तर अपूर्वच होता. राजा नाही, राजधानी नाही, सेना नाही, सेनानी नाही अशा दुर्धर अवस्थेमध्ये राणी ताराबाईंने औरंगजेबाची आक्रमणाची लाट परतवून लावली आणि शिवरायांनी आपल्याला कोणता चैतन्य संदेश दिला आहे हे कृतीने दाखवून दिले.

मराठ्यांच्या अंगी असणाऱ्या शौर्य, पराक्रम गुणांना तिने उत्तेजन व वाव दिला. त्यामुळे मराठे सरदारांचे नीतीधैर्य वाढून त्यांनी मोगली सुभ्यात आक्रमण केले. गुजरात, माळवा, तेलंगणा येथे आपले बस्तान बसविले.

औरंगजेब बादशहा राणी ताराबाईंशी लढत असतानाच त्यास अहमदनगर येथे इ. स. १७०७ मध्ये मरण आले. त्याबरोबरच मराठ्यांशी २६ वर्षे चाललेल्या स्वातंत्र्ययुद्धाचा शेवट झाला. ह्या स्वातंत्र्ययुद्धात मराठी समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींनी भाग घेतल्याचे दृश्य दिसून येते. त्यावेळच्या सनदा-पत्रावरून असे दिसते की, या युद्धात भाग घेणारे मराठी लष्कर पाटील, शेटये, कुणबी, चांभार, कुंभार, परीट, न्हावी, सोनार, कोळी, फुलारी इत्यादी सर्व जातींचे मिळून बनले होते. प्रत्येक मराठी माणूस या युद्धात भाग घेऊन स्वराज्यासाठी राणी ताराबाईंच्या नेतृत्वाखाली लढत होता. त्याचे पर्यवसान मराठ्यांनी हे स्वातंत्र्ययुद्ध जिंकण्यात झाले. इतकेच नव्हे तर मराठ्यांची सत्ता महाराष्ट्राबाहेर पसरण्यास ह्याच काळात सुरुवात झाली.

□□

निवडक संदर्भ ग्रंथसूची

अलीनामा, शिचलेसंग्रह, फार्सी विभाग, भा.इ.सं.मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ५२.

आपटे, द. वि. (संपा.) : मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचा इतिहास पुणे, १९३४.

आपटे, द. वि. : शिवाजी निबंधावली, पुणे १९३०.

दिवेकर, स. म. : कवीन्द्र परमानंदकृत श्रीशिवभारत (संस्कृत) मूळ व मराठी भाषांतर भा.इ.सं. मंडळ, पुरस्कृत क्र. ३, पुणे, १९२७.

आपटे, द. वि. व दिवेकर, स. म. : शिवचरित्रप्रदीप, भा.इ.सं. मंडळ, पुर. ग्रंथमाला क्र. ४, पुणे, १९२५.

आवळसकर, शां. वि. : रायगडची जीवनकथा, पुणे, १९६४.

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १ ला, खंड ५ वा व खंड ८ वा, भा.इ.सं. मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ३५, क्र. ६१ व क्र. ८५, पुणे.

कासिम, मिर्झा मुहम्मद : आलमगीरनामा (मराठी भाषांतर), भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ५३, शिवचरित्रवृत्तसंग्रह, खंड ३ रा, पुणे, १९४१. (प्रका.)

कुंटे, भ. गं. : अहमदनगरची निजामशाही, मुरली प्रकाशन, मुंबई १९६२.

कुलकर्णी, बाळकृष्ण सखाराम (संपा.) : चिटणीस घराण्याची संक्षिप्त माहिती व सनदापत्रे, पुस्तक १ ले, दादर.

कुळकर्णी, अ. रा. : शिवकालीन महाराष्ट्र, पुणे, १९९७.

खरे, ग. ह. (संपा.) : ऐतिहासिक फारसी साहित्य, खंड १ ते ११, भा.इ.सं. मंडळ, स्वीय ग्रंथमाला.

खोबरेकर, वि. गो. : रेकॉर्डस ऑफ द शिवाजी पिरियड, मुंबई १९७४, तारिखे दिलकशा (इंग्रजी) मुंबई, १९७२, कोकणचा राजकीय इतिहास (इ.स. पूर्व ते १८१८), मुंबई १९९७, मराठेकालीन कोकणचे सामाजिक व आर्थिक जीवन, मुंबई, १९९७.

गुर्जर, मा. वि. (सं.) : करवीरकर घराण्याच्या इतिहासाची साधने, भा. १ कोल्हापूर.

चिटणीस (संपा.) : भारत इतिहास संशोधक मंडळ-त्रैमासिक वर्ष १, २, ३, ६, ७, ९, १०, ११, १२, १४, १६, २३, ३८ भा.इ.सं. मंडळ, पुणे.

जोशी, शं. ना. (संपा.) : ऐतिहासिक चरित्र साहित्य, खंड ३ रा, चित्रशाळा प्रेस, पुणे, १९३०.

जोशी, शं. ना. (संपा.) : ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ५ वा, भा.इ.सं. मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ५५, पुणे, १९५२.

शिवकालीन पत्र सारसंग्रह, खंड १, २ व ३, श्री शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०.

जोशी, शं. ना. (संपा.) : संभाजीकालीन पत्र सारसंग्रह ३-१९४९.

दिवेकर, स. म. (संपा.) : पर्णालपर्वतग्रहणाख्यान-जयरामकविविरचित (संस्कृत-मराठी) कल्याण, १९२३.

पगडी, सेतुमाधवराव : मोगल दरबारची बातमीपत्रे, मुंबई, १९७८. मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध. शके. १८६१. हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पुणे, १९६६ मराठे व औरंगजेब (मासिरे आलमगिरी). मराठे व मोगल (तारीखे दिल्कुशा) मोगल-मराठा संघर्ष, पुणे, १९६४, महाराष्ट्र आणि मराठे, पुणे १९६३.

पवार, आप्पासाहेब (संपा.) : ताराबाईकालीन कागदपत्रे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९६९.

पवार, जयसिंगराव : महाराणी ताराबाई, ताराराणी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर, १९७६.

पारसनीस, द. ब. (संपा.) : इतिहाससंग्रह, मासिक, वर्ष १-७, पुस्तक १ ले ; अंक-१२, जुलै १९०९ ; पुस्तक २ रे १९१०, पुस्तक ३ रे, अंक ७, ८ व ९ फेब्रुवारी ते एप्रिल १९११, सातारा.

पारसनीस, द. ब. (संपा.) : इतिहाससंग्रह मासिकातील पेशवे दप्तरांतील सनदापत्रांतील माहिती, मुंबई, १९१७.

पारसनीस, न. वि. (संपा.) : बुसातीनुस्सला तीनचे भाषांतर, सातारा, १९६८.

पिसुर्लेकर, पां. स. : पोर्तुगीज-मराठे संबंध, पुणे १९६०.

पिंगुळकर, वि. पु. : सावंतवाडी संस्थानचा इतिहास.

पुरंदरे, के. व्ही. (संपा.) : पुरंदरे दप्तर, भाग ३ रा, भा.इ.सं. मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. २१, पुणे १९३४.

पंत प्रतिनिधीची बखर, भारत वर्ष, वर्ष १ ले, अंक १ ला, १८९६.

बेंद्रे, वा. सी. : श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे विचिकित्सक चरित्र, मुंबई, १९७२, छत्रपती संभाजी महाराज, आवृत्ती २ री, पुणे १९७१, मालोजी आणि शहाजी महाराज, मुंबई, १९६७, छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन हिंदवी स्वराज्याचा मोगलांशी झगडा, मुंबई, १९७५.

बेंद्रे, वा. सी. : बुसातिन-उस-सलातीन भाषांतर विजापूरची आदिलशाही मु. म. ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला, मुंबई, १९६८.

बेंद्रे, वा. सी. (संपा.) : केशवपंडितकृतम् राजारामचरितम् (संस्कृत-मराठी इंग्लिश) अथवा केशवपंडितकृत श्री छत्रपती राजाराम महाराज यांचे चरित्र अथवा जिंजीचा प्रवास भा.इ.सं. मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ३६, पुणे, १९३१.

भा.इ.सं. मंडळ, पुणे : वार्षिक इतिवृत्ते व अहवाल.

मावजी पुरुषोत्तम विश्राम व पारसनीस द. ब. (संपा.) : दक्षिणेतील सरदारांच्या कैफियती, यादी वगैरे (मराठी), पुणे १९०८.

मावजी पुरुषोत्तम विश्राम आणि पारसनीस द. ब. (संपा.) : वतन पत्रे, निवाड पत्रे, वगैरे-शाहू आणि पेशवे दप्तरातील, पुणे, १९०९.

मुन्सिफ देवीप्रसादजी : औरंगजेबनामा अर्थात मुगलसम्राट मुहिद्दीन मोहम्मद औरंगजेब अलमगीर बादशहा का इतिहास, (हिंदी भाषांतर) पहिला भाग १९०९, दुसरा भाग १९१०, तिसरा भाग १९१३, मुंबई.

मोडक बाळाजी प्रभाकर आणि वझे दिनकर गोविंद : विजापूरच्या आदिलशाहीचा इतिहास, कोल्हापूर १८८६.

राजवाडे वि. का. (संपा.) : मराठ्यांची इतिहासाची साधने, पुणे खंड १, १८९८, खंड २, १९००. खंड ४, १९००. खंड ८, १९०३. खंड १०, १९०९. खंड १५, १९१२. खंड १६, १९१२. खंड १७, १९१३. खंड १८, १९१४. खंड १९, १९१४. खंड २०, १९१५. खंड २१, १९१८.

रामदास आणि रामदासी मासिक वर्ष २, अंक ३, (१९१६), वर्ष ६, अंक ६५ व ६६ (१९२०), वर्ष २०, अंक २३४ (१९४१).

वाकसकर वि. स. (संपा.) : दत्ताजी त्रिमल वाकेनिविसविरचित, शिवछत्रपतींची, एक्याण्णव कलमी बखर (मराठी व इंग्रजी) भारतवर्ष, राजवाडे साने फॉरेस्ट आणि सरकार यांचे पाठ, मुंबई, १९३०.

शकावल्या, शिवचरित्रप्रदीप, पृ. १४ ते ७१, जेधे शकावली, जेधे करीना शिवापूर दप्तरातील शकावली, शिवापूर देशपांडे, वहींतील, गदाधर, प्रल्हाद शकावली, घोडेगांवकर वहींतील शकावली, सहा कलमी शकावली, इ. पुणे. १९२५.

शिवचरित्र साहित्य खंड १ ते ११ भा.इ.सं. मंडळ, स्वीय ग्रंथमाला.

शिवचरित्रवृत्त, संग्रह-कानडी, खंड १ ला, १९४१ इ. खंड ३ रा, फारशी १९४१ इ., भा.इ.सं. मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ४९ व ५३, पुणे.

सरदेसाई, गो. स. (संपा.) : मावळंकर, सरदेसाई घराण्याचा इतिहास, पूर्वार्ध व उत्तरार्ध, कोल्हापूर, १९३०.

: मराठी रियासत खंड १३-१९८८

: उग्रप्रकृती संभाजी, स्थिरबुद्धी राजाराम.

साने, का. ना. (संपा.) : काव्येतिहास संग्रह क्र. ३१, ऐतिहासिक पत्रे, यादी वगैरे, १८८८.

साने, का. ना. (संपा.) : रघुनाथ यादव ऊर्फ चित्रगुप्तविरचित शिवाजी महाराजांची बखर, काव्येतिहाससंग्रह क्र. २६, पुणे १८९३.

साने, का. ना. (संपा.) : श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र मल्हार रामराव चिटणीस विरचित, आवृत्ती ३ री, पुणे १९१५.

साने, का. ना. (संपा.) : शककर्ते श्रीशिवछत्रपती ह्यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, मल्हार रामराव चिटणीस, कल्याण १९५४.

साने, का. ना. (संपा.) : शिवछत्रपती यांची बखर, ४ थी आवृत्ती, सत्कार्योत्तेजक सभा, धुळे.

संशोधक त्रैमासिक, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे.

भारतीय इतिहास आणि संस्कृती, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई.

Aiyangar Krishnaswami	:	*Ancient India and South Indian History and Culture,* Vol. II, Parts I, II, Mylapur, 1941.
Aiyar Satyanath	:	*History of the Nayakas of Madura,* Oxford University Press, Madras, 1924.
Bernier Francis	:	*Bernier's Travels in the Mughal Empire A.D. 1665-1668,* Westiminster.
Danvers Fredrick Charles.	:	*Portuguese in India, Being a History of the Rise and Decline of their Eastern Empire,* W.H. Allen and Company, London, 1892.
Eilliot H. M. and Dawson John.	:	*History of India by its own Historians,* Vol. VII, London, 1877.
Fonseca Jose Nicolas da.		*An Historical and Archaeological Sketch of the City of Goa,* Vol. I & II.
Foster William	:	*The English Factories in India,* Clarendon Press, Oxford, Vol. 1618-1621, 1906/Vol. 1622-1623, 1908/Vol. 1624-1629, 1909/Vol. 1630 1633, 1910/Vol. 1634-1636, 1911/Vol. 1637-1641, 1912/Vol. 1642-1645, 1913/Vol. 1646-1650, 1914/Vol. 1651 1654, 1915/Vol. 1655-1660, 1921/Vol. 1663-1665, 1923.
Graham D. C.	:	*Selections from the Records of the Bombay Government,* Satara Deccan etc. and Vol. VII, New Series, Statistical Report of the Municipality of Kolhapur, Bombay, 1854.
Jervis, T. B.	:	*Geographical and Statistical Memories of the Konkan.*
		Journal of the Bombay Historical Society, Vol. II.
Kelkar N. C. & Apte D. V. (ed.)	:	*English Records on Shivaji 1659 to 1682 A.D.* Shivaji Tercentenary Vol. II, Shivacharitra Karyalaya, Poona, 1931.

Malet C. W. : *Wakiyat-i-Sunot,* Bombay, 1704.

Manucci N. : *Storia da Mogor* (Indian Text Series), Vol. II & III translated with introduction and notes by William Irvine, London, 1907.

Ovington J. : *A Voyage to Surat in the year 1689,* Oxford University Press, London, 1929.

Proceedings of the Indian History Congress, Vol. IV, VI, XIX, XX, XXI, XVIII, XXIII, Sessions held at Delhi, Bardoa, Mysore, Trivendrum, Aligarh, Udaipur, in 1922, 1940, 1943, 1943, 1945 and 1960, New Delhi, Lahore 1924.

Rice B. Lewin : *Ephigraphia Carnatica,* Mysore Archaeological Series, Vol. X 1906.

Roe Thomas and Fryer John : *Travels in India in the Seventeenth Century,* Trubner and Co., London, 1873.

Rule Harris William : *History of the Inquisition,* London, 1868.

Saksena Banarsi Prassad : *History of Shaha Jahan of Delhi,* Allahabad, 1958.

Sarkar J. N. : *Rajasthani Records, Shivaji's Visit to Aurangzeb at Agra.*

Sarkar Jadunath : *Aurangzeb.*

Sarkar Jadunath : "Life of Shivaji (1665-1666 A.D.)", *Dr. Bhandarkar, Commemoration Volume,* Bhandarkar Oriental Research Institute, Poona, 1917.

Sarkar Jadunath : *House of Shivaji,* Calcutta, 1935.

Sarkar Jadunath : *Shivaji and his Times,* Orient Longman Ltd., Bombay 1973.

Sen Surendranath : *Foreign Biographies of Shivaji,* Vol. II, Book Company Ltd., Calcutta, 1931.

Administrative System of the Marathas, University of Calcutta, Calcutta, 1925.

Swaminathan K. D. : *The Nayaks of Ikkari,* Madras 1957.

Verma, D. C. : *History of Bijapur,* New Delhi 1974.

Travel Accounts


Abbe Carre : *The Travels of Abbe Carre in India and the near east,* London, 1947-48.


Foster, W (ed.) : *Early Travels in India,* New Delhi, 1968.

Fryer, John : *A New Account of East India and Persia being nine years travels,* London, 1909.

Tavernier, J. B. : *Travels in India* by, Tr. from the original french edition London, 1889.


Thevenot and Careri Indian Travels of Ed. by Surendranath Sen, New Delhi, 1949.



मराठ्यांची मोगल प्रदेशावर चढाई
चोपडा
बऱ्हाणपूर
धरणगांव
एदलाबाद
अकोट
तळेगांव
धुळे
एरंडोल
जळगांव
मलकापूर
दर्यापूर
खोलापूर
अमरावती
एलिचपूर
धामण
अकोला
मुर्तिजांपूर
धामणगाव
बाळापूर
फर्दापूर
अजंठा
बुलढाणा
करंजा
अंतोर
चिखली
कन्नड
सिलोड
मंगळूरपीर
चांधाकडे
मेहकर
वेरूळ
देऊळगाव राजा
वाशिम
दौलताबाद
वैजापूर
औरंगाबाद
जालना
पिंपळगाव राजा
गंगापूर
नेवासे
अंबड
सारंगपूर
पैठण
५० कि. मी.
०
५० मैल.
०



DECCAN P. WORKS, POONA CITY.

B.D.H.


आधाय ३०वा
परमानन्दकृत शिवभारत.
शके १५८३ मधील
कोंकणावरील स्वारी.
स्केल
एक इंचांत २४ मैल प्रमाणें.
कुलाबा जिल्हा
सुवर्णदुर्ग
पालगड
अंबवलीघाट
दाभोळ
परशुराम
चिपळूण
तीतगड
धामणसें
कोतवडें
देवरुख
आंबेघाट
रत्नागिरी
हरचेरी
पावस
पुरणगड
सातवली
भालवली
जैतापूर
मोठणें
विजयदुर्ग
खारेपाटण
देवगड
फोंडाघाट
रामगड
भगवंतगड
सिद्धगड
मालवण
कुडाळ
सावंतवाडी


धुळे
साल्हेर
मुल्हेर
बागुलाण
हनवंत गड
जवळा गड
पिंपळगाव
रामसेज
नाशिक
त्रिंबकगड
जव्हार
गिरणा नदी
दमण
डहाणू
तारापूर
माहीम
बसई
ठाणे
भिवंडी
कल्याण
तळोजे
पनवेल
मुंबई
उरण
करंजा
खांदेरी
अलिबाग
नागाव
चौल
कोलाई
सुधागड
जंजिरा
माणगाव
पाचाड
रायगड
महाड
श्रीवर्धन
पोलादपूर
प्रतापगड
दाभोळ
चिपळूण
सातारा
सज्जन गड
जयगड
रत्नागिरी
राजापूर
संगमेश्वर
खेळणा
पन्हाळा
कोल्हापूर
कागल
मिरज
सांगली
कराड
सिंधुदुर्ग
मालवण
कुडाळ
सावंतवाडी
वेंगुर्ले
बांदा
पणजी
फोंडा
कारवार
बेळगाव
शहापूर
मुरगोड
सपगाव
दोड्वाड
धारवाड
हुकेरी
पवित्र गड
काकती
नरगुंद
संगमनेर
प्रवरा नदी
जुन्नर
शिवनेरी
नारायणगाव
अहमदनगर
पारनेर
पुणे
सिंहगड
तोरणा
राजगड
पुरंदर
मोरगाव
बारामती
इंदापूर
टेंभुर्णी
अकलूज
फलटण
धर्मपुरी
माळशिरस
कोरेगाव
दहिवडी
(माण)
पंढरपूर
सांगोला
सोलापूर
विजापूर
पैठण
औरंगाबाद
दौलताबाद
खुलताबाद
वेरूळ
गंगापूर
नेवासे
बेजापूर
शेवगाव
पाथर्डी
आष्टी
श्रीगोंदे
पेडगाव
(बहादुर गड)
वाई
भोर
शिरवळ
खंडाळा
चाकण
आळंदी
गोवा
शिवाजी महाराजांची राज्य सीमा
संभाजी राजांची राज्य सीमा
(स्थूलमानाने)
कि. मीटर
मैल

नामसूची

च

ज

भ

म

य

र

स्थळसूची

अ

फ

ब

य

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई



आठव्या कोकण मराठी साहित्य संमेलनाचे कोकण साहित्यभूषण गौरवचिन्ह देऊन सन्मानित केलेले डॉ. विठ्ठल गोपाळ खोबरेकर एम्.ए.,पीएच.डी. जन्म २० जुलै १९२३. हे संचालक पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, या पदावरून इ.स १९८१ त निवृत्त झाले. शासकीय सेवेत असता मुंबई, पुणे कोल्हापूर येथील ऐतिहासिक दप्तरखान्यांतील लाखो ऐतिहासिक मोडी कागदपत्रांचे वर्णनात्मक सूचीकरण करवून घेतले व अभ्यासकांसाठी सूची ग्रंथ प्रसिद्ध केले. तसेच आर्कइव्हल बुलेटीन या मालेतील १० पुस्तके व अन्य १२ संशोधकीय ग्रंथाचे संपादन केले. इ. स. १९६९ पासून मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाचे संचालक व भारतीय इतिहास आणि संस्कृती या संशोधकीय त्रैमासिकाचे संपादक. पीएच.डी. विद्यार्थ्यास मार्गदर्शन करण्यासाठी मार्गदर्शक प्राध्यापक म्हणून मुंबई विद्यापीठाची मान्यता अनेक ऐतिहासिक शोध निबंधांचे कर्ते. सुमारे ३३ संशोधकीय ग्रंथांचे लेखक/संपादक. त्यातील उल्लेखनीय असे खालील ग्रंथ.

१) महाराष्ट्रातील सशस्त्र उठाव (१८१८-१८६०)
२) गुजरातेतील मराठी राजवट (१६६४-१८१८)
३) गुजरातेतील सशस्त्र उठाव (१८५७- १८६४)
४) मराठ्यांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम
५) मराठे कालीन राजपुरूष, सरदार यांची हस्ताक्षरयुक्त पत्रे
६) तारिखे इ दिलकशा (इंग्रजी)
७) रेकॉर्डस् ऑफ द शिवाजी पिरियड
८) महाराष्ट्रातील दप्तरखाने (दु.आ.)
९) मराठी अंमलाचे स्वरुप
१०) शिवाजी मेमोरियल्स् ब्रिटीश ॲटीट्यूड
११) यशवंतराव चव्हाण : विधीमंडळातील भाषणे (मराठी)
१२) यशवंतराव चव्हाण : विधीमंडळातील भाषणे (इंग्रजी)
१३) महारष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (१८१८-१८८५)
१४) महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड -भाग १ ला (इ.स. १६३० ते १७०७)
१५) महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड -भाग २ रा (इ.स. १७०७ ते १८१८)
१६) कोकणचा राजकीय इतिहास (इ.स. पूर्व ते १८१८)
१७) मराठे कालीन कोकणचे सामाजिक व आर्थिक जीवन
१८) कोकण : फ्रॉम द अर्लियस्ट टु १८१८ अे.डी.

कोकणचा सर्वांगीण इतिहास व कोकणवासियांचा चरित्रकोश (२ खंड) इतिहास संशोधन मंडळातर्फे पुरे करण्याचा संकल्प